विनायक दामोदर सावरकर

एक चिकित्सक अभ्यास

(सावरकरांच्या वाङ्मयातून प्रतीत होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व)

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क ९८५३

प्रभाकर लक्ष्मण गावडे
एम्. ए., एम्. एड्.; पीएच्. डी.

REFBK-0017764

स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे

103902
9/1/69
२-१३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 JAN 1976
24 JAN 1979
27 FEB 1980
2/3/83
23 MAR 1983
24 AUG 1983

विनायक दामोदर सावरकर

एक चिकित्सक अभ्यास

(सावरकरांच्या वाङ्मयातून प्रतीत होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व)

प्रभाकर लक्ष्मण गावडे

एम्. ए., एम्. एड्.; पीएच्. डी.

REFBK-0017764

स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे

Title : ' V D. SAVARKAR : A Critical Study '
(Marathi)
Author : Shri. PRABHAKAR LAXMAN GAWADE,
Deopurkar's Wada,
319 Navi Peth, Poona-30,
(Maharashtra State, India)
Publisher : Shri. VISHNU PARASHURAM MAHAJAN,
Swadhyaya Mahavidyalaya Prakashan,
567 Sadashiv Peth, Poona-30.

© प्रभाकर लक्ष्मण गावडे (१९२४ —)
द्विबिंदु वर्गीक ओ १५५, एम ८३ : जी
दशांश वर्गीक ८९१·४६०९

मुद्रक : सौ. उषा ज. नागपूरकर,
श्री मुद्रण मंदिर,
९१४ सदाशिव पेठ,
पुणे – ३०.

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर १९७०

मुखपृष्ठ : अनंत सालकर, पुणे

मूल्य पंचवीस रुपये

जिची व्यक्तिरेखा

माझ्या रांगत्या बाळपणीच

काळाने पुसून टाकली

त्या माझ्या आईस—

कै. ती. सौ. जानकी तथा ताई हीस

सप्रेम समर्पण.



मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वतंत्र
अनुक्रम... दि: ...
क्रमांक ... दि: ...

पुरस्कार

डॉ. प्र. ल. गावडे यांनी पीएच्. डी. च्या प्रबंधासाठी 'सावरकर' हा विषय घेण्याचे ठरविले तेव्हा प्रथम मला जरा काळजीच वाटत होती. सावरकरांचे साहित्य हा एक महोदधी आहे. त्याच्या पार जाणे हेच आधी मुष्कील. मग त्यात अवगाहन करून त्याचे स्वरूप यथार्थपणे सांगणे ही गोष्ट सामान्यतः दुष्करच होय. शिवाय दुसरे असे की सावरकरांनी वाङ्मयाच्या सर्वच क्षेत्रांत अनिरुद्ध संचार केला आहे. त्यांनीं 'हिंदुत्वा'सारखे ग्रंथ लिहिले आहेत, 'हिंदुपदपातशाही,' 'सहा सोनेरी पाने' यांसारखे इतिहास लिहिले आहेत. सावरकर कवी आहेत. आणि महाकवी असा त्यांचा गौरवही झालेला आहे. ते नाटककार आहेत, आणि त्यांच्या नाटकांविषयीं तीव्र मतभेद असले तरी खाडिलकरांसारख्या नाट्याचार्यांनी त्यांच्या नाटकांना अश्रूंचा अभिषेक घातला हेही खरेच आहे. सावरकर कादंबरीकार आहेत, लघुकथाकार आहेत, निबंधकार आहेत. ते सर्व काही आहेत. यामुळे त्यांच्या वाङ्मयसागराचे मंथन करून त्यातून काही नवनीत काढणे हे पीएच्. डी. च्या विद्यार्थ्याला कितपत शक्य आहे याविषयी मला शंका होती.

वाङ्मयाच्या या अफाट विस्ताराबरोबरच त्यातील विषयाचा विस्तारही तसाच अफाट आहे. त्यात कोणता विषय नाही? समाजकारण, राजकारण, धर्म, इतिहास, भारतातल्या प्रचलित घडामोडी, जगातल्या घडामोडी, सत्य-अहिंसेचे तत्त्वज्ञान, जातिभेद, चातुर्वर्ण्य, हिंदु-मुस्लीम समस्या, क्रान्तीचे तत्त्वज्ञान, अनेक थोर क्रान्तिवीरांची चरित्रे, परमेश्वराचे अस्तित्व, त्यामागचा भोळेपणा, विज्ञानवाद, राष्ट्रवाद, लोकशाहीची तत्त्वे, भिन्न भिन्न संस्कृतींचे उत्कर्षापकर्ष, लिपिशुद्धी, भाषाशुद्धी—अमुक एक विषयात सावरकरांच्या प्रतिभेने संचार केला नाही असे नाहीच. आता एवढ्या भिन्न क्षेत्रातल्या विचारांचे मूल्यमापन करावयाचे म्हणजे अभ्यासकाला केवढा उद्योग हवा!

आणि हे सर्व करून त्यातून काही नवे सांगायला हवे. सावरकरांच्या विषयाचा एक चांगला ग्रंथ—एवढेच करून भागण्याजोगे नव्हते. पीएच्. डी. चा प्रबंध लिहावयाचा होता. काही नवे संशोधन, सावरकरांच्या वाङ्मयाकडे पाहण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन, त्यांच्या विचारांची नवी संगती असे काही असल्याशिवाय वाचून प्रबंधाला मान्यता मिळणे शक्य नव्हते. सावरकरांच्या विषयी तोपर्यंत

विपुल लिहिले गेले होते. त्यांची चरित्रे अनेकांनी लिहिली होती. त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन करणारे अनेक लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांचे काव्य, त्यांची नाटके यांवर टीकाही झाली होती. त्यांच्या राजकीय व सामाजिक सिद्धान्तांवर तर कडाक्याचे वादविवाद झाले होते. अशा स्थितीत सावरकरांच्यावर प्रबंध लिहावयाचा म्हणजे भलतीच जोखीम होती.

पण या सर्व अडीअडचणींतून श्री. गावडे यांनी मार्ग काढला. सावरकरांचे सर्व वाङ्मय–त्यांचे काव्य, त्यांची नाटके, कादंबऱ्या, निबंध, प्रबंध इ. सर्व साहित्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्फुरलेले आहे; त्या साहित्यातील विषय, कथानके, घटना, त्यांतील प्रतिपादन, त्यांची शैली या प्रत्येक घटकावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची स्पष्ट छाप आहे हे त्यांच्या ध्यानी आले. आणि त्या दृष्टिकोनातून त्यांच्या सर्व साहित्याचे परीक्षण करावयाचे त्यांनी ठरविल्यामुळे नवे काय सांगावयाचे हा मोठा बिकट प्रश्न सुटला.कारण अशा दृष्टीने त्यांच्या साहित्याचे परीक्षण कोणीच केलेले नव्हते. शिवाय आत्माविष्कार हे अलीकडे सर्वांत मोठे साहित्यमूल्य मानले जाते. लेखक काहीही लिहो तो स्वतःविषयीच लिहीत असतो, असे म्हटले जाते. आत्माविष्काराचे असे अनन्य महत्त्व असल्यामुळे त्या दृष्टीने लिहिलेल्या प्रबंधाला प्रतिष्ठा चांगली लाभेल असे वाटले. आणि त्यामुळे मग तोच विषय निश्चित करण्यात आला. पुढचा प्रश्न मेहेनतीचा, कष्टाचा, दीर्घोद्योगाचा होता. पण श्री. गावडे यांनी त्यात कसूर केली नाही हे त्यांचा प्रबंध वरवर चाळणाऱ्यांनाही दिसून येईल.

काव्य, नाटक, कादंबरी, लघुकथा, निबंध इत्यादी जे वाङ्मयप्रकार, त्या प्रत्येकावर गावडे यांनी स्वतंत्र प्रकरणे लिहून त्यांची चर्चा केली आहे. ती करताना त्या प्रत्येक प्रकाराचे रूढ तांत्रिक दृष्टीने प्रथम त्यांनी विवेचन केले आहे. चरित्रकार सावरकर या प्रकरणाच्या प्रारंभी आंद्रे मोर्वा, एस्. पी. सक्सेना इत्यादी टीकाकारांच्या आधारे त्यांनी प्रथम ' चरित्र ' या वाङ्मय-प्रकाराच्या स्वरूपाची चर्चा केली. आणि मग ' मॅझिनी ', ' तेजस्वी तारे ' इत्यादी त्यांच्या चरित्र ग्रंथांचे मूल्यमापन केले आहे. आणि ते करतानाच हिंदुत्वनिष्ठा, हिंदुराष्ट्रवाद, त्याग, हौतात्म्याचे आकर्षण, क्रान्तिवृत्ती इत्यादी सावरकरांच्या आंतरिक गुणांचा आविष्कार त्यांत कसा झाला आहे, ते त्यांनी साधार, सप्रमाण दाखविले आहे. त्यांच्या निबंधांची चर्चा करताना प्रथम न्यूवोल्ट; प्रीस्टले यांचे विचार त्यांनी मांडले. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी म्हटले आहे की, लेखकाच्या व्यक्तित्वाचा शब्दरूप आविष्कार म्हणजे त्याचे वाङ्मय, अशी जर वाङ्मयाची व्याख्या केली, तर त्या व्याख्येच्या कसोटीला सावरकरांचे

निबंध लेखन पुरेपूर उतरण्यासारखे आहे. वरील दोन टीकाकारांनी हेच मत मांडले आहे. ही मते प्रथम देऊन मग पुढे त्यांच्या अनुरोधाने सावरकरांच्या निबंधातून स्वतः सावरकर दर पावलाला कसे प्रगट होतात, ते श्री. गावडे यांनी स्पष्ट केले आहे. काव्य, कादंबरी, लघुकथा या वाङ्मय-प्रकारांची चर्चा करताना हीच प्रद्धत त्यांनी अवलंबिली आहे.

येथे व्यक्तित्व म्हणजे काय आणि वाङ्मयात ते प्रगट होणे म्हणजे काय, असे प्रश्न सहजच निर्माण होतात. याविषयी अनेक वाद आहेत. साहित्यातील आत्माविष्कार याचे फार विचित्र अर्थ लोकांनी केले आहेत. ते सर्व ध्यानात घेऊन श्री. गावडे यांनी वाङ्मय-परीक्षणाला प्रारंभ करण्यापूर्वी लेखकाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे काय हे निश्चित करून घेतले. त्या अन्वये सावरकरांच्या व्यक्तित्वाचे ठळक घटक पाहिले आणि मग त्यांचा आविष्कार त्यांच्या बहुविध साहित्यात कसा होतो हे दाखविण्यास प्रारंभ केला. ही पद्धत अवलंबिल्यामुळे त्यांच्या विवेचनाला शास्त्रशुद्ध रूप आले आहे.

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे घटक निश्चित करणे आणि ते त्यांच्या साहित्यात कसे प्रगट झाले आहेत ते दाखविणे हे काम वरवर दिसते तसे सोपे नाही. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत संमिश्र व जटिल असे आहे. सामान्यतः कोणत्याही थोर पुरुषाचे व्यक्तिमत्त्व असेच असते. अनेक प्रकारच्या विचार-विकार-वृत्तींच्या धाग्यादोऱ्यांची वीण होऊन ते बनलेले असते. अलीकडे तर कोणत्याही अगदी सामान्य माणसाचे व्यक्तिमत्त्वही असेच संकुल, संमिश्र असते असे मानसशास्त्रज्ञ सांगतात. मग थोर पुरुषांच्या मनाची घडण तशी असेल यात शंकाच नाही. त्यातही सावरकरांनी अनेक क्षेत्रांत वाढविलेले व्याप, त्यांच्या जीवनकाळी भोवतालच्या परिस्थितीत झालेली विचित्र परिवर्तने, भारतात निर्माण झालेले आत्मघातकी तत्त्वज्ञान यांचा परिणाम होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ संकुल, जटिल झाले होते; एवढेच नव्हे तर वरवर पाहणाऱ्याला त्यात परस्पर विरोधी, विसंगत असे अनेक घटक, अनेक धागेदोरे दिसतात. असे असल्यामुळे या सर्व घटकांचा, विचार-विकार-प्रवाहांचा, त्यांच्या बहुविध कार्याचा, त्यांच्या भाषणांचा बारकाईने अभ्यास करून त्यांची एक संगती लावून दाखविणे अवश्य होते. डॉ. गावडे यांनी हे काम अतिशय कुशलतेने केले आहे. त्यांच्या या प्रबंधाचे मोल आहे ते यात आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची राष्ट्रनिष्ठा अगदी ज्वलंत होती. तो त्यांच्या सर्व चळवळींचा आत्मा होता. सर्व तत्त्वज्ञानाचा मूलाधार होता हे जगजाहीर आहे. पण हेच सावरकर मानवतावादी होते हे किती जणांना माहीत आहे?

आणि तसे असल्यास या दोन निष्ठांची सांगड ते कशी घालीत असत ? ' ज्यांत सर्व मनुष्य जातीचा समावेश होईल व जेथील एकूण एक स्त्रियांना व पुरुषांना ही पृथ्वी, ही भूमी, आणि हा प्रकाश–हीच खरी मनुष्याची पितृभूमी आणि मातृभूमी आहेत – ह्यांच्यापासून मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करायचा आणि त्यांचा उपभोग घ्यायचा समान अधिकार राहील, असे संपूर्ण जगाचे एक राष्ट्र करणे ' हे सावरकरांचे उच्चतम ध्येय होते. मानवाचे परम कल्याण साधण्याच्या आपल्या ध्येयाचा उल्लेख त्यांनी अनेक ठिकाणी केला आहे. ते म्हणतात, " आमची खरी जात मनुष्य, खरा धर्म माणुसकी, मानवधर्म, खरा देश पृथ्वी, खरा राजा ईश्वर. " यावरून व्यक्तीपेक्षा राष्ट्रहित व राष्ट्रहितापेक्षा मानवताहित त्यांना श्रेष्ठ वाटे असे निश्चित दिसते. पण भारताचा विचार करताना ते हिंदु-राष्ट्राचा पुरस्कार करतात. हिंदुत्व ही त्यांची आद्यनिष्ठा आहे. आणि त्यासाठी मारता मारता मरावे, हे व्रत त्यांनी घेतले होते व लोकांना ते उपदेशही तसाच करीत. या परस्पर विरोधी निष्ठांची ते स्वतः संगती कशी घालीत असत, ते डॉ. गावडे यांनी चांगल्या रीतीने स्पष्ट केले आहे. ही सर्व द्वंद्वे सोडविण्याची एकच कसोटी सावरकरांनीं सांगितली आहे. आणि ती म्हणजे उपयुक्ततावाद. या कसोटीवर त्यांनी व्यक्ती, राष्ट्र, मानुषक, त्याचप्रमाणे सत्य आणि असत्य, हिंसा आणि अहिंसा, धर्म आणि अधर्म इत्यादी द्वंद्वे व तत्त्वे घासून त्यांच्या मर्यादा सांगितल्या आहेत. ' अधिकात अधिक मनुष्यांचे हित हेच सर्व सद्गुणांचे समर्थन होय ' असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता; आणि ते साधण्यासाठीच त्यांना स्वातंत्र्य हवें होते. ' अखिल मनुष्यमात्राचे कल्याण व्हावे म्हणून आम्हांस स्वतंत्रता हवी होती, ' असे त्यांनी म्हटले आहे. हे विवेचन पाहिल्यावर सावरकरांचे मानवता-प्रेम व त्यांचा आक्रमक राष्ट्रवाद यांत विसंगती आहे असे मुळीच वाटत नाही. किंवा त्यांचे मानवता-प्रेम हे कृत्रिम असावे अशी शंका येत नाही. गाय आल्फ्रेडसारखे पाश्चात्त्य क्रांतिकारक त्यांना केवळ हिंदी देशभक्त मानीत नाहीत तर सर्व जगताचे नागरिक व मानव जातीचे मार्गदर्शक मानतात ते यामुळेच.

सावरकर अत्यंत भावनाप्रधान होते, त्यांचे रागद्वेष अगदी उत्कट होते. पण ते तितकेच विवेकनिष्ठ व बुद्धिनिष्ठही होते. ' सागरा प्राण तळमळला ' या कवनातील त्यांच्या भावना कोणाच्याही हृदयाला जाऊन भिडतील अशाच आहेत. अंदमानहून परत येताना त्यांना हिंदुस्थानचा तट दिसू लागताच ते भक्तिभावाने थरथरून उठले. त्यांचा आनंद गगनात मावेना. हर्षभराने त्यांनी स्वातंत्र्य-लक्ष्मीचा जयजयकार केला. सिंधप्रांत, सिंधु देश व सिंधु नदीचे खोरे हा सर्व प्रदेश पाकिस्तानात जाणार हे कळल्यावर त्यांनी सिंधू नदीविषयी जे

उद्गार काढले, ते भावनेने नुसते ओथंबलेले, अगदी ओले झालेले आहेत. हिंदु धर्म, हिंदुजाती, भारताचे स्वातंत्र्य, हिंदुसंघटन यांच्या हिताविरुद्ध कोणी विचार मांडले तर सावरकर किती जळजळीत शब्दांत त्याचा निषेध करीत, त्या वेळी त्यांच्या उपरोधाला किती तिखट धार चढे हे सर्वांना माहीतच आहे. पण तरीही सावरकर अत्यंत विवेकनिष्ठ होते हे तितकेच खरे आहे. यासंबंधी चर्चा करताना डॉ. गावडे यांनी स्वतः सावरकरांचे व त्यांच्यासंबंधी इतरांचे उद्गार उद्धृत करून या दोन वृत्ती त्यांच्या ठायी अविरोधाने कशा नांदत होत्या ते चांगल्या रीतीने विशद केले आहे. सावरकरांनी स्वतःच म्हटले आहे की 'लहानपणापासूनच माझी भावना जितकी उत्कट तितकीच माझी बुद्धीही तर्कट पडल्यामुळे दोघी सख्ख्या पण छटेल बहिणींप्रमाणे परस्परांचा पाणउतारा करण्यासाठी टपून बसण्यातच त्यांच्या परस्पर प्रेमाची करमणूक चाललेली असे.' हिंदुधर्माचे सावरकर कडवे अभिमानी असूनही 'बुद्धिवादाने धर्म-प्रसार करण्यास प्रत्येकाला अधिकार आहे' असे ते सांगत. प्राचीन हिंदुपरंपरेचा त्यांना किती जाज्वल्य अभिमान होता हे सर्वश्रुत आहे. तरी पण शंकराचार्यादी धर्मसुधारणा करण्यास विरोध करणारे पुराणवादी आचार्य, यज्ञसंस्था आणि त्यांसारख्याच हिंदूंच्या अनेक वेडगळ चालीरीती यांवर त्यांनी कडक टीका केली आहे. प्राचीन संस्कृतीचा तीव्र अभिमान असूनही हिंदुराष्ट्रास जगावयाचे असेल तर त्याने प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, अद्यतन संस्कृतीचा अवलंब केला पाहिजे, असे ते निक्षून सांगतात.

हिंदु धर्माचा सावरकरांना उत्कट अभिमान होता. पण परमेश्वरावर त्यांची श्रद्धा नव्हती. तसल्या भोळ्या श्रद्धेबद्दल ते वडील बंधूंचीसुद्धा चेष्टा करीत. देवलसी वृत्तीचा त्यांना अत्यंत तिटकारा होता. हिंदुधर्माचा अभिमान असूनही प्राचीन शास्त्री पंडितांनी अत्यंत निंद्य मानलेला वर्णसंकर ते 'संकरः स्वर्गायैव,' असे म्हणून गौरवितात. तो अभिमान चित्तात धगधगत असूनही ते गोपूजनावर प्रखर टीका करतात. यामुळेच पुराणवादी शास्त्रीपंडितांनी सावरकरांशी उभा दावा धरला होता. सभा भरवून ते त्यांचा निषेध करीत. मग सावरकरांच्या धर्माभिमानाचा अर्थ काय? अर्थ सोपा आहे. राष्ट्रनिष्ठा, हिंदु राष्ट्रभक्ती हाच ते धर्म मानीत. त्यांच्या मते उपयुक्ततावाद हेच नीतिशास्त्र, हीच क्रान्तीची मनुस्मृती. 'धारणात् धर्ममित्याहुः।' ही धर्माची व्याख्या ते मानीत. समाजाच्या उत्कर्षासाठी उपयुक्त ते सर्व धर्म या कक्षेत येत. याच दृष्टीने श्रीकृष्ण हा उपयुक्ततावादाचा पहिला आचार्य असे ते मानीत.

सावरकरांच्या विचारसरणीत अशाच प्रकारच्या अनेक बाह्यतः परस्पर विरोधी भासणाऱ्या निष्ठा होत्या, वृत्ती होत्या. त्या सर्वांची सविस्तर चर्चा

करून त्यांतून प्रतीत होणारे सावरकरांचे सुसंगत, सूत्रबद्ध, एकजिनसी तत्त्वज्ञान डॉ. गावडे यांनी सिद्ध करून दाखविले आहे. त्या थोर राष्ट्र-पुरुषाच्या, त्याच्या कार्याच्या व त्याच्या जीवननिष्ठेच्या अभ्यासाच्या दृष्टीने डॉ. गावडे यांनी हे एक मोठे कार्य केले आहे, असे म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही.

डॉ. गावडे यांच्या मनात सावरकरांच्या साहित्याबद्दल गाढ भक्ती आहे. या थोर पुरुषाविषयी त्यांच्या मनांत निःसीम आदर आहे. त्यांनी त्यांची प्रबंधात स्वतंत्र अशी स्तुतिस्तोत्रे गायिली नाहीत हे खरे. तसे करणे संशोधनाच्या दृष्टीने उचितही झाले नसते. त्यामुळे त्यांनी चिकित्सेच्या, विवेचनाच्या, साहित्य-मीमांसेच्या सर्व मर्यादा संभाळल्या आहेत. सावरकरांच्या साहित्याचे मूल्यमापन करताना त्यांनी आंधळ्या भक्तीने काहीही लिहिलेले नाही. सावरकरांची नाटके, त्यांच्या कादंबऱ्या व लघुकथा यांचे परीक्षण करताना असे होण्याचा फार संभव होता. परंतु त्यांनी ते कटाक्षाने टाळून जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ दृष्टीने ती चिकित्सा केली आहे. सावरकरांनी आपले सर्व ललित-साहित्य, प्रचार हाच हेतू मनात ठेवून लिहिलेले आहे. हिंदुत्व, हिंदुराष्ट्रवाद, हिंदुपरंपरेचा अभिमान त्यांना हिंदू जातीमध्ये जागृत करावयाचा होता. हिंदू-मध्ये विज्ञानदृष्टी, बुद्धिप्रामाण्यवाद व प्रखर चिकित्सकवृत्ती त्यांना जागृत करावयाची होती. आणि त्या हेतूनेच त्यांनी कादंबऱ्या, नाटके लिहिली. अर्थातच त्यामुळे साहित्याच्या सौंदर्याला बाध आला आहे. ते साहित्य लालित्याच्या दृष्टीने उणे झाले आहे. प्रचाराच्या हेतूमुळे त्या साहित्यात निर्माण झालेले सर्व दोष डॉ. गावडे यांनी अत्यंत मर्यादेने पण स्पष्ट शब्दांत दाखवून दिले आहेत. तसे त्यांनी केले नसते तर त्यांची चिकित्सा एकांगी झाली असती. प्रबंधाची प्रतिष्ठा जरा कमी झाली असती. पण तसे झालेले नाही.

सावरकरांच्या नाटकांचे परीक्षण करताना वाङ्मयेतर कार्याला व प्रचाराला महत्त्व दिल्यामुळे कोणकोणते दोष निर्माण झाले आहेत, ते त्यांनी त्या प्रकरणात सविस्तर सांगितले आहे. सावरकरांनी कथानक-रचनेत तंत्राकडे लक्ष दिलेले नाही. नाट्यप्रयोग नजरेसमोर ठेवून प्रवेशांची रचना त्यांनी कोणत्याच नाटकात केलेली दिसत नाही. संभाव्यता, तर्कशुद्धता व अपरिहार्यता हे निकष त्यांच्या नाटकांना समाधानकारकरीत्या लावून दाखविता येत नाहीत. 'उःशाप' नाटकात त्यांनी दैवी चमत्कार दाखवून, श्रीकृष्णाला अवतार व्यावयास लावून चोखामेळ्याची सुटका केली आहे. आपल्या तीनही नाटकांत त्यांनी अपमृत्यू दाखविले आहेत. हौतात्म्याचे त्यांना अतीव आकर्षण असल्यामुळे त्यांनी स्वाभाविकता व अपरिहार्यता यांकडे दुर्लक्ष केले आहे. यावरून असे दिसते की, कलावंत सावरकरांवर प्रचारक सावरकर मात करतात.

त्यांच्या ह्या बोधवादाचा परिणाम स्वभाव-लेखनावरही झाला आहे. बोधवादामुळे त्यांनी निर्मिलेल्या स्वभावरेखा निर्जीव व कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे वाटतात. त्यांची बहुतेक पात्रे त्यांच्या मतांची मुखयंत्रे झाली आहेत. नाटकांतील मानवी पात्रे सावरकरांचे विचार बोलतात हे एक क्षम्य समजले जाईल, पण परमेश्वर, भगवान श्रीकृष्णसुद्धा सावरकरांचेच विचार बोलण्याइतके परप्रत्ययबुद्धीचे झालेले पाहून आश्चर्य वाटते. सावरकरांच्या बुद्धिमत्तेचा, युक्तिवादाचा, कोटिक्रमांचा वारसा बहुतेक सर्व पात्रांच्या वाट्याला आलेला दिसतो. मग ती पात्रे स्पृश्य असोत, अस्पृश्य असोत, सुशिक्षित असोत, अशिक्षित असोत. सावरकरांच्या नाटकांत यांमुळे स्वभावलेखनाची फार हानी झाली आहे.

नाटकातील संवाद, भाषा, प्रारंभ, शेवट या सर्व घटकांवरच त्यांच्या प्रचारकी वृत्तीचा परिणाम होऊन सौंदर्यहानी झाली आहे. पात्रांची भाषा पात्रांना अनुरूप नाही, एवढेच नव्हे तर तीनही नाटकांत सावरकरांनी जी भाषा वापरली आहे ती अनेक ठिकाणी क्लिष्ट, बोजड व संस्कृतप्रचुर अशी आहे. त्यांच्या नाटकांतील अनेक वाक्ये इंग्रजी घडणीची आहेत. आणि नाटकांतले प्रसंग मात्र इंग्रजांनी या भूमीत पाऊल टाकण्यापूर्वी अनेक शतके घडलेले.

कथाकादंबऱ्यांचे परीक्षण करतांना डॉ. गावडे यांनी त्यांतील दोषांची अशाच मार्मिक चिकित्सा केली आहे. या सर्व प्रकरणांतून त्यांनी सावरकरांच्या साहित्याचा यथायोग्य गौरव तर केला आहेच, पण तसे करताना सावधतेने त्यातील दोष, उणिवा यांही दाखविल्या आहेत.

--पण दोषदर्शन हा गौण भाग होय. सावरकरांच्या साहित्यातून वीर सावरकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे उज्ज्वल दर्शन कसे घडते, ते दाखविणे हा प्रबंधाचा मुख्य विषय आहे. आणि आपला हेतू डॉ. गावडे यांनी उत्तम रीतीने सिद्धीस नेला आहे. अशा रीतीने हा प्रबंध लिहून मराठी टीकावाङ्मयात मोलाची भर टाकल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून हे प्रास्ताविक मी पुरे करतो.

पु. ग. सहस्रबुद्धे

ऋणनिर्देश

'सावरकर : एक चिकित्सक अभ्यास' या प्रबंधलेखनामागील माझी भूमिका या ग्रंथातील 'निवेदना'त मी स्पष्ट केलेली आहेच. येथें फक्त ऋणनिर्देश करावयाचा आहे.

इ. स. १९६८ च्या एप्रिलमध्ये माझा प्रबंध मी पुणे विद्यापीठास पीएच्. डी. पदवीसाठी सादर केला व त्याच वर्षी जून महिन्याच्या प्रारंभी विद्यापीठाकडून मला पदवीही मिळाली. गेली आठ-दहा वर्षे ज्या विषयाचे मी सतत चिंतन केले आणि ज्यासाठी अहोरात्र परिश्रम केले त्याची ही यशस्वी सांगता झाल्याचे पाहून समाधान वाटणे स्वाभाविक होते.

— पण हे समाधान मला लाभावे म्हणून या प्रबंधलेखनाच्या काळात माझ्या कितीतरी आप्तसुहृदांनी, आचार्य-गुरुजनांनी मला केलेले अमोल साहाय्य खरोखरच शब्दातीत आहे.

या सर्व लेखनकार्यात माझे प्रमुख साहाय्यकर्ते होते गुरुवर्य डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे. डॉ. सहस्रबुद्धे हे माझे केवळ संशोधन-मार्गदर्शकच नव्हते. अनेक अडीअडचणींत माझा धीर जेव्हा खचे, तेव्हा ते पित्याच्या वत्सलतेने मला आधार देत आणि गुरुजनांच्या कर्तव्यकठोरतेने माझ्याकडून लेखनकार्य करवून घेत. त्यांच्या करड्या शिस्तीत मी वागलो, म्हणूनच कामाची विशिष्ट शिस्त मला लागली. गुरुवर्यांचे हे ऋण कधीही न फिटणारे असेच आहे; आणि त्यांच्या ऋणात राहण्यात मलाही आनंदच वाटेल.

'स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन'चे प्रवर्तक मित्रवर्य डॉ. वि. प. महाजन यांनी आमच्या दोघांमधील गाढ स्नेहाला अनुलक्षून प्रबंधास ग्रंथरूप दिले आणि तो स्नेह या प्रकाशनाच्या रूपाने चिरस्थायी केला आहे.

या प्रबंधलेखन-कार्यात ज्यांनी आपल्या शुभाशीर्वादांचे बळ माझ्या मागे उभे केले, त्यांचा आदराने उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. अशा व्यक्तींमध्ये माझे वडील ती. ल. रं. गावडे, वडील बंधू ती. वि. ल. गावडे, श्रीमती ताराबाई ढेकणे, श्रीमती सरस्वतीबाई रांजेकर आणि भगिनी श्रीमती नलिनी शेंडे, माझे मेव्हणे डॉ. व. वि. ढेकणे, श्री. अनंतराव गोहाड, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख गुरुवर्य डॉ. रा. शं. वाळिंबे, माझे वरिष्ठ सहकारी माननीय म. वा. शाळिग्राम आणि प्राचार्य न. शं. जमदग्नि, गुरुवर्य डॉ. के. ना. वाटवे, परमस्नेही श्री. मो. रा. वाळंबे आणि श्री. शामराव ओक तसेच सरदार श्रीमंत बाबासाहेब भिरीकर या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक नामनिर्देश

करताना मला अतिशय आनंद होत आहे. तसेच प्रा. गं. बा. सरदार, मित्रवर्य प्रा. श्री. वि. खेर, डॉ. हे. वि. इनामदार, श्री. विष्णुपंत मेहेंदळे, डॉ. म. प. पेठे यांनी, त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून, मला ज्या सूचना दिल्या त्या अतिशय मोलाच्या होत्या.

ग्रंथलेखन-काळातील माझ्या सर्व अडचणींत मित्रवर्य प्रा. व. ह. निवसरकर माझ्यामागे सतत उभे होते. माझी पत्नी सौ. अरुणा हिने तर अनेक अडचणी सोसून मला सतत साथ दिली. मित्रवर्य डॉ. हे. वि. इनामदार व सौ. अलका इनामदार यांनी सतत प्रोत्साहन देऊन व प्रसंगी मुद्रिते तपासण्यापासून सर्व प्रकारचे साहाय्य केले. तसेच डॉ. प्र. न. जोशी, श्री. वा. अ. जोशी, सौ. मंगला जोशी, श्री. म. कृ. श्रोत्रिय, सौ. विद्या श्रोत्रिय, सौ. सरोज टोळे (पूर्वाश्रमीची कु. सरोज वाळंबे) यांनी केलेल्या विविध प्रकारच्या साहाय्याबद्दलही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयास हवा.

श्री. बापूसाहेब नागपूरकर व सौ. उषा ज. नागपूरकर यांनी ग्रंथाचे मुद्रण करीत असताना केवळ मुद्रकाची भूमिका कधीच ठेविली नाही, तर सुहृदाच्या स्नेहाने सर्व प्रकारचे परिश्रम घेऊन मला त्यांनी जे साहाय्य केले, ते शब्दांत व्यक्त करणे केवळ अशक्य आहे. कृतज्ञताभावनेने त्यांचा उल्लेख करणे एवढेच माझ्या हाती आहे.

या ग्रंथ-लेखनाबद्दल डॉ. शं. दा. पेंडसे यांनी मला जे वात्सल्ययुक्त आशीर्वाद दिले, त्याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहे.

आपल्या संग्रहातील सर्वोत्कृष्ट असे सावरकरांचे छायाचित्र या ग्रंथात छापण्याची अनुमती प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी देऊन मला उपकृत केले आहे. प्रस्तुत प्रबंध प्रकाशित करण्यास पुणे विद्यापीठाने जी परवानगी दिली, त्याबद्दल मी विद्यापीठाचा आभारी आहे.

श्री. म. श्री. दीक्षित यांनी या ग्रंथाला व्यक्तिनामसूचीची जोड देऊन ग्रंथाची मौलिकता वाढविली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

'कर्तव्य हे स्वतःच सुखदायी आहे' असे सावरकर सांगत असत. अशा कर्तव्यभावनेचा सुखद आनंद मनात साठवून हा ग्रंथ मी वाचकांच्या हाती नम्रपणे देत आहे.

देवपूरकर यांचा वाडा,
नवी पेठ, पुणे ३०
दि. २५ ऑक्टोबर १९७०

प्र. ल. गावडे

वि. दा. सावरकर : एक चिकित्सक अभ्यास

(सावरकरांच्या वाङ्मयातून दिसणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व)

अनुक्रमणिका

पुरस्कार : (पाच ते अकरा)

ऋणनिर्देश : (तेरा–चौदा)

निवेदन : (१–४)

वापरलेल्या पुस्तकांचे संक्षेप व त्यांचे स्पष्टीकरण : (५–६)

प्रकरण १ ले : सावरकरांचे वाङ्मयीन चरित्र (७–८६)

प्रास्ताविक – ७, विविध चरित्रकारांच्या भूमिका – ७–१०, बालपण आणि संस्कार (१८८३ ते १९०६) – १०–२१, शत्रूच्या शिबिरात (१९०६ ते १९१०) – २२–३७, अंदमानच्या नृशंस गुहेत (१९११ ते १९२१) – ३७–४४, रत्नागिरीतील स्थानबद्धता (१९२४ ते १९३७) – ४४–५०, निर्बंधमुक्त–संचार (१९३७ ते १९६६) – ५०–५६, कृतार्थ जीवन – ५६–६०, जीवनाचे मुख्य सूत्र हिंदुत्वनिष्ठा – ६०–६१, स्वातंत्र्याचा अर्थ – ६१–६२, पक्ष-स्वीकार – ६२, राजकारणाचे हिंदूकरण – ६२–६५, अन्य क्षेत्रांतही हिंदुत्वनिष्ठेचा प्रभाव – ६५, अल्पसंख्याकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन – ६५–६८, अखंड हिंदुस्थानचा ध्यास – ६९–७०, हाती घेतलेल्या चळवळी – ७०–७३, हिंसाअहिंसेची कसोटी – ७३–७४, विरोधकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन – ७४–७७, हिंदुत्वानिष्ठेतून प्रकटलेली भविष्यवाणी – ७७–७९, या कालखंडातील प्रवृत्तिप्रेरणांतून निर्माण झालेले साहित्य – ७९–८१, पहिले ते राजकारण – ८१, दुसरे साहित्य-कारण – ८१, या काळातील ध्येयवाद आणि साहित्य – ८१–८५, आत्मसमर्पणामागील ध्येयवाद – ८५–८६.

प्रकरण २ रे : सावरकरांचे व्यक्तिमत्त्व (८७–१६८)

आत्मचरित्र – व्यक्तिमत्त्वदर्शनाचे सर्वोत्कृष्ट साधन – ८७–८८, सावरकरांच्या चरित्रग्रंथांचे ओझरते दर्शन – ८८–८९, व्यक्तिवैशिष्ट्याने रंगलेला ग्रंथनिर्मितीचा इतिहास – ८९–९२, व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ? – ९२–९४, बाह्यरूप – ९४–९७, संभाषण – ९८–१०२, वक्तृत्व –

१०२–१०५, लेखन – १०५–१०६, आवडनिवड – १०६–१०८ कुटुंबशीलता – १०८–११४, मित्रप्रेम – ११४–११८, उद्योगीपणा – ११८–११९, आत्मविश्वास – ११९–१२२, आशावाद की निराशा-वाद – १२२–१२४, महत्त्वाकांक्षा – १२४–१२५, धाडस व शौर्य – १२५–१२८, हौतात्म्याचे आकर्षण – १२८–१३०, वाचन – १३०–१३६, ज्ञानलालसा – १३६–१३८, प्रज्ञा, स्मृती व प्रतिभा – १३८–१४२, चिंतनशीलता – १४२–१४४, निष्ठा आणि ध्येय – १४४–१५५, श्रद्धास्थाने – १५५–१५६, रागद्वेष – १५६–१५९, स्वार्थमूलक प्रेरणेचा अभाव – १५९–१६१, धर्मभावना – १६१–१६३, जीवनातील भूमिका – १६३–१६८.

प्रकरण ३ रे : चरित्रकार सावरकर (१६९–१९२)

चरित्र – आत्माविष्काराचे साधन – १६९–१७०, चरित्रवाङ्मयातील आत्माविष्कार – १७०–१७३, प्रचार हा हेतू – १७३–१७७, चरित्रनायकांची सहेतुक निवड – १७७–१८२, रागद्वेषांचे दर्शन – १८२–१८३, विचारसाम्य – १८३–१८५, अलंकार – १८५–१८६, सुभाषिते – १८६–१८७, भाषाशैली – १८७–१९२.

प्रकरण ४ थे : इतिहासकार सावरकर (१९३–२१६)

प्रास्ताविक – १९२–१९५, इतिहासवाङ्मयातून आत्माविष्कार – १९५–१९६, इतिहासाकडे पाहण्याची हिंदुराष्ट्रवादी दृष्टी – १९६–१९८, इतिहास-वाङ्मयातून प्रकट होणारे व्यक्तिमत्त्व – १९८–१९९, बुद्धिनिष्ठा – १९९–२००, मानव्यप्रेम – २००–२०१, व्यवहारवाद – २०१–२०२, हिंदुराष्ट्रदृष्टीने भारतीय इतिहासाचा लावलेला अर्थ – २०२–२०७, निबंधातील तत्त्वचर्चेचे इतिहासात दर्शन – २०७, व्यक्तिमत्त्वाचा रचनापद्धतीवर परिणाम – २०८–२१०, इतिहास संशोधनातील हिंदुत्वदृष्टी – २१०–२११, इतिहासंवाङ्मयातील प्रचार – २११–२१४, भाषाशैली – २१४–२१६, समारोप–२१६.

प्रकरण ५ वे : निबंधकार सावरकर (२१७–३१४)

प्रास्ताविक – २१७–२१८, सावरकरांच्या निबंधवाङ्मयाचा स्थूल परिचय – २१८–२१९, निबंधलेखनहेतू – २१९–२२१, निबंध म्हणजे आत्मचरित्रातील विचारांचाच विकास – २२१–२२५, निबंधातील

आत्मलेखन – २२५–२२७, सुधारक सावरकरांवर त्यांनी स्वतःच टाकलेल्या शोधज्योती – २२७–२२८, सुधारकाकडे पाहण्याचा व्यक्ति-विशिष्ट दृष्टिकोन – २२८–२२९, व्यक्तिमत्त्वानुरूप सुधारणांच्या कसोट्या – २२९–२३०, स्वभूमिकेच्या अधिष्ठानावरून सुधारणांचा विचार – २३०–२३१, व्यापक सुधारणावादाची कारणे व्यक्तिमत्त्वात – २३१–२३२, सामाजिक क्रांतीकडे वळण्याची कारणेही व्यक्तिमत्त्वातच – २३२–२३६, व्यक्तिमत्त्वातील विविध निष्ठांनी प्रभावित झालेला निबंधातील आशय – हिंदुत्वनिष्ठा – २३६–२४२, हिंदुधर्म, संस्कृती व परंपरा यांबद्दल अभिमान – २४३–२४४, हिंदुराष्ट्रहित हीच कसोटी – २४४–२४५, सावरकरांची हिंदुत्वाची कल्पना – २४५–२४७, हिंदुत्वनिष्ठेच्या संदर्भातच प्रत्येक गोष्टीचा विचार – २४७–२५२, सात स्वदेशी बेड्यांचा निषेधही हिंदुत्वासाठी – २५२–२५३, उक्ती आणि कृती यांची प्रेरणा–हिंदुत्वनिष्ठाच – २५४–२५५, विज्ञाननिष्ठा – २५५–२६१, बुद्धिनिष्ठा – २६१–२७५, कोटिक्रम – २७५–२८४, स्वातंत्र्यनिष्ठा – २८४–२८५, जीवनातील श्रेष्ठ मूल्ये राष्ट्रहित – २८५–२८६, लोकहित २८६, मानवतावाद-मानवहित– २८६–२८९, रागद्वेष – २८९–२९४, प्रज्ञा आणि प्रतिभा – २९४–२९८, प्रचार आणि कृतिप्रेरणा – २९८–३००, भाषाशैली – ३००–३१४.

प्रकरण ६ वे : कवि सावरकर (३१५–४२६)

प्रास्ताविक – ३१५–३१७, कवितेचे वृत्तिभिन्नतादर्शक कालखंड – ३१७–३१८, कवितेतील व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार ३१९, टीकाकारांचे काही अभिप्राय – ३१९–३२१, कवितेतील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन – ३२१, आत्मचरित्र आणि काव्य – ३२१–३२४, सावरकरांच्या 'स्व-विषयक' कविता – ३२४–३३०, जाणीवपूर्वक आत्म-निवेदन – ३३०–३३४, राष्ट्रीय आशावाद – ३३४–३३६, सतत पुरोगामी राहिलेले व्यक्तिमत्त्व – ३३६–३३९, कुटुंबशीलता – ३३९–३४१, कर्तव्यविचार–३४२–३४३, जशा निष्ठा तशी काव्यसृष्टी : स्वातंत्र्यनिष्ठा – ३४३–३४८, स्वातंत्र्यविषयक कवितांचे वैशिष्ट्य – ३४९–३५२, कवितेतील ध्येयवादित्वाचे प्रतिबिंब – ३५२–३५७, 'हे मातृभूमि, तुजला मन वाहियेले' – ३५७–३६२, हिंदुत्वनिष्ठा – ३६२–३६९, जे गद्यात तेच पद्यात – ३६९–३७७, काव्यदृष्टीच्या सिद्धतेचे काही घटक – (१) काव्यात्म जीवन – ३७७–३७८,

(२) प्रबळ कवित्वशक्ती – ३७८–३७९, (३) महाकवीची प्रतिभा – ३७९–३८०, (४) साहित्यविषयक ध्येयवाद – ३८०–३८३, कविता : साध्य नव्हे, साधन – ३८३–३८४, जीवनतत्त्वाच्या अभिव्यक्तीसाठी काव्यनिर्मिती – ३८४–३८७, श्रीकृष्णोपदिष्ट तत्त्वांचा आचार – ३८७–३९०, व्यक्तिनिष्ठांतून झालेले तत्त्वमंथन – ३९०–३९३, काव्यातून केलेली इतिहासमीमांसा – ३९३–३९६, काव्यविषयांची निवड – ३९६–४००, कवितेची सजावट – ४००–४०१, व्यक्तिमत्त्वानुरूप कवितांचे पर्यवसान – ४०१–४०३, अनुभूती घेण्याची पद्धती – ४०३–४०४, कवितेतील रसाविष्कार – ४०४–४०६, कल्पकता व काव्यालंकार – ४०६–४१०, कविवृत्ती तसे काव्यवृत्त – ४११–४१७, भाषाशैली व व्यक्तिमत्त्व – ४१७, वीररसातून आविष्कृत झालेली शैली – ४१७–४१९, शब्दकलेवर झालेला व्यक्तिमत्त्वाचा परिणाम – ४१९–४२१, अंगप्रत्यंगातून प्रचाराकडे कल – ४२१–४२२, विवादाप्रिय व दाठर शैली – ४२२–४२४, काव्यात्मकतेचा शैलीवर परिणाम – ४२४–४२५, सृजनशील शैली – ४२५, कवित्वाचे मूल्यमापन – ४२६.

प्रकरण ७ वे : नाटककार सावरकर (४२७–५०४)

नाट्यवाङ्मयाचे ओझरते दर्शन – ४२७, टीकाकारांचे विविध अभिप्राय – ४२७–४२९, नाट्यवाङ्मयाचे सामर्थ्य व्यक्तिमत्त्वात – ४३०–४३१, व्यक्तिमत्त्वातील एक मूलद्रव्य : नाट्य ४३१–४३२, ध्येयवादी दृष्टिकोन ४३२–४३३, ध्येयवादी दृष्टिकोनातून विषयांची निवड – ४३३–४३४, सावरकरांच्या नाटकांचे विषय – ४३४–४३६, 'उ:शापा'चे नाट्यबीज – ४३६–४४०, 'संन्यस्त खड्गा'चे नाट्यबीज – ४४०–४४३, ' उत्तरक्रिये 'चे नाट्यबीज – ४४३–४४४, विषयानिष्ठ नाटके – ४४४, कथावस्तुविकसनावर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव – ४४४–४४६, तीनही नाटकांतील संघर्षाचे स्वरूप – ४४६–४५१, व्यक्तिमत्त्वानुरूप उपसंहार – ४५१–४५५, कलेपेक्षा प्रचारालाच प्राधान्य – ४५५–४५७, नाटकांतून केलेला स्वमतांचा प्रचार ४५७ – ४६५, प्रचाराचा स्वभावलेखनावर परिणाम – ४६५–४७६, शस्त्रपुरस्कार – ४७६–४७७, जनहितवृत्ती – ४७७–४७८, हिंसा-अहिंसा आणि सत्य – ४७८–४८०, प्रतिशोधाचे महत्त्व– ४८०–४८३, हौतात्म्याचे आकर्षण – ४८३–४८५, कर्तव्यभावना – ४८५–४८६,

पात्रांचे बौद्धिक विश्वही सावरकरांचेच – ४८६–४८८, प्रचारकी वाङ्मयामुळे स्वभावलेखनाची हानी – ४८८–४९०, पात्रांचे कल्पना-वैभवही लेखकाचेच – ४९०–४९२, विनोदाचे स्वरूप – ४९२–४९३, सुभाषितांतून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचेच दर्शन – ४९३–४९५, संवादरचनेवर व्यक्तिमत्त्वाचाच प्रभाव – ४९५–४९८, भाषाशैलीत व्यक्तिमत्त्वाचेच प्रतिबिंब – ४९८–५०२, नाटकातील आत्मचरित्र ५०३–५०४.

प्रकरण ८ वे : कथा-कादंबरीकार सावरकर (५०५–५४२)

सावरकरांच्या लघुकथांचे स्वरूप – ५०५–५०६, कथावाङ्मय : आत्माविष्काराचे एक साधन – ५०६–५०८, कथासामग्रीची निवड स्वकार्यातून नि तत्त्वज्ञानातून ५०८–५१०, कथांमागील निष्ठात्रयी – ५१०–५१२, कथालेखनाचे विविध हेतू– निबंधातील विचारांचा प्रचार– ५१२–५१३, धर्मभोळेपणाचे उच्चाटन – ५१३–५१४, विज्ञानाचा पुरस्कार – ५१५–५१६, मानवहित दृष्टी – ५१६, उपयुक्ततावाद – ५१६–५१८, धर्मग्रंथविषयक विचार – ५१८, भौतिक सामर्थ्यावर विश्वास – ५१८–५१९, देवतोत्पत्तीची कारणमीमांसा – ५१९–५२०, कथारचनातंत्र व्यक्तिमत्त्वानुसारी – ५२०–५२१, तत्त्वकेंद्रित कथा – ५२१–५२२, कथांतील पात्रे–तत्त्वांचे प्रतिनिधी – ५२२–५२४, कथारचनापद्धतिवर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव – ५२४–५२८, कथादोषांचे कारणही व्यक्तिमत्त्वात – ५२८, साभिप्राय वचने – ५२८–५२९, राग-द्वेषाचे उघड प्रदर्शन – ५२९, कथाकार सावरकरांतील कवी – ५३०, भाषाशैलीत प्रतिबिंबित झालेले व्यक्तिमत्त्व – ५३०–५३२, सावरकरांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप – ५३२, आत्मचरित्राचा कादंबरीशी संबंध – ५३२–५३३, कादंबरीतील आत्माविष्कार – ५३३–५३४, सावरकरांचा कादंबरी प्रबंध – ५३५–५३७, हिंदुत्वनिष्ठा व मानव-हित – ५३७–५३८, शस्त्रसामर्थ्य व हौतात्म्याचे आकर्षण – ५३८–५३९, व्यक्तिमत्त्वाचा कादंबरीच्या रचनापद्धतीवर परिणाम – ५३९, कादंबरीतून चमकणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध शलाका – ५४०, भाषाशैली – ५४०–५४१, समारोप – ५४२.

प्रकरण ९ वे : भाषाशुद्धी नि लिपिशुद्धी यांचे पुरस्कर्ते–सावरकर (५४३–५७६)

प्रास्ताविक – ५४३, व्यक्तिमत्त्वामुळे भाषिक चळवळींना महत्त्व –

५४३–५४६, व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा चळवळीवर परिणाम – ५४६–५५०, भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी वैचारिक भूमिका – ५५०–५५३, दोन्ही चळवळींमागील राष्ट्रीय दृष्टी आणि हिंदुत्वनिष्ठा – ५५३–५६१, भाषाशुद्धीचे व लिपिशुद्धीचे इतर पुरस्कर्ते नि सावरकर-तुलनात्मक अभ्यास – ५६१, (अ) विष्णुशास्त्री चिपळूणकर व सावरकर – ५६१–५६५, (ब) सावरकर व पटवर्धन – ५६५–५७०, (क) सावरकर व क्षीरसागर – ५७०–५७२, कृतिशीलता – ५७२–५७३, लोकहिताची दृष्टी – ५७३, भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळीचे यशापयश – ५७३–५७६, समारोप – ५७६.

प्रकरण १० वे : समारोप (५७७–५९३)

प्रास्ताविक – ५७७, सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण दर्शन – ५७७–५७८, आत्मप्रकटीकरणासाठी साहित्यनिर्मिती – ५७८–५७९, आत्मचरित्रातील विचारांशी साम्य – ५७९–५८०, सर्व वाङ्मयातून विशिष्ट निष्ठांचाच आढळ – ५८०, जाणीवपूर्वक आत्मनिवेदन – ५८०, विषयांची निवड – ५८०–५८१, विषयांची सजावट – ५८१–५८२, प्रचारकी दृष्टिकोन – ५८२, रागद्वेषांचे दर्शन – ५८२-५८३, भाषाशैली – ५८३, आंतरबाह्य व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव – ५८३–५८४, आत्माविष्काराला पडलेल्या मर्यादा – ५८४–५८६, तौलनिक विचार – ५८६–५८८, सावरकरांच्या थोरवीचे मूल्यमापन – ५८८–५९३.

परिशिष्ट : संदर्भग्रंथ : (५९५–६०४)

सावरकर : जीवनपट : (६०५–६०७)

व्यक्ति–सूचि : (६०८–६१३)

निवेदन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी मराठी वाङ्मयात 'सात आठ सहस्र पृष्ठां'ची भर घातली आहे. याशिवाय त्यांची अनेक भाषणे, संभाषणे, विस्मृतीत गेलेले साहित्य आणि क्रांतीच्या वणव्यात भस्मसात झालेले वाङ्मय यांची कल्पनेने मोजदाद केली तर सावरकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाबद्दल विलक्षण कुतूहल अुत्पन्न होते. वाङ्मयनिर्मितीला पोषक असे वातावरण भोवती नसताना, किंबहुना प्रतिकूल परिस्थितीच्या शृंखलांनी त्यांची लेखणी बद्ध झाली असताना अेवढे प्रचंड लेखनकार्य सावरकरांनी केल्याचे पाहून अभ्यासकाची जिज्ञासा जागृत झाली नाही तरच नवल ! अशा जिज्ञासेतूनच या प्रबंधाचा प्रपंच अुभारला गेला आहे.

सावरकरांच्यासंबंधी आजवर ग्रंथरूपाने व स्फुट स्वरूपाचे लिखाण बरेच झाले आहे. त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या सार्वजनिक टप्प्यांच्या प्रसंगी बरेच लिखाण लिहिले गेले. विशेषांकांतून विविध अंगांनी त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व अुलगडून दाखविण्याचा प्रयत्न झाला; त्या त्या प्रसंगी फुटकळपणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखनापैकी बरेचसे लेखन पुढे ग्रंथरूपाने स्थिरही झाले. विविध भाषांतून चरित्रपर अशी काही पुस्तकेही प्रसिद्धिली गेली. परंतु अशा लेखांतून वा ग्रंथांतून सावरकरांच्या सर्वांगीण वाङ्मयीन कार्याचा टीकात्मक दृष्टिकोनातून सूक्ष्म परामर्श घेणे, त्या प्रसंगांचे औचित्य पाहता व लेख-ग्रंथांच्या मर्यादा पाहता, शक्य झाले नाही. संशोधनाचे सूत्र हाती घेऊन सावरकरांच्या सर्व वाङ्मयाचे आलोडन करण्याची दृष्टीही तेथे नव्हती.

राजकारण, समाजकारण, साहित्यकारण अित्यादी सर्व क्षेत्रांत सावरकर ही व्यक्ती वादविषयीभूत झाली होती. पारतंत्र्यात व स्वातंत्र्यकाळाच्या प्रारंभीच्या काही वर्षांत सावरकर साहित्याचा मोकळ्या वातावरणात व पूर्वग्रहांतून मुक्त होअून अभ्यास होणे अवघड झाले होते. सावरकरांच्या गतिशील व्यक्तिमत्त्वामुळे (Dynamic personality) विभूतिपूजकाच्या भूमिकेपासून दूर होअून निर्लेप मनाने सावरकर साहित्य अभ्यासणेही दुष्कर होते. परंतु स्वातंत्र्याच्या काळातील वाढत्या वर्षांबरोबर सावरकरांबद्दलचे गैरसमज हळूहळू कमी होत गेले व सावरकर साहित्याला आणि त्यांच्या कर्तृत्वाला मान्यतेची राजमुद्राही लाभली. स्वातंत्र्याच्या या काळात कर्तव्यपूर्तीचे समाधान मनी बाळगून संन्यस्तवृत्तीने सर्वत्र वावरणाऱ्या सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाकडे तटस्थवृत्तीने पाहणेही शक्य झाले.

सावरकरांच्या निधनाला दोन तीन वर्षे होऊन गेली आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे यथातथ्य मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने हा काळ फारसा प्रदीर्घ नसला, तरी सावरकरांभोवती जमलेल्या गैरसमजाचा धुराळा कमी करण्यापुरते आणि त्यांच्या साहित्याचे निर्लेप मनाने समीक्षण व्हावे म्हणून समीक्षकांची मनोभूमिका, मर्यादित स्वरूपात का होईना, तयार करण्यापुरते त्यास महत्त्व द्यावयास हरकत नाही.

समग्र सावरकर साहित्याचा अभ्यास करताना या प्रबंधात जे मुख्य सूत्र ठेवले आहे ते आत्माविष्करणाचे. सावरकरांचे वाङ्मयीन कार्य त्यांच्या जीवनाशी, किंबहुना अधिक काटेकोरपणे बोलावयाचे झाले, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संबद्ध आहे. त्यांचा प्रत्येक शब्द जगू त्यांच्या घटित व्यक्तिमत्त्वाचा प्रतीक आहे, आणि त्यांच्या सर्व वाङ्मयीन कलाकृतींतून त्या व्यक्तिमत्त्वाचाच सरळसरळ आविष्कार झाला आहे. या आत्माविष्करणाच्या तत्त्वाच्या निकषावर सावरकरांचे सर्व वाङ्मय तपासले, तर शेवटी कोणते निष्कर्ष हाती येतात आणि साहित्यटीकेतील आत्माविष्करणाच्या या तत्त्वाचा नेमका कोणता अर्थ प्रतीत होतो, हे जाणून घेण्याच्या जिज्ञासेतून मी या संशोधनकार्याला प्रवृत्त झालो. साहित्यटीकेतील अितर निकष स्वाभाविकपणे गौण लेखून या प्रबंधातील विवेचन करण्यात आले आहे. सावरकरांच्या विविध कलाकृतींतून त्यांचे अेकसंघ व्यक्तिमत्त्वच कसे प्रकट झाले आहे व त्यांच्या सर्व कलाकृतींमधून अेक अंतःसंगती कशी व्यापून राहिली आहे, हे प्रस्तुत प्रबंधामध्ये अुलगडून दाखविण्यात आले आहे. त्यामुळे विशेषेकरून सावरकर साहित्याकडे व सर्वसामान्य वाङ्मयकृतींकडे पाहण्याची अेक नवी दृष्टी येते.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व ठरविल्याशिवाय प्रस्तुत प्रबंधाची पुढील वाटचाल होणे शक्य नव्हते. हें व्यक्तिमत्त्व ठरविण्याच्या दोन पद्धतींचा मी अवलंब केला. प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात मी सावरकरांचे वाङ्मयीन चरित्र थोडक्यात लिहिले. या वाङ्मयीन चरित्रात सावरकरांच्या जीवनातील वाङ्मयेतर घटनांवर भर देण्यापेक्षा त्यांच्या वाङ्मयनिर्मितीला प्रेरक व पोषक ठरणाऱ्या घटनांवरच प्रकाशझोत टाकीत त्यांचे सर्व चरित्र अुलगडून दाखविले. आणि असे करीत असताना त्यांचे घडत गेलेले भावबंध, त्यांची बनलेली मते व निष्ठा, सिद्ध झालेली त्यांची ध्येये व साधने प्रकट झालेल्या त्यांच्या श्रद्धा, भविष्यकाळासंबंधी त्यांना प्राप्त झालेली दृष्टी अित्यादी गोष्टींचा हेतुपुरस्सर निर्देश करण्यात आला. त्यामुळे या पहिल्या प्रकरणातून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वरूपाची बव्हंश सिद्धता झाली.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात सावरकरांचे व्यक्तिमत्त्व हे सावरकरांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांच्या आधारेच ठरविण्यात आले. "व्यक्तीचे आंतरजीवन त्या व्यक्तीने स्वतःच प्रकट केले तर होअू शकते" हे आत्मचरित्ररचनेमागील तत्त्व ध्यानी

घेऊनच सावरकरांच्या आत्मचरित्रांचा अुपयोग करण्यात आला आहे. या आत्मचरित्रांवरोवरच सावरकरांसंवंधीच्या आठवणी व आख्यायिका, सावरकरांची पत्रे अित्यादी साहित्याची अुपयोजना करण्यात आली आहे. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा अितका सर्वांगीण अभ्यास येथे प्रथमच वाचकांच्या पुढे ठेवण्यात येत आहे.

आत्माविष्काराचे तत्त्व हेच प्रवंधाचे मुख्य सूत्र ठरविण्यात आल्याने सावरकरांच्या चरित्राची व कर्तृत्वाची केवळ कालानुसारी विभागणी करून प्रस्तुत प्रवंधाची रचना करण्यात आलेली नाही. ललित आणि ललितेतर असे जे वाङमयप्रकार सावरकरांनी लिहिले, त्यां सर्वांमागे अेकाच व्यक्तिमत्त्वाचे स्पंदन आहे, अेकच सत्त्व त्यांच्या मागे अुभे आहे याची जाणीव प्रवंधातील सावरकरांच्या विविध वाङमयप्रकारांवर आधारलेल्या प्रकरणांतून येत जाअील, अशी दक्षता घेण्यात आली आहे. वाङमयप्रकार कोणता का असेना, त्या प्रत्येकातून लेखकाचा आत्माविष्कार कसा सहजपणे होतो, हे वहुधा प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी केलेल्या टीकात्मक विवेचनातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. सावरकरांच्या राजकीय कार्यापेक्षा मुख्यत: त्यांच्या साहित्यविषयक कार्याचाच अभ्यास करण्याची मर्यादा मी घालून घेतली होती.विविध वाङमयप्रकारांचा 'तंत्र' या दृष्टीने मी स्वतंत्र अभ्यास केला व त्या तंत्राच्या साच्यात सावरकरांनी लिहिलेले विविध वाङमयप्रकार कितपत वसतात, वसत नसतील तर त्याची कारणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कुठे दडली आहेत, यांचा शोध मी घेतला आणि त्यातून सावरकरांचे पृथगात्म व्यक्तिमत्त्व दाखविण्याचा प्रयत्न मी केला आहे.

सावरकरांचे हे पृथगात्म व्यक्तिमत्त्व स्पष्ट करण्यासाठी आणखी अेका मार्गाचा मी अवलंव केला आहे. मराठीतील विविध वाङमयप्रकार आणि सावरकर यांच्या वाङमयीन व्यक्तित्वाचा तौलनिक परामर्श घेऊन हा फरक ठळकपणे दाखविण्याचा प्रयत्न येथे केला आहे. प्रवंधातील विविध प्रकरणांतून अशी तुलना केल्यानंतर सावरकरांचे विचारविश्व अितर समकालीन प्रमुख विचारवंतांच्यापेक्षा वेगळे कुठे होते व तसे ते वेगळे का झाले याचाही शोध घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.

सावरकरांनी आपल्या वाङमयातून हेतुपुरस्सर प्रचार केला आहे. प्रचारासाठी पुनरुक्ती किती आवश्यक आहे हेही सावरकरांनी सांगितले आहे. या पुनरुक्तीचा परिणाम प्रस्तुत प्रवंधातील विवेचनावरही थोडाफार झाला आहे. सावरकर आपले ठराविक विचार वा कल्पना वेगवेगळ्या संदर्भात पुन:पुन्हा मांडतात. प्रवंधातील विवेचनाच्या ओघात, वेगवेगळ्या संदर्भात, ही पुनरुक्ती जाणवते ती यामुळेच.

प्रस्तुत प्रवंधाचे लेखनकार्य करताना सावरकरांच्या अनेक स्फुट लेखांचाही शोध घेण्याचा प्रयत्न मी केला. नियतकालिकांच्या जुन्या अंकांतून आणि विविध वृत्तपत्रांतून अडकून पडलेले सावरकरांचे लेख मी तपासले, पुणे मुक्कामी सावरकरांची प्रत्यक्ष

भेट घेऊन प्रस्तुत प्रबंधाची कल्पना त्यांना दिली व विविध ठिकाणी विखुरलेल्या त्यांच्या वाङमयाबद्दल थोडी चर्चाही केली. डॉ. द. न. गोखले यांनी स्वतःच्या संग्रही असलेले ' श्रद्धानंदा 'चे सर्व अंक माझ्या स्वाधीन केले. त्यामुळे रत्नागिरीतील सावरकरांच्या वास्तव्याचा व चळवळींचा बारीकसारीक तपशील मला कळू शकला. सावरकरांच्या जीवनाची व त्यांच्यावर झालेल्या संस्कारांची शक्य तो यथातथ्य कल्पना यावी, म्हणून मी भगूर, नाशिक व रत्नागिरी येथे समक्ष जाऊन सावरकर-संबंधित अशी विविध स्थळे व वास्तू अवलोकन केल्या. रत्नागिरी येथील " पतित-पावन " मंदिराशी संबंधित असलेले श्री. अच्युत जोशी यांनी मला सावरकरांच्या तेथील सामाजिक चळवळींबाबतची अनेक पत्रके व हस्तलिखिते अभ्यासासाठी अुपलब्ध करून दिली.

या अभ्यासाच्या कामी किती तरी संस्थांनी मला सर्वतोपरी सहकार्य दिले. पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालय, केसरी मराठा ग्रंथशाला, अेस. अेन. डी. टी. आणि अेम. अी. अेस. महाविद्यालयांची ग्रंथालये, नूतन मराठी विद्यालय प्रशाला-ग्रंथालय, अेम. अी. अेस.-हायस्कूल, डेक्कन जिमखाना, आदी पुण्यातील ग्रंथालयांचा तेथील ग्रंथपालांनी व प्रमुखांनी मला भरपूर अुपयोग करू दिला. या विविध संस्थांचा आणि संबंधित व्यक्तींचा मी अत्यंत ऋणी आहे.

वापरलेल्या पुस्तकांचे संक्षेप व त्यांचे स्पष्टीकरण

मा. आ.	– माझ्या आठवणी
जो. मॅ. आत्म. नि रा.	– जोसेफ मॅझिनी, आत्मचरित्र नि राजकारण,
जो. मॅ. भा. छो. आत्म.	– जोसेफ मॅझिनीच्या आत्मवृत्ताच्या भाषान्तराचे छोटेसे आत्मवृत्त.
आ. म. वा. अि. भा. २	– आधुनिक मराठी वाङमयाचा अितिहास, भाग२.
सं. का. पं.	– संस्कृत काव्याचे पंचप्राण.
मा. जन्म.	– माझी जन्मठेप.
सा. यां. आ.	– सावरकर यांच्या आठवणी.
लं. बा.	– लंडनची बातमीपत्रे.
सा. च.	– सावरकर चरित्र (कथन)
सा. द.	– सावरकर दर्शन.
आ. नि.	– आवडनिवड.
अं. अं.	– अंदमानच्या अंधेरीतून.
ते. ता.	– तेजस्वी तारे.
पू. पी.	– पूर्वपीठिका (आत्मवृत्त).
हिं. द.	– हिंदुराष्ट्र दर्शन.
स. सा. वा.	– समग्र सावरकर वाङमय .
हिं. अि. स. सो. पाने	– हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सहा सोनेरी पाने.
हिं. पा.	– हिंदुपदपादशाही.
वीर सा. अ. म. वि. केसरी	– वीर सावरकर अमृतमहोत्सव विशेषांक,– केसरी.
शि. ग.	शिपायांची गर्दी.
अ. स. भा. स्वा. स.	– अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्यसमर
म. मा. म. म.	– मराठी माणसे : मराठी मने.
सा. वि. द.	– सावरकर विविध दर्शन.
स. चि.	– समाजचित्रे.
सा. गो.	– सावरकरांच्या गोष्टी
क्ष कि.	– क्ष किरणे.
वि. नि.	– विज्ञाननिष्ठ निबंध.
सा. सा.	– सावरकर साहित्य.
जाति. नि. : जात्यु. नि	– जातिभेदोच्छेदक निबंध, जात्युच्छेदक निबंध
केसरी सा. मृ. पु.	– केसरी–सावरकर मृत्युंजय दिन पुरवणी.
रत्ना. हिं. प. पा. व. प्रति.	– रत्नागिरी हिंदुसभेचे पहिल्या पाच वर्षांचे प्रतिवृत्त.

ज्ञा. को.	– ज्ञानकोश.
मा. वि.	– मानवधर्म विवेक.
गां. गों.	– गांधी गोंधळ
सा. क.	– सावरकरांची कविता.
सा. का. स.	– सावरकर काव्य समालोचन.
आ. म. क.	– आधुनिक मराठी कविता.
म. सा. प.	– महाराष्ट्र साहित्य पत्रिका.
श. शि.	– शत्रूच्या शिबिरात.
मा. आ. क.	– माझे आवडते कवी.
चा. रा. यां. फ.	– चाफेकर–रानडे यांचा फटका.
सिं. पो.	– सिंहगडचा पोवाडा.
अ. म. का.	– अर्वाचीन मराठी काव्य.
मख. प.	– मखमालीचा पडदा.
वहु.	– बहुरूपी.
म. सा. समा.	– मराठी साहित्य समालोचन.
हिं. पं.	– हिंदुत्वाचे पंचप्राण.
म. ना. तं. आणि वि.	– मराठी नाट्यरचना– तंत्र आणि विकास.
म. ना. प. अिति. व कार्य	– मराठी नाट्य परिषद– अितिहास व कार्य.
भ. ना.	– भरतनाट्यशास्त्र.
म. ना. सं.	– मराठीचा नाट्यसंसार.
स्व. ले.	– स्वभावलेखन.
सं. ख.	– संन्यस्त खड्ग.
भा. वि.	– भाषाशुद्धि– विवेक.
व्य. आ. वा.	– व्यक्ती आणि वाङमय.
को. ले.	– कोल्हटकरांचा लेखसंग्रह.
ना. लि. आं.	– नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन
म. भा. शु.	– मराठी भाषेचे शुद्धीकरण.
म. भा. अु. व वि.	– मराठी भाषा : अुद्गम व विकास.
स्वा. वि. सा. ह्यांचे सं. च.	– स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर ह्यांचे– संक्षिप्त चरित्र.
स. सो. पा.	– (भारतीय अितिहासातील) सहा सोनेरी पाने.
वॅ. सा. यां. च.	– वॅ. सावरकर यांचे चरित्र.

टीप : वापरलेल्या पुस्तकांच्या आवृत्त्या, त्यांचा प्रकाशन-काल व लेखक या सर्वांचा अुल्लेख आलेला असल्यामुळे येथे त्यांचा स्वतंत्र अुल्लेख केलेला नाही.

ग्रंथ संग्रहालय दा.
दा. क्र. 7067

सावरकरांचे षाण्मासीक चरित्र

प्रास्ताविक :

कै. वॅ. विनायक दामोदर सावरकर ही अेक बहुमिती (Multi dimensional) व्यक्ती होती. सावरकरांचे जीवन त्यांनी स्वत:च वर्णन केल्याप्रमाणे 'काही आकस्मिक, काही अद्‌भुत, काही अुत्क्षोभक विद्युत-तंतूंनी विणलेले होते.[1]– अशा जीवनाभोवती सावरकरांच्या क्रांतिकार्यामुळे गूढतेचे वलय पसरले होते; आणि म्हणूनच त्यांचे जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा सर्वत्र आढळून येते. सावरकरांच्या अनेक चरित्र-कारांनी ही जिज्ञासा काही प्रमाणात पूर्ण करण्याचा प्रयत्न सावरकरांच्या हयातीत केला आणि सावरकरांच्या मृत्यूनंतरही केला. सावरकरांचे जीवन आणि त्या जीवना-तून अुद्‌भूत झालेले त्यांचे तत्त्वज्ञान यांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेक चरित्र-ग्रंथ लिहिले गेले. संस्कृत, मराठी, हिंदी, तामीळ, अिंग्रजी अित्यादी विविध भाषांतून हे ग्रंथ लिहिले गेले. असे ग्रंथ लिहिताना प्रत्येक चरित्रकाराची भूमिका वेगळी होती. दृष्टिकोन वेगळा होता. अनेकांनी सावरकरांच्या जीवनातील अद्‌भुतता व रोमहर्षकता यांना प्राधान्य दिले, तर क्वचित कोणी त्यांचे विचारदर्शनच प्रामुख्याने घडविले. या दृष्टीने सावरकरांच्या या अनेक चरित्रकारांच्या भूमिका अभ्यसनीय आहेत.

विविध चरित्रकारांच्या भूमिका

श्री. स. रा. रानडे यांनी मराठी भाषेत लिहिलेले सावरकरांचे पहिले अुपलब्ध चरित्र अि. स. १९२४ साली प्रकाशित झाले. सावरकरांच्या 'अचाट साहसी' जीवना-बद्दल[2] वाटणाऱ्या कुतूहलातून श्री. रानडे हे चरित्रलेखनाकडे वळले असून 'मिळेल तेवढीच माहिती मिळवून हे चरित्र आपण महाराष्ट्र जनतेपुढे ठेवावयाचे' अशी त्रोटक चरित्र लिहिण्याचीच त्यांची भूमिका होती.[3]– 'चित्रगुप्त' हे टोपण नाव धारण करून अिंग्रजी भाषेत लिहिलेले सावरकरांचे दुसरे चरित्र १९२६ साली प्रसिद्ध झाले. सावरकरांच्या जीवनाबद्दल सर्वत्र पसरलेल्या कुतूहलाची परिपूर्ती करण्यासाठी हे चरित्र लिहिले गेले असल्याची स्पष्ट कल्पना चरित्र-ग्रंथाच्या प्रकाशकांनी प्रस्तावनेत दिली आहे. (In order to satisfy, however, partially, the curiosity so widely felt throughout India to know something of the life and

---

१. मा. आ. पृ. ६. २. स्वा. वि. सा. ह्यांचे सं. च. पृ. ७. ३. स्वा. ह्यांचे सं. च. पृ. ८.

work of the famous patriot Mr. V. D. Savarkar, the publishers have ventured to bring out this short sketch, ...)[१] सावरकरांच्या चरित्राचे विस्कळित आणि अपुरे तुकडे अेकत्रित करूनच (Whatever scraps of information we could gather) हे चरित्र लिहिले गेले आहे. श्री. गो. गो. अधिकारी यांनी प्रकाशित केलेल्या (अि. स. १९३७) सावरकरांच्या चरित्रावर लेखकाचे नावही आढळत नाही. सावरकरांचे विस्तृत आणि साग्र चरित्र अजूनही अुपलब्ध नसल्याची जाणीव प्रकाशकाने प्रस्तावनेत व्यक्त केली असून प्रस्तुत चरित्रात सावरकरांनी आणि त्यांच्या बंधूंनी सोसलेल्या यातनांची आणि केलेल्या भगीरथ परिश्रमांची काही कल्पना वाचकांना येअील असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच 'या चरित्रात दिलेला वृत्तान्त हा केवळ अितिहास म्हणूनच सांगितलेला' असून 'तीच काय ती या चरित्राची कक्षा आहे' असा खुलासाही करण्यात आला आहे.[२]–अेकोणीसशे अडतीस साली प्रसिद्ध झालेल्या व श्री. र. ग. भोपे यांनी लिहिलेल्या 'सावरकर चरित्रा'त लेखकाने जे 'हृदय-निवेदन' केले आहे, त्यात वर अुल्लेखित चरित्रकारांपेक्षा थोडी वेगळी व अधिक व्यापक भूमिका स्वीकारल्याचे दिसते. 'सावरकरांचे संक्षिप्त चरित्र लिहून त्यांचा साहित्यगौरव करावा' हा लेखकाचा हेतू सावरकरांच्या वाङ्मयीन जीवनाकडे प्रथमच किंचित् कललेला दिसतो.[३] सावरकरांचे अनुयायित्व पत्करलेले श्री. मो. शि. गोखले यांनी लिहिलेले 'वीर सावरकर' हे चरित्र (अि. स. १९४०) काहीशा विभूतिपूजकाच्या भूमिकेतून लिहिलेले असून 'हृद्गता'त म्हटल्याप्रमाणे 'चरित्रनायक व चरित्रप्रकाशक' या दोहोंबद्दल मनात असलेल्या आदरामुळेच त्यांनी हे चरित्र लिहिले आहे.[४]

सावरकरांच्या हयातीतच त्यांच्या जीवनावर साग्र व विस्तृत चरित्रग्रंथ प्रकाशित करण्याचा मान श्री. शि. ल. करंदीकर यांना द्यावा लागेल. 'सावरकरांच्या ६१ व्या जन्मदिनाचे टिपण साधून' हा ग्रंथ त्यांनी प्रकाशित केला आणि 'ह्या चरित्रग्रंथाची बहुतेक सर्व प्रकरणे स्वतः सावरकरांच्या अवलोकनातून गेलेली असल्याने' या ग्रंथाला अधिकृत चरित्रग्रंथाची प्रतिष्ठा प्राप्त झाली. श्री. शि. ल. करंदीकर हे स्वतःला जरी 'सावरकरांच्या राजकीय मतांचे अनुयायी' म्हणवीत असले, तरी हा ग्रंथ लिहिताना त्यांनी 'अंधानुयायाची वृत्ती स्वीकारलेली नव्हती.' 'सावरकरांनी केलेल्या कोणत्याही गोष्टीचे समर्थन, पुरस्कार अगर प्रचार करण्याचा हेतू' न बाळगता केवळ 'जिज्ञासुवृत्तीने, अभ्यासूपणाच्या भूमिकेवरून'

---

१. Life of Barrister Savarkar p. V. २. बॅ. सा. यांचे चरित्र, प्रस्तावना, पृ. ५. ३ स्वा. बॅ. वि. दा. सावरकर यांचे जीवनचरित्र पृ. १. ४. वीर सावरकर पृ. १५

हे चरित्र लिहिण्याला ते प्रवृत्त झाले आहेत.[1] पण श्री. करंदीकर यांनी स्वत:च सांगितल्याप्रमाणे सावरकरांचे हे चरित्र ' 'साधन-ग्रंथा 'च्या स्वरूपाचे आहे. सावरकरांच्या वाङमयीन कार्यावर यात भर देण्यात आला नसून तशा स्वरूपाचे लेखन 'कवी सावरकर' 'सावरकर आणि इतिहास लेखन' 'सावरकरांची नाटके' अित्यादी प्रकरणांच्या द्वारा दुसऱ्या अेका पुस्तकात (सावरकर-चरित्र : विवेचन) करण्याचा संकल्प त्यांनी सोडला होता.[2] परंतु तो संकल्प पूर्ण झाल्याचे आढळत नाही. सावरकरांच्या मृत्यूनंतर श्री. करंदीकर यांनी 'असे होते वीर सावरकर ' या नावाचे जे छोटेखानी चरित्र प्रकाशित केले आहे (३१–३–१९६६). त्यातही या पूर्वाश्वासित संकल्पाची सांगता झालेली नाही. या पुस्तकाच्या छोटयाशा प्रस्तावनेत त्यांनी या छोटया पुस्तकाची कल्पना कशी सुचली, याचा खुलासा केला असून पुढे लिहिले आहे– " सामान्य वाचकाला हवा असलेला चरित्रविषयक तपशील या पुस्तकात आहे. हा तपशील अगदीच अुघडा-वाघडा नाही– त्याला सूचक विवेचनाची थोडीफार जोड मिळालेली आहे." या चरित्रात जी दोन नवी प्रकरणे घातली आहेत त्यांत सावरकरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या अेकूण जीवनाचे व तत्त्वज्ञानाचे विवेचक मूल्यमापन चरित्रलेखकाने केले आहे. पण त्यातही सावरकरांच्या वाङमयीन कर्तृत्वाचे स्वतंत्र व साक्षेपी विवेचन केलेले आढळत नाही. त्यामुळे सावरकरांच्या वाङमयीन चरित्राची अुणीव येथेही राहून गेली आहे.

" Savarkar and his Times " हे श्री. धनंजय कीर यांनी लिहिलेले चरित्र (अि. स. १९५०) सावरकरांच्या राजकीय कर्तृत्वालाच प्राधान्य देणारे आहे. " Genius thrives in jail " या अेकाच प्रकरणात चरित्रलेखकाने सावरकरांच्या वाङमयीन कार्याचे टीकात्मक समालोचन केलेले आहे. अन्यत्र केलेले काही तुरळक अुल्लेख सोडल्यास सर्व चरित्रात सावरकरांच्या वाङमयेतर कार्यावर अधिक भर देण्यात आला आहे. चरित्रलेखनामागील आपली भूमिका स्पष्ट करताना व चरित्र-ग्रंथाचे वैशिष्टय सांगताना श्री. कीर यांनी लिहिले आहे:– " This is an humble attempt to give in detail the myriad sides of Savarkar's life in its proper historical perspective."[3] अतअेव श्री. कीररचित सावरकर-चरित्र हे बव्हंशी राजकीय चरित्राच्या प्रकारात (Political biography) शोभेल असेच आहे.

श्री. भा. कृ. केळकर यांनी लिहिलेल्या ' सावरकर–दर्शन, व्यक्ती नि विचार ' (अि. स. १९५२) ह्या चरित्रात्मक ग्रंथाची बैठकच वेगळी आहे. सावरकरांचे

---

१. सा. चरित्र : कथन-लेखकाचे हृद्‌गत पृ. ३१. २. सा. च. कथन पृ. १३.
३. Savarkar and His Times–Preface –p. V.

जीवन कालक्रमानुसार चित्रित करण्याचा अुद्देश डोळ्यांपुढे ठेवून हे चरित्र लिहिले गेलेले नाही. सावरकरांच्या विचारदर्शनाच्या अधिष्ठानावर या चरित्राची अुभारणी करण्यात आली आहे. चरित्र लिहिण्यामागील आपली भूमिका विशद करताना– श्री. भा. कृ. केळकर यांनी म्हटले आहे : " गांधीवधानंतर झालेल्या हिंदुत्ववाद्यांच्या ससेहोलपटीमुळे सावरकरांसारख्या थोर पुरुषावर वैचारिक अन्याय होत आहे असे मला वाटू लागले. हिंदुत्ववाद्यांच्या तथाकथित पराभवाने त्यांच्या विचारसरणी-विषयी गैरसमज पसरत आहेत ही जाणीव मला झाली आणि त्यामुळेच मी हे चरित्र लिहिण्याचे ठरविले. "[1] चरित्र-ग्रंथाची रचनाही याच दृष्टीने करण्यात आली असून 'प्रथम सावरकरांच्या विचारांची वस्तुनिष्ठ मांडणी आणि नंतर त्यातील गुण-दोषांची थोडक्यात पण साधार चर्चा' अशी पद्धती स्वीकारण्यात आली आहे.[2] दोनशे पृष्ठांच्या या पुस्तकात सावरकरांच्या वाङ्मयीन गुणांसंबंधी सुमारे तीस पृष्ठांचे अेक समालोचनात्मक प्रकरण समाविष्ट करण्यात आले आहे. केवळ साहित्य-सृष्टीला प्राधान्य देअून सावरकरांच्या चरित्राची पाहणी करण्याचा प्रयत्न येथेही नाही आणि लेखकाचा तसा अुद्देशही नाही.

सावरकरांच्या विविध चरित्रकारांच्या भूमिका आपण तपासल्या आणि त्या चरित्रग्रंथांच्या रचनापद्धतीचे स्थूल स्वरूपही पाहिले. सावरकरांच्या वाङ्मय-प्रवृत्तींनाच प्राधान्य देअून त्यांच्या चरित्राची मांडणी करण्याचा प्रयत्न येथे करावयाचा आहे. त्या दृष्टीने सावरकरांच्या लौकिक जीवनाचा जेवढा भाग त्यांच्या वाङ्मयीन कृतीशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निगडित आहे, तेवढाच देण्यात येअून हे वाङ्मयीन चरित्र रेखाटण्यात आलेले आहे. सावरकरांच्या ठायी भिन्न कालात भिन्न प्रवृत्ती प्रभावित होत गेल्याचेही ध्यानी यावे या अुद्देशाने त्यांच्या वाङ्मयीन चरित्राचे पुढील कालखंड पाडण्यात आले आहेत.

(१) १८८३ ते १९०६. (२) १९०६ ते १९१०. (३) १९१० ते १९२४. (४) १९२४ ते १९३७. (५) १९३७ ते १९६६.

या वाङ्मयीन चरित्राच्या साहाय्याने सावरकरांच्या व्यक्तित्वावरील मूळ सस्कारांचेही दर्शन घडावे आणि व्यक्तित्वदर्शनाच्या पुढील प्रकरणाची पूर्वतयारी व्हावी अशी योजना केली आहे.

(१) बालपण आणि संस्कार : १८८३ ते १९०६

नाशिक जिल्ह्यातील भगूर हे सावरकरांचे जन्मग्राम. २८ मे १८८३ या दिवशी सावरकरांचा तेथे जन्म झाला. सावरकरांचे वडील दामोदरपंत आणि आअी राधाबाअी

---

१. सा. द. दर्शनापूर्वी पृ. १. २. सा. द. पृ. २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर
अनुक्रम..... दि: १९९
क्रमांक ..... दि: .....

यांना गणेशपंत (बाबा), विनायक (तात्या), माअी व नारायण (बाळ) अशी चार अपत्ये झाली. विनायक नअू वर्षांचा असताना त्याची आअी वारली (१८९२) आणि त्याच्या वयाच्या सोळाव्या वर्षीच त्याचे वडील वारले (१८९९). वयाची पहिली तेरा–चवदा वर्षे विनायकाचे वास्तव्य प्रामुख्याने भगूर येथेच होते. पण पुढे अिंग्रजी शिक्षणाच्या निमित्ताने विनायक नाशिक येथे गणेशपंतांबरोबर राहू लागला आणि मॅट्रिकची परीक्षा अुत्तीर्ण होअीपर्यंत (१९०१) विनायकाची निवासभूमी व कर्मभूमी नाशिक हीच होती.

सावरकरांच्या चरित्रातील हा पहिला क़ालखंड संस्काराच्या दृष्टीने, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मूस तयार होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या कालखंडात सावरकरांच्या मनावर अनेक मार्गांनी विविध स्वरूपांचे संस्कार होत होते. जन्म-ग्राम, विविध व्यक्ती, वाचन आणि वातावरण यांचे पडसाद त्यांच्या मनावर अुमटत होते. जन्मग्रामाचा, भगूरचा संस्कार त्यांच्या मनावर किती प्रभावीपणे अुमटला होता, हे स्वत: सावरकरांनीच आपल्या 'गोमांतक' काव्यात वर्णिले असून आत्मचरित्रात त्याचा जरूर तेवढा तपशीलही दिलेला आहे.[1] या भगूर गावाने सावरकरांच्या काव्य-वृत्तीचा परिपोष जसा केला, तसा – किंवा किंचित् अधिकच–त्यांच्या स्वातंत्र्यवृत्तीचा आणि पेशवाअीवरील प्रेमाचा परिपोष केला. 'पेशवाअीतील (म्हणजे स्वातंत्र्य-काळातील) अैश्वर्याचे दिवस' या भगूर गावाने पाहिले होते आणि त्या गतकालीन अैश्वर्याच्या खुणा चौदा चौकी वाडयाच्या अवशेषरूपाने सावरकर अवलोकीत होते.[2] बालपणीच पेशवाअीबद्दल अुत्पन्न झालेल्या या साभिमान प्रेमामुळे पुढे प्रत्यक्ष पुणे शहर पाहण्यापूर्वीच सावरकरांनी कितीतरी दिवस-रात्री पेशवाअीतील मानसिक पुण्यात घालविल्या होत्या.[3]

भगूर गावच्या भौगोलिक व अैतिहासिक वातावरणाचा ठसा सावरकरांच्या मनावर जसा उमटला तसा त्यांच्या अवतीभवती वावरणाऱ्या अनेक आप्त-स्वकीय व सुहृज्जनांच्या सहवासाचाही संस्कार झाला. सावरकरांच्या ठायी नैसर्गिकपणे असलेली काव्यशक्ती मुखर झाली, ती मुख्यत: दोन-तीन व्यक्तींच्या संस्कारांमुळे– दामोदरपंत स्वत: रसिकपणे काव्याचा परामर्ष घेणारे आणि कविता करण्याचा छंद असलेले गृहस्थ होते.[4] घरातील वातावरण शुचिर्भूत, भक्तिभावयुक्त आणि काव्यपोषक ठेवण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या सान्निध्यात सप्तशतीचे पाठ, संस्कृत, मराठी, अिंग्रजी काव्याचे अध्ययन, पठन, वाचन अित्यादी गोष्टींचा परिणाम सावरकरांच्या मनावर झाला. आपल्या वडिलांचे आणि मामांचे (कोठुरचे —

---

१. मा. आ. पृ. १४ ते २२. २. मा. आ. पृ. १४–१५. ३. भा. आ. पृ. ८५.
४. सा. द. पृ. ११.

श्री. मनोहर) हे काव्यऋण मोकळ्या मनाने मान्य करताना सावरकरांनी लिहिले आहे– " मला वाटते वहुधा माझ्या वडिलांच्या आणि मामांच्या अुभय कुळी आढळून येणाऱ्या अुपजात कवित्वशक्तीचे अंकुरच आम्हां वंधूंच्या कवितेत पल्लवित, पुष्पित आणि फलित झाले असावेत."[1] गणेशपंतांची पत्नी येसू वहिनी हिच्याकडून गजगौरीचे गाणे म्हणून घेण्यात व ते तासन्तास अैकत वसण्यात सावरकरांना जो अवर्णनीय आनंद होअी, तोही ह्या अुपजात कवित्ववृत्तीमुळेच होय.

सावरकरांच्या साहित्यिक गुणांना फुलविणारी या काळातील प्रमुख व्यक्ती म्हणजे ' काळ 'कर्ते श्री. शिवरामपंत परांजपे. दहिवेली येथील वक्तृत्व-स्पर्धेत पहिला क्रमांक मिळविल्याबद्दल अेक वर्षभर ' काळ 'पत्र सावरकरांना फुकट मिळाले होते. तेव्हापासून ' काळा 'तील विचारांचा सावरकरांच्या साहित्यगुणांवर फार परिणाम झाला. " माझ्या मनावर नसला तरी माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि अुत्साहावर ' काळा'च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला " अशा शब्दांत सावरकरांनी हे ऋण मान्य केले आहे.'[2]

या काळात ' गुरूणां गुरुः ' म्हणून सावरकर ज्यांचा गौरव करीत ते लो. टिळक सावरकरांना स्फूर्तिप्रद अशी विभूती वाटत होती. ' श्रीटिळकस्तवन ' नावाची कविता सावरकरांनी लोकमान्यांच्या ठळक गुणांचे संकीर्तन करण्यासाठी लिहिली होती. लोकमान्य टिळकांच्या ' केसरी 'वर सावरकरांची आबाल्य भक्ती होती.[3] ' केसरी 'च्या अनेक लेखांची ते पारायणे करीत असत.[4] केवळ काव्याचाच नव्हे, तर टिळक हे सावरकरांच्या अेकांकी नाटकाचाही विषय बनले होते[5] बालपणात अुद्भूत झालेला हा टिळकांबद्दलचा साभिमानयुक्त आदर पुढे सावरकर अिंग्लंडमध्ये असतानाही असाच प्रकट झाला होता. " महाराष्ट्राच्या विभूषणाला, आर्यधर्माच्या अभिमानाला, नीतिमत्तेच्या निपुणतेला व स्वदेशप्रीतीच्या अुद्भवाला, त्या बाल गंगाधर तिलकाला, " अशा शब्दांत सावरकरांनी टिळकांना वंदन केले होते.[6] सावरकरांच्या साहित्याचा विषय म्हणून टिळकांना मिळालेले स्थान येथे महत्त्वाचे आहे.

सावरकरांच्या वृत्तीवर, विचारावर, कृतीवर आणि साहित्यावरही सर्वाधिक परिणाम करणारी व्यक्ती चाफेकर होत. भारतीय जनतेला छळणाऱ्या रॅण्ड व आयर्स्ट या ब्रिटिश अधिकाऱ्यांचा खून करण्याच्या चाफेकर वंधूंच्या वृत्तीत स्वातंत्र्यलालसा होती, हौतात्म्यवृत्ती होती. त्यामुळे चाफेकर, रानडे, फाशी गेल्याची स्फोटक वार्ता समजताच सावरकरांचे बालहृदय पेटले आणि त्यांनी आपल्या कुलदेवतेसमक्ष चाफेकरांचे क्रांतिकार्य पुढे चालू ठेवण्याची पुढील शपथ घेतली.[7] " माझ्या देशाच्या

---

१. मा. आ. पृ. ११. २. मा. आ. पृ. ८८. ३. मा. आ.पृ. ८९. ४. मा. आ. पृ. ८९.
५. मा. आ. पृ. ८३. ६. लं. बा. पृ. ९६. ७. आत्मवृत्त–पूर्वपीठिका पृ. ८२.

स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजी-सारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन. "(अि. स. १८९८)

चाफेकरांचे हे क्रांतिकार्य सावरकरांच्या वाङमयनिर्मितीमागील अेक प्रमुख प्रेरणा होती आणि 'चाफेकर-रानडे यांच्या फटक्या'मागील सावरकरांची भावनात्मक अनुभूतीही अत्यंत अुत्कट होती. अश्रूंनी न्हालेल्या या कवितेचा प्रत्यक्ष निर्मितीप्रसंग वर्णन करून सावरकरांनी काव्याच्या प्रक्रियेचे अुत्कृष्ट विवेचन केले आहे.[1]

सावरकरांच्या वाङमयनिर्मितीमागील काही आद्य प्रेरणा ठरविण्याच्या दृष्टीने सावरकरांनी या काळात केलेल्या वाचनाची दखल घेणे अत्यावश्यक आहे. व्यक्तिमत्त्वाच्या पुढील प्रकरणात सावरकरांनी केलेल्या वाचनासंबंधी सविस्तर विचार केलेला आहे. येथे फक्त त्यांच्या प्रमुख प्रेरणा ठरविण्याच्या दृष्टीने विवेचन करावयाचे आहे. या कालखंडात सावरकरांनी मुख्यत: अितिहास व काव्य या विषयांचेच वाचन केल्याचे दिसते. महाभारत, पेशव्यांची आणि छत्रपतींची बखर, निबंधमाला, Short History of the World, काव्येतिहास-संग्रह, नवनीत, अित्यादी ग्रंथ; मोरोपंत, वामन पंडित, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास या कवींची काव्ये आणि होमरचे पोपकृत अिलियड हे महाकाव्य यांचे वाचन सावरकरांनी याच काळात केले.[2] (Much of his inspiration he found in history and epics).[3] या सर्व वाचनाचा परिणाम सावरकरांच्या वाङमयाच्या प्रेरणा, वाङमयाचे विषय आणि रचनापद्धती यांवर झाला. त्यांची भाषाशैलीसुद्धा याच वाचनातून आकार घेअू लागली. 'निबंधमाले'सारखी लांब लांब वाक्ये रचता यावी म्हणून ते निबंध लिहू लागले.[4] मोरोपंती कविता पाहून त्यांचे अनुकरणे ते कविता लिहू लागले.[5] "गातो आर्यांते श्रीमयुरेश स्फूर्तिने 'विनायक' तो." अशी स्पष्ट कबुली याच काळात रचलेल्या 'श्रीटिळकस्तवन' कवितेत श्री. सावरकरांनी दिली. हिंदुपदपादशाहीला अुभारणारा मराठ्यांचा अितिहास हा त्यांना पंचम वेदाअितका पवित्र वाटू लागला.[6] या अितिहासातूनच त्यांच्या वाङमयाचे विषय सिद्ध झाले. वयाच्या अकराव्या वर्षी 'श्रीमंत सवाअी माधवरावांचा रंग' त्यांनी आपल्या कवितेत रंगविला. 'झोपाळ्यावरचे गाणे रचले तरी ते पेशव्यांविषयीचे असे."[7] शिवाजीमहाराज नि त्यांची भवानी तलवार ही त्यांची स्फूर्तिदैवते झाली.[8] 'श्री-शिवगीत' 'श्रीशिवाजीमहाराजांची आरती' (अि. स. १९०२), 'शिववीर'

---

१. मा. आ. पृ. ८४–८५. २. मा. आ. पृ. ४६, ४८. ३. Savarkar and his Times p. 3. ४. मा. आ. पृ. ४८. ५. मा. आ. पृ. ४८. ६. आ. पूर्व पृ. ३१. ७. मा. आ. पृ. ३७. ८. सा. क. पृ. १३.

(अि. स. १९०३) ही शिवाजीवरील गीते याच कालखंडात त्यांनी लिहिली, 'शिवाजी ही स्वातंत्र्याची देवता आहे' अशा वृत्तीने त्यांनी शिवोत्सव साजरे केले. 'सिंहगडचा पोवाडा' (१९०४) व 'वाजी प्रभूचा पोवाडा' (१९०५) या कवनांची स्फूर्ति-स्थाने मराठ्यांच्या अितिहासातूनच त्यांनी घेतली. 'हिंदुसंस्कृतीचा गौरव', 'सर्व पेशव्यात थोर पेशवे कोण व का ?' आणि 'अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव का करावेत?' हे ह्या काळातील त्यांच्या निबंधांचे विषय आणि त्यांतील विचारांचे स्वरूप पाहिले म्हणजे अितिहास विषयाच्या वाचनाचा परिणाम सावरकरांच्या वाङ्मयनिर्मितीवर कसा झाला होता हे ध्यानी येते.

वृत्तपत्रांच्या वाचनाने त्या काळातील वातावरणाचाही संस्कार सावरकरांच्या मनावर होत होता. 'केसरी', 'पुणे वैभव' 'जगद्हितेच्छू', 'गुराखी' अित्यादी वृत्तपत्रे आणून ती वाचण्याचा व त्यांतील विषयांचा समवयस्क बालकांबरोबर काथ्या-कूट करण्याचा नाद सावरकरांना लागला होता.[1] अि. स. १८९४ ते ९५ चे संधीस मुंबअी, पुणे वगैरे ठिकाणी हिंदु-मुसलमान दंग्यांची मोठी भयंकर लाट अुसळली होती. त्या दंग्याची माहिती वृत्तपत्रद्वारा सावरकरांना कळे आणि 'मुसलमानांनी दंगे आरंभून हिंदूंचा पाडाव केला' की सावरकर संतप्त होत.[2] या जातीय वातावरणाचा परिणाम सावरकरांवर कसा होत असे, याचे वर्णन करताना श्री. धनंजय कीर यांनी लिहिले आहे–

> " This news of the atrocities then perpetrated on the Hindus in the United Provinces and Bombay fired his blood and he resolved to avenge the woes and deaths of his co-religionists"[3]

या राष्ट्रीय अपमानाचा 'वचपा' काढण्यासाठी त्यांनी आपल्या सवंगड्यांची हिंदू सेना तयार केली आणि भगूरच्या वेशीबाहेरील अेका ओसाड मशिदीवर हल्लाही केला. पण या कृतीपेक्षाही तीमागील सावरकरांची जी मनोवृत्ती तयार झाली तिला अधिक महत्त्व आहे. त्यांच्यातील हिंदूंबद्दलचा अभिमान या वातावरणात वाढीस लागला आणि पुढे तो दृढ झाला. १९०२ साली लिहिलेल्या अेका लेखात सावरकरांनी म्हटले आहे :

> " Hindus are responsible for the poverty and disorderliness of Hindustan. But if they ever desire to attain prosperity they must remain as Hindus.[4] "

मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांप्रमाणेच अिंग्रजांच्या राजकीय अत्याचारां-मुळे धुमसणाऱ्या त्या वेळच्या वातावरणाचाही सावरकरांच्या मनावर परिणाम

---

१. सा. च. पृ. २२. २. मा. आ. पृ. ५४. ३. Savarkar and his Times p.4.
४. Savarkar and his Times pp. 23, 24.

झाला. 'विलायती' नाव असलेल्या काटेरी झाडाची हातातील छडयांनी कत्तल करून विलायतवाल्याची कत्तल केल्याचे समाधान ते मिळवीत असत[1] अिंग्रजांबद्दलचा त्यांच्या मनात असलेला हा तिटकारा भोवतालच्या वातावरणाने अधिकच तीव्र झाला. स्वातंत्र्यलालसा व परकीयांबद्दल द्वेष या दोन्ही प्रवृत्ती त्यांच्या ठायी प्रकट होअू लागल्या होत्या. स्वातंत्र्यप्रेमाचा अुगम त्यांच्या अितिहासग्रंथांच्या वाचनात होता आणि परकीय अत्याचारांच्या अवलोकनातून परकीयांसंबंधीच्या द्वेषाला धार चढत होती. अशा मन:स्थितीत असतानाच त्यांनी चाफेकरांच्या हौतात्म्याची वर्णने वर्तमानपत्रांचे अंक गळत्या अश्रूंनी चिंब भिजवीत वाचली आणि त्यांचा जो परिणाम मनावर झाला त्याचे वर्णन सावरकरांनीच पुढील शब्दांत केले आहे, "ह्या अद्भुत रोमहर्षक घटना अितक्या सतत आणि द्रुतक्रमाने घडत गेल्या की, त्या धक्क्यामागून बसलेल्या धक्क्याने मुर्दाडातील मुर्दाडांच्या अंगात देखील अुत्तेजन आणि अुत्क्षोभ संचारल्यावाचून राहिला नाही. असा सारा देश त्या निशेने धुंद झाल्यासारखा झाला. मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या आणि शिवाजीच्या आणि पौराणिक वीरांच्या रंगातच रंगून राहिलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी ?"[2] "चाफेकर-रानडे फाशी गेल्याची स्फोटक वार्ता येताच माझे बालहृदय पेटले आणि मी माझ्या कुलदेवतेसमक्ष त्यांचे क्रांतिकार्य पुढे चालू ठेवण्याची शपथ घेतली."[3] अभिनव भारताच्या क्रांतिकारक संस्थेचा खरा अुगम या शपथेतच झाला."[4]

१८९६च्या सुमारास सावरकर नाशिक येथे अिंग्रजी शिकण्यासाठी आले. त्यावेळच्या नाशिक शहराच्या राजकीय वातावरणाचा परिणामही सावरकरांच्या मनावर झाला. सावरकरांनी ज्या शाळेत नाव घातले त्या शाळेची रानडे-विद्वांस-जोशी प्रभृती शिक्षक मंडळी लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा अभिमान बाळगणारी होती. नाशिकच्या जीवनावर टिळकांच्या राजकारणाचा ठसा अुमटावा असा या मंडळींचा प्रयत्न असे.[5] तसेच आपल्या राष्ट्रास 'काळ'कर्त्यांच्या स्वातंत्र्यगामी क्रांतिकारक मार्गावर न्यावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या पण निश्चित साधनाची कल्पना नसणाऱ्या श्री. म्हसकर व श्री. पागे यांच्यासारख्या व्यक्तीही नाशिकच्या सार्वजनिक क्षेत्रात कार्य करीत होत्या.[6] राजकारणविषयक चर्चा, गणेशोत्सव व शिवोत्सव यांनी नाशिकच्या मूळच्या अुदासीन व विलासमग्न वातावरणाला हळूहळू चेतना मिळू लागली होती. अशा वातावरणात सावरकर आले, ते 'स्वातंत्र्यासाठी आधीच तळमळ लागलेल्या' आणि 'परकीयांच्या द्वेषाने पेटलेल्या' मनाने. सावरकरांची ही मनोवृत्ती त्या काळात त्यांनी रचलेल्या मेळयांच्या पदांतून आणि स्वतंत्र काव्यरचनेतून प्रकट

---

१. मा. आ. पृ. ५३ २. मा. आ. पृ. ७९. ३. मा. आ. पृ. ८२. ४. मा. आ. पृ. ८३. ५. सा. च. पृ. ३६. ६. मा. आ. पृ. १२१.

होअू लागली. 'स्वदेशीचा फटका' (अि. स. १८९८)त्यांनी रचला.[१] तसेच मेळ्याच्या पदांतील पुढील काव्यपंक्ती त्यांची स्वातंत्र्यलालसा प्रकट करू लागल्या–

अुद्धारा आर्यजना आर्यभूमिला
त्या स्वतंत्र छत्रि आर्य ठेवणे त्वरे
प्रार्थनिया कार्याला लागलो बरे ॥[२]

राजा परकी, शिक्षण परकी, लक्ष्मीही जाहली परकी ।
आता प्रभो दयाळा तुजविण कोणीच ना रिपू हाकी ॥[३]

१८९८ ते १९०६पर्यंत सावरकरांनी जी स्वतंत्र पद्यरचना केली आहे, त्या सर्वांतून त्यांची स्वातंत्र्यविषयक तळमळ कोठे ना कोठे प्रकट झाली आहे. 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' ही कविताही याच काळातील. (अि. स. १९०३)

१८९८ मध्ये सावरकरांनी स्वदेशस्वातंत्र्यार्थ प्रसंगी सशस्त्र क्रांतियुद्धाची अुठावणी करून मारीत मारीत मरण्याची शपथ घेतली. १८९९च्या शेवटी श्री. म्हसकर, पागे व सावरकर यांनी राष्ट्रभक्त-समूहाची गुप्त संस्था काढली; आणि सन १९००च्या जानेवारीत मित्रमेळ्याची प्रकट गुप्त संस्था स्थापिली. या काळात सावरकरांनी संपूर्ण राजकीय स्वतंत्रता हे ध्येय जसे निश्चित केले होते, तसे त्या स्वातंत्र्यप्राप्तीचे अंतिम साधन सशस्त्र क्रांतियुद्ध हेच होय अशी त्यांची दृढ धारणा झाली होती.[४] ही साध्य-साधन-निश्चिती त्यांनी पूर्वकाळातील व समकालीन घटनांचा, विविध राजकीय कार्यांचा अन्वयार्थ लावून केली होती. त्यांनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे 'माझ्या क्रांतिनिष्ठ राजकीय जीवनाचा उगम, विकास नि कार्यक्रम हा माझ्या जन्मापूर्वीच्या काळातील राजकीय अुलाढालींचा नि परिस्थितीचा अेक परिणाम होता, परिपाक होता, प्रतिक्रिया किंवा अनुक्रिया होती'.[५] सन १८५७ नंतरच्या राजकारणाचे स्वरूप हे मुख्यत: ब्रिटिशनिष्ठ व अर्जविनंत्यांचे कसे होते, हे सावरकरांनी हिंदुस्थानातील प्रत्येक प्रांताचे अुदाहरण देअून आपल्या आत्मवृत्ताच्या 'पूर्वपीठिके'त स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रात ब्रिटिशनिष्ठ, स्वदेशनिष्ठ आणि सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्ष अशा स्वरूपाचे कार्य करीत होते याचे विवेचन करून सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाच्या ध्येय-धोरणाचे वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. " ह्या पक्षाची ही सशस्त्र क्रांतिनिष्ठा केवळ अिंग्रजी शिक्षणाचे अपत्य नव्हती. ... तिचे स्फूर्तिदैवत होते श्रीकृष्ण, श्री शिवाजी महाराज आणि त्यांची भवानी तलवार, मुस्लिम पादशाहीला पालथी घालून हिंदुपदपादशाहीला अुभारणारा मराठ्यांचा अितिहास होता तिचा पंचम वेद...

---

१. मा. आ. पृ. ३९. २. मा. आ. पृ. ३९. ३. सा. च. पृ. ३८. ४. मा. आ. पृ. २२४. ५. आ. पूर्व पृ. ७.

सशस्त्र क्रांतीने इंग्रजाला हुसकून दिल्यावाचून तो केवळ न्यायबुद्धीने राज्य सोडून जाईल ही गोष्ट त्रिकालीही घडणार नाही हा असे त्यांचा सिद्धांत....''[1] यश येवो वा अपयश येवो, देशशत्रूचा सूड अुगविणे, प्रतिशोध घेणाऱ्या हौतात्म्याच्या आगीने राज्यक्रांतीचा वणवा भडकविणे आणि कोणी मागे येवो वा न येवो, आपणं आपले कर्तव्य करणे ही ह्या क्रांतिनिष्ठ पक्षाची सूत्रे होती.[2]

याच तत्त्वज्ञानाच्या संदर्भात सावरकरांनी १८८५ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या स्थापनेचा अन्वयार्थ लावला आहे. हिंदुस्थानातील ब्रिटिश-विरोधी असंतोष हा ओसरून जाण्यासाठी ठेवलेले सुरक्षाछिद्र (Safety valve) म्हणजेचं ब्रिटिशांनी काढलेली 'अिंडियन नॅशनल काँग्रेस' होय असे सावरकर मानीत.[3] ब्रिटिश राजमुकुटाशी अेकनिष्ठ राहून व राज्यकारभारकर्त्यांशी आपला वाद आहे असे सांगून त्या वेळचे भारतीय नेते प्रकट राजकारण करीत.[4] त्यांचे ध्येय राज्यक्रांती नसून राज्य-सुधारणा होते. त्यांची साधने नैर्बंधिक (Legal) होती. वैध (Legitimate) किंवा घटनात्मक (Constitutional) देखील नव्हती.[5] नैर्बंधिक साधनातील अपुरेपणा त्या पुढाऱ्यांच्या ध्यानीही आला नव्हता.[6] खुद्द लोकमान्य टिळकही बाह्यतः स्वतःला राजनिष्ठ म्हणवीत आणि Home Rule च्या पलीकडे त्यांच्या चळवळीचे ध्येय गेले नव्हते.[7] या सर्व राजकीय परिस्थितीच्या अभ्यासाचा जो संस्कार सावरकरांच्या मनावर झाला आणि जो निष्कर्ष त्यांनी काढला तो पुढील-प्रमाणे होता. : "मूळ निर्बंध करण्याची सत्ता ब्रिटिशांच्या हातून छिनावून घेतली पाहिजे. ती सत्ता ब्रिटिश जे गाजवितात ते त्यांच्या हाती शस्त्रशक्ती आहे म्हणून. यास्तव त्यांच्या या शस्त्रशक्तीला हाणून पाडणाऱ्या प्रतिशक्तीची—म्हणजेच सशस्त्र क्रांतीची—अुठावणी केल्याशिवाय ब्रिटिशांच्या दास्यातून ही आपली मातृभूमी स्वतंत्र करता येणे नाही. शक्य म्हणा, अशक्य म्हणा, पण मार्ग तो. गुप्त संस्थांच्या भुयारातून सशस्त्र क्रांतीच्या रणांगणाकडे."[8]

१८५७ नंतरच्या कालखंडाचा व समकालीन परिस्थितीचा अभ्यास करून सावरकरांनी आपल्या साध्य-साधनाची जशी निश्चिती केली, तशी आपल्या पुढील कार्यक्रमाचीही योजना केली. या कार्यक्रमाचे स्वरूप सांगताना सावरकरांनी लिहिले आहे : "अभिनव भारताचा कार्यक्रम मी प्रथमपासूनच मनःप्रवर्तन आणि शरीर-प्रवर्तन, राष्ट्राची मानसिक क्रांती आणि मग वास्तविक क्रांती, प्रबुद्ध संकल्प आणि मग प्रबल क्रिया, मतप्रचार आणि कृतिप्रचार अशा अनुक्रमाने विभागला होता."[9]

---

१. आ. पूर्व पृ. ३१. २. आ. पूर्व पृ. ३१. ३. आ. पूर्व पृ. ५६–५७. ४. आ. पूर्व पृ. ५९. ५. मा. आ. पृ. २१३. ६. मा. आ. पृ. २१३. ७. मा. आ. पृ. २१४. ८. आ. पूर्व पृ. ८१. ९. मा. आ. पृ. २३२.

१९०२ पर्यंत सावरकरांचे वैचारिकविश्व व भावविश्व कशा स्वरूपाचे होते हे नीट ध्यानी यावे म्हणून वरील विवेचन अधिक तपशीलाने केले आहे. सावरकरांच्या साहित्याची आद्य प्रेरणा स्वातंत्र्यलालसेत होती. त्या दृष्टीने राष्ट्राची मानसिक क्रांती वा मन:प्रवर्तन करण्यासाठी त्यांनी वाङ्मयाची कास धरली. लोकांचे मन:प्रवर्तन वा लोकांत मानसिक प्रक्षोभ अुत्पन्न करण्यासाठीच त्यांनी चाफेकरांचा पोवाडा रचला होता. (To stir up the people round him he thought of composing a ballad in praise of Chaphekars.)[1]

'स्वातंत्र्यसंगरी रिपूवर घाला' घालण्यासाठी 'अहो वंधूंनो चला' असे त्यांनी बाजीप्रभूच्या पोवाड्यात आवाहन केले आहे. 'या या राष्ट्रहितार्थ नित्य झटुनी कर्तव्यकर्मा स्मरा' किंवा 'वाया सोडुनि वाद, संघ करुनी रे अुध्दरू ही धरा' असा मतप्रचार त्यांनी 'केरळ कोकिळकारांचे स्वागत' करण्याच्या निमित्ताने केला आहे.

१९०२ मध्ये सावरकरांनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात नाव दाखल केले आणि त्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात ते राहू लागले. सावरकर पुण्यात आले त्या वेळी पुण्यात आणि सर्व हिंदुस्थानमध्ये स्फोटक परिस्थिती होती. तो काळ क्रांतिकारक कल्पनांना जन्म देणारा आणि क्रांतिकारक कार्याची सूचना देणारा होता.[2] लो. टिळक, लाला लजपतराय, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ना. गोखले अित्यादी नेत्यांच्या विचारांचा प्रभाव सर्वत्र वाढत होता. श्री. कीर यांच्या शब्दांत सांगायचे तर—"The love of country and the feeling of United India was also raising. Simultaneously the Swadeshi movement was also gaining ground."[3] लॉर्ड कर्झनसारखा चढेल व्हॉअीसराय हिंदुस्थानला लाभल्यामुळे असंतोषाच्या आगीत तेल ओतले जात होते. जागतिक परिस्थितीही युरोपियन राष्ट्रांना विरोधी होअू लागली होती. आफ्रिका, आयर्लंड, चीन, जपान, अित्यादी राष्ट्रांतही युरोपियन राष्ट्रांबद्दल तीव्र असंतोष पसरत होता.[4] अेकूण क्रांतीच्या पोषक अशा वातावरणात सावरकर पुण्यास आले आणि तेही क्रांतिभावनेची बीजे पेरण्यासाठीच. सावरकर पुण्याला जाण्यापूर्वी त्यांना निरोप देण्याकरिता त्यांच्या मित्रमेळ्याची जी सभा नाशिक येथे झाली, तीत भाषण करताना त्यांनी आपला अुद्देश स्पष्ट केला होता. ते म्हणाले, "Now I have decided to utilize this opportunity of my entering the Fergusson College at Poona to further our cause and to spread our mission throughout Maharashtra."[5]

---

१. Life of Barrister Savarkar p. 11. २. सा. च. पृ. ७८. ३. Savarkar and his Times p. 19. ४. सा. च. पृ. ७६–७७. ५. Life of Barrister Savarkar p. 18.

जीवितध्येय आणि साधन निश्चित करून त्यांनी कॉलेजच्या वातावरणात पदार्पण केले होते. त्याबरोबरच अुत्कृष्ट साहित्यिकाला आवश्यक असणारी शिदोरीही त्यांनी जमविली होती. "He had entered Poona with a stock of reading, a gift for writing and a genius for oratory such as few students of this country possess. He was much advanced in classical, historical and political literature."[1] या काळात त्यांनी आपले साहित्यविषयक वाचन अधिक वाढवले. कालिदास व भवभूती यांची नाटके त्यांनी अभ्यासिली व त्यांच्यावरील तुलनात्मक निबंध लिहिला. पाश्चात्त्य कवींपैकी स्कॉट, शेक्सपिअर, मिल्टन यांच्या वाङमयाचे परिशीलन केले. याचवेळी त्यांच्या मनावर मिल्टनच्या 'पॅरिडाअीज लॉस्ट' या महाकाव्याचा फार मोठा प्रभाव पडला होता. 'रामायण' व 'अिलियड' या महाकाव्यांचा सावरकरांनी अितका सूक्ष्म व विवेचक अभ्यास केला होता की, प्रा. वा. ब. पटवर्धन यांच्याकडून सावरकरांनी शाबासकी मिळवली होती.[2]

सावरकर पुण्यास येअीपर्यंत आणि नंतर पुण्यातील वास्तव्यात त्यांच्या मनावर संस्कृत, मराठी व अिंग्रजी वाङमयाचे विविध संस्कार झाले. आणि त्यांचे प्रत्यंतर या काळात त्यांनी लिहिलेल्या अनेक वाङमयकृतींतून दिसून येते. कवितांतील प्रदीर्घ संस्कृत समास, 'स्वतंत्रतेच्या स्तोत्रा'तील संस्कृतप्रचुर ध्रुवपद, संस्कृतशब्दप्राचुर्य अित्यादी गोष्टी या दृष्टीने अवलोकनीय आहेत. मोरोपंतांच्या कवितेचा सावरकरांनी विस्तृत व विवेचक अभ्यास केला होता.[3] मोरोपंतांच्या अेकशेआठ रामायणांपैकी महत्त्वाच्या रामायणाचे प्रकार त्यांनी तोंडपाठ केले होते.[4] मोरोपंतांच्या 'गंगावकिली'-च्या धर्तीवर 'गोदावकिली' रचण्याअितके कौशल्य सावरकरांनी आत्मसात केले होते.[5] आधुनिक मराठी कवितेतील 'केरळकोकिळ' कारांच्या कवितेची धाटणी त्यांनी अचलली होती.[6] 'चुकलेले कोकरू', 'लेडी ऑफ दि लेक' यांतील काही सर्ग अित्यादी कवितांवरून त्यांच्या मनावर पाश्चात्त्य कवींचा झालेला संस्कार अनुकरणाच्या हव्यासापर्यंत पोहोचला होता.[7] संस्कृत व अिंग्रजी महाकाव्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याअितकी त्यांची विवेचक शक्ती विकसित झाली होती.

१९०२ ते १९०५ या काळात महाविद्यालयीन शिक्षणासाठी सावरकरांचे वास्तव्य पुण्यात होते. या काळात त्यांचा राजकीय जहालपणा विदेशी कापडाच्या होळीतून प्रकट झाला होता व गैरवर्तनाबद्दल कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडून त्यांना दहा रुपये दंड आणि वसतिगृह सोडून जाण्याची शिक्षा झाली होती. कॉलेजमध्ये शिक्षण

---

१ Savarkar and his Times 16. २. Savarkar and his Times P. 16. ३. मा. आ. पृ. १६९. ४. मा. आ. पृ. २०५. ५. मा. आ. पृ. २०५. ६. मा. आ. पृ. १६९. ७. मा. आ. पृ. २०४.

घेत असताना सावरकरांच्या वाङ्मयीन चळवळीही चालू होत्या. 'सावरकर कँप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मित्रमंडळींनी 'आर्यन वुअिकली' नावाचे अेक हस्तलिखित नियकालिक काढले होते.[१] या हस्तलिखितातून सावरकरांनी स्वत:ची विपुल काव्यरचना प्रसिद्ध केल्याचे अुल्लेख आढळतात.[२] 'विश्वात आजवरि शाश्वत काय झाले ?' ही कविता सावरकरांनी प्रथम 'आर्यन वुअिकली'साठी रचली होती व नंतर 'काळ' पत्रात ती प्रसिद्ध झाली.[३] 'श्री शिवाजी महाराजांची आरती' ही सावरकररचित कविता त्या वेळी सावरकरांच्या 'आर्यन संघा'च्या साप्ताहिक पठनात होती.[४] केवळ हस्तलिखित नियतकालिकातच नव्हे, तर 'काळ'सारख्या वृत्तपत्रातूनही सावरकरांच्या कविता या वेळी प्रसिद्ध होत होत्या. 'विश्वात आजवरि शाश्वत काय झाले ?' ही अुपरिनिर्दिष्ट कविता आणि 'वृषोक्ति' ही आणखी अेक कविता 'काळ' पत्रातूनच प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.[५] या पद्यलेखनावरोबरच सावरकरांचे काही गद्यलेखनही याच काळात वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत होते. नाना फडणीस अुत्सव समितीने पारितोषिक देअून गौरविलेला 'अेतिहासिक पुरुषांचे अुत्सव का करावे' हा निबंध याच काळात सावरकरांनी लिहिला.[६] 'दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम्' हा 'काळ'मध्ये प्रसिद्ध झालेला निबंध 'विनायक' नावाने जरी प्रसिद्धीला आला, तरी तो सावरकरांचाच होय.[७] या साऱ्या वाङ्मयीन कृतींतून सावरकरांचा ध्येयवाद, त्यांची श्रद्धास्थान, पुनरुत्थानाच्या प्रेरणेतून प्रभावित झालेला त्यांचा दुर्दम्य आशावाद यांचेच दर्शन घडते.

भोवतालची प्रक्षोभक राजकीय परिस्थिती ही जशी सावरकरांच्या वाङ्मयाची अेक प्रेरक शक्ती बनली होती, तशी सभोवतीची अुद्वेगजनक सामाजिक परिस्थितीही सावरकरांच्या वाङ्मयनिर्मितीला कारणीभूत झाल्याचे आढळून येते. मुंबअीचे नामदार सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनी 'हिंदु युनियन क्लबा' च्या हेमंत व्याख्यान कमिटीमार्फत 'बालविधवा दु:स्थितीकथन' या विषयावर रु. २० चे अेक पारितोषिक जाहीर केले होते. त्यामुळे सावरकर ही कविता लिहिण्यास प्रवृत्त झाले. परंतु केवळ पारितोषिकांच्या आमिषाने ही कविता लिहिण्यास सावरकर प्रवृत्त झाले असतील असे वाटत नाही. कारण सावरकरांनी स्वत:च सांगितल्याप्रमाणे 'समाजकारणात रानडे-आगरकर त्यांचे गुरु होते. आणि राष्ट्रीय प्रगतीला अडविणाऱ्या रूढींचा अुच्छेद, विधवा-विवाह, स्त्रीशिक्षण, विटाळवेडाचा नायनाट, परदेशगमन-स्वातंत्र्य, धार्मिक अवडंबराचे अुच्चाटन प्रभृती सुधारणांचे ते सक्रिय पक्षपाती होते.[८]

---

१. सा. च. पृ. ८०. २ सा. च. पृ. ८९. ३. सा. च. पृ. ३४.
४. सा. क. ३४. सा. च. पृ. ८९. ५. सा. च. पृ. ८९–९०. ६. सा. च. पृ. १०१. ७. सा. च. पृ. १०१–१०२, ८. मा. आ. पृ. २३५.

त्यामुळे प्लेगमध्ये पती निवर्तल्यामुळे निराधार बनलेल्या विधवेचे दुःख सावरकरांनी परिणामकारकतेने रंगविले आहे आणि कवितेच्या अखेरीस बालविधवांची स्थिती सुधारण्याचे काही अुपायही सांगितले आहेत. 'राजकीय बाबतीत क्रांतिवादी असणारे सावरकर सामाजिक प्रश्नांचा विचारही त्याच पद्धतीने करीत असत.' तसेच अन्याय म्हटला की त्याच्यावर तुटून पडावयाचे – मग तो अन्याय राजकीय वा सामाजिक असो–ही सावरकरांची वृत्ती होती याची साक्ष या कवितेवरून पटते.[1]

२१ डिसेंबर १९०५ रोजी सावरकर बी.अे.ची परीक्षा अुत्तीर्ण झाले. आणि १९०६ च्या प्रारंभी सेकंड अेलअेल. बी.च्या अभ्यासासाठी ते मुंबअीस जाअून राहिले. मुंबअीच्या त्यांच्या या वास्तव्यातील वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाची घटना म्हणजे– 'विहारी' नावाच्या साप्ताहिकात त्यांनी केलेले लेखन. 'वंदे मातरम्' या शीर्षकाखाली मातृभूमीची थोरवी वर्णन करणारा गद्यकाव्यात्मक लेख त्यांनी याच काळात लिहिला. भारतभूमीतील थोर योद्धे, शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, कवी, धर्मसंस्थापक, राजे पतिव्रता अित्यादी रत्नांचा अितिहास संकलित करून भारतमातेच्या निसर्ग सौंदर्याचेही काव्यमय वर्णन त्यांनी या लेखात केले आहे. सावरकरांच्या कवितांतून जी अुत्कृष्ट मातृभक्ती दृग्गोचर होते तिचे गद्यात्मक रूप या लेखात प्रतिबिंबित झाले आहे. अिंग्लंडला जाण्यापूर्वी सावरकरांचे मन नितांत देशभक्तीने किती भारलेले होते याचा आलेख सापडतो.[2]

१९०६ च्या मे महिन्यात सावरकरांना अिंग्लंडला जाण्यासाठी 'शिवाजी शिष्यवृत्ती' मिळाल्याचे वृत्त समजले. बॅ. सरदारसिंगजी राणा यांनी जाहीर केलेली ही शिष्यवृत्ती 'केसरीकार टिळकांच्या नि काळकर्त्या परांजपे यांच्या अनुग्रहाने' मिळाल्याचे स्वतः सावरकरांनीच सांगितले आहे.[3] त्याशिवाय सावरकरांचे श्वशुर श्री. भाअूसाहेब चिपळूणकर आणि जव्हारचे राजे कृष्णशहा यांच्या आर्थिक नि आशीर्वादिक पाठिंब्याच्या बळावर माझा अिंग्लंडला जाण्याचा योगायोग जुळून आला' असा कृतज्ञ भाव सावरकरांनी व्यक्त केला आहे.[4] या कृतज्ञभावातूनच 'श्रीमान राजे कृष्णशहा यांस' ह्या कवितेची निर्मिती झाली. राजेसाहेब नि त्यांचे कारभारी श्री. चिपळूणकर यांचे गुणगान करताना सावरकर लिहितात––

"की द्रव्य आणी गुण ते निधानी
प्रपूर्ण अैशी तव राजधानी
गुणज्ञ, वेत्ता, अधिकार भारी
समर्थ की तो तव कारभारी ।"[5]

---

१. सा. च. पृ. ९२. २. स. सा. वा. पृ. १३ ते २१. ३. श. शि. पृ. १०१.
४. श. शि. पृ. १०१. ५. सा. क. पृ. ६३.

शत्रूच्या शिबिरात (१९०६ ते १९१०)

९ जून १९०६ रोजी सावरकरांना अिंग्लंडला घेअून जाणाऱ्या पर्शिया बोटीने हिंदुस्थानचा किनारा सोडला. त्यांना निरोप देण्यासाठी त्यांचे अनेक आप्तेष्ट मुंबअीस आले होते. 'विदेश गमनाचे' हे 'कार्य अुदेले' तेव्हा सावरकरांचे कौटुंबिक जीवन नुकतेच बहरास येअू लागले होते. अि. स. १९०१ मध्ये त्यांचा विवाह माअी चिपळूणकर यांच्याबरोबर झाला होता. अि. स. १९०५ च्या पूर्वार्धात अुभयतांच्या 'यौवन-लतिकेला पहिले फूल' प्रभाकराच्या रूपाने फुललेले त्यांनी पाहिले होते. तोच थोडयाच दिवसांत 'प्रियजन-विरहाचे' दुःख त्यांच्यावर कोसळले आणि 'अंतरता मज प्रीति-तरु-लता खेद अती झाला' असे दुःखोद्‌गार त्यांनी काढले.[१] आगनावेवर वावरताना त्यांचे मन 'प्रियजन विरहाने खिन्न' झाले होते.[२] 'अंतःकरणातले अश्रू अंतःकरणातच गोठवून टाकण्याचा प्रयत्न' ते करीत होते.[३] 'खाली तो तटशून्य अथांग महासागर आणि वर ते तलशून्य अथांग आकाश' त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येत होते[४]. स्वतःच्या चिंतनशील मनाची ओढ पुरविण्यासाठी आगनावेवर चढल्यापासूनच रात्र पडली की कोणालाही सांगाती न घेता नावेच्या माथ्यावर जाअून कुठल्यातरी कोपऱ्यात ते तासन तास अेकांतात बसत.[५] अशा वेळी कधी तात्त्विक चिकित्सेत रंगून जात, तर कधी स्वतःच्या प्रेमाची चांदणी स्मरून तळमळत. सावरकरांनी पुढे काही वर्षांनी लिहिलेल्या 'महासागर' ह्या कवितेतील तत्त्वचिंतनात्मक विधेयांचे टिपण याच वेळी त्यांच्या मनाने केलेले आहे.[६] आणि दयितेच्या वियोगाने तळमळणारे त्यांचे मन 'तारकांस पाहून' ह्या कवितेत प्रतिबिंबित झाले आहे. सागर आणि चांदणी यांचा संगम पाहून सावरकरांनी आपली विरहभावना पुढील शब्दांत व्यक्त केली आहे :

"प्रेमाची चांदणी परंतु ज्यांची दूर वसे
किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट जैसे
तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा ।"

'महासागर' आणि 'तारकांस पाहून' या दोन्ही कवितांत सामान्यतः विश्व-चक्राच्या प्रवर्तनामागील हेतू कोणता आणि ह्या ब्रह्मांडाच्या घडामोडीत मनुष्याचे स्थान कोणते यासंबंधीची चिकित्सा सावरकरांनी केली आहे. निसर्गाच्या दर्शनी-शोभेपेक्षा त्याच्या भव्यतेचाच पगडा सावरकरांच्या मनावर अधिक कसा बसत असे[७] आणि कल्पकतेच्या फुलबाजीतूनही त्यांच्या आत्म्याचाच प्रकाश कसा पडत असे, हे वरील दोन्ही कवितांवरून ध्यानी येते.

---

१. सा. क. पृ. ६८–६९. २. सा. क. पृ. ६८–६९ ३. श. शि. पृ. १५. ४. श. शि. पृ. २६. ५. श. शि. पृ. २८. ६. श. शि. पृ. २८. ७. श. शि. पृ. २६.

दोन किंवा तीन जुलैला सावरकर लंडनला जाऊन पोहोचले. अिंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांनी आपले ध्येय व साधन यांची निश्चिती केली होती. बॅरिस्टरीचा अभ्यास हे त्यांचे दुय्यम अुद्दिष्ट होते. त्यांचे मुख्य ध्येय होते ते भरतखंडाचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य. सशस्त्र क्रांती हे त्यांचे अंतिम साधन होते. १९०० साली स्थापन केलेल्या मित्रमेळ्याचे व १९०४ साली नामकरण केलेल्या 'अभिनव भारत' संस्थेचेही ध्येय संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच होते.[१] विदेशात जाण्यामागिल आपल्या हेतूचे स्पष्टीकरण सावरकरांनी अनेक ठिकाणी केले आहे. 'मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी या देशात जी आज नाहीत अशी महत्त्वाची कार्ये विदेशात जाऊन साधावयाची आहेत' असा विदेशी जाण्याचा आपला मुख्य हेतू त्यांनी सांगितला आहे.[२] या महत्त्वाच्या कार्यांपैकी अेक मुख्य कार्य म्हणजे परदेशात अभ्यास करणाऱ्या बुद्धिमान हिंदी तरुणांना अेकत्र गाठावयाचे आणि त्यांच्यात तीव्र देश-स्वातंत्र्यलालसा संचरवून सशस्त्र क्रांतीचा प्रचार करावयाचा. हिंदुस्थानात परतल्यावर हेच विद्यार्थी प्रांतोप्रांती अुच्च अधिकारावर येतील व त्यामुळे देशातील प्रांतोप्रांतींची शासित केंद्रे क्रांतिकारकांच्या हाती येतील अशी सावरकरांची योजना होती.[३] अतअेव भारतीय विद्यार्थ्यांत देशभक्तीच्या भावनेचा प्रसार व सशस्त्र क्रांतीची चेतना ही दोन मुख्य अुद्दिष्टे समोर ठेवून सावरकर लंडनला आले होते.

सावरकर अिंग्लंडमध्ये येण्यापूर्वी तेथील हिंदी विद्यार्थ्यांत असा अुत्कट देशभक्तीचा प्रसार कोणी केला नव्हता आणि सशस्त्र क्रांतीचा अुच्चारही झाला नव्हता. शेकडा दहांचा अपवाद सोडला तर ब्रिटनमधील अुरलेले बहुतेक हिंदी तरुण राजकारणापासून कटाक्षाने दूर राहणारे होते.[४] थेट साहेब बनण्यात बहुसंख्य हिंदी तरुण भूषण मानीत होते.[५] या अुच्छृंखल व विलासी तरुणांचे चित्र सावरकरांनी सविस्तरपणे रंगविले आहे.[६] अशा वातावरणात आल्यावर बॅरिस्टरीच्या अभ्यासाकडे तांत्रिक लक्ष पुरवून अुरलेला वेळ व अुरलेली शक्ती राष्ट्रकार्याच्या विविध प्रकारांत खर्च करण्यास सावरकरांनी सुरुवात केली. या अैषारामी व आत्मतेज विसरलेल्या हिंदी तरुणांचे मानसिक परिवर्तन करण्याचा अुद्योग त्यांनी हाती घेतला आणि १९०६ च्या डिसेंबर महिन्यात अभिनव भारताच्या स्थापनेचा विचार पक्का केला.[७] याच अुद्योगातून पुढे 'फ्री अिंडिया सोसायटी' या संस्थेचा जन्म झाला.

अिंग्लंडमधील चार वर्षांच्या वास्तव्यात सावरकरांनी जे गद्यपद्यात्मक साहित्य लिहिले ते वरील साध्य-साधनाच्या पुरस्कारार्थच लिहिल्याचे दिसून येते. त्यांना

---

१. मा. आ. पृ. २१३, २२४. २. श. शि. पृ. १७. ३. श. शि. पृ. ११०.
४. श. शि. पृ. ११०. ५. श. शि. पृ. १११. ६. श. शि. पृ. ११०-११५.
७. सा. च. पृ. १५४.

अगोदर मानसिक क्रांती करावयाची होती; मन:प्रवर्तन करावयाचे होते आणि मग वास्तविक क्रांती किंवा शरीरप्रवर्तन साधावयाचे होते. म्हणूनच त्यांनी आपल्या साहित्याचा सारा मोहोरा याच ध्येयाकडे वळविला होता. 'लंडनची वातमीपत्रे' 'जोसेफ मॅझिनी – आत्मचरित्र व राजकारण', 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' आणि 'शिखांचा अितिहास' हे गद्यग्रंथ संपूर्ण स्वातंत्र्याच्या पुरस्कारार्थ व सशस्त्र क्रांतीच्या प्रचारार्थ त्यांनी लिहिल्याचे दिसून येते. तसेच 'हुतात्म्यांनो', 'हिंदी संस्था निकांनो', काय पत्करता सांगा', 'आमुचा रामराम घ्यावा' (Fare-well) ही तीन पत्रके प्रसिद्ध केली, तीही ह्याच हेतूने.

अिंग्लंड किंवा युरोप – आशिया – आफ्रिका नि अमेरिका या खंडांत घडलेली कोणतीही घटना असो – त्या घटनेचा अन्वयार्थ स्वातंत्र्याची भावना अुद्दीपित करण्याच्या हेतूने लावावयाचा आणि 'लंडनची वातमीपत्रे' लिहिताना तशी लेखनपद्धती स्वीकारावयाची असे सावरकरांचे धोरण होते. अिंग्लंडमध्ये 'राष्ट्रीय तरुण सेना' अुभारण्यासंबंधी तेथील विविध वृत्तपत्रांत चर्चा सुरू होताच सावरकरांनी तिचा फायदा घेअून 'लंडनच्या वातमीपत्रा'त लिहिले, "प्रत्येकाने आपल्या स्वदेश-स्वातंत्र्यासाठी रणांगणात अुतरण्याची तयारी करावी ही पवित्र महत्त्वाकांक्षा आहे. राष्ट्राचे चैतन्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य हे होय. हे कायम असले तर राष्ट्र आपली अुन्नती करून घेण्यास समर्थ होते."[1] दे. भ. पां. म. वापट यांची स्कॉलरशिप मुंबअी युनिव्हर्सिटीने काढून घेतल्याच्या वृत्तावर मल्लीनाथी करताना सावरकरांनी लिहिले, "हिंदुस्थानच्या तरुण रक्तात निसर्गानेच पेरलेली स्वातंत्र्य-भक्ती आता असला वेडगळ धाक दाखवून मारण्याचे दिवस राहिलेले नाहीत."[2] अिंग्लंडमध्ये भरलेल्या राष्ट्रीय परिषदेतील ठरावांचे वर्णन करताना सावरकरांनी स्वातंत्र्यविषयक ठरावाचे निवेदन केले आहे. आणि अखेरीस लिहिले आहे – "स्वराज्य हे दिव्य आहे व दिव्य अंत:करणातच ते वृद्धिगत होअू शकते."[3]

संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याचा सावरकर –पुरस्कृत मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. मुख्यत: त्याच कृतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळेल, अर्ज–विनंत्यांनी ते मिळणार नाही, असे सावरकरांनी 'लंडनच्या वातमीपत्रा'त अनेक ठिकाणी आग्रहाने सांगितले आहे. 'लंडन टॉवर' मधील शिवाजीची वाघनखे पाहताना 'पारतंत्र्याची आतडी अुपसण्यासाठी सज्जखड्ग झाले पाहिजे' असे त्यांना वाटले.[4] हिंदुस्थानला 'सत्तावन्नचे डोहाळे' लागताच अिंग्लंडमध्ये कशी गडबड अुडाली याचे वर्णन त्यांनी केले आहे.[5] अिंग्लंडच्या स्टेजवर भिक्षा मागून स्वातंत्र्य मिळणार नाही हे त्यांनी 'हिंदुस्थानचे गारुडी' या

---

१. पत्र क्र. ८. २. पत्र क्र. १२. ३. पत्र क्र. ३४. ४. पत्र क्र. ५. ५. पत्र क्र. ६.

पत्रात सूचित केले आहे.[1] अिंग्लंडमधील स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या मागणीसाठी चळवळ केल्याचे पाहून सावरकरांनी निष्कर्ष काढला आहे की, 'कोणतीही राज्यक्रांती प्रत्यक्ष प्रतिकाराशिवाय झाली नाही'[2]. आयर्लंडमध्ये वर्षारंभाला काय काय घडत आहे व तेथील वृत्तपत्रे कोणकोणती चर्चा करीत आहेत यांचे वर्णन करण्याच्या संदर्भात सावरकरांनी 'स्वातंत्र्य हे लढाअीशिवाय कधीही मिळणार नाही' हा आपला आवडता सिद्धान्त सांगितलेला आहे.'[3] 'वरे झाले', 'स्वराज्याच्या जयघोषाचा परिणाम' अित्यादी पत्रांतूनही सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचीच अप्रत्यक्ष चेतावणी दिलेली आहे.

सशस्त्र क्रांतीच्या किंवा प्रत्यक्ष प्रतिकाराच्या साधनांवर सावरकरांचा आत्यंतिक विश्वास असल्याने अितर साधने त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी आणि क्वचित हास्यास्पदही ठरत. या दृष्टीने 'लंडनच्या वातमीपत्रा'त रडक्या प्रतिकाराच्या (Passive resistance) साधनांची ते अुपहासवक्रोक्तीने कशी टर अुडवितात ते पाहण्यासारखे आहे.[4] 'अप्रत्यक्ष प्रतिकाराचा जय व पराजय' या पत्रात त्यांनी अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या तत्त्वाचे रासायनिक पृथक्करण केले आहे आणि शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, 'मानवी मनाच्या हल्लीच्या स्थितीत अप्रत्यक्ष प्रतिकाराने सर्व निकाल लागणे दुर्घट आहे....अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मागे लष्करी सामर्थ्य असले तरच तो विजयी होतो.'[5] फ्रान्सच्या अुदाहरणावरून सावरकरांनी आपला हा सिद्धान्त पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

सशस्त्र क्रांती व गुप्त मंडळे या सावरकर प्रभृती क्रांतिकारकांच्या साधनांचा महात्मा गांधी यांच्याकडून कडाडून विरोध झाला. म. गांधी त्या काळात अिंग्लंडमध्ये होते आणि त्यांनी 'मारो काटो का पंथ' या नावाचे अेक चोपडे प्रसिद्ध करून क्रांतिकारक पक्षावर हल्ला चढविला अशी माहिती मिळते.[6] म. गांधींच्या या हल्ल्याला सावरकरांनी 'तलवार' नावाच्या क्रांतिकारकांच्या मुखपत्रातून अुत्तरही दिले. त्यात सावरकरांनी असा युक्तिवाद केला की, "Whenever the natural process of national and political evolution is violently suppressed by the force of wrong, the revolution must step in as a natural reaction and therefore ought to be welcomed as the only effective instrument to re-enthrone Truth and Right"[7]

सावरकरांनी स्वतः निश्चित केल्या ध्येयाचा व स्वीकारलेल्या साधनाचा हिरीरीने पुरस्कार 'लंडनच्या वातमीपत्रा'त केलेला आहे. त्यात बातमीपेक्षा चर्चेलाच

---

१. पत्र क्र. ११. २. पत्र क्र. १४. ३. पत्र क्र. १५. ४. पत्र क्र. १४, १५, १८, २०. ५. पत्र क्र. २०. ६. सा. च. पृ. १४७. ७. Savarkar and his Times p. 46.

अधिक स्थान आहे आणि म्हणनच सावरकरांनी लिहिलेली ही वातमीपत्रे ' वातमीपत्रे ठरत नसून ती प्रचारपत्रेच ' ठरतात.[१]

'जोसेफ मॅझिनी : आत्मचरित्र नि राजकारण ' या ग्रंथलेखनाला सावरकरांनी १९०६ च्या जुलै महिन्यात प्रारंभ केला आणि सुमारे अडीच महिन्यांनंतर २८ सप्टेंवर १९०६ रोजी तो ग्रंथ लिहून हातावेगळा केला. सावरकरांनी मॅझिनीचे आत्मचरित्र भाषांतरित करण्यापूर्वी मराठीत मॅझिनीचे आत्मचरित्र अुपलब्ध नव्हते असे नाही. अि. स. १९०० च्या आगेमागे श्री. घाणेकर यांनी मॅझिनीचे पहिले मराठी चरित्र लिहिले होते. ' मित्रमेळ्या'च्या व ' अभिनव भारता'च्या साप्ताहिक वैठकीत सावरकर मॅझिनीच्या चरित्राचे गुणगानही करीत होते. त्या वेळी अंगी संचार झाल्यासारखे त्यांना जे शब्द अैकू येत होते ते शिवाजीचे नि कृष्णाचे, मॅझिनीचे नि गॅरिवॉल्डीचे.[२] अिंग्लंडमध्ये आल्यावर त्यांना मॅझिनीचे आत्मचरित्रात्मक सहा खंड वाचावयास मिळाले. ते मिळताच अनेक हेतू डोळ्यापुढे ठेवून त्यांनी हे भाषांतराचे कार्य हाती घेतले. मॅझिनीचे चरित्र लिहिण्यात ग्रंथवाह्यही काही हेतू होते. गॅरिवॉल्डी प्रभृती अिटालियन क्रांतिकारकांना १८५७ सालच्या भारतीय क्रांतिकारकांवद्दल वाटणारी सहानुभती सावरकरांना या विषयाकडे वळविण्यास काही अंशाने कारणीभूत झाली.[३] तसेच सुरेन्द्रनाथ वॅनर्जींच्या पिढीपासून अनेक हिंदी पुढाऱ्यांना मॅझिनीच्या चरित्रापासून स्फूर्ती मिळाली होती आणि मॅझिनीच्या चरित्राचा हिंदी राजकारणावर प्रभाव पडलेला होता.[४]

पण वरील हेतूपेक्षाही सावरकर या चरित्रलेखनाकडे वळले ते वेगळ्याच कारणांनी. मॅझिनीचे क्रांतिकारक मार्गदर्शन व आपण आपल्या सहकाऱ्यांना करीत असलेले मार्गदर्शन यांत सावरकरांना विलक्षण साम्य दिसले.[५] आणि या अनपेक्षित साम्याने भारतमातेला स्वतंत्र करण्याच्या अखिल भारतीय योजनेवरील सावरकरांचा आत्मविश्वास शतपटीने वाढला.[६] आपल्या क्रांतिकारक चळवळीला मॅझिनीच्या लेखांचा भक्कम आधार मिळाल्यास सर्वसामान्य जनतेतही क्रांतिकारक पक्षाविषयी दृढ श्रद्धा अुत्पन्न होअील अशी खात्री सावरकरांना वाटू लागली.[७] मॅझिनीच्या लेखांतील सशस्त्र क्रांतिकारक लेखांचेच महाराष्ट्राने पारायण करावे आणि त्याच्या सशस्त्र क्रांतिकारक मार्गानाच आपण आपल्या परिस्थितीनुरूप अनुसरावे हा ते पुस्तक लिहिण्यामागील सावरकरांचा अेकमेव अुद्देश होता. या ग्रंथाला सव्वीस पानी प्रस्तावना सावरकरांनी हेतुपुरस्सर जोडली आणि त्यामधून सशस्त्र क्रांतीची

---

१. सा. च. पृ. १४५. २. मा. आ. पृ. २१८. ३. श: शि. पृ. १६१. ४. श. शि. पृ. १६०–१६१–१६२. ५. श. शि. पृ. १६६. ६. श. शि. पृ. १६७. ७. श. शि. पृ. १६८.

स्फूर्ती वाचकांना मिळावी अशी कौशल्यपूर्ण योजना केली.[1] यासंबंधी सावरकरांनी लिहिले आहे :– " तो ग्रंथ केवळ ऐतिहासिक नसून, केवळ वाचनीय नसून, आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसंपादनार्थ अनुकरणीय आहे, हे त्याचे वैशिष्ट्य प्रत्यक्षपणे स्पष्ट जरी न सांगता आले तरी अप्रत्यक्षपणे सूचित करणे तरी भाग होते. मी त्या ग्रंथाला स्वत:ची अशी अेक प्रस्तावना लिहिण्याचे ठरविले. हिंदुस्थानच्या परिस्थितीतही त्या अिटालियन क्रांतिलेखातील जो जो तात्त्विक वा क्रियात्मक भाग लागू पडत होता तो तो निवडून अशा पद्धतीने त्याची जडण घडण करावी आणि मधून मधून अशी सूचक वाक्ये घालावी की, ती प्रस्तावना वाचताना चाणाक्ष वाचकांची हृदये क्रांतिकारक स्फूर्तीने थरारून जावीत आणि हिंदुस्थानातही क्रांतिसंघटना नि क्रांतीचे सशस्त्र अुठाव कसे करता येतील ते मार्गदर्शन न सांगताही आपोआप केले जावे. "[2] आत्मचरित्र लिहिण्यामागील सावरकरांचा हेतू स्वकीयांनी तर ओळखला होताच, पण परकीयांनाही त्याची स्पष्ट कल्पना आली होती. म्हणूनच व्हॅलेंटिअन चिरोल यांनी या ग्रंथाला 'Nationalist Textbook' असे संबोधिले आहे.[3] सावरकरांच्या हेतूप्रमाणे या ग्रंथाचा अिष्ट तो परिणामही होंअू लागला होता आणि 'या पुस्तकातून सूचित केल्याप्रमाणे सावरकरांचे मित्र महाराष्ट्रात संघटन करून दाखवू लागले होते.' अशी माहिती १९१० मध्ये सावरकर व त्यांचे सहकारी यांच्यावर भरलेल्या खटल्यातून अुजेडातही आली होती.[4]

'१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाच्या निर्मितीची बीजे सावरकरांनी स्वीकारलेल्या ध्येय–धोरणात, त्या दृष्टीने त्यांनी चालविलेल्या चळवळीत आणि अिंग्लंड व हिंदुस्थान येथील राजकीय वातावरणात आढळून येतात.

१९०६ च्या सप्टेंबरमध्ये मॅझिनीचे चरित्र लिहून हातावेगळे होताच सावरकरांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसंगरावरील ग्रंथाचे वाचन फार दूरगामी विचार करून सुरू केले असले पाहिजे. कारण २–४ महिन्यांतच अुजाडणारे नवे साल १८५७ च्या संग्रामाचे अर्धशतक म्हणून गाजणार हे सावरकरांनी हेरले होते. १९०६ मध्ये स्थापन केलेल्या फ्री अिंडिया सोसायटीच्या प्रकट सभेत त्यांनी अठराशे सत्तावनमधील वीरांची चरित्रे सांगण्यास आरंभ केला होता आणि 'मॅझिनीप्रमाणे आपल्या देशात सशस्त्र क्रांतीची संघटना अुभारून, सैनिकांची मने क्रांतीच्या विचारांनी प्रज्वलित करून आपणही परक्या ब्रिटिश सत्तेचे वर्चस्व झुगारून देअून हिंदुस्थान स्वतंत्र केला पाहिजे अशी विचारसरणी या भाषणांतून ते सांगू लागले.[5] याच वेळी त्यांनी लंडन येथील 'अिंडिया ऑफिस'मधील ग्रंथसंग्रहालयात वसून

---

१. श. शि. पृ. १६८. २. श. शि. पृ. १६८-१६९. ३. Indian Unrest p. 146. ४. सा. च. पृ. ४२०. ५. श. शि. पृ. १९०–१९१.

अभ्यास करण्याची अनुज्ञा मिळविली आणि ५७ च्या अुठावावरील सर्व साहित्य अवलोकिले.[१] या अवलोकनानंतर सावरकरांची अशी निश्चिती झाली की, १८५७ मध्ये भारतीय सैनिकांनी, संस्थानिकांनी आणि प्रांताप्रांतांतील जनतेने अेकत्र येअून, परक्या अिंग्रजी सत्तेविरुद्ध प्राणपणाने केलेला तो अुठाव आपल्या मुळातील कल्पनेपेक्षाही अधिक विस्तृत प्रमाणावर, विशिष्ट अुच्च ध्येयाने प्रेरित होअून नि त्यासंबंधी पूर्वयोजना आखून केलेला अेक फार मोठा स्वातंत्र्यसंग्राम होता.[२] अितकेच नव्हे, तर आपण अिंग्रजांविरुद्ध फार मोठा अुठाव कसा करावा याचा अेक आदर्श भावी काळासाठी या संग्रामाने निर्माण केला.[३] आणि "ह्या विचारांच्या अनुषंगानेच मी पुढे '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' ह्या माझ्या ग्रंथाची रूपरेषा आखली," असे सावरकरांनी स्वत:च सांगितले आहे.[४]

'१८५७ चा सग्राम हा स्वातंत्र्यसंग्राम होता' आणि 'मोठा अुठाव कसा करावा याचा भावी काळासाठी तो अेक आदर्श होता' ही दोन महत्त्वाची तत्त्वे पायाभूत धरून सावरकरांनी या ग्रंथाची रचना केली. जनतेला आणि सैनिकांना ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध चेतवून त्यांना क्रांतिप्रवण करण्यासाठी केवळ पन्नास वर्षांपूर्वीच भारतात घडलेले अुदाहरण त्यांच्यापुढे ठेवण्याचा सावरकरांचा हेतू होता.[५] स्वत: सावरकरांनी आपल्या या हेतूबद्दल नि:संदिग्ध शब्दांत अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. 'The story of this History' या शीर्षकाखाली या ग्रंथाची सत्यकथा सांगताना सावरकरांनी लिहिले आहे –

> "The object in writing this history was, subject to historical accuracy, to inspire people with burning desire to rise again and wage a second and successful war to liberate their motherland..... He (Savarkar) also expected that the history should serve to place before the revolutionists an outline of a programme of organisation and action, to enable them to prepare the nation for a future war of liberation.... So he (Savarkar) invoked the warriors of 1857 to deliver his (Savarkar's) message through their own mighty words and mightier deeds."[६]

१८५७ च्या अर्धशतकसंवत्सराची संधी साधून सावरकरांनी हा ग्रंथ लिहिल ही गोष्ट जितकी खरी तितकीच हीही गोष्ट खरी की, या सुमारास अिंग्लंड व हिंदुस्था येथील तप्त होत चाललेल्या राजकीय वातावरणाचा फायदा सावरकरांना अुठवावयाच

---

१. श. शि. पृ. १८९. २. श. शि. पृ. १९८. ३. श. शि. १९९. ४. श. शि १९९. ५. श. शि. १९२. ६. श. शि. पृ. २०१.

होता. १९०७ साल उजाडताच अिंग्रजांच्या मनातही धास्ती अुत्पन्न झाली होती. पण अिंग्लंडमध्ये त्या धास्तीचे रूपांतर सत्तावन साली ब्रिटिश सैनिकांनी केलेल्या मर्दुमकीच्या गौरवात दृग्गोचर होअू लागले. सत्तावनच्या अुत्थानाचे नाट्यदर्शन अिंग्रजांच्या रंगभूमीवर दाखविण्यात येअू लागले व त्या नाट्यप्रयोगाचा अुपसंहार अिंग्रजांनी दाखविलेल्या शौर्याचा अुदोअुदो करण्यात होअू लागला. त्यामुळे अिंग्लंडमधील राष्ट्रीय वृत्तीचे भारतीय संतप्त होअू लागले.[१] आणि वस्तुस्थिती अशी होती की, हिंदुस्थानलाही 'सत्तावनचे डोहाळे' लागू लागले होते. 'रावळपिंडी येथे दंगा झाला', 'पठाणांच्या तुकडीने संप केला,' 'अजितसिंहाने हजारो लोकांना लाठ्या घेअून लाहोरास जमविले', 'लाला लजपतराय यांना हद्दपार करण्यात आले,' 'बंगाल्यात व पंजाबात सार्वजनिक सभेला बंदी घालण्यात आली,' अित्यादी बातम्या अिंग्लंडमध्ये येत होत्या.[२] १९०८ मध्ये मुझफरपूर येथे,बॉम्बने दोन अिंग्रज स्त्रियांचा बळी घेतला. बॉम्ब तयार करण्याच्या प्रकरणी कलकत्ता येथे माणिकतोळा बागेतल्या तरुणांना पकडण्यात आले.[३] हिंदुस्थानात अुदयास येअू लागलेल्या या क्रांतीच्या पार्श्वभूमीवर सावरकरांचे '५७चे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक लिहिले जात होते.

खुद्द अिंग्लंडमध्येही सावरकर आणि त्यांच्या 'अभिनव भारता'च्या अनेक चळवळी चालू होत्या. १९०४ साली लंडनमधील पहिला शिवोत्सव सावरकर व त्यांच्या मित्रांनी साजरा केला.[४] १० मे १९०८ रोजी सत्तावनच्या स्वातंत्र्याचा जंगी उत्सव लंडनमधील 'अिंडिया हाअूस' च्या हॉलमध्ये अपूर्व थाटाने साजरा करण्यात आला.[५] या दोन अुत्सवांशिवाय 'राखीसमारंभ', 'श्रीगोविंदसिंहाचा जन्मोत्सव', 'विजयादशमीचा अुत्सव' अित्यादी अुत्सवांचे कार्यक्रमही विशिष्ट हेतूनेच पार पाडण्यात आले. सावरकर आणि दे. भ. पांडुरंग महादेव बापट प्रभृती सहकाऱ्यांनी बॉम्ब बनविण्याची विद्या आत्मसात करण्यात याच काळात यश मिळविले होते आणि 'बाँब फॉर्म्युल्या' च्या चोपड्या १९०७ च्या सुमारास भारतात रवाना झाल्या होत्या.[६] तसेच श्री. हेमचंद्र दास, श्री. मोतीलाल वर्मा, श्री. बापट प्रभृती क्रांतिकारकांनी भारताच्या भिन्न भिन्न भागांत क्रांतिकारक मंडळींची संघटना करावी, स्फोटकांच्या नि शस्त्रास्त्र निर्मितीच्या विद्येचा प्रसार करावा, शक्य त्या मार्गांनी शस्त्रास्त्रांचा गुप्त संग्रह करावा व क्रांतिकारक प्रवृत्तींच्या तरुणांची गुप्त संघटना करून योग्य वेळेची मार्गप्रतीक्षा करीत राहावे, असा बेत ठरून ही सर्व मंडळी हिंदुस्थानकडे धाडण्यात आली होती.[७] दे. भ. बापट

---

१. सा. च. पृ. १६१–१६२. २. लं. बा. – पत्र क्र. ६. ३. सा. च.– पृ. १९२. ४. लं. बा. – पत्र क्र. २२. ५. लं. बा. – पत्र क्र. २३. ६. सा. च. –पृ. १७८. ७. सा. च. पृ. १८१.

यांच्याजवळ दोन पिस्तुले आणि 'वाँब मॅन्युअल'च्या चोपड्या देण्यात आल्या होत्या.[१] अशा रीतीने हिंदुस्थानात सशस्त्र क्रांतीचा अुठाव घडवून आणण्याची योजना सावरकर करीत होते आणि याच वेळी 'आदर्श अुठाव कसा करावा' याचे भारतातीलच अुदाहरण भारतीय जनतेपुढे ठेवण्यासाठी '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ ते लिहीत होते. १९०८ च्या मार्च–अेप्रिलमध्ये सावरकरांनी हे ग्रंथलेखन-कार्य पूर्ण केले.

'शिखांचा अितिहास' हे पुस्तक सावरकरांनी अि. स. १९०९–१० साली ते स्वत: निमोनियाने वेल्समध्ये आजारी असताना लिहिले. १९०८ सालच्या सुरुवातीस सावरकरांनी गुरुमुखी भाषेच्या अभ्यासाला आरंभ केला होता. आणि नंतर ती भाषा थोडी अवगत होताच शीख पंथातील विविध धर्मग्रंथ त्यांनी वाचून काढले.[२] 'शिखांचा अितिहास' आणि शीख सैनिकांना अुद्देशून काढलेली हजारो पत्रे प्रसिद्ध करण्यामागे सावरकरांचा हेतू अगदी अुघड होता. हिंदी सैन्यातील शीख सैनिकांना चेतविणे हे क्रांतिकारक पक्षाच्या कार्यक्रमाचे अेक महत्त्वाचे अंग आहे हे सावरकरांच्या लक्षात आले होते.[३] आपल्या शीख बांधवांना राष्ट्रीय वृत्तीने भारून त्यांना राष्ट्रीय कार्याला जुंपण्यासाठी त्यांचे विशेष प्रकारे प्रयत्न चालू होते. 'शीख समाज जागृत होणे शक्य नाही' या अेका मित्राच्या निराशवादी विचारसरणीला अुत्तर देताना सावरकरांनी म्हटले होते, "जरासा स्पर्श करून अुत्तेजन देताच श्रीगुरू गोविंदसिंहाचे तेज पंजाबातील प्रत्येक शिखाच्या रक्तात तेजाच्या ज्वाला भडकवील."[४] शीख समाजात ही राष्ट्रीय जागृती आणण्यासाठी गुरू नानक जयंती व श्रीगुरुगोविंदसिंह जयंती साजरी करण्याची प्रथा त्यांनी सुरू केली होती.[५] हिंदू जातीच्या संरक्षणकार्यार्थ शीख पंथाची स्थापना झाली असल्याने त्यांना गुरू गोविंदसिंहाबद्दल फार आदर वाटे.[६] शिखांचे राज्य हे हिंदुराज्य होते अशीच त्यांची धारणा होती.[७] त्यामुळे 'शिखांचा अितिहास' मराठीत लिहिताना 'शीखेतर हिंदुजातीयांना शिखांच्या महत्तेची नि गुणगौरवाची यथार्थ कल्पना यावी हाही अेक हेतू सावरकरांनी मनात योजला होता.'[८] 'चित्रगुप्त' लिखित सावरकर चरित्रात हाच हेतू सांगितला आहे : "In order to accquaint other Hindu sections with glory and greatness of Sikhs in Punjab he wrote a fine book in Marathi on Sikhs.[९]"

सावरकरलिखित हा 'शिखांचा अितिहास' प्रसिद्धीच्या प्रकाशात मात्र अेअ

---

१. सेनापती बापट वाङ्मय – समग्र ग्रंथ – पृ. १६–१७. २. सा. च. – पृ. २२५. ३. सा. च. पृ. २२५. ४. बॅ. सा. यां. च. – पृ. ४९. ५. वीर सावरकर – पृ. २०. ६. बॅ. सा. यां. च. – पृ. ५०. ७. स. सो. पा. – पृ. ९५३. ८. बॅ. सा. यां. च. – पृ. ५०. ९. Life of Br. Savarkar – p. 52.

शकला नाही. १९०९–१० च्या आसपास सावरकर पॅरिसमध्ये असताना अिंग्रजां-विरुद्ध जो अुठाव त्यांनी केला, त्या धामधुमीत ह्या 'शीख अितिहासा' च्या ग्रंथाचे हस्तलिखित अिंग्लिश गुप्त टपाल विभागाच्या हाती पडून ते नष्ट झाले.[1]

'हे हुतात्म्यांनो', (Oh, Martyrs)! हे पत्रक सत्तावनच्या स्वातंत्र्याच्या जंगी अुत्सवाच्या वेळी लंडनमध्ये वाटण्यात आले होते. ५७ प्रमाणे सशस्त्र क्रांतीच्या अुठावाची प्रच्छन्न प्रेरणा देण्यासाठीच हे पत्रक सावरकरांनी प्रसिद्ध केले. प्रारंभी हुतात्म्यांचा गौरव आणि अखेरी-अखेरीस प्रत्यक्ष अुठावाची चेतावणी अशी या पत्राची रचना करण्यात आली होती. पत्रकातील काही वाक्ये कशी सूचक आहेत पाहा – "दुआब आणि अयोध्या यांनी अेक महिन्यात जे केले ते सगळा हिंदुस्थान अेकदम, आकस्मिकपणे व निर्धाराने अुठेल तर अेक दिवसात साध्य होअील... आम्ही असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, १९१७ साली तुमचा हीरकमहोत्सव होअील तेव्हा पुनरुज्जीवित भारतवर्ष जगात डौलाने प्रवेश केल्याशिवाय राहणार नाही."[2]

सत्तावनच्या हुतात्म्यांनी हौतात्म्य गाजवून भारतीयांना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. तसेच हौतात्म्य आपणांसही दाखवावयाचे आहे याची जाणिव सावरकरांनी आपल्या फ्रान्समधील मित्रांचा निरोप घेताना काढलेल्या 'निरोप' (Farewell) या पत्रकात करून दिली आहे. १९१० मध्ये लंडन येथील ब्रिक्स्टन जेलमध्ये असताना सावरकरांनी हे पत्रक प्रसिद्धिले होते. या तुरुंगातून लवकरच त्यांना हिंदुस्थानात पुढील चौकशीसाठी पाठविले जाणार होते आणि तेथे जाताच आपणास देहान्ताची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात येणार हे सावरकर ओळखून होते. म्हणूनच आपल्या मित्रांना अुद्देशून त्यांनी म्हटले होते, "कार्य होणे हा योगायोग आहे, आत्मदान हा मात्र निश्चित नियम आहे. –ज्याच्या-वर नवीन नि भव्य – आणि हुतात्म्यांच्या कक्षेत त्यांची मुळे रुजली गेली असल्यामुळेच केवळ भव्य – अशा राज्यांची प्रचंड गोपुरे अुभारता येतील असा भक्कम पाया आहे. अशा रीतीने अीश्वराने दिलेले प्राप्त प्राण त्याला पुन्हा परत करीपर्यंत, देवकार्य यशस्वी होअीपर्यंत, हुतात्म्यांची रक्तमाला किंवा विजेत्याचा किरीट हस्तगत करीपर्यंत, मातृभूमीच्या वैभवाकरिता अेकसारखे काम करीत राहा. येतो. रामराम."[3]

हिंदी संस्थानिकांकडे पाहण्याचा सावरकर व त्यांच्या क्रांतिकारक पक्षाचा दृष्टिकोन 'हिंदी संस्थानिकांनो, काय पत्करता सांगा' (Choose, Oh Indian

---

१. स. सो. पा. – पृ. ५३. २. सा. च. – पृ. २०४. ३. अं. अं. – पृ. ४.

Princess) या पत्रकात प्रकट झालेला आहे. राजस्तानच्या दौऱ्यावर असताना हिंदुस्थानच्या व्हॉअीसरॉयने देशातील असंतोष अुत्पन्न करणाऱ्या प्रवाहाविरुद्ध ब्रिटिश सरकारला साहाय्य करण्यासाठी हिंदी संस्थानिकांनी पुढे असले पाहिजे असे आवाहन केले होते. तेव्हा सार्वभौम सरकारच्या पंखाखाली जाअू पाहणाऱ्या या संस्थानिकांना अेकवार मात्रेचे चार वळसे दिले पाहिजेत असे योजून सावरकरांनी वरील पत्रक काढले होते.[1] भारतातील संस्थाने ही स्वकीय शक्तिकेंद्रे आहेत व भारतीय संस्थानिक स्वातंत्र्याचे पाठीराखेच राहतील अशी सावरकरांची धारणा होती. याच भूमिकेतून 'श्रीमान राजे कृष्णशहा' या जव्हार संस्थानच्या अधिपतींना अुद्देशून लिहिलेल्या कवितेत (१९०६) सावरकरांनी पुढील वचन मागितले होते –

'परंतु की आर्य वसुंधरा ही
माता नृपा आपुलि सुंदरा ही
गेलें तिचे ते तिजं द्यावयाते
झटेन ह्या दे वचनासि माते'[2] ।

अि. स. १९०८ च्या सुमारास नेपाळचे प्रधान महाराज चंद्रसमशेर जंगबहादूर लंडनमध्ये आले असताना सावरकर व त्यांच्या क्रांतिकारक तरुणांनी नेपाळच्या प्रधानांना पुढील आशयाचे पत्र पाठविले, "हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य–संगरात आपण प्रकट पुढाकार घ्याल तर हा भारतीय साम्राज्याचा देदीप्यमान मुकुट नेपालाधिपतीच्या मस्तकावर विराजू लागेल. आपण हिंदुस्थानचे व्हिक्टर अिमॅन्युअल व्हाल.[3] "

'हिंदी संस्थानिकांनो, काय पत्करता सांगा' या पत्रकाची रचनाच सावरकरांनी अशी केली आहे की, हिंदी संस्थानिकांनी विश्वासघात केल्यास क्रांतिकारक पक्ष त्यांना क्षमा करणार नाही अशी अुघड धमकी अेकीकडे सतत द्यावयाची आणि दुसरीकडे त्यांना क्रांतिकारक पक्षालाच साहाय्य करण्याचे आवाहन द्यावयाचे. त्यामुळे हे पत्रक अत्यंत स्फोटक व परिणामकारक झाले आहे.

१९०६ ते १९१० या कालखंडात सावरकरांनी लिहिलेल्या कवितांची संख्या दहाच्या आसपास भरेल. यापैकी 'तारकांस पाहून' ही अेकच कविता कल्पनाविलासात्मक आहे. अुरलेल्या बहुतेक कवितांचा अुद्गम त्यांच्या विशिष्ट ध्येयवादातून, कर्तव्यातून, देशभक्तीतून, स्वीकृत कार्याचे मर्म स्पष्ट करण्याच्या भूमिकेतून किंवा आत्मसामर्थ्याच्या दुर्दम्य जाणिवेतून झालेला आहे. या काळातील बव्हंश कवितांभोवती सावरकरांच्या चरित्रातील अनेक घटना निगडित झाल्या आहेत.

---

१. सा. च. – पृ. २९९. २. सा. क. – पृ. ६५. ३. ने. आं. अु. – प्रस्तावना पृ. ४.

सावरकर स्मृति संग्रहालय, ठाणे. स्थलांक

क्रमांक ... नोंद दि. ...

१९०८ मध्ये लंडनमध्ये श्रीगुरुगोविंदसिंह जन्मोत्सव साजरा करण्यात आला होता. त्या प्रसंगी सावरकरांनी रचलेली 'प्रियकर हिंदुस्थान' ही कविता म्हटली गेल्याचा अुल्लेख आढळतो. 'प्रियकर हिंदुस्थान' ही कविता आणि याच सुमारास लिहिलेली 'हिंद सुंदरा ती' ही कविता वर्ण्यविषय नि वर्णनपद्धती या दृष्टीने सारख्याच वाटतात. १९०६ मध्ये 'विहारी' पत्रात सावरकरांनी लिहिलेल्या 'वन्दे मातरम्' या मातृभूमिवर्णनपर लेखाचेच पद्यमय स्वरूप या दोन्ही कवितांत पाहावयास सापडते.

अुत्कट देशभक्ती हाच स्थायी भाव असलेली आणि मातृभूमीची नि आपली आता कायमची ताटातूट होणार या भावनेतून अुचंबळून प्रकट झालेली 'सागरास" ही कविता होय. या कवितेमागील सावरकरांच्या चरित्रातील प्रसंग अत्यंत अुद्बोधक असाच आहे. कवितेमागील सर्व घडामोडींचे चित्रण करंदीकरकृत चरित्रात पुढीलप्रमाणे केले आहे :–" ज्येष्ठ बंधूंना नुकतीच झालेली जन्मठेपेची शिक्षा, १४ जुलै रोजी 'ग्रेज अिन 'मधील चौकशीच्या वेळी विरुद्ध पुरावा म्हणून सांगण्यात आलेली हिंदुस्थानमधील घडामोडींची माहिती, धिंग्रा प्रकरण सुरू झाल्यापासून ('अिंडिया हाअूस' सोडून सावरकरांना करावी लागलेली पळापळ व) पडत गेलेल्या कामाचा मनस्वी ताण, (धिंग्राच्या निषेधार्थ भरलेल्या) कॅक्स्टन हॉलमधील सभेत झालेला प्रकार व त्यानंतर कित्येक दिवसांपर्यंत सोसावा लागलेला मनस्ताप या सर्वांचा सावरकरांच्या प्रकृतीवर फार परिणाम झाला. त्यातही लंडनमध्ये भाड्याची जागासुद्धा मिळणे कठिण झाल्यामुळे काही दिवस तरी त्यांना स्थानांतर करणे अवश्य झाले."[1] त्याप्रमाणे दि. २९–७–१९०९ रोजी ते ब्रायटन या समुद्रकाठच्या रम्य ठिकाणी विश्रांतीसाठी गेले. त्यांच्या सहवाससुखाचा जास्तीत जास्त लाभ मिळावा म्हणून श्री. निरंजन पाल हे वारंवार तेथे येत असत. हे दोघे मित्र अेकदा सायंकाळी ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावर हिंडावयास गेले होते……हे दोघे समवयस्क तरुण सावरकरांवर ओढवू पाहणाऱ्या राजकीय आपत्तीविषयी बोलत होते. बोलता बोलता सावरकरांची तंद्री लागली…समोर पसरलेल्या सागराशी त्यांची वृत्ती तादात्म्य पावली. या प्रसंगी सावरकरांना 'सागरास' ही कविता स्फुरली. त्या वेळच्या सावरकरांच्या मनःस्थितीचे वर्णन 'Overborne with home sickness, abandoned and deserted and shunned by all." असे करण्यात आले आहे.[2]

मातृभूमीच्या विरहाने व्याकुळ झालेले सावरकर 'सागरास' कवितेत दिसतात. पण परिस्थितीने घेरले असूनही 'सांत्वन' कवितेत ते असे चलितचित्त झालेले दिसत नाहीत. 'सांत्वन' कविता लिहिली तेव्हा सावरकर अेकटेच संकटात

---

१. सा. च. पृ. २८५. २. Life of Barrister Savarkar p. 70

नव्हते, तर त्यांचे सर्व कुटुंब संकटात सापडले होते. ज्येष्ठ बंधू श्री. गणेशपंत सावरकर यांना ज्वालाग्राही वाङ्मय प्रसिद्ध करून राजाविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली होती (२१–११–१९०९). कनिष्ठ बंधू श्री. नारायणराव सावरकर यांना अहमदाबाद येथे व्हॉअिसरॉय यांच्या मिरवणुकीच्या वेळी बाँब फेकण्याच्या प्रकरणी संशयित म्हणून अटक करण्यात आली होती. अिंग्लंडमध्ये सावरकरांवर सरकारी करडी नजर तीक्ष्ण होअू लागली होती. अशा वेळी असाहाय्य स्थितीत सापडलेल्या येसूवहिनींचे सांत्वन करून त्यांना धैर्ययुक्त वर्तन करण्याची जाणीव करून देण्यासाठी सावरकरांनी हे कविताबद्ध पत्र लिहिले.

आपल्या दोन्ही बंधूंच्या अटकेचे वृत्त समजताच वहिनींचे सांत्वन करण्यासाठी सावरकरांनी हे कवितावद्ध पत्र लिहिले आणि १९१० च्या मार्च महिन्यात लंडन येथे स्वत:ला अटक होताच सावरकरांनी 'माझे मृत्युपत्र' ही कविता लिहिली. सावरकरांना झालेली ही अटक अिंग्लंडमधील त्यांच्या अनेक चळवळींचा परिपाक होता. '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिल्यापासून ब्रिटिश गुप्तहेर सावरकरांच्या पाळतीवर होते. वरिष्ठ वर्तुळातही सावरकरांच्याकडे संशयित दृष्टीनेच पाहिले जात होते. 'ग्रेज अिन' मधील खटल्यात सावरकरांवर भयंकर आरोप ठेवण्यात आले होते. "राज्यक्रांती करणे, हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याची महती गाणे, रक्तपात व युद्ध यांचा अवलंब करण्यास अुत्तेजन देणे", अित्यादी आरोपांचा त्यात समावेश करण्यात आला होता.[1]

१९०९ मध्ये सावरकरांबद्दल ब्रिटिश सरकारचा संशय ज्या दोन घटनांनी अधिक बळावला, त्या घटना म्हणजे कर्झन वायली व नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांचा वध ह्या होत. 'लंडन टाअिम्स' सुद्धा सारी अिंग्रजी पत्रे सावरकरांचे अुघड नाव घेअून अिंग्लंड नि हिंदुस्थान यांतील या सर्व असंतोषाचे नि अत्याचाराचे मूळ तेच आहेत असे म्हणू लागली. पोलीस सावरकरांच्या मागावरच होते तेव्हा आपल्या सहकाऱ्यांच्या आग्रहावरून सावरकर फ्रान्समध्ये गेले. पण पॅरिसमध्ये त्यांचे मन रमेना. आपले अितर सहकारी कारागृहात कुजत पडले असता आपण पॅरिसमध्ये राहणे अिष्ट नाही असे त्यांना वाटू लागले. अखेर ते अिंग्लंडमध्ये गेले आणि तेथे जाताच प्रथम बो स्ट्रीट पोलीस स्टेशनमध्ये व नंतर ब्रिक्स्टनच्या तुरुंगात त्यांना वद्ध करण्यात आले. या पहिल्या कारागृहात असतानाच त्यांनी 'माझे मृत्युपत्र' ही कविता येसूवहिनींना अुद्देशून लिहिलेली आहे. 'स्वत:ला झालेल्या अटकेची माहिती कळविणे व वहिनींनी व आपल्या पत्नीने धीर सोडू नये म्हणून त्यांना या अटकेचे रहस्य अुलगडून सांगणे हा या कवितेचा प्रधान हेतू आहे."[2]

---

१. लं. वा. पृ. क्र. ४२ चे पत्र. २. सा. च. पृ. ३२९.

याच कवितेमध्ये मातृभूमीच्या मुक्ततेसाठी केलेल्या त्यागाचा अुल्लेख करताना सावरकरांनी लिहिले आहे :–

'त्वत्स्थंडिली ढकलिली गृहवित्तमत्ता ।
दावानलात वहिनी नव पुत्र कान्ता ।।'

'नवपुत्रा'चा हा अुल्लेख १९०९ मध्ये नाशिक येथे अकाली मृत्यू पावलेल्या 'प्रभाकरास' अुद्देशून सावरकरांनी केला आहे. सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर हा चार वर्षांचा होअून लहानपणीच वारला ही वार्ता युरोपमध्ये कळली तेव्हा त्याच्या स्मृत्यर्थ सावरकरांनी 'प्रभाकरास' नावाची कविता रचली.

'सांत्वन' आणि 'माझे मृत्युपत्र' या दोन्ही कवितांतून स्वकीयांना धृति–स्फूर्तीचा संदेश देण्याचा सावरकरांचा हेतू होता. पण विदेशात वास्तव्य करताना कधी स्वत:ला धैर्याचा पुरवठा करण्यासाठी कवचमंत्र म्हणून कवितांचा अुपयोग त्यांना करावा लागला. अिंग्लंडमध्ये धरले गेल्यावर पुढील चौकशीसाठी सावरकरांना हिंदुस्थानला परत धाडण्याची आज्ञा ब्रिटिश न्यायालयाने दिली आणि १ जुलै १९१० रोजी त्यांना 'मोरिया' बोटीवर चढविण्यात आले. ८ जुलै रोजी मार्सेलिस बंदरात बोट असताना सावरकरांनी समुद्रात अुडी टाकून निसटून जाण्याचे अभूतपूर्व साहस केले. पण त्यात त्यांना अपयश आले आणि पुन्हा अटक करून बोटीवर आणण्यात आले. पहारेकऱ्यांनी त्यांचा छळ सुरू केला. त्यांच्या हातकड्या अहोरात्र निघेनाशा झाल्या. अभद्र शिव्याशाप व सूड घेण्याची, दमदाटीची ओंगळ भाषा यांचा वर्षाव होअू लागला. या यमयातनांना आपल्याला तोंड द्यावे लागणार हे स्पष्ट दिसू लागताच, त्यांनी कर्मयोगाचार्य भगवान श्रीकृष्णाचे स्मरण केले. शत्रूने केलेल्या छळाला पुरून अुरलेल्या धैर्यशाली धर्मवीरांच्या नि कर्मवीरांच्या अुदात्त चरित्रांचे मनन करणाऱ्या सावरकरांना त्या परिस्थितीत 'आत्मबल' ही कविता स्फुरली.[1] आणि विलक्षण धैर्याने त्यांनी आपल्या छळकांना बजाविले –

'अनादि मी, अवध्य मी, अनंत मी मला ।
जिंकिल रिपु कवण असा जगति जन्मला ।।'

मानवी छळकांना तोंड देण्यासाठी धैर्याचा पुरवठा व्हावा म्हणून सावरकरांनी 'आत्मबल' कविता लिहिली. अशाच धैर्याच्या संपादनार्थ त्यांच्या ठायी 'मूर्ती दुजी ती' या कवितेचे स्फुरण झाले. फरक अेवढाच की, या कवितेच्या प्रस्फुरणाच्या वेळी मानवाच्या जोडीला निसर्ग हाही अेक छळक होता. १९१० च्या मार्चमध्ये सावरकरांना लंडनमध्ये अटक करण्यात येताच बो स्ट्रीट ठाण्यातील कोठडीत

---

१. सा. च. पृ. ३६७

नव्हते, तर त्यांचे सर्व कुटुंब संकटात सापडले होते. ज्येष्ठ बंधू श्री. गणेशपंत सावरकर यांना ज्वालाग्राही वाङ्मय प्रसिद्ध करून राजाविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली होती (२१–११–१९०९). कनिष्ठ बंधू श्री. नारायणराव सावरकर यांना अहमदाबाद येथे व्हॉअिसरॉय यांच्या मिरवणुकीच्या वेळी बॉंब फेकण्याच्या प्रकरणी संशयित म्हणून अटक करण्यात आली होती. अिंग्लंडमध्ये सावरकरांवर सरकारी करडी नजर तीक्ष्ण होअू लागली होती. अशा वेळी असाहाय्य स्थितीत सापडलेल्या येसूवहिनींचे सांत्वन करून त्यांना धैर्ययुक्त वर्तन करण्याची जाणीव करून देण्यासाठी सावरकरांनी हे कवितावद्ध पत्र लिहिले.

आपल्या दोन्ही बंधूंच्या अटकेचे वृत्त समजताच वहिनींचे सांत्वन करण्यासाठी सावरकरांनी हे कवितावद्ध पत्र लिहिले आणि १९१० च्या मार्च महिन्यात लंडन येथे स्वत:ला अटक होताच सावरकरांनी 'माझे मृत्युपत्र' ही कविता लिहिली. सावरकरांना झालेली ही अटक अिंग्लंडमधील त्यांच्या अनेक चळवळींचा परिपाक होता. '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिल्यापासून ब्रिटिश गुप्तहेर सावरकरांच्या पाळतीवर होते. वरिष्ठ वर्तुळातही सावरकरांच्याकडे संशयित दृष्टीनेच पाहिले जात होते. 'ग्रेज अिन' मधील खटल्यात सावरकरांवर भयंकर आरोप ठेवण्यात आले होते. "राज्यक्रांती करणे, हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याची महती गाणे, रक्तपात व युद्ध यांचा अवलंब करण्यास अुत्तेजन देणे", अित्यादी आरोपांचा त्यात समावेश करण्यात आला होता.[1]

१९०९ मध्ये सावरकरांबद्दल ब्रिटिश सरकारचा संशय ज्या दोन घटनांनी अधिक बळावला, त्या घटना म्हणजे कर्झन वायली व नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांचा वध ह्या होत. 'लंडन टाअिम्स' सुद्धा सारी अिंग्रजी पत्रे सावरकरांचे अुघड नाव घेअून अिंग्लंड नि हिंदुस्थान यांतील या सर्व असंतोषाचे नि अत्याचाराचे मूळ तेच आहेत असे म्हणू लागली. पोलीस सावरकरांच्या मागावरच होते तेव्हा आपल्या सहकाऱ्यांच्या आग्रहावरून सावरकर फ्रान्समध्ये गेले. पण पॅरिसमध्ये त्यांचे मन रमेना. आपले अितर सहकारी कारागृहात कुजत पडले असता आपण पॅरिसमध्ये राहणे अिष्ट नाही असे त्यांना वाटू लागले. अखेर ते अिंग्लंडमध्ये गेले आणि तेथे जाताच प्रथम बो स्ट्रीट पोलीस स्टेशनमध्ये व नंतर ब्रिक्स्टनच्या तुरुंगात त्यांना बद्ध करण्यात आले. या पहिल्या कारागृहात असतानाच त्यांनी 'माझे मृत्युपत्र' ही कविता येसूवहिनींना अुद्देशून लिहिलेली आहे. 'स्वत:ला झालेल्या अटकेची माहिती कळविणे व वहिनींनी व आपल्या पत्नीने धीर सोडू नये म्हणून त्यांना या अटकेचे रहस्य अुलगडून सांगणे हा या कवितेचा प्रधान हेतू आहे.'[2]

---

१. लं. बा. पृ. कृ. ४२ चे पत्र. २. सा. च. पृ. ३२९.

याच कवितेमध्ये मातृभूमीच्या मुक्ततेसाठी केलेल्या त्यागाचा अुल्लेख करताना सावरकरांनी लिहिले आहे :–

'त्वत्स्थंडिली ढकलिली गृहवित्तमत्ता ।
दावानलात वहिनी नव पुत्र कान्ता ।।'

'नवपुत्रा'चा हा अुल्लेख १९०९ मध्ये नाशिक येथे अकाली मृत्यू पावलेल्या 'प्रभाकरास' अुद्देशून सावरकरांनी केला आहे. सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर हा चार वर्षांचा होअून लहानपणीच वारला ही वार्ता युरोपमध्ये कळली तेव्हा त्याच्या स्मृत्यर्थ सावरकरांनी 'प्रभाकरास' नावाची कविता रचली.

'सांत्वन' आणि 'माझे मृत्युपत्र' या दोन्ही कवितांतून स्वकीयांना धृति–स्फूर्तीचा संदेश देण्याचा सावरकरांचा हेतू होता. पण विदेशात वास्तव्य करताना कधी स्वत:ला धैर्याचा पुरवठा करण्यासाठी कवचमंत्र म्हणून कवितांचा अुपयोग त्यांना करावा लागला. अिंग्लंडमध्ये धरले गेल्यावर पुढील चौकशीसाठी सावरकरांना हिंदुस्थानला परत धाडण्याची आज्ञा ब्रिटिश न्यायालयाने दिली आणि १ जुलै १९१० रोजी त्यांना 'मोरिया' बोटीवर चढविण्यात आले. ८ जुलै रोजी मार्सेलिस बंदरात बोट असताना सावरकरांनी समुद्रात अुडी टाकून निसटून जाण्याचे अभूतपूर्व साहस केले . पण त्यात त्यांना अपयश आले आणि पुन्हा अटक करून बोटीवर आणण्यात आले. पहारेकऱ्यांनी त्यांचा छळ सुरू केला. त्यांच्या हातकड्या अहोरात्र निघेनाशा झाल्या. अभद्र शिव्याशाप व सूड घेण्याची, दमदाटीची ओंगळ भाषा यांचा वर्षाव होअू लागला. या यमयातनांना आपल्याला तोंड द्यावे लागणार हे स्पष्ट दिसू लागताच, त्यांनी कर्मयोगाचार्य भगवान श्रीकृष्णाचे स्मरण केले. शत्रूने केलेल्या छळाला पुरून अुरलेल्या धैर्यशाली धर्मवीरांच्या नि कर्मवीरांच्या अुदात्त चरित्रांचे मनन करणाऱ्या सावरकरांना त्या परिस्थितीत 'आत्मबल' ही कविता स्फुरली.[1] आणि विलक्षण धैर्याने त्यांनी आपल्या छळकांना बजाविले –

'अनादि मी, अवध्य मी, अनंत मी मला ।
जिंकिल रिपु कवण असा जगति जन्मला ।।'

मानवी छळकांना तोंड देण्यासाठी धैर्याचा पुरवठा व्हावा म्हणून सावरकरांनी 'आत्मबल' कविता लिहिली. अशाच धैर्याच्या संपादनार्थ त्यांच्या ठायी 'मूर्ती दुजी ती' या कवितेचे स्फुरण झाले. फरक अेवढाच की, या कवितेच्या प्रस्फुरणाच्या वेळी मानवाच्या जोडीला निसर्ग हाही अेक छळक होता. १९१० च्या मार्चमध्ये सावरकरांना लंडनमध्ये अटक करण्यात येताच बो स्ट्रीट ठाण्यातील कोठडीत

---

१. सा. च. पृ. ३६७

कोंडण्यात आले. त्या वेळी अिंग्लंडच्या मानानेही अतिशय कडक थंडी पडली होती. कोठडीच्या भिंती व खालची फरशी अत्यंत गार पडली होती. जवळ पुरेसे अंथरूणपांघरूणही नव्हते. दिवस–रात्र पाय आपटावे, हात चोळावे, त्या पंधरा-वीस पावलांच्या लांबीतच भरभर फेऱ्या घालाव्या, तेव्हा कुठे गारठून जाणारे रक्त काही अुष्णता पावू लागावे. ह्या भयंकर शारीरिक गारठ्याचा परिणाम मानसिक अुत्साहही गारठण्यावर होअू नये म्हणून सावरकरांनी आपल्या मनास वज्रशाली करण्यासाठी विचारपरंपरा हृदयात प्रदीप्त केली, ती 'मूर्ती दुजी ती'[1] या कवितेत ग्रथित केलेली आहे. ही कविता प्रत्यक्ष रचण्याचा अुद्योग मात्र पुढे १९१४ च्या सुमारास अंदमानात झाला असावा.[2] अंदमान-मधील सिल्व्हर जेलच्या भीषण जवडचात चुरडले जात असताना सावरकरांना याच कवितेने मनोधैर्य दिले होते.[3]

२२ जुलै १९१० रोजी सावरकरांना साष्टी बोटीने मुंबअीस आणण्यात आले. त्यानंतर लगेच त्यांची रवानगी नाशिकच्या तुरुंगात करण्यात आली. पुढे ऑगस्टअखेर नाशिकहून येरवडयाच्या तुरुंगात सावरकरांना ठेवण्यात आल्यावर खटल्याच्या दृष्टीने कायदेशीर सल्ला घेण्यास त्यांना परवानगी देण्यात आली. १५ सप्टेंवर १९१० पासून मुंबअी येथील स्पेशल ट्रायब्यूनलपुढे सावरकर व त्यांचे अितर सहकारी यांच्यावरील खटल्यास सुरुवात झाली. सावरकरांवर अेकूण दोन खटले भरण्यात आले होते. बादशहाविरुद्ध युद्ध करण्याचा प्रयत्न करणे, त्या अुद्देशाने कट करणे, बादशहाविरुद्ध युद्ध करण्याच्या हेतूने हत्यारे व दारूगोळा जमा करणे वगैरे आरोप पहिल्या खटल्यात सावरकरांवर ठेवण्यात आले होते, तर दुसऱ्या खटल्यात नाशिकचे कलेक्टर मि. जॅक्सन यांचा खून करण्याला मदत केल्याचा आरोप सावरकरांवर ठेवण्यात आला होता. दि. २४–१२–१९१० रोजी पहिल्या खटल्याचा निर्णय जाहीर होअून त्यात सावरकरांना जन्मठेप, काळेपाणी व असेल नसेल त्या मिळकतीची सरकारतर्फे जप्ती अशी शिक्षा सांगण्यात आली. दि. ३०–१–११ रोजी न्यायमूर्तींनी दुसऱ्या खटल्याचा निकाल सांगितला. आरोपीने जॅक्सनच्या खुनाला मदत केली हा आरोप सिद्ध समजून, न्यायमूर्तींनी आरोपी सावरकर यांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली.

पहिल्या खटल्याचा निर्णय जाहीर होण्यापूर्वी म्हणजे दि. २३–१२–१९१० रोजी सावरकरांनी 'पहिला हप्ता' ही कविता लिहिली. आपले सहाभियुक्त आणि बाहेरील बांधव यांना स्फूर्तिप्रद संदेश देणे हाच या कवितेमागील हेतू होता. मातृभूमीचे व समाजाचे जे ऋण आपल्याला फेडावयाचे आहे त्यातला 'पहिला हप्ता' आपण या

---

१. सा. क. पृ. ११०. २. सा. च. पृ. ३३३ व पृ. ५००. ३. मा. ज. पृ, ७१.

शिक्षेमुळे फेडीत आहोत अशी भावना मनात ठेवून सावरकरांनी ही कविता रचली. आहे.[1] पुढे कठोर शिक्षेच्या जवडचात भरडले जात असताना याच कवितेने सावरकरांचे धैर्य निश्चल ठेविले; आणि ज्येष्ठ बंधू बाबाराव सावरकर यांची अंदमानात भेट होताच याच कवितेतील ओळींनी त्यांनी आपल्या बंधूंचे सांत्वन केले.[2]

हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने सावरकरांना प्रतिकूल निर्णय दिला आणि सावरकरांना दोन जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आल्यानंतर १९११ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस तो निर्णय त्यांना कळविण्यात आला. सुशिक्षित जगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयांच्या निर्णयाबद्दल सावरकर किंचित आशावादी होते. म्हणूनच हिंदुस्थान सरकारने भरलेल्या खटल्याच्या कामकाजात कोणत्याही प्रकारे भाग घेण्यास त्यांनी नकार दिला होता. परंतु हेग येथील न्यायमूर्तींनी असा स्पष्ट निर्णय दिला की, सावरकरांना ज्या परिस्थितीत (मार्सेलिसला) पकडण्यात आले व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले, त्या परिस्थितीत फ्रान्सच्या सार्वभौमत्वाला बाधक असे काहीच नव्हते[3]. या निर्णयाने सावरकरांची सुटकेची अंधुक आशाही मावळली. आणि तो निर्णय ज्या दिवशी ऐकला, त्या दिवसाची कहाणी व अंत:करणातील खळबळ 'सप्तर्षी' कवितेच्या पूर्वार्धात त्यांनी वर्णिली.[4] हेगचा निर्णय सावरकरांन प्रथम कळविण्यात आला तेव्हा ते डोंगरीच्या तुरुंगात होते. पण पुढे त्यांना भायखळ्याच्या कारागृहात हलविण्यात आले. डोंगरीच्या अेकलकोंडीपेक्षा भायखळ्याची ही अेकलकोंडी अेकांताच्या आणि औदासीन्याच्या तीव्रतेची पुढची पायरी होती. भायखळ्याच्या अेकलकोंडीत कोंडले जाताच सावरकरांच्या मनात आपल्या क्रांतिसंस्थेच्या भवितव्याबद्दल व राजकारणाबद्दल विचारांचे काहूर माजले. त्या वेळच्या आपल्या मन:स्थितीचे वर्णन करताना सावरकरांनी लिहिले आहे : "संध्याकाळचे जेवण झाले.....जेवण होअून भांडी घासून पुन्हा त्या सदोदित बंद केलेल्या गजांच्या दाराशी अुभे राहिलो. संध्याकाळ झाली. तीच संध्याकाळ, तीच रात्र, तीच तात्त्विक विचाराने लाभलेली तात्कालिक शांती 'सप्तर्षी' या कवितेच्या अुत्तरार्धाचा विषय झालेली आहे"[5]

अंदमानच्या नृशंस गुहेत (अि. स. १९११ ते अि. स. १९२१)

डोंगरी, भायखळा, ठाणे अशा विविध तुरुंगांतून नेत अखेर मद्रासकडील जलमार्गाने ३० ऑगस्ट १९११ रोजी सावरकरांना अंदमानमध्ये आणण्यात आले.[6] अंदमानसारख्या नृशंस कारागृहात कोंडले गेल्यावरही सावरकरांची

---

१. सा. च. पृ. ४१७. २. मा. ज. पृ. १२५. ३. सा. च. पृ. ३९१.
४. मा. ज. पृ, ३. ५. मा. ज. पृ. १७. ६. सा. च. पृ. २५२.

साहित्य-निर्मितीची अिच्छा अनिर्बंध राहिली होती. डोंगरीच्या कारागृहात असतानाच मराठीत महाकाव्य रचण्याची त्यांची लहानपणापासूनची आकांक्षा पुन्हा जागृत झाली.[१] 'पंचवीस वर्षांत अेक महाकाव्य रचावयाचे' असा संकल्प या कारागृहातच त्यांनी सोडला.[२] ठाण्याच्या तुरुंगात असताना त्यांनी आपले कनिष्ठ बंधू नारायणराव यांना निरोप धाडला होता की, "मला जरी परत हिंदुस्थानच्या पुण्यभूमीच्या तटावर पाय ठेवता आला नाही, तरी मी रचीत असलेले महाकाव्य जसे 'ततः प्राचेतसः शिष्यौ रामायणमितस्ततः मैथिलेयौ कुशलवौ जगत्गुरुचोदितौ' तसे अीश्वराने दिले तर, त्या अभिनव कुमारांच्या कंठांनी देशभर प्रख्यात करवीन. अेका आयुष्याचे साफल्य संपादण्यास हे अेक कार्यही समर्थ आहे."[३] मात्र असे गद्य वा पद्यमय साहित्य निर्माण करण्यामधील सावरकरांच्या अडचणी अंदमानच्या कारागृहात अनंत पटींनी वाढल्या. निस्साहाय्य व निस्साधन अशा अवस्थेत सावरकरांना साहित्यनिर्मिती करावयाची होती. 'प्रत्यही आम्ही कविता रचीतच होतो. पण त्या कशावर अुतराव्या' असा प्रश्न त्यांच्यापुढे अुभा राहात असे.[४] अखेर त्यांनी कोठडयांची चुन्याने रंगविलेली लांब-अुंच भिंतच कागद आणि घायपाताचा काटाच लेखणी केली.[५] विटेच्या तुकडयाने तुरुंगाच्या भिंतीवर लिहिण्याचा प्रयोग त्यांनी भायखळ्यास असताना केला होता. तोच प्रयोग त्यांनी मोठ्या प्रमाणावर करण्याचे योजिले आणि सुटका होअीपर्यंत चौदा वर्षे तो अुपयोगात आणला.[६] अंदमानात लेखन-साधनाबद्दल जशी अडचण होती तशी ती ग्रंथवाचना-बाबतही होती. वृत्तशास्त्रावरील पुस्तक अुपलब्ध न झाल्यामुळे अनुष्टुप छंदाचे नियम त्यांना पडताळून पाहता आले नाहीत.[७] आपली ही अडचण सांगताना सावरकरांनी लिहिले आहे : "कारागारात मला जे वाङ्मय निर्माण करता आले, त्यासाठी साधने नसल्याने विलक्षण त्रास पडे. अेका तारखेकरिता, अेका शब्दाकरिता आठ आठ दिवस खोळंबून राहावे लागे. कल्पना कितीही वरी असली तरी सोडून द्यावी लागे. केवळ स्मृतीत जे होते त्यावर सर्व अुदरनिर्वाह कितीतरी वर्षे करावा लागला."[८] या साहित्यसाधनांच्या अडचणींबरोबरच भीती असे शिक्षेची. तुरुंगाच्या भिंतीवर काव्य लिहिण्याचा गुन्हा अुघडकीस येताच सावरकरांना अेकदा तीन व अेकदा आठ दिवस हातकडीची शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला होता.[९]

अंदमानातील तेरा-चौदा वर्षांच्या कारावासाच्या काळात सावरकरांनी केलेल्या अितर चळवळींचा सविस्तर व तपशीलवार विचार येथे करावयाचा नाही, तर त्या

---

१. मा. ज. पृ. ९. २. मा. ज. पृ. ९. ३. मा. ज. पृ. २४. ४. मा. ज. पृ. १४४. ५. मा. ज. १४५. ६. मा. ज. १४५. ७. मा. ज. पृ. ८४–८५. ८. मा. ज. ८५. ९. स. सा. वा. खंड ७ पृ. १८८.

चळवळींचा परिणाम सावरकरांच्या साहित्यनिर्मितीवर कसा झाला हे मुख्यतः येथे पाहावयाचे आहे. सावरकरांनी अंदमानात येताच थोड्याच दिवसांत तेथील बंदिवानांत संघटना करण्याचा आणि त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार करण्याचा उद्योग हाती घेतला. शिक्षणाचा अर्थ सावरकरांच्या दृष्टीने केवळ साक्षरता व ज्ञानसंग्रह अेवढाच नव्हता, तर त्यांनी आपल्या ध्येयाप्रमाणे शिक्षितांची पुढील व्याख्या केली होती. 'ज्यास आपल्या देशाची आणि प्रचलित राजकारणाची अितकी माहिती आहे आणि ज्याचे सर्वसाधारण ज्ञान अितके विकसित झालेले आहे की, तो भावी विधिमंडळात किंवा पंचसभेत प्रतिनिधी निवडून देण्यासाठी स्वत:चे मत त्यातील अर्थ समजून देअू शकावा.'[1] या दृष्टीने सर्वार्थाने शिक्षित म्हणता येअील अशा शेकडा नव्वद हिंदू बंदिवानांना सावरकरांनी अंदमानात शिक्षण दिले.[2] दर रविवारी तेथे तुरुंगात भरणाऱ्या 'पळत्या बैठकी'तून त्यांनी राष्ट्रीय ज्ञानसत्र चालू ठेविले होते.[3] त्या शिक्षणातून व संघटनेतून पुढे कारागृहात चार राजकीय संप सावरकरांनी घडवून आणले. अंदमानांतील बंदिवानांत राजकीय कैद्यांच्या हक्कांबद्दल आलेली ही जागृती अभूतपूर्व होती. अंदमानातील कैद्यांची संघटनाही अितकी दृढ झाली होती की, लोकमान्य टिळकांच्या निधनाची वार्ता येताच कारागृहापासून तो दूर रास बेटापर्यंत आणि अितर भागांतून शेकडो लोकांनी आपापली जेवणे घेण्याचे नाकारले होते.[4]

संघटना व शिक्षणप्रसार या दोन कार्यांशिवाय सावरकरांनी शुद्धी आणि हिंदी भाषा व देवनागरी लिपी यांचा प्रचार ही कार्ये हाती घेतली होती. पण ही कार्ये त्यांनी ज्या परिस्थितीत व वातावरणात हाती घेतली होती, त्यांची मीमांसा केल्याशिवाय त्या कार्याचे मर्म स्पष्ट व्हावयाचे नाही.

अंदमानात आल्यानंतर 'कोठडीतील पहिल्या आठवड्या'त सावरकरांच्या निदर्शनास असे आले की, त्यांच्यावर पहारा करण्यासाठी पठाणी मुसलमान जाणूनबुजून ठेवण्यात आले आहेत. हेतू हा की, सावरकरांच्या हालचालींच्या बातम्या फुगवून सांगितल्या जाव्यात आणि त्यांना शक्य तितक्या क्रूरपणे वागविले जावे.[5] तसेच अितर हिंदू बंदिवानांचा छळ करण्यासाठी तेथील मुसलमान जामदारांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अुत्तेजन मिळत असे. त्यामुळे अुभ्या अंदमानात हिंदू बंदिवानाचे आणि बंदी अधिकाऱ्यांचे फारच हाल होअू लागले.[6] त्यातच मुसलमान बंदिवानांनी हिंदू बंदिवानांचे भ्रष्टीकरण करण्यास योजनापूर्वक सुरुवात केली होती. मुसलमानांचे संख्याबळ वाढवावे हाच हेतू त्यामागे होता.[7]

---

१. मा. ज. पृ. ४८१. २. मा. ज. पृ. ४८०. ३. मा. ज. पृ. १४२–१४३. ४. मा. ज. पृ. ४७४. ५. मा. ज. पृ. ७७. ६. मा. ज. पृ. ७८. ७. मा. ज. पृ. २६०

आणि म्हणूनच हिंदूंच्या जातीय जीवनाचा बळी दिला जाऊ नये या भूमिकेतून सावरकर शुद्धिकार्याकडे वळले.[1]

अंदमानात धर्माप्रमाणेच भाषा व लिपी यांवरही परकीय आक्रमण चालू होते. अंदमानातील बहुसंख्य लोकांची भाषा हिंदी असूनही प्राथमिक शाळेतून अुर्दू भाषा व पर्शियन लिपी शिकविली जात असे. अुर्दू नोकरांचाच दुय्यम लेख्यालयात भरणा असल्याने लिखाणाची भाषा अुर्दूच झाली होती.[2] कारागारातील शेकडा नव्वद पत्रे अुर्दू भाषेत लिहिली जात. स्वतंत्र लोकांत लग्नकार्याच्या पत्रिकादेखील हिंदू लोक अुर्दूत छापीत. हिंदू मुलास पर्शियन चुटके येत, त्याच्या डोक्यात अुपमा पर्शिया किंवा अरेबियातील नद्यांच्या भरलेल्या असत.[3] सावरकरांनी तेथील सर्वसाधारण माणसांची ही स्थिती अवलोकन केली, तेव्हा अंदमानमध्ये हिंदू संस्कृती जिवंत ठेवावयाची असेल तर हिंदी भाषा आणि नागरी लिपी यांचे शिक्षण प्रत्येक हिंदू मुलास अगदी अपरिहार्य म्हणून दिले जावयासाठी अेकसारखी चळवळ करणे अत्यंत अवश्य आहे असे त्यांचे मत झाले.[4]

हिंदूंचा धर्म आणि त्यांची भाषा व लिपी यांवर होणारे हे आक्रमण बाह्य स्वरूपाचे होते. परंतु हिंदू जातीचे सामर्थ्य खच्ची करणारी अेक विघटनात्मक विचार-सरणी हिंदूंमध्ये मूळ धरून आहे ही गोष्ट सावरकरांच्या विशेषत्वाने ध्यानी आणून देणाऱ्या पुढील काही घटना अंदमानात घडल्या. अंदमानात शिरगणनेच्या कामास आरंभ होताच हिंदूहिंदूंमधील सांप्रदायिक भांडणाचा प्रतिध्वनी वातावरणात अुमटू लागला. आर्यसमाजी बंधूंनी शिरगणनेत आपली नावे 'हिंदू' म्हणून न नोंदता आर्य म्हणून नोंदवावी असा बेत केला. आर्यसमाजीयांचे हे विचार अैकताच त्या वेळेस कारागारात आलेल्या शीख राजबंदींपैकी काही पुढाऱ्यांनी अंदमानातील शीख बंदि-वानांनी आणि शिपायांनीही 'आपणांस हिंदू म्हणून न घेता शीख म्हणून स्वतंत्र नोंद करावी असा हट्ट धरला.'[5] तेव्हा या संकटास तोंड देण्यासाठी 'हिंदू' शब्दाची सत्य, अैतिहासिक व सार्वत्रिक व्याख्या निश्चित करून तिचा अुपयोग अंदमानातील सर्व बंदिवानांना आणि स्वतंत्रांना करण्याचे कार्य सावरकरांना हाती घ्यावे लागले.

सन १९११ मध्ये अंदमानात पाय ठेवताना सावरकरांच्या ठिकाणी साहित्य-निर्मितीची आकांक्षा किती तीव्र होती आणि त्यांच्या सभोवतीची परिस्थिती कशी होती याचा विचार येथपर्यंत केला. आता या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या साहित्य-निर्मितीवर कितपत आणि कसा झाला ह्याचा शोध घ्यावयाचा आहे.

---

१. मा. ज. पृ. २६०. २. मा. ज. पृ. ४६१. ३. मा. ज. पृ. ४६१. ४. मा. ज. पृ. ४६२. ५. मा. ज. पृ. २९०–२९१.

सावरकर अिंग्लंडमध्ये होते तेव्हा त्यांच्या हिंदुत्वाच्या भावनेला अभिनिवेशाची तीक्ष्ण धार चढलेली नव्हती, हे प्रथमदर्शनीच ध्यानी येते. 'लंडनच्या बातमीपत्रा 'त त्यांनी अनेक ठिकाणी हिंदु–मुसलमान अैक्याच्या कल्पनेचा पुरस्कार केलेला होता.[1] तुर्कस्थान, अिजिप्त ह्या अिस्लामी राष्ट्रांकडे भारताचे मित्र म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता.[2] '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथातही हिंदु-मुसलमान अैक्या-बद्दलची त्यांची भूमिका स्पष्ट दिसून येते. तथापि हिंदू जातीच्या अभिमानाचा विचार संपूर्णपणे सुटला नव्हता. विशेषत: 'विजयादशमीचा अुत्सव' या 'लंडनच्या बातमी-पत्रां 'तील शेवटच्या पत्रात 'स्वत:ला हिंदू म्हणवून घेण्यात आले पाहिजे व त्यात अभिमान वाटला पाहिजे.' असे त्यांनी आपल्या मित्राला स्पष्टपणे बजाविले आहे.[3] अितकेच नव्हे, तर हिंदू जातीच्या अुन्नतीच्या दृष्टीने श्रीरामाच्या अवतारकृत्याचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात सांगितले आणि अखेरीस 'हिंदू हिंदुस्थानचें हृदय आहे' असा सारभूत विचारही मांडला.[4]

अिंग्लंडमध्ये असतानाच हिंदुत्वाबद्दलचे विचार आपल्या मनात घोळत होते याचा पुरावा सावरकरांनी स्वत:च सादर केला आहे. 'माझी जन्मठेप' मध्ये ते लिहितात, "अिंग्लंडमध्ये असतानाच हिंदूंच्या सांप्रदायिक कलहाने हिंदुत्वाचे खंड खंड पडून आपल्या अखिल जातीस अेका सूत्रात, अेका ध्वजाखाली आणण्याचे सामर्थ्य सद्य:परिस्थितीत ज्या अेका शब्दात अुरले आहे तो 'हिंदू' शब्द भ्रामक विद्वेषाच्या घावाने पंगू होअील ही भीती आम्हांस चिंता अुत्पन्न करू लागली."[5] त्यांच्या 'हिंदुत्व' ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रकाशकाने म्हटले आहे. "'It was during his (Savarkar's) stay from 1906 to 1910 in England that the attention of Veer Savarkarji was drawn pointedly to the question as to who can be precisely called a Hindu."[6]

१९०८ मध्ये सावरकरांनी लिहिलेल्या, 'प्रियकर हिंदुस्थान' या कवितेत 'पुण्यभूमि तू पितृभूमि तू तू अमुचा अभिमान' असे जे शब्दप्रयोग करण्यात आले आहेत ते सावरकरांच्या हिंदूंच्या व्याख्येतील कल्पनेशी आणि शब्दांशी संपूर्णत: जुळणारे आहेत. यावरून अंदमानात येण्यापूर्वी सावरकरांचा हिंदुत्वाभिमान प्रकट होण्याअितका अुत्कट होअू लागला होता हे सिद्ध होते. अंदमानात या अभिमानाला तीक्ष्ण धार चढण्यास भोवतीची परिस्थिती कारणीभूत कशी झाली हे येथे लक्षात येते. सावरकरांच्या 'हिंदुत्व' ह्या ग्रंथलेखनास खरी चालना मिळाली ती अंदमानातील परिस्थितीमुळेच. आर्यसमाजी, शीख अित्यादी पंथांतील बंदिवानांना 'हिंदू' शब्दाची

---

१. पत्र क्र. ११, २२, २३, २४, ३०, ३२, ३५. २. पत्र क्र. १९, २४. ३. पत्र क्र. ४७. ४. लं. बा. पृ. १४६. ५. मा. जन्म पृ. २९१. ६. Hindutva p. 1.

आणि म्हणूनच हिंदूंच्या जातीय जीवनाचा बळी दिला जाऊ नये या भूमिकेतून सावरकर शुद्धिकार्याकडे वळले.[१]

अंदमानात धर्माप्रमाणेच भाषा व लिपी यांवरही परकीय आक्रमण चालू होते. अंदमानातील बहुसंख्य लोकांची भाषा हिंदी असूनही प्राथमिक शाळेतून अुर्दू भाषा व पर्शियन लिपी शिकविली जात असे. अुर्दू नोकरांचाच दुय्यम लेख्यालयात भरणा असल्याने लिखाणाची भाषा अुर्दूच झाली होती.[२] कारागारातील शेकडा नव्वद पत्रे अुर्दू भाषेत लिहिली जात. स्वतंत्र लोकांत लग्नकार्याच्या पत्रिकादेखील हिंदू लोक अुर्दूत छापीत. हिंदू मुलास पर्शियन चुटके येत, त्याच्या डोक्यात अुपमा पर्शिया किंवा अरेबियातील नद्यांच्या भरलेल्या असत.[३] सावरकरांनी तेथील सर्वसाधारण माणसांची ही स्थिती अवलोकन केली, तेव्हा अंदमानमध्ये हिंदू संस्कृती जिवंत ठेवावयाची असेल तर हिंदी भाषा आणि नागरी लिपी यांचे शिक्षण प्रत्येक हिंदू मुलास अगदी अपरिहार्य म्हणून दिले जावयासाठी अेकसारखी चळवळ करणे अत्यंत अवश्य आहे असे त्यांचे मत झाले.[४]

हिंदूंचा धर्म आणि त्यांची भाषा व लिपी यांवर होणारे हे आक्रमण बाह्य स्वरूपाचे होते. परंतु हिंदू जातीचे सामर्थ्य खच्ची करणारी अेक विघटनात्मक विचार-सरणी हिंदूंमध्ये मूळ धरून आहे ही गोष्ट सावरकरांच्या विशेषत्वाने ध्यानी आणून देणाऱ्या पुढील काही घटना अंदमानात घडल्या. अंदमानात शिरगणनेच्या कामास आरंभ होताच हिंदूहिंदूंमधील सांप्रदायिक भांडणाचा प्रतिध्वनी वातावरणात अुमटू लागला. आर्यसमाजी बंधूंनी शिरगणनेत आपली नावे 'हिंदू' म्हणून न नोंदता आर्य म्हणून नोंदवावी असा बेत केला. आर्यसमाजीयांचे हे विचार अैकताच त्या वेळेस कारागारात आलेल्या शीख राजबंदींपैकी काही पुढाऱ्यांनी अंदमानातील शीख बंदि-वानांनी आणि शिपायांनीही 'आपणांस हिंदू म्हणून न घेता शीख म्हणून स्वतंत्र नोंद करावी असा हट्ट धरला.'[५] तेव्हा या संकटास तोंड देण्यासाठी 'हिंदू' शब्दाची सत्य, अैतिहासिक व सार्वत्रिक व्याख्या निश्चित करून तिचा अुपयोग अंदमानातील सर्व बंदिवानांना आणि स्वतंत्रांना करण्याचे कार्य सावरकरांना हाती घ्यावे लागले.

सन १९११ मध्ये अंदमानात पाय ठेवताना सावरकरांच्या ठिकाणी साहित्य-निर्मितीची आकांक्षा किती तीव्र होती आणि त्यांच्या सभोवतीची परिस्थिती कशी होती याचा विचार येथपर्यंत केला. आता या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या साहित्य-निर्मितीवर कितपत आणि कसा झाला ह्याचा शोध घ्यावयाचा आहे.

---

१. मा. ज. पृ. २६०. २. मा. ज. पृ. ४६१. ३. मा. ज. पृ. ४६१. ४. मा. ज. पृ. ४६२. ५. मा. ज. पृ. २९०–२९१.

सावरकर अिंग्लंडमध्ये होते तेव्हा त्यांच्या हिंदुत्वाच्या भावनेला अभिनिवेशाची तीक्ष्ण धार चढलेली नव्हती, हे प्रथमदर्शनीच ध्यानी येते. 'लंडनच्या बातमीपत्रा 'त त्यांनी अनेक ठिकाणी हिंदु–मुसलमान अैक्याच्या कल्पनेचा पुरस्कार केलेला होता.[१] तुर्कस्थान, अिजिप्त ह्या अिस्लामी राष्ट्रांकडे भारताचे मित्र म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता.[२] '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथातही हिंदु-मुसलमान अैक्या-बद्दलची त्यांची भूमिका स्पष्ट दिसून येते. तथापि हिंदू जातीच्या अभिमानाचा विचार संपूर्णपणे सुटला नव्हता. विशेषत: 'विजयादशमीचा अुत्सव' या 'लंडनच्या बातमी-पत्रां 'तील शेवटच्या पत्रात 'स्वत:ला हिंदू म्हणवून घेण्यात आले पाहिजे व त्यात अभिमान वाटला पाहिजे.' असे त्यांनी आपल्या मित्राला स्पष्टपणे बजाविले आहे.[३] अितकेच नव्हे, तर हिंदू जातीच्या अुन्नतीच्या दृष्टीने श्रीरामाच्या अवतारकृत्याचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात सांगितले आणि अखेरीस 'हिंदू हिंदुस्थानचें हृदय आहे' असा सारभूत विचारही मांडला.[४]

अिंग्लंडमध्ये असतानाच हिंदुत्वाबद्दलचे विचार आपल्या मनात घोळत होते याचा पुरावा सावरकरांनी स्वत:च सादर केला आहे. 'माझी जन्मठेप' मध्ये ते लिहितात, "अिंग्लंडमध्ये असतानाच हिंदूंच्या सांप्रदायिक कलहाने हिंदुत्वाचे खंड खंड पडून आपल्या अखिल जातीस अेका सूत्रात, अेका ध्वजाखाली आणण्याचे सामर्थ्य सद्य:परिस्थितीत ज्या अेका शब्दात अुरले आहे तो 'हिंदू' शब्द भ्रामक विद्वेषाच्या घावाने पंगू होअील ही भीती आम्हांस चिंता अुत्पन्न करू लागली."[५] त्यांच्या 'हिंदुत्व' ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रकाशकाने म्हटले आहे. "'It was during his (Savarkar's) stay from 1906 to 1910 in England that the attention of Veer Savarkarji was drawn pointedly to the question as to who can be precisely called a Hindu."[६]

१९०८ मध्ये सावरकरांनी लिहिलेल्या, 'प्रियकर हिंदुस्थान' या कवितेत 'पुण्यभूमि तू पितृभूमि तू तू अमुचा अभिमान' असे जे शब्दप्रयोग करण्यात आले आहेत ते सावरकरांच्या हिंदूंच्या व्याख्येतील कल्पनेशी आणि शब्दांशी संपूर्णत: जुळणारे आहेत. यावरून अंदमानात येण्यापूर्वी सावरकरांचा हिंदुत्वाभिमान प्रकट होण्याअितका अुत्कट होअू लागला होता हे सिद्ध होते. अंदमानात या अभिमानाला तीक्ष्ण धार चढण्यास भोवतीची परिस्थिती कारणीभूत कशी झाली हे येथे लक्षात येते. सावरकरांच्या 'हिंदुत्व' ह्या ग्रंथलेखनास खरी चालना मिळाली ती अंदमानातील परिस्थितीमुळेच. आर्यसमाजी, शीख अित्यादी पंथांतील बंदिवानांना 'हिंदू' शब्दाची

---

१. पत्र क्र. ११, २२, २३, २४, ३०, ३२, ३५. २. पत्र क्र. १९, २४. ३. पत्र क्र. ४७. ४. लं. बा. पृ. १४६. ५. मा. जन्म पृ. २९१. ६. Hindutva p. 1.

व्याख्या पटवून देण्यासाठी त्यांनी जी चर्चा वा खल केला तोच पुढे ' हिंदुत्व ' पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्धीस पावला.[1]

हिंदुजातीतील विघटनात्मक प्रवृत्ती, तिच्यातील दौर्बल्य व शरणागत वृत्ती, विटाळवेडासारख्या दुष्ट रूढींनी पछाडल्यामुळे तिचा होत चाललेला आत्मघात या अंदमानातील दृश्यांचा परिणाम सावरकरांवर झाला आणि त्यांतून हिंदुत्वाचा अभिमान हिंदूंमध्ये संचरविण्यासाठी त्यांनी साहित्याची कास धरली. अंदमानात संकल्पिलेली 'कमला', 'गोमांतक', 'महासागर', 'विरहोच्छ्वास' ही खंडकाव्ये त्यांनी हिंदूंचा विजयी अितिहास वर्णन करण्यासाठी रचली. पानिपत हा त्यांच्या आवडीचा विषय होता.[2] 'भाअूसाहेबांची वखर', 'पेशव्यांची वखर' यांच्या वाचनाने पोसलेले त्यांचे मन मराठ्यांच्या अुत्कर्षकालावर महाकाव्य लिहावे असे लहानपणापासून संकल्पित होते.[3] अंदमानातील भोवतालच्या वातावरणाने हिंदूंच्या अुत्थानाला अुत्तेजक अशी परिस्थिती दिसून येताच सावरकरांनी आपल्या काव्यातून ती रंगविण्यास प्रारंभ केला. ' कमला ' काव्याच्या अखेरीस त्यांनी लिहिले–

" शत्रु शत्रु दिशा दाही । फिरंगाण तुराण तो
पर्यंत सेतुबंधाच्या जो जो म्लेच्छ अहिंदु तो
तो तो सर्व मिळूनिया अुच्छेदू अुठला अहा
शिवछत्रचि, हिंदूंचा प्राणत्राण अनन्य हा ।"

' गोमांतका 'तील ' महाराष्ट्र भाटाचे विजयगीत ' हे हिंदूंनी ' यशस्वी हट ' कसा केला आणि ' हिंदवी जरिपटका अटकेला ' कसा पोहोचविला याचे अत्यंत तेजस्वी वर्णन करणारे काव्य आहे.[4] त्यात शुद्धीची केलेली तात्त्विक मीमांसा सावरकरांच्या अंदमानातील विचारांचेच प्रतिबिंब होय. ' श्रीवंदावीर ' याला ' अखिल हिंदु वंद्य हुतात्मा ' समजून सावरकरांनी लिहिले आहे–

तो शकला श्रीवंदा हिंदुहुतात्मा
सहण्यासी जरि असह्य छळ तसे तरी
का शकेन मीहि न हे छळ सहू अहा
मीहि हिंदुची असता ?
परि झटेन जीवनांतही झटेनची
करण्यासी विनुक्त मातृभू पुन्हा.[5]

---

१. मा. ज. पृ. २९१. २. स. सा. वा. खंड ७ पृ. १८८. ३. स. सा. वा. खंड ७ १८९. ४. स. सा. वा. खंड ७ पृ. २२०–२२१. ५. सा. क. पृ. १२८.

अंदमानात सावरकरांचा हिंदुत्वाभिमान वाढू लागला होता याचा तुलनात्मक पुरावा त्यांची अंदमानात रचलेली 'हिंदु नृसिंह' ही कविता देते. अिंग्लंडला जाण्यापूर्वी सावरकरांनी शिवाजी महाराजांवर ज्या कविता रचल्या आणि विशेषत: 'श्री शिवाजी महाराजांची आरती' म्हणून जी कविता त्यांनी लिहिली, त्यांत शिवाजीचा अुल्लेख 'हिंदु नृसिंह' असा क्वचित केला गेला आहे. 'आर्यांच्या देशावरि म्लेच्छांचा घाला' किंवा 'या या अनन्यशरणा आर्या तारावया' असे अुल्लेख या प्रारंभीच्या कवितांतून आले आहेत. लंडनमध्ये पहिला शिवोत्सव साजरा करतानाही 'असले अुत्सव म्हणजे कित्येकांनी अशक्य म्हटलेल्या हिंदी राष्ट्रैक्याची मूर्त शक्यता होती असे वर्णन त्या अुत्सवानिमित्त अेकत्रित जमलेल्या हिंदु मुसलमानादी सर्व धर्मांच्या लोकांना पाहून सावरकरांनी केले आहे.[1] परंतु याच विषयावर अंदमानमध्ये केलेल्या कवितेत पुढीलप्रमाणे वर्णन करण्यात आले आहे–

"हे हिंदुशक्ति–संभूत–दीप्ततम तेजा
हे हिंदुतपस्या–पूत अीश्वरी ओजा
हे हिंदुश्री–सौभाग्य–भूतिच्या साजा
हे हिंदु नृसिंहा प्रभो 'अीश्वरी राजा"[2]

अंदमानात सावरकर गेल्यानंतर काही वर्षांत तेथे जो मुख्य बदल घडला तो म्हणजे तेथे गाजत असलेले टीचभर 'पठाणी राज्य' अुलथून पडून त्याच्या स्थानी सव्वा टीचभर 'हिंदुराज्य' स्थापन झाले.[3] सावरकरांना तेल कोठाराचे अधिकारी म्हणून नेमण्यात आल्यानंतर त्या अधिकाराचा अुपयोग शिक्षण-शुद्धीकरण-संघटन अित्यादी कार्यांसाठी ते करू लागले. हिंदू बंदिवानांनी परस्परांना नमस्कार करताना 'सलाम' म्हणण्याअैवजी 'रामराम' म्हणावे असा आग्रह सावरकर करीत. जातिनिर्विशेष हिंदूंची सहभोजने ते घडवून आणीत. शीख–हिंदूंमध्ये अधिक संघटन व्हावे म्हणून श्रीगोविंदसिंहाच्या जयंती-सारखे राष्ट्रीय अुत्सव ते साजरे करीत. अंदमानची वसाहत बंद करण्याचा सरकारी निर्णय कळताच हिंदूंच्या दृष्टीने अंदमान ही वसाहत राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या किती महत्त्वाची आहे, हे आपल्या सहकार्यांना पटवून देण्याचा त्यांनी पराकाष्ठेचा प्रयत्न केला व त्याकरिता अप्रियताही पत्करली. अंदमानातून हिंदुस्थानला परत निघण्याच्या वेळी तेथील काही प्रमुख सहका-यांशी अंतस्थपणे बोलण्याची संधी सावरकरांना मिळाली होती. त्यांच्या हाती सर्व बंदिवानांना सावरकरांनी पाठविलेला निरोप पुढीलप्रमाणे होता– "अंदमानातच

---

१. लं. बा. पत्र क्र. २२. २. सा. क. पृ. १४२. ३. मा. ज. पृ. ४६९.

राहा., शेती करा. आपसात लग्ने करून संतती वाढवा आणि त्या वसाहतीत हिंदु-संस्कृतीचा होत चाललेला फैलाव अेकसारखा वृद्धिगत करा."[1]

रत्नागिरीतील स्थानबद्धता (१९२४ ते १९३७)

१९२१च्या मे महिन्याच्या अखेरीस सावरकरांना रत्नागिरीच्या तुरुंगात आणून ठेवण्यात आले. सुमारे दोन वर्षे सावरकर रत्नागिरीच्या तुरुंगात होते. त्यांना अंदमानात मिळालेल्या सर्व सवलती या तुरुंगातून काढून घेण्यात आल्या. निर्जन अेकलकोंडी पुन्हा नशिबी आली. लेखन, वाचन बंद करण्यात आले. पळ, पळ, त्यांना दुस्सह होअू लागला. आत्महत्येचा विचारही कार्यवाही करण्याच्या पायरीपर्यंत मनात येअून गेला. परंतु स्वत:च्या आयुष्याच्या अितिकर्तव्यांची रूपरेषा सुस्पष्टपणे समजून घेतल्यानंतर पुन्हा जीवनक्रम सुरू झाला. बंदिवानांना शिक्षण, शुद्धीची चळवळ, ग्रंथालयाची सुसज्जता अित्यादी गोष्टींकडे लक्ष देण्यास त्यांनी पुन्हा प्रारंभ केला.

सावरकरांच्या मुक्ततेचे प्रयत्नही याच वेळी ज़ोरात चालू होते. 'महाराष्ट्र प्रांतिक परिषदे 'ने त्यांच्या मुक्ततेची मागणी केली. बॅ. जमनादास मेथा व नागपूरचे श्री. विश्वनाथराव केळकर यांनी पुस्तक व लेखनरूपाने सावरकरांच्या सुटकेसाठी सरकारकडे विनंती केली. मुंबअीस श्री. विठ्ठलभाअी पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सभा होअून सावरकर मुक्ततेची मागणी करणारा ठराव संमत करण्यात आला. १९२३च्या डिसेंबरात कोकोनाडा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सावरकरां-वरील अन्यायाचा निषेध करण्यात आला. या सुमारास सावरकरांना रत्नागिरीहून येरवडा कारागृहात आणण्यात आले. तेथे मुंबअीचे तेव्हाचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉअीड यांनी कारागृहास भेट देअून सावरकरांच्या मुक्ततेबद्दल चर्चा केली आणि अखेर ६-१-१९२४ रोजी सावरकरांची येरवडा येथून मुक्तता झाली. मुक्तता ज्या दोन अटींवर करण्यात आली त्या पुढीलप्रमाणे होत्या- "पाच वर्षेपर्यंत प्रचलित राजकारणात भाग घेअू नये आणि रत्नागिरी जिल्ह्यात स्थलबद्धतेत रहावे, मुक्तता होताच कुठेही न थांबता रत्नागिरीस निघाले पाहिजे"[2] असा हुकूम सावरकरांवर बजावण्यात आला.

रत्नागिरीच्या कारागृहात सावरकरांची साहित्यसेवा चालूच होती. त्या सेवेचा तपशील देताना सावरकरांनी लिहिले आहे : "रत्नागिरीस बंदीत असताना अंदमानात रचलेल्या त्या खंड कविता-ज्या अेकदा काव्याच्या अनुबंधाने गोवल्या जाणार होत्या त्या-आम्ही पूर्ण केल्या. पूर्वीच पुऱ्या झालेल्या कविता संकलित केल्या

---

१. मा. ज. पृ. ५०३. २. मा. ज. पृ. ५३२.

आणि हिंदु-संघटनेस अत्यंत आवश्यक–त्या कार्याचा केवळ पायाच असलेली जी 'हिंदू' शब्दाची व्याख्या–तिचे निश्चित स्वरूप ठरविण्यासाठी 'हिंदुत्व' हा ग्रंथ लिहिला. अंदमानमधून आमची कित्येक लिखाणे आम्ही घरी धाडलीच होती. वरील सर्व कवितांतून निवडून आमच्या बंधूंनी 'कमला', 'सप्तर्षि' आणि 'गोमांतक' ही काव्ये प्रसिद्ध केली. चवथे 'विरहोच्छ्वास' अित्यादी फुटकळ कवितांचे पुस्तक छापलेही होते. ... 'कमला', 'गोमांतक' आणि 'महासागर' ही खंडकाव्ये त्या संकल्पित महाकाव्याची अुपांगे म्हणून निर्मिलेली होती."[1] 'माझी जन्मठेप' या ग्रंथाची जुळणी सावरकरांनी येथेच प्रथम आपल्या स्मृतिपटलावर आणि नंतर लाल विटांच्या तुकड्यांनी तुरुंगाच्या भिंतीवर केली.

रत्नागिरी व येरवडा येथील कारागृहात स्वत:च्या साहित्याला प्रेरक ठरतील असे अनेक विचारप्रवाह सावरकरांना आढळून आले. म. गांधी यांनी प्रवर्तित केलेल्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह, असहकार, खिलाफत अित्यादी तत्त्वांचा व चळवळींचा बोलबाला त्या वेळी सर्वत्र अैकू येत होता. अंदमानमध्येही या विषयांवर सावरकर चर्चा करीत होते. लोकमान्यांसारखा धुरंधर नाहीसा होताच वरील आत्मवंचक असा अशुभ झंझावात सुटला आहे असे सावरकरांना वाटत होते.[2] 'ही खिलाफत नाही, आफत आहे' हे सावरकरांचे वाक्य अंदमानच्या घरादारापर्यंत गर्जत होते.[3] अहिंसेची, सत्याची व्याख्या स्पष्ट करून सांगण्याचे कार्य ते प्रत्यही करीत होते.[4] रत्नागिरी व येरवडा येथील तुरुंगात कित्येक असहयोगी आणि खिलाफती हिंदु-मुसलमान बंदीवान सावरकरांच्या सहवासात येताच सावरकरांना चर्चा वा वाद-विवाद करावा लागे. सत्य, अहिंसेच्या विपर्यस्त व्याख्यांतील राष्ट्रविघातकता त्यांना पटवून द्यावी लागे. सावरकरांनी पुढे लिहिलेल्या 'अु:शाप' आणि 'संन्यस्त खड्ग' या नाटकांतून याच चर्चेला फार मोठे स्थान देण्त्य आले आहे. मलबारमधील मुसल-मानांनी केलेल्या अत्याचाराकडे 'मला काय त्याचे' या भूमिकेतून पाहण्याची हिंदू असहकारवाद्यांची भ्रांत वृत्ती पाहून सावरकरांनी 'मोपल्यांचे बंड' ही कादंबरी लिहिली. अशा रीतीने सावरकरांच्या साहित्याला आशयाचा घाट आणून देण्यात त्या बेळच्या राजकीय वातावरणाचा फार मोठा वाटा होता असे आढळून येते.

१९२५पासून तो १९३७पर्यंत सावरकरांचे वास्तव्य मुख्यत: रत्नागिरी जिल्ह्यात होते. राजकीय निर्बंधामुळे त्यांनी आपल्या कार्याचा जो क्रम लावला तो प्रथम अस्पृश्यता-निवारण आणि नंतर भाषा-लिपिशुद्धी असा होता.[5] सामाजिक सुधारणांसाठी व विशेषत्वाने अस्पृश्यता निवारण्यासाठी सावरकरांनी अनेक चळवळी

---

१. मा. ज. पृ. ५१९. २. मा. ज. पृ. ४९४. ३. मा. ज. पृ. ४९४. ४. भा. ज. पृ. ४१४. ५. म. भा. शु. पृ. ३०–३१.

केल्या. महारवाड्यात जाअून भजने केली. अस्पृश्यांसच गावात आणून संमिश्र भजन, व्याख्यानादी कार्यक्रम केले. शाळांतून मुले-सरमिसळ वसविण्याचे आंदोलन हाती घेतले. अस्पृश्यांना स्पृश्यांच्या घरी सरसकट प्रवेश मिळवून देण्याचा जाणीवपूर्वक प्रत्न केला. स्पृश्यास्पृश्य स्त्रियांचे संमिश्र हळदीकुंकू केले, पूर्वास्पृश्यांचा मेळा काढला, देवालय-प्रवेश अस्पृश्यांना मुक्त केला. अखिल हिंदू देवालय म्हणून पतितपावन मंदिराची अुभारणी केली. अखिल हिंदू अुपहारगृह सुरू केले. सर्व महाराष्ट्रभर सहभोजनाचा धूमधडाका अुडवून दिला. अखिल हिंदू मेळ्याचा अुपक्रम हाती घेतला. शुद्धिसमारंभ घडवून आणले. अस्पृश्यता निवारण्याचे सावरकरांचे हे कार्य पाहून १९३१ मध्ये त्यांना 'मुंवअी प्रांतिक अस्पृश्यता निवारण परिषद' आणि 'सोमवंशीय महार परिपद' या परिषदांचे अध्यक्षपद देण्यात आले होते.

वरील सर्व चळवळींचा परिणाम या काळात निर्माण झालेल्या, सावरकरांच्या साहित्यावर झालेला आहे. अस्पृश्यता-निवारण, शुद्धी व स्त्रियांचे अपहरण हाच त्यांच्या 'अुःशाप' या नाटकाचा विषय आहे. अपहृत स्त्रियांचे प्रश्न व हिंदुत्वनिष्ठ राजकारणाची व्यापक कल्पना त्यांनी 'अुत्तरक्रिया' या नाटकात मांडली आहे. याच हिंदुत्वनिष्ठ दृष्टीने मराठ्यांच्या अुत्थानाचा अर्थ लावून त्यांनी "हिंदुपदपादशाही' हा ग्रंथ लिहिला. 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ सरकारने लोकांपासून हिरावून घेतल्यामुळे सावरकरांनी 'काळे पाणी' ही ह्याच विषयावरील कादंबरी लिहिली. १९२६ ते १९३० या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या 'श्रद्धानंद' या साप्ताहिकात सावरकरांनी विविध स्फुटलेखन केले. अस्पृश्यतानिवारणावरील अनेक लेख त्यांनी याच साप्ताहिकातून प्रसिद्ध केले. 'किर्लोस्कर', 'मनोहर', 'स्त्री', 'प्रतिभा', 'केसरी' अित्यादी नियतकालिकांतून व वृत्तपत्रांतून सामाजिक सुधारणाविषयक बुद्धिवादी नि विज्ञाननिष्ठ लेखन त्यांनी याच काळात केले. हिंदु-संघटनेचे अेक अुपांग म्हणून भाषा व लिपि शुद्धीसाठी त्यांनी जे लेखन केले, तेच पुढे 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' आणि 'नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन' या नावांखाली ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले.

निबंध, अितिहास, नाट्य, कथा-कादंबरी अित्यादी विविध साहित्यप्रकारांत जो हिंदुत्ववाद त्यांना प्रेरक ठरला होता तोच हिंदुत्ववाद त्यांच्या याच काळातील काव्यासही प्रेरक झाला होता. हिंदूंची जाती अेक, देश अेक, धर्म अेक, देव अेक–अशा अेकतेचा प्रचार त्यांनी या वेळी रचलेल्या बहुतेक काव्यांतून केला आहे. 'हिंदूंचे अेकतागान' या कवितेत सावरकर लिहितात–

"तुम्ही आम्ही सकल हिंदू। बंधूबंधू
तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदू ॥

अेकची देश हा अपुल्या । प्रेमाचा
अेकची छंद जीवाच्या । कवनाच्या
अेकची धर्म हा आम्हां । सकलांच्या
ही हिंदुजातिची गंगा आम्ही तिचे सकल बिंदू ।।"[1]

अखिल हिंदू जाती ज्या जातिभेदाने, विटाळवेडाने स्पर्शबंदीने छिन्नविच्छिन्न झाली आहे, तिचा अुद्धार करण्यासाठी त्या परमेश्वराचा–पतितपावनाचा–धावा त्यांनी अेका कवितेत केला आहे.[2] अस्पृश्यता निवारण व मंदिर-प्रवेश या चळवळींच्या प्रचारार्थ त्यांनी 'सुतक युगाचे फिटले', 'संत रोहिदास' आणि 'मला देवाचे दर्शन घेअू द्या' या कविता लिहिल्या. स्वदेशी वस्तूंच्या प्रचारार्थ लिहिलेल्या 'दीपावलीचे लक्ष्मीपूजन' या कवितेतही त्यांनी आवाहन केले आहे ते हिंदु-जातीला. या दृष्टीने 'स्वदेशीचा फटका'(१८९८) या कवितेशी वरील कवितेची तुलना करून पाहिली तर सावरकरांच्या दृष्टिकोनातील फरक लक्षात येअील. त्या फटक्याच्या प्रारंभी 'आर्यबंधु हो, अुठा अुठा' असा पुकारा त्यांनी केला आहे, तर 'दीपावलीचे लक्ष्मी-पूजन' या कवितेत 'अहो, हिंदूंनो' अशी हाक त्यांनी दिली आहे[3] आणि स्वदेशीचा स्वीकार केल्याने 'गजान्तलक्ष्मी, हिंदु हिंदुच्या दारी डोलेल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. हिंदुजातीच्या छळाने तळमळणारे सावरकरांचे हृदय 'जा झुंज' या कवितेत प्रकट झाले आहे. हिंदूंची पराक्रमी व विजयी परंपरा आणि त्या परंपरेला प्राणपणाने अनुसरण्याचा संदेश त्यांनी आपल्या 'अखिल हिंदु-विजय ध्वज गीता'त दिला आहे. 'अखिल हिंदु' हा शब्द (Pan Hinduism) या शब्दाला प्रतिशब्द म्हणून सावरकरांनीच प्रथम योजिला आणि आपल्या लेखांतून आणि काव्यांतून वापरून रूढ केला.[4]

'अैक्य भविष्याला । भव्य भीषणाला' या कवितेतूनही सावरकरांनी हिंदु जातीच्या संघटित सामर्थ्याचे आणि तिच्या भविष्यकालीन वैभवाचे वर्णन केले आहे. ही कविता अेका विशिष्ट प्रसंगाला अनुलक्षून त्यांनी लिहिली होती. अि. स. १९३१ मध्ये नेपाळच्या 'गुरखा संघा'चे अध्यक्ष श्रीमान लेफ्टनंट चंदनसिंह आणि प्रिन्स हेमचंद्रजंग राणा हे रत्नागिरीस आले होते. नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराष्ट्राबद्दल सावरकरांना नेहमीच नितांत आदर वाटत होता. नेपाळबद्दलचा हा आदर सावरकरांनी पुढे हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या बहुतेक भाषणांतूनही व्यक्त केलेला आहे.[5] नेपाळच्या वरील दोन हिंदू पुढाऱ्यांचा सत्कार–समारंभ सावरकरांनी रत्नागिरीत घडवून आणला होता. त्या वेळी भाषण करताना सावरकरांनी पुढील विचार

---

१. सा. क. पृ. १८५. २. सा. क. पृ. २००, २०१, २०२. ३. सा. क. पृ. १८८.
४. र. हिं. पा. व. वृ. पृ. ४४, १०२. ५. हिं. रा. द. पृ. ३, १२७, १६७, २२३.

प्रकट केले होते.: "गुरखा राष्ट्राचे हे सामर्थ्य आपल्या हिंदु-राष्ट्राच्या आकांक्षेची तलवार आहे, संरक्षणाची ढाल आहे. अशा अखिल हिंदु-संघात जर अखिल हिंदू संघटनेविषयी ममत्व अुत्पन्न झाले तर अंतर्क्य काय होणार आहे ?"[1] याच समारंभाच्या वेळी वीस तरुण कुमारिकांनी 'अैक्य भविष्याला । भव्य भीषणाला' हे सावरकरांचे स्फूर्तिमय गीत म्हटले. या गीतात सावरकरांनी पुढे म्हटले आहे :–

"अेक अेकटा जो तो
होअुनि अजि अेकचि तो
वीस कोटी हिंदु जाति हाणिते घणाला ।।"

जगाच्या कानाकोपऱ्यांत होणाऱ्या भूकंपलहरींची नोंद टिपण्याअितकी संवेदनक्षमता वेधशाळेतील भूकंपनोंदणी यंत्रात जशी असते, तशी सावरकरांच्या मनाची स्थिती या काळात झाल्याचे दिसून येते. हिंदु-जगतात घडणारी कोणतीही घटना असो, तिची दखल लगेच सावरकर घेत असत; आणि तीही हिंदुहिताच्या दृष्टिकोनातूनच. त्यामुळे या काळात त्यांनी जे साहित्य लिहिले, त्यात अेकसूत्रीपणा दिसून येतो. 'श्रद्धानंद', 'केसरी', 'किर्लोस्कर' अित्यादी नियतकालिकांतून आपले अनेकविध लेख हे ह्याच दृष्टिकोनातून त्यांनी लिहिले आहेत. सिल्हट जिल्ह्यातील शशिमोहन दे नावाच्या अेका बंगाली नवयुवकाने अेका हिंदु स्त्रीचा सन्मान आणि सतीत्व रक्षणासाठी अेका मुसलमान गुंडास ठार मारल्याचे वृत्त समजताच सावरकरांनी शशिमोहनचा गौरव करण्यासाठी लेख लिहिला.[2] स्वामी श्रद्धानंद यांची हत्या अेका मुसलमान व्यक्तीने केल्याची घटना घडल्यावर सावरकरांनी त्यावर आपले विविध विचार व्यक्त केले. पण त्यांचा मुख्य रोख होता तो शुद्धीकरण व प्रतिशोध घेण्याच्या कल्पनेकडे.[3] सशस्त्र क्रांतिकारकांची भूमिका, त्यांची अुत्कट देशभक्ती व त्यांनी केलेला असीम त्याग सामान्य लोकांना ज्ञात व्हावा म्हणून सावरकरांनी 'बालमुकुंद आणि लज्जावती', 'देशवीर शचीन्द्रनाथ संन्याल', 'वीरमाता क्षीरोदवासिनी', 'भारतवीर श्रीराम राजू', 'देशवीर विष्णु गणेश पिंगळे' अित्यादी अनेक व्यक्तींचा परिचय 'श्रद्धानंद' साप्ताहिकातून करून दिला. तसेच या काळात सावरकर हिंदुसंघटनेचे जे जे प्रत्यक्ष कार्य करीत होते त्या त्या कार्याला ते वाङ्मयीन रूप देत होते. जन्मजात जात्युच्छेदक चळवळीचा संकल्प सोडल्यावर ती चळवळ राष्ट्रभर पसरविण्यास्तव त्यांनी 'केसरी' पत्रास 'जन्मजात जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' ही लेखमाला लिहिली.[4] १९३१च्या अेप्रिलमध्ये सावरकरांनी मराठी सातवीच्या विद्यार्थ्यांपुढे 'सात स्वदेशी बेड्या' या विषयावर

---

१. र. हिं. पा. व. वृ. ९६, ९७, ९८. २. श्रद्धानंद २८–४–२७. ३. श्रद्धानंद १८–१–२७, २८–१–२७. ४. र. हिं. पा. व. वृ. पृ. ५३.

अेक व्याख्यान दिले होते.[१] तेच व्याख्यान पुढे काहीशा विस्ताराने व लेखरूपाने 'जात्युच्छेदक निबंधा'त समाविष्ट करण्यात आले आहे. 'स्वदेशी व बहिष्कार' या विषयावर सावरकरांनी १९३० साली दिलेल्या व्याख्यानामुळे त्या वेळी खूपच खळबळ अुडवून दिली होती. 'चरखा' संप्रदायातील लोकांनी त्या वेळी सर्वत्र यंत्राविरुद्ध हाकाटी सुरू केली होती. 'यंत्राने मनुष्याचा अध:पात झाला' अशी अडाणी ओरड चोहोबाजूस अैकू येत होती. या विचारसरणीविरुद्ध सावरकरांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आणि आपल्या व्याख्यानांतून यंत्राचे महत्त्व पटवून देताना असे सांगितले की, मनुष्याने सृष्टीवर स्थापिलेले भौतिक वर्चस्व म्हणजेच यंत्र. मनुष्यांच्या दुर्बल अवयवांस प्रबलतर आणि अजिंक्यतर करणारी वाढ म्हणजेच यंत्र.[२] सावरकरांची हीच विज्ञाननिष्ठ दृष्टी पुढे त्यांच्या अनेक निबंधांतून दिसून येते. पतितपावन मंदिराची अुभारणी, मूर्तीची स्थापना व मंदिराचे अुद्घाटन यांसंबंधीही सावरकरांनी अनेक लेख विविध वृत्तपत्रांतून लिहिले.[३] अशा रीतीने सावरकरांच्या वृत्तीचा आणि त्यांच्या वाङमयीन कृतीचा अतूट संबंध होता.

स्वमताच्या प्रचारासाठी सावरकरांनी या काळात जशी वाङमयनिर्मिती केली, तशी परमतखंडनासाठीही त्यांना आपली लेखणी परजावी लागली. शस्त्रवाद, हिंसा-अहिंसा, सत्याग्रह, असहयोग, हिंदुमुसलमान अैक्य, स्वराज्य, अित्यादी विषयांवर महात्मा गांधी आणि अितर काँग्रेस पुढारी यांच्या विचारांचा प्रभाव सर्वत्र हळूहळू पसरू लागला होता. या गोंडस तत्त्वज्ञानामुळे राष्ट्राचा तेजोभंग होत आहे याची जाणीव सावरकरांना होत होती.[४] आणि पुढे पुढे तर त्यांच्या असेही अनुभवास आले की, गांधीवादाच्या अेकंदर चळवळींचा परिणाम हिंदूंना अत्यंत घातक झाला असून सैन्यात हिंदूंचे जे प्रमाण होते ते घटत चालले आहे. अितकेच नव्हे तर हिंदु-जातीची सैनिक मनोवृत्ती पुष्कळ अंशी मारली गेली आहे.[५] ही भविष्यकालीन भीती सावरकरांना याच काळात जाणवली होती आणि म्हणून 'गांधी गोंधळ' या नावाखाली प्रसिद्ध झालेले त्यांचे सर्व लेख गांधीवादाच्या खंडनातून लिहिले गेले आहेत. म. गांधींची मुसलमानधार्जिणी मनोवृत्ती, स्वतंत्र हिंदुस्थानचा सम्राट म्हणून निजामाला मान्यता देण्याची त्यांची भूमिका,[६] स्वामी श्रद्धानंद यांच्या मुसलमान मारेकऱ्याला–अबदुल रशिदला – भाअी म्हणून संबोधण्याचा त्यांचा अट्टाहास,[७] मुसलमानी धर्म शांतिप्रधान आहे म्हणून त्यांनी सुरू केलेली हाकाटी,[८] सत्याग्रह व सत्याग्रही यांच्याबद्दलच्या त्यांच्या भ्रामक

---

१. र. हि. पा. व. वृ. ५३. २. र. हि. पा. व. वृ. ४३. ३. र. हि. पा. व. वृ. पृ. ५५. ४. स. सा. वा. खंड ३–पृ. ९५. ५. हिं. रा. द. पृ. १९८. ६. स. सा. वा. खंड ३–पृ. १३६. ७. स. सा. वा खंड ३–पृ. ९६. ८. स. सा. वा. खंड ३–पृ. ९८.

कल्पना,[१] त्यांचा ब्रिटिशांवद्दलचा कैवार[२], मद्रास येथील काँग्रेस अधिवेशनात संमत झालेल्या स्वातंत्र्याच्या ठरावास त्यांनी केलेला विचित्र विरोध[३] अित्यादी कितीतरी बाबतींत म. गांधींशी असलेले मतभेद सावरकरांनी या लेखनातून व्यक्त केले आहेत.

रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात सावरकरांच्या मुक्ततेचे प्रयत्न काही संबंधित व्यक्तींकडून चालूच होते. १९२८ मध्ये मुंबअीस 'बॉम्बे स्टुडंट्स ब्रदरहूड सभेतर्फे सावरकरांच्या मुक्ततेची जाहीर मागणी करण्यात आली. त्या सभेत—श्री. वाय. जे. मेहेरअल्ली, श्री. चोक्सी, सॉलिसिटर वा. गं. खेर, श्री. के. अेफ. नरीमन अित्यादी व्यक्तींनी भाषणे करून सावरकरांच्या मुक्ततेसाठी सरकारला विनंती केली.[४] कौन्सिलमध्ये त्यांच्या सुटकेबद्दल सरकारला प्रश्न विचारण्यात आले. सरकारने त्या वेळचे रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट श्री. डी. सिमिंग्टनने यांच्याकडे सावरकरांच्या अेकूण वर्तणुकीबद्दल विचारणा केली. तेव्हा सावरकरांच्या मुक्ततेबद्दल प्रतिकूल अहवाल सादर करूनही या अहवालात श्री. डी. सिमिंग्टन यांनी लिहिले : "Savarkar had devoted himself to the removal of untouchability and had achieved a certain measure of success and he had successfully admitted the untouchables to the new Patit Pavan Temple."[५] १९३५ मध्ये डॉ. अेम. बी. वेलकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सावरकर मुक्ति समिती', स्थापन करण्यात आली. समितीतर्फे लक्षावधी स्वाक्षऱ्या केलेले अर्ज सरकारकडे धाडण्यात आले. अखेर—खा. ब. धनजीशहा कूपर यांच्या हंगामी मंत्रि-मंडळाला सावरकरांना मुक्त करण्यात यश आले. बॅ. जमनादास मेहेता यांच्याच प्रमुख प्रयत्नामुळे सावरकरांची मुक्तता दि. १० मे १९३७ रोजी करण्यात आली. निर्बंधमुक्त झाल्यावर रत्नागिरी सोडताना सावरकरांनी आपण यापुढेही हिंदु-हिताचाच विचार करणार आहोत असे आग्रहाने सांगितले. (Whatever happened, he would never desert the cause of the Hindus. He would die a Hindu rather than prosper as an anti-Hindu soul.[६]).

निर्बंधमुक्तता

अिसवी सन १९३७ ते १९६६ :

रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून बिनशर्त मुक्तता झाल्यावर सावरकरांनी आपली सारी कर्तृत्वशक्ती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाकडे केंद्रित केली. त्यांच्या

---

१. स. सां. वा. खंड ३ – पृ. १४०, १४२. २. स. सा. वा. खंड ३–पृ. १०१.
३. स. सा. वा. खंड ३ – पृ. ११७. ४. श्रद्धानंद प्र. दि. २०–८–१२९८.
५. Veer Savarkar p. 219–220. ६. Veer Savarkar p. 222.

दा. क्र. १७८६८७

आतापर्यंतच्या जीवनसूत्रास सुसंगत असेच ते कार्य होते. राजकारण आणि साहित्य-कारण यांत ते प्राप्त परिस्थितीच्या संदर्भात नेहमीच श्रेष्ठकनिष्ठ भाव मानीत असत. मुक्ततेनंतर थोडयाच दिवसांत म्हणजे १९३८ च्या एप्रिल महिन्यात मुंबई येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना सावरकरांनी साहित्याचे हे सापेक्ष महत्त्व स्पष्ट केले होते. ते म्हणाले होते : " केवळ यमक वा काव्य वा कादंबरीच नव्हे, तर स्वतः सांगोपांग साहित्य हेही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम-तिय्यम कर्तव्यच वाटत आहे... जर आपले सामूहिक, आपले राष्ट्रीय साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे अेक अुपांगच काय ते असेल, तर राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता, मुख्य साध्य असले पाहिजे."[1] साहित्य-निर्मिती आणि साहित्य-संरक्षण यांसंबंधीचा सावरकरांचा हा परिस्थितिसापेक्ष दृष्टिकोन जसा या व्याख्यानातून व्यक्त झालेला आहे, तसाच तो त्यांनी अन्यत्र दिलेल्या अनेक व्याख्यानांतून वा लेखांतूनही प्रकट झालेला आहे. 'हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीमुळे आपल्याला केवळ प्रचारात्मक स्वरूपाचे साहित्य' कसे लिहावे लागले, याचे विवेचन सावरकरांनी १९३७ साली वडोदे येथील साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून केले होते.[2] १९३७ साली पुणे येथे दिलेल्या अेका व्याख्यानातही वेळ कोणती आहे हे पाहून नाटक, कादंबरी अित्यादी साहित्याचा आस्वाद घ्यावा हा विचार सावरकरांनी सांगितला होता आणि तो विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी पुढील दृष्टान्तही दिला होता–'आअी आजारी असेल तर त्या वेळी गच्चीवरून तारे व ग्रह पाहात राहणारा मुलगा मातृद्रोही ठरेल.'[3] साहित्यापेक्षाही राष्ट्राची शस्त्रसिद्धता अधिक महत्त्वाची ही सावरकरांची भूमिका नगर येथील अेका व्याख्यानातून (१९३८) पुन्हा प्रकट झाली होती. 'प्रबलांचाच जगात विजय होतो' आणि 'जगाच्या बाजारात आज तरी कवितेपेक्षा तरवारीला मान आहे' हे आपले आवडते सिद्धान्त स्पष्ट करताना या व्याख्यानातच सावरकरांनी सांगितले होते– " अेक वेळ आमच्या तरुण लोकांत लेखक, कवी नसले तरी चालतील, वाङ्मया-वर व्याख्याने न झाली तरी चालतील, पण आमची लढाअू वृत्ती फिरून फोफावलीच पाहिजे. नाटकगृहे किंवा बोलपटगृहे यांची आज आम्हांला अेवढी जरूरी नाही. पण रायफल क्लब सगळीकडे स्थापन व्हायलाच पाहिजेत. त्याही गोष्टी आम्हांला नको आहेत असे नाही, त्याही हव्याच आहेत. पण प्रथम हे आणि नंतर अितर सर्व."[4]

साहित्य आणि शस्त्र यांचा संबंध किती निकटचा आहे हे नाशिक येथील व्याख्यानात सांगताना सावरकर म्हणाले, " देश पारतंत्र्यात असताना कसल्या कविता

---

१. स. सा. खंड ४–पृ. ४८५. २. स. सा. खंड ४–पृ. ४३६. ३. स. सा. वा. खंड ४–पृ. ३५९. ४. स. सा. वा. खंड ४–पृ. ४३१..

करता ? . . . . . मी म्हणतो की काही काळ लेखण्या मोडून टाका आणि बंदुका हातांत घ्या. जिवंत साहित्य निर्माण व्हावे म्हणून आपण आपल्या हाती बंदूक घ्या . . . . . भोवतालच्या परिस्थितीचा आधी विचार करा.''[1]

स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यात साहित्याचा क्रम सावरकरांनी असा दुय्यम लावल्याने साहजिकच १९३७ नंतरच्या कालखंडात सावरकरांच्या हातून विपुल साहित्य-निर्मिती होअू शकली नाही. या सुमारे सत्तावीस वर्षांच्या काळात सावरकरांचे प्रमुख असे चार ग्रंथ प्रसिद्ध झाले. १० मे १९४९ रोजी 'माझ्या आठवणी' हा त्यांचा आत्मचरित्रपर ग्रंथ प्रसिद्धीच्या प्रकाशात आला. वीस वर्षांपूर्वी या ग्रंथाची काही प्रकरणे 'श्रद्धानंद' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली होती. परंतु सरकारी वक्रदृष्टीमुळे पुढील प्रकरणे गुप्ततेच्या भुयारात दडवून ठेवण्यात आली होती. 'भारताच्या अितिहासातील सहा सोनेरी पाने' या त्यांच्या प्रबंधाचा पहिला भाग १० मे १९५६ रोजी प्रथम प्रकाशित करण्यात आला आणि याच प्रबंधाचा दुसरा भाग १९६३ साली प्रसिद्ध झाला. १९५७ साली 'पूर्वपीठिका' या नावाने सावरकरांनी आत्मवृत्ताचा अेक खंड प्रसिद्ध केला. पुढे १९६५ साली 'शत्रूच्या शिबिरात' हा त्यांचा आणखी अेक आत्मवृत्तपर खंड प्रकाशित झाला. 'पूर्वपीठिके'त लेखकाने स्वतः भारतीय राजकारणात पदार्पण करण्याच्या वेळी असलेल्या राजकीय परिस्थितीची मीमांसा केली आहे. 'माझ्या आठवणी' या भगूर व नाशिक येथील सावरकरांच्या वास्तव्यातील घटनांनी रंगलेल्या आहेत. 'शत्रूच्या शिबिरा'तील कालखंड हा सावरकरांचा अिंग्लंडमधील निवास आणि तेथील त्यांच्या राजकीय चळवळी नि वाचन-लेखन यांच्या वर्णनाने भरलेला आहे. बुद्धकाळाच्या आरंभापासून तो आंग्लाअीच्या अखेरीपर्यंत भारताच्या पराक्रमी पिढीने ज्या हेतूने परकीयांची आक्रमणे परतवून लाविली आणि भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्याचे पुनरुज्जीवन केले, त्या पराक्रमाचा, त्यामागील हेतूंच्या स्पष्टीकरणाचा नि स्वातंत्र्य-युद्धाचा अितिहास 'सहा सोनेरी पानां'तून सावरकरांनी लिहिलेला आहे. या ग्रंथांशिवाय या कालखंडात सावरकरांनी काही गद्य व पद्य स्फुटलेखन केले. पण संख्येने तेही मोजकेच असल्याने त्याचा तपशील देण्याची येथे आवश्यकता नाही.

राष्ट्रीय जीवनात साहित्याचे स्थान हे परिस्थितिसापेक्ष मानल्याने सावरकरांच्या हातून विपुल साहित्य-निर्मिती झाली नाही हे आपण पाहिले. पण अनेक कारणांपैकी हे अेक कारण होय. दुसरेही कारण तितकेच वलवत्तर आहे. ते म्हणजे सावरकरांचे धकाधकीचे, झंझावाती नि गतिमान असे राजकीय जीवन होय. या कालखंडातील त्यांच्या गतिमान राजकीय जीवनातील काही प्रमुख टप्पे जरी आपण पाहिले तरी त्याची कल्पना येअू शकेल.

---

१. प्रदक्षिणा पृ. २१६–२१७.

१९३७ च्या मे महिन्याच्या दहा दिनांकाला सावरकरांवरील सर्व निर्बंध निघाले आणि १ ऑगस्ट १९३७ रोजी लो. टिळक यांच्या लोकशाही स्वराज्यपक्षात स्वत: समाविष्ट झाल्याची घोषणा सावरकरांनी केली. लवकरच ते हिंदुमहासभेस मिळाले आणि भारताचे निर्भेळ राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी हिंदुमहासभेची झुंझार संघटना अुभी करण्याच्या अुद्योगाला ते लागले. १९३७ साली अहमदावाद येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून ते प्रथम निवडले गेले आणि मग पुढे नागपूर (१९३८), कलकत्ता (१९३९), मदुरा(१९४०) भागलपूर (१९४१), कानपूर (१९४२), आणि अमृतसर (१९४३) येथे भरलेल्या अ. भा. हिंदुमहासभेच्या अधिवेशनांचे अध्यक्षस्थान क्रमश: सात वर्षे भूषविण्याचा मान त्यांना मिळाला. हिंदुसभेच्या ध्येयधोरणाच्या प्रचारासाठी सावरकरांनी झंझावाती दौरे काढले आणि जम्मू-काश्मीरपासून मद्रास-त्रावणकोरपर्यंत नि सिंध प्रांतापासून तो आसाम प्रांतापर्यंत त्यांनी सर्व भारतभर संचार केला. आपल्या ध्येयाच्या पूर्त्यर्थ काही चळवळी हाती घेतल्या, लढे लढविले आणि तुफानी मतप्रचार केला. १९३८ च्या ऑक्टोवरमध्ये निजाम संस्थानातील हिंदूंच्या न्याय्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी सुरू झालेल्या नि:शस्त्र प्रतिकारयुक्त लढ्याचे मार्गदर्शन करण्यात फार मोठा वाटा सावरकरांचा होता आणि हिंदुसभेच्या वतीने तो लढा त्यांनी मर्यादित यशप्राप्तीपर्यंत लढविला. भारतात अनेक गावी सहभोजने घडवून आणून अस्पृश्यता व जातिविद्वेष दूर करण्याचा सावरकरांनी निकडीने प्रयत्न केला.[1] बडोदे साहित्य संमेलन, मध्य-प्रांतीय संमेलन, महाराष्ट्र साहित्य संमेलन अित्यादी संमेलनांच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनी राष्ट्रभाषा, लिपिशुद्धी आणि भाषाशुद्धी या आपल्या चळवळींचा हिरीरीने पाठपुरावा केला. १९३७च्या ऑगस्टपासून सैनिकी शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य त्यांनी हाती घेतले आणि अंगात त्राण असेपर्यंत त्यांनी त्या कार्याचा प्रचार केला. पाकिस्तानची निर्मिती हा सावरकरांच्या जीवनाला लागलेला अेक शोष होता. १९३७च्या डिसेंवरमध्ये अहमदावाद येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात सावरकरांनी संभाव्य पाकिस्तान निर्मितीबद्दल हिंदूंना धोक्याचा अिशारा दिला होता;[2] आणि त्यानंतर हिंदुमहासभेच्या पुढील सर्व अधिवेशनांच्या अध्यक्षपदावरून बोलताना सावरकरांच्या विचारांचे मुख्य केंद्र पाकिस्तानविरोध हेच होते. पाकिस्तान-विरोधासाठी हिंदूंची भरभक्कम आघाडी अुघडण्याचे त्यांनी जिवापाड प्रयत्न केले. म. गांधी, राजाजी व वॅ. जीना यांच्या पाकिस्ताननिर्मितीबावतच्या हालचालींचा अनेक युक्तिवाद करून, पत्रके काढून, व्याख्याने देअून सावरकरांनी कडाडून निषेध केला.[3] १९४४मध्ये त्यांनी 'युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका' या वृत्तसंस्थेला तार

---

१. Savarkar and his Times p. 222. २. हि. रा. द. पृ. ३०–३१.
३. Savarkar & His Times p. 322, 23, 24, 25.

पाठवून आपल्या पाकिस्तानविरोधी मतांना जागतिक प्रसिद्धी दिली.[१] १९४४ च्या ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी त्यांनी दिल्लीस 'अखंड हिंदुस्थान परिषद' घडवून आणली. १९४५चा पहिला आठवडा सर्व भारतभर 'पाकिस्तान निषेधसप्ताह' म्हणून पाळण्याचा आदेश त्यांनी दिला.[२] ८ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्ताविरोधी निकराचा व अखेरचा प्रयत्न करण्यासाठी सावरकरांनी दिल्लीला अेक हिंदु परिषद बोलाविली आणि अखंड हिंदुस्थानचा लढा सतत चालू ठेवण्याचे आवाहन त्यांनी त्या परिषदेद्वारा सर्व हिंदूंना केले.[३] पण परिस्थितीच्या अेकूण कोलाहलात सावरकरांचा आवाज फारच क्षीण ठरला. पाकिस्तानची निर्मिती सावरकरांना स्वतःच्या डोळ्यांना पाहावी लागली. 'Government of Pakistan' हे शब्द त्यांना आकाशवाणीवरून व्यथित मनाने अैकावे लागले आणि भारताच्या स्वातंत्र्यदिनी—१५ ऑगस्ट १९४७ रोजी—सर्व वस्तुस्थिती मान्य करून सावरकरांनी आपल्या घरावर तिरंगी ध्वज फडकाविला. पण त्याचवरोबर अखंड हिंदुस्थानचे प्रतीक असलेला कृपाण कुंडलिनीयुक्त भगवा ध्वज फडकविण्यासही ते विसरले नाहीत. शरमुख लक्ष्याकडेच रोखलेले होते पण परिस्थितीमुळे धनुष्याच्या प्रत्यंचेचा ताण सैल पडला होता.

३० जानेवारी १९४८ रोजी झालेला म. गांधींचा खून सावरकरांच्या राजकीय जीवनाचा वळी घेण्यास कारणीभूत झाला. गांधी खून खटल्यातील अेक आरोपी म्हणून अेक वर्षापेक्षा अधिक काळ सावरकर कारागृहात होते. या खटल्यातून त्यांची निष्कलंक मुक्तता झाली खरी, पण त्या खटल्याच्या कलुषित छायेने त्यांचे पुढील जीवन मात्र काळवंडले. तथापि त्यांची कर्मतृष्णा शमलेली नव्हती. १९४९च्या डिसेंबरमध्ये कलकत्ता येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनास अुद्घाटक म्हणून ते अुपस्थित होते. देशातील विविध घडामोडींकडे त्यांचे सतत लक्ष होते. घटना-समितीला तार पाठवून देशाचे नाव, भाषा व लिपी यांसंबंधी आपले अभिमत सावरकर व्यक्त करीत होते. प्रजासत्ताक भारताचे स्वागत करीत होते. देशाच्या सीमासंरक्षणाबद्दल कोणते धोरण असावे, याबद्दल सल्ला देत होते. परंतु ४ अेप्रिल १९५० रोजी त्यांना स्थानबद्धतेच्या आपत्तीला पुन्हा तोंड द्यावे लागले. पं. नेहरू—लियाकतअल्ली यांच्या दिल्ली येथील वाटाघाटीच्या वेळी सुरक्षिततेसाठी सावरकरांना अटक करण्यात आली. तीन महिन्यांनंतर त्यांची सशर्त मुक्तता झाली. याच वेळी राजकारणातून निवृत्त होण्याचा आपला मनोदय सावरकरांनी जाहीर केला. सरकारनेही राजकारणात भाग न घेण्याचे कालमर्यादित निर्बंध सावरकरांवर घातले. राजकीय कार्याचे हे

---

१. Savarkar & His Times p. 324. २. Savarkar & His Times 334. ३. Savarkar and His Times – p. 356.

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
क्रमांक ... . दि: .....
अनुक्रमांक ..... नों. दि: .....

प्रथम कर्तव्यक्षेत्र बंद होताच सावरकर साहित्याकडे वळले; व पंचांग-सुधारणे-संबधीचे आपले विचार लेखद्वारे त्यांनी प्रकट केले.[1]

१० मे १९५२ रोजी सावरकरांनी स्वतः स्थापिलेल्या 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतिकारी संस्थेचे जाहीररीत्या विसर्जन केले. हा 'अभिनव भारत सांगता समारंभ' पुण्यास अेकूण तीन दिवस साजरा करण्यात आला. या समारंभात १८५७ ते १९४७पर्यंतच्या काळातील दिवंगत भारतीय हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पुढील वर्षी नाशिक येथे भारतीय क्रांतिकारकांच्या स्मारकाचे उद्घाटन सावरकरांनी केले. स्मारकाच्या निधीसाठी त्यांनी भारतीय अितिहासावर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. याच वर्षी पुण्याच्या अेका व्याख्यानात 'धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर' हा खळबळजनक विचार त्यांनी सविस्तरपणे चर्चिला,[2] भारताविरुद्ध होणाऱ्या चीनच्या संभाव्य आक्रमणाचा अिशारा त्यांनी १९५४ मध्येच दिला होता.[3] शुद्धि-संघटनेचे केंद्र बनलेल्या रत्नागिरीला त्यांनी १९५५च्या फेब्रुवारीत भेट दिली. सामाजिक क्रांती व राजकीय क्रांती ही परस्परांना कशी पूरक आहे, याचे मार्मिक विवेचन रत्नागिरीच्या भाषणात सावरकरांनी केले. १९५६मध्ये पुण्याला लो. टिळक जन्मशताब्दीनिमित्त बोलताना सावरकर समाधानी वृत्तीने म्हणाले होते, "अितिहासाच्या अेका सोनेरी पानावर आज आम्ही अुभे आहोत. पुण्यमित्रानंतर अेवढा मोठा भूप्रदेश अेका सत्तेखाली यापूर्वी कधीच आला नव्हता."[4] १८५७ च्या स्वातंत्र्य-समराची शताब्दी पाहण्याचे भाग्यही १९५७ साली सावरकरांना लाभले. या शत-सांवत्सरिक अुत्सवासाठी ते मुद्दाम दिल्लीस गेले. तेथील जनसमुदायापुढे बोलताना त्यांनी आत्मरक्षणासाठी आणि आत्मविकासासाठी शस्त्रबळाची अुपासना करण्या-विषयीचे आपले मत पुन्हा आग्रहाने प्रतिपादिले.

२८ मे १९५८ रोजी सावरकरांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली. ह्या निमित्ताने त्यांचे मुंबअी व पुणे येथे जाहीर सत्काराचे कार्यक्रम झाले. भारत रशियाअेवढा बलिष्ठ व्हावा, अखंड हिंदुस्थान पुनरपि प्रस्थापित करण्याचे विजिगीषू ध्येय पुढच्या पिढ्यांनी डोळ्यांपुढे ठेवावे, अित्यादी प्रमुख मुद्द्यांवरच सावरकरांनी या प्रसंगी दिलेल्या व्याख्यानांतून भर दिला होता. २४ डिसेंबर १९६० हा सावरकरांचा मुक्तता दिन, म्हणजेच मृत्युंजय-दिन म्हणून त्यांच्या अनुयायांनी पाळला व सावरकरांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी ठिकठिकाणी सभा घेण्यात आल्या. या मृत्युंजय-दिनानिमित्त १५ जानेवारी १९६१ रोजी पुण्यात सावरकरांचा भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी केलेल्या भाषणात कृतकृत्यतेचे समाधान त्यांच्या शब्दांतून व्यक्त होत होते, सध्याच्या

---

१ केसरी १३-५-५१ व २०-५-५१. २. केसरी १३-१२-'१३. ३. केसरी २६-१-५४. ४. केसरी-जुलै, १९५६.

पराक्रमी पिढीबद्दलचा सार्थ अभिमान प्रकटत होता आणि अद्ययावत शस्त्रास्त्रांनी भारत समर्थ व्हावा अशी प्रबल आशा त्यांतून अुफाळून वर येत होती.

१९६२ मध्ये चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाने सावरकर अत्यंत व्यथित झाले होते. १९६३ मध्ये त्यांच्या मांडीचे हाड मोडल्याने त्यांना सुमारे महिनाभर रुग्णालयात ठेवण्यात आले होते. नोव्हेंबर १९६३ मध्ये त्यांच्या पत्नी माअी दिवंगत झाल्या. १९६५ मध्ये सावरकरांचा आजार वळावला. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यामार्फत सावरकरांच्या प्रकृतीची दूरध्वनीवरून चौकशी केली आणि काश्मीरमधील दैनंदिन घटनांकडे सावरकरांचे लक्ष वेधण्यात आले किंवा नाही यावावतही विचारणा केली. ६ सप्टेंबर १९६५ रोजी भारताने पाकिस्तानवर प्रतिहल्ला करून युद्ध शत्रूच्या प्रदेशात नेल्यावद्दल सावरकरांना अतिशय आनंद झाला व भारत सरकारचे आणि संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांनी तो आनंद व्यक्त केला.

रुग्ण व विकलांग अवस्थेत सावरकर घरी असताना त्यांना अखेरी अखेरी सरकारकडून पोषणद्रव्य मिळू लागले. १९६६ च्या डिसेंवर महिन्याच्या 'सह्याद्री' या मासिकाच्या अंकात 'आत्महत्या की आत्मार्पण' हा लेख सावरकरांनी लिहून आपल्या निग्रही निर्याणाची मानसिक तयारी केली. ३ फेब्रुवारीपासून त्यांनी प्राणभक्षक प्रायोपवेशनाला प्रारंभ केला आणि २६ फेब्रुवारी १९६६ रोजी जिवंत समाधी घेअून त्यांचा पार्थिव देह काळाच्या जवनिकेत अंतर्धान पावला.

कृतार्थ जीवन :

अि. स. १९३७ नंतरच्या सावरकरांच्या जीवनावर धावता दृष्टिक्षेप टाकला तरीही त्यातील गतिमानता ध्यानी येते. राजकारणातील दैनंदिन धकाधकी, देशव्यापक दौरे, पाकिस्तानच्या संभाव्य निर्मितीविरुद्ध हिंदूंची भरभक्कम संघटना अुभी करण्यासाठी निकडीची धावपळ, दुसरे महायुद्ध व त्यामुळे भारताची स्वातंत्र्याच्या दिशेने पडणारी वेगवान पाअुले, मधून मधून अुद्भवणारी स्वत:च्या शरीरातील व्याधी, पूर्ववयातील अतोनात शारीरिक कष्टामुळे आणि वृद्धत्वामुळे विकलांग झालेला देह आणि या सर्वांपेक्षा साहित्याकडे परिस्थितिसापेक्ष पाहण्याची दृष्टी– यांमुळे अुत्तरायुष्यात सावरकरांच्या हातून नवीन व विपुल साहित्यनिर्मिती होअू शकली नाही.

या कालखंडात जीवनाच्या विविध क्षेत्रांत मिळालेली लौकिक मान्यता पाहून स्वत: सावरकरांनीही समाधानाचे अुद्गार काढले आहेत. अि. स. १९४५ साली मृत्युशय्येवर पडलेल्या आपल्या वरिष्ठ वंधूंना – श्री. वावाराव यांना – पाठविलेल्या

पत्रात सावरकरांनी लिहिले होते : " भारताच्या अितिहासातील अेक अध्याय सुवर्णाक्षरांनी नोंदला गेलाच पाहिजे. ' सावरकर-युग ' शत्रूंनी तो शब्द रुढविला आहे . . . सापेक्षत: बोलावयाचे तर दोन वेळां अुभ्या राष्ट्राचा जीवनप्रवाह प्रतिकूलाकडून अनुकूलाकडे आपण आपल्या सहकाऱ्यांसह अुलटवून दिला आहे. . . . . आपण दोन वेळा राष्ट्राची विचारक्रांती व आचारक्रांती घडवून आणली आहे."[१] अि. स. १९६१ मध्ये मृत्युंजय-दिनाच्या वेळी करण्यात आलेल्या भव्य सत्कारानंतर अुत्तरादाखल केलेल्या भाषणातही सावरकरांची हीच समाधानी वृत्ती होती. हे समाधान व्यक्त करताना सावरकर म्हणाले, " तुम्ही लाखो लोक न बोलाविता येता. . . . (मी) कुणाशी बोलत नाही तरीही आठ-आठशे माणसं ' दर्शन झालंच पाहिजे ' ' दर्शन झालंच पाहिजे ' अशी तासन् तास निदर्शनं करतात माझ्या घरासमोर– हे काय विजयाचं चिन्ह नाही ? हा काय राजमुकुट नाही ? यापेक्षा अधिक काय मिळायचं आहे मनुष्याला ? "[२]

राजकीय क्षेत्रातील सावरकरांचे मोठेपण परकीय राजकारणी आणि स्वकीय नेते यांनी मोकळेपणाने मान्य केले आहे. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लिन्लिथगो यांनी सावरकरांना मुलाखतीस बोलाविले होते. त्या वेळी सावरकरांसंबंधीचा आपला अभिप्राय " The only politician who could ably discuss the war situation from the Indian view-point and its major issues in the context of inter-national politics. "[३] अशा शब्दांत व्यक्त केला होता. सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांच्याशी सावरकरांनी वाटाघाटी केल्यानंतर नॅशनल हेरल्ड या वृत्तपत्राने सावरकरांसंबंधी म्हटले होते :

" Profoundly as we disagree with Savarkar's policies, we freely admit that he is one of the few men of our age who had made history and contributed to re-awakening of our people. With Sir Strafford Cripps he crossed swords which the former will never forget. "[४]

नेमस्त पुढाऱ्यांपैकी सर तेजबहाद्दूर सप्रू, डॉ. जयकर आणि श्रीनिवास शास्त्री यांनी सावरकरांबद्दल गौरवपर अुद्गार विविध प्रसंगी काढलेले आहेत.[५] सुभाषचंद्र बोस यांनी सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या मुत्सद्देगिरीची कृतज्ञतापूर्वक महती गाअिली आहे.[६] पं. नेहरू यांनी सावरकरांचा गौरव करताना ' a brave man, a hero, a great man ' अशी वेचक शब्दयोजना केली आहे.[७] सावरकर हे

---

१ क्रांतिवीर वाबाराव सावरकर पृ. ४२३. २. स. सा. वा. खंड ८ पृ. ५०८-५०९. ३. Savarkar and His Times p. 214. ४. Savarkar & His Times p. 277. ५. स. सा. वा. खंड ८–पृ. ४७५. ६. Veer Savarkar p. 500 ७. Veer Savarkar p. 548.

राजगोपालचारींना लक्ष वेधून घेणारे पहिले क्रांतिकारक दैवत वाटत होते.[१] 'a great figure of contemporary India" अशी सावरकरांची थोरवी पंतप्रधान श्रीमती अिंदिरा गांधी यांनी सांगितली आहे.[२] सावरकर हे स्वातंत्र्याचे 'Steady & Sturdy worker' होते अशी डॉक्टर राधाकृष्णन यांची सावकरां-संबंधीची भावना आहे.[३] 'राष्ट्रीयता, शौर्य व सामाजिक अेकता यांचे अपूर्व मिश्रण सावरकरांच्या ठायी होते अशी आदरांजली ना. यशवंतराव चव्हाण यांनी वाहिली आहे.[४] ना. अेम. सी. छगला हे सावरकरांकडे अेक थोर राष्ट्रभक्त (a great patriot) म्हणून पाहतात.[५]

सावरकरांच्या या गौरवगीतात अनेक भारतीय नेत्यांनी आपापले सूर मिसळले आहेत. त्यांतील लोकनायक अणे, डॉ. सर. सी. पी. रामस्वामी अय्यर, ना. गुलझारी-लाल नंदा, ना. सत्यनारायग सिन्हा, श्री. ह. वि. पाटसकर, डॉ. राम मनोहर लोहिया, श्री. मा. स. गोळवलकर, प्रा. हिरेन मुखर्जी, कॉम्रेड अेस. अे. डांगे, श्री. स. का. पाटील, श्री. न. वि. गाडगीळ, सरदार हुकूमसिंग, अित्यादी व्यक्तींच्या नामोल्लेखावरून सावरकरांची राजकीय क्षेत्रातील मान्यता ध्यानी येते.

याच काळात शैक्षणिक व वाङमयीन क्षेत्रात सावरकरांचा वहुमान करण्यात आला. १९४३ मध्ये नागपूर विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही पदवी अर्पण केली.[६] १९५९ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पदवीदान-समारंभात पुणे विद्यापीठातर्फे सावरकरांना डी. लिट. पदवी वहाल करण्यात आली.[७] मुंवअी विद्यापीठाने डी. लिट्. ची पदवी जरी दिली नाही, तरी अेकोणीसशे अकरा साली रद्द करण्यात आलेली वी. अे.ची पदवी विद्यापीठाने सावरकरांना पुन्हा दिली.[८] १९३८ मध्ये मुंवअी येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान सावरकरांनी भूषविले होते. याच सुमारास पुणे येथील गोखले हॉलमध्ये सर्व महाराष्ट्रीय साहि-त्यिकांच्या वतीने सावरकरांचा सत्कार करण्यात आला. यापूर्वी वडोदे (१९३७) आणि नागपूर (१९३७) येथील विभागीय साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी सावरकरांची निवड करण्यात आली होती. १९४३ साली सांगली येथे साजरा करण्यात आलेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवप्रसंगी अध्यक्षपदाचा मान सावरकरांना देण्यात आला होता.

---

१. Veer Savarkar p. 548. २. Veer Savarkar p. 548. ३. Veer Savarkar p. 548. ४. Veer Savarkar p. 549. ५. Veer Savarkar p. 549. ६. Savarkar and his Times p. 312. ७. Veer Savarkar p. 515. ८. Veer Savarkar p. 517.

जागतिक प्रसिद्धीच्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, प्राध्यापक, जागतिक कीर्तीच्या राजकारणी नेत्यांचे खास चिटणीस, अन्य देशोदेशींचे मंत्री अित्यादींनी सावरकरांची भेट घेअून त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. यामुळे सावरकरांचे जागतिक राजकारणातील स्थानही अुंचावले. भारताच्या भावी घटनेसंबंधी माहिती गोळा करण्यासाठी भारतात आलेले मि. हडसन १९४१ मध्ये सावरकरांना भेटले होते.[१] भारताच्या राजकीय घटनेचा अभ्यास करण्यासाठी प्रा. रेजिनॉल्ड कूपलंड यांनी १९४२ मध्ये भारताला भेट दिली होती. या संदर्भात ते सावरकरांना भेटले होते.[२] याशिवाय 'नॉर्थ अमेरिकन न्यूज पेपर्स अलायन्स 'चे मि. टी. अे. रामन, 'न्यूयॉर्क टाअीम्स 'चे मि. जॉन, अेच. मगरूडकर, लंडनच्या 'स्पेक्टेटर 'चे सर अिव्हलिन रेच या विविध वृत्तपत्रप्रतिनिधींनी सावरकरांच्या मुलाखती घेअून, महायुद्ध व पाकिस्तान यासंबंधी सावरकरांची मते समजावून घेतली होती.[३] १९४२ च्या मे महिन्यात अमेरिकन वकिलातीतील अेक अधिकारी जॉन पॅटन डेव्हिन यांनी सावरकरांची भेट घेअून हिंदु-महासभेच्या वाढत्या प्रभावाबद्दल अमेरिकन वृत्तपत्रे व जनता यांना झालेल्या जाणिवेची त्यांना कल्पना दिली.[४] प्रसिद्ध वृत्तपत्रप्रतिनिधी व लेखक लुअी फिशर यांनी या सुमारास सावरकरांशी पाकिस्ताननिर्मितीसंबंधी चर्चा केली.[५] वी. बी. सी.चे लंडनमधील प्रतिनिधी मि. अेल्. व्रॅण्डर हे १९४२ मध्येच सावरकरांना भेटले होते.[६] अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांचे खास वकील मि. वुअिल्यम फिलिप्स यांनी १९४३ मध्ये सावरकरांची भेट घेतली होती आणि अमेरिका व भारत यांच्या भविष्यकालीन संबंधावाबत चर्चा केली होती.[७] १९४४ मध्ये प्रेसिडेंट रुझवेल्ट यांचे खास वकील मि. लॅम्टन वेरी यांनी सावरकरांची पुन्हा भेट घेतली आणि मागीलप्रमाणेच अमेरिका-भारत संबंधात दोघांची बोलणी झाली.[८] मॉरिशसचे अेक मंत्री श्री. सुखदेव विष्णू दयाळ यांनी १९६५ मध्ये सावरकरांना भेटून चर्चा केली होती.[९]

सावरकरांच्या लौकिक जीवनात त्यांना समाधान वाटेल असे यश मिळाल्याचे दिसून येते. वयाच्या पंधराव्या वर्षी स्वातंत्र्याप्रीत्यर्थ घेतलेली प्रतिज्ञा परिपूर्ण झाल्याचे त्यांनी पाहिले. " मी माझ्यापुरते तरी अगदी मन:पूर्वक सांगतो की, आम्ही आमची मातृभूमी स्वतंत्र झालेली 'ह्याचि देही ह्याचि डोळा 'पाहिली, ह्यातच आम्ही स्वत:स

---

१. Savarkar and His Times p. 273. २. Savarkar and His Times p. 273. ३. Savarkar and His Times p. 273. ४. Savarkar and His Times p. 286. ५. Savarkar and His Times p. 286. ६. Savarkar and His Times p. 287. ७. Savarkar and His Times p. 308. ८. Savarkar and His Times p. 321. ९. Savarkar and His Times p. 534.

कल्पनेहून कृतार्थ झालो असे समजतो," असे अुद्‌गार स्वतः सावरकरांनी काढले आहेत.[१] आपले आयुष्य ही दुःखान्तिका कशी नाही हे स्पष्ट करताना सावरकर म्हणाले होते : " लोकांना असे वाटते; मला मुळीच तसे वाटत नाही. मी माझे कर्तव्य केल्याचे समाधान मला मिळालेले आहे."[२] परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांना जे कारावास भोगावे लागले, त्यामुळे त्यांना अधिक मनस्ताप भोगावा लागला आणि हे शल्य मात्र त्यांच्या मनात राहिल्याचे दिसून येते.[३]

जीवनाचे मुख्य सूत्र – हिंदुत्वनिष्ठा :

१९३७ साली स्थानबद्धतेतून मुक्तता झाल्यानंतर सावरकरांची मनोभूमिका पाहिली तर ती विशिष्ट ध्येयाने, श्रद्धांनी, आकांक्षांनी, मतांनी सिद्ध झाल्याचे दिसून येते. या दृष्टीने पाहिले तर त्यांच्या मूळच्याच निष्ठा वा श्रद्धा अधिक दृढ झाल्या होत्या किंवा अधिक तीव्र झाल्या होत्या हे ध्यानी येते. ' मी बदललो नाही, पूर्वीचाच आहे ' ही त्यांनी १९३७ साली केलेली घोषणा त्यांच्या मूळच्या श्रद्धांचा पक्केपणाच दाखविते.[४] ' १९०८ चे सावरकर व आजचे सावरकर अेक नाहीत ' या आक्षेपाला अुत्तरही त्यांनी याच भूमिकेतून दिले होते.[५] त्यांच्या सर्व निष्ठांत हिंदुत्वनिष्ठा ही सर्वांत प्रबळ अशी निष्ठा होती. या हिंदुत्वनिष्ठेच्या प्रचारासाठी प्रसंगी ते विवेक-निष्ठा व विज्ञाननिष्ठा यांनाही दुय्यम स्थान देत. परमेश्वराच्या अस्तित्वावर सावरकरांची यत्किंचितही श्रद्धा नव्हती. तथापि हिंदुराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचाच ध्यास लागलेले सावरकर कानपूरच्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हणाले होते : " आतापर्यंतच्या हिंदू अितिहासात आढळले त्याचप्रमाणे याही वेळी अेखादा अवतार होअून हिंदूंचे पुनरुत्थान करील व सर्व अहिंदू सामर्थ्यांशी टक्कर देअून हिंदू परत आपल्या पूर्ववैभवाची प्राप्ती करून घेतील असा संभव फार आहे."[६]

हीच हिंदुत्वनिष्ठा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपले राजकारण, वाङ्मयकारण, समाजकारण, अर्थकारण, पक्षस्वीकार अित्यादी गोष्टी केल्या. ' हिंदू हा या राष्ट्राचा पाया आहे ' हे तत्त्व सर्व क्षेत्रांत त्यांनी मूलभूत मानिले.[७] ' हिंदू हाच या देशाचा पाया आहे. तो संघटित झाला तर देशाला स्वातंत्र्य मिळेल ' हे त्यांच्या विचाराचे मुख्य सूत्र होते.[८] हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता हिंदूच झटले.[९] ' अंदमानात गेलेले सर्व हिंदूच होते ', ' हिंदुस्थानच्या अुद्धारार्थ आत्मार्पण हिंदूंनीच केले '[१०] असे त्यांचे ठाम

---

१. स. सा. वा. खंड ८–पृ. ४३२. २. सा. द. पृ. २७३. ३. स. सा. वा. खंड ८–पृ. ४८५. ४. स. सा. वा. खंड ४–पृ. ३२६. ५. प्रदक्षिणा पृ. २२० ६. हि रा. द. पृ. २८४ ७. स. सा. वा. खंड ४–पृ. ३७०. ८. स. सा. वा. खंड ४–३५५ ९. स. सा. वा. खंड ४–पृ. ३५५. १० स. सा. वा. खंड ४–पृ ३५५.

मत होते. ज्या अेका तत्त्वाच्या अधिष्ठानावर हिंदूंनी हे कष्ट घेतले त्या हिंदुत्वाच्या तत्त्वाची मीमांसा सावरकरांनी या काळात वारंवार केली. कर्णावती (१९३८) येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी 'हिंदू', 'हिंदुधर्म' 'हिंदुत्व' या शब्दांच्या अर्थाचे स्पष्टीकरण केले.[1] आपल्या 'हिंदुत्व' ग्रंथातीलच विचार त्यांनी या वेळी पुनरुक्त केले होते. अितकेच नव्हे तर "ज्या कोणाला यापेक्षा अधिक सांगोपांग व परिपूर्ण असे या विषयाचे विवेचन पाहिजे असेल त्यांनी माझे 'हिंदुत्व' हे पुस्तक वाचावे" अशी सूचनाही त्यांनी केली होती.[2] 'हिंदुस्थानात हिंदू हेच स्वयमेव राष्ट्र आहे' हा सिद्धान्त त्यांच्या सर्व विवेचनाचा पायाच होता.[3] या हिंदुत्वनिष्ठेने त्यांचा मनोगंड अितका ताठर केला होता की, 'जीव गेला तरी मी हिंदूंचा पक्ष सोडणार नाही' असा अभिनिवेशाचा पीळ त्याला आला होता.[4] हिंदूंचा पक्ष म्हणून त्यांना प्रथम लोकमान्य टिळकांच्या लोकशाही स्वराज्य पक्षाबद्दल आकर्षण वाटले व त्या पक्षात प्रवेश करताना 'स्वत:ला अत्यंत प्रिय असलेले हिंदुसंघटनेचे सर्व कार्य' त्या पक्षाच्या कार्यक्रमात येअू शकते म्हणून त्यांना आनंदही वाटला.[5] पुढे 'हिंदुराष्ट्राचे पुनरुज्जीवन' करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या[6] व 'हिंदूंना अेकजीव करून त्यांच्यात आत्मप्रत्ययाची निष्ठा अुत्पन्न करणाऱ्या'[7] हिंदुमहासभा या राजकीय पक्षात ते समाविष्ट झाले.

स्वातंत्र्याचा अर्थ :

हिंदुत्वनिष्ठेतूनच जीवनाच्या विविध अंगांची तपासणी करावयाची व हिंदुत्वाला पोषक तेवढ्याचाच स्वीकार करावयाचा ही सावरकरांची या काळातील दृढ भूमिका होती. १९३७ सालानंतर जे ध्येय त्यांनी घोषित केले होते ते 'हिंदुध्वजाखालील असलेले हिंदुराष्ट्र स्थापावयाचे' हे होते.[8] स्वराज्याची सावरकरांची कल्पना हीही हिंदुत्वनिष्ठेवरच आधारलेली होती. केवळ प्रादेशिक वा भौगोलिक तत्त्वावर अधिष्ठिलेली स्वातंत्र्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती.[9] त्यांच्या दृष्टीने 'हिंदी स्वातंत्र्याचा अर्थ' हिंदूंचे राजकीय स्वातंत्र्य हिंदूंना त्यांच्या पूर्ण अुत्कर्षाला नि विकासाला समर्थ करील अशी मुक्तता' हा होता.[10] हिंदूंचे हिंदुत्व अबाधित राहण्याची शाश्वती असलेले स्वातंत्र्यच त्यांना मोलाचे वाटत होते. 'ज्यात स्वत्व म्हणजेच

---

१. हिं. रा. द. पृ. ७६. २. हिं. रा. द. पृ. १०८. ३. हिं. रा. द. पृ. ११, ७३, ७४, ७६, २४०, २७६, २७८ आणि स. सा. वा खंड ४–पृ. ३५२. ४. स. सा. वा. खंड ४–पृ. ३६४. ५. स. सा. वा. खंड ४–पृ. ३७१. ६. हिं. रा. द. पृ. ७६. ७. हिं. रा. द. पृ. १०५. ८. स. सा. वा. खंड ४–पृ. ५३०. ९. हिं. रा. द. पृ. १८. १०. हिं. रा. द. पृ. १८.

आपले हिंदुत्व प्रभावाने स्थापित करता येअील तेच अेकमेव हिंदूंचे स्वराज्य होय' अशी स्पष्ट घोषणा त्यांनी केली होती.[1] स्वराज्याची व्याख्या करताना त्यांनी आवर्जून पुन्हा हेच सांगितले की, 'ज्यात हिंदुसंस्कृतीचे संरक्षण व संवर्धन होअील तेच स्वराज्य' होय.[2]

पक्षस्वीकार :

हिंदुत्वाधिष्ठित स्वातंत्र्याची ही भूमिका स्वीकारलेल्या सावरकरांनी प्रत्येक गोष्ट त्याच दृष्टीने पाहिली. 'कोठल्याही पक्षाशी सहकार्य करावयाचे की नाही हे ठरविण्याचे आमचे मुख्य सूत्र हिंदुत्वच आहे' असे ते सांगत असत.[3] काँग्रेसबद्दल त्यांना अनेक बाबतींत आस्था वाटत होती. राजकीय स्वातंत्र्य हे काँग्रेसचे ध्येय पाहून त्यांना आनंद वाटे.[4] राष्ट्रीय सभेमुळे हिंदुजगताचे सामर्थ्याने झालेले दृढीकरण त्यांना मान्य होते.[5] परंतु काँग्रेसच्या हिंदुविरोधी वृत्तीमुळे त्या पक्षाशी त्यांचे मतभेद झाले होते. प्रादेशिक अेकता हा राष्ट्रीयत्वाचा अेकमेव घटक मानल्यामुळे राष्ट्रीय सभेच्या ध्येयवादामध्ये मुळापासूनच दोष अुत्पन्न झाल्याचे सावरकर सांगत.[6] सिंधचे विभक्तीकरण, जातीय मतदारसंघास मान्यता व शिरगणतीवर बहिष्कार या काँग्रेसच्या धोरणामुळे हिंदुहिताचा घात होत आहे असा ते वारंवार पुकारा करीत.[7] मुसलमानांच्या अत्याचारांकडे पाहण्याचा काँग्रेसचा दृष्टिकोन कसा चुकीचा आहे हे अनेक अुदाहरणांवरून ते पटवून देण्याचा प्रयत्न करीत.[8] त्यांचा राग मुख्यत: होता तो काँग्रेसच्या हिंदूंबद्दलच्या बेपर्वा वृत्तीमुळे.[9] काँग्रेसचे व सावरकरांचे ध्येय समान असूनही काँग्रेस हिंदूंचे अधिकार पायी तुडविते म्हणूनच ते तिला विरोध करीत होते. या भूमिकेमुळेच ते काँग्रेसशी जुळेल तेथपर्यंत सहकार्य करावयास तयार झाले होते; पण हिंदुत्वाचा विरोध दिसू लागताच त्यांनी निराळा मार्ग पत्करला.[10]

राजकारणाचे हिंदुकरण :

ध्येय व पक्ष यांची निवड हिंदुत्ववादी दृष्टीने केल्यावर राजकारणाच्या, समाजकारणाच्या सर्व अंगोपांगांकडे सावरकर याच दृष्टीने पाहू लागले होते. स्थानबद्धतेतून मुक्तता झाल्यावर दोन महिन्यांनी २ ऑगस्ट १९३७ रोजी पुणे येथे दिलेल्या

---

१. हिं. रा. द. पृ. ११३. २. स. सा. वा. खंड ४–पृ. ३३०. ३. स. सा. वा. खंड ४–पृ. ५३०. ४. स. सा. वा. खंड ४–पृ. ३५५. ५. हिं. रा. द. पृ. ६०. ६. हिं. रा. द. पृ. १०९. ७. हिं. रा. द. पृ. २३५. ८. हिं. रा. द. पृ. ४१, ४३. ९. स. सा. वा. खंड ४–पृ. ३४७. १०. स. सा. वा. खंड ४–. ३७१.

अेका व्याख्यानात सावरकर म्हणाले होते : "आपल्या राष्ट्राचा पाया असलेल्या हिंदुत्वाच्या दृष्टीने मी राजकारणाकडे पाहू अिच्छितो. त्या दृष्टीने अुपयुक्त तेच माझे समाजकारण, राजकारण वगैरे सर्व काही आहे."[१] पुढे दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर सावरकरांनी आपली ही भूमिका पुन्हा अेकदा स्पष्ट केली. 'युरोपीय महायुद्ध व हिंदुमहासभा' या विषयावर बोलताना ते म्हणाले, "जगाच्या सगळ्या राजकारणाची कसोटी, सत्याची कसोटी, हिंसेची कसोटी, अहिंसेची कसोटी, ही अेकच असली पाहिजे, ती कसोटी म्हणजे हिंदूंचे कल्याण होअील ते सत्य, हिंदूंचे अकल्याण होअील ते असत्य."[२] १९३८ साली नागपूर येथे केलेल्या अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी राजकारणविषयक आपला दृष्टिकोन निःसंदिग्ध शब्दांत जाहीर केला. ते म्हणाले, "आमचे यापुढील राजकारण म्हणजे निर्भेळ हिंदू राजकारणच राहील आणि त्याचा बनाव हिंदु-परिभाषेनेच नि हिंदुसमाजाचे दृढीकरण, स्वातंत्र्य आणि जीवनवृद्धी ह्यांना साहाय्यभूत होअील अशाच मार्गाने बनेल."[३] 'हिंदूंचे सैनिकीकरण आणि राजनीतीचे हिंदुकरण' हे आपले प्रसिद्ध सूत्र त्यांनी १९४२ साली कानपूर येथे अुद्घोषिले होते.[४]

सावरकरांच्या जीवनातील राजकीय वा सामाजिक घटनांचा अभ्यास केला तर सावरकरांच्या हिंदुकरणाच्या सूत्राशी त्या कशा संबद्ध होत्या हे ध्यानी येते. १९३९ च्या ऑक्टोबरमध्ये हिंदुस्थानचे त्या वेळचे व्हॉअीसरॉय लॉर्ड लिन्लिथगो यांच्याशी सावरकरांची मुलाखत झाली होती. त्या वेळी हिंदुहिताच्या दृष्टिकोनातूनच सावरकरांनी असे सांगितले होते की, युद्धकाळात वायव्य सरहद्दीवर ठेवण्यास योग्य अशी पलटण कोणती असेल तर ती शीख व गुरखा यांचीच होय.[५] वायव्य सरहद्दीपलीकडे असलेल्या मुसलमानी राष्ट्रांच्या भारतावरील स्वारीची भीती सावरकरांनी अनेक वेळां बोलून दाखविली होती. युरोपात महायुद्ध सुरू होताच सावरकरांनी हिंदुमहासभेची भूमिका स्पष्ट करताना घोषित केले की, हिंदुराष्ट्राचे संरक्षण आणि त्याचे हित यांबाबत मुख्यत: हिंदुमहासभेला चिंता वाटते. (The Hindu Mahasabha felt itself concerned with the issues at stake in the war so far as they were likely to affect the safety and interests of the nation). या वेळी सावरकरांनी सैनिकीकरणाचा जो घोशा लावला होता त्याचा मुख्य हेतू हिंदूंना अेक लढाअू जात म्हणून पुनर्मान्यता मिळवून द्यावी हाच होता.

(The main object of Savarkar's war policy was to make Hindus re-animated and reborn into a material race.)

---

१. स. सा. वा. खंड ४–पृ. ३७१. २. स. सा. वा. खंड ४–पृ. ४९०. ३. हिं. रा. द. पृ. ७७. ४. हिं. रा. द. पृ. २८४. ५. Savarkar and His Times p. 214.

१९४२ च्या सुमारास वंगालमध्ये जो भीषण दुष्काळ पडला होता त्यात काँग्रेसच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांकडून मुस्लिम दुष्काळग्रस्तांवद्दल जी पक्षपाती वागणूक दिसून आली, तिचा निषेध सावरकरांनी केला आणि त्या दुष्काळात फक्त हिंदूंनाच मदत पाठविण्याचे धोरण त्यांनी ठेविले.[१] कस्तुरवा गांधी स्मारक-निधीचा अुपयोग हिंदूंच्या विरुद्ध केला जाअील अशी भीती वाटल्यानेच या निधीस साहाय्य न करण्याचे आवाहन त्यांनी केले.[२] जातीय दंगलीची झळ पोहोचलेल्या फक्त हिंदू लोकांनाच सावरकरांनी आर्थिक साहाय्य पाठविले.[३] १९५९ साली केरळमधील कम्युनिस्ट पक्षाला व कम्युनिस्ट सरकारला सावरकरांनी पाठिंवा दिला तो हिंदुहितदृष्टीनेच दिला. ख्रिश्चन मिशनरी, काँग्रेस व मुस्लिम लीग ह्या हिंदुहितविरोधी शक्तींशी कम्युनिस्ट सरकार झुंजत असल्याचे पाहून सावरकरांना कम्युनिस्टांवद्दल वाटणारी आपुलकीसुद्धा त्यांनी या वेळी प्रकट केली.[४] सावरकरांनी पुरस्कृत केलेल्या संयुक्त हिंदी राष्ट्राच्या कल्पनेतही हिंदुहिताचीच दृष्टी होती.[५] देशातील निवडणुका या हिंदुहित दृष्टीनेच लढविल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता.[६] मदुरा येथील अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले होते, " जर निवडणुका जिंकण्याकरिता आपणाला देशाच्या हितावर अंगार ठेवण्याची पाळी येत असेल तर मतदारसंघाच्या मूर्खपणाला कौल लावून निवडणुकी जिंकण्यापेक्षा त्यांना रामराम ठोकून हिंदूंचे हित साधणे हे आपले स्पष्ट कर्तव्य आहे. "[७] हिंदुहितदृष्टीनेच राजकीय सत्ता हातांत घेण्याचा आदेश हिंदुसंघटनवाद्यांना सावरकरांनी दिला होता. ते म्हणाले, " चालू राज्यघटनेनुसार नगरपालिका, जिल्हामंडळे आणि विधिमंडळे यांत आपण हिंदूंना मिळालेल्या साऱ्या जागा जर आपण हिंदुसंघटनवाद्यांनी वळकाविण्याचे काम केले तर हिंदू चळवळीला अेवढी अेकदम अुचल मिळेल की, आपल्या आजच्या सर्वतोपरी अगतिक अवस्थेतून ती कल्पनातीत अशा वलिष्ठ स्थितीला जाअून पोहोचेल."[८]

अंतर्गत राजकीय धोरणाप्रमाणेच परराष्ट्रीय धोरणातही हिंदुहिताला च–प्राधान्य देण्यावद्दल सावरकरांचा कटाक्ष होता. परराष्ट्रीय धोरणाबाबतचे आपले मूत्र सावरकरांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे. " आमचे परराष्ट्रीय धोरणही–स्पष्ट, निर्भेळ अशा हिंदुदृष्टीनेच ठरविण्यात येअील . . . . हिंदूंचे हित हीच आमची कसोटी. खिलाफत, पॅलेस्टाअीनमधील अरबांचा प्रश्न, अित्यादी भ्रमोत्पादक–गोष्टींत निरर्थक लक्ष घालून आणि त्यांच्याशी सहानुभूती दाखवून आम्ही आत्मघातकीपणा

---

१. Savarkar and His Times p. 255. २. Savarkar and His Times p. 314. ३. Savarkar and His Times p. 318. ४. Savarkar and His Times p. 348. ५. Veer Savarkar p. 514. ६. हिं. रा. द. पृ. ७७, ९२, ९३. ७. हिं. रा. द. पृ. १४६, १४७. ८. हिं. रा. द. पृ. २१०.

करणार नाही. अिंग्लंड देशाशी येणारे आमचे संबंध हिंदुहिताच्या धोरणाने म्हणजे हिंदुराष्ट्राच्या पूर्ण राजकीय स्वातंत्र्याची दृष्टी पुढे ठेवूनच ठरविले जातील."[1] भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातही सावरकरांची हीच भूमिका कायम होती. १९५६ साली जोधपूर येथील भाषणात ते म्हणाले होते : "But bear in mind that if tomorrow there breaks out a war between Pakistan and Bharat, almost all Muslims will be arrayed on the side of Pakistan in opposition to us and their enemy Israel will be our only friend. Therefore, I say that Bharat should give an unequivocal recognition to Israel."[2]

अन्य क्षेत्रातही हिंदुत्वनिष्ठेचा प्रभाव :

अस्पृश्यता, शुद्धीवरील बंदी, विधवाविवाह अित्यादी सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टी केवळ समाजसुधारकाची किंवा मानवतावाद्याची नव्हती. या दुष्ट रूढींमुळे मुसलमानांचे हिंदुसमाजावर होणारे आक्रमण त्यांना असह्य होत होते.[3] कर्णावती येथील अध्यक्षीय भाषणात त्यांनी स्पष्टच सांगितले होते की, शुद्धीचे केवळ धार्मिक दृष्टयाच महत्त्व आहे असे नाही, तर राजकीय दृष्टयाही ती तितकीच महत्त्वाची आहे.[4] भारताच्या घटनेतील सर्वांत लक्षवेधक कलम त्यांना वाटले ते अस्पृश्यता निवारण्यासंबंधीचे. अस्पृश्यता निवारण्याची आज्ञा देणारे हे कलम अशोक-स्तंभासारख्या स्तंभावर कोरून ठेवण्याअितक्या मोलाचे आहे असे त्यांना वाटत होते.[5]

हिंदुस्थान हे देशाचे नाव, संस्कृतनिष्ठ हिंदी ही राष्ट्रभाषा, हिंदुजगताची लिपी म्हणजे नागरी लिपी, कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज हा हिंदुराष्ट्राचा ध्वज ही सावरकरांची ठाम मते त्यांच्या हिंदुत्वनिष्ठ भूमिकेतूनच सिद्ध झाली आहेत. १९३९ साली कलकत्ता येथे भरलेल्या हिंदुसभेच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून त्यांनी वरील विषयांची सविस्तर चर्चा केली आहे. देशातील संस्थानांच्याकडे ते याच भूमिकेतून पाहात होते. ही हिंदुसंस्थाने भविष्यकाळी हिंदुराष्ट्राचे पुनरुत्थान करण्यात जोरदार व परिणामकारकरीत्या अुपयोगी पडतील असे ते प्रतिपादीत.[6]

अल्पसंख्याकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन :

हिंदुस्थानमधील अितर जातींकडे पाहण्याचा सावरकरांचा दृष्टिकोन अनुकूल किंवा प्रतिकूल झाला होता तो या हिंदुत्वनिष्ठतेमुळेच. पारशी जमातीबद्दल त्यांना

१. हिं. रा द. पृ. ७८, ७९. २. Veer Savarkar p. 499. ३. हिं. रा. द. पृ. ७०, ७१. ४. हिं. रा. द. पृ. ३३. ५. Veer Savarkar p. 483. ६. हिं. रा. द. पृ. १६५, १६६.

राष्ट्रीय ग्रंथ ... स्थलसंकेत
अनुक्रम..६६५३९०२ दि: ...
क्रमांक ...०१६५३ बोर दि: ...

आदर वाटे. याचे मुख्य कारण ते हिंदूंच्या खांद्याला खांदा भिडवूनच सतत काम करीत आहेत म्हणून.[1] शिवाय हिंदुराष्ट्रावद्दल य। समाजाची वृत्ती केवळ सदिच्छेचीच आहे.[2] ख्रिस्तीसमाजाने राष्ट्रीय लढ्यात फार थोडा भाग घेतला अमूनही सावरकरांना त्या समाजावद्दल किंचित जवळीक वाटते. याचेही मुख्य कारण हेच की, ते हिंदूंच्या गळ्यात धोंड होतील असे वागलेले नाहीत. ते थोडे कमी धर्मपिसे आहेत असा सावरकरांचा अभिप्राय आहे.[3] मात्र पुढे ख्रिस्तीस्तान निर्माण होण्याचा धोका दिसू लागताच त्यांनी या समाजापासून सावध राहण्याचा अिशारा हिंदूना दिला होता.[4] 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' हे सूत्र त्यांनी याच संदर्भात सांगितले होते.[5] ज्यू हे हिंदूंच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या विरुद्ध नसल्यामुळे आणि अँग्लो-अिंडियनांची राजकीय अुपजत-बुद्धी धड असल्यामुळे सावरकरांचे या जमातीवद्दलचे मत फारसे प्रतिकूल नव्हते.[6] यहुदी लोकांनी राजकीय किंवा सांस्कृतिक दृष्टचा हिंदूना फारसा त्रास दिलेला नसल्यामुळे आणि ते धर्मांतर करविणारेही नसल्याने त्यांना संयुक्त हिंदी राष्ट्रात सहज समाविष्ट करता येअील असे सावरकरांना वाटे.[7] परंतु हिंदूंच्या वाढत्या लोक-संख्येला वाव मिळावा म्हणून यहुद्यांच्या नव्या वसाहती वाढू देण्यास मात्र त्यांचा विरोध होता.[8] या सर्व प्रमुख अल्पसंख्य जमातींवद्दलचे आपले अभिमत सावरकरांनी पुढील शब्दांत व्यक्त केले आहे : " आमचे पारशी नि ख्रिश्चन देशबंधू हे आजच आमच्याशी सांस्कृतिकदृष्टचा समानशील आहेत, अितके देशभक्त आहेत आणि अँग्लो अिंडियन अितके समंजस आहेत की, ते हिंदूंच्या न्याय्य भूमिकेवर-येण्याचे मुळीच नाकारणार नाहीत."[9]

परंतु मुसलमान समाजावद्दल जेव्हा सावरकर बोलू लागत तेव्हा अत्यंत प्रतिकूल मत ते प्रकट करीत. १९३७ सालच्या कर्णावतीच्या पहिल्याच अध्यक्षीय भाषणात त्यांनी मुसलमानांबद्दलचे आपले मत स्पष्टपणे व्यक्त केले. ते म्हणाले, " मी हिंदूंना बजावून सांगतो की, जर नि जेव्हा अिंग्लंडची सत्ता निघून जाअील तर नि तेव्हाही मुसलमान हे आपल्या हिंदुराष्ट्राला नि समान हिंदी राष्ट्राच्या अस्तित्वाला मोठेच धोक्याचे ठरण्याचा संभव आहे."[10] याच भाषणात त्यांनी 'हिंदुस्थानात हिंदू आणि मुसलमान अशी मुख्यत: दोन राष्ट्रे विद्यमान आहेत' असा महत्त्वाचा सिद्धान्त मांडला.[11] मुसलमानांच्या या फुटीर प्रवृत्तीला सावरकरांच्या मते मुख्यत: दोन कारणे आहेत. पहिले कारण ब्रिटिश राजवटीत हिंदूना बुद्धिपुरस्सर मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकीत आहे. हिंदूना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यास नकार देअून

---

१. हिं. रा. द. पृ. २९. २. हिं. रा. द. पृ. २९. ३. हिं. रा. द. पृ. २९. ४. केसरी १३-१२-१९५३. ५. केसरी १३-१२-१९५३. ६. हिं. रा. द. पृ. २९, ३०. ७. हिं. रा. द. पृ. ८०. ८. हिं. रा. द. पृ. ८०. ९ हिं. रा. द. पृ. ११४. १०. हिं. रा. द. पृ. ३०. ११. हिं. रा. द. पृ. ३१.

आणि मुसलमान ख्रिश्चनादी जमातींना न्यायतः प्राप्त असलेल्यापेक्षाही अमापपणे अधिक राजकीय सत्ता मिळेल अशा रीतीने स्वतंत्र मतदार संघ, विशिष्ट मताधिकार अित्यादींचा वर्षाव करून ब्रिटिशांनी हिंदूंचे राजकीय वर्चस्व मूलतःच नष्ट करून टाकले आहे असे या संबंधीचे विश्लेषण सावरकर करीत.[1] याशिवाय अन्य मार्गांनी ब्रिटिश राज्यकर्ते हिंदूंचे खच्चीकरण करीत असल्याचा पुकारा सावरकर करीत. हिंदूंचे सामरिक गुण नष्ट करण्यासाठी त्यांची सैन्यातील व पोलिस दलातील भरती घटविणे, सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांकरिता शेकडा साठ जागा राखून ठेवणे, हिंदूंना आर्थिक दृष्ट्या चिरडून टाकणारे कायदे करणे अित्यादी अुपायांनी ब्रिटिशांनी हे खच्चीकरण चालू ठेविले आहे असे सोदाहरण सिद्ध करण्याचा नेटाचा व सतत प्रयत्न सावरकर करीत.[2]

दुसरे कारण मुसलमानांच्या विशिष्ट मनोवृत्तीत आहे असे ते सांगत. या-संबंधी सावरकरांच्या विचारांचे संकलन करावयाचे झाले तर ते पुढीलप्रमाणे करता येअील :—बहिर्देशीय निष्ठा बाळगून मुसलमान हिंदुस्थानात राहात आहेत.[3] येथील मुसलमान आधीही मुसलमान आणि अंतीही मुसलमानच राहिले, ते 'हिंदी' केव्हाच झाले नाहीत.[4] त्यांना हिंदुजगत आणि हिंदुस्थानातील अितर मुसलमानेतर वर्ग यांच्या कपाळावर आत्मशरणागतीची नि मुस्लीम वर्चस्वाची तप्तमुद्राच ठोकावयाची आहे.[5] या दृष्टीनेच 'मुस्लीम लीग' सारख्या प्रतिनिधीभूत संस्थेकडूनच हिंदुस्थानची 'मुसलमानी–हिंदुस्थान' नि 'हिंदु-हिंदुस्थान' अशी दोन छकले करण्याची मागणी करण्यात आली.[6] आपली ही मागणी पूर्ण करण्यासाठी ते लोक अफगाणिस्तानला हिंदुस्थानवर स्वारी करण्याला निमंत्रण करतील.[7] हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे असलेल्या बलाढ्य मुसलमान राष्ट्रांकडे त्यांची दृष्टी आहे यात संदेह नाही.[8] या हेतूने अमीर अमानुल्ला याला हिंदुस्थानचा भावी अनभिषिक्त सम्राट म्हणून दिल्लीला आणण्याचा कट अलीबंधूंनी केला होता.[9] अुर्दू ही राष्ट्रभाषा व राष्ट्रलिपी करण्याचा मुसलमानांचा प्रयत्न याच स्ववर्चस्वाच्या हेतूने चालू आहे.[10] 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीतही मुसलमानांना सहन होअीनासे झाले आहे.[11] सर्व हिंदूंना मुसलमान करण्याची आकांक्षा ते हृदयात बाळगून आहेत, ही गोष्ट मोपल्यांचा पुढारी अल्ली मुसलियार याच्या मुखाने स्पष्ट झाली आहे.[12] हिंदुस्थानात ठिकठिकाणी जे अनन्वित अत्याचार मुसलमानांकडून होत आहेत

---

१. हिं. रा. द. पृ. ४० २. हिं. रा. द. पृ. ४०, ४१. ३. हिं. रा. द. पृ. १६.
४. हिं. रा. द. पृ. ६१. ५. हिं. रा. द. पृ. २५. ६. हिं. रा. द. पृ. ६२.
७. स. सा. वा. पृ. २३०. ८. हिं. रा. द. पृ. २२९. ९. हिं. रा. द. पृ. २२९.
१०. हिं. रा. द. पृ. २३. ११. हिं. रा. द. पृ. २४. १२. हिं. रा. द. पृ. ६२, ६३.

ते त्या प्रदेशातील काफिरांना अुखडून टाकण्यासाठीच आहेत.[१] देशाच्या राष्ट्रीय झगडयात मुसलमान कोठेच आढळत नाहीत.[२] हिंदुस्थानविषयी धर्मानेच अेकनिष्ठ नसल्यामुळे त्यांना हिंदुस्थान हा शत्रुदेशासारखा वाटतो.[३] असे धर्मवेडे शत्रुत्व सरहद्दीवरील प्रांतांत आज मुसलमान करीत आहेत.[४]

मुसलमानांच्या या विद्वेषी वृत्तीचा विलय करून त्यांच्याशी अैक्य प्रस्थापित करण्याचा विचारही सावरकर वोलून दाखवीत. परंतु ते अैक्य त्यांना हिंदुत्वनिष्ठेचा बळी देअून मात्र नको होते. संयुक्त हिंदी राज्याची कल्पना सावरकरांना मान्य होती. त्या स्वरूपाच्या राज्यात मुसलमानांना जरी समानता देण्यात आली तरी राजकीय, धार्मिक वा सामाजिक अशा कोणत्याही प्रकारची विशेष सवलत त्यांना देता कामा नये असा सावरकरांचा आग्रह होता.[५] हिंदूंच्या साहाय्यावाचून नि सदिच्छेवाचून आपले काही चालणार नाही ही भावना मुसलमानांमध्ये निर्माण झाली तर हिंदु-मुस्लीम अैक्य निर्माण होणे शक्य होअील अशी सावरकरांची दृढ धारणा होती.[६] 'जशास तसे' किंवा 'मापास माप' ह्याच न्यायाने मुसलमानांशी वागावयास हवे अशी स्पष्ट घोषणाही ते करीत.[७] पाकिस्तानच्या निर्मितीनंतरही त्यांची ही भूमिका सुटली नाही. अुलट गतानुभवाच्या सहाणेवर त्यांच्या मूळच्या मताला अधिकच धार चढली. १९४९ साली कलकत्ता येथे केलेल्या भाषणात त्यांनी पाकिस्तानशी वागताना 'जशास तसे' ह्याच न्यायाने वागावे असे आग्रहाने प्रतिपादिले.[८] हिंदु-मुस्लीम अैक्याचे त्यांचे सूत्रही ठरलेले होते. १९३७ साली कर्णावती येथे केलेल्या अध्यक्षीय भाषणात हे सूत्र त्यांनी प्रथम निःसंदिग्धपणे अुद्घोषिले. सावरकर म्हणाले "यापुढे हिंदु-मुस्लीम अैक्यासंबंधीचे हिंदूंचे सूत्र हेच राहणार की, 'याल तर– तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुम्हांस विरोधून हिंदु-राष्ट्र आपले भवितव्य बनेल तसे घडवील.[९]" १९४२ साली कानपूर येथे भरलेल्या हिंदुसभेच्या अधिवेशनात त्यांनी पुन्हा याच शब्दांचा पुनरुच्चार केला. "तुम्ही आलात तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून आणि विरोधाल तर तुमचा प्रतिकार करून आम्ही आमच्या पितृभूच्या-हिंदुस्थानच्या-स्वातंत्र्यासाठी आणि अखंडत्वासाठी झगडूच झगडू."[१०] खरा मार्ग हिंदूंनी संघटित व सबल होअून हिंदुत्वाचे रक्षण करावे आणि ह्याच मार्गाने हिंदुमुसलमान अेकी करावी ही त्यांची विचारसरणी अखेरपर्यंत कायम होती.[११]

---

१. हिं. रा. द. पृ. ४१, ४२, ४३. २. हिं. रा. द. पृ. २०. ३ हिं. रा. द. पृ. ६९. ४. हिं. रा. द. पृ. १२६. ५. हिं. रा. द. पृ. ८१. ६. हिं. रा. द. पृ. २८. ७. हिं. रा. द पृ. २६. ८. Veer Savarkar p. 425. ९. हिं. रा. द. पृ. २९. १०. हिं. रा. द. पृ. २७७. ११. स. सा. वा. पृ. ३३२.

अखंड हिंदुस्थानचा ध्यास

खंडित भारताचे का होअीना पण स्वातंत्र्य पाहून सावरकर कृतार्थ झाले होते. परंतु पाकिस्तान निर्मितीचे शल्य त्यांच्या मनात सारखे सलत होते. या शल्याची वोच मधून मधून त्यांच्या वाणी-लेखणीतून प्रकट होअी. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पं. नेहरू यांनी हिंदुराज्याच्या कल्पनेला जो कडवा विरोध जाहीररीत्या प्रकट केला, त्याला अुत्तर देताना सावरकरांनी अखंड हिंदुस्थानच्या पुनर्निमितीचा आपला मनोरथ अेका पत्रकाद्वारे व्यक्त केला. त्या पत्रकात सावरकर लिहितात, "The choice, therefore, is not between two sets of personalities but between two ideologies, not between Indian Raj and Hindu Raj, but between Muslim Raj and Hindu Raj, betwecn Akhand Hindustan and Akhand Pakistan. The Hindu Sanghatanist ideology alone can, therefore, save our nation and re-establish an Akhand Hindustan from the Indus to the Seas."[1]

'किर्लोस्कर' मासिकाच्या फेब्रुवारी १९४८ च्या अंकात सावरकरांनी पाकिस्तानच्या प्रदेशाचा उल्लेख 'बंडखोर प्रांत' अशा स्वरूपाचा केला आहे आणि अखंड हिंदुस्थान पुन्हा प्रस्थापित होअीपर्यंत भारत व पाकिस्तान यांचा लढा सतत चालू राहील असे भविष्य नमूद करून ठेविले आहे.[2] १९५२ साली 'अभिनव भारता'च्या सांगता समारंभातील भाषणात सावरकरांनी पाकिस्तानातून वाहणाऱ्या सिंधुसरितेच्या विमुक्ततेची चेतावणी दिली होती. आपल्या भाषणात सावरकर म्हणाले होते, "सिंधूस आम्ही विसरू? सिंधूवाचून हिंदू, अर्थावाचून शब्द, प्राणावाचून कुडी, अशक्य, अशक्य! जोवर अेकतरी हिंदू जिवंत आहे तोवर तो सिंधूस विसरणे शक्य नाही... अितर कोणीही जरी अेक वेळ विसरले तरी हे स्रोतस्विनी सिंधू, हा आमचा अेकटा महाराष्ट्र अुठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावाचून राहणार नाही!"[3] १९५८ साली सावरकरांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मुंबअी महानगरपालिकेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी सत्काराला अुत्तर देताना 'भारताची फाळणी नष्ट करणारा अेक दिवस निश्चित अुगवेल' असा आशावाद त्यांनी प्रकट केला होता.[4] अर्थात हिंदुत्वनिष्ठ सावरकरांचा मार्गही निश्चित होता. पाकिस्तान-निर्मितीपूर्वीच तो मार्ग सावरकरांनी निश्चित केला होता. १९४५ साली केलेल्या अेका भाषणात सावरकर म्हणाले होते: "पाकिस्तानवर अुपाय अेकच नि तो हा की प्रचंड हिंदुसंघटना वनवून ती योजना खणून काढणे . . . पाकिस्तानचा प्रश्न तर्काने,

---

१. Savarkar and His Times p. 362. २. किर्लोस्कर – फेब्रुवारी, १९४८.
३. स. सा. वा. खंड ८–पृ. ४८०, ४८१. ४. Veer Savarkar p. 510.

तत्त्वज्ञानाने अथवा टीकेने सुटणार नाही, तो फक्त हिंदु-संघटनेनेच सुटणार आहे.''[१] १९६५ च्या सप्टेंबरमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या भूमीवर पाय ठेवून लाहोरच्या दिशेने आगेकूच करताच सावरकरांना विलक्षण आनंद झाला आणि सहा सप्टेंबर या दिवसाचे वर्णन त्यांनी ' भारतीय अतिहासातील सातवे सोनेरी पान ' अशा शब्दांनी केले. १९६६ च्या फेब्रुवारी महिन्यात सावरकर मरणोन्मुख शय्येवर असताना पाकिस्तानवरील भारताच्या चढाओचे वर्णन करणारे पुस्तक (Pakistan cut to size) सावरकर आपल्या चिटणिसाकडून वाचून घेत होते.[२] अखंड हिंदुस्थानचा त्यांचा ध्यास मृत्यूच्या दारात ते अुभे असतानाही कायम होता.

हाती घेतलेल्या चळवळी

१९३७ सालानंतर सावरकरांनी ज्या चळवळी हाती घेतल्या, जे लढे लढविले ते सर्व त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेच्या परिघातीलच होते. १९३८ मध्ये हैद्रावादचा (भागानगरचा) लढा त्यांनी सुरू केला तो त्या संस्थानातील हिंदू नागरिकांवर होणाऱ्या अत्याचारांचा प्रतिकार करण्यासाठी ! या लढ्यामागील आपली भूमिका स्पष्ट करताना सावरकर म्हणाले, " चालू वर्षात झालेल्या सर्व घटनांमध्ये हिंदूंच्या दृष्टीने सर्वोच्च आणि आपल्या आगामी कार्यक्रमात नि धोरणात नित्य ध्येयरूपाने नांदणारी अशी घटना कोणती असेल तर ती अर्थात या वर्षातील पूर्ण सहामासपर्यंत निजामी राज्यातील हिंदुविरोधी धोरणास तोंड देण्यास्तव आपणांस कराव्या लागलेल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीची ! ते अेक धर्मयुद्ध (क्रुसेड) होते.''[३] ' तेथील हिंदूंचा मुलमानांकडून छळ होत होता ' म्हणून ही चळवळ हाती घ्यावी लागली असे सावरकरांनी सांगितले.[४] या चळवळीत असंख्य हिंदूंनी भाग घ्यावा म्हणून सावरकरांनी पश्चिम महाराष्ट्र व वऱ्हाडमध्ये दौरा करून अनेक व्याख्याने दिली. या लढ्यात सुमारे पंधरा हजार सत्याग्रहींनी भाग घेतला होता. या लढ्याला जातीयतेचा वास येत असल्याने काँग्रेस संघटना संपूर्ण अलिप्त होती. लढ्याचे पडसाद पार्लमेंटमध्ये अुठले जात होते आणि कर्नल वेजवुड यांनी हैद्राबादच्या लढ्यासंबंधी प्रश्न अुपस्थित केला होता.[५] अखेर निजामाने संस्थानातील हिंदूना कायदेमंडळात पन्नास टक्के प्रतिनिधित्व देण्याची घोषणा केल्याने हा लढा मागे घेण्यात आला. या लढ्याचा निष्कर्ष सांगताना सावरकर म्हणाले, " पवित्र हिंदू कार्यार्थ चालविलेल्या या धर्मयुद्धाने हे प्रात्यक्षिक पटविले की, जाती नि पंथ, सांप्रदाय नि मार्ग, भिन्न असूनही सर्वव्यापक हिंदुत्वयुक्त समाज सामान्य राष्ट्रीय जीवनाने अद्यापही धगधगतो आहे.''[६]

---

१. स. सा. वा. खड ४–पृ. ५१०. २. Veer Savarkar p. 542. ३. हिं. रा. द. पृ. ९७. ४. हिं. रा. द. पृ. १०३. ५. Savarkar and His Times p. 212. ६. हिं. रा. द. पृ. ९७.

पाकिस्ताननिर्मितीस विरोध, सैनिकीकरण आणि शस्त्रनिर्बंधाविरुद्ध प्रचार यांसाठी सावरकरांनी १९३७ नंतरचा बहुतेक काळ खर्च केला. पाकिस्तान-निर्मिती-विरुद्ध सावरकरांनी केलेल्या प्रयत्नांचा व प्रचाराचा सर्व तपशील यापूर्वीच प्रस्तुत प्रबंधात अन्यत्र दिलेला असल्याने येथे पुनरुक्ती करणे अिष्ट नाही. त्यांच्या सैनिकीकरणाच्या चळवळीचे अधिष्ठानही हिंदुत्वच होते. सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या चळवळीचा धावता अितिहास जर पाहिला तर असे आढळून येते की, त्यांच्या निष्ठांच्या तीव्रतेबरोबर त्यांच्या या चळवळीचा हेतू अन् अर्थही बदलत चालला होता. त्यांच्या चळवळीचा मुख्य हेतू राजकीय होता; जातीय नव्हता. ब्रिटिशांच्या हुकमतीखालील हिंदी सैनिकांत स्वातंत्र्याची भावना जागृत करावयाची आणि राजकारणात घुमणारा स्वातंत्र्याचा ध्वनी त्यांच्या कानापर्यंत पोहोचवून त्या सैनिकांना लढ्यासाठी सिद्ध करावयाचे ही या चळवळीमागील सावरकरांची भूमिका होती. आपल्या या भूमिकेसंबंधी माहिती सांगताना सावरकर म्हणाले होते: " ब्रिटिशांच्या हिंदी सैन्यात गुप्त प्रचार करताना आम्ही, 'ब्रिटिशांच्या सैन्यात जाअू नका' असे केव्हाही सांगितले नाही, तर अुलट ब्रिटिशांच्या सैन्यात राहूनच, हाती पडलेले सारे शस्त्रबळ संभाळूनच, नवनव्या हिंदी तरुणांची शक्य तितकी अधिकाधिक भरती ब्रिटिश सैन्यात करून, संधी येअीतो हिंदी सैनिकांनी परराष्ट्राशीही अिंग्लंडची प्रत्यक्ष युद्धे जुंपली असता त्या युद्धातून जिवंत लढाया लढण्याचे शिक्षण घेत राहावे, असेच या प्रचारपत्रांतून नि ग्रंथांतून आग्रहाने सांगत असू. म्हणजे सशस्त्र क्रांतीची वेळ येताच शस्त्रास्त्रांनी सज्ज, युद्धे खेळण्यात मुरलेले असे हे ब्रिटिशांच्या हाताखालचे लक्षावधी सैनिक, हिंदी सैन्य १८५७ च्या प्रसंगी ब्रिटिशांवरच अुलटले तसे स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ पुन्हा अकस्मात अुलटवून देता येअील. माझ्या सैनिकीकरणाचा अर्थ ह्या शतकाच्या अगदी प्रारंभापासून तो थेट ब्रिटिशांची राज्यसत्ता सन १९४७ मध्ये अुलथून पाडीतो हाच होता."[1] लढाअीचे शिक्षण मिळविण्यासाठी युरोपच्या रणभूमीवर हिंदी सैनिकांनी जावे हा विचार सावरकरांनी १९१५ साली अंदमानमधून पाठविलेल्या अेका पत्रात नमूद केलेला होता.[2] सैनिकी शिक्षणाचे महत्त्व व 'राष्ट्रीय तरुण सेना' यांसंबंधी सावरकरांनी अिंग्लंडमध्ये असतानाच सांगोपांग चर्चा केली होती, याचा पुरावा १९०६ साली त्यांनी लिहिलेल्या 'लंडनच्या वातमीपत्रा'त सापडतो.[3] सैनिकीकरणाच्या भूमिकेमागील राजकीय हेतू स्पष्ट करताना कलकत्ता येथे दिलेल्या अेका भाषणात सावरकर म्हणाले होते, " Since the days of our First War of Independence in 1857, it has been the policy of the British Government to keep the army out of politics. Our policy

---

१. स. सा. वा. खंड ८–पृ. ४५८. २ अंद. अं. पृ. ३२. ३. स. सा. वा. खंड ४–पृ. ३२ ते ३६.

against this should be to carry politics into the army by all possible means and once we succeed in this, the battle of freedom will be won "[१]

परंतु मुसलमानांच्या वर्चस्वाची चिन्हे जसजशी दिसू लागली तसतशी सावरकरांची सैनिकीकरणामागील भूमिकाही वदलू लागल्याचे आढळून येते. अंदमानाहून मुक्तता झाल्यानंतर सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेला अेक वेगळीच धार चढली होती. त्या तीव्र हिंदुत्वनिष्ठेचे पडसाद त्यांच्या सर्व सामाजिक, धार्मिक, भाषिक, राजकीय चळवळींतून अुमटू लागले होते. सैनिकीकरणाच्या वावतीतही हीच हिंदुत्वनिष्ठा प्रभावी ठरली. ब्रिटिशांच्या ताब्यातील हिंदी सैन्यात हिंदू सैनिकांच्या प्रमाणात घट होत असून मुसलमान सैनिकांचे प्रमाण अुत्तरोत्तर वाढत आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. म्हणून दुसऱ्या महायुद्धाचे नगारे वाजू लागताच प्रचंड प्रमाणात सैन्यभरती होण्याचा संदेश सावरकरांनी हिंदूंना दिला. १९३९ साली हिंदुस्थानच्या व्हॉअीसरॉयशी झालेल्या मुलाखतीत सावरकरांनी 'हिंदू हिताच्या दृष्टीने शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात हिंदू लोकांची भरती हिंदी सैन्यात व्हावी' असे आग्रहाने प्रतिपादिले.[२] १९४० साली मदुरा येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या व्यासपीठावरून वोलताना 'हिंदू लोकांनी शक्य तितक्या संख्येने सैन्यात शिरणे' हेच ध्येय सद्यःपरिस्थितीत आपल्यापुढे आहे असे त्यांनी सांगितले.[३] जागतिक परिस्थितीचा हिंदुहितरक्षणाकडे अुपयोग करून घ्यावयाचा असेल, तर सैनिकीकरणाचा विभाग त्वरित हस्तगत करणे आवश्यक आहे असे त्यांनी भागलपूरच्या अधिवेशनात (१९४१) अुद्घोषिले. हिंदूंच्या सैनिकीकरणाचे महत्त्व किती आहे हे स्पष्ट करून सांगताना सावरकर याच भाषणात पुढे म्हणाले, " हिंदू जर.... हिंदू जातीच्या सैनिकीकरण्यावर भर देतील..... तर आपले हिंदुराष्ट्र युद्धोत्तर कठीण समस्यांना तोंड देण्यास– मग ते हिंदुविरोधी अंतर्गत यादवी युद्ध असो किंवा घटनात्मक पेचप्रसंग असो किंवा सशस्त्र क्रांतीची अुठावणी असो– संघटित नि अतुलनीय अशा लाभदायक परिस्थितीत असलेले आपले हिंदुराष्ट्र कल्पनेबाहेर प्रवळ झालेले आढळून येअील."[४] १९४२ सालच्या कानपूरच्या अधिवेशनातही ह्याच हिंदुत्वनिष्ठ दृष्टिकोनातून सैनिकीकरणाचे महत्त्व सांगताना सावरकर म्हणाले, " युद्धानंतरही हिंदुत्वाला जर सगळ्यांत जास्त अुपयोग कोणाचा होणार असेल तर या सैनिकीकरणाच्या चळवळीचा होणार आहे ही खूणगाठ वांधून ठेवा."[५] 'प्रत्येक हिंदू कुटुंवाने अेक तरी माणूस भारताच्या संरक्षणासाठी दिला पाहिजे' ही सावरकरांनी १९५३ साली केलेली घोषणा

---

१. Savarkar and His Times p. 256. २. स. सा. वा. खं ८–पृ. ४७०.
३. हिं. रा. द. पृ. ११७. ४. हिं. रा. द. पृ. २३९ ५ हिं. रा. द. पृ. २८१.

स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांची सैनिकीकरणामागील हिंदुत्वनिष्ठा कशी स्थिर होती याचीच साक्ष पटविते.[१]

सैनिकीकरणाच्या चळवळीबरोवर सावरकरांच्या शस्त्रनिर्वंधाच्या विरुद्ध केलेल्या चळवळीचा विचार क्रमप्राप्त ठरतो. १९३७ साली निर्बंधयुक्त झाल्याबरोवर सावरकरांनी शस्त्रनिर्वंधाचा कायदा रद्द करून घेण्यासाठी संघटित प्रयत्न सुरू केले. नगर येथील अेका भाषणात (१९३८) त्यांनी घोषणा केली की, ... "आधीच मरू घातलेल्या आमच्या मनांना संपूर्णतया ठार करण्याच्या ब्रिटिशांच्या प्रयत्नांना यश मिळत जाऊन त्याची परमावधी म्हणजे आपल्या माथी वसलेला शस्त्रनिर्वंधाचा कायदा होय ! अितर राष्ट्रांत आत्मसंरक्षणार्थ शस्त्रे वापरण्याची व्यक्तिमात्राला जेवढी मोकळीक आहे तेवढा तरी कमीत कमी हक्क मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवाच."[२] 'प्रबलांचाच जगात विजय व्हायचा' हा सामर्थ्यवादाचा सिद्धान्त त्यांनी याच व्याख्यानात सांगितला होता.[३] १९३८ साली मे महिन्यात पुणे येथे भरलेल्या हिंदू युवक परिषदेतर्फे अेक प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती. त्या प्रसंगी सावरकरांनी 'शस्त्रगीत' ही कविता रचली होती.[४] अनेक व्याख्यानांतून त्यांनी 'रायफल क्लब' स्थापन करण्याबद्दल आदेश दिला होता. शस्त्रसाधनेला त्यांनी अुदात्ततेचे अधिष्ठान दिले होते. 'हिंदू लोक शक्तिदेवता कालिमातेची खूण म्हणून शस्त्रांची पूजा करतात' असे शस्त्रपूजनातील वैशिष्ट्य ते सांगत.[५] 'शस्त्र-वादाच्या विचारसरणीस अनुसरून हिंदूंनी फिरून सचेतन व्हावे' अशा शब्दांत ते हिंदूंच्या वीरवृत्तीस आवाहन करीत.[६] या शस्त्रोपासनेमुळे हिंदुराष्ट्र पुन्हा अेकदा विजिगीषू आणि अजिंक्य व्हावे अशी त्यांची अिच्छा होती.[७]

हिंसा-अहिंसेची कसोटी

सावरकरांचा हिंसा-अहिंसा-विवेक अनेक व्यापक वर्तुळांतून संचार करीत करीत अखेर हिंदुहिताच्या मर्यादित वर्तुळात कसा स्थिर होतो हे पाहण्यासारखे आहे. धर्म-अधर्म, न्याय-अन्याय, पाप-पुण्य, शक्यता-अशक्यता, निसर्ग-मानव अशा व्यापक व विविध स्तरांवरून हिंसाअहिंसेचा विचार सावरकरांनी केला आहे. १९४० साली पुणे येथे दिलेल्या अेका व्याख्यानात सावरकर म्हणाले होते, "आत्यंतिक-अहिंसा हा धर्म नसून तो अधर्म आहे. माझ्या राष्ट्राच्या, समाजाच्या व मानव्याच्या नाशास जे कारणीभूत होते ते कधीच धर्म्य होअू शकत नाही."[८] याच वर्षी मदुरा

---

१. Veer Savarkar p. 459. २ स. सा. वा. खंड ४–पृ. ४२९. ३. स. सा. वा. खंड ४–पृ. ४३०. ४. सा. क. पृ. २०६. ५. हिं. रा. द. पृ. १९५. ६. हिं. रा. द. पृ. १९५. ७. हिं. रा. द. पृ. १९५. ८. स. सा. वा. खंड ४–पृ. ५००.

येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनात अहिंसेचा न्यायान्याय दृष्टीने विचार करताना सावरकरांनी सांगितले की, ज्या आत्यंतिक अहिंसावादात अन्याय्य आक्रमणाविरुद्ध केला जाणारा सशस्त्र प्रतिकार त्याज्य ठरविला जातो, ते अहिंसेचे तत्त्वज्ञान अगदीच अव्यवहार्य, मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणे अनीतिमय असेच मानिले पाहिजे.[१] पापपुण्याच्या संदर्भात विचार करता हिंसा-अहिंसा यांबद्दल सावरकरांचा सिद्धान्त असा होता की, आत्यंतिक अहिंसा पाप आहे तर मर्यादित अहिंसा हे पुण्य आहे.[२] 'आत्यंतिक अहिंसा अशक्य आहे' असे सावरकरांचे ठाम मत होते आणि अनेक अुदाहरणांनी आपले मत पटवून देण्याचा ते प्रयत्न करीत.[३] सृष्टीच्या स्वरूपाची मीमांसाही ते 'हिंसा-अहिंसेच्या तत्त्वाधारे करीत. ते सांगत, "अीश्वराने जगाची रचना करताना ती निव्वळ हिंसेवर केली नाही की आत्यंतिक अहिंसेवर केली नाही. या दोघांची गुंफण घालून त्याने सृष्टीची रचना केली आहे. आत्यंतिक अहिंसा ही जगाची स्थिती नव्हे व तत्त्व तर नव्हेच नव्हे."[४] आत्यंतिक अहिंसा ही मानवी जीवनाला घातक असल्यामळेच सावरकर तिचा धिक्कार करीत.[५]

परंतु ह्या विविध, अुच्च स्तरांवरून विहार करणाऱ्या सावरकरांच्या विवेकाला त्यांच्या ठायीची प्रबल हिंदुत्वनिष्ठा कधी खाली खेचत असे आणि मग हिंदुहित हीच हिंसा-अहिंसेची अंतिम कसोटी सावरकर मानीत. ते म्हणत, "सत्याची कसोटी, हिंसेची कसोटी, अहिंसेची कसोटी ही अेंकच असली पाहिजे. ती कसोटी म्हणजे हिंदूंचे कल्याण होअील ते सत्य, हिंदूंचे अकल्याण होअील ते असत्य."[६] हिंदूंच्या कल्याणाच्या या तीव्रतम आकांक्षेत त्यांना मानव्याचाही विसर पडे आणि मग अेका टोकाला जाअून ते सांगत : "जगताचे काय होअील ? मानव्याचे काय होअील ? हे विचार मुख्य नाहीत. तेही विचार आहेत पण ते विचार दुय्यम आहेत. सूर्य गेला तर काय होअील ? सूर्य विझला तर तो विझला म्हणून मला दुःख होणार नाही, तर हिंदूंना प्रकाश मिळणार नाही म्हणूनच मला दुःख होअील."[७]

विरोधकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन

१९३७ नंतरच्या कालखंडात सावरकरांचा, त्यांच्या प्रमुख विरोधकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रामुख्याने हिंदुत्वनिष्ठेतूनच निर्माण झालेला होता. हिंदुत्वा-खेरीज अनेक वैचारिक क्षेत्रांत सावरकर आपल्या विरोधकांचे गुण मुक्त मनाने वर्णन करीत. परंतु सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेला धक्का बसे तेथे त्या विरोधकां-

---

१. हिं. रा. द. पृ. १८९. २. हिं. रा. द. पृ. १९०. ३. स सा. वा. खंड ४–पृ. ५०३, ५०४. ४. स. सा. वा. खंड ४–पृ. ४९१. ५. हिं. रा. द. पृ. १८०. ६. स. सा. वा. खंड ४–पृ. ४९०. ७. स. सा. वा. खंड ४–पृ. ४९०.

बद्दलचा आपला मतभेद ते अत्यंत कडक शब्दांत व युक्तिवादाची सारी आयुधे परजून व्यक्त करीत. या कालखंडात राजकीय क्षेत्रात त्यांचे मुख्यत: दोनच विरोधक होते. अेक महात्मा गांधी व दुसरे पंडित जवाहरलाल नेहरू. या दोन्ही नेत्यांच्या राजकीय कर्तृत्वाबद्दल सावरकरांना आदर होता. म. गांधी यांनी केलेल्या राष्ट्रीय जागृती-बद्दल व विधायक कार्याबद्दल सावरकरांनी अनेकदा प्रशंसोद्गार काढले आहेत. अि. स. १९३७ मध्ये मुक्तता झाल्यानंतर ऑगस्ट महिन्यात सावरकरांनी लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश केला. त्या वेळी केलेल्या भाषणात सावरकर म्हणाले, " आज राष्ट्राची जी प्रगती झाली आहे त्यात म. गांधींच्या विधायक कार्याचा फार मोठा भाग आहे हे मी मोठ्या आनंदाने कबूल करतो."[१] या व्याख्यानानंतर सात-आठ दिवसांनी सोलापूर येथे सावरकरांनी पुन्हा म. गांधींच्या अुपरिनिर्दिष्ट गुणांचा अुल्लेख केला. ते म्हणाले, " म. गांधींच्या विधायक कार्यक्रमांशी माझे पटते. त्यांनी ग्रामोद्योग, अस्पृश्योद्धार या गोष्टी कराव्यात व त्यांच्याशी माझा सहकार आहे."[२] १९३८ मध्ये अजमेर येथील अेका व्याख्यानात म. गांधींनी केलेल्या राष्ट्रीय जागृती-बद्दल (Spirit of National Awakening) सावरकरांनी गौरवोद्गार काढले होते.[३] १९४३ साली म. गांधी आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध असताना त्यांच्या मुक्ततेबद्दल सावरकरांनी केलेले प्रयत्न सर्वश्रुत आहेत. म. गांधींच्या पत्नी सौ. कस्तुरबा ह्या निधन पावल्याचे वृत्त समजताच सावरकरांनी म. गांधींना सांत्वनपर संदेश पाठविला होता.[४]

पं. नेहरू यांच्या स्वराज्यविषयक कल्पना व त्यांचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन यांबद्दल सावरकरांना काही काळ तरी आदर वाटत होता. दुसऱ्या महायुद्धापूर्वी काँग्रेसने जी सत्ता स्वीकारली ती सत्ता म्हणजे खरे स्वराज्य नव्हे, अशी पंडितजींनी केलेली सावधगिरीची सूचना यथायोग्य होती असे सावरकरांचे मत होते.[५] पंडितजींचा स्वराज्यविषयक दृष्टिकोन पाहून त्या वेळी सावरकर म्हणाले होते— " पं. नेहरू हेच मला त्यातल्या त्यात जास्त जवळचे वाटतात. त्यांच्याशी माझे काही थोडे जमले तर जमेल." आंतरराष्ट्रीय जाणीव अुत्पन्न करण्याचे श्रेय सावरकर पंडितजींनाच देतात.[६] १९५८ सालानंतर भारताच्या पूर्व सरहद्दीवर परकीयांच्या आक्रमणाचा धोका वाढू लागताच पं. नेहरू यांनी पूर्व सीमा लष्कराच्या ताब्यात दिली. पंडितजींची ही वृत्ती सावरकरांना अितकी स्वागतार्ह वाटली की, त्यांनी पंडितजींना पत्र लिहून त्यांचे अभिनंदन केले.[७]

---

१. स. सा. वा. खं. ४–पृ. ३६९. २. स. सा. वा. खंड ४–पृ. ३५६. ३. Savarkar and his Times p. 208. ४. Savarkar and his Times p. 306. ५. Savarkar and his Times p. 317. ६. स. सा. वा. खंड ४–पृ. ३६९. ७. Veer Savarkar p. 514.

परंतु हिंदुत्वनिष्ठेला धक्का लागताच गांधी-नेहरूंवर सावरकर कसा कडाडून हल्ला चढवीत ते पाहण्यासारखे आहे. काश्मीरच्या हिंदू राजाने बहुसंख्य मुसलमान प्रजेसाठी राज्यत्याग करावा असे म. गांधींनी सुचविताच तोच अुपदेश हैद्राबाद व भोपाळ संस्थानांच्या मुस्लीम राज्यकर्त्यांना गांधींनी करावा अशी प्रतिसूचना सावरकरांनी केली.[१] हैद्राबाद संस्थानातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरुद्ध सावरकरांनी सुरू केलेल्या लढ्यापासून काँग्रेस अलिप्त राहिली होती. या अलिप्ततेचे मुख्य कारण मुस्लीम अनुनय हेच होते हे सावरकरांनी ओळखले होते. " निजामला अडचणीत आणण्याची आपली अिच्छा नाही." (He did not want to embarrass the Nizam), अशी घोषणा म. गांधी यांनी केली होती;[२] आणि सावरकरांचा खरा मतभेद गांधींच्या मुस्लीम अनुनयाच्या या धोरणासंबंधी होता. कस्तुरबांच्या निधनाबद्दल वाटणारे दु:ख सावरकरांनी जरी व्यक्त केले होते तरी काँग्रेसने कस्तुरबा स्मारकासाठी सुरू केलेल्या फंडाला मात्र त्यांचा कडाडून विरोध होता. कारण हा फंड हिंदूंच्या विरुद्ध अुपयोगात आणला जाअील अशी साधार भीती सावरकरांना वाटत होती. म्हणूनच या फंडासाठी कोण्याही हिंदु-संघटकाने अेक पैदेखील देअू नये असे सावरकरांनी जाहीर केले.[३] हजारो काँग्रेसवाल्या हिंदूंना सरहद्दीपलीकडील मुसलमान पठाणांबद्दल वाटणारी आपुलकी पाहून सावरकर संतप्त होत. याबाबत म. गांधींनी केलेले अेक विधान सावरकरांना नित्य सलत होते. म. गांधी म्हणाले होते की, सरहद्दीवरील पठाणांच्या साहाय्याने निजाम जर स्वतंत्र हिंदुस्थानचा बादशहा बनला, तर आपण त्याच्या राज्यास होमरुल म्हणजे शेकडा १०० टक्के स्वराज्य मानू.[४] मुस्लीम लीगचे सहकार्य मिळविण्याचा सौदा करताना म. गांधींनी असे घोषित केले होते की, संस्थानांसकट सर्व हिंदुस्थानचा कारभार लीगकडे सुपूर्त करण्यास काँग्रेस आडकाठी करणार नाही.[५] म. गांधींची ही हिंदुहितविरोधी घोषणा सावरकरांना अत्यंत विश्वासघातक वाटली होती. 'गांधीवादाच्या अेकंदर चळवळीचा परिणाम हिंदूंना घातक झाला'[६] म्हणूनच सावरकर हे महात्माजींचे कट्टर विरोधक बनले.

पं. नेहरू यांच्या अव्यवहारी राजकारणाबद्दल सावरकर वारंवार विरोधी मत व्यक्त करीतच होते. परंतु पंडितजींनी हिंदुत्वाला व हिंदुराष्ट्रकल्पनेला ज्या ज्या वेळी विरोध केला त्या त्या वेळी सावरकरांनी दिलेले प्रतिटोले अत्यंत प्रखर असेच होते. १९४७ च्या ऑगस्टमध्ये पंजाब व बंगालमध्ये जातीय दंगली अुसळल्या होत्या तेव्हा पं. नेहरू यांनी अशी घोषणा केली की, हिंदुराष्ट्राची स्वप्ने रंगविणाऱ्या हिंदु

---

१. Savarkar and his Times p. 202. २. Savarkar and his Times p. 209. ३. Savarkar and his Times p. 318. ४. हिं. रा. द. पृ. १६८. ५. हिं. रा. द. पृ. २५९. ६. हिं. रा. द. पृ. १९८.

फॅसिस्ट लोकांविरुद्ध लढण्यासाठी वेळप्रसंगी मी राजीनामाही देअीन. हिटलर-मुसोलिनीच्या सर्वनाशक मार्गानिच या हिंदु फॅसिस्टांना जावे लागेल ही गोष्ट त्यांनी चांगली समजून असावी. (He would even resign and fight out the Hindu Fascists who clamoured for Hindu State and he further said that he was sure that those Fascists would go down the way the Hitlers and Mussolinis went.)[1]

पं. नेहरूंच्या वरील विधानास त्याच वेळी मुंबअीच्या 'फ्री हिंदुस्थान' या वृत्तपत्रात सावरकरांनी प्रत्युत्तर दिले होते. या प्रत्युत्तरात सावरकरांनी केलेली पुढील विधाने किती तीक्ष्ण होती हे पाहण्यासारखे आहे : " If Panditji and his Congressite comrades are still safe and secure in their seats, they owe it to this brave fight which the Hindu Sanghatanist and Sikh forces gave in the nick of time.[2] The demand for the Hindu Raj, these pseudo-nationalists say, is communal, stupid, medieval, theocratical, a menace to the progress of mankind itself.... Nevertheless, assuming for the sake of argument that the demand for a Hindu State deserves this condemnation on all these counts, may we ask them : Was not the demand for a Moslem State at least equally condemnable on these very counts ?.....The Hindu Sanghatanist cannot be terrorized by the threat of such carpet knights as the Pandit and his clan."[3]

स्वातंत्र्योत्तर काळात सावरकर व पं. नेहरू यांच्या मतभेदाचे मुख्य विषय तीनच होते. त्यात पाकिस्तानशी भारताने ठेवावयाचे धोरण हा विषय आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा होता. अंतर्गत विषयांपैकी काश्मीर व हैद्राबाद या संस्थानांचे प्रश्न आणि हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा करण्याचा प्रश्न यांना प्राधान्य द्यावे लागेल. हे सर्वच प्रश्न सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेशीच कसे निगडित होते हेच मुख्यत: ध्यानी येते.

हिंदुत्वनिष्ठेतून प्रकटलेली भविष्यवाणी

राजकारणात सावरकरांनी व्यवहारवादाला अधिक प्राधान्य दिले होते. हिंदु-महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या भाषणांतून व्यावहारिक राजकारणाचे महत्त्व ते वारंवार सांगत असत.[4] सत्य व व्यवहार यांच्या आधारावर ते राजकीय घटनांचा अन्वयार्थ लावीत असल्याने अनेकदा त्यांच्या शब्दांना भविष्य-

---

१. Savarkar and his Times p. 359. २. Savarkar and his Times p. 360. ३. Savarkar and his Times p. 361, 362. ४. हिं. रा. द. पृ. १२४, १६७, १८३, १८४, १८८, १९८, २५५, २६०

वाणीची प्रतिष्ठा लाभत असे. राजकीय क्षेत्रात सावरकरांनी जी भविष्ये वर्तविली ती काही काळानंतर खरी ठरल्याचे आढळून आले आहे. त्यांतील वहुसंख्य भविष्ये हिंदुजाती व हिंदुराष्ट्र यांच्या भवितव्याच्या विचारातूनच सांगितली गेली आहेत. १९३७ साली कर्णावती येथे केलेल्या भाषणातून त्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीवावत भयसूचक घंटानाद केला होता. हिंदुस्थानात अस्तित्वात असलेल्या द्विराष्ट्रवादाची स्पष्ट जाणीव या वेळी सावरकरांनी करून दिली होती.[१] हिंदुविरोधी शक्ती वेळेवरच रोखली गेली नाही तर काश्मीरमधील हिंदूंचे भवितव्य भयानक होअील अंसा अिशारा त्यांनी १९३७ साली नागपूर येथे भरलेल्या हिंदुसभा अधिवेशनातच दिला होता. मुसलमान वहुसंख्य असलेला सिंध प्रांत विभक्त होण्याचा प्रयत्न लवकरच सुरू करील याची जाणीव सावरकरांनी तेथील हिंदूना १९३८ मध्येच करून दिली होती.[२] आपण सांगितलेल्या या भविष्यवाणीकडे सिंधमधील हिंदूनी कसे दुर्लक्ष केले व त्याचे परिणाम काय झाले याचे वर्णन १९५३ साली पुणे येथे करताना सावरकर म्हणाले, "सिंधच्या विभागणीपासून मी अिशारे देत आहे. त्या वेळी आमचा सिंध, आमचे मुसलमानभाअी म्हणणारे सिंधी आज रानोमाळ भीक मागत हिंडत आहेत."[३] १९४२ च्या अेप्रिल महिन्यात काँग्रेसच्या वर्किग कमिटीने स्वयं-निर्णयाच्या तत्त्वास मान्यता देताच सावरकरांनी २१–४–१९४२ रोजी अेक निवेदन प्रसिद्ध केले. त्या निवेदनात सावरकर लिहितात, "For the last three years or so I have been publicly warning the Hindus that there was every likelihood that the Congress would servilely surrender to the Moslems on the issue of Pakistan even as it did on the issue of Communal Award."[४] या निवेदनावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, पाकिस्तानची निर्मिती आणि पाकिस्तानच्या निर्मितीस काँग्रेसकडून मान्यता मिळविण्याची शक्यता या दोन्हींवद्दलची सावरकरांची भाकिते खरी ठरली.

१९४३ मध्ये आसामबावत सावरकरांनी असाच धोक्याचा अिशारा दिला होता. वंगाल व ओरिसा प्रांतांतील भटक्या मुसलमानी टोळ्या आसाममध्ये शिरत असून आसाममधील हिंदूंची वहुसंख्या कमी करण्याचा डाव या सामुदायिक प्रवेशा-मागे आहे असे भविष्य सावरकरांनी या वेळी वर्तविले होते.[५] १९४७ च्या अेप्रिल मध्ये सावरकरांनी आसामवावतच्या धोक्याचा पुनरुच्चार केला होता.[६]

शिरगणतीवर वहिष्कार पुकारण्याचे काँग्रेसचे धोरण कसे चुकीचे ठरेल व त्याचे दूरगामी परिणाम काय होतील यासंबंधी सावरकरांनी केलेली भविष्यवाणी

---

१. हिं. रा. द. पृ. ३१. २. Savarkar and his Times p. 208. ३. केसरी १३–१२–१९५३. ४. Savarkar and his Times p. 280.. ५. Savarkar and his Times p. 313. ६. Savarkar and his Times p. 351.

कालांतराने खरी ठरली. 'जाव, आसाम व वंगाल या प्रांतांतून या वंहिष्काराचे परिणाम हिंदूंची संख्या हेतुपुरस्सर घटविण्यात झाले आणि मुसलमानांची संख्या प्रयत्नपूर्वक वाढविण्यात झाले.[१] पुढे याच १९४१ च्या चुकीच्या शिरगणतीच्या आधारावर पाकिस्तानमध्ये समाविष्ट होणाऱ्या मुसलमान वहुसंख्य प्रदेशावावत वाटाघाटी झाल्या आणि हिंदुस्थानचा काही प्रदेश नाअिलाजास्तव पाकिस्तानला देण्याचा प्रसंग हिंदूंवर आला.

मुसलमानांप्रमाणेच ख्रिश्चन मिशनरींच्या भारतातील आक्रमणावावत अनेक धोक्याचे अिशारे सावरकरांनी दिले होते. १९५३ साली पुण्याच्या सभेत त्यांनी 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' ही घोषणा केली होती. व या तत्त्वाच्या आधारे आसाम सरहद्दीवरील नागांचा प्रश्न, काश्मीर संस्थानातील मुसलमानांचा प्रश्न व गोव्यातील ख्रिश्चनांचा प्रश्न यांसंवंधी भविष्यसूचक विवेचन केले होते. नागालॅण्ड, झारखंड अित्यादी मागण्यांतून दिसून येणाऱ्या फुटीर प्रवृत्तीवद्दलही त्यांनी धोक्याचे लाल निशाण दाखविले होते.[२] चीनचा भारतावरील संभाव्य आक्रमणाचा धोका त्यांनी १९५४ मध्येच अेका लेखाद्वारे निदर्शनास आणला होता.[३] पाकिस्तान व अमेरिका यांच्यात शस्त्रास्त्र-विषयक संधी झाल्याची वातमी येताच अचानक ओढविलेल्या या संकटाची सूचना सावरकरांनी दिली आणि भारताने आपले सागरिक सामर्थ्य अधिक वाढवावे असा कळकळीचा संदेश दिला.[४]

सावरकरांची वाणी भविष्याचा वेध ज्या दोन पंखांच्या आधारावर घेत असे त्या पंखांपैकी अेक पंख होता व्यवहारवादाचा आणि दुसरा होता हिंदुहिताचा, हिंदु-राष्ट्र-पुनरुज्जीवनाच्या आकांक्षेचा. त्यांची अनेक राजकीय भविष्ये खरी ठरली असली तरी १९३९ साली त्यांनी केलेले अेक भविष्य, केलेली अेक वल्गना अद्यापि खरी ठरावयाची आहे. त्या वेळी सावरकर म्हणाले होते, " मलाही अेक वल्गना करू द्या ! माझे गाणे मला गाअू द्या ! या जगात आपणाला जर हिंदुत्वाचे मानाचे राष्ट्र म्हणून जगावयाचे असेल, तर तसा आपला अधिकार आहे आणि ते राष्ट्र हिंदुध्वजाखालीच स्थापन झाले पाहिजे. या नाही तरी पुढल्या पिढीत ही वल्गना खरी ठरेल."[५]

या कालखंडातील प्रवृत्ति-प्रेरणांतून निर्माण झालेले साहित्य

१९३७ ते १९६६ या सुमारे तीस वर्षांच्या कालखंडात सावरकरांनी जे साहित्य निर्माण केले त्याची वीजे लेखकाच्या मनोभूमिकेत कशी परिपुष्ट झाली

---

१. Veer Savarkar p. 293. २. Veer Savarkar p. 458. ३. केसरी २६-१-१९५४. ४. केसरी २६-१-१९५४. ५. स. सा. वा. खंड ४-पृ. ५३१.

असावीत याची कल्पना आतापर्यंतच्या विवेचनावरून येअू शकेल. या कालखंडात सावरकरांनी संख्यात्मक दृष्ट्या थोडेच साहित्य निर्माण केले. आत्मवृत्ताचे तीन खंड त्यांनी प्रकाशित केले ते याच काळात. १९४९ मध्ये 'माझ्या आठवणी' हा पूर्वलिखित आत्मवृत्ताचा भाग त्यांनी प्रसिद्ध केला. या आत्मवृत्ताचा काही भाग १९३० पूर्वी 'श्रद्धानंद' साप्ताहिकात प्रसिद्ध झाला होता. परंतु सरकारी निर्बंधामुळे त्याचे प्रसिद्धीकरण थांवले होते. 'पूर्वपीठिका' हा त्यांच्या आत्मवृत्ताचा दुसरा खंड १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. सावरकरांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी भारताची राजकीय परिस्थितो कशी होती, याचे विश्लेषण या खंडात करण्यात आले आहे. आत्मवृत्ताचा तिसरा खंड 'शत्रूच्या शिबिरात' या नावाने त्यांनी १९६५ मध्ये प्रकाशित केला. सावरकर अिंग्लंडला जाण्यापूर्वी त्यांचे राजकीय विचार कसे होते, खुद्द अिंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचे चित्र कोणकोणत्या रंगांनी रंगविले जात होते, आणि शत्रूच्या शिबिरात शिरल्यावर विशिष्ट ध्येयवादाचा प्रचार करण्याच्या दृष्टीने त्यांनी कोणकोणत्या साहित्यसामग्रीची जुळवाजुळव केली, याची माहिती आत्मवृत्ताच्या या खंडात आली आहे. आत्मवृत्ताचे हे तीनही खंड याच कालखंडात प्रसिद्ध झाले याचे कारणही या कालमहात्म्यातच दडलेले आहे. १९४७ नंतर भारत स्वतंत्र झाला होता व स्वत:च्या मनातील राजकीय विचारांचा आणि जीवनातील राजकीय घटनांचा अन्वयार्थ लावण्याचे स्वातंत्र्य सावरकरांना या वेळी लाभले होते.

या कालखंडात सावरकरांनी स्फुट लेखनही फारच थोडे केले. त्यांच्या स्फुटलेखांत मुख्यत: दोन लेख अतिशय गाजले. 'भारतीय पंचांगाचे सूतोवाच' हा त्यांचा विचारप्रवर्तक लेख १९५१ मध्ये 'केसरी' वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला होता.[1] मृत्यूपूर्वी-अवघे दोन-तीन महिने म्हणजे १९६५ च्या डिसेंबरमध्ये 'आत्महत्या आणि आत्मार्पण' या शीर्षकाखाली सावरकरांचा अेक लेख 'सह्याद्री' मासिकात प्रकाशित झाला होता.

याशिवाय 'केसरी'साठी दोन प्रासंगिक लेख त्यांनी लिहिले होते. त्यांपैकी 'तेव्हा स्वातंत्र्यसंपादन, आता स्वातंत्र्यरक्षण' हा लेख त्यांनी 'अभिनव भारता'च्या सांगता समारंभाच्या निमित्ताने लिहिला होता.[2] आणि त्यांचा दुसरा लेख 'सामरिक सामर्थ्याची वाढ हीच आजची निकड' या शीर्षकाखाली 'केसरी'च्या प्रजासत्ताक विशेषांकात प्रसिद्धिला होता.[3]

---

१. केसरी १३-५-१९५१. २. केसरी ११-५-१९५२. ३. केसरी २६-१-१९५४.

'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' हा सावरकरांचा अितिहास समीक्षणात्मक ग्रंथ दोन भागांत प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाचा पहिला भाग १० मे १९५६ रोजी आणि दुसरा भाग अेप्रिल १९६३ रोजी प्रकाशित झाला. बुद्धकाला-पासून तो आंग्लकालाअखेर भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पानांचे वर्णन सुमारे चारशे पृष्ठांच्या या प्रबंधात सावरकरांनी केले आहे.

पहिले ते राजकारण–दुसरे साहित्यकारण

सावरकरांच्या जीवनात राजकारणाला नेहमीच अग्रस्थान होते. साहित्य-कारणाला ते दुय्यम तिय्यम स्थान कसे देत होते हे यापूर्वीच सांगण्यात आले आहे. १९३७ नंतर तर प्रत्यक्ष राजकारणात भाग घेण्याची संधी त्यांना लाभली होती. परंतु सरकारी निर्बंध लादले जाताच साहित्यकारणाच्या दुय्यम कार्याकडे वळावयाचे ही सावरकरांची प्रवृत्ती या कालखंडातही दिसते. सन १९५० च्या अेप्रिल महिन्यात नेहरू-लियाकतअल्ली करार होण्यापूर्वी भारत सरकारने सावरकरांना स्थानबद्ध केले होते. पुढे राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर त्यांना बंधमुक्त करण्यात आले. या राजकीय निर्बन्धकालात सावरकर पुन्हा लेखनकार्याकडे वळले आणि अनेक वर्षे मनात वागविलेला अेक विषय त्यांनी लेखनासाठी निवडला. तो विषय म्हणजे राष्ट्रीय पंचांग हा होय. या विषयावर १९५१ च्या मे महिन्यात 'केसरी' वृत्तपत्रातून त्यांनी दोन लेख लिहिले. १९०७ साली लंडनमध्ये असल्यापासून या विषयावर आपण कसकसा विचार केला याचा त्रोटक आढावा घेअून पुढे सावरकरांनी लिहिले आहे— " .... नंतर क्रांतीच्या झंझावातात झपाट्याने त्या महत्तम कार्याच्या मानाने अगदी गौण असलेला हा भावी पंचांगाचा प्रश्न आमच्या मनाच्या सांधीकोपऱ्यात कुठेतरी जाअून पडला.... तो योग आता आला." [१]

या काळातील ध्येयवाद व साहित्य

राष्ट्रीय पंचांगरचनेमागील सावरकरांचा हेतूही स्वतंत्र भारताच्या प्रशासनाला पूरक असाच होता. आपला हेतू स्पष्ट करताना सावरकरांनी लिहिले होते–" भार-ताच्या महाराज्यात अेकात्मतेची भावना संचरविण्यासाठी आणि त्याचे प्रशासन प्रबळविण्यासाठी असे अेक राष्ट्रीय पंचांग हवे आहे." [२] या राष्ट्रीय हेतूबरोबरच सावरकरांच्या ठायी दृढ झालेला अेकात्म आणि अखंड भारताबद्दलचा विचार या लेखातून दृग्गोचर होतो. पंचांगाचे स्वरूप, कालनिश्चिती यासंबंधी विवेचन करताना प्राचीन नि अखंड भारतीय परंपरा यांचा सावरकरांनी आग्रहपूर्वक अुल्लेख केला

---

१. केसरी १३–५–१९५१. २. केसरी १३–५–१९५१.

आहे.[१] भारताच्या 'प्राचीनत्वाचे, अखंडत्वाचे प्रतीक म्हणून ५००१ वर्षे आरंभावे' असा स्पष्ट निर्णय त्यांनी दिला आहे.[२] हे सर्व विवेचन सावरकरांच्या या कालखंडातील मनोवृत्तीशी सुसंगत होते असेच आढळून येते.

'पूर्वपीठिका' हा आत्मवृत्ताचा चरित्रक्रमाने पहिला असलेला खंड सावरकरांनी १९५७ च्या मार्च महिन्यात प्रसिद्ध केला. या खंडात त्यांनी १८५७ सालानंतरच्या भारतीय राजकारणातील विविध प्रवाहांचे समीक्षण केले आहे. स्वत:च्या 'क्रांतिनिष्ठ राजकीय जीवनाच्या घडणीचा नि त्यातील घटनांचा कार्यकारणभाव विशद करण्यासाठी सावरकरांनी हे समीक्षणात्मक लेखन केले आहे.[३] परंतु हे लेखन त्यांनी ज्या कालखंडात केले त्या कालखंडात प्रबल झालेली त्यांची हिंदुत्वनिष्ठा येथेही आपला प्रभाव गाजविताना दिसते. या काळाकडे अितिहासकाराच्या तटस्थ व वस्तुनिष्ठ दृष्टीने न पाहता हिंदुदृष्टिकोनातूनच सावरकर पाहतात. विशेषत: अखिल भारतीय राष्ट्रीय सभा आणि राष्ट्रीय चळवळीतील मुसलमानांची भूमिका यांसंबंधी त्यांनी जे विवेचन केले आहे, त्यावर १९३७ नंतरच्या सावरकरांच्या राजकीय-विचारांचाच आसर झाल्याचे दिसून येते.[४] काँग्रेसच्या स्थापनेत व देशासाठी त्याग करण्यात हिंदूच अग्रस्थानी कसे होते, हिंदूंमध्येच राष्ट्रैक्याची व देशैक्याची भावना कशी मुरलेली होती, मुसलमानांची या देशाकडे पाहण्याची धर्मशास्त्राधिष्ठित दृष्टी कशी होती, काँग्रेसच्या प्रारंभातच मुसलमानांच्या धर्मीय व जातीय मनधरणीची पाळेमुळे कशी घुसलेली होती अित्यादी मुद्यांसंबंधी सावरकरांनी या ग्रंथात केलेले स्पष्टीकरण त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेचीच साक्ष पटविणारे आहे. हिंदुहिताच्या दृष्टीने लो. टिळकांचे धोरण काँग्रेसच्या चौकटीत बसणारे कसे नव्हते हे पटवून देण्यासाठी त्यांनी 'टिळक-पर्वा'चे केलेले परीक्षण पाहण्यासारखे आहे.[५] १९३७ नंतरच्या कालखंडात सावरकर टिळकांच्या राजकारणातील हिंदुत्वाच्या धोरणावर अधिक भर देअू लागले होते. 'लो. टिळकांना हिंदुत्वाविषयी ममत्व वाटत होते' म्हणूनच १९३७ साली सावरकर टिळकांच्या लोकशाही स्वराज्य पक्षात समाविष्ट झाले होते.[६] 'हिंदूंचे हिंदुत्व अविच्छिन्न नि अबाधित राहिले पाहिजे' हे टिळकांचे ध्येय सावरकरांना प्रिय होते.[७] त्यामुळे 'पूर्वपीठिके'तील टिळक पर्वाचे परीक्षण स्वाभाविकपणेच सावरकरांनी हिंदुत्व दृष्टीने केलेले आहे. हा आत्मवृत्तपर ग्रंथ हिंदुदृष्टिकोनातून लिहिला गेला आहे हे स्वत: सावरकरांनीच मान्य केले आहे. सावरकर लिहितात,

"सन १८५७ च्या क्रांतीचा तात्कालिक अुपशम झाल्यानंतर आणि ब्रिटिश साम्राज्य

---

१. केसरी २०-५-१९५१. २. केसरी २०-५-१९५१. ३. स. सा. वा. खंड १-पृ. ७. ४. स. सा. वा. खंड १-प्रकरण ८ व ९. ५. स. सा. वा. खंड १-पृ. ७६. ६. स. सा. वा. खंड ४-पृ. ३७०. ७. स. सा. वा. खंड ४-पृ. ३७०.

सत्ता हिंदुस्थानभर निर्वेधपणे अधिष्ठित झाल्यानंतर हिंदुस्थानच्या राजकीय अितिहासाचे समीक्षण हिंदुदृष्टिकोनातून आम्ही लिहिलेल्या आमच्या आत्मवृत्ताची 'पूर्वपीठिका' ह्या पुस्तकात अवश्य तितक्या समग्रतेने केलेलेच आहे."[1]

'शत्रूच्या शिबिरा'त हा ग्रंथ सावरकरांनी आपल्या मृत्यूपूर्वी अेकच वर्ष आधी प्रसिद्ध केला होता. रुग्णावस्थेत असलेल्या सावरकरांना या ग्रंथाच्या अुत्तरार्धातील अेका प्रकरणाचे लेखन त्यांचे कार्यवाह श्री. वाळाराव सावरकर यांच्या हस्ते पूर्ण करावे लागले. अिंग्लंडमधील वास्तव्यात सावरकरांनी पाहिलेल्या तेथील राजकीय परिस्थितीची तपशीलवार माहिती या ग्रंथात असल्याने हा ग्रंथ भारताच्या राजकीय अितिहासात महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ मानला जाअील यात वादच नाही. परंतु या ग्रंथातही ज्या स्थळी मुसलमानांच्या भूमिकेसंबंधी विवेचन आले आहे त्या स्थळी सावरकरांची हिंदुहितनिष्ठा पुन्हा अुसळी घेते.[2] अिंग्लंडमधील वास्तव्याच्या काळातच सावरकरांनी लिहिलेली 'लंडनची वातमीपत्रे' आणि १९६५ साली लिहिलेला 'शत्रूच्या शिबिरात' हा ग्रंथ यांची तुलना केली तर या दोन ग्रंथांतील सावरकरांच्या दृष्किोनातील फरक चटकन ध्यानी येतो. हिंदी राष्ट्रैक्याच्या कल्पनेचा पुरस्कार सावरकरांनी 'लंडनच्या वातमीपत्रा'तून अनेक ठिकाणी केलेला आहे,[3] तर 'शत्रूच्या शिबिरात' ह्या ग्रंथात हिंदी राष्ट्रैक्याच्या कल्पनेस वावरण्यास कोठेच मोकळीक देण्यात आलेली नाही.

'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' हा सावरकरांचा ग्रंथ म्हणजे सन १९५२ पासून सावरकरांनी विविध ठिकाणी भारतीय अितिहासावर दिलेल्या व्याख्यानांची लिखित प्रत होय. 'ही व्याख्यानमाला लेखरूपाने लिहून काढावी' अशी प्रकाशकांनी विनंती केल्यामुळे ह्या ग्रंथाचा अवतार झाला.[4] या ग्रंथावरील सविस्तर चर्चा प्रबंधाच्या पुढील विवेचनात येअीलच. येथे अेवढेच सांगावयाचे आहे की, हा ग्रंथ ज्या काळात सावरकरांनी लिहिला त्या काळातील मतांचा, निष्ठांचा, ध्येयाचा परिणाम ग्रंथातील मुख्य विषयाच्या विवरणावर झालेला आहे. 'हा ग्रंथ अितिहासग्रंथ नसून अितिहासग्रंथाचे अेक समीक्षण आहे' असे सावरकरांनी जरी सांगितले असले तरी ते समीक्षण[5] 'हिंदू राष्ट्रीय दृष्टीतून' केलेले आहे हेही ते मान्य करतात.[6]

या ग्रंथाच्या विषयाची बीजे या कालखंडात सावरकरांनी दिलेल्या अनेक व्याख्यानांतून विखुरलेली आहेत. तसेच भारत-पाक फाळणीच्या रूपाने भारतावर

---

१. स. सा. वा. खंड ४–पृ. ९५९. २. शत्रूच्या शिबिरात पृ. ५१–५२. ३. स. सा. वा. खंड ४–पृ. २२, २४, ३०, ३२, ३५. ४. भा. अि. स. सो. पा. प्र. दोन शब्द. ५. स. सा. वा. खंड ४–पृ. ८६८. ६. स. सा. वा. खंड ४–पृ. ६८४, ९२१.

आलेल्या आपत्तीतून या ग्रंथातील विषयाचा प्रपंच करण्यास सावरकर अुद्युक्त झाले असावेत असे वाटते. या ग्रंथाच्या प्रारंभी अितिहासाच्या सोनेरी पानाची जी कसोटी सावरकरांनी सांगितली आहे ती लक्षणीय आहे. सावरकर लिहितात, " कोणत्याही राष्ट्रावर पारतंत्र्यासारखे प्राणसंकट जेव्हा गुदरते, आक्रमक परशत्रूच्या प्रबल टाचेखाली ते स्वराष्ट्र जेव्हा पिचून गेलेले असते किंवा जाअू लागते तेव्हा त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि पराक्रमाची पराकाष्ठा करून स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यातून मुक्त करणारी, त्या पारतंत्र्यातून सोडविणारी आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आणि स्वराज्याचे पुनरुज्जीवन करणारी जी झुंजार पिढी तिच्या, तिला झुंजविणारे जे धुरंधर वीर नि विजयी पुरुष त्यांच्या, त्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वृत्तान्ताचे जे पान, त्या पानास मी येथे सोनेरी पान म्हणून संबोधित आहे."[१]

सोनेरी पानाच्या या कसोटीवर सावरकरांनी भारतीय अितिहासातील चंद्रगुप्त मौर्य काळापासून तो थेट आंग्लाअीच्या अस्तापर्यंतच्या अितिहासाचे समीक्षण केले आहे. ह्या कालखंडात ज्या झुंजार पिढ्यांनी परकीय शत्रूंशी झुंज दिली त्या सर्व पिढ्या हिंदुराष्ट्रविमोचक होत्या असा सावरकरांचा दावा आहे.[२] त्यांच्या मते चंद्रगुप्त-चाणक्य यांचे ध्येय अखिल नि अखंड भारतीय साम्राज्य स्थापन करावयाचे होते आणि त्यांना अुद्दंड म्लेच्छांचे पारिपत्य करावयाचे होते.[३] याच ध्येयाचे सूत्र पुढील पिढ्यांनी कसे चालविले होते हे सावरकरांनी सोदाहरण दाखविण्याचा प्रयत्न या ग्रंथात केलेला आहे. सावरकरांचा हाच विचार वीजरूपाने त्यांनी १९३७ साली कर्णावती येथील हिंदुसभेच्या अधिवेशनात केलेल्या अध्यक्षीय भाषणात आढळून येतो. या भाषणात त्यांनी हिंदुराष्ट्र विमोचकांपैकी चंद्रगुप्त, विक्रमादित्य, शालिवाहन, यशोधर्मन, शिवाजी, पेशवे अित्यादी वीरवरांचा अुल्लेख करून पुढील निष्कर्ष सांगितला आहे :– " आपणांला मोठमोठ्या राष्ट्रीय अुत्पातांना तोंड द्यावे लागलेले आहे. पण प्रत्येक वेळी आपण वर अुठलो आणि त्या उत्पातांना मागे हटविले.[४]"

१९४७ मध्ये भारताची फाळणी झाली नसती आणि सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा प्रबळ राहिली नसती तर आंग्लाअीच्या अस्ताचे सहावे सोनेरी पान लिहून त्यांच्या लेखणीने पूर्णविराम दिला असता; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही सावरकरांच्या दृष्टीने हिंदुराष्ट्रविमोचक पिढीचा झगडा संपलेला नव्हता. फाळणीमुळे भारताचा जो प्रदेश पाकिस्तानच्या अधिसत्तेखाली गेला होता तो पुनरपि मुक्त करण्याची आकांक्षा त्यांच्या हृदयात नित्य वास करीत होती आणि ही आकांक्षा पूर्ण करण्याचे आवाहन ते हिंदुराष्ट्राला करीत होते. सन १९५२ मध्ये 'अभिनव भारता'च्या

---

१. स. सा. वा. खंड ४–पृ. ५८४. २. स. सा. वा. खंड ४–पृ. ५८६.
३. स. सा. वा. खंड ४–पृ. ६२३. ४. हिं. रा. द. पृ. ३५.

सांगता समारंभाच्या वेळी केलेल्या भाषणात सावरकरांनी वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन हिंदू पिढ्यांना हीच चेतावणी दिली होती. त्या भाषणात सावरकर म्हणाले, " . . . . आमची पुण्यक्षेत्रे आज स्वतंत्र, मुक्त, शुद्ध झाली आहेत. . . . . आमची पुण्यतीर्थेही, ह्या आमच्या राष्ट्रीय पुण्यसरिताही ह्या भारतीय महाराज्यात आज विमुक्त आणि विशुद्ध होऊन सामावलेल्या आहेत– पण ह्या पुण्यसरितांत सिंधू का दिसत नाही ! सिंधू कोठे आहे ? हाय ! हाय ! ह्या पुण्यसरितांतील पुण्यतम सरिता जी सिंधू ती मात्र अद्यापि ह्या महाराज्यात सामावलेली नाही. सिंधू आम्हांस अजूनही अंतरलेली आहे. . . . त्या सिंधूस आम्ही विसरू ? सिंधूवाचून हिंदू ! – अर्थावाचून शब्द ! प्राणावाचून कुडी ! अशक्य, अशक्य ! जोवर अेकतरी हिंदू जिवंत आहे तोवर तो सिंधूस विसरणे शक्य नाही ! . . . . अितर कोणीही जरी अेक वेळ विसरले तरी हे स्रोतस्विनी सिंधू, हा आमचा अेकटा महाराष्ट्र अुठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावाचून राहणार नाही."[1]

आणि ६ सप्टेंबर १९६५ रोजी भारतीय सैन्य पाकिस्तानच्या भूमीवर पाय रोवून लाहोरच्या दिशेने दौडू लागताच सावरकरांना अतोनात आनंद झाला. या दिवसाचे 'सातवे सोनेरी पान' म्हणून त्यांनी वर्णन केले. सावरकरांचा हा अेकच अुद्‌गार त्यांच्या 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' या ग्रंथाच्या रचने-मागील हेतूची स्पष्टता करण्यास पुरेसा आहे.

आत्मसमर्पणामागील ध्येयवाद

या कालखंडात मृत्यूचे विचार सावरकरांच्या मनात अनेकदा येत असत. परंतु मृत्यू कसा यावा याबद्दल सावरकरांनी केलेल्या कल्पनांवरही या कालखंडातील ध्येयवादाचा परिणाम झाल्याचे दिसून येते. १९३७ सालापूर्वी सावरकरांचे लक्ष केंद्रित झाले होते ते हिंदूंतील जातिभेदाचे निर्दालन करण्याकडे ! त्यामुळे त्या कालखंडात मृत्यूबद्दलचे विचारही ते याच ध्येयवादाच्या संदर्भात करीत. १९२८ साली 'समता' नावाच्या वृत्तपत्रात सावरकरांनी लिहिले होते : " माझ्या प्रेतास ब्राह्मण, मराठा, महार आणि डोंब, अशा माझ्या सर्व हिंदू बंधूंनी खांदा देअून अस्पृश्यता आणि जातिभेद मेला असे दाखविले तर माझा आत्मा सुख पावेल."[2]

१९३७ सालानंतर सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा, त्यांचे हिंदुराष्ट्र प्रस्थापनेचे ध्येय यांना बाह्य परिस्थितीनुसार अुत्कटता प्राप्त झाली होती. पाकिस्तान निर्मिती-मुळे त्यांच्या या निष्ठांना विलक्षण पीळ भरला गेला होता. त्यामुळे या काळात

---

१. स. सा. वा. खं. ८ पृ. ४७९, ४८७, ४८१. २. जाति. नि. पृ. ३३०.

सावरकरांच्या मनात आलेले मृत्यूबद्दलचे विचारही याच ध्येयवादाच्या छायेत वावरताना दिसतात. नेहरू-लियाकत कराराच्या वेळी सावरकरांना स्थानबद्ध करण्यात आले होते. या वेळी त्यांच्यावर घालण्यात आलेले निर्बंध १९५० च्या जुलै महिन्यात दूर झाले. त्यानंतर अेका प्रकट सभेत भाषण करताना सावरकर म्हणाले, " पाकिस्तानच्या आक्रमणापासून भारताचे संरक्षण करताना मला मृत्यू यावा अेवढीच माझी अंतिम अिच्छा आहे." [१]

१९५६ साली जोधपूर येथे भरलेल्या हिंदुसभेच्या अधिवेशनात सावरकरांनी पुन्हा अेकदा आपली मरणोत्तर इच्छा व्यक्त केली. ते म्हणाले, " I am now infirm and have one foot in the grave. If after my death you set up any memorial over my ashes and write any epitaph I would like you to prefer ' Savarkar, the organiser of Hindus ' to ' Swatantryaveer Savarkar ' on it. For all my efforts towards independence were intended to achieve Hindu unity and to establish a strong independent Hindu nation.[२] स्वातंत्र्यवीरापेक्षा हिंदुसंघटक हा शब्द सावरकरांना अधिक जवळचा व गौरवाचा वाटत होता ही गोष्ट या काळातील त्यांच्या ध्येयवादाची निदर्शक नाही का ?

१९६५च्या अखेरीस सावरकरांना मृत्यूची चाहूल स्पष्टपणे अैकू आली होती. पुन्हा अेकदा आयुष्याच्या अितिकर्तव्याची रूपरेखा सुस्पष्टपणे मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारताची स्वतंत्रता व हिंदुराष्ट्राची प्रस्थापना ही दोन ध्येये त्यांनी आयुष्यभर अुरी कवटाळली होती. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय साकार झाल्याचे पाहून सावरकर स्वत:ला कृतार्थ समजत होते. परंतु हिंदुराष्ट्रप्रस्थापनेचे त्यांचे ध्येय अद्यापिही अपूर्णच राहिले होते. तथापि त्या वटवृक्षाचे बीज रुजविण्याचे, त्या बीजातील स्फूर्तीची आणि वलगनेची जाणीव करून देण्याचे कर्तव्य त्यांनी केले होते. कर्तव्याचे हे समाधान त्यांच्या गाठी होते. 'आपल्या या जीवनकार्याची सापेक्षत: परिपूर्णता झाली आहे अशी आत्मसंतुष्टता ' त्यांच्या ठायी आली होती. अशा वेळी वार्धक्याने आणि व्याधीने स्वत:ला केवळ भारभूत झालेल्या देहाचे प्रायोपवेशनाने त्यांनी विसर्जन केले, आत्मसमर्पण केले.

---

१. Veer Savarkar p. 441. २. Veer Savarkar p. 499.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व

आत्मचरित्र – व्यक्तिमत्त्व दर्शनाचे सर्वोत्कृष्ट साधन

"Every man's life may be best written by himself." हे डॉ. जॉन्सन यांचे अुद्‌गार[१] व्यक्तिदर्शनाचा विचार करताना फार महत्त्वाचे ठरतात. अेखाद्या व्यक्तीचे जीवन त्याच्या मित्रांनाच काय पण आप्तस्वकीयांनाही कळणे फार कठीण असते. म्हणूनच गोविंदाग्रजासारखा कवी 'यावज्जीवहि काय मी न कळले आप्ताप्रती नीटसे । मित्रांतेहि कळे न गूढ ।' असे अुद्‌गार काढतो.[२] चरित्र-विषय झालेल्या व्यक्तीच्या व्यक्तित्वाचे प्रामाणिक चित्रण करण्याचा प्रयत्न चरित्रातून केला जातो हे खरे. किंबहुना चरित्राच्या लेखनाचा हेतूच तो असतो. "The aim of biography is the truthful transmission of personality."[३] मोर्वाचे हे अुद्‌गार बव्हंशी खरे मानले तर आत्मचरित्र हे चरित्रविषय झालेल्या व्यक्तीच्या व्यक्तिदर्शनाचा अस्सल पुरावा असतो, हे विधान अधिक सत्य मानले पाहिजे. अथवा कोटिक्रमाने असे म्हणता येअील की, "If according to Andre Maurois, biography gives us truth convincingly, autobiography aught to do it yet more convincingly, for.....it is first hand information."[४]

चरित्रविषय झालेल्या व्यक्तीचे चित्रण करताना चरित्रकाराला त्या व्यक्तीच्या मुख्यतः कृतिसंबद्ध व परिस्थितिजन्य पुराव्यावर अवलंबून राहावे लागते. व्यक्तीच्या त्या कृतीमागील विचारविकारांचे चित्रण करणे त्याच्या मर्यादेच्या बाहेरचे असते. त्यामुळे त्या व्यक्तीचे आंतरजीवन अशा चरित्रातून प्रकट होअू शकत नाही. ते खरे आंतरजीवन त्या व्यक्तीने स्वतःच प्रकट केले तरच प्रकट होअू शकेल, अन्यथा नाही. म्हणून डॉ. नाअीक यांचे "Especially the inner life, wnich is the real life, can best be revealed by the individual himself," हे विधान यथार्थ मानावे लागते.[५]

---

१. A Boswell James, The life of Samual Johnson p. 1. २. माझा मृत्युलेख – वाग्वैजयंती. ३. Aspects of Biography p. 71. ४. Art of Autobiography – p. 15. ५. Art of Autobiography p. 15.

प्रत्यक्ष पुरावा आणि व्यक्तीच्या अंतरंगाचे यथार्थदर्शन या दोन प्रमुख गुणांमुळे चरित्रापेक्षा आत्मचरित्र हे व्यक्तिदर्शनाचे सर्वोत्कृष्ट साधन ठरते. आत्मचरित्रातूनच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अुत्कृष्टपणे प्रकट होते हा विचार आता सर्वमान्य झाला आहे. पुढील काही टीकाकारांच्या साक्षी वरील विचाराचाच पाठपुरावा करतात. आत्मचरित्रातूनच मनुष्याचे खरेखुरे व्यक्तिमत्त्व प्रकट होते असे प्रा. अ. म. जोशी यांचे मत आहे.[1] प्रसिद्ध हिंदी साहित्यिक जैनेन्द्रकुमार यांनीही याच संदर्भात आत्मचरित्राचे स्वरूप स्पष्ट करताना 'आत्मदानका ही रूप', 'अपनी अनुभूतियोंका समर्पण' अशी शब्दयोजना केली आहे.[2] आत्मचरित्रकाराच्या व्यक्तिमत्त्वाचे भरभक्कम मानसशास्त्रीय पुरावे किंवा कागदपत्रे म्हणजेच आत्मचरित्रे होत असा निर्वाळा डब्ल्यू. अेच. डन याने दिला आहे.[3] (Autobiographies are psychological documents of greatest importance.) ऑर्थर मेलव्हिली क्लार्क यांनी आत्मचरित्राचे वर्णन करताना " It is not the scientific record, but a work of art, an expression of personality " असे स्पष्टच म्हटले आहे.[4] डॉ. डी. जी. नाअीक यांनाही हेच मत मान्य आहे. आत्मचरित्राच्या हेतूसंबंधी विवेचन करताना त्यांनी म्हटले आहे : " Autobiography is a work entirely devoted to this purpose – the purpose of revealing the inner self or the personality of the individual writer. "[5]

सावरकरांच्या चरित्रग्रंथाचे ओझरते दर्शन

सावरकरांनी जे चरित्रवाङ्मय लिहिले आहे ते बव्हंशी आत्मचरित्रपरच आहे. 'सावरकर आत्मचरित्र' अर्थात 'माझ्या आठवणी', 'माझी जन्मठेप', आणि 'शत्रूच्या शिबिरात' हे त्यांचे तीन आत्मचरित्रपर ग्रंथ होत. 'आत्मचरित्रा'त त्यांनी आपल्या जन्मापासून १९०२ पर्यंतच्या आठवणी समाविष्ट केल्या आहेत. 'जन्मठेपे'त १९१० ते १९२४ पर्यंतचा अंदमान, रत्नागिरी व येरवडा येथील कारावासाचा वृत्तान्त दिला आहे. १९०२ ते १९१० पर्यंतच्या जीवनवृत्तान्ताचे लेखन सावरकरांनी सलग, सुसंगत लिहिलेले नाही. या कालखंडातील जीवनस्मृतींचे धागे सावरकरांनी जरी घट्ट वळून ठेवलेले नसले तरी त्यांचे काही सुटे, सैल, विस्कळित पदर आढळतात. 'केसरी' व 'मंदार' या नियतकालिकांच्या १९६१ सालच्या दिवाळी अंकांतून आणि 'लंडनची वातमीपत्रे' व 'शत्रूच्या शिबिरात'

---

१. चरित्र–आत्मचरित्र २. जैनेन्द्रका विचार पृ. १०८. ३. चरित्र आत्मचरित्र पृ. १२६. ४. Autobiography its Genesis and Phase. ५. Art of Autobiography p. 12.

या पुस्तकांतून त्यांच्या जीवनस्मृतीचे कांही विस्कळित धागे विखुरलेले आहेत. 'अंदमानच्या अंधेरीतून' या पत्रसंग्रहामधून अंदमानातील आठवणी प्रकाशात आल्या आहेत. पण त्यात स्मृतिचित्रांपेक्षा मनश्चित्रांना अधिक महत्त्व आहे. या सर्व आत्मचरित्रपर ग्रंथांतून आणि पत्रांमधून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.

सावरकरांनी लिहिलेले चरित्रपर असे दोनच ग्रंथ अुपलब्ध आहेत. 'जोसेफ मॅझिनी–आत्मचरित्र नि राजकारण' हा १९०७ मध्ये प्रसिद्ध झालेला त्यांचा ग्रंथ म्हणजे मॅझिनीच्या आत्मचरित्रपर अिंग्रजी लेखांचा अनुवाद आहे. त्या ग्रंथाला प्रारंभी जोडलेली 'भाषांतरकर्त्याची प्रस्तावना' अेवढीच सावरकरांच्या स्वतंत्र लेखनकर्तृत्वाची साक्ष आहे. 'तेजस्वी तारे' हा व्यक्तिपरिचयात्मक ग्रंथ म्हणजे रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात सावरकरांनी 'श्रद्धानंद' पत्रात लिहिलेल्या लेखांचा संग्रह होय. सावरकरांचा चरित्रवाङ्मय-प्रपंच हा अेवढाच आहे.

व्यक्तिवैशिष्ट्याने रंगलेला ग्रंथनिर्मितीचा अितिहास

या चरित्रात्मक ग्रंथातून सावरकरांचे व्यक्तिमत्त्व कसे प्रतिबिंबित झाले आहे ते पुढे विस्ताराने पाहावयाचे आहे. परंतु या ग्रंथनिर्मितीचा अितिहास त्या ग्रंथजनकाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाने कसा रंगलेला आहे हे पाहणेही मोठे अुद्-बोधक ठरेल. बंदी, जप्ती, धरपकड, स्थानबद्धता, अप्रसिद्धी यांची प्रदीर्घ कहाणी म्हणजे सावरकरांचे जीवन होय. या सर्वांचा परिणाम त्यांच्या ग्रंथनिर्मितीवरही झालेला आहे. राजप्रकोपाच्या अग्निदिव्यातून पार पडावे लागले नाही असा सावरकरांचा ग्रंथ विरळा. त्यांची दोन्ही आत्मवृत्ते या नियमाला अपवाद नव्हती. 'माझ्या आठवणी' त्यांनी रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात लिहिल्या.[1] पहिली दोन प्रकरणे 'हुतात्मा श्रद्धानंद' या वृत्तपत्रात त्यांनी प्रसिद्धही केली. परंतु सरकारची वक्रदृष्टी त्यांच्याकडे वळली आणि रत्नागिरीच्या कलेक्टरांनी सावर-करांना बजाविले की, "तुम्ही आत्मवृत्त लिहिणे हे सरकारला आक्षेपार्ह वाटते, मग ते प्रसिद्ध होण्याची गोष्टच दूर."[2] या अिशाऱ्याबरोबर झडत्याही झाल्या आणि सावरकरांच्या या आत्मवृत्ताच्या आधीच लिहिलेल्या भागासही अिंग्रज सरकारच्या हाती पडू नये म्हणून अज्ञातवासाच्या भुयारात दिवस कंठावे लागले. या आठ-वणींना प्रसिद्धीच्या प्रकाशात येण्यास १९४९ साल अुजाडले.

'माझी जन्मठेप' ही अंदमानची कथा ओठावर येत असताही ओठाबाहेर पडू शकत नव्हती. 'त्या अंधेऱ्या दिवसांची स्मृती अुजेड दिसताच सुकून जाअू

---

१. मा. आ. – निवेदन, पृ. ४. २. मा. आ. निवेदन, पृ. ४.

पाहात' होती. परिस्थिती तिचा पाय मागे हिसडून खेचत होती. रत्नागिरीच्या तुरुंगात आकारास आलेल्या या ग्रंथासंबंधी सावरकर लिहितात, "विलायतेत धरलो गेलो तेव्हापासून रत्नागिरीस येअीपर्यंतची माझ्या कारावासाची कठोर कथा संकलित रूपाने मनातल्या मनात रचण्यास आरंभ केला. ग्रंथ कागदावर लिहावा तसा मनात लिहून त्याचे भाग, प्रकरणे आणि मुख्य घटना क्रमवार पाठ करून टाकल्या. त्या सांगावयाच्या कशा ते स्मृतीस चालना देअून, फुटकळ गोष्टी शक्य तो अेकाग्र चित्ताने आठवून ते मनास पान पान वाचून दाखविले. पुढे प्रसंग साधून काम करीत बसे. त्याच्या आजूबाजूच्या लाल विटांच्या तुकड्यातुकड्यांनी मनास समजेल अशी मुख्य विधेयांची टिपणे चिऱ्यावर आणि.... कोरून वा रंगवून ठेवली. दोन-तीन महिने हे काम जोरात चालले होते. त्याच शिलालेखी टिपणांची आणि स्मृति-लिखितांची हा 'जन्मठेपी'चा आज प्रसिद्ध होणारा ग्रंथ ही कागदी विस्तृत आवृत्ती आहे."[१] हा ग्रंथ १९२६ मध्ये प्रसिद्ध झाला. 'कारावासाची ही कठोर कथा' पुस्तकरूपाने प्रसिद्ध होण्यापूर्वी तिचे काही भाग 'केसरी'तून क्रमशः प्रसिद्ध झाले. आणि खंडशः प्रसिद्ध झालेल्या या भागांच्या आधारावर पुढे 'माझी जन्मठेप' या पुस्तकाची अुभारणी झाली. या पुस्तकाचे गुजराथी भाषांतर होअून ते प्रसिद्ध होण्याची सर्व तयारी झाली होती. अितक्यात मूळ मराठी पुस्तकच सरकारने जप्त करून टाकले.[२]

'जोसेफ मॅझिनी–आत्मचरित्र आणि राजकारण' या ग्रंथाच्या जन्माची कथाही अशीच विलक्षण आहे. अिंग्लंडमधील वास्तव्याच्या पहिल्या सहा महिन्यांत म्हणजे ख्रि. १९०६ मध्ये मॅझिनीच्या अिंग्रजी अनुवादित लेखांचे मराठी भाषांतर सावरकरांनी पूर्ण केले आणि ते प्रसिद्ध करण्यासाठी ज्येष्ठ बंधू श्री. बाबाराव सावरकर यांच्याकडे हिंदुस्थानात धाडून दिले.[३] पुढे ह्या भाषांतराच्या प्रकाशकत्वाचा धोका पत्करूनही ते पुस्तक अवघ्या २।३ महिन्यांत छापून देशवीर बाबाराव सावरकर यांनी ख्रि. १९०७ मध्ये प्रसिद्धिले.[४] पुस्तक प्रसिद्ध होताच त्याचे स्वागतही प्रचंड प्रमाणावर झाले. 'काळ'कर्ते परांजपे यांनी या पुस्तकाचा परामर्श घेणारा स्वतंत्र अग्रलेख लिहिला.[५] सर्वसामान्य वाचकवर्गातही हे पुस्तक त्या वेळी अितके लोकप्रिय झाले की काही काही गावांतून 'शिवलीलामृत', 'हरि-विजय', 'राम-विजय' प्रभृती धार्मिक ग्रंथांप्रमाणे या ग्रंथास पालखीतून मिरविण्यात आले आहे.[६] या पुस्तकाची पहिली आवृत्ती हातोहात अुडाली. पण लवकरच ग्रंथकर्त्याप्रमाणे

---

१. माझी जन्मठेप पृ. ५१२. २. सावरकर चरित्र (कथन) पृ. ५६१. ३. जो. मॅ.–भा. छो. आत्म. पृ. १–२. ४. जो. मॅ.–भा. छो. आत्म. पृ. २. ५. जो. मॅ.–भा. छो. आत्म. पृ. ३. ६. जो. मॅ. – भा. छो. आत्म. पृ. ३.

या ग्रंथासही जप्तीच्या बेडीने बद्ध करण्यात आले. जप्तीच्या काळातही अेखाद्या धर्मग्रंथाप्रमाणे पिढीमागून पिढी त्याची पारायणे करीत आली.[1] अखेर १९४६ मध्ये अधिकारावर आलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने ह्या पुस्तकावरील बंदी अुठविली.

'तेजस्वी तारे' यातील व्यक्ति-परिचयात्मक लेख स्वत: सावरकरांनी आपले नाव-नाते प्रकट न करता 'श्रद्धानंद' साप्ताहिकात प्रसिद्ध केले. यातील अेका लेखामुळे ('पाहिजे तर शस्त्राचारी म्हणा, पण अत्याचारी नव्हे', पृ. ५०) 'श्रद्धानंद' पत्र सरकारने बंद पाडले. अशा रीतीने या पुस्तकालाही प्रसिद्धीपूर्वीच बंदीचा शाप भोगावा लागला.

'अंदमानच्या अंधेरीतून' ह्या पुस्तकातील 'सर्व पत्रांवर सरकारी कारा-गृहातील कठोर परीक्षणाच्या सोळा संस्कारांचे मुद्रांकन होअून ती बाहेर पडलेली आहेत'.[2] सावरकरांच्या चौदा वर्षांच्या कारावासातील अनेक यातनांची व अुद्वेगांची मनश्चित्रे या पत्रातील पानोपानी अुमटलेली आहेत.

बंदी, जप्ती, धरपकड, अप्रसिद्धी अित्यादी शापांनी शापित झालेले सावर-करांचे हे चरित्र-आत्मचरित्रात्मक वाङ्मय पाहिल्यावर स्मरण होते ते सावरकरांच्याच 'अु:शाप' नाटकातील नटीच्या अुद्गारांचे. नाटकाच्या पहिल्याच अंकातील पहिल्याच प्रवेशात नटी म्हणते, "आक्षेपाच्या प्रबल शापाचे वज्राघाताखाली विनायकाच्या लेखणीची देवकीच्या देववंद्य कुसव्यासारखी करुणास्पद स्थिती झालेली आहे. देवकीची देदीप्यंमान अपत्यं, जशी अुपजताच मृत्यूच्या जबडयाच्या थडग्यात पुरून टाकली जात, तशीच त्या लेखणीच्या अपत्यांची स्थिती आजवर झाली असून, योगायोग अेखाद्या काळपुरुषाप्रमाणे त्यांस अुपजताच विस्मृतीच्या अतल पातालात ढकलून देत आलेला आहे."[2]

नटीच्या वरील अुद्गारांतून सावरकरांच्या बहुतेक वाङ्मयावर त्यांच्या जन्मदात्याच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा किती परिणामकारक ठसा अुमटला आहे हे लक्षात येते. त्यांचे चरित्रात्मक वाङ्मयही त्याला अपवाद नाही हे आपण सोदाहरण पाहिले. आता त्यांच्या चरित्रात्मक वाङ्मयाच्या अंतरंगावर ह्या लेख-काचे व्यक्तिमत्त्व कसे प्रभाव गाजविते हे विस्ताराने पाहावयाचे आहे. ते पाहताना सावरकरांच्या आत्मचरित्रात्मक, चरित्रात्मक, पत्रात्मक वाङ्मयातून प्रकट होणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध प्रथम घ्यावयाचा आहे. आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार आत्माविष्काराचे साधन कसा होतो व त्यातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व कसे

---

१. जो. मॅं. – भा. छो. आत्म. पृ. ४. २. अु:शाप पृ. २.

प्रकट होते हे आपण पाहिले. पत्रवाङ्मयातूनही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार सहजपणे होत असतो. 'पत्र म्हणजे व्यक्तिमनाचे स्वाभाविक जिव्हाळ्याने ओथंबलेले असे सहजरम्य स्वरूपाचे अेक भावनात्मक स्फुरण असते.' किंबहुना पत्रवाङ्मयात अितर विविध अंगांपेक्षा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वालाच अधिक महत्त्व असते. पत्रवाङ्मयाची वाङ्मयीन महत्ता पत्र लिहिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते ती यामुळेच.

व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ?

आत्मचरित्र – चरित्र – पत्र – आठवणी – आख्यायिका या वाङ्मयातून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यापूर्वी 'व्यक्तिमत्त्व' या शब्दाची व्याप्ती निश्चित करून घेतली पाहिजे. अशी निश्चिती करताना यासंबंधात काही ख्यातनाम लेखकांनी केलेल्या प्रयत्नांचा मागोवा घेणे अिष्ट ठरेल.

अनेक मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वाच्या (Personality) व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. नॉर्मन अेल. मन या मानसशास्त्रज्ञाने, " Psychology " या आपल्या प्रबंधात पुढील व्याख्या दिली आहे : " Personality may be defined as the most characteristic integration of an individual's structures, modes of behaviour, interests, attitudes, capacities, abilities and aptitudes – especially when considered from the stand point of adjustment in the social situations. "[१]

" Foundations of psychology " या ग्रंथात व्यक्तिमत्त्वासंबंधी विवेचन करताना लिहिले आहे की, " Personality can be described only in terms of behaviour of individual–his acts, postures, words and thoughts. "[२]

वरील दोन मानसशास्त्रीय व्याख्यांवरून व्यक्तिमत्त्वात शरीराची ठेवण, वाचण्या-बोलण्याच्या विविध तऱ्हा, आवडी-नावडी, कर्तृत्व आणि कृती, हितसंबंध, प्रवृत्ती, मते अित्यादी घटकांचा समुच्चय होतो हे लक्षात येते.

वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व निश्चित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न मराठी टीकाकारांनीही केल्याचे आढळून येते. 'डॉ. केतकर चरित्र, व्यक्तित्व आणि वाङ्मय' यांचा अभ्यास करताना डॉ. द. न. गोखले यांनी असा साक्षेपी प्रयत्न केला आहे. कोणकोणत्या बाबी व्यक्तित्वाच्या कक्षेत येतात हे सांगताना डॉ. गोखले लिहितात, " पोषाख व शरीराची ठेवण यांचा समावेश व्यक्तित्वात होतो. बोलण्या-चालण्यातल्या लकबी, वक्तृत्वाची तऱ्हा, वाचनाची तऱ्हा, घरादारात वागण्याची तऱ्हा

---

१. Psychology p. 193. २. Foundations of Psychology.

या बाबी व्यक्तिमत्त्वाच्या कक्षेत येतात. खाण्या-पिण्याच्या, कपडयालत्त्यांच्या, खेळांच्या, करमणुकीच्या वगैरे आवडी-नावडी आणि व्यसने यांचा अंतर्भाव व्यक्तिमत्त्वातच करावा लागेल.... रागद्वेष म्हणजे व्यक्तिमत्त्वाचेच अेक अंग होय. रागीटपणा, अुमेदपणा, कामुकपणा, विक्षिप्तपणा, भ्याडपणा, शूरपणा वगैरे गुणावगुण ही स्वभावाची वैशिष्टये होत व स्वभाव हा व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग होय. प्रतिभा, प्रज्ञा, स्मृती, धारणा, व्यासंग, चिंतनशीलता अित्यादींचा संबंध मेंदूशी किंवा डोक्याशी आहे व ती सर्व व्यक्तित्वाच्या प्रदेशात सामावली जातात. माणसाची जीवनात काही भूमिका ठरलेली असते. त्याच्या समग्र जीवनौघाचे नियंत्रण काही विशिष्ट गोष्टींकडून होत असते. तेव्हा त्यांचा निर्देश व्यक्तित्वाच्या विवेचनात अवश्य झाला पाहिजे.... अेवढचा सर्व बाबी म्हणजे व्यक्तित्व, असे मानसशास्त्रात न शिरता म्हणावयास हरकत नाही."[1]

कवीच्या व्यक्तित्वाची व्याख्या करताना डॉ. के. ना. वाटवे यांनी आपली मानसशास्त्रीय बैठक न सोडता ती व्याख्या शक्यतो अधिक रेखीव करण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाच्या जात्याच अुत्कट व अनुत्कट सहज प्रेरणा (Instincts), त्याच्या या विशिष्ट मनोरचनेला विशिष्ट अनुभवांनी येणारा पक्केपणा, त्यांतून त्याची बनणारी मते, ग्रह किंवा भावबंध (Sentiments) अित्यादी गोष्टींचा विचार डॉ. वाटवे यांनी व्यक्तित्वाच्या घडणीत केला आहे. कवीच्या व्यक्तित्वाचा विचार करताना त्याच्या मनाची अुत्कट भावनात्मकता व कल्पनाशक्ती या दोन गोष्टी विशेष जमेस धरल्या पाहिजेत असे ते आवर्जून सांगतात. अशा शास्त्रीय व साहित्यिक बाजूंनी विचार केल्यावर व्यक्तिमत्त्वाची व्याख्या डॉ. वाटवे पुढील शब्दांत करतात :– " जगातील विविध घटनांचा, व्यक्तींचा व प्रसंगांचा अनुभव घेत असता कवीच्या मनाचा जो अेक विशिष्ट समुच्चयात्मक बनाव होतो त्याला – त्या ठसठशीत वेगळ्या मनोरचनेला कवीचे व्यक्तित्व (Personality) म्हणतात. याच व्यक्तिमत्त्वात त्याची धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक मते, त्याचे विद्याकलाज्ञान व त्याच्या अितर वैयक्तिक आवडीनिवडी मुरून राहिलेल्या असतात."[2]

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी कवीच्या व्यक्तिमत्त्वात 'कवीच्या निष्ठा, श्रद्धा, आशा-आकांक्षा, त्याचे ध्येय, त्याच्या मनोवृत्तीच्या विविध छटा,' यांचा समावेश केलेला आहे.[3]

वरील सर्व मते सावरकरांचे व्यक्तित्व ठरविताना विचारात घ्यावयाची आहेत. तीन आत्मवृत्ते, दोन पत्रसंग्रह, आत्मचरित्रात्मक स्फुट लेख व आठवणी,

---

१. डॉ. केतकर–चरित्र, व्यक्तिमत्त्व आणि वाङमय यांचा अभ्यास (प्रबंध) पृ. १५२–५३. २. सं. का. पं. पृ. २१४. ३. राजविद्या – साहित्यातील आत्माविष्कार.

आख्यायिका या प्रारंभीच अुल्लेखिलेल्या सामग्रीच्या आधारे त्यांचे व्यक्तित्व चित्रित करावयाचे आहे. या आत्मचरित्रात्मक लेखनापैकी बराचसा भाग 'सुसंगत व सुस्पष्ट' नाही हे स्वतः सावरकरांनाही मान्य आहे.[१] पण याचा अर्थ ते लेखन असत्य वा अतिशयोक्त आहे असे मात्र नव्हे. अुलट आठवणी लिहिण्याच्या आधी सावरकरांनी अशी प्रतिज्ञा केली आहे की, 'आम्ही ज्या आठवणी सांगू त्या आठवणी तरी अगदी जशा आठवतात तशाच सांगू. केवळ लोकच्छंदानुवर्तित्वास्तव त्यांत नसती रंगरंगोटी करणार नाही.'[२] अितकेच नव्हे तर 'जे सांगितले जाअील ते अक्षरशः व भावार्थशःही यथातथ्य सांगितले जावे' याविषयी ते स्वतःच अत्यंत दक्ष आहेत.[३] सत्यतेप्रमाणेच अतिशयोक्त मजकूर लिहिला जांअू नये म्हणून सावरकर अतिशय सावध आहेत. 'केवळ लोकांत प्रौढी वाढेल तितकाच भाग प्रसिद्ध करणे' त्यांना मिथ्याचार वाटतो.[४] हे 'लोकप्रियतेचे दास्य' पत्करावयास ते तयार नाहीत.[५] म्हणूनच 'आत्मस्मृतिकथनास आत्मश्लाघेचा अनिवार्यपणे लागणारा गंध' त्यांना संकोचित करतो.[६] सावरकरांच्या मजकुरातील सत्यपणाबद्दल खात्री पटविणारी काही बाह्य साधनेही या दृष्टीने पहाण्यासारखी आहेत. सध्या प्रसिद्ध झालेल्या सरकारी कागदपत्रांच्या पुराव्यावरूनही सावरकरांच्या वृत्तान्तातील प्रामाणिकपणा प्रत्ययास येतो.[७] अंदमानात सावरकरांचे सहतपी असलेल्या भाअी परमानंदाच्या आठवणीवरून सावरकरांच्या कथनातील सत्यता ध्यानात येते.[८] सावरकरांच्या निवेदनातील सत्यता, यथार्थता, अुपलब्ध त्या सर्व साधनांनी पटवून देण्याचा प्रयत्न येथे नाही. येथे फक्त अेवढेच निदर्शनास आणावयाचे आहे की सावरकरांचे— व्यक्तित्व साकार करावयास अुपलब्ध असलेली साधने, जरी ती थोडी अपुरी असली तरी, विश्वसनीय आहेत. शिवाय तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे संपूर्ण सत्य सांगण्यास सावरकरांना काही मर्यादा जरी भासल्या तरी त्यांचा लेखकाच्या व्यक्तित्वाशी प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळे व्यक्तिनिदर्शनास कोणत्याही रीतीने बाध येत नाही.

बाह्यरूप

सावरकरांना प्रत्यक्ष पाहताना वा त्यांचे छायाचित्र पाहताना अेक गोष्ट चटकन लक्षात येते की, त्यांचा देह मूळचाच सुकुमार आहे. असा सुकुमार देह असल्यामुळेच भयंकर व कठोर विचारांचा ताण त्यांच्या कोमल मेंदूला फार बसेल

---

१. मा. जन्म. पृ. ६. २. मा. आ. प्रस्तावना, पृ. ८. ३. मा. आ. प्रस्तावना, पृ. ८. ४. मा. जन्म. – प्रस्तावना, पृ. ६. ५. मा. आ. – प्रस्तावना, पृ. ७. ६. मा. जन्म. – प्रस्तावना, पृ. ५–६. ७. Source material for a History of Freedom Movement in India p. 437–478. ८. The Story of My Life.

असे त्यांच्या वडिलांना वाटले.[१] येसूवहिनींना सावरकरांच्या 'प्रेमळ, सुकुमार व नाजूक मूर्तीला पाहून अत्यंत अुल्हास वाटला.'[२] प्रसिद्ध नाटककार अ. वा. बर्वे यांनी सावरकरांच्या वक्तृत्वकलेचे कौतुक करताना त्यांची मोहक मूर्ती व लहान वय यांचा आवर्जून अुल्लेख केला.[३] स्वत: सावरकरांनाही आपले गौरवर्णी, खूप पाणीदार, कोमल नि मोहक शरीर लहानपणी फार आवडे.[४] लहानपणी आपले शरीर 'तरतरीत पण अेकेरी नि चिमुकले होते' असे सावरकर सांगतात.[५] असे कोमल नि चिमुकले शरीर स्वत:ला आवडूनही सावरकरांना अेक अुणीव नेहमी बोचे. ती म्हणजे 'वयाच्या मानाने खूपच कमी भरलेली अुंची' व 'दणकटपणा आणि राकटपणा' यांचा अभाव. हा अुणेपणा काढून टाकण्यासाठी त्यांनी वयाच्या बारा-तेरा वर्षांपासूनच नमस्काराचा व्यायाम घ्यावयास सुरुवात केली. आणि 'घामाची मूर्ती जमिनीवर अुठेतो' नमस्कार घालण्याची चिकाटी दाखविली.[६] पुढे सँडोच्या डंबेल्सचा व्यायाम त्यांना आवडू लागला आणि विलायतेत असतानाही तो त्यांनी चालू ठेवला. कॉलेजमध्ये असताना 'पैजेवर पाचपाचशे जोर आणि हजार हजार बैठका' ते केव्हा केव्हा काढीत.[७] ही व्यायामाची रुची लागण्यास प्रथमत: शोभीवंतपणाची हौस .हे अेक कारण होतेच.[८] आपले शरीर भरदार व अधिक देखणे होअील अशी त्यांना फार आशा होती.[९] पण ती मात्र सफल झाली नाही. या व्यायामामुळे त्यांचे शरीर सुगठित झाले, वळणदार नि रेखीवही झाले तरी ते भरभक्कम आणि धष्टपुष्ट असे केव्हाच झाले नाही.[१०] अुलट केव्हा केव्हा पूर्वीहूनही 'सुकटलेले आणि राकट' दिसू लागे. तरी त्याचा मूळ सुकुमारपणा, वळणदारपणा आणि रेखीवपणा नष्ट झाला नाही. सावरकर अंदमानला निघाले असताना ठाण्याच्या तुरुंगातील अेका अधिकाऱ्याने त्यांच्या 'सोन्यासारख्या रूपा'चे वर्णन केले होते. कुस्तीगिराला शोभणाऱ्या त्यांच्या दंडांचे व छातीचे वर्णन करून 'दादांचा देह ! असा सोन्याचा तुकडा' असे तो पोलीस अधिकारी म्हणाला होता.[११] सावरकरांच्या देहातील सुकुमारतेचे, तरतरीपणाचे व चापल्याचे वर्णन त्यांचे अेका काळचे सहकारी बॅ. असफअल्ली यांनी पुढीलप्रमाणे केले आहे :– " Fragile as an anamic girl, restless as a mountain torrent and keen as the edge of a Toledo blade." [१२]

अितिहासकार म. म. दत्तो वामन पोतदार यांनी सावरकरांच्या व्यक्तित्वदर्शनाची आपली आठवण सांगताना म्हटले आहे की, 'अेखाद्या पिवळ्याधमक नागासारखे

---

१. मा. आ. पृ. ८५. २. मा. आ. पृ. ३३. ३. मा. आ. पृ. ७२. ४. मा. आ. पृ. १८१. ५. मा. आ. पृ. १८१. ६. मा. आ. पृ. १८३. ७. मा. आ. पृ. १८३. ८. मा. आ. पृ. १८२. ९. मा. आ. पृ. १८३. १०. मा. आ. पृ. १८३. ११. मा. जन्म. पृ. २६. १२. सा. च. (करंदीकर) पृ. ५८३.

त्यांचे शरीर तजेलदार होते. त्यांचा चेहरा केतकीच्या पात्याप्रमाणे गोरा, तकतकीत, तेजस्वी आणि दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेणारा दिसत होता.[१]' श्री. वा. ग. खापर्डे यांनी सावरकरांच्या शरीराचे काव्यमय वर्णन करताना त्यांची देहयष्टी तीमधील गुणांसह साकार केली आहे. श्री. खापर्डे लिहितात, " सावरकरांचा चेहेरा – निदान कपाळ व वरचा भाग नेपोलियनसारखा आहे, धडाडी सीझरची आहे आणि नाजूकपणा 'जोन ऑफ आर्क'चा आहे."[२]

स्वत:चे शरीर रेखीव, देखणे व वळणदार करण्यामागे सावरकरांची शोभिवंतपणाची हौस जशी होती तशी ती स्वत:चा पोषाख सुटसुटीत, टाप-टिपीचा करण्यामागेही होती. गवाळेपणाची त्यांना प्रथमपासूनच नावड होती व सर्व विषयांत टापटिपीच्या राहणीची मोठी आवड होती.[३] त्यांना भपकेपणाचा जितका तिटकारा तितकीच शोभिवंतपणाची हौस असे.[४] याच्या जोडीला त्यांच्या बंडखोर स्वभावाची भर पडली.[५] अर्थात या सर्वांचा परिणाम त्यांच्या पोषाख पद्धतीवरही झाला. काकांची मागल्या पिढीतील सनातन वाराबंदी नि अंगरखे तर राहोच, पण बाबाराव सावरकरांचे ते बेडौल घोळाचे सदरेदेखील वापरण्याचे निर्बंध त्यांनी झुगारून दिले.[६] लहानपणी त्यांनी शर्ट, जाकीट, कोट घालावा आणि धोतराचा सुटसुटीत काचा मारण्याची बंडखोरीही करण्यास कचरू नये.[७] फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना सावरकरांचा पोषाख अिटालियन देशभक्त मॅझिनीच्या पद्धतीप्रमाणे असे, अशी अेक आठवण श्री. रा. अ. कानिटकर यांनी सांगितली आहे.[८]

अिंग्लंडला जाताना मात्र अिंग्रजी कॉलर, विजार, सुटबुटाचा वेष त्यांनी केला होता.[९] तत्पूर्वी अिंग्रजी वेष वापरतात कसा हे सुद्धा शिकण्याचा प्रसंग त्यांच्या-वर कधी आला नव्हता.[१०] अिंग्रजी पोषाख वापरण्याची हौस तर मुळीच नव्हती.[११] अखेर अिंग्रजी पोषाख घालण्याचे शिक्षण घेण्यासाठी अेका मित्रास ते शरण गेले व 'धोतरास रामराम ठोकून कानातील भिकबाळी काढून टाकून कोट-पाटलून, हॅट-बूट नि विशेषत: ते टॉय-कॉलरवर बांधण्यास दहादा चुकून शेवटी ठाकठीक घालावयास अगदी म्हणतात तसे शिकले.'[१२] मात्र हे 'साहेबी सोंग' करण्यामागे त्यांची केवळ अनुकरणाची भूमिका नव्हती. अुलट अधिक विचारपूर्वकता होती. जेव्हा अिंग्लंड-सारख्या परदेशात अनेक वर्षे राहण्याचा प्रसंग येतो तेव्हा आपल्या राष्ट्रास

---

१. सा. यां. आ. पृ. १०१. २. केसरी अ. अं. पृ. ५०. ३. मा. आ. पृ. १८१. ४. मा. आ. पृ. १८१. ५. मा. आ. पृ. १८२. ६. मा. आ. पृ. १८१–१८२. ७. मा. आ. पृ. १८२. ८. सा. यां. आ. पृ. २८. ९. केसरी दि. अं. १९६१, पृ. ७७. १०. केसरी दि. अं. १९६१, पृ. ७७. ११. केसरी दि. अं. १९६१, पृ ७७. १२. केसरी दि. अं. १९६१, पृ. ७७.

अपमानास्पद नसतील, अवश्य असतील नि अुचित असतील त्या त्या त्यांच्या चाली-रीती, शिष्टाचार शिकून नि पाळून त्या परकी समाजात मिळून मिसळून जाणे हे अिष्टच अशी विचारसरणी त्यामागे होती.[१] भारतीय पोषाखाबद्दलचा अभिमान मनात पुरेपूर होता. म्हणूनच वोटीवरील भारतीय मित्रांच्या डोक्यावरील फेटचांना युरोपियन लोक हसू लागले तेव्हा 'फेटा घालू नये हे तरुण सोवत्यांस सांगण्यापेक्षा आपण सर्वांनीच फेटे वांधून वोटीच्या माथ्यावर हिंडण्यास जावे' असा निर्धार यांनी व्यक्त केला.[२] 'प्रासंगिक सोयीचा प्रश्न सोडल्यास शिरोभूषण कोणते असेल र ती गोऱ्यांची शिफ्तरे नसून, आपले नानारंगी फेटेच होत. किती शोभिवंत, भव्य, भरदार!' अशा शब्दांत त्यांचा भारतीय पोषाखाबद्दलचा अभिमान प्रकट ाला आहे.[३] पुढे लंडनच्या वास्तव्यात देशबंधू देवासारखे हिंदी पदवीधर लंडनच्या ाजारात जरतारी फेटचाचा शोध करीत असल्याचे पाहून त्यांचा हा अभिमान पुनश्च फुलून आला होता.[४] मात्र त्यात अभिमान असला तरी अभिमानाचा अतिरेक नाही. म्हणूनच 'युरोपियन टोप्या सोय असेल तर नि तिथे अवश्य घालाव्या' असे ते आवर्जून ांगतात.[५] पण अेकूण विचारसरणीच्या क्रमात अशा सोयीचे स्थानही दुय्यम किंवा ालचेच. सोय होअूनही राष्ट्राचा अपमान, जातीय पाणअुतारा आणि स्वत:च्या मनोदौर्बल्याचे प्रदर्शन होत नसेल तरच परकीय पोषाख परिधान करण्यास त्यांची रकत नाही.[६] भारतीय पोषाखाबद्दल उचित अभिमान बाळगूनही सावरकर स्वत:च्या ोषाखाबद्दल अत्यंत आग्रही किंवा काटेकोर वाटत नाहीत. परदेशात जाताना त्यांचा पोषाख अस्सल विलायती होता हे त्यांनी स्वत:च सांगितले आहे. अिंग्लंडमधील वास्त-व्यात त्यांचा पोषाख कशा स्वरूपाचा होता याचे वर्णन त्यांच्या आत्मचरित्रपर लेखनात कुठेही आढळत नाही. पण तो पाश्चात्य असावा असे त्यांच्या अितरत्र प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रावरून दिसून येते.[७] या विसंगतीतील संगतीही प्रयत्नांती सापडू शकते. षोषाखापेक्षाही आपल्या कार्याचे अुद्दिष्ट आणि तो पोषाख धारण करणाऱ्या शरीराच्या आतील स्वाभिमानी मन याला ते अधिक महत्त्व देत असावेत. म्हणूनच डोंगरीच्या कारागृहात त्यांना भेटावयास आलेल्या पत्नीला अुद्देशून ते म्हणाले, "काय, मला पाहिल्यावरोवर ओळखलेत का ? हे केवळ कपडे बदलले आहेत. मी तोच आहे. थंडीचे निवारण करणे हा जो कपडयांचा मुख्य हेतू तो ह्या कपडयांनीही बहुतेक पूर्ण होतो."[८] ह्या वाक्यात विनोदाच्या आवरणाखाली सावरकरांचा पोषाखाबद्दलचा दृष्टिकोनही सहजपणे प्रकट झाला आहे.

---

१. केसरी दि. अं. १९६१. २. केसरी दि. अं. १९६१, पृ. ७७. ३. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९७. ४. लं. बा. पृ. ५६. ५. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९७. ६. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९७. ७. सा. च. पृ. ११६, ११७. ८. मा. जन्म. पृ. १४.

संभाषण

दुसऱ्यावर चटकन छाप पाडणारा सावरकरांच्या बोलण्यातील गुण म्हणजे गोडवा. येसूवहिनींनी आपल्या आठवणीत 'त्यांचे (सावरकरांचे) बोलणे गोड लागे' असे स्पष्टच सांगितले आहे.[१] या बोलण्यातील गोडव्यामुळे 'तात्या वाटेने चालले असता वाटेत काही निमित्त काढून लोक त्यांना हटकून अुभे करून बोलावयाला लावावयाचे. त्यांचे भाषण अैकून तृप्ती झाल्याविना त्यांना कोणी जाअूच देत नसत.'[२] अल्पवयातसुद्धा तात्यांच्या भाषणात अितकी मोहकता, मार्मिकता समयसूचकता आणि व्यवहारज्ञानता होती.[३] "लहानपणापासूनच दहा मंडळींत अशा (अनेक) संवादास नाना प्रकारच्या रंगांनी रंगवून सोडण्याची सवय झाल्याने माझ्या संभाषण-शक्ती (Conversational Powers) सारख्या विकसित होत गेल्या" असे स्वत: सावरकरच सांगतात.[४] मूळच्या गोडव्याने व या संभाषणकलेमुळे मोठाली मंडळीही त्यांच्याशी बोलताना आणि त्यांची थोर थोर विचारांची बोलणी अैकताना मोहून जात.[५] त्यांच्या धाडसी विधेयांची, संवादाची हातोटी पाहून प्रौढ मंडळीवर. प्रथमपासूनच छाप बसे.[६] सावरकरांचा हा 'बोलघेवडा स्वभाव' पुढे अंदमानच्या कठोर कारागृहातही कायम राहिला.[७]

सावरकरांचे संभाषण ज्या अनेक कारणांमुळे परिणामकारक होत असे त्यांत त्यांच्या ठिकाणी असणारा थट्टेखारपणा, विनोद, हजरजबाबीपणा, कोटिक्रम, अित्यादी गुणविशेषांचा अुल्लेख करावयास हवा. नाट्यवाङ्मयात त्यांचा विनोद हीन प्रतीचा वाटला तरी मूलत: त्यांची विनोदी वृत्ती फार श्रेष्ठ श्रेणीची आहे. येसूवहिनींनी त्यांच्या थट्टेखोर, नकल्या, गमत्या, विनोदी स्वभावाच्या अनेक आठवणी सावर-करांच्या आत्मचरित्रात सांगितल्या आहेत.[८] येसू वहिनीने आपल्याला रांगोळीचा 'झेला' काढता येतो असे सांगताच स्वत: काढलेल्या रांगोळीला सावरकरांनी थट्टेखोरपणे 'फुटका पेला' असे नाव सांगून सर्वांस हसविले.[९] घरात मंडळीची पंगत बसली की तात्या हळूच ओरडायचे, 'ॐ भवति भिक्षां देहि' आणि मग खराच माधुकरी आला असे समजून वायका फसायच्या.[१०] कधी आरशात 'वेडीवाकडी' तोंडे करून अितरांना ते विचारायचे 'मी असा असतो तर तुम्हांस आवडतो का'?[११] कधी कोणास नकळत कुत्र्याच्या पिलासारखे किंवा बकऱ्यासारखे अितके हुबेहूब ओरडावयाचे की अितरांना वाटायचे खरेच पिलू किंवा बकरे

---

१. मा. आ. पृ. ४०. २. मा. आ. पृ. १०८. ३. मा. आ. पृ. १०८. ४. मा. आ. पृ. २००. ५. मा. आ. पृ. १६०. ६. मा. आ. पृ. १००. ७. मा. जन्म. पृ. ४१२. ८. मा. आ. पृ. ३५ ते ३९. ९. मा. आ. पृ. ३७. १०. मा. आ. पृ. ३९. ११. मा. आ. पृ. ३७.

ग्रंथ संग्रहालय, डोंगरी, रत्नागिरी.

आले आहे[१]. अेकदा येसूवहिनींचे सोंग करीत धोतराचा पदर डोक्यावर घेअून त्यांनी गजगौरीच्या गाण्याचे अेक कडवे म्हटले तेव्हा सर्व मंडळींना हसता हसता पुरेवाट झाली.[२]

सावरकरांचा हजरजबाबीपणा या विनोदी वृत्तीने अधिकच आकर्षक वाटतो. लहानपणी सदरा घालून आणि सोवळ्याची लंगोटी नेसून सावरकरांना हिंडताना पाहून सर्व मंडळी हसू लागली, तेव्हा त्यांनी चटकन अुत्तर दिले, " मला लंगोटी धुवायची होती आज म्हणून असे केले."[३] त्र्यंबकेश्वराला राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठी योजलेल्या अेका समारंभाकरिता केलेल्या संस्कृत श्लोकावरील अभिप्राय अेका पंडिताने सावरकरांना विचारताच, " Truely these are pearls but they are thrown before swine. " अशा शब्दांत त्यांनी जवाब दिला.[४] याच वेळी त्र्यंबकेश्वर येथे झालेल्या अेका सभेत 'अेडवर्ड हे आपले खरोखरच बाप आहेत' असे राजनिष्ठा प्रकट करणारे अुद्गार अध्यक्षांनी काढले होते. सावरकरांना हे समजताच त्या अध्यक्षांना अुद्देशून " अेडवर्ड जर आपले बाप आहेत तर आपले वडील आपल्या मातोश्रींचे कोण ? " असा अुनाड खणखणीत सवाल टाकणारी गुप्त पत्रके लिहून त्यांनी ती रातोरात भिंतीवर फडकविली.[५] पन्नास वर्षे काळच्या पाण्याच्या शिक्षेची वातमी अैकल्यावरही सावरकरांचा हजरजबाबीपणा आणि विनोदी वृत्ती झाकाळली नाही. डोंगरी कारागृहातील अेक अधिकारी निष्ठुर विनोदाने, " काही चिंता नाही ; दयाळू सरकार तुम्हाला १९६० साली सोडीलच सोडील " असे म्हणताच सावरकर अुपहासाने अुत्तरले, " पण मृत्यू अधिक दयाळू आहे. त्याने मला त्यापूर्वीच सोडून दिले तर! "[६] जन्मठेप म्हणजे पंचवीस वर्षांची अधिकात अधिक शिक्षा हा दंड-विज्ञानातील अर्थ होय. दोन जन्मठेपा म्हणजे हा जन्म संपून दुसऱ्या जन्मीही शिक्षा भोगणे नव्हे. म्हणून असा हास्यास्पद अर्थ टाळण्यासाठी सावरकरांनी अर्ज केला असता अेक अिंग्रज अधिकारी म्हणाला, " अहो सावरकर अखेर सरकारने असेच ठरविले की, तुमची ह्या जन्माची जन्मठेप भरल्यानंतरच पुढच्या जन्माची दुसरी ठेप भरावयाची. " तेव्हा सावरकर म्हणाले, " तर मग त्यातल्या त्यात ही समाधानाची गोष्ट आहे की, हिंदू लोकांच्या पुनर्जन्माचा सिद्धान्त तरी सरकारने अेकदा मानला आणि ख्रिस्ती धर्माची पुनरुत्थानाची कल्पना सोडून दिली. "[७] अंदमानच्या नृशंसक गुहेतही सावरकरांची वृत्ती नेहमी हसती आणि विनोदप्रवण होती.[८] म्हणूनच पोर्ट-ब्लेअरच्या पोटाळ परमेश्वराचे– त्या बारीबाबाचे – वाक्प्रहार ते सहन करू शकत; नव्हे आपल्या हजरजबाबीपणाने ते परतवून लावू शकत. अेकदा सावरकरांना गुप्तपणे

---

१. मा. आ. पृ. ३७. २. मा. आ. पृ. ३९. ३. मा. आ. पृ. ३६. ४. मा. आ. पृ. १७९. ५. मा. आ. पृ. १८१. ६. मा. जन्म. पृ. ३. ७. मा. जन्म. पृ. २० ८. मा. जन्म. पृ. ३०८.

आलेले पत्र धरले गेल्यामुळे त्यांना सात दिवस हातकडीत लोंबकळत अुभे राहावे लागले. "हे पोस्टेज आहे' असे सावरकरांनी वारीस सांगताच तो म्हणाला, " जरा महाग पडले, नाही ?" तेव्हा सावरकर चटकन अुत्तरले, " छे, किती स्वस्त. तुम्हांस वर्तमानपत्रे घ्यावयाची तर वर्गणी भरावी लागते आणि त्यावाचून पोस्टेज. आम्हांस कारागारात वर्गणीवाचून वृत्तपत्रे मिळतात. केव्हा केव्हा असे आठ दिवस हातकडीचे पोस्टेज–टपालव्यय–दिला की झाले. पुन्हा सहा महिने फुकट पत्र. "[1] दहा वर्षे कारागारात राहूनही सावरकरांना नुसते तेलगोदामाचे व्यवस्थापक, 'Foreman' म्हणून नेमले म्हणून अितर अल्पशिक्षित बंदीवान खेद व्यक्त करीत. तेव्हा सावरकर त्याना सांगत, " अरे पण अधिकार कोणाचा आहे ? बाव तर काय, पण प्रत्यक्ष बंदीवान पर्यवेक्षक, कमिशनर, हे देखील नुसते man म्हणजे मनुष्य आहेत. पण आम्ही Foreman. फोरमन म्हणजे मनुष्यांचा अग्रणी. सरकारने आमचे मूल्य अखेर ओळखले, व्हाअिसरॉयला जो मान नाही तो मान आम्हांस दिला. Foreman! नराग्रणी! आणखी काय पाहिजे ? "[2]

अशा विनोदपरिपूर्ण हजरजबाबीपणाने सावरकरांच्या संभाषणाला अेक प्रकारचा खुसखुशीतपणा येतो; आणि त्यांच्या कोटिक्रम करण्याच्या पद्धतीने त्यात धारदारपणाची चमक येते. बिनतोडपणाची मोहरबंदी त्यावर ठसते. लहानपणापासून अुलटसुलट समजूत घालण्यात सावरकर पटाअीत होते असे येसूवहिनींची आठवण सांगते.[3] अर्जुनापेक्षा भीम श्रेष्ठ कसा हे ते अनेक कोटिक्रमांनी पटवून देत.[4] 'अिंग्रजी, राज्य ही देवाची अिच्छा' असे कोणी देवलशाने सांगताच सावरकर अुसळून म्हणत, " चोराचे राज्य ती देवाची अिच्छा, आणि आम्हां सर्वांची त्यांचे राज्य अुलथून टाकण्याची ही प्रवृत्ती काय कोण्या राक्षसाची अिच्छा? जर सर्व कर्ताकरविता देव तर हीही देवाचीच. "[5] व्हिक्टोरिया राणी मरण पावल्यावर केवळ धोरण म्हणून राजनिष्ठा व्यक्त करण्याचा ठराव मित्रमेळ्याच्या बैठकीत येताच सावरकरांनी श्री. म्हसकरांच्या अगदी अुलट कोटिक्रमाने त्या ठरावाला कसून विरोध केला.[6] 'व्हिक्टोरिया व्यक्तिशः चांगली होती म्हणून ठराव करावा या म्हसकरांच्या विधानावर सावरकर अुत्तरले, " पण ती मेली त्या दिवशीच कितीतरी अशा चांगल्या बायाबापड्या मेल्या, त्यांचा का नाही अुल्लेख होत ? हे सर्व ढोंग आहे. ती राणी होती म्हणूनच तुम्ही सभा करणार "[7] 'अिंग्रजी दुष्टाअीचे दायित्व तिच्यावर नाही. कारण ती बुद्धिबळातील

---

१. मा. जन्म. पृ ३९१–९२. २. मा. जन्म. पृ. ४५५. ३. मा. आ. पृ. ३८. ४. मा. आ. पृ. ४८. ५. मा. आ. पृ. ६४. ६ मा. आ. पृ. १६३. ७. मा. आ. पृ. १६४.

दा. क्र. १७७६८

राणी होती, ' या अपेक्षित युक्तिवादालाही उत्तर देताना सावरकरांनी पुन्हेल कोटिक्रम केला, " तर मग सुष्टाओचे दायित्वही तिचे कसे? तेही बुद्धिवादी थेकळणाऱ्यांचेच. "[1] 'ना विष्णुः पृथ्वीपतिः ' या आधारावर अिंग्रजांच्या राजाला मनःपूवक देवावतार मानणाऱ्या त्र्यंबकेश्वराच्या पंडितांनाही सावरकरांनी अशाच कोटिक्रमाने निरुत्तर केले. ते म्हणाले, " राजा प्रकृतिरंजनात् । दुसऱ्याच्या देशावर केवळ शस्त्र-बळाच्या आधारावर जो राज्य करतो तो त्या देशाचा राजाच नव्हे, मग देव कुठला ? "[2] 'क्रांतिकारकांनी लग्न करावे की नाही? ' या प्रश्नाचे समाधानही ते विविध कोटिक्रमांनी करीत.[3] त्यांचे काही देवलसी मित्र 'हा राजकीय खटाटोप व्यर्थ आहे, अिश्वराची कृपा तेवढी असली की झाले. 'असा अुपदेश सावरकरांना करीत. तेव्हा 'भारतीय राजकीय स्वतंत्रता हेच त्या अीश्वरी कृपेचे ह्या युगीचे साधन आणि व्यक्ती होय. स्वराज्यातून स्वधर्म पंगू होय', अशा कोटिक्रमाने सावरकर त्यांना आपला विचार पटवून देत. 'हिंदू हे नाव अिंग्रजांच्या कानाला ठीक लागत नाहीं.' असे अिंग्लंडमधील अेका हिंदू मित्राने सांगताच सावरकर त्वरित अुत्तरले, " त्यांच्या (अिंग्रजांच्या) कानाला तुमच्या वडिलां-चेही नाव ठीक लागत नाही, मग ते तुम्ही फिरवाल काय ? कानाला वाओट लागते म्हणून जर धर्म छपविणे शिष्टसंमत आहे तर मग अिंग्रजच आम्ही हिंदू आहोत असे का सांगत नाहीत? त्यांचे ख्रिश्चन असणे हे आमच्या कानाला वाओट लागते हे त्यांनाच आपण जाअून कळवा. "[4] ' ज्या लोकांना वाटते की अिंग्रजांच्या चालीरीती अुचलल्या की ते आपणांस सुधारलेले मानतील नि स्वराज्यास पात्र समजतील, नाही तर नाही, ' त्या लोकांचा भ्रमनिरासही सावरकर पुढील कोटिक्रमाने करीत. " आपल्या देशातील लक्षावधी लोक जे ख्रिश्चन झालेले आहेत त्यांनी अिंग्रजांच्या रीतिभातीच नव्हेत तर त्यांचा धर्मसुद्धा स्वीकारला.....मग या लक्षावधी हिंदी ख्रिश्चनांना तरी सुधारलेले समजून अिंग्रज स्वराज्याचा अधिकार का देअून टाकीत नाहीत ? त्यातही जिये काळ्या रंगाचीसुद्धा अडचण नाही, आणि ज्यांच्याशी मुली देण्याघेण्यापर्यंत अिंग्रजांना संकोच वाटू नये अितके जे गोरेपान नि जन्मतःच युरोपियन आहेत त्या आयरिश लोकांना नुसते ' होमरुल ' सुद्धा अिंग्रज लोक का देअून टाकीत नाहीत ? (तेव्हा) रीतिभाती प्रभृती सटरफटर अुपाय केवळ दुय्यम तिय्यम महत्त्वाचे. पण स्वराज्याच्या पात्रतेचा निर्णायक, अमोघ नि रामबाण अुपाय म्हटला म्हणजे ' रामबाण ' हाच. "[5] अंदमानात बारी आणि त्याच्यावरोबरच्या पाहुण्यांबरोबर अठराशे सत्तावन सालच्या बंडाची चर्चा करताना नानासाहेब, तात्या टोपे अित्यादी बंडखोर स्वार्थी होते असा आरोप अेका पाहुण्याने केला. तेव्हा सावरकर म्हणाले, " ते अगदी खरे, आणि हेही खरेच

---

१. मा आ. पृ. १६४. २. मा. आ. पृ. १८०. ३. मा. आ. पृ. १८७–१८८.
४. लं. बा. पृ. १५९. ५. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९९.

आहे की, व्हिक्टर अिम्यानुअेलला अिटलीचा राजा व्हायला पाहिजे होते, वॉशिंग्टनला प्रेसिडेंट व्हावयास पाहिजे होते आणि ग्यारिबाल्डीलाही मोठेपणा पाहिजे होता.''[१] मुसलमान फुटाण्यास शिवला म्हणून ते विटाळलेले फुटाणे अंदमानातील हिंदू बंदीवान खाअीनात तेव्हा सावरकरांनी त्या बंदीवानांच्या या आत्मघातक विटाळवेडाबद्दल चांगलेच कान अुपटले आणि अुलट कोटिक्रमाने विचारले, " मुसलमानांनी तुमच्या फुटाण्याच्या पोत्यात हात घातला तर ते फुटाणे जर मुसलमानी होतात तर तुम्ही हिंदूंनी मुसलमानांच्या फुटाण्यास शिवताच ते फुटाणे हिंदू का होअू नयेत ? ''[२]

सावरकरांच्या संभाषण वैशिष्ट्याची वर्णने अनेक व्यक्तींनी अनेक पद्धतींनी केली आहेत. कधी कोणाला ते शांत व धीराने पण निश्चयपूर्वक वोलताना आढळले तर कधी कोणाला ते अत्यंत भावनावेगाने संभाषण करताना दिसले. ने. ना. श्रीनिवासशास्त्रींनी सावरकरांशी संभाषण करताना त्यांची पुढील वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ते लिहितात:— " But (I) found a thin-looking, quiet Maharashtra chap, speaking slowly and deliberately, seldom raising his voice and always apparently in full possession of his mind and knowing exactly what he wanted. ''[३]

श्री. रा. रा. ज. ग. करंदीकर यांनी सावरकरांच्या संभाषणकलेचे वैशिष्ट्य सांगताना ' विचारांची सडेतोड, तर्कशुद्ध मांडणी आणि भावनाशीलता ' या गुण-विशेषांचा अुल्लेख केला आहे.[४]

वक्तृत्व :

वक्तृत्वाचे काही घटक अुपजत देणगीनेच सावरकरांना प्राप्त झाले आहेत.[५] यातील अेक प्रमुख घटक म्हणजे प्रतिभा. प्रतिभेचे तेजस्वी पाठवळ निसर्गत:च त्यांच्या वक्तृत्वकलेला मिळाले होते.[६] या प्रतिभेला सावरकरांच्या ज्ञानलिप्सेची जोड मिळाली. 'वक्तृत्वाचा आत्मा जी भावना'[७] तीही सावरकरांच्या ठायी अुत्कटत्वाने वास करीत होती. लहानपणापासूनचे त्यांचे विविध वाचन, मनन आणि निरीक्षण यामुळे त्यांच्या वक्तृत्वात 'अमोघ, भरीव, प्रबल आणि अजेय परिणामकारकपणा आलेला होता.'[८]

सावरकरांनी वक्तृत्वकला कमाविण्याचा अभ्यासपूर्वक व पद्धतशीर प्रयत्न केला होता. वक्तृत्वकलेचे गुण जरी अुपजत होते तरी 'त्या गुणास सहानुभूतीने

---

१. मा. जन्म. पृ. ८१. २. मा. जन्म. पृ. २८४. ३. सा. च. (करंदीकर) पृ. ५७८. ४. सा. यां. आ. पृ. ६७. ५. मा. आ. पृ. ७४. ६. मा. आ. पृ. ७४. ७. मा. आ. पृ. ३. ८. मा. आ. पृ. ७४.

अुत्तेजन देणारा कोणी मिळाला नाही.'[१] पण संघर्ष किंवा संकट दिसताच अितरत्न जसे सावरकरांच्या वक्तृत्वास अवसान चढे तसे येथेही झाले.[२] त्यांच्या समवयस्कांनी अरसिक अज्ञानामुळे आणि बहुतेक समकालीन प्रौढांनी मत्सरामुळे त्यांचा मनोभंग आणि तेजोभंग करण्याचाच प्रयत्न केला.[३] पण त्या संघर्षामुळे सुप्त अग्नीच्या ठिणग्या अधिकच प्रदीप्त होअू लागल्या. किशोरावस्थेतच – वयाच्या बारा, तेरा वर्षांच्या संधीस – वक्तृत्व कला या विषयावरची दोन मराठी पुस्तके त्यांनी वाचली.[४] पद्धतशीर निबंध लिहिण्यास ते शिकले.[५] भावनेचे मूळ अधिष्ठान होतेच. त्यांच्या संभाषणात अभिनयकलेचा गुण होता हे पूर्वी पाहिलेच आहे. या गुणांच्या जोडीला त्यांनी कविता, सुभाषिते आणि डेमास्थेनीस, सिसरो, शेरिडन, मेकॉले अित्यादी श्रेष्ठ वत्क्यांच्या भाषणांतील काही अुत्कृष्ट भाग व वक्तृत्वशाली छेदक पाठ केले.[६] महाभारतातील श्रीकृष्णाची सभापर्वातील किंवा कर्णपर्वातील ती अमोघ तेजस्वी भाषणे पद्यातून नि गद्यातून बारकाअीने अभ्यासली.[७] भाषाप्रभुत्व मिळविले.[८] गद्यातील अुत्तम अुतारे, वाक्ये आणि पद्यातील सुंदर अवतरणे यथा-स्थली व वक्तृत्वाच्या सहजगतीत गुंफून देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला;[९] आणि आपले वक्तृत्व खरोखरच प्रबळ आणि दुर्जय करण्यासाठी मुख्यत: त्या विषया-संबंधाचाच नव्हे तर पुष्कळशा अवांतर ज्ञानाचा भरपूर साठा स्वत:जवळ सिद्ध केला.[१०] या गुणांसमवेत संभाषणातील गोडवा, मोहकता, हजरजबाबीपणा, विनोद, कोटिक्रम यांनी चिंब होअून त्यांची वक्तृत्वकला जेव्हा प्रकट होअी तेव्हा ती त्यांच्या व्यक्तित्वाची शब्दमयी मूर्तीच वाटे.

वयाच्या चवदापंधरा वर्षांपासून सावरकरांनी ठिकठिकाणी दिलेल्या व्याख्यानांचे अुल्लेख आपल्या आत्मचरित्रात व पत्रात केले आहेत. त्यावरून वक्तृत्वकला कशी कलेकलेने वाढत होती याची कल्पना येते. वयाच्या चौदा-पंधरा वर्षांच्या सुमारास त्यांनी भगूरच्या सार्वजनिक गणेशोत्सवात केलेल्या भाषणामुळे त्यांच्या बापूकाकांना अितका आनंद झाला होता की, त्यांनी "वा बाळ्या, वा! फार बहार केलीस. तू आमच्या घराचे नाव काढणार," असे म्हणून पोटाशी घेत मुका घेतला.[११] लहानपणी सावरकरांनी केलेले अेक अुत्कृष्ट आणि ओजस्वी भाषण अैकून त्यांचे वडील आण्णाराव यांनासुद्धा अत्यंत आश्चर्य वाटले होते.[१२] सावरकरांच्या वक्तृत्वास 'अुत्तेजनाचे पहिले चुळकाभर पाणी घालण्याची दया

---

१. मा. आ. पृ ७५. २. मा. आ. पृ. ९६. ३. मा. आ. पृ ७५. ४. मा. आ. पृ. ७३. ५. मा. आ. पृ. ७३. ६. मा. आ. पृ. ७५. ७. मा. आ. पृ. ७५. ८. मा. आ. पृ. ७४. ९. मा. आ. पृ. ७४. १०. मा. आ. पृ. ७४. ११. मा. आ. पृ. २४–२५. १२. मा. आ. पृ. ११२–११३.

प्रथम नाशिकच्या वक्तृत्वसभेने केली.' या वक्तृत्वोत्तेजक सभेच्या वार्षिक चढाओढीत सावरकरांचा क्रमांक शेवटी पुकारला जाअूनही 'खाली असोनी सकलांवर होय तो की 'या पंडितांच्या अुक्तीप्रमाणे तो सगळ्यांच्या वर आला आणि त्यांच्या वक्तृत्वातील 'अस्खलितपणा, अलंकृत भाषा व शास्त्रशुद्ध निबंधपद्धती' या गुणांचा गौरव झाला.[१] दहिवेली गावच्या वक्तृत्वस्पर्धेतही त्यांचा क्रमांक पहिला आला आणि वक्तृत्वातील भाषा आणि निबंध या गुणांचे तेथेही कौतुक झाले.[२] सावरकरांच्या तडफदार वक्तृत्वाची प्रचीती अलिबागच्या वक्तृत्वस्पर्धेत आली.[३] त्यांच्या भाषणातील अुद्दीपकता या गुणाचा अुल्लेख म. गांधींनी लंडनमधील अेका सभेच्या प्रसंगी केला.[४] 'अंगावर रोमांच अुभे' करण्याचे सामर्थ्य सावरकरांच्या वक्तृत्वात असण्याचा अनुभव येरवड्याच्या तुरुंगातील राजबंदीवानांनाही आला होता.[५] 'सावरकरांचे भाषण सर्वांनी अक्षरश: लक्षात घ्यावे' या म. गांधींनी लंडनमधील अेका सभेत केलेल्या विनंतीवरून आशयदृष्ट्याही सावरकरांच्या भाषणाची परिणामकारकता ध्यानी येते.[६] आशय आणि अभिव्यक्तीतील कला या दोन दृष्टींनी सावरकरांचे वक्तृत्व आकर्षक ठरावे असेच होते. 'अभिनव भारत छापाच्या वक्तृत्वाची अेक नवीन परंपरा महाराष्ट्रात' सुरू करण्याचे श्रेय सावरकरांनाच द्यावे लागेल.[७]

सावरकरांच्या वक्तृत्वशैलीचा अनेक टीकाकारांनी मुक्तकंठाने गौरव केला आहे. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी शिवरामपंतांपेक्षा सावरकरांचे वक्तृत्व कसे आक्रमक व घणाघाती स्वरूपाचे होते याचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे.[८] श्री. शि. ल. करंदीकर यांनी सावरकरांच्या वक्तृत्वात असलेल्या विविध गुणविशेषांचा– त्यांचा आवाज, नाटकीपणा, त्यातील स्फूर्तीचा अंश, वक्तृत्वाच्या विकासाचे टप्पे, मुद्रेचा आविष्कार, वक्तृत्वातील तळमळ आणि भावनोद्दीपन – या सगळ्यांचा तपशील दिला असून समारोपादाखल म्हटले आहे :– "सावरकरांचे वक्तृत्व खरोखरच अप्रतिम आहे. सावरकरांचे वक्तृत्व सावरकरांच्या वक्तृत्वासारखे आहे असेच म्हणावे लागेल, त्याला दुसरी अुपमा सांगता यावयाची नाही."[९] 'अेखाद्या कलाकृतीप्रमाणे सावरकर आपले भाषण रंगवितात' अशी सावरकरांची भाषणे अैकून आलेली अनुभूती श्री. भा. कृ. केळकर यांनी नमूद केली आहे.[१०] लोकनायक अणे यांना सावरकर हे हृदय अुचंबळून सोडणारे वक्ते वाटत.[११] प्रा. स. गं. मालशे

---

१. मा. आ. पृ. ७१–७२. २. मा. आ. पृ. ८६. ३. मा. आ. पृ. २०५. ४. लं. बा. पृ. १६२. ५. मा. जन्म. पृ. ५२९. ६. लं. वा. पृ. १६२. ७, मा. आ. पृ. २३३. ८. प्रतिभा सा. वि. १९३६. ९. सा. च. पृ. ५७९–५८७. १०. सा. द. पृ. २८२. ११. केसरी अ. वि. पृ. ८.

यांनी सावरकरांच्या वक्तृत्वकलेचे रसग्रहण करणारे विवेचन आपल्या 'आवड-निवड' या ग्रंथात मोठ्या रसिकतेने केले आहे. अंतरीची तळमळ, बिनतोड युक्तिवाद, प्रत्युत्पन्नमतित्व, प्रसंगावधान, अितिहासाच्या अभ्यासाचे पाठवळ, जातिवंत नाटच, रोखठोकपणा, अुपहास, अुपरोध, विनोद, तर्कशुद्धता, समर्पक दाखले देण्यातील कौशल्य, दुर्दम्य आत्मविश्वास आणि 'च' या अेकाच अक्षराने त्यांच्या वाणीला ठाशीवपणाचा, आणि सिद्धान्तवाणीचा येणारा पीळ' हे सावरकरांच्या वक्तृत्वातील सर्व गुणविशेष प्रा. मालशे यांनी अत्यंत रेखीवपणे दाखविले आहेत.[1]

लेखन :

सावरकरांना वाचनाप्रमाणे लिहिण्याचाही फार नाद होता.[2] वाचलेल्या पुस्तकांचा सारांश व त्यातील अुतारे अेका टिपणवहीत अुतरून ठेवण्याची सवय त्यांनी लहानपणापासून स्वत:स लावून घेतली होती.[3] त्यामुळे त्यांचे वाचन धुळीवरचे सारवण न होता पूर्ण पचविले जाअी.[4] वयाच्या बाराव्या वर्षी या टिपण पुस्तकास 'सर्वसारसंग्रह' असे नाव त्यांनी दिले. पुढे बी. अे. होअीतो त्या 'सर्वसारसंग्रहा'त नानाविध ग्रंथांच्या ज्ञानास मंथून काढलेले नवनीत त्यांनी साठविले होते. स्वत:च्या ज्ञानास स्थायी, सुव्यवस्थित आणि सुसंगतपणा देण्यास या 'सर्वसारसंग्रहाचा' त्यांना फार अुपयोग झाला. पुढे केव्हाही तेवढे सूचक टिपण पाहिले की तो अुभा विषय त्यांच्या डोळ्यांपुढे अुभा राही आणि त्यामुळे वाटेल त्या विषयावर लिहिणे वा बोलणे त्यांना सहज शक्य होअी.[5] त्यांच्या या अुताऱ्यांच्या पुस्तकाचे चारपाच खंड झाले होते व जर ते त्यांनी प्रसिद्ध केले असते तर ते अेक नामांकित संदर्भ पुस्तक झाले असते असे सावरकर सांगतात.[6]

'दिसामाजी काही तरी' नियमित लिहिण्याची सवय सावरकरांना अगदी लहानपणापासूनच होती.[7] ते रोज आपली दैनंदिनी लिहीत. पण ती 'आन्हिकी' म्हणजे केवळ त्यांच्या वैयक्तिक जीवनक्रमाची रुक्ष नोंद नव्हती. 'माझ्या आन्हिकीत माझ्याशी परिचित असणाऱ्या व्यक्तींची स्वभावचित्रे, घटनांची सुरस माहिती, माझ्या भावभावना, विचारांची पृथक्करणे अित्यादी वर्णने आकर्षक भाषेत टिपलेली असत' असे सावरकर सांगतात.[8] यावरून सावरकरांची आन्हिकी म्हणजे लेखनकला विकसित करण्यासाठी त्यांनी केलेली नैष्ठिक अुपासनाच वाटते. त्यांची आत्मवृत्ते म्हणजे त्यांच्या अशा या आन्हिकींच्या विस्तृत आवृत्याच वाटतात. बी. अे. होअीपर्यंत

---

१. आवड-निवड २. मा. आ. पृ. ४१. ३ मा. आ. पृ. १६८ व १७१.
४. मा. आ. पृ. १६८. ५. मा. आ. पृ. १६८. ६. मा. आ. पृ. १६८.
७. मा. आ. पृ. १७१. ८. मा. आ. पृ. १७१.

व पुढे अिंग्लंडमध्ये काही काळ या आन्हिकी त्यांनी क्रमवार जपूनही ठेवल्या होत्या.[१] परंतु पुढे राजकीय हाहाकारात अितर, स्वकीयांवर संकटे येअू नयेत म्हणून अग्नीमध्ये. या आन्हिकींची व 'सर्वसारसंग्रहाची' आहुती त्यांना टाकावी लागली.[२]

'सर्वसारसंग्रह' आणि 'आन्हिकी' यांतील नित्य लेखनामुळे सावरकरांच्या बौद्धिक आणि मानसिक कर्तृत्वाचा व्याप वाढण्यास साहाय्य झाले.[३] यावरून त्यांच्या व्यक्तित्वाच्या घडणीत लेखनाचा वाटा किती मोठा आहे याची कल्पना येते.

अंदमानच्या निस्साधन अशा कारागृहातही स्वत:ची लेखनतृष्णा शांत करण्याचे अभिनव मार्ग त्यांनी शोधून काढले. पोलिसांच्या कडक पहाऱ्यातही कागद पेन्सिल मिळवून ते वाचलेल्या पुस्तकांची टिपणे काढीत.[४] तेही मिळणे अशक्य झाल्यावर त्यांनी तुरुंगाच्या 'कोठडयांची चुन्याने रंगविलेली लांब-अुंच भिंत कागद आणि घाय-पाताचा काटाच लेखणी' वनविली. स्पेन्सरच्या अज्ञेय मीमांसेचा युक्तिवाद, 'कमला' हे खंडकाव्य, आणि मिलच्या अर्थशास्त्राच्या ग्रंथातील सर्व महत्त्वाच्या व्याख्या 'सिल्व्हर जेल' च्या सातव्या भागातील सर्व भिंतींवर त्यांनी लिहून काढल्या आणि पाठ केल्या.[५] रत्नागिरीच्या तुरुंगात असताना विटांच्या तुकडयांनी त्यांनी आपल्या कठोर कारावासाची कथा कोरून ठेविली.[६] 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ म्हणजे त्याच शिलालेखी टिपणांची आणि स्मृतिलिखितांची कागदी विस्तृत आवृत्ती होय.[७]

आवड-निवड

सर्व विषयांत टापटिपीच्या राहणीची आवड सावरकरांना लहानपणापासून होती.[८] या टापटिपीच्या राहणीला शोभिवंतपणाची हौस मोठी अुपकारक ठरली. शोभिवंतपणाच्या या हौसेमुळेच त्यांच्या शरीराला, पोषाखाला व ज्ञानार्जनाला अेक विशिष्ट वळण मिळाले. मागील पिढीतील तो सनातनी व बेडौल पोषाख वापरण्याचे सावरकरांनी सोडले ते या शोभिवंतपणाच्या हौसेमुळेच.[९] त्यांच्या ज्ञानार्जनाला सुव्यवस्थितपणा, सुसंगतता आली ती या टापटिपीच्या आवडीमुळेच होय.[१०] स्वत:च्या 'चिडबिड अक्षरा'पेक्षा कुलकर्ण्यांच्या गोपाळच्या घोसदार, टाप-टिपीच्या अक्षरांत आपल्या कविता लिहून घेण्यास त्यांना अतिशय आवडे.[११] 'आधी अक्षर चांगले घोटीव करावे नि मग महाकाव्याचा ग्रंथ हाती घ्यावा' असा लहानपणी पोक्त विचार करण्यामागे त्यांची ही शोभिवंतपणाची आवडच

---

१. मा. आ. पृ. १७१. २. मा. आ. पृ. १६८-१७१. ३. मा. आ. पृ. १७१.
४. मा. जन्म. पृ. १४३-१४४. ५ मा. जन्म. पृ. १४५. ६. मा. जन्म. पृ. ५१२.
७. मा. जन्म. पृ. ५१२. ८. मा. जन्म. पृ. १८१. ९. मा. आ. पृ. १८१.
१०. मा. आ. पृ. १६८. ११. मा. आ. पृ. ४३

दडलेली होती.[१] अर्थात सावरकरांना 'गबाळेपणाची पहिल्यापासून नावड होती.' 'भपकेबाजपणाचा तिटकारा होता' हे ओघानेच लक्षात येते.[२]

सावरकरांना खरी आवड दिसते ती राजकारणाची. अभ्यास, व्यायाम आणि वाचन करून जो वेळ अुरे तो राजकारणी चर्चेत घालण्याची आवड सावरकरांना लहानपणीच लागलेली होती.[३] "माझ्या बरोबरची अितर मुले गंगेवर अुनाडक्या करीत हिंडत असता मी अेकटा गणपतीच्या मेळ्याची पदे अैकण्यात आणि राजकारणाची व्याख्याने, सभा, चर्चा, यांमधून बोलावणे नसले तरी कसेबसे जाअून गुपचूप श्रवणाचा भाग घेण्यात व्यग्र असे" असे सावरकरांनी स्वत:च सांगितले आहे.[४] आजारी पडल्यावरही 'तापात बडबड शाळेची नि सभेतील राजकारणाची' असे.[५] सावरकरांच्या ठायी असलेल्या या 'राजकीय प्रवृत्तीला' मधाचे बोट लावून त्यांना साधुसंतांच्या सेवेला लावण्याचा प्रयत्नही त्यांच्या थोरल्या बंधूकडून – बाबांच्याकडून– होत असे.[६] "नाशिकला आल्यावर माझ्या राजकीय व बौद्धिक प्रवृत्तीशी समरस असणारा कोणीही न मिळाल्याने अेकलकोंडेपणात काही काळ काढावा लागल्या"ची कबुली सावरकरांनी दिली आहे. पुढे सावरकरांचे मित्रमंडळ तयार झाल्यावर त्या मंडळीसह ज्या मनोवेधक, मनोरंजक, विविध गप्पा चालत त्यांत 'सर्व विषयांच्या आंदोलनांचे केंद्र राजकारण असे.'[७] अिंग्लंडला जाताना आगनावेवर हिंदी मित्रांशी त्यांच्या ज्या विविध गप्पा होत आणि चर्चा चालत त्या वेळी 'अनेक साध्या विषयांच्या चर्चेचा ओघही ते आपल्या धोरणाच्या राजकारणाकडे वळवीत.'[८] अंदमानामध्येही ते बंद्यांना जे शिक्षण देत असत ते मुख्यत: राजकीयच असे. राजकारणाला प्राधान्य देअूनच शिक्षणाची व्याख्या त्यांनी ठरविली होती.[९]

सावरकरांच्या या राजकीय प्रवृत्तीनुसारच त्यांच्या आवडी-निवडी, क्रीडा, करमणुकी ठरणे स्वाभाविक होते. त्यांना 'आगगाडीचा खेळ खूप आवडे' असे येसू-वहिनीने जरी सांगितले असले[१०] तरी या राजकीय प्रवृत्तीच्या विकासाबरोबर त्यांच्या गाडीला रूळ बदलून बाजूला (Siding) पडावे लागले आणि 'सशस्त्र क्रांतीचे पाय त्यांच्या पोरखेळाच्या पाळण्यात स्पष्ट दिसू लागले."[११] 'विलायती झाडांची सरसकट कत्तल करून विलायतवाल्यांचीच कत्तल केल्याचे समाधान त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेस' भोगावयास सापडू लागले.[१२] हिंदु-मुसलमानांच्या दंग्यात हिंदूंच्या झालेल्या

---

१. मा. आ. पृ. ४९. २. मा. आ. पृ. १८१. ३. मा. आ. पृ. ६९. ४. मा. आ. पृ. ७१. ५. मा. आ. पृ. ४०. ६. मा. आ. पृ. ६४. ७. मा. आ. पृ. २००. ८. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९९. ९. मा. जन्म. पृ. ४८१. १०. मा. आ. पृ. ३७. ११. मा. आ. पृ. ५३. १२. मा. आ. पृ. ५३.

राष्ट्रीय अपमानाचा वचपा मशिदीवर छापा घालण्याच्या खेळात परिणमित होअू लागला.[१] आपापसांत मुलांचे दोन गट पाडून विपक्षाशी लुटुपटीच्या लढाया खेळण्यात ते रमू लागले. डंबेल्स, मलखांब, झोंबी अित्यादी खेळांच्या आवडीचा अुगमही सावरकरांच्या या राजकीय प्रवृत्तीतच सापडतो.[२] सैनिकी शाळा, अश्वारोहण अित्यादी खेळांची बीजेही याच प्रवृत्तीत आहेत. क्षात्रवृत्तीचा अुदय याच राजकीय प्रवृत्तीतून झाला. शस्त्राबद्दलचे आकर्षण वाढले आणि 'धनुष्य–वाण खेळण्यात त्यांची कितीतरी करमणूक होअू लागली.'[३] घरात तिसऱ्या मजल्यावर लपवून ठेवलेली गुप्ती आणि दोन तलवारी पुन्हा पुन्हा काढण्याचा, घासण्याचा व पुन्हा लपवून ठेवण्याचा छंद त्यांना लागला.[४]

वरील करमणुकीपेक्षा अगदी वेगळ्या अशा करमणुकीत सावरकर लहानपणी रमत असत. तिचे वर्णन सावरकरांनी पुढील शब्दांत केले आहे– "रविवारची माझी आवडती करमणूक म्हणजे फळचावरच्या पोथ्या आणि पुस्तके काढून पुन्हा चाळून पुन्हा लावून ठेवणे ही."[५]

सावरकरांचे हे बाह्यछंद झाले. सावरकरांना मनाचाही अेक छंद लागल्याचे दिसते. तो छंद म्हणजे मनाच्या पंचसभेचा. अेकांती आत्मनिरीक्षणात गुंग होण्याचा. हा छंद पुढील जीवनात आपणा स्वत:स अुपकारक कसा झाला याचे वर्णन करताना सावरकर लिहितात, "काही संकट आले, संस्थेच्या वा व्यक्तीच्या प्रकरणी अेखादा पेच आला, की अेकांतात जाअून माझ्या मनाच्या पंचसभेची बैठक बोलवावी. नि:पक्ष-पातपणे विचार करण्याची बळकट शक्ती विकसित होण्यास हा माझा करमणुकीचा छंद पुष्कळ अुपकारक झाला असे मला वाटते."[६] मनाने निर्हेतुक भ्रमंती करण्याचा अेक आगळा छंद त्यांना होता. अंदमानमध्ये हा छंद त्यांना प्रसन्नता आणीत असे.[७]

'कवितेचा छंद 'ही सावरकरांना लहानपणापासूनच जडला होता.[८] अितिहास, राजकारण, विज्ञान, अर्थशास्त्र हे विषय ह्या जगात मानाने जगावयास शिकविणारे म्हणून त्यांना आवडत.[९] पण गणिताची मात्र त्यांना फारशी आवड नसे.[१०]

कुटुंबशीलता

सावरकरांनी आपल्या आअी-वडिलांचा, भावांचा, बहिणीचा, भावजयीचा, चुलत्याचा अत्यंत भावनापूर्ण शब्दांत अनेक ठिकाणी अुल्लेख केलेला आढळतो.

---

१. मा. आ. पृ. ५४. २. मा. आ. पृ. १८३–१८४. ३. मा. आ. पृ. ५६.
४. मा. आ. पृ. ५७. ५. मा. आ. पृ. ४५. ६. मा. आ. पृ. २०१.
७. अंद. अं. पृ. ४०. ८. मा. आ. ३२(ब), ५२. ९. अंद. अं. पृ. २३.
१०. मा. आ. पृ. ६५

यावरून त्यांची वृत्ती कुटुंबशील होती हे स्पष्ट होते. सावरकरांची आओ– राधा-बाओ– ते नऊ वर्षांचे असतानाच वारली. त्यामुळे तिच्या रूपरेखेचा त्यांना अितका विसर पडला आहे की, 'ती पुन्हा दिसली तरी मी ओळखू देखील शकणार नाही' असे सावरकर सांगतात.[१] पण असे असले तरी आओवरील त्यांच्या अुत्कट प्रेमाच्या पुसट छटा मन हेलावून टाकतात. लहानपणी क्षुल्लक कारणावरून झालेल्या रुसव्याने आओशी प्रत्यहीच्या हसण्या-खेळण्याच्या सुखास अंतरल्याबद्दल सावरकरांना वाटणारी हळहळ अंत:करणाची कालवाकालव करते.[२] आओच्या मृत्यूनंतर घरावर आलेल्या मरणकळेचे वर्णन सावरकरांच्या आओवरील अुत्कटप्रेमाने भारलेले आहे. पुढील अेका वाक्यातच पोरक्या झालेल्या सावरकरांच्या दु:खाची बोच कळते. सावरकर लिहितात, "दुपारी दोन वाजता प्रेत दहन होअून अितर सर्व मंडळी स्मशानातून परतली. आओ काही परत आली नाही."[३]

वडिलांबद्दल सावरकरांचे प्रेमही असेच अुत्कट आहे. वडिलांचा शूचिर्भूतपणा, त्यांचा काव्याचा व्यासंग, त्यांचा आओसदृश कनवाळूपणा, त्यांचे शौर्य, त्यांचे कर्तृत्व यांवद्दल सावरकरांना वाटणारे प्रेम वडिलांबद्दलच्या भक्तीत व अभिमानात रूपांतरित झालेले दिसून येते. म्हणूनच वडिलांच्या मृत्यूनंतर चुलत्याने काढलेले अपशब्द सावरकरांना सहन झाले नाहीत.[४] आपल्या पितृऋणाचा अुल्लेख ते अनेक वेळा करतात. "वास्तविक त्यांनीच मला लहानपणापासून देशप्रेमाची, कवितेची, अितिहासाची आणि लोकमान्य टिळकांच्या राजकारणाची रुची लावली होती. माझ्या गुणांचा ते परिपोष करू पाहात आणि मनातल्या मनात माझ्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगीत." अशा शब्दांत आपल्या पितृऋणाचा ते कृतज्ञतापूर्वक निर्देश करतात.[५] नाशिकला शिक्षणासाठी सावरकर असताना त्यांना वडिलांच्या भेटीची अतीव अुत्कंठा लागावी. पंधरवड्याकाठी ते सावरकरांना भेटायला भगूरहून येत. त्या वेळची मन:स्थिती व्यक्त करताना सावरकर लिहितात, "त्या वेळी मी डोळ्यांत पाणी आणून त्यांची वाटही पाहात बसावे. ते असत तो ते दोन दिवस आनंदात जावे. ते भगूरला परत जाअू लागले की, मला पुन्हा तळमळ लागावी.[६] वडिलांनाही सावरकरांचा अतिशय लळा होता. घराचे पांग फेडणारा हाच अेक मुलगा आहे असे त्यांना वाटत होते. त्यांची द्वारका या अेका खांबावर अुभी होती.[७]

चुलत्याबद्दल सावरकरांना वाटणारे प्रेम त्यांच्या आठवणीसरशी आलेल्या अश्रूंच्या प्रेमळ तिलांजलीतून प्रकट झाले आहे.[८]

---

१. मा. आ. पृ. २५. २. मा. आ. पृ. ३०. ३. मा. आ. पृ. ३२(अ)
४. मा. आ. पृ. १०१. ५. मा. आ. पृ. ८४. ६. मा. आ. पृ. ६९.
७. मा. आ. पृ. ८५. ८.मा. आ. पृ. २५.

सावरकरांची कुटुंबशील वृत्ती त्यांच्या दोन्ही बंधूंवरील प्रेमातून फार अुत्कृष्ट-पणे प्रकट होते. लहानपणापासून दोन्ही भावांचा त्यांना अतिशय लळा होता.[१] आपल्या दोन्ही बंधूंच्या देशभक्तीबद्दल त्यांना नितांत आदर आणि अभिमान होता. 'कष्टभोगी देशभक्त', 'कर्मवीर', 'देशवीर', 'झुंजार सैनिक', 'देवाप्रमाणे पूज्य' अशा गौरवपूर्ण शब्दांत ते आपल्या वडील बंधूंचा– बाबांचा– अुल्लेख करतात. बाबांची सहनक्षमता, परोपकारता, मनोधैर्य या गुणांची ते वारंवार वाखाणणी करतात. 'राष्ट्रस्वातंत्र्यार्थ समरमखाचे होमकुंड पेटताच आपल्या देहाची सर्वा-आधी त्यांनी आहुती टाकली' म्हणून बाबांचा त्यांना यथार्थ अभिमान वाटे. बाबांनी केलेल्या कार्याचे महत्त्व सांगताना सावरकर लिहितात, "अितिहासात देशवीरांनी जे अघोर छळ सोसले म्हणून आम्ही वाचू ते त्या देशवीराने जवळजवळ पहिल्या पहिल्या झुंजीतच आम्हांस स्वत:स सोसून दाखविले. त्यायोगे असल्या छळासही आणि त्यागासही तोंड देण्याची शक्ती अजूनही आमच्या रक्तात आहे, ही जाणीव राष्ट्रास झाली."[२] सावरकर परीक्षा अुतरताच बाबांनी दारिद्र्यावस्थेतही पेढे वाटावेत, ममतेने पाठीवरून हात फिरवावा, 'त्रास सोसूनही तात्याचे शिक्षण बंद पडू देणार नाही' अशी प्रतिज्ञा करून बाबांनी कष्ट अुपसावेत, त्या बाबांनी तुरुंगात सोसलेल्या छळाच्या नुसत्या माहितीने सावरकरांचा जीव कासावीस व्हावा, त्यांची सहनशक्ती, वादळात अेखादा प्रचंड वड कड-कड करीत कोसळू लागतो, तशी कोसळून जाअू पाहावी. हृदय फाटू पाहावे.[३] बाबांची अंदमानात गाठ न पडेल तर बरे असा विचार मनात अुसळून यावा.[४] चवळ्याच्या रकटयाचा अेक पायघोळ कोट घातलेली, सदा खोकणारी पण तोंडावरील धैर्याचे हसू मावळू न देणारी बाबांची ती बंदीवान करुण मूर्ती अंदमानच्या कारागृहात वावरताना सावरकर जेव्हा पाहात तेव्हा त्यांना असह्य दु:ख होअी.[५] अलिपूरच्या तुरुंगातून निघताना बाबांची ताटातूट होण्याचा जेव्हा प्रसंग आला तेव्हा सावरकर मनात आक्रंदत म्हणाले, "जीवनाच्या वाटेवर मला सोडून बाबा मरणाच्या बोळानेच वळत आहेत. बहुधा ह्यांचे हेच शेवटचे दर्शन."[६] आणि खरोखर बाबा आसन्नमरण असल्याची बातमी सावरकरांना रत्नागिरीच्या तुरुंगात समजली तेव्हा बाबांच्या मरणाचा प्रतिशोध घेअून त्यांचे श्राद्ध करण्याचा निश्चय सावरकरांनी मनात केला आणि मग त्यांची तळमळ शांत झाली.[७] पुढे सरकारकडून 'स्मशानाचा व्यय वाचविण्यापुरते जरी बाबांना सोडण्यात आले होते' तरी सावरकरांना बाबांच्या सुटकेने आनंद झाला.[८]

---

१. केसरी दि. अं. १९६१. २. मा. आ. पृ. १५७. ३. मा. जन्म. पृ. ३८–३९. ४. मा. जन्म. पृ. ३८, १२२. ५. मा. जन्म. ४८१. ६. मा. जन्म. पृ. ५०७ ७. मा. जन्म. पृ. ५२१. ८. मा. जन्म. पृ. ५२१.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक.

सावरकरांचा धाकटा भाऊ नारायणराव अर्फे बाळ याच्यावर तर सावरकरांचे पुत्रवत प्रेम होते. "किंबहुना आओबाप लहानपणीच वारल्याने त्यास त्या दोघांचे ठिकाणी मीच झालेलो होतो," असे सावरकर सांगतात.[१] असा बाळ जेव्हा धृत-विद्य आणि कार्यक्षम झाला तेव्हा पितृऋणातून आपण मुक्त झाल्याचा आनंद सावरकरांना झाला.[२] आपल्या अंगचे अनेक गुण बाळाच्या ठायी सुपूर्त करूनही सावरकर दुसऱ्या अर्थानेही पितृऋणातून मुक्त झाले होते. अगदी लहानपणापासूनच सावरकरांच्या स्वभावाच्या मुशीत बाळचा स्वभाव ओतलेला होता.[३] सावरकरांच्या व्याख्यानाची ढव, कविता पाठांतर, संभाषणाची लकब, त्या कोटच्या नि कोटिक्रम बाळने हुबेहूब अुचलले होते.[४] अशी ही आपली 'दुजी मूर्ती' पाहून तिच्यावर सावरकरांनी आपल्या वात्सल्य-भावनेचा निरतिशय वर्षाव केला. ही 'अत्यंत जवळची आणि अत्यंत जिवलग ठेव' असाहाय्य, असंरक्षित स्थितीत सोडून अंदमानला जाताना सावरकरांचे हृदय पिळवटून आले[५]; आणि अंदमानातही सावरकरांच्या आनंदाचे अेकमेव निधान 'हे पोरके पोर' झाले. बाळच्या प्रकृतीची आणि आरोग्याची सावरकरांना अितकी विलक्षण काळजी लागली होती की, बहुतेक प्रत्येक पत्रातून ते बाळच्या प्रकृतीची अत्यंत कळकळीने विचारणा करीत होते. 'तुला धडधाकट, आरोग्य, प्रफुल्लता, अुत्साह आतून अुसळी मारीत आहे असे पाहावे; 'जपून अैस, प्रकृतीची काळजी घे, तीच आमचे जीवन आहे.' 'आम्हांला त्या जगाशी बद्ध करते आहे अशी वाटणारी अेकच गोष्ट म्हणजे तुझे आरोग्य आणि सुरक्षितता;' 'मुख्य गोष्ट म्हणजे तुझ्या प्रकृतीची काळजी घेणे;' 'बाळ, तुझी निरोगी आणि नवजीवनाने ओथंबलेली मूर्ती पाहून मला जितका आनंद झाला तितका कशानेही झाला नाही' ही आणि अशा स्वरूपाची कितीतरी वाक्ये सावरकरांच्या पत्रांतून पानोपानी विखुरली आहेत.[६]

आपल्या दोन्ही बंधूंचे देशप्रेम, त्यांचा त्याग, अतुल धैर्य, अंगीकृत व्रतापासून कधीही न ढळणारा त्यांचा कठोर निश्चय, त्यांची तत्त्वनिष्ठा यांबद्दल सावरकरांच्या मनात निरतिशय आदर आणि अभिमान होता, कृतज्ञता होती, प्रेम आणि वात्सल्याची अुत्कट भावना होती असे दिसून येते.

बाबांवर सावरकरांचे पितृवत प्रेम होते आणि बाबांच्या पत्नीवर– येसूवहिनींवर– सावरकरांची मातृवत माया होती. आम्हीच तिची मुले, तिची संपत्ती, तिचा आनंद, तिचा स्वर्ग होतो असे सावरकर सांगतात.[७] माता म्हणून ते तिला

---

१. मा. जन्म. पृ. २२. २. अं. अं. पृ. ५७. ३. मा. आ. पृ. २०९. ४. मा. आ. पृ. २०९. ५. अं. अं. पृ. ५३. ६. अं. अं. पृ. २१, ७६, २६, ८३, ८४. ७. मा. आ. पृ. १५०.

पूज्य प्रणाम करतात.[१] ही ममतेची आअी अंदमानमध्ये आपल्या भेटीस आली नाही म्हणून हळहळतात.[२] सावरकरांच्या जीवनात येसूवहिनीने केवळ मातेचेच स्थान भूषविले नाही. लहानपणची मैत्रीण, भगिनी, राजकारणातील विश्वस्त सहकारिणी अशी विविध नाती तिच्या ठायी अेकवटली होती असे सावरकर सांगतात.[३] अगदी शांत आणि सतत कष्ट सोशीत असलेली पण सत्त्वापासून न ढळलेली अशी अेखाद्या देवतेप्रमाणे ती त्यांना वाटत होती.[४] अशी ही वहिनी हे जग सोडून गेल्याची वार्ता जेव्हा त्यांना अंदमानात समजली तेव्हा अेखाद्या अर्भकासारखा टाहो फोडून ते अुद्गारले, "सुटल्यावर जेथे माझी वहिनी प्रेमाने माझे स्वागत करणार ती ते करायला येणे शक्य नाही अशा घरात जावे लागेल ही कल्पना आली की, सुटकेतील अर्धा आनंद निघून जातो आणि अुदासीनता वाटते. माझी मैत्रीण, माझी बहीण, माझी माता, माझी सहकारकर्ती–प्रेमाची सर्व नाती अेकट्या तिच्यात अेकदम साठविलेली होती. तिने अेखाद्या सतीप्रमाणे मरण स्वीकारले. तिने आपला आत्मा हू की चू न करता आणि तोही मातृभूमीच्या स्थंडिलावर हवन नाही का केला ? हाय !"[५]

येसूवहिनीप्रमाणे त्यांच्या धाकट्या वहिनीवर– शांतेवर– सावरकरांची ममता दिसून येते. बाळला व शांताला अुद्देशून त्यांनी अेक पत्रही लिहिले आहे.[६] त्या पत्रात 'शांतेची प्रकृती बिघडेल असे काही करू नकोस' असे त्यांनी बाळला थोरपणाच्या ममतेने आणि अधिकाराने बजाविले आहे.[७] वाचन आणि लेखन यांसाठी तिला प्रोत्साहन दिले पाहिजे असे सांगण्यासही त्या पत्रात सावरकर विसरलेले नाहीत.

सावरकरांचे पत्नीप्रेम त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणे आणि कदाचित स्वभावजन्य संकोचामुळे फार विस्ताराने प्रकट झालेले दिसत नाही. पण आपल्या गृहिणीच्या भावनांची जाणीव त्यांना नव्हती असा मात्र त्याचा अर्थ नव्हे. बॅरिस्टर होअून येण्याच्या अैवजी बंदीवान होअून आपण विलायतेहून परत आलो हे पाहून भग्नाकांक्ष झालेल्या 'त्या अेकोणीस-वीस वर्षांच्या तरुण मुलीच्या मनास केवढा धक्का बसला असेल' याची जाणीव त्यांना होतीच होती.[८] संसाराचा भव्यतर अर्थ सांगितल्यावरही, अंदमानात काही वर्षांनी कुटुंबास नेअू देतात अशी माहिती सांगण्यामागे कौटुंबिक सुखाची ओढ असावी असे वाटते. कारण पुढे त्यांनी आपल्या पत्नीस अेक कवितावद्ध पत्र लिहून बजाविले होते की, फार फार तर पाच वर्षे धीर धरावा. त्यानंतर अंदमानात का होअीना पण पुन्हा प्रेमाच्या झोपडीत भेटू आणि आपल्या

---

१. अंद. अं. पृ. १९. २ मा. जन्म. पृ. ४११ ३. अंद. अं. पृ. १९. ४. अंद. अं. पृ. ५१. ५. अंद. अं. पृ ८३. ६. अंद. अं. पत्र ८ वे. ७ अंद. अं. पृ. ४४. ८. मा. जन्म. पृ. १४.

स्वत:च्या हाताने लावलेल्या आणि आपल्या झोपडीच्या पुढच्या मांडलीवर फुलांनी डवडवत पसरलेल्या मोगरामालती, जाओजुओ, यांच्या लतावेलींशीच आपले अिष्ट संबंध जुळवून नांदू लागू. जनसहवास नाही तर नाही.'[1] पण सरकारी कडक निर्बंधामुळे तीही आशा निष्फळ होताच 'त्या मानसिक अुत्तापात कल्पनासृष्टीतल्या जाओजुओदेखील सुकून गेल्या.'

आपल्या अनेक पत्रांतून सावरकरांनी आपल्या पत्नीला–यमुनाबाओंना धीराचा संदेश दिलेला आहे! कधी कधी ते आपल्या पत्नीच्या गुणांचा जाणीवपूर्वक अुल्लेख करतात. पण त्यातूनही स्वत:च्या असहायतेबद्दलची व पत्नीच्या भग्नाश मन:स्थितीबद्दलची हळहळ व्यक्त झाल्याशिवाय राहात नाही. 'थोर पोर, दीन पोर, तिची मूक पण अुत्कट ध्येयनिष्ठा पाहिली की कीव येते व धन्यताही वाटते,' असे अेके ठिकाणी ते आपल्या पत्रात लिहितात.[2] बारा-तेरा वर्षांनंतर अंदमानमध्ये पत्नीची भेट झाल्यानंतर तिच्या अंगचे धैर्य आणि गोडपणा पूर्वीसारखाच अढळ आहे हे पाहून त्यांना फार आनंद वाटला.[3] अंदमानहून परत आल्यावर आपल्या पत्नीने आपल्या 'लेखकाचे आणि टंकलेखकाचे काम काही वेतन न घेता केवळ देशाभिमानाच्या भावनेने करण्याचे मान्य केले आहे' ह्यावद्दल झालेला आनंदही सावरकरांनी पत्रातून व्यक्त केला आहे.[4]

सावरकरांच्या पत्नीप्रेमाचा विचार करताना विवाहासंबंधी सावरकरांनी सांगितलेल्या विचारांची आठवण होते. 'क्रांतिकारकांनी लग्न करावे की नाही?' यासंबंधी त्यांनी विवाहपूर्व व्यक्त केलेले विचार आणि विवाहोत्तर त्यांच्या आत्मचरित्रातून व पत्रांतून प्रकट झालेले विचार यांत अेकरूपता आहे की नाही हे पाहण्याची जिज्ञासा अुत्पन्न होते. "तो (क्रांतिकारक) पत्नीच्या मोहाने वा मायेने स्वत:च कर्तव्यच्युत होण्याच्या स्थळी अुलट आपल्या पत्नी, पुत्रासही स्वत:च्या प्रेमाने आणि प्रभावाने आपल्यासारखेच वीरात्मे करून सोडील" असे अुद्गार त्यांनी काढले होते.[5] हे अुद्गार ध्यानी घेअून, त्याच्या आधारे सावरकरांच्या पत्नीप्रेमासंबंधीचा वरील मजकूर तपासल्यास त्यातील विचारामधील अेकरूपता लक्षात येते. त्यात पत्नीप्रेम आहे पण 'सामान्य संसाराचा मोह' नाही.[6] स्वत:च्या ठिकाणची ध्येयनिष्ठा, धैर्य, देशाभिमान पत्नीच्या ठिकाणी आढळल्याबद्दल आनंदाचे आणि धन्यतेचे ते अुद्गार आहेत.

सावरकरांचे आपल्या दोन्ही भावांवर जसे अुत्कट प्रेम आहे तसेच प्रेम अेकुलत्या अेका बहिणीवर–माओवर–आहे. बहीण ही मनुष्याला मिळणारी अत्यंत

---

१. मा. जन्म. पृ. ३१९. २. अंद. अं. पृ. ५१. ३. अद. अं. पृ. ८३. ४. अंद. अं. पृ. ८५. ५. मा. आ. पृ. १८७. ६. मा. जन्म पृ. १५.

थोर देणगी आहे असे ते मानतात.[१] अशा त्या वहिणीला–माअीला–विसरणे म्हणजे स्वत:वरच रागावणे किंवा स्वत:शीच अबोला धरणे होय असे त्यांना वाटते.[२] माअी-संबंधी किंवा तिच्या मुलाबाळांसंबंधी ते पत्रांतून आस्थेने चौकशी करताना आढळतात. तिच्या वसंताची ते वारंवार मोठ्या आवडीने आठवण काढतात. 'ते छोटे सरकार आम्हाला आपल्या हातचा अेखादा शब्द लिहितील का?' म्हणन प्रेमळ पृच्छा करतात.[३] 'आपल्या गृहदेवता छिन्नविच्छिन्न झाल्यानंतर आणि वंशवाग अुद्ध्वस्त झाल्यानंतर वसंत आणि रंजन या मुलांच्या रूपाने सावरकरांना अितका आनंद होतो की, 'त्याच्या (प्रीतिदीपाच्या) परावर्तित झालेल्या सुख-स्पर्श आणि कोमल किरणांनी माझ्या ह्या कोठडीतील निबिड अंधार अुजळू लागला आहे', असे समाधानाचे, सुखाचे ढेकर त्यांनी दिले आहेत.

सावरकरांची कुटुंबशील वृत्ती केवळ निकटवर्ती कुटुंबियांपुरतीच दिसून येते असे नाही. तिच्या व्यापक परिघात त्यांची आजी (आअीची आअी), मामी, कामावाअी, श्वशुर चिपळूणकरांचे सर्व कुटुंब अित्यादींचा समावेश झालेला दिसून येतो. अितकेच नव्हे तर समसंवेदनेने, सहानुभूतीने ते अितर प्राणी-पक्ष्यांशीही समरस होतात, त्यांच्यावर प्रेम करतात, त्यांच्या सुखदु:खाने हेलावतात. डोंगरीच्या कारागृहातील कबुतरांच्या वेदनांनी ते असेच हेलावले होते. अंदमानात मरणोन्मुख शय्येवर असताना कोंबडीच्या पिलांचे खेळ पाहताना ते आनंदले होते. अंदमानी बुलबुलांच्या भाषेशी समरस झाले होते. तेव्हा आपल्या कुटुंबियांवर आणि पशु-पक्ष्यादी प्राण्यांवरही प्रेम करणारे सावरकर कुटुंबशील वृत्तीचे होते असाच निष्कर्ष काढावा लागतो.

मित्रप्रेम

क्रांतिकारक संघटनेत आणि संगरात सावरकरांना सदैव पुढारी व्हावे लागले.[४] अशा अुच्चपदस्थ किंवा अग्रेसर असणाऱ्या व्यक्तीला अनुयायी किंवा सहकारी मिळतात, पण मित्र मिळत नाहीत. सावरकरांना लहानपणी व तदनंतरच्या काळातही अनेक मित्र मिळाले व त्यांच्याशी सावरकर अगदी मनमोकळेपणाने, बरोबरीच्या नात्याने वागले हे खरे! तथापि ते मित्र मात्र सावरकरांना आपले गुरू, मार्गदर्शक, किंवा पालक म्हणून मानीत. सावरकरांचा शब्द त्यांना वेदवाक्य वाटे.[५] सावरकरांबद्दल प्रेमापेक्षा भक्ती आणि आदर वाटे.[६] भगूरला असताना बाल-पणापासून झालेला त्यांचा मित्र राजाराम शिंपी याचा सावरकरांबद्दलचा स्नेहभाव पुढे देशभक्ताच्या पूज्यतेत परिणमित झाला.[७] नाशिकचे वामनशास्त्री दातार

---

१. अंद. अं. पृ. २८. २. अंद. अं. पृ. ५९. ३. अंद. अं. पृ. २८. ४. मा. आ. पृ. ८८. ५. मा. आ. पृ. १९८. ६. मा. आ. पृ. १९९. ७. मा. आ. पृ. ४२.

सावरकरांचे नुसते कर्तृत्ववान सहकारी नव्हते तर अेकनिष्ठ भक्तच होते.[1] शाहीर गोविंद तथा आवा पांगळे यांना सावरकरांविषयी आदर वाटत होता आणि पुढे तो आदर कमी न होता दिवसेंदिवस प्रेम-स्नेहात, पूज्य बुद्धीत आणि अेकनिष्ठ अनुयायित्वात परिणमित होत गेला.[2] डॉ. वि. म. भट हे सावरकरांचे 'अभिन्नहृदय' स्नेही होते तरी 'अेकनिष्ठ अनुयायी' म्हणून सावरकर त्यांचा जाणीवपूर्वक अुल्लेख करतात. स्वत: डॉ. भट यांनीसुद्धा सावरकरांना आपला 'जिवलग स्नेहीच नव्हे तर आपला गुरू आणि पालकही मानावे.' म्हणजे सावरकरांचे त्यांच्या मित्रमंडळीत स्थानच असे होते की, त्यांनी मित्रांशी कितीही बरोबरीच्या नात्याने, समभावाने, प्रेमाने वागावयाचे ठरविले तरी त्यांच्या मित्रांना भक्ताची, अनुयायाचीच भूमिका घेणे अधिक पसंत पडे.

असे असले तरी सावरकरांचे मित्रमंडळही फार मोठे होते. वर अुल्लेखिलेल्या व्यक्तींशिवाय परशुराम शिंपी, गोपाळराव देसाअी, वामन धोपावकर, बाळू कुलकर्णी, रावजी आणि त्रिंबक शिंपी, भिकू वंजारी, बापू नथू, सातारचे डॉ. आठल्ये, मित्रमेळ्याच्या संस्थापकांपैकी पागे आणि म्हसकर, रामभाअू दातार, नाना, त्रिंबक व श्रीधर वर्तक, धोंडभट विश्वामित्र, गंगाराम आणि गणपत न्हावी, श्रीपाद व सखाराम गोरे, का. र. वैशंपायन, जयवंत बंधू, शंकर वाघ, सखाराम दादाजी गोरे, खाडे बंधू, सरोदे, शंकर गिर गोसावी, धनाप्पा चिवडेवाला, देवीसिंग परदेशी, खुशालसिंग गणपत मगर, मायदेव, घन:शाम चिपळूणकर तसेच कोठूरच्या बर्वे घराण्यातील अनेक व्यक्ती अित्यादी मित्रांचा अुल्लेख करावयास हवा. अिंग्लंडला गेल्यानंतर सावरकरांच्या भोवती जे मित्रमंडळ जमा झाले, त्यात श्यामजी कृष्णवर्मा, कामाबाअी, दे. अय्यर, दे. येरुलकर, दे. मास्तर, दे. वर्मा, दे. राणासाहेब, हुतात्मा मदनलाल धिंग्रा, सरदार अजितसिंह, श्री. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, सेनापती बापट अित्यादी व्यक्तींचा समावेश होतो. अंदमानात भेटलेले सहतपीच काही काळानंतर सावरकरांचे सहकारी झाले. त्यांत प्रामुख्याने भाअी परमानंद, होतीलाल, अिंदुभूषण रॉय, अुल्हासकर दत्ता, नानी गोपाळ अित्यादी मंडळी समाविष्ट करता येतील.

ह्या बहुतेक मित्रांवर सावरकरांच्या आचारांचा आणि मुख्यत: विचारांचा परिणाम झाल्याचे दिसून येते. सावरकरांच्या सहवासाने यांतील अनेकांचे विद्यार्जन सुधारले. अनेकांचा मनोविकास आणि बुद्धीच्या शक्तीचा विकास झाला. सावरकरांची देशभक्ती, धाडस, आकांक्षा, सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञान, राजकीय दृष्टिकोन अित्यादी सर्व विशेषांचे अनुकरण त्यांच्या मित्रांनी केले. " माझा मित्र म्हटला की, तो स्वदेशी वस्तू वापरणारा, स्वदेशाभिमानात रंगलेला, स्वातंत्र्याची निदान मानसिक

---

१. मा. आ. पृ. १२६. २. मा. आ. पृ. १३२.

तळमळ तरी लागलेला – बहुधा मित्रमेळ्याचा सभासद झालेला असांवयाचा" अशा शब्दांत सावरकरांनी आपल्या मित्राच्या गुणविशेषांचे वा वैशिष्ट्यांचे वर्णन केले आहे.[१] सावरकरांच्या मैत्रीचा मुख्य कटाक्ष त्यांचा मतांचा प्रचार हाच होता.[२] त्यामुळे सावरकरांची मैत्री ही त्या संबंधित व्यक्तीच्या राजकीय प्रगतीची खूण ठरत असे.[३] नाशिकला शिक्षणासाठी सावरकर आले तेव्हा त्यांच्या मित्रमंडळींचा जीवनक्रम अेकंदरीत 'निष्कपट आणि निष्काळजी, फुटकळ आणि फुकट, हौशी आणि रंगेल, अव्यवस्थित आणि असंयत, बहुधा निरुपद्रवी आणि बहुधा निरुपयोगी, क्वचित अुपद्रवी आणि क्वचित उपयोगी असा होता.[४] अशा त्या अडाणी अुनाडकीत आणि टिवल्याभावल्या करण्यात काळ घालविणाऱ्या मित्रांच्या जीवनाला सावरकरांनी अेक भव्य, दिव्य वळण लाविले.[५] अिंग्लंडला जाताना बोटीवर भेटलेल्या श्री. शिष्टाचारी प्रभृती मित्रांच्या जीवनाचा दृष्टिकोन पालटून टाकला.[६] १९०६ साली अिंग्लंडला गेलेल्या सावरकरांनी पहिल्या दोन वर्षांच्या वास्तव्यात तेथे राहणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या वर्तनात केवढी क्रांती केली याचे वर्णन 'लंडनच्या वातमीपत्रा'तील २७ व्या पत्रात सविस्तर देण्यात आले आहे.[७] 'सर्व विद्यार्थ्यांना बेबंद करण्यास प्रवृत्त करणारे दे. सावरकर हेच गृहस्थ होत' असा अुघड आक्षेपही 'अिव्हिनिंग स्टँडर्ड' या अिंग्लंडच्या पत्राने केला होता.[८] दे. श्यामजी कृष्णवर्मा, दे. अय्यर यांच्यासारख्या पुढारी व्यक्तींच्या मनात क्रांती झाली होती ती सावरकरांच्यामुळेच झाली होती.[९] अंदमानातही सावरकरांनी आपल्या सहकाऱ्यांत राजकीय जागृती करण्याचा, त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला होता. सावरकर अंदमानात येण्यापूर्वी रविवारच्या दिवसात जे बंदीवान फासे खेळत, जुगार खेळत, शिव्यागाळीत आणि अनेक कुकर्मांत गुंतलेले असत ते बंदीवान सावरकरांच्या सहवासात येताच नाना विषयांवरील पुस्तके वाचू लागले, राष्ट्रीय गाणी म्हणण्यात गुंग होअू लागले.[१०] मित्रांचा जीवनक्रम पालटविण्याचा प्रयत्न जसा सावरकरांनी केला, तसा त्यांच्यासाठी झीज सोसण्याचा स्वभावही त्यांनी अनेकदा प्रकट केला होता. नाशिकला असताना आपल्या मित्रांच्या कौटुंबिक संकटांत ते हातभार लावीत असत.[११] अंदमानात नानी गोपाळासारखा मनुष्य अन्नत्याग करून व्यर्थ मातीच्या मोलाने जाअू नये म्हणून सावरकरांनी स्वत: तीन दिवस अन्नग्रहण केले नव्हते.[१२] मार्नसिंगासारख्या सहकाऱ्याच्या मृत्यूचे खरे कारण कारागारीय मंडळाच्या कानांवर निर्भीडपणे घालण्याचा धोका त्यांनी पत्करला

---

१. मा. आ. पृ. १५४. २. मा. आ. पृ. १५४. ३. मा. आ. पृ. १५४. ४. मा. आ. पृ १३०. ५. मा. आ. पृ. १४६–१४७. ६. केसरी दि. अं. १९६१. ७. लं. बा. प. पृ. ०८. ८. लं. बा. प. पृ. ११७. ९. ते. ता. पृ. ८ व ८६. १०. मा. जन्म. पृ. ४८०–४८१. ११. मा. आ. पृ. १९८. १२. मा. जन्म. पृ. २३१.

होता.[1] सावरकरांच्या ठायी आपल्या मित्रांबद्दल, सहकाऱ्यांबद्दल अपरंपार कृतज्ञता आहे. आत्मवृत्त लिहिण्यामागे सावरकरांचे जे अनेक हेतू आहेत त्यांत कृतज्ञता व्यक्त करणे हा अेक हेतू असल्याचे त्यांनी स्वत:च सांगितले आहे. ते लिहितात, "मी सांगितले नाही तर बहुधा ज्यांच्या गुप्त पण अुत्कट राष्ट्रसेवेची आणि महनीय त्यागाची माहिती लोकांस कळणारी नाही, त्यांची साभार स्मृती प्रकटपणे सन्मानून त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचे ऋण अंशत: तरी फेडण्यासही या माझ्या आठवणी कारणीभूत होणाऱ्या आहेत."[2] 'जन्मठेपे'च्या प्रस्तावनेतही ते म्हणतात, "ज्यांच्या सहतपाचा अुत्ताप सहन केला त्यांस सोडून ह्या पारण्याच्या पंक्तीतील ही मिष्टान्ने अेकटयानेच कशी खावी? ही त्यांची प्रतारणा तर होणार नाही ना?"[3] अशा प्रकारची कृतज्ञ भावना त्यांच्या आत्मचरित्रपर लेखातून अनेक ठिकाणी प्रकट झाली आहे.[4] अंदमानात सावरकरांना तेलगोदामाचे व्यवस्थापक नेमल्यावर त्यांना जो आनंद झाला तो आपल्या मित्रांबद्दल कृतज्ञ भावना व्यक्त करता येअील यासाठी! सावरकर लिहितात– "त्या तेल-कोठारात असताना मला जे मुख्य समाधान अनुभवान्ती आले ते हे होते की, माझ्या आणि अेकंदरीत राजबंद्यांच्या अत्यंत दुर्दशेच्या दिवसांत जे लोक आम्हांला अुपयोगी पडले होते त्यांचे पुष्कळ हित मला साधता येअून स्वतंत्र लोकांतील सत्पात्र मनुष्यास आणि कुटुंबासही पुष्कळ सहाय देता आल्याने कृतज्ञता-बुद्धीस प्रसन्नता देता आली."[5] सुहृदांवरील हे अुत्कट प्रेम, ही कृतज्ञता सावरकरांनी आपल्या अंदमानातून पाठविलेल्या पत्रातून पुढील भावपूर्ण शब्दांत कशी अुत्कट रीतीने प्रकट केली आहे पाहा :–. . . . "त्यांची आणि अितर सर्व प्रेमळ स्नेह्यांची मला नित्य आठवण येते. माझे मन आपल्या निर्हेतुक भ्रमंतीवर निघाल्यानंतर प्रत्येक वळणावर त्यांच्या प्रेमळ मूर्तींचे दर्शन घडतेच. आणि मग माझे मन लागलीच थांबते. आणि ज्यांच्या योगाने माझे जीवन असे फुलले त्यांच्यासाठी आर्त अश्रुबिंदूंचे नूतन आणि मनोहर मंदिर अुभारते, त्यांची त्यात काही वेळ प्रस्थापना करते आणि त्यांनी मला विसरू नये म्हणून प्रार्थना करते."

आपल्या मित्रांशी सावरकर किती प्रेमाने वागत ह्या संबंधीच्या त्यांच्या काही सहकाऱ्यांनी दिलेल्या आठवणीही लक्षात घेण्याजोग्या आहेत. श्री. शं. ना. मोघे, श्री. कृष्णराव गांगुर्डे, श्री. हरिभाअू भागवत, श्री. ह. त्र्यं. देसाअी, डॉ. ना. भा. खरे अित्यादींनी सावरकरांचा हा गुणविशेष आपापल्या आठवणींतून स्पष्ट केला आहे.[6] श्री. शं. ना. मोघे यांनी लिहिलेली पुढील काही वाक्ये या दृष्टीने अुल्लेखनीय आहेत:–

---

१. मा. जन्म. पृ. ४३७. २. मा. आ. पृ. ६. ३. मा. जन्म. पृ. ४. ४. मा. आ. पृ. १२३, १७६, २०१, जन्मठेप–१२९, २८८, ३०८, ३१०, ३५४, केसरी–दिवाळी अं. १९६१. पृ. १०४. ५. मा. जन्म. पृ. ४७२. ६. सा. यां. आ.

"तात्यांना आपले सहकारी शक्य तेवढे आपल्या सहवासात असावे व मित्रमंडळीत होणाऱ्या वादविवादाने त्यांच्या ज्ञानात भर पडावी व त्यांची मने ध्येयसिद्धीला सिद्ध व्हावीत असे वाटत असे.... मित्रांतील गुण वाढीस लागून त्यांना राष्ट्रीय वळण देअून त्यांचा आपल्या क्रांतीकार्यासाठी अुपयोग करून घेण्याची तात्यांची हातोटी काही विलक्षण होती.... तात्या आपल्या सहकाऱ्यांशी अत्यंत प्रेमाने वागत."[१]

सारांश, मित्र जोडणे आणि त्यांना आपल्या विचारांनी भारून टाकणे हे सावरकरांच्या स्वभावातच होते. विशिष्ट राजकीय विचारप्रणालीमुळे त्यांचे मित्रमंडळ जसे वाढले तसे विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळे ते मर्यादितही झाले असे दिसून येते.

उद्योगीपणा

सावरकरांचा स्वभाव सततोद्योगी होता हे त्यांनी स्वत:च केलेल्या वर्णनावरून आणि प्रत्यक्ष केलेल्या अनेक कृतींवरून लक्षात येते. त्यांची 'स्वाभाविक कार्यलालसा' त्यांना कधीच स्वस्थ बसू देत नव्हती.[२] त्यांची कर्मतृष्णा, 'अंगीकृत कार्य करण्याची जी क्रियाशील तळमळ' ती सारखी अुसळी मारीत असे.[३] लहानपणी त्यांनी 'दोन अियत्तांचा' अिंग्रजी अभ्यास स्वत:च्या अुद्योगाने घरी बसल्या केला.[४] स्वातंत्र्याची शपथ देवीपुढे घेतल्यानंतर मित्रमेळ्याची स्थापना केली. गणेशोत्सव, शिवाजी अुत्सव, मेळे यांनी नाशिक शहर दुमदुमन टाकले. अनेक विषयांवर कविता-लेखन केले. स्वत:चे शिक्षण चालू असताना ठिकठिकाणच्या वक्तृत्व स्पर्धांत भाग घेतला. त्याच धांदलीत पब्लिक सर्व्हिसची परीक्षाही दिली. निरनिराळ्या गावी मित्रमेळ्याच्या शाखा काढल्या. अखंड वाचन आणि लेखन केले. देहास काटक, सकस व तितिक्षू बनविण्याकरता घट्टे पडेपर्यंत व्यायाम केला आणि हे सगळे करीत असताना मॅट्रिकची परीक्षा अुतरून कॉलेजाच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा केला.

अिंग्लंडच्या वास्तव्यात सावरकरांच्या या अुद्योगशीलतेला कार्यक्षेत्रही मोठे व्यापक मिळाले. राजकीय सभांची त्यांना मूळचीच आवड होती. अिंग्लंडमधल्या विविध सभांतील विचारग्रहण करून ते विचार हिंदुस्थानमध्ये धाडण्याचा अुद्योग त्यांनी हाती घेतला. श्रीशिवोत्सव, सत्तावनच्या स्वातंत्र्याचा अुत्सव, श्रीगुरु-गोविंदाचा अुत्सव अि. विविध देशभक्तांचे आणि हिंदुस्थानातील नेत्यांचे सत्कार, राष्ट्रीय परिषदा, राखीबंधन किंवा विजयादशमी यांसारखे धार्मिक समारंभ, विविध

---

१. सा. यां. आ. पृ. ९, १०, ११. २. मा. जन्म. पृ. २४८. ३. मंदार दिवाळी अंक १९६१. ४. मा. आ. पृ. ३९.

वृत्तपत्रांशी पत्रव्यवहार, 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' व 'मॅझिनी' या ग्रंथांचे लेखन, शिखांच्या अितिहासाचे सूक्ष्म वाचन अित्यादी कितीतरी विविध कार्ये या काळात सावरकरांनी केली. अंदमानसारख्या, 'निःसहाय, निस्साधन व निरुत्साह' अशा अेकान्त वंदीवासात त्यांची कार्यतृष्णा तळमळतच होती; आणि जेव्हा कोणत्याही साधनाच्या अभावी, अत्यंत निर्दय साधनहीनतेतही अेखादे काव्य रचता येअील, हे अेक कार्य तरी करता येअील असे त्यांनी पाहिले तेव्हा स्वभावाची कार्यपिपासा शांत झाल्यासारखे त्यांना वाटले.[१] अंदमानातही त्यांनी अखंड वाचन केले. तेथील ग्रंथालयातील ग्रंथ असा वाचल्यावाचून ठेवला नाही.[२] याशिवाय बंदीवानांचे शिक्षण, संघटना, शुद्धी अित्यादी कार्ये त्यांनी अत्यंत धोका पत्करूनही हाती घेतली. हिंदी भाषेचा व नागरी लिपीचा प्रचार केला. बंदीवानांचे अनेक संप घडवून आणले. स्वतः रचलेली हजार दीड हजार कविता पाठ केली.[३] अितिहास, भौतिक शास्त्रे यांचे वाचन करताना कधी कधी त्यांची स्वाभाविक कार्यलालसा अधिकच प्रदीप्त होत असे.[४] विविध राजकीय बातम्या अैकून कर्मशक्ती अनावर होअून अुसळी घेत असे.[५] कधी कधी "अितक्या अस्वस्थ, अितक्या अुद्योगी–जगभर वावरणाऱ्या स्वभावाला आठ हात लांबीच्या कोठडीत अगदी घरच्यासारखे स्वस्थ" वाटत असल्याचे पाहून त्यांचे त्यांनाच आश्चर्य वाटत असे.[६] प्रदीर्घ कारावासाचा सावरकरांच्या अुद्योगशीलतेवर काहीच परिणाम झाला नाही असे दिसते. "तुरुंगात येताना मनुष्य जसा असेल तसाच्या तसा तो बाहेर पडेल ही गोष्ट शक्यच नाही," असे स्वतः सावरकर सांगतात.[७] पण त्या तुरुंगाला सावरकरांच्या अुद्योगीपणाला मात्र बद्ध करता आले नाही.

आत्मविश्वास

सावरकरांच्या अुद्योगीपणामागे आत्मविश्वासाचे बळ अुभे असल्याचे दिसून येते. अुद्योग हाती घेतल्यानंतर तो तडीला नेण्यासाठी आत्मविश्वासाने ते अुभे ठाकत असत. त्यामुळे कितीही मोठ्या व्यक्तीने वा भीषण परिस्थितीने त्यांना भेडसाविण्याचा प्रयत्न केला तरी ते विचलित होत नसत. मित्रमेळ्याची स्थापना झाल्यावर काळकर्त्यांच्या सांगण्याप्रमाणे हे गुप्तमंडळ चालवावे अशी अट श्री. म्हसकर यांनी घालताच सावरकर लगेच अुत्तरले, "काळकर्तेही तसे नुसते लिहिण्यापुरतेच क्रांतिलेखक काय ते ठरले.... तरी देखील मी अेकटा अशा गुप्त संस्थांस स्थापून

---

१. मा. जन्म. पृ. ९. २. मा. जन्म. पृ. २४६. ३. मा. जन्म. पृ. ४१६
४. मा. जन्म. पृ. २४८. ५. मा. जन्म. पृ. २४९. ६. अंद. अं. पृ. १७
७. अंद. अं. पृ. १८.

सशस्त्र क्रांतीचा मार्ग चोखाळणार. माझ्या देशास स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा मी जी चाफेकर-रानड्यांच्या राखेला स्मरून देवीपुढे, 'काळ' पत्र हाती पडण्यापूर्वी घेतली, तिला दिवसेंदिवस अधिकच प्रज्वलित करण्याचे जे कार्य काळ करीत आहे, तितके जरी त्याचे साहाय्य झाले तरी आभारच! अधिक झाले तर त्यांच्यासह, न झाले तर त्यांस सोडून–ती प्रतिज्ञा, ते व्रत, मी तरी आजन्म, आमरण आचरणार."[१] आपल्या गुप्तसंस्थेच्या कार्यपद्धतीवद्दल व तिच्या यशावद्दल त्यांना आत्मविश्वास होता. म्हणून ते म्हणत, " आमची अशी निष्ठा असे की, तीस कोटी लोकांचे हे राष्ट्र. त्यातील सर्वज़ण जरी कधीच अुठले नाहीत, तरी दोन लक्ष वीर जरी अशा छाप्यांच्या पद्धतीने, गुप्त संघटनेने, गनिमी काव्याने अखंड, अदम्य, अविश्रांत, वृक्युद्ध लढू निघतील तरी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादू शकतीलच शकतील "[२]. अभिनव भारताचे बिन-चूक होकायंत्र आपण घडवले आहे असा विश्वास त्यांना वाटत होता.[३] वक्तृत्वासारखा वुद्धिनिष्ठ व कलात्मक विषय असो, विवाहासारखा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक विषय असो किंवा कारावासाच्या जीवनातील खडतर प्रसंग असो, सावरकर सर्वत्र आत्मविश्वासाने बोलत आणि वावरत. दहिवेली येथील वक्तृत्व-स्पर्धेत सावरकरांचा जरी पहिला क्रमांक आला, तरी सावरकरांचा निबंध कोणीतरी लिहून दिला असावा अशी शंका अध्यक्षांनी प्रकट केली. तेव्हा सावरकरांनी ताडकन अुठून सांगितले, " निबंध मीच लिहिलेला आहे हे दहादा व्यवस्थापक मंडळीस कळवीत असता तो माझा निबंध नाही असे म्हणण्यास पुरावा काय, तर म्हणे माझे वय लहान आहे. . . . पण याच न्यायाने चालायचे झाले तर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली हेही साफ खोटेच म्हणावे लागेल! 'गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिङ्गं नच वयः ।'[४] विवाह आपल्या 'कर्तव्याच्या पायातील शृंखला होणे केव्हाही शक्य नाही असा पूर्ण आत्मविश्वास त्यांना वाटत होता.[५] अंदमानच्या नृशंस कारागृहात असताना 'ह्या कारावासाने मला नमविणे शक्य नाही' ही खात्री त्यांच्या ठायी होती.[६] आपल्या मनोबलावरही सावरकरांचा असाच दृढ विश्वास होता. अशा 'प्रखर मनोबळा'च्या जोरावर त्यांनी स्वतःच्या विवाहाला संमती दिली होती.[७] अंदमानात प्रारंभी त्यांच्या शरीराची प्रकृती अुत्कृष्ट होती पण मनाची प्रकृती त्याहूनही अुत्कृष्ट होती.[८] पुढे पुढे कारावासातील कष्टांनी त्यांचे शरीर दुर्बल झाले; पण मनाच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी लिहिले होते, " . . . . . पण अद्यापिही मनाला, थरथरणाऱ्या अस्थिमांसावर अधिकार चालविण्याची शक्ती व अिच्छा आहे. ह्याहून अधिक जितके असतील तितके सारे क्लेश सहन करायला आणि तेही

---

१. मा. आ. पृ. १३४–१३५. २. मा. आ. पृ. २३०. ३. मा. आ. पृ. २३२. ४. मा. आ. पृ. ८७. ५. मा. आ. पृ. १९०. ६. अंद. अं. पृ. ४७. ७. मा. आ. पृ. १८७. ८. अंद. अं. पृ. २४.

केवळ कुरकुर न करता, अितकेच नाही तर यत्किंचितही विचलित न होता सहन करायला, ते सिद्ध आहे.''[1]

स्वत:ची बुद्धी आणि मन यासंबंधी सावरकरांच्या ठायी असा विलक्षण आत्मविश्वास असल्याने स्वकर्तृत्वावद्दलचा आत्मविश्वास त्यांच्या ठायी अुत्पन्न होणे अगदी स्वाभाविक आहे. आणि तसा तो त्यांच्या लेखनातून प्रकटही झाला आहे. अंदमानात कोलू फिरविताना त्यांचे मन बंड करून अुठे आणि त्यांना म्हणे, '' असले दु:ख आता का सोसतोस ? ह्या तुझ्या शरीराचा आणि कर्तृत्वाचा राष्ट्रेच्या राष्ट्रे अुदयास आणण्यासाठी अुपयोग व्हावा– आता ते मातीमोल ठरले. मग ह्या अंधारात अुगीच कष्टत का पडतोस ? . . . . हा समुद्रमंथनासच अुपयोगी पडावा म्हणून निर्माण झालेल्या कर्तृत्वशक्तीचा मेरुदंड ह्या य:कश्चित कथलीतले ताक घुसळण्याचे कामाला लावून त्याचा स्वत:च अनादर का करतोस ?''[2] सावरकरांच्या मनाच्या या अुद्गारांत बद्ध कर्तृत्वशक्तीचे अुसासे किती ठासून भरले आहेत याची कल्पना येते. 'आपले कर्तृत्व म्हणजे राष्ट्रेच्या राष्ट्रे अुद्धरता येणारी प्रचंड गती देण्यास क्षम असणारे यंत्र ' आहे याची जाणीव त्यांच्या मनाला पुरेपूर होती[3] आणि 'त्याचा योग्य आणि यथाप्रमाण अुपयोग होत नाही ' म्हणून जाळणारी हळहळही होती.[4]

जेव्हा हे कर्तृत्व मुक्त होते तेव्हा त्याने केलेल्या कार्याचे जे वर्णन सावरकरांनी केले आहे ते त्यांच्या आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेले आहे. सावरकरांनी स्थापना केलेल्या मित्रमेळ्याने जे कार्य केले ते किती पुढारलेले होते हे सांगताना सावरकर लिहितात, '' अिंग्रज चोर ही भावना शेतकऱ्याखेडवळापर्यंत अुत्पन्न करणे . . . . . अितके स्पष्टपणे हे सत्य सांगणे त्यावेळेस प्रकट पुढाऱ्यांपैकी कोणास वा वर्तमानपत्रास शक्य नव्हते. वहुतेकांची तसे सांगण्याची अितकी मानसिक प्रगती देखील झालेली नसे.''[5] दुसऱ्या अेका ठिकाणी ते लिहितात, '' (मित्रमेळ्याच्या) त्या मेळ्याने पदांतून सांगितलेल्या तेजस्वी संदेशासारखा देशवीरत्वाचा संदेश अर्वाचीन काळी महाराष्ट्रास कोणी सांगितला नव्हता. अितर कोणासही तसे सांगण्याचे धाडस झाले नव्हते, होत नव्हते.''[6] कधी कधी हा आत्मविश्वास आत्मश्लाघेत मिसळून गेल्यासारखे वाटते आणि मग '' काळ पत्रासही जर त्याचे संदेशास चरितार्थ करणारा कोणी वाचक त्या पिढीत मिळण्यासारखा होता तर तो मी होतो,''[7] किंवा '' माझ्या ध्येयाच्या, धाडसाच्या आणि रणधुमाळीच्या पुढे पाअूल टाकणारा, त्यात माझे पुढारीपण घेणारा त्या

---

१. अं. अं. पृ. ७५. २. मा. जन्म. पृ. १२९. ३. मा. जन्म. पृ. १३०. ४. मा. जन्म. १३१. ५. मा. आ. पृ. १७३. ६. मा. आ. पृ. १७५. ७. मा. आ पृ. ८८.

पिढीतील पुढाऱ्यांत कोणी नव्हता. ते झाडून सारेजण फार फार मागे अुभें असत," असे अुद्‌गार क्वचित त्यांच्या तोंडून बाहेर पडल्याचे दिसून येते.[1]

आशावाद की निराशावाद

सावरकरांच्या ठिकाणी कार्यपिपासा आहे, क्रियाशीलता आहे, सततोद्योगी वृत्ती आहे आणि कर्तृत्वाबद्दलचा आत्मविश्वास आहे. असा मनुष्य आशावादी असणेच अधिक संभवनीय. मग सावरकर तसे आशावादी आहेत का? काही अुदाहरणांवरून तसे ते आशावादी वाटतातही. भारतासारख्या निःशस्त्र, निर्वीर्य, निःसंघटित राष्ट्रास सशस्त्र क्रांती शक्य आहे, अितकेच नव्हे तर जयही मिळणे शक्य आहे असे अत्यंत आशावादी वृत्तीने ते मित्रमेळ्यातील सहकाऱ्यांशी बोलत.[2] पन्नास वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर भायखळ्याच्या तुरुंगात असताना त्यांच्या मनात निराशेचे विचार नव्हते, तर 'आपण धरलो गेल्याने आपल्या क्रांतिकारक संस्थेची काय स्थिती होअील...पुढे काय घाट रचला पाहिजे' असे भविष्यकाळच्या आशावादी योजनांसंबंधीचे विचार त्यांच्या मनात गर्दी करीत होते.[3] अंदमानात सावरकरांसकट सर्व बंदीवानांचा तेथील काराधिप बारी अपमान करीत असे. कधी कधी अश्लील भाषाही तो अुच्चारी. तेव्हा आशावादी सावरकर त्या निराश बंदीवानांना धीर देत. 'निराशेच्या मूर्च्छेवर (आशावादी) कल्पनेची अुत्तेजक मात्रा देत असत;[4] आणि सांगत असत, "आज आपण अवश आहोत. आज आपला या जगात अपमान होअील. पण असाही अेक दिवस क्वचित येअील की, अंदमानच्या याच कारागारात (तुमचे) पुतळे अुभारले जातील आणि येथे हिंदुस्थानचे राजबंदीवान राहात असत म्हणून हजारो लोक यात्रेस लोटतील."[5] आपली ही आशा अंशतः तरी का होअीना पण सफल झाल्याचें वृत्त पुढे सावरकरांना अंदमानातच अैकावयास मिळाले. 'सिंगापूरहून पुढे सरकणारे कोणी कोणी हिंदी प्रवासी अंदमानकडे तोंड करून त्यास नमस्कार करीत', अशी माहिती अंदमानात नवीनच आलेल्या अेका राजबंदीवानाने त्यांना सांगितली होती.[6] 'आशेची सदाफुली' अशी सावरकरांच्या मनात नेहमीच फुललेली असे. पुढे संकटांचे घाव वसून त्यांच्या हृदयातून रक्त वाहू लागले आणि 'आशेची सदाफुली देखील कोळपली' असे त्यांनी म्हटले असले[7] तरी आपली मूळची आशावादी वृत्तीच त्यांनी त्यातून सूचित केली आहे असे दिसून येअील. डॉ. के. ना. वाटवे यांनी सावरकरांच्या मानसिक आणि शारीरिक स्थैर्याच्या

---

१. मा. आ. पृ. ८९. २. मा. आ. पृ. २२९. ३. मा. जन्म. पृ. १७.
४. मा. जन्म. पृ. ४२१. ५. मा, जन्म. पृ. १२१. ६. मा. जन्म. पृ. ४२१.
७. अंद. अं. पृ. ५३.

ज्या तीन शक्ती सांगितल्या आहेत त्यांत आत्मबलाचा पुरा विश्वास, विजिगीषा आणि आशावाद यांचा अुल्लेख केला आहे.[1]

पण सावरकर असे आशावादी दिसत असले तरी लहानपणापासून त्यांच्या स्वभावाचा 'अेक अशुभाकांक्षी दूरदर्शीपणाचा विक्षिप्त आणि अपशकुनी कल' असल्याचे ते स्वत:च सांगत.[2] अितकेच नव्हे तर 'अशुभाशीच सतत झगडत राहणे दैवी आलेल्या माझ्या आयुष्यास तो फारच अुपयोगी पडला' अशीही पुस्ती ते जोडीत. आपल्या या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी कितीतरी अुदाहरणे दिली आहेत. मनाच्या या अपशकुनी कलामुळेच लहानपणी त्यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या प्लेगच्या आपत्तीला तोंड देण्यासाठी ते सिद्ध झाले.[3] पुढे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात अुतरल्यावर 'प्रतिकूल तेच घडेल' हा हितपरिणामी नियम त्यांना अत्यंत अुपयोगी पडला आणि भावी संकटांच्या प्रतिकाराची मानसिक सिद्धता करण्याची सवय त्यांच्या मनाला लागली. पन्नास वर्षांची शिक्षा झाल्यावरही हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या निकालाने आपण क्वचित सुटू असा संभव त्यांना वाटत होता. पण तो निकाल विरुद्ध लागूनही सावरकरांच्या मनाला तीव्र निराशेने घेरले नाही. याचे कारणही त्यांच्या वरील हितपरिणामी नियमात सापडते.[4] अंदमानातील कोठडीत जास्तीत जास्त तीन वर्षे कैद्याला बंद केल्याची व मग बाहेर फिरण्याची सवलत मिळाल्याची अुदाहरणे सावरकरांनी अैकली होती. 'परंतु कठिणतम तेच गृहीत धरून त्याच्या प्रतिकाराची मानसिक सिद्धता आधीच करून ठेवण्याच्या या अत्यंत अुपयोगी नियमांस अनुसरून' सावरकरांनी ही कोठडीबंदीची मुदत पाच वर्षेपर्यंत गृहीत धरली होती."[5] पहिल्या महायुद्धातील जर्मनीच्या प्रारंभीच्या जयाने अंदमानातील बहुतेक कैदी अिंग्रजांचे राज्य काही महिन्यांतंच जाणार व आपण सुटणार या आशेने वेडावले होते. त्यांनाही सावरकरांनी आपल्याच हितपरिणामी नियमाचे सूत्र सांगितले. त्या सहतप्यांना ते म्हणाले, "बाबांनो, अशा भलत्याच आशा धरू नका. नाहीतर क्वचित निराशेची प्रतिक्रिया सहन होणार नाही. आलीच वेळ तर निधून जाअूच. पण तीवर अवलंबून राहून चालणार नाही. तिची निश्चिती न बाळगता अिथेच झुंजत मरण्याची मनाची सिद्धता ठेवा."[6] अंदमानात अितर राजबंदीवानांच्या व खुद्द सावरकरांच्याही सुटकेच्या भुमका मधून मधून अुठत. तेव्हाही सावरकर वरील नियमानेच बंदीवानांचे समाधान करीत असत.[7]

---

१. केसरी अ. वि. २. मा. आ. पृ. ९४. ३. मा. आ. पृ. ९४. ४. मा. जन्म. पृ. ७. ५. मा. जन्म. पृ. ७६–७७. ६. मा. जन्म. पृ. ३९५. ७. मा. जन्म. पृ. ४४९.

ही सर्व अनुकूल व प्रतिकूल अुदाहरणे पाहिल्यावर प्रश्न असा पडतो की, सावरकर हे खरोखर आशावादी आहेत की निराशावादी आहेत? आशेच्या सदा-फुलीने त्यांचे मन फुललेले आहे की निराशेच्या सहारा वाळवंटावर ते तळमळत आहे? पण थोडया सूक्ष्म विचारांती या प्रश्नांची अुत्तरे सापडू शकतात.

पहिली गोष्ट अशी की राष्ट्रीय किंवा सार्वजनिक, सामाजिक अुन्नतीच्या क्षेत्रांत ते अत्यंत आशावादी वाटतात पण 'अशुभाशीच झगडत राहणे दैवी आलेल्या स्वत:च्या आयुष्यात' मात्र निराशावादाकडेच, अशुभाकडेच त्यांच्या मनाचा कल झालेला दिसतो. ते आशावादी आहेत व 'मनुष्याने अगदी निराश कधीच होता कामा नये' असे जरी त्यांचे मत असले[१] तरी 'वेडी आशा धरण्यापेक्षा ती न धरणेच कर्मयोगाच्या मार्गात अधिक श्रेयस्कर नव्हे तर सुखकरही होते' असा स्वानुभवान्ती त्यांनी सिद्धान्त बसविलेला आहे[२]. याच सिद्धान्तानुसार अनुकूल तेच सत्य मानण्याची त्यांची वृत्ती नाही.[३] शिवाय ही निराशा स्वभावजन्य असण्यापेक्षा वाह्य प्रतिकूल परिस्थितीने त्यांना स्वीकारावी लागली. ज्या काळात त्यांना कार्य करावे लागले त्या काळाचे वर्णन करताना सावरकर लिहितात, "आपल्या ह्या काळात ज्यांचा भारतात जन्म झाला आहे त्यांचा नेहमीचा सहचर खरोखर शीतकाल आहे, वसंत नाही."[४] दुसऱ्या अेका ठिकाणी ते सांगतात, "सिद्धीच्या मानससरोवरावर क्रीडा करण्याचे ज्या पिढीचे भाग्य असेल ते राजहंस सुखेनैव मुक्ताफळ भोजन करून बिसतंतूंचा फराळ करोत. परंतु प्रयत्नांच्या मृतसरोवराच्या विषारी प्रदेशातून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे तिने प्रतिकूल लोखंडाचे चणेच खावयाची व पचवायची सवय ठेवली पाहिजे."[५] सावरकरांचा जीवनविषयक दृष्टिकोनही संपूर्ण आशावादी किंवा संपूर्ण निराशावादी नाही. पुढील शब्दांतून तो स्पष्टपणे प्रकट झाला आहे. "ह्या लोकातले जीवन म्हणजे त्रिदल पुष्पाप्रमाणे आहे. अेका पाकळीवर सुखाचा रंग चढला आहे, दुसरीवर दु:खाचा चढवला आहे, आणि तिसरीवर कोणताच रंग नाही, किंवा ह्या दोन्ही रंगांचे हे मिश्रण आहे. आज सुखाच्या तर अुद्या दु:खाच्या पाकळीला कीड लागलेली असते आणि हे असे गाडे अेकसारखे चाललेले असते."[६]

महत्त्वाकांक्षा

सावरकरांच्या अुद्योगीपणामागे अुभ्या असलेल्या विविध मानसिक शक्ती आपण पाहिल्या. पण त्यांचा अुगम ज्या प्रमुख प्रवृत्तीतून झाला त्या महत्त्वाकांक्षेचा विचार केल्याशिवाय हे विवेचन पूर्ण होणार नाही. डॉ. के. ना. वाटवे यांनी सावरकरांच्या

---

१. मा. जन्म. पृ. १६८. २. मा. जन्म. पृ. १६८. ३. मा. जन्म. पृ. १६८.
४. अंद. अं. पृ. ५८. ५. मा. जन्म. प. ७. ६. अंद. अं. पृ. ५७.

स्वयंप्रभुता (Self-Assertion) या सहजप्रवृत्तीमागे महत्त्वाकांक्षा ही प्रमुख प्रेरणा असल्याचे म्हटले आहे.[१] "सावरकरांच्या अनेकविध महत्त्वाकांक्षांत त्यांच्या ठायी असणारी राजकीय महत्त्वाकांक्षा सर्वांत प्रभावी वाटते. किंबहुना ही राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा त्यांची अेक अुपजत प्रवृत्तीच होती.[२] बालवयातच भारतीय स्वातंत्र्य-संपादनाची तीव्र आकांक्षा त्यांच्या मनात अुदित झाली होती.[३] पुढे ती 'राजकीय महत्त्वाकांक्षा सशस्त्र क्रांतीकडे झपाटयाने झुकू लागली.[४] या राष्ट्रीय आकांक्षेबरोबर काही व्यक्तिगत पण मुख्य आकांक्षेला पोषक अशा आकांक्षाही त्यांच्या ठिकाणी दिसतात. अगदी लहानपणी त्यांच्या 'चिमुकल्या बुद्धीने' महाकाव्य लिहिण्याची आकांक्षा वाळगली होती.[५] आणि पुढे अंदमानच्या अेकान्त कोठडीतील शांततेच्या धुळीवर अंग टाकताच ती आकांक्षा पुन्हा दृग्गोचर होअू लागली होती.[६] ते महा-काव्यही मातृभूमीच्या चरणी अर्पण करण्यात येअील अशा हेतूने लिहावयाचे होते.[७] कोणत्याही विषयात मागे न पडण्याची आकांक्षा लहानपणापासूनच असल्याने बौद्धिक व शारीरिक क्षेत्रांतही त्यांच्या कर्तृत्वशक्तीला अवसान चढल्याचे दिसते. तत्त्वज्ञानांच्या ग्रंथातील गंभीर संवादांत आणि प्रयोगांत त्यांची बुद्धी रंगली ती अशा स्वरूपाच्या आकांक्षेमुळेच. 'अुच्च शिक्षणाच्या आकांक्षेच्या दृष्टीनेच लवकर लग्न करण्याचा' सावरकरांचा विचार नव्हता.[८] शोभिवंतपणाची हौस घेअून जसे ते व्यायामाकडे वळले तसेच शारीरिक बळानेही आपल्या मित्रांचा वरचढ-पणा चालू नये – अशी अेक सुप्त आकांक्षा सावरकरांच्या मनात वास करीत होती.[९] अशा रीतीने त्यांच्या राष्ट्रीय, बौद्धिक व शारीरिक अशा सर्व प्रकारच्या अुद्योगांची अुभारणी त्यांच्या तीव्र महत्त्वाकांक्षेतून झाल्याचे दिसून येते.

धाडस व शौर्य

सावरकरांच्या स्वभावाचा लहानपणापासूनचा अेक विशेष असा की, संकट येताच त्यांचे मन दगडासारखे होअून अुलट त्यांच्या कर्तृत्वास अेक प्रकारचे अवसान चढे.[१०] त्यातच त्यांच्या अपशकुनी विचारांची भर पडे. आणि मग प्रत्येक संकटास अविचलपणे तोंड देण्याची त्यांच्या मनाची सज्जता होत असे.[११] सावर-करांच्या धाडस, शौर्य-धैर्यादी गुणविशेषांचे मूळ त्यांच्या वरील विशिष्ट मनःप्रवृत्तीत सापडते. मग राजकीय, सामाजिक, धार्मिक वा साहित्यिक – कोणत्याही क्षेत्रात सावरकर वावरत असोत, त्यांचे पूर्वनिर्देशित स्वभावविशेष ठसठशीतपणे नजरेत

---

१. केसरी अ. वि. २. मा. आ. पृ. १४६. ३. मा. आ. पृ १७२. ४. मा. आ. पृ. ५३. ५. मा. आ. पृ. ४९. ६. मा. जन्म. पृ. ९. ७. मा. जन्म. पृ. ९. ८. मा. आ. पृ. १९०. ९. मा. आ. पृ. १८२. १०. मा. आ. पृ. ९६. ११. मा. आ. पृ. ९४.

भरतात. बालपणी त्यांचा हा धीटपणा कधी वादविवादातून चमकून अुठे,[१] तर कधी परधर्मीयांच्या प्रार्थना मंदिरावरील छाप्यातून प्रकट होत असे.[२] अेकदा त्यांचे हे धाडस लोखंडी तारेच्या चिमटचात अस्सल काळा साप पकडण्याच्या खोडकरपणातूनही प्रकट झाले होते.[३]

राजकीय क्षेत्रात 'देशमातेच्या मोचनार्थं पणास लावलेल्या प्राणाबरोबरच असीम धाडस' हे अेक प्रभावी शस्त्र सावरकरांच्या व त्यांच्या अवघ्या शेपन्नास सहकाऱ्यांच्या हाती होते.[४] सावरकरांच्या ध्येयाच्या, धाडसाच्या आणि रण-धुमाळीच्या पुढे पाअूल टाकणारा आणि त्यात त्यांचे पुढारीपण घेणारा त्या पिढीतील पुढाऱ्यांत कोणी नव्हता.[५] अितर पुढाऱ्यांनी व वर्तमानपत्रांनी चाफेकर-रानड्यांचा माथेफिरू म्हणून धिक्कार करावा, तर सावरकरांनी त्यांच्या कृत्याचे अुघड अुघड समर्थन करण्याचे धाडस दाखवावे.[६] पुढाऱ्यांप्रमाणे गुरुजनांकडूनही त्यांचा तेजोभंग होई. म्हणून सावरकर लिहितात, "माझ्या लहानपणी काय किंवा प्रौढपणी काय, मला माझ्या साध्या धाडसापासून तो अगदी स्वातंत्र्य-घोषणेच्या आणि राजक्रांतीच्या वा समाजक्रांतीच्या अभिनव भारतीय धाडसापर्यंत अुत्तेजन देणारे गुरुजन मिळण्याचे सुदैव क्वचितच लाभले."[७] व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूनंतर सर्व देश राजनिष्ठा प्रकट करण्यात अहमहमिकेने दंग झाला असता "अिंग्रजांची राणी म्हणजेच आमच्या शत्रूची राणी...आमचा राजा आमचा देश. दुसरा राजाबिजा आम्ही जाणत नाही," असे स्पष्टपणे सांगण्याचे धाडस सावरकरांनी दाखविले.[८] त्रिंबकेश्वरची राजनिष्ठांची सभाही त्यांनी धाडसी कृत्याने अुधळून लावली. 'परराजाशी राजनिष्ठा म्हणजेच स्वराष्ट्राशी राष्ट्रद्रोह' अशा स्वरूपाची वाक्ये लिहिलेली भित्तीपत्रके फडकविण्याचे अुभ्या तीन पिढ्यांतील पहिले धाडसी कृत्य सावरकरांनी केले.[९] अिंग्लंडला जाअून व प्रत्यक्ष 'शत्रूच्या शिबिरात' घुसून तेथे राजद्रोही चळवळी करण्याची धडाडी त्यांनी दाखविली. मदनलाल धिंग्राच्या निषेधार्थ कॅक्स्टन हॉलमध्ये भरलेल्या सभेत मध्यभागी व शांततेने अुभे राहून खुनीच्या निषेधाच्या ठरावास अेकाकी पण मोठ्या धैर्याने त्यांनी विरोध केला.[१०] कारावासाच्या प्रदीर्घ काळातही सावरकरांचे धैर्य अनेक वेळा कसास लागले होते. ज्या धैर्याने त्यांनी पन्नास वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा अैकली ते धैर्य पाहून डोंगरीच्या कारागृहातील अधिकाऱ्यालाही आश्चर्य वाटले.[११] 'या संकटात आपण तरी डगमगणार नाही' अशी हमी सावरकरांच्या वतीने त्यांच्या हवालदाराने आपल्या

---

१. मा. आ. पृ. ४८. २. मा. आ. पृ. ५४. ३. मा. आ. पृ. ११२.
४. मा. आ. पृ. २३६. ५. मा. आ. पृ. ८९. ६. मा. आ. पृ. ७९.
७. मा. आ. पृ. ५२. ८. मा. आ. पृ. १६५. ९. मा. आ. पृ. १८०.
१०. लं. वा. पृ. १२२. ११. मा. जन्म. पृ. १.

कुटंबियांना दिली.[१] 'आपल्या धीरोदात्त वर्तनाचा माझ्या मनावर झालेला ठसा कधीही पुसट होऊ शकणार नाही' अशी कबुली अेका युरोपियन अधिकाऱ्यानेही दिली होती.[२] सावरकरांचे साहस पाहून ठाण्याच्या कारागृहातील अेका अट्टल दरोडेखोराला विलक्षण अचंबा वाटला होता आणि त्यांच्यासारखा शूर पुरुषाचा बंदा गुलाम म्हणून स्वत:ला संबोधण्यात त्याने धन्यता मानिली होती.[३] अंदमानाला भीषण दृश्याच्या जबडयात चुरले न जाता सावरकर निष्कंप,निर्भीड अुभे राहिले आणि 'मूर्ति दुजी ती' या कवितेच्या पठनाने त्यांनी स्वमनाला वज्रकठोर बनविले.[४] 'मरणोन्मुख शय्येवर' पडल्यावर प्रत्यक्ष मृत्यूशीही संवाद केला.

सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतही सावरकरांचा धाडसी स्वभाव प्रकट झाला आहे. नाशिकच्या मित्रमेळयाच्या कार्यात जातिभेदाची व विटाळवेडाची मूर्ख रूढी नाहीशी करण्याचा त्या काळाच्या मानाने धाडसी असा प्रयत्न त्यांनी केला. अंदमानात नित्य घडणाऱ्या मुसलमानीकरणास अडथळा करण्याचे धाडस अज्ञ हिंदूस तर राहोच पण राजकीय बंदीवानांसही होत नसे.[५] पण सावरकरांनी अंदमानात गेल्यावर सरासरी दीड दोन वर्षांनी मुसलमानीकरणाच्या या कृत्यास पहिला प्रतिकार करण्याचे धाडस दाखविले आणि मुसलमानावर पहिला खटला भरला.[६] शुद्धीकरणाच्या चळवळीमागेही सावरकरांचा हा धाडसी स्वभावच दिसून येतो. गणमात्रांची व आर्येच्या नियमांची फारशी माहिती नसताना लहानपणी आर्या रचण्यात सावरकरांनी दाखविलेले धाडस व पुढे अंदमानात अनुष्टुप छंदाचे नियम माहीत नसताना त्या अनुष्टपात महाकाव्य रचण्यात त्यांनी दाखविलेले धाडस ही त्यांची साहित्यक्षेत्रातील धाडसांची अुदाहरणे म्हणून दाखवावी लागतील. फ्रान्सच्या किनाऱ्यावर बोटीतून स्वमुक्ततेसाठी सावरकरांनी समुद्रात घेतलेल्या अुडीने सावरकरांचे धाडस त्रिखंडात दुमदुमले आहे.

सावरकरांच्या या धाडसात व शौर्यात – विशेषत: राजकीय धाडसात तामसी आंधळेपणा होता ? की अुतावळेपणा होता ? की बेहिशोबीपणा होता ? की बेफिकिरी होती ? की विचारपूर्वकता होती ? सावरकरांनी स्पष्टच सांगितले आहे की 'बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे'. आपल्या या धाडसाच्या परिणामाची पूर्ण कल्पना त्यांना होती व ती त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सविस्तरपणे सांगितली होती.[७] लंडनमध्ये संपूर्ण स्वराज्याच्या ठरावावर बोलताना ते म्हणाले होते, "या अंतिम साध्याला संमती देण्यापूर्वी तुरुंगाच्या भिंती व अंधाराच्या गुहा अित्यादिकांची चित्रे डोळ्यांपुढे

---

१. मा. जन्म. पृ. ४. २. मा. जन्म. ४२. ३. मा. जन्म. पृ. २४.
४. मा. जन्म. पृ. ७१. ५. मा. जन्म. पृ. २५७. ६. मा. जन्म. पृ. २६२.
७. मा. आ. पृ. २२६.

आणा. त्या चित्रांच्या देखाव्यात तुम्हांला आकर्षण करणारे मनोहरत्व दिसते आहे की नाही ते पाहा. विस्तवाच्या निखाऱ्यावर पाय ठेवून तो मृदू गादीवर ठेवल्याप्रमाणे अचंचल पडत आहे की नाही ते निश्चित करा व मग ह्या असह्य यज्ञात आनंदात बलिदान करण्याची अुत्कट अिच्छा होत आहे असे जर तुम्हांस वाटत असेल तरच या ठरावास संमती द्या. नाहीतर घाअी करण्यात हशील नाही." सावरकरांचा धाडसीपणा जसा अेका विशिष्ट, मनोवृत्तीतून स्फुरलेला आहे तशी त्यांच्या शौर्याची वृत्तीसुद्धा दूरगामी परिणामाच्या विचारानंतरच घडलेली आहे.

हौतात्म्याचे आकर्षण

सावरकरांच्या धाडसीपणाचे व शौर्याचे मूळ शोधताना त्यांच्या हुतात्मवृत्तीचा विचार अपरिहार्य ठरतो. सावरकरांना क्रांतिकारकाची स्फूर्तीच हौतात्म्यातून मिळाली आहे. 'चाफेकरांच्या फाशीतून आम्ही जन्मलो' असे त्यांनी स्वत:च सांगितले आहे.[१] "माझ्या देशास स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा मी चाफेकर-रानडयांच्या राखेला स्मरून देवीपुढे घेतली" अशी स्पष्ट कबुली त्यांनी दिली आहे.[२] वासुदेव बळवंतने प्रज्वलित केलेल्या हुतात्म्यांच्या परंपरेतील कार्य आपण करीत आहोत अशी त्यांची दृढ भावना होती. म्हणून ते म्हणतात, "वासुदेव बळवंताच्या परंपरेने चाफेकर बंधूंची क्रांतिसंस्था चेतविली. चाफेकर-रानडे फाशीची शिक्षा घेअून फाशी गेल्याची स्फोटक वार्ता अैकताच माझे बालहृदय पेटले आणि मी माझ्या कुलदेवते-समक्ष त्यांचे क्रांतिकार्य पुढे चालू ठेवण्याची शपथ घेतली."[३] या हुतात्म्यांनी घालून दिलेले पराक्रमाचे धडे गिरविण्याचे कार्य सावरकरांनी पत्करले.[४]

हौतात्म्य हेच सावरकरांच्या स्वातंत्र्यस्फूर्तीचे स्थान असल्याने अितरांच्या ठिकाणी अशा हौतात्म्यातूनच स्वातंत्र्यस्फूर्ती अुत्पन्न करावी अशी त्यांची भूमिका होती. 'आमची फाशी आणखी कोणाला जन्म देअील' अशी त्यांची धारणा होती.[५] "अिंग्रजी सत्ताच अुलथून टाकली पाहिजे" ही गोष्ट स्पष्टपणे ज्वालाग्रही भाषेत...फाशीच्या खांबावरून गर्जत राहिल्यावाचून लोकांची हीन लीन आणि अुपेक्षावृत्ती मावळून ते केव्हाही अुठावयाचे नाहीत", असे त्यांना वाटत होते.[६] "...त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या दृष्टीसमोर धरल्यावाचून लोकांची मने आकर्षित होणार नाहीत या भावनेने त्यांनी धाडसी अुद्योग हाती घेतले होते."[७] त्यांची अशी खात्री होती की 'हुतात्म्यांनी सोसलेल्या विपत्ती हीच प्रेरक शक्ती आहे. ती जनतेला हालविते, टोचते आणि पुढे

---

१. मा. आ. पृ. १६५. २. मा. आ. पृ. १३५. ३. आत्म. पू. पी. पृ. १०६.
४. आत्म. पू. पी. पृ. १०६. ५. मा. आ. पृ. १६५. ६. मा. आ. पृ. १३८.
७. मा. आ. पृ. १३८.

ढकलते. जनतेपैकी अुत्तमोत्तम पुरुष जेव्हा क्लेश सहन करतात तेव्हाच अितरांना काम करता येते.'[१]

हौतात्म्याने जनतेत केवळ स्वातंत्र्यस्फूर्ती अुत्पन्न होते व जनता जागृत होते असे नाही, तर जनतेतील शत्रुंजयवृत्तीही वाढते असे सावरकरांना वाटत होते. चाफेकरांच्या तेजाने चेवू पाहणारी शत्रुंजय, वीर वृत्ती पुन्हा थंडगार होअू नये म्हणूनच त्यांनी स्वत: होम करण्याचे ठरविले होते.[२] असे हौतात्म्य जनतेत मरणाचे बाळकडू, मरणाची क्षमता प्रदीप्तवीत शत्रूस राज्यासकट हाकणे अधिकाधिक धोक्याचे करते असा साधार विश्वास त्यांना वाटत होता.[३]

हौतात्म्याबद्दलच्या या विशिष्ट दृष्टिकोनामुळे राष्ट्रातील तरुणांचे ध्येय राष्ट्राची प्रगती, कार्याचे स्वरूप ह्यासंबंधीच्या सावरकरांच्या विशिष्ट कल्पना बनल्याचे दिसून येते. ध्येयासंबंधी विचार व्यक्त करताना ते लिहितात, " अेकंदरीत तरुणांच्या दृष्टीसमोर असायला योग्य असे अुदात्त ध्येय संपत्ती मिळविणे हे नाही, तर आत्मयज्ञ करणे हे आहे. पुष्पलतिकांनी अुद्यान शृंगारणे हे नाही. देवांच्या माळेसाठी ज्याची सर्व फुले शीर्ण झालेली असतात तेच अुद्यान चिरंतन पुष्पांनी बहरलेले असते."[४] ' कार्य होणे हा योगायोग आहे ' असे त्यांना वाटत होते. ' कार्याचे यशापयश योगायोगाच्या गोष्टी आहेत' असेच ते सांगत असत.[५] म्हणून 'आत्मदान करणे, हा निश्चित नियम आहे ' किंवा ' खरा आत्मयज्ञ म्हणजेच कार्य होय, '[६] अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.[७] राष्ट्राच्या प्रगतीचा त्यांचा निकष अगदी वेगळा होता. ' किती कार्य झाले किंवा प्रयत्न झाले यापेक्षा लोकांनी किती आत्मयज्ञ केला, किती क्लेश सहन करण्याचे सामर्थ्य दाखविले यांवरून राष्ट्राची प्रगती ठरवावयाला शिका ' असे त्यांचे सांगणे होते.[८] सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील ज्या तीन मूलद्रव्यांचा श्री. भा. कृ. केळकर यांनी उल्लेख केला आहे, त्यांत असीम स्वातंत्र्यप्रीती, हौतात्म्याचे आकर्षण व हिंदुत्वाचे अधिष्ठान या त्रिगुणांचेच प्रामुख्याने वर्णन केले आहे.[९]

हौतात्म्याचा विचार करताना प्रशंसनीय हौतात्म्य व अनुकरणीय हौतात्म्य यांतील भेद दाखविण्यास सावरकर विसरलेले नाहीत. राष्ट्राच्या क्रांतियुद्धात ' मरत मरत मरण्याहून ' ' मारीत मारीत मरण ' हे त्यांना केव्हाही श्रेष्ठ वाटते.[१०] परंतु राष्ट्रातील प्रत्येक चळवळ, राष्ट्रीय झुंजाराचा प्रत्येक सामना, नुसता प्रशंसनीय असून अुपयोगी नाही, तर तो कुशल, अिष्ट आणि कार्यक्षमही असला पाहिजे

---

१. अंद. अं. पृ. ४७. २. मा. आ. पृ. ८१. ३. मा. आ. पृ. २३०. ४. अंद. अं. पृ. ५८–५९. ५. मा. जन्म. पृ. १२४. ६. अंद. अं. पृ. ४. ७. अंद. अं. पृ. ४७. ८. अंद. अं. पृ. ४. ९. सा. द. पृ. ११. १०. मा. आ. पृ. २३१.

अशी त्यांची विधायक भूमिका आहे.[१] तेव्हा 'नुसते आत्मार्पण करणे म्हणजे मुक्ती मिळविणे नव्हे, नुसते मरत राहणे म्हणजे समर जिंकणे नव्हे, तसेच नुसते मरणी मरणे, हुतात्मा होत राहणे म्हणजे राष्ट्रीय वा धार्मिक स्वातंत्र्य संपादन करणे नव्हे', असे त्यांचे स्पष्ट मत आहे.[२] म्हणून अनुकरणीय हौतात्म्याची व्याख्याही त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. सावरकर लिहितात, "ज्या अेका प्राणाच्या दानाने शेकडो निरपराध प्राण, राष्ट्राचा मान, अेका न्याय्य ध्येयाच्या ध्वजाचा गौरव हे राखले जातात तो प्राण देणे हेच खरे हौतात्म्य – केवळ प्रशंसनीयच नव्हे, वंदनीय नव्हे–पण अनुकरणीय हौतात्म्य होय."[३]

वाचन

सावरकरांची ज्ञानलालसाच मोठी. त्यामुळे त्यांनी लहानपणापासून विविध आणि अश्रांत वाचन केले.[४] लहानपणी ते मोरोपंती कवितांची पुस्तके मित्राकडून महिना काही पैसे देअून आणीत व वाचीत.[५] नाशिकला शिक्षणासाठी असताना त्यांचा हा वाचनाचा नाद अधिकच वाढीला लागला. नाशिकला ते नेहमी वाचनालयात असावयाचे.[६] त्या वाचनालयातील पुस्तके त्यांनी अनुक्रमाने प्रथमपासून शेवटपर्यंत वाचली.[७] त्यांच्या या सर्वभक्षक वाचनामुळे नाशिकचे त्यांचे मित्रमंडळ त्यांचा 'ग्रंथकीट' (Book-worm) म्हणून अुपहास करीत.[८] वाचनाचा चढता क्रम राहावा म्हणून सावरकरांनी अेक विशिष्ट पद्धत स्वत:करिता तयार केली होती. ते वाचलेल्या पुस्तकांची नावे टिपून ठेवीत. आणि प्रत्येक वर्षाची पुस्तके मागच्या वर्षापेक्षा अधिक भरली की नाही याची स्वत:शीच चढाओढ लावीत.[९] आपले वाचन धुळीवरचे सारवण होअू नये म्हणून वाचलेल्या पुस्तकांतील निवडक अुतारे ते आपल्या 'सर्वसारसंग्रहा'त अुतरून ठेवीत.

नाशिकच्या वास्तव्यात सावरकरांचे वाचन असे विस्तृत होण्याला केवळ ज्ञानलिप्सा हेच अेकमेव कारण नव्हते. नाशिकला स्थापिलेल्या मित्रमेळ्याच्या ज्ञानाची वाढही सावरकरांच्या ज्ञानाच्या वाढीवर अवलंबून असल्याने त्या संस्थेच्या अुन्नतीसाठी 'नवीन काय वाचू आणि काय सांगू' असे त्यांना होअी.[१०] याचा दुसरा अेक परिणाम असा झाला की, सावरकरांच्या वाचनाला ध्येयवादाची चाकोरी मिळाली. अिंग्लंडमधील वास्तव्यात 'श्रीगुरुगोविंदसिंह यांचा जन्मोत्सव' आणि 'सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा जंगी अुत्सव' यानिमित्त भरलेल्या सभेत

---

१. ते. ता. पृ. ९३. २. ते. ता. पृ. ९४. ३. ते. ता. पृ. ९६. ४. मा. आ. पृ. ७४. ५. मा. आ. पृ. ४३. ६. मा. आ. पृ. ४०. ७. मा. आ. पृ. १६९. ८. मा. आ. पृ. १३१, १४६. ९. मा. आ. पृ. १६९. १०. मा. आ. पृ. १६.

सावरकरांनी केलेल्या भाषणावरून त्यांच्या वाचनामागील हे ध्येयवादित्वच लक्षात येते.[१] आपल्या 'तरुण देशबंधूंनी राजकारणातील अंतिम शल्ये व महत्सिद्धान्त शिकावेत' म्हणूनच सावरकरांनी मॅझिनीच्या आत्मचरित्रात्मक लेखांचे वाचन केले ही गोष्ट अगदी अुघड आहे.[२] अंदमानच्या कठोर कारावासात त्यांच्या या विस्तृत वाचनावर अनेक बंधने पडली. तेथे ध्येयवादित्वाला मुरड घालावी लागली तरी त्यांच्या ज्ञानतृष्णेने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. 'जगातील प्रत्येक नवीन विचाराची लहर त्या जगद्बहिष्कृत निर्वासितांच्या मज्जापीठांच्या तटास स्पर्शल्याविना राहात नव्हती.'[३] तें रक्त ओकविणारे काम आटोपताच मोकळ्या वेळी सावरकर बरेच वाचन करीत असत.[४]

सावरकरांनी जे वाचन केले आहे ते विविध विषयांवरील आहे, अेवढेच नव्हे तर ते विविध भाषांतील आहे. मराठी, बंगाली, संस्कृत, अिंग्रजी, हिंदी, पंजाबी अित्यादी भाषांतील ग्रंथ त्यांनी वाचले आहेत.[५] भारतीय आणि पाश्चात्त्य ग्रंथकारांचे ग्रंथ त्यांनी अभ्यासले आहेत. अितिहास , काव्य, कादंबरी, चरित्र, तत्त्वज्ञान, शास्त्रे, धार्मिक वाङ्मय अित्यादी विविध शाखांतील ग्रंथांचे वाचन त्यांनी केले आहे.

सावरकरांच्या वाचनाचा मुख्य भार अितिहासावर होता.[६] लहानपणापासून अितिहासाची त्यांना भारी जिज्ञासा.[७] 'पेशव्यांची बखर' व 'छत्रपतींची बखर' त्यांनी लहानपणीच वाचली.[८] 'Short History of the World' या पुस्तकाने त्यांच्या मनावर चिरंतन परिणाम केला.[९] बडोद्याच्या राष्ट्रमालेतील अितिहास व त्याचा मूळ आधार जो Stories of Nations यातील अितिहास ग्रंथ त्यांनी वाचले. वेदकालापासून युरोपच्या अर्वाचीन अितिहासापर्यंतच्या विविध कालखंडांचा त्यांनी परिचय करून घेतला होता.[१०] रशिया, अिटली, अिंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, हिंदुस्थान यांचे अितिहास सूक्ष्मपणे अभ्यासिले होते.[११] कार्लाअील, गिबन, मेकॉले या अितिहास-कारांचे ग्रंथ वाचले होते.[१२] रजनीकान्त बाबूंचे 'शिपायी युद्धेर अितिहास',[१३] दत्त, राय, डेव्हिडचे 'हिंदुस्थान व बुद्ध कालावरील अितिहास',[१४] 'अंदमानचा अिति-हास',[१५] अित्यादी अितिहास ग्रंथांचा त्यांनी बारकाअीने अभ्यास केला होता.

काव्यविषयातील त्यांचे वाचन मुख्यत: संत व पंडित कवींच्या काव्याचे होते. 'ज्ञानदेव व तुकाराम' या संत कवींच्या काव्याचा अभ्यास त्यांच्या मित्रमेळ्यातही

---

१. लं. वा. पृ. १०४ व ७४. २. जो. मॅ. प्रस्तावना पृ. २. ३. मा. जन्म. पृ. २४६. ४. अंद. अं. पृ. ३८. ५. मा. जन्म. पृ. २४६. ६. मा. आ. पृ. १६८. ७. मा. आ. पृ. ४६. ८. मा. आ. पृ. ३७, ४४. ९. मा. आ. पृ. ४६. १० मा. जन्म. पृ. १४१. ११. मा. जन्म. पृ. २४५, २५०. १२. मा. जन्म. पृ. २४५. १३. मा. जन्म. पृ. २४५. १४. मा. जन्म. पृ. २५०. १५. मा. जन्म. पृ. ५७.

होत होता.[१] मोरोपंत, वामनपंडित यांच्या काव्याचा सखोल अभ्यास त्यांनी लहानपणीच केला होता.[२] 'नवनीता'च्या वाचनाने तदंतर्भूत कवींच्या काव्याचा परिचय झाला होता. रामदासांचा 'दासबोध'ही त्यांची स्मृतीच वनली होती.[३] 'काव्येतिहास' आणि 'काव्यसंग्रह' ते नियमितपणे वाचीत.[४] अर्वाचीन कवींपैकी 'केरळकोकिळ'कार श्री. आठल्ये यांच्या कवितांचे ते केवळ वाचनच करीत नसत तर त्यांच्या घाटणीचे अनुकरणही करण्याचा प्रयत्न करीत.[५] जुन्या संस्कृत कवींपैकी कालिदास व भवभूती यांच्या काव्याचे वाचन त्यांनी अत्यंत सूक्ष्मतेने केले होते.[६] पाश्चात्त्य कवींपैकी होमरचे पोपकृत 'अिलियड' त्यांनी लहानपणीच तुटके-फुटके अिंग्लिश येअू लागले तेव्हा वाचले.[७] शेक्सपियर, मिल्टन, पोप यांचे समग्र ग्रंथ अभ्यासिले होते.[८] स्कॉट तर त्यांचा आवडता कवी होता. त्याच्या 'Lady of the Lake' या अिंग्रजी काव्याचा 'चुकलेले कोकरू' या नावाने मराठी अनुवाद करण्याच्या हेतूने त्यांनी शेसवाशे श्लोक रचिले होते.[९]

'कवितेचा आणि तत्त्वाचा विरोध असणेच अशक्य'[१०] ही सावरकरांची भूमिका असल्याने काव्याप्रमाणेच ते तत्त्वज्ञानाच्या ग्रंथवाचनातही रमत असत. पौर्वात्य-पाश्चात्त्य आणि तत्त्वज्ञान, वेदान्त, सर्व प्रमुख धर्मांचे मान्य धर्मग्रंथ यांचे वाचन त्यांनी त्या त्या ग्रंथातील तत्त्वज्ञान व धर्माचे गुह्य समजून घेण्याच्या प्रांजल भूमिकेने केले. हिंदू धर्मग्रंथापैकी अुपनिषदे, ऋग्वेद, रामायण, महाभारत, ब्रह्मसूत्रे, सांख्यसूत्रे, योगसूत्रे, अीश्वरचद्रांच्या कारिका, योगवाशिष्ठ, भविष्यपुराण, गीता, स्वानंदसाम्राज्य अित्यादी ग्रंथांचे आलोडन केले. या संदर्भात सावरकर अेके ठिकाणी लिहितात, "अुपनिषदे, अेकदा मुख्यदशोपनिषदांतील अेकेक घेअून अेकेक महिना त्यावर रात्री रात्री विचार करीत वर्षभर अभ्यासिली."[११] या धर्मग्रंथांशिवाय विवेकानंद, रामकृष्ण यांची चरित्रे, कृष्णमूर्तींचा 'माझे गुरुदेव', 'वैदिक इंडिया', विवेकानंदांची वेदान्तिक व्याख्याने त्यांनी वाचली.

खिस्ती धर्माचे 'बायबल' त्यांनी दोनदा समग्र वाचले.[१२] जुन्या कराराचा अैतिहासिक व धार्मिक दृष्टीने विवेचनात्मक अभ्यास केला.[१३] "येशू खिस्ताच्या चरित्राविषयी आणि अुपदेशाविषयी मला नेहमीच आदर वाटत असे...येशूचे

---

१. मा. आ. पृ. २३३. २. मा. आ. पृ. ४३,४८. ३. मा. आ. पृ २२२.
४. मा. आ. पृ. १६९. ५. मा. आ. पृ. २०३. ६. मा. आ. पृ. २३३.
मा. जन्म. पृ. २४, २४७. ७. मा. आ. पृ. ४८. ८. मा. जन्म. पृ. २४५.
९. मा. आ. पृ. २०४. १०. मा. जन्म. पृ. २४७. ११. मा. जन्म. पृ. २४७.
१२. मा. जन्म. पृ. २४७. १३. मा. जन्म. पृ. १८.

ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
क्रम.... दि: .....
प्रति ..... दि: .....

चरित्रच मराठीत कवितावद्ध करावे असे (मी) ठरविले " असे सावरकर लिहितात.[1] थिऑसफीची पुस्तकेही त्यांनी वाचली होती.[2]

मुसलमानी धर्मग्रंथ ' कुराण ' त्यांनी प्रथम अिंग्रजीत वाचला.[3] नंतर त्याचे बंगाली भाषांतर चाळले. पुढे हिंदुस्थानच्या तटास पोहोचल्यानंतर मराठी भाषांतर वाचले. परंतु ते मुळात समजून घेण्याच्या भूमिकेने केलेल्या प्रयत्नासंबंधी सावरकर लिहितात, " अगदी मूळ वाचले म्हणजे त्याचा खरा स्वाद मिळेल असा माझ्या मुसलमान मित्रांचा अभिप्राय पाहून त्यांच्याकडून प्रत्येक पान त्यांच्यासारखेच शुचिर्भूत मने अेकाग्र वाचून आणि हिंदी भाषांतर करवून अैकले. महंमद अल्ली (अिंग्लंड) यांनी कुराणास नवीन पाश्चिमात्य अुपनेत्रातून पाहून केलेले अगदी आधुनिक भाषांतरही वाचले. "[4]

हर्बर्ट स्पेन्सर, बेनथॅम, मिल यांच्या तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांच्या वाचनाचा सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या घडणीवर फार मोठा परिणाम झाला आहे.[5] अज्ञेयवादाचा, अुपयुक्ततावादाचा, हितवादाचा फार मोठा ठसा या तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांच्या वाचनाने सावरकरांच्या मनावर अुमटला. त्यात पुरस्कारिलेल्या नीतितत्त्वांस ते आपल्या सर्व व्यवहाराची कसोटी, नीतिसूत्र वा व्यावहारिक धर्म मानू लागले.[6] यांशिवाय नोव्हालिस, टॉलस्टॉय, डार्विन, हक्सले, हेकेल, अिमर्सन, प्लेटो, थॉमस, अेकोम्पिस अित्यादी तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानाचा परिचय त्यांनी करून घेतला.[7] बौद्ध तत्त्वज्ञानातील विविध वादांवर सूक्ष्म विवेचन करावे अितके ते त्यांच्या मनात मुरविले जात होते.[8]

सावरकरांनी विविध शास्त्रेही अभ्यासिली. अर्थशास्त्र, शासन-विज्ञान, राजनीतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, भाषाशास्त्र, ज्योतिषशास्त्र अित्यादी विविध शास्त्रांवरील पुस्तके त्यांनी वाचली. ' मिलच्या अर्थशास्त्राच्या ग्रंथातील सर्व महत्त्वाच्या व्याख्या त्यांनी अंदमानातील अेका कोठडीच्या भिंतीवर खिळीने कोरून अुतरल्या होत्या.' आणि स्वत:प्रमाणेच त्या कोठडीत येणाऱ्या अितर बंदीवानांकडून पाठ करून घेतल्या होत्या.[9]

कथा-कादंबऱ्यांच्या वाचनात मात्र सावरकर फारसे रमलेले दिसत नाहीत. त्यांनी वाचलेल्या कादंबऱ्यांच्या नावांचे अुल्लेख त्यांच्या आत्मवृत्तात क्वचित आढळतात. ' कुठे कादंबरी पाहिली की वाच ' असा अुल्लेख येसूवहिनींनी सावरकरांच्या

---

१. मा. जन्म. पृ. १८. २. मा. जन्म. पृ. २४६. ३. मा. जन्म. पृ. २४७. ४. मा. जन्म. पृ. २४७. ५. मा. आ. पृ. १६९–७०. ६. मा. आ. पृ. १७०. ७. मा. जन्म. पृ. २४५, २४७. ८. मा. जन्म. पृ. ४१०. ९. मा. जन्म. पृ. १४५.

वाचनाच्या जवरदस्त नादावद्दल जरी केला असला[१] तरी स्वत: सावरकरांनी आपल्या आत्मचरित्रात फारच थोडया कादंबरीकारांची व कादंबऱ्यांची नावे दिली आहेत. "मी हरिभाऊ आपटयांच्या 'अुष:काल' प्रभृती अैतिहासिक नि सामाजिक अशा वऱ्याच कादंबऱ्या वाचलेल्या होत्या" असे सावरकरांनी अेके ठिकाणी म्हटले आहे.[२] यांशिवाय 'जाअीचा मंडप' आणि 'समाजरहस्य' या दोन कादंबऱ्यांचा अुल्लेख त्यांनी अन्यत्र केला आहे.[३] यापेक्षा अधिक अुल्लेख त्यांच्या आत्मचरित्रात्मक-पत्रात्मक वाङमयातून आढळत नाहीत.

सावरकरांनी वाचलेल्या पाश्चात्त्य पुरुषश्रेष्ठांच्या चरित्रांत प्रामुख्याने नेपोलियन, गॅरिबॉल्डी, मॅझिनी, बिस्मार्क यांच्या चरित्रांची नावे आढळतात.[४] अॅनी वेझंटचे आत्मवृत्त त्यांनी वाचले होते.[५] भारतीय पुरुषश्रेष्ठांपैकी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, अशोक यांच्या चरित्रांचा नामनिर्देश त्यांनी स्मरणपूर्वक केला आहे.[६]

बंगाली भाषेतील ग्रंथांच्या वाचनाचा सावरकरांच्या वाङमयावर परिणाम झाल्याचे दिसून येते. रवीन्द्रनाथांची 'जीवनस्मृती', 'चित्रा' अित्यादी पुस्तके वाचून या भारतीय महाकवीची थोरवी सावरकरांना ज्ञात झाली होती. जुन्या बंगालीत लिहिलेल्या आणि 'पायरा' वृत्तात रचलेल्या रामायण भारतादी ग्रंथांच्या वाचनाने त्यांना काव्यरचनेची अेक नवी दृष्टी लाभली. अिंग्रजीतील निर्यमक वृत्ता (Blank Verse) प्रमाणे बंगालीत मधुसूदन दत्ताने रचलेल्या अमित्राक्षर वृत्ताशी त्यांचा परिचय झाला आणि तसेच अेक वृत्त मराठीत असावे अशी त्यांना अिच्छा झाली. 'तोच प्रयत्न गोमांतकातील वैनायक वृत्तात परिणत झाला.'[७]

त्या त्या काळच्या वृत्तपत्रांनी आणि नियतकालिकांनीही सावरकरांच्या मनावर विविध संस्कार केले. लहानपणी ते 'केसरी', 'गुराखी' 'जगद्हितेच्छू', 'पुणे वैभव' अित्यादी वर्तमानपत्रे वाचीत. मुंबअीचे गुराखी' पुण्याचे 'जगद्-हितेच्छू' आणि 'पुणे वैभव' ही त्यांची आवडती वृत्तपत्रे असत.[८] किती मिनतवारी, किती लाडीगोडी करून त्या वृत्तपत्रांच्या वर्गणीदारांकडून त्यांनी ती आणवावी.[९] 'केसरी' पत्र त्यांचे वडील त्यांच्याकडून वाचून घेत. 'केसरी'वर त्यांची आबाल्य भक्ती होती. 'हिंदुस्थानची देखील राजकीय घडण ज्या केसरीने घडविली त्याच्या लिखाणाचा माझ्या घडणीत अंश नसणे केवळ अशक्य होते' असे सावरकर स्वत:च सांगतात.[१०] 'गुरूणां गुरु:' केसरीच अशी त्यांची श्रद्धा होती.[११]

---

१. मा. आ. पृ. ३६. २. मा. आ. पृ. २०९. ३. अंद. अं. पृ. २२, ३०. ४. मा. जन्म. पृ. २४५. ५. मा. जन्म. पृ. २४६. ६. मा. जन्म. पृ. २४४, २५०. ७. मा. जन्म. पृ. २४४. ८. मा. आ. पृ. ४०. ९. मा. आ. पृ. ४५. १०. मा. आ. पृ. ८९. ११. मा. आ. पृ. ८९.

पण पुढे दहिवेलीच्या वक्तृत्वसभेच्या निमित्ताने 'काळ' पत्राशी परिचय घडताच क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे गुरुपद त्यांनी काळासच दिले.[१] "माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि अुत्साहावर 'काळा'च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला," अशा शब्दांत सावरकरांनी काळास गौरविले आहे.[२] हौतात्म्याच्या भावनेस 'केसरी'हून अधिक साहसाने व्यक्तविणाऱ्या 'काळाविषयी' सावरकरांना जरी कृतज्ञता वाटत होती तरी आपल्या क्रांतिकारक जीवनाच्या कृतीचे गुरुस्थान देण्यास मात्र त्यांची तयारी नव्हती.[३] सावरकरांच्या वाचनातील हा स्वतंत्र दृष्टिकोन येथे ध्यानात घ्यावयास हवा. नियतकालिकांपैकी 'निबंधमाला', 'काव्येतिहाससंग्रह', 'विविधज्ञानविस्तार', 'केरळ कोकिळ', 'करमणूक' अित्यादी नियतकालिके त्यांच्या वाचनात येत असत. त्यांतील 'निबंधमाले'चा परिणाम त्यांच्या विचारावर आणि लेखनशैलीवर झाला. 'निबंधमालेसारखी लांब लांब वाक्ये रचता यावी म्हणून' ते निबंध लिहू लागले.[४] आणि राजकारणात चिपळूणकरांना त्यांनी गुरू मानिले.[५] 'केरळ कोकिळ'कारांच्या मार्मिक, तिखट टीकापद्धतीची तीक्ष्ण दृष्टी त्यांना या मासिकांच्या नियमित वाचनाने आली.[६] अंदमानमधील बंदीवानांच्या ग्रंथालयात 'भारतमित्र', 'प्रताप', 'संदेश', 'चित्रमयजगत', 'सरस्वती', 'आर्य गॅझेट', 'बंगाली', 'प्रभात' अित्यादी पत्रे येत असत.[७] तीही सावरकरांच्या वाचनात येत होती. अंदमानच्या या ग्रंथालयातील पत्रांचे आणि सर्व ग्रंथांचे त्यांनी अध्यवसायपूर्वक अध्ययन केले होते.[८]

सावरकरांच्या आत्मचरित्रात्मक–पत्रात्मक वाङ्मयातून जे संदर्भ येतात त्यावरूनही त्यांच्या वाचनावद्दल कयास बांधता येतो व त्याच्या विस्तृतपणाची, वैविध्याची कल्पना येते. संस्कृत कवींपैकी कालिदासाच्या 'कुमारसंभव' आणि 'रघुवंश' या महाकाव्यांचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला होता हे त्यांतील येणाऱ्या अनेक संदर्भांवरून लक्षात येते.[९] भगवद्गीतेतील कितीतरी श्लोकांची अुदाहरणे त्यांच्या निवेदनाच्या ओघात येतात.[१०] योगसूत्रातील गूढ विचारांत कधी कधी त्यांचे मन भ्रमण करते.[११] ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या ओव्या–अभंगातील चरण त्यांच्या जिभेवर नाचताना दिसतात.[१२] मोरोपंतांच्या काव्याचा बराच भाग

---

१. मा. आ. पृ. ८८. २. मा. आ. पृ. ८८. ३. मा. आ. पृ. ८८. ४. मा. आ. पृ. ४८. ५. मा. आ. पृ. २३५. ६. मा. आ. पृ. २०४. ७. मा. जन्म. पृ. २५०. ८. मा. जन्म. पृ. २४६. ९. मा. जन्म. पृ. १, २४, २४७, २४८, अंद. अं. पृ. २५, ४९, मॅझिनी पृ. २९. १०. मा. जन्म. पृ. २४८. अंद. अं. पृ. २४, २५. मॅझिनी पृ. १५३. ११. मा. जन्म. पृ. ९, १०, २७, ११०. १२. मा. जन्म. पृ. ११. मॅझिनी पृ. ६.

मुखोद्‌गत केल्याचे सावरकरांनी आत्मचरित्रात सांगितले आहेच.[१] त्याची प्रचीतीही मधून मधून दिसून येते. आंग्ल कवी वायरन, मिल्टन, टेनिसन, यांच्या काव्य-चरणशलाका निवेदनाच्या अखंड सलग वस्त्रात कधी कधी चकाकतात.[२]

यांशिवाय निरनिराळी दर्शने, पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे प्रत्यक्षवाद, जडाद्वैत-वाद यांसारखे विविध वाद, 'ओस्ट अिंडिया कंपनी 'च्या प्रमुख राज्याधिकाऱ्यांची मते, हिंदुस्थानात धर्मप्रसार करणाऱ्या प्रख्यात धर्माधिकाऱ्यांचे अभिप्राय, पेशवाअीतील विविध, रंजक दंतकथा, सुरेन्द्रनाथ वॅनर्जी यांच्या आत्मचरित्रातील वेगवेगळे संदर्भ, मेकॉले यांच्या खाजगी पत्रांतील अुतारे, अिंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील विविध टप्पे व प्रयोग अित्यादी कितीतरी प्रकारची माहिती त्यांच्या लेखनात आढळते.

आतापर्यंतच्या विवेचनावरून सावरकरांच्या वाचनातील विस्तृतता, विविधता आणि ध्येयवादित्व हे गुणविशेष लक्षात आले. सावरकरांच्या वाचनात आणखी अेक विशेष दिसतो, तो म्हणजे वेचकपणा. सावरकर स्वत: सर्वभक्षक वाचक असले तरी विशिष्ट जीवनक्रमामुळे व परिस्थितीमुळे त्यांना आपल्या वाचनात वेचकपणा आणावा लागला. पुस्तकांच्या श्रेष्ठ-कनिष्ठपणानुसार त्यांची प्रतवारी करून वाचन करावे लागले. अंदमानातून आपल्या बंधूंकडे पुस्तकांची मागणी करताना ते पुस्तकांची क्रमानुसारी तालिका पाठवीत असत आणि त्या पुस्तकांसाठी आर्थिक व्यय वाढत असेल व बंगीचा आकार वाढत असेल तर "(तालिकेतील) खालपासून क्रमाने अेक अेक (पुस्तक) वगळीत जा" असे आपल्या बंधूंस कळवीत असत.[३] यावरून सावरकरांचे वाचन विस्तृत असूनही विचारपूर्वक आणि विविध असूनही वेचक होते असे दिसून येते.

ज्ञानलालसा

धाडस किंवा शौर्य या केवळ गुणविशेषांच्या बाबतीतच नव्हे, तर सर्वच कर्मे ज्ञानयुक्त असावीत असे सावरकरांचे मत आहे. केवळ वीरदृष्टी ही त्यांच्या मते अेकेरी योग्यता आहे. त्या वीरदृष्टीला ज्ञानदृष्टीची जोड देअून दुहेरी योग्यता अंगी बाणविण्याबाबत सावरकरांचा कटाक्ष आहे.[४] 'नुसते ज्ञान लंगडे तर नुसते कर्म आंधळे' असे यासंबंधीचे आपले विचारसूत्र ते सांगतात.[५] धर्माप्रमाणे राज-कारणातही ज्ञानयुक्त कर्म हेच समाजास हितकारक होणारे आहे असा त्यांचा

---

१. आ. च. पृ. २००. अंद. अं. पृ. ३६. आ. च. पृ. ४२. मॅझिनी पृ. २३१.
२. मा. जन्म. पृ. ७४. मॅझिनी पृ. ९९. ३. अंद. अं. पृ. १६. ४. मा. जन्म. पृ. १४८. ५. मा. जन्म. पृ. १४८.

स्पष्ट अभिप्राय आहे. सावरकरांचा हा ज्ञानयुक्त कर्माचा आग्रह पाहिला की त्यांच्या मूळच्या जवरदस्त ज्ञानलालसेची कल्पना येते. ते जे ज्ञान संपादीत ते मुख्यतः ज्ञानासाठीच संपादीत असत.[१] आणि परिस्थितीने ते राजकारणाच्या रणधुमाळीत सापडले नसते तर त्यांनी आपले सर्व आयुष्य ज्ञानाच्या व्यासंगात घातलेही असते. अंदमानला पन्नास वर्षांच्या जन्मठेपेवर जाताना त्यांनी आपल्या धाकटया भावाला असेच सांगितले होते की, "जर तेथील नियमाप्रमाणे मला कुटुंबास तिकडे दहा-पाच वर्षांनी नेऊ दिले तर जीवित तिकडे ज्ञानाच्या व्यासंगात घालवीन."[२] हिंदुस्थानातील विधिमंडळात ना. गोखले यांचा शिक्षणविषयक ठराव आल्याची वातमी जेव्हा त्यांना अंदमानात समजली तेव्हा त्यांना अतिशय आनंद झाला. 'आपल्या देशात ज्ञानामृताच्या पाणपोयांची मुक्तद्वारे जेथे तेथे अुघडलेली दिसतील' हा विचार त्यांच्या ज्ञानपिपासू मनाला आनंदित करीत होता.[३]

सावरकरांनी जे ज्ञानविषयक अुद्योग हाती घेतले होते त्यांचे त्रिविध स्वरूप होते. ज्ञानाचा संग्रह, ज्ञानाचा विकास व ज्ञानाचा प्रसार असे त्या त्रिविध अुद्योगांचे वर्णन करता येअील. ज्ञानसंग्रहासाठी त्यांनी स्वतः जे वाचन केले त्याचे वर्णन पूर्वी आलेलेच आहे. त्यांच्या मित्रमेळयाच्या बैठकीत जे विषय चर्चेसाठी येत त्यांत स्वभाषा, साहित्य, व्यापार, अितिहास, व्यायाम, गोरक्षण, वेदान्त अित्यादी कितीतरी विविध विषय असत.[४] अंदमानात असताना ही जगातील प्रत्येक नवीन विचाराची लहर त्या वहिष्कृत निर्वासितांच्या मज्जापीठांच्या तटास स्पर्शल्याविना राहू नये यावर त्यांचा कटाक्ष होता.[५] अशा रीतीने त्यांनी स्वतः केवळ ज्ञानसंग्रह केला नाही तर त्याचा अुत्तरोत्तर विकास करण्याचाही प्रयत्न केला. आणि अशा विकसित आणि संग्रहित ज्ञानाचा प्रसारही केला. मित्रमेळयातील व 'अभिनव भारता'तील आपले सहकारी आणि अंदमानातील बंदीवान यांच्यात ज्ञानप्रसार करण्याचे कार्य त्यांनी अत्यंत चिकाटीने केले. केवळ ज्ञानाचा संग्रह करणे अयोग्य होय असे त्यांचे मत आहे. आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ ते लिहितात "नुसते वाचून जे साचत जाते ते ज्ञान, फलहीन वृक्षाप्रमाणे किंवा ज्याच्या पाण्याने हजारो नसो पण अेका अर्ध्या तृषिताचीही तृष्णा भागत नाही वा अन्नोत्पादनाने भूक शमविली जात नाही त्या जलाशयाच्या संग्रहाप्रमाणे केवळ वांझच नव्हे काय ?"[६] अनुकूलता असो वा प्रतिकूलता असो सावरकरांच्या ज्ञानार्जनात खंड कसा पडल्याचे दिसत नाही. 'मरणोन्मुख मृत्युशय्येवर' पडल्यावरही वाचन चालूच ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पण तांतविक क्षीणतेने त्यांना ते वाचन पुढे झेपेना म्हणूनच त्यांनी ते सोडले. त्यांच्या दृष्टीने ज्ञानार्जनासाठी केलेले वाचन

---

१. मा. आ. पृ. ७५. २. मा. जन्म. पृ. २४. ३. मा. जन्म. पृ. १६१.
४. मा. आ. पृ. १३९ ५. मा. जन्म. पृ. २४६. ६. मा. जन्म. पृ. ८.

आत्म्याच्या समाधानाचे अेक साधन ठरावे अितक्या मोलाचे आहे. ज्याचा नैसर्गिक कलच ज्ञानप्राप्तीकडे आहे त्याच्याच हातून असे परिश्रम होणे शक्य आहे आणि त्याचे मोलही तोच जाणू शकतो.

प्रज्ञा, स्मृति व प्रतिभा

सावरकरांनी ज्ञानसंग्रह व ज्ञानप्रसार केला खरा; पण तसे करताना त्यांना स्फुरलेले व त्यांनी प्रसृत केलेले मौलिक विचार पाहिले की, त्या विचारांच्या अुगमस्थानी असलेल्या सावरकरांच्या प्रज्ञाशक्तीची ओळख पटते. 'प्रज्ञाशक्तीने वस्तुमात्रांतले नवे संबंध दिसू शकतात. अभिनव अुपाय व विचार सुचतात आणि जे संबंध दिसतील, जे अुपाय व विचार सुचतील त्यांपैकी वरेचसे तर्काशी सुसंगत राहतात.' प्रज्ञाशक्तीचे असे नवनवोन्मेष सावरकरांच्या लेखनात अनेक ठिकाणी दिसतात व त्यांच्या विचारांतील मौलिकता प्रकट करतात. पुढील काही अुदाहरणांवरून सावरकरांच्या प्रज्ञाशक्तीचा प्रत्यय येअू शकेल.

'पहिले पान असणारा कोणताही अितिहासग्रंथदेखील वास्तविक सरासरी दुसऱ्या पानापासूनच आरंभिलेला असणार' असा सुसंगत तर्क त्यांच्या बालबुद्धीनेही केला होता.[१] 'अर्जुनापेक्षा भीम मोठा' असे रूढ विचारांना धक्का देणारे मत त्यांनी लहानपणीच मोठ्या हिरीरीने व तर्कशुद्धतेने मांडले होते.[२] दुसऱ्या कोणाचीही मतमतांतरे अैकण्यापूर्वीच 'अठरा पुराणे ही अेकाच व्यासाची असणे असंभवनीय' अशी खूणगाठ त्यांच्या मनाने बांधली होती.[३] अंदमानच्या भूमीवर पाअूल ठेवताच त्या बेटाचे हिंदुस्थानच्या दृष्टीने असणारे वैमानिक, सामुद्रिक व सांस्कृतिक महत्त्व त्यांच्या प्रज्ञेने नेमके टिपले.[४] अखिल हिंदू जातीला अेका सूत्रात आणण्यासाठी 'हिंदू शब्दाची जी सत्य, अैतिहासिक व सार्वत्रिक' व्याख्या त्यांनी सांगितली, ती अनेक विचारवंतांनाही मान्य करावी लागली.[५] हिंदू संघटन आणि शुद्धी ही हिंदु-मुसलमानांच्या शाश्वत विरोधाची नव्हेत, तर शाश्वत अेकीची महत्त्वाची साधने होत असा अभिनव सिद्धान्त त्यांनी सांगितला.[६] अंदमानात मृत्यूशय्येवर पडल्या पडल्या विकासवादाचा अेक वेगळा सिद्धान्त मोठ्या मनोरंजक पद्धतीने त्यांना प्रतीत झाला आणि 'हे मार्जारायण विकास घेत घेत रामायणात परिणमित झालेले आहे' असे आपले विचारसूत्र त्यांनी सांगितले.[७] अंदमानच्या अपराध्यांचा वसाहतीचा दूरगामी व राष्ट्रीय दृष्टीने विचार करताना, 'अपराधप्रवणता संततीत अुतरणे हे

---

१. मा. आ. पृ. ४७. २. मा. आ. पृ. ४८. ३. मा. आ. पृ. ६१. ४. मा. जन्म. पृ. ६९, ४४३. ५. मा. जन्म. पृ. २९२. ६. मा. जन्म. पृ. ३०२. ७. मा. जन्म. पृ. ४०८.

आनुवंशिकतेवर अवलंबून नसून ती गोष्ट अनेक तदितर कारणांचे फलित असते' असा प्रस्थापित प्रमेयांपेक्षा वेगळा विचार त्यांनी मांडला.[1] भारताची राष्ट्रभाषा हिंदी असावी व लिपी नागरी असावी असे मत त्यांनी १९०६ सालीच व्यक्त केले व त्यासाठी प्रचारही केला.[2] 'गुरुमुखी लिपी (शिखांच्या) गुरूंनी शोधून काढली नसून.... त्या वेळी प्रचलित असलेल्या लुंडी मुंडी (मोडी) अित्यादी व्यापारी आणि प्राकृत जनांतील लिपीपैकीच गुरूने ती निवडलेली अेक जुनीच लिपी होती', ही आजवर कोणीही विद्वानांनी पुरस्कृत केली नव्हती अशी अुपपत्ती त्यांनी शोधून काढली.[3] 'जीवनक्रम परिणत झालेल्या, अैश्वर्यसंपन्न, पौरुषपूर्ण आणि क्षत्रियत्व संपादिलेल्या अमेरिका-अिंग्लंडसारख्या देशांना, वेदान्त तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे; शूद्रावस्थेत असलेल्या हिंदुस्थानला त्याची आवश्यकता नाही' असा अेक नवा विचारझोत त्यांनी टाकला.[4] संपूर्ण जगाचे अेक राष्ट्र करण्याच्या भूमिकेतून त्यांनी संयुक्त राष्ट्र संघाची किंवा आर्य राष्ट्रसंघाची कल्पना १९२० साली प्रकट केली.[5]

सावरकरांची ही बहुप्रसू प्रज्ञा व त्यांचा गाढा व्यासंग यांच्यातील दुवा असणारी मन:शक्ती जी स्मृती तीही तशीच तीक्ष्ण आहे. सावरकरांच्या क्रांतिकारक व गुप्त जीवनक्रमामुळे त्या स्मृतीला विलक्षण तल्लखता आली होती. राज्यक्रांतीच्या भीषण अुलाढालीत भाग घेत असताना 'टिपणी लिखाण असे ठेवावयाचेच नाही' असे मित्रमेळ्याने ठरविल्याने सावरकरांचा बहुतेक व्यवहार स्मृतीवरच आधारलेला होता. लहानपणी जे पाठांतर त्यांनी केले होते ते स्मृतीने आपल्या खजिन्यात लख-लखीत ठेविले होते. नवनीतातील सुरेख आख्याने आणि वेचे त्यांच्या वडिलांनी त्यांना वारंवार म्हणून दाखवावे आणि ते नुसते अैकून पाठ व्हावेत अितकी त्यांची स्मृती तल्लख होती.[6] सर्व 'नवनीत' त्यांनी मुखोद्गत केले होते.[7] मोरोपंतांच्या आर्या पाठ केल्या होत्या. मोरोपंतांच्या अेकशेआठ रामायणांपैकी महत्त्वाच्या रामायणांचे प्रकार तर ते तोंडपाठ म्हणून दाखवीत.[8] वक्तृत्वकलेचा अभ्यास करताना त्यांनी अनेक कविता, सुभाषिते आणि प्रख्यात वक्त्यांच्या भाषणांतील अुत्कृष्ट भाग पाठ केले.[9] लहानपणी अभ्यास झाला नसेल त्या दिवशी ते अुशिरा शाळेत येअून शेवटच्या अनुक्रमात बसत व प्रश्नोत्तराची पाळी आपल्यावर येअीपर्यंत विषय पूर्ण करून बिनचूक अुत्तरे देत.[10] शाळेच्या खोलीत ज्ञानग्रहणात कुशल असलेली सावर-करांची स्मृती अंदमानच्या कोठडीतही त्याच कौशल्याने कार्य करीत होती.

---

१. मा. जन्म. पृ. ४०८. २. मा. जन्म. पृ. ४५६. ३. मा. जन्म. पृ. ४६०.
४. अंद. अं. पृ. २३. ५. अंद. अं. पृ. ८८. ६. मा. आ. पृ. २३.
७. मा. आ. पृ. ४८. ८. मा. आ. पृ. २००. ९. मा. आ. पृ. ७५.
१०. मा. आ. पृ. १०९.

कोठडीच्या भितीवर खिळीने लिहिलेले अर्थशास्त्राचे सिद्धान्त, स्पेन्सरच्या अज्ञेय मीमांसेचे युक्तिवाद आणि 'कमला' नि अितर कविता त्यांच्या स्मृतीने आपल्या कोशात–कुलुपबंद केल्या होत्या. सुमारे हजार दीड हजार कविता त्यांच्या स्मृतिकोषात साठविलेल्या होत्या.[१] जवळ वृत्तदर्पणासारखे साधन नसताना अनुष्टुप छंदाचे नियम याच स्मृतीने त्यांना पुरविले आणि मग कारागृहाच्या त्या अेकान्त कोठडीत 'कमले'चे रानकमल फुलले.[२] 'माझी जन्मठेप' हा त्यांचा ग्रंथ तर बव्हंशी त्यांच्या स्मृति-लिखितांची कागदी आवृत्ती होय.[३]

प्रत्युत्पन्नस्मरण हा प्रतिभाव्यापारातील अेक घटक असल्याने सावरकरांच्या प्रतिभेचे स्वरूप समजावून घेणे अगत्याचें ठरते. त्यांच्या आत्मचरित्र-चरित्रात्मक लिखाणातून त्यांच्या प्रतिभेच्या बहुतेक वैशिष्ट्यांची ओळख होते. सावरकरांच्या प्रतिभेचा, नजरेत भरणारा पहिला ठसठशीत विशेष हा की ती अभिजात आहे, नैसर्गिक आहे. तिचे अस्तित्व सावरकर आठ वर्षांचे होते तेव्हापासूनच दृग्गोचर होअू लागल्याचे दिसून येते. आठव्या वर्षाच्या संधीस सावरकरांनी कवितेची धूळ-पाटी पहिल्याने हाती घेतली होती.[४] 'प्रतिभेचे तेजस्वी पाठबळ निसर्गतःच आपणांस मिळाले होते' ही गोष्ट स्वतः सावरकरच सांगतात.[५] या नैसर्गिक प्रतिभेमुळेच वयाच्या अकराव्या, बाराव्या वर्षापासून कितीतरी ओव्या, फटके, आर्या, सावरकर रचू लागले.[६] त्यांच्या प्रतिभेचा दुसरा अेक विशेष याच वेळी दृष्टिगोचर होअू लागला. तो म्हणजे पल्लेदारपणा नि विशालपणा. बिंदुस्त्रावी काव्य रचणे त्यांच्या प्रतिभेच्या स्वभावातच नव्हते. लहानपणी ते ओव्या रचत त्यात सहजपणा तर होताच पण 'पहिली माझी ओवी' पासून त्यांनी अेखाद्या आख्यानाला प्रारंभ केला की 'दोनशेवी माझी ओवी'पर्यंत तो आख्यानाचा तंतू ते खाली ठेवीत नसत.[७] सावरकरांच्या प्रतिभेचा आटोप असा मोठा असल्याने सृष्टीतील सौंदर्यापेक्षा सत्यतेचे, भव्यतेचे आकर्षण तिला अधिक वाटे. आगनावेने जात असताना रात्री आकाशातील तारे व अथांग महासागर यांची शोभा जेव्हा सावरकरांनी पाहिली तेव्हा मनात अुसळलेल्या विविध विकार-विचारांच्या तरंगांचे दर्शन सावरकरांनी घडविले आहे. सावरकर लिहितात, " .... त्या महद्भूतांचा प्रत्यक्ष परिचय असा तेव्हा प्रथमच होत होता. त्या मुक्त वायूत बसून त्यांची (नक्षत्रांची) जी शोभा दिसे ती तर रमणीय होतीच, पण माझ्या मनावर त्यांच्या दर्शनी शोभेपेक्षा त्यांच्या भव्यतेचाच पगडा अधिक बसला."[८] सावरकरांच्या प्रतिभेला रम्यतेपेक्षा

---

१. मा. जन्म. पृ. ४१६. २. मा. जन्म. पृ. ८४, ८५. ३: मा. जन्म. पृ. ५१२.
४. मा. आ. पृ. ४९. ५. मा. आ. पृ. ७४. ६. मा. आ. पृ. ४१.
७. मा. आ. पृ. ४९. ८. मंदार, दिवाळी अंक १९६१ पृ. २२६.

भव्यतेचे आकर्षण अधिक आहे याचे प्रत्यंतर त्यांच्या वरील अुद्गारांवरून पटते. सावरकरांच्या प्रतिभेचा चौथा विशेष म्हणजे तिच्या ठायी असणारी अुज्ज्वल कल्पनाशक्ती. भव्य, रम्य अुपमा-अुत्प्रेक्षा, रूपकादींचा पाअूस पाडणे ही तिची सहज लीला आहे. त्यामुळे सावरकरांच्या निवेदनाला चटकन काव्यमय स्वरूप प्राप्त होते. या दृष्टीने त्यांच्या आत्मचरित्रात्मक लेखनातील पुढील काही वर्णने पाहण्यासारखी आहेत.

"ते (टिळक) खड्गाची मूठ होते. आम्ही क्रांतिकारक त्याचे पाते होतो. खड्गाची मूठ ही जरी पाते होअू शकत नाही तरी पाते हे मुठीच्याच आधारावर रणकंदनी लखलखते. पाते मुठीच्याच मनोगताचे पारणे फेडीत असते."[१] "पण 'काळ'-कर्ते तशी चेतना आणि आग तरुणांच्या हृदयास लावण्यासाठी 'काळा'च्या पोलादी सुपांतून विजेचा विस्तव अुत्क्षोभाच्या गंजीवर बसून सारखा पाखडीत राहिलेले."[२] 'आम्ही सर्वांनी खांदा देअून म्हसकरांना चितेच्या जळत्या वेशीतून या लोकींच्या सीमेपलीकडे पोहोचवून दिले.'[३] '....मी कोणाचीही नावेगावे वा विशिष्ट स्फुट कार्यक्रम न लिहिता अंदमानाच्या अंधाराच्या फलकावर आशेच्या कुंचल्या मारून लिहिले.'[४] 'समुद्र शांत होता. अेखाद्या सामुद्रिक राक्षसाप्रमाणे घोरत पडला होता. आगबोट निसरत निसरत अेखाद्या आसन्नमरण नाडीसारखी मंद मंद चालली होती.'[५] 'हातकडयांच्या अघोर अलंकारांनी तो भीषण तुरुंग असा शोभू लागे की, जसा अेखादा मांग अुत्तम कपडे घालून फाशी द्यावयास येताना शोभतो.'[६] 'कालाच्या अुतरणीवरून अकल्पनीय जोराने आपटत आपटत कोसळणाऱ्या प्रपातांना क्रांती म्हणतात व समप्रदेशावर वाहात असणाऱ्या नदीप्रमाणे विश्ववृत्तीचे जे प्रगनात्मक मंदौघ त्यांना अुत्क्रांती म्हणतात."[७] 'परमेश्वराने तुला शेती दिली आहे. त्या विस्तीर्ण शेतीला गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, सिंधू व ब्रह्मपुत्रा हे अखंड कालवे देवाने तयार करून ठेवले आहेत..... तूच ही शेती करशील तर हीत सोने पिकेल. परंतु दुसऱ्याचा नांगर हिच्यावर फिरला की हीत प्लेग पिकेल, दुष्काळ पिकेल, पारतंत्र्य पिकेल .... ही देवाची शर्त तू पाळलीस की हिंदुस्थानात, पुढच्या हंगामात तुझ्या या दिव्य शेतीत पाअूस पडो किंवा न पडो–कोहिनूर पिकतील, मयूरासने पिकतील, कालिदास पिकतील, शिवाजी पिकतील!"[८] 'अतीताला भविष्याशी जोडणारी तरुण स्त्री ही सुवर्णशृंखला आहे. आपल्या वंशाच्या कर्तृत्वाचे ते अभिवचन आहे.'[९]

---

१. मा. आ. पृ. ९०. २. मा. आ. पृ. १३४. ३. मा. आ. पृ. १७६.
४. मा. जन्म. पृ. २४. ५. मा. जन्म. पृ. ५. ६. मा. जन्म. पृ. ७१.
७. लं. बा. पृ. २४. ८. लं. बा. पृ. २९–३०. ९. अंद. अं. पृ. ४४–४५.

वरीलप्रमाणे अुज्ज्वल कल्पनांच्या किती तरी धारा सावरकरांच्या प्रतिभेच्या कारंज्यातून सारख्या अुसळताना दिसतात. सावरकरांच्या कविमनाची साक्ष पटते ती अिथे ! प्रतिभेचा विशालपणा, अभिजातपणा, भव्यत्वाकडे चाललेली तिची झेप व अुज्ज्वल कल्पनाशक्ती पाहिली की, त्यांच्या मनाला महाकवीचा घाट असल्याचीही प्रचीती येते. सावरकरांचे असे हे कविमन अंदमानात हातांनी कष्टांची कामे पार पाडीत असताना अेखाद्या भ्रमराप्रमाणे फक्त मधुमय वस्तूंचा आस्वाद घेत भ्रमत असताना दिसते.[१] कधी कधी ते निसर्गशोभा पाहता पाहता गुलाबकलिका, कमलकंद आणि कल्हारकोसार ह्यांच्याजवळ पटकन जाते.[२] कवींची सुंदर वचने स्मरत त्या कवींच्या समवेत विहार करते.[३] रघुवंशातील वर्णन घोळवीत ते कविमन रघूशीच अेकरूप होते आणि स्वत:शीच हसते, खेळते, विनोद करते.[४] अशा रीतीने सावरकरांचे व्यक्तित्व काव्यमयतेने रंगल्याचें दिसून येते. अशा व्यक्तीने अेखादे महाकाव्य रचण्यातच आपल्या आयुष्याचे साफल्य मानले तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.[५]

चिंतनशीलता

कोणतीही घटना असो वा कार्य असो त्याच्या दर्शनाने चटकन अंतर्मुख होअून त्या कार्याचे व कारणाचे तात्त्विक पृथक्करण करण्याची संवय सावरकरांच्या मनाला जडलेली होती. आपल्या 'ह्या चिंतनशील मनाची ओढ पुरविण्यासाठी... तासन्तास अेकान्तांत बसण्यात सावरकर रमून जात.'[६] आपल्या मनाच्या ह्या स्वभावाला 'चिंतनशील' हेच विशेषण स्वत: सावरकरांनी योजिले आहे.[७] लहानपणी देवीपुढे ध्यानस्थ बसण्याच्या सवयीतून अशा अेकान्तसुखाची गोडी आपणांस लागली असावी असे सावरकरांना वाटते.[८] अशा अेकान्तसुखात असताना, अेखादे काम करीत असताना किंवा अेखाद्या घटनेचे साक्षीदार असताना त्यांचे मन अनेक तत्त्वप्रवण प्रश्नांच्या चिंतनात दंग होअून गेल्याचे दिसून येते. लहानपणी आंअीशी झालेल्या रुसव्यामुळे कल्पासंबंधीचे अनेक अुलटसुलट विचार त्यांच्या मनात येअून गेले.[९] पहिले पान नसलेले अितिहासाचे पुस्तक पाहताच कोणत्याही अितिहासाचे पहिले पान सापडणे शक्य नाही अशा स्वरूपाच्या विचारात त्यांचे बालमन गढून गेले.[१०] अिंग्लंडला जाताना आगनावेच्या माथ्यावर अेकान्तात बसून

---

१. अंद. अं. पृ. १८. २. अंद. अं. पृ. २५. ३. अंद. अं. पृ. २५. ४. अंद. अं. पृ. ४९. ५. मा. जन्म. पृ. २४. ६. मंदार दि. अं. १९६१ पृ. ११६. ७. मंदार दि. अं. १९६१. पृ. ११६, ११९. ८. मा. आ. पृ. ३०. ९. मा. आ. पृ. ३०. १०. मा. आ. पृ. ४७.

आणि दृष्टीपुढील महासागर व आकाशातील तारे पाहात त्यांनी सात-आठ रात्री अनेक तत्त्वप्रवण प्रश्नांच्या चिंतनात घालविल्या होत्या.[१] त्या वेळी 'या प्रलय-प्रभावांच्या अखंड आवर्तनाचा हेतू काय, साध्य काय, ही विश्वाची अवाढव्य घडामोड कशासाठी चालली आहे, काय हा सगळा आंधळ्या कोंशिबिरीचा खेळ आहे. . .' अशा स्वरूपाच्या किती तरी गूढ प्रश्नांत ते रमून गेले होते. अंदमानला जाणाऱ्या चलानाचा ठाण्याच्या तुरुंगातील तो बीभत्सपणा पाहून त्यांचे मन त्या कारणाचे आणि स्वरूपाचे तात्त्विक पृथक्करण करण्यातच गर्क झाले.[२] 'महाराजा' बोटीवरील कैद्यांची किळसवाणी घाण पाहून त्यांनी आपल्या मनाला त्रैलिंगस्वामी, रामकृष्ण परमहंस, रामदास अित्यादींनी भोगलेल्या अद्वैतानुभूतीची आठवण देऊन 'भोजनाअितकेच रेचनही देहधारणास अत्यंत अुपकारक आहे' असे आपल्या मनास समजाविले.[३] कारागृहात काथ्या कुटण्याचे सक्त मजुरीचे काम करताना त्यांनी आपल्या वेडग्या मनास अशाच तात्त्विक विचारांनी समजाविताना म्हटले, "अरे, आयुष्य ही स्वत:च अेक काथ्याकूट आहे. पंचमहाभूतांस पिळून वळून हे आयुष्याचे चऱ्हाट वळावयाचे, तेच ते तंतू जोडून लांबवीत वसावयाचे व शेवटी 'सडत आले की मृत्यूच्या मोगरीने कुटून पुन: काथ्या करून पंचमहाभूतांच्या ढिगात मिसळून द्यावयाचे."[४] अंदमानचा 'सिल्व्हर जेल' पाहिल्यावर त्यांनी मनाशी म्हटले, "ही बंदीशाळा अेवढी भावना सोडून दिली तर ह्या वाडग्यात राहणे अगदीच दुस्सह नाही. राहण्या-पुरताच विचार केला तर 'मम आणि न मम' ह्यांतच सुखदु:खांची बीजे आहेत."[५] अशा कारागृहाच्या बाहेर आपण राहिलो असतो तर बरे वाटले असते असा विचार मनात येताच त्यांच्या चिंतनशील मनाने सावरकरांना लगेच सांगितले, "वेडग्या मना, या कारागाराच्या बाहेर का स्वातंत्र्य आहे? ह्या दगडी भिंतीपलीकडे सृष्टि-नियमांच्या भिंती आहेत. मनाला अिच्छेच्या भिंती आहेत. ह्या कारागाराच्या भिंतींनी तू जितका बद्ध आहेस तितकेच ते बाहेरचे तुला स्वतंत्र वाटणारे लोकही बद्ध आहेत."[६] "कारागृहातच केवळ कंटाळा नाही तर संसारातील प्रत्येक राज-वाडग्यावर , ताजमहालावर, पर्वतावर, समुद्रावर हीच पाटी टांगलेली असते की, "तत: किं?" असे सांगून त्यांनी आपल्या कंटाळलेल्या मनाचे समाधान केले.[७] 'प्रभव ते प्रलय ह्यात सर्व वातम्या आल्या' असा विचार बातमीसाठी अुत्सुक झालेल्या मनाला त्यांनी पटवून दिला.[८] कारागृहातील करमणुकीचे विविध प्रकार त्यांनी मनाला दाखविले आणि मृत्युशय्येवर पडल्या पडल्या विकासवादाचा अेक वेगळा, मनोरंजक सिद्धान्त, त्यांच्या चिंतनशील मनाने मांडून दाखविला.[९] अंदमानहून परत

---

१. मंदार दि. अं. १९६१ पृ. ११६. २. मा. जन्म. पृ. ३७. ३. भा. जन्म. पृ. ४९. ४. मा. जन्म. पृ. ५. ५. मा. जन्म. पृ. ७६. ६. मा. जन्म. पृ. ४०५. ७. मा. जन्म. पृ. ४०६. ८. मा. जन्म. पृ. ४०७. ९. मा. जन्म. पृ. ४०८.

जाताना 'महाराजा' बोटीवरील वेडयांचे विलक्षण चाळे पाहून त्यांच्या मनात अनेक प्रश्नांची मालिका निर्माण झाली. त्यांना वाटले, "कोण वेडे ? आमच्या अिंद्रियांस जे भास होतात तेच कशावरून खरे ? क्वचित त्यांच्या अिंद्रियांस होणारे भासच खरे असतील. अुभयपक्षी अिंद्रियांचीच काय ती साक्ष. आणि कोणाचे अिंद्रिय शुद्धीवर हे तरी कोणते तरी अिंद्रियच ठरविणार ना ?"[1] अंदमानात प्रत्यक्ष कष्टाचे काम करतानाही त्यांच्या मनात असेच विचार येत होते. 'जे काही दिसते त्याला प्रत्यक्ष अस्तित्व नाही– निदान आपल्याला तरी ठाअूक नाही– ते आपल्याच कल्पनेचे विकार आहेत' असे त्यांना वाटत होते.[2] अिंग्लंडला जातानाही अशाच स्वरूपाच्या विचारमंथनात ते गढून गेले होते. त्यांचे चिंतनशील मन अनेक प्रश्न-चिन्हे अुभी करीत त्यांना विचारीत होते– "ह्या ब्रह्मांडाच्या घडामोडीत ह्या वापडया क्षणजीवी मनुष्याचे स्थान कोणते ? त्याच्याकडे कोणी ढुंकून तरी बघणारा आहे का ? किंवा मनुष्य– मन, हेच काय ते मुख्य असून असते असे तेच काय ते असून हे सारे ब्रह्मांड हेच नसते आहे ? मनाला होणारा केवळ आभास आहे ?"[3] सावरकरांच्या चिंतनशील मनाचे हे प्रश्न पाहिले की त्यांच्या जीवनाची तात्त्विक घडण कशी होत गेली याचे अुत्तर सापडणे सुलभ होते.

निष्ठा आणि ध्येय

सावरकरांची स्वातंत्र्यनिष्ठा अितकी अुत्कट आहे की जणू काही तिनेच सावरकरांचे जीवन गतिमान केले आहे असे वाटते. देशभक्ती हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. देशभक्ती आणि स्वातंत्र्यनिष्ठा यांचे साहचर्य त्यांच्या जीवनात तर आहेच, पण अनेक ठिकाणी त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा देशातीत भूमिकेवरूनही प्रकट झालेली दिसते आणि मानव्याच्या अधिष्ठानावर आरूढ होअून स्वातंत्र्याचा अुद्-घोष करताना ते आढळतात.

स्वदेश स्वातंत्र्याची तळमळ त्यांना लहानपणापासूनच लागली होती. लहान-पणी केलेल्या मेळयांच्या पदांतून 'त्या स्वतंत्र छत्री आर्य ठेवणे त्वरे' अशी प्रार्थना त्यांनी गणेशाला केल्याचे दिसते.[4] चाफेकर-रानडे यांच्या रोमहर्षक कृत्यामुळे त्यांच्या स्वदेशभक्तीने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांना प्रतिज्ञाबद्ध केले. स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या सावरकरांनी देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्या-साठी सशस्त्र क्रांतीचा केतू अुभारून मारिता मारिता मरेतो झुंजण्याची शपथ घेतली.[5] 'देश' आणि 'स्वातंत्र्य' या दोन शब्दांनी त्यांचे जीवन व्यापले. 'आमचा

---

१. मा. जन्म. पृ. ५०४. २. अंद. अं. पृ. २५. ३. मंदार दि. अं. १९६१, पृ. ११६. ४. मा. आ. पृ. ३९. ५. मा. आ. पृ. ८२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दा. ए. सो. मुंबई
दि: .....
दो दि: .....

राजा आमचा देश ' असे तेजस्वी सत्य त्यांनी निर्भयपणे सांगितले.[१] त्या देशासाठी यातना, क्लेश भोगले. त्याच्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेविली. ' तीस कोटी लोकांनी गजबजलेला, हिमालयादी पर्वतांनी व समुद्रदेवतांनी संरक्षिलेला, शिवाजी, प्रतापसिंह, गुरू गोविंदसिंह यांच्या पितृस्थानी असलेला ' हिंदुस्थान देश त्यांच्या वाणीचा विषय वनला.[२] ' भारत-भूसारखी दिव्य शेती परमेश्वराने आपणांस दिली आहे ' अशी त्यांची श्रद्धा होती.[३] देशाच्या भक्तीसाठी स्वत:ला वकिलीच्या धंद्याला मुकावे लागले म्हणून त्यांना आनंद झाला.[४] हिंदुस्थानचे सुंदर सृष्टिवैभव, हिंदुस्थानच्या फुलांचे मनोहर परिमल त्यांच्या अंत:करणाच्या पवित्र प्रेमाची प्रीत वस्तू बनली.[५] ' हिंदुस्थानसारखा भाग्यवान, निसर्गसुंदर व रमणीय देश ' लाभणे हे महद्भाग्याचे लक्षण होय असे त्यांना वाटले.[६] असा हिंदुस्थान देश सोडून अंदमानास पन्नास वर्षे काळ्या-पाण्याच्या शिक्षेवर जाताना सावरकरांना अतोनात दु:ख झाले आणि या देशप्रेमामुळेच " मी अंदमानात 'हाय भारत', 'हाय हिंदुस्थान' करीत मरेन " असे अुद्गार त्यांनी काढले.[७] अंदमानातही हिंदुस्थानचे वृत्त कळावे म्हणून सावरकरांनी अनेक यातना भोगल्या. शिक्षा सहन केल्या. सावरकर व त्यांचे सहतपी अंदमानात असताना हिंदुस्थानच्या स्वास्थ्याबद्दल किती चिंतातुर असत याची कल्पना सावरकरांनीच केलेल्या पुढील वर्णनावरून येअू शकेल. सावरकर लिहितात, " (हिंदुस्थानबद्दलच्या) अशा तुटक बातम्या जुळवून, त्यांची चर्चा करीत बसून त्या कठोर कारागारात हे हिंदुस्थाना, तुझ्यासाठी तुझ्यापासून हिसडून नेलेले तुझे तरुण तुझी चिंता वाहत असत. आपल्या शारीरिक पीडेसही वेळेवर विसरत. ते राजबंदी आपल्या मातृभूमीचा हात हातात धरून तिच्या नाडीचे ठोके परीक्षीत आणि त्यावरून तिच्या स्वास्थ्याविषयी चिंतातुर हर्षविषाद अनुभवीत त्या अंदमानात दिवस कंठीत असत."[८] अशी ही प्रिय मातृभूमी अंदमानहून सुटून पुन्हा पाहण्याचा प्रसंग येताच सावरकरांना झालेला अत्यानंद पुढील शब्दांत प्रकट झालेला आहे. " हिंदुस्थानचा तट दिसू लागला. मी चमकलो. हिंदुस्थानचा तट ! ज्या मातृभूमीच्या केवळ स्मृतीने प्रस्फूर्त होअून आजवर ह्या अनेक यातना भोगल्या तिची ती प्रत्यक्ष मूर्ती. ते चरण पुन्हा दिसले. या आयुष्यात पुन्हा दिसले. मी वळून बाबास म्हटले, " बाबा, ते पाहा भारत. ते पाहा त्याचे ' नीलसिंधुजलधौत-चरणतल." आम्ही दोघेही भक्तिभावाने थरथरून अुठलो आणि त्या मातृभूमीच्या चरणापुढे हात जोडून अुद्गारते झालो, 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय, वन्दे मातरम."[९] सावरकरांची मातृभूमीवर अशी अुत्कट प्रीती असल्यामुळेच मातृभूमीची प्रत्यक्ष

---

१. मा. आ. पृ. १६५. २. लं. बा. पृ. ५. ३. लं. वा. पृ. ५.
४. लं. वा. पृ. २९. ५. लं. बा. पृ. ९५–९६. ६. लं. बा. पृ. ५४.
७. मा. जन्म. पृ. ४२. ८. मा. जन्म. पृ. १८१. ९. मा. जन्म. पृ. ५०६.

सेवा करता येअील अशा कोणत्याही अटीवर स्वत:ची मुक्तता करून घेण्यास ते सिद्ध झाले.[१] मातृभूमीची सेवा हे अीश्वरी कार्य आहे असे त्यांना वाटत होते[२] आणि 'दिव्य मातृसेवाव्रताच्या अीश्वरी दीक्षेमध्ये आपण सहभागी' झाल्याबद्दल त्यांना कृतकृत्यता वाटत होती.[३]

सावरकरांचा ध्येयवाद त्यांच्या देशभक्तीतून आणि स्वातंत्र्यनिष्ठेतून निर्माण झाला. भारताचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे त्यांचे निकटतम ध्येय ठरले. त्यांच्या मित्रमेळ्याचे व अभिनव भारताचे मुख्य ध्येय संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच होते. 'पूर्ण राजकीय स्वतंत्रता हेच अभिनव भारताचे सुनिश्चित आणि सुस्पष्ट ध्येय होते' असे सावरकरांनी स्वत:च सांगितले आहे.[४] अभिनव भारताच्या प्रतिज्ञेत, "To win back absolute political independence of our nation" असे शब्दप्रयोग केल्याचे आढळत.[५] अेकट्या दुकट्या सुधारणा निरुपयोगी आहेत असा आपला स्पष्ट अभिप्राय सांगून सावरकरांनी खणखणीतपणे म्हटले आहे, 'संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे ध्येय ठेवून त्याचीच निर्भयपणे घोषणा करीत राहिले पाहिजे.'[६] अंदमानमधून सरकारकडे पाठविलेल्या अेका आवेदनपत्रात सावरकरांनी पुन्हा निक्षून बजाविले आहे की, "हिंदुस्थानास स्वतंत्र राष्ट्राच्या पदवीस पोहोचविणे हे आमचे ध्येय होते व आहेही,"[७] अिंग्लंडला जाताना आगनावेवरील आपल्या भारतीय मित्रांजवळ सावरकरांनी आपल्या या ध्येयाचाच अुच्चार केला आणि सांगितले, "आजचे आपणां सर्व भारतीय तरुणांचे ध्येय हेच की, आपल्या स्वदेशाच्या आणि स्वधर्माच्या पायांत ब्रिटिशांनी ज्या गुलामगिरीच्या शृंखला ठोकल्या आहेत त्या तोडून टाकून आपल्या मातृभूमीला, आपल्या राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी मरू तरी वा जिकू तरी अशा प्रतिज्ञेने त्या परकीय शत्रूशी झुंज द्यावी."[८] अिंग्लंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय परिषदेत 'पूर्ण स्वातंत्र्याच्या अंतिम ध्येयाला,' त्यांनी अनुमोदन दिले ते याच ध्येयनिश्चितीमुळे होय.[९]

ज्या स्वातंत्र्यनिष्ठेतून सावरकरांचा ध्येयवाद अुदित झाला ती स्वातंत्र्यनिष्ठाही तितकीच अुत्कट असल्याचे दिसून येते. ते स्वदेशस्वातंत्र्य हाच त्यांचा राजकीय धर्म, तीच त्यांची राष्ट्रीय देवता, त्यांचा राजकीय देव व मोक्ष बनला होता.[१०] सर्व कौटुंबिक चिंतेत आणि क्लेशात त्यांनी आपल्या या राजकीय व्रताची चळवळ सोडली नव्हती.[११] 'प्राण की स्वातंत्र्य' हा प्रश्न स्वत:स आधीच विचारून आणि

---

१. मा. जन्म पृ. ५२६. २. अंद. अं. पृ. ११. ३. अंद. अं. पृ. ११.
४. मा. आ. पृ. २२४. ५. केसरी दि. अं. १९६१. ६. मा. आ. पृ. १२३.
७. मा. जन्म. पृ. ३१६. ८. केसरी दि. अं. १९६१. ९. लं. बा. पृ. १०२.
१०. मा. आ. पृ. १३८. ११. मा. आ. पृ. १६४–१६५.

'स्वातंत्र्य, प्राण गेला तरी बेहत्तर पण स्वातंत्र्य' अशी शपथ घेऊन राजकीय स्वातंत्र्याच्या अुद्योगात त्यांनी अुडी घेतली होती.[१] 'राष्ट्र-स्वातंत्र्याच्या महान ध्येयासाठीच हे कारागार, हा बंदीवास, ही तपस्या' आपण आचरीत आहोत अशी त्यांची दृढ धारणा होती.[२]

राज्यक्रांतीच्या या ध्येयास्तव सावरकरांचा जीवनक्रम रेखलेला होता. आयुष्यातील कोणतेही पुढचे पाअूल टाकताना ज्या स्वदेश-स्वातंत्र्याचा खडतर क्रांतिमार्गाचे ते यात्री झाले होते ते पाअूल मागे तर खेचीत नाही ना अशी पहिली चिंता त्यांना लागत असे.[३] ते व्यायाम करीत तो स्वदेश-स्वातंत्र्याच्या युद्धात झुंजण्याची काटकता यावी म्हणून करीत.[४] त्यांचा अभ्यास, वाचन हे त्या राज्य-क्रांतीच्या महान कार्यात बौद्धिक सिद्धता व योग्यता प्राप्त व्हावी म्हणून केले जात होते.[५] विवाह करतानासुद्धा तो स्वदेशास्तव व राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करण्याचा विचार त्यांच्या मनात प्रामुख्याने होता.[६] ते शिवाजी-अुत्सव करोत वा गणपत्युत्सव करोत, त्यात 'स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या स्फूर्तिदायक संदेशा-वाचून दुसरे बोलणे नव्हते.'[७] त्यांचा अिंग्लंडचा प्रवाससुद्धा संपूर्ण स्वराज्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणाऱ्या अभिनव भारताच्या युरोपीय शाखा काढण्यासाठीच होता.[८] अंदमानातील वर्तनाचा बिंदू राष्ट्रहित हाच होता.[९] मित्रमेळ्यात अिंग्लंडमधील सहकाऱ्यांत व अंदमानादी विविध कारागृहांत त्यांच्या चर्चेच्या आंदोलनाचे केंद्र असे राजकारण. स्वदेशाला स्वतंत्र करण्यासाठी तळमळणारे राजकारण.

सावरकरांच्या स्वातंत्र्यनिष्ठेत जशी अुत्कटता आहे आणि जीवनाला वळण लावण्याचे जसे सामर्थ्य आहे तसाच तिच्यात संकुचितपणा नाही. त्यांची स्वातं-त्र्याची कल्पना अत्यंत व्यापक व अुदात्त आहे. शत्रुद्वेषातून त्यांची स्वातंत्र्यलालसा जन्म पावलेली नाही तर माणुसकीच्या मानुषकाच्या परम विकासाच्या कल्पनेतून त्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेचा अुदय झालेला आहे. म्हणून सावरकर म्हणतात, "अखिल मनुष्यमात्राचे कल्याण व्हावे म्हणून आम्हांस स्वतंत्रता हवी होती."[१०] ती देवीच्या, दैवी संपत्तीच्या, दैवी शक्तीच्या रूपात त्यांना दिसली.[११] अशा त्या स्वातंत्र्यलक्ष्मीचा अवतार म्हणजे त्या अीश्वरी कृपेचे या युगीचे साधन त्यांना वाटत होते.[१२] धर्मापेक्षाही ही स्वतंत्रता त्यांना श्रेष्ठ वाटत होती. म्हणूनच 'स्वराज्यावाचून स्वधर्म पंगू आहे'

---

१. मा. आ. पृ. १०५. २. मा. जन्म. पृ. ४०५. ३. मा. आ. पृ. १८६. ४. मा. आ. पृ. १८४. ५. मा. आ. पृ. १७१. ६. मा. आ. पृ. १८७–१८८. ७. मा. आ. पृ. १४२–१४३. ८. केसरी दि. अं. १९६१, पृ. १०३. ९. मा. जन्म. पृ. ४३५. १०. मा. आ. पृ. २२२–२२३. ११. मा. आ. पृ. २२३. १२. मा. आ. पृ. २२२.

असे ते अनेक कोटीक्रमांनी पटवून देत.[१] 'व्यक्तीच्या, राष्ट्राच्या, आणि मानवाच्या अैहिक नि पारलौकिक कर्तव्याचा समन्वय म्हणजेच स्वतंत्रता' या सूत्रात त्यांनी आपले स्वातंत्र्यविषयक विचार गुंफले.[२] स्वातंत्र्यनिष्ठेला राष्ट्रीय, धार्मिक कर्तव्याची श्रेष्ठता त्यांनी प्राप्त करून दिली.[३]

हिंदुस्थानचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे सावरकरांचे ध्येय होते. तरी ते निकटतम ध्येय होते. पण त्यांचे अंतिम ध्येय मानव्याधिष्ठित होते. 'अुभ्या मनुष्य जातीचे राजकीय सात्त्विक अेकीकरण हे त्यांचे अंतिम ध्येय होते.[४] 'ज्यात सर्व मनुष्यजातीचा समावेश होअील आणि जेथील अेकूण अेक स्त्रियांना आणि पुरुषांना ही पृथ्वी, ही भूमी आणि हा प्रकाश–हीच मनुष्याची खरी पितृभूमी आणि मातृभूमी आहेत– ह्यांच्यापासून मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करायचा आणि त्यांचा अुपभोग घ्यायचा समान अधिकार राहील असे संपूर्ण जगाचे अेक राष्ट्र' करणे हे सावरकरांचे अुच्चतम ध्येय होते.[५] मानवाचे परम कल्याण साधणाऱ्या आपल्या ध्येयाचा अुल्लेख त्यांनी अन्यत्रही केला आहे.[६]

व्यक्ती, राष्ट्र व मानवता यांचा समन्वय साधणाऱ्या ध्येयाचा पुरस्कार सावरकरांनी केलेला आहे. व्यक्तीपेक्षा राष्ट्रहित व राष्ट्रहितापेक्षा मानवताहित त्यांना श्रेष्ठ वाटते. 'प्रत्युदात्त राजकीय ध्येयाच्या तंद्रीत आपल्या आकुंचित व्यक्तित्वास विसरून विस्तृत अशा समष्टीत विलीन होण्याचा' विचार सावरकरांनी स्वानुभवातून व्यक्त केलाच आहे. ज्या समष्टीत वा राष्ट्रात ते व्यक्तित्व विलीन करावयाचे ते राष्ट्र मानुषकाच्याच हितार्थ असले पाहिजे[७] असा तत्त्वघोष ते करतात.[८] आणि कधी कधी तर जाती, धर्म, राष्ट्र यांच्या अतीत होअून ते असे सांगतात की, आमची खरी जात मनुष्य, खरा धर्म माणुसकी, मानवधर्म, खरा देश पृथ्वी, खरा राजा अीश्वर,' होय.[९] म्हणूनच मानवांच्या हितास पोषक असेल तीच खरी राष्ट्रभक्ती' असे ते मानतात.[१०] मानव्य ही देशाभिमानावरची कोटी आहे हे तत्त्व ते मान्य करतात.[११] अशा मानवतावादी वृत्तीमुळेच ज्या ज्या ठिकाणी मानवी शक्तीचे प्रगमन होत असेल किंवा विकसन होत असेल, त्या त्या ठिकाणी सावरकरांच्या 'मानव्यहिताकांक्षी हृदयाला' आनंद झाल्याचे दिसून येते. पोर्तुगालमध्ये राजसत्ता जाअन लोकपक्षाचा विजय होताच सावरकरांना अत्यंत आनंद झाला. तो व्यक्त करताना त्यांनी पुढील कारणमीमांसा दिली आहे. सृष्टिक्रांतिशास्त्राचे

---

१. मा. आ. पृ. २२२. २. मा. आ. पृ. २२२. ३. मा. आ. पृ. २२३.
४. मा. जन्म. पृ. ३१७. ५. अंद. अं. पृ. ८७, ८८. ६. केसरी दि. अं. १९६१.
७. मा. आ. पृ. १२६. ८. मा. आ. पृ. २२१. ९. मा. आ. पृ. २२१.
१०. मा. आ. पृ. २३५. ११. अंद. अं. पृ. ८९.

साधारण नियम मानवी हृदयाच्या वाढीला साहजिकपणेच लागतात. या नियमांप्रमाणे, पहिले जे व्यक्तीला ओळखणारे हृदय हळूहळू समाजाला, राष्ट्राला व मानव्याला ओळखू लागते व जशी जशी मानवी हृदयाची अेकाहून अेक विस्तृत अशा लोकसमूहाशी सलगी होअू लागते, तशी तशी त्याची वृत्ती अधिक गंभीर बनत जाते. . . मला पूज्य असलेल्या विस्तृत लोकसमूहाचे हिताहिताशी या अभ्युदय, पराभवाचा काय संबंध आहे, ही पृच्छा अेकदम मनात अुभी राहते व हृदयाचे अुडणे किंवा आल्हादवर्तन हे पूज्य लोकपक्षाचा मानभंग किंवा विजय यावर अवलंबून असते."[१] या अंतिम मानवहिताच्या ध्येयामुळेच राजकीय क्षेत्रात निर्बंधबद्ध झालेले सावरकर 'राजकारण करू देत नसाल तर अितर दिशेने देशाची व मानवजातीची सेवा' करण्याची अिच्छा व्यक्त करतात.[२] 'सर्व मनुष्यजातीने सहकार करावा हेच ध्येय डोळ्यापुढे ठेवून 'राजकारण प्रतिसहकारी असावे' असे ते सांगतात.[३] ज्या धन्य दिवसाचे स्वप्न त्यांच्या डोळ्यापुढे तरळत आहे, त्या दिवशी मनुष्यजातीचे स्वातंत्र्य केवळ मनुष्यमात्राच्या प्रेमाचेच दास होअील असा विश्वास त्यांना वाटतो.[४] 'मनुष्यजातीसाठी अधिकात अधिक आत्मयज्ञ करण्याकरिता' विवेकाचा अंकुश ते आपल्या मनाला सारखा टोचीत असतात.[५] सावरकरांच्या या मनुष्यजातीच्या प्रेमामुळेच मि. गाय आल्फ्रेड यासारखे पाश्चात्त्य क्रांतिकारक सावरकरांना केवळ हिंदी देशभक्त मानीत नसून सर्व जगताचे नागरिक व मानव जातीचे मार्गदर्शक मानतात.[६]

सावरकरांचा ध्येयवाद असा मानव्याधिष्ठित व व्यापक असला, तरी व्यवहारी बैठक त्याने सोडलेली नाही. अेका बाजूला त्यांची प्रखर देशभक्ती व स्वातंत्र्यनिष्ठा आणि दुसऱ्या बाजूला त्यांचा मानवतावाद यांत संघर्ष वा द्वंद्व होणे अपरिहार्य असल्याने त्यांच्या हितकारक मर्यादाही सावरकरांनी स्पष्ट केल्या आहेत. ही सर्व द्वंद्वे सोडविण्याची अेकच कसोटी सावरकरांनी सांगितली आहे. आणि ती म्हणजे अुपयुक्ततावाद होय. या अुपयुक्ततावादाच्या कसोटीवर त्यांनी व्यक्ती, राष्ट्र आणि मानुषक, सत्य आणि असत्य, हिंसा आणि अहिंसा, धर्म आणि अधर्म, गुप्तता, शस्त्रयुद्ध, हौतात्म्य अित्यादी द्वंद्वे व तत्वे घासून त्यांच्या मर्यादा सांगितलेल्या आहेत.[७] अधिकात अधिक मनुष्याचे हित हेच सर्व सद्गुणांचे समर्थन होय असा त्यांचा ठाम सिद्धान्त आहे.[८] अैहिक व पारलौकिक राजकारण आणि समाजकारण, व्यक्ती, राष्ट्र व मानुषक यांचे स्वातंत्र्य या सर्व क्षेत्रांत अुपयुक्ततावादाच्या व समन्वयाच्या तत्त्वावरच त्यांनी आपल्या विचारांची मांडामांड केली आहे.[९]

---

१. ल. बा. पृ. ७०. २. मा. जन्म. पृ. ४३८. ३. मा. जन्म. पृ. ४९६.
४. मा. जन्म. पृ. ५२. ५. अंद. अं. पृ. २६. ६. केसरी अ. म. वि.
७. मा. आ. पृ. २१९, २२०, २२१. ८. मा. आ. पृ. २१९, २२०.
९. मा. आ. पृ. २२१, २२३.

सावरकरांच्या या ध्येयवादाच्या संदर्भात त्यांच्या जनहिताच्या, राष्ट्रहिताच्या, ध्येयाचा अुल्लेख करावयास हवा. 'वरं जनहितं ध्येयम्' असे ते स्पष्टपणे सांगतात. आपल्या वर्तनाचा व वचनाचा केंद्रबिंदू ते लोकहित व राष्ट्रहित हाच मानतात. आपला विवाह, आपल्या सर्व चळवळी, अंदमानातील शिक्षण व संप, अंदमानच्या वसाहतीविषयीचे धोरण, प्रांतीय अभिमान, राजनिष्ठेचे प्रकटीकरण, सामाजिक चालीरीती या सर्व ठिकाणी जनहिताचे, राष्ट्रहिताचे ध्येय त्यांनी डोळ्यापुढे ठेवलेले दिसते.

हिंदुत्वनिष्ठा ही सावरकरांची अेक प्रधाननिष्ठा होती. त्यांचे हिंदुत्वप्रेम प्रारंभी जरी भावनामूलक वा परिस्थितिमूलक होते, तरी पुढील जीवनातील अनुभवांनी त्याला निष्ठेचे स्वरूप प्राप्त झाले. अितकेच नव्हे तर पुढे या निष्ठेस बौद्धिक आधार शोधण्याची धडपड सावरकरांनी केली व नंतर बौद्धिक अधिष्ठानावर त्यांची हिंदुत्वनिष्ठा तगूनही राहिली. हिंदु-मुसलमानांच्या दंग्याच्या वातम्या वाचल्यामुळे निर्माण झालेल्या भावनिक प्रतिक्रियेतून हे हिंदुत्वप्रेम बालपणीच त्यांच्या ठायी निर्माण झाल्याचे दिसते.[१] वयाच्या बारातेरा वर्षांच्या सुमारास हिंदू विजयाची गीते गात सावरकर व त्यांच्या मित्रमंडळीचे टोळके भगूरच्या गल्ल्यागल्ल्यांतून मिरवत जात असे.[२] क्वचित मशिदीवर केलेल्या हल्ल्यातून व हिंदु-मुसलमान असे मित्रमंडळीचे गट पाडून केलेल्या लुटुपुटीच्या लढाअीतून सावरकरांचा हिंदुत्वाभिमान प्रकट होत असे.[३] मराठ्यांच्या अितिहासावरील ग्रंथ व बखरी वाचून त्यांच्या हिंदुत्वाभिमानाचे भावनिक पोषण लहानपणापासूनच होत होते. नाशिक येथे शिक्षणासाठी असताना त्यांचा हिंदुत्वाभिमान 'हिंदु संस्कृतीचा गौरव' अशासारख्या लेखातून जनतेपुढे प्रकट होअू लागला होता.[४] अिंग्लंडमधील आपल्या त्यांच्या वास्तव्यात या मूळच्या हिंदुत्वनिष्ठेवर सावरकरांनी हिंदु-मुसलमानांच्या अैक्याचे कलम बांधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. हिंदुस्थानातील सर्व जातींच्या अेकतेतून साधलेल्या राष्ट्रैक्याचा पुरस्कार या वेळी त्यांनी केला. आपल्या राज्यक्रांतीच्या अुद्योगात त्यांनी काही मुसलमान सहकाऱ्यांना सामील करून घेतले व सय्यद हैदर रेझा, दे. भ. खान यांसारख्या मुसलमान देशभक्तांचा जाहीर गौरवही केला.[५] लंडनमध्ये साजरा केलेल्या श्रीशिवोत्सवाच्या व श्री गुरुगोविंदसिंहाच्या अुत्सवाच्या प्रसंगाने हिंदुस्थानातील सर्व दिशांचे व सर्व धर्मांचे हिंदी लोक अेकत्र आणण्याचे पाहून सावरकरांना 'हिंदी राष्ट्रैक्याची मूर्त शक्यता होत' असल्याबद्दल आनंद वाटला.[६] हिंदु-मुसलमानांची देशविघातक दुही ही अिंग्रजांनाच अिष्ट वाटत

---

१. मा. आ. पृ ५४–५५. २. मा. आ. पृ. ५६. ३. मा. आ. पृ. ५४–५५.
४. मा. आ. पृ. ७० ५. लं. बा. पृ. ७८ व ९३. ६. लं. बा. पृ. ७२ व १०६.

असल्याची जाणीवही त्यांना नाशिकच्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्याच्या अेका खोटचा आणि खोडसाळ बातमीने झाली.[१] नाशिकच्या देशभक्त ब्राह्मणांनी गणपती अुत्सवा-सारख्या प्रसंगी सय्यद हैदर रेझा यांना बोलाविल्याची वार्ता त्यांना स्वागतार्ह वाटली.[२] पण लंडनमधील वास्तव्याच्या अखेरच्या काळात त्यांचा हिंदुत्वाभिमान पुन्हा तीव्रतेने प्रकट होअू लागल्याचे दिसते. विजयादशमीच्या अुत्सवाच्या वर्णनातून त्यांचा हा हिंदुत्वाभिमान डोके वर काढताना दिसतो. 'मी हिंदू आहे असे सांगण्यास तरुणांना कोण अभिमान वाटू लागला आहे ?' असे ते सांगतात.[३] 'हिंदू हिंदुस्थानचे हृदय आहे' असा स्पष्ट विचार ते व्यक्त करतात.[४] अिंग्लंडच्या वास्तव्यातच सावर-करांना 'हिंदू' या शब्दातील सामर्थ्य प्रतीत झाले होते आणि पुढे अंदमानात 'हिंदुत्व' हा त्यांच्या चिंतनाचा अेक विषय बनला.[५] अंदमानातील हिंदू बंदीवानां-वरील अन्याय व मुसलमान वंद्यांनी चालविलेले धर्मांतराचे प्रयत्न पाहून सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा पुन्हा अुफाळून वर आली. आणि मग हिंदु-मुसलमानांच्या विचार-सरणीतील, संस्कारातील भेदांचे वैचारिक पृथक्करण करून त्यांनी आपल्या हिंदुत्वाभिमानाला बौद्धिक आधार दिला.[६]

सावरकरांचा हिंदुत्वाभिमान हा अितर धर्मांच्या व जातींच्या द्वेषातून स्थिर झालेला नाही.[७] त्यांचा हिंदुधर्मविषयक दृष्टिकोन प्रामुख्याने अैहिक व सामाजिक स्वरूपाचा आहे. धर्म हे समाजबळाचे अेक साधन आहे असे त्यांना वाटते.[८] राष्ट्र व जात संख्याबळावर टिकत असल्याने हिंदूंच्या धर्मांतराला त्यांचा विरोध आहे; व परधर्मात गेलेल्या हिंदूंना पुन्हा शुद्ध करून हिंदुधर्मात घेण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. या राष्ट्रीय व अैहिक दृष्टीमुळे ते हिंदुत्व-संरक्षण व संवर्धन याला महत्त्व देतात. म्हणूनच त्यांना 'हिंदू न राहणे हे चोरीहून शतपटीने घोर असे राष्ट्रीय व सामाजिक पाप' वाटते.[९] हिंदुराष्ट्राचे संख्याबळ घटू नये म्हणून ख्रिश्चन-धर्म-प्रसारालाही ते विरोध करतात.[१०] अशा रीतीने हिंदुत्वाचा अभिमान हिंदू लोकांत संचरवून हिंदूंचे अेक सवळ राष्ट्र करणे हे सावरकरांचे अुद्दिष्ट आहे.[११]

सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा त्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेहून प्रवळ असल्याचे आढ-ळून येते. १९५६ साली जोधपूर येथील अ. भा. हिंदुसभेच्या अधिवेशनात भाषण करताना सावरकर म्हणाले होते : "दहनस्थळी माझ्या मृत्यूनंतर जर माझ्या-नावाची शिला लावणार असाल तर त्या शिलेवर 'स्वातंत्र्यवीर सावरकर' ह्यापेक्षा

---

१. लं. बा. पृ. ९५. २. लं. बा. पृ. ९४. ३. लं. बा. पृ. १४२, १४३.
४. लं. बा. पृ. १६१. ५. मा. जन्म. पृ. २९१. ६. मा. जन्म. पृ.२९१, ३३०.
७. मा. जन्म. पृ. ३०२. ८. मा. जन्म. पृ. २७०. ९. मा. जन्म. पृ. २६१.
१०. केसरी दि. अं. १९६१, पृ. १०६. ११. मा. जन्म. पृ. २८८.

'हिंदुसंघटक सावरकर' असा लेख कोरला गेल्यास तो मला अधिक आवडेल. कारण स्वातंत्र्यार्थ मी जे प्रयत्न केले, ते ते हिंदुसंघटनेसाठी होते, समर्थ, संपन्न हिंदुराष्ट्रासाठीच होते, अखंड हिंदुस्थानासाठीच होते."[1]

परधर्मप्रसाराने हिंदूंचे संख्याबळ घटू नये म्हणून सावरकर जसे दक्ष आहेत, तसेच सबळ हिंदुराष्ट्र करण्यात आड येणाऱ्या हिंदुसमाजातील घातक रूढींचाही नायनाट करण्यासाठी कर्तव्यतत्पर आहेत. म्हणूनच अेका वाजूने शुद्धी व संघटना आणि दुसऱ्या वाजूनें राष्ट्रीय अवनतीस कारणीभूत होणाऱ्या रूढींचा नाश ही सावरकरांच्या कार्याची दोन प्रमुख अंगे झाली आहेत. विटाळवेड, रोटीबंदी, स्पर्शबंदी, वुद्धिंबंदी, शुद्धिबंदी यांवर सावरकरांनी अंदमानमध्ये असतानाच प्रखर हल्ले चढविले.[2] जातिनिर्विशेष हिंदूंच्या सहभोजनांचा पुरस्कार केला.[3] सावरकरांच्या या हिंदुत्वाच्या अभिमानातून व हिंदू संस्कृतीवरील प्रेमातूनच हिंदी भाषा व नागरी लिपी यांचा अभिमान अुगम पावल्याचे दिसते. हिंदी भाषा ही 'संस्कृतोत्पन्न आणि पूर्वजव्यवहृत अशी हिंदुभाषा होय असे त्यांना वाटते. म्हणून ते तिला राष्ट्रभाषा मानतात. 'हिंदी ही भाषा आणि नागरी ही लिपी आपली धर्मभाषा आणि धर्मलिपी आहेत, असा जो प्रचार सावरकरांनी अंदमानात केला होता, त्यामागे सावरकरांचा हिंदुत्वाभिमानच प्रवळ होता असे दिसून येते.[4] " अंदमानमध्ये हिंदु-संस्कृती जर जिवंत ठेवायची असेल, तर हिंदी भाषा आणि नागरी लिपी यांचे शिक्षण प्रत्येक हिंदू मुलास अगदी अपरिहार्य म्हणून दिले जावे, असे त्यांचे ठाम मत होते."[5]

स्वातंत्र्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा यांप्रमाणेच सावरकरांची बुद्धिनिष्ठा अत्यंत प्रखर आहे. त्यांच्या विवेकनिष्ठेचे वैशिष्ट्य असें की, तिच्या अितक्याच अुत्कट अशा भावनेशी वारंवार संघर्ष होअून ती टिकून राहिली आहे. भावनेला जणू ती आपल्या जरबेत वागविताना दिसते. अनेक प्रसंगी झालेल्या भावना व बुद्धी यांच्या झगडयांत अखेर सावरकरांच्या बुद्धीचाच विजय झाल्याचें दिसून येते. आपली बुद्धी व भावना यांचे नाते व त्यांचा परस्परसंबंध वर्णन करताना सावरकर लिहितात, " लहानपणापासूनच माझी भावना जितकी अुत्कट तितकी माझी बुद्धीही तर्कट पडल्यामुळे दोघी सख्या पण छटेल बहिणींप्रमाणे परस्परांचा पाणअुतारा करण्यासाठी टपून बसण्यातच त्यांच्या परस्पर-प्रेमाची करमणूक चाललेली असते."[6] अशा या बुद्धिभावनांच्या संघर्षांचे प्रसंग लहानपणापासूनच सावरकरांच्या जीवनात अनेक आले. अीश्वर व भक्त यांचे नाते, पोथीतील सत्यासत्य, धार्मिक व्रते, व आचारांतील परस्पर विरोध अित्यादी कितीतरी गोष्टींत स्वत:ची

---

१. हिं. द. २. मा. जन्म. पृ. २८४, ३०१. ३. मा. जन्म. पृ. ४७६.
४. मा. जन्म. पृ. ४६८. ५. मा. जन्म. पृ. ४६२ ६. मा. आ. पृ. ५९.

वुद्धी आणि भावना यांच्यातील द्वंद्व पाहण्याचे प्रसंग सावरकरांवर वालपणीच आले. पुढे पुढे तर विवेकाला न्यायाधीश नेमून त्या मनाच्या पंचसभेत त्यांनी स्वत:वर खटले भरण्यास सुरुवात केली; आणि विवेकाच्या अनुकूल वा प्रतिकूल अशा कोणत्याही निर्णयाला मान्यता देण्याची सवय लावून घेतली.[1] तरीही काही प्रसंग असे येत की, या विकार-विवेकांच्या संघर्षात वा वंडात विकार, विवेकास मनाच्या सिंहासनावर अुचलून फेकून देअी व मनावर क्षणभर विकाराचे राज्य चाले. पण सावरकरांनी पुन्हा अेकेकांस वद्ध करून विवेकाच्या स्थानावर त्याची पुनर्स्थापना करावी व त्याच्या आधिपत्याखाली वागू लागावे.[2]

प्रियजनांशी ताटातूट होण्याचा प्रसंग असो,[3] वा संकटात प्रतिकूल परिस्थिती-पुढे अुभे राहण्याचा प्रसंग असो,[4] याच विवेकाने सावरकरांना धैर्य दिले. मन संयमित करावयाला[5] व आत्महत्येपासून परावृत्त करावयास हाच विवेक सावरकरांच्या पाठीशी अुभा होता.[6] त्यांना कर्तव्याचे पालन करावयास लावले ते याच विवेकाने;[7] आणि ज्या ज्या वेळी सावरकरांच्या मनात स्वत: चमकण्याची हौस अुत्पन्न झाली,[8] अहंतेचा वडिवार त्यांचे मन करू लागले,[9] स्वार्थी, अधोगामी महत्त्वाकांक्षेचे थैमान मनात नाचू लागले,[10] त्या त्या वेळी याच विवेकरूपी आजीवाअीने त्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांचे सांत्वन केले. अंदमानच्या नृशंस कारागृहातही या विवेकानेच त्यांच्या मनाला निवांतपणा लाभला.[11] अंदमानात शुद्धी चळवळ करताना निर्माण झालेल्या धर्मविषयक प्रश्नांचा विचारही सावरकरांनी अत्यंत बुद्धिनिष्ठेने केला. 'शुद्ध आणि आरोग्यदायक अन्न वा जल कोणाच्याही हातचे घेतले तरी त्यात दोष नाही', असा पूर्ण बुद्धिनिष्ठ विचार त्यांनी व्यक्त केला.[12] बुद्धिवादाने धर्मप्रसार करण्यास प्रत्येकाचा अधिकार आहे असेही त्यांनी सांगितले. परकीयांच्या हितकर चालीरीती आत्मसात करावयाला ते संमती देतात, तेही याच बुद्धिनिष्ठेमुळे होय.[13] देशभक्ती, स्वातंत्र्यनिष्ठा, बुद्धिनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा अित्यादी सावरकरांच्या व्यक्ति-मत्त्वातील विविध निष्ठांचे वर्णन त्यांच्या टीकाकारांनीच अनेक स्थळी केले आहे. कै. न. चिं. केळकरांनी त्यांची 'अुत्कट देशभक्ती व स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य' या गुणांचा निर्देश केला आहे.[14] 'देशभक्ती ही सावरकरांची

---

१. मा. आ. पृ. २०१. २. मा. जन्म. पृ. ४१३. ३. मा. जन्म. पृ. १४, १५, ४१३. ४. केसरी दि. अं. १९६१, पृ. १००. मा. जन्म. पृ. १. ५. मा. जन्म. पृ. १६७. ६. मा. जन्म. पृ. १३२, ५११, ५१२. ७. केसरी दि. अं. १९६१, पृ. १००. मा. जन्म. पृ. १२४. ८. मा. जन्म. – अंद. अं. पृ. ४९. ९. अंद. अं. पृ. २५. १०. अंद. अं. पृ. २५. ११. मा. जन्म. पृ. ४०५ ते ४०९. १२. मा. जन्म. पृ. ३००. १३. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९७. १४. सा. च. प्रस्तावना.

अंतिम निष्ठा आहे', असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात.[१] अुत्कट भारत-भक्तीबरोबर सावरकरांच्या ठायी बुद्धिवादी दृष्टी असल्याचेही तर्कतीर्थ जोशी यांचे मत आहे.[२] सावरकरांच्या ठिकाणीच असलेल्या स्वातंत्र्यलालसामूलक देशप्रेम व ध्येयमार्गासंबंधी ठाम निश्चय या व्यक्तिविशेषांचा अुल्लेख श्री. शि. ल. करंदीकर यांनी केला आहे.[३] 'ज्वलंत देशभक्तीचा शाहीर' असे गौरवपर अुद्गार वॅ. अेन. सी. चतर्जी यांनी काढले आहेत.[४]

सावरकरांच्या ध्येयनिष्ठेच्या विचारासमवेत त्यांच्या साधनाबद्दलचा निश्चय वा सिद्धान्त यांचा विचार क्रमप्राप्त होतो. ध्येयाबाबत सावरकरांनी निकटतम ध्येय व अंतिम ध्येय हा जसा क्रम सांगितला आहे, तसाच क्रम त्यांनी साधनासंबंधी सांगितलेला आहे. अभिनव भारताचे अंतिम साधन सशस्त्र क्रांतियुद्ध हेच होते.[५] त्याचा अंतिम सिद्धान्त शस्त्रबल हाच होता.[६] स्वराज्य पात्रतेचा निर्णायक, अमोघ नि रामबाण अुपाय म्हटला म्हणजे 'रामबाण' हाच होय. अशी सावरकरांची श्रद्धा होती.[७] सशस्त्र क्रांतियुद्ध हेच यशस्वी राजकारणापर्यंतचे, भयंकर असले तरी, अनन्य साधन होय अशी त्यांची खात्री होती.[८] 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना' असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता.[९] साधनाबद्दलची ही पूर्ण निश्चिती पटल्यामुळेच आणि अगदी बुद्धिपूर्वक विचार करूनच सावरकर सशस्त्र क्रांतिमार्गाकडे वळले होते. साधनाबद्दलचा असा बुद्धिपूर्वक विचार करताना निसर्गक्रम व अितिहासातील अंतिम सिद्धान्त ह्या दोन गोष्टी सावरकरांनी विचारात घेतल्या होत्या.[१०] पण त्याबरोबरच अधिकात अधिक मानवांचे कल्याण आणि साधनाच्या अुपयोगातील अपरिहार्यता यांचीही दखल त्यांनी घेतली होती.[११]

अंतिम साधनाबद्दल असा ठाम निश्चय असूनही 'साधने ही परिस्थितिसापेक्ष असतात' अशी वाह्यतः विसंगत दिसणारी विचारसरणी त्यांनी मांडली आहे.[१२] या दृष्टीने 'साधनानामनेकता' हे त्यांच्या चळवळीचे सूत्र होते असे पुढील आठवणी-वरून स्पष्ट होअील. श्री. मो. वि. दामले यांनी दिलेल्या आठवणीचा सारांश असा की, सावरकरांच्या सामाजिक कार्याला नि विशेषतः अस्पृश्यता निवारण चळवळीला रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर ब्राअुन यांनी जो मनःपूर्वक पाठिंबा दिला त्याबद्दल सावरकरांनी कलेक्टरसाहेबांना पानसुपारी करून निरोप दिला. यासंबंधी

---

१. सा. द. – प्रस्तावना. २. सा. द. – प्रस्तावना. ३. सा. च. पृ. ५७२. ४. केसरी अ. म. वि. ५. मा. आ. पृ. २२४. ६. केसरी दि. अं. १९६१. ७. केसरी दि. अं. पृ. ९९. ८. मा. आ. पृ. २२०. ९. मा. आ. पृ. २२५. १०. मा. आ. पृ. २२५. ११. मा. आ. पृ. २२० ते २२५. १२. मा. आ. पृ. २२९.

खुलासा करताना सावरकरांनी सांगितले, "माझ्या कोणत्याही चळवळीत पान-सुपारीपासून पिस्तुलापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश होतो."[१] पण त्यातही अंतिम सशस्त्र क्रांतीस अुपयोगी पडतील ती सर्व साधने असा अर्थ त्यांना अभिप्रेत आहे.[२] या दृष्टीने शांततावादी, वैध मार्ग स्वीकारणे त्यांना अधर्म वाटत नाही.[३] निश:स्त्र प्रतिकाराचा मार्ग सुद्धा त्या शेवटच्या सशस्त्र क्रांतीच्या दिव्यास्तव स्वीकारणे त्यांना आवश्यक वाटते.[४] आपल्या न्याय्य पक्षाची कमीत कमी हानी होअून अन्याय्य विपक्षाची जास्तीत जास्त हानी करणारे शुद्धसाधन ते खरे साधन असे सावरकर समजतात.[५] म्हणूनच अन्नत्याग करून घेणारे अुपोषणाचे साधन त्यांना संमत नाही.[६]

श्रद्धास्थाने

सावरकरांनी जी श्रद्धास्थाने मनात पूजिली त्यात केवळ परंपरेचा अभिमान नव्हता तर त्या श्रद्धास्थान झालेल्या व्यक्तीमध्ये अंतर्भूत असलेल्या तत्त्वांची अुपासना वा भक्ती करण्याची भूमिका होती. म्हणूनच देशभक्तीने बेभान झालेल्या सावरकरांना 'जे शब्द अैकू येत होते ते शिवाजीचे नि कृष्णाचे, मॅझिनीचे नि गॅरिबाल्डीचे' होते.[७] प्रत्येक श्रद्धास्थान त्यांना विशिष्ट गुणांचे प्रतीक वाटत होते. रामाने जगातील रावणी अत्याचार रक्ताच्या महानदात बुडवून टाकला होता.[८] 'श्रीकृष्ण हा अुपयुक्ततावादाचा पहिला प्रणेता होता.[९] महाराणा प्रतापाने ..... हिंदुस्थानातील गौरवाचा यशोध्वज स्वातंत्र्याकांक्षेच्या अुंच आकाशात फडकत ठेवला होता.[१०] शिवाजी महाराज तर प्रत्यक्ष स्वातंत्र्याची देवता होती.[११] याच शिवाजी महाराजांनी त्या मोंगली रावणसत्तेला धूळ चारीत हिंदुपदपादशाहीचा विजयप्रासाद बांधला.[१२] श्रीसंभाजी, छत्रपती राजाराम यांनी युद्धयज्ञ करून तो स्वराज्यप्रासाद अभंग ठरविला.[१३] बाजीराव, नानासाहेब, भाअूसाहेब, माधवराव, नाना फडणीस, शिंदे अित्यादी महाराष्ट्रवीरांनी त्या स्वराज्याला साम्राज्यवैभव मिळवून दिले होते.[१४] नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपे, वासुदेव बळवंत, चाफेकर-रानडे ही सर्व बंडाची आदर्श दैवतेच होती.[१५] 'तरवारीवाचन तत्त्वही पंगू पडते असे पाहून गुरुगोविंदसिंहांनी तरवार अुपसली होती' व

---

१. सा. यां. आ. पृ. ३४. २. मा. आ. पृ. २१३. ३. मा. जन्म. पृ. ४३९. ४. मा. आ. पृ. २२८. ५. तें. ता. पृ. ९५. ६. ते. ता. पृ. ९४. ७. मा. आ. पृ. २१८. ८. ते. ता. पृ. ७०. ९. मा. आ. पृ. १७०. १०. तें. ता. पृ. ७०. ११. मा. आ. पृ. १४२. १२. ते. ता. पृ. ७०. १३. तें. ता. पृ. ७०. १४. मा. आ. पृ. १३९. १५. लं. बा. पृ. १०६.

हुतात्म्यांचा तो मुकुटमणी झाला होता.[१] वीर वैराग्याने आपल्या राजविंड्या मुलाचे अनन्वित हाल पाहण्याचे विलक्षण मनोधैर्य दाखविले होते.[२] लो. टिळकांचा राजकीय अंतरात्मा शिवाजीच्या वंशातला होता व स्वराज्य हेच त्यांचे मनोमन अुद्दिष्ट होते.[३] 'काळकर्ते परांजपे तर तरुणांच्या हृदयांत क्रांतीची चेतना व आग भडकावीत होते.[४] मॅझिनी हा तरुण देशभक्तांना अुत्साह, दिव्य, प्रेमळ व अुदात्त अशा राष्ट्रमंत्राची दीक्षा देणारा गुरू होता; आणि त्यांच्या राष्ट्रमंत्राचे तेज गॅरिबाल्डीच्या तरवारीवर झळकत होते.

या सर्व व्यक्तींचे हे गुणविशेष सावरकरांना प्रिय होते आणि म्हणूनच त्या व्यक्ती सावरकरांचे श्रद्धास्थान बनल्या. थोडक्यात सांगायचे तर असे म्हणता येअील की रामायण-महाभारत हे ग्रंथ, मराठ्यांचा व शिखांचा तेजस्वी अितिहास व मॅझिनीचे तत्वज्ञान ही सावरकरांची श्रद्धाकेंद्रे झाली होती.

रागद्वेष

सावकरांच्या मनात अनेक विषयांवद्दल अनुकूल वा प्रतिकूल भावना वास करताना दिसतात. अनुकूल भावनांचे रूपांतर व्यक्तिगत जीवनात क्वचित संकुचित अभिमानातही झाल्याचे दिसून येते. सावरकरांचा कुलाभिमान हा अशा अभिमानांपैकीच अेक अभिमान मानावा लागेल. 'आपले कुल हे अीश्वरांश आहे' असा त्यांच्या मनातील ग्रह मधून मधून प्रकट होताना दिसतो.[५] या विचारातील भावना जरी अुदात्त असली तरी तीमधील मूळचा कुलाभिमान लोपत नाही. त्यांच्या अेका पूर्वजाला पेशव्यांकडून संस्कृत विद्येच्या सन्मानार्थ पालखीचा मान मिळाला होता व त्याबद्दलही सावरकरांना कौतुक व अभिमान वाटत होता.[६] आपल्या कुलाच्या अभिमानाला ढळ लागू नये म्हणून ते दक्ष राहात. अंदमानामध्ये कैद्यांना मिळणाऱ्या सवलतीबद्दल अर्ज करताना त्यात दयेची याचना असता कामा नये असा आग्रह ते आपल्या धाकट्या बंधूंना पाठविलेल्या पत्रात धरतात.[७] कारागृहात आपल्या भेटीची परवानगी मागतानासुद्धा ती नियमानुसार मागावी आणि त्यासंबंधीच्या अर्जात आपल्या विरहाची क्षते परक्यांच्या दृष्टीपुढे अुघडी पडता कामा नयेत असे ते आपल्या बंधूंना कटाक्षाने बजावतात.[८] व्यक्तिगत व्यवहारातही सावरकर अत्यंत स्वाभिमानी आहेत. स्वत:ची कारागृहातून मुक्तता होण्यासाठी कोणतेही नीच वा 'लाळघोटी वर्तन' करावयास ते सिद्ध नव्हते.[९] स्वाभिमान व प्रतिष्ठितपणा असणाऱ्या कोणत्याही माणसाला

---

१. मा आ. पृ. २२७. २. मा. आ. पृ. ८९, २१५. ३. मा. आ. पृ. १३४.
४. मॅझिनी चरित्र पृ. २. ५. अंद. अं. पत्र २ व ३. ६. मा. आ. पृ. १४.
७. अंद. अं. पृ. ३९. ८. अंद. अं. पृ. ४७. ९. मा. जन्म. पृ. ४३५.

अिंग्लंडात कायद्याचा अभ्यास करणे शक्य होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते.[१] मात्र व्यक्तिगत व्यवहारातील त्यांचा अभिमान हा मुख्यतः राष्ट्र किंवा जातीय अभिमानाशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

सावरकरांना तिटकारा होता तो अत्याचाराचा . 'मनापासून कोणत्याही स्वरूपातल्या अत्याचाराचा तिटकारा ' असल्याचे स्वतः सावरकर सांगतात.[२] मग तो अत्याचार धार्मिक असो वा राजकीय असो आणि त्या अत्याचाराचे स्वरूप स्पष्ट असो वा अस्पष्ट असो; त्याच्या प्रतिशोधनासाठी वा प्रतिकारासाठी सिद्ध होणे हा सावरकरांचा स्वभावच होता. लहानपणी मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांचा आणि अिंग्रजांच्या राजकीय अत्याचारांचा, ते काय आहेत ते स्फुटतः कळण्यापूर्वीच, ते आहेत अेवढयाच अस्फुट निश्चिततेने त्यांना तीव्र तिटकारा येअी.[३] अंदमाना-मध्ये अेखादा हिंदू मुसलमान होताना जेव्हा जेव्हा ते पाहात किंवा अेखाद्या बंदीवानाला अधिकाऱ्याने मारहाण चालविल्याची बातमी जेव्हा त्यांना कळे तेव्हा तो अन्याय वा अपमान असह्य होअून त्यांची प्रतिकारशक्ती अुसळी घेत असे.[४] अितकेच नव्हे तर अशा अत्याचाराचा प्रतिकार करण्यास अितरांनाही अुत्तेजन देणे त्यांना आपले कर्तव्य वाटत होते.[५] अन्यायाच्या या तीव्र तिटकाऱ्यामुळे जी जी चळवळ तें हाती घेत वा ज्या ज्या तत्त्वांचा पुरस्कार ते करीत ती, सर्व न्याय्य आहेत म्हणूनच त्यांचा ते पाठपुरावा करतात. आपले स्वातंत्र्याचे ध्येय व त्याचे साधन,[६] शुद्धिचळवळ,[७] देशाभिमान,[८] अंदमानातील संपादी चळवळी[९] अित्यादी सर्व गोष्टी त्यांना न्याय्य वाटत होत्या. तेव्हा अन्याय किंवा अत्याचार यावद्दलचा तीव्र द्वेष त्यांच्या रोमरोमी भिनला असल्याचे दिसून येते.

त्यांचा जातिविषयक द्वेषही अशा अत्याचाराच्या द्वेषातूनच निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यांना जातींचा द्वेष नाही पण जातीच्या अत्याचारी प्रवृत्तीचा मात्र तिटकारा आहे.[१०] मुसलमानी धर्मप्रचारक राक्षसी साधनांनी धर्मप्रचार करतात आणि अशा अत्याचारांनी आपले हिंदू धर्मबांधव हिसडून नेले जातात हे पाहून सावरकरांना मुसलमानांवद्दल स्वाभाविक त्वेष वाटे.[११] ख्रिस्ती प्रचारक आजकाल तसा अत्याचार करीत नाहीत म्हणून त्यांच्याबद्दलचा तीव्र तिटकारा सावरकरांच्या ठिकाणी दिसत नव्हता.[१२] बुद्धिवादाने धर्मप्रसार करण्याचा प्रत्येकाचा अधिकार

---

१. लं. बा. पृ. १३६. २. अंद. अं. पृ. ८९. ३. मा. आ. पृ. ५३. ४. मा. जन्म. पृ. २८७. ५. मा. जन्म. पृ. ३६३. ६. मा. आ. पृ. २२०. ७. मा. जन्म. पृ. ३०२. ८. मा. आ. पृ. २२०. ९. मा. जन्म. पृ. ३६०. १०. मा. जन्म. पृ. ३०२. ११. मा. जन्म. पृ. ३००-३०१. १२. मा. जन्म. पृ. २५२ व ३००.

सावरकरांना मान्य असल्याने[१] मुसलमानांबद्दलचा त्यांचा द्वेष हा केवळ जातीय नाही हे स्पष्ट होते. अंदमानातील समंजस व धर्मवेडापासून अलिप्त असलेल्या मुसलमानांस त्यांनी पाठिंवा दिला होता, त्यांना शिकविले होते आणि प्रत्येक कामात त्यांना साहाय्य दिले होते.[२]

अिंग्रजांबद्दलचा सावरकरांचा द्वेषही जातिविषयक नव्हता. 'अिंग्लिशांचा अिंग्लिश म्हणून आम्ही केव्हाही द्वेष केला नाही' असे स्वतः सावरकर सांगतात. 'अुलट अिंग्लंडच्या न्याय्य स्वातंत्र्यास जर कोणी दुसरे आततायी राष्ट्र अन्यायी दंगलीने तुडवू पाहील तर आम्ही अिंग्लंडच्या मुक्ततेस्तवही असेच झुंजू' अशी आपली वंधुत्वाधिष्ठित भूमिका ते स्पष्ट करतात.[३] 'अिंग्लिशांच्या अनेक सद्गुणांचा मी चाहता आहे' असे त्यांनी वारीस सांगितले होते.[४] 'साहेवांचा शूर स्वभाव त्यांना गौरवास्पद वाटत होता.[५] पण त्यांचा क्रूर स्वभाव मात्र तिरस्काराहं वाटत होता.[६] केवळ अँग्लो-अिंडियन वर्गच नव्हे तर ब्रिटिश जनताही साम्राज्यलोभाने आततायी झाल्याचे सावरकरांना वाटत होते.[७] सावरकरांना चीड होती ती या आततायीपणाची, अत्याचाराची, अिंग्रजाच्या मानव्यविरोधी कृत्यांची. अिंग्रजांची प्रीती दास्यलोलुपतेवर आहे याचा त्यांना राग होता.[८]

ना. गोखले यांच्याबद्दल सावरकरांच्या ठायी जो राग होता तो मुख्यत: गोखल्यांच्या नेमस्त, मवाळ धोरणामुळेच होता. या रागाचे रूपांतर व्यक्तिद्वेषात झाल्याचे दिसत नाही. गोखले वारल्याची बातमी अंदमानामध्ये सावरकरांना कळली, तेव्हा 'निस्सीम देशभक्त आणि देशसेवक' या शब्दांत त्यांनी गोखल्यांचा गौरव केला.[९] पण अिंग्लंडमध्ये असताना मात्र गोखल्यांशी त्यांचे तीव्र मतभेद होते. गोखल्यांचे हिंदुस्थानच्या चळवळीचे निदान चुकीचे होते ही गोष्ट सावरकरांनी पुन्हा पुन्हा सांगितली होती.[१०] लो. टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली तेव्हा गोखल्यांनी भारताच्या अेकवृत्तीला लावलेले गालबोट व टिळकांच्या शिक्षेच्या निषेध-सभेस अुपस्थितही ,न राहण्याची त्यांची कर्तव्यपराङमुखता यांचा राग सावरकरांना आला होता.[११] सावरकरांच्या टीकेचा रोख जहालांच्या रडव्या प्रतिकाराच्या (Passive Resistance) मार्गाविरुद्ध होता.[१२] मवाळांनी हिंदुस्थानच्या राजकारणाला निर्बीज, रुक्ष व नाशकारक मार्गाने नेल्याबद्दल त्यांना अतोनात चीड होती.[१३] सावरकरांचा राग व्यक्तीवर नसून त्या व्यक्तींनी पुरस्कारिलेल्या मार्गाबद्दल

---

१. मा. जन्म. पृ. ३००. २. मा. जन्म. पृ. ४२८. ३. मा. आ. पृ. २२१. ४. मा. जन्भ. पृ. ७२. ५. मा. जन्म. पृ. २२५. ६. केसरी दि. अं. १९६१, पृ. ११०. ७. केसरी दि. अं. १९६१, पृ. ११०. ८. लं. बा. पृ. ४७. ९. लं. बा. पृ. ४७, अंद. अं. पृ. ३३. १०. लं. बा. पृ. १०. ११. लं. बा.पृ. ८४–८५. १२. ल. बा. पृ. २. १३. लं. बा पृ. ६२-६३.

होता हे स्वत: सावरकरांनीच पुढील शब्दांत स्पष्ट केले आहे "त्याच्या (जहाल पक्षाच्या) पुढाऱ्यांशी आमचे गुरुनिष्ठेचे नि वैयक्तिक ममत्वाचे संबंध असत. तथापि ह्या त्यांच्या (Passive Resistance) च्या, नि:शस्त्र प्रतिकाराच्या, कार्यक्रमावर मात्र राष्ट्राची दिशाभूल टाळण्यासाठी आम्हांला सडेतोड टीका करावी लागे."[१]

सावरकरांचा महात्मा गांधींसंबंधीचा राग कधी स्पष्टपणे तर कधी अस्पष्टपणे अनेक ठिकाणी प्रकट झाला आहे. म. गांधींची देशभक्ती व कळकळ सावरकरांनी ओळखली होती. म. गांधींबद्दलचा आदर 'देशभक्त' व 'महात्मा' या विशेषणांनी त्यांनी प्रकट केला आहे.[२] पण गांधींचा मार्ग त्यांना अत्यंत टीकार्ह वाटला. ज्या वेळी संपूर्ण स्वातंत्र्याचा घोष सावरकर करीत होते तेव्हा म. गांधी 'God Save the King' ही प्रार्थना निरुपायाने नव्हे, तर धन्यतेने गात होते.[३] ब्रिटिशांना गांधीजी भक्तिपूर्वक 'राजे' म्हणत होते.[४] ब्रिटिशांना राजनिष्ठ राहून सर्वतोपरी मदत करीत होते. म. गांधींचा अनत्याचारी असहयोगाचा मार्ग सावरकरांना प्रभावी तर वाटत नव्हताच, पण अभिजातही वाटत नव्हता.[५] म्हणून त्यांच्या 'खादाळ', 'सुताळ', 'मिठाळ' मार्गांची सावरकरांनी टवाळी केली.[६] गांधींच्या अहिंसावादावरही सावरकरांनी प्रसंगपरत्वे प्रखर हल्ले चढविले.[७] स्वातंत्र्याचा खरा अर्थ व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी सांगितलेली शिक्षण–गीता[८] म. गांधींना कळली नाही असेही स्पष्टोद्गार सावरकरांनी काढले.[९]

स्वार्थमूलक प्रेरणेचा अभाव

सावरकरांच्या व्यक्तित्वात अभावाने आढळणारी अेक प्रेरणा म्हणजे स्वार्थप्रेरणा होय. त्यांच्या देशभक्तीचा जन्म कोणत्याही स्वार्थप्रेरणेतून झालेला नसून आत्मसमर्पणाच्या त्यागपूर्ण भावनेतूनच झालेला आहे. उच्च शिक्षणासाठी त्यांनी महाविद्यालयात जो प्रवेश केला तो 'क्रांतिकारक तत्त्वाचा प्रसार महाराष्ट्रभर करण्यासाठी केला. कोणत्याही सरकारी नोकरीच्या लाभासाठी किंवा संपत्ती संपादण्यासाठी 'नव्हे. अिंग्लंडला जाण्यातील सावरकरांचा हेतू 'बॅरिस्टरीच्या डौलदार झग्यात वावरण्याचा आणि आशेच्या व संपत्तीच्या झळकणाऱ्या प्रभावळीत' मिरविण्याचा नव्हता; तर 'अिंग्लंडमध्ये क्रांतीचा अुघड प्रचार व भर लंडनमध्ये शत्रूच्या

---

१. केसरी दि. अं. १९६१, पृ. १०८. २. लं. बा. पृ. १४३. ३. मा. आ. पृ. २१७. ४. ते. ता. पृ. ६ ५. ते. ता. पृ. ७. ६. ते. ता. पृ. ५६–५७. ७. ते. ता. पृ. ५५–५६. ८. ते. ता. पृ. ५२. ९. ते. ता. पृ. ७१. १०. मा. आ. पृ. २११.

राजधानीतच क्रांतिकारक कृत्ये' करण्याचा होता.[1] कोणत्याही स्वार्थी हेतूने सावरकरांनी शिक्षण घेतले असते व सरकारी नोकरीत प्रवेश केला असता तर त्यांना कोणीही नावे ठेवली नसती. कारण 'देशभक्तीच्या पायऱ्यांनी हायकोर्ट जज्जशिपची व लोकधुरीणत्वाची अुच्चासने अुपभोगणे' त्या काळात सर्वसामान्य होते.[2] गृहमंत्री सर रेजिनॉल्ड क्रॅडॉक यांनी सावरकरांशी अंदमानात झालेल्या भेटीत सांगितले होते की, 'तुमचे ज्ञान आणि शक्ती जर योग्य मार्गाने व्यय केली जाती तर तुम्हास सरकारी हातात असलेली कोणतीही श्रेष्ठ प्रकारची नोकरी मिळू शकती. पण या दुर्दशेत पडणे तुम्हांस पसंत पडले.'[3] वैयक्तिक सुखाच्या विचाराला दुय्यम मानण्याची सवय सावरकरांना लहानपणापासूनच लागलेली होती.[4] क्रांतिकारकाला कोणकोणते त्याग करावे लागतील याची स्पष्ट जाणीव त्यांना होती.[5] प्रथम वैयक्तिक स्वार्थास समूळ खणून काढूनच अितरांना त्यांनी कर्तव्यक्षेत्रात अुतरण्यास अुद्युक्त केले होते.[6] म्हणून अंदमानात थोरल्या बंधूंची गाठ पडून त्यांचे सांत्वन करण्याचा प्रसंग येताच सावरकरांनी सांगितले, " लौकिक व भाग्योदयाच्या आशांची राख अंगास फासून झुंजत राहणे हेच अलौकिक भाग्य नाही का ?"[7] भाग्यासंबंधीच्या या कल्पनेमुळेच कारागृहात असताना सावरकरांचे मन कधी पश्चात्तापदग्ध झाले नाही. 'कारापीडनेचे मूल्य देणे म्हणजे जीवन व्यर्थ जाणे नव्हे' अशी त्यांची धारणा होती. 'कीर्तीचे, लौकिकाचे, मधाचे बोट न लागल्यामुळे त्या जीवनाला अधिकच श्रेष्ठत्व, अुपयुक्तता प्राप्त झाली असल्याचे समाधान त्यांना वाटत होते.[8] सर्वस्वदक्षिणा यज्ञ संपादन केल्यावद्दल त्यांना आनंद वाटत होता.[9] आणि विवेकाने स्वत:च्या मनालाच ते समजावीत होते : " .... स्वत:ला कोणतेही पारितोषिक मिळावे हा लोभ तुला शिवला नाही. कीर्ती, नाव, भूमी, द्रव्य, निदान पति सुख, कशाचीही तू अिच्छा केली नाहीस. ह्या दिव्यात सर्वांच्यापेक्षा अधिक कष्ट सोसायचा मान आपला असला पाहिजे अेवढाच तुझा हेतू.....दुसऱ्यासाठी, मनुष्यजातीसाठी अधिकात अधिक आत्मयज्ञ करायचा."[10] अंदमानच्या कारागारीय जीवनातही स्वार्थाचे अनेक प्रसंग आले. पण तेथेही बंदीवानांच्या न्याय्य मागण्यासाठी त्यांनी बंदीपालाला विरोध केला व अधिक कष्टात स्वत:ला ओढवून घेतले. डॉ. दामोदर यांच्याकडे पाठविलेल्या पत्रात अंदमानातील सर्व बंदीवानांच्या यातनांचे वर्णन लिहिले. पण स्वत:च्या यातनांचा अुल्लेख मात्र त्यांनी सहेतुक गाळला.[11] अंदमानची वसाहत बंद करण्याचा सरकारी निर्णय हिंदुसंस्कृतीच्या व संरक्षणाच्या दृष्टीने चूक आहे असे त्यांनी निर्भयतेने सांगितले व आपल्याच अितर सहकाऱ्यांचा

---

१. केसरी दि. अं. १९६१, पृ. १०२. २. मा. आ. पृ. २२८. ३. मा. जन्म. पृ. २२५. ४. मा. आ. पृ. १९२. ५. केसरी दि. अं. १९६१. ६. मा. जन्म. पृ. १४४. ७. मा. जन्म. पृ. १२४. ८. मा. जन्म. पृ. १३१. ९. अंद. अं. पृ. २४. १०. अंद. अं. पृ. २५–२६. ११. मा. जन्म. पृ. ३८९.

रोष ओढवून घेतला. पण 'लोकहितार्थ स्वार्थाच्या अितर मोहाप्रमाणेच लोकप्रियतेचा वळी' देण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.[१] देशासाठी दारिद्र्य स्वीकारणे त्यांना महद्भाग्याचे वाटले.[२] अतिशयोक्त प्रसिद्धीच्या स्वार्थाचा मोह होअू नये म्हणून आपल्या त्रिखंडात गाजलेल्या समुद्रातील अुडीची सत्य माहिती त्यांनी सांगितली.[३] 'जगताच्या ह्या प्रचंड राहाटीत अंदमानचे वृत्त अश्रूंतच राहिले तर काही मोठा खंड पडणार नाही', अशा शब्दांत प्रसिद्धीच्या लालसेकडे पाठ फिरविण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखविला.[४] त्यांच्या ठिकाणी स्वार्थ होता तो फक्त कर्तव्यपूर्तीच्या साधनाचा. म्हणून ते म्हणतात, "मनुष्याच्या आयुष्यातील सामान्य अुद्देश आणि विलोभने दूर दडून बसल्यामुळे सदसद्विवेकबुद्धी श्रीरामचंद्राच्या ध्वजाखाली आपण पाअिकी केली आणि काहीतरी काम करून केली, ह्या जाणिवेने आपल्याशी पूर्ण संतुष्ट असते."[५]

धर्मभावना

अीश्वराच्या अस्तित्वापुरताच धर्मभावनेचा विचार केला तर सावरकर हे वयाच्या तेरा-चौदा वर्षांपर्यंत आस्तिक होते असे आढळते. या वयापर्यंत त्यांच्या कुलस्वामिनी देवीवरील त्यांची भक्ती पराकाष्ठेची वाढली होती.[६] पूजा, ध्यान-धारणा, देवीचा साक्षात्कार अित्यादी आचार आणि अनुभव यांतील भक्तिसुख ते चाखीत होते. 'देवी विजय' या पोथीची पारायणे आणि स्वत:च्या 'दुर्गादास विजय' या ओवीबद्ध ग्रंथाची रचना देवीच्या साक्षीने ते करीत होते.[७] पण व्यवहारातील अेका कठोर अनुभवाने त्यांच्या अल्लड भक्तिभावनेचा आधार तुटला आणि मग भक्तिभावनेपेक्षा बुद्धीनेच ते या विषयाकडे पाहू लागले. त्यामुळे भक्तीची अुत्कटता ओसरली व हळूहळू तिला तत्त्वाच्या पोलादी अधिष्ठानाचा आधार मिळाला.[८] त्यांच्या बुद्धीला धार्मिक आणि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथातील विसंगती आणि काल्पनिक भाग दिसू लागला. अीश्वरी अधिष्ठानावरील श्रद्धा नाहीशी झाली. आणि ज्या देवीवर त्यांची निस्सीम भक्ती होती त्या देवीला पाण्यात आकंठ बुडवून प्रसन्न करून घेण्याकरिता बाबाराव सावरकरांनी चालविलेला प्रयत्न त्यांना हास्यास्पद वाटू लागला. नास्तिक वृत्तीने ते बाबांना म्हणालेही, "या दगडीच्या पाण्यात तर काय, पण त्या खोल विहिरीत जरी देवी बुडवून ठेवलीत तरी झालेली (पैशाची) फसगत भरून येणार नाही.[९] अीश्वरावरील श्रद्धा अुडाली तसा धर्माकडे पाहण्याचा

---

१. मा. जन्म. पृ. ४८९. २. लं. बा. पृ. १३०. ३. मा. जन्म. पृ. ५०९. ४. मा. जन्म. पृ. ५. ५. अंद. अं. पृ. १७. ६. मा. आ. पृ. ५७. ७. मा. आ. पृ. ५८. ८. मा. आ. पृ. ६२. ९. मा. आ. पृ. १५२.

दृष्टिकोन बदलला. स्वदेशस्वातंत्र्य हाच धर्म असा नवा विचार स्थिर झाला.[१] सावरकरांच्या सर्व धार्मिक कल्पना या राष्ट्रधर्मावर आधारलेल्या दिसतात. ते देव किंवा देवता मानतात. पण स्वातंत्र्याच्या स्वरूपात ती देवता त्यांना दिसते.[२] कुलस्वामिनी देवीची अल्लड आराधना संपल्यावर 'स्वातंत्र्यलक्ष्मीचा' जयघोष करताना ते दिसतात.[३] अीश्वरी कृपेचे या युगीचे साधन म्हणजे राजकीय स्वतंत्रता अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे.[४] धर्मकार्यातील उपयुक्ततावाद व सामाजिक आशय त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो.[५] राजकीय स्वातंत्र्य हे पारलौकिक व आत्मिक मुक्ती मिळवून देणाऱ्या धर्मापेक्षा त्यांना श्रेष्ठ वाटते. 'स्वराज्यावाचून स्वधर्म पंगू आहे' असा त्यांचा ठाम सिद्धान्त आहे.[६] म्हणून पारतंत्र्याचा नाश हे अेक धार्मिक कर्तव्यच ते मानतात.[७] त्यांची मोक्षाची कल्पना ही स्वदेश-स्वातंत्र्याधिष्ठित होती. व्यक्तीची आणि राष्ट्राची स्वतंत्रता ही पारमार्थिक ध्येयाला, मुक्तीला विसंगत तर नाहीच अुलट राष्ट्रीय स्वतंत्रतेचा परिपूर्ण विकास म्हणजेच मुक्ती अशी त्यांची धारणा आहे.[८]

अीश्वर, धर्म अित्यादी कल्पनांकडे पाहण्याचा असा स्वातंत्र्याधिष्ठित दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे धर्मभावनेशी निगडित अशा अनेक कल्पनांचा वेगळा अर्थ सावरकरांना जाणवतो. धर्म म्हणजे आचार नव्हे हे त्यांच्या बुद्धिवादी मनाला चटकन कळते. आणि दुष्ट आचारांविरुद्ध, रूढीविरुद्ध बुद्धिवादाने ते प्रखर हल्ले चढवितात.[९] नीति-अनीती, सत्य-असत्य, सद्गुण-दुर्गुण, पाप-पुण्य, अैहिक-पारलौकिक अित्यादी धर्मकल्पनांचा अत्यंत क्रांतिकारी अर्थ ते लावतात. 'ज्या सत्याने मनुष्याचे अेकंदरीत कल्याण साधते ते सत्य',[१०] 'मनुष्य जातीचे हित हेच सर्व सद्गुणांचे समर्थन,[११] 'हितवाद, अुपयुक्ततावाद हेच सर्व नीतीचे सूत्र',[१२] 'अैहिकावाचून पारलौकिक पंगू आहे', अशा अनेक सूत्रांतून सावरकरांच्या धर्मकल्पना व्यक्त झालेल्या दिसतात. दैववादही सावरकरांना मान्य नाही. 'प्रयत्नावांचून दैव अपूर्ण, पंगू आहे' असा प्रयत्नवादी विचार ते सांगतात.[१३] पुनर्जन्मावर त्यांची निःशंक निष्ठा नाही.[१४] भविष्यवाद– मग तो ग्रहाधिष्ठित असो वा अेखाद्या पुण्य पुरुषाच्या, साधूच्या वाणीतून प्रकट झालेला असो– त्याच्यावर त्यांचा विश्वास नाही. ग्रहावग्रहांची त्यांना फारशी भीडभाड वाटत नसल्यानेच जन्मकुंडलीची वास्तपुस्त ते करीत

---

१. मा. आ. पृ. १३८. २. मा. आ. पृ. १३८. ३. मा. आ. पृ. २२३.
४. मा. आ. पृ. २२२. ५. मा. आ. पृ. १७०. ६. मा. आ. पृ. २२२.
७. मा. आ. पृ. २२१, २२३. ८. मा. आ. पृ. २२१. ९. मा. आ. पृ. २६३.
१०. मा. आ. पृ. २२०. ११. मा. आ. पृ. २१९. १२. मा. आ. पृ. १७०.
१३. मा. आ. पृ. २२१. १४. मा. आ. पृ. ४१२.

नाहीत.[१] कृष्णदर्शन झालेल्या अरविंदबाबूंच्या भविष्यवाणीवर ते विश्वसत नाहीत.[२] या सर्व विवेचनांवरून सावरकरांची धर्मभावना ही प्रामुख्याने राष्ट्र-बलाधिष्ठित व बुद्धिबलाधिष्ठित असल्याचे दिसून येते.

जीवनातील भूमिका

अग्रेसरत्व आणि कर्तव्यभावना या दोन गुणविशेषांमुळे सावरकरांचे व्यक्तित्व जीवनाच्या सर्व अवस्थांत अचंचल, कार्योन्मुख व आत्मप्रेरक ठरले आणि त्याला प्रचारक वृत्तीची जोड मिळाल्याने ते व्यक्तित्व अधिक गतिमान झाले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अग्रेसरत्वाची भूमिका त्यांनी स्वीकारलेली दिसते. देशसेवेचे व्रत स्वीकारताना त्यांचे आद्यसूत्र हेच होते की चाफेकरांचे कार्य कुणी तरी चालविले पाहिजे ना? तर मग ते मीच का चालवू नये? तो होम मीही का करू नये?[३] पारतंत्र्याच्या विषवृक्षावर आज ना अुद्या–शंभर वर्षांनी का होअीना–घाव घालावाच लागणार आहे. मग तो आरंभ आपणच करून ते प्राणदानाचे मूल्य का देअू नये.[४] अितर पुढाऱ्यांना जे देशकार्य करवत नाही त्या कार्यासाठी आपण थांबणे सावरकरांना मान्य नाही. म्हणून त्यांनी स्पष्ट सांगितले की,.... त्या पुढाऱ्यांना जे करवत नाही ते आपण केले पाहिजे, निर्घोषिले पाहिजे.[५] देशात प्रेरणा अुत्पन्न करण्यासाठी केवळ त्यागाचीच, आत्मबलिदानाचीच आवश्यकता असेल तर त्यासाठीही आपणच अग्रेसर असले पाहिजे अशी सावरकरांची सारखी धडपड होती. म्हणून ते म्हणतात, "बाष्पयंत्रात प्रेरणा अुत्पन्न होण्यासाठी आपल्या देहास अिंधन करून जर कोणी जळत राहिलेच तर ते आपणच का राहू नये?"[६] देशस्वातंत्र्यासाठी गुप्त संस्थांची आवश्यकता आहे हे मित्रांना पटताच सावरकरांनी त्यांना लगेच विचारले, "....तशी अेकही संस्था अस्तित्वात नाही, हे गृहीत धरले तरीही जर आपल्याला तेच आपले प्रथम कर्तव्य वाटले तर आपण आपल्यापुरते तरी ते पार पाडावयास नको काय? कोणी करीत नाही म्हणून तर आपण ते प्रथम केले पाहिजे."[७] पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर भायखळ्याच्या तुरुंगात विचारमग्न स्थितीत असताना आपल्या मित्रांनी सोसलेल्या यातनांची आठवण सावरकरांना झाली आणि त्यांनी स्वत:लाच प्रश्न केला, "निदान मी काही मागे रेंगाळलो नाही ना? आघाडीसच आघाडीच्याच कठोरातील कठोर आघातास आपली छाती पुढे केली नाही का?"[८] आणि मग "अितरांसह लढाअीचे अग्रभागी

---

१. मा. आ. पृ. १२. २. मा. जन्म. पृ. १६८. ३. मा. आ. पृ. ८१.
४. मा. आ. पृ. १३७. ५. मा. आ. पृ. १३८. ६. मा. जन्म. पृ. २४.
७. केसरी दि. अं. १९६१, पृ. १. ८. मा. जन्म. पृ. १९.

अचलपणे झुंजण्यावर खरे कर्तृत्व आणि योग्यता अवलंबून असते; त्या कसोटीस आपण अुतरलो आहोत" या विचाराने त्यांना समाधान वाटले. अंदमानात राजबंदीवान वर्गाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा 'त्या झुंजीस आपणच आरंभ करून पुढे येणाऱ्या राजबंदीवानांचा मार्ग शक्य तो कमी कंटकमय का करून ठेवू नये ? या विचारानेच त्या चळवळीत ते पडले.[१] राजबंद्यांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या कार्यातही त्यांनी अग्रेसरत्व पत्करले.[२] राष्ट्रहिताचे कोणतेही कार्य असो वा चळवळ असो 'सर्वांच्यापेक्षा अधिक कष्ट सोसण्याचा मान आपला असला पाहिजे' हीच सावरकरांची भूमिका असल्याचे दिसून येते. सावरकरांच्या या अग्रेसरत्वाबद्दल सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांना अतीव आदर होता. सावरकरांच्या अग्रेसरत्वाची काही अुदाहरणे देण्याच्या दृष्टीने सर सी. पी. रामस्वामी लिहितात, "भारतातील परदेशी कापडाची होळी पेटविणारा पहिला देशभक्त, भारतातील विद्यालयाने राजकीय चळवळीसाठी शासन केलेला पहिला विद्यार्थी, अिंग्लिश शिक्षणसंस्थांनी बॅरिस्टरीची पदवी देण्यास नकार दिलेला पहिला भारतीय, हिंदी विद्यापीठाने दिलेली पदवी काढून घेतलेला पहिला पदवीधर व अेकाच वेळी दोन जन्मठेपींची शिक्षा झालेला जगातील पहिला क्रांतिकारक म्हणजे सावरकर होत."[३]

कर्तव्यभावनेने सावरकरांच्या भूमिकेला अेक विलक्षण बळ व चैतन्य प्राप्त झाले आहे. सर्व कृतींना सावरकर कर्तव्याचे स्वरूप देतात आणि त्यामुळे त्या कृतींना अुदात्तता प्राप्त होते आणि सावरकरांची भूमिकाही अुंचावते. स्वातंत्र्य प्राप्तीचे ध्येय असो,[४] सशस्त्रयुद्धाचे साधन असो,[५] गुप्त संस्थेची स्थापना असो,[६] व्यायाम असो[७] किंवा विवाह असो[८]–सर्वच विषयांना सावरकर अपरिहार्य कर्तव्यभावनेचे अधिष्ठान देतात आणि मग तो प्रश्न सोडविण्यासाठी स्वतः बद्धपरिकर होतात.

ही कर्तव्यभावनाच सावरकरांच्या जीवनात सामर्थ्यदायी, अुत्तेजक व प्रेरक ठरलेली आहे. आपली मायेची सारी माणसे सोडून अिंग्लंडला जाताना आपल्या अंतःकरणातले अश्रू अंतःकरणातच त्यांनी गोठवून टाकले, ते कर्तव्यकठोर भावनेमुळेच.[९] 'सशस्त्र क्रांती शक्य नाही' असे सांगून निराशावाद फैलावणाऱ्यांना देण्यासारखे अेकच आशादायी अुत्तर त्यांच्याजवळ होते आणि ते म्हणजे "आम्ही आमचे कर्तव्य करणार."[१०] कारागृहाच्या खडतर त्रासात ते पडले तेही 'त्रासात पडणे कर्तव्य वाटले म्हणूनच.'[११] कारागृहातील कठीण कामाकडे ते कर्तव्यदृष्टीनेच पाहात आणि

---

१. मा. जन्म. पृ. १५४. २. मा. जन्म. पृ. २४०. ३. केसरी अ. वि.
४. मा. आ पृ. २२३. ५. मा. आ. पृ. १३४. ६. मा. आ. पृ. २२७–२२८.
७. मा. आ. पृ. १८४. ८. मा. आ. पृ. १८७, १८८. ९. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९९. १०. आत्म.–पूर्वपीठिका पृ. १५६. ११. मा. जन्म. पृ. ७२.

काम करता करता 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' अित्यादी गीतेतील कर्मवादी श्लोक स्वतःशीच गुणगुणत.[१] कारागारातील यातनांनी जीवन दुःसह झाले तरी 'कर्तव्य केले पाहिजे' या जाणिवेने त्यांच्या देहाने तग धरला.[२] जीवन-मरणाचा सर्व विचार त्या त्या प्रसंगी कर्तव्यभावनेनेच त्यांनी केला.[३] 'केवळ कर्तव्यासाठीच हे क्लेश आपण सहन करीत आहोत असे आपल्या वहिणीला सांगून तिला त्यांनी धीर दिला.[४] कारागृहातील कंटाळ्यालाही त्यांनी कर्तव्य म्हणूनच कवटाळले.[५] लोक-प्रियतेचा त्यागही अगदी कष्टाने– केवळ कर्तव्य म्हणून केला.[६] आपल्या पिढीचा मार्ग कर्तव्याचा मार्ग आहे असे त्यांना वाटत होते.[७] हे सर्व करीत असताना 'कर्तव्य हे स्वतःच सुखदायी आहे' अशी निरपेक्ष भूमिका त्यांनी स्वीकारली होती.[८] आणि हीच कर्तव्याची भूमिका त्यांनी जीवनान्तापर्यंत स्थिर ठेविली होती. १९६१ मध्ये झालेल्या मृत्युंजयदिनानिमित्त भाषण करताना स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी 'मी माझे कर्तव्य करून जाणार होतो' असे अुद्गार सावरकरांनी काढले होते.[९] 'जे जीवनात संपादलेले संपादावयाचे होते, ते सर्व संपादलेले आहे. म्हणून आता कर्तव्य असे काही अुरलेले नाही' अशी कृतकृत्यतेची भावनाही त्यांनी आपल्या अखेरच्या लेखात व्यक्त केली होती.[१०] कृतार्थता व कृतज्ञता यांचा सुंदर संयोग सावरकरांच्या व्यक्तित्वात जुळून आल्याचे प्रा. अ. ना. देशपांडे यांना वाटते ते यामुळेच.[११]

केवळ तत्त्वप्रवर्तक न राहता प्रचारकाची भूमिका सावरकरांनी स्वीकारल्या-मुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक गतिमान व प्रभावशाली बनले. 'अभिनव भारता'च्या मित्रमंडळीत 'अेक प्रमुख व्याख्याता नि प्रचारक' म्हणून सावरकरांचे स्थान होते.[१२] आणि भगूर व नाशिक येथे निर्माण झालेले त्यांचे हे स्थान पुढे पुणे, मुंबअी, अिंग्लंड, अंदमान येथेही कायम राहिले. भोवतालची परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल असो सावरकरांच्या प्रचाराला कधी खंड पडला नाही. प्लेगच्या संकटात कुटुंबाची वाताहत होत असताही त्यांनी आपल्या राज्यक्रांतिकारक विचारांचा प्रचार केला.[१३] नाशिकला अुनाडक्या व चैनबाजी करीत असलेल्या मित्रांत आपल्या राजकीय मतांचा प्रचार करून सावरकरांनी त्या मित्रांच्या जीवनाला अेक नवे, दिव्य, भव्य नि गंभीर वळण लावले.[१४] अिंग्लंडला शत्रूच्या शिबिरात घुसून क्रांतीचा अुघड अुघड प्रचार

---

१. अंद. अं. पृ. २४–२५. २. मा. जन्म. पृ. ३१२. ३. मा. जन्म. पृ. १३२, ४००. ४. अंद. अं. पृ. ७६. ५. मा. जन्म. पृ. ५३४. ६. मा. जन्म. पृ. ४८९. ७. अंद. अं. पृ. ५२. ८. लं. बा. पृ. १४४. ९. स. सा. वा. खंड ७८, पृ. ५०४. १०. सह्याद्री – डिसेंबर १९६४. ११. केसरी अ. वि. १२. मा. आ. पृ. १८२. १३. मा. आ. पृ. १२२. १४. मा. आ. पृ. १४७.

करण्याचा त्यांचा हेतू होता;[१] आणि तसा प्रचार त्यांनी केलाही. अंदमानात त्यांचे मुख्य धोरण परिणामकारक प्रचार करणे हेच होते.[२] केवळ अंदमानच्या कारागृहातच नव्हे तर अंदमानच्या वसाहतीत सार्वजनिक प्रचारकार्य त्यांनी हाती घेतले व अनेक अडचणींतूनही चालू ठेवले.[३] अंदमानातील यात्रांचा अुपयोग त्यांनी प्रचारासाठी केला.[४] अंदमानातील आठ-नअू वर्षांच्या प्रचाराने अितकी संघटना अुत्पन्न झाली आणि राजकीय कळकळ अुत्पन्न झाली की ठिकठिकाणच्या पुढारी, देशसेवक बंदीवानांना कारागृहातून दोन तासांत निरोप पोचू शके आणि हजारो बंदीवान अेकमताने राष्ट्रीय दुःख पाळू शकत.[५] पुढे हिंदुस्थानातील रत्नागिरी व येरवडा येथील कारागृहांतही या अखंड प्रचार-यज्ञातील आहुती टळली नाही.

"माझी मैत्री म्हटली की तिचा मुख्य कटाक्ष माझ्या मतांचा प्रचार हाच होता" असे सावरकर सांगतात.[६] ते जेथे जेथे जात तेथे तेथे आपल्या राजकीय मतांचा फैलाव करीत.[७] वादविवादाचा वा चर्चेचा ओघ स्वतःच्या धोरणाच्या राजकारणाकडे वळविण्यातील त्यांचे प्रचारकी कौशल्य सर्वत्र दिसून येते.[८] त्यांच्या प्रचाराचे विषयही त्यांच्या ध्येयधोरणानुसारच असल्याचे आढळते. त्यांचे राज्यक्रांतीचे ध्येय, शस्त्र आणि बल या साधनांवरील श्रद्धा, हिंदुत्व, स्वातंत्र्य आणि लोकसत्ता या तत्त्वांबद्दलचा त्यांचा अभिमान त्यावरील अुत्कट निष्ठा, हिंदी भाषा व नागरी लिपी यांबद्दलचा त्यांचा अभिमान- ह्या सर्व गोष्टी त्यांच्या प्रचाराचे विषय मानले गेले होते. आपल्या सर्व मित्रांना व अंदमानातील कैद्यांना राजकारणाची रुची लावून त्यांनी त्यांच्यात राजकीय जागृती केली. जे शिक्षण दिले ते राजकीय दृष्टिकोनातूनच दिले.[९] त्यांच्यात स्वाभिमानाची ज्योत पेटविली.[१०] हिंदुत्वाचा प्रचार करून शुद्धिकार्य केले. संघटनेचा मंत्र दिला. लोकसत्तेचा ज्या ज्या वेळी विजय झाला त्या त्या वेळी तिचा पुरस्कार केला.[११] १९०६ सालापासून हिंदी भाषेचा पुरस्कार केला आणि अंदमानात तर बंदीवानांकडून हिंदी भाषेत व नागरी लिपीत पत्रे लिहवून घेतली.

प्रत्यक्ष राष्ट्रकार्य किंवा कृतीला अवसर देणारे कार्यक्षेत्र सावरकरांच्या पुढे खुले होताच त्यांच्यातील प्रचारक हाच त्यांच्या अितर भूमिकांवर प्रभाव गाजव

---

१. केसरी दि. अं. पृ. १०२. २. मा. जन्म. पृ. १९०. ३. मा. जन्म. पृ. ३७१. ४. मा. जन्म. पृ. ४७३. ५. मा. जन्म. पृ. ४७४-४७५. ६. मा. आ. पृ. १५४. ७. मा. आ. पृ. १६०. ८. मा. आ. पृ. २००. केसरी दि. अं. १९६१, पृ. ९७. ९. मा. जन्म. पृ. ४८१. १०. केसरी दि. अं. १९६१, पृ. ६७. ११. लं. वा. पृ. ७१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्र.
अनुक्रम ...L3902... दि: ...[illegible]...
क्लास ...[illegible]... दो: दि: [illegible]

लागे, व मग अितर भूमिका दुय्यम होत अथवा प्रचारक सावरकरांना पोषक होत. आत्मचरित्रात त्यांनी अुल्लेखिलेली काव्ये आणि 'हिंदुत्व' व 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हे ग्रंथ यांची रचना मुख्यत: दोन कारणांनी झालेली दिसते. प्रत्यक्ष कार्य करणे त्यांना जेव्हा अशक्य होते तेव्हाच त्यांतील–'सप्तर्षि', 'कमला', 'गोमांतक' अित्यादी प्रमुख काव्यांची रचना झाली आहे किंवा आपल्या कार्याला पोषक होतील असे वाटल्यानेच त्यांनी 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' यासारख्या कविता किंवा 'हिंदुत्व' 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' यांसारखे ग्रंथ लिहिले. प्रत्यक्ष राष्ट्रकार्य किंवा प्रचारकार्य करण्याची संधी मिळाल्यामुळे नवीन तर राहोच पण हाती घेतलेली कविताही लिहिण्याचे कार्य कसे मागे पडत होते, याचे अनेक अुल्लेख स्वत: सावरकरांनी आपल्या आत्मचरित्रात केले आहेत. लहानपणापासून मराठीत अेक महाकाव्य लिहिण्याची त्यांची अिच्छा 'कर्मक्षेत्राच्या रणधुमाळीत जवळ जवळ दिसेनाशी झाली होती.... पण कारागृहाच्या अेकान्त–कोठडीत अंग टाकताच ती पुन्हा दृग्गोचर होअू लागली.'[1] परंतु या अेकलकोंडीत दिवस घालविण्याचे अुत्तम साधन म्हणून करीत असलेल्या कविता मध्यंतरी त्यांनी बंद केल्या. कारण 'समुद्रप्रवासादी गडबडीत बोलायला आणि वाचायला मिळाल्याने विचारांचा लोकांत फैलाव करण्याचे दुसरे काम' त्यांना शक्य झाले.[2] अंदमानात संघटना आणि प्रचार करण्याचे कार्य हाती घेणे शक्य आहे हे पाहताच त्यांनी काव्यरचनेचे कार्य काही दिवसांपुरते स्थगित केले.[3] पुढे (अंदमानातच) अनेक प्रत्यक्ष कार्ये करण्याची संधी मिळत गेली तसे तसे ते मागे पडले.[4] निस्साधन अशा कारागृहातही सावरकरांनी काव्यरचनेचा नुसता निश्चयच केला नाही, तर प्रत्यक्ष काही काव्यरचनाही केली. हे पाहून कवी म्हणून जीवनातील त्यांची भूमिका श्रेष्ठ मानण्याचा मोह होणे साहजिकच आहे. पण वरील विवेचनावरून व अुल्लेखांवरून प्रचारक म्हणूनच सावरकरांची भूमिका कशी श्रेष्ठ आहे याची कल्पना येते.

सावरकरांच्या जीवनातील भूमिकेच्या वैशिष्ट्याचे आणखी अेक विशेष म्हणजे ती भूमिका चंचल नाही, बदलती नाही तर स्थिर आहे. पक्की आहे. ज्या ध्येयधोरणाने त्यांनी आपल्या जाणत्या जीवनाला प्रारंभ केला ते ध्येयधोरण व ती भूमिका तशीच अढळ राहिली याचे त्यांनाही समाधान होते. मनाला वाटणारे हे पवित्र समाधान त्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केले आहे. "दहा वर्षे अंदमानच्या या कारागृहात आशेच्या थडग्यात पुरलेले राहूनही ज्या दिवशी ते कारागृहाचे दार

---

१. मा. जन्म. पृ. ९. २. मा. जन्म. पृ. ८३. ३. मा. जन्म. पृ. ४१६.
४. मा. जन्म. पृ. ५१९.

आता दहाबारा वर्षांनी पुन्हा अुधडणार, तेव्हा त्या शेवटच्या दिवशीचे कृत्यही तेच होते की जे करण्याचे व्रत वयाच्या अकराव्या वर्षी त्यांनी अंगीकारले होते."[1]

अखेरच्या आत्मार्पण समयीही सावरकरांना हेच ध्येयपूर्तीचे समाधान सुखवीत होते. 'आत्महत्या आणि आत्मार्पण' या लेखात त्यांनी लिहिले आहे : "आपले जीवितकार्य, जीवनाचे ध्येय, जीवनाचा हेतू संपूर्णपणे सफल झालेला आहे. अशा सफलतेच्या कृतकृत्यतेच्या भावनेने जे आपल्या अैहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात, त्यांच्या या कृत्यास आत्मार्पण असे म्हणतात. त्या दृष्टीनेच–

धन्योऽहम् । धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।
धन्योऽहम् । धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमिदं संपन्नम् ।[2]

---

१. मा. जन्म. पृ. ५०१. २. सह्याद्री, डिसेंबर १९६४.

चरित्रकार सावरकर

चरित्र – आत्माविष्काराचे साधन

आत्मचरित्र हे लेखकाच्या आत्माविष्काराचे (Expression of Personality) साधन होय हे आपण मागील प्रकरणात पाहिले. आत्मचरित्र लिहिण्यामागील व्यावहारिक हेतू भिन्न भिन्न असले तरी प्रमुख हेतू आत्माविष्काराचाच असतो असा काही टीकाकारांचा दावा आहे. अशा टीकाकारांत आंद्रे मोर्वा हा प्रमुख टीकाकार म्हणून गणला जातो. शेली आणि डिझरेली यांची चरित्रे मोर्वाने लिहीली आहेत. त्या चरित्ररचनेमागील हेतू स्पष्ट करताना मोर्वाने हा आत्माविष्काराचा सिद्धान्त मांडला आहे. चरित्रलेखन ही कला आहे. चरित्रलेखक आत्माविष्काराचे अेक साधन म्हणून या कलेचा अुपयोग करतो. याच दृष्टिकोनातून तो चरित्रविषयाची निवडही करतो अशी मोर्वाच्या सिद्धान्ताची प्रमुख सूत्रे आहेत.

स्वत:च्या या सिद्धान्ताबद्दल अधिक खुलासा करताना मोर्वाने मुख्य भर चरित्रविषयाच्या निवडीवर दिला आहे. चरित्रलेखक व चरित्रविषय झालेली व्यक्ती यांतील समानधर्मत्व पाहून ही निवड केली जाते असे त्याचे मत आहे.[१] स्वत:च्या या मताच्या पुष्टचर्थ त्याने स्वलिखित शेली व डिझरेली यांच्या चरित्रांचा अुल्लेख केला आहे. स्वत:च्या व शेलीच्या जीवनांतील साम्यामुळेच शेलीचे चरित्र लिहिण्यास तो प्रवृत्त झाला; आणि शेलीचे जीवन-चरित्र लिहिले असता आपले अंत:करण मोकळे केल्याचा आनंद मिळेल ' असे त्याला वाटले. डिझरेलीचे चरित्र लिहिताना तर त्याला आपल्या आवडत्या वीराचे व स्वत:ला प्रिय असलेल्या राजकीय तत्त्वप्रणालीचे चित्रण आपण करीत आहोत असे वाटले. म्हणून तो म्हणतो, " The more I read, the more I felt that I could find in Disraeli a hero in whom I should have passionate interest. At the same time I felt that through Disraeli I could express a political doctrine which was exactly what I was seeking. "[२]

---

१. Aspects of Biography – P. 102. २. Aspects of Biography p. 109–110.

चरित्रविषयात असे समानधर्मत्व जेव्हा मोर्वाला वाटू लागले, तेव्हा आत्माविष्काराचे अेक साधन म्हणून तो चरित्रवाङमयाकडे पाहू लागला आणि त्याने पुढील सिद्धान्त मांडला–

" Biography is a means of expression when the author has chosen his subject in order to respond to a secret need in his own nature."[1]

अशा आत्माविष्काराच्या हेतूने लिहिलेले चरित्र हे अधिक स्वाभाविकपणे लिहिले जाते असे स्वानुभवाने त्याला वाटू लागले. अितकेच नव्हे तर काही मर्यादित स्वरूपात आपले आत्मचरित्र त्या चरित्राच्या रूपाने तो लेखक लिहीत असतो असे आपले मतही मोर्वाने नमूद करून ठेवले आहे. (To a certain extent it will be autobiography disguised as biography).[2]

चरित्र हे आत्माविष्काराचे साधन मानण्याच्या सिद्धान्तातून मोर्वाच्या विवेचनात अनेक विसंगती व दोष निर्माण झाले आहेत. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी त्याच्यावर अचूक बोट ठेविले आहे. 'संकराचे अपत्य' या आपल्या लेखात त्यांनी या सिद्धान्तातील विकृती व त्याच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.[3] परंतु त्याबरोबरच त्यांनी "थोर पुरुषांची चरित्रे लिहावयास कोणी समानधर्मे असू शकतील; नाही असे नाही," असा खुलासाही केला आहे. डॉ. सहस्रबुद्धे यांनी पुढे असे म्हटले आहे की, . . . 'त्यांना नुसते समानधर्मत्व असून काय अुपयोग ? त्यांच्या अंगी अभ्यास, विद्वत्ता, लेखनकला, हे सर्व गुण असावयास पाहिजेत.'

वरील विवेचनाचा अित्यर्थ अितकाच की, समानधर्मत्वाचे हे तत्त्व सर्वव्यापक नसले तरी मर्यादित अर्थाने ते विचारार्ह आहे. अशा मर्यादित तत्त्वावर रचलेल्या चरित्रातून चरित्रलेखकाचा आत्माविष्कार होणे अगदीच अशक्य आहे असे नाही आणि म्हणूनच तेवढ्या मर्यादित स्वरूपात का होअीना पण चरित्र हे आत्माविष्काराचे साधन म्हणून मानण्यास हरकत नसावी.

चरित्रवाङमयातील आत्माविष्कार

आत्मचरित्रात्मक वाङमयातून सावरकरांच्या व्यक्तित्वाचे स्वरूप आपण समजावून घेतले. त्या व्यक्तित्वानुरूपच त्यांच्या आत्मचरित्रात्मक वाङमयाची

---

१. Aspects of Biography p. 110. २. Aspects of Biography p. 110.
३. संकराचे अपत्य – 'हंस' दिवाळी अंक.

रचना झाल्याचे दिसून येते. आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचा हेतू मुख्यतः आत्मा-विष्कार हा असतो असे आपण प्रारंभीच पाहिले आहे. आपल्या आत्मचरित्रातून आत्माविष्कार करण्याच्या हेतूने सावरकरांनी ती आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यात त्यांना 'आपल्या आकांक्षा आणि ध्येय, प्रयत्न आणि पराक्रम, न्यूनता आणि सांगता यांची माहिती द्यावयाची आहे.'[१] आपल्या 'विचारांचा, विकारांचा व भावनांचा अितिहास' त्यांना सांगावयाचा आहे.[२] प्रियजनांपाशी आपली सुखदुःखे मन मोकळे करून सांगण्याची स्वाभाविक प्रवृत्तीच या आत्मवृत्तांच्या रचनेमागे आहे.[३] म्हणून आत्माविष्कारासाठीच त्यांनी हे सर्व लेखन केले आहे हे स्पष्ट होते.

परंतु आत्माविष्कार किंवा 'स्वत्वा'चे प्रकटीकरण हा जरी आत्मचरित्रांचा हेतू असला तरी प्रकृतिभिन्नत्वानुसार आत्मचरित्रांचेही घाट बदलतात. हे सर्व कसे व का घडते याची मीमांसा श्री. अेस्. पी. सक्सेना यांनी पुढीलप्रमाणे केली आहे : "While self-consciousness is a common quality of all auto-biographies, great or small, their subject-matter, method of writing and approach is bound to differ according to individual."[४] विशिष्ट व्यक्तिमत्त्वामुळे सावरकरांची आत्मचरित्रेही वैशिष्ट्यपूर्ण झाली आहेत. आणि नुसती आत्मचरित्रेच नव्हेत तर सावरकरांनी लिहिलेली पूर्वोल्लेखित चरित्रेही त्यांच्या व्यक्तित्वाने रंगलेली आहेत.

आत्मचरित्र व चरित्र-लेखनामागील अनेक गौणप्रधान हेतू सावरकरांनी सांगितले आहेत. हे सर्व हेतू त्यांच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वानुसारच ठरले आहेत. सावरकरांचे जीवनचरित्र मूलतःच अशा काही आकस्मिक, काही अद्भुत, काही अुत्क्षोभक विद्युत्तंतूंनी विणलेले आहे आणि प्रकंपक सुखदुःखाच्या रंगबेरंगांनी त्याची सजावट झाली आहे की, त्याच्या नुसत्या अुद्दीपक मनोवेधकपणासाठी देखील साहित्यात त्या चरित्राची भर टाकण्यास त्यांना हरकत वाटत नाही.[५] तसेच 'आक्रोश हा दुःखाचा स्वभावच' असल्याने त्यांचे दुःख प्रसिद्धीचा अुसासा टाकण्यास स्वाभाविकपणेच अुद्युक्त झाले आहे[६] आणि 'स्वजनस्य हि दुःखमग्रतो । विवृतद्वारमिवोपजायते ।' या न्यायानुसार सुहृदांस आपले आत्मवृत्त सांगण्यासाठी त्यांनी हातात लेखणी घेतली आहे.[७] त्यांच्या आठवणी 'मनोवेधक' आहेत.[८] आणि ती भोगलेली अुत्कट सुखदुःखे सांगताना समवेदनांच्या अश्रूंनी स्निग्ध होणारा तो मधुर आनंद

---

१. माझ्या आठवणी – प्रस्तावना पृ. ५. २. मा. जन्म. प्रस्तावना पृ. ६. ३. मा. जन्म. प्रस्तावना पृ. ६. ४. Indian Autobiographies. p. 17. ५. मा. आ. प्रस्तावना पृ. ६. ६. मा. जन्म. प्रस्तावना पृ. ५. ७. मा. जन्म. प्रस्तावना पृ. १. ८. मा. आ. प्रस्तावना पृ. ६.

अुपभोगण्यास ते आतुरही आहेत. पण त्यांच्या आठवणी केवळ मनोवेधक नाहीत, तर त्या 'अुद्‌बोधक' आहेत.[१] त्यांना गतस्मृतींना अुजळा द्यावयाचा आहे पण तो केवळ आत्मानंदासाठी नाही, तर त्या 'राष्ट्रीय अुत्थानाच्या अज्ञात अितिहासावर आपल्या आठवणींनी पाडवेल तितका प्रकाश पाडण्याच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या समाधानासाठी.[२] 'ज्यांच्या गुप्त पण अुत्कट राष्ट्रवेसेची आणि महनीय त्यागाची माहिती लोकांस कळणारी नाही, त्यांची साभार स्मृती' सावरकरांना प्रगटपणे सन्मानावयाची आहे; आणि अशा रीतीने 'त्यांच्या विषयीच्या कृतज्ञतेचे ऋण अंशत: तरी' त्यांना फेडावयाचे आहे.[३] सर्वांत महत्त्वाचा हेतू म्हणजे त्यांना आपल्या आठवणी वैयक्तिक किंवा कौटुंबिक हितासाठी लिहावयाच्या नसून 'जनिक हितार्थच' लिहावयाच्या आहेत आणि त्याही आपल्या सार्वजनिक आयुष्याचे शेवटचे श्रेयस्कर कर्तव्य करण्यासाठी लिहावयाच्या आहेत.[४] आपल्या जीवनवृत्तान्तांचा 'सार्वजनिक अुपयोग फार मोठा आहे' ही जाणीवच या सर्व लेखनामागची प्रेरणा आहे.[५] तेव्हा व्यक्तिगत आत्मसमाधानापासून तो अज्ञात अितिहासावर प्रकाश टाकणे, 'कृतज्ञता व्यक्त करणे,' 'पुढील पिढ्यांचे अुद्‌बोधन करणे,' 'जनिक हितार्थ श्रेयस्कर, राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणे' अित्यादी अनेक कारणांनी सावरकरांनी आत्मचरित्र लिहिले आहे.

सावरकरांच्या हिंदुस्थानातील, अिंग्लंडमधील आणि अंदमानमधील सहकाऱ्यांच्या अनेक अज्ञात कृत्यांची व त्यागाची माहिती त्यांच्या आत्मचरित्रात्मक वाङ्मयातून आढळते. त्यांचा सर्व तपशील सावरकरांच्या मित्रमंडळीच्या वर्णनात पूर्वी आलाच आहे. चरित्रलेखनातही सावरकरांची ही भूमिका आहे. 'तेजस्वी तारे' या चरित्रात्मक ग्रंथात त्यांना अशाच काही चरित्रनायकांच्या अज्ञात कृत्यांची व त्यागाची वर्णने करून राष्ट्रीय अितिहासावर प्रकाश टाकावयाचा आहे. श्यामजी कृष्ण वर्मा यासारख्या अज्ञात वीराचा 'Unknown dead' अशा व्यक्तीचा त्यांनी याच हेतूने परिचय करून दिला आहे.[६] श्रीराम राजूसारख्या शूर, धाडसी सैन्यचालनकुशल, राष्ट्रप्रेमी तरुणास स्वतंत्र हिंदुस्थानातील भावी अितिहासकारांनी विसरून जाअू नये म्हणून त्याच्या पवित्र व स्फूर्तिदायक स्मृतीचा धागा त्यांनी चरित्ररूपाने घट्ट वळून ठेविला आहे.[७] देशवीर पिंगळे यांच्या स्मृतीलाही विसंगतपणाचा दंड भोगावा लागल्याने त्याच्या हेतूची, त्यागाची व अुत्कटतेची ओळख करून देण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला;[८] आणि अितरही सर्व देशवीरांची

---

१. मा. आ. प्रस्तावना पृ. ६. २. मा. जन्म. प्रस्तावना पृ. ५. ३. मा. आ. प्रस्तावना पृ. ७. ४. मा. आ. पृ. ५. ५. मा. जन्म. पृ. ६. ६. ते. ता. पृ. २. ७. ते. ता. पृ. २. ८. ते. ता. पृ. ८२–८४.

चरित्रे ऐतिहासिक कसोटीवर लिहिली जावी असा त्यांचा आग्रह आहे.[1] अितिहासकारांच्या विकृत दृष्टिकोनामुळे स्वकालीन देशभक्तांबद्दल भिन्नी अनास्था निर्माण होत आहे; हेही सावरकर सांगतात आणि अितिहासाचे केवळ संशोधन करणाऱ्यांचा होतो तितका तरी गौरव अितिहास घडवून आणणाऱ्या देशवीरांचा व्हावयास नको काय? असा सूचक प्रश्न ते विचारतात.[2] या सर्व अज्ञात देशवीरांबद्दल कधी प्रत्यक्षपणे[3] तर कधी अप्रत्यक्षपणे सावरकरांच्या मनातील कृतज्ञता प्रकट झाली आहे.

प्रचार हा हेतू

पण सावरकरांनी आपले आत्मचरित्रात्मक–चरित्रात्मक लेखन केले आहे, ते मुख्यत: 'पिढ्यांच्या अुद्‌बोधनासाठी', विचारांच्या प्रचारासाठी. प्रचार हा सावरकरांचा अतिशय बळकट असा स्थायीभाव आहे. सावरकरांच्या अनेकविध भूमिकांवर प्रचारक सावरकर कसे प्रभाव गाजवितात हे आपण पाहिलेच आहे. सावरकरांची आत्मवृत्ते, खाजगी पत्रे आणि सार्वजनिक बातमीपत्रे, तसेच मॅझिनी आणि अितर भारतीय देशवीरांची त्यांनी लिहिलेली चरित्रे यां सर्वांमागे विचारांचा प्रचार हाच सावरकरांचा मुख्य हेतू आहे. 'माझ्या आठवणी' या ग्रंथाचा बहुतेक अुत्तरार्ध सावरकरांच्या विचारांच्या प्रचारासाठीच खर्ची पडला आहे. शेवटी सुमारे पंचवीस पृष्ठे मित्रमेळ्याच्या दोन वर्षांच्या अितिवृत्ताने व्यापिली आहेत. 'जन्मठेपे'-त तर विचारांचा प्रचार करण्यासाठी काही स्वतंत्र प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. या दृष्टीने अंदमानातील संघटना आणि प्रचार करण्याचा निश्चय, 'अंदमानातील संघटना आणि प्रचार', 'अंदमानातील शुद्धी', 'अंदमानात हिंदीचा प्रचार' ही प्रकरणे वाचण्यासारखी आहेत. अंदमानमध्ये स्वविचार प्रकटीकरणांलाही बंदी होती. तिथे सावरकरांनी आपल्या प्रचाराने संप घडवून आणले. 'दीड-दोनशे परधर्मीय बंदीवानांना शुद्ध करून हिंदुधर्मात घेतले. अुर्दूऐवजी हिंदीतून पत्र-व्यवहार करण्यासाठी कैद्यांचे मन वळविले. तेव्हा सावरकरांच्या आत्मवृत्तात प्रचाराला प्राधान्य कसे मिळाले आहे ते लक्षात येअील. 'लंडनची बातमीपत्रे' ही सावरकरांनी विचारांच्या प्रचारासाठीच लिहिलेली आहेत. सावरकर अिंग्लंडमध्ये होते तेव्हा ब्रिटिश साम्राज्याच्या अवतीभोवती क्रांतीचे वारे वाहात होते. रशिया, आयर्लंड, अिजिप्त, जर्मनी, तुर्कस्थान अित्यादी देशात क्रांतीला पोषक अशा अनेक चळवळी चालू होत्या.[4] आशिया खंडातही क्रांतीचा प्रवाह जपान, चीन या देशांतून हिंदुस्थानात अुतरू लागला होता. या विविध क्रांत्यांचा फायदा हिंदुस्थानने घ्यावा या हेतूने सावरकरांनी या बातमीपत्रांतून प्रचार केला आहे. क्रांतीच्या कार्यक्रमाची कल्पना

---

१. ते. ता. पृ. ८७. २. ते. ता. पृ. ८०. ३. ते. ता. पृ. २. ४. लं. बा. पृ. २, ६, २७.

हिंदी लोकांना देण्यासाठी मधून मधून 'गुप्तमंडळ्या', 'राष्ट्रीय तरुण सेना', 'समदु:ख्यांची संघटना करण्याची योजना,' 'गनिमी काव्याची लढाअी,' 'परदेशात जाअून शिक्षण घेण्याचे व संस्थानांचा क्रांतीसाठी अुपयोग करून घेण्याचे फायदे' अित्यादी अनेक विषयांवर सावरकरांनी आपले विचार प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे प्रकट केले आहेत. 'देशाचे स्वातंत्र्य' हा विषय तर सर्व पत्रांच्या केंद्रस्थानी आहे. या पत्रांतून हिंदी लोकांना शिक्षणप्रद अशा अनेक गोष्टी असल्याचे अुल्लेख सावरकरांनी मधून मधून केले आहेत, तर कधी हिंदुस्थानच्या स्वत्वाला नाट्यात्मक आवाहन करून प्रचाराची परिणामकारकता त्यांनी साधली आहे. या दृष्टीने पुढील काही वाक्ये पाहण्यासारखी आहेत. 'गुप्त मंडळ्यांनी स्वदेशप्रेम अुत्पन्न करावे व रचनाकौशल्याने प्रचंड संघ अुभारावे.'[१] 'हिंदुस्थान देशनिष्ठ झाल्यावर मि. सिली हे आपल्या पुस्तकात म्हणतात की, 'मग अेक दिवसभर देखील हिंदुस्थानात राहण्याची सोय नाही.'[२] 'प्रत्येक देशाने राष्ट्रीय तरुण सेना तयार केली पाहिजे.'[३] 'क्रांतीचे प्रवाह' या भाषणात हिंदी लोकांना शिकण्याचे धैर्य असल्यास पुष्कळ शिकता येअील.'[४] 'अिंग्रज येथून तेथून अेकच–मग ते हिंदुस्थानात असोत की– अिंग्लंडात असोत– अितके जंरी हिंदी तरुण शिकले तरी दे. सावरकर व चट्टोपाध्याय यांच्या छळाचा अुपयोग झाला असे मानण्यास हरकत नाही.'[५] 'अिंग्लंडच्या स्त्रिया व हिंदुस्थानचे पुरुष, हिंदुस्थाना, तुझ्या विमल यशाला आम्ही कलंकभूत झालो आहोत. त्यापेक्षा नि:संतान का झालो नाही?'[६] 'हे हिंदुस्थाना, तू लक्षपूर्वक पाहा . . . शंभर वर्षेच काय पण आता पंचवीस वर्षे जर हिंदुस्थान असेच परतंत्र राहिले तर पुन: ही हिंदभू हाती लागणार नाही. म्हणून आता तरी शेवटचा प्रयत्न करू लागा.'[७]

या सर्व वातमीपत्रांतून सावरकरांनी आपल्या क्रांतितत्त्वांचा वारंवार प्रचार केलेला दिसून येतो. 'Passive resistance' अूर्फ रडक्या प्रतिकाराच्या साधनावर त्यांनी कडाडून हल्ला केला असून सशस्त्र प्रतिकाराचा हिरीरीने पुरस्कार केला आहे.[८] या अनेक दृष्टींनी पाहिले तर सावरकरांनी लिहिलेली 'वातमीपत्रे' ही वातमीपत्रे ठरत नसून 'प्रचारपत्रे' ठरतात.[९]

'लंडनची वातमीपत्रे' ही तर बोलून चालून सार्वजनिक वृत्तपत्रातील पत्रे असल्याने त्यांच्यातील प्रचार क्वचित स्वाभाविक व क्षम्यही वाटेल. पण

---

१. लं. बा. पृ. २. २. लं. बा. पृ. ६. ३. लं. बा. पृ. ९. ४. लं. बा. पृ. २६. ५. लं. बा. पृ. १३६. ६. लं. बा. पृ. ३७. ७. लं. बा. पृ. ६१. ८. लं. बा. पृ. ६५–६६. ९. सा. च. क. पृ. १४५.

'अंदमानच्या अंधेरीतून' लिहिलेल्या खाजगी पत्रातूनही सावरकर आपली प्रचारकाची भूमिका विसरू शकत नाहीत हे पाहून आश्चर्य वाटते सावरकरांची खाजगी पत्रे म्हणजे राजकीय बंदीवानांच्या सुटकेचा प्रश्न सारखा प्रचलित ठेवण्यासाठी लाभलेला अेक प्रबळ आधार होता.[१] या पत्रांतून कौटुंबिक प्रश्नांपेक्षाही राजबंदीवानांच्या प्रश्नांना अधिक महत्त्व होते.[२] त्यात अनेक अितर विषयांच्या निमित्ताखाली 'देशास हितकर असणारी राजकीय, सामाजिक आणि धार्मिक मतेही' सावरकर प्रदर्शित करीत असत.[३] म्हणजे ही पत्रे खाजगी पत्रे असण्यापेक्षा मतपत्रे किंवा चर्चापत्रेच बनली होती. शिवाय त्या पत्रांचा अुपयोग हा खाजगी पत्रांप्रमाणे अेकाच व्यक्तीपुरता वा कुटुंबापुरता मर्यादित नव्हता, तर त्या वार्षिक पत्रांच्या भरांभर प्रती केल्या जात.[४] कधी वृत्तपत्रांच्या प्रसिद्धीच्या प्रकाशातही ती खाजगी पत्रे येत.[५] 'पवित्र आठवण म्हणून अनेक देशभक्तांच्या संग्रही राहण्याचा मानही त्या पत्रांना मिळे.[६] सावरकरांची ही पत्रे किती परिणामकारक, काव्यमय व करुणरसात्मक असत, याचे वर्णन बॅ. असफअल्ली यांनी केले आहे.[७] अशा या अुत्कट मतपत्रांचा कौन्सिलपासून तो झोपडीपर्यंत परिणाम झाल्यास नवल नाही.[८]

'माझ्या तरुण देशबंधूंनी राजकारणातील अंतिम सत्ये व सिद्धान्त शिकावे' हा हेतू मनात बाळगूनच सावरकरांनी मॅझिनीचे चरित्र लिहिले.[९] असले सिद्धान्त त्यांनी पाठ करावेत व त्यांचा आपल्या स्वत:च्या अुन्नतीसाठी अुपयोग करावा हीच सावरकरांची येथेही दृष्टी आहे.[१०] त्यांना अिटलीप्रमाणे भारतीय तरुणांचे 'मन स्वदेशी व हात सशस्त्र' करावयाचे होते.[११] ही राजकारणातील तत्त्वे केवळ अिटलीकरिता नाहीत तर 'स्वातंत्र्यसुधेचा हा मेवा' सर्वांनी घ्यावा अशी त्यांची अिच्छा आहे.[१२] 'लंडनच्या बातमीपत्रां'त सावरकरांनी युरोप व आशिया येथे चाललेल्या विविध क्रांतीच्या प्रवाहांचे वर्णन केले होते. त्याच काळात लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्रात सावरकरांनी पुढील वाक्य हेतुपुरस्सर लिहिल्याचे दिसते... "परंतु अशा भयंकर राज्यक्रांत्या आजूबाजूस चालत असताही त्यांच्याकडे पाहून ज्यांना आपल्या गुलामगिरीची व भिक्षांदेहीची शरम वाटत नाही, असे देश या भूमीवर काय थोडे आहेत?"[१३] मॅझिनीच्या क्रांतीच्यां कार्यक्रमाचे वर्णन करता करता सावरकर पुन्हा

---

१. मा. जन्म. पृ. ३६९. २. मा. जन्म. पृ. ३७०. ३. मा. जन्म. पृ. ३७०. ४. मा. जन्म. पृ. ३६९. ५. मा. जन्म. पृ. ३६९–३७० ६. मा. जन्म. पृ. ३६९. ७. Life of Barrister Savarkar by Chitragupta, p. 122–123. ८. मा. जन्म. पृ. ३७०. ९. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. २. १०. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. १. ११. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. २४१ १२. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. ३. १३. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. १०.

बुद्धयाच लिहितात, 'लष्कर वळविण्याचे काम... अिटलीत सहज करता आले' कारण परकीयांचा तिरस्कार व स्वकीयांचा लोभ हा मनुष्यमात्रात निसर्गत:च कायम असतो. त्यास चेतना देणारा मॅझिनी मात्र मला भेटला पाहिजे;[1] आणि स्वदेश-स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची प्रेरणा लोकांत अुत्पन्न करण्याचा सावरकरांचा प्रच्छन्न हेतू पुढील शब्दांत किती ठासून भरला आहे पाहा : 'दोन कोटी देशबंधूंवरच त्या महात्म्याची ही केवढी अुडी! मग जर त्याच्या देशाची लोकसंख्या याहून दहा-पाच पट असती व त्याचा शत्रू जर ऑस्ट्रियाअेवढाच असता तर त्याने स्वदेशस्वातंत्र्य मिळवावयास अेक क्षणही लागू दिला नसता.'[2] मॅझिनीचे लेख राष्ट्रीय मोक्षसाधनासाठी निर्माण केलेले चतुर्वेद आहेत अशी सावरकरांची श्रद्धा होती.[3] आणि म्हणूनच त्या लेखांचा प्रसार त्यांना करावयाचा होता. त्यांना अशी खात्री वाटत होती की, 'कालाकालाचा विचार करून जे त्या वेदांचे, श्रवण, मनन व निदिध्यास करीत जातील त्यांना परवशतेच्या भुताची बाधा कधीही होणार नाही.'[4] प्रचार आणि प्रेरकता हाच 'तेजस्वी तारे' या चरित्रग्रंथ-रचनेमागील हेतू आहे. स्वत:ची स्वातंत्र्यनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा, क्रांतिकारक मार्गावरील श्रद्धा यांचाच प्रचार या ग्रंथात सावरकरांना मुख्यत: करावयाचा आहे. श्यामजी कृष्णवर्मा, शचींद्रनाथ संन्याल, श्रीराम राजू, देशवीर पिंगळे व जितेंद्रनाथ यांच्या कार्यवर्णनातून आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचा त्यांना पुरस्कार करावयाचा आहे. भारताची वास्तव क्रांती आज ना अुद्या यशस्वी झाल्याशिवाय राहाणार नाही असा विश्वास श्यामजींच्या मृत्युलेखाच्या शेवटी त्यांनी व्यक्त केला आहे.[5] 'क्षीरोदवासिनीसारख्या ज्या वीरमातांनी स्वातंत्र्ययज्ञात सर्व कुटुंबासह आहुती दिली, त्यांचे नाव कुमारिकांनो आणि गृहिणींनो, गर्भवतींनो आणि मातांनो, तुम्ही प्रत्यही प्रात:काळी स्मरण करा' असे सावरकर सांगतात.[6] वीर युवक शशिमोहन दे. यांनी हिंदुत्वरक्षणासाठी केलेल्या पराक्रमाचा गौरव करताना हिंदुत्वनिष्ठ सावरकर पुकारा करतात, 'हे वीर युवक शशिमोहन... तुझ्यासारखे वीर युवक ह्या आमच्या हतभाग्य हिंदू जातीत अेका मागून अेक अुपजोत...नागरिकांची नैर्बंधिक कर्तव्ये बजावण्याचे धैर्य, साहस आणि अुदारता प्रत्येक हिंदुतरुणाच्या हृदयात अुसळू लागो.''[7]

सावरकरांनी चरित्रे लिहिली ती आपल्या तत्त्वांच्या प्रचारासाठी लिहिली व त्या चरित्रापासून प्रेरणा व स्फूर्ती देणे हा त्या चरित्रलेखनामागील मुख्य हेतू होता

---

१. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. १०, २१. २. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. ७.
३. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. ९० ४. जो. मॅ. आत्म. व राज. पृ. ९०.
५. ते. ता. पृ. १२. ६. ते. ता. पृ. ४९. ७. ते. ता. पृ ६६.

ग्रंथ संग्रहालय, डाणे, ठेवलेले
दिः .....
क्रमांक .....
नोंद दिः .....

ही गोष्ट आता स्पष्ट झाली. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी म्हटल्याप्रमाणे 'राष्ट्राचे चैतन्य रसरसून वर आणण्यासाठीच'[1] सावरकरांनी चरित्रे लिहिली. त्यांच्या चरित्र-वाङमयावर सरकारने घातलेली बंदी हीच त्या चरित्रांच्या ठायी असलेल्या प्रेरक शक्तीची निशाणी होय.

चरित्रनायकांची सहेतुक निवड

सावरकरांनी आपल्या चरित्रविषय झालेल्या व्यक्तींची निवडही स्वत:च्या व्यक्तित्वानुरूप केली आहे असे दिसून येते. ज्यांच्या जीवनात त्यांना आपल्या जीवनाचा साक्षात्कार झाला त्या व्यक्तींचीच चरित्रे त्यांनी लिहिली आहेत. सावरकरांना प्रिय असलेले ध्येय व तत्त्वे ज्यांनी पुरस्कारली, सावरकरांना अचूक वाटणारा ध्येय-प्राप्तीचा मार्ग ज्यांनी अनुसरला, अतंकेच नव्हे तर सावरकरांच्या सर्व विचार-प्रणालीला ज्यांनी साथ दिली अशा व्यक्तींचीच निवड सावरकरांनी आपल्या चरित्र-लेखनासाठी केल्याचे दिसून येते आणि म्हणूनच सावरकरांनी आत्माविष्कार करण्याच्या हेतूनेच चरित्रवाङमय लिहिले असे निर्विवादपणे म्हटले पाहिजे.

सावरकरांनी 'जोसेफ मॅझिनी' याच्या आत्मचरित्रात्मक लेखांचे जे भाषांतर केले ते आत्माविष्कार करण्याच्या हेतूनेच केले हे अनेक पुराव्यांनी सिद्ध करता येअील. अिंग्लंडला जाण्यापूर्वीच मॅझिनीच्या जीवनचरित्राने ते भारावले होते. 'अंगी संचारल्यासारखे होअून त्यांना मॅझिनी व गॅरिबॉल्डी यांचे शब्द अैकू येत होते.'[2] नुसते शब्दच नव्हेत तर मॅझिनीने अिटालीला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी दाखविलेल्या क्रांतीचा मार्ग आपणही अनुसरावा असे त्यांना वाटत होते. मॅझिनी व गॅरिबॉल्डी या विषयांवर नाशिकच्या मित्रमेळाव्यात तेव्हा ते व्याख्याने देत असत.[3] या व्याख्यानांतून 'अिंग्रजांचे अुघड अुघड नाव न घेता रामाने रावणास, कृष्णाने कंसास....शिवाजीने अफजुलखानास किंवा मॅझिनीने ऑस्ट्रियास असे अशा समयी सांगितले' असे बोधून मॅझिनीच्या मार्गावरील आपली दृढ निष्ठा ते व्यक्त करीत असत.[4] 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संस्थेच्या रचनेनुसारच संस्थेची रचनाही मॅझिनीच्या 'तरुण इटाली' या संस्थेनुसारच त्यांनी केली होती. 'अभिनव भारत' संस्थेच्या स्थापनेचा अितिहास सांगताना त्या संस्थेचे अेक अध्वर्यू डॉ. वि. म. भट यांनी स्पष्ट लिहून ठेविले आहे की, "अभिनव भारताचे खरे जनक म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर होत..... १९०४ साली झालेल्या सभेत 'मित्रमेळ्या'चे नवे नामकरण 'अभिनव भारत' हे झाले. 'तरुण अिटाली' या मॅझिनीच्या संस्थेची हकीकत सांगून त्याच धर्तीवर आपण ही काढीत आहोत असे विनायकराव सावरकरांनी

---

१. हंस दिवाळी अंक, १९६१, पृ. ५५. २. मा. आ. पृ. २१८. ३. मा. आ. पृ. १६८. ४. मा. आ. पृ. १६७.

सांगितले."[१] स्वत: सावरकरांनी डॉ. भट यांच्यावरील विधानास पुष्टिदायक असा विचार अन्यत्र मांडला आहे. अिंग्लंडला जाताना वोटीवरील आपल्या भारतीय मित्रांना सावरकरांनी स्वत:जवळचे मॅझिनीचे अेक अिंग्लिश चरित्र वाचावयास दिले होते. त्या चरित्रातील 'तरुण अिटाली' ह्या गुप्त संस्थेच्या घटनेवर नि कार्यक्रमावर त्यांनी लाल अधोरेखा हेतुत:च काढल्या होत्या. सावरकरांच्या चार-पाच मित्रांनी ते चरित्र वाचले. त्यानंतर झालेल्या संभाषणात सावरकरांनी आपल्या मित्रांना सरळ प्रश्न टाकला की, "आपल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीही मॅझिनीच्या 'यंग अिटाली 'सारख्या गुप्त संस्था स्थापणे आवश्यक नाही का?"[२] अिंग्लंडच्या मार्गावर असताना सावरकरांची बाष्पनौका फ्रान्सच्या मार्सेलिस या बंदराजवळ आली, तेव्हा सावरकरांना 'मार्सेलिस अेखाद्या धर्मक्षेत्राप्रमाणे वाटले,' ते मॅझिनीच्या आकर्षणामुळेच.[३] तरुण वयात देशपारीची शिक्षा झालेला मॅझिनी प्रथम याच मार्सेलिसला राहिला होता. 'या अिटालीच्या स्वातंत्र्यदात्यांतील थोर पुढाऱ्याचे–मॅझिनीचे–घर पाहावे' म्हणून सावरकर अेका वाटाडयाला घेऊन मार्सेलिस नगरात खूप भटकले होते आणि अेक दुर्लक्षित परदेशीय तरुण म्हणून मार्सेलिसमधून भटकताना त्यांचे मन मॅझिनी व स्वत:चे जीवन यांच्यातील साम्य शोधीत होते. सावरकर स्वत:शीच म्हणत होते, " मी अेक भारतीय क्रांतिकारक या मार्सेलिसच्या मार्गातून जसा हिंडत आहे, पण माझ्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नाही, तसाच तो अिटालियन क्रांतिकारक तरुण या नगरात त्या वेळी हिंडत असता त्याच्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नव्हते. मॅझिनीने 'तरुण अिटाली' ही गुप्त संस्था जेव्हा काढली तेव्हा तिची प्राथमिक स्थिती नि शक्तीही आज आमच्या 'अभिनव भारता'ची आहे तशीच होती... जसे मला आज मार्सेलिसमध्ये कोणीही 'या बसा' करीत नाही हा त्यांचा अनमितपणा वा दोष म्हणता येत नाही, तसेच मार्सेलिसच्या त्या पिढीच्या फ्रेंच नागरिकांनी त्या अज्ञात, तरुण, परकीय नि भटकत्या मॅझिनीच्या घराची वास्तपुस्त केली नाही, हे अगदी साहजिकच होते."[४] १९०६ साली अिंग्लंडमध्ये पाअूल टाकताच मॅझिनीच्या लेखांचे अिंग्रजी अनुवाद केलेले सहा भाग सावरकरांना अुपलब्ध झाले.[५] आणि ते वाचून मॅझिनीच्या जीवनचरित्राशी व तत्त्वज्ञानाशी स्वत:चे असलेले विलक्षण साम्य सावरकरांच्या ध्यानी आले असले पाहिजे. 'अिटालीच्या निराश्रितांसाठी' असे म्हणून अेका अिटालियन बंडवाल्याने मागितलेल्या भिक्षेच्या प्रसंगातून मॅझिनीच्या मनाने स्वातंत्र्याचा ध्यास घेतला होता. तसेच चाफेकर-रानडयांच्या बंडातून आणि आत्म्याहुतीतून सावरकरांनी स्वातंत्र्याची प्रेरणा घेतली होती. मॅझिनीच्या वडिलांनी मॅझिनीच्या स्वातंत्र्येच्छेला बळकटी आणली होती, तर

---

१. अभिनव भारत पृ. ६, २४. २. केसरी दि. अं. १९६१, पृ. १०१. ३. मंदार दि. अं. १९६१, पृ. १२१. ४. मंदार दि. अं १९६१. ५. मॅ. आ. भा. छो. आ. पृ. १.

सावरकरांच्या वडिलांनी सावरकरांना टिळकांच्या राजकारणाची रुची लाविली होती. फ्रेंच वृत्तपत्रांनी मॅझिनीच्या महत्त्वाकांक्षा प्रवळ केल्या, तर 'केसरी' आणि 'काळ'ने सावरकरांच्या राष्ट्रीय जीवनाची घडण केली. दोघांच्याही भोवती लहानपणापासून मित्रमंडळ जमू लागले होते. त्या मित्रमंडळीच्या अुनाड, चैनी जीवनापेक्षा दोघांचेही जीवन वेगळे होते, गंभीर होते, राष्ट्राचा विचार करीत अेकांतात वसून राहण्याची सवय दोघांनाही जडली होती. वाचनाचा व लेखनाचा छंद दोघांनाही लहानपणापासूनच लागलेला होता. मॅझिनी रात्री वेरात्री राष्ट्र-स्वातंत्र्याच्या विचारात गढून जाअून शहराच्या आजूवाजूने अेकटा फिरे आणि सावरकर रात्री जाग्रणे करून चाफेकर-रानडे किंवा राणी-लक्ष्मीवाअी यांसारख्या स्वातंत्र्यवीरांगनांवर कवने लिहीत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी गुप्तसंस्थांची आवश्यकता मॅझिनीला पटली आणि रकिनी वंधूंवरोवर त्याने या विषयावर चर्चाही केल्या. सावरकरांनी म्हसकर-पागे या मित्रद्वयावरोवर गुप्तसंस्थेच्या स्थापनेसंवंधी असेच वादविवाद केले. जीवनातील आपले भिन्न कर्तव्य ओळखून दोघांनीही आपला वाङ्मयाकडे असलेला नैसर्गिक कल सोडून मरण-मारणाच्या मार्गात अुडी घेतली. या आणि अशा कितीतरी वावतीत मॅझिनीच्या जीवनाशी आपल्या जीवनाचे असलेले साम्य पाहून सावरकरांना आपल्या जीवनाचा साक्षात्कार मॅझिनीच्या जीवनात झाला आणि भाषांतरासाठी त्यांनी मॅझिनीचेच आत्मचरित्र निवडले. अिंग्लंडला जाण्यापूर्वीच सावरकरांच्या मनावर मॅझिनीच्या तत्त्वज्ञानाचा पगडा बसला होता. पण त्याचे स्वरूप बरेचसे स्थूल व मॅझिनीच्या चरित्रलेखकाच्या दृष्टिकोनातून अुतरलेले असे असले पाहिजे. पण मॅझिनीच्या मूळ लेखांचाच सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला तेव्हा आपण 'अभिनव भारत' संस्थेपुढे क्रांतीचा जो कार्यक्रम आजवर गुप्तपणे आखीत आलो, त्याचाच अधिकार-युक्त वाणीने मॅझिनीच्या आत्मवृत्तात नि लेखात प्रवळ पुरस्कार केलेला असल्याचे त्यांना आढळून आले.[1] अशा या लेखांच्या द्वारे आत्माविष्कार साधून लक्षावधी स्वदेश-वांधवांना अगदी अुघडपणे आपले विचार आपण सांगू शकू असा विश्वास त्यांना वाटला आणि त्यामुळे त्यांना अतिशय आनंदही झाला.[2] अिंग्लंडमधील वास्तव्यात सावरकरांच्या विचारावर आणि वर्तनावर मॅझिनीचा केवढा परिणाम झाला होता, याची वर्णने सावरकरांचे त्या वेळचे सहकारी वॅ. असफअल्ली यांनी केली आहेत. अेका ठिकाणी बॅ. असफअल्ली लिहितात, "Vinayak was a spirit of Shivaji and I believe, consciously imitated Giuseppe Mazzini in his general behaviour."[3] दुसऱ्या अेका जागी ते लिहितात, "Mazzini's life and teaching hourly fed the

---

१. मॅ. आ. भा. छो. आ. पृ. १. २. जो. मॅ. आत्म. व राज. मा. आ. पृ. १.
३. Life of Barrister Savarkar by Chitragupta – p. 124.

flame of his soul, and seemed to inspire his activity in the minute details."[१]

जीवन, राजकीय सिद्धान्त व क्रांतीचा कार्यक्रम या बाबतीत सावरकर व मॅझिनी यांच्यातील हे विलक्षण साम्य सावरकरांच्या टीकाकारांच्या नजरेतून सुटले नाही. श्री. रा. गो. भिडे यांनी 'अभिनव भारताचा मॅझिनी' असे बिरुद सावरकरांना बहाल करून सावरकर व मॅझिनी यांच्यातील अनेकविध साम्य स्पष्ट केले आहे.[२] विचारातील, राजकीय तत्त्वप्रणालीतील या साधर्म्यामुळेच मॅझिनीचे आत्मचरित्रपर लेख सावरकरांनी भाषांतरित केले असा निष्कर्ष श्री. भा. कृ. केळकर यांनी काढला आहे.[३] "सावरकरांना आपल्या साऱ्या अिच्छा-आकांक्षा मॅझिनीच्या जीवनात प्रतिबिंबित झालेल्या दिसल्या" असा आपला अभिप्राय प्रा. अ. म. जोशी यांनी दिला आहे.[४] या समानधर्मत्वामुळेच मॅझिनीच्या आत्म-चरित्रविषयक लेखांच्या भाषांतराकडे सावरकर वळले आणि 'परकीय देशभक्ताच्या चरित्राचा बुरखा घेऊन त्याद्वारे आपल्या अिच्छा-आकांक्षा व्यक्त करण्याचा सोअीस्कर मार्ग' त्यांनी पत्करला[५] आणि आंद्रे मोर्वाच्या सिद्धान्तानुसार सावरकरांनी आपले आत्मचरित्रच काही मर्यादित स्वरूपात वाचकांच्या पुढे ठेविले.

'तेजस्वी तारे' या चरित्रग्रंथातील चरित्रनायकांची निवडही सावरकरांनी याच समानधर्माच्या तत्त्वावर केली आहे. जे ध्येय आणि ज्या निष्ठा सावरकरांनी आपल्या अुराशी बाळगल्या, त्या ध्येयाचा आणि निष्ठांचा आढळ चरित्रविषय झालेल्या व्यक्तींत सावरकरांना होतो. त्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी म्हणजे पर्यायाने आपल्याला प्रिय असणाऱ्या तत्त्वांचा वा विचारांचा गौरव करण्यासाठी सावरकरांनी ही चरित्रे लिहिली. अर्थात या ग्रंथात चरित्रे नसून ती व्यक्तिचित्रे आहेत. त्या व्यक्तिचित्रांना सावरकरांनी कुठे 'कथा'[६] तर कुठे 'वर्णनात्मक चरित्र' असे नाव दिले आहे. काही लेखांतून तर चरित्रविषय व्यक्ती नसून क्रांतिकारकां-वरील आक्षेपांना अुत्तर देण्यासाठीच ते लेख लिहिले आहेत.[७] पं. श्यामजी कृष्णवर्मा व श्रीराम राजू यांचीच चरित्रे त्यांनी थोडी विस्ताराने लिहिली आहेत. बाकीच्या बहुतेक चरित्रनायकांच्या जीवनातील अेखाद्या महत्त्वाच्या घटनेभोवतीच विचारांची मांडामांड केली आहे.

सावरकरांचे संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय हेच या चरित्रग्रंथातील बहुतेक नायकांचे ध्येय आहे. पं. श्यामजी कृष्णवर्मा हे प्रारंभी जरी होमरूलचे पुरस्कर्ते होते

---

१. Life of Barrister Savarkar by Chitragupta p. 137. २. केसरी २८–५–४३. ३. सा. द. पृ. ५२–५४. ४. सा. वि. द. पृ. ८१. ५. ते. ता. पृ. १५.. ६. ते. ता. पृ. ६९. ७. ते. ता. लेखांक ४ व ६.

तरी सावरकरांच्या सहवासात येताच संपूर्ण स्वातंत्र्य 'Absolute Political Independence' हे त्यांचे ध्येय वनले होते.[१] याच ध्येयाने प्रेरित होऊन बाल-मुकुंदाने दिल्लीत व्हाअिसरॉयवर बाँव फेकला. जी भारतमाता, 'जनक-जननी-जननी' दास्याच्या शृंखलात जखडलेली होती तिला मुक्त करण्यासाठी शचींद्रनाथ संन्याल यांनी क्रांतीचा मार्ग जाणून-वुजून पत्करला होता.[२] वीरमाता क्षीरोदवासिनीने 'आपली मुले स्वदेशस्वातंत्र्यार्थ देवाला व देशाला अर्पण केली होती.'[३] सर्व हिंदुस्थान ब्रिटिश सत्तापक्षाच्या हातून सोडवून स्वतंत्र करण्याच्या महत्त्वाकांक्षेच्या प्रखर अग्निज्वालेने भडकणारे होमकुंड श्रीराम राजूच्या अंत:करणात पेटलेले होते.[४] देशवीर पिंगळे 'स्वदेशास स्वतंत्र करण्यासाठी निकराचा प्रयत्न करीत असता' फासावर चढले.[५] जितेंद्रनाथ दासांनी 'भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी' आपल्या सर्वस्वाची आहुती दिली.[६]

या सर्व चरित्रनायकांचे ध्येयच केवळ संपूर्ण स्वातंत्र्य होते असे नाही, तर सावरकरांप्रमाणे सशस्त्र साधनांवरही त्यांची श्रद्धा होती. सावरकरांच्या सहवासाने श्यामजी कृष्णवर्मांचा नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गावरील विश्वास अुडाला होता आणि ते सशस्त्र क्रांतिवादाचे पुरस्कर्ते वनले होते.[७] 'सशस्त्र क्रांतीवाचून आपल्या प्रिय मातृभूमीस स्वतंत्र करण्याचा दुसरा कोणताही अुपाय रवींद्रनाथ संन्याल आणि काकोरीच्या अितर क्रांतिकारकांना शक्य दिसत नव्हता.[८] म्हणून जाणून बुजून त्या रक्तरंजित ध्वजास त्यांनी अुभारले होते.[९] 'साम्राज्यशाहीशी युद्ध केल्यावाचून स्वराज्य कधीही मिळणे शक्य नाही' असा सावरकरांप्रमाणेच श्रीराम राजूचाही ठाम सिद्धान्त होता.[१०] देशवीर पिंगळे यांनी पंजावमध्ये वंड चेतवीत सर्वत्र धुमाकूळ घातला.[११] वालमुकुंद, पिंगळे आणि जितेंद्रनाथ दास यांनी गाजविलेले हौतात्म्य सावरकरांसारख्या हौतात्म्याचे आकर्षण असणाऱ्या लेखकाच्या लेखणीला चेतना न देअील तरच नवल! आपल्या हिंदुत्वनिष्ठेचे प्रतिविंव या व्यक्तींच्या जीवनात पडलेले पाहून सावरकरांच्या लेखणीला विलक्षण स्फुरण चढते. फाशीच्या खांबाकडे गाणे गात जात असलेले शचींद्रनाथ संन्याल व काकोरीचे अितर क्रांतिकारक देशभक्त सर्व हिंदू आहेत आणि हिंदूंची गीता वाचून हे धैर्य त्यांच्या ठिकाणी अुत्पन्न झाले आहे असे सावरकर अत्यंत अभिमानाने सांगतात.[१२] 'मला काय त्याचे?' या हिंदूंच्या षंढतंत्रातील सूत्राला गुंडाळून ठेवून शशिमोहन दे. या वीराचे हिंदू रक्त अुसळलेले पाहून सावरकर त्याला आशीर्वाद देतात आणि प्रत्येक हिंदुमात्राच्या मनातील विचार

---

१. ते. ता. पृ. ८. २. ते. ता. पृ. ४४. ३. ते. ता. पृ. ४८. ४. ते. ता. पृ. ७४. ५. ते. ता. पृ. ८६. ६. ते. ता. पृ. ८९. ७. ते. ता. पृ. ९. ८. ते. ता. पृ. २३. ९. ते. ता. पृ. २४. १०. ते. ता. पृ. ७५ ११. ते. ता. पृ. ७९. १२. ते. ता. पृ. २९.

व्यक्त करताना म्हणतात, " तुझ्यासारखे वीरयुवक ह्या आमच्या हतभाग्य हिंदू जातीत अेकामागून अेक अुपजोत. असे त्रस्त हिंदूंच्या हाकेसरशी धाऊन जाणारे वीर हिंदू आपल्या समाजात निपजू लागोत आणि त्या जुन्या 'मला काय त्याचे' चे मढे जळून राख केले जावो."[1] 'हिंदू जातीच्या अखंड भारतीय वीर-परंपरेतील अेक नि:सीम भक्तमणी' अशा स्वरूपात श्रीराम राजूच्या कार्याचा गौरव ते करतात.[2] या सर्व चरित्रनायकांची नि:स्वार्थी देशभक्ती, त्यांचा त्याग, त्यांचे धाडस आणि शौर्य सावरकरांना प्रिय आहे. अितके समानधर्मत्व आणि समरसत्व असल्याने आत्माविष्कारासाठीच सावरकरांनी या चरित्रनायकांची निवड केली असावी हे मत दृढ होते.

रागद्वेषांचे दर्शन

आत्माविष्कारासाठीच सावरकरांनी चरित्रलेखन केले हा मुद्दा विषय-निवडीच्या बाबतीत जितका आणि ज़सा पटतो, तितका आणि तसाच सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अितर अंगांचा विचार केला असताही पटतो. ज्या तत्त्वांबद्दल आणि व्यक्तींबद्दल सावरकरांच्या मनात रागद्वेष आहेत, ते रागद्वेष या चरित्र-ग्रंथातही सर्वांशांनी अुतरलेले दिसतात. अत्याचाराबद्दल– विशेषत: मुसलमानांनी केलेल्या अत्याचाराबद्दल–सावरकरांना वाटणारा तिरस्कार येथे प्रकट झाला आहे.[3] अिंग्रजांच्या ठिकाणी चांगुलपणाचा अभाव असल्याचे आपले मत आडमार्गाने त्यांनी व्यक्त केले आहे.[4] अिंग्रजांनी क्रांतिकारकांवर केलेल्या अन्यायाबद्दल त्यांना गंभीर समजही दिली आहे.[5] पण या चरित्रग्रंथाचा मुख्य हेतू क्रांतिकारकांवरील आक्षेपांचे निरसन करण्याचा असल्याने महात्मा गांधी व त्यांचा अहिंसावादी पक्ष यांच्याबद्दल सावरकरांच्या ठिकाणी असलेला राग ठायी ठायी प्रकट झाला आहे. म. गांधींची ब्रिटिश राजनिष्ठा, 'God save the king' हे गीत[6] किंवा 'I proudly declare my loyalty to British Empire' हे वाक्य[7] धन्यतेने व अभिमानाने म्हणण्याची त्यांची प्रवृत्ती त्यांच्या सत्य, अहिंसेच्या भ्रांत कल्पना,[8] क्रांतिकारकांना 'अत्याचारी' नाव देण्यातील अहिंसावाद्यांचा शिवराळपणा[9] अित्यादी अनेक बाबतींत सावरकरांनी आपला राग अत्यंत तीव्र शब्दांत प्रकट केला आहे.

चरित्र-चित्रणाला लेखकाच्या ठिकाणी हवी असणारी अलिप्तता येथे दिसत नाही. गौरवाबरोबरच चरित्रनायकांच्या कृत्यांच्या समर्थनासाठीच ही व्यक्तिचित्रे

---

१. ते. ता. पृ. ६६. २. तें. ता. पृ. ६९–७०. ३. ते. ता. पृ. २९–३०. ४. ते. ता. पृ. ९, मॅझिनी पृ. २५. ५. तें. ता. पृ. ३०–३१. ६. तें. ता. पृ. ६. ७. ते. ता. पृ. ११. ८. ते. ता. पृ. ४१ व ६९. ९. ते. ता. पृ. ५६.

लिहिली असल्यामुळे आवश्यक ती अलिप्तता लेखकाच्या अंगी येणे असंभवनीयच. अनेक व्यक्तिचित्रांच्या बाबतीत तर असे म्हटले आहे की, विषयीभूत व्यक्ती केवळ निमित्तमात्र झाली असून सावरकरांच्या स्वत:च्या विचारांनीच लेख व्यापिलेला आहे. 'देशवीर शचींद्रनाथ सन्याल' यांच्यावरील दोन-तीन लेखांत चरित्रविषयक मजकूर फारच थोडा असून क्रांतिकारकांच्या ओजस्वी व तेजस्वी कार्याचे अभिनिवेश-पूर्ण वर्णन सर्व लेखांचे पूरण झाले आहे. 'देशवीर पिंगळे' यांच्या जीवनचरित्राचा अत्यंत अल्प भाग देऊन नंतर क्रांतिकारकांबद्दल लोकांत असणारी अनास्था, हिंदुस्थानातील लोकांना शिक्षण देण्यामागील अिंग्रजांचा स्वार्थी हेतू यांचाच प्रपंच सावरकरांनी केला आहे. जितेंद्रनाथ दासांनी आपल्या स्वदेशासाठी आत्माहुती दिली या अेका बातमीवर शेवटच्या लेखाची अुभारणी सावरकरांनी केली आहे. पण त्यात 'कोणते हौतात्म्य अनुकरणीय' या अेका विषयावरील सोदाहरण चर्चा त्यांनी केली आहे; आणि त्यामुळे या चरित्रलेखाला निबंधाचे स्वरूप आले आहे.

विचारसाम्य

सावरकरांनी चरित्रलेखनातून व्यक्त केलेले विचार आणि त्यांच्या आत्म-चरित्रात्मक लेखनातून व्यक्त झालेले विचार यांच्यातील आत्यंतिक सादृश्य पाहिले की, सावरकरांनी आत्माविष्कारासाठीच ही चरित्रे लिहिली असल्याची खात्री पटते. गुप्त मंडळी स्थापन करण्यासंबंधी विचार व्यक्त करताना मॅझिनी लिहितो, "सत्यास्तव मंडळ्या स्थापन करणे कायदेशीर आहे.... प्रसिद्ध मंडळ्यांची पूर्ण परवानगी असेल तेथे गुप्त मंडळ्या ह्या बेकायदा आहेत. जेथे सत्यप्रतिपादनाची असत्याने बंदी केली आहे तेथे गुप्त मंडळ्या ह्या परमपवित्र आहेत."[1] सावरकरही असाच विचार पुढील शब्दांत सांगतात, "जेव्हा अन्यायी दुष्ट शक्ती सत्य पक्षाची वाचा जखडून टाकतात, ते वाक्स्वातंत्र्य हिरावून घेतात... तेव्हा त्या शक्तीचा पाडाव करण्यासाठी अवश्य असल्यास गुप्तपणेही न्यायाचे दल अेकत्र, संघटित आणि संचलित करणे अगदी धर्मकर्तव्यच होअून बसते."[2] 'मानव्याच्या अत्युच्च पूर्णतेचे साध्य साधण्यास व्यक्तीहून सबळ असे हत्यार म्हणजे देश किंवा राष्ट्र होय"[3] असे मॅझिनी सांगतो, तर "राष्ट्र हे केव्हाही मानुषकाच्याच हितार्थ असले पाहिजे" असे सावरकर सांगतात.[4] विश्वकुटुंबाची कल्पना स्पष्ट करताना मॅझिनी लिहितो, "मानवी जातीची अत्युत्कट अुन्नती हे जे साध्य, ते साधण्याच्या कामी आपापली निसर्गनिर्दिष्ट कर्तव्ये ओळखून स्वतंत्र व समसमान व्यक्तींनी अेकीभूत झालेली निरनिराळी राष्ट्रे अेकदिलाने व अेकवाच्यतेने झटतील व परस्परांच्या हितार्थ झटत

---

१. मॅझिनी पृ. २०५. २. मा. आ. पृ. २२०. ३. मॅ. आ. पृ. १५७.
४. मा. आ. पृ. २२१.

झटत सर्व मनुष्यजात अुद्धार पावेल.''[१] सावरकरांनी ह्याच विश्वकुटुंबाचा पुरस्कार करताना लिहिले आहे. '' . . . अुभ्या मानवजातीचे राजकीय सात्त्विक अेकीकरण हेच ज्यांचे अंतिम ध्येय आहे, त्या आम्हांस त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी तदनुकूल असलेल्या सर्व संस्था त्या ध्येयाकडे जाणाऱ्या मार्गावरील टप्पे म्हणून ग्राह्यच वाटतात.''[२] गुप्तसंस्थांच्या कार्याचा विचार करताना मॅझिनीने मुख्यत: 'मन:संस्कृती आणि युद्धसंस्कृती, मन:प्रवर्तकता आणि शरीरप्रवर्तकता, विचारक्षमता व कृति-तत्परता' अशा दोन अंगांचा विचार केला आहे.[३]. सावरकरांनी ह्याच दोन अंगांचा विचार केला आहे आणि सांगितले आहे '' मी प्रथमपासूनच मन:प्रवर्तन आणि शरीर प्रवर्तन, राष्ट्राची मानसिक क्रांती आणि मग वास्तविक क्रांती. . . . .मतप्रचार आणि कृतिप्रचार अशा अनुक्रमाने अभिनव भारताचा कार्यक्रम विभागला होता.''[४] 'तेजस्वी तारे' या चरित्र ग्रंथातील अनेक विचार सावरकरांच्या आत्मचरित्रात्मक लेखनातील विचारांचेच प्रतिबिंब वाटतात. पुढील अुदाहरणे पाहा : '' भारतमाता. . . . .तिच्या तीस कोटी संतानांतील जात्या-येत्यास हटकावीत आहे, 'प्रथम पुढे होअून या माझ्या विमोचनार्थ पेटलेल्या महान अग्निकुंडात अुडी घालून बलिदानाच्या नवसाची संख्या पुरी करण्यास कोणी प्रथम पुढे येतो आहे काय?''[५] हा विचार सावरकरांच्या 'माझे मृत्युपत्र' या पत्रातील 'विश्वाचिया मंगल चरणाला । वोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ?' ह्या चरणाशी[६] किंवा 'सांत्वन' या पत्रातील 'अेकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली । कुलदेवी प्रकटेल काली । विजयलक्ष्मी पावन ।।' यातील कल्पनेशी[७] किती हुबेहूब जुळणारा आहे हे लक्षात येते. 'प्रिय मातृभूमीच्या स्वातंत्र्ययज्ञात आपण स्वत:च नव्हे तर वंशचा वंश पुन:पुन: स्वातंत्र्यलक्ष्मीच्या स्थंडिलावर बळी देणारे. . . काही धन्य देशवीर' या हिंदुस्थानात आणि हिंदूंत निघाले, त्यात शचींद्रनाथ सन्याल यांचे कुटुंबही गणिले गेले पाहिजे '' असा विचार 'वीरमाता क्षीरोदवासिनी' मध्ये त्यांनी व्यक्त केला आहे.[८] अगदी असाच विचार तत्पूर्वी कितीतरी वर्षे अगोदर लिहलेल्या 'माझे मृत्युपत्र' या काव्यपत्रात सावरकरांनी आपल्या येसूवहिनीला सांगितला आहे.[९] पारतंत्र्यसुलभ दास्यवृत्तीच्या नैर्वधिक भयासाठी श्रीराम राजूसारख्यांना बंडखोर ठरविणारे लोक परकीय देशातील वीरांची मात्र स्तुतिस्तोत्रे गातात,[१०] असे सांगणारे सावरकर नाशिकच्या मित्र-मेळ्याच्या बैठकीतसुद्धा हेच विचार व्यक्त करीत होते.[११] 'जितेंद्रनाथ दासांनी नुसते मरणी न मरता–जर जरा निराळ्या रीतीने (प्राण) दिले असते, तर

---

१. मा. आ. पृ. १५८. २. ६. मा. जन्म. पृ. ३१७. ३. मॅ. आ. पृ. ६१. ४. मा. आ. पृ. २३२. ५. ते. ता. पृ. ४४. ६. अंद. अं. पृ. ९. ७. अंद. अं. पृ. २. ८. ते. ता. पृ. ४८. ९. अंद. अं. पृ. १०. १०. ते. ता. पृ. ६८. ११. मा. आ. पृ. ८०.

अधिकच साधले असते,[१] या विचाराचे मूळ त्यांच्या 'आत्मचरित्रा'त आणि 'जन्मठेपे'त अनेक ठिकाणी असल्याचे दिसून येते.[२]

आपल्या चरित्रात्मक ग्रंथांची सजावट करतानाही सावरकरांनी जे अलंकार वापरले आहेत, सुभाषितांतून जे अभिप्राय सूचित केले आहेत आणि ज्या भाषा-शैलीने त्या ग्रंथांची रचना केली आहे, ते अलंकार, ती सुभाषिते आणि ती भाषाशैली सावरकरांच्या व्यक्तित्वातून अुद्भुत झाली आहे.

अलंकार

सावरकरांच्या अलंकारातील अनेक अुपमाने ही त्यांच्या स्वत:च्या क्रांति-जीवनातून, राजकीय प्रवृत्तीतून स्फुरलेली आहेत. राजकारणातील वा क्रांतिजीवना-तील विशिष्ट पारिभाषिक शब्द घेअून अनेकदा त्यांचे अलंकार सिद्ध होतात. 'माझ्या आठवणी'त देवीवरील आपली श्रद्धा, विश्वास ढळू लागल्याचे वर्णन त्यांनी पुढील शब्दांत कसे केले आहे पाहा : "देवीवरील माझ्या भावनेचा हा अत्यंत सरळ आणि निस्सीम विश्वास माझ्या बुद्धीच्या डोळ्यांत नक्की केव्हा सलू लागला ते आठवत नाही. बहुधा या **गुप्त कटाचा सुगावा** तिने संज्ञ स्मृतीला लागू दिला नसावा."[३] बाबांना सुधारकी चाळ्याचे फार वावडे असल्याने केस ठेवण्याची हौस आपण कशी पुरी केली याचे वर्णन त्यांनी राजकीय परिभाषेत केले आहे. ते लिहितात, "त्यांच्या (बाबांच्या) अधिराज्यात असेतो हा केस ठेवण्याचा हक्क मला हप्त्याहप्त्यांनी आणि अनेक वेळा निर्बंधभंगाच्याच चळवळी करून संपादावा लागला. प्रथम घेऱ्याचा हक्क हाती आल्यानंतर त्या घेऱ्याचा घेर पुढे-मागे वाढत चालला... शेवटी बाबांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालून निघून कॉलेजचे वसाहतीचे स्वराज्य मला मिळाल्यानंतर तो विस्तृत घेरा दोन-तीन आठवड्यांतच राखलेल्या, छाटलेल्या नि भांग पाडलेल्या केसांत परिणामला."[४] अंदमानात 'काळ्या पाण्यावरचा संकल्प' सोडताना तोंडात समुद्राचे खारे पाणी जाताच तोंड अेकदम थू थू थू करीत बंड करून अुठले' असेच वर्णन करणे सावरकरांच्या बंडखोर वृत्तीला शोभेसे आहे.[५] अनेक वेळा त्यांच्या विकार-विचारांतही बंडे झाल्याची वर्णने सावरकर करतात.[६] अशा बंडखोर विकारांना कधी ते 'विवेकाच्या चौकीवर' अडवतात तर कधी त्यांच्यावर 'विवेकाची सेना' पाठवून त्या विकारांचा पराभव करतात.[७] 'मरणोन्मुख शय्येवर पडल्या पडल्या भोवतालची मुंग्यांची नगरी व घुंघुरटी पाहून सावरकरांना सुचलेल्या

---

१. ते. ता. पृ. ९३. २. मा. आ. पृ. २४ व मा. जन्म. पृ. १३०, ५११, ५१२. ३. मा. आ. पृ. ५९. ४. मा. आ. पृ. १८२. ५. मा. जन्म. पृ. ७५. ६. मा. जन्म. पृ. ४१३. ७. मा. जन्म. पृ. १४, १५, २७, ४१३, ५२०.

अुपमा आणि अुत्प्रेक्षा त्यांच्या व्यक्तित्वाचा ठसा धारण करून प्रकट होतात. त्या लढाअू मुंग्या म्हणजे त्यांना क्षत्रिय सैन्य वाटते;[1] आणि तो 'घुंघुरटयांचा थवाच्या थवा ज्यू लोकांच्या फिरत्या अवस्थेतील राष्ट्राप्रमाणे अेकत्रित प्रवास करीत अुडत चालला आहे' अशी अुपमा त्यांना सुचते.[2] सरकारी सवलतींचा स्वीकार करून बंदीवानांनी अंदमानातच राहावे व वसाहत मोडू नये हा सावरकरांचा विचार तेथील बंदीवानांना रुचला नाही. त्या प्रसंगाचे अलंकारिक वर्णन सावरकरांनी पुढील-प्रमाणे केले आहे. "आमच्या शब्दांस त्या मनोराज्यात अिंग्रजी राज्याप्रमाणेच अगदी जप्त करण्यात आले. निषिद्ध वाङमय म्हणून बंदी करण्यात आले."[3]

सुभाषिते

सावरकर आपल्या निवेदनाची सजावट करताना ज्या सुभाषितांचा वा श्रुत-योजनांचा अुपयोग करतात त्यांची निवड ते आपल्या विचारसरणीनुसार आणि तत्त्वज्ञानानुरूप करतात. स्वातंत्र्य हे सावरकरांचे ध्येय होते आणि त्या ध्येयासाठी धडपडणाऱ्या देशवीरांचा, हुतात्म्यांचा गौरव करणे हा त्यांचा आवडता विषय होता. म्हणून बायरनने स्वातंत्र्यदेवीचे गुणगान ज्या कवितेत केले आहे त्या कवितेतील वेचक चरण त्यांनी मॅझिनीच्या चरित्रात अुद्धृत केले आहेत.[4] स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्गही सावरकरांनी निश्चितपणे सांगितलेला आहे आणि तोच मार्ग सुभाषितातून सुचविताना 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' या कवी गोविंदाच्या काव्य-चरणाचा चपखलपणे त्यांनी अुपयोग केला आहे.[5] सशस्त्र युद्धाने शत्रूचा नाश करूनच स्वातंत्र्य मिळते हा सिद्धान्त त्यांनी पुन्हा मॅझिनीच्या चरित्रात दुसऱ्या भागाच्या प्रारंभी कवी गोविंदाच्या 'अविंध सारा चिरा चरचरा व्हाल दास्यपार' या चरणातून सांगितला आहे.[6] सामर्थ्य आणि पराक्रम यांवर जगातील जीवनक्रम आधारलेला आहे हा सावरकरांना घटलेला नियम ते 'अेकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयम्।' या सुभाषितातून अचूकपणे व्यक्त करतात.[7] अन्यायी आक्रमणाचा प्रतिकार करणे केवळ न्याय्यच नाही तर आवश्यक आहे हे आपले ठाम मत मांडताना ते हर्बर्ट स्पेन्सरच्या पुढील अुक्तीचा आधार देतात : "Resistance to aggression is not only justifiable but imperative."[8] पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्राला गनिमी काव्याच्या युद्धा-सारखा दुसरा मार्ग नाही, असा आपला विचार व्यक्त करण्यासाठी 'महा-राष्ट्राचा मॅझिनी' जो रामदास त्याची ओवी सावरकरांनी साभिप्राय योजिली

---

१. मा. जन्म. पृ. ४०८. २. मा. जन्म. पृ. ४०८. ३. मा. जन्म. पृ. ४८८. ४. मॅझिनी आत्म. आणि रा. पृ. ९९. ५. मा. आ. पृ. २२५. ६. मॅझिनी आत्म. नि रा. पृ. ६९. ७. ते. ता. पृ. ९५. ८. ते. ता. पृ. १.

आहे.[१] पारतंत्र्यात राहून मलीन यशाचे जीवन कंठण्यापेक्षा हौतात्म्य पत्करून मारीत मारीत मरणेच सावरकरांना अधिक श्रेयस्कर वाटते. म्हणूनच पुढील संयुक्त सुभाषिताच्या आधारे ते विचारतात, "यदि मरणं अवश्यमेव जन्तोः किमिति मुधा मलिनं यशः कुरुध्वे ?"[२] दास्यात राहण्यापेक्षा आपल्या आजवरच्या अस्तित्वास शोभेल असा महान अंत संपादिणे, हौतात्म्य पत्करणे सावरकरांना कर्तव्य वाटते. म्हणून आपला हा अभिप्राय सुभाषितातून व्यक्त करताना ते लिहितात, 'अभिमुख शस्त्राघाती समरमखामाजि वेचिला काय । स्वंततर कवण मजहुनि आता कर्तव्य राहिले काय ।।[३] पण नुसते मरणी मरण सावरकरांना अनुचित वाटते.–फोल वाटते. असे मरणी मरण हे हौतात्म्य नसून हत्या आहे असा स्पष्ट फरक ते करतात. म्हणूनच त्यांची विजिगीषू वृत्ती, आक्रमक प्रवृत्ती सांगते की, 'मारिता मारिता घ्यावे राज्य आपुले'[४] आध्यात्मिक दृष्टिकोनातून सावरकर धर्माचा विचार करीत नाहीत. समाजबळाचे अेक अुपयुक्त साधन म्हणून ते धर्माकडे पाहतात; आणि धर्माची कल्पना स्पष्ट करण्यासाठी 'धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः' या सुभाषिताचा किंवा 'यद्यद् धर्म मतं मम' या हितवादावर प्रतिष्ठित अशा सुधाषितांचा ते अुल्लेख करतात.[५] मोरोपंतांच्या ज्या अेका वचनाचा अुपयोग करून धर्मासंबंधीचे आपले निश्चित मत सावरकर व्यक्त करतात ते वचन असे आहेः, 'जीवांचा प्रभव जया कर्मे, ते कर्म धर्म वा समज.'[६] या धर्माच्या कसोटीवरच सत्याची कल्पना ते पारखून घेतात आणि मग ज्या सत्याने मनुष्याचे अेकंदरीत कल्याण साधते ते सत्य' या आपल्या विचाराच्या पुष्टयर्थ मोरोपंतांच्या पुढील वचनाचा वारंवार निर्देश करतात, "जो रात्री चोरांनी धरिला त्याची करावया मुक्ति । लेश विचार न करिता बोलाव्या तेथ शतमृणा अुक्ति ।"[७] जीवनाकडे कर्तव्याच्या भावनेने पाहण्याचा सावरकरांचा दृष्टिकोन त्यांनी योजिलेल्या अनेक गीतावचनांतूनही प्रकट झाला आहे.[८]

भाषाशैली

सावरकरांचे आक्रमक व्यक्तित्व चरित्रग्रंथांच्या भाषासरणीवरही प्रभाव गाजविताना दिसते. सावरकरांच्या ठायी स्वमताबद्दल असणारा ठामपणा, अभिनिवेश, आग्रहीपणा, अुपरोधाने टर अुडविण्याची प्रवृत्ती, स्वभाषेबद्दलचा अभिमान

---

१. मॅझिनी आत्म. नि रा. पृ. २४०. २. मा. आ. पृ. २२९. ३. मा. आ. पृ. २२९. ४. मा. आ. पृ. २२५. ५. मा. आ. पृ. १७०. ६. मॅ. आत्म. नि रा. पृ. २३१. ७. मॅ. आत्म. नि रा. पृ. २३१ व मा. आ. पृ. १७०. ८ मॅ. आत्म. नि रा. पृ. १५३.

अित्यादी सर्व वैशिष्टचे त्यांच्या चरित्रग्रंथातील भाषेत आढळतात. त्यांच्या आत्म-चरित्रात ज्या ज्या ठिकाणी प्रतिस्पर्ध्यांशी झालेल्या वादांची वर्णने सावरकरांनी केली आहेत त्या त्या ठिकाणी सावरकरांची ही 'प्रबळ आणि प्रदीप्त' भाषाशैली प्रकट झालेली आहे. त्यांनी म्हसकर-पागे यांच्याशी केलेला वाद[1] 'राजा अिंग्लंडचा की हिंदुस्थानचा ?' यावावत मित्रमेळ्यात म्हसकर यांच्याशी झालेला खडाजंगी वाद,[2] अिंग्लंडला जाताना शिष्टाचारी व अितर मित्रमंडळींशी झालेली चर्चा,[3] अंदमानात राजबंद्यांवरोवर वसाहत वंद न करण्यासंवंधी झालेला शाव्दिक संघर्ष[4] किंवा 'पाहिजे तर शस्त्राचारी म्हणा, पण अत्याचारी नव्हे' या लेखात क्रांति-कारकांवरील आक्षेपांना त्यांनी दिलेले अुत्तर,[5] ह्या सर्व ठिकाणी सावरकरांच्या भाषाशैलीतील अभिनिवेश नि आवेश प्रकर्षाने प्रकट झाला आहे. ध्येय, धोरण, मते यांतील ठामपणा दाखविणारा सावरकरांचा 'च' त्यांच्या भाषाशैलीत अेक विलक्षण चमक निर्माण करतो. पुढील काही शव्द या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. 'असाव-याचेच' 'अर्थातच', 'होण्यासाठीच', 'सांगितलेच', 'कर्तव्यच', 'तत्त्वावरच', 'मार्गानेच', 'खरोखरच' अित्यादी. असे कितीतरी 'च' कार त्यांच्या शव्दांत वळ भरतात. या 'च' च्या आधिक्यामुळे वाक्याचा तोल जाअू नये म्हणूनच की काय ते 'ही' चा वापर करतात. या 'च' च्या जोडीलाच कधी कधी क्रियापदांची पुनरुक्ती ते करतात आणि मग अशी पुनरुक्त क्रियापदे सावरकरांच्या ठायी असणारा मतांचा ठामपणा ठसठशीतपणे दाखवितात. 'नव्हेच नव्हे',[6] 'होअीलच होअील',[7] 'शकतीलच शकतील',[8] 'आहेच आहे',[9] 'मुळीच मुळीच मुळीच नव्हता',[10] होतेच होते',[11] 'न्याय नाहीच नाही',[12] 'क्षुल्लक तर नव्हेच नव्हे',[13] 'जागा तर नाहीच नाही',[14] 'यात शौर्य तर नाहीच नाही',[15] 'मला तर त्याचे सर्व काही आहेच आहे',[16] 'अितका निष्ठुर होताच होता',[17] अशी कितीतरी पुनरुक्त क्रियापदे सावरकरांच्या मतांचा पक्केपणा दाखवितात. त्यातील 'च' कार ती पुनरुक्ती अधिकच प्रभावी करतो. या 'च'चे स्थान सावरकरांच्या भाषाशैलीत अितके आहे की, 'सावरकरांचे व्यक्तित्व 'च' ह्या अेकाच अक्षराने सुचविता येअील' असे प्रा. स. गं. मालशे यांना वाटते.[18] प्रा. मालशे पुढे म्हणतात, "त्यांच्या (सावर-करांच्या) वाणीला ठाशीवपणा आणि सिद्धान्त वाणीचा पीळ हा 'च'च देत

---

१. मा. आ. पृ. १३३–१३५. २. मा. आ. पृ. १६१–१६६. ३. केसरी दि. अं. १९६१. ४. मा. जन्म. पृ. ८८३–४८९. ५. ते. ता. पृ. ५०–५८. ६. मा. जन्म. पृ. १३१. ७. मा. जन्म. पृ. १३४. ८. मा. आ. पृ २३०. ९. मा. जन्म. पृ. ३१. १०. मा. आ. पृ. २३१. ११. मॅ. आत्म. नि राज. पृ. १८. १२. लं. बा. पृ. १४१. १३. लं. बा. पृ. ११०. १४. लं. बा. पृ. २१. १५. ते. ता. पृ. ५८. १६. ते. ता. पृ. ६२. १७. ते. ता. पृ. ९५. १८. आवडनिवड पृ. १०९.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
अनुक्रम..... वि: .....
कपाट..... नों: वि: .....

असतो. सूडाचे तत्त्वज्ञान हा 'च'च प्रखरपणे बनवू शकतो. विपक्षीयांना कट्टर विरोधी बनविणारा व स्वपक्षीयांच्या आदराचे भक्तीत व अंधभक्तीत पर्यवसान करणारा हा 'च' आहे. गवयाची सम तसा हा सावरकरांचा 'च'; त्याला हटकून टाळी मिळालीच म्हणून समजा."

सावरकरांच्या भाषेत आढळणारा अुपरोध किंवा वक्रोक्ती त्यांच्या व्यक्तित्वातूनच निर्माण झालेली आहे. आपला ध्येयवाद, आपले मार्ग किंवा स्वातंत्र्यादी आपल्या निष्ठा त्यांना अुघडपणे जेव्हा व्यक्त करता येत नसत तेव्हा त्यांनी वक्रोक्तीचा आश्रय केल्याचे दिसून येते. दोन्ही आत्मवृत्तांपेक्षा 'लंडनची वातमीपत्रे' 'मॅझिनीचे आत्मचरित्र आणि राजकारण' आणि 'तेजस्वी तारे' या चरित्रग्रंथांतून वक्रोक्तीचा वा अुपहासाचा वापर त्यांनी अधिक प्रमाणात केल्याचे दिसून येते. लंडनमध्ये झालेल्या मिस्टर हार्वे यांच्या भाषणातून त्यांनी गुप्तमंडळ्यांच्या मार्गाचा[1] व क्रांतीच्या अुठावणीचा[2] प्रचार केला आहे. आयर्लंडमधील वर्षारंभाचे वर्णन करताना प्रारंभीच त्यांनी आयर्लंड व हिंदुस्थान यांतील साम्य दाखविले आहे आणि आयर्लंडने 'अिंग्लिशांना हुसकून देण्याचा' जो 'Physical Force' अेकमेव मार्ग सांगितला आहे त्याचे सविस्तर वर्णन अशा वक्रोक्तीने खुलविले आहे की, हिंदुस्थाननेही ह्याच मार्गाचा अवलंब करावा हा आपला विचार त्यातून स्पष्ट लक्षात यावा.[3] स्वातंत्र्यप्राप्तीचे अनन्य साधन जे सशस्त्र प्रतिकार, त्या साधनाचाच प्रचार करण्यासाठी सावरकरांनी फ्रान्समधील अप्रत्यक्ष प्रतिकाराचे अपयश वर्णिले आहे आणि शेवटी वशिष्ठांच्या कामधेनूची पौराणिक कथा सांगून वक्रोक्तीने शस्त्रबळाच्या मार्गाचा पुरस्कार केला आहे.[4] मॅझिनीच्या चरित्राच्या प्रस्तावनेवर सावरकरांनी वक्रोक्तीचे अितके झिरझिरीत दुकुलवस्त्र धरले आहे की, त्या प्रस्तावनेतील सावरकरांचे विचारधन स्पष्ट दिसावे. अेका ठिकाणी ते लिहितात, "दोन कोटी बंधूंवरच त्या महात्म्याची ही केवढी अुडी. मग जर त्याच्या देशाची लोकसंख्या याहून दहा-पाच पट असती व त्याचा शत्रू जर ऑस्ट्रियाअेवढाच असता तर त्याने स्वदेश-स्वातंत्र्य मिळवावयास अेक क्षणही लागू दिला नसता."[5] त्याच प्रस्तावनेत सावरकरांनी अिटलीतील स्वदेशीची चळवळ,[6] अिटलीतील तरुणांनी अितर देशांत जाअून युद्धकलेचे घेतलेले ज्ञान,[7] लष्कर वळविण्याचे त्यांनी केलेले कार्य,[8] त्यांनी स्वीकारलेले गनिमी काव्याचे धोरण,[9] अित्यादी वर्णन साभिप्राय व वक्रोक्तीच्या आश्रयाने केल्याचे स्पष्ट दिसून येते. सावरकरांच्या भाषाशैलीतील अुपरोध किंवा अुपहास ही शस्त्रे त्यांनी तेथेच

---

१. लं. बा. पृ. २. २. लं. बा. पृ. २५. ३. लं. बा. पृ. ४१, ४२, ४३. ४. लं. बा. पृ. ६४, ६५, ६६, ६७. ५. मॅ. आत्म. नि रा. पृ. ७. ६. मॅ. आत्म. नि रा. पृ. १०. ७. मॅ. आत्म. नि राज. पृ. ७ ८. मॅ. आत्म. नि राज. पृ. १०. ९. मॅ. आत्म. नि राज. पृ. २०.

परजली आहेत की, जेथे त्यांच्या रागद्वेषाचे विषय पुढे अुभे राहिले आहेत. त्यांच्या रागद्वेषाचा मुख्य विषय म्हणजे अिंग्रजी सत्ता व आततायी अिंग्लिश जनता. अिंग्रज लोक खिसेकातरूपणाच्या धंद्यात कसे पटाअीत आहेत,[१] लिबरल व कॉन्झरव्हेटिव्ह हे दोन्ही सारखेच असून मोर्लेसारख्या लिबरल पक्षाच्या बाबतीत हिंदुस्थानच्या पैशाने कसा फरक पडला आहे,[२] हिंदी तरुणांच्या अंगातील दुर्गुणास भरभराटविण्यास अिंग्लंडमध्ये पूर्ण स्वातंत्र्य कसे आहे,[३] दुसऱ्याची पत्रे फोडून, वाचून व त्यांतील मजकूर दुसऱ्यास कळविण्याची व्यवहारकुशलता अिंग्रजांजवळ कशी आहे,[४] फाशी झालेल्या क्रांतिकारकांच्या शिक्षा अधिक न वाढविण्याचा 'अुदारपणा' अिंग्रजी कोर्टात कसा दिसून येतो[५] अित्यादी वर्णनांतून सावरकरांनी अिंग्रजांवर अुपरोधिक हल्ले चढविले आहेत. सावरकरांच्या या अुपरोधिक टीकेतून मवाळ पुढारी आणि पक्ष व महात्मा गांधी व त्यांचा अहिंसावादी पक्ष सुटलेले नाहीत. त्यांच्यासंबंधी सावरकरांच्या मनात असलेला राग व्यक्तिदर्शनाच्या विवेचनात अुल्लेखिलेला आहेच. ना. गोखले व त्यांच्या नेमस्त पक्षाची चळवळ फक्त अिंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध होती आणि हिंदुस्थानातील सर्व चळवळीही अिंग्रज अधिकाऱ्यांविरुद्धच आहे असा नेमस्त पक्षाचा दावा होता. नेमस्तांच्या या धोरणाचा अुपहास करताना सावरकर अेके ठिकाणी लिहितात, "देशातील चाळीस कोटी रुपये लुटले जात आहेत म्हणून काही आम्ही चळवळ करीत नव्हतो. दुष्काळाने रुसो-जपानी युद्धाअितके लोक दरवर्षी मरत आहेत म्हणून आमची चळवळ नव्हती किंवा स्वदेशाला दारिद्र्याच्या नरकात वसावे लागत आहे म्हणूनही आमची चळवळ नव्हती; तर आमची चळवळ गेल्या वर्षातील फुल्लरच्या राजीनाम्यासाठी होती."[६] सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी स्वत:ला अभिषिक्त करून अिंग्रजी सत्ता झुगारून दिल्याची बातमी खोटी आहे हे अिंग्रजांना कळावे म्हणून आर. सी. दत्त यांनी 'लंडन टाअीम्सला' अेक पत्र धाडले. त्या पत्रातील मजकुराचे अत्यंत अुपहासास्पद वर्णन सावरकरांनी पुढीलप्रमाणे केले आहे. "सुरेंद्रनाथाला हल्ली फार गर्व झाला आहे व त्यामुळे त्यांच्या हातून असे हास्यास्पद प्रकार घडत आहेत. ब्राह्मणांच्या आशीर्वादवचनांची सुरेंद्रनाथांना भूक का लागावी हे मला समजत नाही. अितके लिहून खाली 'R. C. Datta' म्हणून सही केली आहे. पण पुन्हा शंका आली की, आपल्यावर अिंग्लिश लोकांचा विश्वास कसा बसेल? असे काय आपल्या अंगी आहे? योग्य वेळ विचार करून अुत्तम तोड काढली व वरील नुसत्या सहीखाली 'Late Civil Servant' 'आपलाच अेक बंदा गुलाम' म्हणून असलेल्या थोर पदवीने राजनिष्ठा नम्रतापूर्वक नमूद केली."[७] म. गांधींच्या

---

१. ल. बा. पृ. ४. २. लं. बा. पृ. २६. ३. लं. बा. पृ. ८६.
४. मॅ. आत्म. नि राज. ५. ते. ता. पृ. ३३. ६. लं. बा. पृ. १०.
७. लं. बा. पृ. १२.

व अितर पुढाऱ्यांच्या मार्गावरील अशीच अेक अुपरोधिक टीका पाहण्यासारखी आहे. क्रांतिकारकांच्या क्रांतीच्या धोरणाचे सविस्तर विवेचन करून लगेच सावरकर लिहितात, " काय वेडे धोरण हे ! विधिमंडळे, खादी-मंडळे, शिवोत्सव, शुद्धी, स्वदेशी अित्यादी अत्यंत अुपयुक्त आणि सुखासीन अुपायांनी स्वदेशाची वैठी प्रगती करण्याचे सोडून या क्रांतिकारकांच्या, कानठळ्या वसविणाऱ्या पोरखेळांच्या घोडदौडी प्रगतीत शिरून दातवीत फोडून घेण्याचे संकट स्वत:वर ओढून घ्यावयास आम्हा सभ्य गृहस्थास वेड थोडेच लागले आहे !"[1] क्रांतिकारकांच्या अुठावणीने ब्रह्मदेशच्या सरसीमेवर चीन आणि अिंग्रज यांचे युद्ध जुंपले, तर सरकारने काय करावे याचे सावरकरांनी केलेले आणखी अेक अुपरोधिक वर्णन पाहा. " कोण ही वंडगिरी ! सरकार महात्मा गांधीस का तिकडे धाडीत नाही ! ते गेले तर सत्य अहिंसा नाही तर निदान वनस्पत्याहार अशा कोणत्या तरी गालभरू मुर्दाड तत्त्वाच्या नावाखाली तेव्हाच ब्रह्मी लोकांस समजावील की, अिंग्रजांशी अशा युद्धाच्या वेळी निरपेक्ष, विनअट, विनवोभाट मागतील तो सहकार करणे आणि साह्य देणे हेच खऱ्या असहकारितेचें लक्षण आहे."[2]

सावरकरांच्या शैलीतील स्वभाषाभिमान त्यांच्या वाढत्या हिंदुत्वनिष्ठेवरोबर अधिक तीव्र होत गेल्याचे दिसून येते. मॅझिनीचे चरित्र व 'लंडनची वातमीपत्रे' हे ग्रंथ त्यांच्या चरित्र-आत्मचरित्रात्मक ग्रंथांत कालक्रमाने प्रारंभीचे ग्रंथ होत. या ग्रंथानंतर सुमारे वीस वर्षांनी सावरकरांचे आत्मचरित्रात्मक दोन ग्रंथ लिहिले गेले. 'तेजस्वी तारे' या चरित्रलेखांचे लेखनही आत्मचरित्रलेखनाच्या कालखंडातीलच आहे. या दोन कालखंडांत लिहिलेल्या सावरकरांच्या चरित्र-आत्मचरित्र-ग्रंथांची भाषाशैलीच्या दृष्टीने तुलना केली, तर अंदमानकारावासोत्तर लिहिलेल्या आत्मचरित्रातील भाषाशैली ही स्वभाषेच्या अभिमानाने अधिक भारलेली दिसते. याचा स्पष्ट अर्थ असा की, अंदमानातील परधर्मीय बंदीसमूहाशी झालेल्या संघर्षातून सावरकरांचा हिंदुत्वाभिमान अधिक अुत्कट वा तीव्र झाला आणि भाषा व लिपी या क्षेत्रातही तो प्रकट होअू लागला. अिंग्लंडमधील वास्तव्यात परभाषेतील शब्दांचा वापर ते फार कटाक्षाने टाळताना दिसत नाहीत. अुदाहरणार्थ 'लंडनच्या बातमी-पत्रा'त त्यांनी 'थर्मामीटर',[3] 'कायदे',[4] 'अर्ज',[5] 'शिफारस'[6] हे शब्द वापरले आहेत. पण 'माझी जन्मठेप' किंवा 'माझ्या आठवणी'त याच शब्दांबद्दल त्यांनी कटाक्षाने स्वभाषांतील पुढील शब्द वापरले आहेत. 'औष्ण्यमापन'[7] (थर्मामीटर) 'निर्वंध'[8] (कायदा), 'आवेदन'[9] (अर्ज), 'अनुरोध'[10] (शिफारस), अेवढेच

---

१. ते. ता. पृ. ४०. २. ते. ता. पृ. ४१. ३. लं. बा. पृ. १. ४. लं. बा. पृ. ३३
५. लं. बा. पृ. १०९. ६. लं. बा. पृ. १२८. ७. मा. जन्म. पृ. १४९.
८. मा. आ. पृ. १३७. ९. मा. जन्म. पृ. ५०५. १०. मा. जन्म. पृ. ४११.

नव्हे तर प्रत्येक अरबी, फारशी वा अिंग्लिश अशा परकीय शब्दांना स्वभाषेतील प्रतिशब्द जाणीवपूर्वक वापरण्याचा प्रयत्न आपल्या दोनही आत्मचरित्रांतून व 'तेजस्वी तारे' या चरित्रग्रंथातून केल्याचे दिसून येते. अुदाहरणादाखल पुढील काही शब्द पाहा : 'दंडविधान', 'काराधिप', 'सहाभियुक्त', 'नौसाधन', 'आन्हिकी', 'प्रमाणपत्र', 'ध्वनिवाहक', 'भौगर्भिक', 'भित्तीपत्र', 'स्तंभ', 'कक्षमय', 'गणवेष', 'पर्यवेक्षक', 'अुत्तरदायी', 'दूरध्वनी', 'गृहमंत्री', 'सेनानिवेश', 'त्रुटी', 'प्रतिमूल्य', 'विधिमंडळ', 'औपनिवेशिक स्वायत्तता', 'मानचित्र', 'विध्वंसिका', 'दर्शिका', 'त्वर्य', 'गुप्तचर विभाग', 'दृष्टिबद्ध कारावास', 'रणतरी' अित्यादी. भाषाशुद्धी व लिपिशुद्धी या विषयांचा स्वतंत्र विचार अन्यत्र करावयाचा आहे. येथे फक्त अेवढेच दाखवावयाचे आहे की, सावरकरांच्या भाषाशैलीचे स्वरूप निश्चित करण्यास त्यांच्या ठायीचा हिंदुत्वाभिमान हा अेक प्रमुख घटक ठरलेला आहे. सावरकरांची क्रांतिवृत्ती व त्यांच्या ठिकाणी असणारे मूलगामित्व यांचाही ठसा त्यांच्या भाषाशैलीवर अुमटलेला आहे. या दोन्ही प्रवृत्तींमुळे मराठी भाषेच्या मोडणीत, विशेषत: क्रियापदांच्या स्वरूपात बदल करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या चरित्रात्मक लेखनातही केल्याचे दिसते. दुशब्दी क्रियापदांअैवजी अेकेरी स्वतंत्र क्रियापदे काही तुरळक ठिकाणी त्यांनी वापरलेली आहेत. अुदाहरणार्थ, 'परिणामला',[1] 'तरकला'[2] (तर्क केला), 'अुपयोगिला'[3] अित्यादी.

सारांश, मुख्यत: प्रचाराच्याच भूमिकेतून सावरकरांनी आत्मचरित्र-चरित्रात्मक लेखन केले. चरित्रविषयांची निवड त्यांनी समानधर्माच्या तत्त्वावरच केली. चरित्रवाङ्मयातून आपली विशिष्ट मते व रागद्वेष त्यांनी प्रकट केले. आपल्या चरित्रग्रंथांची सजावटही त्यांनी आपल्या विशिष्ट व्यक्तित्वानुरूपच केली आणि या सर्वांतून त्यांनी सहजरीत्या आत्माविष्कार साधला हेच सिद्ध होते.

---

१. मां. आ. पृ. १८१. २. मा. आ. पृ. ३०८. ३. ते. ता. पृ. ५१.

४

इतिहासकार सावरकर

प्रास्ताविक

सावरकरांचे अितिहासविषयक ग्रंथ पाच आहेत आणि त्यांतील चारच आज अुपलब्ध आहेत. अुपलब्ध ग्रंथांपैकी 'अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर', 'हिंदु-राष्ट्राच्या अितिहासातील सहा सोनेरी पानें', 'हिंदुपदपादशाही' आणि 'नेपाळी आंदोलनाचा अितिहास' या चार ग्रंथांची पृष्ठसंख्या बाराशेच्या आसपास जाते. स्वतः सावरकरांनीच सांगितल्याप्रमाणे अेकूण सावरकर साहित्याची पृष्ठसंख्या 'सात-आठ सहस्र पृष्ठे' आहे.[१] म्हणजे त्यांतील अेक सप्तमांशापेक्षा अधिक भाग सावरकरांच्या अितिहासविषयक ग्रंथांनी व्यापलेला आहे. 'शिखांचा अितिहास' हा सावरकरांचा मराठीत लिहिलेला ग्रंथ मात्र अुपलब्ध नाही. या अितिहास-ग्रंथाचा साद्यंत 'अितिहास' श्री. शि. ल. करंदीकरांनी 'सावरकर चरित्रा'त दिलेला आहे.[२] १९१० च्या सुमारास 'शिखांचा अितिहास' सावरकरांनी अिंग्लंड-मध्ये लिहिला. परंतु 'त्याच्या जन्माच्याच' क्षणी राज्यक्रांतीच्या झगडयाच्या निष्ठुर आघातांनी त्याला गळा दाबून मारण्यात आल्याचा अुल्लेख स्वतः सावरकरांनी केला आहे.[३] अलीकडे लिहिलेल्या 'सहा सोनेरी पाना'त सावरकरांनी या ग्रंथाची सर्व माहिती देअून तो कसा नष्ट झाला याचा खुलासा केलेला आहे.[४]

'शिखांच्या अितिहासा'प्रमाणेच 'सत्तावनचे स्वातंत्र्य समर' या ग्रंथाचा अितिहासही असाच अद्‌भुत आहे. हा ग्रंथ सावरकरांनी १९०७ साली अिंग्लंडमध्ये असताना मुळात मराठीत लिहिला होता. 'अभिनव भारत' या संस्थेच्या वतीने प्रसिद्ध करण्यासाठी तो त्यांनी भारतात पाठविला; परंतु ब्रिटिश सरकारने हा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यावर बंदी घातली व भारतात दशहतीचे असे वातावरण अुत्पन्न केले की, हा ग्रंथ भारतात छापणेच अशक्य व्हावे. अखेर तो जसाच्या तसा सावर-करांकडे परत पाठविण्यात आला. पुढे त्या ग्रंथाचे अिंग्रजीत भाषांतर करून तो हॉलंडमध्ये छापण्यात आला. पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर अभिनव भारत संस्थेचे

---

१. हिं. अि. स. सो. पाने पृ. ९६३. २. सा. च. पृ. ३१३, ३१४, ३१५.
३. हिं. पा. भूमिका पृ. २. ४. स. सो. पा. पृ. ९५३.

अेक कार्यकर्ते डॉ. कुटिनो यांनी तो मूळ मराठी ग्रंथ अमेरिकेत नेला. १९४६ मध्ये '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या अिंग्रजी ग्रंथावरील बंदी भारत सरकारने परत घेतल्यावर डॉ. कुटिनो यांनी मूळ मराठी ग्रंथ भारतात श्री. सावरकर यांच्याकडे पोचता केला. आता या ग्रंथाचा हा अद्भुत अितिहास अुपलब्ध झाला आहे.[१] अितकेच नव्हे तर सावरकरांनी लिहिलेला मूळ मराठी ग्रंथही आता 'समग्र सावरकर वाङमया 'च्या आठव्या खंडात प्रकाशित करण्यात आला आहे. या ग्रंथाचे अद्वितीयत्व वर्णन करताना सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी लिहिले आहे. "सत्तावनचे स्वातंत्र्य समर हा सावरकरांचा असामान्य ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच दोन देशांनी त्यावर बंदी घातली होती हे अुदाहरणही जगाच्या अितिहासात अद्वितीय आहे."[२] सावरकरांच्या या ग्रंथावर प्रतिकूल व अनुकूल अशी टीकाही वरीच झाली आहे. सर व्हॅलेन्टाअीन चिरोल यांनी या पुस्तकाचा अंतर्भाव 'ज्वालाग्राही वाङमय' या नावाच्या लेखात केला असून, या पुस्तकाला पुढील प्रशस्तिपत्र दिले आहे :

> " A very remarkable history of the mutiny combining considerable research with the grossest perversion of facts and great literary power with the most savage hatred."[३]

प्रसिद्ध अितिहासकार प्रा. न. र. फाटक यांनी आपल्या 'शिपायांची गर्दी' या पुस्तकात सावरकरांच्या या ग्रंथाचे मूल्यमापन करताना लिहिले आहे : "शिपायांच्या अुठावाला बंड लेखून त्याच्या अनुरोधाने हिंदी जनतेला नालायक ठरवू पाहणाऱ्या मतप्रणालीची प्रतिक्रिया म्हणजे वीर सावरकरांचे पुस्तक असून त्याला प्रतिक्रियेपुरते संदर्भ साहित्याच्या परंपरेत अवश्य स्थान आहे."[४] प्रसिद्ध समाजवादी पुढारी अशोक मेहेता यांनी या पुस्तकाला मोठे मार्मिक प्रशस्तिपत्र दिले आहे. श्री. मेहेता लिहितात–" It is poetry, passion and patriotism; it reads more like a declaration of war. "[५]

श्री. राजगोपालचारियर यांच्यासारखा सावरकर-तत्त्वज्ञान पराङमुख असणारा मुत्सद्दीही असे अुघडपणे सांगतो की, आमच्या राजकारणी स्फूर्तीचा अुगम या ग्रंथाशी जाअून भिडलेला आहे.[६] दुर्मिळ झालेले हे पुस्तक सर चार्लस-क्लीव्हलंड-जवळून मागून घेऊन ते वाचण्याचा मोह मरहूम मौलना महंमद अल्लींना अनावर झाला अशी माहिती बॅ. असफअल्ली यांनी आपल्या आठवणीत नमूद करून ठेवलेली आहे.[७] अितिहासकार श्री. ओतुरकर यांनी या ग्रंथाचे अितिहास वाङमयातील

---

१. स. सा. वा. खंड ८ – निवेदन पृ. १ ते १०. २. वीर सा. अ. म. वि. केसरी पृ. ८३. ३. Indian Unrest p. 149. ४. शि. ग. पृ. ४१७. ५. हिंदु. अ. वि. १९५८, पृ. ४८. ६. सा. च. – श्री. करंदीकर, पृ. २९१–९२. ७. Life of Savarkar by – Chitragupta p. 180.

श्रेष्ठत्व प्रस्थापित करताना निर्भीड अभिप्राय दिला आहे की, १८५७ चे समर निव्वळ भौतिक हक्कांचा झगडा नसून ते पवित्र स्वातंत्र्ययुद्ध होते ही गोष्ट–त्याबद्दल वाद करणारे खुशाल करोत–ठसठशीतपणे प्रथम मांडण्याचे काम वीर सावरकरांनीच केले.[1]

सावरकरांच्या 'हिंदुपदपादशाही' या पुस्तकाचे स्वत: सावरकरांनीच केलेले मूल्यमापन काहीसे अत्युक्तीचे, आत्मप्रौढीचे वाटले तरी अितिहास वाङ्मयात त्याचे स्थान ठरविण्याच्या दृष्टीने ते विवेचन अभ्यासकांना अुपयुक्त ठरणारे आहे. सावरकरांनी लिहिले आहे : "शक्य तितक्या तिन्हाअीत दृष्टीने बघितले तरी आमचे आम्हांस ते पुस्तक (हिंदुपदपादशाही) मराठ्यांच्या तत्कालीन अितिहासावरील अितर आज अुपलब्ध असलेल्या कोणत्याही पुस्तकापेक्षा अत्यंत मार्मिक... आहे असे वाटते."[2] याच संदर्भात या पुस्तकाचे वर्णन करताना 'अद्वितीय' असे विशेषण सावरकरांनी लावले आहे.[3] श्री. ग. वि. केतकरांनी याच पुस्तकाला 'जिवंत अितिहासलेखन' या शब्दांनी गौरविले आहे.[4]

सावरकरांच्या अितिहासवाङ्मयावरील अनुकूल व प्रतिकूल अभिप्राय पाहिले म्हणजे अभ्यासकांना अेक सावध निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही की, अितिहासवाङ्मयक्षेत्रात सावरकरांनी स्वत:ची अशी स्वतंत्र मुद्रा अुमटविली आहे आणि अितिहाससंशोधक किंवा संकलनकार या भूमिकेपेक्षा समीक्षकाची भूमिकाच त्यांनी मुख्यत: स्वीकारली आहे; आणि जे समीक्षण त्यांनी केले आहे ते त्यांच्या स्वतंत्र अशा व्यक्तिनिष्ठ ध्येयदृष्टीने केलेले आहे.

अितिहास-वाङ्मयातून आत्माविष्कार

अितिहासाकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टी ही त्यांच्या वैयक्तिक ध्येयवादातून, व्यक्तित्वातील विविध निष्ठांतून, श्रद्धांतून, विशिष्ट राष्ट्रीय वा राजकीय मतप्रणालीतून, आशा-आकांक्षांतून नि आग्रहातून कशी बनली हे आपणास आता सविस्तर पाहावयाचे आहे. येथे अेक मूलभूत प्रश्न असा अुत्पन्न होतो की, अितिहास-वाङ्मय हे वस्तुत: वस्तुनिष्ठ स्वरूपाचे वाङ्मय असून ते लेखकाच्या आत्माविष्काराचे साधन कसे होअू शकते ? या प्रश्नाचे होकारात्मक अुत्तर प्रसिद्ध अितिहाससंशोधक प्रा. द. वा. पोतदार यांनी 'केळकर वाढदिवस मंडळा 'तर्फे प्रकाशित केलेल्या ग्रंथातील अेका लेखात दिले आहे. केळकरांनी लिहिलेल्या आयर्लंडच्या अितिहासावर विवेचन करताना आयर्लंडचे अितिहास बहुरंगी का झाले आहेत याचा अूहापोह प्रा. पोतदारांनी प्रारंभी करून पुढे लिहिले आहे : "अशा वेळी स्वत:च्या

---

१. हिंदु–स्वा. वि. १९५८–पृ. ४८. २. स. सो. पाने पृ. ९२१. ३. स. सो. पाने पृ. ९२२. ४. हिं. पा. प्रस्तावना पृ. ३.

मनाचा व मतांचा रंग साहजिकच अभ्यासाच्या विषयावर अुठणे अपरिहार्य होते."[1] सावरकरांचे व्यक्तिमत्त्वच मुळात आक्रमक स्वरूपाचे. तेव्हा त्यांच्या अितिहासवाङ्मयावर त्यांच्या मनाचे व मतांचे रंग अगदी ठसठशीतपणे अुमटले नाहीत तरच नवल.

अितिहासाकडे पाहण्याची हिंदुराष्ट्रवादी दृष्टी

सावरकरांच्या मनाचा शोध घेतला तर असे दिसते की, सर्वसाधारणपणे अितिहास या वाङ्मयप्रकाराचे त्यांना बालपणीच मोठे आकर्षण वाटत होते. त्यांच्या 'माझ्या आठवणी' या आत्मवृत्तात याबद्दलचे अनेक पुरावे पूर्वी दिलेलेच आहेत. 'Short History of the World', 'Stories of Nations' आणि 'राष्ट्रकथामाला' या प्रमुख तीन ग्रंथांनी सावरकरांची अितिहासविषयक जिज्ञासा वाढीस लावली. अितिहासाच्या वाचनाची ही प्रारंभीची प्रतिक्रिया प्रामुख्याने जिज्ञासायुक्त, संशोधनाकडे कलणारी व बरीचशी व्यापक स्वरूपाची आहे याची साक्ष त्यांना बालवयात स्फुरलेल्या 'अितिहासाचे पहिले पान न मिळणे कधी पाहायाते' या ओळीवरून पटते. पण पुढे जाणत्या वयाबरोबर राष्ट्रस्वातंत्र्याचा विचार जेव्हा मनात प्रबल होअू लागला तेव्हा राष्ट्रस्वातंत्र्याचे– आणि तेही मराठ्यांच्या स्वातंत्र्याचे– अितिहास अधिक प्रिय वाटू लागले; आणि तेही स्वाभाविक होते. पेशवाअीच्या अैश्वर्याची साक्ष देणारे चौदा चौकी वाडे ते नित्य पाहात होते, स्वातंत्र्यार्थ लढणाऱ्या पुरुषांच्या आख्यायिका ते ग्रामस्थांकडून अैकत होते. ते स्वातंत्र्य अुपभोगिलेल्या आपल्या पूर्वजांचे पालखीसारखे अवशेष त्यांच्या नित्य अवलोकनात येत होते. अशा संस्कारक्षम वयातच त्यांच्या हातात पेशव्यांच्या आणि छत्रपतींच्या बखरी पडल्या होत्या. मराठी राज्यसत्तेबद्दल सादर अभिमान त्या बखरींच्या वाचनाने निर्माण होत होता. या सर्वांची परिणती स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेत झाली आणि मग पुढील सर्व अैतिहासिक वाङ्मय याच दृष्टिकोनातून वाचले जाअू लागले. नाशिक आणि पुणे येथील 'अभिनव भारता'च्या गुप्त सभांतून त्यांनी आपल्या ध्येयाला पूरक अशा अैतिहासिक सिद्धान्ताचा प्रचार धडाक्याने सुरू केला. अितिहासाकडे पाहण्याचा अेक विशिष्ट ध्येयाधिष्ठित दृष्टिकोन महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळातच सिद्ध झाला. स्वत: सावरकरांनी हे सांगितले आहे. 'सहा सोनेरी पाना'तून आपल्या अितिहास-लेखनकार्याचा आढावा घेताना त्यांनी लिहिले आहे : "आमच्या महाशालेय (Collegian) कालातच आम्ही त्या वेळच्या मराठी अितिहासाच्या विस्तृत पण विस्कळित पसाऱ्यावर हिंदुराष्ट्र दृष्टीच्या विद्युल्लतेचा प्रकाशझोत टाकताच आमचे मनही अकस्मात प्रकाशमय झाले."[2]

---

१. केळकर वा. गो. ग्रं. पृ. १९२. २. स. सो. पाने पृ. ९२०.

पुढे हीच अितिहासविषयक दृष्टी घेअून सावरकर अिंग्लंडमध्ये अुतरले. श्री. रमेशचंद्र दत्त आणि ना. गोखले यांच्याशी अिंग्लंडमध्ये अितिहासविषयक किंवा राजकारणविषयक चर्चा करताना सावरकरांनी आपली स्वत्वनिष्ठ दृष्टीने अितिहास वाचण्याची भूमिका आग्रहाने प्रतिपादन केली.[१] अिंग्लंडमध्येच सावरकरांनी दोन अितिहासग्रंथांचे लेखन (५७ चे स्वातंत्र्यसमर, शिखांचा अितिहास) केले आहे. हे दोन्ही ग्रंथ अि. स. १९०८–०९–१० साली अिंग्लंडमध्ये लिहिल्याचे सावरकर सांगतात.[२] अर्थात ते ग्रंथ स्वत्वयुक्त राष्ट्रीय–म्हणजेच हिंदुराष्ट्रीय–दृष्टिकोनातून लिहिले गेले असले पाहिजेत असा निष्कर्ष काढणेच तर्कशुद्ध ठरते; आणि या तर्काला सावरकरांच्या स्वदस्तुरचा आधारही आहे.[३] या दोन ग्रंथांशिवाय 'हिंदुपदपादशाही', 'नेपाळी आंदोलनाचा अितिहास' आणि 'भारताच्या अितिहासातील सहा सोनेरी पाने' हे ग्रंथही सावरकरांनी हिंदुराष्ट्र दृष्टिकोनातूनच लिहिले आहेत. 'हिंदुपदपादशाही' हे पुस्तक 'हिंदुराष्ट्रीय दृष्टिकोनातून' लिहिल्याचे सावरकरांनी सांगितले आहे.[४] नेपाळने हिंदुस्वातंत्र्याचे संरक्षण केले आणि नेपाळ हे हिंदूंचे राज्य होते हेच 'नेपाळच्या आंदोलनाच्या अितिहासा'चे सूत्र सावरकरांनी स्पष्ट केले आहे.[५] 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' या ग्रंथात सावरकरांनी अि. स. ७ व्या शतकापर्यंत हिंदुराष्ट्राचे सारे जीवन केवळ परकीयांच्या दास्यातच व्यतीत झालेले नव्हते हे अनेक पुरावे देअून सिद्ध केलेले आहे.[६] आणि पुढे अिसवी सनाच्या ८ व्या शतकापासून तो अठराव्या शतकापर्यंत हिंदु-मुसलमान व अिंग्रज यांच्याशी हिंदुराष्ट्राच्या झालेल्या स्फूर्तिदायक संघर्षाचे हिंदुराष्ट्रीय दृष्टचा समीक्षण केले आहे.[७] सारांश सावरकरांनी लिहिलेल्या सर्व अितिहासवाङ्मयाचे स्वरूप 'हिंदुराष्ट्रदृष्टचा' केलेल्या समीक्षणाचे आहे. हे सर्व ग्रंथ प्रायः 'समीक्षणात्मक' आहेत असे सावरकरांनी पुनःपुन्हा सांगितलेले आहे.[८]

अितिहासविषयक ही दृष्टी निश्चित झाल्यानंतर त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून जे जे भारतीय अितिहास या दृष्टीने लिहिले गेले नाहीत ते ते नेमके निवडून त्यातील अपसिद्धान्तांचे खंडण करणे ओघानेच येते आणि सावरकरांनी ते सर्व जाणीवपूर्वक आणि अभिनिवेशाने केलेही आहे. 'हिंदूंचा अितिहास हा पराभवाची अेक मालिका वा जंत्री आहे' या विधानाची असत्यता पटवून देण्याचा सारखा प्रयत्न सावरकरांनी आपल्या सर्व अितिहासग्रंथांतून केलेला आहे. यासाठी त्यांनी आपल्या

---

१. सा. च. – शि. ल. करंदीकरकृत – पृ. २०९. २. स. सो. पाने – पृ. ९५३, १५६. ३. स. सो. पाने – पृ. ९५३–९५६. ४. स. सो. पाने – पृ. ९२१. ५. स. सो. पाने – पृ. ९२१. ६. स. सो. पाने – पृ. ६८० ते ६८२. ७. स. सो. पाने – पृ. ६८४ व ९५१. ८. स. सो. पाने – पृ. ८६८, ८९९, ९०९, ९२१.

खंडनाला पूरक अशा पाश्चात्त्य अितिहासकारांच्या साक्षी काढल्या आहेत. अुदाहरणार्थ, अलेक्झांडरचा चरित्रकार प्लुटार्च[1] आणि 'Early History of India' या ग्रंथाचा लेखक व्हिन्सेन्ट स्मिथ[2] यांच्या साक्षी पाहण्यासारख्या आहेत. आपले शालेय अितिहास कसे चुकीचे लिहिले गेले आहेत याचे अनेक पुरावे सावरकरांनी पुढे मांडले आहेत. या दृष्टीने पुढील काही नमुने अुल्लेखनीय आहेत. पौरस आणि अलेक्झांडर यांच्या भेटीत अलेक्झांडरने पौरसाला राजासारखे वागवावयाचे मान्य केले. त्यात अलेक्झांडरचे औदार्य नसून स्वाभिमानी पौरसाला काही राजकीय डावपेचासाठी त्याने तसे वागविले.[3] शिकंदरला 'जग जिंकण्याला अुरले नाही' ही आख्यायिकाही शिकंदरला नसती बडेजावी देणारी व भारताला हीनपणा आणणारी आहे. तेव्हा जनमनांची दिशाभूल करणारा अितिहास व दंतकथा लिहू नयेत असे सावरकर सांगतात.[4] हूणानंतर मध्यंतरीच्या काळातील हिंदूंच्या स्थितीविषयी न लिहिता अितिहासकार अेकदम हिंदूंवर मुसलमानांची स्वारी झाली असे सांगतात आणि मध्यंतरीचा हिंदूंचा अितिहास ते अजिबात वगळतात. त्यामुळे जणू काही हिंदूंचा अितिहास परकीय आक्रमणांचा वा परक्यांनी सतत केलेल्या स्वाऱ्यांचा अितिहास आहे की काय असे वाटते. अितिहासकारांची चूक सावरकर आवर्जून दाखवून देतात.[5] शालेय अितिहासात वारंवार आढळणारी आणखी अेक चूक म्हणजे हिंदूंनी आपल्या शत्रूवर प्रत्याक्रमणे कधीच केली नाहीत. त्यांनी आक्रमणांचा प्रतिकारच केला नाही अशा स्वरूपांचा गैरसमज पसरविणारी विधाने त्यात केली जातात. किंवहुना अशा स्वरूपाचे अितिहासलेखक तो गैरसमज बुद्धिपुरस्सर निर्माण करतात.[6] अेतदर्थ सावरकरांचे स्पष्ट सांगणे आहे की, असा विपरीत समज होअू नये म्हणून अितिहासलेखकांनी मुसलमानांच्या स्वाऱ्या, स्वाऱ्यांतील मध्यंतराचा काल नि त्या त्या काली हिंदूंनी केलेला यशस्वी प्रतिरोध किंवा अयशस्वी असला तथापि केलेला प्रतिकार यांचा स्पष्ट ठसा वाचकांच्या मनावर बिंबेल अितक्या प्रमाणबद्ध नि परिणामकारक ठळकपणे त्या त्या घटना वर्णिल्या पाहिजेत."[7]

अितिहास वाङ्मयातून प्रकट होणारे व्यक्तिमत्त्व

हिंदुराष्ट्रीय दृष्टिकोनातून अितिहासाचे समीक्षण करण्यास सावरकरांनी प्रारंभ केल्यावर परकीय वा स्वकीय अितिहासकारांनी केलेल्या चुका सावरकरांच्या दृष्टीस येअू लागल्या आणि मग त्यांनी बुद्धकालापासून तो अिंग्रजांच्या दास्यातून भारत स्वतंत्र झाल्यापर्यंतचा संपूर्ण काल या दृष्टीने अभ्यासिला; आणि अितिहास-

---

१. स. सो. पाने – पृ. ६०७. २. स. सो. पाने – पृ. ६११. ३. स. सो पाने – पृ. ५९२. ४. स. सो. पाने – पृ. ६२७, ६२८. ५. स. सो. पाने – पृ. ६८३. ६. स. सो. पाने – पृ. ६९८. ७. स. सो. पाने – पृ. ६९८, ६९९.

विषयक समीक्षणात्मक ग्रंथ लिहिताना 'अतिहास कसा लिहावा' आणि 'कसा वाचावा' याबद्दल आपली ठाम अशी भूमिका त्यांनी स्वीकारली. ही त्यांची भूमिका म्हणजेच 'अतिहासकार सावरकरां'ची भूमिका होय.

अतिहासकार सावरकर यांची ही भूमिका त्यांच्या व्यक्तित्वातील विविध पैलूंनी साकार झाली आहे. त्यांच्या व्यक्तित्वातील सारे रंग त्यात मिसळले आहेत. हिंदुत्वनिष्ठा ही त्यांच्या व्यक्तित्वातील प्रमुख निष्ठा येथे प्रकर्षाने दिसते. त्यांच्यातील स्वातंत्र्यनिष्ठा ही सर्व अतिहास ज्वलंत आणि जिवंत करते. त्यांच्यातील काव्यात्मकतेमुळे तर त्या मूळच्या रुक्ष अतिहासाला रसरशीतपणा आणि सौंदर्य प्राप्त होते. त्यांचा बुद्धिवाद हा मूळच्या घटनांचे सत्याधिष्ठित व प्रामाणिक समीक्षण करण्यास त्यांना साहाय्यभूत होतो. बुद्धिनिष्ठेने भेदक झालेली त्यांची संशोधनदृष्टी काही नवीन पण हिंदुत्वानुकूल घटितांचे अर्थ अुलगडून दाखविते आणि या सर्वांसमवेत त्यांच्यातील युक्तिवादाचे चापल्य, मानव-हितदृष्टी आणि व्यवहारवाद, शस्त्र-सामर्थ्यावरील अढळ निष्ठा आणि हौतात्म्य वृत्तीचे आकर्षण, प्रतिशोध घेण्याची प्रवृत्ती आणि रागद्वेष, अनुभवातून सिद्ध झालेले ठाम राजकीय सिद्धान्त आणि प्रचारकी वृत्ती अित्यादी सर्व व्यक्तिविशेष आपले अस्तित्व प्रकट करताना आढळतात. सावरकरांचे अतिहासग्रंथ अभ्यासिताना त्यांचे हे वरील व्यक्तिविशेष कुठे कुठे आढळतात हे आता पाहावयाचे आहे.

बुद्धिनिष्ठा

सावरकर जरी अेका विशिष्ट हिंदुत्ववादी दृष्टिकोनातून अतिहासाकडे पाहात असले तरी अतिहासकार म्हणून त्यांची मूळ भूमिका बुद्धिनिष्ठ, सत्याधिष्ठित आहे. 'सहा सोनेरी पाने' लिहिताना प्रारंभीच त्यांनी सांगितले आहे की, हिंदूंचा अतिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवाचीच काय ती अेक जंत्री आहे. या धडधडीत असत्याचा प्रतिकार करणे स्वराष्ट्राभिमानाच्याच दृष्टीने नव्हे, तर अैतिहासिक सत्याच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक आहे.[1] भूतकालातील हे सत्य सांगताना अतिहासकाराने कोणती दृष्टी स्वीकारली पाहिजे याचे स्पष्टीकरण करताना सावरकर लिहितात, "ज्या कार्यकर्त्याच्या कृतीचे वर्णन करण्याच्या अुद्देशाने अतिहासकार अतिहास लिहावयास घेतो, त्याच्या स्वतःच्या भावनांचे, हेतूंचे, विकारांचे आणि कृतींचे शक्यतोपर्यंत चित्र रंगविणे हे त्याचे मुख्य कर्तव्य आहे आणि त्यावेळेपुरता तो नुसत्या आपल्या आवडीनिवडीचाच नाही तर त्या भूतकालच्या वृत्तान्ताच्या : वर्तमानातील अुद्दिष्टावर व परिस्थितीवर होणाऱ्या संभवनीय परि-

---

१. स. सो. पाने – पृ. ५८६.

णामाविषयीच्या भीती, आशंकांचा देखील त्यांनें पूर्णपणे त्याग केल्यावाचून त्याला हे कर्तव्य अुत्तम रीतीने आणि यथातथ्य पाळता येणे शक्य नाही.... भूतकालातील व्यक्तीच्या कृत्यांच्या आणि हेतूविषयी अतिशयोक्ती, अन्योक्ती किंवा विपर्यास करून अर्थ लावला जाता कामा नये."[१]

भारतीय अितिहासाचे समीक्षण करताना सावरकरांची ही बुद्धिनिष्ठा सतत जागृत असल्याचे आढळून येते. अितिहासातील ज्या व्यक्ती त्यांना आदर्श व अनुकरणीय वाटतात, मराठ्यांच्या ज्या पराक्रमशाली अितिहासाचा त्यांना अभिमान वाटतो त्याची चिकित्सा करताना सावरकरांची ही बुद्धिनिष्ठा आपले कर्तव्य पार पाडताना दिसते. कल्याणच्या सुभेदाराची सून सालंकृत परत पाठवून आणि पोर्तुगीज किल्लेदाराच्या पाडाव झालेल्या शत्रुस्त्रीस गौरवून पतीकडे धाडून देअून शिवाजी महाराज आणि चिमाजी आप्पा, हिंदुधर्मातील परस्त्रीदाक्षिण्याच्या आणि अुदारपणाच्या सद्गुणविकृतीला वळी पडले असे सावरकर परखडपणे सांगतात.[२] मराठ्यांना अिंग्रज का जिंकू शकले याची मीमांसा करताना सावरकरांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, हिंदू हे सोळा आणे देशभक्तीत आणि सार्वजनिक हितकारक सद्गुणांत अिंग्रजांच्या मानाने पुष्कळच कमी पडले.[३] अितकेच नव्हे, तर महासागरांच्या पलीकडे असणाऱ्या अिंग्लंडने हिंदुस्थानला जिंकले, या विजयाबद्दल सावरकरांना अिंग्लंडचा मत्सर तर वाटत नाहीच, अुलट अिंग्लंडच्या सामर्थ्याचे व कौशल्याचे त्यांना कौतुक वाटते.[४] ज्या तेजस्वी देवलस्मृतीने हिंदूंच्या पुनरुज्जीवनाला प्रेरणा दिली त्या देवलस्मृतीतील अुणिवाही सावरकरांनी आपल्या भेदक बुद्धीने दाखविल्या आहेत.[५] अितिहास या साधनाची प्रेरक परिणामकारकता लक्षात घेअूनही सावरकरांची बुद्धिनिष्ठा कठोर आत्मदोषांचा निर्देश केल्याविना राहात नाही हेच खरे. अितिहासातील भावनात्मक वर्णनातही मूळ घटनेचे स्वरूप विकृत न व्हावे अशा बुद्धिनिष्ठ भूमिकेचे अितिहाससमीक्षण करण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला आहे.[६]

मानव्य-प्रेम

सावरकरांच्या बुद्धिवादी भूमिकेची परिणती मानवतावादात होते. अितिहासाचा अभ्यास करताना व अितिहासाचे मानवजातीवर होणारे परिणाम पाहताना सावरकर मानवताधिष्ठित भूमिका स्वीकारतात. मानवजातीतील सद्गुणांची व दुर्गुणांची निवड ते याच मनुष्यहिताच्या निकषावर करतात. हिंदूंच्या अितिहासाचा

---

१. हिं. पा. – पृ. ३, ४. २. स. सो. पाने पृ. ७२९. ३. हिं. पा. – पृ. १९३
४. हिं. पा. – पृ. २४२. ५. स. सो. पाने पृ. – ७३९. ६. स. सो. पाने – पृ. ९१४, ९१५.

त्यांच्या पराभवाचा विचार करताना हिंदूंच्या प्रचंड हानीला कारणीभूत होणाऱ्या 'सद्गुणविकृती'ची चिकित्सा सावरकरांनी केली आहे. मनुष्यजातीच्या बाबतीत कोणता सद्गुण आणि कोणता दुर्गुण याचा विचार करताना सावरकरांनी लिहिले आहे : "व्यवहारात आणि नीतिशास्त्रात तरी गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास अपकारक ठरतो तेव्हा तितक्याच मर्यादेपर्यंत तो सद्गुण समजला गेला पाहिजे आणि जेथून तोच गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अधःपातास कारणीभूत होतो, तेथून त्याचे दुर्गुणात रूपांतर होते. तो त्याज्य ठरतो."[1]

या मानवतावादी भूमिकेला सावरकर जेव्हा पोहोचतात तेव्हा अतिहास-वाचनाच्या परिणामाबद्दल ते तशीच सुसंगत व व्यापक भूमिका घेतात. अतिहासाचे प्रभावी साधन देशाभिमानाचा, राष्ट्रजागृतीचा स्फुल्लिंग पेटविण्यासाठी वापरले आहे हे खरे आहे. परंतु जेव्हा त्यांच्या व्यक्तित्वातील ही मानवतावादी भावना प्रबळ ठरते तेव्हा अतिहास हा मानवी ऐक्यासाठी वाचला जावा अशा विचारसरणीचा ते प्रभावी पुरस्कार करतात. आपली ही भूमिका विशद करताना सावरकरांनी लिहिले आहे : "आपण जे अतिहासाचे वाचन करावयाचे ते आपल्या पवित्र मातृभूमीच्या नावाने म्हणा किंवा ज्याने मनुष्यामनुष्यांत आणि जातीजातींत भेद अुत्पन्न केला त्या आपल्या भगवान परमेश्वराच्या नावाने म्हणा, जुनी भांडणे आणि कलह, द्वेष व रक्तपात चिरंतन चालविण्यासाठी सर्वोत्कृष्ट कारण काढण्याच्या अुद्देशाने करावयाचे नसून त्याच्या अगदी अुलट कारणासाठी म्हणजे कोणीही मनुष्य केवळ तो मनुष्य आहे– सर्वांचा सामान्य पिता जो परमेश्वर त्याचे संतान आहे– सर्वांची सामान्य माता जी धरणी तिच्याच दुधावर वाढलेला आहे– म्हणून दुसऱ्या मनुष्याकडे ओढला जावा अेवढ्यासाठी ज्या मूलभूत कारणांनी तो द्वेष आणि रक्त-पात, ती भांडणे आणि कलह अुत्पन्न झाले ती कारणे शोधून काढण्यासाठीच वं ह्या प्रकारांचे निर्मूलन करणारी अुत्कृष्ट साधने निश्चित करण्यासाठी करावयाला पाहिजे."[2]

व्यवहारवाद

मानवतावादी भूमिकेवरून सावरकरांनी रंगविलेला हा ध्येयवाद स्तुत्यच आहे. पण सावरकरांच्या व्यक्तित्वात ध्येयवाद आणि व्यवहारवाद यांचे विलक्षण मिश्रण असल्यामुळे सावरकर जेव्हा व्यवहारवादाकडे वळतात, तेव्हा अैतिहासिक सिद्धान्तांचे अर्थ ते आपल्या व्यक्तित्वानुसार लावू लागतात; आणि मग मोठे सामाजिक घटक बनण्याच्या प्रक्रियेमध्ये, निसर्गाच्या कडक निर्बंधान्वये, स्वार्थ-

---

१. स. सो. पाने – पृ. ९२०. २. हिं. पा. भूमिका – पृ. ५.

त्यागाच्या व झगडयाच्या घणाच्या योगाने रणभूमीच्या अैरणीवर त्या विस्तृत जीवनात हे रूपांतर करून घ्यावे लागते ही गोष्ट ते आग्रहाने सांगतात.[1] सावरकरांच्या मते मानवजातीतील ही अेकी सिद्ध करावयाची असेल तर निरनिराळ्या जातींनी आपली शारीरिक योग्यता प्रथम सिद्ध करावयास हवी आणि अखिल मनुष्यजातीचा सामाजिक किंवा राष्ट्रीय घटक म्हणून जिवंत राहावयाला आपण योग्य आहोत हे सिद्ध करून दाखविले पाहिजे.[2] तसेच अशा निरनिराळ्या जातींतील अेकीही तुल्यतेच्या, मित्रत्वाच्या, सन्मानाच्या आणि बरोवरीच्या नात्याने व्हावयास हवी. तशी योग्यताही ह्या जातीजातींनी परस्परांना पटवून द्यावयास हवी. या विचारसरणीतून भारतीय अितिहासाचे समीक्षण केले तर असे दिसते की, परकीय आक्रमकांशी हिंदूंनी चालविलेल्या प्राणांतिक झगडयात ही योग्यता सिद्ध करून दाखविण्याचा भार हिंदूंवर येअून पडला होता. अखेर हिंदूंनी हे युद्ध जिंकलेही. सावरकरांचा 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ म्हणजे हिंदूंच्या या विजयचिन्हांनी मुद्रांकित झालेला ग्रंथ होय. तेव्हा प्रामुख्याने या ग्रंथामागे आणि याशिवाय त्यांच्या अितर अितिहास ग्रंथांमागे सावरकरांच्या व्यक्तित्वातील हिंदुत्वनिष्ठा हीच प्रेरणा कशी प्रबळ होती हेच आता सविस्तर व साधार पाहावयाचे आहे.

हिंदुराष्ट्रदृष्टीने भारतीय अितिहासाचा लावलेला अर्थ

बुद्धकालापासून तो थेट अिंग्रजांशी केलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या झगडयापर्यंत घडलेल्या भारतीय अितिहासाचे समीक्षण सावरकरांनी याच 'हिंदुराष्ट्रीय दृष्टीने' केले आहे, याचा अुल्लेख पूर्वी आलेलाच आहे. त्यांचे हे सर्व अितिहासग्रंथ म्हणजे हिंदु-विजयाच्या गौरवगाथाच आहेत. हिंदुजाती ही परकीय आक्रमणांनी खचून न जाता, नामशेष न होता पुनरुज्जीवित होअून व प्रत्याक्रमण करून सन्मानाने पुन्हा अुभी राहिली आणि या जगात मानवजातीचा अेक घटक म्हणून जगण्याची योग्यता तिने सिद्ध केली, हे सूत्र सावरकरांच्या या सर्व अितिहासग्रंथांतून गुंफलेले आहे. भारतीय अितिहासातील घटनांचा हिंदुत्ववादी दृष्टिकोनातून अर्थ लावण्यातून सावरकरांचे व्यक्तित्व दिसून येते.

या दृष्टीने सावरकरांनी भारतीय अितिहासाच्या प्राचीन खंडाचा केलेला समारोप आणि त्यातून काढलेले काही सिद्धान्त पाहण्यासारखे आहेत. अि. स. पू. ६०० ते ७००, पर्यंतच्या साधारणत: १३०० वर्षांच्या या सुदीर्घ कालखंडात झालेल्या यवन, शक, हूण, अित्यादी शत्रूंच्या आक्रमणांनी हिंदुराष्ट्र व हिंदु-जाती नामशेष तर झाली नाहीच; अुलट या त्यांच्यावर विजय मिळवून शत्रूंचे अस्तित्वच काय पण

---

१. हिं. पा. भूमिका – पृ. ६. २. हिं. पा. भूमिका – पृ. ९.

'नाम'सुद्धा 'शेष' अुरू दिले नाही असे सावरकरांनी या विवेचनात सोदाहरण सिद्ध केले आहे.[१] या पहिल्या प्राचीन कालखंडाच्या विवेचनाचा रोख मुख्यतः हिंदुजातीवरील अेका आरोपाचे खंडन करण्यावरच आहे. 'हिंदूंचा अितिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवामागून पराभवांचीच काय ती अेक जंत्री आहे' असा अुपमर्दकारक आरोप हिंदुजातीवर परकीय व स्वकीय लोकांकडून केला जातो. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी या ग्रंथाचा प्रपंच केला आहे.[२] चाणक्य व चंद्रगुप्त, बिंदुसार, पुष्यमित्र, विक्रमादित्य, सम्राट कुमारगुप्त, युवराज स्कंदगुप्त, यशोधर्म या सर्व हिंदू राजांचे ध्येय अखिल व अखंड भारतीय साम्राज्याची स्थापना करण्याचे होते. म्लेंच्छांचे पारिपत्य करण्यासाठीच ते सर्व राजे झुंजले आणि या परकीय आक्रमकांना मागे हटवून हिंदूंच्या साम्राज्याची सीमा काबूल, कंदाहार, गझनीपर्यंत त्यांनी नेअून भिडविली होती.[३] तेव्हा या तेराशे वर्षांच्या कालखंडाचा निष्कर्ष असा की, कोणतेही परचक्र सारा भारत केव्हाही जिंकू शकले नाही.[४]

हिंदूंवरील आक्रमकांपैकी मुसलमानांच्या आक्रमणाचे स्वरूप कसे दुतोंडी आहे हे सावरकरांनी स्पष्ट केले आहे.[५] हिंदु-मुसलमानांच्या या झगडयात हिंदूंनी मुसलमानांचा प्रतिकार कोठेच केला नाही, या स्वकीय व परकीय अितिहासकारांच्या असत्य विधानांचे खंडन सावरकरांनी पुढील अनेक पुरावे देअून केले आहे. हूणांच्या स्वाऱ्यानंतर हिंदूंनी हिंदुकुशाच्या पलीकडील खोतानपर्यंत दिग्विजय केला होता. प्रत्यक्ष गझनी येथे राजा शिलादित्य राज्य करीत होता.[६] नंतर पुढील पाच शतके भारतावर परकीय आक्रमणे झालीच नाहीत. अितिहासकार व्हिन्सेन्ट स्मिथनेही हे मान्य केले आहे.[७] मुसलमानांची आक्रमणे सुरू झाल्यावरही मुस्लीम सत्तेला हिंदूंनी सिंध प्रांताबाहेर पाअूल टाकू दिले नाही.[८] पंजाबवरील पहिल्या मुसलमानी आक्रमकांना राजा जयपाल व त्याचा पुत्र अनंगपाल यांनी हिंदुराज्य व हिंदुधर्म संरक्षणासाठी अनेक लढाया देअून रोखून धरले होते.[९] खुद्द सोमनाथवरील स्वारीच्या वेळी सहस्रावधी हिंदु-वीरांनी हिंदुधर्मार्थ बलिदान केले.[१०] देवल व मेधातिथी यांच्या तेजस्वी स्मृतिग्रंथांनी प्रेरित होअून हिंदूंनी धार्मिक चढाअी केली होती. अनेक मुसलमान झालेल्या हिंदूंना शुद्ध करून घेतले होते.[११] मेधातिथीच्या तेजस्वी भाष्यामुळे प्रस्फुरित होअून दक्षिणेकडील हिंदु-राज्ये दिग्विजय करीत होती.[१२] अितकेच

---

१. स. सो. पाने – पृ. ६८१–८२–८३. २. स. सो. पाने – पृ. ५८६. ३. स. सो. पाने – पृ. ७९७. ४. स. सो. पाने – पृ. ६८०–८२. ५. स. सो. पाने – पृ. ६८६. ६. स. सो. पाने – पृ. ६८७. ७. स. सो. पाने – पृ. ६८७. ८. स. सो. पाने – पृ. ६९८. ९. स. सो. पाने – पृ. ७०४. १०. स. सो. पाने – पृ. ७०५. ११. स. सो. पाने – पृ. ७४४. १२. स. सो. पाने – पृ. ७४४.

नव्हे तर मेवाड, मारवाड, नेपाळ अित्यादी राज्यांच्या राजांनी मुसलमानांवर धार्मिक चढाअी करून सूडही अुगविला.[१] अतअेव, मुसलमानांच्या हिंदुस्थानावरील आक्रमणाच्या पूर्वार्धाच्या काळात असे दृश्य दिसते की, यवन, शक, हूणादिक परकीयांच्या सत्तेप्रमाणे मुस्लिमांनी हिंदुस्थानात स्थापिलेली अिस्लामी राज्यसत्ता अुखडून टाकून हिंदूंनी आपले राजकीय स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केले होते.[२]

मुसलमानी आक्रमणाच्या अुत्तरार्धाच्या काळातही ते हिंदूंचा संपूर्ण पराभव करू शकले नाहीत. अुलट हिंदूंची राज्ये दक्षिणेत फोफावली व अखेर अुत्तरेत अटकेपर्यंत जाअून हिंदूंनी आपले झेंडे फडकाविले. या अुत्तरार्धाच्या कालखंडात सावरकरांनी हिंदूंच्या पुनरुत्थानाचा आलेख काढलेला आहे. या आलेखात हिंदूंच्या वैभवाच्या काळाचे तीनचार बिंदू सावरकरांनी दर्शविले आहेत. अि. स. १००० ते १०३० या कालखंडात सर्व हिंदुस्थानावर मुसलमानांचे नावापुरतेही राज्य नव्हते; आणि भारत राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, व्यापारविषयक बाबतींत वैभवशाली देश म्हणून नांदत होता.[३]

दिल्लीच्या तख्तावर बसून अखिल हिंदु-साम्राज्याची स्थापना केल्याची घोषणा खुश्रूखानने अि. स. १३२० मध्ये केली. तो काळही असाच हिंदूंच्या राजकीय वैभवाचा काळ मानावा लागेल.[४]

खुश्रूखानच्या या राज्यक्रांतीचे परिणाम विजयनगरच्या साम्राज्यावर झाले. विजयनगरचे हे हिंदुराज्य ज्या वैभवात नांदत होते त्याची कल्पना पोर्तुगाल, अिराण या देशांच्या वकिलांनी केलेल्या वर्णनावरून येते.[५]

पुढे मराठ्यांनी 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना केली, आक्रमण हे नव्या मराठी रणनीतीचे सूत्र बनविले आणि अटकेपर्यंत जरिपटका फडकावून ह्या हिंदु-मुस्लिमांच्या दशशतव्यापी महायुद्धात अंतिम महान विजय मिळविला. अखेर हिंदुस्थानावरील मुस्लिम साम्राज्यसत्ता हिंदूंनी पादाक्रांत केली.[६]

ब्रिटिशांच्या आक्रमणाच्या काळातही हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वासाठी ब्रिटिशांना लढावी लागलेली सारी युद्धे हिंदूंशीच लढावी लागली[७] आणि अखेर सर्वांत महाबलाढ्य अशा ब्रिटिशांच्या सह्याद्या परचक्राचीही हिंदुस्थानने दाणादाण अुडविली.[८]

---

१. स. सो. पाने – पृ. ७४६–७४९. २. स. सो. पाने – पृ. ७८९. ३. स. सो. पाने – पृ. ८००. ४. स. सो. पाने – पृ. ८३५. ५. स. सो. पाने – पृ. ८७६–७७. ६. स. सो. पाने – पृ. ९४८, ९४९. ७. स. सो. पाने – पृ. ९५२. ८. स. सो. पाने – पृ. ९६७.

'हिंदूंचा अितिहास हा पराभवामागून पराभवांची अेक जंत्री आहे' हा आक्षेप खोडून काढण्यासाठी सावरकरांनी 'हिंदुराष्ट्रीय निर्भय दृष्टिकोना'तून भारतीय अितिहासाचा लावलेला अर्थ आतापर्यंत आपण पाहिला. याच दृष्टिकोनातून मराठ्यांच्या अितिहासाचे सविस्तर समीक्षण त्यांनी त्यांच्या 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथात केले आहे. महाराष्ट्रातील मराठे केवळ महाराष्ट्रासाठी लढले नाहीत. त्यांचा मूलतःच ओढा हिंदुधर्म, हिंदुराष्ट्र यांकडे होता. हिंदुस्थानवर हिंदुराज्य स्थापणे हाच त्यांचा हेतू होता. या विधेयाचे[1] स्पष्टीकरण सावरकरांनी या ग्रंथात केलेले आहे. म्हणूनच या ग्रंथास 'मराठ्यांचा अितिहास' असे नाव न ठेवता 'हिंदुपदपादशाही' असेच नाव त्यांनी ठेवले आहे.[2]

या ग्रंथात शिवाजीमहाराज, रामदासस्वामी, संभाजीमहाराज राजाराम-महाराज आणि पुढील सर्व पेशवे यांच्या कार्याचे अुद्दिष्ट हिंदु-साम्राज्य स्थापण्याचे कसे होते, याविषयी त्या वेळच्या मुत्सद्यांच्या पत्रांचे, राजलेखांचे, तत्कालीन काव्यांचे, परकीय अितिहासकारांचे अित्यादी अनेक पुरावे सावरकरांनी दिले आहेत. विस्तारभयास्तव त्या सर्वांचा क्रमवार अुल्लेख येथे करणे अिष्ट होणार नाही. म्हणून सावरकरांनी हा ग्रंथ लिहिण्यामागील विशद केलेली भूमिका सांगितल्यास पुरेसे होअील असे वाटते.

अितर देशीयांना व परप्रांतीय भाषिकांना मराठ्यांच्या अितिहासाची थोरवीच काय, पण नुसती जाणीवही नसते अंसे अनुभवान्ती सावरकरांच्या ध्यानी आल्यावर त्यांनी प्रसिद्ध अितिहासकार श्री. सरदेसाअी यांना तसा अितिहास लिहिण्याची विनंती केली होती.[3] पुढे पंधरावीस वर्षांनी श्री. सरदेसाअी यांनी मराठ्यांचा विस्तृत अितिहास तीन खंडांमध्ये अिंग्रजी भाषेतच लिहिला.[4] अि. स. १९२४ नंतर सावरकरांना रत्नागिरीस स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. त्या काळात शिवोत्तर महाराष्ट्राच्या असामान्य पराक्रमाचे आणि मुसलमानी राज्यसत्तेला निर्दाळून त्यांनी केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विमोचनाचे वैशिष्ट्य साधारणपणे महाराष्ट्राच्या बाहेरील परप्रांतीय आणि परराष्ट्रीय जगतास निवेदावे, यास्तव अिंग्रजी भाषेतच अितिहास लिहिण्याचे कार्य सावरकरांनी केले.[5] मात्र हा अितिहास सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास– 'आमच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणारा' असा अेक समीक्षक ग्रंथ होता.[6] अर्थात हा दृष्टिकोन म्हणजे 'अखिल हिंदू अितिहासाच्या दृष्टीने मराठी अुत्थापनाचे महत्व' दाखविण्याचा होता.[7]

---

१. स. सो. पाने – पृ. ९१९. २. स. सो. पाने – पृ. ९१९ ३. स. सो. पाने – पृ. ९१८. ४. स. सो. पाने – पृ. ९१८. ५. स. सो. पाने – ९१९. ६. स. सो. पाने – पृ. ९१९. ७. हिं. पा. भूमिका, पृ. ३०.

नव्हे तर मेवाड, मारवाड, नेपाळ अित्यादी राज्यांच्या राजांनी मुसलमानांवर धार्मिक चढाअी करून सूडही अुगविला.[१] अतअेव, मुसलमानांच्या हिंदुस्थानावरील आक्रमणाच्या पूर्वार्धाच्या काळात असे दृश्य दिसते की, यवन, शक, हूणादिक परकीयांच्या सत्तेप्रमाणे मुस्लिमांनी हिंदुस्थानात स्थापिलेली अिस्लामी राज्यसत्ता अुखडून टाकून हिंदूंनी आपले राजकीय स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केले होते.[२]

मुसलमानी आक्रमणाच्या अुत्तरार्धाच्या काळातही ते हिंदूंचा संपूर्ण पराभव करू शकले नाहीत. अुलट हिंदूंची राज्ये दक्षिणेत फोफावली व अखेर अुत्तरेत अटकेपर्यंत जाअून हिंदूंनी आपले झेंडे फडकाविले. या अुत्तरार्धाच्या कालखंडात सावरकरांनीं हिंदूंच्या पुनरुत्थानाचा आलेख काढलेला आहे. या आलेखात हिंदूंच्या वैभवाच्या काळाचे तीनचार बिंदू सावरकरांनी दर्शविले आहेत. अि. स. १००० ते १०३० या कालखंडात सर्व हिंदुस्थानावर मुसलमानांचे नावापुरतेही राज्य नव्हते; आणि भारत राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, व्यापारविषयक बाबतींत वैभवशाली देश म्हणून नांदत होता.[३]

दिल्लीच्या तख्तावर बसून अखिल हिंदु-साम्राज्याची स्थापना केल्याची घोषणा खुश्रूखानने अि. स. १३२० मध्ये केली. तो काळही असाच हिंदूंच्या राजकीय वैभवाचा काळ मानावा लागेल.[४]

खुश्रूखानच्या या राज्यक्रांतीचे परिणाम विजयनगरच्या साम्राज्यावर झाले. विजयनगरचे हे हिंदुराज्य ज्या वैभवात नांदत होते त्याची कल्पना पोर्तुगाल, अिराण या देशांच्या वकिलांनी केलेल्या वर्णनावरून येते.[५]

पुढे मराठ्यांनी 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना केली, आक्रमण हे नव्या मराठी रणनीतीचे सूत्र बनविले आणि अटकेपर्यंत जरिपटका फडकावून ह्या हिंदु-मुस्लिमांच्या दशशतव्यापी महायुद्धात अंतिम महान विजय मिळविला. अखेर हिंदुस्थानावरील मुस्लिम साम्राज्यसत्ता हिंदूंनी पादाक्रांत केली.[६]

ब्रिटिशांच्या आक्रमणाच्या काळातही हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वासाठी ब्रिटिशांना लढावी लागलेली सारी युद्धे हिंदूंशीच लढावी लागली[७] आणि अखेर सर्वांत महाबलाढ्य अशा ब्रिटिशांच्या सह्याव्या परचक्राचीही हिंदुस्थानने दाणादाण अुडविली.[८]

---

१. स. सो. पाने – पृ. ७४६–७४९. २. स. सो. पाने – पृ. ७८९. ३. स. सो. पाने – पृ. ८००. ४. स. सो. पाने – पृ. ८३५. ५. स. सो. पाने – पृ. ८७६–७७. ६. स. सो. पाने – पृ. ९४८, ९४९. ७. स. सो. पाने – पृ. ९५२. ८. स. सो. पाने – पृ. ९६७.

'हिंदूंचा अितिहास हा पराभवामागून पराभवांची अेक जंत्री आहे' हा आक्षेप खोडून काढण्यासाठी सावरकरांनी 'हिंदुराष्ट्रीय निर्भय दृष्टिकोना'तून भारतीय अितिहासाचा लावलेला अर्थ आतापर्यंत आपण पाहिला. याच दृष्टिकोनातून मराठ्यांच्या अितिहासाचे सविस्तर समीक्षण त्यांनी त्यांच्या 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथात केले आहे. महाराष्ट्रातील मराठे केवळ महाराष्ट्रासाठी लढले नाहीत. त्यांचा मूलत:च ओढा हिंदुधर्म, हिंदुराष्ट्र यांकडे होता. हिंदुस्थानवर हिंदुराज्य स्थापणे हाच त्यांचा हेतू होता. या विधेयाचे[1] स्पष्टीकरण सावरकरांनी या ग्रंथात केलेले आहे. म्हणूनच या ग्रंथास 'मराठ्यांचा अितिहास' असे नाव न ठेवता 'हिंदुपदपादशाही' असेच नाव त्यांनी ठेवले आहे.[2]

या ग्रंथात शिवाजीमहाराज, रामदासस्वामी, संभाजीमहाराज राजाराम-महाराज आणि पुढील सर्व पेशवे यांच्या कार्याचे अुद्दिष्ट हिंदु-साम्राज्य स्थापण्याचे कसे होते, याविषयी त्या वेळच्या मुत्सद्यांच्या पत्रांचे, राजलेखांचे, तत्कालीन काव्यांचे, परकीय अितिहासकारांचे अित्यादी अनेक पुरावे सावरकरांनी दिले आहेत. विस्तारभयास्तव त्या सर्वांचा क्रमवार अुल्लेख येथे करणे अिष्ट होणार नाही. म्हणून सावरकरांनी हा ग्रंथ लिहिण्यामागील विशद केलेली भूमिका सांगितल्यास पुरेसे होअील असे वाटते.

अितर देशीयांना व परप्रांतीय भाषिकांना मराठ्यांच्या अितिहासाची थोरवीच काय, पण नुसती जाणीवही नसते अंसे अनुभवान्ती सावरकरांच्या ध्यानी आल्यावर त्यांनी प्रसिद्ध अितिहासकार श्री. सरदेसाअी यांना तसा अितिहास लिहिण्याची विनंती केली होती.[3] पुढे पंधरावीस वर्षांनी श्री. सरदेसाअी यांनी मराठ्यांचा विस्तृत अितिहास तीन खंडांमध्ये अिंग्रजी भाषेतच लिहिला.[4] अि. स. १९२४ नंतर सावरकरांना रत्नागिरीस स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. त्या काळात शिवोत्तर महाराष्ट्राच्या असामान्य पराक्रमाचे आणि मुसलमानी राज्यसत्तेला निर्दाळून त्यांनी केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विमोचनाचे वैशिष्टय साधारणपणे महाराष्ट्राच्या बाहेरील परप्रांतीय आणि परराष्ट्रीय जगतास निवेदावे, यास्तव अिंग्रजी भाषेतच अितिहास लिहिण्याचे कार्य सावरकरांनी केले.[5] मात्र हा अितिहास सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास– 'आमच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणारा' असा अेक समीक्षक ग्रंथ होता.[6] अर्थात हा दृष्टिकोन म्हणजे 'अखिल हिंदू अितिहासाच्या दृष्टीने मराठी अुत्थापनाचे महत्व' दाखविण्याचा होता.[7]

---

१. स. सो. पाने – पृ. ९१९. २. स. सो. पाने – पृ. ९१९ ३. स. सो. पाने – पृ. ९१८. ४. स. सो. पाने – पृ. ९१८. ५. स. सो. पाने – ९१९. ६. स. सो. पाने – पृ. ९१९. ७. हिं. पा. भूमिका, पृ. ३०.

हिंदुराष्ट्र दृष्टीने भारतीय अितिहासाचा अभ्यास करताना परकीय व स्वकीय अितिहासकारांनी बुद्धिपुरस्सर वगळलेल्या काही घटना व निर्माण केलेले अपसमज सावरकरांच्या ध्यानी आले व ते निर्भयपणे सांगून दूर करण्याचा प्रयत्न सावरकरांना आपल्या समीक्षक अितिहास ग्रंथात करावा लागला. सोमनाथला बलिदान केलेल्या हिंदुभक्तांच्या भावडया भक्तीचा जो अुपहास अितिहासकारांनी केला आहे त्याची मनस्वी चीड सावरकरांना येते.[१] कासमच्या सिंधवरील आक्रमणापासून तो थेट अिंग्रजांच्या हातून राजसत्ता जाअीपर्यंत हजार वर्षे हिंदू हे परदास्यात खितपत आलेले आहेत असे निव्वळ खोटे व हिंदूंना अपमानकारक असलेले अुल्लेख अितिहासातून मुळासकट खोडून टाकले पाहिजेत असे सावरकर आग्रहाने सांगतात.[२] आज कालच्या अडाणी व पक्षपाती अितिहासाला दूर सारून यापुढे तरी हिंदूंच्या पराक्रमी कर्तृत्वाचे प्रसंग हिंदूंनी आपल्या अितिहासात स्वत: संबोधून लिहिले पाहिजेत असे सांगण्याच्या संदर्भात चालुक्य घराण्यातील दुसऱ्या विक्रमादित्याने मुसलमानांच्या केलेल्या पराभवाचा अुल्लेख कसा केला जात नाही याचे अुदाहरण सावरकरांनी दिले आहे.[३] हिंदुसम्राट खुश्रूखान याने दिल्लीत केलेल्या राज्यक्रांतीचे व तिच्या परिणामाचे वर्णन सावरकरांनी मुद्दामच केले आहे. त्यातून त्यांना हेच सिद्ध करावयाचे आहे की, 'हिंदुदृष्टी नसल्यामुळेच आजपर्यंत या महान घटनेचा अुल्लेख अितिहासकारांनी तुच्छ लांच्छनास्पद शब्दांनीच केला असावा.'[४] याच दृष्टीच्या अभावी विजयनगरचे नवे हिंदुराज्य स्थापणाऱ्या हिंदू पिढीच्या कर्तृत्वाचा जितका गौरव हिंदू अितिहासात व्हावयास हवा आहे तितका तो झालेला नाही असे त्यांना वाटते.[५] नेपाळ हा भाग हिंदुराष्ट्राचे अुत्तमांग आहे अशी सावरकरांची धारणा आहे.[६] याच दृष्टीने सावरकरांनी 'नेपाळी आंदोलनाचा अितिहास' हे पुस्तक लिहून त्यात नेपाळच्या पराक्रमी अितिहासाचे आणि त्याने केलेल्या यशस्वी हिंदुस्वातंत्र्य-संरक्षणाचे वृत्त दिले आहे.[७] अकबर या मुसलमान राजाचे हिंदुराष्ट्रदृष्टीने मूल्यमापन करताना त्याचा मोठेपणा मानूनही तो हिंदूंच्या दृष्टीने परकीय; परधर्मीय, अत्याचारी अधम होता, म्हणून त्याचा धिक्कार केला पाहिजे असे सावरकर निर्भयपणे सांगतात.[८] शिखांच्या अितिहासाची मीमांसाही याच हिंदुराष्ट्र-दृष्टीने सावरकरांनी लिहिली आहे : "महाराज रणजितसिंगाने पंजाबातून मुसलमानांचे राज्य अुखडून देअून शतद्रू ते सिंधपर्यंत आणि वरं जम्मू-काश्मीरपर्यंत विस्तारलेले नवे हिंदुराज्य स्थापले आणि जयपाळ नि अनंगपाळ यांच्या प्राचीन पराभवाचा सूड अुगविला."[९] तसेच

---

१. स. सो. पाने – पृ. ७०५. २. स. सो. पाने – पृ. ७१८. ३. स. सो. पाने – पृ. ८१३–८१४. ४. स. सो. पाने–पृ. ८६६. ५. स. सो. पाने – पृ. ८६६. ६. स. सो. पाने – पृ. ९१०. ७. स. सो. पाने – पृ. ९११. ८. स. सो. पाने – पृ. ९१२, ९१३. ९. स. सो. पाने – पृ. ९०८.

"शिखांनी सिंधुनद ओलांडला आणि विजयाने हिंदुध्वज काबूल नदीपर्यंत नेऊन अब्दालीचे अुसने फेडले."[1]

निबंधातील तत्त्वचर्चेचे अितिहासात दर्शन

या हिंदुराष्ट्र दृष्टीने विचार करताना सावरकरांनी जशा हिंदूंच्या गौरवगाथा लिहिल्या तसे कठोर आत्मपरीक्षण करून अितिहासाने दाखविलेले हिंदूंचे दोषही अत्यंत परखडपणे सांगितले. हिंदु-मुस्लिम या झगडचात मुसलमानांनी बळाने भ्रष्ट केलेले हिंदू परत आपल्या हिंदुजातीत का येअू शकले नाहीत व त्यामुळे हिंदुराष्ट्राची कशी हानी झाली याची चर्चा सावरकरांनी या अितिहासग्रंथांतून अनेक स्थळी केलेली आहे. 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथांतील प्रकरण ४ थे व ५ वे ही दोन्ही प्रकरणे सावरकरांनी हिंदूंमधील घातक दोषदिग्दर्शनासाठीच खर्च केली आहेत. हिंदूंमधील जातिभेद, विटाळवेड, परधर्म-सहिष्णुतेची विकृती, धर्मभ्रम, जातिबहिष्कार आणि स्वतः सावरकर नामोल्लेखित सात स्वदेशी बेडचा यांची चर्चा या प्रकरणांमधून झालेली आहे. हिंदूंच्या या घातक दोषांमुळे झालेली हानी अितिहासातील अनेक अुदाहरणे देअून सावरकरांनी वर्णन केली आहे. अेकदा बाटलेल्या हिंदूंना स्वधर्मात परत न घेण्याच्या वृत्तीमुळे त्या बाटलेल्या हिंदूंची कट्टर मुस्लिम पिढी ही पुढे हिंदु-जातीच्याच जीवावर कशी अुठते हे महमंद घोरीच्या अुदाहरणावरून (जो पूर्वीच्या धुरी या हिंदुजातीत जन्मला होता) त्यांनी दाखविले आहे.[2] सुलतान टिपूने बाटविलेल्या हिंदूंना मराठचांनी पुन्हा शुद्ध करून न घेतल्याने हिंदूंच्या संख्याबळाची हानी किती घातक ठरली हे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.[3] हिंदूंच्या या सद्गुण-विकृतीच्या दोषाला शिवाजीमहाराज, चिमाजीअप्पा, हरिपंत फडके आणि खर्ड्याच्या लढाअीच्या वेळी तहानेने तडफडणाऱ्या निजामाला पाणी पुरवून स्वतः पेशवे आणि त्यांचे मंत्रिमंडळ कसे वळी पडले याची साद्यंत वर्णने सावरकरांनी केली आहेत. मुसलमानांनी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा वचपा काढण्याची तळमळ कोणालाही लागल्याचे आठवत नाही, अशी हळहळ या अितिहासाच्या अभ्यासानंतर सावरकरांनी व्यक्त केल्याचे दिसून येते.[4] हिंदू व मुसलमान या दोन समाजांतील प्राकृतिक, ध्येयात्मक, धार्मिक व राजकीय विरोध सावरकरांनी 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथाच्या द्वितीय खंडातील पहिल्या प्रकरणात सविस्तर दाखविला आहे तो या संदर्भात अभ्यसनीय आहे.[5]

---

१. हिं. पा. – पृ. १११. २. स. सो पाने – पृ. ७०७. ३. स. सो. पाने – पृ. ७७५. ४. स. सो. पाने – पृ. ७७१–७७५. ५. हिं. पा. – पृ. १८९, १९०.

व्यक्तित्वाचा रचना-पद्धतीवर परिणाम

भारतीय अितिहासाचे समीक्षण करण्याची हिंदुराष्ट्र-दृष्टी हीच लेखकाच्या व्यक्तित्वानुसार प्रभावी ठरल्यामुळे त्याचे परिणाम त्याच्या अितिहास-ग्रंथ-रचना-पद्धतीवर होणे अपरिहार्य होते. 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाना 'ची कसोटी याच दृष्टीने ठरविण्यात आली. सोनेरी पान कोणते ? याविषयीची सावरकरांची दृष्टी त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे सांगता येअील : "तसे पाहता आपल्या या अैतिहासिक कालात काव्य, संगीत, प्राबल्य, अैश्वर्य, अध्यात्म-प्रभृती अवांतर कसोटींना अुतरणारी शतावधी गौरवार्ह पाने सापडतात. परंतु कोणत्याही राष्ट्रावर पारतंत्र्यासारखे प्राणसंकट जेव्हा गुदरते, आक्रमक शत्रूच्या प्रबळ टाचेखाली ते स्वराष्ट्र जेव्हा पिचून गेलेले असते किंवा जाअू लागते, तेव्हा तेव्हा त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि पराक्रमाची पराकाष्ठा करून स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यातून मुक्त करणारी... आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आणि स्वराज्याचे पुनरुज्जीवन करणारी जी झुंजार पिढी, तिच्या नि तिला झुंजविणारे जे धुरंधर वीर नि विजयी पुरुष त्यांच्या त्या स्वातंत्र्य-युद्धाच्या वृत्तान्ताचे जे पान त्या पानास मी येथे सोनेरी पान म्हणून संबोधीत आहे."[1]

सोनेरी पानाची ही कसोटी ठरविल्यानंतर ग्रंथाची सगळी रचना हिंदूंच्या विजयाचाच गौरव करण्याच्या दृष्टीने केलेली आहे. त्यामुळे ज्या अैतिहासिक पुरुषांच्या काळात ही पराक्रमाची पराकाष्ठा करणारी विजयी झुंज हिंदूंनी दिली नाही, त्यांना या अितिहास-ग्रंथात फारसे स्थान मिळाले नाही. अुदाहरण सांगावयाचे झाले तर सम्राट अशोकाचे देता येअील. याबाबत स्वत: सावरकरांनीच सांगितले आहे की, ह्या पुस्तकातील सोनेरी पानाची जी कसोटी आणि विषय-क्षेत्र आखून घेतले आहे, त्यात सम्राट अशोककालीन पान बसत नाही. ह्यास्तव त्याच्या राज-वटीचा अधिक अुल्लेख करता येत नाही.[2] अर्थात अशोकाचे परमतसहिष्णुत्व, अहिंसा आणि क्षात्र-वृत्तीला मारक असे तत्त्वज्ञान हेच लेखकाच्या वृत्तीशी जुळणारे नसल्याने त्याच्या अितिहास ग्रंथात सम्राट अशोक यांस अधिक जागा मिळण्याची शक्यताच नव्हती. अुलट ज्या बुद्ध धर्माचा अशोकाने प्रचार व प्रसार केला, त्या बौद्ध धर्माच्या राष्ट्रीय व राजकीय अनिष्ट परिणामांची चर्चा करण्यासाठी लेखकाने अनेक पाने खर्ची घातली आहेत.

'सहा सोनेरी पाना 'त हिंदूंच्या पराक्रमाची वर्णने तुलनेने फारच थोडी आहेत; आणि जी वर्णने आली आहेत ती ते पराभव पुढील विजयाला कसे अुपकारक

---

१. स. सो. पाने – पृ. ५८४. २. स. सो. पाने – पृ. ६३१.

व प्रेरक ठरले हे सांगण्यासाठी आली आहेत. तसेच हिंदू हे परकीय आक्रमणापुढे कधीच शरणागत झाले नव्हते हे पटवून देण्याच्या संदर्भात आली आहेत. यवनांशी भारतातील मालव व शूद्रक गणराज्यांनी दिलेली झुंज,[१] 'भागासा' व 'अग्रश्रेणी' या प्राजकांनी केलेला जोहार[२], पौरस, जयपाल व अनंगपाल यांनी पराभवातूनही दाखविलेले हिंदु-तेज, समरशिविरातच लढता लढता हौतात्म्य पत्करणारा युवराज स्कंदगुप्त[३] अशी कितीतरी अुदाहरणे या संदर्भात सांगता येतील.

अितिहासविषयक या दृष्टीतील फरकामुळे सावरकर सन-शक-संवतादी कालानुबंधाच्या क्रमापेक्षा विषयानुबंधाच्या क्रमाकडेच मुख्य लक्ष पुरवितात.[४] म्हणूनच केवळ संगतवार अितिहास सावरकर लिहीत नाहीत; तर हिंदुत्ववादी दृष्टिकोनातूनच त्या घटनांचे अर्थ अुलगडून दाखविण्याकडे त्यांचा अधिक ओढा आहे. मुसलमानी आक्रमणामुळे ह्या लढायांतून हिंदूंचा पराभव झाला असा वस्तुनिष्ठ अितिहास ते सांगत नाहीत; तर हिंदूंच्या पराभवाची कारणमीमांसा वैयक्तिक तात्त्विक दृष्टिकोनातून विस्तारश: केल्याशिवाय त्यांची लेखणी पुढेच जाअू शकत नाही. आपल्या निबंधांतून हिंदूंच्या जातिभेदासंबंधी व सात स्वदेशी बेडयांसंबंधी जे विवेचन सावरकरांनी पूर्वीच केले आहे, त्याचीच पुनरावृत्ती येथे पुन्हा होते. या सर्व विवेचनासाठी त्यांनी आपल्या अितिहास-ग्रंथांतील अनेक पाने खर्ची घातली आहेत आणि काही काही वेळा तर अेकही अैतिहासिक घटना न अुल्लेखिता याच चर्चेसाठी स्वतंत्र प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. जिज्ञासूंनी 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथातील पाचव्या सोनेरी पानातील चौथे व पाचवे प्रकरण या दृष्टीने मुद्दाम पाहावे.

भारतीय अितिहासातील जी घटना हिंदुत्वाच्या दृष्टीने महत्त्वाची, तिला स्वतंत्र प्रकरणातून स्वतंत्र स्थान देण्याची सावरकरांची अितिहासरचनापद्धती आणखी अेका ठिकाणी प्रकर्षाने दिसते. ते प्रकरण म्हणजे पाचव्या सोनेरी पानातील खुश्रूखान आणि देवलदेवीचे पाचवे प्रकरण होय.[५] ते प्रकरण आपण स्वतंत्रपणे का लिहीत आहोत, याचे कारण सांगताना सावरकरांनी चौथ्या प्रकरणाच्या अखेर लिहिले आहे : "त्याचे (खुश्रूखानचे) वृत्त स्वतंत्रपणे देण्याअितके हिंदुस्थानच्या अितिहासात हिंदुत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने पुढच्या प्रकरणातूनच सांगणे अुचित होणार आहे."[६]

---

१. स. सो. पाने – पृ. ६०१. २. स. सो. पाने–पृ. ६०४, ६०५. ३. स. सो. पाने – पृ. ६७४. ४. स. सो. पाने – पृ. ६८५. ५. स. सो. पाने – पृ. ८२४. ६. स. सो. पाने–पृ. ८२४.

'हिंदुपदपादशाही'चे ध्येय साकार करण्यासाठी जे मराठे झुंजले त्या पराक्रमी मराठ्यांचा स्फूर्तिप्रद अितिहास सावरकरांचा अतिशय आवडता कालखंड होय. म्हणून 'हिंदुपदपादशाही' या आपल्या ग्रंथाच्या रचनेत त्यांनी त्या अितिहासातील काही विजयी व वैभवशाली क्षणांची केलेली वर्णने वरीच विस्तृत आहेत. मराठ्यांचे राज्य ज्या सवाअी माधवरावांच्या कारकीर्दीत वैभव-शिखरावर होते त्या माधवरावांची कारकीर्द वर्णन करण्यासाठी त्यांनी त्या ग्रंथातील सर्वांत अधिक पृष्ठे खर्चिली आहेत. ती वैभवाची चित्रे पाहण्यात सावरकरांची कल्पनाशक्ती अितकी रमते की, अखेर ते मोकळ्या मनाने कबूल करतात : "ह्या वैभवाच्या परमोच्च बिंदूवर . . . तो काळ अुलटून गेला नाही तोपर्यंत . . . तिला तेथे आनंद मानीत वसू द्या."[१] 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथातील 'द्वितीय खंडातील' सहाव्या प्रकरणात हिंदुसाम्राज्यावर पडदा पाडताना सावर-करांना अत्यंत दु:ख होते[२] आणि ज्या हिंदुवीरांनी थोर पराक्रम करून हिंदुसाम्राज्य स्थापिले त्या वीरांचे आणि त्या थोर हिंदुसाम्राज्याचे शक्य तितके रेंगाळत अंतिम दर्शन घेण्याची आपली मानवी भावना ते व्यक्त करतात.[३] शके १७१७ पासून (अि. स. १७९५) मराठी साम्राज्य अस्ताला जाअीपर्यंतचा, म्हणजे शके १७३९ (अि. स. १८१७) पर्यंतचा जवळजवळ पाव शतकाचा काळ सावरकरांना अितका दु:खसमाकुल करणारा वाटतो की, त्यावर अेक अश्रुबिंदू ढाळल्यावाचून, अेक अुसासा टाकल्यावाचून पुढे जाणे त्यांना अशक्य होते.[४] या काळाचे समीक्षण त्यांनी आपल्या 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथात अवघ्या अेका प्रकरणाच्या चार पृष्ठांत केले आहे;[५] आणि या प्रकरणाच्या अखेरीस अंत:करण अुघडे करून वाचकांना सांगितले आहे की, 'ह्या आपल्या थोर राष्ट्रीय साम्राज्याच्या समाधीवर हा मृत्युलेख लिहिताना आम्हांला तीव्र वेदना होत आहेत ही गोष्ट आम्ही लपवीत नाही![६] सावरकरांच्या अितिहास-ग्रंथाची रचनापद्धती त्यांच्या आवडीनिवडीनुसार कसे आकार घेत होती, संकोच पावत होती वा विस्तारत होती, रेंगाळत होती वा गतिमान होत होती याची कल्पना येण्यास वरील विवेचन पुरेसे होअील असे वाटते.

अितिहास संशोधनातील हिंदुत्वदृष्टी

सावरकरांचे अितिहास-ग्रंथ हे मुख्यत: समीक्षणात्मक आहेत, संशोधनात्मक नाहीत हे पूर्वी आपण पाहिले आहे. पण असे समीक्षण करताना हिंदुराष्ट्र दृष्टीने काही घटनांवर त्यांनी संशोधनात्मक प्रकाश टाकला आहे. ययातीपुत्र अनू याचे

---

१. हिं. पा. पृ. १८२. २. हिं. पा. पृ. २३१. ३. हिं. पा. पृ. २३८.
४. हिं. पा. पृ. २३९. ५. हिं. पा. पृ. २३९ ते २४२. ६. हिं. पा. पृ. २४२.

ग्रीक हे वंशज असतील काय, असा प्रश्न त्यांनी अुपस्थित केला आहे आणि अनूपासून > अन्वायन > अयोनियन > यवन अशी रूपे तयार झाली असावीत असे आपले मत त्यांनी व्यक्त केले आहे.[1] अिंग्रजीमधील 'पोर्ट' (Port) हा शब्द संस्कृत 'पट्तन' या शब्दापासून सिद्ध झाला असावा असे ते सांगतात.[2] अरबस्थानचा व भारताचा पूर्वापार अगदी पुराणकाळापासून निकटचा संबंध असावा असे सावरकरांनी हरिवंशाच्या अेका अुपपुराणाच्या मौसल पर्वाची कथा सांगून आणि तामीळ भाषेचे मूळचे 'अरवी' हे नाव आपल्या वरील तर्काशी जोडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.[3] सावरकरांच्या अितिहास-संशोधनाचे क्षेत्र किती व्यापक होते, आणि त्यांच्या संशोधनाचा विषयही किती मूलगामी होता हे सांगताना अेक टीकाकार श्री. साधुदास यांनी लिहिले आहे : "आपल्या समाजात अुत्पन्न झालेले वैगुण्य सावरकरांनी बिनचूक ओळखले आहे आणि तदनुरोधाने कृत्रिम जातिभेदांचे निर्मूलन करून धर्माच्या आणि पर्यायाने देशाच्या अभिमानाच्या पायावर हिंदू समाजाची संघटना करण्याचे धोरण त्यांनी आखले आहे, हे त्यांच्या अितिहास संशोधकत्वाचे मोठे गमक होय."[4]

अितिहास वाङ्मयातील प्रचार

हिंदुराष्ट्रदृष्टीने सावरकरांनी भारतीय अितिहासाचे समीक्षण जसे केले तसेच अितिहास या साधनाचा अुपयोगही स्वदेशाभिमानाची भावना गदगदून हलविण्यासाठी त्यांनी केला. हा अितिहास लिहिताना 'गुलामी दशेत गुलामी वृत्तीच्या मगरमिठीतून देशाची सुटका केली पाहिजे व स्वदेशाच्या अितिहासातील अुत्कट व भव्य असेल त्यावर तरुण पिढीची नजर खिळली पाहिजे' अिकडे सावरकरांचे लक्ष होते.[5] त्यामुळे अितर अितिहासकार व सावरकर यांच्या मूळ भूमिकेतच फार मोठी तफावत पडते. प्रसिद्ध अितिहासकार श्री. रा. वि. ओतुरकर यांनी अितर अितिहासकारांशी सावरकरांची तुलना करून सावरकरांचे वेगळेपण मोजक्या शब्दांत सांगितले आहे. प्रा. ओतुरकर लिहितात, 'सावरकर म्हणजे अुपलब्ध पुराव्याचे आलोडन करून शांत चित्ताने मराठी रियासतीचे खंड लिहिणारे ऋषितुल्य सरदेसाअी नव्हेत, सावरकर म्हणजे अितिहास-विषयक तत्त्वज्ञान व संशोधन यांत सारखेच अवगाहन करणारे प्रज्ञावंत राजवाडे नव्हेत, सावरकर म्हणजे कमालीच्या क्लिष्ट घडामोडी प्रमाणशीरपणे अुलगडा करून मांडणारे बंगवासी जदुनाथ थत्ते नव्हेत, सावरकर म्हणजे संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास

---

१. स. सो. पाने – पृ. ५८८. २. स. सो. पाने पृ. ६०७. ३. स. सो. पाने पृ. ७९ ७९६. ४. सह्याद्री, सा. वि. १९४३ जून, पृ. २९७. ५. हिंदु. स्वा. सा. विशेषांक, १९५८ – पृ. ४८.

करून अितिहासाच्या अभ्यासाचे बारा खंड प्रसिद्ध करणारे टॉयनबी नव्हेत; पण यांपैकी अेकालाही अितिहासाचे साधन वापरून कधी करता आले नाही असे कार्य सावरकरांनी केले आहे व ते म्हणजे धगधगत्या राखेतून देशाभिमानाचा स्फुल्लिंग पेटवावयाचा, झोपलेल्यास खडबडून जागे करावयाचे, देशाभिमानाच्या भावनेस गदगदा हलवून ती महाराष्ट्रात अुभी करण्यासाठी अितिहासाचा वापर करणारांत महाराष्ट्रातच काय पण अुभ्या हिंदुस्थानातही सावरकरांअेवढा थोर पुरुष झालेला नाही.''[१]

या वर्णनावरून सावरकरांच्या अितिहासलेखनात केवळ हिंदुत्वदृष्टीच नाही तर त्यात त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा आणि त्या निष्ठेच्या प्रचाराची आत्यंतिक तळमळ दिसून येते. त्यांचे सर्व अितिहास-ग्रंथ भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्याच वर्णनांनी भरलेले आहेत. पण त्यातही अुत्कट स्वातंत्र्यभावनेने भरलेला आणि त्या भावनेच्या प्रभावी प्रचारार्थ लिहिलेला ग्रंथ म्हणजे '५७ चे स्वातंत्र्यसमर' हा होय. ' It reads more like a declaration of war' असे त्या ग्रंथाचे यथार्थ मूल्यमापन श्री. अशोक मेहेता यांनी केले आहे.

'५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ सावरकरांनी मुख्यतः भारतात क्रांतीचा प्रचार व्हावा आणि सत्तावनच्या सालाप्रमाण सर्व भारतभर, स्वातंत्र्यार्थ पुन्हा अुठावणी व्हावी या हेतूने लिहिला असावा असे अनेक पुराव्यांवरून सिद्ध करता येअील. चित्रगुप्तलिखित सावरकर चरित्रातही ही प्रचारवादी भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे : " Savarkar thought of relating the story of Indian National rising in 1857 with a view to instruct the people how a revolution could be organized on a vast scale even under the peculiar Indian environment and limitations."[२] हा ग्रंथ लिहिताना सावरकरांची हिंदुराष्ट्रदृष्टी नाहीशी झालेली नव्हती. अुलट 'हिंदुराष्ट्राच्या दृष्टिकोनातून त्या क्रांतियुद्धाचे समीक्षण त्यांनी केले होते.[३]. या ग्रंथातील अंतर्गत काही पुराव्यांवरूनही हिंदुराष्ट्रदृष्टी लुप्त झालेली होती असे आढळत नाही.[४] तरीही हा ग्रंथ सावरकरांनी क्रांती घडवून आणण्याच्या अुद्देशाने लिहिला होता आणि अुघड प्रचार शक्य नव्हता म्हणून या समरातील योद्धचांच्या मुखाने आपले विचार आणि कार्याची दिशा भारतीय जनतेत प्रसृत करण्यासाठीच तो लिहिला होता हे टीकाकारांचे मत ग्राह्य वाटते.[५]

---

१. हिंदु–स्वा. सा. विशेषांक, १९५८, पृ. ४८. २. Life of Barrister Savarkar by Chitragupta – p. 43. ३. स. सो. पाने पृ. ९५६. ४. स. मा. स्वा. स. पृ. २३३, २५७. ५. स्वा. स. प्रस्तावना – पृ. ५.

हा ग्रंथ १९०८–०९ साली आपण लिहिला हे आता सावरकरांनीच सांगितले आहे.[१] या काळाच्या अेक-दोन वर्षे मागे पाहिले तर असे दिसते की, भारताची परिस्थिती हळूहळू स्फोटक वनू लागली होती. १९०७ मध्ये बॉम्वच्या फॉर्म्युल्याची पुस्तिका भारतात प्रसृत केली जात होती.[२] भारतातील सावरकरांचे क्रांतिकारक सहकारी 'योग्य वेळे'ची वाट पाहात होते.[३] रशियातील राज्यक्रांतीचे पडसाद युरोपभर अुमटत होते. भारतातील वंगाल, मुझफरपूरच्या बॉम्ब स्फोटाने जागा झाला होता.[४] याच वेळी अिंग्लंडमध्ये 'सत्तावनचे डोहाळे' सुरू झाले होते.[५] 'लंडनच्या वातमीपत्रा'तून अेक सूचक वाक्य सावरकरांनी लिहिले होते : "सत्तावनचे डोहाळे कोणाच्या जन्माचे द्योतन करीत आहेत याचा अुलगडा भविष्यकाळ लवकरच करो."[६] सावरकर व त्यांचे सहकारी लंडनमध्ये 'सत्तावनच्या स्वातंत्र्याचा जंगी अुत्सव' करीत होते ते याच वेळी.[७] सावरकरांचे 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हे पुस्तक याच सुमारास भारतात पाठविण्याचे अनेक प्रयत्न चालू होते. मूळ हस्तलिखित भारतात पाठविले गेलेही होते. पण भारत सरकारने त्याच्या प्रसिद्धीवर वंदी घातल्याने ते प्रकाशित करणे अशक्य झाले आणि पुन्हा ते लेखकाकडे परत पाठविले गेले.[८] पुढे मूळचा हा मराठी ग्रंथ अिंग्रजीत भाषांतरित करण्यात येअून हॉलंडमध्ये छापण्यात आला आणि तेथून त्याच्या शेकडोशे प्रती भारतात गुप्त रीतीने पाठविण्यात आल्या.[९]

भारतातील क्रांतिकारकांची सिद्धता, लंडनच्या वातमीपत्रातील सावरकरांची सूचक वर्णने आणि त्याच वेळी 'स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचा भारतातील प्रसार व प्रचार यांचा अन्योन्यसंबंध हेच तर्कशुद्ध पद्धतीने सांगतो की, सावरकरांनी हा ग्रंथ भारतीय क्रांतीच्या अुठावणीसाठी व प्रचारासाठी लिहिला होता.

ही नियोजित क्रांती ज्या तत्त्वांवर अधिष्ठित असावी असे सावरकरांना वाटले होते, ती सर्व तत्त्वे त्यांनी आपल्या १९०६ साली लिहिलेल्या आणि पुढे जप्त झालेल्या 'जोसेफ मॅझिनी' या ग्रंथातीलच तत्त्वे होती. जो क्रांतिमार्ग मॅझिनीने सांगितला होता तोच सावरकरांना येथेही पुरस्कृत करावयाचा होता. मॅझिनीने सांगितलेले राष्ट्राचे मन:प्रवर्तन व शरीरप्रवर्तन,[१०] क्रांतियुद्धात यश येण्यासाठी त्याने सांगितलेले गुप्त मंडळचांचे आणि वृकयुद्धाचे मार्ग,[११] स्वदेश व

---

१. स. सो. पाने–पृ. ९५६. २. सा. च. – शि. ल. करंदीकर, पृ. १७८. ३. सा. च. -- शि. ल. करंदीकर, पृ. १८१. ४. सा. च. – शि. ल. करंदीकर पृ. १९०. ५. लं. बा. पृ. ४. ६. लं. बा. पृ. २९. ७. लं. बा. पृ. ८९–९०. ८. स्वा. स. खंड – पृ. ८९–९०. ९. स्वा. स. खंड – पृ. ५–६. १०. स्वा. स. पृ. ७२. ११. स्वा. स. पृ. ७२, ७८, ३५०.

स्वधर्म या श्रेष्ठ तत्त्वांचा मॅझिनीने केलेला पुरस्कार,[१] हा प्रथम दास्यमुक्तता आणि नंतर राष्ट्रैक्य, समतादी तत्त्वांचा त्याने केलेला अुपदेश[२] अित्यादी मॅझिनीच्या क्रांतितत्त्वांचाच पुरस्कार स्वातंत्र्यसमर या ग्रंथातून केल्याचे दिसून येते. अशा क्रांतितत्त्वांच्या पुरस्कारातून '५७ चे स्वातंत्र्यसमर' हेही याच तत्त्वांवर व धर्तीवर झाल्याचे सिद्ध करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सावरकरांनी केला आणि भविष्यकालीन क्रांतीची सूत्रे आणि सूक्ते सांगितली. म्हणून या क्रांतिशास्त्राच्या निर्मात्याचा–मॅझिनीचा–अुल्लेखही 'स्वातंत्र्यसमर' ग्रंथात सावरकरांनी केला आहे. राज्यक्रांतीसारख्या अनिश्चित प्रसंगी राजधानीच्या शहरावर सर्व प्रांतांनी अवलंबून राहणे कसे नाशकारक आहे हे मॅझिनीच्याच शब्दांत सावधानतेने म्हणा वा अनवधानतेने म्हणा–सावरकरांनीच सांगितले आहे.[३] स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ क्रांतिकारकांची गीता का मानला जातो याचा अुलगडा अशा रीतीने करता येतो.[४] क्रांतितत्त्वांच्या प्रचाराचे या ग्रंथातील विलक्षण सामर्थ्य पाहिले की,मग या ग्रंथाच्या प्रती लाला हरदयाळ आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या थोर क्रांतिकारकांनी का नेल्या होत्या याची कल्पना येते.

भाषाशैली

अितिहास का लिहावा, याबाबत सावरकरांचे निश्चित असे मत आपण आत्तापर्यंत पाहिले. अितिहास लिहिताना लेखकाने कोणती भाषाशैली अवलंबावी हेही सावरकरांनी ठामपणे ठरवून टाकलेले आहे. सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा, भारतीय अितिहासातील त्यांच्या आवडीचा काळ आणि व्यक्ती, त्यांचे स्वातंत्र्य प्रेम आणि काव्यात्मक वृत्ती यांतून त्यांची अितिहास-लेखन-शैली सिद्ध झाली आहे. अुत्कट भावनेच्या नैसर्गिक काव्यमय भाषेतच अितिहास लिहावा असे सावरकर आग्रहाने सांगतात; आणि आपल्या या मताच्या स्पष्टीकरणार्थ पुढील विवेचन ते करतात : "निर्भेळ अितिहासात आणि काव्यातही काही प्रदेश असा असतो की, तो अितिहास आणि काव्य यांच्या संयुक्त मिश्रणानेच यथार्थपणे व्यक्तविला जाअू शकतो. त्यावाचून त्या प्रसंगाच्या वर्णनाला जिवंतपणाच येत नाही. अशा प्रसंगी अितिहास हा अकस्मात आपण होअूनच काव्यमय होतो. अशा प्रसंगी अगदी पुराणातील अदभुत रूपकांचा, दैनिक वर्णनशैलीचा अवलंब केल्यावाचून त्या घटनांचे अलौकिकत्व, यथाप्रमाण अशा रसरशीतपणे रंगविले जातच नाही. मनुष्याला साध्या घटना जशाच्या तशा गद्यभाषेत सांगता येतात. पण मनुष्याची प्रवृत्ती आणि स्वभावच असा घडविला आहे की, अुत्कट, भव्य, दिव्य,

---

१. स्वा. स. पृ. ३२–३४. २. स्वा. स. पृ. २८८, ४२२. ३. स्वा. स. पृ. १५४. ४. म. मा. म. म.

अलौकिक अशा कोणत्याही भावनांना रसरसून सोडणारी घटना, ती अगदी यथावत घटना असली, तरी साध्या शब्दांत, रुक्ष गद्यात सांगवतच नाही. त्यात ती मावतच नाही. तेव्हाचं तर मनुष्य अकस्मात खदखदून हसतो, कळवळून रडतो, आनंदाने नाचतो, संतापाने खवळून जातो. म्हणजेच अुत्कट भावनेच्या भाषेतच तो बोलू लागतो. अशा अुत्कट भावनेची नैसर्गिक भाषा म्हणजेच काव्य."[१]

सावरकरांचे अतिहास-ग्रंथ हे काव्यमय (It is poetry) आणि श्रेष्ठ वाङमयीन गुणांनी युक्त (with great literary power) का झाले याचे अुत्तर त्यांच्या वरील विवेचनात सापडते. या अतिहास-ग्रंथांचा सर्वच भाग काव्यमय आहे असे नाही. काही ठिकाणी ते नुसत्या घटितांचे, घटनांचे रोकडे टिपण करतात. पण जो काळ त्यांना 'हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने काही अलौकिक, हृदय हलवून सोडणाऱ्या घटितांनी बहरलेला वाटतो तो काळ वर्णिताना भावनांची काव्यमय भाषाच काय ती जिवंतपणे नि यथार्थपणे त्याचे व्यक्तीकरण करू शकेल' असे त्यांना वाटते.[२]

भारतीय शत्रूबद्दल सूडाची भावना व्यक्त करण्याचा जेव्हा जेव्हा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा सावरकरांच्या लेखणीतून नाट्य-काव्य निर्माण होते. 'सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरात' राष्ट्रक्षोभाची कुलदेवता जी 'सूड' तिचा यज्ञसमारंभ सावरकरांनी 'ढकला त्यात' ह्या प्रकरणात रंगविला आहे. त्या प्रकरणातील हविर्दानाचे जे नाट्य आणि काव्ययुक्त वर्णन सावरकरांनी केले आहे, ते या दृष्टीने पाहण्यासारखे आहे.[३] तसेच त्याच प्रकरणातील 'हे सूडा, जगातील न्याय्य तरवारीच्या धारेवर तू चढतोस तेव्हा तू देवांनाही वंद्य व ऋषींनाही स्तुत्य होतोस' या वाक्यापासून सुरू होणारे वर्णन रसरशीत काव्याचा अुत्कृष्ट नमुना म्हणून दाखविता येअील.[४] क्रांतिविचारांनी धगधगणारे सावरकरांचे मन सत्तावनच्या अैतिहासिक घटना जेव्हा वर्णन करू लागते, तेव्हा त्या रुक्ष अैतिहासिक घटना काव्यरूप धारण करतात आणि मग ५७ च्या क्रांतीचा प्रसार करणाऱ्या त्या गव्हाच्या वा बाजरीच्या पिठाच्या चपात्या त्यांना अेखाद्या 'क्रांतीच्या देवदूता 'सारख्या वाटू लागतात. तसेच लगेच त्यांची अुत्तुंग कल्पनाशक्ती पंख विस्तारून काव्य प्रांतावरून झेपावू लागते आणि मग 'जा, हे क्रांतीच्या दूता, तसाच पुढे जा,' हा गद्यकाव्याचा अेक मनोहारी नमुना वाचकांच्या डोळ्यांपुढे अुभा राहतो.[५]

हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने अलौकिक घटनांचे वर्णन करण्याची जी जी स्थळे भारतीय अितिहासात आली आहेत, त्या त्या वेळी सावरकरांची लेखणी काव्यरसात बुडूनच लेखनकार्य करताना आढळते. 'हिंदुपदपादशाही' हे सावरकरांचे

---

१. स. सो. पाने–पृ. ९१४. २. स. सो. पाने–पृ. ९१५. ३ स. स्वा. स. पृ. ६१. ४. स. स्वा. स. पृ. ६३. ५. स. स्वा. स. पृ. ८४–८५.

अुत्कट ध्येय आहे आणि भारतीय अितिहासात ते साकार झाल्याचे दृश्य जेव्हा सावरकर पाहतात, तेव्हा त्यांची लेखणी काव्याच्या भाषेतच बोलू लागते. 'हिंदुपदपादशाही 'तील सदाशिवरावभाअूंनी दिल्ली नगरीत विजयप्रवेश केला तो प्रसंग[1] आणि निजामाशी झालेल्या अखेरच्या युद्धात मराठ्यांनी विजय मिळविल्यानंतर श्रीमंत सवाअी माधवरावांनी पुण्यनगरीत जो विजयप्रवेश केला, तो प्रसंग सावरकरांना हेलावून सोडतो[2] आणि मग हिंदुराष्ट्राच्या वैभवाच्या स्थानी रेंगाळत राहून त्यांचा कल्पना–विहंग जी दृश्ये टिपतो, ती अतीव काव्यमय आहेत.

समारोप

सावरकरांच्या अितिहासवाङ्मयाचे धावते समालोचन येथे संपते. हे अितिहासवाङ्मय लिहिताना जे अुद्दिष्ट सावरकरांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेविले होते, भारतीय अितिहासातील घटनांचा जो नवा अर्थ त्यांनी लावला, त्या अितिहास-रचनापद्धतीला त्यांच्या निष्ठा नि श्रद्धांमुळे जो आकार मिळाला, अितिहास या साधनाच्या अुपयोगासंबंधी जी भूमिका त्यांनी स्वीकारली आणि अितिहासाच्या लेखनासाठी जी भाषाशैली त्यांनी अवलंबिली, त्या सर्वांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने प्रकट होते.

---

१. हिं. पा. पृ. ८९–९०. २. हिं. पा. पृ. १८०, १८१, १८२.

निबंधकार सावरकर

प्रास्ताविक

निबंध हा वाङ्मयप्रकारच लेखकाच्या आत्माविष्काराला अत्यंत पोषक आहे. निबंधाच्या निरनिराळ्या व्याख्या निबंधाच्या या वैशिष्ट्यांकडेच अंगुलिनिर्देश करतात. प्रसिद्ध फ्रेंच निबंधकार मॉंतेन आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लिहितो, " It is myself that I am painting....I am myself the subject of my book....."[१] जे. वी. प्रिस्टले या टीकाकाराने लेखकाच्या व्यक्तित्वातूनच निबंध आकारास येतो हा आपला सिद्धान्त पुढील शब्दांत प्रकट केला आहे : " The true essay approximates to familiar talk and the essayist is the brilliant and the self–revealing conversationalist whose every phrase is salted with Personality....."[२] निबंधाची सर्वांगीण चर्चा करताना आणखी अेका टीकाकाराने म्हटले आहे : " The essay gives us glimpses of the inner man.....A reminiscence, a fragment of autobiography, a report of some experience, an idea and some instance, a character–sketch, these are the things that make–up the subject–matter of the essayist....The keynote of the essay is its personality."[३] निबंध-वाङ्मयाच्या या व्याख्या किंवा हे स्वरूपवर्णन सावरकरांच्या निबंध-वाङ्मयाच्या संदर्भात अधिकच सत्य वाटू लागते. डॉ. अ. ना. देशपांडे यांना सावरकरांच्या निबंधलेखनाचा अभ्यास करताना हीच गोष्ट विशेषत्वाने जाणवली आणि म्हणून त्यांनी म्हटले की, " लेखकाच्या व्यक्तित्वाचा शब्दरूप आविष्कार म्हणजे त्याचे वाङ्मय, अशी जर वाङ्मयाची व्याख्या केली, तर त्या व्याख्येच्या कसोटीला सावरकरांचे निबंधलेखन पुरेपूर अुतरण्यासारखे आहे."[४] डॉ. देशपांडे सावरकरांच्या निबंधलेखनाचे असे सर्वसाधारण वर्णन करूनच थांबत नाहीत, तर सावरकरांच्या व्यक्तित्वातील अेका अत्यंत प्रमुख अशा घटकाचा निर्देश करून त्या व्यक्तिवैशिष्ट्याने सावरकरांचे सर्व

---

१. Essays and Essayists – by Henry Newbolt p. 7. २. Essays Past and Present – by J. B. Priestley. ३. The English Essay – by Ramrao, A. Kulkarni, Pp. 44–5. ४. सा. वि. द. पृ. ५५.

निबंधवाङ्मयच कसे रंगले आहे हे ते अधिक तपशीलाने दाखवितात. डॉ. देशपांडे लिहितात, "अतिरेक हा तर सावरकरांच्या व्यक्तित्वविशेषांचा आणि त्यांचे अेक व्यक्त स्वरूप असलेल्या त्यांच्या वाङ्मयाचा अेक व्यवच्छेदक घटक आहे."[१] सावरकरांच्या आक्रमक व्यक्तित्वाचा साक्षात्कार त्यांच्या निबंध-वाङ्मयाचा अभ्यास करताना श्री. भा. कृ. केळकर यांनाही होतो.[२]

सावरकरांचे निबंधवाङ्मय प्रकट होते ते त्यांची जीवनदृष्टी घेअूनच. 'स्वत:च्या जीवनदृष्टीच्या प्रचाराची ओढ' सावरकरांच्या निबंधवाङ्मयात पराकोटीची आहे.[३] 'समाज-परिवर्तनाची दृष्टी' त्यातून प्रतिबिंबित झाली आहे. या जीवनदृष्टीबरोबरच त्यांचा जीवनहेतूही त्यांच्या निबंध-वाङ्मयाला साकार करणारी अेक प्रमुख प्रेरणा आहे. या मद्दड, आत्मविस्तृत व निद्रावश हिंदु-राष्ट्राचे जागरण व अुद्धरण करणे, हा त्यांचा जीवित हेतू होता; आणि त्यांच्या निबंध-लेखनाचाही हेतू मुख्यत: हाच असल्याचे स्पष्ट मत श्री. पु. भा. भावे यांनी दिले आहे.[४] वरील सर्व संदर्भात सावरकरांचे निबंध-वाङ्मय तपासावयास हवे.

सावरकरांच्या निबंधवाङ्मयाचा स्थूल परिचय

सावरकरांच्या निबंधवाङ्मयाचे अैतिहासिक व सामाजिक असे दोन भाग ढोबळ मानाने करता येतात. त्यांच्या अैतिहासिक 'निबंधचक्रा'त 'हिंदुत्व' हा प्रबंध केंद्रबिंदूसारखा असून अितर बहुतेक सर्व निबंध त्याच्या विचार-परिघातच वावरताना दिसतात. 'सावरकर साहित्या'चे पाच भाग' आणि 'जात्युच्छेदक निबंध' यांच्यातील केवळ विषय व विचारच सारखे आहेत असे नाही, तर 'सावरकर साहित्या'तील काही लेखच 'जात्युच्छेदक निबंधां'त पुनर्मुदित करण्यात आले आहेत. (निबंध १६ ते २० आणि निबंध ३०, ३१). 'क्ष-किरणे' हा सावरकरांच्या स्फुट लेखांचाच संग्रह आहे. 'गांधी गोंधळ', 'रणशिंग', 'हिंदुत्वाचे पंचप्राण' या निबंधग्रंथांचे स्वरूपही स्फुट लेखांच्या संग्रहासारखेच आहे. हे स्फुट लेखन सावरकरांनी मुख्यत: 'केसरी', 'श्रद्धानंद', 'किर्लोस्कर', 'मनोहर', 'महाराष्ट्र-शारदा', 'स्त्री', 'प्रतिभा', अित्यादी प्रमुख मासिकां-तून वा वृत्तपत्रांतून केले आहे. सावरकरांनी आपली वक्तृत्वकला निबंधाच्या पद्धतीनेच विकसित केलेली असल्यामुळे[५] त्यांची अनेक गाजलेली भाषणे म्हणजे अुत्कृष्ट निबंधाचे नमुने होत. याशिवाय १९०२ पूर्वी सावरकरांनी जे दोन-तीन

---

१. आ. म. वा. अिति. – भाग २, पृ. ४१. २. सा. द. – पृ. २४१. ३. सा. वि. द. – पृ. ४१. ४. केसरी सा. मृ. पु.; – पृ. १९. ५. आ. च. पृ. ७३.

निबंध प्रसिद्धिले तेही सावरकरांचे त्या काळातील विचारदर्शन घडवितात म्हणूनच अुल्लेखनीय आहेत. यांपैकी पहिला निबंध 'नाशिक वैभव' या वर्तमानपत्रात 'हिंदु-संस्कृतीचा गौरव' अशा स्वरूपाच्या मथळ्याखाली प्रसिद्ध झाला होता. दुसरा हरिभाअू आपटे यांच्या 'करमणूक' पत्रात 'सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोणते व ते का याची कारणे' या शीर्षकाखाली निबंध-स्पर्धांतील पहिल्या पारितोषिकाचा मान घेअून लोकांपुढे आला. सावरकरांचा तिसरा निबंध श्री. ग. ना. जोशी यांनी प्रसिद्ध केला असून 'नाना फडणवीस शतसांवत्सरिक अुत्सव समिती'ने या निबंधाला पहिले पारितोषिक दिल्याची नोंद आढळते. १९०२ ते १९०४ पर्यंत सावरकरांनी निबंध-लेखन विशेषत्वाने केल्याचे दिसून येत नाही. १९२४ नंतर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात त्यांची लेखणी लेखनकार्यासाठी मुक्त झाली आणि तीही काही विशिष्ट विषयांच्या प्रवेशापुरतीच ! पण ज्या विषय-प्रांतात तिने पदार्पण केले तिथे ती लाठीसारखी प्रभावी ठरली आणि 'निबंधकार सावरकरां'चे अेक स्वतंत्र स्थान तिने निर्माण केले.

निबंध-लेखन-हेतू

सावरकरांच्या निबंधलेखनाच्या हेतूसंबंधी प्रास्ताविकात अोझरता अुल्लेख आला आहे. येथे सोदाहरण चर्चा अभिप्रेत आहे. सावरकरांच्या जीविताचा हेतूच हिंदु-राष्ट्राचे जागरण व अुद्धरण करण्याचा होता. हिंदुत्वनिष्ठा हे तर त्यांच्या व्यक्तित्वातील श्रेष्ठ मूलद्रव्य होय. या हिंदुत्वनिष्ठेला अुपकारक वा पोषक अशा विषयांची आणि विचारांची त्यांनी मांडामांड केली आणि या निष्ठेला विघातक अशा विचारांचे व प्रवृत्तींचे त्यांनी अुच्छेदन केले. या दृष्टीने कधी तात्त्विक विवेचन तर कधी निश्चयात्मक मतप्रदर्शन, कधी धर्मभोळ्या प्रवृत्तीवर प्रखर प्रहार तर कधी हिंदुसमाजाला क्षयासारख्या ग्रासणाऱ्या जातिभेदाचा धिक्कार, केव्हा प्रति-पक्षांच्या आक्षेपांचे खंडन तर केव्हा प्रत्यक्ष कृतीसाठी आवाहन, अशा विविध पद्धतींनी सावरकरांनी आपले निबंधलेखन केले आहे. पद्धती कोणतीही असो, त्या विषयामागील सावरकरांचा हेतू कधीच सुटत नाही. त्यांच्या 'हिंदुत्व' ग्रंथाचा मुख्य अुद्देशच 'हिंदुत्वाची मूलभूत तत्त्वे काय आहेत याचे विवरण' करण्याचा आहे.[1] हिंदुत्वाचे मुख्य लक्षण आणि वैशिष्ट्य यांची चर्चा करण्याच्या हेतूनेच तो ग्रंथ सावरकरांनी लिहिला आहे.[2] समाजाने वाअीट रुढीविरुद्ध बंड अुभारण्यासाठी सिद्ध होण्यापूर्वी तात्त्विक विवेचनाची आवश्यकता असते अशी सावरकरांची भूमिका आहे.[3] सावरकरांनी जे जे सुधारणाविषयक निबंध लिहिले

---

१. हिंदुत्व पृ. ६३, १०१. २. हिंदुत्व पृ. ३. ३. क्ष-किरणे पृ. १५१.

आहेत त्यांपैकी बव्हंश निबंधांतून आपल्या सुधारणावादाला तात्त्विक अधिष्ठान देण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो.[१]

हिंदुसमाजातील जातिभेदांच्या अुच्छेदनासाठी सावरकरांनी अनेक निबंध लिहिले. हिंदु-समाजाला 'जातिभेदाचा तिटकारा यावा आणि अस्पृश्यतेसारख्या घातक रूढीने हिंदु-राष्ट्राची जी भयंकर हानी होत आहे तिची तर ओकारीच यावी' या हेतूने सावरकरांनी निबंधलेखन केले.[२] 'जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' या लेखमालेच्या मूळ हेतूचे विवरण करताना सावरकरांनी लिहिले आहे : 'या जाति-भेदाच्या आजच्या विकृत स्वरूपाचे विवरण करून त्या विकृतीपासून, त्या क्षया-पासून आपल्या जातीच्या प्रकृतीस कशी मुक्त करता येअील हा या लेखमालेचा मूळ हेतू आहे...''[३] 'जातिभेद मोडायचा म्हणजे काय केले पाहिजे?' या प्रश्नाचे अुत्तर देण्यासाठीही त्यांनी आपल्या निबंध-लेखनातील काही भाग खर्ची घातला आहे.[४] 'जन्मजात जातिभेदाच्या अुच्चाटनाची अेक योजना सादर करण्यासाठी सावरकर कधी कधी निबंध-वाङ्मयाकडे वळल्याचे दिसून येते.[५]

सावरकरांचे काही निबंध निश्चित मतप्रदर्शनाच्या हेतूने लिहिलेले दिसतात. डॉ. आंबेडकर यांच्या धर्मांतराविषयी मतप्रदर्शन करण्याच्या हेतूने सावरकर अेतद्विषयक निबंधलेखनासाठी प्रवृत्त झालेले आहेत;[६] आणि मग त्यातून 'धर्मांतराच्या प्रश्नाविषयी महारबंधूंशी मनमोकळा विचारविनिमय' त्यांनी केला आहे.[७] जातिभेदोच्छेदक पक्षाचे जातिसंघविषयक धोरण कोणते असावे? या प्रश्नातून मतप्रदर्शनार्थ ते कधी निबंध-लेखनास अुद्युक्त झाल्याचे दिसते.

सावरकरांच्या ठायी असणारी बुद्धिनिष्ठा व विज्ञाननिष्ठा त्यांना हिंदु-स्थानातील धर्मभोळ्या, भाबड्या प्रवृत्तीचे अुच्चाटन करण्यास प्रेरक ठरली आहे. त्यांनी 'किर्लोस्कर' मासिकात लिहिलेल्या अनेक निबंधांचा हेतू 'धर्मभोळ्या बुद्धिभ्रंशावर रामबाण विषारी लस' टोचण्याचा होता.[८] बुद्धिक्षयाची बाधा नाहीशी करण्याचा होता,[९] 'भाबड्या प्रवृत्तीचा अुच्छेद' करण्याचा होता.[१०] 'केडगाव येथील धर्मभोळेपणाचे वाह्यात प्रदर्शन पाहून' या हेतूमुळेच त्यांनी हातात लेखणी घेतली होती. 'यज्ञ', 'गोपालन-गोपूजन नव्हे' अशा विषयांकडे ते वळतात ते याच धर्मभोळ्या प्रवृत्तीच्या अुच्छेदनासाठी!

---

१. क्ष–किरणे पृ. २. सा. द. पृ. १०५. ३. सा. सा. भाग ५–पृ. ४०.
४. जाति. नि. पृ. २८. ५. जाति. नि. पृ. १५५. ६. जाति. नि. पृ. ६३.
७. जाति. नि. पृ. २२०. ८. जाति. नि. पृ. २३१ ते २४९. ९. क्ष–कि. पृ. १५१. १०. क्ष कि.–पृ. १५१.

सावरकरांचे अनेक निबंध प्रत्युत्तरात्मक स्वरूपाचे आहेत. सावरकरांच्या निष्ठांना, आवडत्या मतांना ज्या ज्या वेळी धक्का लावला गेला त्या त्या वेळी ते असळून प्रतिपक्षाचे खंडन व स्वमताचे आवेशाने मंडन करण्यासाठी निबंध-लेखनाकडे वळले आहेत. रत्नागिरीच्या पतितपावन मंदिरावर अेक-दोघा वर्तमानपत्रांनी असा आक्षेप घेतला की, 'ते देअूळ केवळ अस्पृश्यांकरिताच आहे आणि म्हणून ते अस्पृश्यतेस अुलट पोषकच आहे.' या आक्षेपाला खोडून काढण्यासाठी सावरकरांनी आपली लेखणी लगेच अुचलल्याचे दिसते.[१] 'मुसलमान धर्मात समता आहे, अुच्चनीचता नाही' हे मुस्लिम मौलवीचे वाक्जाल किती अतथ्य आहे हे दाखविण्यासाठी सावरकरांनी 'तौलनिक धर्म-विज्ञानदृष्ट्या मुसलमानांतील पंथोपपंथांचा परिचय' करून देणारे दोन लेख लिहिले.[२] गौबासारख्या पक्षपाती मुसलमान प्रचारकांनी हिंदुधर्मावर जे आक्षेप घेतले व मुसलमान धर्मातील समतेचा जो अुदो अुदो केला त्याला सावरकरांनी 'मुसलमानी धर्मातील समतेचा टेंभा' या शीर्षकाखाली अेक निबंधवजा प्रत्युत्तर त्वरित देअून टाकले.[३] गोरक्षणावरील स्वत:च्या लेखांनी झालेले गैरसमज दूर करण्यासाठी व निवडक अशा दोघा-तिघा टीकाकारांच्या लेखांस प्रत्युत्तर देण्यासाठी 'गोरक्षक की गायाळ?' 'हा गाभारा की गोठा?' यांसारखे निबंध त्यांनी लिहिले.[४] 'आम्ही धर्मभावना अुच्छेदीत नाही, बुद्धिभेद करीत नाही' हे पटवून देण्याकरिता त्यांनी 'न जनयेत् बुद्धिभेदं अज्ञानां कर्मसंगिनाम्' या गीतेतील श्लोकाच्या अर्थाचे विवरण केले आहे.[५]

सावरकरांच्या बहुतेक सर्व निबंधांतून आपल्या ध्येयाचा, तत्त्वांचा, मतांचा प्रचार करण्याचा हेतू स्पष्टपणे दिसून येतो. प्रचार करण्याचे आणि कृतिप्रेरणा देण्याचे सामर्थ्य त्यांच्या व्यक्तित्वातच मुरून राहिले आहे. त्यांच्या व्यक्तित्वात लोकहिताची असलेली प्रबळ भावनाही निबंधात डोकावते. 'जातिभेदांचे अिष्टानिष्टत्व' या प्रदीर्घ लेखमालेच्या अखेरीस 'लोकहितार्थ अपरिहार्य म्हणून ही लेखमाला' वाढल्याचे ते सांगतात.[६]

सावरकरांचा जीवित हेतू आणि त्यांचा निबंधलेखनामागील हेतू यांच्यात हा असा अभेद संबंध असल्याचे दिसून येते.

निबंध म्हणजे आत्मचरित्रातील विचारांचाच विकास

रत्नागिरीच्या स्थलबद्धतेच्या काळात आणि त्यानंतर सावरकरांनी जे निबंध-लेखन वा वक्तव्य केले, त्यांतील बहुतेक सर्व विचार त्यांच्या आत्मचरित्रपर लेखनात

---

१. जा. नि. पृ. ८२. २. जा. नि. पृ. १८६. ३. जा. नि. पृ. २५०.
४. क्ष–कि. पृ. ३६. ५. सा. सा. भाग २–पृ. ११५. ६. जा. नि. पृ. ७०.

वीजरूपाने स्थिर झाल्याचे दिसून येते. नाशिक, अिंग्लंड व अंदमान येथील वास्तव्यात सावरकरांच्या मनात दृढ झालेल्या विचारांचा विकास म्हणजेच त्यांचे निबंधवाङ्मय होय. आत्मचरित्रपर लेखनातील विचार-वीजांचा बहुशाखांनी विस्तारलेला वृक्ष येथे आपणांस पाहावयास मिळतो. त्यांचे व्यक्तित्व ज्या विचारविकारांनी, श्रद्धा-निष्ठांनी, ध्येय-आकांक्षांनी आकारास आले, त्यांचेच दर्शन येथे घडते.

वयाच्या दहा-बारा वर्षांच्या सुमारास बंड करून अुठलेली सावरकरांची तात्त्विक मती आणि पोथ्यापुराणांवरील डळमळलेली श्रद्धा सावरकरांच्या निबंध-वाङ्मयात वारंवार डोकावते. मनुस्मृती, पोथ्यापुराणे, अितकेच नव्हे तर अितर धर्मांच्या धर्मग्रंथांतील विसंगती सावरकरांनी आपल्या निबंधात अनेक ठिकाणी दाखविली आहे. बालवयातच त्यांच्या धर्मनिष्ठेला जो 'तत्त्वाचा भक्कम पाया' प्राप्त झाला, त्यावरच पुढे त्यांच्या निबंधवाङ्मयाची दणकट अिमारत अुभी राहिली. काही स्थळी तर आत्मचरित्रात आणि निबंधांत, केवळ विचारांत नव्हे तर शब्दांत आणि वाक्यांतही विलक्षण साम्य असल्याचे आढळून येते. अुदाहरणार्थ, सावरकरांनी 'माझ्या आठवणी'त स्वत:च्या धार्मिक विचारांत अुडत चाललेल्या खळवळीचे वर्णन करताना म्हटले आहे : "पाण्यात पाहशील तर दात पडतील, या फलश्रुतीप्रमाणेच ही फलश्रुती ही अुत्तानार्थी अेक वुजगावणे आहे; आणि माझ्या बंडखोर तात्त्विक मतीला जे अुत्तान अर्थाचे वुजगावणेच तेवढे दाखविण्यात मी त्यास न वुजता.... 'कुठे दात पडतात' म्हणून दात काढीत पुन: पाण्यात पाही... माझे वडील बंधू मी शेंडीस गाठ देण्यास विसरलो की सहजच रागावून (ब्रह्महत्येचे) भय घालीत. मी वाकडे अुत्तर देअी. 'चिंता नाही. संध्याकाळी शिवाचे नाव घेतले की सात जन्मांची पापे भस्म होतील."[1] अशाच स्वरूपाचा विचार पुढे अेका निबंधात व्यक्त करताना सावरकर लिहितात : "'प्रात:काले शिवं दृष्ट्वा' किंवा 'पाण्यात पाहिले की दात पडतात' या आजी-बाअींच्या सूत्रापेक्षा सृष्टिविज्ञानाच्या दृष्टीने 'यज्ञात् भवति पर्जन्य:' याला काही अधिक मूल्य देता येणार नाही."[2]

जे जे विषय सावरकरांनी आपल्या निबंधवाङ्मयात हाताळले व त्यासंबंधी जे जे विचार व्यक्त केले त्याचा संपूर्ण तपशील पुढील विवेचनात येणारच आहे. येथे केवळ त्या वीजभूतविचारांचे थोडक्यात दिग्दर्शन करावयाचे आहे. १९०२ पर्यंतच्या आत्मचरित्रात सावरकरांनी आपल्या त्या वेळच्या विचारांचा परिचय करून दिला आहे. त्या काळातही त्यांच्या मनात 'अद्भुत चमत्कार सत्य की असत्य, सोवळे-ओवळे, पदोपदी धर्म म्हणून बोकाळलेल्या रूढि त्याज्य की अत्याज्य,

---

१. आ. च. पृ. ४६, ६१, ६२. २. सा. सा. भाग १ – पृ. ४९.

केवळ आचार कोणते आणि खरे धर्म कोणते, ईश्वराचे अस्तित्व की नास्तित्व' अित्यादी विचारांचे द्वंद्व चालत असे.[१] जातिभेदावद्दलचा तिटकारा बालपणापासून त्यांच्या मनात होता[२] आणि 'विटाळवेडाची मूर्ख पण मारक रूढी तोडण्याचा सुधारकी' बाणा त्या वेळी त्यांच्या ठायी दिसत होता.[३] 'अुपयुक्तावाद हेच नीतिशास्त्र, हीच क्रांतीची मनुस्मृती' असे याच काळात त्यांनी ठरविले आणि 'श्रीकृष्ण हा अुपयुक्तावादाचा पहिला आचार्य' अशी त्यांची दृढ धारणा झाली.[४] सर्व मित्रमंडळींनी अेकत्र सरमिसळ बसून फराळ करण्याचे धाडस बालवयातच दाखवून त्यांनी पुढील सहभोजनाची नांदी केली होती.[५] सर्व सद्गुणांचे समर्थन करताना अधिकांत अधिक मनुष्यांचे हित हीच कसोटी ते मानू लागले होते.[६] 'धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः' अशी धर्माबद्दलची स्पष्ट कल्पना याच काळात त्यांच्या मनात दृढ झाली होती.[७] 'अपरिमित हिंसा टाळण्यासाठी दुष्टांची वीण थांबवणारी किंचित हिंसाच खरी अहिंसा होय' अशी त्यांची निश्चिती झाली होती.[८] भारताची राजकीय स्वतंत्रता हे निकटतम ध्येय आणि मानुषकाचा परम विकास हे अंतिम ध्येय त्यांनी याच वेळी डोळ्यापुढे ठेवले होते.[९] आणि शक्य ती औद्योगिक आणि सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीलाही अुपकारकच आहे, असा विचारही त्यांच्या मनांत रुजला होता.[१०] शस्त्रबळाचे सामर्थ्य आणि जो टिकेल तोच जगेल हा सृष्टीचा निर्घृण नियम त्यांना अवगत झाला होता.[११] बळावाचून तत्त्व, शक्तीवाचून न्याय, प्रयत्नावाचून दैव, भौतिकावाचून आत्मिक, अैहिकावाचून पारमार्थिक पंगू आहे, या गोष्टींचा साक्षात्कार त्यांना झाला होता.

१९०२ पर्यंतच्या सावरकरांच्या या विचारांचे अंदमानात अधिकच दृढीकरण झाले. 'सावरकरांनी अंदमानमध्ये जातिभेदाचा, अस्पृश्यतेचा हा नरकासुर भस्म करून टाकता येअील असे सामर्थ्य आपणांस प्राप्त व्हावे म्हणून चौदा वर्षे जणू तपःसाधना केली.'[१२] याच अंदमानात सावरकरांना ध्येयवादाचा आणि कार्याचा खरा साक्षात्कार झाला. राजकीय क्रांतीच्या क्षेत्रस्थानाप्रमाणे हिंदूंच्या सामाजिक क्रांतिविचारांचेही अुगमस्थान हे अंदमानच झाले.[१३] सावरकरांच्या पुढे गाजलेल्या 'हिंदुत्व' या प्रबंधातील विचार या अंदमानातच

१, आ. च. पृ. ६३. २. आ. च. ३. आ. च. पृ. २००. ४. आ. च. पृ. १७०. ५. आ. च. पृ. १९९. ६. आ. च. पृ. २२०. ७. आ. च. पृ. १७०. ८. आ. च. पृ. २२८. ९. आ. च. पृ. २२२. १०. आ. च. पृ. २३५. ११. आ. च. पृ. २२४, २२५. १२. केसरी–सा. मृ. पु. पृ. ५. १३. केसरी सा. मृ. पु. पृ. ९.

जन्म पावले.[१] हिंदूंची संघटना आणि शुद्धीकरण यांसंबंधीच्या विचारांना खरा कस लागला तो अंदमानातच! हिंदुसमाजहितासाठी, संख्यावळ वाढविण्यासाठी, अैहिक लाभासाठी, शुद्धीकरकरणाच्या चळवळीचे महत्त्व येथेच सावरकरांच्या ध्यानी आले.[२] अन्नपेयांच्या स्पर्शास्पर्शतेच्या बाष्फळ अतिरेकाचा त्याग आणि धर्मबहिष्कृतास शुद्ध करून घेण्याची रूढी ह्या दोन सुधारणा हिंदूंनी आपल्या समाजात केल्या पाहिजेत अशी सावरकरांची निश्चिती झाली.[३] पण त्याबरोबरच आपापल्याला जो धर्म सत्य वाटतो त्याचा प्रसार बुद्धिवादाने करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे हेही तत्त्व त्यांनी मान्य केले.[४] खाण्याने मनुष्य बाटतो ही पोरकट समजूत मारण्यासाठी त्यांनी सारखे प्रयत्न केले.[५] सगळ्या जगाचे अन्न खाऊन-पिऊन पचवून टाकून पुन्हा हिंदूंचे हिंदू राहिले पाहिजे या विचारांचा त्यांनी अंदमानात सतत अुद्घोष केला.[६] शुद्ध आणि आरोग्यदायक अन्न वा जल कोणाच्याही हातचे घेतले तरी त्यात दोष नाही असे त्यांचे यासंबंधात सूत्र होते.[७] येथेही विटाळवेडातील घातकपणा त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला आणि "विटाळ या एका शब्दात आपल्या सामाजिक आणि राष्ट्रीय अवनतीस कारणीभूत झालेल्या बहुतेक रूढींशी बीजे अंतर्भूत झालेली आहेत ही गोष्ट त्यांना मनोमन पटली."[८] या विटाळवेडापायीच परदेशगमन अशक्य होअून हिंदू भिकेस लागले अशी त्यांची खात्री झाली.[९] या सर्व दुष्ट रूढींनी हिंदुसमाजाचे संख्यावळ घटेल आणि हिंदूंची संस्कृती क्षीणतर होअून अन्य जातींपुढे हिंदूंच्या जातीय जीवनाचा बळी पडेल अशी त्यांची दृढ धारणा झाली.[१०] म्हणूनच त्यांनी शिरगणतीत 'हिंदू' म्हणून नाव नोंदविण्याचा आग्रह सतत धरला आणि पुढेही तो कायम ठेवला.[११] हिंदुत्वाचा प्रचार करणे हे तर त्यांच्या अंदमानातील कार्याचे अेक महत्त्वाचे अंग होते.[१२] या प्रचारासाठी त्यांनी अंदमानातील सण-यात्रादी अुत्सवांचा भरपूर अुपयोग करून घेतला.[१३] हिंदू बंदीवानांत ज्ञानाचा प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले.[१४] पूर्वी मित्रमेळ्याच्या बैठकीत ज्ञानप्रसार चालूच होता. अंदमानातही हे राष्ट्रीय ज्ञानसत्र त्यांनी चालू ठेवले. कारण सावरकरांची अशी दृढ श्रद्धा होती की, धर्मकारणाप्रमाणेच राजकारणातही ज्ञानयुक्त कर्म हेच समाजास हितकारक होणारे आहे.[१५] ही समाजहिताची, लोक-

---

१. मा. जन्म. पृ. २९१. २ मा. जन्म. पृ. २६०. ३. मा. जन्म. पृ. ३०१. ४. मा. जन्म. पृ. ३००. ५. मा. जन्म. पृ. २८२. ६ मा. जन्म. पृ. २८२, पृ. २८३. ७. मा. जन्म. पृ. ३००. ८. मा. जन्म. पृ. ३०१. ९. मा. जन्म. पृ. २८४. १०. मा. जन्म. पृ. २६०. ११. मा. जन्म. पृ. २९१. १२. मा. जन्म. पृ. २७४, २८०, २८८. १३. मा. जन्म. पृ. ४७६. १४. मा. जन्म. पृ. १४६, १५१, १४८, २४०. १५. मा. जन्म. पृ. १४८.

हिताची भावना येथे सदोदित जागरूक होती. या लोकहितासाठी लोकप्रियतेचा बळी देण्यास सिद्ध असलेली सावरकरांची प्रवृत्ती येथेही प्रबळ होती.[१] राष्ट्रहिताच्या दृष्टीनेच अंदमानची वसाहत बंद न करण्याचा विचार त्यांनी व्यक्त केला होता.[२] पुढे निबंधात आलेला अनुवंशाचा विचार येथेही त्यांच्या मन:प्रांतात वावरत होता.[३] सत्य-अहिंसेबद्दल पूर्वी दृढ झालेल्या मतात काहीही बदल झालेला नव्हता.[४] रत्नागिरीच्या वास्तव्यात सावरकरांना सक्तीने राजकारण-संन्यास घ्यावा लागला. पण पुढे-मागे असा प्रसंग आला तर राजकारणाव्यतिरिक्त शैक्षणिक, धार्मिक, वाङ्मयात्मक अशा अनेक प्रकारांनी राष्ट्राची सेवा करता येईल अशी योजना सावरकरांनी अंदमानच्या बंदीवासातच मनात पक्की केली होती.[५]

येथपर्यंत सावरकरांच्या आत्मचरित्रपर लेखनाच्या आधारे त्यांच्या प्रमुख विचारसूत्रांची ओळख करून घेतली. हीच विचारसूत्रे घेऊन पुढे सावरकरांनी आपले निबंधाचे विशाल वस्त्र कसे विणले आहे हे सविस्तर पाहावयाचे आहे.

निबंधातील आत्मलेखन

सावरकरांच्या निबंधवाङ्मयातील प्रत्यक्ष विचारांकडे वळण्यापूर्वी आणखी अेका गोष्टीची दखल घेणे आवश्यक आहे. अशी दखल घेतल्याने निबंध-वाङ्मयातील सावरकरांचे व्यक्तिमत्त्व अधिकच स्पष्ट होअील. सावरकरांच्या निबंधांवर त्यांच्या जीवनक्रमाचा, भोवतालच्या राजकीय परिस्थितीचा, त्यांच्या स्वत:च्या प्रत्यक्ष कार्याचा फार मोठा परिणाम झाला आहे. त्यांचे आक्रमक व्यक्तित्व निबंधासारख्या विचारप्रधान वाङ्मयप्रकारातही मधून मधून डोकावते. त्यामुळे अनेक वेळा स्वत: सावरकर वाचकांच्या पुढे अुभे राहून बोलू लागतात आणि आत्मचरित्रातील काही घटना ते सांगतात; आत्मचरित्रातील काही विचारांचे स्वत:च निवेदन करतात.

'अुच्चांकाची साथ' या निबंधात 'गोगीते'च्या शेवटच्या मंत्रास अनुसरून अुपरोधिक प्रार्थना करताना सावरकर म्हणतात : "हे विश्वाचे अनभिषिक्त राज्ञी ! . . . अेक दोन त्वर्य गाऱ्हाणी तर आजच्या आज दुरवीव . . . ह्या ध्रुवाला, पृथ्वीच्या अुलट, जी अेकाच जागी युगेयुगे डांबून ठेवण्याची आमच्यासारखी स्थलबंदीची शिक्षा झालेली आहे, ती रद्दबातल करून मरणाच्या आधी अेकदा तरी निदान चारी धर्मांची यात्रा करून घेण्याची अनुज्ञा द्यावी."[६] आधी राजकारण,

---

१. मा. जन्म. पृ. ४८३–४८८. २. मा. जन्म. पृ. ४८३–४८४. ३. मा. जन्म. पृ. ४८४. ४. मा. जन्म. पृ. ४९४. ५. मा. जन्म. पृ. ५२७. ६. क्ष–कि. पृ. ८३.

मग समाजकारण असा अुपदेश करणाऱ्या आणि राजकारणाच्या ढालीआड लपणाऱ्या अंगचुकार विरोधकांना प्रत्युत्तर देताना सावरकरांनी स्वत:च्या खडतर राजकीय जीवनाचे स्मरण देअून बजाविले आहे की, "..... हे जात्युच्छेदक आंदोलन चालवीत आहे त्याच्या (हिंदू संघटनावादी पक्षाच्या) धुरिणांमध्ये अनेक लोक असे आहेत की, ज्यांनी प्रथम राजकारणाचे लोखंडी चणे खाअून पचविले नि मग महार बंधूंच्या हातचे सहभोजनी चणे खाण्यास आरंभिले ! हलाहला-सारखे 'काळे पाणी' जे प्रथम प्यायले नि नंतर भंगी बंधूंच्या हातच्या सहभोजनी पाण्याचे अनुपान करू लागले."[1] श्रुती नि श्रौतधर्म, शब्दनिष्ठ बाबावाक्य-प्रमाणप्रवृत्ती यांच्यावरील आपल्या प्रखर टीकेचे समर्थनही सावरकरांनी शल्य व श्रीकृष्ण यांच्या टीकेतील तुलनेने केले आहे आणि या बाबतीतील आपल्या अधिकाराची जाणीव प्रतिस्पर्ध्यांना करून देताना लिहिले आहे : "त्या दोघांच्या हेतूंत नी परिणामांत जो फरक तोच पाद्ऱ्यांच्या टीकेत आणि ज्यांनी या हिंदुराष्ट्रासाठी मृत्यूसही हटकण्यास कमी केले नाही त्यांच्या टीकेतील हेतूंत नी परिणामांत असलाच पाहिजे अितका विवेकही ज्यास राहात नाही तो पंडित कसला ?"[2]

डॉ. आंबेडकर यांच्या 'समतासंघ' या मुखपत्रात 'सावरकर हे जाति-भेदाचे मोठे अभिमानी असल्याचा' आरोप वाचताच सावरकरांचे आक्रमक व्यक्तिमत्त्व अुफाळून वर आले आणि या आरोपाचे खंडन करण्यासाठी सावरकरांनी केलेले आत्मलेखन त्यामुळेच मोठे वाचनीय झाले आहे. सावरकर लिहितात, "जातिभेदाच्या निर्दालनासाठी...मी शाळेत होतो तेव्हांपासून प्रकटपणे वागत आलो आहे. कॉलेजमध्ये मी हा अुघड अुपदेश देअी. विलायतेत तर बोलावयासच नको. पुढे अंदमानातही हाच अुपदेश देअी आणि तो प्रत्यक्ष व्यवहारात आणीत मी शेकडो लोकांच्या जातिभेदमूलक दुष्ट समजुती पालटल्या आहेत. कारागारातून बाहेर येताच मी तीव्र लोकद्वेषास तोंड देअूनही जातिभेदाच्या निर्दालनाचे यत्न प्रकटपणे व्याख्यानांतून, लेखांतून, चर्चेतून करून माझ्या व्यक्ती-पुरते तसे आचरण प्रकटपणे केले आहे. याविषयी माझ्या शब्दांचाही पुरावा पुरे होता. पण त्रोटकपणे दोनचार घटनाही अुल्लेखितो. 'अंदमानची पत्रे' प्रसिद्ध झाली आहेत. त्यांत मी त्या काळीही जातिभेदाचे हानिकारकत्वावर वेळोवेळी लिहिले असून रोटीबेटी व्यवहार सर्व हिंदूंत चालू व्हावेत म्हणून अुत्कट अिच्छा प्रकट केलेली आढळेल. 'जन्मठेपे'त प्रकरणेच्या प्रकरणे या विषयाला वाहिली असून 'हिंदू तेवढा अेक, हिंदू ही अेकच जात आम्हांस माहीत आहे' असा अुपदेश

---

१. जात्यु. नि. पृ. ३२३–३२४. २. सा. सा. भाग २, पृ. ३४.

आणि आचार यांचा तिकडे कसा सारखा प्रयोग मी चालविला होता हे लिखित आहे. भगूरला मी प्रसिद्धपणे माझ्या पूर्वास्पृश्य बंधूंसह दूध आणि चहा प्यायलो, नाशिकला हजारो लोकांच्या अुघड सभेतही ही घटना सांगून प्रामाणिकपणे अेवढी अिच्छा प्रकट केली की, माझ्या प्रेतास ब्राह्मण, मराठा, महार आणि डोंब अशा माझ्या सर्व हिंदू बंधूंनी खांदा देअून अस्पृश्यता आणि जातिभेद गेला असे दाखविले तर माझा आत्मा सुख पावेल. या गोष्टी तत्कालीन 'स्वधर्म' आदी पत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'श्रद्धानंदा'त लेखणी थकेतो रोटी व्यवहारा-विरुद्ध लिहिले जात आहे. 'धर्माचे स्थान हृदय–पोट नव्हे' हे वाक्य 'श्रद्धा-नंदा'च्या लिखाणाने मराठी भाषेत म्हणीसारखे परिचित होत आहे. माझ्या घरी अेक वेळ नव्हे तर प्रत्यही सहभोजने होतात. रत्नागिरीस शेकडो लोक भंग्यांच्या मुलांबरोबर चहा-चिवडा घेतात. मी अुघडपणे मराठे, वैश्य, ब्राह्मण, अित्यादी माझ्या हिंदुबंधूंकडे जेवतो आणि अंदमानापासून आतापर्यंत अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणण्यात मी अुघड आणि यशस्वी खटपट केली आहे."[1]

सावरकरांचे हे आत्मनिवेदन किंचित प्रदीर्घ असले, तरी सावरकरांच्या व्यक्तित्वातील ध्येयवादित्व, तत्त्वनिष्ठा, कार्यतत्परता, चिकाटी अित्यादी गुण-विशेषांचे दर्शन घडविण्यास ते अुपयुक्त ठरावे. सावरकरांनी आपल्या निबंधांतून आणखी अेका ठिकाणी आत्मोल्लेख केला आहे; आणि तोही लोकप्रियतेपेक्षा लोकहित श्रेष्ठ या तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठी! सावरकर लिहितात, "आमच्यापुरते तरी लोकप्रियता की लोकहित असा व्यामोह मनास पुनःपुनः घडू नये यास्तव आमच्याच अेका अनुष्टुपात ग्रथिलेले सूत्र आम्ही आमच्या मनात वारंवार अुपदेशीत असतो की, 'वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुतिः।"[2]

सुधारक-सावरकरांवर त्यांनी स्वतःच टाकलेल्या शोधज्योती

सावरकरांनी आपल्या समाजसुधारणाविषयक निबंधांतून सुधारक म्हणून स्वभूमिकेचे वर्णन अनेक ठिकाणी केले आहे. या सर्व आत्मलेखनातून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध शलाकाच चमकताना दिसतात. प्रामाणिक बहिष्कार हीही अेक अुपकारक प्रतिक्रियाच आहे हा विचार स्पष्ट करताना 'खऱ्या राष्ट्र-हितैषी सुधारकांनी बहिष्कारामुळे चिडून जाअू नये' असा स्वतःच्या राष्ट्रवादी प्रवृत्तीतून स्फुरणारा अुपदेश ते करतात. सुधारक म्हणून स्वतःची भूमिका वर्णन करताना त्यांनी आपल्या निबंधातून अनेक ठिकाणी 'आम्हां बुद्धिनिष्ठ विज्ञान-वादी सुधारकांनी'[3] 'आम्ही बुद्धिवादी जर युक्तिवादाने ती प्रत्यक्ष पुराव्याने

---

१. जात्यु. नि. पृ. ३२८–३३०. २. सा. सा. भाग २ – पृ. ९९. ३. सा. सा. भाग २ – पृ. १६४.

खोटे पाडू लागलो,"[१] 'आम्हां विज्ञाननिष्ठ अभ्यासूंना'[२] 'अद्यतन, अप-टु-डेट प्रवृत्तीच्या आम्हां मंडळीस,'[३] 'खरा बुद्धिवादी,'[४] 'प्रत्यक्षनिष्ठ, विज्ञानवादी नी अद्ययावत सुधारक,' 'आम्हां अुपयुक्ततावाद्यांचा . . . तिटकारा यावा की भाबड्या पोथीवाद्यांचा ?' अित्यादी अनेक पद्धतींनी आत्मोल्लेख करून आपल्या व्यक्तित्वाची स्पष्ट जाणीव वाचकांना करून दिली आहे. सावरकरांच्या स्वतःच्या शब्दांत त्यांची सुधारक म्हणून भूमिका समजावून घेतल्यानंतर सुधारक म्हणून त्यांचे त्या वेळचे स्थान लक्षात येण्याच्या दृष्टीने त्या काळी प्रसिद्ध होणाऱ्या 'सत्यशोधक' वृत्तपत्रातील पुढील वर्णन अत्यंत बोलके आहे. 'सत्यशोधका'त लिहिले आहे : "सहभोजनाची थोर माणसांना (आचार्य, महाजन) चीडच ! अशा सुधारणा पीठस्थ वा मठस्थ यांना बहुधा असंमत असतात. कर्ते सुधारक त्या प्रथम आपल्या स्वतःच्या हमीवर घडवून आणतात; नी मग लोकप्रियतेची काठी घरून चालणाऱ्या अितरांची संमती त्यांच्यामागे लागत येते. बॅ. सावरकर हे संघटनाचार्य धर्मवीर होत. तो आजचा वा कालचा नसून अुद्याचा आचार्य होय."[५]

सुधारकाकडे पाहण्याचा व्यक्तिविशिष्ट दृष्टिकोन

'सत्यशोधक'कारांनी स्वतःच्या दृष्टीने जरी 'सुधारक सावरकरांचा' परिचय करून दिला असला तरी सुधारक कसा असावा यासंबंधी स्वतः सावरकरांनीच आपल्या निबंधांतून व्यक्त केलेले विचार सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत. कारण खऱ्या सुधारकाचे गुण-संकीर्तन करताना व त्याच्यापुढील आदर्श तत्त्वांचे वर्णन करताना सावरकरांनी स्वतःस प्रिय असणाऱ्या तत्त्वांचा आदर्शच अुभा केला आहे. सावरकरांच्या ठायी असणारे धाडस, त्यांची विज्ञाननिष्ठ शास्त्रीय दृष्टी, त्यांची लोकहितपरता, त्यांचे राष्ट्रहिताचे ध्येय, धार्मिक भाबडेपणाच्या कचाट्यातून मानवी बुद्धीला मुक्त करण्याची त्यांची धडपड, या त्यांच्या सर्व व्यक्तिविशेषांचे स्मरण त्यांचे खऱ्या सुधारकावरील विचार वाचताना होते.

"जो सुधारक बहिष्कारास पुरून अुरेल, सुधारकाचा सुधारक अुरेल, तेच खरे नाणे"[६] असे अेके ठिकाणी ते सुधारकाचे वर्णन करतात. सुधारकाचे ध्येय कोणते असावे यासंबंधी त्यांनी लिहिले आहे : "लोककल्याण हेच ध्येय. केवळ

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ८५. २. जात्यु. नि. पृ. – १९२. ३. सा. सा. भाग ४ – पृ. १२४. ४. सा. सा. भाग ३ – पृ. ११२. ५. रत्ना. हिं. प. पा. व प्रति. – पृ. ६८. ६. सा. सा. भाग २ – पृ. १०७.

लोकप्रियता हे नव्हे !"[१] या ध्येयाचाच सावरकरांनी अनेक ठिकाणी अुद्घोष केला आहे. 'जर का आज पेशवाअी असती' या निबंधात सुधारकांवर सनातन्यांकडून येणाऱ्या अनेक आक्षेपांना सावरकरांनी जी अुत्तरे दिली आहेत त्या सर्वांचा मूळ आधारच लोकहित हा आहे. त्यांनी सनातन्यांना अनेक युक्तिवादांनी असे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे की, 'खरा सामाजिक वा धार्मिक सुधारक जो जो होअून गेला वा ज्यास ज्यास व्हावयाचे असेल त्याचे लोकहित हेच ध्येय होते, असले पाहिजे."[२] अशा सुधारकाने 'जनहिताचा वळी देअूनच जी संपादिता येते ती जनस्तुती सर्वस्व त्याज्य' मानिली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत आहे.[३] म्हणून पहिला त्याग जो करावा लागतो तो या लोकप्रियतेचाच होय.[४] कर्तव्याची भूमिका घेअून सुधारणा क्षेत्रात अुतरल्यास लोकांकडून घालण्यात येणाऱ्या बहिष्काराचा सुधारकास राग येत नाही असेही ते सांगतात.[५] धार्मिक भाबडेपणा नी लुच्चेगिरी यांच्या कचाट्यातून मानवी बुद्धीला मुक्त करणे हे सुधारकाचे धर्मकृत्य आहे असे त्यांना वाटते.[६]

व्यक्तिमत्त्वानुरूप सुधारणांच्या कसोट्या

सावरकरांची सुधारणाविषयक दृष्टीही त्यांच्या जीवितहेतूतून निर्माण झाली आहे आणि त्या दृष्टीला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अंगोपांगांची जोड मिळालेली आहे. राष्ट्राची, हिंदुराष्ट्राची अभ्युन्नती हे सावरकरांचे ध्येय आहे. म्हणून त्यांचा सुधारणावाद त्या ध्येयवादावर अधिष्ठित आहे. आपल्या सुधारणांचा हेतू सनातनी बंधूंना पटवून देताना सावरकर लिहितात, "आम्ही प्रतिपादीत असलेल्या सुधारणा आपल्या हिंदुराष्ट्राच्या अभ्युन्नतीस्तव कशा अपरिहार्य नी अुपकारक आहेत हे सनातनी बंधूंना पटवून (आम्हांस त्यांचे) मतपरिवर्तन करावयाचे आहे."[७] 'हिंदुराष्ट्राच्या अुन्नत्यर्थ अत्यंत आवश्यक असणाऱ्या समाजसुधारणा आम्ही करीत आहोत' अशी सावरकरांची धारणा होती.[८] राष्ट्रहित हीच सुधारणेची कसोटी ते मानतात. ती विशिष्ट सुधारणा त्या विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रधारणास हितकर आहे की नाही हे प्रत्यक्ष प्रमाणच विचारात घेतले जावे असा त्यांचा आग्रह आहे.[९]

---

१. रत्ना. हिं. प. पा. व प्रति. पृ. १५६. २. रत्ना. हिं. प. पा. व प्रति. पृ. १५६. ३. सा. सा. भाग २ – पृ. ९९. ४. सा. सा. भाग २ – पृ. ९८. ५. जात्यु. नि. पृ. ३४२. ६. सा. सा. भाग २–पृ. १०७. ७. सा. सा. भाग २–पृ. ११७. ८. सा. सा. भाग २ – पृ. ११६. ९. जाति. नि. पृ. ८८.

त्यांच्या व्यक्तित्वानुरूप ते सुधारणांच्या आणखी काही कसोट्या सांगतात. विज्ञान, मानवहित आणि अुपयुक्तता ह्या तीन कसोट्यांवर घासून सुधारणांचा स्वीकार करावा असा त्यांचा सर्वत्र आग्रह आहे.[१] ज्या सुधारणा सत्याधिष्ठित नि राष्ट्रहितकारक आहेत त्यांचा ते प्रचार करतात.[२] या दृष्टीने पोथीजात जातिभेदावर हल्ला चढविताना सावरकर सांगतात, "आमच्या परिस्थितीत विज्ञानाच्या कसोटीस अुतरतील त्या त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस 'शास्त्राधार' आहे का ? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटनेस नि अभ्युदयास अमकी सुधारणा अवश्य आहे ना ? हा प्रश्न मुख्य. मग त्यास शास्त्राधार असो वा नसो."[३] सावरकरांच्या मते ज्या ज्या काळी जे जे हितकर ते ते शास्त्र.[४] सांप्रतची परिस्थिती हाच शास्त्राधार.[५] कोणतेही धर्मतत्त्व स्वीकारावयाचे असले तरी ते तत्त्व विज्ञान आणि लोकहिताच्या कसोटीस ते प्रथम लावतात. त्याजबरोबर प्रत्यक्ष अनुभवाची कसोटीही त्यांना मान्य आहे. याशिवाय अुपयुक्ततेच्या कसोटीवरच घासून ते सुधारणांचा स्वीकार करतात. कोणताही आचार हितकर आहे वा त्या त्या परिस्थितीत अुपयुक्त आहे की नाही याचा विचार करावा असा त्यांचा आग्रह आहे.[६] 'सुधारणा अिष्ट की अनिष्ट या प्रश्नाचे अुत्तर ती आज अुपयुक्त आहे की अनुपयुक्त आहे याच अेका कसोटीवर पारखून दिले पाहिजे' असे त्यांना वाटते.[७] अुपयुक्त ते अुपयुक्त म्हणूनच आचरण्याची अद्ययावती प्रवृत्ती आम्ही स्वीकारली पाहिजे अशी केवळ अुपयुक्ततावादी भूमिका ते स्वीकारतात.[८] सुधारणा ही बलात्काराने करण्याअैवजी ती मतपरिवर्तनानेच करावी[९] आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा सन्मान ठेवून करावी असे त्यांचे मत आहे.[१०]

स्वभूमिकेच्या अधिष्ठानावरून सुधारणांचा विचार

समाजसुधारकाच्या ठिकाणचे गुणधर्म आणि समाजसुधारणेमागील दृष्टिकोन सावरकरांनी जसा स्पष्ट केला आहे तसेच सुधारणेसंबंधी त्यांनी केलेले विवेचनही अभ्यसनीय आहे. सावरकरांच्या मते सुधारणा म्हणजेच कोणत्या तरी दुष्ट रूढीचा अुच्छेद. रूढी म्हणजेच बहुसंख्यकांनी चिवट निष्ठेने अवलंबिलेली

---

१. जाति. नि. पृ. १८७. २. सा. सा. भाग २ – पृ. १२२. ३. जाति. नि. पृ. ८९. ४. क्ष–किरणे पृ. ११. ५. सा. सा. भाग २ – पृ. १२७. ६. सा. सा. भाग २–पृ. ४. ७. सा. सा. भाग २ – पृ. १६. ८. सा. सा. भाग २ – पृ. ३०. ९. जात्यु. नि. पृ. ३१५. १०. रत्ना. हिं. अिति. पृ. १४.

चाल.[१] म्हणूनच सुधारणा म्हणजे अल्पमत आणि रूढी म्हणजे बहुमत.[२] यामुळेच जो क्रांतिवादी सुधारक असतो तो प्रथम अेकटाच असणार. त्यातही जी रूढी कोटयनुकोटी लोक धर्म म्हणून पाळीत आहेत, तिलाच अुच्छेदू निघणारा सुधारक सर्वांहून अत्यंत अप्रिय ठरणारच. अशा टीकाकाराने समाजावर टीकास्त्र सोडताना तेजोभंग करण्याची वृत्ती न ठेवता विधायक दृष्टी ठेवली पाहिजे. शल्याची भूमिका घेण्यापेक्षा पार्थसारथी श्रीकृष्णाची भूमिका स्वीकारली पाहिजे. आपण स्वतः हीच भूमिका स्वीकारली असल्याचे सावरकर सांगतात. या कूपमंडूकतेच्या भंगड गुंगीत प्रज्ञाहत झालेल्या हिंदुराष्ट्राला कार्यप्रवृत्त करण्याचे व्रत त्यांनी अंगीकारलेले आहे.[३]

सुधारणेस पारतंत्र्यापेक्षा स्वराज्याचा काल अधिक अनुकूल असतो असा सिद्धान्त सावरकर मांडतात आणि पुराव्यादाखल बडोदे आणि कोल्हापूर या संस्थानांत भाषाविषयक व समाजहितकारक झालेल्या सुधारणांची माहिती ते देतात.[४]

व्यापक सुधारणावादाची कारणे—व्यक्तिमत्त्वात

सावरकरांचा सुधारणावाद हा विज्ञाननिष्ठा आणि मानवहित या प्रवृत्तींतून जन्मला असल्याने तो तात्त्विक दृष्ट्या तरी व्यापक बनला आहे. त्यामुळेच ते आपल्या सुधारणांत औद्योगिक सुधारणांचाही विचार करतात. नाशिकच्या मित्रमेळ्याच्या बैठकीतूनही ते औद्योगिक सुधारणांचा पुरस्कार करीत होते.[५] अंदमानातून पाठविलेल्या पत्रांतूनही ते हिंदुस्थानातील औद्योगिक प्रगतीची चिंता वाहात होते.[६] रत्नागिरीच्या दौऱ्यावर असताना दिलेल्या व्याख्यानांतून शाळेस जोडून अेक तरी अुत्पादक कारखाना चालवावा असा आग्रह करीत होते.[७]

सावरकरांनी हिंदू धर्मग्रंथाप्रमाणेच मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण व ख्रिश्चनांचा धर्मग्रंथ बायबल यांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. तेव्हा त्या सर्व धर्मग्रंथांतील विसंगती व धर्मभोळेपणा त्यांच्या ध्यानात आला होता. तेव्हा विज्ञान व मंत्रशीलतेचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांनी आपल्या सुधारणेचे क्षेत्र मर्यादित न ठेवता अितर धर्मीयांनाही सुधारणेच्या परिसरात ओढले आहे. आपापल्या धर्मग्रंथांचा अपौरुषेय म्हणून जे अितर धर्मीय अुदोअुदो करतात त्यांचा भ्रमनिरास सावरकरांनी केला आहे.[८] मुसलमान, ख्रिश्चनांचे सुतकी

---

१. सा. सा. भाग २ पृ. ९९. २. सा. सा. भाग २ पृ. ९८, रत्ना. हिं. अिति. पृ. ४. ३. सा. सा. भाग २ पृ. ३४–३५. ४. सा. सा. भाग २ पृ. १११–११२. ५. आ. घ. पृ. २३५. ६. अंद. अं. पत्र ५ वे, पृ. १८. ७. रत्ना. हिं. वृ. पृ. २९. ८. सा. सा. भाग २ – पृ. ७.

आचार हे आदी मानवांच्या धर्ममतांचे अवशेष कसे आहेत हे त्यांनी सोदाहरण दाखविले आहे.[१] त्यांनी मुसलमान समाजास स्पष्ट सांगितले आहे की, तुमचा समाजही ज्या धर्मवेडाच्या रानटी समजुतींनी नी क्रूर आचारांनी बुजबुजला आहे हे अुपद्रवी आचार नी क्रूर धर्मवेड तुम्ही शक्य तितक्या लवकर सोडणे तुमच्याच हिताचे आहे. . . . मनुष्यजातीच्या हितास जे जे आज अुपयुक्त ते ते वेखटक आचरण्याची अद्यतन प्रवृत्ती ती तुम्ही स्वीकारा. . . मुसलमान अद्ययावत बनल्या-वाचून त्यांचा स्वत:चाही नाश होणार आहे. म्हणून आता विज्ञाननिष्ठ बना."[२] मुसलमानांच्या धर्मवेडेपणास विज्ञानाच्या धारेचे पाणी चाखविल्यावाचून हिंदुस्थानासच नव्हे तर मानवी संस्कृतीसच धोका पोचल्यावाचून राहणार नाही अशी भीती मानवहितवादी सावरकरांना वाटते.[३] आणि याच मानवहिताच्या भूमिकेवरून ते मुसलमानांना कळवळून सांगतात, "आमची मनापासून अशी अिच्छा आहे की, हिंदी मुसलमानांनीही पोथीनिष्ठ प्रवृत्ती सोडून विज्ञाननिष्ठ बनावे. देवभोळेपणा आणि धर्मवेड यांच्या खोडयांतून त्यांची बुद्धी मोकळी व्हावी आणि त्यांचा समाजही शिक्षित, प्रगत नि अभ्युन्नत व्हावा. . . मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यात हिंदूंचेही कल्याणच आहे, हिंदी मुसल-मानांचे तर कोटकल्याणच आहे."[४] सावरकरांचा हा व्यापक सुधारणावाद पाहून पं. रघुनाथशास्त्री कोकजे यांनी म्हटले आहे– "हिंदुकर्मकांडातील भोंगळ सामर्थ्य-वादाचे खंडन करताना सावरकर मोठ्या आवेशाने पारशी, ख्रिस्ती, मुसलमानी, यहुदी अित्यादिकांच्या धर्मग्रंथांतील अेकाच प्रकारचे दोष दाखवितात, तेव्हा वाचक थक्क होअून जातो."[५] सावरकरांचा हा सुधारणावाद व्यापक होण्यास मुख्य कारण त्यांची विज्ञाननिष्ठा हीच होय. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी अशाच स्वरूपाची कारणमीमांसा करताना लिहिले आहे : 'विज्ञाननिष्ठेची परिणती आंतरराष्ट्रीयवादी व पर्यायाने व्यापक मानवतावादी भूमिकेत होणे हे क्रमप्राप्त व स्वाभाविक वाटण्यासारखे आहे.'[६]

सामाजिक क्रांतीकडे वळण्याची कारणेही व्यक्तिमत्त्वातच

सावरकरांचे समाजसुधारणाविषयक निबंध वाचताना अेक प्रश्न अभ्यास-कांच्या मनाला नेहमीच अस्वस्थ करतो. तो प्रश्न असा की, सावरकरांचे हे समाज-सुधारणाविषयक लेखन प्रतिकूल अशा बाह्य, राजकीय परिस्थितीतून तात्कालिक,

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. १६. २. क्ष–किरणे पृ. ११. ३. क्ष–किरणे पृ. ८. ४. जाति. नि. पृ. ३३७. ५. सा. वि. द. पृ. १५७. ६. सा. वि. द. पृ. ४५.

नैमित्यिक स्वरूपाचे म्हणून निर्माण झाले आहे की, त्या लेखनामागे सावरकरांची सुसंगत आणि शाश्वत महत्त्वाची काही विचारसरणी आहे? पंडित रघुनाथशास्त्री कोकजे यांनी या प्रश्नाची दखल घेतली आहे आणि स्वमत-प्रदर्शन करताना म्हटले आहे, "राजकारणात भाग न घेण्याचे त्यांना (सावरकरांना) बंधन होते. त्यामुळेच केवळ ते समाज़कारणाकडे वळले असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण असले ओढून ताणून आणलेले अवसान फार काळ टिकत नसते. सावरकरांनी १९२४ पासून १९३७ पर्यंत म्हणज़े जवळजवळ चौदा वर्षे जे कार्यक्षेत्र हलवून सोडले ते अुसन्या प्रेमाने होणे शक्य नव्हते. खरोखरीच समाजसुधारणेचे प्रेम असण्याचा हा भरभक्कम पुरावाच होय."[1]

सावरकरांची हिंदुसमाजाबद्दलची तळमळ वादातीत आहे. हिंदुराष्ट्रासाठी त्यांनी मृत्यूसही हटकण्यास कमी केले नाही. श्री. पु. भा. भावे यांनी म्हटल्याप्रमाणे 'मृत्यूसही हटकण्यास हे शब्द सावरकरांनी अमर्याद तळमळीने व अधिकाराने अुच्चारले आहेत. या तळमळीने सावरकरांचा प्रत्येक शब्द सजीव झाला आहे. सावरकरांचा अुपरोध, सावरकरांची वक्रोक्ती, सावरकरांचे आव्हान व आघात या तळमळीपोटी आहेत.'[2] अस्पृश्यांबद्दल सावरकरांना वाटणारी तळमळ व मानव्याच्या भूमिकेवरून अस्पृश्यांना केवळ स्पर्श करण्याची, कुत्रे जेथपर्यंत येते तेथपर्यंत येअू देण्याची त्यांनी स्पृश्यांना केलेली विनंती या हिंदुसमाजाबद्दलच्या कळवळ्यातूनच निर्माण झाली आहे. पुण्याच्या सनातन धर्माभिमान्यांनी राजभोजादिक अस्पृश्यांना काठीने झोडपून काढल्याचे वृत्त वाचून सावरकरांना जे दुःख झाले, ते त्यांच्या 'पुण्यातील तीन हजार मंबाजीवुवा' या निबंधात पानोपानी दिसून येते.[3]

सावरकरांचे समाजसुधारणाविषयक निबंध सूक्ष्मतेने वाचल्यानंतर अेक अुत्तर मनाला निश्चितपणे मिळते की, सावरकर समाजकारणाकडे वळले त्यामागे काही सुसंगत व शाश्वत स्वरूपाची विचारसरणी आहे. 'आधी सामाजिक की आधी राजकीय' या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर सावरकरांची यासंबंधातील विचारसरणी अत्यंत सुसंगत व स्पष्ट आहे. 'औद्योगिक व सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीलाही अुपकारकच आहेत' हे आगरकर प्रभृतींचे म्हणणे सावरकर १९०२ सालापासूनच अनुवादीत होते.[4] सामाजिक व राजकीय प्रश्न परस्परांशी किती निगडित आहेत हे पुढे रत्नागिरीच्या वास्तव्यात लिहिलेल्या अनेक निबंधांतून आणि व्याख्यानांतून सावरकरांनी विशद केले आहे. रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत

---

१. सा. वि. द. पृ. १५४. २. केसरी – सा. मृ. पु. पृ. १८. ३. जाति. नि. पृ. ९६ ते १०७. ४. आ. च. पृ. २३५.

त्यांची लेखणी जरी प्रचलित राजकारण-संन्यासाच्या शृंखलेने जखडलेली होती तरी जातिभेदाचे स्वरूप स्पष्ट करताना राजकीय परिस्थितीचा विचार करणे क्रमप्राप्त होणार ही जाणीव त्यांच्या मनात कायम होती.[1] सामाजिक क्रांती अेका अर्थी राजकारणाचाच भाग आहे हा आपला विचार स्पष्ट करण्यासाठी सावरकरांनी लिहिले आहे : 'हिंदुराष्ट्राचे हितशत्रू राजकीय विशेषाधिकाराचे हे नवे विषय आपल्या समाजाच्या अंगात जे टोचीत आहेत ते सुद्धा समाजाच्या अंगात सामाजिक विषमता मुरली आहे तोवर आणि त्यामुळेच विषारी ठरण्याचा संभव आहे. म्हणजे आधी सामाजिक विषमता जिवंत आहे म्हणून त्या खोडावर ही राजकीय विषमतेची कलमे बांधू शकली जातात, जीव धरू शकतात.'[2] सावरकरांची अशी मनोमन खात्री होती की, हिंदुराष्ट्राच्या अभ्युत्थानास्तव राजकारण नी समाजकारण ही दोन्हीही साधने अत्यावश्यक आहेत. राजकारण ही अेका हातातील चढती तलवार आहे. समाजकारण ही दुसऱ्या हातातील बचावती ढाल आहे. ही दोन्ही अेकमेकांस पूरक आहेत. यांपैकी कोणतेही अेक दुसऱ्यावाचून पंगू आहे. अर्थात ज्या अर्थी समाजकारण हेही हिंदुराष्ट्राच्या अभ्युत्थानार्थ अेक अपरित्याज्य साधन होअून बसले आहे आणि ज्या अर्थी हिंदुराष्ट्राच्या पायांत आमच्या आम्हीच ठोकून घेतलेल्या रोटीबंदी प्रभृती सात स्वदेशी शृंखला तोडूनं टाकल्यावाचून हिंदुसमाज अेकजीव, अेकजात, अेकात्म, संघटित, प्रबळ नि प्रगत होणे दुर्घट आहे, त्या अर्थी ज्या पोथीजात अुच्चनीचतेच्या मानीव जातिभेदाने ह्या सात शृंखला आमच्या हिंदुराष्ट्राच्या पायांत ठोकल्या, त्या जातिभेदाचे अुच्चाटन करणे हेही राष्ट्रकार्यच आहे.[3] राष्ट्राच्या पायांतील वाह्य विदेशी बेडया तोडण्याचे सामर्थ्य, हौसेनं धर्म म्हणून ठोकून घेतलेल्या, स्वदेशी बेडया तोडण्यानेच अधिक संचरणार आहे अशी सावरकरांची निश्चिती होती.[4] म्हणूनच त्यांना सहभोजन हे अेक राष्ट्रीय आंदोलन वाटत होते.[5] अस्पृश्यता-निवारण करण्याच्या या कार्यात त्यातले राजकीय अंग त्यांनी दृष्टिआड केले नव्हते. फक्त ते त्यांना राजकारणसंन्यासामुळे शब्दांनी व्यक्त करता येत नव्हते. म्हणून अस्पृश्यांना जवळ करणे कसे अिष्ट आहे याचे विवेचन करताना सावरकरांनी म्हटले आहे, "आम्ही असे विनवितो की, न्याय्य दृष्टीने, नैर्वधिक दृष्टीने (आणि जर आम्हांस राजकारणाची चर्चा करता आली असती तर आम्ही राजकीय दृष्टीनेही) महारास जवळ करणे अिष्ट आहे हे दाखवू शकलो असतो.'[6]

राजकीय कार्याच्या सफलतेसाठी, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जशी सामाजिक कार्याची नितांत आवश्यकता होती त्याचप्रमाणे प्राप्त झालेले स्वातंत्र्य टिकविण्याच्या

---

१. जाति. नि. पृ. २. २. जाति. नि. पृ. ३२७. ३. जाति. नि. पृ. ३२४.
४. जाति. नि. पृ. ३२४. ५. जाति. नि. पृ. ९०. ६. रत्ना. हिं. वृ. पृ. ११५.

दृष्टीनेही समाजकारण अपरिहार्य आहे अशी सावरकरांची खात्री होती- समाजातील जातिभेदाची अुपेक्षा करणे धोक्याचे आहे असा अिशारा देताना सावरकरांनी म्हटले आहे, "जे हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य आपणांस मिळवावयाचे आहे ते जातिभेदाने जर्जर झालेल्या या आपल्या राष्ट्र-पुरुषास जरी अेक वेळ मिळविता आले तरी या रोगाचे जोवर निर्मूलन झाले नाही तोवर अेका बाजूस ते मिळविणे शतपट दुर्घट होणारे असून दुसऱ्या बाजूस ते मिळविताच पुन्हा गमावण्या-चाही पाया भरत जाणार आहे."[1]

समाजकारण व राजकारण यांच्यातील अभेदासंबंधी सावरकरांची वरील मते केवळ त्यांच्या राजकारण-संन्यासातून निर्माण झालेली नव्हती. ती तात्कालिक स्वरूपाचीही नव्हती हे स्पष्ट करण्यासाठी आणखी अेक महत्त्वाचा पुरावा अुपलब्ध आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५५ साली सावरकर जेव्हा पतितपावन मंदिरा-तील गणेशोत्सवाच्या समारोपानिमित्ताने रत्नागिरीस गेले होते, तेव्हा त्या प्रसंगी त्यांनी जे भाषण केले, ते या प्रश्नाच्या संदर्भात अभ्यसनीय आहे. त्या वेळी सावरकर म्हणाले होते : "सामाजिक क्रांती ही राजकीय क्रांतीला पूरक असते व राजकीय क्रांती टिकाअू व्हावयास हवी असेल तर सामाजिक क्रांतीचा आधार-स्तंभ असणारा समाज हा अेकजिनसी बनला पाहिजे. ही गोष्ट झाली नाही तर राजकीय क्रांतीही विफल होअून पारतंत्र्याच्या शृंखला पुन्हा पायांत पडतात हा अनुभव पूर्वी आलाच आहे."[2] रत्नागिरीच्या याच दौऱ्यात त्यांनी हा विचार पुन्हा अेकदा मांडला होता. ते म्हणाले, "राजकीय क्रांतीने स्वातंत्र्य हस्तगत करून घेता येते, तथापि ते जागृत व अेकजिनसी समाज असल्याशिवाय चिरकाल टिकविणे अशक्यप्राय आहे हे जाणून सामाजिक सुधारणांकडेही देशातील लोक-धुरीणांचे लक्ष सतत राहिले पाहिजे."[3]

वरील सर्व विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट होअील की, सावरकर समाज-कारणाकडे वळले त्यामागे अेक सुसंगत व शाश्वत स्वरूपाची विचारसरणी होती. त्यांचे सामाजिक कार्य हे केवळ परिस्थितीशी केलेल्या तडजोडीतून निर्माण झालेले नव्हते. म्हणूनच डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी म्हटल्याप्रमाणे, "राजकारण हे समाजकारणावाचून नेहमी पंगूच राहणार हा सावरकरांचा सिद्धान्त आजही सर्वांनाच शिरोधार्य वाटतो."[4] श्री. पु. भा. भावे यांनी सावरकरांच्या वरील विचारसरणीवरील आपले अभिमत व्यक्त करताना म्हटले आहे : "राजकारणाचे

---

१. जाति. नि. पृ. १०. २. केसरी – दि. ६–२–१९५५. ३. केसरी – दि. १५–२–१९५५. ४. केसरी – सा. मृ. पु. १५–१–१९६१, पृ. ६.

अनन्यसाधारण महत्त्व ओळखूनही समाजकारणाचे स्थान सावरकरांनी मानलेले होते. राजकीय अुत्कर्ष व सामाजिक अुत्कर्ष यांचे परस्परसंबंध त्यांना अुत्तम प्रकारे ठाअूक होते, म्हणूनच राजकीय जागृतीसमवेतच सामाजिक जागृती घडवून आणण्याचा अट्टाहास स्वा. सावरकरांनी केला."[१]

सावरकर समाजकारणाकडे वळण्यामागे जशी त्यांची अेक निश्चित विचार-सरणी कारणीभूत आहे तसेच त्यांच्या व्यक्तित्वातील अितर काही घटकही कारणीभूत झाले आहेत. क्रांती हा सावरकरांच्या स्वभावाचा स्थायीभाव अस-ल्याचे पूर्वी आपण पाहिलेच आहे. याच क्रांतिवृत्तीमुळे सावरकर सामाजिक क्रांती-कडेही आकृष्ट झाले. समाजकार्याचे वर्णन करताना सावरकर 'सामाजिक क्रांती' शब्दप्रयोगच अनेकदा वापरतात.[२] समाजकारणाकडे सावरकरांनी आपला मोहरा वळविला यामागे आणखी अेक लहानसे कारण त्यांच्या व्यक्तित्वात सापडते. सावरकरांचे व्यक्तित्व आक्रमक आणि विजिगीषू वृत्तीने नेहमी स्फुरण पावत असते. जेथे पराक्रमाला, पौरुषाला आवाहन आहे, तेथे त्यांची प्रथम धाव असते. समाजकारणातही पराक्रमाला, पौरुषाला आवाहन देण्याचे सामर्थ्य आहे हे त्यांच्या ध्यानी आले होते. 'समाजकारणातही लोखंडाचे चणे खावे लागतात ते येरा गवाळाचे काम नोहे' या सावरकरांच्या विचारातच ते समाजकारणाच्या क्षेत्रात का अुतरले या प्रश्नाचे अुत्तर मिळते.[३]

व्यक्तिमत्त्वातील विविध निष्ठांनी प्रभावित झालेला निबंधातील आशय

(१) हिंदुत्वनिष्ठा

सावरकरांच्या निबंधवाङ्मयाचा आशय त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मुख्यत: तीन निष्ठांनी प्रभावित झालेला आहे. हिंदुत्वनिष्ठा, विज्ञाननिष्ठा आणि स्वातंत्र्य-निष्ठा ह्या त्या तीन निष्ठा होत. अंदमानातील अनुभवांनी सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा विशेष प्रखर बनली होती. '१९०६ ते १९१० पर्यंतच्या अिंग्लंड-मधील वास्तव्यात सावरकरांचे लक्ष 'हिंदू' शब्दाच्या व्याख्येकडे गेले होते.[४] अंदमानात १९२१ च्या शिरगणतीच्या कामास सुरुवात होताच हिंदुहिंदूंतील सांप्रदायिक भांडणांचा प्रतिध्वनी अंदमानातील हिंदू कैद्यांत अुमटू लागला. 'आर्य', 'शीख' अशा निरनिराळ्या नावाखाली हिंदूंची संख्या विभागू लागली. अशा वेळी 'हिंदू' शब्दाची सत्य, अैतिहासिक व सार्वत्रिक व्याख्या सावरकरांनी मनाशी

---

१. केसरी – सा. मृ. पु. पृ. १७. २. जाति. नि. पृ. ३२६–३२७. ३. जाति. नि. पृ. ३२५. ४. हिंदुत्व – प्रस्तावना. पृ. १.

निश्चित केली व तिचा अुपदेशही सर्वत्र सुरू केला. पुढे १९२३ मध्ये सावरकरांनी यासंबंधीचे आंपले सर्व विचार 'हिंदुत्व' या प्रबंधात प्रसिद्ध केले.[१]

अंदमानातून आणि पुढे रत्नागिरीच्या बंदीवासातून सुटून आल्यावर आजवर सावरकरांचे जे प्रत्यक्ष चरित्र घडले त्याला 'हिंदुत्वा'च्या या प्रबंधातील भूमिकेची आणि विचारसरणीची अखंड प्रेरणा लाभलेली आहे. म्हणूनच 'हिंदुत्व' हे पुस्तक हिंदुराष्ट्रवादाची 'गीता' यथार्थपणे मानण्यात येते.[२] 'हिंदुत्व' ह्या ग्रंथातील विवेचन हा सावरकरांच्या पुढील चळवळीचा पायाच होय. स्वतः सावरकरांना 'हिंदुत्व' हा शब्द आपल्या सबंध राजकारणाच्या शरीराचा जणू काय पाठीचा कणाच वाटतो;[३] आणि रत्नागिरीच्या राजकारणसंन्यासाच्या काळात सावरकरांच्या समाजकारणाच्या पाठीचा कणाही हा 'हिंदुत्व' शब्दच बनला होता. त्यांच्या वाणीची आणि लेखणीची प्रेरणा या 'हिंदुत्वा'त होती.

'हिंदुत्व' या प्रबंधात सावरकरांनी 'हिंदू' शब्दाच्या वास्तविक अर्था-विषयी हिंदूंतील अनेक संप्रदायांत असलेला तिरस्कार हा भाषाशास्त्रीय आणि अैतिहासिक अज्ञानाचा परिणाम आहे ही गोष्ट सविस्तरपणे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.[४] सावरकरांचे असे निश्चित मत आहे की, सप्तसिंधू नद्यांच्या शेवटच्या सीमेपर्यंत आर्यांची वसाहत पसरली होती व या आर्यांनीच या सरित-श्रेष्ठांबद्दलच्या कृतज्ञता बुद्धीने प्रेरित होअून, स्वतःला 'सप्तसिंधू' हे नाव धारण केले.[५] हे लोक केवळ आपणांसच 'सिंधू-हिंदू' संबोधीत होते असे नाही, तर शेजारी असलेल्या देशचे लोकसुद्धा त्यांना सप्तसिंधू या नावाने ओळखीत होते. भाषाशास्त्रीय नियमाने या संस्कृतमधील 'स' चा हिंदी वा अितर प्राकृत भाषेत 'ह'मध्ये बदल झाला आणि 'सप्तसिंधू' या नावाचे रूपांतर 'हप्तहिंदू' असे झाले.[६] तेव्हा 'हिंदू' हा शब्द आपणांस परक्या लोकांनी तिरस्काराने लावला नसून अुलट मूळचे 'हिंदू' नावच परकीयांनी कायम केले.[७] तेव्हा 'हिंदू' हा शब्द आपणांस परक्या लोकांनी तिरस्काराने लावला नसून 'हिंदू' या शब्दाचा वास्तविक अर्थ हा असा आहे.

अैतिहासिक दृष्टीने पाहिले तर 'हिंदू व 'हिंदुस्थान' या शब्दांच्या अिति-हासाचा भाग अत्यंत प्राचीन अशा वैदिक कालापासून तो अगदी अर्वाचीन हिंदू साम्राज्याचे पतन १८१८ साली झाले तेथपर्यत कसा सुसंगत रीतीने काढता येतो हे सावरकरांनी या प्रबंधात सोदाहरण स्पष्ट केले आहे. हा सर्व अितिहास निवेदन

---

१. मा. जन्म. पृ. २९१. २. केसरी वीर सा. अ. म. वि. पृ. ३२. ३. हिंदुत्व पृ. ४३. ४. मा. जन्म. पृ. २९१. ५. हिंदुत्व पृ. ६. ६. हिंदुत्व पृ. ७–८. ७. हिंदुत्व. पृ. १५.

करताना सावरकरांची दृष्टी हिंदुत्वनिष्ठेनें रंगलेली असल्याचे पदोपदी दिसून येते. 'हिंदू' व 'हिंदुत्व' या शब्दांबद्दलचा सावरकरांचा अभिमान येथे ओतप्रोत भरलेला आहे. "हिंदू हा शब्द आपल्या जातीचे जणू अेक निशाणच होअून बसला आहे, आणि ज्या गोष्टींनी आपली जातीय अेकी ही केप-कामोरिनपासून तो काश्मीर-पर्यंत व अटकपासून कटकपर्यंत बलवत्तर केली जाते व अखंड टिकविता येते, अशा गोष्टींपैकी अेक प्रमुख गोष्ट होअून बसली आहे" अशा शब्दांत 'हिंदू' शब्दा-बद्दलचा अभिमान आणि त्याचे सामर्थ्य सावरकर व्यक्त करतात.[१] 'हिंदुत्व' हे नाव तर मनुष्यजातीला नवीन जीवन व स्फूर्ती देणारे आहे असा त्यांचा विश्वास आहे.[२] 'हिंदुत्व' हा शब्द आज जसा आहे तसा घडवायला चाळीस शतकांचा काळ लागला असा गौरवयुक्त अुल्लेख ते करतात.[३]

वैदिक काळापासून हिंदूंच्या ज्या ज्या चळवळी झाल्या त्या त्या या हिंदु-त्वाच्या अभिमानातून, हिंदुत्वरक्षणार्थ आणि हिंदूंच्या पुनरुत्थानाच्या भूमिकेवरून झाल्या असा अेकसारखा घोष सावरकरांनी आपल्या या प्रबंधात कायम ठेवला आहे. बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारानंतर जेव्हा आपल्या जातीय जीवनाचाच बळी जाण्याचा प्रसंग आला तेव्हा याच हिंदुत्वाच्या अभिमानाने म्यानातून निष्कोषित झालेल्या पुनरुद्दीप्त हिंदू शस्त्रांचा विजय हा संपूर्ण व संशयातीत असाच झाला असे सावरकर सांगतात.[४] शक-हूणांच्या पराभवानंतर मुसलमानांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. परंतु शतकामागून शतके चाललेले हे भीषण युद्ध हिंदुस्थानने अगदी अेकाकी असताना नैतिक दृष्टीने आणि लष्करी बाण्याने लढत ठेविले. शेवटी विजयी हिंदूंचे आपले निशाण आपल्या मराठ्यांनी अटकेपर्यंत नेले, ते शीख लोकांनी स्वीकृत केले व सिंधू नदीच्या पार नेअून काबूल नदीच्या तीरावर भिडविले. अितिहासाचा हा तपशील सांगितल्यावर सावरकर आपला निष्कर्ष सांगतात की, 'ह्या सतत चाललेल्या भीषण झगड्यामध्ये आपल्या लोकांना आपण हिंदू आहोत याची प्रखर जाणीव झाली; आणि ते सर्व आपल्या अितिहासात पूर्वी कधीही झाले नव्हते अितके अेकराष्ट्रीयत्वाच्या बंधनाने बद्ध झाले.[५]

अि. स. १३०० ते १८०० पर्यंत हिंदुस्थानात ज्या ज्या घटना घडल्या वा प्रसंग निर्माण झाले त्या सर्व चळवळींचा हेतू हिंदुस्थानची अभ्रू आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करणे आणि हिंदुत्वाच्या संस्कृतीचे अैक्य आणि सार्वजनिक जीवित अखंड कायम ठेवणे हा होता असा सावरकरांचा सिद्धान्त आहे.[६] या आपल्या

---

१. हिंदुत्व पृ. ६८. २. हिंदुत्व पृ. ३. ३. हिंदुत्व पृ. ४. ४. हिंदुत्व पृ. २२
५. हिंदुत्व पृ. ४२. ६. हिंदुत्व पृ. ४३.

स्पष्टीकरणार्थ त्यांनी पृथ्वीराजापासून रजपूत, शीख व मराठे यांच्या अितिहासांतील विविध दाखले दिले आहेत. 'पृथ्वीराज रासो' या ग्रंथाचा कवी चंदबरदाअी, त्याचा पिता वेन कवी यांनी आपल्या काव्यांतून 'हिंदू' हाचं शब्द वारंवार वापरलेला आहे.[१] रामदासांनी तर 'हिंदुस्थान बळावले' असाच शब्दप्रयोग केला आहे.[२] कवी भूषण हा 'आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत हिंदू जातीच्या पुनरुत्थानाच्या चळवळीला प्रोत्साहन देत होता.[३] भूषण कवी छत्रसालकडे तो हिंदुत्वाचा अेक पाठीराखा होता याच दृष्टीने पाहात होता.[४] शीख लोकांचा महान गुरू तेगबहादूर यांनी पंजाबमध्ये केवळ या हिंदुमोचनाच्या आंदोलनालाच अुत्तेजित केले.[५] गुरू गोविंदसिंह हा तर हिंदुजातीचा व हिंदू संस्कृतीचा संरक्षक होता.[६] शिवाजीच्या मनात 'हिंदवी स्वराज्य' स्थापण्याचे ध्येय होते.[७] राजाराम महाराजांनी 'हिंदुराव' ही अुच्च दर्जाची व अभिमानास्पद पदवी देअून वहिरजी घोरपडे यांचा गौरव केला होता.[८] शिवाजीच्या सर्व अनुयायांच्या अनेक पिढ्यांचे मुख्य ध्येय– हिंदुपदपादशाही– हेच होते.[९] नानासाहेब पेशवे तर सर्वत्र हिंदुत्वाचे रक्षक म्हणूनच दृष्टीस पडतात.[१०] पेशव्यातर्फे निजामच्या दरबारी असणारे प्रसिद्ध वकील गोविंदराव काळे हे 'अटक नदीच्या अलीकडे दक्षिण समुद्रापावेतो हिंदूंचे स्थान– तुरकस्थान नव्हे' असे प्रकटपणे, निर्भयपणे सांगतात.[११] अितिहासातील असे विविध अुल्लेख अुद्धृत करून सावरकर शेवटी सांगतात : 'हिंदू' व 'हिंदुस्थान' यांच्या अुत्पत्तीवद्दल स्वयंस्फूर्तीने त्यांमध्ये अचूक अुल्लेख केला आहे. आपल्या अगदी शेवटल्या पिढीपर्यंत, आपले पूर्वज किती पूर्णपणाने ह्या संज्ञांना सादर मान देत होते, याचे वक्तृत्वपूर्ण निदर्शन या पत्रात झाले आहे."[१२]

सावरकरांनी 'हिंदुत्व' प्रबंधाचा अुत्तरार्ध मुख्यत: हिंदुत्वाची मूलतत्त्वे ठरविण्यासाठी व हिंदूची व्याख्या करण्यासाठी खर्च केला आहे; आणि ग्रंथाच्या अखेरीस हिंदूंना जाति-अुपजातीतील कृत्रिम बंधने तोडून टाकण्याचा कृतिमंत्र दिला आहे.[१३] हिंद देशाचा भविष्यकाळ हिंदूंच्या सामर्थ्यावरच अवलंबून असल्याने असे सामर्थ्य अुत्पन्न करण्यासाठी हिंदूंनी आपल्या जातीच्या मूळ केंद्र स्थानाला बांधणारा प्रत्येक बंध मग तो अेक रक्ताचा असो, भाषेचा असो, किंवा सर्वसाधारण अुत्सव व सण यांचा असो, अथवा तो संस्कृतीचा असो, मातृभूमीवरील प्रेमाने तो दृढ करावा अशी चेतवणी दिली आहे.[१४]

---

१. हिंदुत्व पृ. ४४–४७. २. हिंदुत्व पृ. ४७. ३. हिंदुत्व पृ. ५०. ४. हिंदुत्व पृ. ५०. ५. हिंदुत्व पृ. ५१. ६. हिंदुत्व पृ. ५२. ७. हिंदुत्व पृ. ५३. ८. हिंदुत्व पृ. ५५. ९. हिंदुत्व पृ. ६०. १०. हिंदुत्व पृ. ६०. ११. हिंदुत्व पृ. ६१–६२. १२. हिंदुत्व पृ. ६३. १३. हिंदुत्व पृ. १३६. १४. हिंदुत्व पृ. १३६.

सावरकरांनी हिंदुत्वाची प्रमुख तीन लक्षणे– समान राष्ट्र, समान जाती आणि समान संस्कृती– सांगितल्यावर हिंदूची व्याख्या अेका अनुष्टुपात सांगितली आहे ती अशी :

" आसिंधु-सिंधुपर्यंता यस्य भारत भूमिका ।
पितृभू पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ।। "

व्याख्येतील 'पितृभू' शब्दात 'राष्ट्र' व 'जाती' या हिंदुत्वाच्या पहिल्या दोन लक्षणांचा समावेश होतो आणि तिसरे अवश्य लक्षण जे संस्कृती ते 'पुण्यभू' शब्दाने व्यक्त होते.[1]

सावरकरांनी केलेली 'हिंदू'ची ही व्याख्या हिंदुत्वावरच कशी अधिष्ठित आहे हे येथे स्पष्ट होते. सावरकरांचे वेगळेपण ते येथे आहे. सावरकरांपूर्वी 'हिंदू'-ची व्याख्या करण्याचे अनेक प्रयत्न झाले. या प्रयत्नांचा अितिहास सांगताना 'हिंदुत्व' प्रबंधाच्या प्रकाशकांनी लिहिले आहे :

" From the most eminent scholars both Indian and English right down to the penny aliner in the daily sheets, each and all who got interested in the subject tried to define the word 'Hindu'. How the more precisely they tried to define the word 'Hindu' the more confounded the confusion grew, could best be seen by the fact that a respectable and studied booklet published at that time on the subject 'who is a Hindu' could collect some fifty definitions of the word which then held the field and how the author of it at last summed up the argument by pointing out that the word 'Hindu' was simply undefinable. "[2]

काही भारतीय व्यक्तींनी 'हिंदू'ची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. 'भाला'कार भोपटकरांनी 'ज्याची महामाता धेनू आहे तो हिंदू' (धेनुर्यस्य महामाता) अशी व्याख्या केली आहे[3] गाअीसारख्या दुबळ्या पशूवर आधारित अशी ही व्याख्या हिंदुत्वनिष्ठ सावरकरांनाही मान्य नाही, म्हणूनच ते 'धेन जर कोणाची खरोखरच महामाता असेल तर ती बैलाची होय' अशा कुत्सापूर्ण शब्दात तिची बोळवण करतात. दुसरी अधिक व्यापक व बुद्धिनिष्ठ व्याख्या केली लो. टिळकांनी. ती व्याख्या अशी :

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
अुपास्यानामनियमः अेतद्धर्मस्य लक्षणम् ।।

---

१. हिंदुत्व पृ. ११३. २. हिंदुत्व – प्रस्तावना, पृ. १. ३. क्ष–किरणे पृ. २०.

लो. टिळकांच्या या व्याख्येत 'अुपास्यानामनियमः' आणि 'साधनानामनेकता' या दोन पदांनी हिंदुसमाज हा विशिष्ट परमार्थसाधनमूलक असा संप्रदाय नाही ही गोष्ट त्यांनी दाखविली आहे. आणि 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' या वाक्याने जाती अेकत्र बांधण्याचे अेक महत्त्वाचे बंधन त्यांनी दिले आहे.[1] डॉ. केतकर यांनी लो. टिळकांच्या या व्याख्येतील महत्त्वाच्या त्रुटी दाखविल्या आहेत. मुख्यतः वेदाविषयी प्रामाण्यबुद्धी नसलेला वर्ग हिंदुसमाजातून बाहेर पडण्याची भीती डॉ. केतकरांनी व्यक्त केली आहे.[2] हिंदुत्वाधिष्ठित विचारसरणीमुळे खुद्द सावरकरांनाही टिळकांची व्याख्या फक्त 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त असा जो सनातन धर्म' त्याची व्याख्या वाटते. सावरकरांचे असे स्पष्ट मत आहे की, टिळकांच्या विवेचनाचा मुख्य रोख ज्याला 'हिंदुधर्म' असे म्हणतात त्यावरच फक्त आहे– 'हिंदुत्वावर नाही.[3] अर्थात सावरकरांची व्याख्या मुख्यतः हिंदुत्वाधिष्ठितच आहे हे आपण पूर्वी पाहिलेच आहे.

डॉ. केतकर यांनी टिळकांच्या व्याख्येतील त्रुटी दाखवून स्वतः 'हिंदू' शब्दाची व्याख्या केली आहे. ब्राह्मणास मानणारे ते हिंदू असे लक्षण वरेच व्यापक होअील' असे डॉ. केतकरांना वाटते.[4] पण हिंदूंचे हे लक्षण ठरविताना 'ते पूर्णपणे बरोबर होणार नाही,' असे स्वतः केतकरांनीच सांगितले असल्याने आणि व्याख्येचा आधार अेक विशिष्ट वर्ण वा वर्ग असल्यामुळे तिला स्थैर्य व चिरकालिकता लाभणे कठीण आहे. सावरकरांच्या व्याख्येला हिंदुत्व लक्षणातील राष्ट्र-जाती व संस्कृती या चिरंतन घटकांचा भक्कम पाया लाभलेला आहे.

अखिल भारतीय हरिजन सेवक संघाचे अेक कार्यकर्ते कै. काकासाहेब बरवे यांनी 'आदिवासी—हिंदू की अहिंदू?' या प्रश्नाची चर्चा करताना लो. टिळक व सावरकर यांनी केलेल्या हिंदूंच्या व्याख्यांवर सविस्तर भाष्य केले आहे. कै. बरवे लिहितात, "या दोन व्याख्यांपैकी लो. टिळकांची व्याख्या बरोबर दिसत नाही. ही व्याख्या वैदिक-धर्माला लागू पडेल, पण नंतर बनलेल्या हिंदुधर्माला लागू पडणार नाही. . . . वेद ज्यांना अैकू दिले नाहीत व वाचू दिले नाहीत, त्या बहुसंख्य हिंदूंना वेदाविषयी प्रामाण्यबुद्धीचे लक्षण लावणे चुकीचे ठरते. श्री. सावरकरांची व्याख्या मात्र प्रादेशिक आहे, आणि मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी व पारशी यांची पुण्यभूमी हिंदुस्थानाबाहेर असल्यामुळे त्यांच्या व्याख्येप्रमाणे ते वगळले जातात; व बाकीचे लोक हिंदूंतच समाविष्ट होतात. मला ही व्याख्या अधिक बरोबर वाटते."[5]

---

१. ज्ञा. को. – प्रथम खंड, पृ. ९९. २. ज्ञा. को. – प्रथम खंड पृ. ९९.
३. हिंदुत्व पृ. १०५. ४. ज्ञा. को.–प्रस्तावना पृ. १००. ५. मा. वि. पृ. २२४.

सावरकरांच्या व्याख्येच्या बाबतीत असा अनुकूल निर्णय दिल्यानंतर सावरकरांच्या व्याख्येशी मिळतीजुळती अशी अेक स्थूल व्याख्याही कै. बरवे यांनी केली आहे. 'हिंदुस्थानात राहणारे, पण जे मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी अथवा पार्शी नाहीत ते सर्व हिंदू' असे म्हणण्यास कै. बरवे यांना काहीच प्रत्यवाय वाटत नाही.'[1]

सावरकरांनी केलेली हिंदुत्वाची व्याख्या किती समर्पक आहे हे पाहण्यासाठी श्री. ग. वि. केतकर यांनी केलेले विवेचन अत्यंत महत्त्वाचे ठरते. श्री. केतकर यांच्या मते १९५६ मध्ये जी नवी हिंदु-संहिता सिद्ध झाली त्या नव्या संहितेतही सावरकरांच्या व्याख्येचेच प्रतिबिंब अुमटले आहे.[2] श्री. ग. वि. केतकर लिहितात, "ज्यांच्या धर्माची अुत्पत्ती भारतात झाली असे वंशपरंपरा भारतात राहणारे लोक हे ब्रिटिशांनी आणि काँग्रेसी सत्ताधाऱ्यांनी 'हिंदू' या नावाला पात्र म्हणून मानले. हिंदूंमधून या दोघांही सत्ताधाऱ्यांनी वगळले ते मुसलमान, पार्शी, ज्यू व ख्रिस्ती; या लोकांचे धर्म वाहेरून भारतात आले आहेत. ही विभागणी सूत्रमय शब्दांत सांगावयाची तर "भारत हीच ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे तो हिंदू' असेच म्हटले पाहिजे."[3]

'हिंदू'च्या अितरांनी केलेल्या व्याख्या व त्यांतील त्रुटी पाहिल्यानंतर "आमची व्याख्या अगदी संकुचित नाही व अगदी विस्खलित नाही; आणि म्हणून अव्याप्ती व अतिव्याप्ती या दोनही दोषांपासून ती मुक्त आहे." हे सावरकरांचे अुद्गार यथार्थ वाटतात.[4] याचे कारण ही व्याख्या करताना सावरकरांनी तिला हिंदुत्वाची शास्त्रीय बैठक दिली होती आणि या प्रश्नाचा मूलगामी विचार सावरकरांनी केला होता. मूलगामित्व हेही सावरकरांच्या व्यक्तित्वातील अेक महत्त्वाचे मूलद्रव्य आहे. अितिहासाधिष्ठित ही शास्त्रीय दृष्टी आणि हे मूलगामित्व यांमुळे सावरकरांच्या या व्याख्येला अेखाद्या शास्त्रीय सूत्राची सार्वत्रिकता व सत्यता लाभली आहे. श्री. धनंजय कीर यांनी हा विचार व्यक्त करताना म्हटले आहे :

" Savarkar is, therefore, to this Hindu ideology what Newton is to the Law of Gravitation or Marx to Socialism. Each of them applied his own logic to the diverse views and brought unity in diversiy. "[5]

---

१. मा. वि. पृ. २२३. २. केसरी – वी. सा. अ. वि. पृ. २८. ३. केसरी – वी. सा. अ. वि. पृ. ३. ४. हिंदुत्व पृ. १२८. ५. Savarkar and His Times – p. 223.

हिंदुधर्म, संस्कृती व परंपरा यांबद्दल अभिमान

सावरकरांच्या 'हिंदुत्व' या प्रबंधासंबंधी जरा विस्ताराने विवेचन करण्याचे कारण पूर्वी दिलेच आहे. या 'हिंदुत्वा'तील वळकट विचारमेढीच्या आधारानेच त्यांची साहित्यलता विस्तारलेली आहे. त्यांच्या निबंधांतून हाच अेक विचारप्रवाह वेगाने वाहात आहे. या 'हिंदुत्वा'तून निर्माण झालेला हिंदुधर्म, हिंदू संस्कृती व परंपरा यांबद्दलचा अभिमान त्यांच्या निबंधांतून सर्वत्र डोकावतो. हिंदू धर्मातील भावडेपणावर त्यांनी शस्त्रही धरले आहे. पण हिंदुधर्म, संस्कृती व परंपरा यांबद्दलचा त्यांचा अभिमान जागता आणि जिवंत आहे. या अभिमानातून ते म्हणतात, 'हिंदू विचारपरंपरा....ही अितकी पूर्णपदाला पोचली आहे की, मनुष्याच्या कल्पना-शक्तीत आता असे काही अुरले नाही की, ज्यामुळे—अज्ञेयाबद्दल नसले तरी—अज्ञाताबद्दल अेखादी नवी कल्पना पुढे येऊ शकेल किंवा 'तत्' आणि 'त्वम्' यांच्यामधील संबंधाबद्दल काही नवीन मीमांसा निघू शकेल.'[१] हिंदुधर्म हाच सत्य आणि आत्मिक कल्याणाचा श्रेष्ठ मार्ग आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.[२] हिंदुधर्म व संस्कृती हीच मनुष्यजातीस कल्याणप्रद आहे अशी त्यांची निष्ठा होती.[३] अशा या प्रामाणिक सत्याचा अुपदेश व प्रचार करण्याचा अधिकारही असलाच पाहिजे असे त्यांना वाटे.[४] 'काही झाले तरी बुद्धिवादाच्या दृष्टीनेही अेकंदरीत पाहता धर्मांत ग्राह्यतम धर्म असेल तर तो हिंदुधर्म होय,' असा स्पष्ट निर्वाळा त्यांनी डॉ. आंबेडकरांना दिला होता.[५] हिंदुधर्म सोडून जाण्याची धमकी देणाऱ्या डॉ. आंबेडकरांना जसे हिंदुधर्माचे श्रेष्ठत्व सावरकरांनी सांगितले तसे गोरक्षणावर टीका करणाऱ्या अहिंदूनांही सावरकरांनी चांगलेच खडसावले आहे. ते लिहितात, "गोरक्षणास हिंदूंनी दिलेले धार्मिक स्वरूप कितीही भावडेपणाचे असले तरी दुष्टपणाचे नाही. कारण मनुष्यास अत्युपयोगी अशा बैलासारख्या पशूंचे रक्षण करण्याचाच, म्हणजे मानवी हिताचाच त्यात हेतू असतो. पण ज्या कित्येक अहिंदूंचा धर्मच मुळी गोघ्न आहे, त्यांचे ते धार्मिक वेडेपण नुसते भावडेच नसून दुष्टही आहे. त्यांना हिंदूस हसण्याचा लवलेश अधिकार नाही."[६] यज्ञात होणाऱ्या पशुहत्येविरुद्ध ओरडणाऱ्या ख्रिश्चन, मुसलमानादी अहिंदूंना सावरकर बजावतात, 'मनुष्याच्या पोटासाठी सहस्रावधी पशू प्रत्यही कसाअीखान्यात मारताना ज्यांस दुःख करावेसे वाटत नाही, त्यांना पोटासाठी जरी दहापाच वोकड यज्ञात मारले तरी कांगावा करण्याचा काय अधिकार आहे; अितकेच नव्हे तर पशुहननपर अेकेका श्लोकाच्या खंडनार्थ 'मा हिंस्यात्सर्व भूतानि' म्हणून टाहो फोडणारी नी प्रत्यक्ष आचरणात मनुष्यास शक्य

---

१. हिंदुत्व पृ. १११. २. श्रद्धानंद १३–३–२७. ३. श्रद्धानंद १३–३–२७.
४. श्रद्धानंद १३–३–२७. ५. जाति. नि. पृ. २२२. ६. क्ष–किरणे पृ. २५.

ती अहिंसा व्यवहारविण्यास कारणीभूत झालेली जी शंभर शंभर वचने हिंदूंच्या श्रुतिस्मृतिशास्त्रात सापडतात, त्यांही करून देवाला शक्य तितके खरेखरेच देवलसी करून सोडलेल्या नी भूतदयेच्या ध्येयास यावच्छक्यतो या हिंसामय सृष्टीतही व्यवहार्य करून सोडण्याचा यत्न करणाऱ्या हिंदुधर्माच्या सदिच्छेपुढे तरी जगताने स्वतःचे मस्तक नमविलेच पाहिजे."[१]

सावरकरांनी हिंदु-परंपरेचे गाअिलेले स्तोत्र अेकत्रित वाचावयाचे असेल तर 'हिंदुत्व' प्रबंधातील अनेक पृष्ठे आपणांस नजरेखालून घालावी लागतील.[२]

हिंदुराष्ट्रहित हीच कसोटी

हिंदुत्वनिष्ठेतून निर्माण झालेला हिंदुराष्ट्राभिमान सावरकरांच्या निबंधातून पदोपदी प्रकट झालेला आहे. राष्ट्र हा शब्द ते हिंदुराष्ट्र या अर्थीच नेहमी वापरतात; आणि कोणत्याही गोष्टीच्या ग्राह्याग्राह्यतेचा, योग्यायोग्यतेचा निकष ते हिंदुराष्ट्रहित हाच ठरवितात. गाय हिंदूंना कितीही पूज्य असली तरी ती राष्ट्रहानीस कारणीभूत होत आहे असे पाहताच त्यांना गोरक्षण हे त्याज्य, निंद्य, पाप वाटते.[३] युद्धात आवश्यक तेव्हा गाअी खाणे हाच त्या गाअीस हिंदुराष्ट्रास अुपयुक्त करून घेण्याचा खरा मार्ग त्यांना वाटतो.[४] कारण गोहत्येपेक्षा स्वराष्ट्रहत्या हे सहस्रपटींनी महत्तर पाप आहे, अशी त्यांची दृढ धारणा आहे.[५] देवलसी प्रवृत्तीचे परिणाम राष्ट्रहितघातक आहेत म्हणून ते तिचा निषेध करतात.[६] त्यांच्या मते पशू वा झाडे यांच्या रक्षणाचा वा नाशाचा निकषही राष्ट्रहित हाच असला पाहिजे.[७] सावरकरांना रूढीबद्दल चीड निर्माण झाली ती या हिंदुराष्ट्रहिताच्या भावनेतूनच. सिंधुबंदीमुळे यंत्रविद्या शिकण्यासाठी कुणीही हिंदूने परदेशगमन केले नाही याबद्दल त्यांना हळहळ वाटते.[८] रोटीबंदी ही राष्ट्रास घातक असल्यामुळेच तीवर ते प्रहार करतात.[९] हिंदुराष्ट्राची सर्वांगांनी भरभराट होण्यासाठीच त्यांना गुणनिष्ठ व्यवसाय-स्वातंत्र्य हवे आहे.[१०] अतअेव, जे राष्ट्रकारणास अुद्धरणास अवश्य वाटेल ते बेधडक आचरण्यास ते सांगतात.[११] असे करताना राष्ट्रीय हितास अुपयुक्त

---

१. सा. सा. खंड १ ला – पृ. ५३–५४. २. हिंदुत्व पृ. १०७, १०८, १०९, ११०. ३. सा. सा. खंड १ ला – पृ. ६४. ४. सा. सा. खंड १ ला – पृ. ६४. ५. सा. सा. खंड १ ला – पृ. ६५. ६. सा. सा. खंड १ ला – पृ. ६५. ७. सा. सा. भाग ३ रा – पृ. १२०. ८. सा. सा. भाग २ रा – पृ. ५४. ९. सा. सा. भाग २ रा – पृ. ८८. १०. जाति. नि. पृ. १६२. ११. सा. सा. भाग २ रा – पृ. १७.

ग्रंथालय ग्रंथ संग्रहालय. ठाणे. [illegible]
अनुक्रम..... दि: .....
अवांक ..... दी: दि: .....

ठरल्यानंतर जुन्या शास्त्रांचा आधार नसला तरी तेच आचरले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.[1] जर हे सांगितल्याने . . . शब्दनिष्ठ वाबावाक्यप्रमाणं प्रवृत्तीचे बोकाळलेले अवसान खचले तर त्यातच राष्ट्रहित आहे अशी त्यांची मनोमन खात्री आहे.[2]

सावरकरांची हिंदुत्वाची कल्पना

सावरकरांची हिंदुत्वाची कल्पना संकुचित होती की व्यापक होती याबद्दल विविध मते आढळून येतात. 'हिंदुत्वा'च्या कल्पनेचे आणि व्याख्येचे जे अनेक घटक स्वतः सावरकरांनी आपल्या 'हिंदुत्व' या प्रबंधांत सांगितले आहेत[3] त्या घटकांत सावरकर कोणत्या घटकाला अधिक प्राधान्य देतात हेही या दृष्टीने तपासले पाहिजे; आणि असा तपास घेतल्यानंतर असे आढळून येते की, 'राष्ट्र', 'जाती' आणि 'पुण्यभू' या घटकांपैकी सावरकर 'पुण्यभू' या घटकावरच अधिक भर देतात, किंबहुना 'हिंदुत्वा'च्या धार्मिक लक्षणालाच अधिक प्राधान्य देतात.

भारतात आश्रयार्थ आलेल्या अन्य धर्मीयांचा समावेश 'हिंदुत्वा'च्या कक्षेत करताना सावरकर या धार्मिक लक्षणाची प्रमुख कसोटीच लावतात. बोहरी, खोजा इत्यादी अन्य धर्मीय राष्ट्र, जाती व संस्कृती या हिंदुत्वाच्या तीन लक्षणांनी संपन्न असूनही सावरकर त्यांना हिंदुत्वा'च्या कक्षेत प्रवेश देण्यास सिद्ध नाहीत; आणि आपल्या या प्रतिबंधाचे कारण देताना सावरकरांनी सांगितले आहे की, 'बोहरी लोक तसेच मुसलमान किंवा ख्रिश्चन लोक यांच्याजवळ 'हिंदुत्वा'ची अितर सर्व लक्षणे आहेत, परंतु अेक लक्षण मात्र नाही; व ते लक्षण म्हणजे हे की, ते 'हिंदुस्थान'ला 'पुण्यभू' म्हणून मानीत नाहीत."[4]

मूळचे हिंदुधर्मीय असून नंतर धर्मांतर केलेल्या ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्मीयांनाही सावरकरांनी 'हिंदुत्वा'च्या क्षेत्रात प्रवेश नाकारला आहे. त्यांच्या मते हे लोक ह्या भूमीला जन्मभूमी मानत असले आणि जवळजवळ हिंदू रक्ताचेच असले तरीही त्यांना 'हिंदू' गणता यावयाचे नाही. कारण, ज्या वेळेपासून त्यांनी नवीन धर्माचा स्वीकार केला त्याच वेळेपासून त्यांचा हिंदु संस्कृतीवरील हक्क उडाला.[5] सावरकर या सर्व अन्यधर्मीयांना असे आवाहन करतात की, "हे बंधूंनो! तुम्ही फक्त अनन्यतेने आपल्या भूमातेवर प्रेम करा व ती केवळ 'पितृभू' आहे, अितकेच न मानता ती 'पुण्यभू'ही आहे असे माना, म्हणजे 'हिंदू संस्कृती'च्या कक्षेत तुमचे अत्यंत प्रेमाने स्वागत होअील."[6]

---

१. सा. सा. भाग २ – पृ. २८. २. सा. सा. भाग २ – पृ. ३४. ३. हिं. पृ. ११३. ४. हिं. पृ ११११. ५. हिं. पृ. ९६. ६. हिं. पृ. ११२.

सावरकरांचा 'पुण्यभू' शब्दाचा अर्थ धार्मिक लक्षणांशीच किती निगडित आहे हे या संदर्भात पाहण्यासारखे आहे.[1]

परंतु सावरकरांच्या 'हिंदुत्वा'च्या कल्पनेतील संकुचितता अधिक विचारान्ती आणि राजकीय नीतीच्या संदर्भात कमी झाली होती आणि तिला अेक व्यापक राष्ट्रीय अधिष्ठान प्राप्त होअू लागले होते असे मानण्याअितका पुरावा श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या अेका लेखात दिल्याचे आढळते. ५ अेप्रिल १९६२ च्या 'तरुण भारत'च्या अंकात श्री. माडखोलकर यांनी 'डॉ. हेडगेवार यांचे जीवनकार्य' या शीर्षकाखाली जो लेख लिहिला आहे त्यात सावरकरांनी 'हिंदुत्वा'च्या धार्मिक लक्षणाला गौणत्व देअून 'धर्मांतर केल्यावरही मनुष्य संस्कृतीने हिंदू राहू शकतो' या विचाराला अनुकूलता दर्शविल्याचा निर्वाळा श्री. माडखोलकर यांनी दिला आहे.[2]

या लेखात श्री. माडखोलकर यांनी सावरकरांच्या अेका खाजगी पत्राचा हवाला दिला आहे. आणि श्री. देवदत्त नारायण टिळक यांच्या ज्या विचारांना सावरकरांनी मान्यता दिली आहे ते पुढील विचारही अुद्धृत केले आहेत. "धर्मांतर म्हणजे संस्कृत्यन्तर किंवा समाजान्तर नव्हे. अेखाद्या माणसाने हिंदू धर्म सोडून अन्य धर्माचा स्वीकार केला म्हणजे त्याने आपल्या पूर्वजांची संस्कृती आणि समाज सोडला, असे समजण्याचे मुळीच कारण नाही. तो धर्मांतर केल्यावरही संस्कृतीने हिंदू राहू शकतो."[3]

रेव्हरंड ना. वा. टिळक आणि श्री. देवदत्त नारायण टिळक यांच्या धर्मांतरा-संबंधीच्या मतप्रणालीचा शोध घेणेही या संदर्भात अुचित ठरेल. श्री. दे. ना. टिळक यांचे मत वर अुद्धृत केलेच आहे. रेव्ह. टिळक यांचे धर्मांतरासंबंधीचे विचार श्री. दे. ना. टिळक यांनी त्यांच्या 'ना. वा. टिळक– व्यक्तिदर्शन व काव्यविवेचन' या चरित्रग्रंथात ग्रथित केले आहेत. त्या विचारावरून असे दिसते की, धर्मांतर म्हणजे संस्कृत्यन्तर नव्हे. या कल्पनेनेच टिळकांनी हिंदुसंस्कृतीला आपला पहिला 'जुना करार' म्हटले आहे.[4] टिळक वेदांना धिक्कारीत नव्हते तर त्यांना आपला जुना करार समजत होते.[5] कै. लक्ष्मीबाअी टिळक यांनी लिहिलेल्या 'स्मृति-चित्रां'च्या पहिल्या भागात शेवटी जी अेक कविता दिली आहे तीतही हाच विषय आला आहे. 'धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे' हाच त्या कवितेचा विषय आहे. कवितेचा कवी कोण हे स्पष्ट केलेले नसले तरी ती रेव्ह. टिळकांचीच

---

१. हिं. पृ. १०६, १०७. २. व्यक्तिरेखा – पृ. २४९. ३. व्यक्तिरेखा पृ. २४९
४. नारायण वामन टिळक – पृ. ६३. ५. नारायण वामन टिळक – पृ. ६३.

असावी असे 'मित्रास दिलेल्या अुत्तरा'वरून वाटते. त्या कवितेतील पुढील चरण चिन्त्य आहेत–

"ख्रिस्तयशोरत झालो तरि मी सोडि न जन्मधरेला"[1]
"मरेन आपुल्या देशासाठी ख्रिस्ती जरी झालो."[2]

नागपूर येथे भरलेल्या ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना कै. लक्ष्मीबाअी टिळक यांनी 'धर्मांतर म्हणजे देशान्तर नव्हे' या विषयाचा अुहापोह केलेला आहे. आणि त्यात ज्या ख्रिस्तीधर्मीय कवींनी हिंदुसंस्कृतीचा पुरस्कार केला आहे, अशांपैकी मायकेल मधुसूदन दत्त व तोरू दत्त यांचा आवर्जून अुल्लेख केला आहे. श्री. माडखोलकर यांना लिहिलेल्या खाजगी पत्रात सावरकरांनी याच मायकेल मधुसूदन दत्त या बंगाली राष्ट्रीय ख्रिस्ती कवीचा अुल्लेख करून 'माणसाने धर्मांतर केल्यावरही तो संस्कृतीने हिन्दू राहू शकतो' या मताला आपली अनुकूलता प्रकट केली आहे.[3]

सावरकरांचा 'अल्पसंख्याकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन' प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात विस्तृतपणे व्यक्त करण्यात आला आहेच, आणि त्या ठिकाणी 'आमचे पारशी नि ख्रिश्चन देशबंधू हे आजच आमच्याशी सांस्कृतिकदृष्टया समानशील आहेत' असे सावरकरांचे मत अुद्धृत करण्यात आले आहेत. तेव्हा सावरकरांच्या 'हिंदुत्वा'च्या कल्पनेत आणि व्याख्येत व्यापकता आली होती या मुद्दयाकडे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या अुपरिनिर्दिष्ट लेखातून जे लक्ष वेधले आहे, ते 'सावरकरांची हिंदुत्वाची कल्पना' समजावून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले पाहिजे.

श्री. माडखोलकर यांच्यासारख्या अभ्यासकाने सावरकरांच्या हिंदुत्वाच्या कल्पनेसंबंधी जे मत दे. ना. टिळक यांच्या विचाराच्या संदर्भात दिलेले आहे, त्यामुळे ते विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे. पण ते प्रत्यक्ष सावरकरांच्या वाङमयात स्पष्टपणे मांडल्याचे आढळत नसल्यामुळे या मतासंबंधी अधिक संशोधन व्हावयास हवे असे वाटते.

हिंदुत्वनिष्ठेच्या संदर्भातच प्रत्येक गोष्टीचा विचार

(१) **धर्मशास्त्र** : हिंदुसंघटन हेच स्मृतिशास्त्र मानावे अशा मताचे सावरकर आहेत[4]. 'म्हणूनच हिंदुराष्ट्राच्या अभ्युदयार्थ आजच्या परिस्थितीत

---

१. स्मृतिचित्रे – भाग १, पृ. १८४. २. स्मृतिचित्रे – भाग १, पृ. १८६.
३. व्यक्तिरेखा – पृ. २४९. ४. रत्ना. हिं. अिति. पृ. २७.

जो जो विधिनिषेध अुपकारक तो तो आमचे आजचे शास्त्र' अशी घोषणा ते करतात.[१] अितकेच नव्हे, तर हिंदुराष्ट्राच्या संघटनाबलाच्या मुळावरच घाव घालणारा धर्म नसून तो अपधर्म मानावा असा स्पष्ट सल्ला ते देतात.[२]

(२) **धर्माचार आणि धर्मोत्सव** : हिंदुराष्ट्राचा अभ्युदय तोच आजचा धर्म, तोच आजचा सदाचार अशा दृढ धारणेने सावरकर या विषयावरील आपले विचार व्यक्त करतात.[३] हिंदुधर्मातील व्रते व व्रताचार कशा रीतीने आचरावेत यासंबंधी सावरकर लिहितात, "हिंदुराष्ट्राची... प्रत्यक्ष सेवा नी रोखठोक परोपकार घडेल ते व्रत हिंदू साधु-संतांनी नी सामान्य स्त्री-पुरुषांनी आचरावे... हिंदुराष्ट्रास प्रत्यक्ष अुपयोगी पडेल ते कृत्य धार्मिक समजावे."[४] या विचाराच्या आधाराने सावरकर दानधर्माचे विविध प्रकारही सांगतात. मात्र हा दानधर्म लौकिक समजण्यात येणाऱ्या धर्मकल्पनेतून निर्माण झाला नसून सावरकरांच्या हिंदुत्व-निष्ठेतून तो प्रकटला आहे. त्यांच्या मते धार्मिक व्रते वा दानधर्म करावयाचा असेल तर हिंदू अनाथ महिलांचा अेखादा आश्रम अुघडावा.[५] हिंदूंच्या पोटची अनाथ लेकरे सोडवून ती पाळण्याकडे दानधर्म करावा. सत्यनारायण करण्यात रुपये खर्च करण्याअैवजी ती रक्कम डॉ. मुंजे यांच्या सैनिकी विद्यालयास द्यावी.[६] मृताच्या नावे (हिंदू) समाजहितकारक संस्थेस दान द्यावे.[७] तूप, भाताच्या राशी, मोहनभोग यज्ञाच्या आगीत न होमिता भूक करीत कासावीस झालेल्या आपल्या लक्षावधी धर्मबंधूंच्या पोटातील आगीत ओतावेत.[८] मिशनरी बायांप्रमाणे हिंदू स्त्रियांनीही शुद्धीचा अुपदेश करीत बाटच्या ख्रिश्चन वस्तीत हिंडण्याचे व्रत घ्यावे.[९] खरी धर्मसेवा करावयाची असेल तर हिंदुजातीस समर्थ बनविणाऱ्या संस्थेस लाखो रुपये देअूनच ती सेवा करावी.

धर्मोत्सवासंबंधीही सावरकरांची हीच दृष्टी आहे. धर्मोत्सवाचा हिंदुधर्माच्या नी राष्ट्राच्या अुद्धारास काही लाभ झाला पाहिजे[१०] ही विचारसरणी त्यांच्या विवेचनात अेकसारखी दिसते. मित्रमेळ्याच्या कार्यापासूनच अशा धर्मोत्सवांचा अुपयोग 'राष्ट्रात राजकीय चैतन्य आणि पौरुष' संचारण्यास्तव, सावरकरांनी केला होता.[११] लंडनला असताना रक्षाबंधन, विजयादशमी अित्यादी धार्मिक

---

१. क्ष–किरणे पृ. १५८. २. सा. सा. भाग २ – पृ. १२७. ३. रत्ना. हिं. अिति. पृ. ७३. ४. क्ष–किरणे – पृ. ८ व ५३. ५. क्ष–किरणे पृ. ५३ व ८५. ६. क्ष–किरणे पृ. ८४. ७. सा. सा. भाग ४ – पृ. १७. ८. सा. सा. भाग २ – पृ. ३४. ९. सा. सा. भाग ४ – पृ. ८६. १० सा. सा. भाग २ – पृ. ९०. ११. सा. सा. भाग १ – पृ. १२८.

अुत्सवांचा अुपयोग सावरकरांनी वरील हेतूसाठीच केला होता. रत्नागिरीच्या अखिल हिंदू गणेशोत्सवातील अेका भाषणात ते अुघडपणेच म्हणाले होते, "अुत्सव हे अेक तुच्छ निमित्त; मुख्य प्रश्न अशा राष्ट्रीय महत्त्वाचा आहे."[१] जात्युच्छेदक चळवळीच्या अेका अुत्सवप्रसंगी सावरकरांनी पुन्हा हेच सांगितले की, "या अुत्सवामुळे स्पर्शबंदीची बेडी, वेदोक्तबंदीची बेडी, शुद्धीच्या बंदीची बेडी, तुम्ही तुमच्या नगरापुरती तोडलीत."[२]

(३) **जातिभेद** : सावरकरांनी जन्मजात जात्युच्छेदक चळवळीचा संकल्प सोडताना या चळवळीमागील आपला हेतू प्रकट केला होता. ते म्हणाले, "आपल्या हिंदुराष्ट्रांच्या सामर्थ्यासि खच्ची करून टाकणाऱ्या बहुतेक दुष्ट रूढींचे जे मूळ त्या जातिभेदाच्या अुच्छेदनाचे आंदोलन हाती घेण्याचा संकल्प मी आज सोडीत आहे."[३] सावरकरांची ही निश्चित धारणा होती की जन्मजात जाति-भेद ही संस्था हिंदुराष्ट्राच्या अपकर्षाचे अेक बलवत्तर कारण आहे.[४] आजच्या जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद केल्यावाचून हिंदुराष्ट्राचे सामुदायिक अैक्य, परा-क्रमशक्ती नि प्रगतिक्षमता वाढणे दुर्घट आहे.[५] या जाणिवेने ते वारंवार सांगत होते : हिंदुधर्माच्या व हिंदुराष्ट्राच्या मुळासच लागलेली ही जन्मजात म्हण-विणाऱ्या पण पोथीजातच असणाऱ्या जातिभेदाची कीड मारल्यावाचून तो संघटित व सबळ होअून आजच्या जीवनकलहात टिकाव धरू शकणार नाही.[६] या जातिभेदाच्या विळख्यांनी हिंदुराष्ट्राच्या संघटित सामर्थ्याचे हातपाय बांधलेले आहेत.[७] ह्या पोथीजात जातिभेदाने आपल्या हिंदुराष्ट्राची हानीच होत आहे. आपसांत कलह माजवून आक्रमणास तोंड देण्याची संघटित शक्ती हिंदुराष्ट्रात अुत्पन्न होणेच दुर्घट करून सोडले आहे.[८] तेव्हा हा जातिभेद अुच्छदणे हेच आजच्या आपल्या खऱ्या हिंदुराष्ट्र-अुद्धाराचे अेक अपरिहार्य साधन होअून बसले आहे.[९] किंबहुना आमच्या हिंदुराष्ट्राच्या गळ्यासच तात देणाऱ्या ह्या जाति-भेदाचा निःपात केल्यावाचून हिंदुराष्ट्राचे अभ्युत्थान नी अुज्जीवन होणे सर्वस्वी असंभाव्य होय.[१०] हिंदुराष्ट्राची या जातिभेदानेच दुर्दशा अुडविली.[११] या जाति-भेदानेच हिंदुराष्ट्राची अपरिमित विघटना केली.[१२] म्हणून जातिभेदाचे आमूलाग्र निर्दालन करणे आपल्या हिंदुराष्ट्रासच हितकारक आहे.[१३]

---

१. रत्ना. हिं. अिति. पृ. ४६. २. रत्ना. हिं. अिति. पृ. ४६. ३. रत्ना. हिं. अिति. पृ. ४७. ४. जाति. नि. पृ. १. ५. जाति. नि. पृ. २८९. ६. जाति. नि. पृ. २२६. ७. जाति. नि. पृ. ९५. ८. जाति. नि. पृ. ८९. ९. जाति. नि. पृ. ८९. १०. सा. सा. भाग २–पृ. १०७. ११. सा. सा. भाग ५–पृ. ३९. १२. सा. सा. भाग ५–पृ. ३६. १३. जाति. नि. पृ. ३३१.

(४) **अस्पृश्यता** : हिंदुराष्ट्राच्या हितासाठीच अस्पृश्यतेची चळवळ सावरकरांनी हाती घेतली. रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात ही चळवळ सुरू करताना सावरकरांनी तीमागील आपला हेतू पुढील शब्दांत व्यक्त केला आहे. 'सन १९२५ च्या गणेशोत्सवात आम्ही अस्पृश्यतेच्या घातुक रूढीस अुच्चाटण्यासाठी चळवळ आरंभिली. तिच्यापासून हिंदुराष्ट्राच्या संघटनेस केवढा अडथळा निर्माण होत आहे, ती किती अन्याय्य व अधर्म्यही आहे, प्रभृती विषयांवर व्याख्यानांची, लेखांची, संवादांची झोड अुठवून दिली.'[1] अस्पृश्यतानिवारण करण्यामागील वरील हेतूवरोवरच सावरकरांनी मानव्याच्या भूमिकेवरून या दुष्ट रूढीचा विचार केला आहे. 'आमच्या अस्पृश्य वंधूंना धोक्याची सूचना' या निबंधात या प्रश्नाचा विचार न्यायाच्या दृष्टीने, कार्याच्या दृष्टीने आणि माणुसकीच्या दृष्टीनेही केला आहे;[2] आणि एका ठिकाणी तर माणुसकीच्या भूमिकेवरच अधिक भर दिला आहे. या संदर्भात सावरकरांनी लिहिले आहे : 'अस्पृश्यतेची रूढी ही अत्यंत अन्याय्य आणि आत्मघातकी असल्यामुळे केवळ माणुसकीसाठी म्हणूनच तिचे आम्हां हिंदूंनी निर्दालन केले पाहिजे. अितर सर्व कारणे दुय्यम होत, हेच आमचे अवाधित मत आहे.'[3]

येथे असा प्रश्न अुत्पन्न होतो की, खरोखरच सावरकरांनी अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीत मानव्यापेक्षा हिंदुत्वाला दुय्यम स्थान दिले होते का ? अेक महत्त्वाचा अुपलब्ध पुरावा असे स्पष्ट सांगतो की, या चळवळीमागील सावरकरांची सर्व प्रमुख प्रेरणा हिंदुत्वाचीच होती. तो पुरावा असा : २६–४–३१ रोजी रत्नागिरीला पतितपावन मंदिरात 'रत्नागिरी सोमवंशीय महार परिषद' सावरकरांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या परिषदेत काही महार गृहस्थांनी आमंत्रणपत्रिकेवरील 'हिंदू धर्म की जय' या शब्दप्रयोगाला आक्षेप घेतला. तेव्हा सावरकरांनी अस्पृश्यांना निक्षून सांगितले, "जर हिंदुधर्म, हिंदुत्व हेच कोणास मान्य नसेल तर तो आमचा कोण नि आम्ही त्याचे कोण ? तुम्ही आम्ही अेकमेकांचे सहकारी कोणत्या नात्याने ? तर हिंदुत्वाच्या, धर्म-बंधुत्वाच्या. जर तो हिंदू नसेल तर तो क्वचित आमचा धर्मशत्रूही असू शकेल. त्याचा आमचा काय संबंध ?"[4]

वरील अुद्गारांवरून हे स्पष्ट होते की, सावरकर मानव्यापेक्षा हिंदुत्वाचे नातेच सर्वश्रेष्ठ मानतात. हिंदुत्वाच्या या ध्येयांमुळे अस्पृश्यता निवारण करण्याचे जे साधन सावरकरांनी ठरविले ते सेवेचे नसून हिंदुसंघटनेचे आहे. ते घोषणाही

---

१. जाति. नि. पृ. २६०. २. जाति. नि. पृ. ७१. ३. जाति. नि. पृ. ७३. ४. रत्ना. हिं. अिति. पृ. ८४.

अशीच करतात की, 'अस्पृश्यता मारण्याचा महामंत्र हिंदुसंघटन हाच होय.'[१] प्रथमतः हिंदुराष्ट्र तारण्यास अवश्य या कोटिक्रमानेच ते अस्पृश्यतेच्या रूढीचा धिक्कार करतात.[२] अस्पृश्य अहिंदूहून संव्यवहार्य न समजणे म्हणजे हिंदुत्वाचा अपमान करणे होय असे त्यांना वाटते.[३] अहिंदूस जितके सार्वजनिक ठिकाणी आपण जवळ करतो तितके तरी हिंदूंस–हिंदुराष्ट्रास जिवंत ठेवणे असेल तर आपण जवळ केलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.[४] हिंदुराष्ट्र जिवंत ठेवणे असेल तर त्याचा आधार संख्याबळ हाच असल्याने सावरकर या प्रश्नात संख्याबळाचा विचार कधी दृष्टिआड होऊ देत नाहीत. अस्पृश्य अन्याय्य छळाने त्रासून परधर्मीयांच्या गोटात शिरण्याच्या स्वाभाविक परंतु अत्यंत निंद्य मोहास बळी पडतात आणि त्यामुळे हिंदुसमाजाच्या संख्याबळाची आणि गुणबळाची भयंकर हानी होते, असे सावरकर वारंवार सांगतात.[५] मुसलमानांच्या संख्याबलाअितकेच हे (अस्पृश्यांचे) संख्याबल अेखाद्या तुटलेल्या हाताप्रमाणे निर्जीव होऊन पडले आहे, याबद्दल सावरकरांना हळहळ वाटते.[६] अेवढे संख्याबळ हिंदुसमाजात समाविष्ट झाले तर हिंदूंची शक्ती किती वाढेल याची जाणीव ते मंदिरप्रवेशास विरोध करणाऱ्या सनातन्यांना करून देतात. सनातन नाशिककर बंधूंना याच जाणिवेने त्यांनी लिहिले आहे : "... पंचवटीचे श्रीराममंदिर पूर्वास्पृश्य हिंदू बंधूंना अितर हिंदूंप्रमाणेच अप्रतिबंधपणे अुघडे करताच आपल्या हिंदू जातीची शक्ती, प्रभाव, आणि जीवन अनेक पटींनी अधिकच प्रबल होअील..."[७] हाच विचार अन्यत्र मांडताना सावरकर लिहितात, 'अस्पृश्यता ही तर निव्वळ मानीव, पोथीजात, माणुसकीचा कलंक. ती तर तत्काळ नष्ट केली पाहिजे. ह्या अेका सुधारणेसरशी कोटी कोटी हिंदुबांधव आपल्या राष्ट्रात अेकजीव होऊन सामावले जातील. आपल्या गोटात अितके अेकनिष्ठ सैनिक वाढून हिंदुराष्ट्राच्या चढाअीत नि लढाअीत झुंजू लागतील."[८]

वरील विवेचनावरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होते की, सावरकर अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नाकडे हिंदुत्वाच्या आणि त्यातही व्यावहारिक भूमिकेवरून पाहतात. अखिल भारतीय हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष कै. बरवे हे या प्रश्नाकडे सेवाधर्माने पाहिले पाहिजे असे आग्रहाने सांगतात. संख्याबळाच्या व्यापारी चढाओढीने या प्रश्नाकडे पाहणे योग्य नाही असे त्यांचे मत आहे.[९] सावरकरांची

---

१. जाति. नि. पृ. २४९. २. जाति. नि. पृ. ७३. ३. श्रद्धानंद दि. १–११–२८. ४. रत्ना. हि. अिति. पृ. १५५. ५. जाति. नि. पृ. ७२. ६. जाति. नि. पृ. ९–१०. ७. जाति. नि. पृ. ११५. ८. जाति. नि. पृ. ९३. ९. माः वि. पृ. ७१–७२.

हिंदुत्वाधिष्ठित विजिगीषु-वृत्ती मात्र अस्पृश्यता निवारणामुळे गेलेले हिंदुवैभव आणि लोपलेला हिंदुगौरव पुन्हा जिंकण्याची आकांक्षा बाळगणारी आहे.[१]

सात स्वदेशी बेड्यांचा निषेधही हिंदुत्वासाठी

रूढी म्हणजे सनातन धर्म नव्हे, हे सूत्र सावरकरांनी रूढींचा अुच्छेद करताना प्रारंभीच सांगितले होते. या दुष्ट रूढी जेव्हा हिंदुराष्ट्राच्या संघटनेच्या आड येतात तेव्हा त्यांचे अुच्चाटन करण्यासाठी सावरकर सिद्ध झालेले दिसतात. त्यांच्या या दृष्टीने या रूढी म्हणजे हिंदुराष्ट्राच्या प्रबळ संघटनेस अत्यंत हानिकारक असणारा भाग होय.[२] ज्या सात स्वदेशी बेडया तोडताच ह्या पोथीजात जाति-भेदाच्या ब्यादीपासून, भूतबाधेपासून हे हिंदुराष्ट्र मुक्त होअू शकते त्या सात बेडया अशा : वेदोक्तीबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी. आणि बेटीबंदी. या सातही बेडयांशी मुख्यत: सामाजिक प्रश्न जरी निगडित झालेले होते तरी समाजकारण व राजकारण यांच्यात कृत्रिम भेद न मानणाऱ्या सावरकरांना या बेडयांशी जखडलेले राजकीय प्रश्नही दृष्टिआड करणे शक्य नव्हते. म्हणूनच या सात स्वदेशी शृंखलांचे स्पष्टीकरण करताना त्यांनी म्हटले आहे · 'आपल्या राष्ट्राच्या पायांत ज्या बाह्य विदेशी आपत्तीच्या बेडया आहेत त्या तोडण्याचे सामर्थ्य ह्या आपल्या पायांत आपणच हौशीने धर्म म्हणून ठोकून घेतलेल्या स्वदेशी बेडया तोडल्याने अधिकच संचरणारे आहे.[३] या स्वदेशी बेडया तोडल्याने विदेशी बेडया तोडण्यास आपले राष्ट्र अधिक शक्त झाल्यावाचून राहणार नाही, असा विश्वास सावरकरांना वाटतो.[४]

या सात स्वदेशी बेडयांपैकी प्रत्येक बेडी तोडल्यामुळे हिंदुराष्ट्र, हिंदुधर्म व हिंदुसमाज यांचे काही हित व्हावे अशी सावरकरांची भूमिका आहे. आज वेदांचे अध्ययन वा वेदोक्त संस्कार करण्याचा प्रत्येक हिंदूस अधिकार नाही. वेदोक्त बेडी तोडल्यामुळे सर्व हिंदुमात्रांस वेदादिक यच्चयावत धर्मग्रंथांवर समान-हक्क प्राप्त होअील.[५] व्यवसायबंदी तोडल्याने योग्य मनुष्य योग्य कामी लागून राष्ट्रकार्य अधिक दक्षतेने पार पाडण्याचा अधिक संभव निर्माण होअील. व्यवसायबंदी दूर करून व्यक्तीच्या प्रकट गुणानुरूप काम सोपविल्याने राष्ट्रीय शक्तीचा मितव्यय होअील आणि राष्ट्राची क्षमताही अधिक वाढेल.[६] स्पर्शबंदी तोडणे म्हणजे अस्पृश्यतेचे, विटाळवेडाचे समूळ अुच्चाटन करणे होय. हे अस्पृश्य पुन्हा हिंदुधर्मात आल्याने हिंदुराष्ट्राचे सैनिकी बळ वाढेल. कोटी कोटी हिंदुबांधव

---

१. रत्ना. हिं. अिति. पृ. १७. २. जाति. नि. पृ. १५८. ३. जाति. नि. पृ. ९०
४. जाति. नि पृ. ९५. ५. जाति. नि. पृ. ९१. ६. जाति. नि. पृ. ९२.

आपल्या राष्ट्रात अेकजीव होअून सामावले जातील.[१] सिंधुबंदीने तर आपले हिंदुराष्ट्र मेक्सिकोपासून मिसरपर्यंत पसरलेल्या आपल्या जागतिक हिंदुसाम्राज्यासच आचवले आहे.[२] हिंदूंच्या पराक्रमाचा संकोच या परदेशगमन निषेधामुळेच झाला.[३] महासागरसंचारी हिंदु-पराक्रम या सिंधुबंदीच्या बेडीनेच बेडूक होअून बसला.[४] मराठी साम्राज्याच्या क्षयाला हीच बेडी कारणीभूत झाली. ही बेडी तोडून परदेशात हिंदू गेले असते तर तेथील कला, व्यापार, शिस्त, शोध हिंदूंनीही आत्मसात केले असते.[५] परदेशातील यादवीचा लाभ त्यांनाही घेता आला असता.[६] पण ही सिंधुबंदी मानल्याने परदेशीय व्यापार ठार बुडाला, नाविक बळ बुडाले, परदेशी शत्रूंच्या मुळावरच, ते सिंधू ओलांडून स्नान करण्याअितके बलवत्तर होण्याच्या आधीच, तिकडे जाअून कुऱ्हाड घालणे अशक्य झाले. परदेशीय विद्यांचे संजीवनीहरण दुर्घट झाले.[७] ह्या सोवळ्यापायी मुकुट दवडले.[८] रोटीबंदीच्या स्वदेशी बेडीने, खाण्याने जात जाते, धर्म बुडतो, या भोळसट समजुतीमुळे हिंदू राष्ट्र पंगू झाले.[९] पोर्तुगीजांच्या आततायी तरवारीअितकीच आमच्या ह्या आत्म-घातकी रूढीची सुरीही आमच्या नाशाला कारणीभूत झाली.[१०] खाण्यापिण्याने धर्म बुडत नाही, जात ही रक्तबीजात असते, भाताच्या तपेल्यात नव्हे, धर्माचे स्थान हृदय, पोट नव्हे.[११] ही रोटीबंदीची ब्याद सहभोजनाच्या टोल्यासरशी हाणून पाडलीच पाहिजे.[१२] अशा सहभोजन पंगती फुटकळ जातिपंगतींपेक्षा शतपटींनी अधिक राष्ट्रहितकारक ठरतात.[१३] बेटीबंदी ही हिंदुराष्ट्राची शकले पाडण्यास कारणीभूत झाली आहे.[१४] म्हणून मिश्र विवाहाची अनुज्ञा जन्मजात जातिभेद मोडण्याच्या दृष्टीने नव्हे तर शुद्धी-चळवळ पचविण्यासही अत्यंत अवश्य आहे. हिंदुराष्ट्राच्या संघटनेस अुपकारक नि अपरिहार्य आहे.[१५] शुद्धीबंदी तोडल्याने हिंदूंचे संख्याबळ वाढेल.[१६] शुद्धी ही हिंदुत्वाची चळवळ आहे नुसती धार्मिक म्हणजे तत्त्वज्ञानविषयक वितंडवाद नव्हे.[१७]

सात स्वदेशी बेड्यांचा निषेध करताना सावरकरांची दृष्टी सतत हिंदुत्वा-वरच कशी खिळलेली होती हे वरील त्रोटक विवेचनावरून ध्यानात येते. ह्या सर्व दुष्ट रूढी हिंदुराष्ट्राच्या स्वास्थ्यास आणि संवर्धनास हानिकारक आहेत,[१८] हा विचार सावरकरांच्या मनात सारखा वागत असल्याचे दिसते.

---

१. जानि. नि. पृ. ९३. २. जाति. नि. पृ. ९३. ३. जाति नि. पृ. ७.
४. जाति. नि. पृ. ७. ५. जाति. नि. पृ. ८–९. ६. जाति. नि. पृ. ९.
७. जाति. नि. पृ. ९३. ८. जाति. नि. पृ. ९. ९. जाति. नि. पृ. ३२१.
१०. रत्ना. हिं. अिति. ११. जाति. नि. पृ. ९४. १२. जाति. नि. पृ. ९४.
१३. जाति. नि. पृ. ३२०. १४. जाति. नि. पृ. ९४. १५. जाति. नि. पृ. १८४.
१६. जाति. नि. पृ. ९४. १७. श्रद्धानंद २६–४–२८. १८. क्ष–किरणे पृ. ३.

अुक्ती आणि कृती यांची प्रेरणा हिंदुत्वनिष्ठाच

हिंदुराष्ट्राला हानिकारक ते ते त्याज्य आणि हिंदुराष्ट्राच्या अभ्युदयार्थ जे जे हितकारक ते ते स्वीकारार्ह ही सावरकरांची भूमिका त्यांच्या निबंधांतून सर्वत्र दिसते. ज्यामुळे हिंदुराष्ट्राची प्रज्ञाहत्या होते ते ते सगळे त्यांना टाकाअू वाटते, त्याज्य वाटते. यज्ञसंस्था ही हिंदुराष्ट्राची प्रज्ञा बेशुद्ध करते, म्हणून सावरकर यज्ञसंस्थेवर टीकाप्रहार करतात.[१] धर्मभोळेपणा, भावडी वृत्ती यांवर सावरकरांचा राग याच अेका कारणामुळे आहे.[२] हिंदुराष्ट्राच्या हितास हानिप्रद ठरणारी कोणतीही गोष्ट, मग ती गाय, वड, तुळस, गोमूत्र यांसारखी लौकिकदृष्ट्या पवित्र मानलेली कोणतीही गोष्ट असो, सावरकर तीवर चौफेर हल्ले चढवितात.[३] अेखादी गोष्ट पाच हजार वर्षांपूर्वीच्या पोथ्यांत सांगितलेली का असेना, ती हिंदु-राष्ट्राच्या हितास हानिकारक आहे असे दिसताच सावरकर ती टाकाअू समजतात. विवाहासारखा प्रश्न निघाला तरी सावरकर सांगतात– "अहिंदू व्यक्तीस हिंदू करून घेतल्यावरच काय तो विवाह करावा. ही मर्यादा हिंदुराष्ट्राच्या हितार्थ आज अपरिहार्य आहे."[४] सहभोजन हे राष्ट्रहितकारक म्हणून त्यांना स्वीकारार्ह वाटते.[५] अद्ययावतपणातच हिंदू राष्ट्राचे खरे कल्याण आहे म्हणून ते त्याचे स्वागत करतात[६]. जातिभेदाने हिंदुजातीची हानी होत असल्याने 'जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद आणि गुणजात जातिभेदाचा अुद्धार' या तत्त्वाचा पुरस्कार ते करतात.[७] संख्याबळ हेच हिंदुराष्ट्राचे कल्पनातीत बळ असल्याने[८] शिरगणती-तही हिंदू हीच जात लिहावी असा आग्रह ते धरतात[९] आणि त्यासाठी रत्नागिरीत चळवळ करून ती यशस्वी करून दाखवितात.[१०] जातिभेदाचा दोष सुधारण्याचे अुत्तरदायित्व साऱ्यांचेच असल्याने सर्व हिंदूंनी मिळून अखिल हिंदुत्वाच्या पोलादी पायांवर पुन्हा अुभे राहणे हेच त्यांना अुचित वाटते.[११]

सावरकरांनी आपल्या लेखनातून स्वतः रत्नागिरीस वा अन्यत्र केलेल्या सार्वजनिक चळवळीचा जो वृत्तान्त दिला आहे, त्यातील कृतीची प्रेरणा ही हिंदुत्वनिष्ठेतच दिसून येते. हिंदुसंघटन व शुद्धीकरण या दोन चळवळींवर त्यांनी मुख्य भर दिला होता. शुद्धीकरणाची चळवळ त्यांच्या दृष्टीने धार्मिक नव्हती. तर ती हिंदुत्वाची चळवळ होती.[१२] सहभोजनाचा मंत्र 'जन्मजात जात्युच्छेदनार्थम्

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ७९. २. सा. सा. भाग २ –पृ. ८० ३. क्ष–किरणे पृ. १८. ४. जाति. नि. पृ. ९५. ५. जाति. नि. पृ. ३२०. ६. सा. सा. भाग ४– पृ. १२४. ७. जाति. नि. पृ. २९. ८. हिंदुत्व पृ. १३१. ९. रत्ना. हिं. अिति. पृ. ५४. १०. रत्ना. हिं. अिति. पृ. ५४. ११. क्ष–किरणे पृ. ३४. १२. श्रद्धानंद २६-४-२८.

अखिल हिंदु सहभोजनं करिष्ये' असा होता. अस्पृश्यतानिवारण करण्यासाठी विटाळवेड ढिलावण्यासाठी, त्यांनी महारवाडयात भजने केली. अस्पृश्यांसच गावात आणून संमिश्र भजने, व्याख्याने अित्यादी समारंभ घडवून आणले. अस्पृश्यतेच्या भावनेवरच्या मुळावरच कुऱ्हाड घालण्यासाठी त्यांनी शाळांतून मुले सरमिसळ वसविण्याचे आंदोलन हाती घेतले. अस्पृश्यतेची घरातून हकालपट्टी व्हावी म्हणून दसरा व संक्रांत ह्या दोन दिवशी सोने व तिळगूळ वाटण्यासाठी त्यांनी गृहप्रवेशाचा अुपक्रम केला. पूर्वास्पृश्यांसह संमिश्र स्त्रियांचे हळदीकुंकू समारंभ घडवून आणले. सभा, नाटकगृहे यांतूनही स्पृश्यास्पृश्य समाज सरमिसळ वसविण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला. 'हिंदू वॅंड' सुरू केल्याने अस्पृश्यांना ब्राह्मणादिकांत सरमिसळ वावरण्यास मोकळीक मिळाली. पूर्वास्पृश्य मेळा काढून मंदिरप्रवेशाचा मार्ग त्यांनी सुलभ केला आणि सर्व हिंदूंना वेदोक्ताचा अधिकार मिळावा, स्पृश्यास्पृश्यांना वेखटक अेकत्र पूजाप्रार्थना करता यावी, अखिल हिंदूंचे शक्तिकेंद्र निर्माण व्हावे या हेतूंनी त्यांनी पतितपावन मंदिराची स्थापना केली.

विज्ञाननिष्ठा

हिंदुत्वनिष्ठ सावरकरांनी धर्मभोळेपणावर शस्त्र धरले तर विज्ञानाला धर्माची पदवी प्राप्त करून दिली. प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगसिद्ध विज्ञानच आजच्या परिस्थतीत नि आजच्या जागतिक स्पर्धेत आमच्या राष्ट्राचा वेद झाला पाहिजे अशा घोषणा सावरकर करतात.[1] सनातन धर्माची सावरकरांनी पुढीलप्रमाणे आख्या केली आहे : "प्रत्यक्ष, अनुमान आणि त्यांना सर्वस्वी विरुद्ध न जाणारे वाक्य या प्रमाणांच्या आधारे सिद्ध होअू शकणारे आणि ज्याविषयी कोणीहीं यथाशास्त्र प्रयोग केला असता त्या त्या कार्यकारणभावाच्या कसोटीस जे पूर्णपणे केव्हाही अुतरू शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यात जे जे सृष्टिनियम आणि जी जी वैज्ञानिक सत्ये आज आलेली आहेत त्यास त्यासच आम्ही आमचा सनातन धर्म समजतो."[2] 'हे केडगाव की वेडगाव?' या कथासदृश निबंधातूनही त्यांचा स्वामी विचक्षणानंद घोषित करतो की, "पाच हजार वर्षांपूर्वीच्या अज्ञान युगाकडे पाठ फिरवा. आजच्या विज्ञानयुगास स्वागता. हाच खरा धर्म आहे.'[3] 'यज्ञात् भवति पर्जन्यो' हे पोथीजात सूत्र टाकून त्या सूत्राच्या ठायी 'विज्ञानादेव पर्जन्यो' ह्या नवीन सूत्राची स्थापना केली पाहिजे असे सांगण्याअितकी सावरकरांची विज्ञाननिष्ठा प्रवळ आहे.[4]

---

१. क्ष–किरणे पृ. १८. २. सा. सा. भाग १ – पृ. २५. ३. सा. सा. भाग १ – पृ. १३०. ४. सा. सा. भाग १ – पृ. ५१.

विज्ञान हाच वेद, विज्ञान हाच धर्म या भूमिकेतून सावरकर जेव्हा आमच्या धर्मग्रंथांचा अभ्यास करतात, तेव्हा त्यांतील खुळचट धर्मविधी त्यांच्या ध्यानात येतात आणि या नवीन विज्ञानधर्माच्या दृष्टीने या धर्मविधींचे वर्णन करण्यात यावे असे त्यांना वाटते. म्हणून ते लिहितात, " . . . . या विज्ञानयुगात अक्षम्य ठरलेल्या या धर्मभोळ्या कथांना नी व्रतांना यापुढे छापून अज्ञ जनतेला कोणीही फसवू नये हेच अुचित नी हाच धर्म आहे. गाढवावर बसणाऱ्या त्या संक्रांतीच्या विक्षिप्त चित्रास नी चरित्रास फाटा देअून यापुढे तरी ज्योतिषशास्त्रातील त्या संक्रमणाची अद्ययावत सत्य ती माहिती गणितशास्त्रीय निश्चित सिद्धान्तासह प्रत्येक पंचागात छापावी[1] . . . . यापुढे प्रत्येक पंचागात निदान टिळकपंचागात तरी मकर संक्रमणाचा वैज्ञानिक अर्थ द्यावा; ग्रहणांची वैज्ञानिक कारणे द्यावीत; ग्रहांचे व्यास नी गती, सूर्यमालेची नी पृथ्वीची अवश्य ती आकृती वैज्ञानिक परिभाषेत निवेदावी आणि ते संक्रांतीचे सोंग नी ती ग्रहणादिकांची भाकड वर्णने साफ काढून टाकावी."[2]

स्वत: सावरकरांनी धर्मग्रंथांचे वाचन अशा विज्ञाननिष्ठ दृष्टीने केले आणि असे वाचन करताना स्वत:चा 'विज्ञाननिष्ठ अभ्यासू' असा अनेक ठिकाणी अुल्लेख केला आहे. 'मुसलमानी पंथोपपंथांचा परिचय' करून देण्याच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना सावरकरांनी लिहिले आहे," . . . आम्हा विज्ञाननिष्ठ अभ्यासूंना ते धर्मग्रंथ शब्दनिष्ठ दृष्टीने न वाचता आमच्यापुरते, निव्वळ मनुष्यकृत ग्रंथ वाचावे, तसे तर्काच्या कसोटीस धरून वाचण्याचे बुद्धिस्वातंत्र्य अुपभोगिण्याचा अधिकार सांगता येतो."[3] याच निबंधात ते पुन्हा सांगतात, "कोणत्याही धर्मग्रंथात वा मतात हे अमुक असे आहे, म्हणून ते सत्य नि कृत्य असलेच पाहिजे, अशा अभ्यासू बुद्धीस पहिल्या पावलीच पंगू करून टाकणाऱ्या कोणत्याही प्रतिज्ञेने धर्माधर्माचा तौलनिक अभ्यास करून निघालेला विज्ञानवादी स्वत:स बांधून घेणार नाही."[4] विज्ञाननिष्ठ अभ्यासकाची ही भूमिका स्वीकारल्यामुळे यच्चयावत धर्मग्रंथास वैज्ञानिक नि अैतिहासिक दृष्टीनेच वाचण्याची शिफारस ते करतात. नव्हे[5] तर त्या धर्मग्रंथातील ज्ञान नि अज्ञान अद्ययावत विज्ञानाच्या कसोटीस लावण्याची आणि अुत्तम ते मानवी सामाअिक संपत्ती म्हणून स्वीकारण्याची आग्रही सूचनाही त्यांनी केली आहे.[6] धर्मग्रंथांतील आध्यात्मिक, अज्ञेय, गूढ असे विचार आत्मसात करण्यासारखी विज्ञाननिष्ठ सावरकरांची मनोरचनाच नाही हे त्यांनी स्वत:च काढलेल्या अेका अुद्गारावरून सहज लक्षात

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. ६३. २. सा. सा. भाग ४ – पृ. ७४. ३. जाति. नि. पृ. १९२. ४. जाति. नि. पृ १८७. ५. जाति. नि. पृ. १८८. ६. जाति. नि. पृ. १८९.

येते. सावरकर म्हणतात, "माझी श्रवणेंद्रिये आणि माझी आकलनशक्ती ही ह्या ऐहिक, प्रत्यक्ष प्रमाणमय जगाचा शब्दघोष ऐकण्यास शिकली आहे."[1]

स्वतः स्वीकारलेल्या या विज्ञाननिष्ठ प्रवृत्तीचे स्पष्टीकरणही सावरकरांनी केले आहे. हीं विज्ञाननिष्ठ प्रवृत्ती म्हणजेच अद्यतनी, अद्ययावत, प्रत्यक्षनिष्ठ प्रवृत्ती होय. केवळ 'काल'च्या पोथीने 'आज' बांधलेला नसावा, 'अुद्या' तर नसावाच नसावा; या विज्ञाननिष्ठ मतासच आम्ही अद्ययावतपणा म्हणतो. अद्यतनी प्रवृत्ती ती हीच," असे सावरकरांनी म्हटले आहे.[2] दुसऱ्या अेका निबंधात याच प्रवृत्तीच्या स्पष्टीकरणार्थ ते लिहितात, "राष्ट्रीय हितकारक तो नवीन निर्बंध नवीन म्हणून चक्क सांगून स्वीकारतो. विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, अद्ययावत प्रवृत्ती ती हीच."[3]

सावरकरांनी विज्ञानाचे श्रेष्ठत्व ओळखले होते म्हणूनच या विज्ञाननिष्ठ प्रवृत्तीचा पुरस्कार ते करतात. धर्मस्तोत्राप्रमाणे सावरकरांनी आपल्या निबंधांतून अनेक ठिकाणी विज्ञानस्तोत्रे गाअिली आहेत. या दृष्टीने सावरकरांनी सांगितलेली काही विज्ञान-वचने वाचनीय आहेत. सावरकर लिहितात, "....विज्ञानाने देवी, प्लेग, कॉलरा, क्षय ह्यांचे जंतू शोधून, त्यांवर जवळजवळ रामबाण औषधे नी लसीचे अुपाय काढून, 'क्ष' किरणे, क्लोरोफॉर्म, कृत्रिम श्वास प्रभृती अनेक साधने प्रकल्पून, अुपाय योजून मृत्यूच्या तावडीतून लक्षावधी जीवांस सोडविले, प्रसववेदनेपासून स्त्रीची सुटका केली. आगनाव, आगगाडी, तार, बिनतार, विमाने ह्यांही समुद्र-भूमि-नभ यांजवरील मनुष्याचीं शक्ती अमोघ करीत, मृत्यूचे प्रांतचे प्रांत त्याच्या हातून सोडवीत मानवी साम्राज्यास जोडले[4] ... ...विज्ञानास आधारिताच मोठमोठ्या ऋषि-पैगंबरांस जे देववले नाही ते वरदान माणसास मिळाले[5] ... वैदिक प्रार्थनांनी देव सहायास धावत नसून वैज्ञानिक सूक्तांनीच त्यांना दासासारखे राबवून घेता येते.[6] ... पश्चिमेकडे वक्रदृष्टीने पाहण्याची संक्रांतीची छातीच नाही, त्या पश्चिमेच्या वाटेस जाताच गाठ आहे मशीनगन्सशी, तोफांशी, बॉम्बशी.[7] ... वेदापेक्षा विज्ञानाने हे सूर्य, अग्नी, प्रकाश, वीज, मरुत, सोम कसे तात्काळ बिनचूक नी हटकून माणसाळवले जातात.[8] ...मनुष्याचा अुत्पात अपघातादी संकटांवर अुपाय अज्ञानाची धार्मिक छाछू नाही, तर विज्ञानाच्या कार्यकारण भावाची वाट होय[9] ... जे संपादावयाचे

---

१. हिंदुत्व पृ. ३५. २. सा. सा. भाग २ – पृ. ३९. ३. सा. सा. भाग ४ –पृ. १५५. ४. क्ष–किरणे पृ. ३९. ५. सा. सा. भाग २ – पृ. ६०. ६. सा. सा. भाग २ – पृ. ३४. ७. सा. सा. भाग ४ – पृ. ६३. ८. सा. सा. भाग १ – पृ. ४१. ९. क्ष–किरणे पृ. ९०.

आहे ते धर्मभेदाची नांगी ज्यापुढे ढिली पडते ते विज्ञानबळ होय,... ते विज्ञान-कवच आम्ही धारण केले पाहिजे.[१]

विज्ञानाचे हे श्रेष्ठत्व जाणल्यामुळे विज्ञाननिष्ठ सावरकरांनी सर्व व्यवहारांत विज्ञान हीच कसोटी मानलेली दिसते. त्यांचे असे स्पष्ट मत आहे की, आज काय योग्य हे सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम विज्ञानाचा आहे.[२] जे शास्त्राधार परस्परविरुद्धतेमुळे परस्परांस परभारेच लटके पाडतात, त्यांच्या प्रकरणी प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, अद्यतन विज्ञान जे सांगेल तेच आज त्यातल्या-त्यात ग्राह्य होय अशी कबुली याच विज्ञाननिष्ठ भूमिकेवरून सावरकर देतात.[३] आमच्या धर्मग्रंथांतील आचार, विचार, आहार, व्रते, वैवाहिक धर्मकृत्ये, पूजा-प्रार्थना, जातीची श्रेष्ठकनिष्ठता अित्यादी सर्व गोष्टींतील योग्यायोग्यतेची कसोटी त्यांच्या मते, विज्ञानच होय. धर्मग्रंथ वैज्ञानिक व अैतिहासिक दृष्टीने वाचण्याची त्यांनी केलेली सूचना आपण पूर्वी पाहिलीच आहे. पाच हजार वर्षांपूर्वीच्या पोथ्यांत सांगितलेली प्रत्येक गोष्ट अद्ययावत विज्ञानाच्या कसोटीवर पारखून घेतली जावी आणि ती प्रत्यक्षनिष्ठ ज्ञानाच्या विरुद्ध जाताच टाकाअू समजावी असा निर्णय ते देतात.[४] या बाबतीतील सावरकरांच्या सर्व विवेचनाचा थोडक्यात निष्कर्ष असा : धार्मिक छापाच्या रूढींनाही विज्ञानाच्या कसोटीवरच घासून घ्यावे.[५] जी वेदकाळची रूढी किंवा आचारात्मक धर्म आज विज्ञानाच्या दिव्य-तर प्रकाशात समाजघातक रोगाणूंनी लडबडलेला दिसतो ती रूढी वा आचार आजच्या संस्कृतीत न मोडता दुष्कृतीतच मोडला पाहिजे.[६] पोथीजात जातिभेदास तोडण्यासाठी आजच्या परिस्थितीच्या विज्ञानाच्या कसोटीस अुतरतील त्या त्या समाजसुधारणा तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत.[७] सोवळे ते की जे वैद्यकाच्या प्रत्यक्ष नि प्रयोगसिद्ध पुराव्याने आरोग्यासाठी अवश्य आहे. वैज्ञानिक पुराव्यानेच विटाळ समर्थिला पाहिजे.[८] यापुढे तरी सुतकाचे आचार आजच्या विज्ञानाच्या नी वैद्यकाच्या कसोटीस लावून समाजहितार्थ अुपयुक्त ठरतील तेच कायम ठेवा-वेत[९]. जातींचा विचार करतानाही हीच शास्त्रीय, वैज्ञानिक दृष्टी हवी. कारण रक्तबीजाची शास्त्रोक्त परीक्षा होअून अनुवंशाच्या दृष्टीने समाजात अुत्तम संततीची भर पडावी अशा कोणत्याही हेतूने ह्या आजच्या जातिपाती केलेल्या नसून त्यांच्या फाटाफुटी हास्यास्पद मतभिन्नतेने अेकमेकांवर बहिष्कार पडून

---

१. क्ष–किरणे. २. सा. सा. भाग २ – पृ. १६. ३. सा. सा. भाग ४ – पृ. १३०. ४. क्ष–किरणे पृ. १८ ५. क्ष किरणे पृ. ९८. ६. सा. सा. भाग १ – पृ. ५१. ७. जाति. नि. पृ. ८९. ८. जाति. नि. पृ. ९२. ९. सा. सा. भाग ४ – पृ. १६.

त्या होत आल्या आणि अेक अेका जातीचे तुकडे अुडत नवनव्या जाती पडत चालल्या.[१] व्रतांचा विचार करतानाही विज्ञाननिष्ठ प्रगतीपर व्रते कोणती व अज्ञाननिष्ठ, कोणती हे पाहिले पाहिजे.[२] आणि ज्या व्रतांतील देवता व त्यांची वर्णने आजच्या प्रयोगक्षम विज्ञानाने साफ खोटी पाडली आहेत अशी व्रते टाकाअू समजावीत.[३] अेवढेच नव्हे तर वैज्ञानिक दृष्ट्या जी जी असत्य व्रते ती ती टाकावीत.[४] जनतेस आंधळी ठेवू पाहणारी, बुद्धीचा विकास खुंटविणारी ती धर्मभोळी व्रते म्हणजे असत्याची पूजाच होय. ज्योतिर्गोलासारख्या निर्जीव वस्तूंच्या गतिस्थितीचे मनुष्यावर जे प्रतिकूल परिणाम होतात ते,... टाळण्यास विज्ञानाच्या प्रत्यक्षनिष्ठ नी प्रयोगसिद्ध अुपायांनीच झटले पाहिजे.[५] भक्ष्य-अभक्ष्य हा प्रश्नही शास्त्रीय पद्धतीने सोडवावा. कारण खाणे-पिणे हा वैद्यकीय प्रश्न, धार्मिक नव्हे.[६] कोणते मांस खाद्य ते धर्मग्रंथाच्या टिपणीत न पाहता वैद्यकाच्या कोष्टकात पाहावे.[७] मांसाशनाचा प्रश्न प्रयोगांनी पटणाऱ्या अद्ययावत वैद्यक ज्ञानानेच सोडविणे अिष्ट.[८] तात्पर्य पुरातन सर्व बऱ्या-वाअीट अनुभवांस जमा धरून आजच्या विज्ञानाच्या कसोटीने जे राष्ट्रधारणास आज अुपयुक्त ठरते तेच बेधडक आचरावे.[९] अर्थात त्याबरोबर हेही लक्षात ठेविले पाहिजे की, वैज्ञानिक ज्ञानात चुकीचे ठरले तर तो आजचा आचार बदलण्यास 'अुद्या' ही तसाच स्वतंत्र असावा.[१०]

प्रत्येक गोष्टीच्या योग्यायोग्यतेची पारख करण्यासाठी ही विज्ञानाची कसोटी सावरकर लावतात याचे कारणही हेच की विज्ञान हे प्रत्यक्षनिष्ठ असते. ते आज्ञा न देता अैहिक प्रत्यक्षाचे पुरावे देते, कारणे सांगते आणि म्हणून विज्ञाननिष्ठ मनुष्याला आपले कर्तव्य पोथीनिष्ठ मनुष्यापेक्षा अधिक अचूकपणे ठरविता येते.[११]

सावरकरांचे हिंदुत्वनिष्ठ राष्ट्रवादी मन विज्ञानातील बळ, सामर्थ्य अचूक हेरते व हिंदुराष्ट्राच्या हिताहिताच्या संदर्भात विज्ञानाचा विचार करते. म्हणूनच आपल्या हिंदुराष्ट्रास आजच्या विज्ञानयुगाशी टक्कर देअून जगावयाचे आहे याची जाणीव ते करून देतात.[१२] ही विज्ञाननिष्ठा आपण स्वीकारली नाही तर आपले हिंदुराष्ट्र नी हिंदुधर्मही पाच हजार वर्षांइतकाच मागासलेला राहून ह्या विज्ञानाच्या वैमानिक युगातील टकराटकरीत आपण टिकाव धरू शकणार नाही' अशी भीती

---

१. सा. सा. भाग ५ – पृ. ४९. २. सा. सा. भाग ४ – पृ. ५०. ३. सा. सा. भाग ४ – पृ. ५४. ४. सा. सा. भाग ४ – पृ. ५५. ५. सा. सा.भाग ४ – पृ. ७०. ६. जाति. नि. पृ. ३४३. ७. क्ष–किरणे पृ. १२५. ८. सा. सा. भाग ४ – पृ. १३०. ९. सा. सा. भाग २ – पृ. ३९. १०. सा. सा. भाग २– पृ. ३९. ११. सा. सा. भाग १ – पृ. ६६-६७. १२. क्ष–किरणे पृ. १२५

त्यांना वाटते. 'आजच्या जागतिक स्पर्धेत विज्ञान हाच आपल्या राष्ट्राचा वेद झाला पाहिजें', असा त्यांचा आग्रह आहे.[१] यंत्रशीलपणाचा सावरकरांनी जो अनेक कारणांनी पुरस्कार केला आहे त्यात विज्ञाननिष्ठेप्रमाणेच राष्ट्रनिष्ठा हेही अेक महत्त्वाचे कारण आहे. त्यांच्या मते प्रचंड यांत्रिक शक्ती हीच राष्ट्राची या युगातील खरी शक्ती होय.[२] म्हणून हिंदुराष्ट्राची दृष्टी पोथीनिष्ठ न राहता विज्ञाननिष्ठ व्हावी, पुराणप्रवृत्ती, सनातन प्रवृत्ती सुटून त्यांची अद्यतन प्रवृत्ती असावी[३] असा सारखा प्रचार सावरकर आपल्या निबंधांतून करतात.

यंत्र हे विज्ञानाचीच 'घनवटलेली मूर्ती' असल्याने विज्ञाननिष्ठ सावरकरांनी यंत्राचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. विज्ञानजन्य यंत्र अेका बाजूला मानवी सामर्थ्य अपरंपार वाढविते, तर दुसऱ्या बाजूला देवभोळेपणा घटविते म्हणून सावरकर यंत्राचे स्वागत करतात.[४] 'यंत्र हे मनुष्याला अतिमानुष करणारे विज्ञानाचे वरदान होय' अशा शब्दांत सावरकर यंत्राचा गौरव करतात. यंत्रशीलपणा वाढल्याने देवभोळेपणा कसा घटतो याचे सावरकरांनी केलेले वर्णन मोठे पाहण्यासारखे आहे. ते लिहितात, "देवाची इच्छा ही संख्या यंत्रशास्त्राच्या कधीच खिसगणतीत नसते. वास्तविक पाहता यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धान्तच असा की, त्याच्या पाठात (फॉर्म्युल्यात) अीश्वराच्या अिच्छेचा वा धर्मशास्त्रीय पापपुण्याचा वा ज्योतिषी शकुनाचा कोणताही घटक दमडीच्या अुधारीनेही गणलेला नसावयाचा. अितका ऑक्सिजन, अितका हायड्रोजन, अितका प्राणवायू, अितका अुज्ज, की पाणी झालेच. मग तो संयोग शुभ मुहूर्तावर घडो वा न घडो. बोकड न मिळाल्यामुळे बहिरोबा किंवा अीदीला गाय न मिळाल्याने खुदा, त्या वेळी रागावलेला असो वा नसो; ते रसायन डुक्कर खाणारा ख्रिश्चन करो, की न खाणारा मुसलमान करो ते रसायन सिद्ध झालेच पाहिजे. यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धान्तच असा देवभोळ्या धर्मशास्त्राच्या ताठ विरुद्ध."[५]

या विज्ञाननिष्ठेतून आणि यंत्राच्या सामर्थ्याच्या जाणिवेतून सावरकर यंत्रावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांचे मोठ्या हिरीरीने खंडन करतात;[६] आणि शेवटी मोठ्या आग्रहाने प्रतिपादितात की, समाजकारणात आणि राष्ट्राच्या अर्थकारणातही याच विज्ञानाची मूर्ती जे यंत्र त्या यंत्राचे वर्चस्व स्थापिले पाहिजे.[७]

डॉ. अ. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे सावरकरांच्या विज्ञानदृष्टीच्या प्रचाराच्या दोन पद्धती आहेत, अेकीकडे विज्ञानवादी जीवनदृष्टीची ते तरफदारी

---

१. क्ष-किरणे पृ. १८. २. रत्ना. हिं. अिति. पृ. ४१-४२. ३. जाति. नि. पृ. ३३३. ४. सा. सा. भाग २ – पृ. ६१. ५. सा. सा. पृ. ४९. ६. सा. सा. पृ. ५४-५५. ७. सा. सा. पृ. ५५.

करतात तर दुसरीकडे विज्ञानवादाशी विसंवादी असलेल्या वेडगळ आचारविचारांवर अुपहासाची आणि अुपरोधाची फैर अुडवितात.[1] अनेक वेळा ते विज्ञानाधिष्ठित अितर राष्ट्रांच्या आश्चर्यकारक प्रगतीची चित्रे रंगवितात आणि त्या चित्रांची आपल्या राष्ट्राच्या चित्राशी तुलना करून विज्ञानाच्या प्रचंड सामर्थ्याकडे लक्ष वेधतात. आपली प्रत्येक पिढी पूर्वीहून खुरटी, किरटी नि करंटी का आणि अमेरिकेतील प्रत्येक पिढी पौरुषेय लक्षणांनी अधिकाधिक संपन्न का, असा प्रश्न ते वाचकांच्या पुढे अुभारतात.[2] आमच्या व युरोपच्या व्रतांत, प्रतिज्ञेत किती अंतर आहे, तफावत आहे हे त्यांनी अनेक अुदाहरणांनी पटवून दिले आहे.[3] 'दोन शब्दांत दोन संस्कृति' हा त्यांचा निबंध म्हणजे युरोपच्या अप-टु-डेट, अद्ययावत संस्कृतीचे आणि आपल्या 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' संस्कृतीचे परस्परविरोधी रंगांत रंगविलेले अुत्कृष्ट चित्र होय. रशिया, युरोप, अमेरिका, जपान अित्यादी राष्ट्रे प्रबळ बनली ती याच विज्ञानाच्या बळावर हे सावरकरांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे; आणि या विज्ञानाच्या प्रचारार्थ वारंवार हेच कथिले आहे की, "तसे (युरोपप्रमाणे) त्रिखंडविजयी आमच्या भारतीय राष्ट्रासही होणे असेल, तर पुरातनी युगाचा ग्रंथ मिटून ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादी शासने गुंडाळून आणि केवळ अैतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयात सन्मानपूर्वक ठेवून विज्ञानयुगाचे पान अुलटले पाहिजे"[4] ... "या विज्ञानयुगात समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष अैहिक नि विज्ञाननिष्ठ अशाच तत्त्वांवर केली पाहिजे. ती वाट चोखाळता अिंग्लंड, रशिया, जपान ही राष्ट्रे बलवान झाली तसेच हे आपले हिंदुराष्ट्रही झाल्यावाचून राहणार नाही."[5]

बुद्धिनिष्ठा

हिंदुत्वनिष्ठा, विज्ञाननिष्ठा याप्रमाणेच बुद्धिनिष्ठेनेही सावरकरांच्या लेखनाला, वक्तृत्वाला विलक्षण स्पष्टता, अग्रता आणि कणखरपणा आला आहे. धर्मग्रंथासारख्या श्रद्धामय ग्रंथांचे वाचन त्यांनी बुद्धिनिष्ठ दृष्टीने केले आहे.[6] असे धर्मग्रंथ तर्काच्या कसोटीस धरून वाचण्याचे बुद्धिस्वातंत्र्य अुपभोगण्याचा आपला अधिकार आहे असे त्यांना वाटते;[7] आणि म्हणून ते बुद्धिस्वातंत्र्य आम्ही सांगून सवरून अुपभोगू अिच्छितो असे ते स्पष्टपणे सांगतात.[8] सावरकरांची धर्मविषयक मतेही या बुद्धिनिष्ठेवर अधिष्ठित आहेत. रत्नागिरीला

---

१. सा. वि. द. पृ. ४५. २. जाति. नि. पृ. ६१. ३. क्ष–किरणे पृ. ४-५. ४. सा. सा. भाग २ – पृ. १६. ५. जाति. नि. पृ. ३४५. ६. जाति. नि. पृ. १९२. ७. जाति. नि. पृ. १९२. ८. जाति. नि. पृ. १९२.

महात्मा गांधींच्या-बरोबर झालेल्या मुलाखतीत त्यांनी महात्माजींना म्हटले होते, "माझी धर्ममते तरी मी केवळ बुद्धिगम्य सिद्धान्तावर अुभारलेली असून ती अितकी भावनानिरपेक्ष आहेत की, ती अैकून आपणही चमकून अुठाल."[1] सावरकरांची धर्मविषयक मते अशी बुद्धिनिष्ठ असल्याने श्रद्धेला तेथे शिरकाव नाही. त्यामुळे श्रद्धेवर आधारलेल्या पारलौकिक जीवनाबद्दल त्यांना आकर्षण नाही. किंबहुना, पारलौकिक वस्तुस्थिती ही प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द यांपैकी कोणत्याही प्रमाणाने सिद्ध होत नाही असाच त्यांचा दावा आहे.[2] जिथे पारलौकिक जीवनाबद्दलच कोणताही नक्की सिद्धान्त कळलेला नाही तिथे कोणता अैहिक आचार पारलौकिक जीवनास अुपकारक होअील हे ठरविणे किती अशक्य आहे हे लक्षात येअील.[3] सावरकरांची अैहिक जीवनावरील श्रद्धा या विचारातून निर्माण झाली आहे. म्हणून त्यांनी आपल्या निबंधांतून अनेक ठिकाणी अैहिक सामर्थ्याचे पोवाडे गाअिले आहेत. 'अीश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय?' या निबंधात सावरकरांनी या अैहिक सामर्थ्याचा प्रभावी पुरस्कार केला आहे. त्यांच्या सांगण्याचा निष्कर्ष असा : " . . . ज्यांना ज्यांना आपल्या चळवळीत अैहिक यश हवे, त्यांनी त्यांनी आमच्या पक्षास न्याय आहे, आमच्या पक्षास देव आहे, सत्य आहे; यास्तव तो आमचा पक्ष विजयी होणारच अशा वल्गना करण्याचे आणि आंधळ्या निष्ठेत निश्चित राहण्याचे सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादी न लागता 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे', अितकेच काय ते खरे मानावे आणि वैज्ञानिक, सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा अैहिक साधनांनी विपक्षाहून वरचढ होण्याचा यत्न करावा. अैहिक विजयाचा मार्ग हाच. अन्यायी, परोपद्रवी व्हावे असे नव्हे; तर न्याय झाला तरी तो 'समर्थ' नसेल तर व्यर्थ होय. समर्थ अन्याय त्याच्यावर कुरघोडी केल्यावाचून राहणार नाही. दुर्बल पुण्याअीही पंगू होय हे विसरू नये."[4] यज्ञसंस्थेचा विचार करतानाही सावरकरांनी आपला वरील सिद्धान्त पुन्हा मांडला आहे. 'यज्ञ तिथे जय . . . अग्नी तिकडे विजय' या सर्वसाधारण श्रद्धेलाही त्यांनी आपल्या बुद्धिवादाने असाच धक्का दिला आहे आणि असे सिद्धिले आहे की, यज्ञ नी यश अग्निपूजा नी पराक्रम यांचा काही अेक कार्यकारण-संबंध नाही. अैहिक विजय अैहिक साधनांनीच मिळतात."[5]

अैहिक सामर्थ्यावरील सावरकरांचा विश्वास हा असा पारलौकिकाबद्दलच्या बुद्धिनिष्ठ अविश्वासातून जन्मलेला आहे. हिंदुधर्मातील धर्मभोळेपणावर

---

१. श्रद्धानंद दि. १०–३–२७. २. सा. सा. भाग १ – पृ. २९. ३. सा. सा. भाग १ – पृ. २९. ४. सा. सा. भाग १ –पृ. १९. ५. सा. सा. भाग १–पृ. ४३.

जरी त्यांनी झोड अुठविली असली तरी हिंदुधर्मातील बुद्धिनिष्ठ भागाबद्दल त्यांना अतीव आदर आणि अभिमान आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या धमकीला अुत्तर देताना त्यांनी अगदी परखडपणे सांगितले आहे की, काही झाले तरी बुद्धिवादाच्या दृष्टीनेही अेकंदरीत पाहता धर्मात ग्राह्यतम धर्म असेल तर तो हिंदुधर्म होय.[1] याच बुद्धिनिष्ठेमुळे सावरकरांना 'हिंदुदर्शनात कोणत्याही अेका धर्मग्रंथाच्या पिंजऱ्यात न अंडकणारी तत्त्वज्ञानबुद्धीची जी स्वतंत्र भरारी आढळून येते, तेच आपले भूषण आहे' असे वाटते.[2]

अीश्वर, धर्म, धर्मग्रंथ या सर्व गोष्टींना सावरकर बुद्धिनिष्ठेच्या कसोटीवर घासून मग त्यांची पारख करतात. अीश्वराबद्दल भोळसर कल्पना त्यांना यत्किंचित मान्य नसून प्रसंगी ते त्यांची टरही अुडवितात. चंद्र, सूर्य, तारे, शक्ती अित्यादी ज्योतिर्गोल निर्जीव व ठराविक सृष्टिनियमांनी बद्ध असल्याने त्यांची अुपासना व प्रार्थना त्यांना हास्यास्पद वाटते.[3] कधी कधी अुपहास-अुपरोधाच्या शस्त्राने ते देवकल्पनेला पार मुळासकट अुखडून टाकतात. अशा वेळी वाचकांच्या बुद्धीला हादरे बसविणारी कितीतरी वाक्ये त्यांच्या लेखणीतून अवतरत असतात. पुढील काही वाक्ये या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. 'जसा प्राणदायक तसाच प्राणहारकही आहे हा सूर्यच'.... 'सूर्यास प्रसादविण्याचे धार्मिक साधन जे जप ते नसून वैज्ञानिक साधन जे जोडा ते होय.' 'जपापेक्षा जोड्यानेच शनि-सूर्याची पीडा पुष्कळ कमी होते!'[4]... 'ज्या ज्या संकटातून आपणांस सोडविले म्हणून आपण देवाचा सत्यनारायण करतो, त्या त्या संकटांत प्रथम आपणांस ढकलतो कोण? तोच सत्यनारायण, तोच देव. जो प्रथम आपला गळा कापतो आणि नंतर त्यास मलम लावतो, त्याची मलम लावण्यासाठी पूजा करावयाची तर प्रथम गळा कापलास म्हणून त्याची आधी यथेच्छ शोभाही करावयास नको काय?'[5] ... 'दूधपित्या हजारो कोवळ्या लेकरांचा भूकंपाच्या वरवंट्याखाली ज्याने चेंदामेंदा केला तो देव की दैत्य? दुष्ट की दयाळू?'[6]

देवासंबंधीच्या कल्पना करताना आपण मुख्यतः दोन चुका करतो असे सावरकरांना वाटते. अेक चूक अशी की, आपण मनुष्याच्या दुष्टतेच्या वा दयालुत्वाच्या गजाने देवाला मोजू पाहतो;[7] आणि दुसरी चूक ही की, देवाने हे विश्व, मनुष्य, त्याचा मध्यबिंदू कल्पून केवळ मनुष्याच्या सुखसोयीसाठीच निर्मिले आहे

---

१. जाति. नि. पृ. २२२. २. जाति. नि. पृ. ३४५. ३. सा. सा. भाग ४– पृ. ६६ ते ६९. ४. सा. सा. भाग ४ – पृ. ६६ ते ६८. ५. सा. सा. भाग १– पृ. ८-९. ६. सा. सा. भाग ३ – पृ. ५४. ७. सा. सा. भाग ३ – पृ. ५४.

असे मानतो.[१] या चुकांमुळे देवासंबंधीच्या आपल्या अनेक कल्पनांत विसंगती अुत्पन्न होते असे सावरकरांचे म्हणणे आहे.

या सर्व विवेचनावरून अेक गोष्ट लक्षात येते की, सावरकरांचा मुख्यत: विरोध आहे तो अज्ञानातून, बुद्धिहीनतेतून निर्माण झालेल्या देव ह्या कल्पनेला. झाडांचा देवच करून टाकणे आपल्या संस्कृतीच्या पदरी बुद्धिहीनतेचा दोष बांधण्यासारखे आहे असे त्यांना वाटते.[२] बुद्धीच्या, ज्ञानाच्या प्रकाशात देव या कल्पनेचे सत्य स्वरूप, मूळ स्वरूप दाखविण्याचा प्रयत्नही सावरकरांनी केला. अपयुक्ततेतूनच ही देवीकरणाची प्रथा निर्माण झाली असा सिद्धान्त ते सोदाहरण मांडतात. यज्ञाग्नीला 'देव' पदवी कशी प्राप्त झाली याचे वर्णन करताना सावरकर लिहितात, "अग्नीच्या अत्यंत अुपयुक्ततेमुळे ते दैवी तेज जसे देवातील अत्यंत प्रिय नी पूज्य देव झाले, तसेच अग्नी सतत पेटत ठेवण्याची, त्या देवाचे अस्तित्व आणि अुपस्थिती आपापल्या गृहात सतत शक्य करण्याची ही क्रियाही तिच्या अत्यंत अुपयुक्ततेमुळेच अेखाद्या दैनिक, धार्मिक, पवित्र क्रियेसारखी कर्तव्य होअून बसली, संस्कार होअून बसली, अग्निहोत्रपद पावली . . . चूल वा चिलीम पेटविणाऱ्या व्यावहारिक आगीचे देवीकरण म्हणजेच अग्निदेव, यज्ञीय अग्नी."[३] गाय हीही अुपयुक्त पशू असल्यामुळेच पूज्य देवता, माता अशी धर्मभावना दृढ झाली.[४]

सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ मनाला मूर्तिपूजाही तत्त्वत: मान्य नाही. म्हणून त्यांनी म्हटले आहे की, पतितपावनादी मंदिरात देवाची मूर्ती स्थापिणे काय, नी खोलीत वडिलांचे छायाचित्र लावणे काय, लाक्षणिक अर्थ समजण्याअितका विवेक असणारे सारखेच समंजसपणाचे कृत्य मानगार.[५] सावरकरांनी देवाची पुढील-प्रमाणे व्याख्या केली आहे : 'प्रभुत्वाचा, पावित्र्याचा, पूजनीयतेचा, परमोच्च आदर्श म्हणजे देव.'[६] त्यांच्या दृष्टीने देव हा शब्द दिव्यत्वाचा बोधक होय.

सावरकरांनी 'देव' कल्पनेच्या धार्मिक, आध्यात्मिक अंगापेक्षा सामाजिक किंवा राष्ट्रीय अंगासच अधिक महत्त्व दिले आहे. पतितपावन मंदिराची स्थापना करताना सावरकरांनी 'पतितपावन' या अभिधेचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे : 'ह्या पतन पावलेल्या हिंदुराष्ट्रास जो अुद्धरील त्या देवास मी पतित-पावन म्हणेन . . . आम्हां हिंदूंचे जे जे गेले ते ते सर्व आम्हांस परत हवे. जो देव ते देअील त्यास मी पतितपावन म्हणेन.'[७] याच भूमिकेतून 'नर हाच नारायण'

---

१. सा. सा. भाग – १ पृ. ७. २. सा. सा. भाग ४ – पृ. ९१. ३. सा. सा. भाग १ – पृ. ३६. ४. सा. सा. भाग १ – पृ. ७८. ५. क्ष–किरणे पृ. ४१. ६. क्ष–किरणे पृ. ४७. ७. रत्ना. हिं. अिति: पृ. १४.

अशी ते देवाची व्याख्या करतात; आणि याच व्याख्येनुसार धार्मिक व्रताचारांचा आग्रह ते धरतात. गोलिकाव्रतात पिठाची नासाडी करण्यापेक्षा त्याच्या भाकरी जर असाहाय्य, दीन, क्षुधित सज्जनांच्या अेक वेळच्या भुकेस दिल्या असत्या तर त्यात त्यांच्या अंतरात्म्याला नी नराच्या अंतरात्म्यातच त्यातल्या त्यात अुत्कटपणे व्यक्त असणाऱ्या नारायणाला संतोष झाला असता असे व्रतांसंबंधी विवेचन करताना त्यांनी म्हटले आहे.[1] यज्ञासंबंधी विचार करतानाही सावरकरांचा हाच दृष्टिकोन दिसून येतो. ते लिहितात, "नारायणाची अत्यंत अुत्कट व्यक्ती जो नर त्या मनुष्यजातीस अुद्धारार्थ झिजण्यापेक्षा, लोकधारण व्रतापेक्षा नारायणास संतोषविणारा दुसरा कोणता यज्ञ असू शकणार?"[2] आपल्या या विचाराच्या पुष्टचर्थ ते असा युक्तिवाद करतात की, काही झाले तरी नारायणाची व्यक्ती वड, पिंपळ, दगड-धोंडे, शेणमाती यांच्या जड मूर्तीहून नराच्या सचेतन मूर्तीतच अधिकच अुत्कटत्वाने झालेली आहे.[3] वडाची पूजा करण्याने देव पावतो...तर अनाथ अर्भकास दूध पाजण्याने तो देव का पावणार नाही? असा मार्मिक प्रश्न ते विचारतात.[4] मात्र ही अनाथालये हिंदू अर्भकांची असावीत असे सांगणारी त्यांच्यातील हिंदुत्वनिष्ठा येथेही प्रभाव गाजविते.

'धारणात् धर्मम् अित्याहुः' हीच धर्माची व्याख्या सावरकरांना त्यातल्या त्यात सुसंगत अशी आणि बुद्धिनिष्ठ वाटते.[5] म्हणून "जो अैहिक नि पार-लौकिक धारणा करतो तो धर्म" असे सूत्र ते सांगतात.[6] धर्माची अशी व्याख्या करताना सावरकरांचे बुद्धिवादी मन धर्माच्या भोळसर आणि आचारबद्ध स्वरूपात गुरफटत नाही; त्यामुळे त्यांना धर्म आणि आचार यांतील भेद स्पष्ट दिसतो. रत्नागिरीच्या वास्तव्यात 'धर्म' आणि 'आचार' हा त्यांच्या व्याख्या-नांचा अेक महत्त्वाचा विषय असे. या व्याख्यानांतून ते सनातन अशा धर्मा-पासून आचारधर्म भिन्न आहे, असे पटवून देत असत.[7] अशा स्वरूपाच्या व्याख्यानां-तील विचारच पुढे निबंधांतून वारंवार आले आहेत. धर्मविषयक त्यांच्या सर्व मतांचा थोडक्यांत निष्कर्ष सांगावयाचा झाला तर तो पुढीलप्रमाणे सांगता येअील : जातिभेद मनुष्यकृत असल्याने त्याला धर्म या अर्थी अशाश्वत म्हणणे अन्वर्थक नाही. येथे 'धर्म' शब्दाचा अर्थ आचार होय. त्रिकालाबाधित आदितत्त्वाचे आंदिनियम असा त्याचा अर्थ नसतो. खरा धर्म म्हणजे विश्वातील चिरंतन शाश्वत सत्य होय. प्रत्येक धर्मात जे जे चिरंतन सत्य असेल ते ते स्वीकारण्यातच

---

१. क्ष-किरणे पृ. ७. २. सा. सा. भाग १; ३. सा. सा. भाग ४ – पृ. ८६. ४. सा. सा. भाग ४ – पृ. ५१७; ५. जाति. नि. पृ. १८७; ६. जाति. नि. पृ. १८७. ७. रत्ना. हि. अिति. पृ. १०; ८. जाति. नि. पृ. १३–१४;

सर्वांचे हित आहे.[१] विश्वाचा हा सनातन धर्म–त्यालाच आम्ही हिंदू लोक सनातन धर्म म्हणतो.[२] बाकी सगळे आचार मनुष्यसापेक्ष धर्म, मनुष्याच्या धारणार्थ योजलेल्या युक्त्या. ते धारण जोपर्यंत त्यांच्यायोगे होअील तोपर्यंत ते आचार आम्ही पाळू, नाहीतर बदलू, नाहीतर बुडवू, नाहीतर नवे स्थापू.[३] कारण 'न हि सर्वहितः कश्चित् आचारः संप्रवर्तते ।' आचारधर्म स्वभावतःच परिवर्तनशील असतात. चातुर्वर्ण्य काय, जातिभेद काय, दोन्ही आचारच आहेत, सनातनधर्म नव्हेत.[४] आपल्याला जो आचार शुद्ध नि हितकर वाटतो तो आपण आचारावा. पण तोच काय तो सनातन, त्रिकालाबाधित, अीश्वरोक्त धर्म होय, आणि अितर साऱ्या परिस्थितीत तोच मानला पाहिजे, तो हितप्रद झालाच पाहिजे, तो अपरिवर्तनीय धर्म असलाच पाहिजे असा धर्मवेडा दुराग्रह मात्र धरू नये.[५]

सावरकरांचे बुद्धिवादी मन धर्माचा असा व्यापक व तात्त्विक विचार करणारी झेप घेत असले तरी हिंदुत्वनिष्ठेच्या चिवट बंधनातून ते सर्वस्वी मुक्त होअू शकत नाही आणि म्हणूनच कधी कधी ते मन धर्माचा हिंदुराष्ट्राच्या संदर्भात विचार करू लागते आणि अुद्गारते, "हिंदुराष्ट्राच्या अभ्युन्नतीस जो आज अुपकारक, अुद्धारक तोच आजचा सदाचार–आजचा धर्म."[६]

धर्माप्रमाणेच धर्मग्रंथांसंबंधीची सावरकरांची मते अत्यंत बुद्धिनिष्ठ आहेत. मतामतांनी गजवजलेल्या धर्मग्रंथांचा अर्थ लावावयाचा असेल तर पुरुष-बुद्धीवाचून दुसरा वाटाड्या नाही असा त्यांचा ठाम विश्वास आहे.[७] मानवी बुद्धी ही अीश्वरोक्त मताअेवढी धर्मवेडी कधीच असू शकणार नाही असे वरील विचाराच्या स्पष्टीकरणार्थ ते सांगतात.[८] याच बुद्धीच्या बळावर विसंबून ते असा सिद्धान्त सांगतात की, धर्मग्रंथ हे अीश्वरी आज्ञा नसून, ते मनुष्यकृत आहेत. रत्नागिरीच्या अेका व्याख्यानात, 'God sent Books and how men should read them' या विषयावर विचार व्यक्त करताना सावरकरांनी म्हटले होते : वेद, बायबल कुराण प्रभृती यच्चयावत ग्रंथ अीश्वरकृत नसून मनुष्यकृत आहेत आणि म्हणूनच ते त्रिकालज्ञानी व त्रिकालाबाधित होअू शकत नाहीत...त्यांना आदरावे पण अनुल्लंघनीय त्रिकालाबाधित अेकमेव शास्त्र मानू नये.'[९] हाच विचार आणखी अेका निबंधात व्यक्त करताना त्यांनी लिहिले आहे : 'ज्या मनुष्याला धर्माचे नुसते अेक दूरध्वनि-यंत्र बनावयाचे नसेल, माणूस म्हणून

---

१. जाति. नि. पृ. १८७. २. जाति. नि. पृ. १३–१४. ३. जाति. नि. पृ. १५. ४. जाति. नि. पृ. १३ ते १६. ५. क्ष–किरणे पृ. १६७–६८. ६. रत्ना. हिं. अिति. पृ. ७३. ७. जाति. नि. पृ. १९१. ८. जाति. नि. पृ. १९१. ९. रत्ना. हिं. अिति. पृ. ८३.

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. क्रमांक

क्रमांक ..... दो: वि: .....

स्वत:चे बुद्धिनिष्ठ मत हवे असेल, त्याने शब्दनिष्ठेला अुच्छेदून वेद, अवेस्ता बायबल, कुराण हे सारे आदरणीय नी अभ्यसनीय पण निव्वळ मनुष्यकृत ग्रंथ आहेत असे ठाम मत ठरवून सादर अभ्यासावे.'[1] हे धर्मग्रंथ त्रिकालाबाधित व अीश्वरी आज्ञा मानण्यातील धोका अेका कोटिक्रमाने दाखविताना सावरकरांनी म्हटले आहे की, त्यायोगे त्या धर्मग्रंथांना ते अीश्वरीय पूर्णत्व येण्याच्या ठायी अुलट अीश्वरासच अेखाद्या मनुष्यासारखे स्खलनशील दुर्बलत्व चिकटविले जाते. तो ग्रंथकर्ता मनुष्य अीश्वरप्रेषित होण्याच्या ठायी अीश्वरच मनुष्य होअून बसतो.[2] याशिवाय मागासलेल्या धर्मग्रंथास त्रिकालाबाधित मानल्याने त्यांच्या-अितकेच सदोदित मागासलेले राहणे भाग पडते.[3] हे धोके दाखविताना सावर-करांची प्रागतिक व समाजनिष्ठ वृत्तीही प्रकट होते आणि ती बजावते की, कोणतीही व्यक्ती वा ग्रंथ त्रिकालाबाधित, अस्खलनीय, अशंकनीय असे सार्व-कालीन परमप्रमाण मानले गेले की, त्या धर्माची नी समाजाची प्रगती खुंटलीच म्हणून समजावे.[4] त्यांचे बुद्धिनिष्ठ मन अशी शंका घेते की, श्रुतिस्मृती किंवा कुराण यांतील लुप्त भाग अथवा गळलेले अीश्वरी संदेश लक्षात घेतले म्हणजे सध्या असलेल्या अीश्वरी आज्ञेहून भिन्न आज्ञा नव्हत्या असे मानता येत नाही.[5] शास्त्रीय अभ्यासाने त्यांचे बुद्धिनिष्ठ मन त्यांना अशी ग्वाही देते की, मनुष्य हा सृष्टीनंतर लाखो वर्षांनी निर्माण झाला असल्यामुळे जगतोत्पत्तीबरोबर मनु-स्मृती रचली गेली नाही.[6] तर आजची मनुस्मृतीही भिन्नभिन्न मतांची संकल्पित संहिता आहे.[7] मनुस्मृती सावरकर वाचतात ती अपौरुषेय, त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य धर्मशास्त्र म्हणून नव्हे, तर बुद्धिमीमांस्य अशी केवळ अैतिहासिक माहिती म्हणून.[8] सर्व धर्मग्रंथांचे वाचन ते अैतिहासिक व बुद्धिनिष्ठ दृष्टीने करतात.[9] पण अशा बुद्धिनिष्ठ दृष्टीने अभ्यास करूनही त्यांना धर्मग्रंथांविषयी अतीव आदर वाटतो. धर्मग्रंथाबद्दलचा हा आदर पुढील शब्दांत कसा व्यक्त झाला आहे पाहा : 'आपल्या वेदस्मृतिप्रभृती ग्रंथांची योग्यता अितकी मोठी आहे की तिला टिकविण्यासाठी ते ग्रंथ अपौरुषेय वा त्रिकालाबाधित वा सर्वज्ञ आहेत अशा काहीच्या बाहीच अर्थवादाचे वा व्यर्थवादाचे स्तोम रचणे, हिमालय पर्वत डगमगू नये म्हणून त्याच्या पायथ्याला बांबूंचे टेकू अुभारण्याअितकेच अनावश्यक, अनिष्ट नी हास्यास्पदच व्हावे. अितकेच नव्हे तर त्यांस, ते आहेत तसेच, पौरुषेय, परि-स्थितिसापेक्ष, त्या काळच्या भावभावना, नियमनिर्बंध, आचारविचार प्रदर्शविणारे

---

१. क्ष–किरणे पृ. ३०. २. सा. सा. भाग ४ – पृ. १०१. ३. सा. सा. भाग २ – पृ. १०. ४. क्ष–किरणे पृ. १६१. ५. जाति. नि. पृ. १९८. ६. जाति. नि. पृ. १४६–१४७. ७. जाति. नि. पृ. १५ . ८. सा. सा. पृ. ९६. ९. जाति. नि. पृ. १५३–१५४.

आमचे प्राचीन धर्मग्रंथच या दृष्टीने संबोधण्याने त्यांच्याविषयीची पूज्यता चिरकाल टिकू शकते, जगन्मान्य राहू शकते."[1]

बुद्धिप्रामाण्यवादी सावरकरांना धर्मग्रंथांतील विसंगती शोधण्याची सवय लहानपणापासून जडली होती. त्यांच्या निबंधांतून या प्रवृत्तीचे अनेक पुरावे सापडतात. यज्ञसंस्थेतील पशुहिंसेचे वर्णन करताना सावरकरांनी मंत्रदृष्ट्या ऋषींतील अनेक मतभेदांचे विवेचन केले आहे. यज्ञात पशू मारावा की न मारावा, पुष्ट पशू बळी द्यावा[2] मांस म्हणजे पशूचे मांस की मांस म्हणजे माष – डाळीची अेक जात,[3] असे अनेक विकल्प सावरकरांनी दाखवून देऊन वेदमंत्रातील या विसंगतीवर बोट ठेविले आहे. सावरकरांच्या मते अशी विसंगती केवळ आपल्या धर्मातच नाही, तर जगातील अितर झाडून साऱ्या अपौरुषेय म्हणविणाऱ्या प्राचीन आणि अर्वाचीन धर्मग्रंथांचीही तीच स्थिती आहे. या सर्व विसंगतींचे थोडक्यात वर्णन करताना सावरकरांनी लिहिले आहे : "हजारो वर्षांपूर्वीच्या मोसेस पैगंबरापासून तो अगदी आजकालच्या अमेरिकेतील मोर्मन पैगबंरापर्यंत सर्वांनी, मनुष्याच्या अुठण्यावसण्यापासून, दाढी-मिशा-शेंडीच्या लांबीरुंदीपासून वारसांच्या, दत्तकांच्या, लग्नाच्या निर्बंधापासून तो देवाच्या स्वरूपापर्यंत आपल्या साऱ्या विधानांवर 'अेष धर्मस्सनातनः' हीच राजमुद्रा आणि तीही देवाच्या नावाने ठोकलेली आहे... सर्व मानवांनी सुंता केलीच पाहिजे हाही सनातनधर्म आणि त्रैवर्णिकांनी तसे भलते-सलते काहीअेक न करता मुंजच करावी हा सनातन धर्मच. लाक्षणिक अर्थीच नव्हे, तर अक्षरशः ह्या साऱ्या अपौरुषेय अीश्वरी धर्मग्रंथांत अेकाचे तोंड पूर्वेस तर अेकाचे पश्चिमेकडे वळलेले आहे आणि तेही अगदी प्रार्थनेच्या पहिल्या पावलीच. सकाळी पूर्वेकडे तोंड करून प्रार्थना करणे हाही सनातन धर्म आणि सकाळी देखील प्रार्थना म्हटली की, ती पश्चिमेकडेच तोंड करून केली पाहिजे हाही मनुष्यमात्राचा सनातन धर्मच. अेकाच देवाने मनूला ती पहिली आज्ञा दिली नी महंमदाला दुसरी दिली. देवाची अगाध लीला; दुसरे काय?"[4] सावरकरांची तर्ककर्कश बुद्धी मनुस्मृतीतील अनेक विसंगतींचा अत्यंत भेदक शब्दांत परामर्श घेते. स्वरांच्या विविध माळा गुंफीत गवयाचे गाणे जसे वेगाने समेवर येअून आदळते तशी विसंगतीची अनेक अुदाहरणे देत देत सावरकरांची ही तार्किक बुद्धी 'अेष धर्मस्सनातनः' या ध्रुवपदावर आघात करीत आदळते. हिंदुराष्ट्राच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्कृतीचे वर्णन करताना सावरकरांनी लिहिले आहे : 'लसूण का खाअू नये' तर तो कोणत्या परिस्थितीत वैद्यकदृष्ट्या हितावह आहे वा नाही ह्याची चिकित्सा न करता केवळ 'अेष धर्मस्सनातनः'

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. ९९-१००. २. सा. सा. भाग १ – पृ. ५५.
३. सा. सा. भाग १ – पृ. ५६. ४. सा. सा. भाग १ – पृ. २३.

आहे म्हणून. 'दिवसा मलमूत्रोत्सर्ग अुत्तराभिमुख करावे पण रात्री दक्षिणाभिमुखच का? अेष धर्मस्सनातनः आहे म्हणून.'[१] 'मनुस्मृतीतील महिला या निबंधात सावरकरांनी अनेक विसंगतींचा निर्देश केला आहे. विधवाविवाहासंबंधी लिहिताना स्मृतिकार विधवेला पुनर्विवाह न करता ब्रह्मचर्यव्रत पालन करण्याची आज्ञा देतात, तर लगेच दुसरीकडे वंशक्षय टाळण्यासाठी नियोगपद्धतीने विधवेने प्रजोत्पत्ती करावी अशीही आज्ञा करतात. या प्रजोत्पत्तीच्या आज्ञेतही पुन्हा विसंगती आहेच. विधवेने अेकच पुत्र होअीपर्यंत संबंध ठेवावा–'न द्वितीयं कथंचन' असे सांगणारी स्मृती लगेच आज्ञापिते–'अेकपुत्रत्व व अपुत्रत्व' ही दोन समान होत असे कित्येक आचार्य मानितात...म्हणून ते स्त्रियांच्या ठायी दुसरा पुत्र अुत्पन्न करणे हा धर्म मानितात.[२] नियोगपद्धतीला मान्यता देणारी हीच स्मृती पुन्हा विरुद्ध मोहरा वळवून सांगते–'विधवेला नियोगाने परपुरुषाशी रतू देणे हा सनातन धर्माचा घात होय.'[३] पण हीच स्मृती पुन्हा नियोगाचा 'धर्म्य' म्हणून अुल्लेख करते.[४] अनुलोम या विवाहामुळे निर्माण झालेल्या ब्राह्मणांच्या चारी वर्णांच्या मुलांना मातेच्या द्रव्याची वाटणी मिळण्यात अनेक परस्परविरुद्ध आज्ञा स्मृतींने दिल्या आहेत.[५] सावरकरांनी या सर्व विसंगतींचे अत्यंत बुद्धिनिष्ठ दृष्टीने वर्णन केले आहे. मानवी बुद्धीला न पटणारी पोथ्यापुराणांतील विसंगत वर्णनेही सावरकरांनी निबंधांतून वाचकांपुढे मांडली आहेत. भंडारी जातीच्या अुत्पत्तीविषयी सावरकरांनी दिलेली पोथ्यापुराणांतील माहिती या दृष्टीने वाचनीय आहे.[६]

धर्मग्रंथांतील ही केवळ विसंगती देअूनच सावरकरांचे बुद्धिनिष्ठ मन स्तब्ध राहात नाही. तर त्या विसंगतीमागील कार्यकारणभाव ती शोधू लागते. मनुस्मृतीतील विसंगतीची कारणे सांगताना सावरकरांनी लिहिले आहे: "... जे जे नवीन ते ते चांगले आहे म्हणून न स्वीकारता, ते श्रुतिपुराणोक्त असले तरच स्वीकार्य होय असा दंडक अगदी मनूपासूनच आमच्या रोमरोमी खिळलेला होता. वेदात आहे तेच मी सांगतो अशा खऱ्याखोट्या शपथा मनूलादेखील वारंवार ह्या स्मृतीत द्याव्या लागल्या, तेव्हा मनुस्मृती धर्म्य ठरू शकली. स्वतः मनूनेही मनुस्मृतीतही 'अितर स्मृती खोट्या आहेत, त्या पाळू नका' हे सांगताना अगदी शेवटच्या १२ व्या अध्यायात ९६ व्या श्लोकात सांगितले आहे की, 'तान्यर्वाक् कालिकतया निष्फलान्यनृतानि च' त्या मनुस्मृतीहून अितर स्मृती त्याज्य

---

१. सा. सा. भाग २. – पृ. ४. २. सा. सा. भाग ४ – पृ. १३५–१३६. ३. सा. सा. भाग ४ – पृ. १३८. ४. सा. सा. भाग ४ – पृ. १३९. ५. सा. सा. भाग ४ – पृ. १४९. ६. जाति. नि. पृ. १३४.

आमचे प्राचीन धर्मग्रंथच या दृष्टीने संबोधण्याने त्यांच्याविषयीची पूज्यता चिरकाल टिकू शकते, जगन्मान्य राहू शकते."[1]

बुद्धिप्रामाण्यवादी सावरकरांना धर्मग्रंथांतील विसंगती शोधण्याची सवय लहानपणापासून जडली होती. त्यांच्या निबंधांतून या प्रवृत्तीचे अनेक पुरावे सापडतात. यज्ञसंस्थेतील पशुहिंसेचे वर्णन करताना सावरकरांनी मंत्रदृष्टच्या ऋषींतील अनेक मतभेदांचे विवेचन केले आहे. यज्ञात पशू मारावा की न मारावा, पुष्ट पशू बळी द्यावा[2] मांस म्हणजे पशूचे मांस की मांस म्हणजे माष–डाळीची अेक जात,[3] असे अनेक विकल्प सावरकरांनी दाखवून देऊन वेदमंत्रातील या विसंगतीवर बोट ठेविले आहे. सावरकरांच्या मते अशी विसंगती केवळ आपल्या धर्मातच नाही, तर जगातील अितर झाडून साऱ्या अपौरुषेय म्हणविणाऱ्या प्राचीन आणि अर्वाचीन धर्मग्रंथांचीही तीच स्थिती आहे. या सर्व विसंगतींचे थोडक्यात वर्णन करताना सावरकरांनी लिहिले आहे : "हजारो वर्षांपूर्वीच्या मोसेस पैगंबरापासून तो अगदी आजकालच्या अमेरिकेतील मोर्मन पैगबंरापर्यंत सर्वांनी, मनुष्याच्या अुठण्यावसण्यापासून, दाढी-मिशा-शेंडीच्या लांबीरुंदीपासून वारसांच्या, दत्तकांच्या, लग्नाच्या निर्बंधापासून तो देवाच्या स्वरूपापर्यंत आपल्या साऱ्या विधानांवर 'अेष धर्मस्सनातनः' हीच राजमुद्रा आणि तीही देवाच्या नावाने ठोकलेली आहे... सर्व मानवांनी सुंता केलीच पाहिजे हाही सनातनधर्म आणि त्रैवर्णिकांनी तसे भलते-सलते काहीअेक न करता मुंजच करावी हा सनातन धर्मच. लाक्षणिक अर्थीच नव्हे, तर अक्षरशः ह्या साऱ्या अपौरुषेय अीश्वरी धर्मग्रंथांत अेकाचे तोंड पूर्वेस तर अेकाचे पश्चिमेकडे वळलेले आहे आणि तेही अगदी प्रार्थनेच्या पहिल्या पावलीच. सकाळी पूर्वेकडे तोंड करून प्रार्थना करणे हाही सनातन धर्म आणि सकाळी देखील प्रार्थना म्हटली की, ती पश्चिमेकडेच तोंड करून केली पाहिजे हाही मनुष्यमात्राचा सनातन धर्मच. अेकाच देवाने मनूला ती पहिली आज्ञा दिली नी महंमदाला दुसरी दिली. देवाची अगाध लीला; दुसरे काय ?"[4] सावरकरांची तर्ककर्कश बुद्धी मनुस्मृतीतील अनेक विसंगतींचा अत्यंत भेदक शब्दांत परामर्श घेते. स्वरांच्या विविध माळा गुंफीत गवयाचे गाणे जसे वेगाने समेवर येअून आदळते तशी विसंगतीची अनेक अुदाहरणे देत देत सावरकरांची ही तार्किक बुद्धी 'अेष धर्मस्सनातनः' या ध्रुवपदावर आघात करीत आदळते. हिंदुराष्ट्राच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्कृतीचे वर्णन करताना सावरकरांनी लिहिले आहे : 'लसूण का खाअू नये' तर तो कोणत्या परिस्थितीत वैद्यकदृष्टच्या हितावह आहे वा नाही ह्याची चिकित्सा न करता केवळ 'अेष धर्मस्सनातनः'

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. ९९-१००. २. सा. सा. भाग १ – पृ. ५५.
३. सा. सा. भाग १ – पृ. ५६. ४. सा. सा. भाग १ – पृ. २३.

आहे म्हणून. 'दिवसा मलमूत्रोत्सर्ग अुत्तराभिमुख करावे पण रात्री दक्षिणाभिमुखच का? अेष धर्मस्सनातनः आहे म्हणून.'[१] 'मनुस्मृतीतील महिला या निबंधात सावरकरांनी अनेक विसंगतींचा निर्देश केला आहे. विधवाविवाहासंबंधी लिहिताना स्मृतिकार विधवेला पुनर्विवाह न करता ब्रह्मचर्यव्रत पालन करण्याची आज्ञा देतात, तर लगेच दुसरीकडे वंशक्षय टाळण्यासाठी नियोगपद्धतीने विधवेने प्रजोत्पत्ती करावी अशीही आज्ञा करतात. या प्रजोत्पत्तीच्या आज्ञेतही पुन्हा विसंगती आहेच. विधवेने अेकच पुत्र होअीपर्यंत संबंध ठेवावा–'न द्वितीयं कथंचन' असे सांगणारी स्मृती लगेच आज्ञापिते–'अेकपुत्रत्व व अपुत्रत्व' ही दोन समान होत असे कित्येक आचार्य मानितात...म्हणून ते स्त्रियांच्या ठायी दुसरा पुत्र अुत्पन्न करणे हा धर्म मानितात.[२] नियोगपद्धतीला मान्यता देणारी हीच स्मृती पुन्हा विरुद्ध मोहरा वळवून सांगते–'विधवेला नियोगाने परपुरुषाशी रतू देणे हा सनातन धर्माचा घात होय.'[३] पण हीच स्मृती पुन्हा नियोगाचा 'धर्म्य' म्हणून अुल्लेख करते.[४] अनुलोम या विवाहामुळे निर्माण झालेल्या ब्राह्मणांच्या चारी वर्णाच्या मुलांना मातेच्या द्रव्याची वाटणी मिळण्यात अनेक परस्परविरुद्ध आज्ञा स्मृतींने दिल्या आहेत.[५] सावरकरांनी या सर्व विसंगतींचे अत्यंत बुद्धिनिष्ठ दृष्टीने वर्णन केले आहे. मानवी बुद्धीला न पटणारी पोथ्यापुराणांतील विसंगत वर्णनेही सावरकरांनी निबंधांतून वाचकांपुढे मांडली आहेत. भंडारी जातीच्या अुत्पत्तीविषयी सावरकरांनी दिलेली पोथ्यापुराणांतील माहिती या दृष्टीने वाचनीय आहे.[६]

धर्मग्रंथांतील ही केवळ विसंगती देअूनच सावरकरांचे बुद्धिनिष्ठ मन स्तब्ध राहात नाही. तर त्या विसंगतीमागील कार्यकारणभाव ती शोधू लागते. मनुस्मृतीतील विसंगतीची कारणे सांगताना सावरकरांनी लिहिले आहे: "... जे जे नवीन ते ते चांगले आहे म्हणून न स्वीकारता, ते श्रुतिपुराणोक्त असले तरच स्वीकार्य होय असा दंडक अगदी मनूपासूनच आमच्या रोमरोमी खिळलेला होता. वेदात आहे तेच मी सांगतो अशा खऱ्याखोट्या शपथा मनूलादेखील वारंवार ह्या स्मृतीत द्याव्या लागल्या, तेव्हा मनुस्मृती धर्म्य ठरू शकली. स्वतः मनूनेही मनुस्मृतीतही 'अितर स्मृती खोट्या आहेत, त्या पाळू नका' हे सांगताना अगदी शेवटच्या १२ व्या अध्यायात ९६ व्या श्लोकात सांगितले आहे की, 'तान्यर्वाक् कालिकतया निष्फलान्यनृतानि च' त्या मनुस्मृतीहून अितर स्मृती त्याज्य

---

१. सा. सा. भाग २. – पृ. ४. २. सा. सा. भाग ४ – पृ. १३५–१३६. ३. सा. सा. भाग ४ – पृ. १३८. ४. सा. सा. भाग ४ – पृ. १३९. ५. सा. सा. भाग ४ – पृ. १४९. ६. जाति. नि. पृ. १३४.

आहेत ! का ? त्यांतील निर्बंध समाजहितास बाधक आहेत असे सिद्ध होते म्हणून नव्हे, तर मुख्यत्वेकरून त्या अेकाच महाकारणासाठी ! 'अर्वाक् कालिकतया' त्या अर्वाचीन आहेत म्हणून. जे जे अर्वाक्-कालीन, अद्यतन ते ते टाकाअू असलेच पाहिजे हा मनूचा दंडक. त्यामुळे पुढच्या शास्त्रकारांना आपल्या सुधारणा लोकांच्या गळी अुतरविण्यास आपले श्लोक मनूच्या प्राचीन स्मृतीतच दडपण्यावाचून गत्यंतर अुरले नाही.[1]"

कुराणातही प्रत्यक्ष पैगंबराच्या तोंडचीच अनेक परस्परविरुद्ध वचने आहेत. खुद्द अिस्लामी धर्मशास्त्री हे अशा वचनांची संख्या कमीतकमी दोनशेतीस वर आहे, असे मानतात.[2] पूर्वी कुराणात अशी आज्ञा होती की सर्व मुसलमानांनी जेरुसलेम-कडेच तोंड करून प्रार्थना म्हणाव्यात. पुढे पैगंबराने ही आज्ञा फिरवून असे सांगितले की, जेरूसलेमकडे तोंड करून प्रार्थना न करता प्रत्येक सच्चा भक्ताने, मद्धर्मीयाने मक्केकडे तोंड करूनच प्रार्थना कराव्यात.[3] सावरकरांनी वरील विसंगतीची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे केली आहे. 'कुराण देवकृत मानले की विरोध विसंगत भासतो. ते कुराण मनुष्यकृत मानले की, या दोन कुराणांत काहीच आक्षेपार्ह नाही. कारण प्रथम मक्केत जुन्या अरबी धर्माचे मूर्तिपूजक लोक प्रबळ असत. त्यांनी महंमदाचे अुच्चाटन करून त्यास देशोधडीस लावले होते. ते जोवर मक्केचे धनी होते तोवर महंमदाच्या धर्माच्या त्या शत्रूंचे ते केंद्र होते. म्हणून मक्केकडे तोंड करून प्रार्थना करणे महंमदास पसंत नसे. पण पुढे मक्का जिंकली. आधीच जी क्षेत्र होती जी मूलभूमी, जन्मभूमी ती मक्का त्यांच्या हातात पडताच तीच त्याच्या अिस्लामी धर्माची राजधानी नि पवित्र क्षेत्र झाले. म्हणून मग यच्चयावत मुसलमानांनी त्यांच्या धर्मराष्ट्रास अेकसूत्री, अेकमुखी, अेकजीवी करण्यासाठी जी अेकरूप बंधने लादली त्यांत सर्वांनी मक्केकडे तोंड करून प्रार्थना करावी हेही बंधन घातले.'[4] या धर्मग्रंथांतील विसंगती नाहीशी करण्यासाठी बुद्धिनिष्ठ सावरकरांनी जो सर्वमान्य अुपाय सांगितला आहे तो हाच की हे धर्मग्रंथच मनुष्यकृत समजून पुरुषबुद्धीच्या स्वच्छ अुपनेत्राने वाचावेत... मनुष्याला शेवटी असा अैहिक नि पारलौकिक वाटाडया, पुरुषबुद्धीवाचून दुसरा कोणताही सापडणे शक्य नाही.[5]

हिंदुधर्मातील व्रतविधींना, श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्तीला सावरकर याच बुद्धिनिष्ठेमुळे विरोध करतात. धर्माची छाप पडताच सर्व विधी व आचार अस्थि-स्थिर (Fossilized) होअून बसतात म्हणून ते या धर्मभोळ्या सनातनी

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. १५३. २. जाति. नि. पृ. २००. ३. जाति. नि. पृ. २०१. ४. जाति. नि. पृ. २०२. ५. जाति. नि. पृ.१९१, १९३

प्रवृत्तीचा निषेध करतात.[१] व्रतविधींचा जन्म मनुष्याच्या अज्ञानातून होतो म्हणून त्यावर ते टीकास्त्र सोडतात.[२] त्यांच्या निबंधांचा प्रमुख हेतूच बुद्धि-वादाचा भडिमार करून धर्मभोळेपणाची मुसंडी दाबून टाकण्याचा आहे.[३] ही श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्ती म्हणजे हिंदुराष्ट्राच्या बुद्धीच्याच पायांत पडलेली बेडी आहे असे सावरकर मानतात आणि ती लवकर तोडून टाकण्यासाठी लेखांचे घणाघात करतात.[४]

गाअीला देवता मानण्यास सावरकरांचा जो तीव्र विरोध आहे तो या बुद्धि-निष्ठेतूनच निर्माण झालेला आहे. गाअीला 'देवता' पदवी कशी प्राप्त झाली याची ते बुद्धिनिष्ठ चिकित्सा करतात. गोपालन आणि कृषी हीच ज्या ज्या राष्ट्रांची मुख्य अुपजीविका होती त्या त्या जगातील बहुतेक प्राचीन राष्ट्रांत गोभक्तीचा अुदय व्हावा, हे त्या प्राचीन जगाच्या भावनाप्रधान धर्मप्रवृत्तीस साजेसे नी साहजिकच होते असा मूलभूत विचार ते मांडतात.[५] त्यांच्या मते मनुष्यास गाअीवैलांची जडलेली युगायुगांची माया व अुपयुक्तता हीच या गोपूजेस नी वृषभ-पूजेस प्राचीन जगतात कारण झाली.[६] परंतु पुढे मनुष्याचे सृष्टपदार्थविज्ञान जसजसे वाढत गेले तसतशी देवांची नी देवतांची प्रतीकेही अधिक प्रकृष्ट नी तात्त्विक बनत गेली. त्यामुळे गाय केवळ अेक अुपयुक्त पशू मानायला हवा.[७] पण अुप-युक्ततेच्या दृष्टीनेही गाअीचे स्तोम माजविणे चुकीचे होय. घोडा आणि कुत्रे हे दोन पशू तरी गाअीहून आधी, निदान गाअीबरोबरच मनुष्याचे अत्यंत अेकनिष्ठ सेवक झालेले आढळतात.[८] तेव्हा अशा अुपयुक्त गाअीच्या वास्तविक गुणांचे गोडवे गायचे झाले तर हा माणसाळू, मायाळू, दुधाळू पशू प्रेमपूर्वक पालनीय होय असेच म्हटले पाहिजे.[९] गाय केवळ अुपयुक्त पशू, माता नव्हे – देवता तर नव्हेच नव्हे.[१०]

गाअीला देवता मानण्याच्या भाबडेपणास काही मूलभूत विचार करून सावरकरांनी जसे अुत्तर दिले आहे, तसे काही वेळेला बुद्धिनिष्ठ कोटिक्रमांनी या भाबडेपणाची भंबेरी अुडविली आहे. यासंबंधात सावरकरांनी केलेले पुढील काही कोटिक्रम पाहण्यासारखे आहेत : अतिमानुष ती देवता, देव. अपमानुष तो पशू किंवा कीट. गाय ही घादान्त अेक पशू. मनुष्यातील अगदी निर्बुद्ध माणसा-अितकी बुद्धी देखील ज्यात नाही अशा कोणत्याही पशूला देवता मानणे म्हणजे

---

१. सा. सा. भाग १ – पृ. ३४. २. सा. सा. भाग ४ – पृ. ६६ ते ६८. ३. सा. सा. भाग २ – पृ. ८०. ४. सा. सा. भाग २ – पृ. ३९. ५. क्ष–किरणे पृ. ४२. ६. क्ष–किरणे पृ. १४–१५. ७. क्ष–किरणे पृ. ४२. ८. सा. सा. भाग १ – पृ. ६९. ९. क्ष किरणे पृ. ४६–४७. १०. क्ष–किरणे पृ. ४२.

माणुसकीचाच अपमान करणे आहे.[1] काही झाले तरी मनुष्याने ज्याची देवता म्हणून पूजा करावयाची ते सत्त्व, ते प्रतीक मनुष्याहून मानवी गुणात तरी सर्वतोपरी श्रेष्ठ असावयास पाहिजे. मनुष्याचा देव हा मनुष्याहूनही हीनतर असेल तर त्या देवानेच त्या भक्ताची पूजा करणे अुचित ठरेल.[2] गाय हा हिंदुराष्ट्राचा अेक दुग्धबिंदू. मानबिंदू नव्हेच नव्हे. भक्ताचा देव, त्याचा भक्तिबिंदू, भक्ताहून महत्तर हवा, तसाच राष्ट्राचा मानबिंदू, ज्यायोगे राष्ट्राचा अत्युच्च पराक्रम, तेज, आकांक्षा दुर्घट करून सोडील, माणसांचे अतिमानुष करून सोडील असा महत्तम हवा.[3] ब्रह्मसृष्टीत गाय नी गाढव ही समानच आहेत. म्हणून गाअीचे पंचगव्य पिण्याच्या संस्काराच्या ठायी यज्ञादी धर्मविधींत गाढवीचे पंचगाढव्य ब्राह्मणाने घ्यावे की काय?[4] गोरक्षण न करता गोभक्षण का करू नये? ब्रह्मवादाने दोन्हीही लटकी किंवा दोन्हीही खरी आहेत, स्वीकार्य आहेत. भक्षण आणि रक्षण हा भेदच ब्रह्मसृष्टीत नाही. 'नासतो विद्यते भावः नाभावो विद्यते सतः' ही ब्रह्मसृष्टी. मग गोभक्षण का करू नये?[5] गायीत देव आहेत म्हणून पोथ्या सांगतात. तर वराहावतारी देव डुक्कर झाले होते असेही पोथ्या सांगतात. मग गोरक्षणच का? डुक्कर-रक्षण-संघ स्थापून 'डुक्कर-पूजा' का प्रचलवू नये?[6] अेका पशूला देवता बनविण्याच्या धांदलीत देवांनाच पशूहून पशू बनविले. त्या गाअीच्या शिंगाच्या टोकापासून तो तिच्या शेपटाच्या केसांच्या टोकांनादेखील असे लोंबकळत चिकटून राहावयास देव म्हणजे गोचिडांची अेखादी जात आहे की काय?[7]... जेव्हा तो कसाई ह्या देवतेस सुऱ्याच्या अेका वारासरशी ठार करतो तेव्हा तिच्या शरीरात राहणाऱ्या या तेहतीस कोटी देवांपैकी अेकही मायेचा पूत पुढे सरसावून त्या कसायाला शिक्षा का करीत नाही?[8]

सावरकरांच्या बुद्धिनिष्ठेची चमक त्यांच्या अनेक विधानांतूनही दृष्टोत्पत्तीस येते. या विधानांना विज्ञाननिष्ठेची जोड मिळाल्याने त्यांतील विचारांचा प्रखरपणा चांगलाच जाणवतो. नमुन्यादाखल पुढील काही विधाने चिंतनीय आहेत : (१) आता मुद्रण आल्याने धार्मिक ग्रंथ पाठ करणाऱ्या वर्गास पोसण्याचे बंद केले पाहिजे.[9] (२) (मनूने सांगितलेल्या) ह्या (दहा) पुत्रांच्या प्रकारावरून स्त्रीपुरुषांसंबंधी मनुष्यांची प्रवृत्ती त्या त्या सत्ययुगातही आजच्या कलियुगापेक्षा कोणत्याही प्रकारे अधिक संयत होती असे दिसत नाही. ह्या कलियुगातील वैवाहिक नीती त्या सत्य-त्रेता-द्वापर युगांतील नीतीपेक्षा

---

१. सा. सा. भाग १ – पृ. ६२ २. क्ष–किरणे पृ. १५. ३. क्ष–किरणे पृ. १०९. ४. क्ष–किरणे पृ. १६. ५. क्ष–किरणे पृ. १६. ६. क्ष–किरणे पृ. १७. ७. क्ष–किरणे पृ. २०. ८. क्ष–किरणे पृ. २०. ९. सा. सा. भाग १–पृ. १२९.

अधिक श्रेष्ठ होय असे मानले पाहिजे.[१] (३) हिंदुस्थानात दुभत्या गाअी व कामसू बैल खाण्यासाठी मारणे अेकंदरीत कमी लाभदायक, म्हणून साधारणत: वर्ज्य; पण अिंग्लंड-अमेरिकेत तरी गोमांस हे आम्हांससुद्धा अितर कोणत्याही मांसासारखेच खाण्यास काहीं हरकत नाही.[२] (४) शिवाजी महाराजांच्या परिस्थितीत ज्या ग्रीदांचा नी शास्त्रांचा नी शस्त्रांचा अुपयोग, ती त्यांनी वापरली, राष्ट्र राखले, वस्स. त्यांचे कर्तव्य त्यांनी केले. आमचे कर्तव्य आमच्या परिस्थितीत राष्ट्र राखावयास अवश्य ते जुने नि नवे साधन हाती घेणे हेच होय. ग्रहणे, सूर्यचंद्रांना राहू, केतू खातात म्हणून घडतात, असे शिवाजी मानीत, म्हणून प्रत्यक्ष ज्ञानाला नाकारून आजही शाळांतून ग्रहणांची ती कारणे शिकवावयाची काय ?[३] (५) आम्हांस असे वाटते की, गाअीचे शेण खाणे नी मूत्र पिणे ही पूर्वी केव्हातरी अेक अुपमर्दकारक निंदाव्यंजक शिक्षा दिली जात असावी... पुढे त्या शिक्षेचाच संस्कार म्हणजेच धर्मीकरण झाले आणि ज्यायोगे पापनिवृत्ती होते ते पुण्यकारक ह्या सहजभावानुक्रमे गायीचे शेण खाणे नी गोमूत्र पिणे हे स्वय-मेवच पुण्यकारक होय, अशा धर्मभोळ्या मताला अगदी सहज असलेली मजूत होअून बसली.[४]

विज्ञाननिष्ठा व बुद्धिनिष्ठा या प्रवृत्तींमुळे सावरकरांनी धर्मभोळेपणा, देव-भोळेपणा, भावडेपणा यांच्यावर अितकी प्रखर टीका केली की लोणी येथे भरलेल्या 'सनातन धर्म परिषदेने'ने सावरकरांच्या निषेधाचा प्रकट ठराव केला.[५] आणि त्या ठरावात सावरकरांना 'स्वेच्छाचारप्रवर्तक, धर्मभावना विघातक, वाङ्मय-द्वारा समाजाचा बुद्धिभेद करणारे' अित्यादी विशेषणे लावण्यात आली.[६] सावरकरांनीं धर्मभोळेपणाचा अुच्छेद करण्याची भूमिका अगदी ठामपणे घेतल्याचे त्यांच्या अनेक अुल्लेखांवरून स्पष्ट दिसून येते. बुद्धिवादाचा भडिमार दुप्पट अुत्साहाने चालवून धर्मभोळेपणाची ही अजूनही मधून मधून मुसंडी मारू पाहणारी अुचल पुन:पुन: दाबून टाकली पाहिजे' असा आपला निर्धार ते व्यक्त करतात.[७] बुद्धिवाद्यांच्या कर्तव्याविषयी विवेचन करताना त्यांनी लिहिले आहे : 'हिंदु-समाजातीलच नव्हे, तर भाकड धर्मवेडाने ग्रासलेल्या ख्रिस्ती मुसलमानादिकांतील लक्षावधी अडाणी लोकांतूनही ही अज्ञानाची साथ जी फैलावली आहे ती हटवून त्यांनासुद्धा विज्ञानाच्या शुद्ध वातावरणात नेअून सोडणे बुद्धिवाद्यांचे कर्तव्य आहे."[८] सावरकरांचा पोथीनिष्ठ धर्मावर जो राग आहे त्याला कारण

---

१. सा. सा. भाग १ – पृ. १४० २. क्ष–किरणे पृ. १२६. ३. क्ष–किरणे पृ. १०८. ४. सा. सा. भाग १ – पृ. ७५. ५. सा. सा. भाग २ – पृ. ११३. ६. सा. सा. भाग २ – पृ. ४६. ७. सा. सा. भाग २ – पृ. ८०. ८. सा. सा. भाग २ – पृ. ८०.

मुख्यत: तो 'धर्म' बुद्धी आंधळी करून टाकतो म्हणून आहे. अशा धर्मावद्दलचा आपला राग लोक व्यक्त करताना सावरकर लिहितात, "धर्म, शब्दनिष्ठ पोथी-जात धर्म म्हटला की, बुद्धी आंधळी होते, किंवहुना बुद्धीचे डोळे काढून घेण्यासाठीच कित्येक वेळा 'धर्माचे सांडस' तापवून हेतुत:च घुसविले जातात."[१] धर्मभोळे-पणाने बुद्धी आंधळी झाली की, मग पुरातन आचारांना वा रूढींना आजच्या वाढत्या ज्ञानाची आणि मिळविलेल्या अनुभवाची कसोटी लावताच कामा नये, ही भ्याड भावना अुत्पन्न होते.[२] बुद्धिप्रामाण्यवादी सावरकरांना तर वाढत्या सृष्टिज्ञानाची अनुभवाची आणि विज्ञानाची कसोटी प्रत्येक गोष्टीस लावावयाची होती. देवभोळेपणाने दुबळेपणा येतो असा त्यांचा सिद्धान्त होता.[३] देवभोळे-पणाचा अर्थ प्रत्येक घटनेचे कारण देवाची लहर, राग वा लोभ असा असल्याने मानवी प्रयत्नांना ती देवभोळेपणाची भावना दुवळी करते असे त्यांचे मत होते.[४] हा देवभोळेपणा नाहीसा करण्याचा अत्यंत सोपा मार्ग सावरकरांनी सांगितलेला आहे. देवकल्पना वा धर्मकल्पना ही भावनेत असल्याने ती खुळचट धर्मभोळी भावना सोडणे हाच अुत्तम मार्ग असे सावरकर सांगतात.[५] त्यांच्या मते विटाळ हीसुद्धा धर्मभोळेपणावर आधारलेली भावनाच आहे.[६] धर्मभोळे-पणाची भावना बुद्धी पंगू करते म्हणूनच केवळ सावरकर तिला विरोध करतात असे नाही, तर धर्मभोळेपणाची भावना समाजाला अनेक प्रकारे हानिकारक आहे म्हणून तिच्यावर ते शरसंपात करतात. सावरकरांच्या म्हणण्याचा अित्यर्थ असा की, हा धर्मभोळेपणा समाजाच्या वैज्ञानिक प्रगतीला मारक ठरतो.[७] तो ज्ञानवृद्धीस विरोध करतो.[८] अैहिक सामर्थ्य, कर्तृत्व व वैभव यांच्यावद्दल अत्यंत विपरीत कल्पना, भाकड समजुती या धर्मभोळेपणामुळेच निर्माण होतात.[९] भटशाहीचे वळही या लोकांमधील भावडेपणातच असते.[१०] तेव्हा हा देवभोळेपणा, धर्मभोळेपणा नाहीसा करावयाचा असेल तर यंत्राचे वर्चस्व समाजकारणात व अर्थशास्त्रातही स्थापिले पाहिजे.[११] कारण यंत्रशीलतेचा सिद्धान्त हा देवभोळ्या धर्मशास्त्राच्या ताठ विरुद्ध असतो.[१२] देवाची अिच्छा ही संख्या यंत्रशास्त्राच्या कधीच खिजगण-तीत नसते.[१३] युरोपमध्ये हेच झाले. तेथे देवभोळेपणा घटल्याने यंत्रशीलपणा वाढला. युरोपने सृष्टिनियमांना प्रगतीच्या रथास जुंपून दिग्विजय केला.[१४]

---

१. क्ष–किरणे पृ. २१. २. क्ष–किरणे पृ. ९८. ३. सा. सा. भाग २–पृ. ५३. ४. सा. सा. भाग २–पृ. ४६. ५. क्ष–किरणे पृ. १४५. ६. सा. सा. भाग ४–पृ. १४. ७. क्ष–किरणे पृ. ९२. ८. सा. सा. भाग ४ – पृ. ६०. ९. सा. सा. भाग १ – पृ. १३०. १०. सा. सा. भाग ४ – पृ. २५–२६. ११. सा. सा. भाग २ – पृ. ५५. १२. सा. सा. भाग २ – पृ. ४९. १३. सा. सा. भाग २ – पृ. ४९. १४. सा. सा. भाग २ – पृ. ५३.

आशिया मात्र सृष्टिनियमांची पूजा करीत बसला.[१] तिबेटसारखे अेखादे राष्ट्र याच धर्मभोळेपणाच्या पायी भूतकाळाच्या खड्डयातल्या खड्डयात दबून पडून राहिले.[२]

विज्ञाननिष्ठेप्रमाणेच सावरकरांची बुद्धिनिष्ठाही हिंदुत्वनिष्ठेच्या छायेत वावरताना दिसते. देवभोळेपणा, धर्मभोळेपणा या भाकड प्रवृत्तीवर हल्ले चढविताना सावरकरांची विज्ञाननिष्ठा व बुद्धिनिष्ठा किती प्रभावी बनते, हे आतापर्यंत आपण पाहिलेच आहे. पण दोन्ही निष्ठांवरही त्यांची हिंदुत्वनिष्ठा अधिराज्य चालविते. सावरकरांनी हिंदूंच्या राजकीय व राष्ट्रीय अंगासच अधिक महत्त्व दिले, 'हे डॉ. अ. ना. देशपांडे यांचे विधान या दृष्टीने चित्य वाटते.[३] या धर्मभोळेपणाच्या, विटाळवेडाच्या संदर्भात लिहिताना सावरकरांनी अनेक पुराव्यांनी असे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे की, भूतकाळात आपल्या हिंदुराष्ट्रानेही राज्यापेक्षा धर्म, जात, सोवळे-ओवळे यांना अधिक महत्त्व दिले. सावरकरांच्या या सर्व विचारांचे सार अेका सूत्रात सांगता येअील. ते सूत्र म्हणजे 'आम्ही मुगुटचापायी मुकुट दवडिले' हे होय.[४] हिंदुराष्ट्राच्या विरोधी अशी जी जी भावना ती ती सावरकरांच्या मते, अधर्मभावना होय. मलबारातील मोपल्यांचे व मध्यप्रदेशातील हलबीचे अुदाहरण देअून सावरकरांनी रोटीबंदी, शुद्धीबंदी, सिंधुबंदी यांची गणना प्राणघातक धर्मभावनेत केली आहे.[५] पोथी-जात प्रवृत्तीचा परिणाम राष्ट्राची शतपटीने अधिक हानी करण्यात होतो म्हणून सावरकर तिचा निषेध करतात.[६] या धर्मभोळेपणाने भाबडेपणाची प्रवृत्ती राष्ट्रात वाढून गोभक्तीपायी राष्ट्रभक्तीचे खोबरे झाले म्हणून सावरकर हळहळतात.[७] म्हणून त्यांना गोहत्येपेक्षा स्वराष्ट्रहत्या हे सहस्रपटींनी महत्तर पाप वाटते.[८] गाय राष्ट्रहानीस कारणीभूत आहे असे पाहताच त्यांना गोरक्षण त्याज्य, पाप, निंद्य वाटते.[९]

कोटिक्रम

सावरकरांचा कोटिक्रम हा त्यांच्या बुद्धिवादातून जन्मलेला आहे. स्वत:स प्रिय असणाऱ्या मतांच्या मंडनासाठी आणि अप्रिय मतांच्या खंडनासाठी कोटि-क्रमाचे शस्त्र सावरकर अत्यंत प्रभावीपणे वापरतात. आक्रमक व्यक्तित्वामळ त्यांचा कोटिक्रम हा मुख्यत: टोल्यास टोला या रोखठोक स्वरूपाचा वाटतो.

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ५३. २. क्ष–किरणे पृ. १६१. ३. सा. वि. द. ४. जाति. नि. पृ. ९. ५. सा. सा. भाग २ – पृ. ९४ ते ९६. ६. क्ष–किरणे पृ. १९. ७. सा. सा. भाग १–पृ. ६८. ८. सा. सा. भाग १–पृ. ६५. ९. सा. सा. भाग १ – पृ. ६४.

श्रद्धास्थाने वा मानबिंदू डिवचला जाताच सावरकरांच्या कोटिक्रमाला अत्यंत तीक्ष्ण धार चढते आणि मग तो कोटिक्रम सावरकरांचा बुद्धिवाद, त्यांची विद्वत्ता व व्यासंग, त्यांच्या निष्ठा अित्यादी त्यांच्या व्यक्तित्वाची बहुतेक वैशिष्ट्ये घेअून प्रकट होतो.

हिंदुत्वनिष्ठेने अुफाळलेला सावरकरांचा पुढील कोटिक्रम पाहण्यासारखा आहे. डॉ. आंबेडकरांनी 'Hindus 'has been a life of continuous defeat. It is a mode of survival of which every Hindu will feel ashamed.' असे अुद्गार[1] काढताच हिंदुराष्ट्राची तीन हजार वर्षांची तेजस्वी परंपरा सावरकरांनी अुभी केली आणि हिंदूंच्या विजयशाली अस्तित्वाचा पुकारा करीत सांगितले : "आज जर हिमालयाच्या वा विंध्याद्रीच्या अुत्तुंग शिखरांवर अुभे राहून कोण्या देवदूताने विचारले की, ह्या हिंदुराष्ट्राचे वैदिक नी पौराणिक काळांतील ते प्रतिपक्षीय असुर, दानव, राक्षस, ते समकालीन अकेडियन, असीरियन, बाबिलोनियन कुठे आहेत किंवा या हिंदुराष्ट्राच्या अैतिहासिक प्राचीन काळातील ते ग्रीक, पार्थियन, शक, यूची, हूण कुठे आहेत ? हिंदुस्थानात, ह्या जगात त्यांच्यापैकी कुणी अुरला आहे काय ? तर त्यांच्या धर्माच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या नावाचा अेकही प्रतिनिधी अुठून 'हा मी अिथे आहे' म्हणून म्हणावयास अुरलेला नाही असेच आढळणार. पण त्याच शिखरावरून त्याने, त्याच देवदूताने, विचारले, "त्या वैदिक काळातील सप्तसिंधूंच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या अुत्तराधिकाराला प्राणपणाने आपणाविणाऱ्या हिंदु राष्ट्राचा कोणी प्रतिनिधी, कोणी हिंदू, अिथें आहे काय ? तर आजही ह्या हिंदुस्थानात 'मी, मी' असे प्रत्युत्तर कोटी कोटी कंठांतून गर्जत अुठेल."[2]

फजलूल हक्क यांनी मुख्यमंत्रिपदावरून बोलताना अेकदा अशी फुशारकी मारली होती की, 'The Muslims were tigers and lions and they would harass the Hindus.' सावरकरांनी लगेच प्रतिटोला दिला : – "The history of creation proves that it is men who have reclaimed the earth and lions and tigers had to retire to the obscurity of the forest. We Hindus are men. One man with a whip in his hand controls scores of lions and tigers in a circus and these beasts obey wonderfully well."[3]

देवलसीवृत्ती, धर्मभोळेपणा, यज्ञ-अग्निपूजा अित्यादी धार्मिक आचार यांचे अवडंबर व त्यांतील भाकडवृत्ती नष्ट करण्यासाठी सावरकरांनी अनेक वेळा

---

१. सा. वि. द. पृ. ४६. २. सा. वि. द. पृ. ४६–४७. ३. Savarkar and His Times p. 399.

आपल्या कोटिक्रमाचे हत्यार परजले आहे. जय हा अग्निपूजेने मिळत नसून ऐहिक विजय ऐहिक साधनांनीच मिळतो, हा आपला सिद्धान्त पटविण्यासाठीच सावरकरांनी पुढील कोटिक्रमांनी प्रतिपक्षाला कसे निरुत्तर केले आहे पाहा :– "असेच जर असते तर वैदिक, यज्ञीय नी आर्य अशा पौरस राजाला त्या अवैदिक म्लेंच्छांनी कसे जिंकले ? रणांगणात यदृच्छा, दैव म्हणून जे असते त्या योगा-योगास जर भगवंताचे अधिष्ठान, अग्नीची कृपा म्हणावयाचे, तर अलेक्झांडरच्या अलौकिक चरित्रात ते दैव त्याच्याच बाजूने तितके वेळा कसे अनुकूल झाले की, आर्यांतही म्हण पडावी, 'त्याचे दैवच शिकंदर'... पौरसापेक्षा चंद्रगुप्त हा काही यज्ञाचा अधिक अेकनिष्ठ भक्त थोडाच होता ? अुलट तो यज्ञत्यागी, निरग्नी जैन मतास अवलंबिता झाला होता असेही दिसते. अत्यंत विस्तृत, प्रबल नी स्पृहणीय असे आर्यांचे अैतिहासिक साम्राज्य होते अशोकाचे–अेका त्यक्तयज्ञ, निरग्नी, वेदबाह्य बुद्धवीराचे. हे तर नुसते यज्ञत्यक्त होते, पण यज्ञध्वंसक हूणांनी नी मुसलमानांनी भारतादी आर्यावर जे जयामागून जय मिळविले ते कसे ?... दैव म्हणजे जर भगवंताचे अधिष्ठान असेल तर तो भगवंत यज्ञ-ध्वंसकास कसा मिळाला ?... अहो, जो गोभक्षक, यज्ञ-ध्वंसक, ब्रह्महत्यारी, देवशत्रू, भगवद्द्रोही–त्यास यश आले ते जर भगवंताच्या अधिष्ठानामुळे असेल तर तसल्या त्या अभद्र भगवानाला प्रसादविण्याचा खरा मार्ग हा मूर्तिपूजक हिंदुधर्म नी यज्ञपूजा नसून तो मूर्तिभंजक यज्ञध्वंसक मुसलमानी धर्मच होय असे म्हणावे लागेल."[1]

'अग्निपूजेने यश, वैभव, संपत्ती, साम्राज्य लाभते या विधानाचा परामर्श सावरकरांनी अशाच कोटिक्रमांनी घेतला आहे. ते सरळ सरळ विचारतात– 'अग्नि-पूजक पारसिक व आम्ही भारतीय दोघेच जगाचे पददलित का? आणि निरग्नी व अप्पलपोटे असे सारे जग राज्यपदाधिष्ठित का?[2] युरोप-अमेरिकेसारख्या यज्ञध्वंसी राष्ट्रांत दुष्काळाच्या नावाचाच दुष्काळ, तर यज्ञपूजक भारतात दुष्काळात मृत्यु-मुखी पडणाऱ्या लक्षावधी मनुष्यांचे प्रमाण सर्वांत अधिक का ?[3] प्राचीन संस्कृतीचे स्मृतिचिन्ह म्हणून यज्ञसंस्था रक्षिणेच तर नृयज्ञ, मांसाशन, द्यूत खेळणे, राजपत्नी पणास लावणे अित्यादी गोष्टींचे रक्षण करावयाचे काय ?[4] तूप जाळल्याने वातावरण निरोगी होते हेच जरी यज्ञाचे मुख्य समर्थन असले, तरी असल्या सोप्या गोष्टीसाठी यज्ञीय कर्मकांडाचा हा अवाढव्य नी किचकट व्याप कशास हवा होता ? तेवढाच हेतू असेल तर चुली पेटतातच आहेत की, त्यातच बुटकुली भरून तूप ओतले की, गृहशुद्धी नी म्युनिसिपल झाडूवाले जेव्हा डांबर-प्रभृती

---

१. सा. सा. भाग १ – पृ. ४३–४४. २. सा. सा. भाग १ – पृ. ४१.
३. सा. सा. भाग १– पृ. ४९. ४. सा. सा. भाग १ – पृ. ५१.

चौकांतून जाळतात तेव्हा त्यांतच त्यांना तपेली तपेली तूपही जाळण्यास सांगितले की, नगरशुद्धी सहजासहजी होत राहती. . . . . तूप जाळण्याने रोग हटतात हे खरे घरले तरी ते फार तर तूप जाळण्याचे समर्थन करील.. . . .या यज्ञाच्या अवाढव्य कर्मकांडाचे नव्हे.[1] . . . ही यज्ञीया आर्यभूमी हिवताप, महामारी, प्लेग, देवीप्रभृती झाडून साऱ्या रोगांच्या प्रात्यक्षिक अभ्यासासाठी राखून ठेविलेले जगातील पहिल्या प्रतीचे संग्रहालय वनलेली आहे आणि यज्ञात पळीभरदेखील तूप गेल्या हजार वर्षांत न जाळणाऱ्या त्या यज्ञद्वेष्टया अनार्य युरोप-अमेरिकादी राष्ट्रांत आरोग्य नी आयुर्मान अतुलनीय अुत्कर्ष पावत आहे. हे काय यज्ञात तूप जाळणे हे आरोग्याचे अत्युत्कृष्ट, अपरिहार्य नी दिव्य साधन आहे असे सिद्ध करते ? "[2]

देवभोळेपणाचा, धर्मभोळेपणाचा सावरकरांना वाटणारा तिटकारा कधी कधी अुपहासयुक्त कोटिक्रमांनी प्रकट होतो. देवाला वळी देण्याच्या प्रथेबद्दल लिहिताना सावरकरांनी अगदी अुघडपणे म्हटले आहे की, हा धर्मभोळेपणाच देवाच्या माथी भयंकर लाचखाअूपणा मारण्यास सोडत नाही.[3] 'भूतकाळात मुसलमान धर्मभोळेपणामुळे विजयी झाले' या विधानाला सावरकर लगेच अुत्तर देतात की, जे, मुसलमानांपेक्षा असंघटित नी धर्मभोळे होते, त्यांच्यावर मुसलमानांनी विजय मिळविले. पण त्यांच्यापेक्षा अैहिक दृष्टया अधिक संघटित अशा समाजाशी गाठ पडताच मुसलमानांना त्यांच्यावर विजय मिळविता आला नाही.[4] केडगावच्या नारायण महाराजांना 'अनंतकोटिब्रह्मांडनायक' अशी पदवी दिल्याचे अैकताच सावरकर उद्गारतात, 'तर मग तो अिंग्रज किती अनंतकोटि-ब्रह्मांडनायक ?'[5] कलियुगात मानवजातीवर ओढवणाऱ्या संकटांची धर्मभोळी भीती ज्यांना बसली आहे. त्यांना सावरकर विचारतात, " ह्या कलियुगाची ब्याद सर्व मनुष्यजातीवर आणि सर्व पृथ्वीवरच कोसळणार म्हणून सांगितले आहे ना ? मग अमेरिकेत त्याच्या अगदी अुलट स्थिती का होत आहे ? त्यांच्या माणसांची छाती, अुंची, प्रतिभा प्रति-पिढी वाढत आहे. त्यांची अेक गाय आमच्या दहा दहा गाअींअितके दूध देत आहे शेती, नारळाअेवढे बटाटे, बियांवाचून द्राक्षे आणि खंडाखंडास पुरून अुरेल अितके धान्य निपजवीत आहे, आणि माणूस अिच्छील तेव्हा आणि अिच्छील तेथे अिंद्र वनून पाअूस पाडण्याची कला आटोक्यात आणीत आहे.'[6] 'वड-पिंपळ तोडणे हे पाप आहे. ती झाडे जागृत दैवते आहेत, त्यांवर महापुरुष राहतात' या भावडट धर्मभावना

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ३१–३२. २. सा. सा. भाग २ – पृ. ३३. ३. सा. सा. भाग २–पृ. ४७. ४. जाति. नि. पृ. ३३४–३५. ५. सा. सा. भाग १ – पृ. १२०. ६. जाति. नि. पृ. ६१.

अुराशी वाळगणाऱ्यांना सावरकर सांगतात, "ते झाड दैवत हिंदूना भेडसावते पण मुसलमान-ख्रिश्चनांना भेडसावीत नाही. . . . .म्हणजे वड-पिंपळातले हे हिंदू दैवत अितके भ्याड आहे की, ते मुसलमान-अिंग्रजांपुढे शेपूट घालते. भित्यापाठीच काय तो लागणारा तो ब्रह्मराक्षस. त्याला भजणाऱ्यांच्या मानगुटीस बसणारा आणि भंगणाऱ्याचे पाय चाटणारा भ्याड. वायकोचा बाजीराव आणि चावडीचा मारखाअू असा हा आमचा वड-पिंपळ देव आहे असे मानणे म्हणजे आपल्या देवाची निवळ टवाळी करणे नव्हे तर काय ?"[1]

या धर्मभोळेपणातूनच व्रतविधींचा जन्म झाला असल्याने सावरकरांनी या व्रतांचा फोलपणा, त्यांतील हास्यास्पदता अनेक कोटिक्रमांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. सूर्य, शनी, मंगळ प्रभृती ग्रहांची पूजा-प्रार्थना करणाऱ्यांना अुद्देशून सावरकर विचारतात, "ह्यांची आज शतकोशतके प्रार्थना करून आपल्या राष्ट्राने काय मिळविले ? पारतंत्र्य, दु:ख, दारिद्र्य, अपमान, अवहेलना; आणि या साऱ्या नवग्रहांना दमडीचा धूप न जाळणाऱ्या त्या युरोपकडे पाहा. त्यांना शनी पीडित नाही, मंगळ अमंगळ ठरत नाही. त्यांची भरभराट, आम्हां ग्रहपूजकांच्या छातीवर त्यांच्या वर्चस्वाची टाच. आम्हांस त्या नवग्रहांची पूजा करण्याची अनुज्ञादेखील देण्याची शक्ती त्यांच्यात."[2] युगानुयुगे सूर्याला अर्घ्य देणाऱ्या आम्हा हिंदूंच्या स्थितीचे वर्णन सावरकरांनी कशा विरोधाने केले आहे पाहा :– 'त्याच आम्हां हिंदूंच्या साम्राज्यावर आज शतकोशतके त्या सूर्याने पाठ फिरविली आहे. आमच्या आशेच्या साम्राज्यावर तो मुळीच अुगवत नाही. पण कधीच मावळत नाही कोणाच्या साम्राज्यावर ? ज्यांनी त्याला युगानुयुगातून अेकदाही अर्घ्य दिलेले नाहीत; गायत्रीचे जे घातक, सूर्यनमस्कारावाचून ज्यांचे स्नायू पोलादी, मनगटे वज्रमुठी, भर सूर्यग्रहणात जे जेवणारे, सूर्यवंशाचे अुच्छेदक, राहूचे नी केतूचे वेदबाह्य साथीदार त्यांच्याच साम्राज्यावर आज तो सूर्य मावळत नाही."[3] आमच्या प्रसूतिशास्त्रातील धर्माचार कसा हास्यास्पद आहे, हे अेका कोटिक्रमाने दर्शविताना सावरकर लिहितात, "पण सटवी-जिवतींची अितकी पत्रास राखणाऱ्या हिंदुस्थानातच बालमृत्यूची भयंकर साथ सारखी चालू आहे; आणि त्या सटवीला कधीही धूप न जाळणाऱ्या, शांतिपाठाचा पाठ कधीही न मांडणाऱ्या आणि सुवेराचा विटाळ घरभर कालविणाऱ्या पण प्रकाश, वायू, शल्यौषधीची काळजी घेणाऱ्या त्या युरोपातील बाळबाळंतिणींच्या वाटेस जाण्याची सटवीच्या बापाचीही छाती होत नाही."[4] ग्रहणांतील हिंदूंच्या धार्मिक व्रतांचे असेच

---

१. क्ष–किरणे पृ. १४४–१४५. २. सा. सा. भाग २ – पृ. ८९. ३. सा. सा. भाग ४ – पृ. ६८–६९. ४. सा. सा. भाग २ – पृ. १४.

विडंवन सावरकरांनी केले आहे. ग्रहणात डबे, बाटल्या, वरण्यांवर तुळशीपत्रे ठेवण्याच्या धार्मिक विधीचे वर्णन करून सावरकरांनी मिस्किलपणे विचारले आहे : 'जर डब्यावरणीवर, शालीपैठणीवर तुळशीपत्रे ठेवल्याने ग्रहणाचे संकट टळते, तर त्या घरावरच तुळशीपत्राचा बुचका टाकून मोकळे का होअू नये ? . . .ग्रहणात जेवल्याने हिंदू लोकांचेच आरोग्य तेवढे विघडते असे दिसते. कारण युरोप, अमेरिका, चीन, जपान सारे जग ग्रहणातून जेवतही असते आणि जगतही असते.'[1] पोटावर सरपटत जाण्याच्या व्रताची अशीच थट्टा करीत. सावरकरांनी म्हटले आहे, " जर देव हा मनुष्याचा धाता, माता, हितकर्ता असेल, तर त्यास त्याच्या प्राणिसृष्टीतील अत्यंत लाडका मनुष्य, हा नर. त्या नारायणाचे श्रद्धेच्याच शपथेप्रमाणे असलेले परमव्यक्त प्रतीक, त्या ह्या माणसास किडा झालेले पाहून, पोटावर सरपटत चाललेला पाहून कृतकृत्यता वाटेल, की त्या त्याच्या पुत्राची, त्या माणसाची आकाशात अुंच अुंच दिग्विजय करीत जाणारी भव्य दिव्य प्रगती पाहून वाटेल ?"[2]

धर्मग्रंथ हे अीश्वरकृत आहेत, त्रिकालावाधित आहेत या विधानाला अुत्तर देताना सावरकर कोटिक्रम करून असे विचारतात की, त्या धर्मग्रंथांत वर्णिल्या-प्रमाणे जर देवदेवतांना देखील ते राजे, त्या राजधान्या, ती राष्ट्रे रक्षिणे अितके महत्त्वाचे वाटत होते की, त्यासाठी अीश्वरीय सूक्ते, आयने नी देवदूतांची सैन्ये त्यांनी घाडावी, तर मग त्यांच्यावाचूनही जग चालू शकेल असे त्याच अीश्वराला पुढे कसे वाटले ? आज ती बाबिलोनच्या नेबूचदने झारची राजधानी कुठे आहे ? ते अिस्त्राअिलांचे सुवर्णमंदिर, ते असीरियन, ते खाल्डियन, ते पारसिक, त्या रागीट मोलाक देवतेची ती देवळे, ते लोकचे लोक कुठे गेले ? 'रघुपतेः क्व गतोत्तरकोसला ? यदुपतेः क्व गता मथुरापुरी ?'[3]

मांसाशनाला विरोध करणाऱ्या आक्षेपकांना अनेक पुरावे देअून व कोटि-क्रमाने सावरकर पुढील अुत्तर देतात : " ब्राह्मणांसुद्धा सर्व वर्ण मांस नी मत्स्य पूर्वी खात असत. त्यात धर्माविरुद्ध आचरण समजले जात नसे. . .अितकेच नव्हे तर यज्ञ, श्राद्धप्रभृती हव्यकव्यप्रसंगी तर मांसाचे नी मत्स्याचे भोजन हे ब्राह्मणां-नीही केलेच पाहिजे असा धर्म होता. . . केवळ मनुस्मृतीत आहे तोच धर्म माना-वयाचा असेल तर मांस नी मासे खाण्यास अगदी जाति-बहिष्कार्य असा महान अधर्म समजणारे आजचे ब्राह्मणच सनातन धर्माच्या अगदी अुलट वागणारे पाखंड लोक ठरत असून मांस नी मासे खाणारे सारस्वत प्रभृती ब्राह्मणच खरे पंक्तिपावन

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. ५८–५९. २. क्ष–किरणे पृ. ५. ३. सा. सा. भाग २ – पृ.

सनातनी ब्राह्मण ठरतात.[१] . . . जर मनूचा प्रत्येक शब्द त्रिकालाबाधित धर्म मानावयाचा असेल तर या प्रकरणी तरी सुधारकांहून ब्राह्मण सनातनीच अत्यंत धर्मध्वंसी नी अपराधी ठरणारे आहेत."[२]

गोभक्तीचा अुच्चांक गाठणाऱ्या गोदासांना सावरकरांनी बुद्धिवादाने काय अुत्तरे दिली याचा विचार आपण पूर्वी केलाच आहे. पण कधी कधी बिनतोड कोटिक्रमांनी सावरकर या विषयावरील आपले विचार व्यक्त करतात. 'पंचगव्याने सर्व रोग प्रतिबंध होतो' असा दावा सांगणाऱ्या गोदासांना सावरकर लगेच फटकारतात, "जर गोमूत्र अशी संजीवनी असती, तर त्याच्या हौदात शतकोशतके डुंबत राहणारे आम्ही आज प्लेग–महामारीचे राखीव रान कसे झालो आणि सात पिढ्यांत त्या पशूच्या शेणामुताचा थेंबही तोंडात न घालणारे युरोपियन असे लालबुंद, गलेलठ्ठ, निकोप नी निरोगी कसे?"[३] 'गायीच्या शेणात रोगपरिहारक नी पौष्टिक गुण आहेत' अशी भाषा वापरणाऱ्या गोभक्तांना सावरकर त्वरित विचारतात, "श्रावणीप्रभृती प्रसंगी जी आपण मंडळी जमतो ती काय त्या रोगांनी सारीच्या सारी पछाडलेली असते? आणि युरोप-अमेरिकेत हे पौष्टिक शेण पिढ्यान्पिढ्या कोणीही खाल्ले नाही म्हणून तिकडचे स्त्रीपुरुष आज अगदी क्षयाने झिजलेले असे पाप्याचे पितर झाले आहेत नाही?"[४]

कामकोटीच्या शंकराचार्यांनी 'पक्व फळे व गायीचे दूध सर्व मनुष्यांनी सेवावे, म्हणजे सत्त्वगुण वाढेल आणि सत्त्वगुण वाढताच युद्ध करण्याची मनुष्याची प्रवृत्तीच नाहीशी होअील' असा युक्तिवादात्मक अुपदेश करताच सावरकरांनी त्यांना प्रतियुक्तिवादाने पुढील अुत्तर दिले : "वैल अगदी पहिल्या दिवसापासून निव्वळ गायीच्याच दुग्धावर वाढत असताही मोठा मारकुटा प्राणी म्हणून वेदांत देखील संकीर्तलेला आहे. वरे, गायीच्या दुधाचा सात्त्विक परिणाम वैलावर जरी न झाला तरी माणसावर होअीलच असे म्हणावे तर अगदी गायीच्या दूध-दही-लोणी-तुपावरच परिपुष्ट झालेले गोकुळीचे भगवान बालकृष्णही मारकुटेपणात राक्षसांचेही बालवयातच काळ झालेले होते."[५]

नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रात गोसेवक श्री. सरंजामे यांनी लावलेल्या अेका 'अद्भुत शोधा'चा परामर्शही सावरकरांनी अेका तिखट कोटिक्रमाने घेतला आहे. श्री. सरंजामे यांनी लिहिले आहे : 'लोकमान्यांसारखा सुपुत्र होण्यासाठीसुद्धा गोसेवेचे कारण मुळाशी आहे. . . . लोकमान्यांसारख्या अलौकिक

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. १२५–१२६. २. सा. सा. भाग ४ – पृ. १२७. ३. सा. सा. भाग १ – पृ. ८२–८३. ४. क्ष–किरणे पृ. २३. ५. क्ष–किरणे पृ. ६०; ६२.

पुरुषाला जन्म देणाऱ्या त्या थोर मातेने नित्य नियम म्हणून पंचगव्य प्राशन केले, ते गोमाता व देवता ह्याच भावनेने केले असले पाहिजे हे अुघड आहे ' या विधानाला सावरकरांनी लगेच प्रतिटोला दिला– ' सरंजाम्यांसारख्या गोमयानंदांना ते पंचगव्यप्राशनाचे फळ वाटते. लवणानंदासारख्या मीठ खाण्याच्या अभिमान्यांना मीठ खाल्ले म्हणून लोकमान्यांसारखा पुत्र झाला असे त्याच न्यायाने का वाटू नये ? वॉशिंग्टन, नेपोलियन, लेनिन, डार्विन यांच्या मातांपैकी कित्येक प्रायश: गोमांस सेवीत नि कित्येक प्रसंगी मद्यही पीत. मग गोमांस खाल्ल्याने अलौकिक पुत्र जन्मतात, असेही ' त्रिकालज्ञानी ' नियम का बांधता येअू नयेत ?"[1]

भूतदया, शुद्धी, रोटीबंदी, अनुवंश, चातुर्वर्ण्य व जातिभेद अित्यादी विषयांवरील सावरकरांचा कोटिक्रम त्यांच्या बुद्धिवादाची व विचारांतील सूक्ष्मतेची साक्ष देतो.

' भूतदया की भूतबाधा ' या विषयाच्या विवेचनात सावरकर कोटिक्रमाने विचारतात, " जी मनुष्यासच घातक, ती दया, ' दया सर्वेषु भूतेषु ' होअील तरी कशी ? कारण सर्व भूतांत मनुष्यही आलाच."[2]

शुद्धीकरणाच्या विरोधकांना ते प्रतिप्रश्न विचारतात, " शुद्धी करणे हे जर द्वेष फैलावणे असेल तर भ्रष्टीकरण हे द्वेष फैलावणे का ठरू नये ? किंबहुना मुल्ला-मिशनरी बाटविण्याची चळवळ आधी करतात म्हणूनच आणि मगच काय ते शुद्धी करणे आम्हांस भाग पडते."[3]

रोटीबंदीची बेडी तोडण्यासाठी ते असा कोटिक्रम करतात की, खाणेपिणे हा वैद्यकशास्त्राचा प्रश्न. वैद्यकदृष्टीने जे आरोग्य देते ते, ते वैद्यक दृष्टीने भोज्यान्न अशा कोणत्याही मनुष्यावरोवर खाण्यास व पिण्यास हरकत नाही, त्याने जात जात नाही. धर्म बुडत नाही. जात ही रक्तबीजात असते, भाताच्या तपेल्यात नव्हे. धर्माचे स्थान हृदय, पोट नव्हे."[4]

' तिसऱ्या, चवथ्या पिढीत पितृगुण अुतरतात ' या अनुवंशाच्या तत्त्वाच्या पुरस्कर्त्यांना सावरकर सांगतात, ' पण तुकारामांना आज १०।२० पिढ्या होअून गेल्या पण त्या वंशात अेकही तुकाराम झाला नाही. किंवा अनुवंशाच्या गुणाची कीव करून पांडुरंगाने त्याच्या मुलां-नातवांसाठी पुन्हा आजवर अेकदाही विमान धाडले नाही. गेल्या सात पिढ्यांत रामदासाच्या घरात पुन्हा दुसरा रामदास नाही, न बोनापार्टाच्या घरात बोनापार्ट. "[5]

---

१. क्ष–किरणे पृ. १०९, ११०, १११. २. क्ष–किरणे पृ. १२६. ३. रत्ना. हिं. अिति. पृ. ३२–३३. ४. जाति. नि. पृ. ९४. ५. जाति. नि. पृ. ६०.

पोथीजात जातिभेदोच्छेदनाचा संकल्पच सावरकरांनी सोडला होता. तेव्हा जातिभेदाला कवटाळणाऱ्या प्रत्येक विषादाचे निर्मूलन करण्याचे कार्य सावरकरांनी हाती घेतले होते. या दृष्टीने पुढील काही कोटिक्रम पाहण्यासारखे आहेत. (१) अनुलोम विवाह व पितृसावर्ण्य ह्या जोड निर्बंधामुळे चातुर्वर्ण्याचे रक्त वरपासून खालपर्यंत प्रत्येकाच्या नसानसांतून सतत प्रवाहिले जाऊन सर्व राष्ट्र रक्तसंबंधाने आप्तपणे अेकजीव झालेले होते, अेकहृदय झालेले होते ... तेव्हा आजचे चातुर्वर्णीय हिंदुराष्ट्र अेका रक्तबीजाचीच संमिश्र संतती आहे.[१] (२) निसर्ग हा आमच्या ह्या जातिभेदातील पोथीजात जातींना जात म्हणून मानीतच नाही.[२] (३) 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' म्हणजे मी चातुर्वर्ण्य संस्था अुत्पन्न केली. त्यात गुणधर्माप्रमाणे लोकांस जन्म देतो आणि तोही वंशपरंपरा देत राहतो, या अर्थाचा मागमूसही या श्लोकात नाही... (तेव्हा) पाचवा वर्ण म्हणून कोणी राहातच नाही. मग हिन्दुसमाजात चातुर्वर्ण्य तेवढे आम्ही पाळू, प्रस्थापू असे म्हणणारे माझे सनातन धर्माभिमानी बंधू सात कोटी अस्पृश्य हिंदूंना अेकदम शूद्राचे तरी अधिकार देअून टाकण्यास सिद्ध आहेत का?[३] (जातिभेद निर्मिती) हा काही मूठभर ब्राह्मणांचा गुप्त कट नव्हे... केवळ ब्राह्मणांचीच ही कल्पती असती तर श्रीराम आणि श्रीकृष्ण हे तर ब्राह्मण नव्हते ना? मग त्यांनी तेच चातुर्वर्ण्य का अुचलून धरले? जर म्हणाल की, क्षत्रियादिक वर्ण बिचारे भोळसर म्हणून सहज ब्राह्मणी काव्यात फसले, तर श्रीकृष्ण काय-भोळा होता? का समुद्रगुप्त भोळा होता? का शिवाजी भोळा होता?[४] (५) कोणास अशी भीती वाटलीच की हा पोथीजात जातिभेद सोडला तर समाजाची भयंकर अवनती तर होणार नाही ना? त्यांनी मनात अितकाच विवेक करावा की ही पोथीजात जातिभेदाची व्याद पृथ्वीवरील अितर कोणत्याही धुरंधर राष्ट्रात रूढ नाही. जपान, रशिया, अिराण, तुर्कस्थान, अिंग्लंड, अमेरिका जर्मनी या सर्वांचे या जातिभेदावाचून काही अडले आहे का?[५]

हिंदूंतील जातिभेदविषयक विचारांचा अनेक कोटिक्रमांनी अुच्छेद करण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला खरा; पण त्या कणखर कोटिक्रमाला आपुलकीची मूठ होती, बैठक होती. परंतु पाश्चात्त्यांनी या जातिभेदावर टीका-प्रहार करताच स्वाभिमानी सावरकर कोटिक्रमांच्या आपल्या तीक्ष्ण खड्गाने पाश्चात्त्यांवर प्रतिहल्ला चढवीत त्यांना विचारतात, "अिंग्लिश लोक खरोखरीच अेकजाती आहेत का? जगात फ्रेंच रक्त, अिंग्रज रक्त, चिनी रक्त, अशा तऱ्हेची काही वस्तू आहे काय? अितर लोक परकीयांचे रक्त मुक्तपणाने आपल्यात मिसळून

---

१. जाति. नि. पृ. ११७, ११९. २. जाति. नि. पृ. ४७. ३. जाति. नि. पृ. १७. ४. जाति. नि. पृ. २५–२६. ५. जाति. नि. पृ. ७०.

देतात तर हिंदूंना काय हरकत आहे ? . . . त्या जातिभेदाने स्वकीय रक्तापेक्षा परकीय रक्ताचीच भेसळ आमच्यामध्ये होअू न देण्याला अधिक मदत केली. "[1]

हिंदूंच्या एकराष्ट्रीयत्वावद्दल शंका अुत्पन्न करून 'हिंदुहिंदूंत लढाया झाल्या त्याचे काय ?' असा प्रश्न विचारणाऱ्या पाश्चात्त्यांना सावरकर प्रति-प्रश्नाने विचारतात, "मग अिंग्लिशांमध्ये ज्या 'गुलाबांच्या लढाया' झाल्या त्याचे काय ? अिटली, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका येथे जे संस्थाना-संस्थानांचे, पंथापंथांचे, वर्गावर्गांचे आपापसात प्रसंगी परक्याचे साहाय्य घेअूनही जे झगडे झाले त्यांचे काय ? आणि तरीही ते सर्वजण अेकराष्ट्र आहेत ना ?[2] .

स्वातंत्र्यनिष्ठा :

स्वातंत्र्यनिष्ठा ही सावरकरांच्या व्यक्तित्वातील अेक अत्यंत प्रभावी निष्ठा असल्याचे आपण पूर्वी पाहिलेच आहे. त्यांच्या निबंधांतून मात्र ही निष्ठा व्यक्त होताना बाह्य परिस्थितीची अनेक बंधने तीवर पडली होती. सावरकरांचे निबंधलेखन मुख्यतः त्यांच्या रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात झालेले आहे. त्यामुळे त्या स्थानबद्धतेच्या कडक नजरेतून सहजपणे सुटेल अितक्याच बेताने त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा त्यांच्या निबंधांतून प्रकट झालेली आहे. आपली ही कुचंबणा व्यक्त करताना सावरकरांनी अेके ठिकाणी लिहिले आहे : "जातिभेदाच्या आजच्या स्वरूपाचे परिणाम विशद करू जाताच आमच्या राजकीय परिस्थितीचा विचार क्रमप्राप्तच होणार आणि प्रचलित राजकारण-संन्यासाच्या शृंखलेने जखडलेली आमची लेखणी त्यास तर शिवूही शकत नाही."[3] पण अशी कुचंबणा जरी होत असली तरी 'हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य आपणांस मिळवावयाचे आहे' हे सांगण्यास ते विसरत नाहीत.[4] मातृभूच्या संग्रामात सहभागी होण्याचा व स्वातंत्र्यासाठी झुंजण्याचा अपराध केल्यावद्दल सावरकरांना अभिमान वाटतो.[5] रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी केलेला स्वदेशीचा पुरस्कार हा त्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेतूनच जन्मलेला आहे. परकीय मालावर बहिष्कार हा परकीय सरकारवर बहिष्कार घालण्यात परिणत होतो असे सावरकरांचे सूत्र होते. रत्नागिरीच्या वास्तव्यात त्यांनी स्वदेशी वस्तूंच्या प्रसारासाठी अनेक प्रयत्न केले. दुकानात व शाळेत स्वदेशी वस्तू ठेविल्या. स्वदेशी प्रचारार्थ मेळा काढला. 'स्वदेशी व बहिष्कार' या विषयावर व्याख्याने दिली. स्वदेशी

---

१. हिंदुत्व पृ. ७६. २. हिंदुत्व पृ. ८९–९०. ३. जाति. नि. पृ. २.
४. जाति. नि. पृ. १०. ५. हिं. द. पृ. २५१.

साखरेच्या महागाईचे समर्थन केले. व्यापाऱ्यांच्या स्वतंत्र सभा घेतल्या. हिंदु-सभेने स्वदेशी चळवळ हाती घ्यावी असा आग्रह धरला.

'प्रस्तुतच्या जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' ही प्रदीर्घ लेखमाला लिहितानाही हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य मिळविणे व ते टिकवणे याचाच विचार त्यांच्या मनात प्रबळ होता.[१]

जीवनातील श्रेष्ठ मूल्ये : राष्ट्रहित

सावरकरांनी आपल्या व्यक्तित्वानुसार काही मूल्यांना आपल्या जीवनात अत्यंत श्रेष्ठ असे स्थान दिलेले आहे. ज्या ज्या वेळी त्यांच्या मनात वैचारिक संघर्ष अुत्पन्न होतो, त्या त्या वेळी ही जीवनमूल्यंच त्यांना मार्गदर्शक ठरतात. राष्ट्र-हित, लोकहित किंवा मानवहित हीच ती जीवनमूल्ये होत. कोणत्याही प्रश्नाचा किंवा समस्येचा विचार या जीवनमूल्यांच्या संदर्भातच सावरकर करतात.

राष्ट्रहित हे सावरकरांनी सदोदित श्रेष्ठ मानले आहे. राष्ट्रहिताचा विचार करताना हिंदूंनी आपला मानबिंदू मानलेल्या गाअीलाही ते कनिष्ठ लेखतात. गोहत्येपेक्षा स्वराष्ट्रहत्या हे सहस्त्रपटींनी महत्तर असे पाप त्यांना वाटते.[२] गाय ही राष्ट्रहानीस कारणीभूत होत आहे असे पाहताच गोरक्षण हेच त्याज्य, पाप, निंद्य होय असे ते मानतात.[३] युद्धात आवश्यक तेव्हा गाअी खाणे हिंदुराष्ट्रास अुपयुक्त होय असे धाडसी विधान ते करतात.[४] देवलसी प्रवृत्तीचे परिणाम राष्ट्रहितघातक होतात म्हणून त्या प्रवृत्तीचा तिरस्कार ते करतात.[५] पशू वा झाडे जेव्हा राष्ट्रहितघातक होतात तेव्हा ती रक्षणीय ठरत नाहीत, असे सडेतोड मत याच राष्ट्रहिताच्या विचारातून ते व्यक्त करतात.[६]

रूढी आणि जातिभेद यांचा विचार करतानाही राष्ट्रहित हीच कसोटी ते लावतात. रोटीबंदी, सिंधुबंदी, स्पर्शबंदी व शुद्धिबंदी या दुष्ट रूढी हिंदुराष्ट्रास अधोगतीस नेणाऱ्या आहेत म्हणूनच त्यांचा नाश करणे सावरकरांना कर्तव्य वाटते.[७] जन्मजात जातिभेद राष्ट्रीय दृष्टया अनिष्टतम असल्याने तो अुच्छेदा-वयास पाहिजे असे त्यांचे स्पष्ट अभिमत आहे.[८] गुणजात जातिभेदाचा अुद्धार व गुणनिष्ठ व्यवसाय स्वातंत्र्याचा पुरस्कार करणे त्यांना अिष्ट वाटते याचे कारणही राष्ट्रहित हेच होय.[९]

---

१. जाति. नि. पृ. १०. २. सा. सा. भाग १ – पृ. ६४. ३. सा. सा. भाग १– पृ. ६४. ४. सा. सा. भाग १–पृ. ६४. ५. सा. सा. भाग १ – पृ. ६५. ६. सा. सा. भाग १ – पृ. १२०. ७. सा. सा. भाग २ – पृ. १५. ८. जाति. नि. पृ. १५६. ९. जाति. नि. पृ. १६०–१६२.

प्रतिपक्षावर वा व्यक्तीवर टीका करतानाही राष्ट्रहित-भावनेने प्रेरित होअूनच ते टीका करतात. म. गांधींवर टीका करताना सावरकरांनी लिहिले आहे : "राष्ट्रीय हिताचाच अगदी घात होतो तेथेच काय ते आडवे येणे प्राप्त होते. परंतु 'परैस्तु विग्रहे प्राप्ते वयं पंचाधिकम् शतम्' हेच आमचे ब्रीदवाक्य असले पाहिजे, आमचे आहे."[1]

पुरातनी प्रवृत्तीचा त्याग करून ज्या अद्यतनी प्रवृत्तीचा स्वीकार करण्याचा आग्रह सावरकर धरतात, त्यामागे ही राष्ट्रहिताचीच भावना आहे.[2] शस्त्राधार व राष्ट्रहित यांत राष्ट्रहितालाच प्राधान्य द्यावे हे सांगताना सावरकर लिहितात, "जे आजला राष्ट्रीय हितास अुपयुक्त ठरेल ते अेकदा ठरविल्यानंतर त्या जुन्या शास्त्रांचा आधार नसला तरी तेच आचरिले पाहिजे."[3]

लोकहित :

आत्मचरित्रात प्रकट झालेली लोकहिताची भावना सावरकर आपल्या-निबंधांतूनही व्यक्त करतात. 'न जनयेद् बुद्धिभेदम्' या गीतेतील श्लोकाचा अर्थ स्पष्ट करताना सावरकरांनी अनेक ठिकाणी आपली लोकहिताची भूमिका ठामपणे मांडली आहे. ते लिहितात, "आमच्यापुरते तरी लोकप्रियता की लोकहित असा व्यामोह मनास पुनःपुनः पडू नये यास्तव आमच्याच अेका अनुष्टुपात ग्रथिलेले हे सूत्र आम्ही आमच्या मनास वारंवार अुपदेशीत राहतो की, 'वरं जनहितं ध्येयं केवला न जनस्तुतिः।'[4] रत्नागिरीस विद्यार्थ्यांना शाळेतून सरमिसळ बसविण्याच्या आपल्या प्रयत्नांचा पुरस्कार करताना सावरकरांनी 'लोककल्याण हेच ध्येय, केवळ लोकप्रियता नव्हे' या शीर्षकाखाली अेक लेख प्रसिद्ध केला होता आणि त्या लेखाच्या प्रारंभी 'वरं जनहितं ध्येयं' याच ध्येयवाक्याचा पुनरुच्चार त्यांनी केला होता.[5] आपल्या अनेक निबंधांतून, व्याख्यानांतून वादविवादांतून कोणत्याही सुधारणेची लोकहित हीच महत्त्वाची कसोटी त्यांनी सांगितली आहे. 'सुधारक सावरकर' या मुद्याचे विवेचन करताना याच प्रकरणात अन्यत्र सावरकरांची वरील भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

मानवतावाद-मानवहित

हिंदुत्ववादी सावरकर कधीकधी विशाल, व्यापक मानव्याची स्वप्ने पाहताना दिसतात. 'हिंदुत्व' या प्रबंधात हिंदुराष्ट्र व हिंदुजाती यांना दृढीभूत

---

१. श्रद्धानंद २३-८-२८. २. सा. सा. भाग २ – पृ. ४१. ३. सा. सा. भाग २– पृ. २८. ४. सा. सा. भाग २ – पृ. ९. ५. रत्ना. हिं. अिति. पृ. १५६.

करणाऱ्या अनेक बंधांचा विचार केल्यानंतर सावरकरांनी मानवतावादाकडे झेप घेतली आहे आणि लिहिले आहे : "ज्या वेळी हिंदू मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो, त्या वेळेला तो शंकराचार्यांप्रमाणे वाराणसी मेदिनी म्हणून गावयाला लागतो व श्रीतुकाराम महाराजांप्रमाणे 'आमुचा स्वदेश । भुवनत्रयांमध्ये वास ।' असे गर्जून अुठतो."[1] सात स्वदेशी बेडया तोडून टाकण्याचा आदेश देताना सावरकरांनी पुन्हा हेच सांगितले आहे की, मानवधर्म हीच हिंदुधर्माची परमसीमा नी परिपूर्णता होय.[2] हिंदूंच्या अेकजातीयत्वाचा विचार करताना सावरकरांना मानवजातीचा विसर पडत नाही आणि त्या मानवप्रेमातून ते लिहितात, "अेकंदरीत जर पाहिले तर सर्व जगामध्ये मनुष्य म्हटला की, त्याची अेकच जात असली पाहिजे व ती मानवजाती होय. आपण अेकाच रक्ताच्या संचरणाने जिवंत राहिलो आहोत– व ते रक्त म्हणजे मानवी रक्त. या व्यतिरिक्त जी अन्य भावना ती केवळ तात्पुरती, सोअीपुरती आणि फक्त सापेक्षत: सत्य आहे."[3]

ह्या हिंदुत्वातीत भूमिकेवर जेव्हा सावरकर आरोहण करतात, तेव्हा संकुचित जात्यभिमानाचे बंध त्यांना बांधू शकत नाहीत आणि मग प्रत्येक कृतीची, घटनेची, विचाराची अेकमेव कसोटी म्हणजे मानवहित हीच होय असे ते मानतात. म्हणूनच मनुष्यजातीच्या हितास जे आज अुपयुक्त ते ते बेखटक आचरण्याची प्रवृत्ती स्वीकारण्याचा संदेश ते देतात.[4] अितकेच नव्हे तर मनुष्यहिताच्या आचारालाच धर्माचाराची पदवी आणि श्रेष्ठता ते देतात.[5] मानवहित हीच कसोटी मानून सर्व गोष्टींचा विचार सावरकरांनी केला आहे याचे थोडक्यात संकलन पुढीलप्रमाणे करता येअील : "मनुष्यजातीच्या सामुदायिक हितार्थ जो अुपकारक तो सदगुण, अपकारक तो दुर्गुण.[6] वडपिंपळादी देव तोडून टाकणे हेच जेव्हा मनुष्यहितास आवश्यक तेव्हा तेही केले पाहिजे.[7] मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल ते चांगले, मनुष्यजातीच्या सुखाला प्रतिकूल ते वाअीट होय.[8] मनुष्यहितास अवश्य ती हिंसाच मनुष्यधर्म. मनुष्यहितास अनुकूल तितकीच भूतदया नी तितकीच अहिंसा श्रेयस्कर, अिष्ट, अुचित; मानवनीती ती अितकीच. अग्नीचा मनुष्यहितास जो अुपयोग करून घेता येतो तो करून घत राहणे हाच मार्ग. या वैज्ञानिक युगातील खरी ती प्रत्यक्ष फलदायी अग्निविद्या होय;[9] पशुहननाने मनुष्याचे अैहिक वा पारलौकिक हित साधत असेल तर

---

१. हिंदुत्व पृ. १३९. २. जाति. नि. पृ. ९५. ३. हिंदुत्व पृ. ८३. ४. क्ष–किरणे पृ. ११. ५. सा. सा. भाग १ – पृ. ३१. ६. सा. सा. भाग ४ पृ. ४४. ७. सा. सा. भाग ४–पृ. ८२. ८. सा. सा. भाग १–पृ. ९. ९. सा. सा. भाग १ पृ. ५४.

यथाप्रमाण अवश्य तितके पशू यज्ञात वळीं देणेच हित, प्राप्त, अतअेव धर्म्य होय.[१] केवळ माणुसकीसाठी तरी अस्पृश्यता-रूढीचे निर्दालन आम्हीं हिंदूंनी केले पाहिजे.[२] मनुष्यास गायीचा ज्यायोगे अधिकांत अधिक अुपयोग अैहिकदृष्टया देखील होअील असेच आपल्या राष्ट्राचे गोविषयक धोरण नी व्यवहार असला पाहिजे.[३] मनुष्य-जातीच्या कल्याणार्थच स्त्रियांनीं आपल्या लावण्याचा विनियोग करावा.[४] आपल्या हिंदुसंस्कृतीत जे जे अुत्तम, अुदात्त आणि अुन्नत आहे त्याचा त्याचा लाभ मानवी जातीच्या अुन्नतीकरता घडवून आंणावा.[५] मानव्याच्याही हितार्थ झुंज-ण्याची योग्यता नी वळ यावे यासाठी स्वराष्ट्रांचा पतितावस्थेतून अुद्धार व्हाव-यास हवा.[६]

सावरकरांचा हा मानवतावादी दृष्टिकोन येथे स्पष्टपणे प्रकट झाला असला तरी, श्री. भा. कृ. केळकर यांनी म्हटल्याप्रमाणे, सावरकर हे मानवतेचे अुद्गाते नाहीत, चाहते आहेत.[७] त्यांचे मानव्यप्रेम हे निरपेक्ष नसून सापेक्ष आहे. ते संताचे भूतदयाधिष्ठित मानवप्रेम नसून हिंदुराष्ट्रनिष्ठ मानवप्रेम आंहे. सावर-करांच्या सामर्थ्यवादी तत्त्वज्ञानाचा रंग या मानवप्रेमातही वेगळा अुठून दिसतो. विश्ववंधुत्वाच्या भावना नाकारण्यामागील कारणांचे स्पष्टीकरण करताना सावरकर लिहितात, "जोपर्यंत अुत्क्रांतितत्त्वाने घालून दिलेला कायदा 'चराणा-मन्नमचरा दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिण: । अहस्ताश्च सहस्तानां शूराणां चैव भीरव: । हा अतीव अप्रतिहार्यतेने व भयंकर प्रामुख्याने या जगात वावरत आहे व याचा अिन्कार सत्याच्या कायद्याने होअू शकत नाहीं, तोपर्यंत राष्ट्रीयत्वाच्या भावना विश्ववंधुत्वाचे निशाण फडकविण्याचे नाकारीतच राहतील."[८] स्वसंरक्षणरहित व विश्वरत अशा हिंदुस्थानाबद्दल अितर राष्ट्रांची अभिलाषाच जागृत करणारे विश्ववंधुत्व सावरकरांना नको आहे.[९] अितर धर्मीय लोक वा राष्ट्रे जेव्हा मानवतेच्या, विश्ववंधुत्वाच्या समान पातळीवर अुतरतील, तेव्हाच हिंदुस्थानने हिंदुत्वाचा त्याग करणे अिष्ट ठरेल असे सावरकरांचे सांगणे आहे. म्हणून ते लिहितात, "हिंदुस्थानमधील अितर जाती जोपर्यंत हिंदुस्थान आधी असे म्हणत नाहीत, किंवा जगातले अितर लोक मनुष्यजाती आधी" असे तत्त्वज्ञान आचरीत नाहीत... तोपर्यंत– हिंदूंनो, तोपर्यंत तरी तुम्ही शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला, ज्ञानतंतूंच्या जाळ्याप्रमाणे अेकजीव करणारी सर्व बंधने

---

१. जाति. नि. पृ. ७३. २. सा. सा. भाग १ – पृ. ५४. ३. सा. सा. भाग १ – पृ. ६२. ४. हिंदुत्व पृ. ११६. ५. सा. सा. भाग २ – पृ. ११६. ६. सा. द. पृ. ५. ७. सा. सा. भाग ४ – पृ. ४७ ८. हिंदुत्व पृ. ३५–३६. ९. हिंदुत्व पृ. २५.

दृढीभूत करा."[1] डॉ. आंबेडकरांच्या 'समतासंघ' या संस्थेच्या 'समता' या मुखपत्राला अुत्तर देताना सावरकरांनी वरीलप्रमाणेच विचार व्यक्त करताना म्हटले की, जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व अित्यादी 'त्व' अितर सोडीत असतील तर मग माझे हिंदुत्वही मानुषकतेत विलय पावेल. जसे माझे राष्ट्रीयत्वही– हिंदीपणाही – मानव-राष्ट्रात तेव्हा विलय पावेल की, जेव्हा अिंग्लिशपण, जर्मनपण अित्यादी 'पणा' लुप्त होअून मनुष्यपणा तेवढा जगात– मनुष्य मात्रात नांदू लागेल.[2]

वरील सर्व विवेचनाचा निष्कर्ष थोडक्यात सांगायचा झाला तर असे म्हणता येअील की हिंदुत्वनिष्ठा ही सावरकरांची आद्य, प्रथम निष्ठा होय. हिंदुत्वाचा बळी देअून मानव्याची जोपासना करण्याच्या कल्पनेला सावरकरांचा विरोध आहे तो या निष्ठांतील क्रमातूनच निर्माण झालेला आहे.

रागद्वेष

सावरकरांनी आपल्या निबंधलेखनातून अनेक व्यक्तींवर सडेतोड टीका केली आहे. त्या टीकेतून त्या व्यक्तींसंबंधी सावरकरांच्या ठायी असलेले राग, द्वेष व्यक्त होतात. सावरकरांनी अितर थोर व्यक्तींवर जरी टीका केली असली तरी म. गांधींवर त्यांनी केलेली प्रखर टीकाच सर्व साधारण जनांच्या ध्यानी येते. म. गांधींवरील त्यांचे टीकालेख स्वतंत्र ग्रंथरूपात समाविष्ट करण्याअितके विपुल व विस्तृत आहेत. 'गांधी-गोंधळ' हा ग्रंथ या दृष्टीने अभ्यसनीय आहे. शिवाय निबंधलेखनातून मधून मधून गांधींच्या अनेक विधानांचा समाचार घेताना सावरकर दिसतात. व्यक्तिद्वेषापेक्षा विचार-विरोधातून सावरकरांची टीका जन्मली असल्याचे दिसून येते. म्हणून जेथे सावरकरांच्या विचारांशी वा कृतीशी मिळतीजुळती अशी विचारसरणी म. गांधींच्या ठिकाणी त्यांना आढळली तेथे ते व्यक्तिद्वेष विसरून व्यक्तिगौरवही करण्यास संकोच करीत नाहीत.

म. गांधींनी अेका महाराच्या मुलीला स्वत: पाळले, तिच्या हातचे नी तिच्यासह खाणे-पिणे, बसणे, अुठणे, अुघडपणे केले आणि शेवटी तिचे लग्न अेका ब्राह्मणाशी स्वसंतोषाने लावून दिले. या जात्युच्छेदक कामगिरीबद्दल सावरकर म. गांधींचे स्तुतिपाठ गातात आणि भंगीकाम केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतात.[3] अस्पृश्यतेप्रमाणेच रोटीबंदीची बेडी तोडण्यासाठी म. गांधींनी केलेल्या कार्याचीही महती सावरकर जाणून आहेत. गदळ अशा कोणत्याही ब्राह्मण-मराठ्याच्या खानावळीत जेवल्याने जात नाही तर म. गांधींसारख्यांच्या

---

१. हिंदुत्व पृ. १३८. २. जाति. नि. पृ. ३३१. ३. क्ष–किरणे पृ. १५३–१५४.

वरोवर जेवणे ब्राह्मणास, मराठ्यास निषिद्ध का वाटावे, याचे सावरकरांना मोठे गूढ वाटते.[1]

जातिभेदोच्छेदन, रोटीबंदी, व्यवसायबंदी यांबावत म. गांधींनी केलेल्या कार्याची थोरवी सावरकरांनी जशी सांगितलेली आहे, तशी गांधींची शौर्यगाथाही सावरकरांनी गाअिली आहे. राजकारणाची अुठावणी हिंदूंनीच केली व त्यात गांधीजी हे अेक राष्ट्रवीर होते असा अुल्लेख ते अेके ठिकाणी करतात.[2] म. गांधींनी वार्डोलीचा संग्राम सुरू केल्यावर महात्माजींच्या सहकारतेस व साहाय्यास अुपयोगी पडतील तेच शब्द बोलण्याचे आणि आचरण्याचे बंधन सावरकरांनी स्वत: घालून घेतले होते.[3] म. गांधी, अरविंद बाबू व टागोर हे अुभ्या जगातील तीन महापुरुष असल्याची प्रांजल कबुली सावरकरांनी दिली आहे.[4]

पण 'गांधी-गोंधळा'त आणि अन्यत्र सावरकरांनी जी टीकेची झोड अुठविली आहे ती मुख्यत: म. गांधींशी सावरकरांचा जो वैचारिक विरोध आहे त्यातून अुठविली आहे असे स्पष्ट दिसून येते. विज्ञाननिष्ठ सावरकरांना गांधींचा धर्मभोळेपणा, देवभोळेपणा, 'आतल्या आवाजा'चे त्यांचे वेड मान्य नव्हते.[5] अहिंसेची गांधीकृत व्याख्या त्यांना मान्य नव्हती. सावरकरांची अहिंसेची व्याख्या मुख्यत: बुद्धिग्राह्यता आणि मानवहित या दोन कसोट्यांवर अधिष्ठित होती.[6] ती सत्यसृष्टीला धरून आहे असा सावरकरांचा दावा होता.[7] पण गांधीजींनी 'सत्याग्रह्याने हातात कधी शस्त्र न धरण्याची व नुसते सत्य आचरीत मरण्याची' सूचना करताच सावरकरांनी त्यांच्यावर टीकास्त्र सोडले[8] आणि 'भगवती गोगलगाय', 'अहिंसात्मक भंडविधान' या लेखांतून तर या टीकेला अुपरोधाची धार दिली. म. गांधींच्या अेकूण राजकारणालाच सावरकरांचा कडवा विरोध होता. गांधींचे राजकारण हे देशविघातक आहे.[9] ते चंचल, अुथळ व दुबळे आहे[10] असा सावरकरांचा आक्षेप होता. स्वातंत्र्याला गांधीजींचा विरोध असल्याचे काही पुरावेही सावरकरांनी दिले आहेत. 'गांधी-गोंधळा'तील अेक संपूर्ण लेख 'स्वातंत्र्याला विरोध' या शीर्षकानेच प्रसिद्धिला आहे.[11] गांधीजींचा अिंग्रजी राज्याबद्दलचा दृष्टिकोनही सावरकरांना मान्य नव्हता. 'God save the King.' हे अिंग्लिश साम्राज्याचे युद्धगीत मोठ्या अभिमानाने गांधीजी म्हणत असत. त्याबद्दलही सावरकरांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.[12]

---

१. जाति. नि. पृ. २९४. २. जाति. नि. पृ. ३३५ ३. जाति. नि. पृ. ४६–४७.
४. श्रद्धानंद. ५. क्ष–किरणे पृ. ९२, ६४, ६६. ६. क्ष–किरणे पृ. १२४.
७. क्ष–किरणे पृ. ५७. ८. गांधी गोंधळ पृ. ४. ९. गां. गों. पृ. ३.
१०. गां. गों. पृ. ४७. ११ गां.. गों. पृ. ४८ ते ५६. १२. गां. गों. पृ. ५३.

झुलू लढाऔविषयी मतप्रदर्शन करताना गांधीजींनी स्वत:च्या आत्मवृत्तात प्रकट केलेली विचारधारा सावरकरांना अिंग्रजी साम्राज्याच्या संदर्भात संपूर्ण नापसंत होती.[१]

साध्यावद्दलच्या मतभेदाप्रमाणेच साधनावद्दलचा दोघांतील मतभेद सावरकरांच्या निबंधवाङ्मयातून अनेक वेळा दृग्गोचर झाला आहे. सत्य, अहिंसा सत्याग्रह यांसंबंधी सावरकरांनी केलेली टीका पूर्वी पाहिलीच आहे. गांधीजींना क्रांतिकारकांचा मार्ग आणि स्वत: क्रांतिकारक यांच्यावद्दल जो राग वाटे त्यामुळेही सावरकरांनी त्यांच्यावर शरसंधान केले आहे. यतीन्द्र, गोपीनाथ सहा या ख्यातनाम क्रांतिकारकांबद्दल गांधींनी जी निर्विकारता दाखविली, जो तुटकपणा वा तटस्थपणा स्वीकारला त्याबद्दल सावरकरांना आलेला संताप त्यांच्या 'साबरमतीचा श्रमण' या लेखात अुफाळून आला आहे.[२]

सावरकरांना महात्माजींचा राग येण्याचे आणखी अेक कारण म्हणजे महात्माजींची मुसलमानधार्जिणी वृत्ती. श्रद्धानंदाचा खुनी अबदुल रशीद याला गांधीजींनी अुघडपणे 'भाअी' म्हटले आणि गोपीनाथ सहाला मात्र गांधींनी त्या नात्याने संबोधिले नाही ही विसंगती सावरकरांना असह्य झाली.[३] "मी मुसलमानांचा मित्र आहे. ते मुसलमान माझे 'रक्ताचे भाअू' आहेत," हे गांधीजींचे अुद्गार सावरकरांना गांधीजींच्या पक्षपाती वृत्तीचेच द्योतक वाटतात.[४] 'अिस्लामी धर्म हा शांततेचा धर्म आहे.' या गांधींच्या विधानातूनही त्यांची वरील वृत्ती प्रकट होते असे सावरकरांना वाटते.[५] निजामाला हिंदुस्थानच्या सम्राटपदावर चढविण्यास याच मुसलमानधार्जिण्या प्रवृत्तीमुळे गांधीजी सिद्ध झाले आहेत असा सावरकरांचा दावा आहे.[६]

अेकूण, गांधीजींचे ध्येय, त्यांचा साधनमार्ग, त्यांची मुसलमानांबद्दलची पक्षपाताची वृत्ती, त्यांचे राजकारण, त्यांचे 'बालिश तत्त्वज्ञान व षंढतेचे शास्त्र"[७] या सर्वांबद्दलच सावरकरांच्या ठायी तीव्र द्वेष दिसून येतो.

विज्ञाननिष्ठा व बुद्धिवाद या व्यक्तित्वातील निष्ठांमुळे सावरकरांच्या टीकेच्या भडिमारात आणखी काही व्यक्ती सापडल्याचे आढळून येते. बिहारमधल्या भूकंपाची कार्यकारणमीमांसा करताना शंकराचार्यांनी 'ते भूकंप अस्पृश्यता निवारण्याच्या पापामुळे घडतात' असा अभिप्राय व्यक्त करताच

---

१. गां. गों. पृ. ५३. २. गां. गों. पृ. ३२ ते ४७. ३. गां. गों. पृ. १४ ते १७.
४. गां. गों. पृ. १६. ५. गां. गों. पृ. १८. ६. गां. गों. पृ. ७७. ७. गां. गो. पृ. १२.

सावरकरांनी शंकराचार्यांवरही टीकास्त्र सोडलें.[१] शरीरातील सत्त्वगुण वाढविण्यासाठी आहारात पक्व फळे व गाअीचे दूध हे अन्न ठेवण्याचा अुपदेश कामकोटीच्या श्रीमच्छंकराचार्यांनी करताच सावरकरांनी त्यांची अनेक कोटिक्रमांनी भंबेरी अुडविली.[२] केडगावच्या नारायणमहाराजांनी सत्यनारायण करण्यात गाठलेल्या अुच्चांकावद्दल त्यांच्यावर अुपरोधिक, बोचरी टीका सावरकरांनी केली आहे.[३] गोभक्तीचे समर्थक चौंडेमहाराज, समाजशास्त्रज्ञ श्री. गो. म. जोशी (बी. अे. ऑनर्स) आणि श्री. सरंजामे यांच्यावर सावरकरांनी जी टीका केलेली आहे ती मुख्यतः गायीविषयक सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातूनच केली गेली आहे असे दिसून येअील.[४]

सनातन्यांवर सावरकरांनी जे शस्त्र धरले ते प्राधान्याने अस्पृश्यता निवारण चळवळीला सनातन्यांनी केलेल्या विरोधामुळे धरले आहे. 'पुण्यातील तीन हजार मंबाजीबुवा' या अेकाच लेखावरून सावरकरांच्या सनातन्यांबद्दलच्या दृष्टिकोनाची कल्पना येते.[५] 'न जनयेद् बुद्धिभेदम्' म्हणजे काय?' हा सावरकरांचा निबंध बुद्धिनिष्ठ सुधारणावादातून स्फुरलेला असून सनातन्यांच्या तद्विरोधी वृत्तीला दिलेले ते अेक सडेतोड अुत्तर होय.[६]

व्यक्तीबद्दल सावरकरांच्या जशा रागद्वेषाच्या भावना प्रकट झाल्या आहेत, तशा त्या हिंदुस्थानातील विविध जमातीबद्दल व्यक्त झाल्या आहेत. पारशी व ख्रिश्चन जमातींबद्दल सावरकरांच्या ठायी फारसा तीव्र द्वेष दिसत नाही. अुलट पारशी जमात ही अिंग्रजी अधिराज्याच्या विरुद्ध हिंदूंच्या खांद्याला खांदा भिडवूनच सतत काम करीत असल्याबद्दल त्यांना त्या जातीबद्दल आदरच आहे.[७] ख्रिस्ती जातीबद्दलही अल्प अंशाने असेच म्हणावे लागेल असे त्यांना वाटते. ख्रिस्ती लोक थोडे कमी धर्मपिसे असून राजकीय तर्कबुद्धीला अधिक मान तुकविणारे आहेत असाच त्यांचा निर्वाळा आहे.[८] मात्र मुसलमान जातीबद्दल मत व्यक्त करताना त्यांच्या राग-द्वेषाला खूपच धार चढते.

सावरकरांनी मुसलमान जातीबद्दल अनेक प्रसंगी जे मत प्रकट केले आहे, ते बव्हंशी स्वानुभवावर अधिष्ठित आणि त्यांच्या विशिष्ट निष्ठा व तत्त्वज्ञानातून सिद्ध झालेले आहे. बालपणापासून त्यांची मुसलमान समाजाबद्दल प्रतिकूल भावना बनली होती व पुढे तिचा भावबंध दृढ झाला. अंदमानमधील वास्तव्यात आलेल्या अनुभवातून सावरकरांची मुस्लिम जातीकडे पाहण्याची दृष्टी

---

१. सा. सा. भाग २ – पृ. २ ते ४६. २.क्ष–किरणे पृ. ६० ३. क्ष–किरणे पृ. ८४. ४. क्ष–किरणे पृ. ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, १०९, ११०. ५. जाति. नि. पृ. ९६ ते १०७. ६. सा. सा. भाग २ – पृ. ७८ ते ९१. ७. हिं. द. पृ. २९. ८. हिं. द. पृ. २९.

कसकशी वदलत गेली हे आपण पूर्वी आत्मचरित्रात पाहिलेच आहे. या अनुभवांतून सावरकरांच्या मुस्लिमविरोधी मूळ भावनेला वळकटी आली आणि मग 'हिंदुत्वा'च्या विशिष्ट तत्त्वज्ञानावर ती भावना अधिकच पोसली गेली.

मुसलमानांचा धर्म, वंश, संस्कृती, निष्ठा अित्यादी वाबतींत सावरकरांची ठाम मते सर्वश्रुतच आहेत. अिस्लामी धर्म हा शांतिप्रधान धर्म नाही असे सावरकरांनी अनेक पुरावे देअून सिद्ध केले आहे.[१] हिंदु-मुसलमानांचा हिंदुस्थानातील लढा हा साधासुधा प्रश्न नसून दोन विभिन्न संस्कृती नि वंश नि राष्ट्रे यांच्यातील हा लढा आहे असे सावरकरांचे स्पष्ट मत आहे.[२] कोणताही मुसलमान घेतला तरी त्याच्या ठायी वहिर्देशीय राज्यनिष्ठाच वारंवार वागत असलेली आढळून येते असे ते सांगतात.[३] अुर्दू ही राष्ट्रभाषा आणि अुर्दू हीच राष्ट्रीय लिपी करण्याचा मुसलमानांचा आग्रह अत्यंत अराष्ट्रीय स्वरूपाचा असल्यानेच तो सावरकरांना मान्य नाही.[४] त्यांच्या मते या अराष्ट्रीय वृत्तीमुळेच मुसलमान 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीतास विरोध करतात.[५] आपल्या धर्मप्रचारासाठी व वर्चस्वासाठीच ते रक्तपातकारक दंगे घडवून आणतात.[६] 'हिंदी राष्ट्रत्वा'च्या नव्या कल्पनेने हिंदूंनी जरी आपण हिंदू असल्याचे नाकारले तरी मूळच्या अराष्ट्रीय वृत्तीमुळे मुसलमान हे आधीही मुसलमान नी अंतीही मुसलमानच राहिले. 'हिंदी' केव्हाच झाले नाहीत.[७] मुसलमानांच्या या अराष्ट्रीय वृत्तीमुळे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालात त्यांच्यासंबंधी कोणते धोरण ठेवावे हे सांगताना सावरकरांनी लिहिले आहे : "त्या (मुसलमान) समाजाकडे आपण सर्व बाबतींत शक्य तेवढ्या संशयी दृष्टीनेच नीट लक्ष ठेविले पाहिजे. कोणत्याही समाजातील कोणत्याही व्यक्तीला समानतेच्या भूमिकेला धरून जी वागणूक मिळण्याचा अधिकार आहे. तेवढीच त्यांना देणे जसे अेका वाजूने अवश्य आहे तसे दुसऱ्या वाजूने कोणत्याही प्रकारची अितरांना नसलेली सवलत राजकीय, धार्मिक वा सामाजिक अशा कोणत्याही संबंधांत त्यांना देण्याचे कठोरपणे नाकारणेही अवश्यच आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या लढ्यात आपण गुंतलेले असतानाच केवळ नव्हे तर ते स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरही आपण त्यांना संशयातीत मानता कामा नये."[८] मुसलमानासंबंधीच्या वरील दृष्टिकोनातूनच सावरकरांचे हिंदु-मुस्लिम-अैक्यावद्दलचे पुढील सूत्र सिद्ध झाले आहे : "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुम्हांस विरोधून हिंदुराष्ट्र आपले भवितव्य बनेल तसे

---

१. श्रद्धानंद दि. २७–१–२७. २. हिं. द. पृ. २४. ३. हिं. द. पृ. १६.
४. हिं. द. पृ. २२–२३. ५. हिं. द. पृ. २४. ६. हिं. द. पृ. ४१–४२.
७. हिं. द. पृ. ६१. ८. हिं. द. पृ. ८१.

घडवील."[१] भारतीय राजकारणातील घटनांसंबंधी सावरकरांचे काही अंदाज चुकले असतीलही. पण मुसलमानांसंबंधी सावरकरांनी वर्तविलेले भविष्य वव्हंशी खरे ठरले, हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे सावरकरांचे विरोधकही मनमोकळेपणाने मान्य करतात.[२]

प्रज्ञा आणि प्रतिभा

वस्तुमात्रातील नवे संबंध दिसणे, अभिनव, तर्कशुद्ध अुपाय व विचार सुचणे हे प्रज्ञेचे लक्षण सावरकरांच्या निबंधवाङ्मयांतून दृग्गोचर होते. यज्ञसंस्थे-संबंधी विवेचन करताना सावरकरांची प्रज्ञाशक्ती असे अनुमान काढते की, अग्नि-होत्रे, अग्निपूजा, अग्न्यागारे आणि महिनोगणती, वर्षोगणती सारखे भडकलेले मोठमोठे यज्ञ ह्या सर्व धार्मिक संस्था कोण्यातरी हिमप्रदेशात किंवा शीत प्रदेशातच त्यातल्या त्यात प्रथमत: अत्यंत प्रिय नी पूज्य मानल्या गेल्या असाव्या, 'धर्म' होअून बसल्या असाव्या, प्रथम आवश्यकता नंतर आवड नी शेवटी, देवीकरण-धर्मीकरण अशा परंपरेने अग्निपूजा–यज्ञ ही संस्था हिमप्रदेशातच अुद्भवली गेली असल्याचा संभव वाटतो.[३]

आपल्या ह्या तर्कास प्राचीन संस्कृतीचा अितिहास बळकटीच आणतो असा सावरकरांना विश्वास आहे. ते लिहितात, "अुष्ण प्रदेशात ज्ञात काळाच्या अगदी आरंभापासून निवसणाऱ्या राक्षस (निग्रोप्रभृती) लोकांत यज्ञसंस्था जन्मली नाही, अितकेच नव्हे तर ती कळली तेव्हाही ती त्यांना केव्हाही आवडली नाही. हिमप्रदेशात विकसलेल्या संस्कृतीच्या पारसिक नी भारतीय अनुयायांनाच ती अग्निपूजा मुख्यत्वेकरून जटिल, कर्मकांडाचे धार्मिक केंद्र होअून वसली. हिम वा शीत प्रदेशात आर्य लोक असता अग्नीचे सतत साहचर्य अपरिहार्यच नव्हे तर सुख-करही वाटणे साहजिकच होते. मोठमोठ्या होळ्या अिंग्लंडमध्येही काही धार्मिक सणांत पेटवितात. असहनीय शीत ऋतूत गावोगावी त्या सुखकरच होतात. ह्या आर्यप्रभृती जाती अुष्ण प्रदेशात आल्यानंतरही ती अग्निपूजा नी यज्ञसंस्था जी असुखोदर्क असताही सोडू शकले नाहीत तो तिच्या देवीकरणाचा धार्मिकी-करणाचा परिणाम."[४]

सूर्य, चंद्रास लागणाऱ्या ग्रहणांचा विचार करताना सावरकरांची प्रज्ञा 'दे दान सुटे गिराण' असे ओरडत फिरणाऱ्या शूद्रातिशूद्र जातींच्या या वहिवाटी-

---

१ हिं. द. पृ. २९. २. सा. द. प्रस्तावना पृ. ४–५. ३. सा. सा. भाग १– पृ. ३७. ४. सा. सा. भाग १ – पृ ३७.

मागील अर्थ शोधण्याचा प्रयत्न करते. त्यांचा तर्क असा आहे की, कित्येक जाती वहुधा चेटकाने आपण ग्रहण लावतो असेही भासवीत असाव्यात आणि ते खरे वाटून त्यांस दान देऊन संतोषवून ग्रहण सोडविणे अितरांस भाग पडत असावे. राहूकेतू हे दैत्य, राक्षस, त्यांचे वंशज नी सगेसोयरे म्हणजेच गावाबाहेर राहणारे ते अुग्र, मांग, चेटके, गारुडी, महारप्रभृती चांडालवर्ग. म्हणून वहुधा तेच ओरडत फिरण्याचीही वहिवाट पडली असावी. "दे दान सुटे गिऱ्हाण" दान द्याल तर आमचे चेटुक मागे घेअून हे गिऱ्हाण आम्ही सोडवितो" असा त्यांच्या दानमागणी-मागील अर्थ असावा.[1]

लिंगपूजेची, वृष पूजेची पद्धती सर्वत्र कशी रूढ झाली असावी यासंबंधीही सावरकरांनी तर्कशुद्ध विवेचन केले आहे. ते लिहितात, "वृषपूजा ही लिंगपूजेचीच अेक आनुषंगिक पद्धती आहे. प्रजननात्मक सृष्टिशक्तीचे जे महदाश्चर्य मनुष्य-मात्रास सहजच वाटते त्याची ती व्यक्ती आहे. सृष्टिशक्तीचे अुत्तान, प्रकट नी अुत्कट असे जे प्रतीक प्राचीन मनुष्यास दिसले त्याची त्याने पूजा आरंभावी हे त्या काळास साहजिकच होते. यामुळेच लिंगपूजेच्या प्रथेचा प्रघात जगातील प्राचीन अशा वहुतेक धर्मांतून जगभर पसरलेला आढळतो. लिंगाचे नी नंदीचे साहचर्यही तसेच आणि त्याच कारणासाठी प्राचीन राष्ट्रांतून जगभर रूढावलेले होते. नंदीच्या वृषणास स्पर्शून वंदिण्याची धार्मिक क्रिया ही त्या सृष्टिशक्ती-तील बलशाली पूंबीजाचा गौरव करण्याची अुत्तान पद्धती होय."[2]

सावरकरांच्या संशोधक प्रज्ञेचा खरा प्रत्यय येतो तो त्यांच्या 'काही अैतिहासिक प्रमेये' या निबंधात.[3] या लेखात सावरकरांनी बुद्धीला धक्का देणारी काही प्रमेये अितिहासाच्या आधाराने मांडली आहेत. त्यांचे पहिले अैतिहासिक प्रमेय असे आहे की, अक्केडियन किंवा अक्केडी लोक भारतवर्षीय आर्य वा द्रवीड होते. आपल्या या प्रमेयाच्या स्पष्टीकरणार्थ सावरकरांनी असा युक्तिवाद केला आहे की, खाल्डियन लोकांवर अक्केडी लोकांनी स्वारी करून त्यांना जिंकले व अक्षर लिपी खाल्डियात चालू केली. अक्केडी लिपी ही अक्षर लिपीशी मिळते. अक्षरी > अक्कल > अक्कड > अक्केडी अशी या शब्दाची व्युत्पत्ती असावी असा सावरकरांचा तर्क आहे. याबाबत अधिक खुलासा करताना सावरकर लिहितात, "आर्यावर्तीय आर्य आणि द्रविड ह्या अुभय जाती खाल्डिया, बाबिलोनिया अि. प्रांतांवर चालून जाअून वसाहती करीत होत्या हे अितिहासात विदित आहे. म्हणून 'अक्षरी' वरून 'अक्केडी' शब्द आला असावा."[4]

---

१. सा. सा. भाग ४–पृ. ५७. २. क्ष–किरणे पृ. १४. ३. श्रद्धानंद दि. ४–५–१९२९.

सावरकरांनी केलेले दुसरे अैतिहासिक प्रमेय हे वव्हंशी प्रतिक्रियात्मक स्वरूपाचे असले तरी ते विचारार्ह आहे अेवढे मात्र खरे. अेका मुसलमानाने 'आर्य लोकांची अरबी ही पहिली भाषा होती' अशा आशयाचे विचार अेका पुस्तकात मांडले होते. हिंदुत्वनिष्ठ सावरकरांच्या मनात या विचाराने चलविचल होणे साहजिकच होते. तेव्हा वरील विचाराला प्रत्युत्तर देताना सावरकरांनी अेक प्रमेयांची मालिकाच अुभी केली होती. प्रथमतः त्यांनी असे सांगितले की, हिंदु जातीय आरबी लोकांनी वसाहत केल्यानंतर 'अरेबी' हे नाव अरबस्थानास पडले असावे. दुसरे असे की, 'आरबी' तामीळ लोकांची वसाहत 'आरबी' म्हणून प्रसिद्ध झाली असावी. तिसरी गोष्ट अशी की, हा तामील लोकांस लावला गेलेला मूळचा अरबी शब्दही आर्यावर्ती या शब्दांचाच अपभ्रंश असावा. आणि अखेर त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, आर्यावर्ती शब्दाचा अपभ्रंश आरबी (हिंदी द्रवीड जाती) असा होअून त्यांस तत्रस्थ वसाहतीवरून 'आरबी' हे नाव अरबस्थानांस पडले असावे.

या अभिनव विचाराची आणि अितिहासाची सावरकरांच्या प्रज्ञेने मोठी मनोज्ञ सांगड घालून दिली आहे. या अभिनव विचाराचे मूळ ज्या अितिहासात आहे त्याचा दाखला देताना सावरकर लिहितात, "तामीळ भाषेस आणि संस्कृतीस 'आरबी' असे स्वतः तामील लोक म्हणतात. द्रविडियन लोक, अरबस्थान हा शब्द अितिहासात व्यवहृत होण्याचे हजार वर्षांपूर्वी वलुचीस्थान आदी मार्गाने, समुद्रमार्गाने पश्चिम आशियाच्या बहुतेक भागांत व्यापार, वसाहत करीत गेलेले होते. ग्रीक ग्रंथकर्ता अेरियन 'अिंडिका' ग्रंथात म्हणतो की, अलेक्झांडरचे नौकायान सिंधू नदी सोडून परत चालले असताना काही दिवसांनी त्यास काकेडा हे रेताड बेट लागले. तेथे आरबी नावाचे हिंदू जातीय लोक राहात असत. अर्थात हे हिंदू तामील म्हणजे द्रविड जातीय जे 'आरबी' तेच असले पाहिजेत; आणि हे हिंदू जातीय लोक आज ज्यास 'अरेबिया' म्हणतात त्याच्या मार्गावरील बेटात जांअून राहिले होते. ह्या गोष्टीवरून आरबी लोकांनी वसाहत केल्यानंतर अरेबी हे नाव अरबस्थानास पडले असावे."

सावरकरांच्या प्रज्ञाशक्तीचा विचार करताना अेक गोष्ट ध्यानात येते की, सावरकरांच्या ठायी प्रखर प्रज्ञाशक्ती असली तरी तिचे स्फुरण सावरकरांच्या निष्ठांनी, ध्येयांनीच सीमित झालेले आहे. स्वतंत्र अशा ज्ञानाच्या क्षेत्रांचा शोध घेताना ती क्वचितच आढळते.

प्रज्ञेने अभिनव विचार सुचतात तर त्या विचारांना प्रतिभाशक्ती सौंदर्याच्या कोंदणात बसविते: कल्पनेच्या साहाय्याने मूळ रूक्ष विचार हीच प्रतिभा अधिक

सुंदर करते. सावरकरांची प्रतिभा ही महाकवीची प्रतिभा आहे. तिला रम्यतेपेक्षा भव्यतेचे आकर्षण अधिक आहे. त्यांच्या निबंधवाङ्मयातून त्यांच्या या प्रतिभेचा साक्षात्कार ठायी ठायी होतो. 'यज्ञ' संस्थेचे विवेचन करताना अग्नी पेटविण्याची युक्ती मनुष्यास सापडताच केवढे मन्वंतर झाले हे सावरकरांना सांगावयाचे आहे. पण त्यांची भव्य प्रतिभा चटकन सांगून जाते की, 'काळ्याकभिन्न मध्यरात्रीस अेक प्रतिसूर्य अुगव म्हणताच अुगवण्याचे सामर्थ्य मनुष्यात आले. जन्मांध काळोखास डोळा फुटला – दिसू लागले.'[1] ज्योतिर्गोलविषयक सारी पूजाअर्चा, व्रतवैकल्ये साफ खोटी असल्याचे आणि ग्रहगोलांचा सर्व व्यापार भौतिक स्वरूपाचा असल्याचे सावरकरांचे मत अेका पुढील कल्पनेतून प्रकट होते. 'कसला शनी नि कसले शनिमाहात्म्य, अहो या ब्रह्मांडाच्या विस्तीर्ण म्युनिसिपालिटीने आकाशप्रांगणात सृष्टिनियमांनुसार लावलेले हे सारे कंदील आहेत. त्या कंदिलात ठराविक तेजाचे घासलेट घातलेले आहे, तोवर तुम्ही त्यांस लाखो शिव्या देत राहिलेत तरी ते जळल्यावाचून राहणार नाहीत.'[2] यंत्रशीलपणामुळे युरोप हे आज अजिंक्य झाले आहे हा विचार, स्पष्ट करताना सावरकरांची प्रतिभा पुढील भव्य, काव्यपूर्ण शब्दांतून प्रकट होते : "युरोप सृष्टिशक्तींना आपल्या प्रगतीच्या रथास घोड्यासारखे जुंपून भरधाव दिग्विजय करीत चालला असता, आशिया या सृष्टिशक्तींना पूजीतच राहिला."[3] 'ललनांच्या लावण्याचे हानिलाभ' या निबंधात तर सावरकरांच्या प्रतिभेला अनेक कल्पसुमांचा बहर आलेला आहे. 'ललनेचे लावण्य हा शब्द तर सृष्टीच्या कलाकुसरीचा अत्यंत कमनीय असा कांचनी कळसच आहे' ही कल्पना स्पष्ट करताना सावरकरांनी सृष्टीला आद्य नी अमर चित्रलेखेची दिलेली अुपमा अत्यंत मनोज्ञ आहे.[4] सावरकरांच्या तरल आणि नाजूक कल्पकतेचे दर्शन त्यांच्या 'जातिभेदाची अिष्टानिष्टता' या अत्यंत शास्त्रीय अशा निबंधातूनही घडते. मानवाने मानीव जातींची बंधने कितीही कडक केली तरी निसर्ग हा पोथीजात जातींना मानीतच नाही हा विचार सावरकरांनी पुढील रूपकांच्या आधारे किती काव्यपूर्ण रीतीने व्यक्त केला आहे पाहा : "...केवळ आडनावे ठेवलेल्या मानीव जातीचे ते बेटीबंद अंतःपूर सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही त्याभोवती आमच्या पोथ्यापुस्तकांची चीनच्या भिंतीअेवढी जरी प्रचंड तटबंदी अुभारली, तरी तीस न जुमानता संकर हा लैंगिक आकर्षणाच्या पुष्पक विमानातून मनात येताच त्या तटबंदीच्या अंतःपुरात अलगद अुतरल्यावाचून राहात नाही."[5]

---

१. सा. सा. भाग १ – पृ. ३५. २. सा. सा. भाग ४ – पृ. ६४. ३. सा. सा. भाग २–पृ. ५३. ४. सा. सा. भाग ४–पृ. ४१–४२. ५. जाति. नि. पृ. ४७.

सावरकरांच्या कल्पना-विलासाचे वैभव त्यांचा 'ध्वनिलेख' हा अेक निबंध जरी वाचला तरी ध्यानी येते. 'ध्वनिलेख' (फोनोग्रॅम) या यंत्रावर त्यांनी जे कल्पकतापूर्ण रूपक केले आहे ते पाहण्यासारखे आहे. त्यांच्या कल्पकतेला हा ध्वनिलेख अेखाद्या अुत्तमांगधारी राहूसारखा दिसतो; सहस्रजिव्ह असा दुजा वाल्मीकीच वाटतो. फडा काढलेल्या शेषासारखाच जणू तो डोलत असतो. तबकडी म्हणजे त्याचा मेंदू, सुअी म्हणजे त्याची प्रतिभा आणि तबकडीवरील सूक्ष्म छिद्रे म्हणजे नाना विकार-विचारांची घरटी. त्याची किल्ली म्हणजे अमृत-मय सोमाची चिळकांडीच वाटते. मस्तकावर मुख (कर्णा) धारण करणारा असा अद्भुत देहधारी तो दिसतो.

अेका शास्त्रीय अशा विषयाला सावरकरांच्या प्रतिभेचा स्पर्श होताच कल्पनांचा कसा सडा पडतो याचा प्रत्यय येण्यास वरील लेख पुरेसा आहे. कभिन्न, खडवडीत कातळातून अेखादा चमकदार जलप्रवाह जसा झुळझुळत असावा तसा सावरकरांच्या विचारघन, शास्त्रीय रूक्ष अशा निबंधविषयांतून त्यांच्या काव्या-त्मकतेचे अनेक पाझर स्रवताना आणि झुळझुळताना दिसून येतात.

प्रचार आणि कृतिप्रेरणा

प्रत्यक्ष कृती आणि तिचा प्रचार हा सावरकरांच्या व्यक्तित्वातील विशेष त्यांच्या निबंधवाङ्मयात प्रकर्षाने दिसून येतो. ध्येयवादी विचार आणि त्यानुसार स्वतः केलेली कृती यांतून सावरकरांचे अनेक निबंध जन्म पावले आहेत. आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी अेका निबंधात लिहिले आहे की, "मीही गेल्या पाचसहा वर्षांपासून रोखठोक हेच काय ते कार्य हे सूत्र हिंदुराष्ट्रापुढे अितर प्रकरणी तसेच सामाजिक क्रांतीविषयीही ठेवीत आलो आहो. ते सूत्र व्यवहार-विण्याचा नि जन्मजात जातिभेद प्रत्यहीच्या आचरणात तोडून दाखविण्याचा प्रयोग माझ्या मते रत्नागिरी नगरात मोठ्या प्रमाणात नि त्या खालोखाल मालवण नगरात यशस्वी झाला आहे."[1] सावरकरांची ही भूमिका आणि त्यांचे हे प्रयोग त्यांच्या निबंधांतील अेक महत्त्वाची प्रेरणा ठरली आहे. 'आधी केलेचि पाहिजे' हे समर्थांच्या क्रांतीचे सूत्र त्यांनी आपल्या सामाजिक क्रांती-सही लागू केले होते.[2] रत्नागिरी जिल्ह्यात अेका हाताने ते जातिभेदोच्छेदन, सप्तशृंखलाभेदन, सहस्रभोजनसंमेलन करीत होते तर दुसऱ्या हाताने निबंध-लेखनातून आपल्या आचारविचारांचा प्रचार करीत होते आणि हिंदु समाजाला कृतीची प्रेरणा देत होते. 'आजच्या सामाजिक क्रांतीचे सूत्र' सांगताना त्यांनी

---

१. जाति. नि. पृ. २२७. २. सा. सा. भाग ५ – पृ. ८४.

लिहिले : "सोडून दे त्या स्पर्शबंदीच्या, सिंधुबंदीच्या, रोटीबंदीच्या, पोथीजात जातपातींच्या पाच हजार वर्षांपूर्वीच्या भाकड भावना. तोडून टाक त्या तुझ्या कर्तृवाच्या पायांत पडलेल्या त्या शब्दनिष्ठ श्रुतिस्मृति-पुराणोक्त प्रवृत्तीच्या– बेडया आणि जे जे हत्यार तुझ्यावर चढून आलेल्या आजच्या आपत्तीच्या अुच्छेदास आज समर्थ होअील – अुपस ते ते हत्यार."[1] 'ही जातिभेदाची ब्याद मुळापासूनच अुखडून टाकली पाहिजे' असा सारखा घोष त्यांच्या निबंधांतून अैकू येतो.[2] आणि त्याबरोबरच हाती येण्यासारखे साधन म्हणजे 'रोटीबंदीचा अुच्छेद, प्रकट सहभोजनाचा घूमधडाका' अशी कृतिप्रेरणाही दिली जाते. 'जातिभेद मोडावयाचा म्हणजे काय करावयाचे?' या विषयावर केवळ तात्त्विक विचार लिहून सावरकर थांबत नाहीत, तर प्रचारकाच्या अभिनिवेशाने ते लगेच सांगतात, "तरी हे हिंदुसंघटका, अूठ आणि दुसरे कोणी काय हवे ते करो, तू तुझ्यापुरते या घटकेपासून हे व्रत धर की, जे बोट कुत्र्यामांजरास मी लावतो ते बोट मी माझ्या 'अस्पृश्य' धर्मबंधूंस, माणसांस प्रत्यही लावल्यावाचून अन्नग्रहण करणार नाही. म्हण शिवेन; आणि कोणातरी अस्पृश्य धर्मबंधूंस प्रत्यही प्रकटपणे सगळ्यांना तसा शिवून दाखवीन."[3] 'हिंदुत्व' या ग्रंथात हिंदुत्वाच्या मूलभूत तत्त्वांचे तात्त्विक, सखोल व साधार विवेचन केल्यानंतर ग्रंथाच्या अखेरीअखेरीस त्यांची प्रचारात्मक वाणी घुमू लागते : 'हे हिंदूंनो... हिंदुत्वाचा हा आपला संघ अेक रक्ताच्या, जन्मजन्मांच्या व संस्कृतीच्या पवित्र बंधनांनी घडून आलेला आहे. जर करवत असेल तर त्याला दृढतर करा. जाती आणि अुपजाती, पंथ आणि मतमतांतरे यांची आता निरुपयोगी झालेली कृत्रिम बंधने ताडताड तोडून टाका. सहभोजनाचे काय घेअून बसला आहात? परंतु प्रांताप्रांतांमधील व जातीजातींमधील संमिश्र लग्ने जिथे होत नसतील तिथे घडवून आणा.'[4]

रत्नागिरीस असताना सावरकरांनी अेकदा 'वाफ' हा विषय आपल्या व्याख्यानासाठी निवडला होता. प्रत्यक्ष कृतीला आवाहन करण्यासाठीच त्यांनी तो विषय निवडला होता.[5] त्या वेळी प्रसिद्ध होणाऱ्या 'श्रद्धानंद' या वृत्तपत्रातूनही त्यांचा अेकच अुद्घोष चालू होता– 'हिंदूनो, निराश होअू नका, केवळ कामाला लागा.'[6] 'श्रद्धानंदा'तील त्यांचा 'वसअीला चला' हा लेख म्हणजे वसअीपासून गोव्यापर्यंतच्या हजारो हिंदूंच्या शुद्धीकरणासाठी दिलेली कृतिप्रेरणाच

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ३५. २. सा. सा. भाग ५ – पृ. ६२. ३. जाति-नि. पृ. १७६. ४. हिंदुत्व पृ. १३५–१३६. ५. रत्ना. हिं. अिति. पृ. १५. ६. श्रद्धानंद पृ. ८, दि. २०–१–२७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दा...
अनुक्रमांक ३००२२०२ दि: ...

क्रमांक २८४८ दि: २२/७/०७

होय. धर्मप्रचाराची त्यांची कल्पना केवळ तात्त्विक विवेचनावर आधारलेली नसून प्रत्यक्ष कृतीवर अधिष्ठित आहे. म्हणनच ते सांगतात, "अैतिहासिक धार्मिक संशोधन मंडळे काढा. धर्मग्रंथ विनामूल्य वा अल्पमूल्य धर्मार्थ वाटा. ते दान धर्मग्रंथरक्षणार्थ होअील. शेकडो ठिकाणी प्रचारक पाठवून ते ते धर्मग्रंथ सार्थ वाचून दाखवा."[२]

या प्रचारकी प्रवृत्तीमुळेच सावरकरांना तत्त्वचर्चेपेक्षा प्रत्यक्ष कृती केल्याचा आनंद व समाधान अधिक वाटते. 'सहभोजनाचा धूमधडाका' हा निबंध लिहिताना त्यांचे कृतिप्रवण मन सुखावल्याचे स्पष्टपणे दिसून येते.[३]

भाषाशैली

भाषाभिमानाचा शैलीवर प्रभाव – सावरकरांच्या भाषाशैलीचा विचार सविस्तर करण्यापूर्वी त्यांच्या भारतीय भाषाभिमानाचा विचार करणे अगत्याचे ठरते. कारण त्यांची शैली घडविण्यात स्वभाषाभिमान हा अेक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे; आणि त्यांचा हा स्वभाषाभिमान मुख्यत: त्यांची हिंदुत्वनिष्ठा, हिंदुजाती व वीर परंपरा यांबद्दलचा त्यांचा अभिमान, त्यांची हिंदुराष्ट्रैक्य दृष्टी, हिंदूंच्या राजकीय वैभवाबद्दलची अस्मिता यांवर पोसलेला आहे.

संस्कृत भाषेबद्दल जेव्हा जेव्हा ते लिहू बोलू, लागतात तेव्हा तेव्हा ते अभिमानाने सांगतात की, संस्कृत भाषा ही चिरकालपर्यंत आमच्या जातीचा अेक अमूल्य ठेवा म्हणून कायम राहील. कारण आमच्या लोकांचे मूलभूत अैक्य तिच्या योगे भक्कम पायावर अुभारले गेले. आमचे आयुष्य तिने संपन्न केले. आमच्या आकांक्षा तिने अुदात्त बनविल्या; आणि आमच्या जीवनाचा झरा तिने पुण्यमय ठेविला.[४] ही संस्कृत भाषाच आपल्या देवांची, पूर्वजांची सर्वोत्तम भाषा म्हणून मान्य झालेली आहे. आपल्या सर्वांच्या विकारांना आणि आकांक्षांना अुत्स्फूर्त आणि अुत्तेजित करून त्यांना समसंवेदक बनविणारी मर्मस्थ ज्ञानशलाका म्हणजे संस्कृत भाषा होय. ही काही भाषाच आहे असे नाही. पुष्कळ हिंदूंना तो अेक मंत्र आहे. सर्वांना ते अेक संगीत आहे.[५]

सावरकरांना प्राकृत भाषेचाही अभिमान आहे याचे कारण ती संस्कृत भाषेची सर्वांत वडील मुलगी आहे. ही प्राकृत 'हिंदी' म्हणजे पूर्वीचे 'सिंधू'

---

१. श्रद्धानंद दि. २९–२–१९२८. २. सा. सा. भाग १–पृ. १२९. ३. सा. सा. भाग ५–पृ. ८४–८५. ४. हिंदुत्व पृ. ३८. ५. हिंदुत्व पृ. ९०–९१.

अथवा 'हिंदू' यांच्या वाङ्मयाचे व राष्ट्रीयपणाचे जे वंशज त्यांची भाषा होय असे सावरकर मानतात.[१]

संस्कृत, प्राकृत किंवा देशी भाषांचा विचार सावरकर राष्ट्रीय ऐक्याच्या संदर्भात करतात असे दिसून येते.[२] या सगळ्यांचा संकलित परिणाम त्यांच्या लेखन-शैलीवर झाला आहे. त्यांच्या भाषाशुद्धीच्या आग्रहाचा अुगमही याच निष्ठांत आणि प्रेरणांत आहे. अुर्दूवाचून मराठीत वीररस अुत्पन्न होअू शकत नाही या समजुतीचा ते यामुळेच धिक्कार करतात आणि बजावतात की, चंद्रगुप्ताची साम्राज्ये आणि विक्रमाचे विजय ज्या हिंदुभाषेत शासिले गेले, योंजिले गेले आणि लढले गेले, त्या हिंदुभाषासंघापैकी कोणत्याही भाषेत वीररसोत्पादक शब्दच नाहीत आणि तिला वीररसासाठी मुसलमानी शब्दांची लस अंगात टोचून घेणेच प्राप्त आहे असे समजणे... वीरांना तरी शोभणारे नाही.[३] भाषाशुद्धीचे कार्य चालवितानाही आपण हिंदूंची वैभवशाली परंपराच चालवीत आहोत ही जाणीव सावरकर विसरू शकत नाहीत. म्हणूनच त्यांनी 'आज पेशवाअी असती तर' या निबंधात म्हटले आहे : " ... अितर कोणत्या पुण्याअीसाठी नसले तरी निदान बिचाऱ्या भाषाशुद्धीच्या कार्यासाठी तरी रघुनाथपंडितांच्या हाताशी शिवाजीने आम्हांस राखून ठेवले असते." प्रथम स्वकीय भाषेचा अभिमान व मग त्यातून भाषाशुद्धीचा आग्रह असा त्यांच्या भाषाविषयक मतांचा क्रम सांगता येअील. पुढे या आग्रहाचाही अतिरेक झाला आणि त्याचा परिणाम केवळ त्यांच्या शैलीवरच झालेला नाही, तर निबंधरचनेवरही झाला आहे. या दृष्टीने त्यांचा 'क्ष किरणां'तील संहावा निबंध अभ्यसनीय आहे. कामकोटीचे शंकराचार्य आणि म. गांधी यांच्या विचारांचा व देवभोळेपणाचा परामर्श घेताना त्यांच्या निबंधात अचानक विषयांतर झाले आहे. मूळ विषयाचे विवेचन करताना 'ओघातच आलेल्या 'अुच्चांक' शब्दाचे बारसे त्यांनी त्याच निबंधात साजरे केले आहे.[४] आणि निबंधाची अखेरी 'रेकॉर्ड' व 'कायदा' या शब्दांना स्वभाषेतील प्रतिशब्द देण्यात केली आहे. निबंधाच्या रूढ अशा रचना-तंत्रापेक्षा येथे व्यक्तीच्या निष्ठा, त्याचे आग्रह यांनाच अधिक महत्त्व आहे.

सावरकरांच्या निबंधातील भाषाशैलीतून त्यांच्या व्यक्तित्वाची सर्व वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसून येतात. स्वकीय शब्दांचा आग्रह हा त्यांच्या भाषा-शैलीचा पहिला विशेष होय. असे शब्द वापरताना कधी ते शब्द सावरकर संस्कृत वा देशी भाषांतून घेतात तर कधी ते स्वतःच घडवितात. या दृष्टीने

---

१. हिंदुत्व पृ. ३८. २. हिंदुत्व पृ. ३९. ३. श्रद्धानंद दि. २३-६-२७.
४. क्ष-किरणे पृ. ६७.

त्यांच्या निबंधातून दिसणारे पुढील काही शब्द पाहण्यासारखे आहेत :— वाक्पीठ (Pla tform), व्यासपीठ (Pulpit), मुद्रापीठ[1] (Press), ध्वनिक्षेप ध्वनिलेख, प्रकल्प, अुच्चांक, हुतात्मा, जुळारी, विश्वस्त, अद्ययावत, बोलपट, विधिमंडळ धर्मकार (Law-giver), निर्बंध (कायदा), निर्बंधशास्त्र, निर्बंध पंडित, नैर्बंधिक,[2] जनिक (Public), दायित्व, भ्रमिष्टालये, तालिका, मृतपत्र (Dead letter), अस्थिशेष, (Fossils), चेतावणी (Caution), नागरविधान, दंडविधान, सैनिकविधान,[3] नौसाधन, स्थिरटंकी, अेकस्व (Monopoly), छेदक, निक्षेप-पत्र (Trust-deed), प्रतिलिपी (Copy), शोधज्योत, प्रपीडिक (Tyranical), टोच (Injection),[4] प्रतिवाद, मुखबंद (Memorandom), विधेये (Points),[5] निर्वाचन, क्षारपरीक्षा (Acid-Test), विविधविक्रेता (General Merchant), अनुरोध (शिफारस) वीजगोलक, टंकलेखक, स्वयंटंकक, अुपनेत्र (चष्मा), निष्पीडन (Exploitation),[6] यंत्रज्ञ-यंत्रशिल्पी, पाठ (फॉर्म्युला), दूरदर्शक (Television), हातचमक (Hand-Battery), प्रतिमूल्य, घरधनी (मालक), परिपत्र (Circular), प्रसिद्धिके (जाहिराती), वक्तव्य (जवानी), आलेख्य (नकाशा), चमक (Battery),[7] कलागृह (Studio)[8], दृश्यपालट (Transfer-Scene).

स्वकीय शब्दांप्रमाणेच नामावरून क्रियापद साधण्याच्या आग्रहामुळे सावरकरांच्या शैलीला पृथगात्मकता आली आहे. मराठीतील क्रियापद-दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्नशील होण्याचा संदेश त्यांनी मुंबअीस भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून दिलेला आहेच. तो संदेश देण्यापूर्वी सावरकरांनी स्वत: आपल्या लेखनात क्रियापद-दारिद्र्य दूर करण्याचा कटाक्षाने प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांच्या निबंधांत दिसून येणारी पुढील काही क्रियापदे पाहा :

पारंगततेल, तरवारली, नष्टेल, निषेधला, अग्रेसरली, जिज्ञासला, आव्हानावे, प्रसिद्धिली, निर्मळावे, पवित्रावे, प्रचलविले, अंतर्धानले, समर्थिते, अुत्तरेल, अनुवादिले, नष्टणार, आंघोळणे, स्वागतितात, आविर्भवली, अुद्भावली, दुबळा विते, अुपदेशावे, चक्करला, आशीर्वादिले, प्राणविले, प्रदक्षिणावे, विवाहावे,

---

१. क्ष–किरणे पृ. ४६. २. क्ष–किरणे पृ. ५९, ६०, ६७, ६८, ६९. ३. क्ष–किरणे पृ. ७३, ७४, ८२, १२४, १४९, १५४, ४, १२. ४. जाति. नि. पृ. ७, ३८, ५६, ७३, ८३, ११५, १८७, २२७, ३११. ५. जाति. नि. पृ. २९०, २९२. ६. सा. सा. भाग २ – १२, १३, ६३, ७६,. ७. सा. सा. भाग ३– पृ. १२, १३, २७, ३४, ५३, ६२, १०१. ८ .सा. सा. भाग ४–पृ. ४२, ११७.

दूरवावा, धन्यवादील, कत्तलवून, नामशेषिले, निर्णयिले, प्रश्नतील, विलीनला, आनंदविते.

विषयावद्दलचा अभिनिवेश आणि प्रचारकी वृत्ती यांमुळे सावरकरांनी आपल्या लेखनात क्रियापद, विशिष्ट शब्दक्रम, वाक्य, विचार आणि विषय यांची पुनरुक्ती केल्याचे दिसून येते. क्रियापदांची ही पुनरुक्ती करतानाही सावरकर त्या क्रियापदांना 'च' जोडून त्याची परिणामकारकता अधिकच वाढवतात. अुदाहरणार्थ 'मिळेलच मिळेल', 'असताच असता' (भाग ३) 'राखीलच राखील', 'ठेवणारच ठेवणार' (भाग ३) 'धैर्य होतेच होते' (भाग २) 'होणारच होणार', 'घडणारच घडणार', 'आहेच आहे', 'येतोच येतो' (भाग १) 'सुधारणा होतेच होते', 'रूढी तुटतेच तुटते' (भाग ५), 'वाटणारच वाटणार', 'जाणारच जाणार' (जा. नि.), 'नाहीच नाही' (हिंदुत्व), 'असतोच असतो', 'पावतेच पावते', 'प्रसादतेच प्रसादते', 'जाअीलच जाअील' (क्ष किरणे) अित्यादी.

पुनरुक्ती : आपले विवेचन अधिक परिणामकारक व्हावे म्हणून सावरकर अनेक वेळा विशिष्ट शब्द आणि वाक्ये यांची नाट्यपूर्ण पुनरुक्ती करताना दिसतात. 'जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' सांगताना समाजाचा देह पोखरणारे जातवेड किती भयंकर आहे याची कल्पना ठसविण्यासाठी त्यांनी लिहिले आहे : "आजही हे सात कोटी अस्पृश्य, मुसलमानांच्या संख्याबलाअितकेच हे संख्याबल, अेखाद्या तुटलेल्या हाताप्रमाणे निर्जीव होअून पडले आहे– या जातवेडाने ! कोट्यवधी हिंदू बाटले जात आहेत– या जातवेडाने ! हे ब्राह्मणेत्तर, हे सत्यशोधक फुटून निघाले– या जातवेडाने."[1] 'हिंदू' हे अभिधान आपल्या लोकांच्या अेकजातीयत्वाचे पूर्ण दिग्दर्शन करू शकते हे विधान परिणामकारकरीत्या पटवून देण्यासाठी सावरकरांनी जे वर्णन केले आहे त्यांत 'आपण सर्व हिंदूच आहोत व अेकाच रक्ताचे आहोत' ही वाक्यसंहती पुनरुक्त करून अिष्ट तो परिणाम साधलेला आहे.[2]

केवळ क्रियापद, शब्द, वाक्य अेवढ्यापुरतीच ही पुनरुक्ती मर्यादित नाही, तर विषय, विचार, कल्पना, अित्यादी बाबतींतही सावरकर पुनरुक्ती करताना दिसतात. आपली विधेये वाचकांच्या चित्तावर ठसावी म्हणून ती आपण पुनरुक्त करतो असे स्वतः सावरकरच सांगतात.[3] अशी पुनरुक्ती करण्यामागील आपली भूमिका त्यांनी कलकत्त्याच्या अध्यक्षीय भाषणात अधिक स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, "सर्व लोकसमुदायाच्या मनोवृत्तीला आपल्याला पाहिजे असे रूप

---

१. जाति. नि. पृ. ९–१०. २. हिंदुत्व पृ. ८०–८१. ३. जाति. नि. पृ. २४०.

द्यावयाचे तर अेखाद्या सत्याचा अगणित वेळा पुनरुच्चार हेच साधन होय असे म्हणता येअील."[१]

सावरकरांच्या निबंधांचे बहुतेक विषय त्यांची हिंदुत्वनिष्ठा, विज्ञान-निष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा, बुद्धिनिष्ठा. अित्यादी निष्ठांच्या परिघात फिरताना दिसतात आणि हे विषय सजविण्यासाठी सावरकरांनी दिलेली अुदाहरणेही तीच तीच असल्याचे आढळून येते. त्यांच्या विज्ञाननिष्ठ निबंधांत यज्ञसंस्थेसंबंधी केलेले विवेचन आणि 'सावरकर' साहित्य भाग २ मध्ये केलेले विवेचन त्याच अुदाहरणांनी सजविलेले आहे.[२] भाग तीन मधील 'शिवाजीचे आजच्या कर्त्या पिढीला अजीर्ण झाले आहे' हा विचार पूर्वी 'तेजस्वी तारे' या चरित्रग्रंथात मांडून झालेला आहे.[३] यहुद्यांनी मोसेस प्रभृतींचा अुपदेश घुडकावून वृषभपूजा, गोपूजा चालू ठेवली हे अुदाहरण दोन, तीन वेळा दिले आहे.[४] परदेशगमनबंदीचे परिणामही त्यांनी अनेकदा विशद केले आहेत.[५] अनुवंशासंबंधी विचार व्यक्त करताना 'पांडवांच्या कुलाचे अुदाहरणच' त्यांनी वारंवार दिले आहे.[६] 'धर्म' शब्दाचा खरा अर्थ सावरकर साहित्याच्या पहिल्या भागात आणि जातिभेदोच्छेदक निबंधात अेकाच पद्धतीने सांगण्यात आला आहे.[७]

अुपहास–अुपरोध :– सावरकरांच्या भाषाशैलीचा आणखी अेक विशेष म्हणजे त्यांचा प्रतिपक्षाला घायाळ करणारा तीक्ष्ण अुपहास आणि अुपरोध होय. अुपहासापेक्षाही त्यांचा अुपरोध अधिक तीक्ष्ण असतो. येथेही व्यक्तित्वानुसारच त्यांच्या अुपरोधाच्या विषयांची निवड झालेली दिसून येते. व्रते व व्रतविधी, धर्म-भोळेपणा वा देवभोळेपणा, सनातनी लोक आणि धर्मभोळेपणाचा प्रचार करणाऱ्या व्यक्ती, राजकीय प्रतिस्पर्धी अित्यादी विषयांवर व व्यक्तींवर त्यांनी अुपरोधाचे हत्यार चालविल्याचे दिसून येते.

सावरकरांचा अुपरोध मुख्यतः त्यांच्या बुद्धिनिष्ठेतून जन्मलेला आहे आणि स्वमतविरोधी विचारांतील हास्यास्पदता अुघडकीस आणून त्या विचारांचे विध्वंसन करणे हा त्याचा हेतू असल्याचे दिसून येते. धर्मभोळेपणा वा देवभोळे-पणा यांवर सावरकरांनी शस्त्र धरले आहे. त्यामुळे या देवभोळेपणाची अुप-लक्षणे झालेल्या गाय, वड, तुळस, यज्ञ, व्रते, ग्रह अित्यादी गोष्टींवर त्यांच्या अुपरोधाचे शस्त्र अत्यंत तीव्रतेने चालते.

---

१. हिं. द. पृ. १०७. २. भाग २ – पृ. १०–११. ३. भाग ३ पृ. ३५. ४. क्ष–किरणे पृ. १३–१४, ४०. ५. क्ष–किरणे पृ. १५६ व जाति. नि. पृ. ८, ९. ६. हिंदुत्व पृ. ७९ व जाति. नि. पृ. ५३, ५४. ७. सा. सा. भाग १ – पृ. २४; जाति. नि. पृ. १२, १३, १४.

पोटावर सरपटत जाण्याचा नवस पाहून बुद्धिवादी सावरकरांना तो मानवाचा अधःपात वाटतो. म्हणून ते अुपरोधिकपणे म्हणतात, "माणसाने किडा होण्यातच खरी माणुसकी आहे हे देवाच्या देखील आता ध्यानात येअील अशी आशा आहे."[1] रामनाम लिहिलेल्या अकरा लक्ष चिठ्ठ्या सुगंधी पिठाच्या गोळ्यागोळ्यांतून घालून गंगेस अर्पण करण्याच्या आणखी अेका बैठ्या व्रतातील हास्यास्पदता ते पुढील अुपरोधिक वाक्यांतून प्रकट करतात, :– "रामाचा पत्ता जरी त्या चिठ्ठ्यांवर संस्कृतमध्ये लिहिलेला असला तरी माशांस वा बेडकांस संस्कृत येत असल्याचे वा तो पत्ता वाचण्याअितका साक्षरतेचा प्रसार झाल्याचे फारसे अैकिवात नसल्यामुळे, त्या पिठाच्या गोळ्या त्या बेडकांच्या नी माशांच्या पोटांत पडणार, देवाकडे कशा जाणार? देवाकडची पत्रे टाकण्याच्या बेडकांची नी माशांची पोटे ह्या पोस्टाच्या पेटच्या आहेत की काय?"[2]

गाअीसंबंधी लिहिताना सावरकरांच्या अुपरोधास अशीच धार चढते. गाअीच्या शरीरातील देवांच्या गर्दीचे वर्णन ह्या दृष्टीने पाहण्यासारखे आहे.[3] ह्या वर्णनानंतर ते लगेच अुपरोधिकपणे विचारतात, "..... जेव्हा तो कसाअी ह्या देवतेस सुऱ्याच्या अेका वारासरशी ठार करतो तेव्हा तिच्या शरीरात राहणाऱ्या या तेहतीस कोटी देवांपैकी अेकही मायेचा पूत पुढे सरसावून त्या कसायाला शिक्षा का करीत नाही?..... की देव त्यांच्या भजकांसारखेच मुर्दाड झालेले आहेत?"[4] गोभजकांनी गोस्तुती हा 'अतिदुर्घट' विषय जागतिक स्पर्धेसाठी निवडल्याचे सांगून त्यांच्यावर अुपहासात्मक टीकाप्रहार सावरकर करतात. ते लिहितात, "प्रथम गाय ही बैलांची राज्ञी होती. पुढे काही गोशाळांतील गोठ्यांची राज्ञी झाली. आता तिचे साम्राज्य वाढता वाढता ती 'श्रीमती गोमाता' 'विश्वाची अनभिषिक्त राज्ञी' झाल्याची ताजी तार आली आहे."[5] गोग्रासासंबंधी असेच अुपहासात्मक वर्णन त्यांनी केले आहे.[6] 'ज्याची महामाता धेनू आहे तो हिंदू' अशी हिंदुत्वाची व्याख्या करणाऱ्या 'भाला'कारांना सावरकर अुपरोधिकपणे अुत्तरतात, "धेनू जर कोणाची खरोखरीच महामाता असेल तर ती बैलाची होय."[7]

---

१. क्ष–किरणे पृ. ४. २. क्ष–किरणे पृ. ६. ३. क्ष–किरणे पृ. ४.
४. क्ष–किरणे पृ. २०. ५. क्ष–किरणे पृ. ८१. ६. सा. सा. भाग १ – पृ. ७१–७२. ७. क्ष–किरणे पृ. २०.

संक्रांत, सटवाअी-जिवतींची पूजा, ग्रहणे, यज्ञ अित्यादी गोष्टींत दिसून येणाऱ्या देवभोळेपणाची भंबेरी सावरकर या अुपरोधाच्या साहाय्यानेच अुडवितात. संक्रांतीच्या विक्षिप्त, तिरकस चालण्याच्या पद्धतीचा अुपहास करताना ते लिहितात, "अेकीकडे जाताना भलतीकडेच पाहात ठोकरा खाणाऱ्या आजच्या हिंदुमनोवृत्तीची ती (संक्रांत) सुयोग्य ध्येय आहे." संक्रांतीच्या स्वरूपाचे पंचांगामध्ये असणाऱ्या वर्णनाची चेष्टा करण्यासाठी ते लिहितात, "मकर संक्रमण या घटनेला नाक आहे. अुद्या गुरुत्वाकर्षणाला केस आहेत नी त्याला कामिनीया तेल लावलेले आहे असे सांगून अेखादे अद्ययावत दैवत कोणी पुजू लागल्यास काही हसावयास नको."[१] संक्रांतीच्या वाहनावर अुपरोधिकपणे विचार व्यक्त करताना सावरकर लिहितात, "संक्रांतीचे वाहन गाढव आहे. असल्या कल्पनेला वाहून नेण्यास बैलदेखील आपल्या शहाणपणास कमीपणा आणणारे मानीत असावा."[२] 'यंत्र' या निबंधात त्यांनी डॉक्टरी शस्त्रे पाहून गर्भगळित होणाऱ्या सटवाअीचे अुपहासगर्भ वर्णन केले आहे. ग्रहपूजेसंबंधीच्या आचारांची चेष्टा करताना ते विचारतात, "शनी पोथीने प्रसन्न होतो तर सडकेवरचा हा घासलेटी कंदील कोण्या कंदील महात्म्याने का प्रसादू नये?"[३] वडाला प्रदक्षिणा घालण्याच्या व्रतातील हास्यास्पदतेचा परिस्फोट करताना त्यांनी अशी विनोदी कल्पना केली आहे की, वडास प्रदक्षिणा घालण्याच्या व्यावहारिक अुपयोगासाठी महिलेच्या कमरपट्ट्यास घाण्याची साखळी जोडावी व येअील ते तेल दान करावे.[४] सुतकातील निरनिराळ्या वस्तूंच्या दानातही असाच हा विक्षिप्तपणा त्यांना दिसून येतो. म्हणून ते लिहितात, "त्यावेळी सायकली नव्हत्या, नाहीतर मृतास परलोकीच्या सडकांवरून झटपट जाता यावे, यास्तव भटास अेकेक सायकल द्यावी असेही वचन गरुडपुराणातील सुतकशास्त्रात सापडू शकेल."[५] शंकराचार्यावर टीका करतानाही त्यांचा अुपहास यत्किंचितही बोथट होत नाही आणि दिवसा मशाल लावून चालणाऱ्या शंकराचार्यासंबंधी ते चटकन लिहून जातात की, या सकलशास्त्रपारावर पारिणांना दिवसासुद्धा मशालीवाचून दिसत नाही.[६] प्रेत वाहून नेण्याच्या ठराविक वेदकालीन पद्धतीचा त्यांनी अत्यंत बोचऱ्या शब्दांत अुपहास केला आहे. त्यांनी लिहिले आहे : "... वांबूच्या ठराविक चिपट्या, ठराविक गाठी मारून जी केली आहे, जी लचकत करकचत कधी मधेच मोडते आहे, त्या पाचहजार वर्षांपूर्वीच्या

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. ६२. २. सा. सा. भाग २ – पृ. ६२. ३. सा. सा. भाग २ – पृ. ६४. ४. सा. सा. भाग २ – पृ. ८४. ५. सा. सा. पृ भाग ४ – पृ. १६. ६. सा. सा. भाग २ – . १२.

तिरडीवर, आपले विद्रूप तोंड अुघडे टाकून नको नको हे हाल म्हणत ज्याची मान लुटलुटत सारखी नन्ना करीत आहे त्या प्रेतास; घरी गवरीचे खांड पेटवून तोच अग्नी त्या मडक्यात घालून, ते शिके हाती धरीत, अुघड्याबोडक्याने स्मशानापर्यंत जीत आप्तेष्ट नेत आहेत ती प्रेतयात्रा कितीही गैरसोयीची असली तरी पुण्य. कारण ? ती श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे.''[1]

जातिभेद, अस्पृश्यता हे विषयही सावरकरांच्या अुपरोधाचे विषय वनलेले आहेत. व्यवसाय आणि आहारविशिष्ट जातिभेदांवर त्यांनी केलेली टीका या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ते लिहितात, ''नुसत्या लेखणीने लिहिणाऱ्या ब्राह्मणांची अेक जात करून टंकलेखकाने (Type-writer) लिहिणाऱ्या ब्राह्मणाची दुसरी जात करावी आणि जात म्हणजे अर्थातच बेटीवंद, रोटीवंद, चिरेवंद ! 'आगगाडीय' ब्राह्मणाची अेक जात आणि 'मोटारीय' या ब्राह्मणांची दुसरी. न्हाव्यांतही जुन्या स्थिर-पाती वस्ताऱ्याने स्मश्रू करणारांची – पूर्वीची सनातन धोकटीची – अेक जात करून, नवीन विलायती वस्त्याने आणि केशकर्तक यंत्राने स्मश्रू करणाऱ्यांची दुसरी जात करावी.''[2] आहारविशिष्ट भेदोत्पादक तत्त्वातील तर्कदृष्टता दर्शविण्याकरिता त्यांनी लिहिले आहे की,... ''मांसाहारातही मासे खाणाऱ्या ब्राह्मणांची अेक जात तर कोंबडी खाणाऱ्यांची दुसरी, बोकड खाणाऱ्यांची तिसरी. त्याच क्रमाने आणि तत्त्वाने कांदे खाणाऱ्या सुनेची अेक, वटाटे खाणाऱ्या सासूची दुसरी आणि लसूण खाणाऱ्या मुलाची तिसरी झाली नाही अेवढेच सुदैव.''[3]

'पुण्यातील तीन हजार मंबाजीबुवा' हा संपूर्ण निबंध अस्पृश्यतेवरील अुपरोधाचे अुत्कृष्ट अुदाहरण होय. या दृष्टीने या निबंधातील पुढील काही वाक्ये वाचनीय आहेत. ''(अस्पृश्य) म्हणत की, निदान ख्रिश्चनादिक अहिंदू जेथपर्यंत येतात तेथपर्यंत तरी आम्हांस येअू द्याच. आता ख्रिश्चनांची राज्ये आहेत. त्यांच्यापाशी मशिनगन्स आहेत. पण या नीच हिंदू अस्पृश्यांपाशी काय आहे ?''[4] ''मूर्तिभंजकांच्या देवालय-प्रवेशास अडथळा करण्याअितके काही आम्ही सनातन धर्माभिमानी परमतासहिष्णू नाही, रानटी नाही, हिंसक नाही, हट्टी नाही, हे त्या अेका औरंगजेबाने फोडलेल्या आमच्या काशीविश्वेश्वरास तरी ठाअूक आहे.''[5] ''आणीबाणीचा तो संग्राम जेथे नंदी आहे त्याच स्थली, नंदीच्या

---

१. सा. सा. भाग २ – पृ. १४–१५. २. जाति. नि. पृ. २१–२२. ३. जाति. नि. पृ. २२. ४. जाति. नि. पृ. ९९. ५. जाति. नि. पृ. ९९.

देवळापाशीच आम्ही मांडला. कारण अशा विकट प्रसंगी योग्य ती सद्‌बुद्धी आणि चातुर्य आमच्या हृदयांत संचारित करणारी ह्या आमच्या सनातन धर्माच्या नंदी देवतेवाचून दुसरी कोणती देवता असणार ? "[1]

विनोद : सावरकरांच्या शैलीतील अुपहास-अुपरोधाचा विचार करताना त्या विशेषांच्याच अनुषंगाने निर्माण होणाऱ्या, किंबहुना त्या अुपहास-अुपरोधावरच अधिष्ठित असलेल्या त्यांच्या विनोदाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. सावरकरांच्या विनोदाची निर्मिती ही त्यांच्या व्यक्तित्वानुसारच झाली आहे हेही दिसून येते. धर्मभोळेपणा, देवभोळेपणा, हे विषय आणि अशा धर्मभोळेपणाचा पुरस्कार करणाऱ्या व्यक्ती नि सनातनी वर्ग ही सावरकरांच्या विनोदाची अुगमस्थळे होत.

धर्मभोळेपणावर त्यांनी केलेला अुपरोधमिश्रित विनोद आपण पूर्वी पाहिलेला आहे. म. गांधी, केडगावचे महाराज, शंकराचार्य, गो. म. जोशी, अित्यादी व्यक्तींवर सावरकरांनी अशीच अुपरोधपूर्ण विनोदमिश्रित टीका केली आहे. म. गांधींची अहिंसा ही सावरकरांच्या टीकेचे मुख्य लक्ष्य होय. 'अुंदरांना माणसाअितकाच जगण्याचा हक्क आहे' या गांधींच्या अुद्‌गारावर सावरकरांनी केलेली टीका लक्षणीय आहे.

केडगावच्या महाराजांनी दोन हजार सत्यनारायण करण्याचा संकल्प जाहीर करताच सावरकरांनी मिस्किलपणे लिहिले, "सत्यनारायणाच्या पोथीत अेकेका सत्यनारायणासरशी अेकेका राजाने आपले गेलेले अेकेक राज्य परत जिंकले अशा कथा आहेत. सत्यनारायणाचा हा प्रताप माहीत असलेल्या युरोप अमेरिकेला अेका सत्यनारायणाने अेक राज्य या दराने दोन हजार सत्यनारायणांनी किती, हेच त्रैराशिक सहज सुचले आणि आता आपल्या राष्ट्राचे होणार तरी काय, केडगावकर किती राज्ये जिंकणार, म्हणून ते थरकापू लागले."[2] शंकराचार्यांना दिवसासुद्धा मशालीवाचून दिसत नाही, असा चेष्टेखोरपणा करण्यासही ते विसरत नाहीत. 'गोरक्षक की गायाळ ?' या निबंधात त्यांच्या अुपरोधपूर्ण विनोदाला, मूळ विषयामुळे आणि नंतर श्री. गो. मं. जोशी यांच्यावरील टीकेमुळे खूपच धार चढते; आणि प्रत्येक परिच्छेदाचे पालुपद 'समाजशास्त्रज्ञ श्री. गो. म. जोशी, बी. अे. (ऑनर्स) या शब्दसंहतीने त्यांनी तयार केल्याचे आढळून येते.[3]

---

१. जाति. नि. पृ. १०० २. क्ष–किरणे पृ. ८४ ३. क्ष– किरणे

सनातनीवर्ग आणि बुद्धिमत्ता यांची फारकत दाखविण्यासाठी ते प्रसंगी विनोदाचा अुपयोग करतात. लोणी येथील सनातन धर्मपरिषदेत सनातन्यांनी केलेल्या बुद्धिहीन ठरावावर टीका करताना सावरकरांनी लिहिले आहे : "क्वचित असेही असेल की ती धर्मपरिषद बोलून चालून श्रद्धानिष्ठांचीच असल्यामुळे बुद्धीला तिचे सभासद होता आले नसावे."[१]

अशा रीतीने सावरकरांच्या निबंधांतील विनोद हा मुख्यत: विषयनिष्ठ आहे. क्वचित त्यांच्या विनोदाची निर्मिती रागद्वेषातूनही झालेली दिसते. म्हणूनच त्यांचा विनोद हा निर्भेळ व निर्मळ नाही. त्यांच्या व्यक्तित्वानेच तो रंगलेला आहे.

शब्दनिष्ठ विनोदानेही त्यांच्या शैलीला क्वचित शोभा प्राप्त होते. 'तोंडचे पाणी पळणे',[२] 'पाठीस लागणे',[३] 'हात धुअून पाठीस लागणे',[४] 'नाक मुरडणे',[५] 'नाक वर करणे',[६] अित्यादी वाक्प्रयोगांच्या साहाय्याने अशा प्रकारचा शब्दनिष्ठ विनोद साधताना ते दिसतात. कधी कधी 'पंचगव्या'प्रमाणे पंचगाढव्य' असा शब्दप्रयोग करून तेविनोद साधण्याचा प्रयत्न करतात. 'अुतारे' या शब्दावर श्लेषात्मक विनोद साधण्यासाठी ते लिहितात, "गोरक्षण संप्रदायाच्या भाकडपणाच्या बुद्धिभ्रंशरोगावर ते (आमचे) अुतारेच खरे 'अुतारे' आहेत."[७] सनातन्यांवर त्यांनी केलेल्या टीकेच्या कठीण कातळातून शब्दनिष्ठ विनोदाची अेखादी लहानशी धारा चमकताना दिसते. स्त्रियांना नद्यांची नावे देणे त्याज्य होय, असे मनुस्मृतीत सांगितले असूनही सनातनी तसे करीत नाहीत हे सांगताना सावरकर लिहितात, "पण आमच्या सनातनबंधूंच्या घरोघर गंगा, गोदावरी, सिंधू, कृष्णा, कावेरी, नर्मदा, यमुना दुथडी भरभरून वाहात आहेत. नक्षत्रनामे मनू अशीच अग्राह्य मानतात. पण आमच्या घरादारांत 'रोहिणी' दिवसाढवळ्या देखील सारख्या चकाकत आहेत."[८] मनुस्मृतीप्रमाणे ज्या मुलींची अशी निषिद्ध नावे एकदा ठेविली त्या जन्मभर लग्नास निषिद्ध ठरतात हा विचार सांगताना ते पुन्हा लिहितात, "...म्हणजे साऱ्या अुपवर गंगा, गोदा, भागीरथीचे प्रीतिजीवन आजच्या आज आटून जाणार ! साऱ्या अुपवर ज्योती मावळणार !

---

१. सा. सा. भाग २ – पृ. ११४. २. सा. सा. भाग २ – पृ. ४४. ३. सा.सा. भाग २ – पृ. २६. ४. सा. सा. भाग २ – पृ. २६. ५. सा. सा. भाग ४ – पृ. १८. ६. सा. सा. भाग ४ – पृ. १८. ७. क्ष–किरणे पृ. १५०. ८. सा. सा. भाग ४ – पृ. १०३.

ग्रंथ संग्रहालय, ठा... ... ...
वि: .....
दिनांक.... .....
नो: वि: .....

चंपावतीची आशा जळून खाक होणार. आमच्या भिमीलाच काय पण धोंडीला देखील पाझर फुटून त्या धायधाय रडू लागणार. "[१]

सुभाषिते : सावरकरांच्या लेखनातील सुभाषिते ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची सूत्रेच असतात. सावरकरांचे तत्त्वज्ञान मुख्यतः सामर्थ्यवादावर अुभे आहे. 'जगामध्ये खवळलेल्या प्रचंड जीवनकलहात सामर्थ्यसंपन्नांचाच टिकाव लागणार' असा त्यांचा ठाम सिद्धान्त आहे.[२] 'भविष्यकाळी संरक्षणाचा केवळ अेकच मार्ग म्हणजे शौर्य आणि बल हाच होय' असा त्यांचा विश्वास आहे.[३] 'नुसत्या नीति-नियमांनी जे साध्य करता आले नाही ते शौर्याने घडून आणले गेले' असा अितिहासाचा निष्कर्ष ते सांगतात.[४] 'भौतिक जगातील विजय भौतिक सामर्थ्यानेच मिळतात' अशी त्यांची श्रद्धा आहे.[५] 'मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल ते चांगले, प्रतिकूल ते वाअीट' अशी मानवहित-दृष्टी त्यांच्या ठायी आहे.[६] विज्ञाननिष्ठेमुळे धर्माकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनच बदललेला आहे आणि म्हणून त्यांच्या मते 'जे सृष्टि-नियम विज्ञानास प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगान्ती सर्वथैव अबाधित, शाश्वत, सनातन असे आढळून आले आहेत, तेच काय ते खरे सनातन धर्म होत."[७] त्यांची धर्मदृष्टी केवळ विज्ञानाधिष्ठित नाही; तर ती मानवहिताधिष्ठितही आहे. म्हणूनच ते म्हणतात, "मनुष्यहितास अवश्य ती हिंसाच मनुष्यधर्म."[८] धर्माच्या कर्मकांडाचा – यज्ञाचा विचारही ते याच भूमिकेवरून करतात. पण मनुष्यहित व हिंदुहित हे परस्परावलंबी असल्याचे ते मानीत असल्याने लगेच सांगतात की, 'ज्या परिस्थितीत हिंदुराष्ट्राच्या धारणेस नी अुद्धरणास जे कृत्य प्रत्यक्षपणे लाभदायक नी अवश्य असेल ते संपादणे हाच त्या परिस्थिती-तील यज्ञ.'[९] विज्ञाननिष्ठेतून त्यांची यंत्रनिष्ठा जन्म घेते. त्यांना 'विज्ञानाची व्यष्टी, व्यक्ती म्हणजेच यंत्र' वाटते.[१०] आणि 'देवभोळेपणा घटतो त्या मानाने यंत्रशीलपणा वाढतो' अशी साक्ष त्यांचे बुद्धिवादी मन देते.[११] मानवी श्रेष्ठतेवर त्यांची श्रद्धा असल्याने 'यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीने अधिक कार्यक्षम झालेले मनुष्याचे अेकेक अिंद्रियच आहे' हा विचार त्यांना अभिमानास्पद वाटतो.

---

१. सा. सा. भाग ४ – पृ. १०४. २. हिंदुत्व पृ. १३५. ३. हिंदुत्व पृ. २५. ४. हिंदुत्व पृ. २३. ५. हिंदुत्व पृ. २१. ६. सा. सा. भाग १ – पृ. ९. ७. सा. सा. भाग १ – पृ. ३१. ८. सा. सा. भाग १ – पृ. ५४. ९. सा. सा. भाग १ – पृ. ६०. १०. सा. सा. भाग २ – पृ. ५१. ११. सा. सा. भाग २ – पृ. ४५.

त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाला 'शक्यतेचा मूळ अुगम आकांक्षेतच असणार' या विचाराचा साक्षात्कार होतो.[१] आपत्तींनी भरलेल्या त्यांच्या जीवनाचे सार कधी शब्दरूपाने व्यक्त करताना ते स्वत:च सांगतात, "आपत्तीच कधी आरोग्यप्रद असते, रामवाण औषध होते."[२] सोवळ्या-ओवळ्यापायी आम्ही हिंदूंनी राज्ये गमाविली म्हणून हळहळणारे त्यांचे हिंदु-मन सूत्ररूपाने सांगते, "ह्या मुकट्या-पायी (आम्ही) मुकुट दवडले."[३]

वक्तृत्व : सावरकरांच्या प्रचारकीवृत्तीमुळे त्यांच्या शैलीत जसा विलक्षण अभिनिवेश आला आहे त्याप्रमाणेच तीत वक्तृत्वगुणही निर्माण झाला आहे. त्यांच्या निबंधाच्या हेतूमागे अनेक वेळा तत्त्वचिंतनाची बैठक दिसत नाही. ते बहुधा नैमित्यिक विषयांवर लिहिलेले व प्रत्युत्तरात्मक आढळतात. आगरकरांच्या निबंधांतील विषयांची व्यापकता येथे नाही. येथे विषय विशिष्ट निष्ठांच्या परिघात फिरणारे आणि विचारही पुनरुक्तीने प्रकट झालेले आणि मूळ व्यक्तित्वातील वक्तृत्वगुणांनी नटलेले. त्यातही वैशिष्ट्य असे की, हे वक्तृत्वही शिवरामपंत परांजपे यांच्या वक्तृत्वाप्रमाणे वक्रोक्तिपूर्ण असे फार थोडे, त्यात स्पष्टोक्तीच अधिक. श्री. न. चिं. केळकर यांनी शिवरामपंत परांजपे आणि सावरकर यांच्या लेखनशैलींतील फरक स्पष्ट करताना लिहिले आहे : "अेक वेळ मानवी पतिव्रतेचा अुरोज क्वचित अुघडा पडलेला दिसेल, परंतु शिवराम-पंताची राक्षसी विषकन्या कोणाला स्तनपान देअून मारावयाला आली असली तरी त्या मर्यादशीलतेचा पदर विदारण केल्याशिवाय त्यांचे तोंड त्या विषारी 'बोथी'ला लागणे शक्यच नव्हते. अुलट सावरकरांचे लिहिणे बोलणे असल्या अंगचोर पडदपोशीचे कधीही नव्हते. त्यांच्या कलेच्या रथाच्या निशाणावर 'या आणि पाहा' ही अक्षरे नसून 'येतो आणि दाखवितोच' अशी अक्षरे असावयाची! शिवरामपंतांच्या अवगुंठित, छद्मी व वहाणेदार लेखन-वक्तृत्वाने किती तरी भोळ्या मनांची फसवणूक होअून, त्यांच्या वाच्यार्थाच्या भुलभुलाअीत ती कोलमडून जाअून हास्यास्पद ठरली असतील ! पण, सावरकरांचे लिहिणे-बोलणे भोळ्या गोळ्याच्याही मनात आवेशाचा संचार करून त्याला पक्केपणा आणणारे असे."[४]

वाचकांच्या मनात हा 'आवेशाचा संचार' करण्याच्या हेतूनेच सावर-करांचे लेखन स्पष्टोक्तिपूर्ण वक्तृत्वाने नटलेले आहे. शिवरामपंत व सावरकर यांच्या व्यक्तित्वांतील वेगळेपणामुळेच मुख्यत: हा फरक पडल्याचे दिसून येते.

---

१. जाति नि. पृ. ७. २. सा. सा. भाग ३ – पृ. १०. ३. जाति नि. पृ. ९.
४. प्रतिभा १९३६.

या दोघांच्या व्यक्तित्वांतील, त्यांच्या ध्येयवादांतील, त्यांच्या प्रेरणांतील हा फरक डॉ. के. ना. वाटवे यांनी सोदाहरण स्पष्ट केला आहे. डॉ. वाटवे लिहितात, "अेके काळी शिवरामपंत हे सावरकरांच्या सुप्त शक्तीला स्फूर्ती देणारे त्यांचे गुरूही होते. पण सावरकरांचा पंतांनी अुपेक्षिलेला सामाजिक-सुधारणा-विषयक ध्येयवाद त्यांच्या राजकीय ध्येयवादाअितकाच अुत्कट व भव्य आहे. तें शिवराम-पंतांअितके काव्यात्म असले तरी त्यांची काव्यकल्पना अंतरिक्षातच संचारत न राहाता व्यवहाराच्या भूमीवर स्थिरावते. आपल्या कल्पनारम्य ध्येयांना प्रत्यक्ष व्यवहारात सगुण व साकार करण्याची कृतिशीलता त्यांच्यामध्ये आहे. ते ध्येय-वादाच्या काव्यमय अुन्मादात रंगतात, पण त्या अुन्मादाला व्यावहारिक रूप देण्याच्या प्रयत्नाकडे त्याच वेळी त्यांची योजकता जागरूकतेने वळलेली असते.... त्यांच्या चलनी नाण्यावर अेका बाजूस व्यवहार व वास्तवता आणि दुसऱ्या बाजूस ध्येयवाद कोरलेला आहे... निर्भेळ कल्पनारम्य ध्येयवादामुळे शिवरामपंतांचे काव्य अधिक मोहक व सरस वठले असले तरी सावरकरांच्या साक्षात कार्यप्रेरक-त्वाची धार त्याला नाही... निदान पंतांच्या ठायी ती (कार्यप्रेरकता) कमी असल्याने व सावरकरांच्या ठायी ती जास्त असल्याने दोघांच्या वाङ्मयांची घटना थोडी वेगळी वेगळी झाली आहे. अेवढे मात्र नमूद करणे क्षम्य होअीलसे वाटते... सावरकर आणि परांजपे यांच्या मनोरचनेतील हे मूलभूत साम्य-भेद त्यांच्या निबंध-शैलीतील सारखेपणाला आणि निराळेपणालाही कारण झालेले आहेत."[1]

सावरकरांच्या शैलीत वक्रोक्तीपेक्षा स्पष्टोक्तिपूर्ण वक्तृत्व अधिक का, याचे स्पष्टीकरण करण्यास वरील विवेचन पुरेसे होअील असे वाटते.

नाट्यमयता : सावरकरांच्या व्यक्तित्वातील नाट्यमयतेचाही परिणाम त्यांच्या निबंधांतील शैलीवर झाला आहे. त्यांच्या स्पष्टोक्तिपूर्ण वक्तृत्वाला ही नाट्यमयता अधिकच खुलावट आणते आणि त्यांच्या प्रचारकी प्रवृत्तीला ती पोषकच ठरते. 'आजच्या सामाजिक क्रांतीचे सूत्र' सांगताना, त्या सूत्राने स्वत:वर राष्ट्राचा तेजोभंग करण्याचा आरोप येण्याची शक्यता असूनही आपण ते सूत्र सांगण्यास का सिद्ध झालो आहोत, हे सावरकरांनी स्पष्ट केले आहे आणि निबंधाचा शेवट वक्तृत्वपूर्ण नाट्यमयतेने केला आहे. अेतद्विषयक अुतारा पूर्वी अुद्धृत केलाच आहे.[2] दुसऱ्या अेका निबंधात अशाच नाट्यात्मक शैलीत ते लिहितात, "पाअूस पडत नाही ऋग्वेदातील मंडुकसूक्त म्हणून बेडूक देवतेस आराधा ! नौका बुडते आहे ? वरुणसूक्त जपून समुद्रास नारळ वाहा ! प्लेग आला ? बहिरोबापुढे बोकड मारा. नाहीतर अीदला गाअीची कुरबानी करा. खुदा भला

---

१. स्वातंत्र्यसूक्ते पृ. ३८, ३९, ४०. २. प्रबंध पृ. ७३.

करेगा."[1] पुण्याच्या पर्वतीच्या सत्याग्रहात अस्पृश्यांचे पुढारीपण घेतलेल्या राजभोजांना अुद्देशून सावरकरांनी जे अुद्गार काढले आहेत ते असेच वक्तृत्वपूर्ण आणि नाटचमय आहेत. सावरकर लिहितात, "आता त्यांच्या लाठ्याकाठ्यांनी रक्तबंबाळ होअून पडलेल्या तरुण वीरा, हे राजभोज! तुझे वक्तव्य!–तुझ्या अंगातून वाहणारे ते निरपराध रक्त सांगतच आहे! तुझ्याविषयी आम्ही काय लिहावे?... राजभोज, तुझे क्लेश व्यर्थ जाणार नाहीत–गेले नाहीत. अुभे पुणे तू या विषयावर बोलते चालते केलेस, हलवून सोडलेस. दगडांना देखील वाचा फोडलीस! हे काम काही थोडे झाले नाही. आता पंचवटीच्या रामापासून तो काशीच्या विश्वेश्वरापर्यंत ही झुंज हिंदू म्हणून झुंजू या. हिंदू म्हणून जिंकू या आणि अशा आपल्या ह्या संघटित हिंदुराष्ट्राचा ध्वज आध्रुव-ध्रुव फडकवीत नेअू या."[2]

या वक्तृत्वपूर्ण नाटचमय शैलीच्या योगाने वाक्यात क्वचित अनुप्रासही सावला जातो आणि मग ते अनुप्रासयुक्त वाक्य अेखाद्या नाटकातील सुंदर वाक्यासारखे खुलून दिसते. निर्भेळ भूतदया ही आचरणे अशक्य आहे हे सांगताना सावरकरांनी पुढील अनुप्रासयुक्त वाक्यरचना कशी केली आहे पाहा : "धान्य खावे तर शेतातील लक्षावधी कीड-मुंग्यांची, अुंदीरघुशींची, साप-सुरवंटांची हत्या! झाडपाला, फळे खावी तर वनस्पतीही जीवच. काहीच न प्यावे न खावे, तर मनुष्य जातची जात ठार. मशकासाठी मनुष्याचा वध, वारगुडयासाठी ब्रह्महत्या, सापासाठी साधूचा घात."[3]

प्रदीर्घ वाक्यरचना : प्रदीर्घ वाक्यरचना हे सावरकरांच्या शैलीचे वैशिष्टय. हे त्यांनी मुख्यत: केलेल्या चिपळूणकरांच्या लेखनशैलीच्या अनुकरणाचा परिणाम होय. चिपळूणकरांच्या शैलीचे असे अनुकरण आपण केले हे त्यांनी स्वत:च आपल्या 'आत्मचरित्रात' सांगितले आहे. सावरकरांच्या प्रदीर्घ वाक्यरचनेचा हा अेक नमुना पाहा. "मुसलमानांच्या धर्मवेडेपणासही विज्ञानाच्या–धारेचे पाणी चाखविल्यावाचून हिंदुस्थानच्या काय किंवा अेखाद्या मानवसंस्कृतीच्या काय प्रगतीस धोका पोचल्यावाचून आणि आजवर ज्या आततायीपणाने केली तीहूनही अधिक हानी झाल्यावाचून कशी राहणार नाही, ही आवश्यकता तुम्हां आम्हां मुसलमान नसलेल्यांनाच नव्हे, तर ज्ञानाने आणि विज्ञानाने ज्यांचे डोळे अुघडले आहेत त्या मुसलमान तुर्कांना का वाटली, जे जे धर्मवेडे रानटीपण आहे त्याची त्याची बेडी तोडूनच आपले राष्ट्र अद्ययावत विज्ञानाच्या पायावरच

---

१. सा. सा. भाग २. २. जाति. नि. पृ. १०५, १०७. ३. क्ष–किरणे पृ. १२०.

अुभारणे का भाग पडले, असे त्या प्रत्यक्ष खलिफांच्या नी सुलतानांच्या अत्यंत पुढारलेल्या मुसलमानी गाझीस, त्या केमाल आतातुर्कास नी त्याच्या साऱ्या तुर्क राष्ट्रास– ते या फुटकळ घटनांच्या क्ष किरणांच्या अुजेडात पट्कन प्रकटून उठते.''[1]

सावरकरांच्या लिखाणातील काही दोषांना नावे ठेवणाऱ्या टीकाकारांना श्री. पु. भा. भावे यांनी दिलेले अुत्तर पाहिले म्हणजे सावरकरांच्या लेखनशैली-चीही कल्पना येअील आणि श्री. भावे यांचे त्यासंबंधीचे मतही स्पष्ट होअील म्हणून तो मतप्रदर्शक परिच्छेद येथे नमूद करणे आवश्यक आहे. श्री. भावे लिहितात, "आव्हान, कडवेपणा, ओज, वीरश्री, वक्रोक्ती, अुपरोध हे सावरकरांच्या लिखाणातील जे दोष म्हणून दाखविले जातात तेच वस्तुतः त्यांच्या लिखाणातील मोठ्यातले मोठे गुण आहेत. सह्याद्रीच्या अुग्र व कठीण कडकपारीत मधूनच अेखाद्या चमकत्या जलधारेचे दर्शन व्हावे, तसे गरजणाऱ्या छेदकांच्या मालिकेत अेखादे चमकते वाक्य सावरकर लीलेने लिहून जातात. अेखादी फार कोमल भावना छेडून जातात. माणसाने दचकावे व कंपित व्हावे असे काही सांगून जातात. विचारून जातात... (पण) त्यांचे शब्द आत्मश्लाघेचे किंवा अुर्मटपणाचे नाहीत... मृत्यूला वारंवार हटकणाऱ्या व जिंकणाऱ्या मृत्युंजयाचे ते शब्द आहेत. अमर्याद तळमळीने व अधिकाराने हे शब्द अुच्चारले गेले आहेत. या तळमळीने सावरकरांचा प्रत्येक शब्द सजीव झाला आहे. सावरकरांचा अुपरोध, सावरकरांची वक्रोक्ती, सावरकरांचे आव्हान व आघात ह्या तळमळीपोटी आहे."[2]

श्री. भावे यांच्या या मतांवरून 'सावरकरांची निबंधलेखनशैलीही त्यांच्या व्यक्तित्वानुसार बनली आहे' या विधानालाच अधिक वळकटी येते.

---

१. क्ष–किरणे पृ. ८, ९. २. केसरी सा. मृ. पु. पृ. १८.

कवि सावरकर

प्रास्ताविक :

'मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे, पण परिस्थितीने मला राजकारणी पुरुष बनविले आहे' हे सावरकरांचे अुद्गार त्यांच्या कवितांचा अभ्यास करताना अधिक चिन्त्य वाटतात.[१] या अुद्गारांतून सावरकरांच्या व्यक्तित्वातील नैसर्गिक काव्यवृत्ती आणि परिस्थितीने त्यांच्या काव्याला आलेला घाट, प्राप्त झालेला आशय, मिळालेले विषय आणि अभिव्यक्तीची त्यांनी स्वीकारलेली पद्धती अित्यादी गोष्टीही ध्वनित होतात. सावरकरांची काव्यवृत्ती ही नैसर्गिक होती हे निर्विवाद ! केवळ नैसर्गिकच नव्हे तर असामान्य कोटीतील होती असे कै. न. चिं. केळकर यांचे म्हणणे आहे.[२] वयाच्या 'सरासरी आठव्या वर्षाच्या संधीस कवितेची धूळपाटी' सावरकरांनी हाती घेतली होती;[३] आणि 'वयाच्या दहाव्या वर्षाच्या आधीच तीवर कवितेची धुळाक्षरे' त्यांनी गिरविली होती.[४] तेव्हापासून सुमारे चाळीस वर्षे सावरकरांनी काव्यलेखन केले. मूळची काव्य-वृत्ती आणि काव्यलेखनासाठी मिळालेला प्रदीर्घ काळ यांचा विचार केला तर सावरकरांनी आपला काव्यप्रपंच प्रचंड प्रमाणावर मांडावयास हवा होता. तसा तो मांडण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला. निस्साधन, निस्साहाय्य अशा बंदी-शाळेत 'अेक वा अर्धा लक्ष महाकाव्य रचण्याचा' संकल्प त्यांनी सोडला होता. परंतु परिस्थितीने प्रबळ झालेल्या त्यांच्यातील राजकारणी पुरुषाने त्यांच्यातील कवीवर मात केली आणि दहा ते अकरा हजार ओळींपेक्षा जास्त काव्यलेखन सावरकर करू शकले नाहीत. त्यांच्या काव्यप्रपंचाची मोजदाद करणाऱ्यांपैकी प्रा. वा. गो. मायदेव यांनी सावरकरांच्या काव्यसंभाराची संख्या १०४८८ ओळीं-पर्यंत नेली आहे.[५] तर प्रा. स. गं. मालशे यांनी ही गणती सुमारे १३५०० ओळीं-पर्यंत केली आहे.[६] श्री. भा. कृ. केळकर यांना ही संख्या ११००० पर्यंत जाअील असे वाटते. या संख्येत त्यांनी सावरकरांच्या 'महासागर' या दीर्घकाव्याचा

---

१. सा. वि. द. पृ. १. २. सा. द. प्रस्तावना पृ. ७. ३. मा. आ. पृ. ४९.
४. मा. आ. पृ. ४९. ५. सा. क. पृ. १२. ६. आ. वि. पृ. ८५.

समावेश केलेला नाही.[1] अितर टीकाकारांनीही सावरकरांच्या नाटकांतील सुमारे ८१ पदे जमेस धरून त्यांच्या कवितेची मोजदाद केली असल्याचा स्पष्ट पुरावा आढळत नाही. आज अुपलब्ध असलेल्या सावरकरांच्या कवितांवरून काव्यचरणांची गणना केली तर ती १०४४५ या संख्येहूनही अधिक वाढेल हे निश्चित. कारण त्यात नाटकांतील पदांचीही भरच पडेल. काव्यपंक्तींच्या संख्येत पडणाऱ्या या फरकाची काही कारणेही संभवतात. त्यांतील अेका कारणाचा अुलगडा नाटकांतील पदांची संख्या व त्यांचा अेकूण चरणसंख्येतील समावेश या संदर्भात करता येअू शकेल. दुसरेही अेक कारण संभवते; ते असे की, स्वत: कवीनेच काव्यसंग्रहाच्या पुढील नव्या आवृत्तीतून काही संस्करण करून कवितेची चरणसंख्या कमीअधिक केल्याचे दिसून येते. अुदाहरणार्थ, १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'रानफुले' या कवितासंग्रहात 'कमला' काव्याचे ८७२ चरण दिले आहेत. परंतु १९४७ साली प्रकल्पित झालेल्या 'कमला' काव्याच्या तिसऱ्या आवृत्तीत ही चरणसंख्या ८८० दिली आहे. तसेच सावरकरांची बव्हंश कविता ही पाठांतरातून संग्रहित झाली असल्याने कवितांच्या प्रसिद्धीकरणाच्या वेळी, कधी कर्त्याच्या विस्मरणाने तर कधी संपादकाच्या हेतुपूर्वक वा अहेतुपूर्वक नजरचुकीने ती प्रसिद्धीच्या प्रकाशात येअू शकली नाही. 'विश्वात आजवरि शाश्वत काय झाले' या कवितेचा पहिला श्लोक[2] आणि 'तारकांस पाहून' या कवितेतील सहा ओळी[3] प्रकाशित काव्यसंग्रहातून का वगळल्या गेल्या याची कारणमीमांसा अशा रीतीने करता येअील. पण निष्कर्षवजा अेवढे मात्र सांगता येअू शकेल की, सावरकरांचा अेकूण काव्यसंभार १०४४५ ओळींच्या खाली निश्चितपणे जात नाही.

काव्यसंग्रहाच्या रूपाने सावरकरांच्या कवितांचा संख्यात्मक विचार करावयाचा झाला, तर अेकूण सहा काव्यसंग्रह सावरकरांच्या नावावर जमा करता येतील. रचनादृष्ट्या त्यांचा कालक्रम ठरविणे अभ्यासाच्या दृष्टीनेही आवश्यक आहे. सावरकरांची पहिली प्रसिद्ध कविता (श्रीमंत सवाअी माधवरावांचा रंग) सन १८९४ मधील आहे, तर शेवटची प्रसिद्ध कविता (शस्त्रगीत) सन १९३८ मधील आहे. काव्यसंग्रहांपैकी 'चाफेकर नि रानडे यांजवर फटका' या कवनाचा रचनाकाल म्हणून दिनांक ७–५–१८९९ हा दिवस दिलेला आहे.[4] 'सिंहगडचा पोवाडा' सन १९०४ च्या सुमारास केव्हातरी रचला गेला होता;[5] आणि या पोवाड्याच्या रचनेनंतर वर्षभराने 'श्रीबाजीप्रभू देशपांडे यांचा

---

१. सा. द. पृ. २५४. २. सा. का. स. पृ. १७२. ३. सा. क. पृ. २१०. ४. सा. च. पृ. ४३. ५. सा. च. पृ. ९३.

पोवाडा ' लिहिला गेला असावा. १९०६ सालच्या मे महिन्याच्या सुमारास हे दोन्ही पोवाडे अभिनव भारत मालेची क्रमांक १ व २ ची पुष्पे म्हणून श्री. बाबा सावरकर यांनी प्रसिद्ध केली होती."[1] सावरकरांचे 'कमला' काव्य 'विजय-वासी' या टोपण नावाने १९२२ मध्ये चिमुकल्या आकारात प्रसिद्ध झाले. १९२४ मध्ये 'महाराष्ट्र भाटा'चे म्हणजेच सावरकरांचे–'गोमांतक' हे खंड-काव्य प्रकाशात आले. पाच परडयांतील फुलांनी वनविलेला 'रानफुले' हा काव्यगुच्छ 'वॅ. सावरकर यांची अंदमानातील कविता' या टीपेच्या पृष्ठपर्णांसह १९३४ मध्ये महाराष्ट्रातील रसिकांना अर्पण करण्यात आला. सावरकरांच्या साठाव्या वाढदिवसाच्या प्रसंगाने त्यांच्या कवितांचा संग्रह 'सावरकरांची कविता' या नावाने १९४३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. सावरकरांच्या समग्र काव्याचा संग्रह 'समग्र सावरकर वाङमय प्रकाशन समिती'ने १९६५ च्या अेप्रिल महिन्यात प्रकाशित केला. या संग्रहात सावरकरांचे आजपर्यंत स्फुट स्वरूपात विखुरलेले आणि प्रसंगाप्रसंगाने प्रसिद्ध झालेले काव्य व काही अप्रसिद्ध काव्य या सर्वांचा समावेश करण्यात आला आहे.[2]

कवितेचे वृत्तिभिन्नतादर्शक कालखंड :

काव्यसंग्रहाच्या प्रसिद्धीच्या कालक्रमानुसार सावरकरांच्या कविता-संभाराचा परिचय करून देण्याची ही पद्धती केवळ बाह्यांगापुरती आणि अत्यंत स्थूल स्वरूपाची आहे. सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या संदर्भात असा परिचय करून द्यावयाचा झाला, तर तो त्यांच्या वृत्तिविकासाच्या वा वृत्त्यंतराच्या आधारानेच करून देणे प्रबंधाच्या मूळ सूत्राला धरून होअील. तसा प्रयत्न काही टीकाकारांनी केलाही आहे. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी सावरकरांच्या ध्येय-दृष्टीत झालेल्या परिवर्तनाच्या आधारे त्यांच्या काव्यवाङमयाचे दोन प्रमुख कालखंड पाडले आहेत.[3] त्या दोन कालखंडांतील सावरकरांच्या वाङमयाचे वेगळेपण दाखविताना श्री. माडखोलकर लिहितात, "१९११ साली जन्मठेपेची शिक्षा होअीपर्यंत त्यांच्या हातून जे वाङमय निर्माण झाले, त्यात विशुद्ध स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार केलेला आहे. त्यानंतरच्या विशेषत: गेल्या बारा वर्षांतील त्यांच्या वाङमयात स्वातंत्र्याच्या पुरस्काराला गौण स्थान मिळून, हिंदू जातीच्या पुनरुत्थानाच्या ध्येयाला प्रामुख्य मिळाले."[4] प्रा. भ. श्री. पंडित यांनी सावरकरांच्या अेकंदर कवितेचे तीन भाग पाडले आहेत आणि त्या प्रत्येक

---

१. सा. च. पृ. ९३–९४. २. स. सा. वा. खंड ७ – प्रास्ताविक पृ. ५
३. प्रतिभा – डिसेंबर १९३५. ४. प्रतिभा – डिसेंवर १९३५.

भागाचे वैशिष्ट्य पुढील शब्दांत सांगितले आहे : "त्यांच्या (सावरकरांच्या) आरंभीच्या कविता प्रोत्साहक आहेत व अखेरच्या कवितांतही जातीयतेचा प्रखर अभिनिवेश आहे. परंतु मधल्या विभागातील कवितांतले तेजस्वी विचार व ओजस्वी शब्द ज्या प्रमाणात अंत:करणाची पकड घेतात, त्या प्रमाणात आरंभीच्या व अखेरच्या विभागांतील कविता घेत नाहीत... मधल्या विभागातील कवितांत त्यांच्यातला देशभक्त व भावविवश कवी जागृत आहे."[1] सावरकरांच्या कवितांचे संपादन करताना प्रा. वा. गो. मायदेव यांनी सावरकरांच्या कवितेचे जे चार कालखंड पाडलेले आहेत ते सावरकरांच्या त्या त्या कालखंडातील प्रभावी झालेल्या विकारविचारांच्या आधारेच पाडलेले आहेत. प्रा. मायदेव यांनी केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे. पहिला खंड १८९३ ते १९०२, दुसरा १९०३ ते १९१२, तिसरा १९१३ ते १९२४ व शेवटचा १९२४ व ते १९४३ पर्यंतचा.[2] या विविध कालखंडांत सावरकरांच्या व्यक्तित्वातील कोणकोणत्या प्रवृत्ती प्रभावी बनल्या होत्या हेच प्रा. मायदेव यांनी यात दाखवले आहे. प्रा. स. गं. मालशे यांनी प्रा. मायदेव यांच्याप्रमाणेच सावरकरांच्या कवितेचे वृत्ति-भिन्नताद्योतक असे चार कालखंड पाडले आहेत. पण या चार कालखंडांची विभागणी सनांच्या आकडेवारीत न करता ती त्यांनी स्थानभेदावरून केली आहे. प्रा. मालशे लिहितात, "पहिला नाशिक-पुण्याचा विद्यालयीन कालखंड, दुसरा लंडनचा क्रांतीचा कालखंड, तिसरा बंदीशाळेतला अंदमानचा कालखंड आणि चवथा रत्नागिरीचा संघटनी कालखंड. या प्रत्येक कालखंडात कसकसा फेर पडत गेला, हे पाहणे अुद्बोधक ठरेल. पहिल्या कालखंडात मित्रमेळ्याचे अध्वर्यू म्हणून ते कार्य करीत होते. या काळातील त्यांची कविता मेळ्यातल्या कवनांच्या स्वरूपाची आहे. दुसरा कालखंड तारुण्याचा, क्रांतीच्या अैन बहराचा! या काळात कवीच्या भावनेचा वेग शिगेला पोहोचला होता. तिसरा कालखंड बंदीशाळेचा. बंदीशाळेत कवीची वृत्ती अंतर्मुख होणे साहजिकच होते. या काळातील कविता सघन आणि प्रदीर्घ बनली आहे. .... या नंतरच्या चवथ्या कालखंडात सावरकर हिंदुसंघटनेचे, अस्पृश्यतानिवारणाचे प्रचारक म्हणून पुन्हा मेळ्याकडे वळले आहेत. त्यांची कविता प्रचारकी बनली आहे."[3]

सावरकरांच्या कवितेच्या बाह्यांगाचा आणि अंतरंगाचा स्थूल परिचय होण्याच्या दृष्टीने वरील विवेचन करण्यात आले असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराच्या दृष्टीने त्यांच्या समग्र कवितेचे समालोचन आता करावयाचे आहे.

---

१. आ. म. क. पृ. १९५. २. सा क. पृ. ६ (प्रस्तावना). ३. आ. नि. पृ. ८५–८६.

कवितेतील व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार

'स यत्स्वभावः कविस्तदनुरूपं काव्यम् ।' हे राजशेखरने काव्यमीमांसे मध्ये सांगितलेले सूत्र[1] सावरकरांच्या कवितेबाबत अत्यंत यथार्थ ठरते. कवीचे व्यक्तिमत्त्व काव्यात प्रकट होत असते ते अनेक मार्गांनी, अनेक पद्धतींनी. काव्य रचना करताना कवी आपल्या विशिष्ट वृत्तीप्रमाणे आपल्या काव्य-विषयाची निवड करतो, सजावट करतो. त्याचे अलंकार, त्याच्या अुपमा-अुत्प्रेक्षा, त्याची पात्रे व त्याची भाषाशैली या सर्वांमध्ये त्याचे व्यक्तिमत्त्व आविष्कार पावते. विशेषतः रसाविष्कारात कवीचे व्यक्तिमत्त्व फारच चांगले व्यक्त होते. . . .त्यातून कवीने आपला काव्यविषय आपल्या खास जिव्हाळ्याचा व आपल्या अनुभवाचे सार व्यक्त करणारा असाच निवडला, तर तो त्यात जास्तीत जास्त रमतो.[2] या दृष्टीने सावरकरांचे काव्य अभ्यासताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक खुणा त्यांच्या कवितालतेच्या अंगोपांगांवर फुलताना, प्रकटताना दिसतात. त्यांच्या व्यक्तित्वाची पहिली खूण पटते ती त्यांच्या काव्यलेखनाच्या मागील हेतूमध्ये. सावरकरांनी काव्यलेखन केले ते आत्माविष्करणासाठीच, आत्मप्रकटीकरणासाठीच.[3] विषय कोणताही असो, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होत असतो. सावरकरांच्या अनेक काव्यसमीक्षकांनी सावरकरांची कविता ही आत्माविष्कारासाठीच प्रकट झाली, असेच आपले निस्संदिग्ध अभिप्राय दिले आहेत.

टीकाकारांचे काही अभिप्राय

'सावरकरांचे काव्य हे त्यांच्या चरित्राचे पूर्ण प्रतिबिंब आहे' असा आपला स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून श्री. दा. ना. आपटे यांनी सावरकरांच्या काव्यरचनेमागील हेतूचे विश्लेषण केले आहे. श्री. आपटे लिहितात, "केवळ जनरंजनासाठी, स्वतःच्या करमणुकीसाठी, बुद्धिप्रदर्शनासाठी वा लोकैषणेसाठी सावरकरांनी केव्हाही काव्य लिहिलेच नाही, तर ते त्यांच्या क्षुब्ध अंतःकरणातून पिळवटून निघालेले अुद्गार आहेत. . . . आपले जीवनतत्त्व व्यक्त करण्यासाठी त्यांनी केवळ वृत्तांचा आश्रय केला आहे. त्यात अुत्तम काव्य आढळले हे त्याचे आनुषंगिक फल आहे. . . आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान कवितावद्ध करणे या मुख्य हेतूच्या ओघाने अुत्कृष्ट काव्यनिर्मिती हा श्री. सावरकरांना झालेला प्रसंगोपात लाभ होय."[4] (सावरकरांच्या 'कमला' काव्याचे रसग्रहण करताना प्रा. मायदेव यांनी अखेर हाच निष्कर्ष सांगितला आहे की, कवीने आपले जीवनाचे

---

१. का. मी. पृ. १०. २. सं. का. पं. पृ. २१४. ३. सा. का. स. पृ. १६३. ४. सा. का. स. पृ. १६०.

रहस्य सांगण्यासाठी तर हे काव्य लिहिले नाही ना, असे वाटून काव्य म्हणजे कवीचा आत्माविष्कारार्थ केलेला शब्दविलास होय याचा सहजच प्रत्यय येतो.[१] याच 'कमला' काव्याच्या संदर्भात प्रा. शं. के. कानेटकर व श्री. बाळशास्त्री हरदास यांनी असेच अभिमत व्यक्त केले आहे. हे काव्य वाचताना ध्येयजीवनाशी एकरूप झालेल्या सावरकरांच्या कार्यप्रवण विशाल मनाची साक्ष प्रा. कानेटकर यांना पटते.[२] आणि हे काव्य ज्या काळात व ज्या परिस्थितीत झाले त्यांचा सावरकरांच्या जीवनाशी आलेला निकट संबंध प्रा. कानेटकरांच्या ध्यानी येतो.[३] श्री. बाळशास्त्री हरदास यांना 'कमला' हे काव्य सावरकरांच्या 'क्रांतिकारक आयुष्याचे आत्मनिवेदनच' वाटते.[४] आपल्या धार्मिक, सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञान प्रतिपादन करण्याच्या हेतूनेच 'गोमांतक' काव्य सावरकरांनी लिहिले असा प्रा. जोग यांचा अभिप्राय आहे.[५] सावरकरांच्या समग्र कवितेचे समालोचन करताना श्री. धनंजय कीर यांना तीमधून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचाच साक्षात्कार घडला. म्हणूनच त्यांनी लिहिले:

"Savarkar's poetry has an autobiographical note and is subjective par excellence .... Savarkar has expressed his own emotions, his own sensations, his own thoughts."[६]

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे काव्य परस्परांशी किती अेकजीव आहेत हे स्पष्ट करताना प्रा. भ. श्री. पंडित यांनी अेका समर्पक अुपमेचा फार सुंदर अुपयोग केला आहे. प्रा. पंडित लिहितात, "फुलांच्या पाकळ्यांपासून ज्याप्रमाणे गंध वेगळा करता येत नाही किंवा पाखरांच्या पंखांपासून ज्याप्रमाणे रंग निराळे काढता येत नाहीत, त्याचप्रमाणे सावरकरांच्या कवितेपासून त्यांचे व्यक्तिमत्त्व अलग करता येत नाही. त्यांच्या कवितेच्या अक्षराअक्षरांतून ते प्रतिबिंबित झाले आहे."[७] सावरकरांचे 'कवित्व' या लेखातून प्रा. पंडित यांनी हाच दृष्टिकोन प्रकट केला आहे. सावरकरांची सर्व कविता त्यांच्या व्यक्तिगत जीवनातून कशी अुत्स्फूर्त झाली आणि काव्यातील प्रसंग प्रत्यक्ष सावरकरांच्या जीवनातील असल्यामुळे त्यात त्यांनी स्वतःच्या दृष्टिकोनातून जीवनाचे भाष्य सांगण्याचा प्रयत्न कसा केला आहे याचे विवेचन प्रा. पंडितांनी या लेखात सोदाहरण केले आहे.[८] आशयाच्या दृष्टीने सावरकर आपल्या सर्व कवितेत आत्मलक्षी

---

१. कमला – प्रस्तावना, पृ. ८. २. सा. का. स. पृ. ४०. ३. सा. का. स. पृ. ४२. ४. सा. का. स. पृ. १३३. ५. सा. का. स. पृ. ९२, ९५. ६. Savarkar and His Times p. 121, 122. ७. सा. वि. द. पृ. १३, १४. ८. म. सा. प. एप्रिल-मे-जून १९५८.

(Subjective) कसे राहिले याचे स्पष्टीकरण प्रा. मालशे यांनी केले आहे.[1] 'सावरकरांची कविता त्यांच्या जीवनाची खरी सहचरी आहे' या विधानातून डॉ. के. ना. वाटवे यांनी सावरकरांचे जीवन आणि त्यांचे काव्य यांच्यातील निकट साहचर्यच सुचविले आहे.[2] सावरकरांच्या काव्यसमीक्षकांच्या वरील अनेक विधानांतील सूर पाहिला तर जो अेकच मुद्दा मुख्यत: प्रस्थापित होतो तो हा की, सावरकरांची कविता ही त्यांच्या जीवनाची मूर्तिमंत असाळी आहे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तो अेक सरळ आविष्कार आहे.

कवितेतील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन

सावरकरांनी आविष्कृत केलेल्या व्यक्तिमत्वाचे दर्शन त्यांच्या कवितेत कुठेकुठे घडते, कशा स्वरूपात घडते, त्यात सत्य आणि कल्पनाकलित भाग किती असतो, त्यांचे प्रत्यक्ष जीवन त्यात कोठे आणि कितपत प्रतिबिंबित होते आणि कवितेच्या कोणकोणत्या अंग-प्रत्यंगातून ते प्रकट होते, याचा साकल्याने विचार आता करावयाचा आहे.

काही कवितांतून सावरकरांनी आपल्या चरित्रातील घटनांचा अुघड अुघड अुल्लेख केला आहे. आपल्या आत्मवृत्तात्मक लेखनातून सावरकरांनी अशा काही कवितांचा संबंध स्वचरित्राशी जोडूनही दाखविला आहे. सावरकरांच्या जीवन-चरित्राचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांच्या चरित्राच्या खुणा पटविगारी प्रच्छन्न स्थळे त्यांच्या काही कवितांत आढळतात. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांच्या बहुसंख्य कवितांतून कोरले गेले आहेत. सावरकरांच्या कित्येक कविता त्यांच्या वैचारिक धारणेतून निर्माण झाल्या आहेत, आणि ही वैचारिक धारणा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अेक प्रधान अंग आहे. सावरकरांचे ध्येय आणि त्यांची साधननिश्चितता व श्रद्धा, व्यक्तिमत्त्वात मुरून राहिलेले त्यांच्या अभिमानाचे अन् अभिनिवेशाचे विषय, अितिहास आणि मानवी जीवन यांकडे पाहण्याचा त्यांचा विशिष्ट दृष्टिकोन, अनुभूती घेण्याची त्यांची व्यक्ति-विशिष्ट पद्धती अित्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक अंगे त्यांच्या कवितेतून सहजपणे व्यक्त झाल्याचे आढळून येते.

आत्मचरित्र आणि काव्य

स्वजीवनातील घटनांना, सभोवतीच्या वातावरणाला आणि व्यक्तींना सावरकरांनी काव्यरूप दिल्याची अनेक अुदाहरणे त्यांच्या कवितेत आढळतात.

---

१. आ. नि. पृ. ९४. २. केसरी – मे १९५८.
सा. अे. चि. अ. २१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठा...
अनुक्रम..... दि: .....
क्रमांक ३२२ दो: दि: .....

आपले चरित्रच काव्यरूपाने तेथे प्रतिबिंबित झाल्याची स्पष्ट कबुलीही सावरकरांनी दिली आहे. "गोमांतक 'काव्यातील' भार्गव' म्हणजेच माझ्या लहानपणचे भगूर अशी अेक जम्मत" त्यांनी 'कुणालाही न कळविण्याच्या अटीवर' वाचकांना सांगितली आहे. याच भगूरचे कल्पनारम्य चित्र त्यांनी 'गोमांतकात' सविस्तर रेखाटले आहे. तसेच 'गोमांतका'तील 'रमे'च्या रूपाने त्यांनी आपल्या आअीचीच मूर्ती साकार केली आहे.[1] 'गोमांतका'तील रमा-माधव यांचा सुखी, आनंदी संसार आणि त्यात रंगविलेला वनभोजनाचा प्रसंग म्हणजेच सावरकरांनी स्वत:च्या प्रत्यक्ष जीवनातील अनुभवाला दिलेले काव्यमय रूप होय. यासंबंधी आत्मचरित्रात सावरकर लिहितात, "माझ्या आअीवापांचा तारुण्यातील संसार फार आनंदात झाला. ते गमतीचे दिवस कसे जात, दारणा नदीच्या पलीकडे असलेल्या त्या जहागिरीच्या राहुरी गावाजवळील आमच्या आमराअीत हौसेने वनभोजने कशी होत, माझ्या आअीचा प्रेमळ, कर्तव्यतत्पर दिनक्रम कसा असे, याचा काही आभास 'गोमांतका'तील 'रमे'-विषयीच्या वेच्यांच्या आरशात दिसू शकेल."[2] 'गोमांतक' काव्यात काही स्थळे तर अशी आहेत की, जेथे सावरकरांच्या आत्मचरित्रातील अुद्गारांचीच आठवण व्हावी. सावरकरांच्या जहागिरीच्या गावचे कुणबी लोक त्यांना 'छोटे जहागिरदार' म्हणत व त्यांचे नाना प्रकारे कौतुक करीत.[3] 'गोमांतक' काव्यातील शेतकरीही 'रमा-माधव' यांच्या घरी आले की, त्यांच्या लहानग्या शंकरबद्दल पुढील पृच्छा करीत : 'अहो बाअी सत्वरा दाखवा। छोटा कुठे जहागीरदार तो अमुचा नवा?"[4] आअीच्या 'हातचे दूधभात लोणचे' खाल्ल्याची गोडी सावरकरांच्या मनात अितकी मुरली होती[5] की, पुढे अंदमानात 'गोमांतक' काव्य रचताना ती प्रकट झाली आणि 'गोमांतका'तील पुढील काव्यचरणांना विलक्षण गोडवा देअून गेली :

'शैशवी दूधभाताचा घास लावुनि लोणचे
ताटलीतुनि जो देअी आअी त्यासम कोणचे
मिष्ट पक्वान्न हो लागे आयुष्यात पुन्हा? तसे'[6]

'कमला' काव्यातील नायक मुकुंद व त्याचा सहकारी क्रांतिकारक मुकुल यांच्या-तील संवाद हा सावरकरांच्या स्वत:च्या जीवनातील आत्मप्रत्ययावरच आधार-लेला आहे. १९०१ मध्ये सावरकरांचे लग्न ठरल्याचे त्यांच्या मामांनी अकस्मात येअून सांगताच सावरकरांच्या मित्रमंडळीत त्यावर चर्चा सुरू झाली. 'जो

---

१. मा. आ. पृ. २५. २. मा. आ. पृ. २६, २७. ३. मा. आ. पृ. १३.
४. गोमांतक पृ. २३. ५. मा. आ. पृ. ३२ अ. ६. गोमांतक पृ. २१.

क्रांतिकारक सत्याच्या जयास्तव कारागारात वा फासावर वा रणांगणावर आपले शिर हातावर घेऊन कार्यक्षेत्रात अुतरला त्याने विवाहाची वेडी पायांत ठोकून घ्यावी की काय, हा प्रश्न या चर्चेत निघाला होता.[१] "त्याविषयीचे माझे विचार पुढे 'कमला' काव्यात क्रांतिकारक जो मुकुल याच्या भूमिकेतून मी वदविले आहेत," अशी कबुली स्वतः सावरकरांनीच आपल्या आत्मचरित्रात दिली आहे.[२] या काळात सावरकरांनी स्थापन केलेल्या 'मित्रमेळ्याचा' किंवा 'रामहरी' या गुप्त संस्थेचा अुल्लेखही त्यांनी आपल्या काव्यातून केलेला आहे. 'केरळ-कोकिळकारांचे स्वागत' करताना 'द्याया सिद्धीस अुच्च हेतुस अशा ही जन्मली सुंदरा' असे वर्णन आपल्या 'मित्रमेळा' संस्थेच्या कार्याची प्रस्तावना करून देताना त्यांनी केले आहे.[३] 'गोदावकिली' या कवितेत स्वजनांच्या क्षेमासाठी गोदेची प्रार्थना करताना "विश्वालंकृत होअून पंचकडी मिळून 'राम-हरिस भजो" या चरणातून त्यांनी आपल्या 'रामहरी' या गुप्तसंस्थेचे नाव गुंफले आहे.[४]

'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रातील काही गद्य वर्णने आणि विचार सावरकरांच्या 'सप्तर्षि' कवितेत पद्यमय होअून पुन्हा प्रकटले आहेत. पन्नास वर्षांची शिक्षा लागू झाल्याची वार्ता तुरुंगातील अधिकाऱ्याने सांगताच सावर-करांच्या मनात ज्या विविध वैचारिक आणि भावनिक प्रतिक्रिया झाल्या त्यांचे स्वरूप 'माझी जन्मठेप' या गद्य ग्रंथात आणि 'सप्तर्षि' या प्रदीर्घ कवितेत सारखेच वर्णिले आहे. पन्नास वर्षाच्या शिक्षेची वार्ता अैकणे, बंदिवानाचे कपडे अंगावर चढविणे, यावज्जीवन शिक्षेचा अर्थ पंचवीस की पन्नास वर्षे यासंबंधी संदेह अुत्पन्न होणे, शिक्षेची वार्ता सांगणाऱ्या गृहस्थाचेही अंतःकरण कळवळणे अित्यादी अनेक तपशील 'जन्मठेपे'त आणि 'सप्तर्षी'त अेकच आहेत.[५] अितकेच नव्हे, तर बंदिवासाच्या, निवासनाच्या या प्रसंगी रामाच्या वनवासाचे स्मरण होणे आणि त्याच्या खडतर वनवासाशी स्वजीवनातील या विजनवासाचे साम्य सावरकरांना प्रतीत होणे, याही गोष्टी वरील दोन्ही गद्यपद्य ग्रंथांत सारख्याच आढळतात.[६]

'विरहोच्छ्वास' या खंडकाव्यातही 'जन्मठेपे'तील विचारांची वृत्तबद्ध चित्रे पाहावयास सापडतात. दिल्लीस भारताची राजधानी नेण्यात आल्याचे वृत्त सावरकरांना जेव्हा अंदमानात कळाले, तेव्हा 'हिंदुस्थानची राजधानी अुज्जयनी

---

१. मा. आ. पृ. १८६. २. मा. आ. पृ. १८८. ३. मा. आ. पृ. २०३–२०४. ४. सा. क. पृ. २७. ५. सप्तर्षि–आर्या ३०, ३१, ३२, ४०. ६. सप्तर्षि आर्या ३२.

व्हावी ' असे मत त्यांनी व्यक्त केले होते,[1] आणि याच मताला ' विरहोच्छ्वासा 'त काव्यरूप देताना सावरकरांनी लिहिले–

" ते ध्येय अणी । देव ज्यासि लोभावे ।
मृत कल्पतरू बहरावे ।
अुज्जयनीचे कळस कांचनी देखे
डुलविती नव जरी-पटके ।।"[2]

' विरहोच्छ्वासा 'तील अेकवीस क्रमांकाचे पद्य हेही सावरकरांना द्वीपांतरवासाची शिक्षा होताच आपल्या तरुण पत्नीला आश्वासनार्थ पाठविलेल्या अेका पत्राचे पद्यरूपच होय. या पत्रात सावरकरांनी लिहिले होते, " अंदमानात का होअीना पण पुन्हा प्रेमाच्या झोपडीत अेकत्र भेटू; आणि आपल्या स्वत:च्या हातानें लावलेल्या आणि आपल्या झोपडीच्या पुढच्या मांडलीवर फुलांनी डवडबत पसरलेल्या मोगरा, मालती, जाअी, जुअी, यांच्या लतावेलींशीच आपले अिष्ट संबंध जुळदून नांदू लागू, जनसहवास नाही तर नाही."[3] ' विरहोच्छ्वासा 'तील पुढील अुच्छ्वास हीच भावना शब्दांच्या फुलांतून कशी दरवळून टाकतो ते पाहण्यासारखे आहे :

' सुमकाननि की सिंधु संगमी सरिता
पाहूनि कुण्या अेकांता ।
हा छोटासा अेक बंगला, स्वास्थ्या
ज्या वस्तु अवश्यची त्या, त्या ।
ती गीता, ते आदिकाव्य, ती वीणा
फुलबाग काम्य-कष्टांना ।
त्वत्सुखा चित्रिण्या जितुकी
पटभूमि समुचिता तितुकी
तितुकीच अणी अर्जुनि की
संगती तुझ्या । सुखशांतिद या,
दिन न्यावा हा कळुहि देत ना कवणा ।'[4]

सावरकरांच्या ' स्व-विषयक ' कविता

सावरकरांचे चरित्र मूलत:च काही आकस्मिक, काही अद्भुत विद्युत्-तंतूंनी विणलेले असल्याने त्यांच्या कवितांतही त्या अद्भुततेची झळाळी अुतरली आहे.

---

१. मा. ज. पृ. १७५. २. रानफुले पृ. ७२. ३. मा. ज. पृ. ३११.
४. रानफुले पृ. ६८.

वालपणी ती देवीच्या देवघरात तथाकथित दैवी सामर्थ्य संचरून कविमुखातून बाहेर पडली आहे. चाफेकर-रानडे यांच्या हौतात्म्याने गहिवरून ती अश्रूंनी चिंब भिजली आहे, ती समुद्रमार्गात लिहिली गेली आहे, लंडन येथील 'शत्रू'च्या शिबिरातील स्थंडिलावर ती प्रज्वळली आहे, अंदमानाच्या तुरुंगातील दगडांवर सुंदर शिल्पासारखी ती कोरली गेली आहे. त्यामुळे डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणे सावरकरांची कविता खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनाची खरी सहचरी झाली आहे. सुखात आणि दु:खात, राजद्वारात आणि स्मशानात, स्वास्थ्यात किंवा सवडीत आणि अस्वास्थ्यात किंवा निकडीत तिने त्यांना पतिव्रतेप्रमाणे साथ दिली आहे.[1] या सर्व परिस्थितीमुळे सावरकरांच्या चरित्राच्या ओळी वाचताना त्यांच्या कवितांचे नाद कानांवर पडत असतात; आणि त्यांच्या कवितांचे चरण गुणगुणत असताना त्यांच्या चरित्राचे स्मरण होत असते आणि हे दोन्ही अेकाच वेळी आस्वाद्य होत असल्याने 'येथ अलंकारीले कवण कवणा।' असा संभ्रम केवळ रसिकालाच नव्हे, तर अलिप्ततावादी अभ्यासकालाही पडतो.

सावरकरांचे जीवन आणि त्यांचे काव्य यांच्यात ही आत्यंतिक अेकरूपता असण्याचे कारण स्वत:च्या कृतीला तत्काळ आणि सरळपणे काव्यबद्ध करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते हे होय. किंवा डॉ. वाटवे यांच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर असे सांगता येअील की, 'ज्या हाताने त्यांनी कृती केली त्याच हाताने त्यांनी तीवर काव्य रचले.'[2] काव्यरचनेस आवश्यक असणाऱ्या अनुभूतीसाठी त्यांना कल्पनेच्या साहाय्याने कोणा अन्य व्यक्तीशी समरस होण्याचे कारण नव्हते, किंवा आपली असामान्य अनुभूती काव्यनिर्मितीच्या शक्तीच्या अभावी अन्य कोणा भाषाप्रभूच्या स्वाधीन करण्याची त्यांना आवश्यकता नव्हती. कै. न. चिं. केळकर यांच्या शब्दांत सांगावयाचे तर 'असाधारण, असामान्य, अलौकिक, लोकविलक्षण, अद्भुत' जीवन सावरकर जगले.[3] सावरकरांच्या सारखे असामान्य जीवन अन्य कोणा व्यक्तीच्या वाटयाला आले नव्हते असा मात्र-याचा अर्थ नव्हे. पण असे अलौकिक जीवन प्राप्त होअूनही त्या थोर व्यक्तींना काव्यप्रतिभेच्या अभावी आपल्या जीवनाला सावरकरांसारखे शब्दरूप देअून जिवंत व साकार करता आले नाही. श्री. भा. कृ. केळकर यांनी सावरकरांचे हे वैशिष्ट्य आणि वेगळेपण समर्पक शब्दांत टिपले आहे. श्री. केळकर लिहितात, "सावरकरांच्या या असामान्य जीवनामुळे व त्यांच्या उत्कट ध्येयवादित्वामुळे त्यांच्या वाङ्मयातील अनुभूती ही फार मोठी आहे। नेपोलियन कवी असता तर त्याने काय लिहिले असते? शिवाजी महाराजांनी आपले दिव्य जीवन कोणत्या शब्दांनी वर्णिले

---

१. केसरी मे १९५८. २. केसरी मे १९५८. ३. सा. च. प्रस्तावना–पृ. ४.

असते ? भगतसिंगाने फासाचे चुंबन घेण्यापूर्वी कविता केली असती तर ती किती भावोत्कट झाली असती ? या सर्वांची अनुभूती अुच्च होती, पण ती साहित्यात अवतरली नाही. सावरकरांचे तसे झालेले नाही. सावरकरांनी ज्या ज्या वेळी कृतीसाठी पाअूल टाकले, त्यांच्या बंडखोर मनात ज्या ज्या संवेदना अुमटल्या, त्यांच्या कविमनाने जे जे सौंदर्यग्रहण केले–त्या त्या सर्व गोष्टी त्यांच्या साहित्या-तून त्यांनी जगापुढे मांडल्या."[1] ह्या सगळ्यांचा परिणाम असा झाला की, सावरकरांचे काव्य, विशेषत: त्यांच्या भावकविता नुसत्या आत्मपर (Subjective) झाल्या नाहीत तर त्या 'स्व-विषयक' (Personal) बनल्या आहेत. त्या कविता अितक्या स्वविषयक आहेत की, त्यांच्या आरस्पानी आकृतीतून सावर-करांच्या चरित्रातील विविध प्रसंग आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू स्पष्ट अुठून दिसावेत. किंबहुना सावरकरांचे चरित्र व त्यांचे व्यक्तिमत्त्व वाचकांना कळल्याखेरीज त्या कवितांच्या अर्थाला पूर्णताच येअू नये.

विलापिका अनेक कवींनी लिहिल्या आहेत. पण 'प्रभाकरास' ही सावरकरांची विलापिका समजून घ्यावयाची असेल तर विदेश-गमनातील सावरकरांचा हेतू, त्या प्रिय लहानग्या 'प्रभ्या'ला त्या बाल-झुंझाराला हुतात्म होताना हसत पाह-णाऱ्या पित्याची ती वृत्ती आणि सावरकरांच्या 'शिखांचा अितिहास' या ग्रंथाला क्रांतीच्या 'अग्नि-मेघ वारे' यांचा झालेला अुपद्रव– हे सारे त्यांच्या चरित्रातील व व्यक्तित्वातील धागे हाती लागल्याशिवाय त्या कवितेचा आशयपट विणलाच जाअू शकत नाही. 'सागरास' ही कविता वाचकांच्या अंत:करणाला तेव्हाच जाअून भिडते की, जेव्हा त्या कवितेच्या निर्मितीमागील अितिहास त्यास ज्ञात होतो. धिंग्रा-प्रकरणानंतर सावरकरांना लंडनमध्ये भोगावा लागलेला मनस्ताप आणि सावरकरांचे मातृभूमीवरील अुत्कट प्रेम हे समजल्यानंतरच त्यांच्या प्राणाची खरी तळमळ प्रत्ययास येते. त्या कवितेतील काही चरण, शब्द आणि कल्पना सावरकरांच्या चरित्रातून व व्यक्तित्वातूनच आकारास आल्या आहेत.

'जगदनुभव-योगे बनुनी । मी
तव अधिक शक्त अुद्धरणी । मी'

किंवा,

"गुण सुमने मी वेचियली या भावे । की तिने सुगंधा घ्यावे
जरि अुद्धरणी व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा"

ह्या काव्यपंक्तीतून आठवण होते ती सावरकरांच्या आत्मचरित्रातील वाक्यांची. विदेशात जाण्यामागील आपला हेतू सांगताना सावरकरांनी लिहिले आहे :—

---

१. सा. द. पृ. २३९

"आजचे आपणां सर्व भारतीय तरुणांचे ध्येय हेच की, आपल्या स्वदेशाच्या नि स्वधर्माच्या पायांत ब्रिटिशांनी ज्या गुलामगिरीच्या शृंखला ठोकलेल्या आहेत, त्या तोडून टाकून आपल्या मातृभूमीला, आपल्या राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी मरू तरी वा जिंकू तरी अशा प्रतिज्ञेने त्या परकीय शत्रूशी झुंज घ्यावी. त्यासाठी देशात जी आज नाहीत अशी महत्त्वाची कार्ये विदेशात जाऊन साधावयाची आहेत. विदेशी जाण्याचा आपला हेतू हाच असला पाहिजे."[१]

'सांत्वन' आणि 'माझे मृत्युपत्र' या कवितांच्या ओळी-ओळींमागे सावरकरांच्या चरित्राचे, त्यांच्या ध्येयांचे, आकांक्षांचे, त्यांच्या हौतात्म्य वृत्तीचे अन् त्यांच्या त्याग वृत्तीचे पृष्ठिपत्रच जणू अुभे आहे. त्या दोन्ही कविता म्हणजे कौटुंबिक स्वरूपाची दोन पत्रेच आहेत. पुढील काही काव्यपंक्ती वाचताना सावरकरांचे चरित्रच पद्यरूपाने आपल्यापुढे साकार होते –

'जयासी तुवा प्रतिपाळिले। मातेचे स्मरण होअू न दिले'
'आशीर्वाद पत्र पावले । जे लिहिले ते ध्यानी आले ।
मानस प्रमुदित झाले । धन्यता वाटली अुदंड ।'
'अशीच सर्व फुले खुडावी । श्रीरामचरणी अर्पण व्हावी
काही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ।'[२]
'झाल्या तया प्रियकरांसह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी, स्मरती तुम्हां का?'
'त्वत्स्थंडिली ढकलले प्रिय मित्र संघा
केले स्वये दहन यौवन-देह-भोगा'
'त्वत्स्थंडिली ढकलली गृहवित्तमत्ता
दावानलात वहिनी नवपुत्र, कांता
त्वत्स्थंडिली अतुल धैर्य वरिष्ठ बंधू
केला हवी परमकारुण पुण्यसिंधू
त्वस्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिली बघ अता मम देह ठेला'[३]

'आत्मबल' या कवितेतील सर्व पाशवी शक्तीला आव्हान देणारी कवीची मृत्युंजयी वृत्ती ध्यानी येण्यासाठी सावरकरांनी ज्या प्रपीडक परिस्थितीत ती कविता

---

१. श. शि. पृ. १७. २. सा. क. सांत्वन पृ. ७३–७४. ३. माझे मृत्युपत्र पृ. ७६, ७७, ७८.

रचली, ती परिस्थिती – त्यांच्या चरित्रातील तो रोमहर्षक प्रसंगच – माहीत असावयाला हवा. अन्यथा ,

'खुळारिपूऽऽ । तया स्वये
मृत्युच्याचि भीतीने भिववु मजसि ये ।

या ओळी, किंवा ,

हलाहलाऽऽ । त्रिनेत्र तो
मी तुम्हांसि तैसाचि गिळुनि जिरवितो ।

या ओळी कोणाला अुद्देशून लिहिल्या आहेत, का लिहिल्या आहेत हे नेमके लक्षात येणे शक्य नाही.

सावरकरांनी फाशीच्या छायेत 'पहिला हप्ता' ही कविता लिहिली. १९१० साली सावकरांवर भरलेल्या खटल्याचा निकाल ज्या दिवशी लागणार होता आणि त्यात 'फाशीची शिक्षा देण्यात येण्याचा भरपूर संभव त्यांना वाटत होता', त्या दिवशी ही कविता रचल्याचे स्वत: सावरकरांनी सांगितले आहे.[1] स्वातंत्र्यप्राप्तीचे आपले कार्य अितर भारतीय बंधूंकडून असेच पुढे चालू राहील असा दुर्दम्य विश्वास त्यांना वाटत होता. देशसेवेच्या द्वारा देशाचे ऋण फेडण्याची भूमिका सावरकरांच्या ठायी फार पूर्वीपासून रुजली होती. १९०५ साली लिहिलेल्या 'बाजी प्रभू देशपांडे' यांजवरील पोवाड्यात 'फेडाया ऋण या भूचे' असा शब्द प्रयोगही त्यांनी केला होता.[2] सावरकरांच्या चरित्रातील या पार्श्वभूमीसह जेव्हा 'पहिला हप्ता' ही कविता वाचली जाते, तेव्हा पुढील काव्यचरणांचा अर्थ कसा अुलगडू लागतो पाहा :—

" ऋण ते फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिली देह अर्पितो हा ।
अशी तीस कोटी तव सेना
ती आम्हांविना थांवेना
परि करूनि दुष्टदलदलना
रोविलची स्वकरी । स्वातंत्र्याचा हिमालयावरि झेंडा जरतारी "[3]

अंदमानच्या कारागृहातील 'सायंघंटा' अैकताना सावरकरांना जी अनुभूती आली ती अितर कैद्यांपेक्षा वेगळी का, या प्रश्नाचे अुत्तर कळून घ्यावयासही सावरकरांच्या चरित्राचाच शोध घ्यावा लागतो. अेका सहृतपीने सावरकरांच्या मुक्ततेची पृच्छा केल्यानंतर सावरकरांनी त्याला दिलेल्या अुत्तराचा अर्थ त्यांच्या पन्नास वर्षांच्या जन्मठेपेच्या शिक्षेच्या संदर्भातच केवळ समजू शकतो. सावरकर अुत्तरतात :

---

१. मा. ज. पृ. ४१०. २. सा. क. पृ. ५५. ३. सा. क. पृ. ८१.

"अहा ।
कोण करी ह्या गणिता । चांद दोन वा
तीन चार चाळीस–ना; चांद तो किती–
पक्ष, मास, ऋतु, अयने, वत्सरे अहा
तीन, चार, चाळीस : ते गणित हातिच्या
किति ह्यापरि चरणांच्या अंगुलीसही
धरुनि ना येणारे सत्य मोजता ।
बहुधा मज चांद वघेलचि न कोणता
जेथे तुज चांद तिज़ा की वघेलची ।" [१]

सायंघंटेचा जो अर्थ सावरकरांनी लावला आहे त्याची कारणेही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात खोल मुरून राहिलेल्या विविध निष्ठा आणि ध्येये यांमध्येच सापडतील.

'मूर्ति दुजी ती' ही कविता मनाला वज्रशाली वनविण्यासाठी सावरकरांनी लिहिली. १९१० साली अिंग्लंडमध्ये पकडले गेल्यानंतर लंडनच्या पोलीसचौकी-मध्ये त्यांनी ही कविता लिहिली की, १९१४ च्या सुमारास अंदमानमध्ये त्यांनी रचली[२] हा मुद्दा येथे महत्त्वाचा नाही. ज्या प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीत अिंग्लंडमधील त्या गोठविणाऱ्या कडक थंडीत – कोठडीतील तो काळ सावर-करांनी काढला तो येथे महत्त्वाचा आहे. अिंग्लंडच्या मानानेही कडक अशी ती थंडी होती[३] आणि त्यात बाहेरील गारठ्याने ज्याचे मनोबलही थिजून जावे असा सावरकरांसारखा 'भाव कोवळा' कवी त्या पिंजऱ्यात ठेवला गेला होता.[४] सावरकरांची मूळची काव्यवृत्ती आणि त्यांच्यापुढे अुदित झालेले क्रकच-तीक्ष्ण असे कर्तव्य यांची सांधेजोड केल्याशिवाय या कवितेचे खरे मर्म कळावयाचे नाही. 'मारक जे दुःसह जे कठिण कटुकटू' अशा त्या परिस्थितीत वध-शिळेवर चढलेल्या वीरवर बंद्याचाच आदर्श त्यांनी आपल्यापुढे का ठेवला याचेही अुत्तर त्यांच्या व्यक्तित्वातच सापडू शकेल.

'महाकाव्य म्हणजे काय हेही निश्चितपणे कळत नव्हते' अशा वयात म्हणजे 'सरासरी आठव्या वर्षाच्या संधीस' सावरकरांनी महाकवी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली होती.[५] सावरकरांच्या या महत्त्वाकांक्षेच्या पार्श्व-भूमीवर त्यांनी अंदमानात लिहिलेली 'रवींद्रनाथांचे अभिनंदन' ही कविता

---

१. सा. क. पृ. १००. २. सा. च. पृ. ५००. ३. सा. क. पृ. ११०.
४. सा. क. पृ. १११. ५. मा. आ. पृ. ४९.

वाचली म्हणजे ती किती स्व-विषयक आहे हे लक्षात येते. सावरकरांचे आत्महुत जीवन कळल्याशिवाय रवींद्रनाथांच्या या अभिनंदनाचे मोलही कळणार नाही. या कवितेत रवींद्रनाथांपेक्षा डोळ्यांपुढे मूर्ती अुभी राहाते ती अंदमानात कष्टणाऱ्या सावरकरांची.

'मरणोन्मुख शय्येवर' सावरकरांच्या संपूर्ण जीवनाचे वस्त्रच जणू पसरले आहे असा भास होतो. देशासाठी देहदंड भोगणाऱ्या वीराचे मृत्यूच्या दारातील हे आजारी अंथरूण आहे हा कवितेच्या मागे असलेला विचार यातील दु:खाला, यातनांना अुदात्तता प्राप्त करून देतो. ही कविता लिहिण्यामागची कवीची भूमिका स्वविषयकच आहे आणि त्यातील अनुभूतीही सत्याधिष्ठित आहे. व्यक्तिगत जीवनातूनच अुदित झालेल्या या कवितेवद्दल स्पष्टीकरण करताना सावरकरांनी लिहिले आहे : "तुरुंगात असताना जेव्हा आम्हीही असेच अगदी मृत्यूच्या दारात आपले आजारी अंथरूण घालून पडलो होतो, तेव्हा मनास ज्या चिंता, अुद्वेग, अपुऱ्या अशा अतृप्त कर्मतृष्णा त्रास देत होत्या त्यांच्या समाधानार्थ 'मरणोन्मुख शय्येवर' ही कविता लिहिली होती."[1]

या कवितेत सावरकरांनी जे जे अुल्लेख केले आहेत ते ते त्यांच्या व्यक्तिगत जीवनाशीच निगडित आहेत. त्या अुल्लेखित गोष्टीत त्यांचे सत्कुल आहे. परम दयाळू जनक-जननी आहेत, वत्सल असा अग्रज आणि विनीत असा अनुज आहे, आपल्या शिरावर असलेल्या विविध ऋणांचा निर्देश आहे, 'अभिनव भारत' ही संस्था आहे, स्वत:ला 'शारदेचिया राजसभेमाजी' मिळालेल्या काहीशा मान्यतेची जाणीव आहे, विविध 'कटिबंधस्पर्शातून' केलेल्या प्रवासाची नोंद आहे, नैष्कर्म्याच्या आणि कर्तव्याच्या जोपासलेल्या प्रवृत्तीची जाण आहे, कर्मफलाप्रमाणे प्राप्त होणाऱ्या अुत्तम पुनर्जन्मावद्दलची खात्री आहे आणि अखेरीस स्वत:च्या व्यक्तित्वानुसार केलेली मृत्यूची बुद्धिगम्य मीमांसाही आहे.

जाणीवपूर्वक आत्मनिवेदन

सावरकरांच्या या स्व-विषयक कवितांनाच 'आत्मवृत्तात्मक भावकविता' असे नाव देता येअील. प्रा. भ. श्री. पंडित यांनी हे अन्वर्थक नाव दिलेही आहे.[2] या आत्मवृत्तात्मक कवितांशी सावरकरांच्या चरित्रातील केवळ स्थूल घटनांचाच संबंध आहे असे नाही. तर सावरकरांच्या अंतर्मनाचे प्रतिबिंबही त्यांत पडले आहे. राष्ट्रकार्यार्थ जे व्रत त्यांनी घेतले, जे सतीचे वाण वृद्धचाच करी धरले आणि

---

१. स्वा. कवि गोविंद यांची कविता – परिशिष्ट २ रे, पृ. १६९. २. सा. वि. द. पृ. २५.

त्यासाठी दैहिक सुखोपभोगाचा सर्वस्वासह जो त्यांनी त्याग केला त्यासंबंधीचे जाणीवपूर्वक आत्मनिवेदन त्यांच्या या आत्मवृत्तात्मक कवितांत पाहावयास सापडते.

हे खडतर जीवन-कर्तव्य म्हणून आपण स्वेच्छेने स्वीकारले असे सावरकर अनेक ठिकाणी सांगतात. 'या त्रासात स्वतः होऊन पडणे मला माझे कर्तव्य वाटले' असे उत्तर त्यांनी बारीला अंदमानाच्या कारागृहाच्या प्रवेशद्वारातच दिले होते.[1] त्यांच्या कवितांतूनही हेच विचार पुनरुक्त होतात. 'सायंघंटा' या कवितेत त्यांनी आपल्या सहकारी बंद्याला असेच सांगितले की,

'म्यांचि अनिष्टाची ती जंडशिळा स्वये
बांधुनिया निजकंठी टाकिली अुडी'[2]

'निद्रे'तही हीच भावना व्यक्त करताना ते म्हणतात :

'माझे की देहा ह्या प्रथम ज्या दिनी
म्या अपुल्या हस्तेची रचुनि मम चिता
ठेवियले तीवरती–चंडिके तया
करू सुतृप्त।'[3]

संकटात स्वतःला असे लोटून घेताना आपण आपद्धर्म पाळीत आहोत, आपणांवर पडलेली राष्ट्रोद्धाराची अल्पशी जबाबदारी आपण कर्तव्य म्हणून पार पाडीत आहोत अशी सावरकरांची धारणा होती. कवितेच्या रसौघात मधूनमधून हाच विचार ते व्यक्त करतात. 'मरणोन्मुख शय्येवर' असताना ते लिहितात,

'कार्ये म्या धर्म्य अशी मानिली, अणी
तदनुरूप अेकाचा म्हणुनि जो ठरे
म्यां माझा भार असे अुचलिला मुदे
यथाशक्ति यथा परिस्थिती न भंगता
धरिले ते व्रत कदापि किमपि ना भये'[4]

'माझे मृत्यूपत्र' या कवितेत हेच 'दिव्यदाहक व्रत' आम्ही अंधतेने घेतले नसल्याचे ते स्पष्टपणे सांगतात. ज्या वयात हे खडतर व्रत त्यांना स्वीकारावे लागले, राष्ट्राची जी अवघड धुरा खांद्यावर घेतली ते वयही होते नव्हाळीचे, अैन तारुण्याचे.

---

१. मा. ज. पृ. ७२. २. सा. क. पृ. १००. ३. सा. क. पृ. १०६.
४. सा. क. पृ. १६०–१६१.

"नवी वयी,
प्रौढ धुरंधरहि न जी शकती तोलण्या
तीच धुरा भर अुन्हात तोलणे घडे ।"

असे ते स्वत:च सांगतात.[1] ही धुरा तोलणे त्यांना भागच होते. कारण त्या कठोर कर्तव्याने त्यांना आज्ञा केली होती की,

"अधांतरि शिखरावरति वायुच्या
संभाळुनी तोल सतत चढत धावण्या
आज्ञा मज दे । पाठीवरति लादुनी
पर्वतसम दुर्धर सद्गर्वभार हा
राष्ट्राचा अखिलाची ।"[2]

अैन तारुण्यात हा दुर्धर भार त्यांना अुचलावा लागल्याने यौवनातील वासंतिक सौंदर्याला, आनंदाला सावरकरांना स्वहस्ते तिलांजली द्यावी लागली. अंदमानातून आपल्या धाकट्या भावाला– बाळला पाठविलेल्या पत्रात त्यांनी ही यौवनसुख-विमुखता प्रकट केली होती. त्यांनी लिहिले होते : "वसंताची मदिरा आपल्या पेल्यात नाचते आहे तोच तिचे व्यसन आपल्याला लागता कामा नये किंवा आपण तिच्यावर अवलंबून राहता कामा नये. आपल्या ह्या काळात ज्यांचा भारतात जन्म झाला आहे त्यांचा नेहमीचा सहचर खरोखर शीतकाल आहे, वसंत नाही."[3] 'माझे मृत्युपत्र' या कवितेत आपण 'स्वये यौवन-देह-भोगां'चे दहन केल्याचे ते सांगतात.[4] पण कर्तव्य म्हणून असे दहन त्यांना करावे लागले तरी तारुण्याची सुखाकडील ओढ सर्वस्वी संपली होती असे मात्र झाले नाही. 'मरणोन्मुख शय्येवर' असताना त्यांनी आपले हे अंतरीचे दु:ख, ह्या वेदना अुघड बोलून दाखविल्या आहेत. सावरकर लिहितात,

"म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हसत चांदण्यामधे
या आयुष्याच्या मम ।"[5]

'सायंघटे'तील बंद्याशी बोलताना हेच शल्य त्यांनी पुढील शब्दांतून अेका वेगळ्या संदर्भात व्यक्त केले आहे.

"चांद मला कोणताहि पाहणार ना
लगटुनि लगटूनि कटी सिंधुतटि कुण्या
रमता वा धावत वा धरित वा प्रिये ।"[6]

---

१. सा. क. पृ. १६२. २. सा. क. पृ. ११५, ११६. ३. अंद. अं. पृ. ५८. ४. सा. क. पृ. ७७. ५. सा. क. पृ. १६२. ६. सा. क. पृ. १००.

ऐन तारुण्यात, वयाच्या पंचविशीत सहन करावा लागलेला पत्नीचा विरह सावरकर मूक मनाने सहन करीत होते. पण मधूनमधून त्याला वाचा फुटे. 'तारकांस पाहून' या कवितेत ही विरहभावना प्रथम प्रकट झाली आहे. या कवितेत सागराला अुद्देशून बोलताना सावरकर ही विरहव्यथा पुढील शब्दांत व्यक्त करतात :

'प्रेमाची चांदणी परंतु ज्यांची दूर वसे
किती प्रवासी तळमळती वा, तुझ्या निकट अैसे
तुझा तुझ्या चांदणिशी पाहुनि प्रिय संगम साचा
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा ''[1]

१९०६ साली लिहिलेल्या या कवितेत सावरकरांच्या विरहाचा केवळ प्रारंभ होता. अंदमानातील त्या नृशंस गुहेत ही विरहवेदना अधिकच वाढली. अंदमानात गेल्यानंतर थोडयाच दिवसांत फुलू लागलेल्या 'कमला' काव्यातून ही विवासना-तील विरहाची झुरणी व्यक्त होअू लागली. या काव्यात आपल्या मन:स्थितीचे हे चित्र वर्णन करताना सावरकर लिहितात :–

"स्नेहशून्य सहारे जे आयुष्यातिल घोर रे
विवासनी अशा जेव्हा जीव व्याकुळ हा झुरे
किंवा विणी कसे जाळे कोळी हीच मजा जिथे
काळ खोलीत बंदीच्या तैं तिथेहि, सख्या, तिथे,
प्रियेच्या पहिल्याची हे मुग्ध-प्रेमल चुंबना ।'
तुझीच स्मृती जावोनी भेटवी विरही मना । "[2]

सावरकरांच्या या पंक्तींतून येथे स्मृती होते ती त्यांच्या पत्रातील अेका वाक्याची. अंदमानातून बाळला पाठविलेल्या अेका पत्रात सावरकर लिहितात, "आपण कोणाही भारतातील तरुणाने– हे विसरता कामा नये की, आपले जीवन म्हणजे अेक तापलेले, वालुकामय, जे सहन करणे शक्य नाही पण जे सहन मात्र करीत गेलेच पाहिजे असे प्रचंड सहाराचे वाळवंट आहे."[3] अशा या परिस्थितीत सावरकरांना विरहोच्छ्वास टाकीत 'प्रिय विरहमरूची शेती"[4] करण्यासही चोरी झाली होती. पन्नास वर्षांच्या शिक्षेनंतर झाली तर प्रियेची भेट होणार! पण तोपर्यंत विरहाच्या तापाने तरुण तनुलतेची फुले सुकणार! 'जीवन लावण्य-रहित, रूक्ष, निर्माल्यवत झाल्यावरच प्रीतिदेवतेची भेट झाली तर होणार' हा विचार सावरकरांच्या मनाला सतावीत असावा, हे 'विरहोच्छ्वास' या प्रदीर्घ काव्यातील पुढील कवितेवरून दिसून येते.

---

१. सा. क. पृ. ६१. २. कमला पृ. १६. ३. अंद. अं. पृ. ५८. ४. रानफुले पृ. ६९.

'धरि धीर वदा ? परि न काय ही तापे
सुकतील सुकोमल पुष्पे ।
जाअील शिळे जलहि अुषेचे वाया
नेत्राभिषेकपात्री या
निर्देव देवळामाजी
माझिया हृदाच्या आजी
ही झुरे बालविधवाशी
तारुण्यलता । निजकुसुमा त्या ।
आपुल्याचिवरी बघुनि झरत जाताना
छळि विरहवेदना प्राणा ।'[1]

या सहारासमान असणाऱ्या आपल्या निष्प्रेम जीवनाचे सूत्र सावरकरांनी अखेर 'मरणोन्मुख शय्येवर' पडल्यावर पुढील शब्दांत सांगितले : 'प्रीति विफल : विरह चिरंतन ।'[2]

राष्ट्रीय आशावाद

'प्रतिकूल तेच बहुधा घडेल' असा अपशकुनी कल सावरकरांच्या मनाचा होता.[3] 'लहानपणापासून या अशुभाशीच झगडणे त्यांच्या दैवी' आले होते.[4] कारावासात त्यांच्या आशेची सदाफुली वाळून कोळपली होती.[5] आशेच्या प्रदीर्घ स्मशानभूत जणू त्यांनी अेक तपश्चर्या केली होती.[6] 'सप्तर्षि' कवितेत 'आपली आशा-पेटी जाळियली' असे त्यांनी सांगितले आहे.[7] याच कवितेत पुढे 'आशेच्या रक्षेतुनि' प्रभा-धवल अशी मंजूषा त्यांना प्राप्त झाल्याचे ते सांगतात.[8] 'श्रीबंदावीर' कवितेत ते कवितेच्या दुज्या मूर्तीला अुद्देशून म्हणतात–

'त्या सुरात, कविते । तनु तंतु वाद्य हे
माझेही बांध : राग तो निराश गा :'

परंतु राष्ट्रीय जीवनाच्या अस्मितेबद्दल आणि राष्ट्राच्या पुनरुत्थानाबद्दल जेव्हा सावरकर विचार करू लागतात, तेव्हा त्यांची ही वैयक्तिक जीवनातील निराशा त्वरित लोप पावते व दुर्दम्य आशावाद त्यांच्या मनी-मानसी खेळू लागतो.

---

१. रानफुले पृ. ७४. २. सा. क. पृ. १६२. ३. मा. ज. पृ. ७.
४. मा. आ. पृ. ९४. ५. अंद. अं. पृ. ५३. ६. सा. क. पृ. १५९.
७. रानफुले पृ. ११२. ८. रानफुले पृ. ११२.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना जे आपण पाहिले तेच कवितेतही दिसते. डॉ. वाटवे म्हणतात त्याप्रमाणे 'आत्मबलाचा पुरा विश्वास, विजिगीषा आणि आशावाद' या सावरकरांच्या शारीरिक आणि मानसिक स्थैर्याच्या तीन संधारक शक्ती आहेत.[1] डॉ. वाटवे यांनी या विधानाला पुरावा म्हणून सावरकरांच्या 'आत्मबल' आणि 'सायंघंटा' ह्या कविता दिल्या आहेत. या दोन्ही कवितांतून सावरकरांच्या वैयक्तिक भावनेवर त्यांची राष्ट्रीय भावनाच मात करताना दिसते. 'आत्मबला'त आध्यात्मिक विचारापेक्षा राष्ट्रीय अस्मितेचा विचारच अधिक प्रबळ आहे. ही कविता ज्या मनःस्थितीत लिहिली, त्या वेळी त्यांच्यापुढे अुभा असलेला रिपू षड्रिपू नव्हता. सैन्यतोफांच्या अैहिक पाशवी सामर्थ्यानिं तो रिपू त्यांच्यापुढे खडा होता. म्हणून या ठिकाणी सावरकरांचा आत्मा जे बल धारण करतो, ते आपल्या अजिंक्य राष्ट्राचे बल असते. 'सायंघंटे'च्या नादाचा अर्थ लावतानाही सावरकरांची ही विजिगीषू मनोवृत्ती त्यांच्या वैयक्तिक नैराश्यावर मात करून कार्य करताना आढळून येते. अन्यथा कवितेच्या पूर्वार्धात 'आता जे बुडणे ती निश्चित स्थिती' असे म्हणणारा कवी अुत्तरार्धात–

'घंटे त्या सुदिनासी आणितो अहा
अेक अेक दिन सन्निध । दास्य मुक्तिच्या
सुदिना–ना मम–परंतु हिंदुजातिच्या
मुक्त तिचे जीवन की तेच आमुचे'[2]

असे अुद्गार काढताना सावरकरांचा हा राष्ट्रीय आशावाद त्यांच्या 'मूर्ति दुजी ती' या कवितेच्या अखेरीस असाच प्रकट होतो. अुग्र लोखंडी जबड्याने त्यांची आशा गिळून टाकली होती. परंतु राष्ट्रीय कर्तव्याला स्मरून त्यांनी जेव्हा 'रुंड-धरा छिन्नमुंड खंड-कृपाणा अशा मूर्तीचा धावा केला तेव्हा दुर्दम्य आशावादाने त्यांचे मन गाऊ लागले :–

"याहुनिहि भयद असे छळ सहेनची
परि झटेन, जीवनांतिही झटेनचि
करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा ।'[3]

सावरकरांच्या ठिकाणी असलेला व्यक्तिगत जीवनातील निराशावाद आणि राष्ट्रीय जीवनातील आशावाद यांचे अुत्तम चित्र पाहावयास सापडते, ते त्यांच्या 'पहिला हप्ता' या कवितेत. १९१० च्या डिसेंबर महिन्यात जेव्हा सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा झाली, तेव्हा झालेली आपली मनःस्थिती अेका

---

१. केसरी २७१ १९५८. २. सा. क. पृ. १०४. ३. सा. क. पृ. १२८.

पत्रात त्यांनी वर्णन केली आहे. वाळला पाठविलेल्या पत्रात ते लिहितात, "मुंबअी हायकोर्टाच्या अभियुक्तांच्या कठड्यातून जेव्हा मी तुझ्यापासून अलग झालो आणि तुझ्यावर शेवटची दृष्टी टाकली–कारण त्यावेळी आपणांस हस्तांदोलन सुद्धा करू दिले नाही.–टोपी हलविली आणि दूर झालो, त्या वेळी बाळ, त्या सर्व करुण देखाव्याची बोच अेका भावनेत होती..तुला कोणी साहाय्य करायला नाही.... अशा स्थितीत भर समुद्रावर निराधार सोडला गेलास! गृहाग्नी कायमचा विझला गेला, गृहदेवता छिन्नविच्छिन्न केल्या गेल्या असे स्पष्ट दिसू लागले.... ज्या वेळी मी ती. वहिनींना 'जो वंशवाग अुद्ध्वस्त झाला। संतत पुष्प तोचि अेक।' असे लिहिले त्या वेळी. हृदयाच्या घावातून रक्त वाहात होते; आशेची सदाफुली देखील वाळून कोळपली होती."[1]

जन्मठेपेच्या शिक्षेच्या वेळी सावरकरांची मन:स्थिती ही अशी नैराश्याने काळवंडलेली होती. पण ही निराशा फक्त व्यक्तिगत जीवनापुरतीच मर्यादित होती. शिक्षेच्या आदल्याच दिवशी रात्री त्यांनी लिहिलेली 'पहिला हप्ता' ही कविता राष्ट्रीय आशावादाने कशी ओसंडत होती हे पाहण्यासारखे आहे. सावरकरांनी ती कविता लिहिली ती आपल्या बरोबरीच्या सहाभियुक्तांना व बाहेरच्या आपल्या बांधवांना काहीतरी आशादायक व स्फूर्तिप्रद संदेश देण्यासाठी![2] या कवितेत सावरकरांनी लिहिले होते :–

"सारथी जिचा अभिमानी। कृष्णजी आणी। राम सेनानी
अशि तीस कोटि तव सेना
ती अम्हांविना थांबेना
परि करुनि दुष्ट दल दलना
रोविलची स्वकरी। स्वातंत्र्याचा हिमालयावरि झेंडा जरतारी॥"[3]

पुढे अंदमानच्या लोखंडी जबड्यात चुरडले जात असताना याच कवितेने सावरकरांच्या व त्यांच्या बंधूंच्या–बाबांच्या–मनाला निश्चल व अुत्साहित केले होते.[4]

सतत पुरोगामी राहिलेले व्यक्तिमत्त्व

अंदमानामधून पाठविलेल्या अेका पत्रात सावरकरांनी बाळला लिहिले आहे, "आपल्या मातृभूमीचे दास्यविमोचन करायचे आणि तीतही माझ्यापुरते मी अितक्या समाधानकारक रीतीने काम केलेले!.... मला किती निर्धोर

---

१. अंद. अं. पृ. ५३. २. सा. च. पृ. ४१७. ३. सा. क. पृ. ८१. ४. मा. ज. पृ. १२५.

झोप लागते– वृत्ती कशा मधुमय होतात. कारण जेव्हा दिवस होता आणि तिच्या रणक्षेत्रावर माझी आवश्यकता होती त्या वेळी मी अितके खपून काम केले की, रात्र येताक्षणी निद्रा दर्वाबिंदूंप्रमाणे माझ्या पापण्यांवर हळूच अुतरली."[१] दुसऱ्या अेक-दोन पत्रांतून, आपल्यावर ज्यांनी नितांत प्रेम केले आहे त्यांची मानसपूजा करण्या-साठी आपले मन या कारागारातून भ्रमंतीवर कसे निघते याचे वर्णन केले आहे.[२] कारागृहात कोणत्याही कठीण किंवा सोप्या कामाकडे आपली योजना झाल्यास ते काम आपण 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।' हे चरण स्वतःशीच गुणगुणत कसे पार पाडीत असतो, याचाही अुल्लेख त्यांनी आणखी अेका पत्रात केला आहे.[३] 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रात आपल्या मूलतः हळव्या, संवेदनाक्षम असणाऱ्या मनाला परिस्थितीमुळे कर्तव्यकठोर कसे व्हावे लागले, याचे हृदयद्रावक चित्र सावरकरांनी रंगविले आहे. पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा अैकल्यावर मनाची झालेली मरगळलेली अवस्था,[४] डोंगरीच्या कारागृहात झालेली पत्नीची भेट आणि त्या वेळी 'आकाश वळवांनी भरून यावे तशी अेका क्षणात हृदय दाटून झालेली मनःस्थिती,"[५] अंदमानांत पत्नीची व धाकट्या भावाची झालेली पुनर्भेट आणि त्यावेळी वहिनींच्या मृत्यूची वार्ता 'हलाहल गिळावे तशी गुपचिप गिळून' टाकण्याची प्राप्त झालेली परिस्थिती[६] या सर्वांचे वर्णन सावरकरांनी हेलावलेल्या अंतःकरणाने केलेले आहे; आणि त्यांच्या कवितेतून हेच आत्मवृत्त ठायीठायी प्रकट झाले आहे.

'मरणोन्मुख शय्येवर' पडल्या पडल्या त्यांनी मृत्यूला बजाविले आहे–

'आणि जरी दिवस अंसे अजुनि तरुण हा
तरि लहानथोर अशी असति संपली
दिवसाची कार्येही बहुत करुनिया"[७]
'म्या असता दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेहि म्हणुनि दुःख ना मला'[८]

'निद्रा' ही कविता कवीच्या या मानसिक समाधानातून निर्माण झाली आहे. हीच निद्रा कवीला प्रतिदिन त्याच्या आप्तस्वकीयांची 'सोनेरी स्वप्नांच्या' रथातून भेट घडविते. अितकेच नव्हे तर 'पंखावरि वाहुनि ती विश्व आणिते । कारेतहि मजसाठी' असे अुपकृतीचे अुद्‌गार कवी काढतो.[९] 'सायंघंटा' कविते-तही हीच भावना व्यक्त करताना सावरकर लिहितात :

---

१. अं. अं. पृ. ४९. २. अं. अं. पृ. २५, ४०. ३. अं. अं. पृ. २४. ४. मा. जन्म. पृ. ७. ५. मा. जन्म. पृ. १४, १५, १६. ६. मा. जन्म. पृ. ४१२. ७. सा. क. पृ. १५९. ८. सा. क. पृ. १६३. ९. सा. क. पृ. १०७.

'की येता रात्रीतुनि रथ विचित्र ते
स्वप्नांचे भू–जल–ख–ग शृंखलिताही
देहासी, गेहासी तेवि, सोडुनि
वंदीते स्वेच्छासंचार घडतसे
प्रियसंगति, मुक्तभोग वा नवीनही ।'[1]

'सप्तर्षि' कवितेत तुरुंगातील नियोजित काम आपण कोणत्या वृत्तीने करीत होतो, याचे वर्णन सावरकर पुढील आर्येत करतात :

'श्रम ते शांत मने मी लागे करण्या सवे करी धरुनी
स्वे स्वे कर्मण्यभिरत संसिद्धिसि लाभतात ते स्मरुनी ।।'[2]

खडतर, विरहतप्त जीवनात झगडताना आयुष्याच्या अखेरीस आपल्या पेल्यात 'कितीही पीत राहिलो तरी न संपणाऱ्या' 'अश्रूंच्या मदिराच मात्र राहिल्या' आहेत असा निष्कर्ष सावरकरांनी 'मरन्णोन्मुख शय्येवर' या कवितेत सांगितला आहे.[3] पण कर्तव्यकठोर वागताना या अश्रूंचा आढळही आपल्या डोळ्यांत होअू नये अशी खबरदारी त्यांना घ्यावी लागली. आत्म-वृत्तात यासंबंधी त्यांनी केलेले वर्णन यापूर्वीच देण्यात आले आहे. हीच सारी मन:स्थिती 'विरहोच्छ्वासा' तील काही कवितांचा विषय बनली आहे. अेकोणिसाव्या गीतात सावरकर लिहितात :

"आणि तुझ्या तरी हस्ती असा का देवा
हा विषम विपर्यय व्हावा,
ये पिताहि जो पाजिता न वा प्याला
का आसवात तो भरला;
सुम कोमल का हृदय दिले वा का या
योजिले वज्र, वाराया
सखि ! कवण वदे 'दयित जनांची माया
याच्या न शिवतची हृदया ।"[4]

"पण हे असे कठोर हृदय करावे लागले ते वीर धर्माची, कर्तव्याची अट म्हणून ! त्या धर्माची अटच त्या परिस्थितीत अशी होती की, हसत ते अुग्र व्रत कर ! म्हणून रक्त गळले तरी प्रकटपणे अश्रू गळू दिला नाही. परंतु त्याचा विपर्यास होअन सहानुभूतिशून्य लोक म्हणाले : 'ह्या हृदयात अश्रूच नाहीत.'" "परंतु

---

१. सा. क. पृ. १०१. २. रानफुले पृ. ११७. ३. सा. क. पृ. १५८.
४. रानफुले पृ. ६६. ५. रानफुले पृ. ६५.

ज्या परिस्थितीत या शोकाच्या कैचीत मी गवसलो आहे तीत– 'ती अश्रूंची चैन : तीहि मजसी ना ।' असे म्हणण्याचा प्रसंग आपल्यावर आला आहे.[1]"

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन प्रस्तुत प्रबंधाच्या प्रारंभीच्या प्रकरणातून घडविले आहे. त्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला तर कलानिर्मितीच्या अुच्च पातळीवर जाअूनही सावरकर आपले विशिष्ट व्यक्तिमत्त्व, आपला स्वभावविशेष, आपले वैशिष्ट्यपूर्ण मनोधर्म विसरू शकत नाहीत असेच आढळून येते. क्रांतिकारक संघटनेत आणि संगरात सावरकरांना जसे सदैव स्वत:चेच पुढारी व्हावे लागले,[2] तसे काव्यात कोणतीही भावभावना वा विचार सावरकर व्यक्त करीत असोत, त्यांचे व्यक्तिमत्त्व सतत पुरोगामीच राहिले. किंबहुना आंब्याच्या कणाकणांत जसे आम्रत्व भरलेले असते, तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व कवितेच्या शब्दाशब्दांत साठविलेले आहे हेच सिद्ध होते.

कुटुंबशीलता

कुटुंबशीलता हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अेक स्पृहणीय विशेष आहे. स्पृहणीय या अर्थाने की, कर्तव्याने कठोर कार्याच्या करांत त्यांना ढकलून दिल्यानंतरही त्यांची ही कुटुंबवत्सलता कायम राहिली. कवितेचा विषय आत्मनिष्ठ असो वा वस्तुनिष्ठ असो, त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुधा सरळपणे आणि क्वचित वक्रतेने व्यक्त होताना आढळते. 'सायंकाळी रानात चुकलेल्या कोकरा'शी बोलताना अेकदम त्यांचे मातृप्रेम जागृत होते आणि पोरकेपणाच्या जाणिवेने भारावून ते म्हणतात :–

'तव माता क्षणभर चुकली । म्हणुनि का तनू तव सुकली
माझीही माता नेली । यमकरे.
भेटेल अुद्या तव तुजला । मिळणार न परि मम मजला
कल्पान्तकाळ जरि आला । हाय रे'[3]

स्वत:चे घराणे वा वंश, जनक-जननी, आजोळचे मामा आणि आजी, थोरले बंधू बाबा व धाकटे बंधू बाळ, बाबांची पत्नी येसूवहिनी, स्वपत्नी यमुना, स्वत:चा पुत्र प्रभाकर, मित्रमेळ्यातील आपले सुहृद्जन, आपले श्वशुर आणि त्यांच्याकडून स्नेहसंबंध जुळलेले जव्हाराधिपती राजे कृष्णशहा अित्यादी सर्व त्यांच्या कुटुंबशील वृत्तीच्या कक्षेत येतात.

---

१. रानफुले पृ. ६९. २. मा. आ. पृ. ८८. ३. सा. क. पृ. ११.

देशाची सेवा करण्याचे भाग्य लाभलेला आपला वंश धन्य आहे. अितकेच नव्हे, तर तो 'सुनिश्चये अीश्वरी अंश' आहे असे सावरकरांना वाटते.'[१] या अीश्वरांश असलेल्या कुलाचा अुल्लेख ते 'माझे मृत्युपत्र' या कवितेत पुन्हा करतात.[२] 'मरणोन्मुख शय्येवर' असतानाही आपल्या 'सत्कुला'बद्दलचा त्यांचा अभिमान कायम होता.[३] याच कवितेत त्यांनी 'परम दयाळू जनक-जननीचा' आदराने अुल्लेख केला आहे.[४] आत्मचरित्रातून आणि पत्रांतून त्यांनी आपल्या दोन्ही बंधूंबद्दल आणि वहिनीबद्दल व्यक्त केलेली आदराची, आणि आत्मीयतेची भावना त्यांच्या कवितेतून अनेकदा व्यक्त झाली आहे. 'जयासी तुवा प्रतिपाळिले। मातेचे स्मरण होअू न दिले' अशा गौरवयुक्त शब्दांत वहिनींबद्दलचा आदर ते प्रकट करतात.[५] 'वत्सले,' 'माझी स्फूर्ती,' 'धैर्याची मूर्ती,' 'देवी' अित्यादी शब्दांनी ते वहिनींना संबोधतात. आपल्या दोन्ही बंधूंचा स्वभावविशेष खालील ओळींतून ते सांगतात :

"जनक आणि जननी ती, त्याहुनीहि की
वात्सल्ये, पुण्ये, प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमधे
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसे
प्रेयांचे प्रेमपुण्य"[६]

सावरकरांची पत्नीसंबंधीची भावना पत्रांतून जितकी व्यक्त झाली आहे, तितकी ती आत्मवृत्तातून झालेली नाही; आणि आत्मवृत्तातून जितकी व्यक्त झाली आहे, तितकी कवितेतून व्यक्त झालेली नाही. कदाचित त्या काळातील शिष्टाचाराचा व सावरकरांच्या ठायी असलेल्या 'गुरुजन-मर्यादे'चा हा परिणाम असावा. 'प्रभाकरास' आणि 'माझे मृत्युपत्र' या मुख्यतः दोनच कवितांतून सावरकरांच्या पत्नीसंबंधीच्या नाजूक भावना मुखर झाल्या आहेत. 'प्रभाकरास' या कवितेतच त्यांची वात्सल्य-भावना प्रकट झाली आहे. 'या वात्सल्यदर्शक आत्मलेखना'चा गौरव प्रा. द. के. केळकर यांनी केलेला आहे.[७] काळाने प्रभाकरावर अचानक झडप घातल्याने त्यांच्या ठायीच्या वात्सल्याचा झरा खंडित झाला. पण हीच वात्सल्याची भावना राष्ट्रीय पातळीवर चढून पुढे प्रकट झाली ती 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत. 'पुत्र अखिल हे, अभिनव भारतची मम' अशी व्यापकता त्यांच्या वात्सल्य-भावनेस आली.[८] 'चांदोबा,

---

१. सा. क. पृ. ७४. २. सा. क. पृ. ७८. ३. सा. क. पृ. १६१. ४. सा. क. पृ. १६१. ५. सा. क. पृ. ७३. ६. सा. क. पृ. १६१. ७. सा. क. पृ. ६८. ८. सा. का. स. पृ. १४५. ९. सा. क. पृ. १५९.

चांदोबा । भागलास का ?' या कवितेत कवीने आपल्या 'आजोळींच्या लाडांचा, लीलांचा आणि लोभांचा' दरवळलेला स्मृतिपुंज साकार केला आहे;[१] आणि त्यातून त्याने आपल्या प्रेमळ मामांची आणि आवडत्या आजीची जरतारी स्मृती विणलेली आहे.

'सागरास' कवितेतही सावरकरांच्या ठिकाणी असलेला 'मायाळू कुटुंबवत्सल' कसा दर्शन देतो याकडे प्रा. भ. श्री. पंडित यांनी लक्ष वेधले आहे.[२] 'स्वजनां'च्या भेटीसाठी कळवळणारा कवी येथे दिसतो. सावरकर अनेक ठिकाणी स्वजनांचा, मित्र व मैत्रिणींचा अुल्लेख प्रतीकात्मक रीतीने तरुलता, पुष्पांच्या रूपकाने करतात. 'माझे मृत्युपत्र' कवितेत चांदण्यांत जमलेल्या 'तरुण मंडळा' चे, 'मित्रमेळ्या'तील सहकाऱ्यांचे वर्णन 'दिव्यालता-तरुसि जे गृह बाग झाला' असे प्रतीकात्मक रीतीने सावरकरांनी केले आहे.[३] प्रभाकरास व प्रिय पत्नीस सोडून विदेशगमन करण्याचे कार्य अुदित होताच 'अंतरता मज प्रीति-तरु-लता खेद अती झाला' असे व्याकुळ अुद्गार सावरकरांनी काढले होते.[४] तसेच प्रभाकराच्या मृत्यूचे 'विषम-वृत्त' अैकताच आपल्या मैत्रिणी व मित्र यांना किती दारुण दुःख झाले याचे वर्णन त्यांनी पुढील प्रतीकात्मक पद्धतीनेच केले आहे :– 'वसंत विव्हल लतातरु ते विव्हल बहु झाले.'[५] 'सागरास' कवितेतही ह्याच पद्धतीने त्यांनी आपला स्वजनाबद्दलचा कळवळा व्यक्त केला आहे. सावरकर लिहितात :

"ती आम्रवृक्ष वत्सलता । रे
नवकुसुमयुता त्या सुलता । रे
तो बालगुलावही आता । रे
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला ।"[६]

जव्हारचे अधिपती राजे कृष्णशहा यांच्या पदरी सावरकरांचे सासरे श्री. भाअूसाहेब चिपळूणकर हे अुच्च पदावर काम करीत होते. असा 'समर्थ कारभारी' राजे कृष्णशहा यांना मिळाल्याबद्दल सावरकरांनी गौरवोद्गार काढले आहेत;[७] आणि स्वतः राजेसाहेबांसंबंधी वाटणारी कृतज्ञतेची भावनाही कवितेतून व्यक्त केली आहे.[८]

---

१. सा. क. पृ. ९४, ९५. २. म. सा. पत्रिका – एप्रिल ते जून १९५८.
३. सा. क. पृ. ७५. ४. सा. क. पृ. ६९. ५. सा. क. पृ. ६९. ६. सा. क. पृ. ७१. ७. सा. क. पृ. ६३. ८. सा. क. पृ. ६४.

कर्तव्यविचार

अशा 'मायाळू कुटुंबवत्सल' सावरकरांवर त्यांच्या ठायीची कर्तव्यवृत्ती कशी मात करते आणि त्यांना कर्तव्यकठोर कशी बनविते हे आपण त्यांच्या व्यक्ति-मत्त्वाच्या अभ्यासात पूर्वी पाहिलेच आहे. कवितेतही याच स्वरूपाचे विचार सावरकर व्यक्त करतात. कर्तव्याला धर्माच्या श्रेष्ठ पदवीवर अधिष्ठित करून साऱ्या जीवनाची रचना त्या धर्माच्या आज्ञेनुसार आपण केली आहे, ही त्यांची भूमिका कधीच सुटली नाही.' 'माझे मृत्युपत्र' या कवितेत 'धर्मार्थ देह' असल्याचे आपण कृतीने सिद्ध केले याचा त्यांना अभिमान वाटला.[१] आपणां-सारख्या 'भावकोवळ्या' कवीला कारागृहाच्या लोह-पिंजऱ्यात स्वतःचे मन वज्रशाली करण्यासाठी 'ऋकचतीक्ष्ण कर्तव्य'च[२] कसे अुपकारक ठरले हे 'मूर्ति दुजी ती' या कवितेत त्यांनी स्वतःच सांगितले आहे. 'मरणोन्मुख शय्येवर' पडल्यावरही मृत्यूच्या यातना 'समजुनि कर्तव्य सहू सिद्ध असेची' अशीच भूमिका त्यांनी स्वीकारली.[३] 'विरहोच्छ्वास' या खंडकाव्यात प्रीती आणि कर्तव्य यांच्या परस्परविरोधी झगडयात कर्तव्याने आपल्या अंतःकरणावर कशी हुकमत गाजविली आणि या 'वीरकर्तव्यास्तव धारण केलेल्या कठोरपणाच्या कवचा-खाली' आपले प्रेमळ हृदय विरहाने सारखे कसे झुरत होते याचे वर्णन सावरकरांनी कवितेतील नायक मुकुल याच्या मुखाने केले आहे. या कर्तव्यरूपी धन्याने आपल्या जीवनावर स्वामित्व कसे प्रस्थापित केले याचे वर्णन नायक मुकुल याने पुढीलप्रमाणे केले आहे : 'हा कर्तव्यधनी फार रागीट आहे, अती अुग्र असा तो विप्र आहे,[४] 'प्रिय सखीपासून दूर होण्याची आणि प्रथम रणयज्ञ परिपूर्ण करण्याची आज्ञा या कर्तव्यविप्रानेच दिली. या अंधाऱ्या कोठडीत पहारा देण्याचे काम त्यानेच करायला सांगितले.'[५] 'त्या विरहाने व्याकूळ होअूनही कर्तव्य करणेच प्राप्त झाले'[६] 'या वीरधर्माची त्या परिस्थितीत अटच अशी होती की, 'हसत हे अुग्र व्रत कर।'[७] आणि अखेरीस–

'संपन्न असा विप्रयज्ञ हा होता
मग बघुनि कुण्या अेकान्ता
तू आवडत्या त्याचि तिच्या प्रियकंठी
मारुनि मिठी
– आपल्या जीवनातला आनंद लूट'[८]

---

१. सा. क. पृ. ७७. २. सा. क. पृ. ११४. ३. सा. क. पृ. १६७. ४. रानफुले पृ. ६२. ५. रानफुले पृ. ६३. ६. रानफुले पृ. ६४. ७. रान-फुले पृ. ६५. ८. रानफुले पृ. ७६.

अतएव, जीवन-मृत्यू, कृती-प्रीती, सुखदु:ख या सर्व गोष्टींचा विचार सावरकर कर्तव्याच्या कसोटीवर कसा करतात हे ध्यानी येते. कर्तव्यविचार ही सावरकरांच्या जीवनातील फार मोठी प्रेरक शक्ती होती.

जशा निष्ठा तशी काव्यसृष्टी : स्वातंत्र्यनिष्ठा :

सावरकरांच्या व्यक्तित्वातील ज्या तीन प्रमुख निष्ठांवर त्यांची काव्य-सृष्टी विकसित झाली आहे. त्या निष्ठा म्हणजे स्वातंत्र्यनिष्ठा, देशनिष्ठा आणि हिंदुत्वनिष्ठा ह्या होत. प्रा. व. ना. नाओक यांनी सावरकरांच्या कवितेतील स्वातंत्र्यप्रीतीचे हे महत्त्व अचूकपणे निर्देशित केले आहे. "हे काव्यवाङ्मय वरवर चाळणाऱ्याच्याही लक्षात अेक गोष्ट आल्याशिवाय राहात नाही आणि ती ही की, सावरकरांच्या स्वातंत्र्यप्रीतीभोवतीच ही काव्यमाला गुंफलेली आढळते," असे प्रा. नाओक म्हणतात.[1] 'अुत्कट देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य ह्या सावरकरांच्या अल्पवयातल्या गुणां'वर त्यांची कविता जोपासली गेली.[2] श्री. ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या मते 'विनायकराव सावरकर यांची कविता म्हणजे स्वातंत्र्यस्फूर्तीचे निधानच होय.'[3] पूर्वकालीन व समकालीन कवींच्या बरोबर सावरकरांची तुलना करताना सावरकरांची ही स्वातंत्र्यनिष्ठा व त्यातून अुत्स्फूर्त झालेले काव्य डॉ. अ. ना. देशपांडे यांना अधिक महत्त्वपूर्ण वाटते. म्हणूनच ते लिहितात, "स्वातंत्र्यविषयक कविता केशवसुतादींनीही लिहिलेली आहे, पण स्वातंत्र्याचा पुरस्कार काव्याच्या माध्यमातून सावरकरांनी अितक्या तन्मयतेने, तेजस्वितेने आणि निर्भयतेने केलेला आहे की, प्रभावी आणि प्रतिभा-संपन्न असे सर्वश्रेष्ठ स्वातंत्र्यशाहीर म्हणवून घेण्याचा त्यांचा अेकट्याचाच हक्क आहे. स्वातंत्र्यसंगरात सर्वस्वार्पण करणारे ते स्वत: स्वातंत्र्यवीर असल्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्यविषयक कवितांना अुत्कट स्वानुभूतीचे आणि अपार आत्मप्रत्ययाचे असाधारण तेज प्राप्त झाले आहे."[4] स्वातंत्र्यदेवीची स्तोत्रे गाण्याच्या मुख्य विचार-धारेतूनच सावरकरांची कविता जन्म पावली असे श्री. धनंजय कीर यांचे मत आहे.

(The parent thought of his poetry is the worship of the Goddess of Freedom.)[5]

स्वातंत्र्यप्राप्तीच्या ज्या महान ध्येयाची घोषणा सावरकरांनी १८९८ मध्ये देवीपुढे शपथ घेअून केली त्याच ध्येयाच्या दिशेने त्यांच्या साऱ्या शक्ती विकसित

---

१. सा. का. स. पृ. १८४. २. सा. च. प्रस्तावना पृ. ८. ३. मा. आ. क. पृ. ३२३. ४. आ. म. वा. अि. भाग २ – पृ. ३६. ५. Savarkar and His Times p. 129.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

झाल्या. त्यांची काव्यशक्ती त्याला अपवाद नव्हती. त्यांच्या स्वातंत्र्यभावनेला प्रारंभापासूनच दैवी अधिष्ठान लाभले होते. त्यांच्या लहानपणाच्या देवीभक्तीचे रूपांतर पुढे स्वातंत्र्यलक्ष्मीच्या भक्तीत कसे झाले, याचा बोध त्यांचे लहानपणापासूनचे अेक सवंगडी श्री. गो. आ. देसाअी यांच्या अेका आठवणीवरून चांगल्या रीतीने होतो. श्री. देसाअी लिहितात, "देशाला स्वातंत्र्याच्या शिखरावर चढविण्याचे प्रयत्न करण्याची शपथ ह्या महिषासुरमर्दिनीपुढे ह्या बाल किशोराने घेतल्यानंतर तो आपणांस 'दुर्गादास' असे म्हणवू लागला; आणि काहीही लिहावयाचे झाले तर प्रथम 'श्री' किंवा 'श्रीगजाननप्रसन्न' ह्या ठिकाणी 'श्री योगेश्वरी प्रसन्न' लिहून आपल्या अिष्ट देवतेस आवाहन करावयाचे. 'श्री योगेश्वरी प्रसन्न'चे रूपांतर पुढे 'स्वातंत्र्यलक्ष्मी प्रसन्न' ह्या आवाहनात झाले."[1] ही स्वातंत्र्यलक्ष्मी आपणांस देवीच्या, दैवी संपत्तीच्या, दैवी शक्तीच्या रूपात प्रकट झाली आहे असे स्वत: सावरकर सांगतात.[2] दैवी संपत्तीचे अधिष्ठान लाभलेली सावरकरांची ही स्वातंत्र्यनिष्ठा केवळ अेका राष्ट्रापुरती संकुचित राहिली नाही. अखिल मानवतेचे प्रेम तिच्या ठायी होते आणि अैहिक व पारलौकिक जगाच्या कल्पनाही तिच्या कक्षेत सामावल्या होत्या. आपल्या या स्वदेश-स्वातंत्र्याचे व्यापक व अुदात्त स्वरूप सावरकरांनी पुढील शब्दांत सांगितले आहे : "ते स्वदेशस्वातंत्र्य हेच आमचे ध्येय. ते स्वदेशस्वातंत्र्य हाच आमचा राजकीय धर्म. ते स्वदेशस्वातंत्र्य हीच आमची राष्ट्रीय देवता, आमचा राजकीय देव, आमची अैहिक अुन्नती, आमचा मोक्ष."[3] सावरकरांच्या कवितांच्या विषयांचे स्फुरण याच अुत्कट निष्ठेतून झालेले आहे आणि त्यांच्या आशयांना घाटही याच निष्ठेतून प्राप्त झाला आहे.

सावरकरांच्या अनेक कवितांचा अुद्गम आणि विकास ह्या स्वातंत्र्यनिष्ठेतून झाला आहे. या सर्व कवितांच्या केंद्रस्थानी असणारी कविता म्हणजे 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' ही होय.[4] सावरकरांना अभिप्रेत असलेल्या स्वतंत्रतेचे तत्त्व रूपदर्शन या कवितेच्या पूर्वार्धात घडते. सावरकरांना देवी स्वतंत्रता ही 'भगवती'च दिसते. ती राष्ट्राचे मूर्तिमंत चैतन्य आहे, नीती आणि संपत्तीची नियंत्रक शक्ती तीच आहे. आदित्याचे तेज तीच आणि अुदधीचे गांभीर्यही तीच आहे, पंचमहाभूतांतून तिचे स्फुरण होत असते. या जगातील जे जे अुत्तम, अुदात्त, अुन्नत आणि महन्मधुर आहे ते ते या स्वतंत्रतादेवीच्या साहचर्याने नांदत असते, अितकेच नव्हे तर मोक्ष, मुक्ती आणि साक्षात परब्रह्म ही स्वतंत्रतेचीच रूपे आहेत.

---

१. मा. आ. परिशिष्ट १, पृ. १११. २. मा. आ. पृ. २२३. ३. मा. आ. पृ. १३८. ४. सा. क. पृ. १.

सुजनांकडून पूजिली जाणारी आणि अधमांच्या रक्ताने रंगणारी अशी ही स्वतंत्रता प्रत्यक्ष देवताच आहे. म्हणूनच या भगवती स्वतंत्रतेला अुद्देशून सावरकर 'स्तोत्र' गातात. ती प्रसन्न व्हावी म्हणून तिला वंदन करतात, तिचा जयजयकार करतात. कारण सावरकरांच्या दृष्टीने 'भारतीय राजकीय स्वतंत्रता हेच अीश्वरी कृपेचे ह्या युगीचे साधन' होय.[1]

या स्वतंत्रतेच्या चरणी सावरकरांनी आपले सर्वस्व समर्पण केले होते. आपल्या प्रतिज्ञेत त्यांनी म्हटले होते : "माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होअून माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन."[2] हीच प्रतिज्ञा, हीच स्वातंत्र्यनिष्ठा अुरी बाळगून सावरकरांनी या कवितेत म्हटले–

'तुजसाठि मरण ते जनन
तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधि देशिल वरदे ?'[3]

आपले ध्येय आणि निष्ठा यांनी समरसून हे अुद्गार सावरकरांनी काढले असल्यामुळे प्रा. नाअीक यांच्यासारख्या टीकाकारांना अशा पद्यपंक्तींत सावरकरांचे हृदयसर्वस्व साठविले आहे असे वाटते आणि सावरकरांचे अेकंदर आयुष्य याच मंत्राने, आशेने, त्या आशेतून अुत्पन्न होणाऱ्या विषण्णतेने व तत्संलग्न निश्चयाच्या बळाने कसे भारलेले होते हे त्यांच्या अनुभवास येते.[4]

स्वातंत्र्याचा अुत्कट ध्यास, मुक्ततेची तीव्र लालसा, पारतंत्र्याबद्दल चीड, वद्धतेबद्दल खेद व हळहळ यांच्या ताणांतून सावरकरांच्या कवितांचा आशय विणला गेला आहे. अनेकदा विषय आणि आशय यांचे धागे त्यांच्या कित्येक कवितांत अेकजीव झालेले दिसतात. ज्यांचे जनन आणि मरण देशाच्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी घडले असेच वीरवर सावरकरांच्या कवितेचे विषय बनले आहेत. 'चाफेकर-रानडे' सावरकरांच्या नमनाला योग्य ठरले होते कारण देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी फास-बोहल्यावर चढून त्यांनी 'मुक्ति-नवरीला वरले' होते.[5] सिंहगडच्या पोवाडयातील तान्हाजी हा तर शिवनेरीवर अुदयाला आलेल्या शिवरूपी स्वातंत्र्यसूर्याचा किरणच होता.[6] बाजीप्रभू देशपांडे

---

१. मा. आ. पृ. २२२. २. मा. आ. पृ. ८२. ३. सा. क. पृ. २. ४. सा. का. स. पृ. १८६. ५. चा.–रा. या. फ. पृ. १४. ६. सिं. पो. पृ. १.

स्वतंत्रतेच्या रणात मरून चिरंजीव झाला होता.[1] "चला घालू स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला" अशा तडफेने तो रणांगणात तळपला होता. सावरकरांच्या दृष्टीने शिवाजी ही स्वातंत्र्याची देवता होती.[2] 'ती अंगात संचरून स्वदेश-स्वातंत्र्याच्या कर्मक्षेत्री झुंजण्याची आणि जिंकण्याची शक्ती भारतीयांच्या ठायी यावी या हेतू'ने त्यांनी शिवाजीवर अनेक कविता लिहिल्या. 'श्री शिवगीत', 'श्रीशिवाजीमहाराजांची आरती', 'शिववीर', 'हिंदु-नृसिंह' अित्यादी कविता त्यांनी याच हेतूने लिहिल्या. 'ती मायभूमी मुक्त-क्लेशा हो' असा पण शिवाजीने केला होता. (श्रीशिवगीत) श्रीशिवरायाने 'स्वातंत्र्यदेवीचा गोंधळ करून 'पारतंत्र्याचा वोकड चिरला' आणि मग 'स्वातंत्र्या संपादुनि देशा शोभविले' (शिववीर) 'परवशतेच्यापाशी मरणोन्मुख' झालेल्या आम्हांला मुक्त करण्यासाठी शिवभूपाने शिवनेरीवर देह धारण केला आणि नंतर तो 'देश स्वातंत्र्याचा दाता' झाला. (श्रीशिवाजीमहाराजांची आरती).

स्वातंत्र्यनिष्ठेतून अुद्भूत झालेले हे वरील विषय आणि त्यांतील आशय यांच्यातील अेकजीवता सावरकरांनी अशा रीतीने साधली आहे. परंतु सावरकरांच्या अशा कित्येक कविता आहेत की, ज्यांतून सावरकरांना लागलेला स्वातंत्र्याचा ध्यास, लागलेली तळमळ व्यक्त होते. ती तळमळ कधी काव्य-विषयातून, कधी कवितेच्या आशयातून तर क्वचित कवितेच्या काही काव्य-चरणांतून, प्रकट होते. या ध्यासाच्या अभिव्यक्तीची अेक पद्धती अितिहासातील स्वातंत्र्यकाळाचे, त्यातील वैभवाचे समरसून आणि अभिमानाने वर्णन करणे, त्यात साठविली होती. सावरकरांना असे वर्णन करणे अतिशय प्रिय वाटे. 'श्रीमंत सवाअीमाधवरावांचा रंग' या कवितेतील स्वातंत्र्यकाळातील वैभवाच्या वर्णनाने त्यांनी सर्व कविताच जणू नखशिखान्त रंगविली आहे. पूर्वी–म्हणजे स्वातंत्र्याच्या काळात–आपण सर्व कलांची खाण कसे होतो, जगभर आमचा व्यापार कसा चाले, पांडवांची मयसभा आम्हीच कशी निर्माण केली, प्रतिब्रह्मेच बनून आम्ही विविध वस्तू कशा बनवीत होतो याचे अैश्वर्यशाली चित्र सावरकरांनी 'स्वदेशीचा फटका' या कवितेत रेखाटले आहे. 'हिंद सुंदरा ती' या कवितेत भारताची समृद्ध अशी सांस्कृतिक परंपरा त्यांनी शब्दबद्ध केली आहे.

ही स्वातंत्र्यविषयक तळमळ अभिव्यक्त करण्याची दुसरी पद्धती अगदी सरळ आहे. 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' गाताना त्यांनी त्या भगवतीला सरळ प्रश्न विचारला आहे–

---

१. सा. क. पृ. ४७. २. मा. आ. पृ. १४२.

'ही सकल-श्री-संयुता । आमुची माता । भारती असता
का तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वीची ममता सरली
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, का तू त्यजिले अुत्तर याचे दे ?'

'हिंद सुंदरा ती' या कवितेत भारतमातेच्या वैभवाचे वर्णन केल्यानंतर अखेर त्यांच्या तळमळीला पुढील शब्दरूप प्राप्त झाले–

'शीघ्रचि होअिल ती । मुक्त शुभमूर्ति
स्वतंत्र ती, समर्थ ती । विश्वोद्धरणा ती !'

अंदमानातील कारागृहाची 'सायंघंटा' कानावर पडताच सावरकरांच्या मनात विचार घणघणू लागतात ते भारतमातेच्या मोचनाचे. भारताच्या नष्ट दशेच्या सेनेतील दिवसाचा अेक दुष्ट शिपाअी ठार झाला म्हणून त्यांना आनंद होतो; आणि घंटेचा तो अेक अेक गर्ज भारताच्या दास्यमुक्तीच्या त्या सुदिनाला सन्निध आणतो म्हणून ते त्या घंटानादाचे स्वागतच करतात. श्रीबंदावीराने सोसलेल्या छळाप्रमाणे कारावासातील असह्य छळ आपणही सहन करू शकू असा विश्वास सावरकरांना वाटत होता. मातृभूमीच्या अेकतेसाठी हे छळ सोसले पाहिजेत अशी सावरकरांची धारणा होती. म्हणूनच 'मूर्ति दुजी ती' या कवितेत त्यांचे स्वातंत्र्याकांक्षी मन घोषणा देत होते–

"हे सहेनची
याहुनिही भयद असे छळ सहेनची
परि झटेन, जीवनांतिही झटेनची
करण्दासी ही विमुक्त मातृभू पुन्हा ।
मुक्त पुन्हा, शक्य पुन्हा, मनुजमंगला
पुण्यभूमि पुनरुत्थित पतित पावना ।"

पारतंत्र्याची चीड, गतवैभव नष्ट झाल्याबद्दलची हळहळ, पूर्व गौरव आणि दास्यमुक्त जीवनाचा धिक्कार सावरकरांच्या कवितेत अनेक ठिकाणी दिसतो. भारतमाता 'परक्यांची दासी झाली' म्हणून तळमळणारे सावरकर स्वतंत्रतेचे स्तोत्र गाअून तिला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतात. 'परदेशी पटे कदापि धरू नका' असा कळकळीचा अुपदेश ते 'स्वदेशीच्या फटक्या'त करतात. 'पर टोळ घाला' येअून त्याने स्वातंत्र्यराशीस लुटून नेल्याबद्दल ते हळहळतात.[1]

---

१. सा. क. पृ. ९.

रानात चुकलेल्या कोकराची बावरलेली मन:स्थिती पाहून त्यांना स्वातंत्र्य-नष्टदशेतील दु:खाची आठवण होते आणि ते म्हणतात–

'स्वातंत्र्य जयांचे गेले । परक्यांचे बंदी झाले
त्रिभुवनी सुख न त्या कसले । हे खरे[1] '

पारतंत्र्याने मती कुंठित कशी होते याची जाणीव 'केतकर प्रशस्ती' करताना ते विसरत नाहीत.[2] परवशतेतील दु:ख, अस्वलीच्या नखांपेक्षाही अधिक दुस्सह असते असे 'गोदावकिली' करताना ते सांगतात.[3] 'वृषोक्ति' कवितेत अुपरोधाचा मार्मिक अुपयोग करून त्यांनी बैलाच्या मुखातून पारतंत्र्यातील हिंदूंचा धिक्कार केला आहे. 'पारतंत्र्यामुळे कांचनमया भूमी तू लोखंडी कशी केलीस, 'रावबहाद्दुरी' शुष्क किताव घेअून तू त्याच्या मोवदल्यात स्वातंत्र्यसंपदा परक्यांना कशी दिलीस, तू जे पारतंत्र्याचे जू वाहतो आहेस ते असंख्य अन्यायकारक, यमपुरीहून तापद, नाशाच्या प्रत्यक्ष जबड्याप्रमाणेच कसे आहे' अित्यादी विचार हा बैल त्या हिंदूस अैकवितो आणि त्याचा धिक्कार करतो.[4] गणपतीची प्रार्थना करतानाही परदास्याचे शल्य सावरकर विसरू शकत नाहीत. अेका काळी वैभवाने, बाणेदारवृत्तीने, क्षात्रतेजाने वावरलेले ब्राह्मण, रजपूत आणि मराठे हे परक्यांच्या लाथा कशा खात आहेत याचे वर्णन त्यांनी 'हे सदया गणया तार' या कवितेत केले आहे.[5] अितिहासाच्या अवगुंठनाखालून आपल्या दोन्ही पोवाड्यांत सावरकरांनी पारतंत्र्याचा भेदक धिक्कार केला आहे. सिंहगडच्या पोवाड्यातील पुढील वर्णन किती भेदक आहे पाहा :–

"स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे
गुलामगिरिच्या अुकिरड्यावरी गुलाम निपजाचे
श्वानहि भरिते पोट बापुडे चघळुनिया तुकडे
शेणामाजी वांधुनी वाडे नांदति शेणकिडे"

श्री. वाजी देशपांडे यांच्या पोवाड्यात पुढील काव्यचरण पुनरुक्त करून पारतंत्र्याबद्दलची चीड कशी चेतविली आहे ते पाहण्यासारखे आहे :–

'स्वराज्य नाही, स्वदेश नाही, धिक् त्या देहाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।'

---

१. सा. क. पृ. ११. २. सा. क. पृ. १४. ३. सा. क. पृ. २४.
४. सा. क. पृ. ३१, ३२. ५. सा. क. पृ. ४४.

स्वातंत्र्यविषयक कवितांचे वैशिष्ट्य :

स्वातंत्र्याचा ध्यास आणि पारतंत्र्याचा निरास अेवढ्याच भावनांना सावरकरांच्या स्वातंत्र्यविषयक कवितेत स्थान मिळाले नव्हते. या स्वरूपाच्या भावना सावरकरांपूर्वी केशवसुत-विनायकादी कवींनी काव्यांतून व्यक्तही केल्या होत्या. स्वातंत्र्यविषयक किंवा राष्ट्रीय कवितेत त्या काळी सामान्यतः दोन पंथ होते. अेक पंथ प्रोत्साहक काव्य निर्माण करणाऱ्या कवींचा होता, तर दुसरा हताश झालेल्या व त्यामुळेच अधिक अुत्कट दुःख व्यक्त करणाऱ्या कवींचा होता.[१] या काळात केशवसुत, टिळक, विनायक, गोविंदाग्रज, ना. के. बेहेरे, आनंदराव टेकाडे, तिवारी, बी., माधव काटदरे, कवी गोविंद, साने गुरुजी अित्यादी कवी राष्ट्रीय कविता कमीअधिक प्रमाणात लिहीत होते. पण अितक्या कवींनी राष्ट्रीय कविता लिहूनही, प्रा. मालशे म्हणतात त्याप्रमाणे 'सावरकर वगळले तर त्या काळच्या देशभक्तीच्या भावना मूकच राहिल्या आहेत.'[२] असे का घडले याचे अुत्तर सावरकरांच्या काव्यवैशिष्ट्यात आणि त्यांच्या पृथगात्म व्यक्तित्वात सापडते. या सर्वांपेक्षा काही थोडे अपवाद वगळले तर–सावरकरांच्या कवितेला आत्मप्रत्ययाची जिवंत अनुभूती लाभली होती. 'सावरकर हे त्या काळचे क्रांतिदूत असल्यामुळे त्यांच्या देशभक्तीच्या आविष्काराला आत्मप्रत्ययाचे अेक आगळे तेज चढलेले होते.'[३] स्वातंत्र्य वा देशप्रेम यांच्या 'क्रियारूप आविष्काराचा जातिवंत अनुभव त्यांनी चाखला होता.'[४] किंवा डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणे 'ज्या हाताने त्यांनी कृती केली त्याच हाताने त्यांनी तीवर काव्य रचले,'[५] प्रा. भ. श्री. पंडित यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'त्यांच्या काव्यात निव्वळ कल्पनेचे अिमले नाहीत, प्रत्यक्षानुभवाचे रसरशीत अंगार आहेत.'[६]

सावरकरांच्या पृथगात्म व्यक्तित्वामुळे त्यांचे राष्ट्रीय काव्य वेगळे झाले हे तर खरेच, पण अितर राष्ट्रीय कवींच्या कृतींशी सावरकरांच्या काव्याची तुलना केली असता हे वेगळेपण नेमके कुठे आढळते हेही ध्यानी येते. 'केशवसुत देशाभिमानी असले तरी त्यांच्या त्या देशाभिमानाला अुज्ज्वल पूर्वेतिहासांपासून प्रेरणा मिळाली होती, असे वाटत नाही.'[७] याशिवाय 'दुरंत, प्रमाथी प्रणय विकाराने त्यांचे जीवन आणि काव्य ग्रासून टाकलेले होते.'[८] त्यांना परवशतेची खंत वाटत होती. पण त्यांच्या काव्यात अुत्कटता आणि चीड दिसत नाही.[९] 'ख्रिस्ती

---

१ अ. म. का. पृ. ६७. २. आ. नि. पृ. ८४. ३. आ. नि. पृ. ८४.
४. सा. का. स. पृ. १४५. ५. केसरी २७ मे १९५८. ६. आ. म. क. पृ. १९४.
७. मा. आ. क. पृ. ३०७. ८. मा. आ. क. पृ. ३०५. ९. महाराष्ट्र लक्ष्मी – प्रस्तावना पृ. १२.

धर्माविषयीच्या दुरभिमानामुळे रे. टिळकांचा देशाभिमान हा संकुचित आणि विकृत होअून गेलेला होता' हा श्री. ग. व्यं. माडखोलकर यांचा अभिप्राय या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखा आहे.[१] "'वी' कवी राजकारणाच्या धकाधकी-पासून दूर राहिले होते."[२] तसेच गोविंदाग्रजांचेही झाले. लो. टिळकांचा साधा नामोच्चार करावयाचा झाला तरी ते 'वी. जी.' असा करीत.

'कवी विनायक हे राष्ट्रीय कवितेचे पहिले व श्रेष्ठ अुद्गाते आहेत' हे प्रा. भ. श्री. पंडित यांचे मत मर्यादित अर्थाने खरे आहे.[३] केशवसुत आणि टिळक यांच्या राष्ट्रीय कवितांशी तुलना करता हे मत यथार्थ आहे हेही मान्य करावयास हवे. परंतु प्रा. रा. श्री. जोग यांनी विनायकाच्या कवितेचे केलेले मूल्यमापन दृष्टि-आड करून चालणार नाही. सावरकरांच्या कवितेच्या संदर्भात तर ते विशेष चिंतनीय आहे. प्रा. जोग लिहितात; " विनायक कवींनी अितर गोष्टी केल्या असल्या तरी नवीन पराक्रमाला प्रोत्साहन देणे त्यांच्याकडून थोडेच झाले.... त्यांचा अेकंदर दृष्टिकोन नैराश्याचाच आहे.... राष्ट्रीय काव्यातही लोकांना चोदना देअून त्यांच्यावर प्रोत्साहक परिणाम करणारे काव्य लिहिण्यापेक्षा विलापाच्या स्वरूपाचे लेखन त्यांचे अधिक झाल्याने ते अनुयायी गोळा करू शकले नाहीत. ते लिहीत असतानाच गोविंद कवी, सावरकर अित्यादींनी जे काव्य लिहिले त्याचा परिणाम अधिक झाला. विनायकांच्या कवितेचा नाही."[४]

श्री. ना. के. बेहेरे यांच्या राष्ट्रीय कवितासंबंधातही असेच म्हणता येअील " बेहेरे यांच्या राष्ट्रीय कवितांमधून जी स्पष्टोक्ती आहे तिचे वर्णन ओज व तेज या शब्दांनी करता येण्याजोगे नाही. कवी गोविंद किंवा सावरकर यांच्या कविते-बरोबर याबाबतीत तिची तुलना होअू शकणार नाही."[५] श्री. टेकाडे, श्री. तिवारी, साने गुरुजी, माधव काटदरे यांच्या राष्ट्रीय कवितेसंबंधी प्रा. जोग यांचे अभिप्राय असेच चिन्त्य आहेत. प्रा. जोग यांच्या ह्या अभिप्रायांचे समालोचन पुढीलप्रमाणे थोडक्यात करता येअील. " विचार–भावना–कल्पना या काव्याच्या त्रिविध अंगांत (टेकाडे यांच्या) कवितेचीही अुंची फार वरची नाही.... राष्ट्रीय कविता लिहूनही ओजस्वी भाग तीमध्ये कमी वाटतो व बहुधा सध्याच्या अवनत स्थितीचेच चित्र तीत अधिक येते."[६] "श्री. तिवारी यांच्या कवितांसंबंधानेही अर्थापेक्षा आवाज अधिक अशी रसिकांची समजूत आहे. त्या आवाजापुढे राष्ट्रीय भावनेची अुत्कटता गुदमरून गेल्यासारखी वाटते. म्हणून गोविंद कवीअितकी

---

१. मा. आ. क. पृ. २२. २. आ. नि. पृ. ८४. ३. विनायकाची समग्र कविता – प्रस्तावना. ४. अ. म. का. पृ. ६७, ७०. ५. अ. म. का. पृ. २४७. ६. अ. म. का. पृ. २४८.

मान्यता तिवारींना मिळाली नाही. सावरकरांची विशाल दष्टी अर्थातच तिवारींमध्ये नव्हती व राष्ट्रकार्यातील संकटांचा अनुभवही नव्हता."[१] "तुरुंगात लिहिले गेले आहे त्यापलीकडे श्री. साने गुरुजी यांच्या व सावरकर यांच्या काव्यांमध्ये साधर्म्य थोडे आढळते..... सावरकरांच्या काव्यात ओज, आवेश, अर्थगौरव आहे, सान्यांच्या कवितेत नम्रता, लीनता, कारुण्य ही भरली आहेत."[२] "..... कलेच्या बाबीकडे कवी माधव यांनी भरपूर लक्ष दिले आहे..... पण या साक्षेपामुळेच की काय, राष्ट्रीय काव्याशी नेहमी संबद्ध असा भावनेचा आवेश त्यांच्या ऐतिहासिक काव्यात कमी प्रमाणात अुतरला आहे."[३]

अन्य राष्ट्रीय कवींशी तुलना करता सावरकरांचे राष्ट्रीय काव्य हे त्यांच्या व्यक्तित्वामुळे आणि काव्यगुणांमुळे श्रेष्ठ कसे ठरले हे वरील काही अभिप्रायांवरून ध्यानी येते. सावरकरांचे समकालीन आणि त्यांच्या 'मित्रमेळ्या'तील सहकारी कवी गोविंद यांचे राष्ट्रीय काव्य सावरकरांच्या काव्याअितकेच गाजले. कवी गोविंद यांनी कवितेचे धडे सावरकरांजवळ बसूनच गिरविले होते. सावरकरांच्याच संगतीने कवी गोविंद यांचा जीवनक्रम बदलून गेला होता. 'हे दोघे मित्र महाराष्ट्राच्या राजकीय अितिहासात १९०५ ते १९१० पर्यंत जो प्रक्षोभाचा काळ होअून गेला, त्याचे अुद्गाते होत.'[४] प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनी राष्ट्रीय अथवा ऐतिहासिक कविपंचकात विनायक, तिवारी, माधव यांच्यावरोबर सावरकर व गोविंद यांचा अुल्लेख केला आहे.[५] परंतु वरील पहिल्या तिघा कवींमध्ये व सावरकर यांच्यामध्ये जसा भेद होता, तसा तो सावरकर आणि गोविंद यांच्यामध्येही होता. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी या भेदावर नेमके बोट ठेवले आहे. कवी गोविंद यांची कविता प्रतिभा–गुणाने जरी मंडित असली, तरी ती अगदीच त्रुटित असून तिच्यात सावरकरांप्रमाणे विशालता किंवा ध्येयदर्शित्व नाही, असा श्री. माडखोलकर यांच्या सांगण्याचा मथितार्थ आहे.[६] या दोघांच्या कवितेतील हा भेद म्हणजे त्यांच्या मनोवृत्तीतील– त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील– भेद होय. कवी गोविंद यांच्या काव्याचा परिचय करून देताना श्री. माडखोलकर यांनी आपले मत अधिक स्पष्ट केले आहे. श्री. माडखोलकर लिहितात, "गोविंदांच्या कवितेत जी सूडाची तळमळ आहे, ती पंगुतेच्या दु:खद जाणिवेतून प्रादुर्भूत झालेली आहे. त्यांच्या आणि सावरकरांच्या कवितेत आणि मनोवृत्तीत जर कोणता मूलभूत फरक असेल, तर तो हाच होय. सावरकरांनी अैन तारुण्यात 'काळे पाणी'

---

१. अ. म. का. पृ. २७१. २. अ. म. का. पृ. २७२. ३. अ. म. का. पृ २७४. ४. आ. म. क. पृ. १९४. ५. स्वा. कवि गोविंद यांची कविता पृ. ९. ६. मा. आ. क. पृ. ३३०.

पाहिलेले असताही त्यांची कविता काळवंडली नाही किंवा विव्हळली नाही.... दुबळीक किंवा कोवळीक ही जणू त्यांच्या प्रतिभेला माहीतच नाही.अुलट गोविंदांचा वीररसही करुणाश्रित आणि करुणगर्भ असतो."[1] प्रा. भ. श्री. पंडित यांनी म्हटल्याप्रमाणे कवी गोविंद यांच्या स्वतंत्र प्रतिभेचे तेजस्वी पंख दडपशाहीच्या जुलमी कातरीने कातरले गेले होते.[2] परंतु "प्रतिकूल परिस्थितीतदेखील सावरकरांच्या गीतांना भीतीचा व निराशेचा ओझरताही स्पर्श झाला नाही. अुलट त्यांत 'याहूनिहि भयद असे छळ सहेनची। परि झटेन, जीवनांतिहि झटेनचि। करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा।' असा दुर्दम्य आशेचा अुद्दाम अुद्रेक मात्र झाला आहे."[3]

कवितेतील ध्येयवादित्वाचे प्रतिबिंब

आत्मप्रत्यय, विशालता आणि ध्येयदर्शित्व हे सावरकरांच्या स्वातंत्र्यनिष्ठ वा राष्ट्रीय कवितेचे पृथगात्म विशेष आहेत हे आतापर्यंतच्या विवेचनावरून सिद्ध झाले आहे. त्यांची राष्ट्रीय कविता केवळ विलाप करणारी नाही, तर ती प्रोत्साहक, कृतिप्रेरक आणि ध्येयदर्शी आहे. सावरकरांचा ध्येयवाद आशयात आणि अभिव्यक्तीत साठवून ती प्रकट झाली आहे. संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे सावरकरांचे ध्येय होते आणि सशस्त्र क्रांती हे त्यांचे साधन होते. निसर्ग आणि अितिहास यांनी सिद्ध केलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गावर त्यांचा विश्वास होता. श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीशिवाजीमहाराज हे त्यांचे राष्ट्रीय नेते होते. स्वातंत्र्याचा संकुचित अर्थ न घेता मानवहिताचा व्यापक अर्थ त्यांना अभिप्रेत होता. जीवनार्थ कलह चालू असलेल्या या सृष्टीत शस्त्रशक्तीची मानवाला असणारी आवश्यकता त्यांना पटली होती. नीति-अनीती, हिंसा-अहिंसा, सद्‌गुण-दुर्गुण यांची कसोटी म्हणजे अधिकांत अधिक मानवांचे हित होय असे ते मानीत होते. आततायांस वचक बसविणारा सूड अुगविणे त्यांना न्याय्य वाटत होते. हौतात्म्यातूनच राष्ट्राच्या पराक्रमाला, क्षात्रवृत्तीला तेज चढते असा त्यांचा सिद्धान्त होता. मातृभूमीचे ऋण फेडण्याच्या कर्तव्याच्या भावनेतूनच निर्माण होणारी देशभक्ती त्यांना मान्य होती. सावरकरांपूर्वीच्या वा समकालीन राष्ट्रीय कवींमध्ये असे ध्येयाधिष्ठित वैचारिक नेतृत्व करून आत्मप्रत्ययाने रसरसलेले काव्य निर्माण करणारा कवी क्वचित झाला असेल. त्यांच्या ध्येयवादाची ही विविध तत्त्वे त्यांच्या राष्ट्रीय कवितेत कुठेकुठे दृग्गोचर होतात हे आता थोडक्यात पाहावयाचे आहे.

स्वातंत्र्याचा अुदात्त आणि व्यापक अर्थ 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' या कवितेत सावरकरांनी कसा सांगितला आहे, हे आपण पूर्वी पाहिले आहे. या विगत

---

१. मा. आ. क. पृ. २०५. २. आ. म. क. पृ. २००. ३. आ. म. क. पृ. १९९.

स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी केवळ हळहळत न बसता स्वतत्त्वज्ञानानुसारी मार्गाचे ते दिग्दर्शन करतात. 'चला घालु स्वातंत्र्य-संगरी रिपूवरी घाला' अशी चोदना ते देतात. 'मेल्या-परी काय बसून ठेला?' असा निर्भर्त्सनायुक्त कृतिसंदेश ते देतात. या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अेकी करावयास हवी, संघटना करावयास हवी म्हणून ते सांगतात–

'याला आता अुपाय वरवा अेकी करवा मन भरवा'[1]
'तत्तारणा झटावे सदये, संतत समस्त गावकरी
गाव जुटीने अुठला तरि तदहित केवि दुष्ट राव करी'[2]
'वाया सोडूनि वाद, संघ करुनी रे अुद्धरु ही धरा
द्याया सिद्धिस अुच्च हेतुस अशा ही जन्मली सुंदरा'[3]

संघटनेबरोबर सावरकरांनी पुरस्कारिलेला दुसरा मार्ग म्हणजे शस्त्रसामर्थ्याचा. 'शस्त्रगीत' या कवितेतून या मार्गाचाच त्यांनी हिरीरीने प्रचार केला आहे.

'व्हावया स्वदेश सर्व सिद्ध आत्मशासना
नव्या पिढीस द्या त्वरे समग्र युद्धशिक्षणा'[4]

असे ते स्पष्टपणे सांगतात. हा मार्ग निसर्गसिद्ध आणि अितिहासानुमानित आहे असे त्यांचे ठाम मत आहे. म्हणून ते म्हणतात–

'व्याघ्र-नक्र-सर्प-सिंह-हिंस्र-जीव-संगरी
शस्त्रशक्तिने मनुष्य हा जगे धरेवरी'[5]

या शस्त्रसामर्थ्याच्या अुपासनेनेच स्वातंत्र्यदेवता प्रसन्न होते हे तत्त्व अैतिहासिक निष्कर्षाच्या आधाराने पटवून देताना सावरकर लिहितात :

'श्रीरामचंद्र-वनवास-कथा रसाला
की केवि देश अिटली रिपुमुक्त झाला
तानाजिचा समरधीर तसा पवाडा
गावा चितोरगड वा शनवार वाडा'[6]

परंतु शस्त्रक्रांतीच्या या अंतिम साधनापूर्वीही अन्य साधनांनी, अुपायांनी स्वदेश-स्वातंत्र्याप्रीत्यर्थ प्रयत्न करता येअील अशी सावरकरांची धारणा होती. स्वदेशी वस्तूंचा वापर हा अेक सोपा व सर्वांना सहजशक्य मार्ग होता. त्यांच्या 'स्वदेशीचा फटका' किंवा 'दिपवाळीचे लक्ष्मीपूजन' या कवितेतून स्वदेशी वस्तूंचा प्रचार

---

१. सा. क. पृ. ७. २. सा. क. पृ. २५. ३. सा. क. पृ. ३०. ४. सा. क. पृ. २०६. ५. सा. क. पृ. २०६. ६. सा. क. पृ. ७६.

त्यांनी केला आहे. सावरकरांनी सांगितलेला दुसरा मार्ग हौतात्म्याचा होता, आत्मबलिदानाचा होता. हा मार्ग राजकीय असंतोष चेतविणारा, आततायांस वचक बसविणाऱ्या सूडाने भरलेला आणि राष्ट्रातील मृत्युंजयी वृत्ती वाढविणारा होता. सावरकरांनी आपल्या अनेक राष्ट्रीय कवितांतून या हौतात्म्याची प्रेरणा दिली आहे.

'बलिदानाविण वीरांच्या परि राष्ट्रोद्धारहि कसा घडे?' असा प्रश्न ते 'चाफेकर–रानडे यांच्या फटक्या'त विचारतात.[1] वीरांच्या हौतात्म्यातूनच स्वराज्यप्राप्ती होते, हा आपला सिद्धान्त बाजीप्रभू देशपांडे यांच्या पोवाड्यात त्यांनी शेवटी पुढील शब्दांत सांगितला आहे :–

'श्रीबाजीचे रक्त पेरिले खिंडित त्या काला
म्हणुनि रायगडि स्वातंत्र्याचा थोर वृक्ष झाला'[2]

'सांत्वन'मध्ये त्यांनी आपल्या वहिनींना हेच सांगितले आहे :–

'अेकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रकटेल काली । विजयालक्ष्मी पावन ।।'[3]

'सायंघंटे'च्या गर्जनेतून त्यांना हाच संदेश द्यावयाचा आहे की,

'बलिदानाची ही नवरात्रि संपता
पूर्णाहुति पडुनि शक्ति होमहुताशी
जे विजयादशमीला प्रज्वलोज्ज्वला
त्या ज्वाला-मालीतुनि तृप्त चंडिच्या
होअिल की मुकुट दिव्य-दीप्त आमुचा
ग्रहणमुक्त सूर्यासम प्रकट पुनरपि'[4]

हुतात्म्यांच्या रक्तमासातून सूडाचा हंगाम अुठतो आणि मग तो 'बादशहाची बा दशा' करून टाकतो हा आपला अैतिहासिक सिद्धान्तावरील विश्वास त्यांनी 'मूर्ति दुजी ती' या कवितेच्या अुत्तरार्धात व्यक्त केला आहे.[5] आजच्या युवक आणि युवतीसंघाने ज्या आणाभाका घ्यावयास हव्यात त्या आदर्श हुतात्मा होण्याच्या घ्यावयास हव्यात असेच जणू त्यांच्या 'माझे मृत्युपत्र' या कवितेतील पुढील ओळी सांगत होत्या–

'बाजी प्रभू ठरू' वदे युवसंघ सर्व
'आम्ही चितोरयुवती' युवती सगर्व'[6]

---

१. चा.-रा. यां. फ. पृ. १६. २. सा. क. पृ. ५७. ३. सा. क. पृ. ७४.
४. सा. क. पृ. १०३. ५. सा. क. पृ. १२५. ६. सा. क. पृ. ७६.

या हौतात्म्य मार्गाचा परिणाम वाचकांच्या मनावर होतो तो मुख्यतः त्यातील आत्म-प्रत्ययाच्या भावनेमुळे! या मार्गाचा अवलंब करून सावरकरांनी आपला देह सर्वस्वासह स्वातंत्र्याच्या यज्ञवेदीवर ठेवल्याचे चित्र त्यांच्या कवितेत पाहावयास सापडते. 'माझे मृत्युपत्र' या कवितेत सावरकर लिहितात:-

"त्वस्थंडिली ढकलिले प्रिय मित्रसंघा
केले स्वये दहन यौवन-देह-भोगा
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवां
तत्सेवनीच गमली रघवीर सेवा
त्वत्स्थंडिली ढकलिली गृहवित्तमंत्ता
दावालनात वहिनी, नवपुत्रकांता
त्वत्स्थंडिली अतुल-धैर्य वरिष्ठ बंधू
केला हवी परमकारुण पुण्यसिंधू
त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिली बघ अता मम देह ठेला
हे काय बंधु असतो जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलीच असते दिधले बळी मी"[1]

मातृभूमीचे ऋण फेडण्याचे कार्य आपण आपल्या देहबलिदानाने करण्यास सिद्ध आहोत ही कल्पना पुन्हा त्यांच्या 'पहिला हप्ता' या कवितेत आली आहे :-

'ऋण ते फेडाया। हप्ता पहिला तप्त स्थंडिली
देह अर्पितो हा।'[2]

हौतात्म्याचाच मार्ग स्वीकारणारा श्रीबंदावीर आपल्यापुढे आदर्श आहे अशी स्पष्ट कल्पना त्यांनी 'मूर्ति दुजी ती' या कवितेतील पुढील चरणांतून दिली आहे :

'अंधकारात, घोर दक्षिणायनी
चिरवित निज देहा की वध्य पशु तसा,
धर्मास्तव नरकी जो होअुनी पचे
तो वीर श्रीबंदा हिंदु हुतात्मा
आज असो ध्येय मला अेकमात्रची।'[3]

सावरकरांच्या कवितेतील विशालता विशेषत्वाने जाणवते ती मानव-हिताच्या संदर्भात व्यक्त होताना! आपल्या जीवनाचा आणि बलिदानाचा संबंध ते

---

१. सा. क. पृ. ७७, ७८. २. सा. क. पृ. ८१. ३. सा. क. पृ. १२७.

अखिल मानवाच्या सुखाशी जोडतात. त्यांच्या आत्मचरित्रातून, निबंधांतून, नाटकांतून मानवी हिताची जी विचारधारा वाहते ती त्यांच्या भावकवितेलाही पुष्ट करते. विशेषत: सावरकर जेव्हा 'हिंदुत्वातीत' होतात, जीवनाच्या अंतिम सीमेपर्यंत येअून अुभे राहतात; तेव्हा त्यांच्या व्यक्तित्वातील ही मानवहितैषी वृत्ती ठळकपणे प्रकट होते. 'माझे मृत्युपत्र' आणि 'मरणोन्मुख शय्येवर' ह्या दोन्ही कविता सावरकरांनी मृत्यूच्या छायेतच लिहिल्या होत्या. आपली कृती आणि मृती लोकहितार्थच असावी, मानवाच्या मांगल्यासाठीच असावी अशा वृत्तीने 'मरणोन्मुख शय्येवर' देह ठेवल्यावर ते म्हणतात,

'तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणाप्रती
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,
सज्जनासि गमली अनुकूल तीच की
कार्ये म्या धर्म्य अशी मानिली, अणी'[1]

केवळ कार्येच नव्हेत, तर हौतात्म्यही आपण मानवहिताच्या प्रेरणेनेच करावयास अुद्युक्त झालो हे त्यांनी 'माझे मृत्युपत्र' या कवितेत पुढील शब्दांत नमूद केले आहे :

'तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव अुग्र दीक्षा
जे घेति येअि तअि तत्कृतिची परीक्षा'
"विश्वांचिया अखिल मंगल-धारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ?"
'आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडिता हे
दिव्यार्थ, देव ! अमुचे कुल सज्ज आहे
हे साध्वि, गर्जुनि असे पहिल्या हवीचा
हा अीश्वरी मिळविला अम्हि मान साचा'[2]

विश्वाच्या मंगल धारणेसाठी केवळ व्यक्तीनेच कटिबद्ध व्हावयाचे असे नाही, तर हिंदुराष्ट्रालाच मानवहितासाठी स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न करणे आवश्यक आहे अशी सावरकरांची भूमिका होती. आत्मचरित्रात आपली हीच भूमिका त्यांनी अधिक स्पष्ट केली आहे.[3] 'हिंद सुंदरा ती' या कवितेच्या अखेरीस त्यांनी ही 'विश्वोद्धारणा'ची मनीषा पुन्हा व्यक्त केली आहे.[4] 'मूर्ति दुजी ती' या कवितेच्या शेवटी ही 'विमुक्त मातृभू मनुजमंगला' होण्यासाठी मी 'झटेन जीवनांतिही झटेनची' असा दुर्दम्य आशावाद त्यांनी प्रकट केला आहे.[5] 'मरणोन्मुख शय्येवर

---

१. सा. क. पृ. १६०. २. सा. क. पृ. ७७. ३. मा. आ. पृ. २२१, २२२, २२३. ४. सा. क. पृ. ६६. ५. सा. क. पृ. १२८.

पडून मृत्यूचे स्वागत करताना 'मानवीय वंशाच्या गौरवार्थ' त्यांच्या हृदयात नव आशा, अुच्च आकांक्षा' अुदित होत होत्या.[1] सावरकरांची अशी राष्ट्रीय कविता वाचून 'सावरकरांची कविता म्हणजे राष्ट्रीय ध्येयवादाचे केवळ निधानच आहे'[2] हे श्री. ग. त्यं. माडखोलकर यांचे विधान सत्य मानायचे की, अिंग्लंडमध्ये सावरकरांवरील खऱ्या मित्रप्रेमाने सहकारी बनलेले ब्रिटिश नागरिक–'गाय आल्ड्रेड' यांनी सावरकरांची अुदात्त व विशाल मानवहिताची दृष्टी ध्यानी घेअून 'सर्व जगताचे नागरिक व मानव-जातीचे मार्गदर्शक'[3] असे काढलेले अुद्‌गार खरे मानावयाचे असा संभ्रम पडतो.

हे मातृभूमि । तुजला मन वाहियेले ।

सावरकरांची मातृभूमीवरील निष्ठा अत्यंत अुत्कट होती. त्यांच्या स्वातंत्र्य-निष्ठेला जसे दैवी अधिष्ठान होते तसेच त्यांच्या देशनिष्ठेला देवाचे अधिष्ठान होते. सावरकर 'देश' आणि 'देव' यांत अभेद मानीत होते. देशसेवा म्हणजे देवसेवा ह्या पवित्र, अुदात्त भावनेनेच आपण देशकार्य केले, असे 'माझ्या मृत्युपत्रात' त्यांनी नमूद करून ठेवले आहे. मातृभूमीला अुद्देशून ते लिहितात :–

'त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवा ।
त्वत्सेवनीच गमली रघुवीर-सेवा'[4]

याच रघुपदी भक्ताच्या – देशभक्तांच्या – झुंडी झुलत असतात.[5] आणि मग त्या रघूत्तमाने 'विश्वाच्या अखिल मंगल धारणेसाठी' आत्मबलिदानाचे आमंत्रण सोडताच ते देशभक्त 'दिव्यार्थ सज्ज' होतात.[6]

देव भक्ताची जशी परीक्षा पाहतात तशी देवस्वरूप असणाऱ्या भारतमातेनेही आपली परीक्षा पाहावी असे सावरकरांना वाटत होते. देश हाच श्रीराम किंवा श्रीहरी, त्याच्यासाठी बलिदान हीच नरदेहाची खरी सार्थकता, त्याच्यासाठी असे बलिदान करणारी व्यक्ती वा वंश म्हणजे साक्षात अीश्वरी अंशच, देशासाठी मृत्यू म्हणजेच खरी मुक्ती आणि 'अनेक पूर्वज ऋषीश्वर' व 'अजात वंशजांचे संभार' यांनी 'साधु, साधु' अशी साभिमान गर्जना करावी अशी अेकमेव कृती म्हणजे देशासाठी केलेली प्राणाची आहुती होय, अशी सावरकरांची दृढ धारणा होती. आपली ही विचारसरणी मुख्यतः 'सांत्वन' ह्या कवितेत आणि अितरही अनेक काव्यचरणांतून त्यांनी व्यक्त केली आहे. 'सांत्वनं' कवितेत ते म्हणतात –

---

१. सा. क. पृ. १६०. २. मा. आ. क. पृ. ३३०. ३. केसरी २७ मे १९५८. ४. सा. क. पृ. १७७. ५. सा. क. पृ. ७६. ६. सा. क. पृ. ७७.

"धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चये अीश्वरी अंश
की परमसेवा–पुण्य लेश । आपुल्या भाग्यी लाधला ।'
'परी जे गजेंद्रशुंडेने अुपटिले । श्रीहरीसाठी मेले ।
कमलफूल ते अमर ठेले । मोक्षदाते पावन ।
त्या पुण्य गजेंद्रासमची । मुमुक्षु-स्थिती भारतीची
करुणारवे ती याची । अिंदिवरश्यामा श्रीरामा ।
स्वोद्यानी तिने यावे । आपुल्या फुलास भुलावे
खुडोनिया अर्पण करावे । श्रीरामचरणां ।
अशीच सर्व फुले खुडावी । श्रीरामचरणी अर्पण व्हावी
काही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ।
अमर होय ती वंशलता । निर्वंश जिचा देवाकरिता
दिगंती पसरे सुगंधता । लोकहित परिमलाची ।
अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार
'साधु, साधु' गर्जतील । अैसे वर्तणे या काळा ।'

देश हाच देव आणि देशासाठी मरण हेच खरे अमरपण ही कल्पना त्यांच्या अन्य काव्यातही आढळते. सावरकरांनी रंगविलेला बाजीप्रभू देशपांडे सांगतो –

'मद्देशचि माझा राजा
तो प्राण, देव तो माझा.'[1]

'कमला' काव्यातील कमलेची सासू कमलेला हेच सांगते –

'देवकार्यी, अहा बाले, लतांचीच सुमे किती
यौवनांची सुमे वीरप्रसू तोडुनि अर्पिती ।।'[2]

'गोमांतका'तील शंकराची आअी शंकराला अेका पोर्तुगीज भ्रष्ट पण हिंदुत्वाभिमानी साध्वी स्त्रीच्या हाती देताना म्हणते –

'मी मरे :
परि घ्यावी ह्या देवासुर रणांगणी
आमुचिया वंशाची हीच वर्गणी ।'[3]

अंदमानातून पाठविलेल्या पत्रांतूनही सावरकर हेच विचार पुनरुक्त करतात. वहिनींना त्यांनी लिहिले होते – 'जो वंशबाग अुद्ध्वस्त झाला । संततपुष्प तोचि अेक ।'[4]

---

१. सा. क. पृ. ४९. २. कमला पृ. ९. ३. गोमांतक पृ. २०४–२०५.
४. अंद. अं. पृ. ५३.

बाळला अुद्देशून त्यांनी म्हटले होते – 'देवाच्या माळेसाठी ज्यांची सर्व फुले शीर्ण झालेली असतात तेच अुद्यान चिरंतन पुष्पांनी बहरलेले असते.'[1]

सावरकरांच्या भावनेत्रांना हिंदुस्थानचे जे चित्र १९०६ साली दिसले, तेच पुढे १९०८ साली त्यांनी आपल्या 'हिंद सुंदरा ती' आणि 'प्रियकर हिंदुस्थान' या दोन कवितांत रंगविले आहे. १९०६ साली 'विहारी' नावाच्या पत्रात 'वन्दे मातरम्' हा सावरकरांचा लेख प्रसिद्ध झाला होता.[2] त्यातील मुख्य विचार आणि तदनुषंगिक वर्णने पाहिली, म्हणजे याच विचारांना आणि वर्णनांना पुढे सावरकरांनी कवितारूप कसे दिले आहे हे ध्यानी येते. या लेखात सावरकरांनी ज्या ज्या कारणांमुळे भारताला 'हे मातर्' असे म्हणून गौरविण्यात भारतीयांना धन्यता वाटली ती ती कारणे दिली आहेत. भारताची रमणीय भूमी, हिमाचलासारखे अुत्तुंग पर्वत आणि गंगा-सिंधूसारख्या विशाल नद्या, भारतातील विविध ऋतू आणि विविध विहंगम, भारतीय तत्त्ववेत्ते आणि शास्त्रप्रणेते, कालिदास-भवभूतीसारखे कवितादेवीचे लाल, गार्गेयी, लोपामुद्रासारख्या बुद्धिमती स्त्रिया, श्रीराम-श्रीकृष्णासारखे साम्राज्य-संस्थापक, नरवीर अित्यादी अनेक गोष्टींमुळे आपली भारतमाता 'सकल-श्री-संयुता' आहे असे सावरकरांनी म्हटले आहे. केवळ निसर्गसंपत्तीमुळेच भारतभूमी ही श्रेष्ठ झाली आहे असे सावरकरांना वाटत नव्हते. त्यांच्यापुढे असलेल्या भारताच्या चित्रात पराक्रमी भारतीय परंपरा आहे, सांस्कृतिक वैभव आहे, भारताच्या स्वयंभू तेजस्वितेचा आणि अंगभूत पावित्र्याचा दिमाख आहे, पुण्यभूमी आणि पितृभूमी या श्रेष्ठ पदाचा अभिमान आहे, ती भारतमाता धन्यप्रसवा असल्याची ग्वाही आहे.

या लेखातील काही वर्णने आणि वर अुद्धृत केलेल्या दोन्ही कवितांतील काही ओळी यांच्यातील सामर्थ्य या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. या लेखात अेके ठिकाणी सावरकर लिहितात : " वशिष्ठ–वामदेवांनी अभिमंत्रित असलेल्या जलांच्या सिंचनाने ही भूमी पुनीत झालेली आहे. होम-हवनांच्या पुण्यसमयी देवदेवतांचा संतोष अग्नीच्या दक्षिणार्ची ज्वालांनी ह्या भूमीत व्यक्त झालेला आहे. होमामध्ये दग्ध होणाऱ्या घृतांचे सुवासाने दुरून स्वर्गातील अिंद्र व वरुण या भूमीवर अवतरत असतात."[3] लेखातील हाच भाव कवितेत संक्रांत करताना सावरकर लिहितात :

> " यज्ञ-धूम-सौगंध-मनोहर जिचे सामरव गान
> अैकुनि येती जिथे कराया देव सोमरसपान"[4]

---

१. अंद. अं. पृ. ५९. २. स. सा. वा. खंड ४ – पृ. १३ ते २१.
३. स. सा. वा. खंड ४ – पृ. १९. ४. सा. क. पृ. ६७.

सावरकरांची स्वातंत्र्यनिष्ठा आणि त्यांची देशभक्ती ह्या अन्योन्याश्रयी आहेत. भारताचे नुसते वैभव व सौंदर्य त्यांना सुखवीत नाही. अुलट त्या वैभवाच्या दर्शनाने त्यांना भारताच्या स्वातंत्र्यनाशाची, पारतंत्र्याच्या अस्तित्वाची स्मृती तीव्रतेने होते. 'स्वतंत्रतेच्या स्तोत्रा 'त 'सकल-श्री-संयुता' भारतमातेचे वर्णन करीत असतानाच ते स्वतंत्रता भगवतीला प्रश्न विचारतात :

'का तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वीची ममता सरली
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, का तू त्यजिले अुत्तर याचे दे ?'

'स्वदेशीच्या फटक्या'त त्यांनी आर्यबंधूंना असाच प्रश्न विचारला आहे :

'कामधेनुका भरतभूमिका असुनि भाग का ती भिक्षा ?
सहस्रकोसांवरूनी खासा पैका हरतो प्रभुदीक्षा'

'हिंद सुंदरा ती' या कवितेत भारताच्या वैभवाच्या विविध अंगांचे वर्णन करीत करीत शेवटी सावरकर प्रश्नालंकाराने स्वातंत्र्यनिष्ठा आणि देशनिष्ठा यांच्यातील साहचर्यच ध्वनित करतात. सावरकर लिहितात –

'देअि अशा प्रसवा । जिचा धन्य कुसवा
वसुमति ती दासी का । क्षण तरि राहो ती ?'

अशा या मायभूमीच्या अुद्धाराच्या विचारातूनच त्यांच्या क़विता स्फुरण पावतात. 'सागरा प्राण तळमळला' या कवितेत त्यांची अुत्कट देशभक्ती आणि स्वातंत्र्यप्रीती याच भावना अुसळत आहेत. त्यांचा प्राण तळमळतो तो मातृभूमीच्या संभाव्य विरहभावनेतून. अिंग्रज सरकारची वक्रदृष्टी झाल्यामुळे आपणांस भारताला परतता येणार नाही याची जेव्हा तीव्र जाणीव त्यांना झाली, तेव्हा विरह-व्याकुलतेने ते अुद्गारतात –

'भूविरह कसा सतत साहु या पुढती ।
दशदिशा तमोमय होती ।
नभि नक्षत्रे बहुत अेक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद अिथे भव्य परी मज भारी । आअिची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिचा'

पण या विरहव्याकुळतेतहीं भरतभूमीच्या अुद्धाराचा विचार ते विसरत नाहीत. ते म्हणतात :

'गुण सुमने मी वेचियली या भावें । की तिने सुगंधा घ्यावे
जरि अुद्धरणी व्यय म तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा'

ह्या कवितेतून व्यक्त होणारी सावरकरांची अुत्कट देशभक्ती पाहून प्रा. द. के. केळकर यांनी सावरकरांच्या साहित्यनिर्मितीमागची भूमिका स्पष्ट केली आहे. प्रा. केळकर लिहितात, "सावरकरांच्या साहित्याचा स्थायी भाव देशप्रेम हा आहे, मग विषय कोणताही असो. चुकलेले कोकरू असो वा गाडीला जुंपलेला बैल असो. या प्रेमाच्या क्रियारूप आविष्काराचा जातिवंत अनुभव त्यांनी चाखलेला आहे आणि आपले प्रतिभेचे देणे देशप्रेमाच्या आविष्कारातच वेचिले गेले पाहिजे अशी त्यांची तळमळ आहे."[1] देशाभिमान हा सावरकरांच्या साहित्याचा स्थायी भाव आहे हे श्री. माडखोलकर यांनीही सांगितलेले आहे.[2] आचार्य कालेलकर यांच्यासारख्या सावरकरांच्या विरोधकांना सुद्धा ह्या कवितेतील अुत्कट देशप्रीती पाहून 'ही कविता मराठी भाषेचे लेणे' ठरण्याअितकी योग्यतेची वाटते.[3] सावरकरांची ही देशनिष्ठा पाहून आठवण होते ती सावरकरांचे सहकारी श्री. ग्यानचंद वर्मा यांच्या अेका अुद्-गाराची . अेका वेगळ्या संदर्भात श्री. वर्मा म्हणाले होते :

["If Savarkar had any sweet heart, his country was the only sweet heart he had."[4]]

स्वातंत्र्यनिष्ठेप्रमाणेच सावरकरांची देशनिष्ठाही क्रियारूप आहे. कर्तव्य-भावनेमुळे जशी तिला धार चढते व कृतिप्रेरकता येते तसे ऋण फेडण्याच्या भावनेतून तिच्या ठायी नम्रता येते, कृतज्ञभाव अुत्पन्न होतो. सावरकरांच्या व्यक्तित्वातील कृतार्थता व कृतज्ञता या भावनांचा आढळ त्यांच्या काव्यातून कसा होतो हे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी सोदाहरण दाखवून दिले आहेच.[5] देशनिष्ठेच्या संदर्भातही सावरकरांच्या व्यक्तित्वातील ह्या दोन प्रवृत्तीच कृतिप्रेरक ठरल्या आहेत. 'निजमातृ-विमोचनार्थ' 'स्वार्थ जाळून आम्ही कृतार्थ ठरलो' असे 'माझे मृत्युपत्र' या कवितेत सावरकर सांगतात,[6] आणि फांशीच्या छायेत अुभे राहून ते आपल्या मातृभूमीला कृतज्ञतेने म्हणतात –

'ऋण हें बहु झाले । तुझ्या स्तनीचे स्तन्य पाजुनी धन्य अम्हां केले
ऋण ते फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिली देह अर्पितो हा।"[7]

'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेतही देवऋण आणि पितृऋण फेडण्याची कल्पना ते बोलून दाखवितात.[8] देव म्हणजे देश आणि देश हीच पितृभूमी ही सावरकरांची

---

१. सा. का. स. पृ. १४५. २. मा. आ. क. पृ. ७४. ३. प्रतिभा, १५–१–१९३६. ४. सा. च. पृ. ३२१. ५. केसरी – २७ मे १९५८. ६. सा. क. पृ. ७७. ७. सा. क. पृ. ८१. ८. सा. क. पृ. १५९.

विचारधारा ध्यानात घेता त्यांच्या देशनिष्ठेला ही ऋणभावना कशी कृतिप्रेरक ठरली आहे हेच सिद्ध होते. सावरकरांचा बाजीप्रभू रणांगणावर लढताना भूमातेचे ऋण फेडण्याचीच भाषा बोलतो.[1] सावरकरांची सारी कविता भारतमातेच्या मुमुक्षु-स्थितीतून आणि 'दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माते'च्या शोकयुक्त विवंचनेतून निर्माण झालेली आहे.

हिंदुत्वनिष्ठा

सावरकरांच्या कवितेच्या विकासासाठी कारणीभूत झालेली हिंदुत्वनिष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अेक फार प्रभावी शक्ती होती. विज्ञाननिष्ठा, यंत्रनिष्ठा, बुद्धिनिष्ठा या सावरकरांच्या व्यक्तित्वातील विविध निष्ठा त्यांच्या गद्य वाङ्मयात –विशेषत: निबंधवाङ्मयात – कशा प्रकर्षाने दिसून येतात, यासंबंधीचे विवेचन अन्यत्र करण्यात आलेले आहे. त्यांच्या कवितेत या निष्ठांचा आढळ होतो तो तुरळक आणि अन्य विषयांच्या अनुषंगाने. 'बालविधवा दु:स्थितिकथन' या कवितेत त्यांची बुद्धिनिष्ठा दिसते ती 'स्थित्यनुसारे स्वधर्म सुधारण्या'चा मार्ग सुचविण्यात.[2] तसेच बालविधवांचा प्रश्न सोडविण्यासाठी सावरकरांनी जे अुपाय सुचविले आहेत तेही बुद्धिवादावर आधारलेले आहेत. त्यांचा युक्तिवादही कवितेतून प्रकटतो; आणि तोही बुद्धिवादावर पोसलेला असतो. 'हिंदुजातीचा श्रीपतितपावनाचा धावा' या कवितेतील युक्तिवाद म्हणजे सावरकरांच्या बुद्धिनिष्ठेचे तर्कशुद्ध स्फुरण आहे. 'शस्त्रगीता'त 'शस्त्रबंधने करा समस्त नष्ट या क्षणा' हे पटवून देण्यासाठी त्यांनी युक्तिवादाने त्या विषयाची तर्कशुद्ध आणि काव्यबद्ध रचना केली आहे. 'संत रोहिदास' या कवितेत कातड्याची देवमूर्ती भ्रष्ट कशी होत नाही व चित्ताचा शुद्ध तोच खरा शुद्ध कसा यासंबंधी बुद्धिग्राही विवेचन त्यांनी केले आहे. सावरकरांच्या यंत्रनिष्ठेचे दर्शन त्यांच्या 'गोमांतक' कवितेत पाहावयास सापडते. या भयंकर, हिंसामय सृष्टीत मानवाने आपले वर्चस्व यंत्रबळाने कसे प्रस्थापित केले याचे वर्णन कवितेतील नायक शंकर करतो.[3]

सावरकरांच्या व्यक्तित्वातील हिंदुत्वनिष्ठा त्यांच्या कवितेत प्रकर्षाने दिसते ती अंदमानोत्तरच्या कालखंडात आणि याचे मुख्य कारण म्हणजे अंदमानाच्या विशिष्ट वातावरणातच त्यांची ही हिंदुत्वनिष्ठा अधिक प्रबळ झाली. सावरकरांच्या ठायी झालेल्या ह्या वृत्त्यंतरानुसारच त्यांच्या कवितेच्या कालखंडाचे दोन भाग टीकाकार पाडतात. अंदमानात त्यांच्या मनोवृत्तीत लक्षवेधी बदल झाला आणि ती हिंदुत्वाकडे, हिंदुराष्ट्रवादाकडे अधिक झुकली अशी टीका

---

१. सा. क. पृ. ५५. २. सा. क. पृ. ४२. ३. गोमांतक पृ. २२०–२२२.

सावरकरांचे विरोधक आणि त्यांचे सहकारीही करतात. सेनापती बापट हे सावरकरांचे फार निकटचे सहकारी. पण सावरकरांच्या मनोवृत्तीतील बदलाची 'अेक कडू आठवण' त्यांनी सांगितलेली आहे.[1] त्या आठवणीत सेनापती लिहितात, "अंदमानात मुसलमान कैद्यांचा हा आलेला (कडू) अनुभव स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मनात सर्व मुसलमानांविषयी कायमची अढी अुत्पन्न करण्यास कारण झाला असावा असे दिसते." सावरकरांचे अेक चहाते श्री. ना. ग. जोशी यांनी सावरकरांच्या मनोवृत्तीतील ह्या बदलाचा परिणाम त्यांच्या कवितेवर कसा झाला आहे याची सोदाहरण चर्चा केली आहे. 'सावरकर काव्याचा पद्य-रचनादृष्ट्या विचार' करताना सावरकरांनी 'कमले'च्या द्वितीय संस्करणात केलेले बदल कोणत्या मनोवृत्तीने केलेले आहेत हे श्री. जोशी यांनी सांगितले आहे. श्री. जोशी लिहितात, "पण नवीन संस्करणाच्या वेळी त्यांनी जुन्यातील ओळींतही फेरफार केला असून पुढील ओळी तर काढूनच टाकल्या आहेत.

'अर्धचंद्र शुभारी जो स्फूर्त आरबनी तसा
पुण्यश्लोक शिव श्रीमान गोविंद प्रभु धन्यसा'

या अैवजी आता,

'हिंदु छत्रपति श्रीमान शिव वीरवराग्रणी
गुरु गोविंद वा वंदा धर्मवीर नवा कुणी'

अशा प्रकारचा श्लोक आहे. हे परिष्करण सुबोधतेसाठी नसून बदललेल्या मनोवृत्तीमुळेच झालेले आहे, असे वाटते. कारण आताच्या हिंदुत्वाच्या प्रेषिताला अर्धचंद्र अुभारणारा, आरबांचा स्फूर्त नायक महंमद पैगंबर, जसा हिंदुस्थानातून तसाच कवितेतूनही अर्धचंद्र देण्याअितका अयोग्य वाटणे साहजिकच आहे. अंदमान ते रत्नागिरीपर्यंतच्या दोन-अडीच दशकांतील बदललेली विचारसरणीच याला कारणीभूत आहे."[2] सावरकरांच्या नाशिक येथील 'मित्रमेळ्या'त 'क्वचित प्रसंगी अकबर-जयंतीचा अुत्सव साजरा' केला जात असे ही आठवण या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखी आहे.[3] सावरकरांच्या या बदललेल्या मनोवृत्तीमुळेच '१९०८ सालचे सावरकर आणि आजचे सावरकर अेक नाहीत' असा आक्षेप टीकाकार घेत आणि या आक्षेपाची जाणीव सावरकरांनाही होती.[4] ते ह्या टीकेचे निराकरण करीत ही गोष्ट वेगळी.

---

१. प्रसाद – ऑगस्ट १९६६. २. सा. का. स. पृ. १५५–१५६. ३. स्वा. बॅ. सा. यांचे चरित्र पृ. २०. ४. प्रदक्षिणा पृ. २२०.

हिंदुत्वनिष्ठेमुळे सावरकरांच्या कवितेचे विषय बदलले, त्या कवितेतील आशय बदलला ही गोष्ट नाकारता येणे कठीण आहे. कमीत कमी कवितेत कोणत्या विषयांना प्राधान्य द्यावयाचे, कशावर अधिक भर (emphasis) द्यावयाचा आणि कवितेतून कोणता परिणाम साधावयाचा यासंबंधी सावरकर जाणीवपूर्वक प्रयत्न करीत होते हें दुसऱ्या कालखंडाचा विचार करताना ध्यानी येते. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी सावरकरांच्या वृत्त्यंतराच्या तत्त्वावर त्यांच्या कवितेचे दोन भाग पाडले आहेत आणि त्या दोन्ही भागांतील त्यांच्या कवितेचे वेगळेपणही निदर्शनास आणले आहे. श्री. माडखोलकर लिहितात, "त्यांच्या कवितेचे युद्धपूर्व आणि युद्ध-कालीन असे दोन भाग पडतात..... महायुद्धातील घडामोडींनी त्यांच्या मनः-स्थितीत जसे परिवर्तन घडवून आणले, तशीच राष्ट्रोद्धाराच्या ध्येयाविषयीची त्यांची कल्पनाही बदलून टाकली. अंदमानच्या नृशंसक गुहेत डांबले गेलेले सावरकर हे विशुद्ध स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. तेथून सुटून आलेल्या स्थानबद्ध सावरकरांनी हिंदू जातीच्या अुत्थानाच्या ध्येयावर आपली दृष्टी केंद्रित केलेली आहे. 'गोमांतक' आणि 'कमला' या त्यांच्या दोन प्रदीर्घ काव्यांत त्यांच्या मनो-वृत्तीत झालेल्या या फरकाचे प्रतिबिंब स्पष्ट पडलेले दिसते."[1]

वर अुल्लेखिलेल्या वृत्त्यंतरानुसार आणि श्री. माडखोलकर यांच्या विवे-चनाच्या आधारे सावरकरांच्या कवितेची पाहणी केली तर हिंदुत्वनिष्ठेच्या छायेत त्यांची कविता अुत्तरोत्तर कशी वागू लागली हे लक्षात येते. सामान्यतः १९०८ पर्यंतच्या सावरकरांच्या कवितेत 'हिंदू' किंवा 'हिंदुराष्ट्र' हा शब्द फार तुरळक आढळतो. 'हिंदू'अैवजी 'आर्य' हा शब्दच त्यांनी अनेक कवितांतून अुपयोजिलेला आहे. १८९८ साली रचलेल्या 'स्वदेशीचा फटका' या कवितेत 'आर्यबंधु हो अुठा अुठा' अशा संबोधनाने त्यांनी आवाहन केले आहे.[2] 'श्रीटिळकस्तवन', 'केतकर-प्रशस्ती', 'श्रीशिवगीत', 'वृषोक्ति', या चारही कविता सावरकरांनी १९०० साली लिहिल्या आहेत. या सर्व कवितांतून त्यांनी 'हिंदू'अैवजी 'आर्य' हाच शब्द वापरला आहे. १९०२ साली लिहिलेल्या 'श्रीशिवाजी महाराजांच्या आरती'त 'या या अनन्यशरणा आर्या ताराया', 'आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला' 'अैकुनिया आर्यांचा धावा महिवरला' अशी शब्दयोजना सावरकरांनी केली आहे. १९०३–४ पर्यंतच्या काळातील दोन-तीन कवितांमधूनच सावरकरांनी 'हिंदू' किंवा 'हिंदूंचा देश' असा शब्द-प्रयोग केला आहे. 'केरळकोकिळकारांचे स्वागत' करताना 'हिंदु जे असतील सर्व मिळुनी अेकी करा रे करा' अशा शब्दांत त्यांनी 'मित्रमेळा' ह्या स्वनिर्मित

---

१. मा. आ. क. पृ. ३२३. २. सा. क. पृ. ६.

संस्थेचा अुद्देश सांगितलेला आहे.[१] 'शिववीरा'चे स्तुतिस्तोत्र गाताना 'हिंदूं'च्या देशाचे हाल वघून 'प्रभुवर शिववीर भूवर आला' असे त्यांना वाटले.[२] १९०५ सालच्या आगेमागे लिहिलेल्या 'सिंहगडच्या पोवाडया'त 'देश हिंदुचा हाय तयाचा मालक म्लेंच्छ ठरे' अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली आहे.

सावरकरांच्या अंतरात असलेला हा 'हिंदुत्वा'चा बीजांकुर पुढे अिंग्लंड-मध्ये काही काळ तरी कोळपून गेला होता. १९०८ सालच्या 'लंडनच्या बातमी-पत्रा'तून त्यांनी शिवोत्सवासारखे अुत्सव म्हणजे हिंदी राष्ट्रैक्याची मूर्त शक्यता होत' असे अुद्गार काढले आहे.[३] विदेशात हिंदू, मुसलमान, पारशी, यहुदी असे अनेक धर्मांचे देशभक्त सावरकरांचे सहकारी बनले होते. भाडोत्री दंगे घडवून हिंदुमुसलमानांच्या सलोख्यात ब्रिटिश सरकार वितुष्ट आणीत आहे असे या काळात सावरकरांचे मत होते. 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहि-तानाही धर्माकरिता आणि स्वातंत्र्याकरिता हिंदुमुसलमानांनी केलेल्या अेकत्रित अुठावाच्या कल्पनेने ते भारावलेले होते.[४] 'आर्य-वसुंधरा' किंवा 'हिंद सुंदरा' अशा शब्दप्रयोगातून त्यांची ही हिंदुत्वातीत दृष्टी त्या काळातील कवितांतूनही दृग्गोचर होत होती.[५]

परंतु याच काळाच्या अखेरी अखेरीस सावरकरांच्या मनात हिंदुत्वनिष्ठा पुन्हा मूळ धरीत असल्याचे आढळून येते. 'हिंदुत्व' ग्रंथाच्या चौथ्या अिंग्रजी आवृत्तीच्या प्रस्तावनेत 'हिंदू' या शब्दाच्या व्याख्येकडे सावरकरांचे मन या काळात कसे वळले याचे विवेचन करण्यात आले आहे.[६] लंडनमध्ये १९०८ सालच्या डिसेंबर महिन्यात गुरू गोविंदसिंह यांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला होता. त्या वेळच्या सभेत सावरकरांची 'प्रियकर हिंदुस्थान' ही कविता म्हटली गेली होती. या कवितेतील हिंदुस्थानला अुद्देशून 'पुण्यभूमी तू । पितृभूमि तू ।' अशी केलेली सूचक अभिप्राय शब्दरचना त्या वेळी सावरकरांच्या मनात चाललेल्या 'हिंदू'च्या व्याख्येची द्योतक तर नसावी ना अशी शंका अुत्पन्न होते. श्री. शि. ल. करंदीकरां-नीही आपल्या 'सावरकरचरित्रा'त याच शंकेने वरील काव्यचरणाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.[७] गुरुगोविंदसिंहाच्या जन्मोत्सवाच्या या सभेत भाषण करताना सावरकरांनी गुरुगोविंदसिंहाच्या विजयी हिंदुपक्षाचा अुल्लेख केला होता. लंडनहून पाठविलेल्या अखेरच्या बातमीपत्रात (२६ नोव्हेंबर १९०९) 'हिंदू हिंदुस्थानचे

---

१. सा. क. पृ. ३०. २. सा. क. पृ. ४५. ३. लं. बा. पत्र क्र. २२. ४. स. स्वा. प्रकरण २ रे. ५. सा. क. पृ. ६५. ६. Hindutva Preface p. i. ७. सा. च. पृ. २२५.

हृदय आहे' असे अुद्‌गार सावरकरांनी काढले होते.[1] या सर्व पुराव्यांचा निष्कर्ष हाच की, अंदमानला प्रस्थान ठेवण्यापूर्वी सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेला पुन्हा टवटवी आली होती आणि अंदमानात तर तिला चांगलेच खतपाणी मिळाले.

अंदमानात सावरकरांनी 'कमला', 'विरहोच्छ्वास', 'गोमांतक', 'महासागर' हे संकल्पित महाकाव्याच्या विशाल शिल्पाचे जे चार तुटक चबुतरे बांधले त्यांना सावरकरांची ही हिंदुत्वनिष्ठाच पायाभूत झाली होती. 'कमले'त पानपतच्या अितिहासावर आधारित अशा हिंदूंच्या अुत्थानाचा कलात्मक प्रसंग सावरकरांनी रंगविलेला आहे. 'विरहोच्छ्वासा'तील वीर युवक मुकुल आपली शूर दयिता जी प्रेमला तीसह हिंदुपदपादशाहीसाठी लढताना मुसलमानांच्या हाती अेकटाच ससैन्य सापडतो' आणि नंतर बंदीत प्रियेसाठी विरहाने सारखा झुरत राहतो. पण प्रियेच्या संगतीसाठी असे झुरतानाही हिंदुपदपादशाहीच्या विजयाची भविष्यकालीन दृश्ये पाहतो. 'गोमांतका'त 'हिंदुस्वातंत्र्यवसंततुसमीरे' कोकण प्रदेशाला कशी टवटवी आली आणि हिंदूंच्या विजयाचे चौघडे अटकेपार कसे झडले याचे वीरश्रीयुक्त वर्णन आढळून येते. 'महासागरा'त आंग्ल-मराठी सिंधुयुध्दाचे वर्णन करण्यात आले असून त्यातून हिंदूंच्या सामुद्रिक विजयाचा अितिहास चित्रित करण्यात आला आहे. या चारही महाकाव्यसदृश काव्यांची मूळ प्रेरणा हिंदूंच्या अुत्थानाची व हिंदुराष्ट्राच्या विजयाची आहे.

अंदमानच्या कारागृहात सावरकरांनी रचलेल्या स्फुट भावकवितांनाही हिंदुत्वनिष्ठेचाच पीळ आहे. तुरुंगातील 'सायंघंटे'चा गर्जे देशाच्या दास्य-मुक्तीचा अेक अेक दिन सन्निध आणतो म्हणून सावरकरांना आनंद होतो. परंतु देशाच्या दास्यमुक्तीचा दिन म्हणजे हिंदुजातीच्या मुक्तीचा दिन – असे समीकरण सावरकर येथे विसरू शकत नाहीत आणि त्या हिंदुजातीचे आपण अेक अंगभूत घटक आहोत या नात्याने 'मुक्त तिचे जीवन की तेच आमुचे' असा अतूट संबंध दाखविण्यात त्यांना अभिमान वाटतो. हिंदू जातीच्या पराक्रमाचे, क्षात्रवृत्तीचे, अस्मितेचे, धर्मनिष्ठेचे रक्त आपल्याही धमन्यांतून वाहात आहे ही भावना सावरकरांच्या ठायी संकटातही धैर्य अुत्पन्न करते, त्यांच्या तितिक्षेला वज्राचे काठिण्य प्राप्त करून देते. त्यांचा ध्येयवाद, आशावाद पुनरपि प्रस्फुरित करते. 'मूर्ति दुजी ती' या कवितेत अंदमानातील क्रकच-तीक्ष्ण कर्तव्याला तोंड देताना ते म्हणतात–

---

१. लं. बा. पत्र क्र. ४७.

'मी न काय अेक जरी क्षुद्र डहाळी
तरि त्याची प्रथिता अश्वत्थ-तरूची
हिंदवीय वंशाच्या ? ती यदीय की
शाखा, जरि दिक्कुंजर हस्त दीर्घशी
हिंदु हुतात्म्या बंद्या वीरवराची ?
तेच रक्त, अल्पसत्त्व, तरि शिरात या
तेचि बीज, जीवन ते, मृत्तिकाहि ती।
तो शकला श्रीबंदा हिंदु हुतात्मा
सहण्यासी जरि असह्य छल तसे तरी
का शकेन मीहि न हे छळ सहू अहा
मीहि हिंदूची असता ?'[1]

आपल्या. मनाला धैर्याचा पुरवठा करण्यासाठी सावरकरांनी 'आत्मबल' कवितेत अशीच विजिगीषू वृत्ती प्रकट केली होती. परंतु त्या कवितेला अधिष्ठान होते ते अध्यात्मवादाचे, आत्म्याचे अमरत्व सांगणाऱ्या तत्त्वज्ञानाचे. 'मूर्ति दुजी ती' या कवितेतील सावरकरांची ही तितिक्षावृत्ती हिंदुजातीच्या अभिमानातून, हिंदुत्वनिष्ठेतून निर्माण झालेली आहे. मनाला वज्रशाली बनविण्याचा दोन्ही कवितांचा हेतू जरी अेक असला तरी दोन्ही कवितांमागील निष्ठा मात्र भिन्न आहेत.

कवितांचे विषय अेकच असूनही वृत्त्यंतरामुळे त्याच्या अभिव्यक्तीत त्यांच्यातील कल्पनाविलासात असाच बदल झाल्याचे आढळून येते. या दृष्टीने 'स्वदेशीचा फटका' आणि 'दिपवाळीचे पूजन' 'श्रीशिवाजीमहाराजांची आरती' आणि 'हिंदुनृसिंह' 'प्रियकर हिंदुस्थान' आणि 'अमुचा स्वदेश हिंदुस्थान' ह्या काही कविता अभ्यसनीय आहेत. 'स्वदेशीच्या फटक्या'त कवीच्या डोळ्यांपुढे सर्व आर्य जाती आहे तर 'दिपवाळीचे लक्ष्मीपूजन' या कवितेत हिंदूंना संबोधूनच कवी अुपदेश करीत आहे. 'गजान्त लक्ष्मी हिंदुहिंदुच्या दारी डोलेल' ही कवीची सदिच्छा अेका विशिष्ट जातीपुरतीच मर्यादित झालेली आहे. 'श्रीशिवाजीमहाराजांच्या आरती'त आर्यांच्या देशावर म्लेंच्छांचा घाला आल्यामुळे आर्यांच्या परित्राणासाठी श्रीशिवनृपाला आवाहन करण्यात आले आहे. 'हिंदु-नृसिंह' कवितेत मात्र 'करि हिंदुराष्ट्र हे तूते वंदना' असा स्पष्ट अुल्लेख करण्यात आला आहे. तसेच शिवाजीराजांना योजण्यात आलेली सर्व

---

१. सा. क. पृ. १२७–१२८.

विशेषणे ही हिंदुजातीच्या संदर्भातच योजण्यात आलेली आहेत. या दृष्टीने पुढील श्लोक पाहण्यासारखा आहे.

'हे हिंदुशक्ति-संभूत दीप्ततम तेजा
हे हिंदुतपस्या-पूत अीश्वरी ओजा
हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतिच्या साजा
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा'[1]

हिंदुस्थानच्या वैभवाचे गुणगान करण्यासाठीच 'प्रियकर हिंदुस्थान' आणि 'अमुचा स्वदेश हिंदुस्थान' या दोन्ही कविता सावरकरांनी लिहिल्या आहेत. दोन्ही कवितांच्या अखेरीस या मातृभूमीच्या वैभवाच्या, सन्मानाच्या 'रक्षणी प्राण अर्पु' असा निर्धार व्यक्त करण्यात आलेला आहे. तथापि १९२५ साली रत्नागिरीस लिहिलेल्या 'अमुचा स्वदेश हिंदुस्थान' या कवितेतील अभिमानाला हिंदुत्वनिष्ठेमुळे अधिक धार चढलेली आहे. 'प्रियकर हिंदुस्थान' या कवितेच्या ध्रुवपदात 'केवळ पंचप्राण अमुचे सुंदर हिंदुस्थान।' अशी शब्दयोजना करण्यात आलेली आहे,[2] तर 'अमुचा स्वदेश हिंदुस्थान' कवितेतील ध्रुवपदात 'आम्हां हिंदूंचा तो केवळ, होय जीव की प्राण'[3] अशी या देशाच्या स्वामित्वाची व अभिमानाची व्याप्ती हिंदुजातीपुरतीच मर्यादित करण्यात आलेली आहे.

हिंदुत्वनिष्ठतेचा परिणाम कवितेतील कल्पनाविलासावरही झाला आहे. विशुद्ध स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे सावरकर १९०३ साली जेव्हा 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' गात होते, तेव्हा स्वतंत्रतेच्या ठायी सूर्याची प्रखर तेजस्विता कशी साठवलेली असते याचे वर्णन ते करतात. परंतु त्यांचे ध्येय हिंदुजातीपुरतेच जेव्हा सीमित होते तेव्हा सूर्याच्या त्या अुपमानावरही मर्यादित अर्थ व्यक्त करण्याचे बंधन ते घालतात. १९२६ साली लिहिलेल्या 'सुखशय्यापंलंग' या कवितेत सावरकरांच्या वृत्तीतील हे अंतर चटकन लक्षात येते. सावरकर लिहितात–

'जो ध्येय प्राप्त न ते, जो न असे राष्ट्रपाश हा तुटला
हा हिंदु-जाति-गौरव-रवि ना राहुग्रहातुनी सुटला'[4]

अंदमानातून सुटून रत्नागिरीस आल्यावर सावरकरांनी हिंदुत्वनिष्ठा हेच आपले जीवनसूत्र ठेवून तेथे हिंदुसंघटनेचे कार्य कसे केले, हे त्यांच्या चरित्रावरील प्रकरणात सविस्तर सांगितले आहेच. १९२४ ते १९३७ या रत्नागिरीतील वास्तव्याच्या काळात सावरकरांनी हिंदुराष्ट्रवादाची विधायक आणि अुभारणीची

---

१. सा. क. पृ. १४२. २. सा. क. पृ. ६६. ३. सा. क. पृ. १८६.
४. सा. क. पृ. १९१.

कामे केली. या वेळी 'हिंदुत्व' ह्या ग्रंथातील विवेचन हा त्यांच्या चळवळीचा पाया होता. 'हिंदुत्व' ग्रंथात त्यांनी हिंदूंना अुद्देशून, अखेरीस असे म्हटले होते की, 'हे हिंदूंनो.... तुम्ही शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला, ज्ञानतंतूंच्या जाळ्याप्रमाणे अेकजीव करणारी सर्व बंधने दृढीभूत करा.'[1] या संदेशानुसार यांनी संघटनेच्या द्वारा हिंदुसमाजाच्या अंतर्गत अैक्य-प्रस्थापनेचे कार्यक्रम धडाक्याने हाती घेतले. अस्पृश्यांसह सर्व हिंदूंचे अेकत्र कार्यक्रम, अुत्सव आणि समारंभ घडवून आणण्यास त्यांनी प्रारंभ केला. हिंदूंच्या या दृढीकरणासाठी त्यांनी अखिल हिंदूंचा ध्वज व अखिल हिंदूंचे अेकता-गान या गोष्टी प्रचलित केल्या. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून 'पतितपावन मंदिरा'ची अुभारणी केली. या हिंदुत्ववादी दृष्टीमुळे या काळातील कवितांचे विषय निवडताना ते आपल्या चळवळींना पूरक ठरतील, किंबहुना त्या चळवळींच्या प्रचाराला साहाय्यक होतील असेच त्यांनी निवडले. त्यांच्या प्रतिभेने हिंदुत्ववादाची जणू कोंडीच निर्माण केली. हिंदूंत अेकतेची व पुनरुत्थानाची भावना अुत्पन्न करण्यासाठी त्यांनी 'हिंदूंचे अेकतागान' लिहिले, 'अखिल-हिंदु-विजयध्वज-गीता'चा सर्वत्र प्रचार केला. अस्पृश्यांचा मंदिर-प्रवेश सहजसुलभ करण्यासाठी त्यांनी 'सुतक युगाचे फिटले', 'हिंदुजातीचा श्रीपतितपावनाचा धावा' आणि 'मला देवाचे दर्शन घेअू द्या' या गीतांतून हिंदूंना भावनात्मक आवाहन केले. सावरकरांची ही प्रासंगिक गीते 'प्रचारकी बनली आहेत' अशी टीकाही त्यांच्यावर केली गेली.[2] 'सप्तर्षी'त ताऱ्यांशी तत्त्ववाद करणारा, 'जगन्नाथाच्या रथोत्सवा'तील ग्रहनक्षत्रांचे भव्य सौंदर्य शब्दांकित करणारा, 'तारकांस पाहून' कल्पकतेची फुलबाजी फुलवणारा हा कवी जेव्हा मेळ्यातील प्रचारगीतांच्या पातळीवर अुतरतो तेव्हा वैनतेयाने कुक्कुटासारखे दोन वीत अुंचीच्या वातावरणात आपले पंख फडफडविण्यात आपल्या गगनविहारी सामर्थ्याची कृतकृत्यता मानावी असा भास होतो. काव्य-निर्मितीतील ह्या साऱ्या बदलाचे अुत्तर सावरकरांच्या ज्या अेका निष्ठेत मिळते ती निष्ठा म्हणजे हिंदुत्व-निष्ठा होय.

जे गद्यात तेच पद्यात

सावरकरांची कविता म्हणजे त्यांच्या आत्मवृत्तातील आणि निबंध-वाङ्मयातील गद्य विचारांचेच पद्यमय आविष्करण होय. सावरकरांनी या दोन्ही वाङ्मयप्रकारांतून अनेक विषयांवर आपली दृढ, ठाशीव मते प्रकट केलेली

---

१. हिंदुत्व पृ. १३८. २. आ. नि. पृ. ८६.

आहेत. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या निबंधवाङ्मयाचा अभ्यास करताना त्या त्या मतांचा सविस्तर परामर्श घेण्यात आलेला आहेच. तीच मते सावरकरांच्या पद्यवाङ्मयात कुठे कुठे प्रतिबिंबित झालेली आहेत हेच मुख्यतः येथे पाहावयाचे आहे.

सत्य-असत्य, हिंसा-अहिंसा, धर्माधर्म, शुद्धि-बहिष्कार, शस्त्रसामर्थ्य, देव, अुपयुक्ततावाद, राष्ट्रहित व मानवहित, सृष्टीचे स्वरूप अित्यादी विषयांवर त्यांनी गद्यवाङ्मयातून आपले विचार ठामपणे प्रकट केले आहेत. या सर्व विचारांतून सहजपणे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. त्या सर्व विचारांची पद्यातही आवृत्ती होते. आत्मचरित्राच्या अखेरच्या समालोचनात सत्याची कसोटी मानवहित असल्याचे त्यांनी सांगितले आहे आणि अुदाहरण म्हणून पुढील काव्यचरण दिले आहेत. 'जो राती चोरांनी धरिला त्याची करावया मुक्ती । लेश विचार न करिता बोलाव्या तेथ शतं मृणा अुक्ती ।'[1] 'गोमांतक' काव्यातील साथी हेच सांगतो. तो निनामीवावास म्हणतो,

'सुरापास सुरा देणे गोदानासहि खाटिका
अर्पिणे न परि आर्ता सत्ये सज्जन हिंसका'[2]

हिंसा-अहिंसा यांसंबंधी लिहिताना त्यांनी सूत्ररूपाने सांगितले आहे की, अपरिमित हिंसा टाळण्यासाठी दुष्टांची वीण थांवविणारी किंचित हिंसाच खरी अहिंसा होय.[3] 'गोमांतका'तील राजमुख्य अलंकारिक भाषेत हेच विचारसूत्र सांगताना म्हणतो–

– व्याघ्र आफ्रिकी तो, तो वृकहि युरोपी;
निरुपद्रव सहसाची आज होअुनी
हिंसी ना ! – कारण की हिंसु शकेना
अितुकी ती आमूलात स्वच्छ छाटुनी
दंतनखे हिंसेची, गाय तिज करी
धर्माचा, तीक्ष्ण खड्ग ।'[4]

सावरकरांचे अेकंदर तत्त्वज्ञानच बल व सामर्थ्य यांवर आधारलेले आहे.[5] बळावाचून तत्त्व, शक्तीवाचून न्याय, अैहिकावाचून पारमार्थिक पंगू आहे असा त्यांचा सिद्धान्त[6] आहे. हाच सिद्धान्त त्यांच्या कवितेतून पुढील सुभाषिताच्या रूपाने प्रकट होतो–

---

१. मा. आ. पृ. २२०. २. गोमांतक पृ. ५२. ३. मा. आ. पृ. २२८.
४. गोमांतक पृ. ११५. ५. सा. का. स. पृ. ९६. ६. मा. आ. पृ. २२१.

'पंगु दुर्बल पुण्याअी : जोवरी जगतात की
चरणी नखरे व्याघ्रा, गरले भुजगा मुखी ।'[1]

'गोमांतका 'तील शंकरने हाच सिद्धान्त सर्व भार्गववासियांना सांगितला :–

'हे खोदुनि काढोनी हिंदुजातीच्या
हृदयावरि सत्य हेचि की जगामध्ये
धर्माविण वल पाशव हे जसे खरे
पंगुधर्महीं तसा वलाविना ठरे'[2]

मुसलमानांनी हिंदुस्थानात अनेक हिंदूंना बाटविले आणि युरोपात ख्रिस्त्यांनी ख्रिस्त्यांचीच लूटमार केली तीही या वलाच्या आधारावरच, असे सावरकर सांगतात. आपल्या ह्या विचारांना सुभाषितांच्या स्वरूपात व्यक्तता देताना ते लिहितात :

'वल आहे तोच वलात्कार की टिके'[3]
'माशासी मासे, मनुजासि मनुज ते
ख्रिस्त्यासी ख्रिस्ती । कवण ही गिळागिळी
कान पिळी धर्माचा जगति जो वळी ।'[4]

सावरकरांचा शस्त्रसामर्थ्यावरील विश्वास सर्वश्रुत आहे: तोच विश्वास त्यांच्या 'शस्त्रगीता 'त प्रकट झाला आहे. 'गोमांतक' काव्यात याच 'कृपण कृपे'-ची[5] आणि पापांना जाळणाऱ्या 'चापा 'ची[6] महती त्यांनी गाअिली आहे. जीवनार्थ कलह हा सृष्टीचा निर्घृण नियम त्यांनी आपल्या आत्मचरित्रात वर्णिला होता;[7] आणि पुन्हा अेका जाहीर भाषणात सांगितला होता.[8] सृष्टीचे हे हिंसा-अहिंसेवर आधारलेले स्वरूप वर्णन करताना सावरकर म्हणाले होते– "हरिण-वालकाचा वध करून रक्ताने माखलेल्या जिव्हेने वाघीण आपल्या पिलांकडे येत आहे. ती पिले तिला बिलगून दुग्धप्राशन करीत आहेत आणि वाघीण रक्ताने भरलेले आपले तोंड जिभेने साफ करीत आहे. सृष्टी ही अशी आहे." 'गोमांतका 'तील शंकर सृष्टीचे वर्णन ह्याच रूपकाने करतो. तो म्हणतो–

---

१. गोमांतक पृ. ८४. २. गोमांतक पृ. १८३. ३. गोमांतक पृ. १३४.
४. गोमांतक पृ. २१४. ५. गोमांतक पृ. ३५. ६. गोमांतक पृ. ८९.
७. मा. आ. पृ. २२४. ८. स. सा. स. खंड ४ – पृ. ४९९.

"सृष्टीचे साग्र गौप्य । वघ कशी तिथे
करुणाची क्रूरतेस दूध पाजिते
पाजु पिलांसी मारी ठार मृगांशी !
करुणेच्या साहाणेवरति धार या
क्रौर्याची पाजळली जातसे अशी ।"[१]

बुद्धिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ सावरकरांची देवासंबंधीची मतप्रणाली त्यांच्या कवितेतही बदलत नाही. गद्यवाङमयातील त्यांच्या विचारांचे पडसाद पद्य-वाङमयात अुमटले आहेत. 'गोमांतक' काव्यात त्यांच्या विचारांचेच दर्शन अनेक ठिकाणी घडते. 'प्राण्याचे रक्षण करतो तोही देवच आणि त्यांचे भक्षण करतो तोही देवच'[२] या काव्यातील विचारावर सावरकरांच्या 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या निबंधातील मुख्य विचाराची छाप पडलेली आहे. याच निबंधात सावरकर लिहितात, 'ज्याने विश्वाचा मनुष्यास सुखद होणारा हा चांगला भाग निर्मिला तो देव; मनुष्यास दुःख देणारा तो दुसरा वाअीट भाग निर्मिला तो राक्षस.'[३] हीच व्याख्या त्यांच्या 'महासागर' या काव्यात पाहा-वयास सापडते. त्या कवितेतील मराठा नायक सागराला स्तोत्रांजली अर्पण करताना म्हणतो–

'परि विषयी सम अनन्य तत्त्व हे अहो
दे सुख तो देव अणी ने नृशंस तो'[४]

'गोमांतका'तील मठामधील शंकराच्या पिंडीवर चढलेल्या मूषकाच्या दर्शनाने देवाच्या सामर्थ्याविषयी पोर्तुगीज गोऱ्या सैनिकाने जी टीका केली आहे, ती सावर-करांच्या विचारांचीच पुनरावृत्ती होय.[५] याच काव्यात अन्यत्रही देवासंबंधी व्यक्त केलेले विचार सावरकरांच्या गद्यवाङमयातील विचारांचाच अनुवाद होय.[६]

धर्माधर्म, शुद्धी, बहिष्कार यांसंबंधी सावरकरांनी आपल्या 'जन्मठेपे'तून आणि 'जात्युच्छेदक निबंधा'मधून अनेक विचार वारंवार प्रकट केले आहेत. 'धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः' ही श्रीकृष्ण नीती सावरकरांना मान्य होती.[७] आपल्या विज्ञाननिष्ठ निबंधांतून त्यांनी धर्माची हीच कसोटी पुन्हा सांगितली होती.[८] 'लोकधारणास साहाय्यक तो धर्म',[९] 'जो हिंदुराष्ट्रास अुद्धारक व वैज्ञानिक सत्यावर आधारलेला तो खरा धर्माचार'[१०] अित्यादी सूत्रेही

---

१. गोमांतक पृ. २२५. २. गोमांतक पृ. ३५. ३. स. सा. वा. खंड ३ – पृ. २९०. ४. स. सा. वा. खंड ७, पृ. २४८. ५. गोमांतक पृ. ४१. ६. गोमांतक पृ. ४३, ४४, ५८, ५९, ८६. ७. मा. आ. पृ. २२०. ८. वि. नि. पृ. ५७. ९. हिंदुत्व पृ. २०३. १०. सा. सा. भाग २ – पृ. ८०.

त्यांनी सिद्ध केली आहेत. धर्म हा परिस्थितिनिरपेक्ष मानण्यात आपली चूक होत आहे याची जाणीव त्यांनी करून दिली आहे.[१] धर्मशास्त्रातील आपद्धर्म प्रकरणात सांगितलेल्या 'राष्ट्रविप्लवे स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते' अित्यादी आज्ञांची आठवणही त्यांनी अस्पृश्यतानिवारणाच्या संदर्भात करून दिलेली आहे.[२] धर्म-विषयक हे सर्व विवेचन त्यांनी 'गोमांतका'तील गुरुपुत्राच्या तोंडी घातले आहे. तो विप्रवर्य आपल्या भाषणात म्हणतो–

'धारणाद्धि धर्म अिति प्रमुख लक्षणे
जो प्रजासि अुद्धारिल, अभ्युदया ते
नेअिल जो जीवासी धर्म तो ठरे.
धर्माचे हे स्वरूप निश्चिताच की
न्यायेची हेही निष्पन्न होतसे
की समाजधारण जो करिल, जातिच्या
अभ्युदया कारण जो होत, होतसे
देशकालतः समाजधर्म तोच की
धर्माचे द्विविधित्वहि अेतदर्थची
स्वास्थ्यकालतः, आपत्कालतः, असे–
सर्वस्मृतिसंमत हे.
स्वस्थकालधर्मी जी विहित तीच की
स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते महाभये
संग्रामे, यात्रायां देशविप्लवे
ग्रामनगरदाहे वा'[३]

शुद्धी आणि बहिष्कार यांबाबतीतही 'माझी जन्मठेप' आणि निबंध-वाङ्मय यांतील विचार सावरकर काव्यात व्यक्त करतात. समाजहित ही शुद्धि-कार्याची मुख्य कसोटी ते मानीत होते. आज शुद्धिकार्याकडे दुर्लक्ष केले तर बाटलेल्या हिंदूंची संतती ही पक्की परधर्मीय होअील असा अिशारा ते देत असत.'[४] धार्मिक स्वातंत्र्य त्यांना मान्य होते आणि स्वेच्छेने धर्मांतर करू द्यावे अशी त्यांची वास्तव विचारसरणी होती.[५] धर्मांतराचे दायित्व मुसलमानांअितके हिंदूंवरही ते टाकीत असत. त्यांच्या दृष्टीने विटाळ, तलवार व तत्त्व ही बाटविण्याची ती प्रमुख साधने होती. आणि बुद्धिवादाने आपल्या सद्धर्माचा प्रचार करण्याचा हक्क प्रत्येकाला आहे अशी त्यांची धारणा होती.[६] हा सारा विचार 'गोमांतका'त

---

१. क्ष–किरणे पृ. २२. २. जात्यु. नि. पृ. ७२. ३. गोमांतक पृ. १ ४–१२५.
४. मा. जन्म. पृ. २६०. ५. मा. जन्म. पृ. २६८. ६. मा. जन्म. पृ. ३००–३०१.

भावयुक्त अंशा काव्यरूपाने ते मांडतात. 'गोमांतका 'तील खालील काही काव्य-पंक्ती या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत :

'प्रश्न विचारार्ह येथ : पतित जनांची
शुद्धि समाजाचे हित? वा वहिष्कृति?
हितकारक अभ्युदयप्रवण की जरी
पतित परावर्तनाची– धर्म्य ही तरी'[1]
'कारण या अेकेका धिक्कृता जना
प्रति होअिल संतति अहिंदु गृही जी
ती पालित लालित शत्रूत होअुनी
परची ते पितर असे भाविणार की'[2]
दुसरा : अप्रीत तया व्यक्तिते न जो
माने संबंध तया आपण स्वये
सोडुनिया देणे, निज जातितुनी तया
व्यक्तीते, गुणुनि वहिर्भूत तीप्रती
सत्य गमे ते देणे आचरू सुखे'[3]
'पतितपरावर्तन हे अेवढे जरी
वैध गणू आम्ही सर्वत्र यापुढे
तरि समजा झाली तरवार आजची
वोथट या म्लेंच्छांच्या धर्मछलांची'[4]

भारताचे सद्गुणच भारताच्या नाशास कारणीभूत झालेले आहेत अशी मीमांसा त्यांनी आपल्या वाङमयातून अनेक ठिकाणी केली आहे. 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' या ग्रंथात त्यांनी 'सद्गुण विकृती' या शीर्षकाखाली अेक स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे.[5] 'गोमांतक' काव्यातील साथी भार्गव गावातील मल्लाला भारताच्या विनाशाची हीच कारणमीमांसा सांगताना म्हणतो –

'तुझे दुर्गुण ना जैशी करिती, करितीच ते
तुझे सद्गुणची भारी, भारता, तव घात ते ।
जगद्घातहि जे आणी, : अधमा प्रबळावया
सद्गुणाभासची झाले तुझे पौष्टिक की तया'[6]

---

१. गोमांतक पृ. १२५. २. गोमांतक पृ. १३०–१३१. ३. गोमांतक पृ. १२६.
४. गोमांतक पृ. १४३. ५. भा. अि. स. सो. पा. पान ५ वे, प्रकरण ४ थे.
६. गोमांतक पृ. ८७.

सहनशीलता ह्या हिंदूंच्या दुर्गुणावरही सावरकरांनी अनेकदा भेदक टीका केली आहे. 'गोमांतक' काव्यात अेका रूपकातून त्यांनी हिंदुजातीचा हा दुर्गुण आणि त्यावरील अुपाय यासंबंधी विवेचन केले आहे. कोकणातील परकीय सत्ता मराठ्यांनी कशी निपटून टाकली याचे वर्णन करताना सावरकर लिहितात –

'शिद्दी, अिंग्रज, पुर्तुगीज – आसुरी
शक्तीचे सिंहासन ज्यावरी अुभे –
स्तंभा त्या हिंदुसहनशीलतेचिया
हरिविद्वेषार्थ असुर लाथ मारिती ।
तोच असह्य कडकडाट होअुनी अहा
स्तंभातुनि त्याचि घुसे हिंदुशक्तिचा
मूर्त – नृसिंहचि तैसा वीर चिमाजी ।'[1]

पुढे 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथातून हाच विचार ह्याच रूपकातून त्यांनी पुन्हा मांडला आहे. नृसिंह आपल्या राष्ट्राचे दैवत होता, पुढारी होता ही कल्पना त्यांनी पुन्हा येथे सांगितली आहे. अंदमानात लिहिलेल्या अेका कवितेत त्यांनी शिवाजीमहाराजांना 'हिंदु–नृसिंह' असे संबोधिले आहे.

आततायांस वचक वसविणारास प्रत्याघात करणे हे सावरकरांच्या रणनीतीचे अेक सूत्र होते. मित्रमेळ्याच्या बैठकीतून याच सूत्राचा पुरस्कार ते वारंवार करीत असत. 'मानुषकाच्या दृष्टीनेही आततायांस वचक वसविणाऱ्यास सूड अुगवीतच मरणे अिष्ट. त्यामुळे आततायांची संख्या घटते. दुसऱ्या कोणा अनागसाचा छळ करण्याचीही त्याची छाती ह्या प्रतिशोधाच्या भीतीने सहसा होत नाही' अशी यासंबंधी सावरकरांची भूमिका होती.[2] पुढे 'सहा सोनेरी पाना'तून अखिल भारतीय अितिहासाचे समालोचन करताना हिंदूंनी प्रत्याघात करून, प्रत्याक्रमण करून प्रतिपक्षाचा सूड अुगवावयास हवा होता ही आपली विचारसरणी पुन्हा सविस्तर व सोदाहरण मांडली आहे.[3] 'गोमांतका'त सावरकरांची हीच विचारसरणी पुढील काव्य-चरणांतून प्रकट झाली आहे.

'प्रत्याघाता न शक्त वीर जो मरे
तो अन्यायासि वांझ करित त्या क्षणी
प्रत्याघातासि शक्त व्हावया अुरे
तो अन्यायासि ठार मारितो रणी'[4]

---

१. गोमांतक पृ. ११४. २. मा. आ. पृ. २२९. ३. भा. अि. स. सो. पा. पान ५ वे, प्रकरण ५ वे. ४. गोमांतक पृ. २०१.

सावकरांच्या काव्यात आणि निबंधादी गद्यलेखनात हे विचारसाम्य अितके आढळते की, अनेकदा सावरकरांचे काव्य वाचताना आपण त्यांचा अेखादा निबंधच वाचीत आहोत असा भास होतो. त्यांचे 'जात्युच्छेदक निबंध' वाचताना शुद्धी, धर्मांतर, बहिष्कार, परदेशगमनबंदी अित्यादी विषयांवर त्यांनी व्यक्त केलेली मते तशाच पद्धतीने आणि त्याच अुदाहरणांसहित 'गोमांतक' काव्यात चर्चिली गेल्याचे आढळून येते. 'प्रस्तुतच्या जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' या लेखमालेत सावरकरांनी, परदेश-गमनाच्या दुष्ट रूढीमुळे मलवारच्या राजाने हिंदू व्यक्तींची भरती मुसलमान समाजात कशी केली आणि बेजात केलेले तेच 'मोपले' आज त्याच जातिवाल्या हिंदूंचा निर्वंश करण्यास त्यावर लांडग्यासारखे तुटून कसे पडत आहेत याचे वर्णन केले आहे.[1] 'गोमांतका'तही हाच विषय ह्याच अुदाहरणाने पटवून देताना सावरकरांनी लिहिले आहे—

'या हिंदुस्थानच्या असे
आश्चर्यागारी आश्चर्य हेहि की ।
मलयी नृप हिंदूंचा शिष्टसंमते
आज्ञापी हिंदूंतिल अेक–जातिते
प्रत्येकी अेक अेक पुत्र अर्पिण्या
मुस्लीमा स्वेच्छेने ! का ? तरी तशी
सामुद्रिक वाणिज्यी वृद्धि घडावी
हिंदुशास्त्र ना समुद्रगमन मानिते :
हिंदुशास्त्र निजकन्यातनय परंतु
विकण्याशी म्लेच्छांना लव न लाजते :–
हिंदूंच्या या बीजातूनिची पुढे
क्रूर शत्रू हिंदूंचे अुपजतील ते :
जातिगोत्र मायबाप कोण आपले
विसरोनी, ते राक्षससम महा–पिले
'मान्य–पुत्र' हे हिंदूंचेचि की अहा
हिंदूंचे कापितील कंठ चराचरा :'[2]

'यंत्र' या निबंधात सावरकरांनी 'यंत्र हे शाप की वरदान' या विषयावर सविस्तर विवेचन केले आहे. शरीराने दुबळा असलेला माणूस यंत्रबळाने प्रबलतम कसा ठरला आणि यंत्राच्या साहाय्याने त्याची बहिश्चर अिंद्रिये लक्ष पटीने शक्तिमान कशी झाली

---

१. जात्यु. नि. पृ. ६–७. २. गोमांतक पृ. १३५–१३६.

याचे वर्णन सावरकरांनी अनेक अुदाहरणे देअून या निबंधात केले आहे.[1] 'गोमांतक' काव्यातही विषय हाच आहे आणि अुदाहरणेही तीच आहेत. जणू तो निबंधच लयबद्ध पदन्यास करीत वामनावताराने काव्यात अवत्तीर्ण झाला आहे. काव्यातील नायक शंकर यंत्रवळाने मानवाला लाभलेले देहसामर्थ्य वर्णन करताना म्हणतो –

'आत्मबळे म्हणजेची बुद्धिबळाने
बुद्धिबळाने म्हणजे यंत्रबळाने
आणि यंत्रवळ हेची देहवळ असे
की जे जे यंत्र असे अिंद्रियची ते
वृद्धिंगत – शक्तिक्षम अेक आमुचे'[2]

सावरकरांच्या गद्यपद्यांतील ही साधर्म्यस्थळे पाहिली म्हणजे सावरकरांना आपल्या वैचारिक धारणेतून कवितेचे अनेक विषय कसे स्फुरले हे ध्यानी येते; आणि सावरकरांची वैचारिक धारणा ही त्यांच्या व्यवितमत्त्वाचेच अेक प्रधान अंग आहे. अतअेव, सावरकरांच्या काव्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व सहजपणे प्रकट झाले आहे हा निष्कर्ष तर्कशुद्ध ठरतो.

काव्यदृष्टीच्या सिद्धतेचे काही घटक :

(१) काव्यात्म जीवन

सावरकरांच्या कवितेतील आशयाला विशिष्ट घाट येण्याचे कारण जसे यांच्या वैचारिक धारणेत आहे तसे त्यांच्या काव्यविषयक दृष्टीत आहे; आणि त्यांची काव्यदृष्टी त्यांच्या पृथगात्म जीवनातून निर्माण झालेली आहे. सावरकरांचे जीवन व त्यांचे काव्य यांतील अतूट संबंध आणि अेकजिनसीपणा यांबाबत प्रायः सर्व टीकाकारांचे अेकमतच आहे. सावरकरांच्या कवनांचा विचार करताना कवी साधुदास यांनी सावरकरांचा हाच 'अनन्यसाधारण विशेष' दाखविला आहे. कवी साधुदास लिहितात, "व्यक्ती सावरकर, शाहीर सावरकर किंवा वीर सावरकर हे 'अंग मन जैसे कापुराचे' या ज्ञानेश्वरी न्यायाने केव्हाही अेकरूप असल्याचे दिसून येअील."[3] सावरकरांच्या काव्यात्म जीवनाचे दर्शन घडविताना डॉ. अ. ना. देशपांडे यांनी लिहिले आहे : "ते जीवित म्हणजे वीर, करुण, अद्भुतादी रसांचा अुदात्त साक्षात्कार घडविणारे अेक महान ओजस्वी काव्यच आहे."[4] डॉक्टर देशपांडे यांनी पुढे असेही म्हटले आहे की, "त्यांचे काव्यलेखन हे जणू त्यांचे आत्मचरित्र-लेखनच झाले आहे."[5]

---

१. स. सा. वा. खंड ३ – पृ. ३८८ ते ३९१. २. गोमांतक पृ. २२१. ३. सा. का. स. पृ. २१. ४ आ. म. वा. अि. भाग २. ५. आ. म. वा. अि. भाग २ – पृ. ३६.

वि. वि. ग्रंथालय, दापोली.
क्रमांक ३७८ दि: .....
नोंद दि: .....

स्वत: सावरकरांनाही आपल्या या काव्यात्म जीवनाची जाणीव होती असे वाटते. कारण 'आकस्मिकता, अद्भुतता, अुद्क्षोभकता' अित्यादी काव्यविशेषांचा आढळ आपल्या चरित्रात मूलत:च झाला असल्याचे व त्यामुळे आपले चरित्र 'अुद्दीपक, मनोवेधक' वनल्याचे त्यांच्या ध्यानी आले होते.[1]

(२) प्रवल कवित्वशक्ती

ही काव्यशक्तीच सावरकरांच्या जीवनातील सर्वांत प्रभावी शक्ती होती. पुढे स्वीकारलेल्या ध्येयवादाने तिचा विकास अेका विशिष्ट दिशेने झाला ही गोष्ट जरी खरी असली तरी, त्या ध्येयवादावर वाह्यवंधने पडताच वा जीवनसांगतेचा समय समीप आल्याची जाणीव होताच अुसळी घेअून जागी होणारी त्यांच्या जीवनातील जी अेकमेव शक्ती होती ती काव्यशक्तीच होती. वयाच्या आठव्या वर्षी कवितेची धूळपाटी हाती घेतानाच आपण कवी व्हावे, महाकवी व्हावे अशी महत्त्वाकांक्षा सावरकरांच्या मनात अुदित झाली होती.[2] पुढे वालपणी – म्हणजे सन १८९८–९९ मध्ये भगूरवर प्लेगचे भयंकर अरिष्ट कोसळताच स्वत:ला प्लेग होअील या भीतीने सावरकरांनी आपली शेवटची म्हणून जी अिच्छा वडिलांना सांगावयाचे ठरविले होते, ती अिच्छा म्हणजे त्यांच्या प्रभावी काव्यवृत्तीचेच द्योतक होती. आपल्या सर्व कविता प्रसिद्ध कराव्यात हीच सावरकरांची अखेरची अिच्छा होती.[3] 'रवींद्रनाथांचे अभिनंदन' करताना कवी होण्याची आपली महत्त्वाकांक्षा आपणास का सोडावी लागली हे सावरकरांनी जरी सांगितले असले तरी त्या विचारातून त्यांच्या मूळ काव्य वृत्तीचेच दर्शन घडते. कारागृहात पन्नास वर्षे वंद होअून पडण्याचा प्रसंग प्राप्त होताच त्यांच्या व्यक्तित्वातील ज्या अेका प्रवृत्तीने त्यांना आशावादी वनविले व जीवन सुसह्य केले ती काव्यप्रवृत्तीच होती. 'माझ्या जन्मठेपे'त सावरकरांनी लिहिले आहे; "अगदी लहानपणी अेक अिच्छा असे की, आपण मराठीत अेक महाकाव्य लिहावे. (पुढे) कर्मक्षेत्राच्या रणधुमाळीत जरी ती अिच्छा जवळजवळ दिसेनाशी झाली होती तरी कारागृहाच्या अेकान्त कोठडीतील या शांततेच्या धुळीवर अंग टाकताच ती पुन्हा दृग्गोचर होअू लागली..."सध्याच्या अत्यंत निर्दय साधनहीनतेतही हे कार्य करणे शक्य आहे. आणि जर असे अेखादे काव्य मला रचता आले तर वंदिवासातून कधी काळी सुटल्यास व जर सुटलो तर मातृभूमीच्या चरणी या पंचवीस वर्षांची प्राप्ती म्हणून हाही अेक नवोपाहार अर्पण करता येअील. तितके कार्यही काही लहानसहान नाही."[4] याचाच अर्थ असा की, महाकाव्य रचण्यात आयुष्याचे साफल्य आहे असे वाटण्याअितकी त्यांची काव्यप्रवृत्ती प्रवळ होती.[5] 'मृत्यूच्या छायेत' वावरण्याचे

---

१. मा. आ. प्रस्तावना पृ. ६. २. मा. आ. पृ. ४९. ३. मा. आ. पृ. ९४.
४. मा. जन्म. पृ. ९. ५. मा. जन्म. पृ. २४.

जे जे प्रसंग सावरकरांच्या जीवनात आले, त्या त्या वेळी त्यांनी आपल्या काव्यशक्तीने मनाला वज्रशाली बनवून त्या प्रसंगांची तीक्ष्ण धार बोथट केली. 'माझे मृत्युपत्र', "मूर्ति दुजी ती', 'पहिला हप्ता', 'मरणोन्मुख शय्येवर' या सर्व विकट प्रसंगी त्यांनी कवितेचीच कास धरली. ध्येयाच्या मार्गे धावताना सावरकरांनी क्वचितच प्रसंगी कवितेचा त्याग केला पण कवितेनें – म्हणजेच त्यांच्या ठायीच्या प्रभावी काव्यशक्तीने – त्यांचा त्याग कधीच केला नाही. हा स्वानुभवच सावरकरांनी 'मूर्ति दुजी ती' या कवितेत पुढील शब्दांत साकार केला आहे–

'ना! कविता निजभक्ता त्यागिना कधी
भक्त तिला त्यागो, ती त्यागिना तया'[1]

सावरकरांच्या जीवनातील ही काव्यप्रवृत्ती किती बलवती होती याचा अेका दुसऱ्या पद्धतीनेही शोध घेता येअील. ज्या निस्साहाय्य व प्रतिकूल परिस्थितीत सावरकरांनी काव्यसाधना केली तिला जगाच्या वाङ्मयनिर्मितीच्या अितिहासातही क्वचितच तोड सापडेल. निस्साधन अंशा कारागृहात, चुन्याच्या भिंतीचा कागद करून आणि घायपाताच्या काटचाची लेखणी करून सावरकरांनी जे काव्य लिहिले आणि ते लिहिलेले सहस्रावधी काव्यचरण स्मृतिगत करून कारागृहाबाहेर पाठविण्याची जी युक्ती केली त्यात खरोखर विलक्षण अद्भुतता होती. 'ही गोष्ट जगाच्या अितिहासात अभूतपूर्व होय' असे सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी यासंबंधी म्हटले आहे.[2] प्रा. भ. श्री. पंडित यांनी याबाबत आपला अभिप्राय देताना स्पष्टच सांगितले आहे की, 'मराठीशिवाय जगातल्या अितर कोणत्याही भाषेच्या वाङ्मयाच्या अितिहासात असा अद्भुतरम्य प्रसंग नसेल.'[3] सावरकरांसारखी 'काव्यरचनेची तपश्चर्या आधुनिक कालात तरी कोणी केली नसेल' असे प्रा. रा. श्री. जोग यांचे मत आहे.[4] कवितेसाठी हातकडीची शिक्षा भोगणारा व कविताप्रसिद्धीची शक्यताही नसताना काव्यनिर्मितीची साधना करणारा सावरकरांसारखा कवी क्वचितच आढळेल. या सर्व काव्यसाधनेच्या मागे सावरकरांच्या व्यक्तित्वातील प्रबल काव्यप्रवृत्ती कार्यरत होती हेच सिद्ध होते.

(३) महाकवीची प्रतिभा

काव्यात्म जीवन, प्रबल कवित्वशक्ती यावरोबरच सावरकरांना जो तिसरा नैसर्गिक लाभ झाला होता तो महाकवीला साजेशा प्रतिभेचा. सावरकरांच्या हातून अेक सलग महाकाव्य लिहून झाले नाही ही गोष्ट खरी, पण 'कमला', 'विरहोच्छ्वास',

---

१. सा. क. पृ. ११२. २. केसरी २७ मे १९५८. ३. सा. वि. द. पृ. १२.
४. अ. म. का. पृ. २६५.

'गोमांतक', 'महासागर' ही त्यांची खंडकाव्ये म्हणजे 'कल्पनेने निर्माण करू घातलेल्या अेका महाकाव्यरूपी द्रोणागिरीची लहान लहान शकलेच होत.'[१] तांत्रिकदृष्टचा सावरकरांच्या हातून महाकाव्य लिहिले गेले नाही हा कदाचित मतभेदाचा मुद्दा होअू शकेल. पण महाकवित्वाच्या तात्त्विक गमकाचा विचार करता सावरकर हे महाकवीच ठरतात. डॉ. के. ना. वाटवे यांच्या मते तर सावरकर हे तांत्रिक व तात्त्विक ह्या दोन्हीही गमकांची दृष्टी लक्षात घेता महाकवीच होत.[२] महाकाव्यरचनेचा सावरकरांचा प्रयत्न जरी अपुरा असला तरी 'महाकाव्य न लिहिलेले महाकवी' असेच त्यांचे वर्णन करावयास हवे असा आपला स्पष्ट अभिप्राय श्री. वा. ना. देशपांडे यांनी दिला आहे.[३] सावरकरांच्या ठायी महाकाव्य रचावयास अवश्य असलेली विशाल, ध्येयदर्शी आणि अभिजात अशी पौराण प्रतिभा (Epic Genius) वसत होती यावद्दल श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांना कोणतीच शंका वाटत नाही.[४] श्री. अ. का. प्रियोळकर व प्रा. रा. श्री. जोग यांना सावरकरांच्या 'गोमांतक' काव्याचा मोहोरा महाकाव्याकडेच वळलेला वाटतो.[५] तर 'कमला' काव्यासंबंधी श्री. वाळशास्त्री हरदास यांचे असे मत आहे की, हे केवळ अेक काव्य जरी त्यांच्या प्रतिभेतून स्फुरते तरी ते महाकवी ठरावे अितक्या योग्यतेचे आहे.[६] सावरकरांसारख्या 'प्रतिभासंपन्न महाकवीची कविताकृती' श्रीमहाराष्ट्र शारदेला भूषणास्पद वाटण्यासारखीच आहे असे प्रा. भ. श्री. पंडित सांगतात.[७]

सावरकरांची प्रतिभा ही महाकाव्यानुकूल होती हे मत प्रस्थापित करावयाला वरील टीकाकारांचे अभिप्राय पुरे होतील असे वाटते. या टीकाकारांशिवाय अन्य काही टीकाकारांची नुसती नामावली जरी दिली तरी तीमुळे वरील मत अधिक बळकट होअील. या नामावलीतील श्री. ना. ग. जोशी, प्रा. स. गं. मालशे, श्री. भा. कृ. केळकर, श्री. दा. न. शिखरे, प्रा. देवदत्त दाभोळकर अित्यादी साहित्यकोविदांचा अुल्लेख करावयास हवा.

(४) साहित्यविषयक ध्येयवाद

काव्यात्म जीवन, अतिप्रबल कवित्वशक्ती आणि महाकवीची प्रतिभा या गुणांनी संपन्न असे सावरकरांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यातून महाकाव्याचे विशाल शिल्प अुभारणे ही गोष्ट सावरकरांना सहजसाध्य होती. परंतु तसे घडले नाही याचे कारण त्यांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनात सापडते; आणि हा दृष्टिकोन त्यांच्या पृथगात्मक

---

१. सा. का. स. पृ. ३९. २. केसरी २७ मे १९५८. ३. प्रतिभा १५ जानेवारी १९३५. ४. प्रतिभा १५ जानेवारी १९३५. ५. सा. का. स. पृ. ४८ व ८७. ६. सा. का. स. पृ. १३०. ७. म. सा. प. अेप्रिल, मे, जून १९५८.

व्यक्तिमत्त्वातून निर्माण झालेला आहे. अितरही अनेक कारणे आहेत. पण ती बव्हंशी वाङमयबाह्य असल्याने त्यांचा विचार येथे गौण ठरतो. 'कर्त्याचे राजकीय जीवन'[१], लेखन–साहित्याची अुणीव, काव्याचे जहाल राजकीय विषय,[२] चिकाटीचा अभाव,[३] प्रतिभेला दडपून टाकणारा भारदस्तपणा',[४] 'काव्यसाधनेपेक्षा कार्य-साधनेला त्यांनी दिलेले अधिक महत्त्व'[५] अित्यादी अनेक कारणे त्यांच्या हातून महाकाव्य लिहून न झाल्यावद्दल विविध टीकाकारांकडून दिली गेली आहेत. पण प्रा. जोग यांनी म्हटल्याप्रमाणे 'परिस्थितीपेक्षा स्वत: लेखकच यास जबाबदार आहे' आणि लेखक जबाबदार आहे याचा अर्थ काव्याकडे पाहण्याचा त्यांचा विशिष्ट दृष्टिकोनच जबाबदार आहे असाच घ्यावा लागेल.

सावरकर साहित्याचा जो विचार करीत तो राष्ट्रजीवनाच्या, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संदर्भात करीत असत. केवळ आनंदनिर्मिती किंवा कलाविलास हे साहित्याचे ध्येय त्यांना मान्य नव्हते. साहित्याचे ध्येय काय असावे याचा विचार ते आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार दोन पातळींवरून करीत होते. मानवहित आणि राष्ट्रहित ह्या श्रेष्ठ साहित्याच्या कसोट्या ते मानीत होते. हिंदुत्वातीत होअून मानवहिताच्या दृष्टीने ते जेव्हा विचार करीत तेव्हा श्रेष्ठ साहित्याची व्याख्या ते पुढीलप्रमाणे करीत– "मनुष्यजातीच्या अधिकांत अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेच साहित्य श्रेष्ठ, तेच सुप्रासंगिक."[६] परंतु मानवहिताचा विचार राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय होअू शकत नाही ही सावरकरांची भूमिका येथेही कायम होती. 'अखिल मानवाचे परम-कल्याण व्हावे म्हणून भारताला राष्ट्रीय स्वतंत्रता हवी आहे' ही राजकीय क्षेत्रातील सावरकरांची विचारप्रणाली साहित्यिक क्षेत्रातही सुनिश्चित होती.[७] साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे अेक अुपांगच असल्याने राष्ट्राचे जे ध्येय तेच साहित्याचे ध्येय असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.[८] 'राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता, मुख्य साध्य असले पाहिजे' असे ठाम मत ते प्रतिपादीत.[९] मानवहिताच्या पहिल्या पातळीवरून राष्ट्रहिताच्या दुसऱ्या पातळीवर ते असेच अुतरत असत आणि राष्ट्रहिताच्या पातळीवर अुतरल्यानंतरही ते साहित्याचा विचार परिस्थितिसापेक्ष करीत. पारतंत्र्याच्या काळात साहित्याचे स्थान दुय्यम किंवा तिय्यम दर्जाचे असावे असा त्यांच्या विवेचनाचा रोख असे. महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदावरून भाषण करताना साहित्य व साहित्यिक यासंबंधी त्यांनी जे विचार व्यक्त केले त्याचे संकलन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येअील :–

---

१. आ. नि. पृ. ८३. २. सा. च. प्रस्तावना पृ. ७. ३. अ. म. का. पृ. २६९. ४. अ. म. का. पृ. २७०. ५. अ. म. का. पृ. २६९. ६. स. सा. वा. खंड ४ पृ. ४८१. ७. मा. आ. पृ. २२२, २२३. ८. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८५. ९. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८५.

" सांगोपांग साहित्य हेही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम-तिय्यम कर्तव्यच वाटत आहे....[1] आनंद नि करमणूक ही मानवहितास काही प्रमाणात हितकारकच असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात (मानव-हिताच्या) ध्येयात होतोच. पण केवळ करमणूक हे काही कर्तव्य नव्हे. घरात आअी मरणान्तिक वेदनांनी अंथरुणावर खिळली असता, जर अेखादा वहकलेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रमू शकला तर त्यास कलावंत म्हटले तरी कुलदीपक काही म्हणता यावयाचे नाही[2]..... साहित्यासाठीसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळले पाहिजे. कारण जे राष्ट्र खुरटे, दुबळे, त्यांचे साहित्यिक खुरटे नि दुबळे असणार[3]..... युगधर्म ओळखून, शिवाजीने सरस्वतीच्या रक्षणार्थच सरस्वतीकडे काही काळ पाठ फिरवून शुंभ - निशुंभ - मर्दि-नीचीच अुपासना केली; लेखणी टाकून भवानी तलवार अुचलली म्हणून तर आज महाराष्ट्र सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे[4]..... म्हणून आजच्या परिस्थितीत आमचे राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ. शास्त्रचर्चा नव्हे[5]..... आज राष्ट्रीय शस्त्रबळ हेच मुख्य कर्तव्य, राष्ट्रीय साहित्य हे तिय्यम.[6] आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजय मात्रा म्हणजे त्यांचे शस्त्रबळ; साहित्य नव्हे[7]..... यास्तव मी आपणास स्पष्टपणे सांगतो की, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचे सापेक्ष महत्त्व तिय्यम आहे आणि तरुण पिढीचे पहिले कर्तव्य आहे सैनिकशिक्षण[8]..... सरस्वतीचा अेक अुपासक या नात्याने मी तुम्हास सांगतो की, आपल्या तरुण पिढीने आता लेखणी मोडून टाकावी आणि बंदूक अुचलावी.[9] "

सावरकरांचे वरील विवेचन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ध्येय, निष्ठा, श्रद्धा, अित्यादींच्या रसायनात बुडून निघालेले आहे. त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा, स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय, शस्त्रसामर्थ्यविरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रीय कर्तव्यविचार या त्यांच्या व्यक्ति-त्वातील मूलद्रव्यांचे दर्शन येथे घडते. कृतिप्रेरकता हा त्यांचा व्यक्तित्वविशेष येथेही प्रकट झाला आहे. पारतंत्र्याच्या परिस्थितीत सावरकरांनी साहित्याला तिय्यम स्थान दिले आणि हे जे स्थान दिले तिथेही त्या साहित्याला त्यांनी प्रचारकार्याला जुंपले. स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रत्यक्ष कार्य त्यांनी प्रथम क्रमाचे मानिले आणि त्या कार्यात वाह्य बंधनांनी ज्या ज्या वेळी खंड पडला त्या त्या वेळीच मुख्यतः ते साहित्यनिर्मितीकडे

---

१. स. सा. वा. खंड ४ – पृ ४८५. २. स. सा. वा. खंड ४ –पृ. ४८५.
३. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८७. ४. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८७.
५ स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८६. ६. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८६.
७. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८५. ८. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८६–४८७.
९. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८७.

वळले; आणि अशा वेळी जे साहित्य त्यांनी निर्माण केले तेही आपल्या ध्येयधोरणाला पोषक व त्याचा प्रचार करणारे असेच साहित्य निर्मिले. १९३७ 'साली वडोदे साहित्य संमेलना 'च्या अध्यक्षपदावरून भाषण करताना आपली ही भूमिका त्यांनी विशद केली आहे. ते म्हणाले, " साहित्य हे राष्ट्राच्या वृद्धीचे , सामर्थ्याचे, शौर्याचे प्रतीक आहे अशी माझी भावना आहे. मी स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो असतो किंवा पेशवाईत जन्माला आलो असतो तर माझ्या साहित्याच्या कल्पनेचा अर्थ तुम्हांस अधिक पटवून देता आला असता. सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीत माझे साहित्य हे केवळ प्रचारात्मक स्वरूपाचे आहे. "[1].

१९४१ साली नाशिक येथील अेका भाषणात सावरकरांनी साहित्यासंबधीचे आपले विचार पुन्हा अेकदा प्रकट केले. या विचारांतही पूर्वीचे सूत्र कायमच होते. 'लेखण्या मोडा, बंदुका घ्या ' या आपल्या पूर्वीच्या सूत्राचे स्पष्टीकरण या व्याख्यानातून सावरकरांनी पुन्हा अेकदा केले. ते म्हणाले; "साहित्याच्या संरक्षणासाठीच ते सूत्र मी सांगितले..... देश पारतंत्र्यात असताना कसल्या कविता करता? म्हणून मी म्हणतो की, काही काळ लेखण्या मोडून टाका आणि बंदुका हातात घ्या. जिवंत साहित्य निर्माण व्हावे म्हणून आपण आपल्या हाती बंदुका घ्या.....श्रेष्ठ नि जिवंत साहित्य निर्माण करावयाचे असेल तर अगोदर क्षात्रतेज निर्माण करा. "[2]

१९४३ साली पुन्हा ह्याच विषयावर सावरकरांनी विवेचन केले होते. सांगली येथील शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवांच्या प्रसंगी भाषण करताना ते म्हणाले, " मी पूर्वीचा उपदेश केला त्या वेळी राष्ट्रातील तरुण मला सुनीतांत नि कादंबऱ्यांत गुंतलेले दिसले. त्या वेळी राष्ट्राच्या दृष्टीने तरुणांचे जे आद्य कर्तव्य मला वाटले ते मी प्रतिपादले...स्वातंत्र्य संपादनार्थ सर्व शक्ती आज केंद्रित झाल्या पाहिजेत...म्हणून बंदुका घेण्यास शिकविणारी नाटके लिहावीत. "[3]

कविता : साध्य नव्हे साधन

साहित्याकडे पाहण्याचा सावरकरांचा दृष्टिकोन त्यांच्या पृथगात्मक व्यक्तिमत्त्वातूनच निर्माण झाला होता, हाच वरील सर्व विवेचनाचा निष्कर्ष होय. कवितेकडे साध्यापेक्षा साधन म्हणूनच ते पाहात होते. परिस्थित्यनुकूल असे मनोधर्म जागृत करणारी व जीवन सह्य होण्यास साहाय्यक होणारी शक्ती म्हणजे कविता अशा हेतूने ते काव्यनिर्मिती करीत असत. कविता ही कर्तव्याला अनुसरून तिच्या भक्ताचे रक्षण करते. म्हणून कर्तव्यानुसार तिच्या भिन्न भिन्न अशा दोन मूर्ती

---

१. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४३६. २. प्रदक्षिणा पृ. २१४, २१५, २१६, २१७. ३. केसरी दि. ९–११–१९४३.

आहेत असा त्यांचा विश्वास होता. 'सांत्वन', 'माझे मृत्युपत्र', 'आत्मबल', 'पहिला हप्ता', 'सप्तर्षि', 'मूर्ति दुजी ती', 'मरणोन्मुख शय्येवर' अित्यादी सावरकरांच्या अुत्कृष्ट कवितांतून त्यांची हीच भूमिका दिसून येते.) या सर्व कवितांनी सावरकरांना 'क्रकचतीक्ष्ण कर्तव्या'च्या प्रसंगी कसा धीर दिला[1], मनास वज्रशाली कसे केले[2], यातनांच्यावर मात करून 'याहुनिही भयद असे छळ सहेनची' अशा धैर्याचा पुरवठा कसा केला[3] हे त्यांच्या आत्मचरित्रातील अनेक अुल्लेखांवरून दिसून येते.

अुत्कृष्ट भावगीत-रचनेत ही सावरकरांची साधनदृष्टी होती, मग पुढे हिंदुत्वाच्या प्रचारासाठी लिहिलेल्या गीतात ती अपरिहार्यपणे अंसणारच. तेथेही पुन्हा काव्यसाधनेपेक्षा कार्यसाधनेला महत्त्व आले होते. त्यामुळे कार्यनिष्पत्ती-पेक्षा काव्यनिर्मिती गौण मानिली गेली. या सर्व विवेचनाच्या कार्याचा प्रा. रा. श्री. जोग यांच्या शब्दांत समारोप करता येअील. प्रा. जोग लिहितात, "काव्याकडे पाहण्याची त्यांची (सावरकरांची) दृष्टीही साधनाची असून, साध्याची नव्हती. त्यामुळे (महा) काव्य लिहून झालेच पाहिजे असा आग्रह त्यांना स्वत:ला वाटत नसावा. काव्यलेखनापेक्षा कार्यसाधन अधिक महत्त्वाचे वाटत असावे व म्हणून काव्यसमाधी मागे पडली."[4]

जीवनतत्त्वाच्या अभिव्यक्तीसाठी काव्यनिर्मिति :

(सावरकरांची काव्यसृष्टी जशी त्यांच्या ध्येयवादाने विकसित झाली आहे तशीच ती त्यांच्या तत्त्वज्ञानावर परिपुष्ट झाली आहे. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान कविताबद्ध करण्याच्या मुख्य हेतूने त्यांनी काव्य लिहिले. पण त्या मुख्य हेतूच्या ओघाने अुत्कृष्ट काव्यनिर्मिती हा प्रसंगोपात्त लाभ सावरकरांना झाला.[5] 'आपले जीवनतत्त्व व्यक्त करण्यासाठी त्यांनी केवळ वृत्तांचा आश्रय केला आहे. त्यात अुत्तम काव्य आढळले ते त्याचे आनुषंगिक फळ आहे.' श्री. दा. ना. आपटे यांचे यासंबंधीचे मत तर्कशुद्ध वाटते.[6] स्वत: सावरकरांना कविता व तत्त्वज्ञान यात यत्किंचितही विरोध नाही असे वाटे. सौंदर्यनिर्मिती व सत्यदर्शन हा अेकच हेतू दोघांचा आहे अशी त्यांची धारणा होती. याबाबत आपले विचार व्यक्त करताना सावरकरांनी म्हटले आहे : "खरोखरच कवितेचा आणि तत्त्वाचा विरोध असणेच अशक्य आहे. कविता सौंदर्यास भुललेली आणि सौंदर्य तेच की जे निरपवाद परिपूर्ण आनंद देते, तेच सत्य! अिंद्रिय, मन, बुद्धी यांच्या विरोधास लवलेश वाव न अुरू

---

१. मूर्ति दुजी ती. २. आत्मबल. ३. मूर्ति दुजी ती. ४. अ. म. का-पृ. २६९–२७०. ५. सा. का. स. पृ. १६३. ६. सा. का. स. पृ. १६३.

देता जे शंकाकुल आत्म्यास अेकाअेकी नि:संशय आणि संपूर्ण समाधानात डोलविते ते सत्य, तेच समाधान – समाधीचे सौंदर्य."[1]

सावरकरांचे तत्त्वज्ञान ज्या तत्त्वज्ञांच्या विचारावर परिपुष्ट झाले ते तत्त्वज्ञ मुख्यत: भारतीय परंपरेतील होते. त्यांच्या मतावर सर्वात अधिक प्रभाव होता तो गीताकार भगवान श्रीकृष्णाचा. त्याशिवाय श्रीरामानुजाचार्य, शंकराचार्य, पतंजली, ज्ञानेश्वर, तुकाराम, रवींद्रनाथ टागोर अित्यादी भारतीय तत्त्वज्ञांच्या विचारसरणीचे संस्कार त्यांच्या मनावर झाले होते. परकीय तत्त्वज्ञांपैकी बेनथॅम आणि मिल यांच्या नीतिशास्त्राची पकड त्यांच्या मनावर होती.[2]

सावरकरांचे व्यक्तित्व विशिष्ट ध्येयवादाने घडले गेले नसते तर त्यांच्या तात्त्विक कवितेने फार अुच्च पातळीवरून व व्यापक विचार-परिघात संचार केला असता. सावरकरांनी 'हिंदुत्वातीत' होअून लिहिलेल्या काही कविता पाहिल्या तर वरील विधानाची सत्यता सहज पटू शकेल. विश्वाचे स्वरूप व त्याच्या निर्मिती-मागील हेतू जाणून घेण्याच्या जिज्ञासेने त्यांनी लिहिलेल्या 'जगन्नाथाचा रथोत्सव', 'तारकांस पाहून', 'महासागर', 'सप्तर्षि' अित्यादी काही कविता या संदर्भात पाहण्यासारख्या आहेत. विश्वाच्या अितिहासाचे पहिले पान जाणून घेण्याची जिज्ञासा त्यांना अगदी लहानपणीच झाली होती.[3] याच तत्त्वजिज्ञासेचा विकास असाच हिंदुत्वातीत मन:स्थितीत झाला असता तर सावरकरांची तात्त्विक कविता अेका अुच्च आणि निराळ्या पातळीवरूनच वावरली असती. त्यांच्या आत्मौपम्य वृत्तीचा व अिंद्रियसुखातीत प्रवृत्तीचा जो विशेष त्यांनी "मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत सांगितला आहे तो जर तसाच स्थिर राहिला असता तर त्यांची कविता निखळ अध्यात्मवादी बनली असती. मानववंशाच्या गौरवातच स्वत:चा गौरव मानण्याची जी भूमिका त्यांनी या कवितेत घेतली होती ती अढळ राहिली असती तर त्यांची कविता मानवतावादाचा पुरस्कार करणारी ठरली असती. | पुढे विशिष्ट ध्येयवादाने त्यांनी आपल्या वृत्तींचा विकास जरी अेका ठराविक दिशेने केला होता, तरी जीवनाच्या अत्युत्कट आणि अंतिम क्षणी त्यांच्या व्यक्तित्वात मुरून राहिलेली अध्यात्मता, मानवतावाद व आत्मौपम्यवृत्ती प्रकट झाल्याशिवाय राहिली नाही. 'आत्मबल' कवितेतील मुख्य विचारच आत्म्याच्या अमरत्वातून स्फुरलेला आहे. 'मूर्ति दुजी ती' या कवितेतही 'अच्छेद्य, अदाह्य, अशोष्य' आत्म्याचा पुकारा करणारी विचारप्रणाली कवीला जागवावयाची आहे.[4]

---

१. मा. जन्म. पृ. २४८. २. मा. आ. पृ. १७०. ३. मा. आ. पृ. ४७.
४. सा. क. पृ. ११३.

'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत स्वजीवनातील निरिच्छ, कामनात्यक्त आणि विरागी वृत्ती यांचे वर्णन कवीने पुढील शब्दांत केले आहे :

'अिच्छेच्या बीजा फल भोग लागता
अिच्छेची बीजेची त्यात फिरोनी
आणी अनुभवुनी की अेक भुकेची
अेक जेवणाने जी तृप्ति जाहली
तृप्ति सहस्रव्याही भोजनामुळे
असते की तितुकीची आणि तशीची'[1]

'जीवन हे जीवोजीवी समसंवेदन झालेले असते'[2] या वृत्तीनेही सावरकरांनी आपले जीवन जगण्याचा प्रयत्न केला. या आत्मौपम्यभावाने आपले मन किती कोमल झाले होते याचे वर्णन करताना सावरकर सांगतात,

'जै हिरव्या गवताचा गार गालिचा–
वरुनि दहापावलीच अंगणामधे
कारागारात कधी मी फिरे तधी
आत्मौपम्यात मुरत चित्त थिजोनी
कितिदा तरि चरण अकस्मात चालता
स्तंभित होअुनि रहावेत घटिघटि
काही केल्याहि तया तरुण कोवळ्या
गवताचे अंकुर दुखतील या भये
पाय त्यांवरी नये पडूचि की पुढे
हातीचा घास कधी हटुनि रहावा
हातीची, की जितुकी त्यात शिते ती
बीजेची नव्हत काय ? खातसो अम्ही
फल ते ते भ्रूणघात ?'[3]

या आत्मौपम्यभावाबरोबर जीव, जगत, अीश्वर या त्रिपुटीबद्दलही सावरकरांच्या मनात चिंतन चालू असे. 'सूत्रधारास' 'अज्ञेयाचे रुद्धद्वार' या कवितांतून त्या जगच्चालकाला जाणून घेण्याचा, त्याचे 'परमधाम' कोठे आहे हे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. 'महासागर' कवितेत मानव आणि हे विशाल विश्व यांच्यातील अन्योन्य-संबंधाचा विचार त्यांनी केला आहे.[4]

---

१. सा. क. पृ. १६२. २. मा. जन्म. पृ. ४०९. ३. सा. क. पृ. १६४.
४. स. सा. वा. खंड ७–पृ. २४६, २४७.

आणि त्यावरोवरच मानवजातीची सेवा ही श्रेष्ठ भक्ती होय, खरा मानवधर्म होय अशी आपली मानवतावादी बैठक स्थिर ठेविली आहे;[१] सावरकरांची ही वृत्ती पाहिली की, त्यांच्या मूळ प्रकृतीवद्दल संदेह निर्माण होतो. श्री. मायदेव यांच्या मनात तसा संदेह निर्माणही झाला आहे. म्हणूनच त्यांनी म्हटले आहे : " विनायकरावांच्या या कविता वाचल्यानंतर ते किती निवृत्तिप्रिय, संन्यस्त व आत्मनिष्ठ आहेत याची कल्पना येअील. किंवहुना हीच त्यांची प्रकृती असून त्यांचा जगाला दिसणारा ज्वलंत कर्मयोगीपणा विकृती तर नाही ना असे क्षणभर वाटेल."[२] श्री. धनंजय कीर यांनीही असेच अुद्गार काढले आहेत. श्री. कीर लिहितात :

"It is clear that Savarkar's outlook on life is that of an ascetic moving in great events."[३]

श्रीकृष्णोपदिष्ट तत्त्वांचा आचार

सावरकरांनी अनेक अध्यात्मपर ग्रंथ वाचले होते तरी त्यांच्या मनावर प्रभाव पडला तो श्रीकृष्णाच्या व श्रीरामाच्या तत्त्वज्ञानाचा ! त्यातल्या त्यातही श्रीकृष्णोपदिष्ट भगवद्गीतेचा संस्कार त्यांच्या मनावर अधिक झाला. सावरकरांच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या ध्येयाला व साधनाला श्रीकृष्णाची विचारसरणीच पोषक होती. म्हणूनच त्यांनी म्हटले होते– 'आम्हांस जे शब्द अैकू येत होते ते शिवाजीचे नि कृष्णाचे.'[४] आपल्या क्रांतिसूत्राच्या आचारांचे समर्थन करताना ते सांगत, " अुपयुक्ततावादाचा श्रीकृष्ण हाच पहिला प्रणेता, नव्हे पहिला आचार्य. कारण त्याने तो आचरून दाखविला. त्याच्या सर्व आचारांचे समर्थन याच तत्त्वावर त्याने केले, करता येणारे आहे."[५] श्रीकृष्णाने आचरलेल्या अुपयुक्ततावादाचे अधिक स्पष्टीकरण सावरकरांनी 'रहस्यकार आणि अुपयुक्ततावाद' या लेखात केले होते.[६] या लेखात सावरकर लिहितात, " अुपयुक्ततावाद म्हणजे ते वर्तन नैतिक होय की, ज्यायोगे शक्य तितक्या अधिक मनुष्यांचे शक्य तितके अधिक हित साधले जाते.... सर्व भूतांचे हित साधणे सर्वस्वी अशक्य असून मनुष्यास व्यावहारिक शक्यतेचा अेकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे मनुष्यजातीस अधिकांचे अधिक कल्याण, शक्य तितक्या पुष्कळांचे शक्य तितके पुष्कळ सुख साधणे हाच होय. 'सर्वभूतहिते रतः' ही पदवी अर्थवादात्मक असून त्याचा मुख्यार्थ 'वहुमनुष्यहिते रतः' असाच होतो. म्हणूनच कृष्णाने कंस मारला...

---

१. स. सा. वा. खंड ७–पृ. २४७. २. सा. का. सं. पृ. १७. ३. Savarkar & His Times p. 124. ४. मा. आ. पृ. २१८. ५. मा. आ. पृ. १७०. ६. केसरी ४–८–१९२५.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
दिनांक ..... वि: .....
आवक क्रमांक ३८८ नोंद दि: .....

आम्हांस तर असे वाटते की, अगदी पहिला व प्रख्यात अुपयुक्ततावादी जर कोणी असेल तर तो पार्थसारथी भगवान श्रीकृष्ण होय."

आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सावरकरांनी श्रीकृष्णोपदिष्ट तत्त्वे स्वीकारली आणि आपल्या वर्तनात ती अुतरवून दाखविण्याचा प्रयत्न केला. सावरकरांच्या सर्व तात्त्विक कवितेत गीतातत्त्वांचा अुद्घोष जो वारंवार अैकू येतो तो यामुळेच होय. हे तत्त्वज्ञान 'सकल गुरूचा गुरुंवर भगवान श्रीकृष्णजी स्वये कथिती' असे 'सप्तर्षि' कवितेत सावरकरांनी सांगितले आहे.[1]

'ओळखिचे पत्र अम्हांजवळ त्या स्वये
भगवान श्रीकृष्णाचे'

अशी स्पष्ट कबुली 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत सावरकरांनी दिली आहे.[2] त्यांनी आपल्या काव्यात गीतावचनांचा हेतुपुरस्सर अुपयोग केला आहे. आत्म्याचे अमरत्व, आत्मरतीतील आनंद, निष्काम कर्मयोग, मनाचे चंचलत्व व त्याचा निरोध, भक्ताला त्याच्या भक्तीप्रमाणे मिळणारा परमेश्वरी कृपाप्रसाद, लोकसंग्राहकता, कर्मयोग्याला योगभ्रष्टतेनंतरही प्राप्त होणारी अुत्तम स्थिती, 'गुरूणामपि दुःखेन' विचलित न होणारी योगीवराच्या आत्म्याचा धर्म अित्यादी अनेक गीतातत्त्वे आपल्या कवितेत सावरकरांनी गुंफिली आहेत. ही तत्त्वे त्यांनी आपल्या आयुष्याच्या ध्येयतात्यासारखी ठरविली आणि त्यांचा आपल्या ध्येय धोरणाच्या पुरस्कारासाठी त्यांनी अुपयोग केला. केव्हा केव्हा आपल्या बाह्य व्यवहाराच्या किंवा वर्तनाच्या समर्थनार्थ त्यांनी त्या तत्त्वांचा पुरस्कार केला. म्हणूनच श्री. ना. दा. आपटे यांनी म्हटल्याप्रमाणे सावरकरांच्या काव्यातील तत्त्वज्ञान हे स्वसंवेद्य आहे व ते स्वानुभूत आहे.[3]

लोकसंग्राहकता, मानवहित ही आपल्या नैतिक वर्तनाची कसोटी सावरकरांनी याच तत्त्वज्ञानातून सिद्ध केली. सावरकर लिहितात,

'तरिहि लोकसंग्रहार्थ धारणाप्रती
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या
सज्जनास गमली अनुकूल तीच की,
कार्ये म्या धर्म्य अशी मानिली'[4]

आपण निवडलेली कार्ये ही श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे निवडलेली असल्याने प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाचे संमतिपत्र, ओळखपत्र आपल्याला मिळालेले

---

१. रानफुले पृ. ११९. २. सा. क. पृ. १६५. ३. सा. का. स. पृ. १६३.
४. सा. क. पृ. १६०.

आहे, म्हणूनच आता दुर्गती प्राप्त होण्याचे भयच अुरले नाही अशी सावरकरांची ठाम निश्चिती होती.[1] ज्या तत्त्वज्ञानावर विश्वसून आपण कर्मबीजांची पेरणी अिहलोकाच्या भूमीत केली, ते तत्त्वज्ञान श्रीकृष्णानेच आपणास सांगितलेले आहे आणि त्या कर्मबीजांची निवडही त्यानेच आपणांस करून दिली आहे अशी सावरकरांची धारणा होती. म्हणून ते म्हणतात,

'की येथे पेरले अम्ही
फुलत आणि फलत तेच, कथिति ते तिथे
आणी मी पेराया कष्टलो असे
बीजे की ती ती जी निवडुनी दिली
त्यांनीच अत्युत्तम म्हणुनिया मला'[2]

आणि ही जी पेरणी करावयाची तीही श्रीकृष्णाने सांगितलेल्या निष्काम-वृत्तीने, फलाशाविरहित भावनेने! गीतोपदिष्ट ही निष्कामवृत्ती सावरकरांच्या अनेक कवितांतून प्रतिबिंबित झालेली आहे. 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत "त्यांनीच अत्युत्तम म्हणुनिया' निवडून दिलेली बीजे 'पेरू फलाशाविरहित' असा शब्दप्रयोग सावरकरांनी केला आहे.'[3] 'माझे मृत्यपत्रा'त ह्याच निष्काम कर्माचरणाची आठवण करून देताना सावरकरांनी येसूवहिनींना लिहिले–

'भंगली भिअुनिया धृति यातनांना
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना'[4]

'सप्तर्षि' या प्रदीर्घ कवितेत सावरकरांनी या निष्काम कर्मयोगाचा अुल्लेख अनेक ठिकाणी केला आहे.[5] चंचल मनाला आवर घालण्याचा ज़ो ठेवा आपल्या-जवळ आहे, त्याचे वर्णन करताना सावरकर लिहितात—

'निष्काम कर्मयोगाचा मज ठेवा, तया बळे आधी
लेश वशंवद होते स्वच्छंदाची सुटोनी मन आधी'[6]

चंचल मनाला स्ववश करण्यासाठी गीतेने सांगितलेल्या अभ्यासाचा–चित्तवृत्ति-निरोधाचा मार्ग सावरकर अवलंबीत असत. गीतेच्या सहाव्या 'ध्यानयोगा'च्या अध्यायातील चौतिसाव्या व पस्तिसाव्या श्लोकांत मनाचे चंचलत्व व त्या मनाला अभ्यासाने व वैराग्य वृत्तीने ताब्यात ठेवण्याचा मार्ग सांगितलेला आहे. सावरकर ह्याच मार्गाने आपल्या मनाला आवर घालण्याचा प्रयत्न कसा करीत, याचे वर्णन 'सप्तर्षि' कवितेत आलेले आहे. सावरकर लिहितात,

---

१. सा. क. पृ. १६५. २. सा. क. पृ. १६३. ३. सा. क. पृ. १६३. ४. सा. क. पृ. ७७. ५. रानफुले पृ. १०७, १०८, ११८. ६. रानफुले पृ. ११८.

'मन हे चंचल भारी ! दुर्निग्रह भासलेचि साधुजना
जडजीव अनभ्यस्तची त्यात अम्ही, आवरेचि ते मज ना'[१]
'घेता घेता अैशा वृत्ती ध्यानस्थ चित्ति विलयाते
ये सुखद अनुभवाया आत्मरतीचा प्रसाद तिल याते'[२]

गीतेच्या तिसऱ्या अध्यायात (श्लोक क्र. १७) सांगितलेल्या आत्मरतीचा आनंद लुटण्याचा प्रयत्न सावरकर अशा पद्धतीने करीत असत. 'सुख ते आत्मरतितची वसते' अशी त्यांची निश्चिंती झाली होती.[३]

गीतेत वर्णन केलेल्या योगिवराच्या आत्म्याप्रमाणे अचल राहून मोठ्या संकटाला तोंड दिले पाहिजे हा विचार 'मूर्ति दुजी ती' या कवितेत सावरकरांनी श्रीबंदावीराच्या स्वभावचित्रातून सांगितलेला आहे. गीतेच्या सहाव्या अध्यायातील बाविसाव्या श्लोकात अशा योगसाधना करणाऱ्या योगीवराच्या आत्मस्थितीचे वर्णन आले आहे. त्याच्याच आधारे श्रीबंदावीराच्या छळाचे वर्णन करताना सावरकर लिहितात,

"— तरिहि धैर्य ना चळे ।
अुस्सहि ना निघत मुखातुनि : की असे
योगिवराचा आत्मा, क्रूर हो, तया
आधीची गत तेथे : की 'विचाल्यते
गुरूणामपि स दुःखेन न यत्र आगतः ।"[४]

गीतेच्या अठराव्यया अध्यायातील 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' हे तत्त्व सावरकरांनी कर्माचरण करताना आदर्श म्हणून मानिले होते. तुरुंगातील श्रमाचे काम करताना सावरकर ह्याच तत्त्वाचे आचरण करीत. 'सप्तर्षि' कवितेत ते लिहितात,

'श्रम ते शांत मने मी लागे करण्यासवे करी धरुनी
स्वे स्वे कर्मण्यभिरत संसिद्धिसि लाभताति ते स्मरुनी'[५]

व्यक्तिनिष्ठांतून झालेले तत्त्वमंथन

सावरकरांची तात्त्विक कविता स्वानुभूत असल्यामुळे रूपकाचा फारसा आश्रय न घेता ती सरळ प्रकट होते. श्री. अ. म. जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे ती विषयापासून वेगळी काढता येत नाही.[६] तसेच सावरकरांच्या चरित्रापासूनही

---

१. रानफुले पृ. ११८. २. रानफुले पृ. ११८. ३. रानफुले पृ. ११६.
४. सा. क. पृ. १२४. ५. रानफुले पृ. ११७. ६. साहित्य – मे १९४९.

तिला अलग करता येणार नाही. 'मूर्ति दुजी ती' किंवा 'आत्मबल' या कवितेत त्यांना जे तत्त्वज्ञान स्फुरले ते जीवनातील त्या त्या विशिष्ट प्रसंगातून स्फुरलेले आहे. ते केवळ बुद्धिगम्य नाही किंवा कल्पनाकलित नाही. जीवन-मृत्यु-विषयक विचारांना आध्यात्मिक गूढगुंजनात गुंतविण्याऐवजी राष्ट्रीय ध्येयाच्या संदर्भातच त्यांचे आविष्करण ते करीत. या नश्वर देहाची सार्थकता वैयक्तिक मुक्तीत नसून श्रीरामचरणी–म्हणजेच स्वदेशचरणी–हा देह अर्पण करण्यातच आहे असे त्यांना वाटे.[1] जीवन कृतार्थतेची कल्पना 'निजमातृ-विमोचनार्थ स्वार्थ' जाळण्यामध्येच आहे अशी त्यांची धारणा होती.[2] त्यांच्या दृष्टीने मुक्तीचा-मोक्षाचा अर्थ हा आध्यात्मिक स्वरूपाचा नव्हता. भगवती स्वतंत्रतेचीच 'मोक्ष, मुक्ति ही रूपे' आहेत असे ते सांगत.[3] राष्ट्रीय दृष्टीने त्यांनी स्वतंत्रतेचा अर्थ जसा मुक्तीपर्यंत नेऊन भिडविला, तसाच मरणाचा अर्थही त्यांनी मुक्तीपर्यंत आणून सोडला. पण तो विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून वा बुद्धिनिष्ठेतून/ विशिष्टाद्वैती श्रीरामानुजाचार्य किंवा केवलाद्वैती श्रीशंकराचार्य या दोनही तत्त्वज्ञांच्या मतांचा अनुवाद त्यांनी 'सप्तर्षि' आणि 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितांत केलेला आहे.[4] परंतु पुढील चरणांतून मृत्यूची तर्ककठोर, बुद्धिगम्य मीमांसा त्यांनी केली आहे–

'मरण अेक सुषुप्ति
अथवा प्रत्यक्ष मुक्ति । पंचही असे
मिश्रित भूतांश पृथक् मुक्ति होअुनी
विहरोत स्वेच्छ नव्या मिश्रणातुनी,
वा स्वयेचि, वा शून्यी ।'[5]

व्यक्तिगत, सांसारिक दुःखांचे विस्मरण होण्यासाठी तत्त्वज्ञानाचा आश्रय कुणी केला तर त्यात विशेष लक्षणीय असे काही नाही, ती जगरूढीच आहे. परंतु राष्ट्रीय दुःखात वा राष्ट्रासाठी कष्ट अुपसताना तत्त्वज्ञानाचा आधार घेअून मनाचे सांत्वन करण्याची कल्पना क्वचित आढळते. सावरकरांनी हे केले. कारण संसाराचा 'भव्यतर अर्थ' त्यांनी घेतला होता.[6] म्हणून व्यक्तिगत दुःखाचा संबंध ते राष्ट्रीय दुःखाशी जोडीत असत. अंदमानात तीन कटोऱ्यांत स्नान करताना आपण 'काळ्यापाण्यावरचा स्नानसंकल्प'च सोडीत आहोत असे त्यांना

---

१. सा. क. पृ. ७४. २. सा. क. पृ. ७७. ३. सा. क. पृ. १.
४. सा. का. स. पृ. १८०, १८१. ५. सा. क. पृ. १६५–१६६.
६. मा. जन्म. पृ. १५.

वाटले.[1] पायांना जखडणाऱ्या बेडीमध्येही त्यांनी असाच तात्त्विक आशय अुभा केला. 'बेडी' या कवितेत सावरकर लिहितात–

"चरणासि सतत इच्छेच्या । जी वेढी
घडि कवण विधिनिषेधांची । ही बेडी
जाणे कोण अजी । निश्चित ते
परंतु की मज गमते
अिच्छे घडि त्याची । अिच्छाची
वा बेडि तदिच्छेची ।"[2]

त्यांची 'कोठडी' ही कविता अशाच तात्त्विक आशयाने भरलेली आहे. 'माझी जन्मठेप' या आत्मवृत्तात सदर कवितेतील विचारच त्यांनी व्यक्त केले आहेत. सावरकर लिहितात, "स्वतंत्र जीवन? वेड्या मना, ह्या कारागाराच्या भितीबाहेर का स्वातंत्र्य आहे? ह्या दगडी भितीपलीकडे सृष्टिनियमांच्या क्षिती आहेत! मनाला 'अिच्छेच्या, क्षितिजाच्या भिती' आहेत.[3] 'कोठडी'-मध्ये हाच विचार व्यक्त करताना सावरकरांनी म्हटले आहे–

'तरिही काय? अहो । आंशिक ती
शक्य 'पूर्ण' ना मुक्ती
याहि तटापुढती । बंदीच्या
क्षितिजांच्याही भिती ।[4]

पन्नास वर्षांची जन्मठेपेची शिक्षा झाल्याचे वृत्त समजताच सावरकरांनी आपल्या मनातील खळबळ 'सप्तर्षि' कवितेच्या पूर्वार्धात वर्णन केली आहे. तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर आरूढ होअून त्यांनी मनाला त्या वेळी पुढीलप्रमाणे दिलासा दिला–

'बंदी पन्नासचि ना वर्षे? पन्नास कल्पना ही तो :
आभास-काल केवल, वस्तुस्थितिचा पदार्थ नाही तो
बंदी? ती आत तशी बाहेरहि या शिवासि जीवाची :
पगडा तुजवरि पांचावृत्तींचा तोवरी न केव्हाची
आनंद गवसणारा मुक्तीचा–तुज तुरुंग मानस हा
त्याचा बंदी जो तू तो जू वाकवुनि मान सहा'[5]

हिंदुत्वातीत होअून तत्त्वज्ञानाच्या अुच्च स्तरावर विहार करणारे सावरकरांचे मन विशिष्ट ध्येयवादाने व्यवहारवादी बनते आणि आपल्या राष्ट्रनिष्ठेची

---

१. मा. जन्म. पृ. ७५, ७६. २. सा. क. पृ. १३०. ३. मा. जन्म पृ. ४०५.
४. सा. क. पृ. १३१. ५. रानफुले पृ. ११३.

आणि हिंदुत्वनिष्ठेची जाणीव करून देते. याच दृष्टीने 'अंतवंत अमे लोका:' या आध्यात्मिक तत्त्वाचा राजकीय किंवा राष्ट्रीय अर्थ ते लावतात आणि 'विश्वात आजवरि शाश्वत काय झाले ?' या कवितेतून 'मत्त, बलान्वित, गर्ववाही' अशा राज्यकर्त्यांना भीषण भविष्याची सूचना करतात.[१] 'सप्तर्षि' तान्यांवर पृथ्वीवरील कोणकोणती दृश्ये दिसतील याची कल्पना करताना 'मेक्सिको देशात हिंदंच्या वसाहती होत्या का आणि तेथे रामलीलेचे अुत्सव करीत असत ते खरे का हे पाहा' असे ते सांगतात.[२] 'सप्तर्षि'शी 'तत्त्ववाद' करतानाही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील ह्या निष्ठा कशा प्रभाव गाजवतात याची कल्पना यावरून येअू शकेल.

सावरकरांच्या तात्त्विक कवितांचा समारोप करताना पुढील काही निष्कर्ष हाती येतात. सावरकरांची तात्त्विक कविता ही संतकवींच्या गूढवादात्मक किंवा रहस्यवादात्मक कवितेसारखी आस्तिकतेच्या श्रद्धेतून निर्माण झालेली नाही. "Mysticism denotes that attitude of mind which involves a direct, immediate, first-hand, intuitive apprehension of God." ही जी गूढवादाची व्याख्या प्रा. रा. द. रानडे यांनी केली आहे[३] तिच्या कसोटीवर सावरकरांच्या कवितेवर गूढवादाची मुद्रा मारणे योग्य होणार नाही. राष्ट्रवादी निष्ठेतून ते देवाचा अर्थ देश असाच करतात. 'त्वत्सेवनीच गमली रघुवीरसेवा' असा देवभक्तीचा अर्थ ते मातृभूमीच्या सेवेच्या संदर्भात लावतात. प्रत्यक्ष देवाचा विचार ते बुद्धिनिष्ठेतून, राष्ट्रनिष्ठेतून करतात. 'गोमांतक' काव्यात त्यांनी देवासंबंधी केलेले अनेक अुल्लेख या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. 'देवहि दुबळ्यांचे असतील किती बळी' अशी देवाची कल्पना ते भक्तीपेक्षा सामर्थ्यवादावर अुभारतात.[४] रत्नागिरीच्या हिंदुसंघटनी कालखंडात तर त्यांनी देवावरही 'हिंदुजातीचा देव' असा शिक्का मारला.[५] तात्पर्य हेच की, सावरकरांची तत्त्वज्ञानात्मक कविता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या मुशीतूनच प्रकटलेली आहे.

काव्यातून केलेली अितिहासमीमांसा

'गोमांतक' खंडकाव्याच्या प्रस्तावनेत सावरकरांनी अितिहास व काव्यलेखन यासंबंधीची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सावरकर लिहितात- 'पोर्तुगीजांच्या वेळेपासून तो पेशवाअीतील पूर्ण भरभराटीच्या दिवसापर्यंत कोकणच्या राजकारणी घडामोडीतील मर्म विशद करण्याचा या काव्यात प्रयत्न

---

१. सा. क. पृ. ३४, ३५. २. रानफुले पृ. १२८. ३. Mysticism in Maharashtra p. 1. ४. गोमांतक पृ. १६. ५. सा. क. पृ. २००.

केला आहे. यातील महत्त्वाच्या अैतिहासिक घटना व अुल्लेख आपल्या व पोर्तुगीजांच्या अितिहासातील आधारास धरूनच केलेले आहेत. यद्यपि हे काव्यच आहे. तथापि म्हणून ते अितिहास नाही असे नाही. अितिहासाच्या पृष्ठभूमीवर कल्पनेची कुंचली घेअून कवितेने चित्रिलेले ते अेक चित्र आहे.''[1]

अैतिहासिक सत्याला धरून काव्यलेखन केल्याची ग्वाही येथे सावरकरांनी जरी दिलेली असली तरी प्रत्यक्षात काही अैतिहासिक पुरावे वेगळे सापडतात. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी अशा अनेक पुराव्यांचे अुल्लेख 'गोमांतक काव्याची अैतिहासिक पार्श्वभूमी' या लेखात केले आहेत.[2] यांपैकी पेशव्यांचे गोव्यातील स्वधर्म-रक्षण व स्वधर्म-स्वातंत्र्य यांकडील दुर्लक्ष्य आणि खुद्द पेशवाअीत शुद्धीकरण कार्याला पेशव्यांना झालेला विरोध हे पुरावे विशेष महत्त्वाचे आहेत.

सावरकरांच्या कवितेत अैतिहासिक सत्यावद्दल जे काही प्रमाद झालेले दिसतात ते केवळ कल्पनेच्या मिश्रणामुळे झालेले नसून अितिहासाकडे पाहण्याच्या सावरकरांच्या व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनामुळे झालेले आहेत असे आढळून येते. अितिहासाचा विशिष्ट अर्थ लावण्याच्या पद्धतीतून येथे सावरकरांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. 'हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सहा सोनेरी पाने', 'हिंदुपदपादशाही' व 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' या तीन अैतिहासिक ग्रंथांतून सावरकरांनी जी अितिहास-मीमांसा केली आहे तीच त्यांच्या अैतिहासिक कवितेत वृत्तबद्ध झाली आहे. या अितिहासमीमांसेत त्यांनी पुरुष-कर्तृत्व, वैदिक धर्म, परंपरा, संस्कृती व मातृभूमी यांचा अभिमान, शस्त्रबळाची अुपासना, धर्मविजयाचे धोरण, आत्यंतिक अहिंसा, जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृती अित्यादी तत्त्वांच्या आधारे भारतीय अितिहासाचा अर्थ अुलगडून दाखविलेला आहे.[3] 'गोमांतक' काव्यातील अैतिहासिक घटना त्यांनी याच तत्त्वानुसार निर्मिल्या आहेत. त्यात 'कृपाणकृपे'चे महत्त्व दाखविले आहे.[4] पतितपरावर्तनद्वारा धर्मविजयाचे धोरण व शुद्धीचा पुरस्कार केला आहे.[5] निनामीबाबाच्या रूपाने सद्गुणविकृती रंगविली आहे,[6] शंकरच्या व्यक्तिचित्रणातून पुरुषकर्तृत्वाची ओळख पटवून दिली आहे. हिंदुधर्म, संस्कृती, परंपरा, मातृभूमी यांच्याबद्दलचा अभिमान अनेक स्थळी व्यक्त करण्यात आलेला आहे. या संपूर्ण काव्यकथेचा विकास काव्यकलेच्या कसोटीवर न होता सावरकरांच्या अैतिहासिक तत्त्वांच्या आधारे होत गेला आहे, असेच तपासाअंती आढळून येते. तसेच येथे त्यांच्यातील अितिहास-

१. गोमांतक प्रस्तावना. २. सा. का. स. पृ. ६८ ते ८०. ३. वसंत सप्टेंबर १९३७, ले. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे. ४. गोमांतक पृ. ३५. ५. गोमांतक उत्तरार्ध. ६. गोमांतक पृ. ४३, ५३, ७४, ७५, ७७, ८२, ८७.

शास्त्रज्ञच केवळ जागा नाही तर त्यांच्यातील प्रचारकही तितकाच कार्यरत आहे. 'गोमांतक काव्य लिहिण्यात बॅ. सावरकरांची भूमिका कवीपेक्षा प्रचारकाचीच जास्त दिसते' हे प्रा. प्रियोळकर यांचे अुद्‌गार वरील विवेचनाचाच पाठपुरावा करतात.[1] 'अखिल-हिंदु-विजयध्वज-गीता'तही अैतिहासिक सत्यापेक्षा त्यातील स्वमतानुकूल प्रचारात्मक अर्थच सावरकरांनी प्रतिपादिलेला आहे. 'आपल्या मत-प्रतिपादनासाठी अितिहासाला थोपटून थापटून मुरड घालण्याच्या' सावरकरांच्या वृत्तीचे मूळ त्यांच्या अितिहासमीमांसेत सापडते.[2]

गद्याप्रमाणेच पद्यातही सावरकर अितिहासाचा तटस्थ, वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय स्वरूपात विचार करीत नाहीत. देशपरिस्थितीच्या, तात्कालिकाच्या संदर्भात अितिहासाचा विचार करून ते त्यातील स्फूर्तिदायक प्रसंगांना काव्यरूप देतात. 'सिंहगड' आणि 'बाजीप्रभू देशपांडे' यांचे पोवाडे त्यांनी ह्याच व्यक्तिनिष्ठ दृष्टीने लिहिले आहेत. त्यामुळे ह्या पोवाड्यांचा व त्यांच्या अितर अैतिहासिक कवितांचा समावेश अैतिहासिक काव्याअैवजी राष्ट्रीय काव्यात करावयास हवा. अैतिहासिक कविता आणि राष्ट्रीय कविता यांतील सूक्ष्म भेद येथे ध्यानी घेणे आवश्यक आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी हा फरक स्पष्ट करून सांगितला आहे. ते लिहितात, "देशभक्तीला पोषक अशा भावनांचा वा विचारांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने प्रचार करण्यावरच राष्ट्रीय कवितेचा प्राधान्याने भर असतो. त्यासाठी पुष्कळ वेळा अितिहासातील व्यक्तिविशेषांचा आणि प्रसंग-विशेषांचाही अुपयोग करण्यात येतो. शुद्ध अैतिहासिक कवितांची निर्मिती मात्र राष्ट्रीय संवर्धक अशा भावनांच्या वा विचारांच्या प्रचारापासून सर्वस्वी अलिप्त अशा भूमिकेवरून होअू शकते."[3]

सावरकरांनी आपली अैतिहासिक कविता तात्कालिकाच्या संदर्भात व देशभक्तीच्या, स्वातंत्र्यभावनेच्या प्रचारार्थ लिहिली. या मताचा पाठपुरावा अनेक टीकाकारांनी केलेला आहे. सावरकरांना अर्वाचीन शाहिरांत अग्रेसरत्वाचा मान श्री. साधुदास व श्री. य. न. केळकर या दोन्ही टीकाकारांनी दिला आहे आणि आपल्या मतांचे वेगवेगळे विश्लेषणही केले आहे. श्री. साधुदास लिहितात, "सारा भरतखंड हे आपले हिंदूंचे राष्ट्र आणि त्याचे स्वातंत्र्य हे आपले अभिप्रेत ध्येय, ही कल्पना अगदी अलीकडे प्रादुर्भूत झाली आणि या कल्पनेवर कवने रचणाऱ्या अर्वाचीन शाहिरांत अग्रेसरत्वाचा मान निर्विवाद सावरकरांचा आहे."[4] "सावरकरांनी पोवाडे रचले तेव्हा त्यांच्या डोळ्यांपुढे त्यांनी योजलेल्या कार्यासाठी लोकांत

---

१. सा. का. स. पृ. ८५. २. आ. नि. पृ. १०१. ३. आ. म. वा. अि. पृ. ४२५. ४. सा. का. स. पृ. २०.

चैतन्य आणून त्यांना कार्यप्रवेण करणे हाच हेतू होता," असे श्री. य. न. केळकर यांनी स्पष्टच सांगितले आहे.[1] अैतिहासिक पोवाड्यांच्या गुणविशेषांचे विश्लेषण सविस्तरपणे केल्यानंतर प्रा. भ. श्री. पंडित यांनी असा निष्कर्ष काढला आहे की; 'सावरकरांच्या पोवाड्यांत मराठेशाहीचा अितिहास नसून त्यांच्या स्वतःच्या काळाच्या अत्याचारी अिंग्रज सत्तेविरुद्धचा वीर-हुंकार आहे.'[2] 'सावरकरांचे पोवाडे हे त्यांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचे निदर्शक आहेत असा श्री. माडखोलकर यांचा अभिप्राय आहे.[3] पारतंत्र्यांविषयी कवीला लागलेली टोचणी किती तीव्र होती हे पोवाड्यांतील पुढील काही काव्यपंक्तींच्या आधारे प्रा. मालशे यांनी सांगितले आहे :

'घरात शिरला चोर तयांना मानुनिया राजा'
'शेणामध्ये वाडे बांधुनि नांदति शेणकिडे'
'कवणाची भाकरी वंधु हो कवणाची चाकरी?'
'स्वराज्य नाही स्वदेश नाही धिक् त्या देहाला'[4]

प्रा. शंकर वैद्य यांनी सावरकरांच्या पोवाड्यांचे त्यांच्या व्यक्तित्वाशी फार घनिष्ठ नाते जोडले आहे. ते लिहितात, "मारित हाणित छाटित रमला रणांगणामाजी' या सावरकरांच्या संग्रामप्रिय वृत्तीस, 'देशार्थ मरण ते जनन' या कर्तव्यासाठी वलिदानोत्सुक असलेल्या ध्येयवादी वृत्तीस आणि समाजाचा अुपहास करून त्याची अस्मिता जागी करण्यास येथे पूर्ण अवसर मिळाला आहे..... या पोवाड्याची ओळ न् ओळ आसूड मारताना हिसडावा तशी हिसडा देअून गेलेली आहे. सावरकरी व्यक्तित्वातले विद्युत्स्पंदन या पोवाड्यातून जाणवत राहते."[5]

काव्यविषयांची निवड

कवी आपल्या व्यक्तित्वानुरूप काव्यविषयाची निवड कसा करतो हे अिंग्लिश महाकवी मिल्टन याच्या अुदाहरणावरून आपण प्रस्तुत प्रवंधात अन्यत्र पाहिलेच आहे.[6] काव्यविषयांची निवड करताना सावरकरांनी ती दोन प्रकारांनी केली. प्रारंभी त्यांच्या मनावर प्रभाव होता तो महाराष्ट्राच्या अितिहासाचा. लहानपणी झोपाळ्यावर वसून जी गाणी सावरकर रचीत ती पेशव्यांविषयीची असत, अशी आठवण येसूवहिनींनी सांगितलेली आहे.[7] 'पेशव्यांची बखर' वाचून त्यातून 'श्रीमंत सवाअी माधवरावांचा रंग' हे गाणे सावरकरांना स्फुरले, हे

---

१. सा. का. स. पृ. ३५. २. सा. वि. द. पृ. १९. ३. प्रतिभा–डिसेंबर १९३५. ४. आ. नि. पृ. ८७. ५. सत्यकथा, मे १९६६. ६. सं. का. पं. पृ. २१८. ७. मा. आ. पृ. ३७.

येसूवहिनींच्या आठवणीवरून स्पष्ट होते.[१] महाराष्ट्राच्या पराक्रमी अितिहासापासून फक्त सावरकरांनाच स्फूर्ती मिळाली होती असे नाही. प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'राष्ट्रवादी कवींची परंपरा' वर्णन करताना बहुसंख्य कवींच्या स्फूर्तीचे निधान महाराष्ट्राच्या दोनशे-अडीचशे वर्षांचा पूर्वेतिहास कसा होता हे सविस्तरपणे सांगितले आहे.[२] राष्ट्रवादी कवींची स्फूर्तिस्थाने प्रारंभी जरी महाराष्ट्राच्या अितिहासातील असली तरी त्यांतील काहींची दृष्टी अधिक व्यापक झाली होती आणि 'महाराष्ट्राबाहेरील रजपूत व शीख यांच्या पराक्रमाचे पोवाडे हे त्यांच्या काव्यगायनाचे विषय झाले होते. अितकेच काय, पण भारताबाहेरील रोम, ग्रीस, अिटली, आयर्लंड अित्यादी राष्ट्रांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नात त्यांना प्रेरणेचे ऋण लाभले होते.'[३] सावरकरांचेही असेच झाले. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'सावरकरांची स्वातंत्र्यस्फूर्ती ही अंशतः भारताच्या अितिहासापासून व अंशतः मॅझिनीप्रभृती पाश्चात्य क्रांतिकारकांच्या तत्त्वज्ञानापासून घेतलेली होती.'[४] तसेच अितर राष्ट्रवादी कवींप्रमाणे टिळक-रानडे आदी तत्कालीन पुढाऱ्यांच्या राजकीय मतप्रणालीत व सार्वजनिक चळवळीत सावरकरांना स्फूर्तीचे स्फुल्लिंग आढळले. अितिहासाखेरीज अितर जे वाङ्मय सावरकर वाचीत त्यातूनही त्यांना काव्यरचनेच्या प्रेरणा मिळत होत्या. प्राचीन संस्कृत महाकाव्ये, मध्ययुगीन मराठी कविता आणि काही अिंग्रजी महाकाव्ये व स्फुट कविता यांच्या संस्कारांतून त्यांची प्रतिभा तल्लख होत होती.

सावरकरांनी किशोरावस्थेतील आपल्या कवितेचे विषय व बाह्यरूप अनुकरणानेच निवडले. ओव्या, फटके, पदे, लावण्या, आरत्या, श्लोक, पोवाडे, आर्या असे काव्यरचनेचे रूढ घाटच त्यांनी प्रारंभी हाताळले. या काळात मोरोपंत हे सावरकरांचे मुख्य स्फूर्तिस्थान होते. 'विनायक मयुरेश स्फूर्तिने गातो'[५] किंवा 'कविचा त्या भक्त पुरातन मी'[६] या साभिमानपूर्वक अुल्लेखावरून सावरकरांची प्रारंभीची काव्यरचना कोणत्या वळणावर चालली होती हे ध्यानी येते. त्यांच्या या काळातील कवितांच्या शीर्षकांना जोडलेले 'स्तोत्र', 'स्तवन', 'प्रशस्ति', 'वकिली' अित्यादी वैशिष्ट्यपूर्ण शब्द आणि कवितांच्या शेवटच्या चरणांतून साधलेले चित्रबंध व कविनामोल्लेख यांवरून हे अनुकरण कसे आपादमस्तक केले जात होते याची स्पष्ट कल्पना येते. पोवाड्यांच्या रचनेत–विशेषतः सवाअी माधवरावांच्या रंगाच्या पोवाड्यात किंवा फटक्यात–हे अनुकरण विषयापासून

---

१. मा. आ. पृ. ३८. २. आ. म. क. पृ. १८७–१८८. ३. आ. म. क. पृ. १८८. ४. मा. आ. क. पृ. ३२३–३२४. ५. सा. क. पृ. १३. ६. सा. क. पृ. १९१.

तो काही कल्पनासाम्यस्थळांपर्यंतही कसे झाले याचे विवेचन श्री. य. न. केळकर यांनी सोदाहरण केले आहे.[1]

परंतु हे अनुकरण प्रारंभीच्या अुमेदवारीच्या काळात होणे अपरिहार्य होते. सावरकरांच्या स्फूर्तीची मुळे ही त्यांच्या कवितेच्या वाह्यरूपावाबतच काही काळ परिणाम करू शकली. पुढे त्यांनी स्वीकारलेल्या ध्येयवादाबरोवर व त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासावरोवर कवितेचे अंतरंग म्हणजे विषय आणि त्या विषयाची आविष्काराची पद्धती मात्र स्वतंत्र राहिली.

सावरकरांची कविता देशाला वाहिलेली आहे. मातृभूमीच्या वैभवाचे समरसून वर्णन करणे हा तिचा ध्यास आहे. 'तूतेचि अर्पिलि नवी कविता रसाला। लेखाप्रती विषय तूचि अनन्य झाला'[2] असे त्यांनी मातृभूमीला अुद्देशून म्हटले आहे. कवितेने – म्हणजेच कवीने – आपले विषय निवडावे ते प्राप्त कर्तव्याला अनुसरून निवडावेत असे सावरकरांचे मत होते. 'मूर्ति दुजी ती' या काव्यात कवितादेवीला अुद्देशून ते म्हणतात–

'तू जरी अशी
सद्यःकर्तव्य मूर्ति मद्हृदापुढे
रुंडधरा, छिन्न मुंड, खंड-कृपाणा
अैशीची मूर्ति धरुनि, तूहि ये करू
कविते, या हृदयाचा पाठपुरावा'[3]

'श्रीवंदावीरा'च्या हौतात्म्याचा जयजयकार करताना' ते कवितेला सांगतात–

'त्या सुरात कविते। तनुतंतुवाद्य हे
माझेही बांध : राग तो निराश गा
धैर्याचा परम तशा।'[4]

तेव्हा प्राप्त कर्तव्यानुसार कवितेने आपले विषय निवडावेत असा सावरकरांचा दृष्टिकोन होता, 'श्रीमंत सवाअी माधवरावांचा रंग' ही त्यांची बहुधा अेकच कविता अशी आहे की, जीत राष्ट्रीय दृष्टीपेक्षा मुख्यतः अैतिहासिक दृष्टीच दिसून येते. पेशवाअीतील त्या वैभवशाली अैतिहासिक काळाचे वर्णन करणे अेवढाच हेतू या कवितेच्या रचनेमागे दिसून येतो. १८९४ साली लिहिलेली ही सावरकरांची पहिली कविता होती. पुढे १८९८ मध्ये सावरकरांनी देशाच्या

---

१. सा. का. स. पृ. ३७, ३८. २. सा. क. पृ. ७७. ३. सा. क. पृ. ११७.
४. सा. क. पृ. १२७.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देवीपुढे शपथ घेतली व तीमधून त्यांच्या ध्येयाची दिशा स्पष्ट झाली. त्या प्रतिज्ञेत पुढील शब्द फार महत्त्वाचे होते. 'देशाचे स्वातंत्र्य परत मिळविणे', त्यासाठी 'सशस्त्र क्रांतीचा केतू अुभारणे' आणि 'मारिता मारिता मरेतो झुंजणे' हेच ते शब्द होत. या ध्येयाच्या दिशेने त्यांच्या सर्व शक्ती विकसित होअू लागल्या. त्यांच्या कवितेचेच नव्हे तर सर्व साहित्याचेच विषय या ध्येयदृष्टीने निवडले जाअू लागले. प्रतिज्ञेतील अुपरिनिर्दिष्ट शब्दसंहतीप्रमाणे स्वातंत्र्य, शस्त्रसामर्थ्याचा पुरस्कार व हौतात्म्य ह्या तीन विषयांभोवतीच त्यांची कविता केंद्रित झाली. त्यांच्या वहुतेक कवितांतून याच विषयांना प्राधान्य मिळाले आहे. पण त्यातही त्यांनी अधिक भर दिला तो प्राप्त परिस्थितीतील कर्तव्यावर. ते कर्तव्य त्यांच्या दृष्टीने अेकच होते. ते म्हणजे चाफेकरादी हुतात्म्यांनी चेतविलेली शत्रुंजयवृत्ती यज्ञकुंडात समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणे' हे होय.[1] परंतु परिस्थित्यनुसार देशापुढे सांगण्यासारखा अेकच संदेश त्यांच्याजवळ होता– तो म्हणजे हौतात्म्य गाजविण्याचा. आपल्या आत्मचरित्रातून, विविध पत्रांतून, भाषणांतून, त्यांनी हौतात्म्य वृत्तीचाच मंत्रजागर केला. मदनलाल धिंग्रा यांच्या मुखातून त्यांनी हेच सांगितले की, 'The only lesson required in India at present is to learn how to die and the only way to teach it is by dying ourselves.'[2] 'तरुणांच्या दृष्टीसमोर असायला योग्य असे अुदात्त ध्येय आत्मयज्ञ करणेच होय' असे त्यांनी आपल्या पत्रांतून अनेकदा सांगितले आहे.[3] म्हणून सावरकरांनी कवितेसाठी जे विषय निवडले ते ह्या हौतात्म्यवृत्तीचा परिपोष करणारेच निवडले. प्रा. स. गं. मालशे यांनी म्हटल्याप्रमाणे 'हौतात्म्य हा त्यांच्या काव्याचा आत्मदोर' बनला.[4] हुतात्मे हे त्यांच्या कवितेचे विषय ठरले. चाफेकर, बाजी प्रभू, तानाजी, येशू ख्रिस्त, गुरुगोविंदसिंह, श्रीवंदावीर, भगतसिंग, राणा प्रताप, सत्तावनी क्रांतिवीर, चितोरयुवती या सर्व हुतात्म्यांचे त्यांनी गुणगान केले.[5] स्वतंत्रपणे तर हे विषय त्यांनी निवडलेच पण त्यांच्या प्रदीर्घ कवितेतून आणि खंडकाव्यांतून त्यांनी अशा हुतात्म्यांचीच चित्रे रंगविली. 'कमला' खंडकाव्यातील 'मुकुंद', 'मुकुल', 'कमला', 'प्रेमला' ही सारी पात्रे हौतात्म्यवृत्तीनेच राष्ट्रकार्यात अुडी घेतात. 'गोमांतका'तील मुख्य विषय पतितपरावर्तनाचा असला तरी त्यातील 'शंकर', 'लिली', 'रमा-माधव', 'पंतोजी' ह्या पात्रांचे हौतात्म्य त्यांना वाचकांच्या दृष्टीपुढे धगधगते ठेवावयाचे आहे. अशा रीतीने सावरकरांची कविता म्हणजे 'मराठीतील हौतात्म्याची कविता' ठरली आहे.

---

१. मा. आ. पृ. ८१. २. सा. च. पृ. २७३. ३. अंद. अं. पृ. ४, ४७, ५३. ४. आ. नि. पृ. १०१. ५. आ. नि. पृ. १०२.

अंदमानच्या कालखंडात सावरकरांचे वृत्त्यंतर झाले, ध्येयधोरणांत विशिष्ट बदल झाला आणि मग त्यांच्या कवितेचे विषयही बदलले. 'भरतभूमी'च्या वा 'भारती'च्या स्वतंत्रतेपेक्षा[1] 'हिंदुजातीच्या मुक्तते'चा घोष कवितेतून घुमू लागला.[2] 'हिंद सुंदरा' अशी ती मातृभूमी[3] 'आम्हां हिंदूंचा ती केवळ जीव की प्राण' ठरली.[4] रत्नागिरीच्या कालखंडात तर हिंदूंचे शुद्धिसंघटन, मंदिर-प्रवेश, पूर्वास्पृश्यांचा अुद्धार अित्यादी विषय सावरकरांच्या कवितेचे विषय बनले. वृत्ती बदलली म्हणून विषय बदलले आणि ही वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अेक अंगभूत घटक होती.

कवितेची सजावट

कवीच्या व्यक्तिमत्त्वानुसार कवितेचे केवळ विषयच निवडले जातात असे नाही, तर कवितेच्या सजावटीवरही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होतो. अेकाच विषयावरील दोन भिन्न व्यक्तिमत्त्वाच्या कवींच्या कविता तपासल्या तर सजावटीतील हा फरक चटकन जाणवतो. असा तुलनात्मक अभ्यास प्रा. दे. अ. दाभोळकर यांनी केला आहे. यासाठी त्यांनी 'वीर बंदा' ह्या अेकाच विषयावर रवींद्रनाथ टागोर आणि सावरकर यांच्या कविता निवडल्या आहेत.[5] प्रा. दाभोळकर यांनी या दोन्ही कवितांतील साम्यभेद वर्णन केला असून त्याची कारणमीमांसाही केली आहे. ते लिहितात, "जुलमी मोगल राजसत्तेच्या अन-न्वित छळापुढे शरण न जाता ज्या वीरवृत्तीने बंदा याने आपले मरण स्वीकारले ती वीरवृत्तीच या दोघांचाही काव्यविषय आहे. (पण) या दोन कवितांची आद्य स्फूर्तिस्थाने वेगवेगळी आहेत. (रवींद्रनाथांचे) 'बंदा वीर' हे अेका कविवर शाहिराचे वीरपूजन आहे. 'श्रीबंदावीर' हे अेका वीरवर कवीची धृतिसाधना आहे. रवींद्रनाथांची सारी रचना रेखीव व प्रमाणबद्ध आहे..... अुलट 'श्रीबंदावीर' हा अेक अनिरुद्ध खळखळणारा प्रवाह आहे. या प्रवाहाला द्वेषाची धार आहे, तिखट नाकाला येणारा जातीयतेचा दर्प आहे, पण त्याबरोबरच त्यात जिवंत जोमही पण आहे हे निश्चित.... ज्या कारणासाठी ही कविता सावरकरांनी रचली ती लक्षात घेता (बंदावीराच्या छळाच्या) भागालाच आपल्या कवितेत सावरकरांनी विशेष महत्त्व द्यावे हे साहजिकच आहे. त्यांना स्वत:च्या तितिक्षेसाठी त्या वीरस्मृतीचे कवच घालावयाचे होते. (पण) याच छळाचे रवींद्रनाथांनी केलेले वर्णन कितीतरी अधिक संयत आहे. (बंदावीराच्या छळाने) सारी सभा स्तब्ध-निश्चल झाली (असे वर्णन करून) जागरूक कलेचा अुत्कर्षबिंदू कवीने (रवींद्रनाथांनी) साधलेला आहे. परंतु

---

१. सा. क. पृ. २. २. सा. क. पृ. १०४. ३. सा. क. पृ. ६५. ४. सा. क. पृ. १८६. ५. नवभारत–जानेवारी १९५४.

सावरकरांच्या सावेश प्रतिभेला 'दर्शकजन मूदिल नयन' हे परिसमाप्तीचे स्थान म्हणून कधीच रुचले नसते. या हौतात्म्यामुळे जी जनजागृती झाली तिचे वर्णन करणे व त्या हौतात्म्याच्या स्मरणाने आज जी जनजागृती करता येणे शक्य आहे तिच्यासाठी प्रयत्नशील राहणे ही त्यांच्या (सावरकरांच्या) प्रतिभेची प्रतिज्ञा आहे. (वीरबंदाच्या बालकाच्या दर्शनाचे वर्णन करताना) 'प्रकाश योजना' आणि 'लक्ष्यकेंद्र' (Focus) यांत दोन कवींनी दाखविलेला भेद लक्षात घेण्याजोगा आहे.

"सावरकरांच्या साऱ्याच वाङ्मयात पराक्रमाची पूजा आहे आणि षंढ भीरुतेचा द्वेष आहे. वीरबंदा व त्याचे वीर आपली आहुती देत असताना ज्या निमूट, कायर कुतूहलाने सारा हिंदुसमाज त्यांची ती विटंबना पाहात अुभा होता, त्याच्या-विषयी अत्यंत जळजळीत असे अुद्गार सावरकरांनी काढले आंहेत. (राजमार्गा-वरील गर्दीच्या दृश्याच्या वर्णनात) शेवटी 'सभा हल निःस्तब्ध' अेवढेच सांगून प्रेक्षकगणांच्या कायरवृत्तीवर रवींद्रनाथ पडदा सरकवितात. परंतु या दृश्याने सावरकरांच्या अंगाची लाही लाही होते..... याचे कारण या दोन कवींच्या रक्ताचा धर्मच वेगळा आहे हे असावे. रवीन्द्रनाथांची मुख्य प्रेरणा कलेची आहे. सावरकरांची क्रांतीची आहे."

कविवर्य मोरोपंतांची 'गंगावकिली' व सावरकरांची 'गोदावकिली' यांची रचना अेकाच वृत्तात व समान विषयावर जरी असली तरी सावरकरांच्या पृथगात्म व्यक्तित्वाचा ठसा त्यांच्या कवितेवर स्पष्टपणे अुमटला आहे. मोरोपंतांनी देशस्थितीचा अुल्लेख सर्व कवितेत कोठेच केलेला नाही. फक्त पेशव्यांच्या पदरचे काही सरदार, नाना फडणीस, आणि खुद्द सवाअी माधवराव पेशवे यांचे अुल्लेख काही आर्यांतून आलेले आहेत.[1] अुलट सावरकरांच्या 'गोदावकिली'त हीन झालेल्या भरतखंडाचा, 'दुःसह परवशतेचा', 'भरत-खंडाच्या तारणासाठी गाव जुटीने अुठण्याचा', 'ह्या हस्ते देशशत्रू दंडण्याचा' इत्यादी अुल्लेख अनेक ठिकाणी आलेले आहेत. कवीचे लक्ष्यकेंद्र कोणते व त्याने कशावर भर (Emphasis) दिलेला आहे यावरून कवीचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. सावरकरांचे येथे असेच झाले आहे.

व्यक्तिमत्त्वानुरूप कवितांचे पर्यवसान

सावरकरांमधला समाजसुधारक, क्रांतिकारक, तत्त्वज्ञानी, विचारवंत, हिंदुत्वनिष्ठ प्रचारक आणि कवी यांमध्ये अेक प्रकारचे विघटन होत असे आणि

---

१. मोरोपंतकृत प्रकरणे – भाग १, पृ. २३९, २४०.

त्यांच्यातल्या कवीवर अितर भूमिका मात करीत असत. त्यामुळे त्यांच्यातील जातिवंत कलावंताने अेखाद्या विषयाचे सौंदर्यदृष्टीने जरी ग्रहण केले, तरी कलाकृतीच्या अखेरीपर्यंत त्यांचे मन त्या कलात्मक पातळीवर राहू शकत नसे; आणि मग त्या कलाकृतीचा विकास व तिचे पर्यवसान कलानिष्ठेला धरून होण्याअैवजी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अन्य कलाबाह्य प्रबळ निष्ठांच्या हुकमतीखाली होत असे. 'सायंघंटा' या कवितेत घंटेचा अेक अेक गर्ज मातृभूच्या दास्यमुक्तीच्या सुदिनास सन्निध आणतो येथपर्यंत सावरकरांनी मूळ कल्पना सुसंगतपणे फुलविली आहे. परंतु येथेच त्यांच्यातील प्रचारक जागा होतो आणि प्रश्नालंकाराने विचारू लागतो–

'कवण जगे ? अहह जरी हिंदची मरे ।
कवण मरे ? हृष्ट जरी हिंद जगे रे ।[1]

सावरकरांनी काढलेल्या ह्या सिद्धान्ताबद्दल प्रा. श्री. शं. खानवेलकर यांनी असेच म्हटले आहे की, हा सिद्धान्त काव्यामधून निघत नाही. तो बुद्धया, ओढूनताणून आणलेला आहे असे वाटते.[2] 'मूर्ति दुजी ती' या कवितेचा पूर्वार्ध म्हणजे सावरकरांच्या कलात्मक वृत्तीचा मूर्तिमंत नमुना आहे. परंतु पूर्वार्धाच्या अखेरीस आलेल्या श्रीवंदाच्या अुल्लेखाबरोबर त्यांच्यातील हिंदुत्वनिष्ठ प्रचारक जागा होतो; आणि मग कवितेचे पर्यवसान त्या हिंदुहुतात्म्याच्या अश्वत्थ-तरूची आपण डहाळी आहोत ह्या अस्मितेच्या वर्णनात होते.[3] तेथेही पुन्हा विविध निष्ठांची गल्लत होत आहेसे वाटते. कारण सबंध अुत्तरार्धात कवितेला चढलेली जातीयतेची धार 'मातृभूच्या मुक्तते' च्या विचारात आणि 'मनुजमंगला'च्या चिंतनात विलीन होते.

आत्मलक्षित्वाच्या दोषापासून अपवादभूत म्हणून अलिप्त राहिलेली आणि कालिदासीय कवितेची आठवण करून देणारी सावरकरांची कविता म्हणजे 'आकांक्षा' होय. परंतु या सुंदर कलाकृतीच्या पर्यवसानस्थळी सावरकर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा रंग चढवितात आणि त्या गरुडकन्येच्या मुखातून पुढील चरण वदवितात–

'मूर्तिमतीच महत्त्वाकांक्षा मी ध्येय तेच तू महता'[4]

काव्याचा कलात्मक विकास करताना कलात्मक पातळीवर सतत राहून सावरकर कलाकृती का निर्माण करू शकत नाहीत, याचे अुत्तर शोधण्याचा प्रयत्न प्रा. स. गं. मालशे यांनी केला आहे. प्रा. मालशे लिहितात, "आशयाच्या दृष्टीने सावरकर

---

१. सा. क. पृ. १०४. २. सा. का. स. पृ. ११५. ३. सा. क. पृ. १२८.
४. सा. क. पृ. १५१.

आपल्या सर्व कवितेत आत्मलक्षीच (Subjective) राहिले. . . .त्यांची प्रतिभा अतिआत्मलक्षी असल्यामुळे कलावंताला अवश्य असणारी अलिप्तता (Artistic Detachment) त्यांच्या ठायी कमी होती."[१]

अनुभूती घेण्याची पद्धती

सावरकरांची अनुभूती घेण्याची पद्धती आणि त्यांनी केलेला रसाविष्कार यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी फार निकट संबंध आहे. सावरकरांची कविता प्रत्यक्षानुभवातून स्फुरलेली असल्यामुळे त्यांची अनुभूती ही 'औरस अनुभूती' होती. 'कवितेसाठी त्यांना क्रांतिकारकांचे, वीरांचे, शूरांचे अनुभव अितर कवींप्रमाणे दत्तक घ्यावे लागले नाहीत', हे डॉ. वाटवे यांचे अुद्‌गार या संदर्भात अत्यंत यथार्थ वाटतात. सावरकरांनी ज्या काळात कविता लिहिली त्या काळातील कवितेत 'अंत:करणाचा अुद्‌गार' असे फारच थोडया कवितांसंबंधी वर्णन करता येअील. त्या काळातील कवींच्या अनुभूतीला फार मर्यादा पडत असत. आणि जी अनुभूती काव्यातून प्रकट होअी ती प्राय: अिंग्रजी काव्यवाचनातून आत्मसात केलेली असे. व्यक्तिगत अनुभूतीचे स्वरूपही फार ढोबळ होते. त्या अनुभूतीतही कृत्रिमता असे. व्यक्ती म्हणून अनुभव घेण्यापेक्षा कवी म्हणून तो अनुभव घेतला जाअी. जीवनातून कविता स्फुरावी याअैवजी कवितेसाठी कवींनी अुरावे असे विचित्र चित्र दिसत असे. पण सावरकरांच्या कवितेत–विशेषत: त्यांच्या राष्ट्रीय कवितेत – जे अनुभवविश्व प्रकट झाले आहे ते त्यांच्या जीवनविश्वाची साक्षात प्रतिकृती आहे. याचे कारण सावरकरांच्या पुढील शब्दांत सापडू शकेल. "माझे जीवन त्याच्या अगदी जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशी संबद्ध झालेले आहे. अितकेच नव्हे, तर पुढे पुढे त्या राष्ट्रीय जीवनाचा ते माझे व्यक्तिजीवन अेक प्रमुख आणि परिणामकारक घटक होत आले आहे."[२] जीवनाच्या जाणत्या आरंभापासून झालेली ही जाणीव 'मरणोन्मुख शय्येवर' पडल्यावरही सावरकरांना होती. म्हणून त्या कवितेत त्यांनी म्हटले आहे–

'धन्य आणि ते
ध्येय महत, देअी जे जीवनाप्रती
सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जे आयु:कालाते, पूत चरित्रा'[३]

---

१. आ. नि. पृ. ९४, ९५. २. मा. आ. पृ. ५. ३. सा. क. पृ. १६१.

"सावरकरांच्या या अुत्कट ध्येयवादित्वामुळे त्यांच्या वाङमयातील अनुभूती फार मोठी आहे.....अभिजात प्रतिभेच्या साहाय्याने आपल्या अनुभूतीचा पुनःप्रत्यय ते लोकांना देअू शकले."[१]

विशिष्ट रंगाची काच सप्तरंगात्मक प्रकाशातील विशिष्ट रंगच जसा शोषून घेते तशीच पद्धती सावरकरांची विविध अनुभूती घेण्यामध्ये होती. प्रणयानुभूती ही जीवनातील अत्यंत तरल व नाजुक अनुभूती होय. पण तिचा अनुभव घेतानाही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील ठराविक रंग तिच्यात मिसळत. राष्ट्रास्तव होणाऱ्या रणघाअीत प्रेमाच्या 'विरहाच्या व्याकुळ वेली' वेलण्यात त्यांची प्रेमकविता रंगते.[२] 'कमला' आणि 'विरहोच्छ्वास' या खंडकाव्यांतील प्रेमरसात सावरकरांच्या ध्येयवादित्वाचे, हौतात्म्यवृत्तीचे, कर्तव्यभावनेचे रंग मिसळले आहेत. 'कमले'तील मुकुंद-कमला यांच्या संभोग-शृंगारातही हिंदूंच्या राष्ट्रीय परंपरेच्या पुनर्जन्माचीच चित्रं त्यांनी रंगविली आहेत.[३] 'देवकार्यी महामुखी' प्रज्वलित झालेल्या आगीत प्रियसखीला फेकून प्रेमसेजेचा निरोप घेण्याचे दृश्यच त्यांना अधिक विलोभनीय वाटते.[४] 'विरहोच्छ्वासा'तील प्रणय भावना ही हिंदुपदपादशाही,[५] कर्तव्य आणि प्रीती यांच्यातील संघर्ष,[६] कर्तव्याच्या आज्ञेत वागणारी प्रीती[७] ह्या साऱ्या विषयांनी रंगलेली आहे. विशुद्ध प्रणयानुभूतीचे दर्शन त्यांच्या कवितेत होअूच शकत नाही. कारण प्रणयभावनेचे जीवनातील स्थान हे राष्ट्रकर्तव्याच्या खालच्या पातळीवर असावे असे त्यांचे मत होते. "दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून आल्यावर पहिले बाजीरावही मस्तानीच्या अंतःपुरात अेखादे पान खाताना आढळत" हे त्यांनी दिलेले अुदाहरण त्यांचा प्रेमविषयक दृष्टिकोन दर्शविते. जी गोष्ट प्रणयभावनेची तीच वत्सलभावनेची. 'प्रभाकरास' कवितेत त्यांच्यातला सहृदय पिता पुत्रमृत्यूने हळहळूनच केवळ थांबत नाही, तर पुत्रवियोगाचा हा अनुभव त्यांच्या हौतात्म्यवृत्तीचे रंग घेअूनच प्रकट होतो.

कवितेतील रसाविष्कार

सावरकरांनी कवितेतून केलेल्या रसाविष्काराचा विचार करताना डॉ. वाटवे यांनी केलेल्या अेका विधानाचा निर्देश करावयास हवा. डॉ. वाटवे लिहितात, "रसाविष्कारात कवीचे व्यक्तिमत्त्व फारच चांगले व्यक्त होते....

---

१. सा. द. पृ. २३९. २. सा. क. पृ. २०४. ३. कमला पृ. ३६–३७. ४. रानफुले पृ. ५७, ७१. ५. रानफुले पृ. ६२, ६३. ६. रानफुले पृ. ६३, ६४, ६५. ७. स. सा. वा. खंड ४ – पृ. ४८८.

माणसांचे विचार अेकरूप असतात. पण त्यांच्या भावनात्मक प्रतिक्रिया मात्र भिन्न होतात. त्यामुळे रसाविष्कारात कवीचे वैशिष्ट्य दिसून येते. त्यातून कवीने आपला काव्यविषय खास जिव्हाळ्याचा व आपल्या अनुभवाचे सार व्यक्त करणारा असाच निवडला असला तर तो त्यात जास्तीत जास्त रमतो व वाचकांस रंगवितो. यालाच रसात्मकता म्हणतात."[१]

सावरकरांनी आपल्या कवितेचे विषय आपल्या जिव्हाळ्याचे व अनुभवाचे सार व्यक्त करणारे कसे निवडले आहेत हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. 'स्वतः-च्याच अेका कवितेत म्हटल्याप्रमाणे सावरकरांनी 'नाना रस चाखियले' असले तरी त्यांच्या कवितेत वीर रसाच्याच घरी अन्य रस 'पाहुणेरा' आल्याचे आढ-ळून येते. त्यांच्या कवितेत वीररसाला यजमानाचे हे स्थान मिळाल्याचे कारण त्यांच्या व्यक्तित्वातील स्वयंप्रभुतेत आहे असे डॉ. वाटवे यांना वाटते.[२] ते पुढे लिहितात, "भवभूतीच्या अुत्तररामचरित्रातील अेकच करुण रस अितर रसांना आत्मसात करून टाकतो, तसा सावरकरी काव्यातील वीररस अितर सर्व रसांना आपल्यात सामील करून घेतो."[३]

डॉ. वाटवे यांच्याप्रमाणेच अन्य काही टीकाकारांनी सावरकरांच्या कविते-तील रसाविष्कारासंबंधी विविध मते व्यक्त केली आहेत. सावरकरांच्या कविते-तील करुणरस हा पुष्कळदा भयानकात व रौद्र रस पुष्कळदा बीभत्सात पर्यवसित होतो असे श्री. माडखोलकर यांना वाटते.[४] हौतात्म्याची भूमिका वठविण्यासाठी सावरकरांनी करुण व वीर हे रस अत्यंत प्रभावी रीतीने वापरले आहेत हे विधान श्री. भा. कृ. केळकर यांनी सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रमुख मूलद्रव्याच्या संदर्भातच केले आहे.[५] प्रा. भ. श्री. पंडित यांनी सावरकरांच्या करुणरसात्मक गीतांचा विचार करताना त्या रसाचे पर्यवसान आर्ततेत न होता सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वा-तील दुर्दम्य आशावादी वृत्तीच्या दर्शनात कसे होते हे सांगितले आहे.[६] सावरकरांच्या कवितेतील पात्रगत रस व रसिकगत रस असा तुलनात्मक विचार करून प्रा. मालशे यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, 'कमला' काव्यात पात्रगत वीररस असला, तरी रसिकगत करुणरसच आहे. हुतात्म्याची छाती वीरासारखी अुंचावलेली दिसली, तरी कारुण्याचे कढच रसिक हृदयाची कालवाकालव करतात.[७]

सावरकरांच्या कवितेत वीर आणि करुण रसांचाच अुत्कर्ष साधलेला आहे ही गोष्ट वरील मतप्रदर्शनातून सिद्ध होते. संघर्ष आणि संग्राम हीच सावरकरांच्या

---

१. सं. का. पं. पृ. २१४. २. केसरी–२७ मे १९५८. ३. केसरी–२७ मे १९५८.
४. प्रतिभा–डिसेंबर १९६५. ५. सा. द. पृ. २६१. ६. आ. म. क. पृ. १९९.
७. आ. नि. पृ. १०२.

आक्रमक, झुंजार, विजिगीषू वृत्तीची प्रेरणा होती. 'आघात आणि प्रत्याघात हे तिचे स्पंदन होते.' सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या संदर्भात वीररसाच्या स्थायी भावाचे विवेचन केले तर सावरकरांच्या कवितेत वीररसच अुत्कर्षाप्रत का पोहोचला याचे कारण सापडू शकेल. वीररसनिर्मितीसंबंधी डॉ. के. ना. वाटवे यांनी केलेला विमर्श येथे अुल्लेखनीय आहे. डॉ. वाटवे लिहितात, ... "क्रोधा'अैवजी 'अमर्ष' हा (वीररसाचा) स्थायिभाव अधिक योग्य मानण्यात आला असून क्रोधस्थानी त्याचीच योजना केली आहे. 'प्रतिकूल व्यक्तीच्या ठिकाणी कठोर पणा व्यक्त करणे'[1] (प्रतिकूलेषु तैक्ष्ण्यस्य प्रबोधः क्रोधसंज्ञितः) असे क्रोधाचे व 'क्रोधच पुष्कळ वेळा स्थिर झाला तर तो अमर्ष होय' (कोप अेव स्थिरतरो ह्यमर्ष अिति कथ्यते।) किंवा 'अपमान झाला असता स्वाभिमान जागृत होणे' (अधिक्षेपापमानादेरमर्षोऽभिनिविष्टता।) असे अमर्षाचे लक्षण संस्कृत साहित्यात देतात. युद्धप्रवृत्तीची सहचरभावना क्रोध ही आहे हे खरे असले तरी युद्धप्रवृत्तीचा अुगमही प्रतिकारभावनेत म्हणजे अनिष्ट गोष्ट सहन न करण्याच्या वृत्तीत आहे. 'अमर्ष' शब्दात 'सहन न करणे' हाच धात्वर्थ आहे. शिवाय क्रोधापेक्षा ही अमर्षाची भावना व्यापक व स्थिर असल्याने तीच वीररसाचा स्थायिभाव मानली आहे."

सावरकरांची बहुतेक कविता देशधर्मावर झालेल्या अत्याचारातून, हिंदुत्वाच्या अपमानातून स्फुरलेली आहे. त्यांच्या काव्यनिर्मितीची मीमांसा करताना प्रा. भ. श्री. पंडित यांनी म्हटले आहे की, 'अन्याय, मग तो कोणताही असो, त्याच्या चरकात पिळल्या जाणाऱ्या दैवहतांविषयी तिला (त्यांच्या जाज्वल्य विषिगीषू वृत्तीला) अमाप सहानुभूती आहे आणि बलोद्धतांविषयी विलक्षण तिरस्कृती आहे. पतित विधवा, दलित अस्पृश्य, धर्मांतरित ज्ञातिबांधव आणि परतंत्र देशबांधव हे सारे तिच्या अुदार व विशाल दृष्टीत सामावले आहेत. त्या साऱ्यांचा अुद्धार हे तिचे ब्रीद आहे."[2] सावरकरांच्या कवितेतील करुण-वीर रसांच्या आविष्काराचा संबंध त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी पोहोचतो तो असा:-

कल्पकता व काव्यालंकार

कल्पकता व अलंकार या दोन्ही काव्यगुणांचा संबंध कवीच्या व्यक्तिमत्त्वाशीच आहे. कल्पकतेला खरी व्यापकता व पल्लेदारपणा कवीच्या विस्तृत अनुभवाने येतो. म्हणजे अनुभव हाच कल्पनेचा आधार आहे. अुत्पादक कल्पनाशक्ती

---

१. रसविमर्श पृ. ३११–३१२. २. सा. वि. द. पृ. १३.

(Creative Imagination) संयोजक कल्पनाशक्ती (Associative Imagination) आणि नवार्थशोधक कल्पनाशक्ती (Interpretative Imagination) या कल्पनाशक्तीच्या तीन प्रकारांपैकी तिसऱ्या प्रकारच्या कल्पनाशक्तीद्वारा कवीचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यक्त होते. सावरकरांची प्रतिभा निसर्गतःच पल्लेदार होती. सौंदर्यापेक्षा भव्यतेचे आकर्षण तिला अधिक होते.[1] प्राचीन साहित्याचे गाढ परिशीलन आणि विश्वातील ऐश्वर्याचे रसिक चिंतन यांनी ती प्रभावित झाली होती.[2] अशा प्रतिभेवर त्यांची कल्पकता पोसलेली होती. अनेक टीकाकारांनी तिचे हे विशिष्ट गुण पाहून तिला अभिजात, लोकोत्तर, अलौकिक, भव्य, विशाल तरल, अुद्दीपक अित्यादी विशेषणे लाविली आहेत.

ज्या अनुभवांचा आधार सावरकरांच्या कल्पकतेला होता ते त्यांचे अनुभवविश्व फार व्यापक होते. 'मरणोन्मुख मृत्युशय्येवर' या कवितेत त्यांनी आपण किती 'कटिबंधस्पर्श' अनुभवले यांचे चित्र रंगविले आहे. त्यांनी लिहिले आहे–

'परिसले किती
स्वर शत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कंठातिल–आणि मृत्यूच्या
शतकठोर कंठातिल घोर लागल्या;
नाना जन, जानपदे, जातिविभिन्ना
देश किती दृश्ये ती, भूमिच्या महा–
संग्रहालयात परिभ्रमत पाहिली"[3]

या अनुभवांमुळे सागर, जंगलातले सृष्टीचे करुणभीषण स्वरूप, जीवसृष्टीची स्वभावनग्नता, बंदीजीवनातील दृश्ये– ह्या साऱ्या गोष्टी सावरकरांच्या कल्पकतेने प्रत्ययकारी आस्वाद्यतेच्या कक्षेत आणल्या आहेत.

कल्पकतेच्या साहाय्याने सावरकर अेखाद्या अनुभवाचा वा काव्यविषयाचा जो नवीन अर्थ लावतात त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व विशेषेकरून प्रकट होते. 'सायंघंटे'चा अर्थ त्यांच्या सहतपी वंद्याने स्वतःच्या मुक्ततेपुरताच व मुक्ततेनंतरच्या सुखी सांसारिक जीवनाशी निगडित असा लावला. पण सावरकरांना मात्र त्या घंटेचा अेक अेक गर्जं हिंदुजातीच्या मुक्ततेचा सुदिन जवळ आणीत आहे असे वाटले. अितकेच नव्हे तर 'मुक्त तिचे जीवन की तेच आमुचे' अशी समष्टीची व्यापक जाणीव त्यांना झाली.[4] यंत्रबळाचा पुरस्कार करणाऱ्या त्यांच्या

---

१. साहित्य–मे १९४९. २. प्रतिभा–डिसेंबर १९३५. ३. सा. क. पृ. १६१, १६२. ४. सा. क. पृ. १०४.

विज्ञानवादी प्रवृत्तीला त्या वंदीगृहरूपी पेटीत यातनांच्या दिवसांच्या नाण्यांपैकी अेक दिनार पडला अशी पावती देणारा यांत्रिक प्रतिध्वनीच त्या 'सायंघंटे'चा तो नाद वाटत असे.[१] 'सागरास' या कवितेत अेका आचमनात सागर पिणाऱ्या अगस्तीची कल्पना त्यांना सुचली, ती सागरावर स्वामित्व मिरविणाऱ्या आंग्ल-भूमीला प्रतिशह देण्यासाठी.[२] ही कल्पना मूलतः पौराणिक असली तरी ती स्फुरली मात्र राष्ट्रीय अस्मितेतून. 'सांत्वन' कवितेतील गजेंद्राची व त्याने स्वमुक्तते-साठी भक्तिभावाने अर्पण केलेल्या कमलाची कल्पना त्यांना भारताच्या पारतंत्र्य-मुक्तीच्या व आपल्या वंशाच्या हौतात्म्यवृत्तीच्या ध्यासातून सुचली.[३] 'सप्तर्षि' कवितेच्या अुत्तरार्धातील वहुतेक कल्पनाचित्रे त्यांच्या वुद्धिवादातून व विज्ञान-निष्ठेतून प्रस्फुरित झाली आहेत.

सावरकरांच्या संग्रामप्रिय वृत्तीतून, वीरवृत्तीतून काही कल्पना अवतरतात. 'कमला' काव्यातील वागेचे वर्णन सावरकरांनी फुलांसारख्या नाजूक शब्दांत केले आहे. परंतु त्या वागेतील विविध लतावृक्षांवर, पुष्पांवर त्यांना ज्या अुत्प्रेक्षा सुचतात, त्यांतून कधीकधी त्यांची वीरवृत्ती खड्गाच्या पात्याप्रमाणे मधूनच चमकते. 'वागेतील शेवरीचे वर्णन करताना त्या पहारा करणाऱ्या शस्त्र-धारी स्त्रिया आहेत असे त्यांना वाटते.[४] शेवरीच्या हिरव्या शेंगा व त्यांना लगड-णारी लाल फुले म्हणजे पाचूंची चौफुले मुठीवर जडविलेल्या तरवारीच त्यांना वाटतात.[५] निशिगंधाच्या फुलावर त्यांनी पुढील कल्पना केली आहे–

'फूल ह्या निशिगंधाचे । हे अधीरविते हृदे
कामसेना पुरोगामी रौप्यशृंगचि काय ते ।'[६]

'गोमांतक' काव्यात भार्गववासियांच्या छळाची रात्र संपताच तिच्यातून दिवस अुगवला तो कसा ? त्या पीडद रात्रीहूनही घोर ! सावरकरांची कल्पकता चित्र रंगविते ते कोशातून बाहेर पडलेल्या तीक्ष्ण खड्गाचे ![७] सिंहगड घेण्यासाठी धाव घेतलेला तानाजी म्हणजे 'शिवहस्तातुनि निसटलेला तीर'च होय असे सावरकरांना वाटते;[८] आणि गड चढून येण्यासाठी बांधलेला दोर सूर्याजीने तोडल्याचे सांगताना सावरकरांची संग्रामप्रिय वृत्ती कल्पना करते की, 'तो दोर मघाचि लढोनिया मेला.'[९] पावनखिंडीतील शत्रूवर तुटून पडणारा बाजीप्रभू म्हणजे खिंडरूपी तोफेतून सुटणारा गोळाच होय असे चित्र त्यांची कल्पना रंगविते.[१०]

---

१. सा. क. पृ. १०३. २. सा. क. पृ. ७२. ३. सा. क. पृ. ७३. ४. कमला पृ. १. ५. कमला पृ. २. ६. कमला पृ. ६. ७. गोमांतक पृ. ६०. ८. सिंहगड पृ. ५. ९. सिंहगड पृ. ९. १० सा. क. पृ. ५५.

अलंकारांचा संबंध कवीच्या व्यक्तिमत्त्वाशी कसा पोहोचतो याचे विश्लेषण डॉ. वाटवे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे : "विचाराच्या किंवा कल्पनेच्या मूळ कंदातूनच अलंकाराचा घुमारा फुटतो व भावनेशी संबद्ध होऊन तो पालवतो. त्यामुळे अलंकारांचा संबंध कवीच्या मन:स्थितीशी आहे.... सादृश्यगर्भ किंवा अितर अलंकार ह्यांचा कवीच्या विचारप्रक्रियेशी व भावनांशीही निकटचा संबंध असल्याने त्याने योजलेले अलंकार हे त्याच्या अंतरंगात डोकावून पाहण्याचे अेक सुंदर गवाक्ष आहे. म्हणून अलंकारांचा रसाशी संबंध आहे, असे म्हणावयाचे व म्हणून ज्या अलंकाराचा रसाशी संबंध नाही तो वापरू नये असा नियम करावयाचा."[१]

सावरकरांच्या कवितेतील वीररस हा अितर सर्व रसांना कसा आत्मसात करतो हे आपण रसाविष्काराचा विचार करताना पाहिले आहे. सावरकरांच्या कवितेतील सर्व अलंकारांचे अलंकारशास्त्रदृष्ट्या विवेचन येथे अभिप्रेत नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार वीररसपरिपोषक अशा अुपमानांची किंवा प्रतीकांची निवड ते कशी करतात अेवढेच येथे दिग्दर्शित करावयाचे आहे. वीरवृत्ती आणि हौतात्म्य यांतूनच कवितेतील अुपमानांची योजना ते करतात. यासाठी वैश्वानर, हुताशन, दीप्तानल, दावानल, अग्निकुंड, यज्ञागार, स्थंडिल, रणयज्ञाग्नी, सतीचे वाण, हवी, पूर्णाहुती, फूल, यांसारख्या अुपमानांचा वा प्रतीकांचा अुपयोग ते करतात.[१] बाजीप्रभू त्यांना 'प्रदीप्त वैश्वानर' वाटतो[२] स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रज्वलित झालेल्या यज्ञकुंडात 'पहिल्या हवीचा मान' आपण मिळविला याचा त्यांना अभिमान वाटतो.[३] हुताशनाला भक्ष्य होण्यासाठी कोण सिद्ध आहे, असे प्रभू रघूत्तमाने आमंत्रण सोडताच 'दिव्यार्थ अमुचे कुल सज्ज आहे' असा प्रतिसाद ते देतात.[४] मातृ-भूमीच्या स्थंडिलावर सर्वस्व अर्पण करून आपण कृतार्थ झालो अशी समाधानाची भावना त्यांच्या ठायी आहे.[५] या हौतात्म्य भावनेतूनच 'विस्तवातल्या राजपुतींचे हास्य' त्यांना दिसू शकते.[६] 'नवरात्रीचा नवकाल' संपताच व 'सुमनमाला' समर्पण होताच 'विजयालक्ष्मी' प्रकटेल असा विश्वास त्यांना वाटतो.[७]

'बलिदानाची ही नवरात्रि संपता
पूर्णाहुति पडुनि शक्ति-होम-हुताशी
जै विजयादशमीला प्रज्वलोज्ज्वला
त्या ज्वाला-मालीतुनि तृप्त चंडिच्या
होअिल की मुकुट दिव्य-दीप्त आमुचा
ग्रहणमुक्तसूर्यासम प्रकट पुनरपि'

---

१. रसविमर्श पृ. ३७१–३७२. २. सा. क. पृ. ५०. ३. सा. क. पृ. ७६–७७.
४. सा. क. पृ. ७७ ५. सा. क. पृ. ७७–७८. ६. सा. क. पृ. ७८.
७. सा. क. पृ. ७४.

अशी हौतात्म्यावर आधारलेली विजिगीषू वृत्ती ते या दीर्घ रूपकातून प्रकट करतात.[१] भारतमातेच्या समरबाष्परथकक्षातील अग्निप्रेरक कक्षात अिंधन म्हणून जळण्याचे कर्तव्य आपणांस करावे लागल्याबद्दल त्यांना आनंद वाटतो.[२] भारतमातेच्या यज्ञागारातील यज्ञपूजनाच्या वेळी 'दहनातील कळी' होअून आत्माहुती देण्यात त्यांना जीवनाची कृतकृत्यता वाटते.[३] केवळ स्वत:चेच जीवन यज्ञात आहुती दिलेल्या फुलाच्या प्रतीकाने ते रंगवितात असे नाही. त्यांच्या कवितेतील पात्रांचे जीवनही ते ह्या प्रतीकाने रेखाटतात. श्रीवंदावीराच्या मुलाच्या आत्माहुतीचा प्रसंग वर्णन करताना ते लिहितात–

'वीरसुत श्रीबंदा वीरवराचा
निज तनुच्या नवनालावरुनि खुडुनिया
वाहुनि दे हिंदु-धर्म-मंगलार्थ की
समर-चंडिका-चरण-स्थंडिलावरी
निजसुंदर मुखमंडल कमलकुसुमसे ।'[४]

'कमला' काव्यात समरांगणावर जाणारा मुकुल कमलेचे वर्णन करताना म्हणतो–

'फेकावे ते कसे आगीमधेंचि कमला असे ।'

त्यावर लगेच कमलेचा पती मुकुंद अुत्तरतो–

'आगीतही असे फेकू कमला न अयुक्त की
जरी प्रज्वलिली ती देवकार्य–महामखी'[५]

सावरकरांच्या कल्पनावैशिष्ट्यासंबंधी व अलंकारांतील प्रतीकांविषयी प्रा. मालशे यांनी व्यक्तविलेले विचार वरील विवेचनाचाच पाठपुरावा करणारे असल्याने ते अुद्धृत करून या विषयाचा समारोप करणे अिष्ट ठरेल. प्रा. मालशे लिहितात–

(संतत शोणित तर्पण-धारा धरीत आली पिढी पिढी
हविर्भुजाची रणकुंडातिल आग विपल ना विझू दिली'

हाच त्यांचा परवलीचा शब्द होता. यज्ञ, स्थंडिल, आहुती, हुताशन, या कल्पना त्यांच्या कवितेत पुन्हा पुन्हा येतात. सावरकर हे स्थंडिल-संप्रदायाचे पहिले ऋत्विज होत.[६]

---

१. सा. क. पृ. १०३. २. सा. क. पृ. १३८, ३. सा. क. पृ. १३८–१३९.
४. सा. क. पृ. १२१. ५. कमला पृ. ३९, ४०. ६. आ. नि. पृ. १०२.

कविवृत्ती तसे काव्यवृत्त

(कवीच्या वृत्तीचा संबंध रसांशी असतो आणि रसांना अनुरूप अशी वृत्त-योजना कवी करीत असतो.) क्षेमेंद्राने आपल्या 'सुवृत्ततिलका'त 'कवीने रस आणि वर्ण्य विषयाचे स्वरूप यांच्या अनुरोधाने सर्व वृत्तांचा अुपयोग विवेकाने करावा असे सामान्य धोरण सांगितले आहे.[1] याचा अर्थ असा की, कवी योजीत असलेल्या काव्यवृत्तांचा संबंध त्याच्या वृत्तीशी म्हणजेच त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी असतो. सावरकरांच्या बाबतीत तसा तो आहे हे टीकाकारांनी मान्यच केले आहे. खास सावरकरी 'वैनायक' वृत्ताचा विचार करताना श्री. ना. ग. जोशी यांनी म्हटले आहे की, " .... अतिशय महत्त्वाची गोष्ट अशी की त्यात (वृत्तात) श्रीमान विनायक दामोदर सावरकरांनी आपले दुर्दमनीय, वंदनीय, तेजःपुंज असे व्यक्तित्व ओतले आहे. "

आपल्या व्यक्तिमत्त्वानुरूप वैनायक वृत्ताची निर्मिती वा निवड करण्या-पूर्वी मोरोपंत-वामनादी कवींनी वापरलेल्या पुढील वृत्तांचा व काही अितर जाति-वृत्तांचा अुपयोग सावरकरांनी केला होता. 'हरिभगिनी' ('स्वदेशीचा फटका', 'अटकेवर जरिपटका'), चंद्रकांत ('स्वतंत्रतेचे स्तोत्र', 'तानाजीचा पोवाडा', 'श्रीबाजीप्रभूचा पोवाडा', 'तारकांस पाहून', 'प्रभाकरास') आर्या ('गोदा-वकिली', 'बाल-विधवा दुःस्थितिकथन', 'टिळकस्तवन') परिलीना ('शिवाजीमहाराजांची आरती', 'शिववीर') अक्रूर ('सागरास', 'विरहोच्छ्वास') सुंदर यादव ('पहिला हप्ता', 'जगन्नाथाचा रथोत्सव') माधवकरणी ('अनंताची आरती'), भूपति ('हिंदुनृसिंह') वसंततिलका ('माझे मृत्युपत्र', 'विश्वात आजवरि शाश्वत काय झाले') मंदाक्रान्ता ('आकांक्षा') शार्दूलविक्रीडित ('नारोशंकराचे देवालय', 'केळकर प्रशस्ति', 'के. कोकिळकारांचे स्वागत', 'वृषोक्ति', 'पाण्यातली आग ती', 'परगावी जाताना') चामर ('आत्मबल').

अंदमानात लिहिलेले 'कमला' हे संपूर्ण काव्य आणि 'गोमांतक' या खंडकाव्याचा पूर्वार्ध त्यांनी अनुष्टुप छंदात लिहिला. अनुष्टुप छंद हाच आपण का निवडला, याचे स्पष्टीकरण त्यांनी 'माझी जन्मठेप' या आत्मवृत्तात केले आहे. "रामायण-भारतासारखी महाकाव्ये ज्यात गाअिली जाअू शकतात आणि गीतेसारखे तत्त्वज्ञानही सुव्यक्त होअू शकते अशा त्या गोड परिचित आणि काही काव्यप्रकारांस अत्यंत अनुकूल अशा अनुष्टुपाची अगदी विचारपूस करणेसुद्धा

---

१. रसविमर्श पृ. ३८१.

सोडून देणे ही हानिकारक निर्दयता मराठीस लांछनास्पद आहे', अशी यासंबंधी सावरकरांची भूमिका होती.[1] याचा अर्थ अेवढाच की 'अनुष्टुप वृत्ताच्या सामर्थ्याची जाणीव त्यांच्या ठायी होती आणि मराठीच्या वृत्तसमृद्धीचा विचार त्यांच्या मनात जागा होता. आर्यागीती, श्लोक, ओवी अित्यादी मराठीतील अितर रचनाप्रकारांतील भावव्यक्तीचे सामर्थ्य व सौंदर्य त्यांना पूर्ण परिचित होते व त्यासंबंधी गौरवपर अुद्गार त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्तही केले होते.[2] परंतु अनुष्टुप छंदात त्यांनी जी काव्यरचना केली तीत मुख्यत: त्यांना प्रदीर्घ अशा कालिदासीय व होमेरिक अुपमा गुंफावयाच्या होत्या.[3] दीर्घकाव्याकडे झुकलेली त्यांची प्रतिभाच येथे कार्यरत होती.

सावरकरांनी 'वैनायक' वृत्ताची रचना करून त्यातून आपल्या काव्य-सरितेचा प्रवाह वाहावा असा हेतुपूर्वक प्रयत्न का केला ? याचे अुत्तर त्यांच्या प्रतिभेच्या स्वरूपात आहे, त्यांच्या कवितेतील नवीन आशयात आहे, त्यांच्या पृथगात्म व्यक्तिमत्त्वामध्ये आहे. ते अुत्तर तपशीलाने शोधून काढण्यापूर्वी 'वैनायक' वृत्ताची वैशिष्ट्ये समजून घ्यावयास हवीत. सावरकरांनी स्वत:च ती सांगितलेली आहेत. 'वैनायकवृत्ताचा विशेष' या लेखात सावरकरांनी पुढील विशेष सांगितले आहेत. (१) वैनायक वृत्तावर तालयतिप्रभृती संस्कार होत असल्याने त्यास मंजुळ सुरेलपणाची जोड मिळू शकते. यास्तव ते गद्य नसून पद्य होय. (२) वैनायक वृत्त अक्षरसंख्याक नसून मात्रासंख्याक आहे. (३) वैनायक वृत्तास दोन वा चार वा दहा चरणान्तीच विराम असावा असे बंधन नाही. त्यामुळे विशाल विचार संपेतो विराम लांबविता येतो. अनेक लहान अुपवाक्यांनी गुंफलेली वक्तृत्वपूर्ण दीर्घ वाक्ये, त्यांची गोड गुंफण वा गंभीर प्रवाह-फारसा खंडू न देता, त्यात सावता येतात. 'Paradise Lost' या मिल्टनच्या महाकाव्यातील 'Blank Verse' च्या वृत्तात गुंफलेली सैतानाच्या राज-सभेतील किंवा अीश्वराच्या देवसभेतील वक्तृत्वशाली भाषणे वाचली असता हा लाभ अशा वृत्ताने कसा साधला जातो हे चटकन ध्यानात येअील. तीच सोय वैनायक वृत्तात तशीच साधली जाते. (४) सयमकता हा जो बहुतेक मराठी वृत्तांचा निरपवाद नियम तो ह्या वृत्तास केवळ विकल्पाने लागू आहे..... परंतु या वृत्तात अनेक वेळा अनेक लहान वाक्ये गुंफलेले अेखादे मोठे वाक्य दहा-पाच चरणांत प्रवाहत अर्थानुरोधे मध्येच कुठेतरी संपते.... अशा स्थळी त्या दीर्घ वाक्याची आणि वक्तृत्वपूर्ण प्रवाही विचाराची शोभाच यमकाच्या दुय्यम शोभेहून

---

१. मा. जन्म. पृ. ८३. २. रानफुले – परिशिष्ट पृ. १५८–१५९. ३. सा. का. स. पृ. १५४.

अधिक रसानुकूल असल्यास यमक सोडून तीच साधणे अर्थ-सौंदर्यास अुपकारक होते. (५) हे वृत्त गेय नसून पाठ्य, वाच्य आहे. प्रवाही, भरदार वक्तृत्व-शील अशा भावभावनांच्या गुंफणीचा काव्यबंध अेकसुरीपणा आणि त्रुटितपणा टाळून रचावयाची सोय या वैनायक वृत्तात त्यातल्या त्यात अधिक होत असल्यामुळे अशा वेळी यथारुची या वृत्तास अवलंबावे. (६) हे वृत्त पाठ्य असल्यामुळे गद्याप्रमाणे आवेश, अुद्वेग प्रभृतींचे रसानुसारी ध्वनी अितर गेय वृत्तापेक्षा अधिक सहज त्वरेने वदलून या वृत्तात ताल संभाळूनही व्यक्तिविता येतात. (७) .... ह्या वृत्तास वाचण्याची, गेय नसली तरी पाठ्य अशी अेक पद्धत, लवचिक आणि लांब झेपेची का होअीना पण अेक सुरेल चाल, ही आहेच.[1] (८) ह्या वृत्तात अितर वृत्तांपेक्षा कथाप्रवाह अधिक वेगाने व डौलाने वाहात जातो व म्हणून वीररसात्मक व गंभीर प्रवचनात्मक विचारांस अितर लहान लहान वृत्तांत तुटक तुटक स्वरूप मिळाल्याने जो अेक त्यातील आवेगाचा व वेगाचा खंड पडतो तो पडत नसल्याने ह्या वृत्तात गद्यातील वाग्गतिवैचित्र्यास काव्यातील ताल-वद्धतेच्या मंजुलतेची जोड मिळते.[2]

वरील विशेषातून काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात येतात. हे वृत्त रचताना त्यावर मिल्टनच्या 'Blank Verse' चा परिणाम झाल्याचे सावरकर ध्वनित करतात. सावरकर व मिल्टन यांच्या वृत्तीमध्ये किती साधर्म्य होते हे श्री. ना. ग. जोशी यांनी 'वैनायक वृत्ताच्या विचारा'त सविस्तर स्पष्ट केले आहे.[3] यमकाच्या शोभेपेक्षा वक्तृत्वपूर्ण प्रवाही विचाराची शोभाच सावरकरांना अधिक महत्त्वाची वाटत होती. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा कल काव्यगुणांपेक्षा वक्तृत्वगुणाकडे अधिक झुकता होता.[4] 'गोमांतका'च्या अुत्तरार्धातील राज-मुख्याचे भाषण, विप्रतनयाचे भाषण, सिंधुमुख्याचे भाषण आणि राजदूतांचे वक्तृत्वपूर्ण आत्मनिवेदन यांमधून सावरकरांच्या प्रतिभेचा वक्तृत्वाकडील कल अुत्कृष्टपणे ध्यानी येतो; आणि 'वक्तृत्वपूर्ण कथन, वर्णन हा सावरकरी काव्याचा आत्मा असल्यामुळे ओघवती, धावती रचना ज्या वृत्तात शक्य आहे असे 'वैनायक' वृत्तच सावरकरांना अनुकूल वाटले;[5] व त्याचीच निवड त्यांनी आपल्या काव्याकरिता केली. असे हे दीर्घ काव्यातील रचनाविलास सावरकरी प्रतिभेचे खरे प्रतिनिधी वाटतात.[6]

सावरकरांच्या कवितेतील आशय अुत्तरोत्तर विचारघन होत गेला आणि त्यात 'वीर रसात्मक व गंभीर प्रवचनात्मक विचारांस' अधिक स्थान मिळाले.

---

१. रानफुले – परिशिष्ट पृ. १६० ते १६४. २. गोमांतक–प्रस्तावना पृ. १ ३. म. सा. प.–अेप्रिल १९३८. ४. सा. का. स. पृ. १४६. ५. म. सा. प. पृ. ६७. ६. सा. का. स. पृ. १५२.

आवेश, भव्यता, गांभीर्य, तेजस्विता या सर्व गुणविशेषांनी त्याला विलक्षण घनता प्राप्त झाली आणि सावरकरांनीच म्हटल्याप्रमाणे 'वृत्तांच्या लहान घडीव फुलपात्राहून या वैनायक वृत्ताचे विस्तृत आणि वाहत्या महान ओघाचे हे वृत्तपात्र दीर्घकाव्यबंधाच्या प्रवाहास अधिक अनुकूल झाले.' ('सायंघंटा, 'निद्रे', 'मूर्ति दुजी ती', 'मरणोन्मुख शय्येवर', 'महासागर' अित्यादी प्रमुख कवितांतून सावरकरांनी वैनायक वृत्ताचाच अवलंब केला आहे. 'सायंघंटे'त स्वातंत्र्यदिन समीप येत असल्याचा व त्यासाठी आवश्यक तो त्याग आपल्याकडून होत असल्याचा सार्थ अभिमान सावरकरांच्या अंगात जेव्हा घणघणू लागला, तेव्हा 'वैनायक' वृत्ताच्या पुढील काव्यखंडातून तो किती वक्तृत्वपूर्ण रीतीने प्रकट झाला आहे पाहा–

'ज्या दिवशी हिंदभूमि अति कठोर या
बंदिनिघित दंडाच्या भरिल अंतिमा
दिवस-दिनारा दारुण दुर्दशेचिया;
बलिदानाची ही नवरात्रि संपता
पूर्णाहुति पडुनि शक्ति-होमहुताशी
जै विजयादशमीला प्रज्वलोज्ज्वला
त्या ज्वाला-मालीतुनि तृप्त चंडिच्या
होअिल की मुकुट दिव्य दीप्त आमुचा
ग्रहणमुक्त-सूर्यासम प्रकट पुनरपि
त्या दिवशी विजयवृत्त ते करोत की
प्रथित दिशा दाही जो आध्रुवध्रुवी
सिंधु तटोतट प्रति ध्वनित गर्जत्या
जाअिल जयघंटेचा घोष महान या
राष्ट्राच्या पुनरुत्थित; नाद-सिंधुच्या
त्याची हा अेक असे नादबिंदु की
कष्टगणक घंटे, हा नाद जो तुझा
बिंदुबिंदुने ह्या तो सिंधु साचणे ।[1]

वीररसाप्रमाणे गंभीर प्रवचनात्मक विचारांच्या अभिव्यक्तीसाठी सावरकरांनी या वृत्ताचा अुपयोग कसा केला हे पुढील काव्य अुताऱ्यावरून ध्यानी येअील. 'शुद्धिकार्य कार्य वा अकार्य' या प्रश्नाबाबत निर्णय सांगताना 'गोमांतक' काव्यातील विप्रतनय म्हणतो :

---

१. सा. क. पृ. १०३–१०४.

"धारणाद्धि धर्म अिति प्रमुख लक्षणे
जो प्रजांसि अुद्धारिल, अभ्युदयाते
नेअिल जो जीवासी धर्म तो ठरे
धर्माचे हे स्वरूप निश्चिताच
न्यायेची हेही निष्पन्न होतसे
की समाजधारण जो करिल, जातिच्या
अभ्युदया कारण जो होत, होतसे
देशकालतः समाजधर्म तोच की
धर्माचे द्विविश्वत्वही अेतदर्थची
स्वास्थ्यकालतः, आपत्कालतः असे–
सर्वस्मृतिसंमत हे. भिन्न अवस्था–
आवश्यकता– योगे कृत्य अेकची
कै मारक कै तारक होतसे क्रमे
स्वस्थकालधर्मी जी विहित तीच की
'स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते महाभये
संग्रामे, यात्रायां देशविप्लवे
ग्राम नगरदाहे वा' ह्याच हेतुने
धर्माचे हे स्वरूप स्वरूप दृष्टिच्या पुढे
धरिता आम्हांसि मुख्य अेकची दिसे
प्रश्न विचारार्ह येथः पतित जनांची
शुद्धि समाजाचे हित ? वा बहिष्कृति ?
हितकारक अभ्युदयप्रवण की जरी
पतित परावर्तनची– धर्म्य ही तरी"[1]

सावरकरांच्या अशा प्रवचनात्मक विचारांमुळेच "गोमांतक' महाकाव्यात सावरकरांतला हिंदुत्ववादी प्रवचनपटू प्रबळ आहे," असे अुद्‌गार प्रा. भ. श्री. पंडित यांनी काढले आहेत.[2]

'वैनायक' वृत्त हे प्रथम सावरकरांनीच शोधून काढले की केवळ अेका जुन्याच जातिवृत्ताचे नवे नामकरण केले याबद्दल टीकाकारांत अेकवाक्यता नाही. 'वैनायक' हे वृत्ताचे नामकरण सावरकरांनीच केले ही गोष्ट मात्र खरी आहे. हेच नाव आपण का दिले याबद्दल सावरकरांनी कारणही दिले आहे. सावरकर लिहितात, "या वृत्ताच्या चालीची झेप विनायका-(गरुडा) प्रमाणे भरारीची

---

१. गोमांतक पृ. १२४–१२५. २. आ. म. क. पृ. १९९.

व विस्ताराची आहे हे दर्शविण्यासाठी 'वैनायक' हे चालचलाऊ नावच योजिले आहे."[१]

प्रा. मालशे वगळले तर बहुसंख्य टीकाकारांनी हे वृत्त सावरकरांनी केवळ संस्कारित केले, नवीन शोधून काढले नाही असा अभिप्राय व्यक्त केला आहे. श्री. ना. ग. जोशी यांना हे वृत्त सावरकर-निर्मित वाटण्यापेक्षा सावरकर-संस्कारितच अधिक वाटते.[२] प्रा. भ. श्री. पंडित यांनी स्पष्टच सांगितले आहे की, सावरकरांनी 'वैनायक' वृत्ताच्या रूपाने "मराठी कवितेच्या प्रांतात 'स्वच्छंद छंदा'च्या कल्पनेचे प्रवर्तन केले असले, तरी त्यांचा छंद काही नवा नाही."[३] प्रा. रा. श्री. जोग यांनाही 'वैनायक' वृत्तात वृत्तदृष्ट्या नावीन्य वाटत नाही. 'धवलचंद्रिका' हे नवीन नाव असलेली ती पूर्वीचीच अेक चाल आहे अशा आशयाचा खुलासाही त्यांनी केला आहे.[४] 'छंदोरचना' कार पटवर्धनांना धवलचंद्रिका या जाति-वृत्ताला सावरकरांनी नवे महत्त्व प्राप्त करून दिले हे मान्य आहे, परंतु ही जाती नवीन व स्वकृत आहे हा सावरकरांचा दावा मात्र त्यांना मान्य नाही.[५]

प्रा. मालशे यांनी मात्र वैनायक वृत्ताच्या निर्मितीचा आणि मुक्त रचनेच्या आद्यप्रवर्तकाचा मान सावरकरांना दिला आहे. हे नाव देताना व या वृत्तात कविता रचताना 'निर्यमक धवलचंद्रिका' या जातिवृत्ताची जाणीवही सावर-करांना नव्हती असा प्रतिवाद प्रा. मालशे यांनी केला आहे.[६] सावरकरांनी या वृत्ताची रचना का केली याचा खुलासा करताना प्रा. मालशे लिहितात, "प्रति-भेच्या आणि कल्पकतेच्या पल्लेदारपणाला खंड पडू नये, म्हणून त्यांनी हे घावते व सलग असे वृत्त शोधून काढले आहे."[७] श्री. भा. कृ. केळकर हेही सावरकरांना या वृत्तनिर्मितीचेच श्रेय देतात.[८]

वरील सर्व विवेचनाचा निष्कर्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येअील. धवलचंद्रिका या जुन्याच जातीचा अुपयोग सावरकरांनी 'वैनायक' वृत्तात केला असला तरी त्यावर संस्कार मात्र आपल्या व्यक्तित्वानुसार केले. 'वैनायक' हे वृत्तनामही त्यांनी स्वत:वरूनच दिले. वीररसात्मक, प्रवचनात्मक, वक्तृत्व-पूर्ण कशा स्वकाव्यातील वैशिष्ट्यांना योग्य अभिव्यक्ती देण्याच्या म्हणजेच यथातथ्य आत्माविष्काराच्या धडपडीतून हे वृत्त त्यांना स्फुरले. प्रतिभेचा व कल्पकतेचा पल्लेदारपणा ह्या सावरकरांच्या व्यक्तित्वातील विशेषांतूनच 'वैनायक' वृत्ताचा घाट तयार झाला. 'रचनादृष्ट्या सावरकरांनी केलेल्या

---

१. गोमांतक – प्रस्तावना – पृ. २. २. म. सा. प. अेप्रिल १९३८. ३. सा. वि. द. पृ. ३६. ४. अ. म. का. पृ. २६८, २६९. ५. छंदोरचना पृ. ४०८. ६. आ. नि. पृ. १८०. ७. आ. नि. पृ. १०१. ८. सा. द. पृ. २६५.

या प्रयोगाची दखल अर्वाचीन मराठी कवींनी घेतली नाही ' या प्रा. जोग यांच्या अभिप्रायातच[1] या वृत्ताचे व्यक्तिनिविष्ट स्वरूप सिद्ध होते.

भाषाशैली व व्यक्तिमत्त्व

सावरकरांच्या काव्यातील भाषाशैलीचा विचार येथे फक्त व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भातच करावयाचा आहे. काव्याच्या वेषभूषेची सर्वांगीण चर्चा येथे अभिप्रेत नाही. कवीच्या काव्यशैलीचा आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा असणारा निकटचा संबंध सर्वश्रुत आहे. भारतीय व पाश्चात्त्य टीकाकारांच्यामध्ये यावाबत कसे मतैक्य आहे याचे सोदाहरण विवेचन डॉ. के. ना. वाटवे यांनी 'शैली आणि शैलीकार' या लेखात साकल्याने केले आहे.[2] डॉ. वाटवे यांच्या प्रतिपादनाचा मुख्य आशय थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येअील : "काव्यातील 'रीती' व 'गुण' यांचा संबंध कविमनाशीच आहे हे प्रायः सर्व टीकाकारांना मान्य आहे. काव्यातील आशयानुरूप कवी शब्दयोजना करीत असतो. कवीच्या भावनात्मक किंवा वैचारिक अनुभवप्रकारातच त्याच्या शैलीचे मूळ असते. शैली म्हणजे संबंध कवी असे म्हटले की, सबंध कविमनाची प्रतिमा त्याच्या शैलीत अुतरली–पाहिजे. 'जसा कवी तशी त्याची भाषा' याचा अर्थ जसे कवीचे मनोधर्म तशी त्याची काव्यभाषा ! कवीच्या मनोधर्मात विशिष्ट भावनात्मकता, कल्पनाशक्ती व प्रज्ञा यांचा समावेश होतो. कवीच्या नैसर्गिक मनोरचनेप्रमाणे तो विशिष्ट भावनांच्या आविष्कारात जास्त रमतो. तसे करताना कल्पनेचे कमी-अधिक साहाय्य घेतो व आपला आशय आपल्या प्रज्ञेच्या व सौंदर्यदृष्टीच्या साहाय्याने व्यवस्थित रूपात औचित्य, संयम व भाषानियम पाळून व्यक्त करतो. याप्रमाणे व्यक्तिमनोधर्माप्रमाणे शैलीचे रूप बदलत असते."

भाषाशैलीसंबंधी प्रा. ना. सी. फडके यांचांही निष्कर्ष असाच आहे. 'प्रतिभा-साधना'त काहीं पाश्चात्त्य टीकाकारांच्या विचारांचे आलोडन केल्यानंतर प्रा. फडके यांनी अखेरीस म्हटले आहे की, शैली म्हणजे लिहिणाराच्या अंतर्यामीचीच शक्ती व शोभा होय.[3]

वीररसातून आविष्कृत झालेली शैली

सावरकरांची शैली अनुकरणीय झाली आहे ती त्यांच्या पृथगात्म व्यक्तित्वामुळे ! स्वातंत्र्यलालसा आणि परकीय राज्यकर्ते व हिंदुजातीवर अत्याचार करणारे

---

१. अ. म. का. पृ. २६९. २. युगवाणी–ऑगस्ट १९५१. ३. प्रतिभासाधन पृ. २४६.

परधर्मीय यांच्यावद्दलची चीड या मनोरचनेतून त्यांची शैली साकार झाली आहे. विजिगीषू व झुंझार वृत्ती यांतून निर्माण होणाऱ्या वीर-रौद्र रसांमुळे त्यांची शैली, ओज व दीप्ती या गुणांनी युक्त अशी वनली आहे. ओजस्वती भावेचे मूळ जाडया, ओवडधोवड शव्दांत नसून रौद्रादी रसांत कसे असते याचे विवेचन, ध्वन्यालोक-कारांनी केले आहे.[1] (रौद्रादीन्हि प्रकाशयतः काव्यस्य दीप्तिः ओजः ।) या दृष्टीने विचार करता सावरकर ज्या विशिष्ट भावनांत विशेषेकरून रमतात त्यांतून त्यांच्या शैलीचे प्रकृतिज गुण निर्माण झाले आहेत हे सिद्ध होते.(सावरकरांचे मनोव्यापार संयमाने, समतोलपणे कधीच प्रकट होत नाहीत. अुत्कट, रसरशीत भावनाभिव्यक्ती त्यांच्या सर्व वाङमयातून आढळते. हौतात्म्यभावनेमुळे त्यांच्या रसोत्कर्षात विलक्षण दाहकता व दीप्ती अुत्पन्न होते.' श्री. न. चिं. केळकर यांनी म्हटल्याप्रमाणे तेलाचे पेटलेले पलिते व नागव्या सुऱ्या वांधलेल्या चौकटी-तील अुडयांप्रमाणे सावरकरांचे सर्व लेखन आहे.[2] 'स्थंडिलावर ठेवलेल्या देहमना 'तून आणि ' मृत्यूशी गाठून वळे भेटण्या 'च्या झुंझार मनोवृत्तीतून त्यांची काव्यभाषा प्रकट झाली आहे.

(शृंगार-करुणादी रसाविष्कारातही त्यांची भाषा फारशी मृदू होअू शकत नाही. ' कमला ' काव्यातील मुकुंद-कमला यांच्या प्रथम संगमाच्या वर्णनांतही त्यांच्या शैलीला वीररसाचे विस्मरण होत नाही. त्यांच्या शैलीचे हे वैशिष्टय सांगताना प्रा. शं. के. कानेटकर यांनी म्हटले आहे : " शृंगार तर सर्व (कमला) काव्यातच पसरला आहे व त्याला वीराचे मिळालेले अुच्चासन फारच खुलून दिसते."[3] केवळ शृंगारच नव्हे तर त्यांच्या काव्यातील करुण व शांत या रसांचे पर्यवसान वीर-रौद्रादी रसांत झाल्याचे दिसून येते. चाफेकर, रानडे, तानाजी, श्रीवाजी देशपांडे, प्रभाकर यांच्या मृत्यूंचे प्रसंग, फाशीच्या छायेत वावरण्याचे स्वत:वर आलेले प्रसंग यांचे कवितेत वर्णन करताना करुणरसाचा परिपोष करण्या-अैवजी सावरकर आपला मोहोरा वीररसाकडेच वळवितात.' 'मरणोन्मुख शय्येवर ' पडून मृत्यूला आवाहन करताना सावरकरांच्या शैलीतून करुणरसाचा केवढा अुत्कर्ष व्हावयास हवा होता ! पण आत्मौपम्याच्या शांत रसातून जाताना त्यांची शैली वीररसात केव्हा विराम पावते हेच कळत नाही. कवितेच्या शेवटी ते मृत्यूला वजावतात–

परि अशक्य जरि ते तुज अेकटे तसे
येणेची, तरि त्याही क्रूर पीडका

---

१. काव्यालोचन–पृ. ३३३. २. प्रतिभा–जानेवारी १९३६. ३. सा. का. स. पृ. ४४.

रोगाच्या सैन्याचा क्षोभ सोसण्या
मी असेचि सिद्ध आजि दोन वासरे
. . . . तो मी त्या सर्व सुखांचे
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि की
समजुनि कर्तव्य सहू सिद्ध असेची ।[१]

'गोमान्तक' काव्यात अंतुनीने केलेला ('रमा-माधव') यांचा छळ, 'पुत्र की पती' असा रमेपुढे अुभा केलेला अति करुण प्रश्न, देशमुखांच्या दोन्ही सुनांवर– विशेषत: जाअूबाअीवर– पोर्तुगिजांनी केलेले अत्याचार या सर्व करुण प्रसंगांतून सावरकरांची शैली निर्माण करते ती सूडाची भावना ! प्रतिकाराची भावना ! या सर्व पात्रगत कारुण्यातून रसिक मनात हुंकारत असतो तो वीररसच ! 'श्रीबंदावीरा'च्या छळातून आणि त्याच्या हौताम्यातून वीररसाचाच अुत्कर्ष होत असतो. अशा वीररसातून सावरकरांच्या शैलीला ओज प्राप्त होते.

शब्दकलेवर झालेला व्यक्तिमत्त्वाचा परिणाम

काव्याच्या अंगभूत असलेल्या या ओजस्वी आशयाला सावरकर संस्कृत प्रचुर दीर्घ समासांनी अधिकच प्रदीप्त करतात. प्रक्षोभ अुत्पन्न करणे हाच सावरकरांच्या सर्व वाङ्मयाचा हेतू आहे. भडक परिणामाकडे लक्ष ठेवून ते अशा दीर्घ समासयुक्त गौडी रीतीचा आश्रय करतात. वानगीदाखल पुढील काही प्रदीर्घ संस्कृत समास पाहण्यासारखे आहेत. 'अवम-रक्त-रंजिते'[२] 'तत्च्छ्रीमत्शिवनृप',[३] 'अवनतिकृतांत-केलि-प्रासाद',[४] 'त्वत्-त्रिदशकोटि-संतान',[५] 'दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचे',[६] 'अस्मत्प्राण-हवी',[७] 'समर-चंडिका-चरण-स्थंडिलावरी',[८] 'हिंदुशक्ति-संभूत-दीप्ततम-तेजा',[९] 'सकल-विहग-श्रेणि-सम्राट',[१०] 'व्याघ्र-नक्र-सर्प-सिंह-हिंस्र-जीव-संगरी',[११] 'अस्मद्राज्यशत्रू',[१२] 'युष्मद्दिग्जय',[१३] 'हिंदु-स्वातंत्र्यवसंततुसमीरे'[१४] अि. या प्रदीर्घ समासांच्या गर्दीत काही अपरिचित, कठीण शब्दांची भर जेव्हा पडते तेव्हा सावरकरांची शैली क्लिष्ट व बोजड बनते. सामान्य वाचकांना त्यांच्या काव्याचा आस्वाद घेताना अडखळल्यासारखे का होते, हे पुढील काही शब्द वाचल्यानंतर लक्षात येअील. 'सरितापुलिनोत्थ',[१५]

---

१. सा. क. पृ. १६७. २. सा. क. पृ. २. ३. सा. क. पृ. ३३. ४. सा. क. पृ. ३५. ५. सा. क. पृ. ६७. ६. सा. क. पृ. ७५. ७. सा. क. पृ. १०४. ८. सा. क. पृ. १२१. ९. सा. क. पृ. १४२. १०. सा. क. पृ. १४४. ११. सा. क. पृ. २०६. १२. गोमांतक–पृ. २७. १३. गोमांतक–पृ. ७३. १४. गोमांतक–पृ. ९९. १५. सा. क. पृ. ११०.

'ऋकचतीक्ष्ण',[१] 'ऋव्याद',[२] 'क्लिन्नगंध',[३] 'शीघ्रान्तता',[४] 'तपोदिनदीनार',[५] 'कल्पद्रुमसमुचय',[६] 'तार्क्ष्य',[७] 'हैमपक्ष्मप्रभा',[८] 'करटगती'[९] 'अलपाक',[१०] 'निमुली'[११] 'आशु',[१२] 'अभिघा',[१३] 'भास्वर',[१४] 'मस्तिष्की'[१५] 'मलघ्नम',[१६] 'वशंवद',[१७] 'तरणी',[१८] 'अयुताब्द',[१९] 'लिप्से',[२०] 'अकाट्य'[२१] 'दौत्य'[२२] 'अैतिह्यी'[२३] अित्यादी. सावरकरांच्या कवितेतील असे शब्द वाचताना प्रा. शं. के. कानेटकर यांच्या यासंबंधीच्या अभिप्रायाचे स्मरण होते. प्रा. कानेटकर लिहितात, 'सावरकरांची भाषा खडबडीत व क्लिष्ट आहे. वाचकाला तीतून सावकाश व सावधगिरीने जावे लागते. क्वचित ठिकाणी अर्थ लावण्याकरिता किंवा ग्रांथिक संदर्भ समजून घेण्याकरिता थांवावे लागते. विचित्र-शब्द संयोगाचे त्याला धक्केही वसतात.''[२४]

सावरकरांची ही भाषाशैली संस्कृतच्या अध्ययनातून आणि मोरोपंत वाम्नमदी पंडित कवींच्या संस्कारातून सिद्ध झाली आहे. 'संस्कृत शब्दांचा अतिरिक्त अुपयोग' हे तिच्या जाचक गांभीर्याचे अेक कारण प्रा. जोग यांनी दिले आहे.[२५] परंतु त्यांच्या भाषेत पुढे पुढे जे अधिक काठिण्य आले ते परकीय शब्दांना काव्यात टाळा देण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीतून!'[२६] सावरकरांच्या भाषा-शैलीला त्यांच्या व्यक्तिमत्त्वानुसार घाट कसा आला हे येथे ध्यानी येते. अितर सर्व वाङ्मयातून व काव्यातून परकीय शब्द टाळण्याचा जो आग्रह त्यांनी धरला, तो त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेतून निर्माण झाला होता. प्रस्तुत प्रबंधातील भाषा-शुद्धीच्या प्रकरणात यासंबंधी सविस्तर विवेचन केलेले असल्यामुळे येथे फक्त सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेचा निर्देश करावयाचा आहे. 'काव्यानुकूल वा रसानुकूल शब्दांची निवड करण्यापेक्षा ते शब्द स्वकीय म्हणजे हिंदुभाषोद्भव असेच निवडण्याकडे सावरकरांचा कटाक्ष आहे. आर्यभाषोद्भव परंतु रूढ असे परकीय शब्द त्यांना मान्य नव्हते. 'गोमांतक' काव्यात परकीय रूढ शब्दांअैवजी सावरकरांनी वापरलेले पुढील काही हिंदुभाषोद्भव शब्द तुलनात्मक अभ्यासाच्या

---

१. सा. क. पृ. ११४. २. सा. क. पृ. १२३. ३. सा. क. पृ. ९७. ४. सा. क. पृ. ९९. ५. सा. क. पृ. १०२. ६. सा. क. पृ. १४४. ७. सा. क. पृ. १४४. ८. सा. क. पृ. १४८. ९. सा. क. पृ. १५१. १०. सा. क. पृ. ६. ११. सा. क. पृ. ७. १२. सा. क. पृ. २७. १३. सा. क. पृ. ३२. १४. सा. क. पृ. ६६ १५. सा. क. पृ. ९२. १६. सा. क. पृ. १३८. १७. रानफुले–पृ. ११८. १८. रानफुले–पृ. १२५. १९. रानफुले–पृ. १२७. २०. रानफुले–पृ. १२८. २१. रानफुले–पृ. १२८. २२. गोमांतक–पृ. १४६. २३. गोमांतक–पृ. १३९. २४. सा. का. स. पृ. ४४. २५. अ. म. का. पृ. २६८. २६. अ. अ. का. पृ. २६८.

दृष्टीने लक्षणीय आहेत. 'कोशागार'[१] (खजिना), 'दंडक'[२] (कायदा), 'रुग्णालय'[३] (दवाखाना), 'विक्षत'[४] (जखम), 'दुर्गप'[५] (किल्लेदार), 'सिंधु मुख्य'[६] (सुभा आरमार), 'सिंधुद्वार'[७] (बंदर), 'पारितोषिक'[८] (बक्षीस), 'जनिक'[९] (जाहीर), 'फुलवाडी'[१०] (फुलबाग) अित्यादी.

अिंग्रजी रूढ शब्दांअैवजी स्वकीय शब्द निर्माण करून तो कवितेत वापरण्याचा आग्रह सावरकरांनी आपल्या हिंदुत्वनिष्ठेतूनच धरला होता. दर्शिका[११] (तिकीट), राजमुख्य[१२] (व्हाअीसरॉय), नौशिल्पी[१३] (नेव्हल अिंजीनिअर) अित्यादी शब्दांची त्यांनी काव्यात केलेली योजना स्वभाषाभिमानापेक्षाही हिंदुत्वनिष्ठेतूनच केली होती असे म्हणणे अधिक तर्कसंगत ठरेल. भाषेतील परकीय रूढ शब्दांमध्ये काही विशिष्ट अर्थांच्या छटा (Associations) निर्माण झालेल्या असतात हे सावरकरांना मान्य होते. परंतु अशा शब्दांअैवजी योजण्यात यावयाच्या पर्यायी शब्दांच्या वारंवार वापराने त्या शब्दांत अपेक्षित अर्थछटा निर्माण होअू शकतात असे त्यांचे मत होते.[१४] काव्यातील भाषेचे महत्त्व सावरकरांच्या दृष्टीने दुय्यम होते. सौंदर्यापेक्षा प्रक्षोभावर, अुद्दीपनावर त्यांचा भर अधिक होता. त्यांची लेखनक्रीडा म्हणजे आपल्या लेखणीने त्यांनी केलेली युद्धक्रीडाच होती. 'माझी लेखणी मी लाठीसारखी चालविली' हे सावरकरांचे अुद्गार त्यांच्या[१५] युद्धप्रवृत्तीचे जसे प्रतीक आहेत, तसे त्यांच्या भाषाविषयक दृष्टिकोनाचेही निदर्शक आहेत.

अंगप्रत्यंगांतून प्रचाराकडे कल

लेखणीला लाठीचे रूप दिल्यामुळे आघात किंवा प्रहार हे तिचे अुद्दिष्ट बनले. कवितेतील काही स्थळे सोडली तर सावरकर कोणत्या ना कोणत्या तत्त्वाच्या वा विचारांच्या प्रतिपादनार्थ काव्यलेखन करीत आहेत असे वाटते. त्यांच्या प्रारंभीच्या काही कवितांत स्वदेशस्वातंत्र्याच्या भावनांचा संचार आहे तर अखेरच्या कवितेत जातीयतेचा प्रखर अभिनिवेश आहे. त्यांच्या बहुसंख्य कवितांत विचारांची स्पष्टोक्ती आहे. या स्पष्टोक्तीत 'कठोर निर्भयता व गावठी आडदांडपणा' कसा आढळून येतो ते श्री. न. चिं. केळकर यांनी श्री. शिवरामपंत परांजपे यांच्या शैलीशी सावरकरांच्या शैलीची तुलना करताना सविस्तर सांगितले आहे.[१६] स्पष्टोक्तीप्रमाणेच अुपरोधाचे शस्त्र परजून ते मधून मधून प्रहार करतात.

---

१. गोमांतक–पृ. ४५. २. गोमांतक–पृ. १२५. ३. गोमांतक–पृ. १०६. ४. गोमांतक पृ. १०६. ५. गोमांतक–पृ. १४४. ६.–गोमांतक पृ. १४५. ७. गोमांतक–पृ. २०८. ८. गोमांतक–पृ. १७५. ९. गोमांतक–पृ. ११८. १०. गोमांतक–पृ. २०. ११. गोमांतक पृ. १०८. १२. गोमांतक–पृ. ११२. १३. गोमांतक–पृ. १७१. १४. रहस्यरंजन–जानेवारी १९६१. १५. सा. द. पृ. २६६. १६. प्रतिभा – जानेवारी १९३६.

त्यांचे अुपरोधाचे विषयही ठरलेले आहेत व ते सर्व त्यांच्या व्यक्तित्वातील विविध निष्ठांशी निगडित आहेत. परकीय राज्यकर्ते, बलोद्धत परधर्मीय, शांति-अहिंसा या तत्त्वांचे ढोंगी पुरस्कर्ते, भोंदू साधू, राष्ट्रविघातक, दुष्ट, धार्मिक व सामाजिक चालीरीती, हिंदूंचा षंढपणा अित्यादी विषयांवर सावरकर जेव्हा लिहू लागतात तेव्हा त्यांच्या अुपरोधाला विलक्षण धार चढते. 'वृषोक्ति' कविता त्यांच्या अुपरोधाचा अेक अुत्कृष्ट नमुना आहे. 'गोमांतक'तील पंतोजीचे भाषण म्हणजे ख्रिस्त-धर्मानुयायांच्या अत्याचारी आचरणाचा केलेला मर्मभेदक अुपहास आहे.[1] त्याच काव्यातील निनामीवावांच्या रूपाने शांतता व अहिंसा या तत्त्वांचा राष्ट्रघातक पुरस्कार करणाऱ्या व्यक्तींवर सावरकरांनी अुपरोधिक टीका केली आहे.[2] आणि या तत्त्वांच्या प्रचारातील विरोध वा विसंगती पुढील मार्मिक शब्दांत वर्णन केली आहे :

'विश्वासघातकी होअी जिथे सत्य, जिथे अहा
हिंसका करू दे हिंसा, अहिंसा अजि तीच हा ।
असाधुकार्य साधू दे साधुता वदती तया
जनी पिसाळल्या श्वाना डसू दे द्रवती दया'[3]

सावरकरांचे हे अुपरोधिक लेखन कलावंताच्या पातळीवरून केले जाण्या-अैवजी प्रचारकाच्या भूमिकेवरून केले गेले असल्याने त्यात 'वाच्यार्थाची भूल-भुलाअी' नाही; आणि शिवरामपंतांच्या लेखनकलेप्रमाणे 'अवगुंठित छद्मीपणा व बहाणेदारपणा'ही त्यात आढळावयाचा नाही. वाचकांच्या ठिकाणी आवेशाचा संचार करणे, त्यांच्या विचारांना पक्केपणा आणणे हे त्यांच्या प्रचारकी अुपरोधाने पत्करलेले कार्य होते.

विवादप्रिय व दाठर शैली

लेखनशैलीत कलात्मकतेला महत्त्व देणारी, भाषासौंदर्याची बूज राखणारी ही दृष्टी सुटल्यामुळे व प्रचारकी वृत्तीलाच प्राधान्य देण्यात आल्यामुळे सावरकरांच्या शैलीत आणखी दोन दोष निर्माण झाले आहेत. सहज, कलात्मक विलासाअैवजी तिच्यात विवादप्रियता निर्माण झाली आहे; आणि लवचिकपणा जाअून तिच्या ठायी दाठरता आली आहे.

सावरकरांच्या विवादाचे विषयही त्यांच्या व्यक्तित्वानुरूप ठरलेले आहेत. ईश्वराचे अस्तित्व, शस्त्रसामर्थ्य, पतितपरावर्तन, जातिभेदोच्छेदन, राष्ट्रघातक सामाजिक रूढी ह्या विषयांत त्यांच्या वादप्रियतेला बहर येतो. या सर्व वादांत

---

२. गोमांतक–पृ. ७२, ७३. २. गोमांतक–पृ. ७४, ७५, ७६, ७७, ८२, ८६.
३. गोमांतक–पृ. ८६.

त्यांची बुद्धिनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा त्यांच्या ठायी या वाग्युद्धासाठी वळ भरीत असतात. 'बालविधवा-दुःस्थितिकथन' या कवितेत दुःस्थितीतून कारुण्य अुत्पन्न करण्याअैवजी सावरकरांनी धर्मविषयक तत्त्वमंथनच अधिक केले आहे. 'सुज्ञाने सुविचारे स्थित्यनुसारे स्वधर्म सुधरावा' अशा प्रचारात्मक आदेशाला 'कालस्थितिवश धर्मही आहे' असा बुद्धिनिष्ठ तत्त्वाचा आधार त्यांनी दिला आहे.[1] 'कमला' काव्यात 'क्रांतिकारकाने विवाह करावा की नाही' या वादविवादातच त्यांच्या कथानकाचा ओघ अडखळतो. 'गोमांतका'त अीश्वराच्या सामर्थ्यासंबंधी केलेले विवेचन,[2] मानवी देहबळाला, आत्मबळाला सीमा असल्यामुळे यंत्रसामर्थ्याचा त्यांनी केलेला पुरस्कार,[3] राष्ट्रघातक अहिंसेची त्यांनी केलेली मीमांसा,[4] समाज-हितकारक धर्मतत्त्वानुसार शुद्धी, बहिष्कार, अपहृत स्त्रीचा स्वीकार अित्यादी समस्यांचा त्यांनी केलेला अूहापोह, विश्वेतिहासावद्दल त्यांच्या मनात निर्माण झालेली जिज्ञासा[5] अित्यादी विषयांतून, त्यांच्या शैलीची विवादप्रियता सिद्ध होते.

सावरकरांच्या भाषाशैलीत जो अेकसूरीपणा आला आहे तो काव्यातील पात्रप्रसंगानुरूप त्यांची भाषा लवचिक न बनल्यामुळे आला आहे. संस्कृतमयता, भाषा शुद्धीचा आग्रह यांमुळे त्यांची शैली कशी दाठर बनली आहे हे पूर्वी आपण पाहिलेच आहे. या दाठरपणात आणखी दोन कारणांनी वाढ होते. अेक कारण म्हणजे त्यांचा क्रियापदाच्या रूपासंबंधीचा आग्रह आणि दुसरे त्यांच्या काव्यातील व्यक्तींना सावरकरी भाषाच बोलावयाला भाग पाडण्यासाठी त्यांनी घातलेला दंडक.

मराठीतील क्रियापददारिद्र्य दूर करण्याच्या यांच्या आग्रहातून गद्या-प्रमाणेच त्यांचे पद्यही सुटत नाही. 'नमस्कारवुनी'[6] 'स्वाक्षरवील',[7] 'प्रति-निवेदितो',[8] 'ध्वनवित',[9] 'सूक्तविती',[10] 'प्रश्नला'[11] ही त्यांच्या कवितां-तील क्रियापदे त्यांच्या शैलीला सावरकरांच्या व्यक्तित्वाचा रंग चढवितात. कोणत्याही वयाची, समाजातील कोणत्याही थरातील व कोणत्याही धर्माची व्यक्ती असो ती सावरकरांच्या काव्यात अवतरते ती सावरकरी भाषेचे संस्कार घेअूनच. सावरकरांच्या भाषाशैलीच्या या वैशिष्ट्यावर प्रा. रा. श्री. जोग यांनी नेमके बोट ठेविले आहे. या वैशिष्ट्याचे सोदाहरण स्पष्टीकरण करताना प्रा. जोग लिहितात, " . . . कोणताही पुरुष वा स्त्री व्यक्ती बोलत असो, त्यात तिची भाषा व तिचे वैशिष्ट्य न दिसता सावरकरांचे व्यक्तित्व दृग्गोचर होते. फारशी

---

१. सा. क. पृ. ४२. २. गोमांतक पृ. ४१, ५९, ७७. ३. गोमांतक पृ. २००–२२२. ४. गोमांतक पृ. ७६, ८६. ५. सप्तर्षि. ६. गोमांतक पृ. २०. ७. गोमांतक पृ. १६८. ८. गोमांतक पृ. १२४. ९. गोमांतक पृ. ११४. १०. गोमांतक पृ. १४७. ११. सा. क. पृ. १००.

शिक्षित नसलेली ('गोमांतका 'तील) देशमुखवधू, तिच्यापेक्षा अधिक शिक्षित अशी रमा, भार्गव खेड्यातील पंतोजी अथवा पुढे महापंडित झालेला त्याचा मुलगा, पुर्तुगीज संस्कृतीत वाढलेला अुत्तरार्धाचा नायक शंकर, सत्य-अहिंसावादी साधू किंवा त्याच्यावरोबर वाद करणारा शूर मराठा साहाय्यक वीर, खिरस्ती अंतुनी किंवा मराठी राज्यातील राजमुख्य किंवा सिंधुमुख्य सारे अेकच बोजड संस्कृत-प्रचुर सावरकरी थाटाची भाषा बोलत असतात. यात कोणी साधे बोलत नाहीत. सारेच भाषणे करतात. अंतुन्नीचा गोरा हेर सैनिक तेच करतो."[1]

काव्यात्मकतेचा शैलीवर परिणाम

सावरकरांच्या व्यक्तित्वातील विशिष्ट निष्ठांच्या छापेत वागणारी व वळणे घेणारी त्यांची शैली होती हे जितके खरे तितके हेही खरे की, कधीकधी सावर-करांच्या व्यक्तित्वातील जातिवंत काव्यात्मता त्या निष्ठांच्या घाकातून मुक्त होअून त्यांच्या शैलीला सौंदर्योत्पादक अभिजात स्वरूप प्राप्त करून देत असे. अशा वेळी त्यांची शैली मनोरम, तरल व अखिल विश्वातील सौंदर्याला गवसणी घालण्याअितकी भव्य रूप धारण करीत असे. बाह्य जड-विश्व व सचेतन मानवी जीवन यांतील विविध चित्रे त्यांची शैली लीलया कशी साकार करू शकते याची अनेक अुदाहरणे त्यांच्या काव्यात सापडतात. 'तारकांस पाहून', 'जगन्नाथाचा रथोत्सव', 'सप्तर्षि' अित्यादी कवितांतून त्यांनी हे ग्रहनक्षत्रांकित विश्व कवितांच्या चौकटीच्या लहानशा विस्तारात प्रतिबिंबित केले आहे. 'कमला' काव्यात सावरकरांनी अुभी केलेली पुष्पसृष्टी अभिजात संस्कृत वाङ्मयात शोभावी अितकी वैभवशाली रंगविली आहे.

"जे गजेंद्रशुंडेने अुपटिले । श्रीहरिसाठी मेले
कमलफूल ते अमर ठेले । मोक्षदाते पावन"[2]

या केवळ चारच चरणांत लोकोत्तर महाकवीच्या भव्य शैलीचे सामर्थ्य त्यांनी अुभे केले आहे. 'कमला' काव्यात मुकुंद-कमला यांच्या 'पहिल्या-चुंबना'चे थरथरते चित्र त्यांनी पुढील दोनच चरणांत किती प्रत्ययकारी केले आहे पाहा :

'चोरट्या कटिला गुंफी कापता कर तो झणी
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजति, त्याहुनी'[3]

.... निसर्ग सृष्टी, मानवी सृष्टी आणि चर्मचक्षूंच्या दृष्टिपथात न येणारी अतिमानुष सृष्टी यांच्यातील जीवनैक्यरसता व सामरस्य हळुवारपणे टिपून घेण्याअितकी संवेदनाक्षम अशी त्यांची शैली आहे. फुले म्हणजे अप्सरांच्या

---

१. सा. का. स. पृ. ९७. २. सा. क. पृ. ७३. ३. कमला–पृ. ५.

चुंबनांचे घेतलेले ठसे'[1] किंवा 'प्रभातीच्या हिमाने घनीभवन झालेले चांदण्याचे रवे'[2] आहेत असे वर्णन ते करतात. 'स्वर्णचंपकाची फुले म्हणजे सूर्याची किरणे ओल्या मातीत पिळून सोन्याची मृदुचेतन बनलेली फुलेच होत'[3] अशा शब्दांत ते निसर्गातील ही किमया अुलगडून दाखविण्याचा प्रयत्न करतात. चांदणी रात्र, तीमधील नीरव शांतता व साऱ्या जीवसृष्टीला त्या शांततेने आणलेले स्वास्थ्य आणि सुरक्षिततेची भावना या परस्परमिश्रित रंगांचे व हळुवार शब्दांनी साकार केलेले 'गोमांतका'तील पुढील चित्र किती विलोभनीय आहे–

'ती सौम्य रात्रि । छाये या मठाच्या निजली स्वता
रवंथ करिता कोण्या हरिणीसम शांतता
जगी असा कुणी फासेपारधीच न की अुरे
पारिजातावरी जाती तशी झोपुनि पाखरे ।
शांत कोमल गीताचा स्रोत शीतल पाझरे
ती सौम्य रात्रि सगीती, चांदण्यात तशी विरे'[4]

सृजनशील शैली

आपल्या वृत्तीतील हिंदुत्वनिष्ठ भाषाभिमान प्रकट व्हावा म्हणून सावरकर जसे नवे शब्द वा शब्दसंहती सिद्ध करतात तसे आपले काव्यात्म, नाजूक, तरल भाव यथातथ्य व्यक्त व्हावेत म्हणून ते नवे सुंदर शब्दसंप्रदायही बनवितात. या दोन्ही प्रकारांत त्यांच्या शैलीतील सृजनसामर्थ्य ध्यानी येते. 'ज्योत्स्नेची रसिकता नदी', 'चांदण्याचे रवे', 'ताजे जिते मोती', 'मदनाचा दलाल', 'विश्वमोहन मद्याचे पेले', 'स्नेहशून्य सहारे', 'सुमांच्या सुगंधावर वाढलेले भाव', 'सुमासम बोचले', 'लज्जाचंचल चुंबन', 'गजाचा रज', 'प्रश्नांचा ताल', 'फुलशेज' अशा कितीतरी खास सावरकरी शब्दसंहतीचे सडे त्यांच्या 'कमले'च्या फुलबागेत पडलेले दिसतील.

अितकी सृजनशील व काव्यात्म शैली असूनही प्रा. जोग म्हणतात त्याप्रमाणे तिच्यात 'अवजडपणा' का आला? याचे अुत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच आहे. तत्त्वज्ञानप्रवणता, व्यासंग व पांडित्य हे त्यांच्या वृत्तीचेच गुणधर्म होते. त्यांची प्रतिभा कवीची असण्यापेक्षा तत्त्वज्ञाची, प्रेषिताची, सुधारकाची होती आणि तीही पांडित्य आणि पौरुषाच्या भाराखाली दडपली गेली होती.[5] लेखणीचा लाठीसारखा अुपयोग करण्याच्या प्रचारकी प्रवृत्तीचा परिणाम त्यांच्या काव्यातील लेखनशैलीवर झाला ही गोष्ट नाकारता यावयाची नाही.

---

१. कमला–पृ. २. २. कमला–पृ. ५. ३. कमला–पृ. ३. ४. गोमांतक–पृ. ३१. ५. अ. म. का. पृ. २७०.

कवित्वाचे मूल्यमापन

कवी म्हणून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने आणि काव्याने मराठी कवितेत सावरकरांनी कोणते स्थान मिळविले ? या प्रश्नाचे अुत्तर देण्याचा प्रयत्न अनेक काव्यसमीक्षकांनी केला आहे. कोणी त्यांचे व्यक्तिमत्त्व वाखाणले तर कोणी त्यांचे काव्य गौरविले. सावरकरांच्या थोर व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या काव्याला मोल चढले असेही काहींनी ध्वनित केले.[१] परंतु बहुसंख्य टीकाकारांनी सावरकरांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे काव्य यांबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. येथे केवळ त्यांच्या काव्यातील व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात व्यक्त करण्यात आलेल्या अभिप्रायांचा अुल्लेख करून या प्रकरणाचा समारोप करणे प्रबंधाच्या सूत्राला धरून होअील.

श्री. ग. त्यं. माडखोलकर यांनी 'गेल्या साठ वर्षातील मराठी कविते'चे समालोचन करताना सावरकरांच्या ठायी 'प्रतिभा, पांडित्य आणि पौरुष यांचा अूर्जस्वल संगम' कसा झाला आहे हे दाखवून दिले आहे.[२] 'महाराष्ट्रातील अेकच अेक पुरुषार्थी कवी' असा सावरकरांचा गौरव त्यांनी अन्यत्र केला आहे.[३] सावरकरांची 'युयुत्सू मनोवृत्ती' आणि त्यांचा 'देशाभिमान' यांचाही अुल्लेख त्यांच्या वाङ्मयाचे विशेष सांगताना श्री. माडखोलकर यांनी केला आहे.[४] सावरकरांच्या ठिकाणी महाकवीची प्रतिभा असल्यामुळे डॉ. वाटवे त्यांना 'गजेंद्रकमल विनायक' असे बिरुद बहाल करतात.[५] श्री. बाळशास्त्री हरदास यांना 'आधुनिक भारताच्या महान वैतालिकांत सावरकरांचे स्थान 'व्यासा'चे आहे असे वाटते.[६] 'अेक थोर कलाकार' अशी सावरकरांची थोरवी प्रा. भ. श्री. पंडित गातात.[७] सावरकरांच्या शाहिरी काव्याचा परामर्श घेताना श्री. य. न. केळकर यांनी सावरकरांना 'चांदभाट' म्हटले आहे व 'भारतवीणा' ही पदवी त्यांना दिली आहे.[८] श्री. साधुदास यांनी 'अर्वाचीन शाहिरांत अग्रेसरत्वाचा मान' सावरकरांनाच दिला आहे.[९] सावरकरांनी आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाने 'मराठीतल्या अनुभवविश्वाची कक्षा रुंदाविली'[१०] आणि 'मराठी कविता अनेक दृष्टींनी समृद्ध करून प्रगतीच्या दिशेने नेणारा, अेक खास स्वत:च्या मार्गाने जाणारा कवी या दृष्टीने' मराठी काव्यसृष्टीत स्वतंत्र स्थान मिळविले.[११] 'सावरकरी काव्याने मराठीची कस धन्य झाली.'[१२]

---

१. सा. का. स. पृ. १८३. २. मा. आ. क. पृ. ३३०. ३. प्रतिभा–जानेवारी १९३८.
४. प्रतिभा–जानेवारी १९६८. ५. केसरी–२७ मे १९५८. ६. सा. का. स. पृ. १४२.
७. आ. म. क. पृ. १९६. ८. सा. का. स. पृ. ३०, ३१. ९. सा. का. स. पृ. २०.
१०. सत्यकथा–मे १९६६. ११. सत्यकथा–मे १९६८. १२. केसरी–२७ मे १९५८.

७

नाटककार सावरकर

नाट्यवाङ्मयाचे ओझरते दर्शन

सावरकरांनी अेकूण तीनच नाटके लिहिली. त्यांचे पहिले नाटक 'अुःशाप' १९२७ मध्ये प्रसिद्ध झाले आणि 'नाट्यकला प्रसारक मंडळी'ने ते रंगभूमीवर आणले.[1] १९३१ मध्ये सावरकरांचे 'संन्यस्त खड्ग' हे दुसरे नाटक प्रसिद्धीच्या प्रकाशात आले आणि 'बलवंत नाटक मंडळी'ने ते 'सर्वांगांनी नटवून' अभिनीत केले.[2] या नाटकानंतर लगेच अेक-दोन वर्षांतच म्हणजे १९३२–३३ साली सावरकरांनी 'अुत्तरक्रिया'. हे नाटक लिहिले आणि त्याचे प्रायोगिक दर्शन 'भारतभूषण संगीत मंडळी'ने सर्व महाराष्ट्राला घडविले.[3] १९२७ ते १९३३ या सहा-सात वर्षांच्या काळातच सावरकरांनी ही तीन नाटके लिहिली. १९२४ ते १९३७ ही तेरा वर्षे सावरकर रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्ध होते. १९३७ साली स्थानबद्धतेतून मुक्तता झाल्यावर सावरकरांनी अेकही नाटक लिहिले नाही. सदतीसनंतर सावरकरांनी नाट्यलेखन का केले नाही, याची कारणे पुढील विवेचनाच्या ओघात येतीलच. येथे अेवढेच नमूद करावयाचे आहे की, वरील नाटकांनीच सावरकरांना 'नाटककार' हे बिरुद प्राप्त करून दिले. अितकेच नव्हे, तर १९४३ साली सांगली येथे झालेल्या 'शतसांवत्सरिक-नाट्यमहोत्सवा'च्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळवून दिला.

टीकाकारांचे विविध अभिप्राय

सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाच्या यशापयशाचा विचार जर केला तर पहिली गोष्ट ही दिसून येते की, लोकप्रियतेचे वैभवशाली अधिष्ठान सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाला फारसे लाभले नाही. श्री. भा. कृ. केळकरांसारखे टीकाकार ही वस्तुस्थिती मान्य करूनही पुढे म्हणतात की सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाला लौकिकतेचा निकष लावणे त्यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाच्या

---

१. मख. प. पृ. २३८. २. बहुरूपी. पृ. २३२. ३. अु. क्रि.–प्रस्तावना.

दृष्टीने चुकीचे ठरेल.[1] सावरकरांच्या नाटकांवरील काही टीकाकारांचे अभिप्राय या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहेत.

प्रायोगिक मूल्य हे नाटकाच्या यशाचे अेक महत्त्वाचे गमक मानले जाते. या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा अभिप्राय असा आहे तो कै. चिंतामणराव कोल्हटकर यांचा! 'संन्यस्त खड्ग' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची प्रेक्षकांनी केलेली वाखाणणी आणि त्यातील रंगलेले विविध प्रवेश यांचे प्रत्ययकारी वर्णन त्यांनी केले आहे.[2] नागपूरला या नाटकाचे स्वागत प्रेक्षकांनी चिक्कार गर्दी करून कसे केले याचाही तपशील त्यांनी दिला आहे.[3] सांगलीच्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवात अेकाच प्रवेशाने आणि मुंबअीला झालेल्या याच नाटकाच्या चारच त्रोटक प्रवेशांनी प्रेक्षक बेहद्द खूष कसा झाला याचा अुल्लेखही ते आपल्या लेखाच्या शेवटी करतात.[4] भावनोत्कटता हा सावरकरांच्या वरील नाटकातील अेक विशेष गुण कोल्हटकरांनी दिला असून ते नाटक पाहात असताना नाट्याचार्य खाडिलकर यांनी आपल्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी तात्यांच्या (सावरकरांच्या) नाट्य प्रतिभेला अभिषेक कसा केला याची हृद्य आठवण कोल्हटकरांनी दिली आहे.[5] सावरकरांच्या भावनोद्दीपक नाट्याने प्रेक्षकांवर केवढी पकड बसत असे याचे अेक अुत्कृष्ट अुदाहरण डॉ. ना. भा. खरे यांच्या अेका आठवणीद्वारा कोल्हटकरांनी मोठ्या मार्मिकपणे दिले आहे.[6]

'भिन्नरुचिर्जनस्य' या न्यायाने सावरकरांच्या नाट्यवाङ्मयाकडे भिन्न भिन्न टीकाकार विविध गुणांमुळे आकृष्ट झाल्याचे दिसून येते. काहींना नाट्य विषयामुळे त्यांची नाटके आवडली[7] तर काहींना नाट्यपूर्ण घटनांनी भरलेले कथानक आवडले.[8] नाट्यगुणांपेक्षाही सावरकरांच्या नाटकांतून सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांसंबंधी जी मूलगामी आणि बुद्धिवादी विचारप्रणाली आहे तिची भुरळ काही टीकाकारांना पडली[9] तर काहींना नाटकाच्या अंतर्यामी जी कळकळ आणि राष्ट्रीय हिंदुवृत्ती आढळली तिच्यामुळे आकर्षण निर्माण झाले.[10] कुणाला त्यातील संभाषणाचे ओज असामान्य वाटले. कुणाला त्यांतील दीप्ती, बुद्धी हलवून सोडणारे विचार व त्यांत दिसणारी सावरकरांची बुद्धीची आतष-

---

१. सा. द. पृ. २४८. २. वहुरूपी. पृ. २३३. ३. वहु. पृ. २३६. ४. वहु. पृ. २४०. ५. वहु. पृ. २३५. ६. वहु. पृ. २३७. ७. वहु. पृ. २६०; मख. प. पृ. २७३. ८. वहु. पृ. २३०. ९. अ. म. वा. अिति. पृ. २४४. १०. म. सा. समालोचन पृ. ४९२.

वाजी नेत्रदीपक वाटली.[१] श्री. गोपीनाथ तळवलकर यांच्यासारख्या रसिक टीकाकाराला तर सावरकरांचे नाट्य-वाङमय अुत्कृष्ट वाङमयात समाविष्ट करावेसे वाटते. अितकेच नव्हे तर सावरकरांची नाटके भाषा आणि संस्कृती यांच्या अुपासकाला नेहमीच अभ्यसनीय वाटतील असा निर्वाळाही त्यांना द्यावासा वाटतो; आणि सावरकरांच्या नाटकांतील दीप्ती आणि स्फूर्तीमुळेच त्या नाट्य-वाङमयाला महाप्रतापी परशुरामाची किंवा तेजस्वी आणि चढाअीखोर व्याधाची अुपमा देण्याचा मोह त्यांना पडतो.[२]

सावरकरांच्या नाट्यवाङमयावर प्रतिकूल टीका करणाऱ्यांचे कलमही कमी धारदार नाही. सावरकरांच्या नाटकाच्या प्रायोगिक यशाचे गुणगान गाणारे कै. कोल्हटकर मधूनच 'या नाटकामुळे (संन्यस्त खड्ग) आर्थिक अपेक्षा सिद्धीस गेल्या नाहीत' असे वाक्य लिहून त्याच्या अपयशावर बोट ठेवतात.[३] साहित्य-सम्राट न. चिं. केळकरांचा सावरकरांच्या नाटकांसंबंधी फारसा अनुकूल ग्रह नाही. ते परखडपणे लिहितात, "संन्यस्त खड्ग' व अुत्तरक्रिया ही नाटके वाचली;पण ती नाटके या दृष्टीने मला मुळीच आवडली नाहीत. त्यात नाट्य विषयाची मांडणी कुशलपणाची नाही."[४] 'संन्यस्त खड्गा'ची प्रवेशरचना विस्कळित असल्यामुळे प्रयोगदृष्टीने त्याची रंगावृत्ती आपणांस कशी काढावी लागली याचे वर्णन श्री. व. शां. देसाअी यांनी केले आहे.[५] प्रायोगिक अडचणी-मुळे याच नाटकातील युवराज सिद्धार्थाच्या गृहत्यागाचा पहिला प्रवेश गाळावा लागल्याची माहिती कै. कोल्हटकरांनी दिली आहे.[६] स्थलकालाची ओढाताण सावरकरांनी 'अुत्तरक्रिया', 'अु:शाप' या दोन्ही नाटकांत केली आहे. दोन अंकांत ४० वर्षांचे अंतर 'संन्यस्त खड्गा'त पाहावयास मिळते, असे दोषदिग्दर्शन भा. कृ. केळकरांनी केले आहे.[७] 'नाट्यतंत्राच्या दृष्टीने ही नाटके सामान्य दर्जाचीच आहेत' असा डॉ. अ. ना. देशपांडे यांचा निर्भीड अभिप्राय आहे.[८] श्री. द. रा. गोमकाळे यांनी तर स्पष्टपणे सांगितले आहे की, आपली नाटके कलादृष्टया मौलिक व्हावीत अशी आच सावरकरांना नव्हती. त्यामुळे त्यांच्या नाटकांत रचनाशैथिल्य आणि तंत्रदृष्टया दोष आढळतात. अुच्च दर्जाचा कलावंत त्यांच्या नाटकात अभावानेच आढळतो.[९] या सर्व प्रतिकूल टीकांचा निष्कर्ष अितकाच की, सावरकरांची नाटके कलात्मकता, रचनाकौशल्य, नाट्यतंत्र, प्रायोगिक मूल्य आणि लोकप्रियता या दृष्टीने फारशी यशस्वी झाली नाहीत.

---

१. सा. द. पृ. २५२. २. सह्याद्री–जून १९४३, पृ. ४२६. ३. बहु. पृ. २३४.
४. प्रतिभा – १९३६ पृ. २. ५. मख. प. पृ. २७३. ६. बहु. पृ. २३०
७. सा. द. पृ. २५२. ८. अ. म. वा. अिति. पृ. ४४. ९. सा. द. पृ. ५८, ६३.

नाट्यवाङ्मयाचे सामर्थ्य व्यक्तिमत्त्वात

सावरकरांच्या नाटकांतील गुण आणि दोष यांचा विचार अधिक सखोलतेने केला तर अेक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते, ती ही की, या गुणदोषांचा अुगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. त्यांची नाटके हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे. त्यांची रंगदेवता लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे सारे गडद गहिरे रंग घेअून प्रेक्षकांच्यापुढे अुभी आहे. जे जे प्रतिपाद्य म्हणून त्यांनी आपल्या नाटकांत घेतले आहे, ते ते त्यांना मनापासून पटलेले आहे. त्यांवर त्यांची अगाध श्रद्धा आहे; आणि अितरांस आपले म्हणणे पटविण्याकरिता त्यांनी त्या त्या विषयाला बुद्धिवादाची बैठक देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. म्हणून सावरकरांचे ढंगदार व्यक्तिमत्त्व आपणांस त्यांच्या या नाट्यवाङ्मयात पाहावयास सापडते.[१]

अेखाद्या रागिणीच्या विलोभनीय विस्तारासाठी जसे विशिष्ट थाटातील ठराविक स्वर आधारभूत असतात, तसेच सावरकरांच्या नाट्यवाङ्मयातही दिसून येते. त्यांच्या नाट्यवाङ्मयाचे सामर्थ्य त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वात आहे.[२] या व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांच्या नाटकांचा निर्देश नाट्यकलेच्या अितिहासात होअील.[३] सावरकर नाटकांकडे वळले ते मुख्यतः विशिष्ट परिस्थितीत आत्माविष्काराचे, आत्मप्रकटीकरणाचे अेक साधन त्यांना हवे होते म्हणूनच.[४] साहजिकच त्यांच्या तीनही नाटकांनी सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाला आविष्कारित केले. त्यांनी आपले ठाम विचार, आपले आवडते तत्त्वज्ञान, आपली तळमळ, आपली जळफळ सारीच्या सारी आपल्या व्यक्तिवैशिष्ट्याच्या रसात रंगवून प्रकट केली.[५] या वैशिष्ट्यामुळेच त्यांच्या वाङ्मयाला वजनदारपणा आणि आकर्षकता प्राप्त झाली.[६] या वाङ्मयातूनच त्यांचे प्रभावी, प्रक्षोभक, क्रांतिकारी, अुत्कट व महान व्यक्तिमत्त्व अभिव्यक्त झाले.[७] अर्थात नाट्यवाङ्मयाला आवश्यक असणाऱ्या वस्तुनिष्ठेपेक्षा आत्मनिष्ठाच अधिक प्रमाणात प्रकट झाल्याने त्यांच्या प्रतिभेच्या व्यापकतेला, निरपेक्षतेला मर्यादाही पडल्या.[८] त्यांची नाटके विषयनिष्ठ झाली. स्वतः बाजूला राहून समाजातील विविध व्यक्तींचे स्वभावचित्रण वा भावचित्रण करण्याची शक्ती असूनही त्यांच्या आक्रमक व्यक्तिमत्त्वाने सर्वत्र प्रभाव गाजविला.[९] पण या अुणिवा असूनही त्यांतच त्यांच्या

---

१. वीर सा. ना. सह्याद्री – १९४३. २. सा. वि. द. पृ. ७८. ३. मख. प. पृ. २३४. ४. सा. वि. द. पृ. ५८. ५. सह्याद्री–जून १९४३, पृ. ४२४. ६. सह्याद्री जून १९४३, पृ. ४२४. ७. सा. वि. द. पृ. ५६. ८. सा. वि. द. पृ. ७७. ९. सा. द. पृ. २४८.

नाट्यवाङ्मयाचे सामर्थ्य साठविले आहे. त्यांचे नाट्यवाङ्मय म्हणजे अेका महनीय, थोर व्यक्तीच्या जीवनाचा साक्षात्कारी आविष्कार आहे.[1] त्यांच्या नाटकांची खरी थोरवी ती हीच.

व्यक्तिमत्त्वातील अेक मूलद्रव्य – नाट्य

या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात 'नाटककार सावरकर' म्हणून विचार करताना पहिला प्रश्न हा अुभा राहतो की, सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या रसायनात नाट्यात्मकतेचे मूलद्रव्य आहे काय ? या दृष्टीने पुरावे तपासले तर ते अनुकूलच असल्याचे दिसून येते. वयाच्या १४–१५ व्या वर्षीच त्यांनी आपले पहिले नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला होता. लोकमान्य टिळक व चाफेकर-रानडे यांच्या अुघड गौरवाकरिता अेकांकी नाटक त्यांनी रचले होते. पण भगूरच्या कुलकर्णी-पाटलाच्या अंत:स्थ सूचनेमुळे ते पडद्याआडच राहिले.[2] सावरकरांचा स्वभाव लहानपणापासूनच नकल्या आणि म्हणूनच थोडाफार नाटकी होता, हे येसू-वहिनींच्या आठवणीवरून लक्षात येते.[3] या शैशवातील नाट्याची जपणूक त्यांनी प्रौढत्वातही केली. कै. चिंतामणराव कोल्हटकरांनी यासंबंधी दिलेली आठवण मोठी मार्मिक व सावरकरांच्या स्वभावावर प्रकाश पाडणारी आहे. 'अुत्तरक्रिया' या नाटकाच्या वाचनाच्या वेळी अश्रूंचा अभिषेक होत असताना आसपासच्या गावचे लोक सावरकरांच्या भेटीस आले आणि लगेच सावरकर त्यांच्याशी बोलण्यात रमून गेले. हा दृश्यपालट पाहात असताना कोल्हटकरांना फार अंचबा वाटला. या प्रसंगाचे वर्णन त्यांनी पुढील शब्दांत केले आहे.–"या गृहस्थाशी बोलताना तात्या अितके जिव्हाळ्याने व गोड भाषेत बोलत होते की माझ्यासारख्या नटालाही क्षणभर अचंबा वाटला. ज्या प्रसंगाच्या वाचनात आम्ही रंगून गेलो होतो, त्याची अेवढीशीही छटा दिसू न देता असे प्रचारकी कळकळीचे गोड बोलणे ही गोष्ट अुत्कृष्ट नटालाही कितपत साधेल हा प्रश्न आहे.... अद्वितीय नाट्याविना ही गोष्ट सहज साधत नाही. अशा प्रकारचे अुच्च दर्जाचे नाट्य तात्यांच्या ठिकाणी पाहावयाला सापडते. प्रभावी नेता हा अुत्कृष्ट नट असावाच लागतो."[4]

सावरकरांच्या स्वभावातच नाट्य होते; अेवढेच नव्हे तर त्यांना नाट्य-दृष्टीही होती. स्वत:च्या नाट्यपूर्ण जीवनातून ही नाट्यदृष्टी अधिक तीक्ष्णही झाली असावी. क्रियाप्रतिक्रियांच्या संघर्षावर नाट्याची अुभारणी केली जाते ही

---

१. सा. वि. द. पृ. ७८. २. मा. आ. पृ. ८३. ३. मा. आ. पृ. ३७, ३८, ३९.
४. बहु. पृ. २४०.

गोष्ट त्यांना ज्ञात होती. 'अुत्तरक्रिया' नाटकातील सुनीतीच्या मुखातून सावरकरांची नाट्यदृष्टी प्रकट झाली आहे. मराठ्यांनी रोहिल्यांचा सूड अुगविला तेव्हा सुनीती म्हणते, "अेखाद्या नाटककारासदेखील कल्पित कथानकातही अितक्या कुशल कुंचलीने क्रियेप्रतिक्रियेची, घटनेघटनेस प्रतिघटनेची अशी तोडीस तोड रंगविता आली नसती."[1]

दोन तुल्यबल पक्षांच्या झुंजीतून नाट्य जन्म घेते हा नाट्यशास्त्रातील सिद्धान्त सावरकरांनी येथे मांडला आहे. तेव्हा सावरकरांच्या ठिकाणी नाट्य-दृष्टी होती हे सिद्ध होण्यास अडचण पडू नये. परंतु 'सावरकर हाडाचे नाटककार नाहीतच' असा दावा काही टीकाकारांच्याकडून मांडला जातो.[2] त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सावरकरांना तंत्राची मातब्बरी नव्हती हे खरे आहे. पण आपल्या नाटकांना ध्येयवादाची जोड दिल्याने त्यांनी तंत्राकडे दुर्लक्ष केले. नाट्याचा मूळ स्रोत त्यांच्या जीवनात होता. पण कलात्मक वळणे घेत आणि रसिकांना रिझविण्याच्या सुंदर सारस्वताचे मळे आपल्या काठावर फुलवीत त्या स्रोताने आपला मार्ग अनुसरला नाही, तर खडतर कार्याच्या दरीत शरीर झोकून त्याने त्या गतिमानतेच्या जोरावर प्रचंड शक्ती, चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कार्यभिन्नता दिसली तरी नाट्याचा मूळ स्रोत नाकारता येणार नाही.

ध्येयवादी दृष्टिकोन

नाटकासंबंधीचा हा ध्येयवादी दृष्टिकोन सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातून निर्माण झाला आहे. ध्येयाला समर्पित असे त्यांचे जीवन होते. प्रसंगी आपल्या पत्रांतून, भाषणांतून आणि नाटकांतील पात्रांच्या मुखांतूनही त्यांनी आपला ध्येयवादी दृष्टिकोन प्रकट केला आहे. सर्व वाङमय, विशेषतः नाट्यवाङमय, हे हेतुप्रधान, ध्येयप्रधान असले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. 'अंदमानच्या अंधेरीतून' आपल्या धाकट्या बंधूंना – नारायणराव सावरकरांना – लिहिलेल्या अेका पत्रात सावरकर लिहितात, "आपल्या सामाजिक चालीरीतींत ही जातिभेदाची पद्धती म्हणजे हिंदुस्थानला मिळालेला महाशाप आहे. तिच्यामुळे हिंदुजीवनाचा प्रबळ प्रवाह वाळवंटात आणि डबक्यात मुरू पाहतो आहे. .... शेंड्या-बुडख्यांसकट त्याचे अुच्चाटन केले पाहिजे. हे साधावयाचा अुत्तम मार्ग म्हणजे सर्व प्रकारच्या वाङमयातून– आणि मुख्यतः नाटके आणि कादंबऱ्या ह्यांच्यातून– त्यांच्यावर शस्त्र धरावयाचे."[3]

---

१. अु. क्रि. पृ. १०५. २. सा. वि. द. पृ. ६२. ३. अंद. अं. पृ. ३०, ३१.

१९४३ साली [illegible] झालेल्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना सावरकरांनी हाच ध्येयवादी दृष्टिकोन मोठ्या आग्रहाने प्रकट केला. ते म्हणाले, "मी शतसांवत्सरिक महोत्सवाचा अध्यक्ष झालो तेव्हा 'बोरू मोडा नि बंदुका घ्या' या अुपदेशाप्रमाणे 'पडदे फाडा' असे सांगेन अशी काहींना भीती वाटली. मी पूर्वीचा अुपदेश केला त्या वेळी राष्ट्रातील तरुण मला सुनींतात नि कादंबऱ्यांत गुंतलेले दिसले. त्या वेळी राष्ट्राच्या दृष्टीने तरुणांचे जे आद्य कर्तव्य मला वाटले ते मी प्रतिपादले. गेल्या दोन वर्षांत त्याचा कितीतरी अुपयोग झाला असून कितीतरी तरुण लष्करात गेले आहेत. 'साहित्य मारा' हा अर्थ त्यातून अभिप्रेत नव्हता. स्वातंत्र्य-संपादनार्थ सर्व शक्ती आज केंद्रित झाल्या पाहिजेत. अुरलेले सामर्थ्य अितरत्र केंद्रित करा असा त्याचा अर्थ होतो. म्हणून बंदुका घेण्यास शिकविणारी नाटके लिहावीत. आपण प्रथम तरुणांस सैनिकी शिक्षण द्या मग त्यांस नाटकांत पाठवा."[1]

नाट्यवाङ्मय हे समाजाला ध्येयाकडे नेणारे अेक अुपयुक्त साधन आहे हा विचार सावरकरांनी आपल्या पहिल्याच नाटकात–'अुःशाप' मध्ये– व्यक्त केला आहे. त्या नाटकातील नांदीच्या पहिल्याच प्रवेशात सूत्रधार म्हणतो, "समाजाला मंगलास्पद असणाऱ्या ध्येयाकडे प्रवृत्त करायला नाट्यकला–जर ती अुदात्ताशी समरस होअील तर– अेक अत्यंत अुपयुक्त साधन आहे."

ध्येयवादी दृष्टिकोनातून विषयांची आवड

आत्माविष्काराचे अेक साधन म्हणून सावरकर नाटकांकडे वळले आणि त्यांच्या नाटकांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे, हे प्रमेय काही टीकाकारांच्या विधानांच्या आधारे आपण मांडले. हे प्रमेय सिद्ध करताना आपण प्रथम ही गोष्ट पाहिली की, सावरकरांची नाट्यरचना ही ध्येयप्रधान आहे, हेतुप्रधान आहे आणि हा ध्येयवादी दृष्टिकोन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातूनच निर्माण झाला आहे. या ध्येयवादी दृष्टिकोनातूनच सावरकरांनी आपल्या नाटकांच्या विषयांची निवड केली. लेखक किंवा कवी आपल्या वर्ण्यविषयाची निवड आपल्या मनोरचनेनुसार, व्यक्तिमत्त्वानुरूप आपल्या हेतूंशी सुसंगत अशीच करीत असतो. महाकवी मिल्टनने आपल्या मनोरचनेला जुळण्याजोगाच विषय निवडला होता; व विषयांच्या यादीतील अितर विषय खुशाल बाजूस सारले होते. (What was akin to his own nature he took, the rest he put aside with perfect unconcern.)[2] 'जीवनाच्या जाणत्या आरंभापासून' विशिष्ट परिस्थितीशी

---

१. केसरी ९–११–१९४३. २. सं. का. पं. पृ. २१८.

अनुसंधान राखणाऱ्या सावरकरांच्या विशिष्ट मनोरचनेला अनुभवाने पक्केपणा आला होता. त्यांची मते, ग्रह, किंवा अभिनिवेश दृढ वनले होते. पण रत्नागिरीतील स्थलबद्धतेच्या नियमांनुसार त्यांना आपली राजकीय मते अुघड अुघड व्यवत करणे शक्य नव्हते. परंतु व्यक्तित्वात मुरून राहिलेली क्रांतिप्रवृत्ती अुसळ्या घेत होती. भरतभूमीवर परक्यांनी अधिकार गाजवावा ह्या गोष्टींच्या विरुद्ध त्यांचे मन जितके बंड करून अुठे, तितकेच ते जातिभेद आणि अस्पृश्यता ह्या गोष्टींविरुद्ध अुठे.[1] त्यामुळे नाटकासारखा समाजाधिष्ठित कलाप्रकार (Socialized Art) हाती येताच त्यांनी आपल्या मनोरचनेला जुळणाऱ्या विषयांची निवड केली.

सावरकरांच्या नाटकांचे विषय

आपल्या पहिल्याच नाटकात – 'अुःशाप 'मध्ये – सावरकरांनी अस्पृश्यता-निवारण व शुद्धी हा विषय चर्चिला आहे. गौतमबुद्धाच्या निवृत्तिपर आणि अहिंसाप्रधान विचारसरणीतील फोलपणा दाखवून प्रवृत्तिपर आणि शक्तिपूजक कर्मयोगाची श्रेष्ठता त्यांनी 'संन्यस्त खड्गा 'त सांगितली आहे. पानिपतच्या सूड अुगविणाऱ्या वैभवशाली मराठी साम्राज्याच्या काळाचे चित्रण त्यांनी 'अुत्तरक्रिये 'त केले आहे.

विविध टीकाकारांनी सावरकरांच्या तिन्ही नाटकांतील विषयांसंबंधी चर्चा करताना वर निर्देशित केलेले विषयच मान्य केले आहेत. त्यांच्या मतांचे थोडक्यात व अेकत्रित संकलन करावयाचे झाले तर ते पुढीलप्रमाणे करता येअील :

(१) **उःशाप** :– सावरकरांनी स्थानबद्धतेच्या काळात पतित-परावर्तनाचे, अस्पृश्यता-निवारण्याचे कार्य चालविले होते. तोच विषय त्यांनी या नाटकात मांडला आहे.[2] अस्पृश्यता, शुद्धी, स्त्रियांचे अपहरण, सनातन्यांचे ढोंगी वर्तन या अनिष्ट प्रकारांवर आवेशपूर्ण टीका करण्याकरिता हे नाटक त्यांनी लिहिले.[3] या नाटकात अस्पृश्योद्धार व शुद्धीकरण या दोन्ही प्रश्नांना त्यांनी चालना दिली आहे.[4] अस्पृश्यतेचा कलंक हिंदूंच्या श्रेष्ठ धर्माला कसा लांछनास्पद आहे हे 'अुःशाप ' पटवून देतो.[5]

(२) **संन्यस्त खड्ग** :– हिंसा, अहिंसेचा मूलग्राही विवेक करून कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग आचरण्याची आवश्यकता कशी अधिक आहे, हे 'संन्यस्त

---

१. अंद. अं. पत्र क्र. १२ पृ. ९०. २. सा. वि द. पृ. ६४. ३. सा. द. पृ. २४७. ४. म. सा. समा. पृ. ५१५. ५. सह्याद्री – जून १९४३, पृ. ४२२.

खड्ग' सिद्ध करू पाहते.[१] राष्ट्रातील थोर थोर व्यक्तींनी कनक, कामिनी व कृपाण यांचा त्याग करून संन्यस्त वृत्ती अंगीकारल्यास द्रव्योत्पत्ती, संतानवृद्धी आणि देशसंरक्षण ही कार्ये लफंग्या, हीन वृत्तीच्या लोकांकडेच राहून देश धुळीला मिळतो हे तत्त्व या नाटकात प्रतिपादले आहे.[२] गौतमबुद्धाच्या निवृत्तिपर आणि अहिंसाप्रधान विचारसरणीचा पराभव या नाटकात दाखविला आहे... आत्यंतिक अहिंसेचे अकल्याणकारी स्वरूप सिद्ध करण्याकरिताच हे नाटक लिहिले आहे.[३] हिंसा-अहिंसा, प्रवृति-निवृत्ति अित्यादी विषयांवरील आपली मते मांडण्यासाठी गौतमबुद्धाच्या काळातील अेक कथानक घेअून ते 'संन्यस्त खड्गा'त गुंफले आहे.[४] 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' हा सावरकरांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आत्मबिंदू आहे व त्या तत्त्वाचे अुत्कट, परिणामकारक प्रणयन हा 'संन्यस्त खड्ग' नाटकाचा हेतू आहे.[५] गांधीप्रणीत आत्यंतिक अहिंसेपासून भारतीयांना सावध करण्याकरिता सावरकरांनी हे नाटक लिहिले आहे.[६] हे नाटक म. गांधींच्या अहिंसावादावर टीकारूप आहे.[७]

(३) **अुत्तरक्रिया** :– मराठ्यांच्या अितिहासाविषयीचा अभिमान आपल्या तात्त्विक निष्कर्षांसह सावरकरांनी 'अुत्तरक्रिया' या नाटकात प्रकट केला आहे.[८] ज्या काळी पानिपतचा पुरेपूर सूड अुगवून साऱ्या हिंदुस्थानातील मुसलमानी अधिसत्ता मराठ्यांनी पादाक्रांत केली आणि दिल्लीच्या बादशहाला आपल्या हातातील अेक बाहुले करून सोडले, त्या हिंदू-अितिहासातल्या काळातील विजयशाली घटनांना ह्या नाटकांत सावरकरांनी चित्रिले आहे.[९] अुत्तरक्रिया म्हणजे अुत्तर जिंकण्याची क्रिया.... ती मराठ्यांनी थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत कशी पार पाडली, हे 'अुत्तरक्रिया' नाटकात दाखविले आहे.[१०] पानिपतावरील मराठ्यांच्या अपजयाचा थोरले माधवराव पेशवे यांनी सूड अुगवून 'बादशहा नाव तेवढे शहा अलमचे– बादशाही तेवढी श्रीमंतांची' अशी वाटणी केली. या अैतिहासिक कथानकावर या नाटकाची अुभारणी केली आहे.[११] मराठे-शाहीला पानपतला जो धक्का बसला त्याचा सूड मराठ्यांनी कसा कसोशीने घेतला हे 'अुत्तरक्रिया' दाखविते.[१२] हिंदुत्वनिष्ठ राजकारणाची व्यापक कल्पना सावरकरांनी माधवराव पेशवे यांच्या मुखाने या नाटकात सांगितली आहे.

---

१. सह्याद्री – जून १९४३, पृ. ४२२. २. म. सा. समा. पृ. ४९३. ३. अ. म. वा. अिति. पृ. ४३. ४. सा. द. पृ. २४७. ५. सा. वि. द. पृ. ६९. ६. हिंदु – विशेषांक, १९५८, पृ. २५. ७. प्रतिभा – पृ. २. ८. सा. द. पृ. ४४७ आणि अ. म. वा. अिति. पृ. ४३. ९. अुत्तरक्रिया–प्रस्तावना पृ. १. १०. म. सा. समा. पृ. ४९३. ११. सा. वि. द. पृ. ७५. १२. सह्याद्री–जून १९४३, पृ. ४२२.

या तीनही नाटकांतून सावरकरांच्या तळमळीचे, श्रद्धेचे, आकांक्षांचे, ध्येयाचे, प्रतिबिंब स्पष्टपणे पडल्याचे दिसून येते. त्यांच्या ज्या मनोभूमीत ही नाट्यबीजे पडली ती मनोभूमी हिंदुत्वाच्या, न्याय्य शस्त्रसामर्थ्याच्या व हिंदु-राष्ट्राच्या अभिमानाच्या विचारांनी सकस झाली होती. प्रसंग, घटना, व्यक्ति-दर्शन, वाचन अित्यादी मार्गांनी सावरकरांच्या नाटकांची बीजोत्पत्ती झालेली नाही. तर अनुभवाने पक्क्या झालेल्या विशिष्ट मतांच्या प्रकटीकरणासाठी त्यांची नाटके अवतरली. सौंदर्यदर्शनापेक्षा विचारदर्शन घडविण्याच्या बुद्धिपुरस्सर जाणिवेतून त्यांच्या नाटकांचा जन्म झाला. भावनेपेक्षा वैचारिक जीवनसत्त्वयुक्त अन्नावरच त्यांची बीजे परिपुष्ट झाली. म्हणूनच त्यांचे नाट्यवाङ्मय कलेचा आनंद देण्यासाठी नसून काही मूलभूत प्रश्नांचा विचार करण्यासाठी प्रवृत्त करणारे ते नाट्यमय आवाहन आहे असेच म्हणावे लागेल.[1]

सावरकरांची नाटके म्हणजे त्यांच्या विचारांना दिलेले नाट्यमय स्वरूप आहे हा मुद्दा अधिक लक्षात येण्यासाठी सावरकरांनी आपल्या नाटकांतून व्यक्त केलेले विचार प्रथम समजावून घ्यावयास हवेत. हे विचार म्हणजे सावरकरांच्या प्रदीर्घ अनुभवांचा परिपाक होत. ते केवळ प्रवाही, तात्कालिक परिस्थितीतून निर्माण झालेले चंचल विचार नसून त्यांना ग्रहांचा, मतांचा, अभिनिवेशाचा घनपणा, पक्केपणा प्राप्त झालेला आहे. त्या विचारांचे दर्शन त्यांच्या चरित्रात जाणत्या वयाच्या प्रारंभापासून घडते आणि पुढे नाट्यरचनेच्या अगोदर त्या विचारांना आलेला ठामपणाही ध्यानी येतो. या विचारांनीच सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची मूस बनविली आहे; आणि याच घटित व्यक्तिमत्त्वाने त्यांची नाट्यसृष्टी अुजळून टाकली आहे.

उःशापाचे नाट्यबीज

१९२७ साली लिहिलेल्या 'अुःशाप' या नाटकात सावरकरांनी 'अस्पृश्यता निवारण' आणि 'शुद्धी' या विषयावरील आपले विचार व्यक्त केले आहेत हे आपण नाट्यविषयांचा अूहापोह करताना पाहिलेच आहे. हिंदुजातीतील स्पृश्यास्पृश्यतेसंबंधी, जातिभेदासंबंधी, 'विटाळवेडाबद्दल तिटकारा आपल्या आत्मचरित्रात सावरकरांनी अनेक वेळा प्रकट केला आहे. 'लहानपणापासून मला जातिभेदाचा तिटकारा वाटे',[2] 'विटाळवेडाचा, फाजील सोवळ्या-ओवळ्याचा, जातिभेदाचा मला तेव्हापासून (बालपणापासून) तिटकारा येअी',[3] 'अन्नाने जात

---

१. सा. द. पृ. २५२. २. आ. च. पृ. ४२. ३. आ. च. पृ. ४५.

वाटते ह्या समजुतीचा मी त्या वयातही (१३–१४ वर्षे) अुपहास करीत असे.'[1] 'माझ्या मनात जातीचा किंतु असा नसेच'[2], आम्ही मंडळींनी अेकत्र सरमिसळ वसून फराळ करावा'[3] असे कितीतरी अुल्लेख त्यांच्या 'आत्मचरित्रा'त सापडतात. पण 'अस्पृश्योद्धार' आणि 'शुद्धी' यासंबंधीच्या त्यांच्या विचारांचे परिणत दर्शन घडते ते त्यांच्या 'माझी जन्मठेप' या आत्मवृत्तात आणि 'गोमांतक' या काव्यात.

'माझी जन्मठेप' मध्ये सावरकरांनी १९११ ते १९२१–२२ सालापर्यंत केलेल्या शुद्धिकार्याचे वर्णन केले आहे. मुसलमानांनी बाटविलेल्या हिंदू कैद्यांच्या शुद्धिकरणाच्या अनुषंगाने आपले विचार त्यांनी मांडले आहेत. धर्माकडे समाज-बळाचे अेक साधन म्हणून अैहिक दृष्टीने पाहणे किती आवश्यक आहे हे त्या वेळी त्यांच्या लक्षात आले होते. संख्याबळाचे महत्त्व त्यांना अुमगले होते. हिंदुत्वाचा जन्मजात जाज्वल्य अभिमान भावबंधरूप पावला होता. त्यांच्या 'हिंदुत्वा'ला तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठानही लाभले होते. 'विटाळ' या अेका शब्दात आपल्या सामाजिक आणि राष्ट्रीय अवनतीस कारणीभूत झालेल्या बहुतेक रूढींची बीजे अंतर्भूत झालेली आहेत याची तीव्रतेने जाणीव निर्माण झाली होती. धर्मांतराचे अुत्तरदायित्वही मुसलमानांअितकेच हिंदूंवरही आहे अशी त्यांची दृढ धारणा झाली होती. त्या वेळच्या आपल्या विचारांचा निष्कर्ष देताना सावरकर लिहितात, "अेतदर्थच आमची अशी निश्चिती झाली की, अन्नपेयांच्या, स्पर्शास्पर्शतेच्या बाष्कळ अतिरेकाचा त्याग आणि धर्मबहिष्कृतांस शुद्ध करून घेण्याची रूढी ह्या दोन सुधारणा हिंदूंनी आपल्या समाजात जर केल्या तर त्यायोगे मुसलमानांस हिंदूंतील आपद्ग्रस्तांस बाटविणे पुष्कळच दुर्घट होअील, बाटविलेल्यांस सांभाळणे त्याहूनही दुर्घट होअील. त्यामुळे त्यांस बुद्धिवादाने जे काय हिंदू बाटविता वा सांभाळता येतील, तितकेच हिंदूमुसलमान झाल्याने आणि त्याच न्याय्य रीतीने मुसलमानांसही हिंदू करून घेण्यास हिंदूंस हरकत न अुरल्याने अेका बाजूस मुसलमानांची अत्याचारी वृत्ती संधी न साधल्याने आणि निष्फळ ठरल्याने कमी होअील आणि दुसऱ्या बाजूस हिंदूंना आपले धर्मबांधव हिसडून नेले जाताना पाहून मुसलमानांविषयी साहजिकच जो त्वेष येतो तो कमी होअील. म्हणजे मुसलमानी धर्मांतराच्या विटाळ, तरवार आणि तत्त्व ह्या त्यांस अनुकूल झालेल्या तीन साधनांपैकी तत्त्व हेच कायम ते न्याय्य साधन अुरून धर्मांतराचा वाद मिटेल."[4] 'गोमांतक' काव्यात विप्रवर्य गुरुसुताच्या मुखातून शुद्धीबद्दलचे बुद्धिनिष्ठ विचार सावरकरांनी

---

१. आ. च. पृ. ७०. २. आ. च. पृ. १५४. ३. आ. च. पृ. १९९.
४. मा. जन्म. पृ. ३०१

मांडले आहेत.[1] त्यात त्यांनी प्रारंभी धर्माची व्याख्या करून धर्माचे व्दिविधत्व वर्णन करताना म्हटले आहे–

'समाजधारण जो करील, जातीच्या
अभ्युदया कारण जो होत, होतसे
देशकालतः समाजधर्म तोच की
धर्माचे द्विविधत्वहि अेतदर्थची
स्वास्थ्यकालतः, आपत्कालतः , असे
सर्वस्मृतिसंमत हे

म्हणून स्वस्थकालधर्मी जी गोष्ट विहित तीच आपत्काली विहित मानणे योग्य होणार नाही असे मत व्यक्त करून समाजाचे हित जीत आहे ती शुद्धी धर्म्य होय असा निष्कर्षही ते सांगतात. खलदलबल शक्तीने पळवून नेलेल्या व्यक्तीवर बहिष्कार घालण्याचा अधिकार कुणाचाच नाही; हे धर्मबहिष्कृत व्यक्तींचे पूर्वार्जित गेहच आहे, हे त्याचे पैतृक धन आहे असे ते बजावतात.[2]

१९२४ साली रत्नागिरीस स्थानबद्ध झाल्यानंतर सावरकरांनी अस्पृश्योद्धार व शुद्धी या दोन चळवळींना जोराची चालना दिली. १९२४ सालच्या प्लेगच्या धामधुमीत सावरकर रत्नागिरीहून नाशिकास गेले व तेथे त्यांनी शंभर-दीडशे महारांस मुसलमान करण्याच्या आगाखांनी कटातून सोडविले होते.[3] पुढे १९२५ मध्ये सावरकरांनी रत्नागिरीस पुन्हा अस्पृश्योद्धाराचे कार्य हाती घेतले. शिरगाव वेंगुर्ले, रत्नागिरी, दापोली, मालवण, खारेपाटण, देवरुख, कोर्ले अित्यादी ठिकाणी कधी स्पृश्यास्पृश्यांच्या सरमिसळ मेळाव्यात तर कधी केवळ अस्पृश्यांपुढे त्यांनी अनेक भाषणे दिली. नागरिकांच्या विचारांत क्रांती घडवून आणली. चिपळूण येथे अस्पृश्योद्धार व शुद्धी याच विषयांवर त्यांनी व्याख्याने दिल्याची नोंद सापडते.[4] शिरगाव येथे अेका चांभाराच्या घरी सत्यनारायणाच्या प्रसादासाठी सावरकर गेले होते. रत्नागिरीस श्रीविठ्ठलाच्या व राधाकृष्णाच्या देवळांत पूर्वास्पृश्यांना देवालयाच्या सभामंडपापर्यंत येअू देण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला होता. १९२५ च्या गणोशोत्सवात त्यांनी पूर्वास्पृश्यांचा अेक स्वतंत्र मेळा काढला. चांभारांचा अेक स्वतंत्र गणपती बसवून स्पृश्य लोक पानसुपारीस आणले. त्या वेळच्या 'सत्यशोधका'त सावरकरांच्या अस्पृश्योद्धार कार्याचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे. "सर्व चालचलाअू कामाकरिता रत्नागिरीतील अस्पृश्यता सध्या

---

१. गोमांतक–पृ. १२३ पासून २४२ पर्यंत. २. गोमांतक–पृ. १२२ व १२७.
३. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. ४. ४. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. ३१.

जवळ जवळ नाहीशी झाली आहे असे म्हणता येअील. व त्याचे बरेचसे श्रेय श्री. तात्यासाहेब सावरकर यांस दिले पाहिजे."[1]

'बकुल' या आणखी अेका वर्तमानपत्रात सावरकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचे व त्या संबंधीच्या विचारांचे वर्णन आहे. शुद्धिप्रवर्तनाचे श्रेय श्री. तात्यासाहेब सावरकर यांना देअून ते पत्र पुढे म्हणते, "त्यांनी या स्पृश्यास्पृश्यतेविषयीच्या विषयावर तात्त्विक आणि व्यावहारिक अशा दोन वाजूंच्या विचारांनी परिप्लुत अशी तीन व्याख्याने दिली. 'धर्म व आचार', 'अस्पृश्यतेची अुपपत्ती' आणि 'यापुढे टाकावयाचे पाअूल.' या क्रमाने विचार करून त्यांनी समाजाला असे पटवून दिले की, सनातन अशा धर्मापासून आचारधर्म भिन्न आहे. निरनिराळ्या स्थितींत त्या काळी भासणाऱ्या कारणामुळे आर्यसमाजाला सामाजिक शुद्धपणा राखण्यासाठी स्वत:वर बंधन घालून घेताना भिन्न संस्कृतीच्या अनार्यावर अस्पृश्यतेचा छाप मारावा लागला. तथापि आता ती स्थिती राहिली नाही. सनातन धर्मीयांकडे अितर अनार्यादी समाजाच्या धर्मप्रामाण्याविषयी कायमचा ओढा लागल्यामुळे त्या सर्वांचा अेकजीव झाला आहे. आणि म्हणून निदान सार्वजनिक आणि केवळ सामाजिक अशा व्यवहारात स्पृश्यास्पृश्यता मानून आपल्याच धर्मापैकी अेका मोठ्या संख्येच्या वर्णाविषयी आपण सहानुभूती धरीत नाही हा प्रकार फार घातक आहे. त्यामुळे धर्मांतराची कल्पना बळावते आणि सनातन धर्मीयांची संख्या कमी होते."[2]

अस्पृश्यतेच्या अुपपत्तीची मीमांसा वरील परिच्छेदात सावरकरांनी ज्या बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून केली आहे तसेच व्यवहारवादी दृष्टिकोनातून अस्पृश्यतेच्या अुच्चाटनाचे मार्गही त्यांनी सांगितले आहेत. रत्नागिरी नगरात पूर्वास्पृश्यांस अहिंदु येतो तेथपर्यंत तरी येअू देणारे पन्नास घरधन्नी निघावेत अशी जाहीर अिच्छा त्यांनी प्रकट केली होती.[3]

ज्या काळात सावरकरांनी 'अु:शाप' नाटक लिहून प्रसिद्ध केले (१९२७), त्या काळात सावरकरांनी लिहिलेले लेख या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. शुद्धिसंघटनेचे प्रणेते स्वामी श्रद्धानंद यांचा १९२६ च्या डिसेंबरमध्ये खून झाला. त्यानंतर 'श्रद्धानंद' हे नामाभिधान घेअून रत्नागिरीहून प्रसिद्ध होअू लागलेल्या वृत्तपत्रात सावरकरांनी शुद्धिसंघटनेवर अनेक लेख लिहून स्वामीजींच्या कार्याला पुन्हा वेगाने चालना दिली. 'आमच्या भिक्षुक बंधूंनो' निदान अेवढे तरी वाचा',

---

१. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. १०. २. रत्ना. हिं. प. पा. व. अिति. पृ. १०–११. ३. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. ४२.

'म्हण शिवेन–स्वीकारीन!', 'हिंदूंनो निराश होअू नका, केवळ कामाला लागा! 'संख्यावळ हेही वळच आहे', धर्माचे स्थान हृदयच आहे, पोट नव्हे', 'जो दर्शनाने वाटतो तो देव कसला?' 'आमच्या अस्पृश्य धर्मबंधूंना धोक्याची सूचना' अित्यादी अनेक लेख त्यांनी 'श्रद्धानंदा'तून प्रसिद्ध केले. या बहुतेक लेखांतून सावरकरांनी धर्म, न्याय व माणुसकीच्या दृष्टीने अस्पृश्यतानिवारण करण्याबद्दल अत्यंत तळमळीने, बुद्धिवादाने व अनेक कोटिक्रम लढवून आवाहन केले आहे. 'हे सात कोटी (अस्पृश्य) आपले हिंदू, रक्ताचे, धर्माचे, राष्ट्राचे बंधू, ह्यांस आपण ....अितर विधर्मीय धर्मोन्मत्त यांना जितके जवळ करतो, त्यांना जसे आणि जेथपर्यंत दारात येअू देतो, तेथपर्यंत आणि तसे देखील वागवीत नाही."[1] विशेषतः न्यायासाठी त्यांस त्याचे मनुष्यत्वाचे अधिकार आपण होअून जर आपण देअू तर आपल्या हिंदु-समाजावर आघात करण्यासाठी विधर्मीयांनी अुचललेल्या भ्रष्टीकरणाच्या तरवारीची अर्धी अधिक धार बोथट होअून जाअील.[2] 'ही सात कोटी आम्हां मनुष्यांसारखी मनुष्ये आम्ही कुत्र्यामांजरांसारख्या गदळ प्राण्यांस, म्हशी-गाअींसारख्या पशूंस शिवू पण त्यांस शिवत नाही!'[3] अनुलोम-प्रतिलोमादिक विवाहांनीच अस्पृश्यादिक जातींची अुत्पत्ती झालेली असल्याने अस्पृश्यांचे पूर्वज आणि चतुर्वर्णादिकांचे पूर्वज अेकच होते."[4] 'धर्मशास्त्रात...चे राष्ट्रविच्छेदे स्पृष्टास्पृष्टिः न विद्यते' अशा अनेक स्पष्ट आणि निर्णायक आज्ञा सांगितल्या असल्याने धर्मशास्त्राच्या नसेल तर आपद्धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणे ही अस्पृश्यतेची रूढी त्यागिणे हे कर्तव्य ठरत आहे"[5] अशा प्रकारचे अनेक विचार या लेखांतून सावरकरांनी व्यक्त केले आहेत. हे व अशा स्वरूपाचे अितर विचार कळून घेतल्यानंतर 'अुःशाप' या नाटकाचे बीज सावरकरांच्या मनोभूमीत कसे रुजले असेल याची स्पष्ट कल्पना येते आणि नाटकातील विविध पात्रे जेव्हा हेच विचार बोलू लागतात तेव्हा त्यांचा 'बोलविता धनी'च डोळ्यांपुढे अुभा राहतो.

'संन्यस्त खड्गा'चे नाट्यबीज

'संन्यस्त खड्ग' या नाटकाचे बीज सावरकरांच्या मुख्यतः दोन ग्रंथांतील विचारात सापडते. त्या दोन ग्रंथांपैकी पहिल्या 'हिंदुत्व' ग्रंथात त्यांनी जी बुद्धधर्माच्या ऱ्हासाची कारणमीमांसा केली आहे ती या नाटकाच्या विषयाच्या संदर्भात अभ्यसनीय आहे. 'हिंदुत्व' या ग्रंथातील विचारांचे चिंतन त्यांनी

---

१. हिं. पं. पृ. ३०. २. हिं. पं. पृ. ३०. ३. हिं. पं. पृ. ३०. ४. जात्यु. नि. पृ. ७७. ५. जात्यु. नि. पृ. ७२–७३.

अंदमानातच केल्याचा पुरावा मापडतो[१] त्यामुळे या नाटकात बुद्धाचे कार्य व त्याचे तत्त्वज्ञान यासंबंधी मांडलेली मते प्रदीर्घ वाचन-चिंतनानंतर बनलेली आहेत हे अुघड आहे. बौद्ध धर्म हा सत्यतत्त्वाचा होता, त्याचा प्रयत्न अुदात्त होता अशी सावरकरांची बुद्धाबद्दलची आदराची भावना त्या ग्रंथातून प्रकट झाली आहे. तरीही बौद्ध धर्मातील अुणिवा, त्याच्या ऱ्हासाची कारणमीमांसा व त्यावरील निष्कर्ष सावरकरांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे :

'बौद्धधर्माच्या प्रसाराने राष्ट्राच्या पौरुषावर व राष्ट्रीय अस्तित्वावरच गदा आली. राष्ट्रातील अुत्तमोत्तम माणसे बौद्ध धर्मात सामील झाल्याने शाक्य राष्ट्र समर्थ शत्रूला वळी पडले. अग्नी व खड्ग यांना अुत्तर देण्याचे सामर्थ्य बौद्ध धर्मात नव्हते. तेव्हा विचारवंतांना आपला खड्ग पुन्हा निष्कोषित करावे लागले. भविष्यकाळात संरक्षणाचा अेकच मार्ग म्हणजे शौर्य आणि बल हेच होय ही गोष्ट पुन्हा अेकदा सिद्ध झाली.'[२]

'संन्यस्त खड्ग' हे नाटक जरी बौद्ध कालावर आधारलेले असले तरी त्या वेळच्या (नाट्यनिर्मितिकालीन) राजकीय संघर्षात त्याचा अुगम आहे.[३] ही वस्तुस्थितीही पुराव्यांवरून खरी मानावयास हरकत नाही. म. गांधींच्या अहिंसावादावरच हे नाटक टीकारूप होय असे कै. न. चिं. केळकरांनी सांगितले असल्याचे पूर्वी आपण पाहिलेच आहे. सावरकर व म. गांधी यांच्या राजकीय तत्त्वज्ञानांतील विरोध जुना होता. म. गांधी व सावरकर यांच्या अिंग्लंडमधील वास्तव्यात तो अुघडही झाला होता.[४] १९२० मध्ये म. गांधींनी 'तरवारीचा पंथ' नावाचा अेक लेख 'यंग अिंडिया'त प्रसिद्ध केला होता.[५] तत्पूर्वीही 'मारो काटो का पंथ' (Cult of Violence) या नावाचे अेक चोपडे त्यांनी प्रकाशित केले होते. सावरकर अंदमानात असताना म. गांधींच्या असहकारितेच्या राजकारणाचे वारे वाहू लागले होते. 'खिलाफत, असहकारिता' 'अहिंसा, सत्य' अित्यादी गोष्टींसंबंधीची सावरकरांची प्रतिक्रिया अंदमानात त्या वेळी पुढील शब्दांत प्रकट झाली होती– 'लोकमान्यांसारखा धुरंधर नाहीसा होताच हा खिलाफतच्या अत्यंत आत्मवंचक चळवळीचा आणि अेका वर्षात चरखा फिरवून आणि अहिंसेच्या आणि सत्याच्या अत्यंत विपर्यस्त व्याख्येवर अुभारलेल्या तेजोहीन आणि तेजोनाशक असहकारितेने स्वराज्य मिळवू अिच्छिणाऱ्या आत्मवंचक अुन्मादाचा हा तसाच अेक अशुभ झंझावात सुटला आहे. हा बुद्धिविभ्रमाचा

---

१. मा. जन्म. २. हिंदुत्व पृ. १८ ते २५. ३. सा. वि. द. ४. लं. बा. पृ. १४४. ५. The Doctrine of Sword – Young India – 11–8–1920.

अेक रोग, अेक साथ सुरू झाली आहे."[1] पुढे रत्नागिरीच्या तुरुंगात असताना असहकारवादी बंदीवानांच्या भ्याड मनोवृत्तीचा जळजळीत निषेधही सावरकरांनी केला.[2]

रत्नागिरीतील स्थानबद्धतेच्या काळात म. गांधींच्या सत्य-अहिंसाधिष्ठित विचारसरणीचा प्रभाव सर्वत्र पसरत असल्याचे पाहून सावरकरांनी त्या विचार-सरणीविरुद्ध लेखणी अुचलली. 'श्रद्धानंदा'तून या विषयावर त्यांनी अनेक लेख लिहिले. म. गांधींच्या राजकारणाने तरुण पिढीचा तेजोभंग होत आहे,[3] ते राजकारण राष्ट्रकार्याचा चुराडा करून तीस अकर्मण्य करून ठेवीत आहे,[4] हिंदुस्थानच्या वीरवृत्तीला ही भोंगळ सुती अहिंसेची कीड लागलेली आहे,[5] शस्त्र हाती धरणे हेही पाप आणि हिंसा ठरत आहे,[6] अित्यादी म. गांधींच्या राज-कारणातील दोष दाखवून सावरकरांनी तरुणांना पुढील शब्दांत चेतावणी दिली आहे– "तरुण हो, जर तुम्हांस राष्ट्रासाठी खरोखरच काही करून दाखवायचे असेल तर हे बालिश तत्त्वज्ञान आणि हे षंढतेचे शास्त्र पहिल्याने पायाखाली तुडवून टाका."[7]

विरोध दिसताच प्रतिक्रियेस, कर्तृत्वास अवसान चढण्याचा सावरकरांचा स्वभावविशेष या काळातील त्यांच्या बहुतेक लिखाणातून दिसून येतो. त्या वेळच्या राजकारणात जे विरोधी विचारप्रवाह वाहात होते त्यांना आपल्या सर्व बुद्धिमत्तेने, युक्तिवादाने आणि कोटिक्रमांनी क्रांतिकारकांचे अेक प्रमुख प्रतिनिधी म्हणून अुत्तर देणे सावरकरांना आपले अेक कर्तव्य वाटत होते. विशेषत: अहिंसा, अत्याचार या शब्दांचा खरा अर्थ, खरी व्याख्या लोकांच्यापुढे मांडावी म्हणून त्यांनी आपल्या अनेक लेखांतून त्या व्याख्येची अगदी मूलगामी, बुद्धिनिष्ठ अशी चर्चा केली आहे.[8] 'अधिकतर हिंसा टाळण्यासाठी जी अल्प हिंसा अपरिहार्य-पणे करावी लागते ती खरी अहिंसा होय,[9] आणि परपीडक बळाचा अुपयोग तोच अत्याचार होय.'[10] अशा काही व्याख्याही सावरकरांनी सांगितल्या आहेत.

सत्य-अहिंसेबद्दलची सावरकरांची मते ही म. गांधीच्या तत्त्वज्ञानाच्या विरोधातून मात्र निर्माण झाली नसून १९०२ सालापर्यंतच्या काळातच ती दृढ झाली होती असे दिसते.[11] तसेच अंदमानातच बव्हंशी रचलेल्या 'गोमांतक'

---

१. मा. जन्म. पृ. ४९४. २. मा. जन्म. पृ. ५१४, ५१५. ३. गां. गों. पृ. ७. ४. गां. गों. पृ. ७. ५. गां. गों. पृ. ५९–६०. ६. गां. गों. पृ. ५७. ७. गां. गों. पृ. ११. ८. गां. गों. पृ. ४, ३३, ६२, ६४, ६८, ६९. ७०. ९. गां. गों. पृ. ४. १०. गां. गों. पृ. ६८. ११. आ. च. पृ. २२० व २२८.

काव्यातही सत्य, अहिंसेच्या ज्या व्याख्या त्यांनी दिल्या आहेत त्या 'आत्म-चरित्रा'त दिलेल्या व्याख्यांशी सुसंगतच आहेत.[1] या सर्व व्याख्यांच्या मुळाशी अधिकात अधिक मानुषकांचे हित किंवा 'लोकहितवर्धकते'चे जे तत्त्व आहे तेच सर्वत्र दिसून येते.

अतअेव, 'संन्यस्त खड्ग' नाटकाचा अुगम तत्कालीन राजकीय संघर्षातून झाला आहे आणि बौद्ध कालाचा माध्यमासारखा अुपयोग करून सावरकरांनी आपली मते, राजकीय तत्त्वज्ञान सरळ सरळ प्रतिपादन करून सहजपणे आत्मा-विष्कारच साधला आहे असे दिसून येते.

'अुत्तरक्रिये'चे नाट्यबीज

'अुत्तरक्रिया' या सावरकरांच्या तिसऱ्या अैतिहासिक नाटकाची अुभारणी पहिल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत पानिपतच्या पराभवाचा सूड घेण्यासाठी मराठ्यांनी जो अुत्तर दिग्विजय केला त्यावर करण्यात आली आहे. मराठ्यांचा अितिहास आणि त्यातही त्यांच्या अुज्ज्वल पराक्रमाने भरलेला अितिहास सावरकरांच्या अत्यंत आवडीचा विषय. माधवराव पेशवे तर सावरकरांचे अत्यंत लाडके पेशवे. सर्व पेशव्यांत थोर पेशवेपणाचा मान 'पहिल्या माधवराव' पेशव्यासच ते देत असत. 'सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण'? या त्यांच्या निबंधाला 'करमणूक' पत्रात पहिले पारितोषिक मिळाले होते.[2] या माधवरावांच्या कारकीर्दीत मराठ्यांनी पानिपतचा प्रतिशोध घेतला असल्याने सावरकरांना या विषयाचे आकर्षण अधिकच होते. १९२५ मध्ये सावरकरांनी 'हिंदुपदपादशाही' हा प्रबंध प्रसिद्ध केला होता. ह्या प्रबंध-लेखनामागील सावरकरांचा प्रमुख अुद्देश 'अखिल हिंदू अितिहासाच्या दृष्टीने मराठी अुत्थापनाचे महत्त्व दाखवून निश्चित करावयाचे' हा होता.[3] मराठ्यांचे अुत्थापन हे मराठ्यां-पुरतेच नव्हते तर ते अखिल हिंदुजातीसाठीच होते हे सूत्र या प्रबंधात सावर-करांनी गुंफले होते. मराठ्यांनी केलेली अुठावणी ही अगदी प्रारंभीसुद्धा केवळ वैयक्तिक किंवा विशिष्ट वर्गाची संकुचित चळवळ नव्हती. हिंदुधर्माच्या संरक्षणासाठी, परकी मुसलमानी सत्ता अुलथून पाडण्यासाठी, स्वतंत्र व समर्थ असे हिंदवी-साम्राज्य स्थापन करण्यासाठी केलेली ती आमूलाग्र हिंदू चळवळ होती, हा अेकच प्रमुख विचार सावरकरांनी या प्रबंधातून अभिनिवेशाने मांडला आहे.

सावरकरांच्या वरील विचारांचा अुगम १९१० च्या आसपास सापडतो. 'हिंदुपदपादशाही' या प्रबंधाच्या प्रस्तावनेत स्वतः सावरकरांनी तसा अुल्लेखही

---

१. गोमांतक – पृ. ५२ व ११५. २. आ. च.–पृ. २१०. ३. हिं. प. पा. पृ. ३.

केला आहे.[१] पुढे १९२८ मध्ये या प्रबंधातील विषय त्यांनी 'औट घटकेचे साम्राज्य' या आपल्या अेका व्याख्यानात मांडला होता.[२] नंतर १९३२–३३ मध्ये याच विषयाला त्यांनी नाट्यस्वरूप दिले.

विषयनिष्ठ नाटके

सावरकरांच्या तीनही नाटकांची बीजे त्यांच्या विचारसरणीत कशी खोल रुजली होती हे आपण आतापर्यंत साधार पाहिले. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की, सावरकरांची नाटके ही विषयनिष्ठ आहेत. नाट्यतंत्राच्या दृष्टीने पाहिले तर नाटकाचे यश नाटकाच्या विषयावर अवलंबून नसते, तर विषयापेक्षा नाटककाराच्या वस्तुरचना-कौशल्यावर नाटकाची सर्व मदार असते.[३] परंतु सावरकरांची नाट्यनिर्मितीमागील भूमिका कलावंताची नाही. त्यांच्या नाटकांत अुच्च दर्जाचा कलावंत अभावानेच आढळतो, असे द. रा. गोमकाळे यांनी स्पष्टच म्हटले आहे.[४] नाट्यकलेकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टी कलावंताची नाही, विचारवंताची आहे. म्हणून 'केवळ आनंदनिर्मिती हे नाटकाचे कार्य नाही' असे ते सांगतात.[५] 'Drama is a copy of life, a mirror of customs, a reflection of truth' ही सिसिरो किंवा अेमिल झोला यांची व्याख्या त्यांना संपूर्ण मान्य नाही. तर 'संसार कसा असावा हेही नाटकाने दाखविले पाहिजे' असे ते आग्रहाने सांगतात.[६]

नाटकाचा हेतू, विषय आणि त्याचे कार्य यांबाबत सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाने कसा प्रभाव गाजविला आहे हे आपण पाहिले. आता प्रत्यक्ष नाट्यवस्तुविकसनावर, कथानक-रचनेवर सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचाच ठसा कसा अुमटला आहे ते सोदाहरण पाहावयाचे आहे.

कथावस्तुविकसनावर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव

सावरकरांची नाटके अभ्यासताना प्रथम दर्शनीच ही गोष्ट लक्षात येते की, कथानक रचनेत त्यांनी तंत्राला फारसे महत्त्व दिलेले नाही. नाट्यप्रयोग नजरेसमोर ठेवून प्रवेशाची रचना त्यांनी कोणत्याच नाटकात केलेली दिसत नाही.[७] रंगभूमीवरील प्रायोगिक क्षेत्राबाबत त्यांच्याकडून अुपेक्षाच झाली.[८] नाट्यदृष्टी असूनही अेका निराळ्याच ध्येयासाठी आपले जीवन कष्टविण्याची भूमिका पत्करल्यामुळे त्या दृष्टीला मर्यादित महत्त्व मिळाले. तंत्राबाबतची ही अुपेक्षा

---

१. हिं. प. पा. भूमिका पृ. २. २. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. १३०. ३. म. ना. तं. आणि वि. पृ. ७५, ७७. ४. सा. वि. द. पृ. ५८. ५. म. ना. प. अिति. व कार्य पृ. १३०. ६. म. ना. प. अिति व कार्य पृ. १३०. ७. सा. वि. द. पृ. ६२. ८. म. ना. पृ. २६.

कित्येक वेळा अितकी होते की, काही प्रवेशांत ते स्थळांचा अुल्लेख विसरतात, तर काही वेळा पात्रांच्या प्रवेशाचा निर्देश करीत नाहीत. अुदाहरण म्हणून 'अुःशाप' नाटकातील अंक २, प्रवेश २ आणि अंक ३, प्रवेश ३ पाहण्यासारखा आहे. 'अुत्तरक्रिया' यातील अंक २, प्रवेश दुसरा असाच आहे. भरत-नाट्य-शास्त्राप्रमाणे रंगभूमीवर लढाया, खून, मृत्यू दाखविणे वर्ज्य समजले जाते.[१] पण सावरकरांच्या तीनही नाटकांत लढाया, द्वंद्वे आणि मृत्यू दाखविलेला आहे. कालैकता (Unity of Time), स्थानैकता (Unity of Place) व कार्यैकता (Unity of Action) यांवद्दलचे विवेचन भरत-नाट्यशास्त्रात केले आहे.[२] पण सावरकरांच्या नाटकांत विशेषतः स्थानैकता व कालैकतेचा दोष फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. स्थानैकतेकडे दुर्लक्ष केल्यामुळे 'अुत्तरक्रिया' नाटकातील अंक २ मध्ये किती वेगवेगळ्या स्थानी नाटकातील प्रसंग घडतात पाहा : पहिले चार प्रवेश अुत्तर हिंदमधील स्थाने दाखवितात, तर पाचवा प्रवेश यशवंतरावचे पुण्यातील अंतःपुर दाखवितो. सहावा प्रवेश अलाहाबाद येथे घडतो तर सातवा प्रवेश फत्तरगडचे दर्शन घडवितो. कालैकतेच्या दोषाचे अगदी ढळढळीत अुदाहरण सापडते ते 'संन्यस्त खड्ग' या नाटकात. या नाटकातील पहिला अंक व दुसरा अंक यांत चाळीस वर्षांच्या कालावधीचे अंतर दाखविले आहे. या दोषामुळे प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी 'बलवंत नाटक मंडळी'-ला कशा अडचणी आल्या याचे वर्णन कै. कोल्हटकरांनी केले आहे, ते पाहण्या-सारखे आहे.[३] तसेच 'संन्यस्त खड्ग' या नाटकाच्या प्रारंभी 'प्रेक्षकांस सूचना' देअून प्रयोगाच्या सोयीच्या दृष्टीने केलेल्या फेरफारांचा अनुक्रमही नाटककाराला छापावा लागला.[४] प्रवेश-रचना विस्कळित असल्याने या नाटकाची रंगावृत्ती काढल्याची नोंद व. शां. देसाअी यांनी स्वतःच केली आहे.[५] भरत नाट्यशास्त्रा-प्रमाणे 'अुःशाप' नाटकाच्या प्रारंभी नांदी असून सूत्रधार, नटी, परिपार्श्वक यांचा प्रवेश आहे. पण 'संन्यस्त खड्ग' व 'अुत्तरक्रिया' या नाटकांतून मात्र तसा प्रवेश नसून नाटकातील प्रमुख पात्रे प्रथमदर्शनीच रंगभूमीवर आणली आहेत. गोपीनाथ तळवलकरांनी सावरकरांच्या नाटकांतील तंत्राच्या अभावासंबंधी लिहिले आहे की, वीर सावरकरांच्या नाटकात रेखीवपणा व तंत्रशुद्धता यांची मात्र फारशी फिकीर केलेली दिसत नाही. स्वगत भाषणे, प्रवेशाचे पडदे त्यात अजूनही आढळतात. आधुनिक नाट्यतंत्राचीच नव्हे तर आदर्श (क्लासिक) नाट्यतंत्राचीही कदर सावरकर फारसे करीत नाहीत असे दिसते.[६]

---

१. भ. ना. शा. अ. १८, श्लोक १९. २. भ. ना. शा. अ. १८ श्लोक२१. ३. बहु. पृ. २३१, २३२. ४. संन्यस्त खड्ग–प्रेक्षकांस सूचना. ५. मख. प. पृ. २७३. ६. सह्याद्री – जून १९४३, पृ. ४२३.

सावरकरांच्या या कलात्मक तंत्राच्या अुपेक्षेची कारणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच दडली आहेत. 'माझी लेखणी मी लाठीसारखी फिरविली होती. तुम्हांला चुकून त्यात कला, रसात्मकता आढळली अेवढेच,' असे अुद्‌गार सावरकरांनी अेका सत्कार-प्रसंगी काढले होते.[1] 'भावनेस धक्के देण्याचे[2] विचारांना तडाखे लगावण्याचे कार्य' त्यांना इतर वाङ्मयाप्रमाणे नाटकाअुळे साधावयाचे होते. कलाकुसरीची जागती जाणीव त्यात नव्हती. वाङ्मयेतर कार्याला महत्त्व आणि अन्य कार्य बाहुल्य यांची भर त्यात पडली आणि त्यामुळे सावरकरांच्या नाटकांत वरीलप्रमाणे तंत्रदोष राहून गेले.

तीनही नाटकांतील संघर्षाचे स्वरूप

नाटकाचा मूलाधार (Cardinal part of drama) म्हणजे संघर्ष होय. सर्व नाटकांची निर्मिती ही संघर्षातूनच होत असते. (All Dramas ultimately arise out of conflict.)[3] नाट्यवस्तुरचनेची चित्तवेधकता ही बऱ्याच अंशी तीमधील घटकांच्या क्रियाप्रतिक्रियात्मक संघर्षावर अवलंबून असते.[4] त्यामुळे मुख्य संघर्ष निर्माण करणाऱ्या अितर लहान संघर्षात्मक घटना आणि मुख्यप्रधान संघर्ष ह्या गोष्टी निर्माण करण्यात नाटककाराला विलक्षण कलात्मकता दाखवावी लागते. नाट्यवस्तूतील संघर्ष हा जितका तर्कशुद्ध, नैसर्गिक व अटीतटीच्या घटनांच्या मनोहर पेचातून निर्माण झाला असेल तितकी नाटकाची रंगत अधिक व त्याचे यशही श्रेष्ठ.

येथे सावरकरांच्या तिन्ही नाटकांतील संघर्षाचे स्वरूप प्रथम पाहावयाचे आहे; आणि मग ते तसे का झाले याचा शोध त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात करावयाचा आहे.

'अु:शाप' या नाटकातील मुख्य संघर्ष अस्पृश्य संत चोखामेळा आणि स्पृश्य अुच्च वर्णीय हिंदु-धर्ममार्तंड यांच्यामधील आहे. पहिल्या अंकात चोखामेळा व देवीसिंह व नारंभट यांच्या संभाषणांतून या संघर्षाला प्रारंभ होतो व 'चोखामेळ्याचे हे बंड आपण समूळच अुपटून टाकू या' या वाक्यातून संघर्षाची प्रत्यक्ष ठिणगी पडते.[5] दुसऱ्या अंकातील प्रवेश ६ व ७ मध्ये या संघर्षाला तीव्र स्वरूप येअू लागते आणि 'कोटी कोटी अस्पृश्य जातीच्या जीवनाचं अंतिम ध्येय

---

१. केसरी – मे १९४३. २. म. ना. प. अिति. व कार्य पृ. १३०. ३. An Introduction to Dramatic Theory – A. Nicoll – p. 40. ४. म. ना. तं. आणि वि. पृ. १९५. ५. उ:शाप पृ. २३.

कोणतं, आम्हांसही देव आहे किंवा नाही .... कोटी कोटी अस्पृश्यांना ह्याच जन्मी अुद्धार आहे की नाही, ह्या महान प्रश्नाचं अंतिम अुत्तर मिळविण्याच्या, कोटी कोटी अस्पृश्यांना मनुष्यत्वाचे अधिकार मिळवून देण्याच्या–महत्तम कर्तव्यासाठी' चोखा आपले प्राण पणास लावतो. तिसऱ्या अंकात चोख्याची स्थिती विलक्षण गंभीर होते आणि त्याला मूर्च्छितावस्था येअू लागते. संघर्ष शिगेला पोहोचतो. पण प्रत्यक्ष श्रीकृष्ण प्रकट होअून चोख्याच्या प्रश्नांची अुत्तरे अधिकारवाणीने देतात. अस्पृश्यांना या जन्मी परमेश्वराचे दर्शन तर घडतेच, पण ब्राह्मणादी अुच्च वर्णीयांपेक्षाही अस्पृश्य हा देवांना अधिक प्रिय आहे. अितकेच नव्हे तर 'अस्पृश्यांच्या घरी जेवावयास जाण्यास देवांनाही प्रतिबंध नाही असे प्रत्यक्ष श्रीकृष्ण चोख्यास सांगतात. खरोखर नाटकातील मुख्य संघर्ष तिसऱ्या अंकाच्या अखेरीसच संपतो. परंतु पुढे चार व पाच या अंकांत अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढीचा फायदा आपल्या धर्मप्रसारासाठी करणाऱ्या मुसलमान अधिकाऱ्यांच्या तावडीत सावरकरांनी चोखामेळ्याला दिले आहे. त्याने धर्मांतर करावे म्हणून प्रारंभी युक्तिवादाने व नंतर बळाने प्रयत्न केला जातो. चोख्याला देहान्ताची शिक्षा दिली जाते. परंतु श्रीकृष्ण पुन्हा प्रकट होअून चोख्याला वाचवितात व चोख्याला छळणाऱ्या स्पृश्यांना नवी धर्माज्ञा देअून कलियुगात अस्पृश्यत्व वर्ज्य करण्यास सांगतात.

'संन्यस्त खड्ग' नाटकातील संघर्ष हा बुद्ध व विक्रमदेव यांच्या विचारसरणीतील विरोधावर आधारलेला आहे. अंक १, प्रवेश ३ मध्ये या संघर्षाची पहिली चाहूल लागते; आणि याच अंकातील सातव्या प्रवेशात तो शब्दाशब्दीच्या खणखणाटात प्रकट होतो. आपले कृपाण खाली ठेवण्यापूर्वी विक्रम बुद्धास बजावतो की, "पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर, या जगाच्या दुर्दैवाने शस्त्रयुगाचेच प्राबल्य दिसून येअील, बळी तोच कान पिळीत राहील."[1] पुढे दुसऱ्या अंकात कोसलच्या राजाने शाक्यावर स्वारी करून त्याची धूळधाण अुडविल्याची बातमी विक्रमास कळताच तो बुद्धास पुन्हा संन्यासाश्रमातील धोका पटवून देण्याचा प्रयत्न करतो. 'हिंसेची दंतनखे शस्त्राने छाटून टाकते तीच खरी अहिंसा होय' अशी अहिंसेची व्याख्या करून 'ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचे परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच असल्यामुळे'[2] त्या अहिंसेला तो सोडून जातो व पुन्हा 'राष्ट्रधर्मास्तव, मनुष्यधर्मास्तव, भूतदयेस्तव अपरिहार्य साधन म्हणून शस्त्र अुचलतो.[3] शाक्य राष्ट्राला कोसलच्या आक्रमणापासून वाचविण्याची तो

---

१. संन्यस्त खड्ग–पृ. ४१. २. संन्यस्त खड्ग–पृ. ८४. ३. संन्यस्त खड्ग–पृ. ८३.

पराकाष्ठा करतो. शेवटी खुद्द बुद्धावर कोसलचा सेनापती प्रचंड हल्ला करतो तेव्हा विक्रमाचेच खड्ग बुद्धाचे संरक्षण करतो आणि बुद्धाने वर्णन केलेल्या निर्वाणपदाचा तो धिक्कार करतो. पण प्रत्यक्ष धर्म प्रकट होअून विक्रमास 'तू निर्वाणच्युत झाला नाहीस. अुलट ह्या हौतात्म्यानेच निर्वाणपद प्राप्त झालास असे सांगतो; आणि अखेरीस आपले निश्चित आणि अुत्तम मत पुढील श्लोकात प्रकट करतो :–

यद्यपि– संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ
तथापि– तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ॥

'अुत्तरक्रिये'तील संघर्षाची ठिणगी अेका वेडीकडून प्रथम पडते आणि तिने माधवरावांचे मन पेट घेताच ते पुढील प्रतिज्ञा अुच्चारतात : "अुत्तर हिंदुस्थानात हिंदूंची सत्ता स्थापन करण्याच्या, भाअूंच्या अपुऱ्या अिच्छेचा आत्मा, महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या जरीपटक्याच्या पदरात असा पक्का बांधून, अब्दालीचे नाकावर टिचून पानपतचे अुट्टे काढून अुत्तर हिंद जिंकण्याचे ते भाअूंचे कार्य, ती भाअूंची महाराष्ट्रीय अुत्तरक्रिया तरी मी यथाविधी संपादणार."[1] माधवरावांच्या या प्रतिज्ञेच्या आड येणारे मुख्यतः तीन शत्रू असतात. सापासारखा लपंडावी व विषारी नजीबखान, पानिपतचे हाडवैरी हाफीज रहमत व अहंमदखान बंगष! कपटी नजीबखान अब्दालीस बोलावून व बादशहा, सुजा व अिंग्रज मराठ्यांविरुद्ध अुठवून 'कोल्हा सिंहाच्या गुहेत अचानक सोडावा' तसे मराठ्यांना कैचीत पकडण्याचा डाव टाकतो. पण अब्दालीने मराठ्यांशी मैत्रीचा संधी कायम केल्याने व जाटांचा पराभव झाल्याने नजीबखानाचा सर्व विरोध ढासळतो व तोच मराठ्यांना शरण जातो. पुढे सुन्नीती नावाच्या अेका भ्रष्ट मराठा स्त्रीच्या साह्याने मराठ्यांना शत्रूच्या सर्व बातम्या कळू लागतात व अखेर पानपतचा सूड उगविला जाअून मराठ्यांचा विजय होतो. दिल्लीस वस्तुतः हिंदुपदपादशाहीच स्थापन होते.

सावरकरांच्या तीनही नाटकांतील संघर्षाचे स्वरूप पाहिल्यानंतर पुढील काही प्रश्न मनात अुत्पन्न होतात. या संघर्षाचे स्वरूप आंतरक्रियात्मक आहे की बाह्यक्रियात्मक आहे ? (Inner conflict or outer conflict) ते वैचारिक आहे की भावनाप्रधान आहे ? विचाराअंती असे आढळून येते की, त्यांच्या संघर्षाचे स्वरूप हे बाह्यक्रियात्मकच (Outer conflict) अधिक आहे आणि भावनाप्रधानतेपेक्षा ते वैचारिक बाजूकडेच अधिक झुकणारे आहे. याचे कारण नाटकासंबंधीच्या त्यांच्या ध्येयवादी दृष्टिकोनातच सापडते. सावरकरांना मानवी-

---

१. अुत्तरक्रिया – पृ. ५.

जीवनदर्शन दाखवायचे नव्हते तर मानवीजीवनादर्श दाखवायचा होता. मानवी मनाचे सखोल चित्रण करावयाचे नव्हते तर स्वत:च्या विशिष्ट मतांचे दर्शन अुत्कटतेने घडवावयाचे होते. नाटककाराचा स्वमार्गाबद्दलचा निश्चय व मतांबद्दलचा पक्केपणा असल्याने यातून मनोविश्लेषणाला अवसर सापडणेच कठीण. समस्याप्रधान (Problem play) नाटकात मनोविकार दर्शनाला वाव अधिक. पण येथे समस्यांच्या सोडवणुकीबद्दल 'निश्चित आणि अुत्तम मत'[1] सिद्ध असल्याने पात्रांच्या आंतरमनातील द्वंद्वाची शक्यताच नाहीशी होते.

सावरकरांच्या नाटकांतील संघर्ष हा मुख्यत: तत्त्वनिष्ठेतून निर्माण झालेला आहे. त्यामुळे साहजिकच तो वैचारिक स्वरूपाचा, तात्त्विक स्वरूपाचा झाला आहे. 'संन्यस्त खड्गा'वर लिहिताना चिंतामणराव कोल्हटकरांनी 'तत्त्वनिष्ठेतून निर्माण झालेला संघर्ष' असे स्पष्टच म्हटले आहे.[2] वि. द. साठे यांनी 'वैचारिक संघर्ष' असा त्याचा अुल्लेख केला आहे.[3] द. रा. गोमकाळे त्याचा 'तात्त्विक संघर्ष' म्हणून निर्देश करतात.[4] भा. क्र. केळकरांनी 'राजकीय, सामाजिक, तात्त्विक मतांच्या संघर्षांना रंगभूमीवर आणण्यासाठी त्यांनी (सावरकरांनी) आपली कथानके, व्यक्ती, पुढे आणल्या आहेत' असे सांगितले आहे.[5]

अुत्कटभावनाप्रधानता हा सावरकरांच्या व्यक्तित्वातील विशेष त्यांच्या नाटकातील संघर्षालाही क्वचित अुपकारक ठरतो. त्यामुळे वीर वामनराव जोशी यांच्या नाटकांप्रमाणे अुत्कट भावनोद्दीपनावर त्यांच्या नाटकांतील संघर्ष अत्यंत परिणामकारक होतो. विशेषत: अुपकथानकातील काही प्रसंगी त्या संघर्षाचा अुठाव फारच चांगला साधला जातो. 'अु:शाप' मधील अंक ४, प्रवेश २ मधील शंकर व कमलिनी यांची भेट व त्या वेळचे कमलिनीच्या मनातील आंतरद्वंद्व आणि त्याच अंकातील ४ थ्या प्रवेशात शंकरचा भुतांशी झालेला संवाद व त्यांतून प्रकट झालेले त्याचे अंतरंग वाचकांना हेलावून सोडते. तसेच 'संन्यस्त खड्ग'मधील तिसऱ्या अंकातील समरसभेतील सुलोचनेचे भाषण व पाचव्या प्रवेशातील सुलोचनेचे स्वत:च्या मनावरील विवेकाची मुद्रा काढून केलेले स्वगत असेच अुत्कट भावनांनी भरलेले आहे. अुत्तरक्रियेतील तिसऱ्या अंकातील सुनीतीचा व तिच्या आअीचा–वेडीचा–प्रवेशही चित्तथरारक संघर्षाचा नमुना म्हणून चिरकाल लक्षात राहील असाच आहे.

दोन तुल्यबल पक्षांतील अटीतटीचा संघर्ष हाच नाटकाची रंगत वाढवीत असतो. वस्तुनिष्ठतेने दोन्ही पक्षांतील सामर्थ्य प्रेक्षकांपुढे अुभे करून मनोरंजकता,

---

१. संन्यस्त खड्ग पृ. १३२. २. बहु. पृ. २३०. ३. म. ना. तं. वि.– पृ. २०३. ४. सा. वि. द. पृ. ७४. ५. सा. द. पृ. २४९.

चित्तवेधकता निर्माण करणे हे नाटककाराचे कार्य असते. पण सावरकरांच्या नाटकांत तसे क्वचित घडते. अेका विशिष्ट विचारसरणीचे वा व्यक्तीच्या कार्याचे समर्थन करण्याकडेच त्यांचा कल असतो. पराभव मग तो प्रिय विचारसरणीचा असो वा व्यक्तीचा असो–स्वीकारणे त्यांच्या आक्रमक व विजिगीषु-वृत्तीला अशक्य होते. बालपणी 'राम-रावण युध्दासारख्या खेळांत किंवा हिंदु-मुसलमान पक्षांतील लुटुपुटीच्या लढाअीत चुकून रावणाचा किंवा मुसलमानांचा जय झाला तरी त्यांना तो असह्य, अस्वीकरणीय वाटे.[1] मग नाटकांत तर सर्व पात्रांच्यावर त्यांचा जनक, निर्माता म्हणून अधिकारच होता. तेव्हा प्रतिपक्षाचे चित्रण करताना त्यांच्या हातून ते थोडे दुबळे, कमकुवत, फिके, होणेच जास्त स्वाभाविक होते; आणि तसे ते झालेही आहे. याची जाणीव विशेषत: 'संन्यस्त खड्ग' आणि 'अुत्तरक्रिया' या नाटकांत जास्त होते. बुद्धापेक्षा विक्रम देवाचे चित्रण अधिक प्रभावशाली झाले आहे ते याच कारणामुळे. बुद्ध-विक्रम संवादात दोन ठिकाणी विक्रमाचे विधेय बुद्धाने 'अखंडनीय' म्हणून पराभव कबूल केला आहे.[2] विक्रमाच्याच तोंडून सावरकरांना आपले तत्त्वज्ञान मांडावयाचे असल्याने बुद्धापेक्षा विक्रमाच्याच संवादांना अधिक जागा देण्यात आली आहे आणि शेवटी प्रत्यक्ष धर्माच्या तोंडूनच विक्रमाच्या विचारसरणीवर मान्यतेचे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. 'अुत्तरक्रिया' नाटकाच्या कथानकाच्या निवडीतच सावरकरांनी मराठ्यांच्या पानिपतावरील पराभवाचा अितिहास न निवडता मराठ्यांच्या पुनर्विजयाचा अितिहास हेतुपुरस्सर निवडला आहे. मराठ्यांच्या अितिहासातील विजयाचा आणि वैभवाचा काळ तेवढा त्यांना गेय आणि वर्ण्य वाटतो. म्हणूनच 'हिंदुपद-पादशाही' या ग्रंथाच्या अखेरीस मराठ्यांच्या वैभवशाली काळाचा निरोप घेताना दु:खपूर्ण अंत:करणाने, अश्रूपूर्ण नेत्रांनी ते शेवटचा पडदा टाकतात.[3] 'अुत्तरक्रिया' नाटकातील अेकूण चोवीस प्रवेशांपैकी प्रतिपक्षाच्या चित्रणासाठी त्यांनी केवळ पाचच प्रवेश खर्ची घातले आहेत. (अंक १–प्र. ३, अंक २–प्रवेश १, २, ६, अंक ३– प्र. १) अितर ठिकाणी प्रतिपक्षाचे जे चित्रण त्यांनी केले आहे ते बव्हंशी मराठ्यांच्या विजयाच्या पार्श्वभूमीवर केले आहे. प्रतिपक्षाकडील कोणतीही व्यक्तिरेखा प्रभावी दमदार अशी त्यांनी रेखाटली नाही. अुलट यशवंतराव, माधवराव, सुनीती, बिनीवाले, अित्यादी मराठ्यांच्या पक्षाकडील व्यक्तिरेखा तुलनेने अधिक ठसठशीत रेखाटलेल्या आहेत. त्यामुळे त्याच व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनांवर कोरल्या जातात. म्हणून दोन्ही तुल्यबल पक्षांतील अुत्कट, अटीतटीच्या क्रियाप्रतिक्रियात्मक अशा संघर्षाच्या आनंदाचा लाभ प्रेक्षकांना

---

१. आ. च. पृ. ५५–५६. २. संन्यस्त खड्ग–७७ व १३१. ३. हिं. प. पा.– पृ. २३९.

मिळू शकत नाही. नाट्याचार्य खाडिलकरांच्या ऐतिहासिक नाटकांशी सावरकरांच्या नाटकांशी तुलना करताना संघर्षाच्या स्वरूपातील हा फरक चटकन लक्षात येतो.

व्यक्तिमत्त्वानुरूप अुपसंहार

नाटकाचे पर्यवसान किंवा अखेरी साधतानाही नाटककारास ती काही नियमांनीच साधावी लागते. नाटकातील पात्रांच्या निर्मितीनंतर त्यांच्या स्वभावावर किंवा कृतीवर जसा नाटककाराचा अधिकार चालू शकत नाही, तसा त्यांच्या अखेरीवरही चालू शकत नाही. अखेरीच्या अंकात सर्व कथानक 'फलयोगा'कडे शीघ्र गतीने आणि कार्यकारणभावाच्या लयबद्धतेने नेणे आवश्यक असते. अलेक्झांडर ड्यूमाने नाटकाचा शेवटचा अंक आटोपशीर असावा (Last act brief) असे म्हटले आहे;[1] पण नुसता आटोपशीरपणाही पुरेसा पडत नाही. 'The Art of Drama' या पुस्तकात अखेरीसंबंधी पुढील विचार व्यक्त केले आहेत : "A satisfactory solution or de'nouement in whatever type of drama will be found to have certain characteristics–clarity, plausibility and interest."[2]

यावरून नाटकाची अखेरी सुस्पष्ट, संभाव्य आणि अुत्कंठापूर्ण असावी हे तर खरेच ! पण याबरोबर ती तर्काला पटणारी व अटळ अशी असावी.[3]

नाटकाच्या अखेरीच्या या तंत्राच्या संदर्भात सावरकरांची नाटके तपासून पाहिली तर दोन कसोटयांना ती बव्हंशी अुतरतात. जे प्रश्न त्यांनी नाटकांत निर्माण केले आहेत त्यांची सुस्पष्ट अशी अुत्तरे आपणांस मिळतात. अस्पृश्योद्धार, शुद्धी, स्त्रियांचा अपहार, मंदिर-प्रवेश, हिंसा-अहिंसा, बलात्कारित भ्रष्ट हिंदू स्त्रिया, परदेशगमनबंदी, मराठ्यांच्या अुत्थानामागील हिंदुराष्ट्र निर्मिण्याचे तत्त्व अित्यादी प्रश्नांना सावरकरांनी आपल्या तिन्ही नाटकांतील निर्णायक स्वरूपाची अुत्तरे दिली आहेत. तसेच नाटकांच्या अखेरीपर्यंत प्रेक्षकांचे कुतूहल कायम राहावे असा प्रयत्नही त्यांनी काही युक्त्या योजून केला आहे. 'अुःशाप' नाटकाच्या ४ थ्या अंकाच्या अखेरीस शिकंदरखान (शंकर) किंवा बंगषचा प्रत्यक्ष हल्ला होण्यापूर्वी कमलिनीचे गंगाजीच्या घरातून पलायन दाखवून कुतूहलनिर्मिती केली आहे. 'संन्यस्त खड्गा'त शाक्य राष्ट्राची शाका होण्याचा प्रसंग प्राप्त झाला असता

---

१. Playmaking – Archer – p. 112. २. The Art of Drama – Millett and Bentley – p. 194. ३. The Art of Drama – Millett and Bentley – p. 195.

दुसऱ्या अंकाच्या अखेरीस विक्रम पुन्हा हाती कृपाण घेतो व रणांगणावर चालून जातो. तिसऱ्या अंकात 'समरसभेच्या प्रवेशात सुलोचनेचे वेषांतर व तिचा वल्लभ शत्रूच्या ताब्यात सापडून त्याचा शिरच्छेद होण्याची खात्री वाटत असताही 'शरण नाही रण–मारीत मारीत मरण' असा जेव्हा ती अुद्घोष करते, तेव्हा प्रेक्षकांचे कुतूहल पराकोटीस पोहोचते. 'अुत्तरक्रिये'तही अशाच प्रकारचे कुतूहल जागृत ठेवण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला आहे. तिसऱ्या अंकाच्या अखेरीस वेषांतरित सुनीतीचे प्रकट होणे आणि यशवंतरावाची व तिची भेट होताच कर्तव्याचे रणशिंग फुंकले जाअून 'यातून जगलो तर पुन्हा भेटू, न जगलो तर. . ' या वाक्यासरशी सुनीतीचे पुन्हा निर्गमन विलक्षण अुत्कंठा निर्माण करते व त्यातच दारूच्या कोठारातील भीषण अंधार आणि अग्निकल्लोळ, दवंडीच्या ललकाऱ्या आणि युद्धाचा घूमधडाका यांनी चौथा अंक प्रेक्षकांच्या पुढे रंगभूमी सारखी जागती ठेवतो. तेव्हा 'Clarity and Interest' या दोन कसोटयांना सावरकरांची नाटके वव्हंशी अुतरतात असा विचार मान्य होण्यास हरकत नसावी.

परंतु संभाव्यता, तर्कशुद्धता व अपरिहार्यता हे निकष मात्र त्यांच्या नाटकांना समाधानकारकरीत्या लावून दाखविता येत नाहीत.

'अु:शाप' आणि 'संन्यस्त खड्ग' या नाटकांतील नायकांची पेचप्रसंगांतून सोडवणूक करताना ते अखेरीस नाट्यबाह्य संकेतांचा अुपयोग करतात. 'अु:शाप'मध्ये दैवी चमत्कार व प्रत्यक्ष श्रीकृष्णाचा अवतार दाखवून चोखामेळ्याची सुटका केली जाते. तर 'संन्यस्त खड्गा'त धर्माला अवतार घ्यावयास लावून बुद्ध व विक्रमदेव यांच्या भिन्न विचारसरणींतील मतभेद मिटविले जातात. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी संभाव्यता, स्वाभाविकता, तर्कशुद्धता व अपरिहार्यता आढळत नाही.

याच निकषांच्या अनुरोधाने आणखी अेक गोष्ट खटकते. ती म्हणजे सावरकरांच्या तीनही नाटकांत दिसून येणारे अपमृत्यू. 'अु:शाप' या नाटकात कमलिनी-शंकर, 'संन्यस्त खड्ग'मध्ये सुलोचना-वल्लभ आणि 'अुत्तरक्रिये'त सुनीती या व्यक्तींचे अपमृत्यू नाटककाराने दाखविले आहेत. ह्या पात्रांपैकी कमलिनी व सुनीती यांच्या मृत्यूमागील कारणेही सवळ नाहीत व ते मृत्यू अपघाती आहेत. सुलोचना-वल्लभ यांचा रणांगणावर 'अभिमुख आघाती' जरी मृत्यू झाला असला, तरी धर्माच्या अवताराने त्या दोघांनाही पुनर्जीवन देण्याची संधी नाटककाराला अनायासे प्राप्त झाली होती. पण त्याने ती संधी हेतुपुरस्सरच साधली नाही. तसेच त्या पात्रांचे मृत्यू दाखवून नाटकातील काही महत्त्वाचे प्रश्न सुटले आहेत असेही नाही. कमलिनीने सूडाच्या सुरीने बंगषखानाचा वध केलाच होता.

गंगाजीने दुसऱ्या शिपायाला घायाळ केले होते. शंकरने तिसरा अुरलेला शिपाअीही ठार मारला. आपल्या हिंदुत्त्वाचे, पावित्र्याचे संरक्षण कमलिनीने केले होते. शंकरलाही धर्मांतरावद्दल पश्चात्ताप झाला होता व पश्चात्तापाने तो हिंदू झाला होता. अशा स्थितीत त्या दोघांचा मृत्यू घडवून आणून नाटकातील कोणताही महत्त्वाचा प्रश्न सुटणार नव्हता. 'अुत्तरक्रिये'तील सुनीतीचा स्वीकार यशवंतरावाने केला होता. तेव्हा बलात्कारित स्त्रियांचा प्रश्न सुटलेलाच होता. हिंदु-धर्माच्या पवित्र ध्वजाखाली देह ठेवण्याची संधी सुनीतीला पुनरपि मिळाली होती. तरीही तिचा अचानक मृत्यू नाटककाराने दाखविला आहे. याचे कारण काय, या प्रश्नातूनच सावरकरांच्या नाटकांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंध जोडला जातो. या प्रश्नाचे अुत्तर सावरकरांच्या विचारसरणीत आणि नाटकांसंबंधी अेका प्रसंगी काढलेल्या अुद्गारात पाहावयास सापडते.

हौतात्म्याचे आकर्षण हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अेक महत्त्वाचा घटक आहे. किंवहुना त्यांच्या देशभक्तीला क्रियाशीलता प्राप्त झाली ती चाफेकरांच्या हौतात्म्यातूनच. हौतात्म्यातील प्रेरक शक्ती त्यांनी स्वतः अनुभवली होती. आणि म्हणूनच 'चाफेकरांच्या फाशीतून आम्ही जन्मलो; आमची फाशी आणखी कोणास जन्म देअील आणि हा वंश राखील' या वाक्यातून हौतात्म्यातील सामर्थ्य, प्रेरणा त्यांनी प्रकट केली.[1] हौतात्म्य जागविल्याशिवाय भारताला खडवडून जाग येणार नाही अशी त्यांची श्रद्धा होती. मदनलाल धिंग्रा याला लिहून दिलेल्या बचावाच्या भाषणात त्यांनी हाच विचार व्यक्त केला होता.[2] (The only lesson required in India at present is to learn how to die and the only way to teach it is by dying ourselves.) पुढे 'अंदमानच्या अंधेरी'तून पत्र लिहिताना त्यांनी पुन्हा हेच सांगितले की, अेकंदरीत तरुणांच्या दृष्टीसमोर असायला योग्य असे अुदात्त ध्येय संपत्ती मिळविणे हे नाही तर आत्म-यज्ञ करणे हे आहे."[3] याच पत्रातून ते आणखी अेका ठिकाणी लिहितात, 'हुतात्म्यांनी सोसलेल्या विपत्ती हीच प्रेरक शक्ती आहे. ती जनतेला हालविते, टोचते आणि पुढे ढकलते.'[4] कर्तव्य करीत असताना हौतात्म्य पत्करून मृत्यूला मिठी मारणे हीच सुखकर मरणासंबंधी त्यांची कल्पना बनली होती. वर अुल्लेखिलेली सर्व पात्रे याच कल्पनेतून मरणाला कवटाळतात. कमलिनीला आलिंगन देअून मरताना शंकर म्हणतो, " हे दयाळा देवा, हे गोड मरण मला जीवनाहून आनंददायक वाटत आहे."[5] वल्लभ व सुलोचना परस्परांजवळ मृत्युशय्येवर निजली असताना पुढील वाक्ये अुच्चारतात[6] :

---

१. आ. च. पृ. १६५. २. सा. च. क. पृ. २७३. ३. अन्द. अं. पृ. ५८.
४. अन्द. अं. पृ. ४७. ५. अुःशाप पृ. १५०. ६. संन्यस्त खड्ग पृ. १२८.

सुलोचना : अशा मरणानेच आपले जीवन सफल झाले. आपले कथानक सुखान्त झाले.

वल्लभ : कोणती घटना सुखान्त वा दुखान्त, हे आपण सुख कशात मानतो त्यावर अवलंबून आहे. लोककल्याणार्थ मरेतो लढणे हीच आपली कालची अिच्छा. ती पुरी झाली म्हणून मरणच सुखान्त.

शत्रूशी लढत 'अुत्तरक्रिये'तील सुमती जेव्हा धारातीर्थी पडते तेव्हा 'याहून सुखकर मरण ते कोणते?' असाच प्रश्न ती विचारते.[1]

सावरकरांची मूळ विचारसरणी व नाटकातील अुल्लेखित व्यक्तींच्या कृती नि त्यांचे अुद्गार वाचले म्हणजे नाटककाराच्या वैयक्तिक अिच्छेनुसार त्याच्या व्यक्तित्वानुरूप हे सर्व घडले आहे याची बरीचशी कल्पना येते. पण या कल्पनेला वळकटी येते ती सावरकरांच्या अेका अुद्गारामुळे. नाट्याचार्य खाडिलकरांनी 'संन्यस्त खड्ग' नाटक सुखान्त करण्यासंबंधी केलेली सूचना अैकताच सावरकर अुद्गारले, "त्यांच्यासारख्या (खाडिलकरांसारख्या) नाटककाराला मी सांगायला पाहिजे असे नाही. पण त्या तरुण जोडप्याने राष्ट्रासाठी धारातीर्थी जी चिरनिद्रा घेतलेली दाखविली, त्यामुळे आजच्या तरुणांत जागृती व्हावी हीच माझी मनीषा! महत्तम त्यागाच्या दर्शनाने अनुकरणाच्या बीजाला अंकुर फुटण्याचा संभव."[2]

खरोखर नाटकाच्या तंत्राच्या दृष्टीने पाहिले तर नाटककाराच्या लहरीनुसार पात्राचा अंत घडविणे अिष्ट नव्हे. आर्चर वुअिल्यमने स्पष्टच सांगितले आहे की, We must believe that he dies because he cannot live and not merely to suit the playwright's convenience, and help him to an effective curtain.[3] नाटकांतील पात्रांचा असा अकस्मात अंत म्हणजे नाटककाराने त्या पात्रांना आत्महत्या करावयासच भाग पाडणे होय. नाटकातील पात्रांचा मृत्यू प्रेक्षकांना कार्यकारणभावाने पटला तर मान्य व परिणामकारक वाटेल. 'The art of Drama' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे 'Suicide on the stage must be made convincing and intelligible even-though in life it may not often be so.'[4]

अशा रीतीने सावरकरांच्या नाटकांचे पर्यवसान तर्कशुद्ध व अपरिहार्य नसते हे आपण पाहिले आणि याला मुख्य कारण नाटककाराचे विशिष्ट व्यक्तिमत्त्व हेच होय, असा निष्कर्षही आपण पुराव्यांच्या आधारे काढला. येथे आणखी

---

१. अुत्तरक्रिया पृ. १०७ २. बहु. पृ. २३८. ३. Play Making p. 271.
४. The Art of Drama p. 196.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

[redacted]

अेक असा विचार येतो की, स्वत: सावरकर हे तर्कशुद्ध विचार करणारे अेक विचारवंत आहेत. त्यांच्या निबंध-वाङ्मयातून तर्कशुध्द विचारसरणीचा आढळ ठायी ठायी होतो. मग नाट्यवाङ्मयातून त्यांच्या तर्कशुद्धतेचा लोप का व्हावा? या प्रश्नाचे अुत्तरही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच आहे. त्यांच्या नाट्यवाङ्मयात तर्कनिष्ठ सावरकरांवर प्रचारवादी सावरकर मात करतात असेच आढळून येते.

'सावरकरांच्या मनाची बैठक निसर्गत:च वैचारिक असली, तरी त्यांच्या मनात सनातन श्रद्धेचा ओलावा भरपूर आहे हे त्यांच्या तिन्ही नाटकांच्या पर्यवसानावरून स्पष्ट दिसते,' असे विधान श्री. द. रा. गोमकाळे यांनी केले आहे.[1] पण हे विधान अर्धसत्य वाटते. कारण सावरकरांनी श्रीकृष्ण किंवा धर्म यांचा अवतार अनुक्रमे 'अु:शाप' व 'संन्यस्त खडग' या नाटकांतून जो दाखविला आहे, तो भाविकतेने दाखविलेला आहे असे वाटत नाही. चातुर्वर्ण्यप्रणीत समाज-रचना निर्माण करणाऱ्या श्रीकृष्णाच्या मुखानेच नवीन समाजरचनेचे शास्त्र त्यांनी वदविले आहे. तसेच कर्मसंन्यासी व कर्मयोगी यांच्यातील निर्वाण-पदासंबंधीच्या वादाचा निर्णय 'मानवधर्माचे अधिष्ठान असणाऱ्या' धर्मासारख्या अधिकारी पुरुषाकडूनच लावणे त्यांना अिष्ट वाटले असावे. देव आणि धर्म या दोन्ही गोष्टींबद्दल सावरकरांचे विचार मुख्यत: अुपयुक्ततावादावर आधारलेले आहेत. 'देव, अवतार आणि धर्म हे हिंदूंचे अेकत्व साधणारे म्हणून त्यांना प्रिय आहेत.'[2] हिंदु-राष्ट्राच्या अभ्युन्नतीस जो आज अुपकारक, अुद्धारक तोच आचार आजचा सदाचार, आजचा धर्म असे ते मानतात.[3] 'अगदी पहिला व प्रख्यात अुपयुक्ततावादी जर कोणी असेल तर तो पार्थसारथी भगवान श्रीकृष्ण होय', अशी त्यांची बुद्धिनिष्ठ श्रद्धा आहे.'[4] त्यामुळे सनातन श्रद्धेच्या भरपूर ओलाव्यामुळे सावरकरांनी वरील दोन नाटकांचे पर्यवसान घडवून आणले हे मत विचारान्ती टिकण्यासारखे नाही. मात्र 'अुत्तरक्रिये'तील दिव्य राजपुरुषांचा, हिंदुवीर नृपतींचा अवतार सावरकरांच्या ठायी असलेला हिंदुपरंपरेचा अभिमान प्रकट करतो.

कलेपेक्षा प्रचाराला प्राधान्य

नाटकाचे पर्यवसान नैसर्गिकरीत्या व्हावे हा नाट्यशास्त्रातील नियम सावरकरांना मान्य असावा असे त्यांच्याच अेका नाटकावरून दिसते. 'संन्यस्त खड्ग' नाटकात निराश सुलोचनेस नलिनी धीर देते. तेव्हा सुलोचना म्हणते, "विधी हा काही अिष्टलोलुप अल्लड प्रेक्षकांच्या पैशाने ओशाळलेला कोणी

---

१. सा. वि. द. पृ. ७७. २. सा. वि. द. पृ. १०४. ३. रत्ना. हिं. प. पा. व. प्रति. पृ. ७३. ४. केसरी ४–ऑगस्ट १९२५.

नाटककार आहे की काय, की ज्याने त्याची सगळी नाटके अनैसर्गिक विपर्यास करून सुखान्तच रचली पाहिजेत.''[1] पण 'संन्यस्त खड्ग' नाटकाचा शेवट सुखान्त होण्याची शक्यता असूनही तसा तो सावरकरांनी का केला नाही, यासंबंधी स्वत: त्यांनी खाडिलकरांना दिलेले अुत्तर आपण पूर्वी पाहिलेच आहे. म्हणजे कलात्मकतेत अुणीव राहण्याचा दोष पत्करून सुद्धा सावरकरांनी ते नाटक दु:खान्त केले आहे. 'अु:शाप' व 'अुत्तरक्रिये'त प्रमुख पात्रांचा–तरुण युवक युवतींचा अंत दाखवून त्यांनी आपला अिष्ट हेतू–आपला ध्येयवाद–प्रकट केला आहे. कलावंत सावरकरांवर प्रचारक सावरकर मात करतात ते असे. नाटकाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनच प्रचारवादी आहे. 'समाजाला मंगलास्पद असणाऱ्या ध्येयाकडे प्रवृत्त करायला नाट्यकला हे अेक अुपयुक्त साधन आहे' असे ते मानतात.[2] 'बंदुका घेण्यास शिकविणारी नाटके लिहावीत' असे त्यांचे स्पष्ट मत आहे.[3] केवळ आनंद-निर्मिती हे नाटकाचे कार्य नसून संसार कसा असावा हेही नाटकाने दाखविले पाहिजे अशी त्याची भूमिका आहे.[4] या सर्व मतांतून सावरकरांचा ध्येयवादी दृष्टिकोन, बोधवादी विचारसरणी प्रकट होते आणि त्यांच्यातील कलावंत जेव्हा नवनिर्मिती करू लागतो तेव्हा हीच विचारसरणी त्यावर प्रभाव गाजविते. 'त्यांच्या नाटकांत अुच्च दर्जाचा कलावंत अभावानेच आढळतो' असे म्हटले जाते ते याच कारणामुळे होय.[5] सावरकरांची नाटके प्रचारकी का झाली, या प्रश्नाचे अुत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अशा रीतीने आढळून येते.

हा प्रचारकी बाणा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात किती मुरला आहे, याचे अनेक पुरावे त्यांच्या नाटकांच्या अभ्यासाच्या संदर्भात सापडतात. 'संन्यस्त खड्गा'बद्दल लिहिताना कै. चिंतामणराव कोल्हटकरांनी काही मार्मिक पुरावे दिले आहेत. 'बलवंत नाटक मंडळी'ने सावरकरांच्या सन्मानार्थ चिपळूणमधील ग्रामस्थ अिष्टमित्रांसह भोजन समारंभ करावयाचे ठरविले होते. तेव्हा भोजनास संमती देताना 'पण ते सहभोजन असावे' अशी अट सावरकरांनी घातली. कै. कोल्हटकरांनी यासंबंधी लिहिले आहे :– ''कोणत्याही प्रसंगी त्यांना आपल्या भूमिकेचा विसर पडत नसे. अेखाद्या प्रचारकाप्रमाणे ते प्रसंग मिळताच त्याचा आपल्या कार्याला अुपयोग करून घेतल्याविना सोडीत नसत.''[6] अेका गावाला भेट देण्याच्या वेळीही 'स्पृश्यास्पृश्य मुले अेकत्र सहशिक्षण घेअू लागली म्हणजे मी तुमच्या गावी अवश्य येअीन' अशी अट त्यांनी घातली

---

१. संन्यस्त खड्ग पृ. ९१. २. अु:शाप पृ. ५. ३. केसरी ९-११-१९४३.
४. म. ना. प. अिति. व कार्य पृ. १३०. ५. सा. वि. द. पृ. ५८.
६. बहु. पृ. २३९.

होती.[१] 'अुःशाप' नाटक स्पृश्यास्पृश्य सरमिसळ बसवून पाहण्याची रूढी त्यांनी पाडली.[२] सावरकरांचा हा प्रचारकी बाणा 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रात पानोपानी प्रकट झालेला आहे.

सावरकरांची नाटके त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार असल्याने ती प्रचारकी थाटाचीच होणे स्वाभाविक होते. सावरकरांच्या बहुतेक टीकाकारांनी हे मान्य केले आहे आणि या प्रचारकी वृत्तीमुळेच नाटकांत न्यूनता निर्माण झाली आहे, असे काही अपवाद वगळले तर, बहुतेक टीकाकारांचे मत आहे. श्री. गोमकाळे यांनी सावरकरांच्या नाटकांवर अभिप्राय देताना सावरकरांची नाटके 'प्रचारात्मक असून केवळ प्रचाराची भूमिका घेतल्यामुळेच विशिष्ट प्रकारचे पर्यवसान दाखविले आहे', असे म्हटले आहे.[३] सावरकरांनी प्रचाराचा आग्रह सोडून कलेच्या किंवा केवळ नाट्याच्या दृष्टीने नाटके लिहिली असती, तर ती अजूनही रंगभूमीवर घुमत राहिली असती असा विश्वास श्री. भा. कृ. केळकर यांना वाटतो.[४] ही सावरकरांची तिन्ही नाटके मात्र सर्वस्वी प्रचारकी थाटाची आहेत, असा अभिप्राय डॉ. अ. ना. देशपांडे यांनी दिला आहे.[५] श्री. गोपीनाथ तळवलकर यांनीही सावरकरांची नाटके प्रचारकी आहेत हे मान्य केले आहे.[६] 'अुत्तरक्रिये'वर अभिप्राय देताना 'नाटकाचा अुद्देश विशिष्ट मताचा प्रचार हा आहे' असे श्री. वि. सी. सरवटे यांनी म्हटले आहे.[७] श्री. वि. स. खांडेकरांनी 'अुःशाप' नाटकासंबंधी वरीलप्रमाणे विचार व्यक्त केले आहेत.[८]

सावरकरांची नाटके प्रचारकी थाटाची आहेत. या प्रचारकी वृत्तीमुळेच नाटकांचे पर्यवसान ते विशिष्ट पद्धतीने करतात आणि ही प्रचारकी वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच अेक विशेष कसा आहे हे आपण पाहिले. आता त्यांनी आपल्या नाटकांतील पात्रांच्या तोंडून कोणकोणत्या मतांचा प्रचार केला आहे ते सोदाहरण पाहावयाचे आहे.

नाटकांतून केलेला स्वमतांचा प्रचार

हिंदुत्व, हिंदुराष्ट्र, हिंदुधर्म, हिंदु-परंपरा यांचा अभिमान सावरकरांची बहुतेक पात्रे अशा अभिनिवेशात प्रकट करीत असतात की, त्याला प्रचाराचेच स्वरूप प्राप्त होते. हिंदुधर्म सोडून दुसरे घर पाहावे असा नुसता विचार बोलून दाखवितानाच 'अुःशाप'मधील कमलिनी म्हणते, "आपण हिंदूच आहोत आणि

---

१. बहु. पृ. २४०. २. रत्ना. हिं. प. पा. इति. पृ. ५०–५१. ३. सा. वि. द. पृ. ५८, ६७. ४. सा. द. पृ. २५२. ५. आ. म. वा. अिति. पृ. ४३. ६. सह्याद्री – जून १९४४. पृ. ४२४. ७. म. सा. समा. पृ. ४९२. ८. म. ना. सं. पृ. ९१.

हिंदू आपलेच आहेत. हिंदु-धर्माचे आपले पूर्वार्जित घर सोडून आपणांस दुसरे घर पाहणे असेल तर ते अेका नरकाविना अन्यत्र कुठेही मिळणार नाही.''[१] गंगाजी नावाच्या वेश्येजवळ ती विनवणी करते, ''माझं हे कुलव्रत, माझा हा हिंदुधर्म आपण रक्षण करा. कमलिन्नीच्या प्रियकराने–शंकरने–तिच्यासाठी हिंदुधर्माचा त्याग केल्याचे तिला कळताच ती अुद्‌गारते, ''हिंदुत्वाचं मूल्य माझ्यासारख्या दुर्गंध मूत्रयुक्त अेका यःकश्चित मुलीवरच्या प्रीतीहून जो अधिक समजला नाही तो अधमच असला पाहिजे.... केवळ व्यक्तिगत छळाचा सूड घ्यायचा म्हणून जो आपल्या हिंदुधर्माला लाथाडतो, त्याच्या नीचपणाची पराकाष्ठा झाली असे मी समजते.''[२] कोणाही अहिंदूला स्वेच्छेने स्पर्श न करण्याचा आपला निर्धार प्रकट करून कमलिनी सांगते, ''मी हिंदुत्वाच्या वेशीचं रक्षण करीत मरेन.''[३] आणि जेव्हा ती तशी मरते, तेव्हा हिंदु-कुमारिकांना पावित्र्यरक्षणाचा आणि धर्म-संगोपनाचा अेक प्रदीर्घ संदेश देअून मग मरते.[४]

हिंदु-धर्माबद्दलचा असाच अभिमान तिचा भाअू किसन याच्या ठिकाणी आहे. हिंदु-धर्माच्या त्यागाची आवश्यकता शंकरने किसनच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करताच किसन म्हणतो, ''दिल्लीच्या मयूरासनावर बसविण्यासाठीही मी हिंदुत्वाचा त्याग करणार नाही. अस्पृश्यतेचा छळ सोशीन पण हिंदुबंधूंच्या दाराशी पाण्याविना तळमळत पडेन.... हिंदूंच्या रूढीच्या हत्तीखाली चिरडून मरेन, पण हिंदू म्हणून मरेन.... मीही हिंदू महारच राहणार, हिंदू म्हणूनच जगणार, हिंदू म्हणूनच मरणार, हिंदू म्हणूनच हिंदु-कुळात परत जन्म घेणार.''[५]

शंकरही पश्चात्तापदग्ध झाल्यावर 'मरणंच तर माझ्या हिंदुधर्माच्या रक्षणासाठी' असे म्हणून मरण्याची प्रतिज्ञा करतो.[६] सर्व भुतेही 'हिंदु-कन्यकांवर बलात्कार करू पाहणाऱ्या दुष्ट दैत्यातील निदान अेका तरी दैत्याला वधदंड देअून' प्रायश्चित्त घेण्याचा आदेश शंकरला देतात.[७]

चोखामेळा आपल्या अस्पृश्य-बंधूंना अुपदेश करताना स्वतःचा हिंदुधर्म विसरत नाही.[८] मुसलमान धर्मापेक्षा हिंदुधर्माची श्रेष्ठताच चोख्याच्या मुखाने अखेर नाटककाराने सांगितली आहे.[९]

गंगाजीसारखी वेश्याही कमलिनीला सांगते, '(माझं) रक्त, मांस, आणि प्राण अजून निर्मळ आहेत. हिंदूचे हिंदू आहेत. त्यास तुझ्या हिंदुत्वाच्या रक्षणार्थ आहुती देअून मी स्वतःच्या हिंदुत्वाचं रक्षण करीन.''[१०]

---

१. अु:शाप पृ. ४२. २. अु:शाप पृ. १२१. ३. अु:शाप पृ. १३६. ४. अु:शाप पृ. १४७. ५. अु:शाप पृ. ९२. ६. अु:शाप पृ. १३३ ७. अु:शाप पृ. १३५. ८. अु:शाप पृ. १९–२०. ९. अु:शाप पृ. १५२. १०. अु:शाप पृ. ७९.

मराठी राज्याच्या संस्थापनेमागे हिंदुपदपादशाही स्थापण्याचा, स्वधर्माचे राज्य स्थापण्याचा, हिंदुराष्ट्र निर्मिण्याचा प्रयत्न होता, हा मुख्य विचार पटविण्यासाठी 'अुत्तरक्रिया' या नाटकात सावरकरांनी त्यातील बहुतेक प्रमुख पात्रांच्या मुखांतून ह्याच मताचा प्रचार केला आहे. हेच सूत्र सर्व नाटकांत गुंफलेले पाहावयास सापडते.

अुत्तर हिंदुस्थानात हिंदूंची सत्ता स्थापन करण्याची सदाशिवराव भाअूंची अिच्छा होती. माधवराव पेशवे देखील त्याच अिच्छेचा अुल्लेख करून म्हणतात, "भाअूंच्या अपुऱ्या अिच्छेचा अश्मा महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या जरीपटक्याचे पदरात असा पक्का बांधून, अबदालीच्या नाकावर टिच्चून, पानपतचे अुट्टे काढून अुत्तर हिंद जिंकण्याचे ते भाअूंचे कार्य, ती भाअूंची महाराष्ट्रीय अुत्तरक्रिया तरी मी यथाविधी संपादन करणार."[१] अबदालीच्या वकिलाला शिंदे बजावतात, "वास्तविक दिल्लीचे, हिंदुस्थानचे सिंहासन हिंदूंचे. ते पृथ्वीराजापासून महंमद घोरीच्या तरवारीच्या बळाने मुसलमानांनी जिंकले."[२] नवलसिंग जाटास पराभूत केल्यावर आपल्या ध्येयाचे स्पष्टीकरण करताना सरसेनापती बिन्नीवाले म्हणतात, "वास्तविक हिंदुस्थान हिंदुमय करून स्वधर्म राज्य स्थापावे हा आमचा पूर्वापार मनोदय. तीन पिढ्या मराठे त्यासाठी यवनांशी झुंजत आले."[३] रजपूतादी हिंदूंच्या राज्यसंस्थापनेमागील प्रयत्नांपेक्षा मराठ्यांच्या प्रयत्नांचे वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व सिद्ध करताना यशवंतराव म्हणतात, "बंगालपासून सिंधपर्यंत साऱ्या हिंदूंत, हिंदुस्थानात अेकछत्री हिंदुराज्य करील असा अेकही वीर अुरला नसता अेकट्या मराठ्यांनी तेवढे साहस केले."[४]

हिंदुत्व व हिंदुधर्माबद्दलचा अभिमान 'अुत्तरक्रिये'तील पात्रेसुद्धा प्रकट करतात. दुआबच्या कानीत मराठ्यांचे सैन्य सापडल्याची वार्ता यशवंतरावजीची द्वितीय पत्नी सुशीला हीस कळताच ती म्हणते, 'हिंदू म्हणून हिंदु-सैन्य अशा संकटी वेढले असता गाद्यागिरद्यांवर लोळत मला राहवत नाही."[५] सुनीती व तिची दासी अम्मा या दोघींना हिंदुधर्माचा विलक्षण अभिमान आहे; आणि मरतानाही सुनीतीने शेवटची अिच्छा अेवढीच सांगितली आहे की, 'हिंदुत्वाच्या अपजयाचे दारुण दुःख ज्या मी जन्मभर सोसले त्या मला मरताना तरी हिंदुधर्माच्या जयवाद्यांच्या निनादात सुखाने मरू द्यावे."[६]

---

१. अुत्तरक्रिया पृ. ५. २. अुत्तरक्रिया पृ. ५. ३. अुत्तरक्रिया पृ. ४७.
४. अुत्तरक्रिया पृ. ४८. ५. अुत्तरक्रिया पृ. ६०. ६. अुत्तरक्रिया पृ. १०८.

अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धी हा प्रचाराचा महत्त्वाचा विषय सावरकरांच्या नाटकांत कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्षपणे प्रकट झाला आहे. असा प्रचार करताना कधी अस्पृश्यांच्या मुखांतून, कधी मुसलमान व्यक्तींच्या मुखांतून, कधी धर्मांतर केलेल्या अस्पृश्य माणसांच्या अुद्गारांतून तर कधी अस्पृश्योद्धाराला अनुकूल असलेल्या स्पृश्यांच्या विचारांतून ते आपला प्रचार करतात.

'अु:शाप 'मधील चोखामेळाच्या मुखातून स्पृश्यास्पृश्यांना अुपदेश करताना सावरकर लिहितात, "अमुक कर्म अुच्च आणि अमुक कर्म नीच, अमुक कर्म पवित्र आणि अमुक अपवित्र, या कल्पना जर हिंदुसमाज सोडून देअील आणि लोकहितसाधक ते ते कर्म पवित्रच आहे असे समजेल तर, हा परस्पर मत्सर अुत्पन्न होणार नाही."[१] अस्पृश्यांना अुद्देशून चोखामेळा म्हणतो, "आपणांला जे पतित मानतात, त्या आपल्या धर्मबंधूंची ती चुकी सुधारण्याचा मार्ग म्हणजे हिंदुहिंदूंनी, एकमेकांचा मत्सर करणे हा नाही. आम्ही महार, भंगी इ. अस्पृश्य गणल्या गेलेल्या लोकांनी स्वत:ची राहणी अितकी शुद्ध ठेवावी, स्वत:चं मन अितकं निर्मत्सर आणि हिंदुधर्मपरायण ठेवावं, स्वत:चं आचरण अितकं परोपकारी आणि प्रेमळ ठेवावं की, आपल्या अुच्च वर्णीय बंधूंना आपणाला हीन आणि अमंगळ लेखण्याविषयी आपण होअूनच पश्चात्ताप व्हावा."[२] महार व ब्राह्मण हा सारखाच सन्मान्य समजला गेला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन चोखामेळा करतो.[३] मंदिर-प्रवेश, देवदर्शनाचा अधिकार, या जन्मी अुद्धार आणि मनुष्यत्वाचे अधिकार अस्पृश्यांना आहेत की नाहीत, असे प्रश्न चोख्याच्या मुखातून वदवून[४] सावरकरांनी अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाला वैचारिक अधिष्ठान देअून प्रचाराला विलक्षण धार आणली आहे.

मुसलमान पात्रांच्या तोंडी घातलेल्या विचारांच्या आधारे आपला मतचार सावरकरांनी अधिक प्रभावी केला आहे. मौलवी जाफरअल्ली आपल्या धर्मप्रसाराची कहाणी सांगताना हिंदुसमाजातील अस्पृश्यतेमुळे मुसलमानी धर्म किती झपाट्याने पसरत आहे हे सविस्तरपणे सांगतो.[५] तो म्हणतो, "वरील चारी वर्णांना बाटवायला अेक लाठीचा कोटिक्रम तेवढा परिणामकारक ठरतो. पण महारांना, अस्पृश्यांना बाटवायला कोटिक्रमच लागत नाही. अेकदा त्यांचा हात धरावा आणि कानाला लागावं की, ते बघ तुझे हिंदू कुत्र्याला शिवतात, कुत्र्याला घरात येअू देतात, त्याला पंचवटीच्या रामाच्या देवळात, पंढरपूरच्या विठोबाच्या देवळात किंवा काशीच्या देवळात शिरून प्रदक्षिणा घालू देतात, पण

---

१. अु:शाप पृ. १८. २. अु:शाप पृ. २०–२१. ३. अ:शाप पृ. १९.
४. अु:शाप पृ. १०१. ५. अु:शाप पृ. ७०.

तुला – मनुष्याला घालू देत नाहीत. पुरे, अितकं कुजबुजलं की, विटला तो हिंदू धर्माला .... अस्पृश्यतेची रूढी पाडून आणि राखून हिंदू धर्मानं आम्हां मौलवींना हिंदु-धर्मनाशाच्या कार्यी मन:पूर्वक साह्य दिलं आहे. . . .प्रथम अस्पृश्य बाटवावे आणि मग त्यांच्या संख्यावलानं प्रवल झालेल्या अिस्लामानं, तत्त्व म्हटलं की, तरवार अुपसून या तत्त्वज्ञ ब्राह्मणादिकांस मुसलमान बनवावं हे धोरण, हा कार्यक्रम."[1]

पतित झालेल्यांना हिंदु-धर्मात पुन्हा शुद्ध करून घेतले जात नाही, ही गोष्ट मुसलमानी धर्मप्रसाराला कशी अुपकारक ठरली आहे हे सांगून जाफरअल्ली पुढे म्हणतो, "अस्पृश्यता-निवारण आणि शुद्धी या दोन गोष्टी हिंदू लोक जोवर करीत नाहीत तोवर मुसलमानी सत्तेची आणि प्रसाराची भरभराटच होत जाणार."[2]

मौलवी जाफरअल्ली ही नाटकातील जरा वरच्या दर्जाची व्यक्ती. पण प्रचाराची संधी अगदी सामान्य अशा पात्राकडूनही साधण्याकडे सावरकरांचा कटाक्ष आहे. कमलिनी गंगाजीच्या घरातून पळून गेल्यानंतर तिला अेखाद्या हिंदू घरात लपविण्यात आले असेल, अशी शंका बंगषखानास येताच क्रमांक दोनचा शिपाअी आपल्या धन्यालाही पुढील तत्त्वज्ञान सांगतो : 'अजि सुभेदारसाहेब, ती महाराची पोर, तिला हिंदू म्हणून घरात घेण्याअितके हिंदू लोक स्वजातीचे अभिमानी ज्या दिवशी होतील, त्या दिवशी हिंदुस्थानात अिस्लामी प्रचाराची आशा नष्ट झाली असं समजावं."[3]

धर्मांतर करून मुसलमान झालेले हिंदू पुढे मुसलमानी धर्माच्या प्रचाराचे कार्य करून हिंदुधर्माची अधिक हानी कशी करतात, याचे चित्र अिब्राहिम व शंकरच्या रूपाने सावरकरांनी रंगविले आहे. त्यांच्या धर्मांतराचे मूळ कारण अस्पृश्यताच होय हा विचार सारखा पटवून देण्याचा सावरकरांचा प्रयत्न आहे. म्हणून अिब्राहिम म्हणतो, "मांझी मूळची जात हिंदू डोंब. पण हिंदू होतो तोवर मला ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत तर काय, पण हे महार देखील नीच नीच म्हणून हड हड करीत असत. हिंदुसमाजात ही अशी शिवाशिवीची आत्मघातक लाथाळी सारखी चालली आहे."[4] तोच अिब्राहिम पुढे जी जी हिंदूंची सुंदर स्त्री सापडेल तिला मुसलमान करायच्या कार्याला लागतो आणि अनुभवान्ती आपले तत्त्वज्ञान पुढील शब्दांत सांगतो : 'खरोखरच देवानं या हिंदू लोकांचा नाश करण्यासाठी प्रथम त्यांची बुद्धी आंधळी करून सोडली आहे. महार 'हिंदू' आहेत तोवर, आम्ही त्यास पाणी भरू देणं वा शिवणं अधर्म समजतो. पण ते जर मुसलमान वा किरि-

---

१. अु:शाप पृ. ७१. २. अु:शाप पृ. ७४. ३. अु:शाप पृ. १४१.
४. अु:शाप पृ. ३५.

स्ताव होतील तर त्यास पाणी भरू देअू – शिवू – सन्मानानं वागवू – तो आमचा 'हिंदु-धर्म' आहे. या त्यांच्या वाक्यातील प्रत्येक अक्षराच्या आघाताखाली, या अस्पृश्यांना हिंदू धर्मास वांधून टाकणाऱ्या प्रेमाच्या आणि भक्तीच्या साखळीचा अेक अेक दुवा, खाड खाड तुटत चालला आहे.'[१]

'सर्व छळाचं मूळ अस्पृश्यताच' असल्याने शंकर मुसलमान होतो.[२] मुसलमानी धर्मात 'अुदात्तपणाचा लवलेशही आढळून येत नसला' तरी 'हिंदूंच्या जातिभेदाच्या छळापासून संरक्षण होण्यापुरता मुसलमानीपणा आपण स्वीकारला' असे शंकर सांगतो.[३]

'पशूंना आपण स्पर्श करतो पण महारांना स्पर्श करीत नाही'[४] 'महारांनाही मनुष्यासारख्या भावभावना, सुखदु:खे आहेत',[५] 'आपत्तीतही महार दयेला पात्र ठरत नाहीत का'?[६] 'पतितांनाही पावन करण्याचे सामर्थ्य गायत्री मंत्रात आहे.'[७] अित्यादी अनेक विचारांतून सावरकरांनी अस्पृश्यतानिवारणासाठी प्रचार केला आहे.

'पतितांना पावन करून घेणे हे हिंदुधर्मदृष्ट्या अत्यंत हितकारक आहे,' 'समाजोपयुक्त जो आचार तेच नवे शास्त्र', 'वलात्कारित धर्मभ्रष्टांची स्वधर्मात पुनर्स्थापना' ही सावरकरांच्या प्रचाराची सूत्रे त्यांच्या नाटकांतून दृग्गोचर होतात. 'अु:शाप' मधील भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून 'पतितपावनत्व हेची व्रीद या युगी' असे ते स्पष्ट सांगतात.[८] 'हिंदुजातीला हितकर असा अु:शाप श्रीकृष्णांच्या मुखाने वदवून व जुन्या शास्त्राची निरर्थकता सांगून त्यांनी नव्या शास्त्राचा अुद्घोष करविला आहे.[९] समाजाचे आत्यंतिक हित साधणारा धर्म हाच खरा धर्म होय असे त्यांनी सांगितले आहे.[१०] माधवराव पेशवे यांच्या तोंडून वलात्कारित स्त्रियांच्या स्वधर्मातील पुनर्स्थापनेच्या मताचा पुरस्कार त्यांनी केला आहे.[११]

हिंदुसमाजहितघातक रूढीविरुद्धही सावरकरांनी आपल्या नाटकांतून प्रभावी प्रचार केला आहे. अस्पृश्यतेच्या रूढीने हिंदुसमाजाचा होणारा घात 'अु:शाप' नाटकात त्यांनी कसा दाखविला आहे, हे आपण आतापर्यंत पाहिलेच

---

१ अु:शाप पृ. ४३. २. अु:शाप पृ. ७२. ३. अु:शाप पृ. ८६. ४. अु:शाप पृ. ३१ व संन्यस्त खड्ग पृ. २८, २९. ५. अु:शाप पृ. ३४ व संन्यस्त खड्ग पृ. २८, २९. ६. अु:शाप पृ. ३१. ७. अु:शाप पृ. ४०–४१. ८. अु:शाप पृ. १०६. ९. अु:शाप पृ. १५५, १५६. १०. संन्यस्त खड्ग पृ. १३२. ११. अुत्तरक्रिया पृ. १०८.

आहे. य:कश्चित गाडीवाल्याच्या तोंडीही 'महारास रूढीच्या साखळीनं गावच्या शौच-कुपास वांधून टाकलं आहे' असे वाक्य या प्रचारकी वृत्तीन्ने घालावयास ते विसरत नाहीत.[१] जन्मावरून श्रेष्ठकनिष्ठता ठरविणाऱ्या रूढीविरुद्ध ते प्रचार करतात. चोखामेळ्याच्या मुखात त्यांनी या पोथीनिष्ठतेविरुद्ध विचार घातले आहेतच. सिद्धार्थाच्या मुखातून ते सांगतात, "तथागत बुद्ध केवळ गुणावरून, शीलावरून माणसांची योग्यता ठरवितो. जन्मावरून नाही."[२] रोटीबंदी, सिंधुबंदी या रूढींच्याविरुद्ध यशवंतरावाच्या द्वारे सावरकरांनी प्रचार केला आहे. 'अुत्तरक्रिया' नाटकाच्या पहिल्या अंकातील चौथ्या प्रवेशातील यशवंतरावांची भाषणे या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. रोटीबंदीने व सिंधु-बंदीने हिंदुराष्ट्राची झालेली प्रचंड हानी वर्णन करताना यशवंतराव म्हणतात "....मिसरपासून मेक्सिकोपर्यंत आपल्या भारतीय आर्यांचा हिंदुधर्म हिंदुराज्ये फैलावली होती. ती कोणी बुडविली? मुख्यत: ही परदेशगमन-बंदीची बेडी आपण होअून आपल्या पायांत ठोकून घेतल्याने! त्यामुळे ती हिंदुराज्ये आणि हिंदुजनता तिकडे निर्जीवन होअून अहिंदूंनी खाअून टाकली... युरोपपर्यंत आपली सारी हिंदु-याने, हिंदू आरमारे जाअून जगताचा व्यापार आपल्या खिशात ठेवीत होती.... तो सारा जागतिक हिंदू व्यापार नि ती हजारो सिंधु-याने कशात बुडाली? कोण्या महासागराच्या प्रचंड वादळात? नव्हे, तर अेका संध्येच्या पळीच्या वादळात! परदेशातील पाण्याने संध्या विटाळते, मुकटा विटाळतो, विजातीयांसह खाण्याने जातच जाते, धर्मच बुडतो, या खुळापायी जेव्हा रोटीबंदी नि तिच्यामुळेच पुढे समुद्रबंदीची बेडी आम्हीच आमच्या प्रगतीच्या पायात ठोकली. तेव्हा तीमुळे ती आमची राज्ये नि तो सामुद्रिक व्यापार ठार बुडविला. या मुकटयापायी मुकुट दवडले."[३]

सिंधुबंदी व रोटीबंदी या दुष्ट रूढी नष्ट करणे हे आपले पुण्यकर्तव्य आहे असे यशवंतराव सांगतो[४] व त्यामुळे होणारी हानी 'श्रीमंतास अत्याग्रहाने पटवून देण्याची पराकाष्ठा' करण्याची घोषणा करतो.[५] तेव्हा रूढीविरोधी प्रचार करणारे सावरकर वाचकांच्या डोळ्यांपुढे अुभे राहावेत, अितका हा प्रचार स्पष्ट व सरळ आहे. यशवंतरावांप्रमाणेच 'अु:शाप'मधील शंकर अस्पृश्यतेच्या रूढीची घातकता पटविण्यासाठी सांगतो, "दयेची आणि सहानुभूतीची अमृत-लतिका, मनुष्याच्या मनात बालपणी अशी लुसलुशीत दिसत असते. तिला जातीच्या अहंकाराची कीड शिक्षण आणि रूढी हीच पुढे लावतात."[६]

---

१. अु:शाप पृ. १८, १९. २. संन्यस्त खड्ग पृ. २९. ३. अु. क्रि. पृ. २४, २५. ४. अु. क्रि. पृ. २४. ५. अु. क्रि. पृ. २६. ६. अु:शाप पृ. ३८.

अशा रीतीने सावरकरांच्या नाटकांतून त्यांनी स्वत:च सांगितलेल्या सात स्वदेशी बेडयांविरुद्ध प्रचार केल्याचे दिसून येते.

सावरकरांच्या प्रचारविषयांपैकी आणखी अेक विषय म्हणजे शस्त्रसामर्थ्यावरील त्यांचा विश्वास हा होय. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' या तत्त्वाचे प्रणयन हा त्यांच्या 'संन्यस्त खड्ग' या नाटकाचा हेतू आहे.[१] या तत्त्वाने सावरकरांना किती भारून टाकले आहे, याची कल्पना त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी स्वत:च केलेल्या वर्णनावरून येते.[२] 'संन्यस्त खड्ग'मधील विक्रमदेवांच्या तोंडून त्यांनी आपल्या विचारांचा प्रचार केला आहे. त्यातील पुढील काही विचार पाहण्यासारखे आहेत.

'कामिनी आणि कृषी ह्यांच्या आत्यंतिक त्यागाच्या ज्या दोन प्रतिज्ञा संन्याशास घ्याव्या लागतात, त्यामुळे राष्ट्राचा प्रजाक्षय आणि धनक्षय होऊन त्या राष्ट्राचा अुलट कसा अपकार होतो, हे मी जे आता दाखविले, त्याहूनही भयंकर हानी या समाजाची, या राष्ट्राची कृपाणाच्या त्यागाने होणारी आहे.[३] दंड करण्याची शक्ती ज्यास आहे, तोच क्षमा करू शकतो,[४] 'पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर या जगाच्या दुर्दैवाने शस्त्रयुगाचेच प्राबल्य दिसून येअील.' 'वळी तोच कान पिळीत राहील.'[५] 'तिन्ही त्यागांत आत्यंतिक शस्त्रत्यागाची प्रतिज्ञा तरी लोकहितास अत्यंत बाधक होते.'[६] 'अत्यंत अुत्कट विरुद्ध प्रयत्नांनीही शस्त्रबळाची अुपेक्षा हानिकारक आहे हे सत्य असिद्ध झालेले नाही.'[७] 'दुष्टाचं मन सदुपदेश अैकण्याच्या सद्प्रवृत्त स्थितीत आणण्यासच दंडशक्तीची मात्रा बहुधा पहिला रामबाण अुपाय असतो,'[८] विक्रमदेवाने केलेला हा शस्त्रगौरव सावरकरांची अितर पात्रेही करताना दिसतात. 'अु:शाप'मध्ये कमलिनी या सूडाच्या सुरीचे, या निर्वाणीच्या मैत्रिणीचे प्रदीर्घ गुणगान करते.[९] खड्ग हाच आपल्या विनंतीचा वशिला लावून 'अुत्तरक्रिये'तील सुनीती हिंदुधर्मध्वजाखाली देह ठेवण्याची आपली मागणी मांडते.[१०] आणि रत्नखचित खड्ग तिच्या हाती देअून तिच्या महनीय राष्ट्रसेवेचा गौरव सरसेनापती करतात.[११] 'संन्यस्त खड्ग' नाटकातील धर्महीं शस्त्रबळाच्या अुपेक्षेने झालेली शाक्य राष्ट्राची हानी ही भावी अुभ्या आर्यावर्तावर येणाऱ्या घोर संकटाची केवळ

---

१. सा. वि. द. २. आ. च. पृ. २२५. ३. संन्यस्त खड्ग पृ. ३८. ४. संन्यस्त खड्ग पृ. ३९. ५. संन्यस्त खड्ग पृ. ४१. ६. संन्यस्त खड्ग पृ. ७२. ७. संन्यस्त खड्ग पृ. ७४. ८. संन्यस्त खड्ग पृ. ७६. ९. अु:शाप पृ. १४७. १०. अु. क्रि. पृ. १०७. ११. अु. क्रि. पृ. १०७.

पूर्वसूचना आहे असे सांगतो,[१] आणि 'शक्तिपूजक कर्मयोगाचा अवलंब करणे. हेच त्या संकटाच्या कचाट्यातून मुक्त होण्याचे साधन आहे,' असा निर्णायक अुपदेशही करतो.[२]

याशिवाय खरी अहिंसा, खरा जितेंद्रिय, खरी भूतदया या विषयांवरील आपल्या मतांचा प्रचार सावरकरांनी आपल्या नाटकांतून केला आहे.

प्रचाराचा स्वभावलेखनावर परिणाम

सावरकरांनी आपली नाटके प्रचारासाठी, बोधासाठी लिहिली ही गोष्ट त्यांच्या नाटकांतील अनेक अुदाहरणांवरून आपण सिद्ध केली. या बोधवादाचा परिणाम सावरकरांच्या नाटकांतील स्वभावलेखनावर होणे अपरिहार्य होते आणि तसा तो झालाही आहे: या बोधवादामुळे त्यांनी निर्मिलेल्या स्वभावरेखा निर्जीव व कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे वाटतात.[३] स्वत: बाजूला राहून समाजातील विविध व्यक्तींचे स्वभावचित्रण वा भावचित्रण करण्याची शक्ती असूनही आक्रमक व्यक्तित्वामुळे त्यांच्या व्यक्ती, त्यांची स्वभावचित्रे ही त्यांच्या मतांची प्रतीके बनतात.[४] त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्वच राहात नाही. (Here the playwright's lives the life of his self, speaking and acting through his characters.)[५] रिझविण्यापेक्षा शिकविण्याच्या भूमिकेतून, प्रचाराच्या प्रवृत्तीतून, बोधवादातून सावरकरांनी नाटके लिहिली असल्यामुळे नाटकांतील स्वभावलेखनाची हानी झाली आहे.

सावरकरांच्या नाटकांतील पात्रांचा परिचय करून घेताच, प्रथमदर्शनीच ही गोष्ट लक्षात येते की, त्यांची बहुतेक पात्रे त्यांच्या मतांची प्रतीके आहेत. आपल्या विशिष्ट ध्येयात्मक तत्त्वांभोवती त्यांनी आपल्या सर्व प्रसंगांची आणि पात्रांची मांडणी केली आहे. अशा प्रकारच्या मांडणीमुळे कलाकृतीत 'अखंड अेकजिनसीपणा अुत्पन्न होतो,' हे टीकाकारांचे मत[६] मान्य केले तरीही त्यामुळे स्वभावलेखनकलेची हानी होते हेही खरे आहे. तीनही नाटकांतील पात्रे सावरकरांच्या मतांचा देहधारी अवतार आहेत. सत्य-अहिंसेची टवाळी करण्यासाठी त्यांचा 'सत्यवान' किंवा 'शाकंभट' जन्मला आहे. अस्पृश्यांची बाजू मांडण्यासाठी त्यांचा चोखा रंगभूमीवर आला आहे. धर्मांतरवाद्यांची वकिली शंकर किंवा अिब्राहिम करतो. स्पृश्यांचा अहंकार व आचार नारंभट, देवीसिंगादी पात्रांकडून

---

१. संन्यस्त खड्ग पृ. १३२. २. संन्यस्त खड्ग पृ. १३२. ३. सा. वि. द. पृ. ६३. ४. सा. द. पृ. २४८. ५. Savarkar and His Times p. 190-191.
६. साहित्य-विहार पृ. ३०.

दाखविला जातो. शक्तिपूजक कर्मयोगाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी त्यांचा विक्रम-देव अुभा आहे. सात स्वदेशी बेडचांविरुद्ध प्रचाराची पराकाष्ठा करण्याचे कंकण त्यांच्या यशवंतरावाने बांधले आहे. वर्णाश्रम धर्माचे प्रतिनिधी म्हणून शास्त्री-बुवांची योजना करण्यात आली आहे. नाटकांतील या पात्रांची निर्मिती सावरकरांनी जी केली आहे ती कधी त्यांच्या मुखांतून आपली मते वदविण्यासाठी, तर कधी स्वत:स हास्यास्पद वाटणाऱ्या अेखाद्या मताच्या प्रतिपादनासाठीच केली आहे.

सावरकरांच्या नाटकांतील पात्रे सावरकरांच्याच विचारांचे अुद्गाते (Mouth-pieces) आहेत, हे विधेय सावरकरांच्या अितर वाङमयाच्या, विशेषत: आत्मचरित्र व निबंध यांच्या आधारे सिद्ध करून देणे अगत्याचे आहे. तेव्हा त्याचा तपशीलाने विचार करू.

हिंदुत्व, हिंदुराष्ट्राभिमान, हिंदुधर्माभिमान हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वा-तील महत्त्वाचा घटक आहे. 'हिंदुत्व', "हिंदुपदपादशाही' या प्रमुख ग्रंथांच्या निर्मितीचा अुगम या त्यांच्या व्यक्तिविशेषात आहे. म्हणून नाटकांतील बहुतेक प्रमुख पात्रांच्या स्वभावांत हा हिंदुत्वाभिमान, हिंदुराष्ट्रनिष्ठा, हिंदुधर्माभिमान प्रकर्षाने दिसून येतो. 'अु:शाप 'मधील कमलिनी, किसन, चोखामेळा, गंगाजी यांच्या ठायी हिंदुत्वाभिमान अुत्कटतेने वास करीत आहे. हिंदुधर्म रक्षण करण्याचे कमलिनीचे कुलव्रतच आहे.[1] हिंदुत्वाचे मूल्य वैयक्तिक प्रेमापेक्षा कमी लेखले म्हणून ती शंकरची निर्भर्त्सना करते.[2] आपल्यासारख्या हिंदुधर्माच्या अभिमानी असलेल्या मुलीला मरतानाही बाटग्याचा– अहिंदूचा– स्पर्श होअू नये अशी तिची आग्रही अिच्छा असते.[3] कमलिनीचा भाअू किसन हा तर निग्रहाने सांगतो, की दिल्लीच्या मयूरा-सनावर बसण्यासाठीही मी हिंदुत्वाचा त्याग करणार नाही.[4] त्याची प्रतिज्ञाच अशी असते की, मी हिंदू म्हणूनच जगणार, हिंदू म्हणूनच मरणार, हिंदू म्हणूनच हिंदू कुळात परत जन्म घेणार.[5] चोखामेळ्याला मुसलमान होण्याची सक्ती करण्यात येते तेव्हा त्याच्यातील हिंदुधर्माभिमान अुसळून वर येतो.[6] गंगाजी-सारख्या वेश्येला आपल्या हिंदुधर्माची जाणीव होताच हिंदुत्वरक्षणासाठी स्वत:ची आहुती देण्यासही ती सिद्ध होते.[7]

'अुत्तरक्रिया' नाटकातील बहुतेक प्रमुख पात्रे सावरकरांच्या हिंदुराष्ट्रा-भिमानाने भारली आहेत. 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथात सावरकरांनी मराठी

---

१. अु:शाप पृ. ७९. २. अु:शाप पृ. १२१. ३. अु:शाप पृ. ७८, १४९.
४. अु:शाप पृ. ९२. ५. अु:शाप पृ. ९२. ६. अु:शाप पृ. १५२.
७. अु:शाप पृ. ७९.

... ग्रंथालय, ठाणे, ...

... नों: वि: ...

अुत्थापनाच्या मागे जे अखिल भारतीय महत्त्व होते व ज्या तत्त्वांनी आणि ध्येयांनी त्या अुत्थापनाला चेतना दिली, ती स्पष्टपणे पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे.[1] सदाशिवराव भाअूंचे हिंदुपदपादशाहीचे स्वप्न कसे साकार झाले, याचेही वर्णन त्यांनी या ग्रंथात केले आहे.[2] हिंदुराष्ट्रस्थापनेच्या संबंधात जे विवेचन सावरकरांनी केले आहे त्याचेच निनाद 'अुत्तरक्रिये'त अैकू येतात. म्हणूनच माधवराव पेशवे म्हणतात, "अुत्तर हिंदुस्थानात हिंदूंची सत्ता स्थापन करण्याच्या भाअूंच्या अपुऱ्या अिच्छेचा अश्मा महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या जरीपटक्यात पक्का वांधून ती भाअूंची अुत्तरक्रिया तरी मी यथाविधी संपादन करणार."[3] अबदालीच्या वकिलाला मराठ्यांच्या पराक्रमाचा दिमाख सांगताना महादजी शिंदे गरजतात, "वास्तविक दिल्लीचे, हिंदुस्थानचे सिंहासन हिंदूंचे.... हिंदू वीर भाअू आठ शतकांचे अुट्टे काढीत घण घालीत आहे आणि औरंगजेबाच्या तक्ताचे तुकडे त्या घावासरशी घळघळत आहेत हे दृश्य, हे चित्र हिंदुराष्ट्राच्या डोळ्यांपुढे युगान्युगे..... स्फूर्तीच्या ज्वाला फेकीत प्रकाशत राहील."[4] नवलसिंग जाटाला सरसेनापती बिनीवाले सांगतात, "वास्तविक हिंदुस्थान हिंदुमय करून स्वधर्मराज्य स्थापावे हा आमचा पूर्वापार मनोदय."[5] यशवंतरावही तोच विचार सांगतात : "बंगालपासून सिंधपर्यंत साऱ्या हिंदूंत–हिंदुस्थानात अेकछत्री हिंदु-राज्य करील असा अेकही वीर अुरला नसता अेकट्या मराठ्यांनी हे साहस केले."[6] या हिंदूंच्या अभिमानामुळेच, मराठी सैन्य दुआबच्या कात्रीत अडकल्याची वार्ता सुशीलेला कळताच ती सांगते, "हिंदू म्हणून हिंदू सैन्य संकटी वेढले असता गाद्यागिरद्यांवर लोळत मला राहवत नाही."[7] सुनीतीचा हिंदुत्वाभिमान अितका प्रखर आहे की पैठणी हा हिंदुवेष आहे म्हणूनच तिला तो प्रिय आहे. 'मला मरताना तरी हिंदु-धर्माच्या जयवाद्यांच्या निनादात सुखाने मरू द्यावे' अशी तिची अिच्छा आहे. हिंदुपदपादशाहीस अुपयोगी पडेल म्हणून तिने आपला भ्रष्ट देह आत्महत्येला बळी न देता जगविला होता.[8] माधवरावाने 'आसिंधुसिंधु हिंदुमय धरा' केली म्हणून दिव्य राजपुरुषांनीही त्यांचे अभिनंदन केले.

अस्पृश्यता, शुद्धी, धर्मान्तर या विषयांसंबंधीची सावरकरांची मते, त्यांचे विचार अनेक लेखांतून प्रसिद्ध झाले आहेत. 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्र-पर ग्रंथातील 'अंदमानात शुद्धी' या सर्व प्रकरणात शुद्धीसंबंधीचे विचार त्यांनी व्यक्त केले आहेत. याच विषयावर 'श्रद्धानंद' नियतकालिकात व 'केसरी'त

---

१. हिं. प. पा. पृ. ३. २. हिं. प. पा. प्रकरण १३ वे. ३. अुत्तरक्रिया पृ. ५.
४. अत्तरक्रिया पृ. १६. ५. अु:शाप पृ. ४७. ६. अुत्तरक्रिया पृ. ४८.
७. अुत्तरक्रिया पृ. ६०. ८. अु:शाप पृ. ८४.

त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. यांतील बरेचसे लेख अनुक्रमे 'हिंदुत्वाचे पंचप्राण' व 'जात्युच्छेदक निबंध' या ग्रंथांत समाविष्ट केले आहेत. या सर्व स्फुट लेखांतील व ग्रंथांतील विचार समजावून घेतले तर सावरकरांच्या नाटकांतील विविध पात्रे सावरकरांचेच विचार कसे व्यक्त करतात हे ध्यानी येअील.

अस्पृश्यांना मनुष्यत्वाचे अधिकार द्यावयास पाहिजेत असा अेक महत्त्वाचा विचार त्यांच्या निबंधात दिसून येतो. त्यांचा चोखामेळा तेच विचार सांगताना म्हणतो, "कोटी कोटी अस्पृश्यांना मनुष्यत्वाचे अधिकार मिळवून देण्याच्या महत्तम कर्तव्यी अेकाची हत्या घडली तर ती हत्या नसून हवीच होअील."[१] अस्पृश्य हे पशूपेक्षाही हीन लेखले जातात हा सावरकरांच्या अनेक निबंधांतून आलेला विचार व्यक्त करताना किसन गाडीवाल्याला म्हणतो, "त्या बैलानं तुझी गाडी वाटत नाही, त्या कुत्र्याच्या लाळेनं हात वाटत नाहीत. मनुष्यासारखे मनुष्य आम्ही महार.... आमच्या स्पर्शानं मात्र तुझी गाडी विटाळेल, नाही?"[२] आपद्धर्म म्हणून तरी अस्पृश्यता दूर करावी ही सावरकरांची 'गोमांतक' या काव्यातील व पुढे 'आमच्या अस्पृश्य धर्मबंधूंना धोक्याची सूचना' या अेका लेखात प्रकट झालेली भूमिका किसनच्या भूमिकेतून सांगते, "आपत्तीत देखील आम्ही (महार) दयेला पात्र नाही ना?"[३] 'जेथपर्यंत मुसलमान ख्रिश्चनादी विधर्मीयांना स्पृश्यांच्या घरात येअू दिले जाते तेथपर्यंत तरी अस्पृश्यांना येअू दिले जावे' हे सावरकरांचे रत्नागिरीतील प्रचाराचे सूत्र संभाजीराव पाटलाच्या घरात प्रवेश करणाऱ्या किसनच्या मुखातून त्यांनी सूचित केले आहे.[४] अस्पृश्य हे आपल्या हिंदू समाजात अुपरे नसून त्यांचे पूर्वज हिंदुधर्माची मालमत्ता मिळविण्यास झटले आहेत हा विचार सांगताना सावरकर लिहितात, "हिंदुत्वाच्या गावाच्या वेशीवर आज अनेक सहस्रके जागता पहारा ज्या अस्पृश्य महारांनी दिलेला आहे ते सर्व महार ते आपल्या राजधानीचे 'येसकर' तुमचेच पूर्वज होते."[५] सावरकरांचा हाच विचार ह्याच शब्दात कमलिनी सांगते. गंगाजीला ती म्हणते, "हिंदुधर्माच्या वेशीवर पहारा देण्याचे काम आम्हां महारांकडे सोपविलेलं असतं. मी वेसकराची मुलगी आहे. मी हिंदुत्वाच्या वेशीचं रक्षण करीत मरेन."[६] चोखाही अशाच स्वरूपाचे अुद्गार काढतो[७] व श्रीकृष्णही 'हिंदुजातीच्या ध्वजासि धरूनि राहिले। हिंदुधर्मदुर्गाची वेस रक्षुनी' अशाच भाषेत बोलतात.[८] अस्पृश्यांची अुत्पत्ती अनुलोम-प्रतिलोमादिक विवाहांनीच

---

१. अु:शाप पृ. ६४. २. अु:शाप पृ. ३०, ३१ ३. अु:शाप पृ. ३१. ४. अु:शाप पृ. ८७, ८८. ५. जाति. नि. पृ. ७७. ६. अु:शाप पृ. १३६. ७. अु:शाप पृ. ६०. ८. अु:शाप पृ. १५६.

झाल्याचे सावरकर सांगतात;[१] आणि त्यांचा सत्यवानही तेच म्हणतो, "महारांच्या स्त्रियांशी तदितर पुरुषांचे व तदितर स्त्रियांशी महार पुरुषाचे गांधर्व संबंध अनेकदा घडतात, अनुलोम प्रतिलोम जेथे रूढ आहेत त्या जगात कोण कोणाचा हे सांगता येणे कठीण."[२]

स्पृश्यांचे व अस्पृश्यांचे पूर्वज अेकच होते. तेव्हा अस्पृश्यता नष्ट करण्याचा मार्ग अगदी सुलभ आहे. त्यांना फक्त स्पर्श करावयाचा. ही स्पर्शबंदीची बेडी तोडावयाची, 'म्हण – शिवेन । स्वीकारीन ।' या सर्व लेखात सावरकरांनी हाच अेक विचार अनेक लेखांतून परिणामकारक पुनरुक्तीने मांडला आहे.[३] सावरकरांचा शंकर, जाफरअल्ली, सिद्धार्थ, गौतमबुद्ध ही सगळी पात्रे हाच विचार याच शब्दांत बोलतात. भिन्न कालात वावरत असूनही त्यांचे विचार अेकसारखे कसे, याचे आश्चर्य वाटते. शंकरचे अुद्गार पूर्वी दिलेलेच आहेत. जाफरअल्ली म्हणतो, "अेकदा त्यांचा (अस्पृश्यांचा) हात धरावा आणि कानाला लांगावं की, 'ते बघ तुझे हिंदू कुत्र्याला शिवतात, कुत्र्याला घरात येअू देतात .... देवळात शिरून प्रदक्षिणा घालू देतात, पण तुला मनुष्याला घालू देत नाही.'[४] सिद्धार्थ गौतम आपल्या वडिलांच्या समोर असेच व्याख्यान देतो. आपण प्रथम राजवाड्यात न जाता अस्पृश्याकडे का आलो याचे स्पष्टीकरण करताना तो म्हणतो, "गावातील कुत्र्यांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविताना मी हजारो चातुर्वर्णीयांना पाहिले आहे. कुत्र्याची पाळीव पिले हातांत अुचलून त्यांचे कौतुक करिताना मी त्रैवर्णिकांस पाहिले आहे. पण ह्या हीन दीन अस्पृश्यांची सोन्यासारखी मुले, कुत्र्याच्या मोलानेही त्यांस कोणी विचारीत नाहीत."[५]

अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करू दिल्याने देव वाटतो या स्पृश्यांच्या कल्पनेलाही सावरकरांनी आपल्या निबंधांतून धक्का दिला आहे. 'जो दर्शनाने बाटतो तो देव कसला?' असा अत्यंत मार्मिक प्रश्न सावरकरांनी विचारला आहे; आणि असा युक्तिवाद केला आहे की, 'अस्पृश्यांच्या स्पर्शाने जर देव बाटता तर ज्या दिवशी त्यानं अस्पृश्यांस अुत्पन्न केले त्याच दिवशी त्यांच्याच स्पर्शाने तो बाटला आहे.'[६] सावरकरांचा हा युक्तिवाद त्यांचा चोखाही करतो. स्पृश्य हिंदू आणि मुसलमान जेव्हा त्याचा छळ करतात तेव्हा चोखामेळा, त्या शारीरिक वेदना असह्य होत असताना, अुत्तरतो, "अस्पृश्यांच्या स्पर्शानं जर देव विटाळत असतील, तर ज्या दिवशी त्यांनी अस्पृश्यांना घडवलं त्याच दिवशी ते विटाळले गेले."[७]

---

१. जाति. नि. पृ. ७७. २. अु:शाप पृ. १४०. ३. श्रद्धानन्द दि. ३-२-२७. ४. अु:शाप पृ. ७०, ७१. ५. संन्यस्त खड्ग पृ. २८-२९. ६. श्रद्धानंद दि. ८–९–२७. ७. अु:शाप पृ. १२९.

नाटकांतील मानवी पात्रे सावरकरांचे विचार बोलतात हे अेकवेळ क्षम्य समजले जाअील. पण प्रत्यक्ष परमेश्वर, भगवान श्रीकृष्णसुद्धा सावरकरांचेच विचार बोलण्याअितके परप्रत्यय बुद्धीचे पाहून आश्चर्य वाटते. सावरकर 'अुःशाप' नाटक लिहीत असताना त्या काळात ज्या जागतिक घटना घडत होत्या त्यांचेही प्रतिबिंब ध्वनिरूपाने श्रीकृष्णांच्या भाषणात पडले आहे. 'जो दर्शनाने बाटतो तो देव कसला ?' या निबंधाच्या अखेरीस सावरकरांनी लिहिले आहे :–

"केनियात परधर्मी आणि परदेशी युरोपियन तुम्हांस अस्पृश्य समजतात त्यांच्यावर तुम्ही जळफळता. ते न्याय्यच आहे. पण मग त्याच तोंडाने त्याच कोटि-क्रमास अुलटवून, ह्या तुमच्या स्वधर्मीयांस स्वदेशातच अस्पृश्य म्हणून तुम्ही जेव्हा धिक्कारता, तेव्हा परमेश्वर तुमच्या या अहंकारी भोंदूपणाने संतुष्टच होत असेल नाही काय ? हा अन्याय श्रुतिस्मृतीला संमतच आहे नाही ? .... आता कसल्या श्रुती आणि स्मृती ? .... हिंदुराष्ट्र नामशेष होण्याचा प्रसंगच जेथे आला आहे तेथे ज्या ज्या अुपायाने त्याचे रक्षण करता येअील, हे हिंदु राष्ट्र जिवंत आणि वर्धमान ठेवता येअील, ते साधन स्मार्त आणि श्रौत आहेच आहे."[1] चोखामेळ्याच्या संरक्षणासाठी नाटकातील सावरकरनिर्मित श्रीकृष्ण जेव्हा प्रकट होतात तेव्हा सर्व स्पृश्यांना अुद्देशून म्हणतात :

"तुम्ही महारासि महानीच लेखिले
अस्पृश्य श्वानाहुनि, तेविची तुम्हां
पुत्रांसी, पौत्रांसी आणि प्रपौत्रां
तुमच्या त्या, हाय हाय अखिल भूवरी
लेखितील जाति अन्य अन्य खंडिच्या
द्वीपांतरि, खंडांतरि हिंदु पाहता
रक्तपितीसम जग हुसकील तुम्हां ही !
हे महार तुमचे, त्या हिणविता तुम्ही
जगताचेची महार व्हाल,....
अस्पृश्यत्वासी या पुढति समजणे
कलिवर्जी आर्ये ही स्पष्ट मदाज्ञा
या विरुद्ध जे जे ते शास्त्र वर्ज्य की
शब्द आमुचा तोची शास्त्र जगाचे"[2]

---

१. हिं. पं. पृ. ५८–५९. २. अुःशाप पृ. १५५–१५६.

सावरकरांनी स्वत:चेच विचार श्रीकृष्णांच्या तोंडी घातले याचे प्रारंभी जरी आश्चर्य वाटले, तरी सावरकरांची देवासंबंधीची मते कळल्यावर तसे आश्चर्य मानावयाचे कारण नाही. परमेश्वरासंबंधीचे त्यांचे बुद्धिनिष्ठ विचार त्यांची पात्रेच बोलून दाखवितात. मग तो सिद्धार्थ गौतम असो वा अेखादा सामान्य भिकूशेट असो. या पात्रांचे विचार अैकले की सावरकरांच्या दोन-तीन निबंधांतील ही अुसनवारी आहे हे चटकन लक्षात येते. त्यांच्या 'विज्ञाननिष्ठ निबंध' या ग्रंथातील 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' व 'अीश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय?' या दोन निबंधांत व्यक्त केलेले विचार त्यांची ही वरील पात्रे बोलतात. 'देव दयाळू आहे, तो आपले चांगले ते करील' ही कल्पना चुकीची आहे असे ते सांगतात.[1] त्यांचा सिद्धार्थही हेच विचार थोड्या निराळ्या स्वरूपात मांडतो. तो म्हणतो, "जिवांचा जितका अधिक छळ होअील, तितका अधिक प्रसन्न होणारा देव हा देव नसून दैत्यच असला पाहिजे"[2] पुण्यशील अशा देवांच्या लाडक्या लोकांवर मुसलमानी अत्याचारांनी कसा विजय मिळविला, याचे वर्णन करून सावरकरांनी दुसऱ्या अेका निबंधात म्हटले आहे, "जे जे देअूळ ते ते काशीरामेश्वरपर्यंत पाडले, जे जे देअूळ पाडले त्याची त्याची मूर्ती मशिदीची पायरी केली. पण देवास त्या अत्याचाराचा राग आला नाही. पण अिकडे कोणी हिंदू अेखाद्या नारळाचा नवस जरी फेडायचा विसरला ना, की तोच देव काय रागावेल!"[3] सावरकरांचा भिकूशेट तरी दुसरे काय सांगतो? तो म्हणतो, "विजयनगरच्या त्या त्या प्रख्यात तेलगू कर्नाटक साम्राज्यातील प्रत्यक्ष नृसिंहाचे भव्य मंदिर मुसलमानांनी फोडलं, पण देव त्यांच्यावर रागावला नाही; अुलट त्यांना राज्यच देअून टाकलं. तेच अेखादा आपला हिंदू, नुसता नारळ फोडायला जरी विसरता तरी नृसिंह त्याच्या बोकांडी बसायला सोडता ना!"[4]

ज्या वर्णाहंकाराने स्पृश्यास्पृश्यता निर्माण झाली तो वर्णाहंकारच नष्ट करून 'जन्मजात जातींचा अुच्छेद आणि गुणजात जातींचा अुद्धार' हे सूत्र कार्यपरिणत करण्याचा पुरस्कार सावरकरांनी आपल्या निबंधातून केला आहे.[5] चोखामेळ्याच्या तोंडी हेच विचार त्यांनी अप्रत्यक्षरीत्या घातले आहेत.[6] पण त्यांचा सिद्धार्थ तर त्यांचे हे विचार त्यांच्याच शब्दांत सांगतो. तो शुद्धोदनास म्हणतो, "महाराज, वर्णाहंकारांनी माणूसच माणसाचा भयंकर शत्रू झालेला आहे. म्हणून तथागत बुद्ध केवळ गुणावरून, शीलावरून माणसांची योग्यता ठरवितो, जन्मावरून नाही."[7]

---

१. सा. सा. भाग १ – पृ. ८. २. संन्यस्त खड्ग पृ. ६. ३. सा. सा. भाग १ पृ. १६. ४. अु:शाप पृ. १३१. ५. केसरी – दि. ५–५–१९३१. ६ अु:शाप पृ. १९. ७. संन्यस्त खड्ग पृ. २९.

धर्मांतर, शुद्धी या विषयांवर त्यांच्या नाटकांतील पात्रे जी चर्चा करतात, जे विचार मांडतात ते सर्व विचार नाटककाराचेच आहेत. 'आम्हांस शिवा नाही तर आम्ही दुसरे घर पाहतो'[१] हेच सावरकरांचे वाक्य शंकर पुढीलप्रमाणे अुच्चारतो : 'मला तर असं वाटतं की, यापुढे आपण हिंदुसमाजावरच आपली सावली टाकणं सोडून देअून कुठं तरी दुसरं घर पाहावं.''[२] धर्मांतराच्या विटाळ, तरवार व तत्त्व या साधनांपैकी पहिली दोन नष्ट करून केवळ बुद्धिवादानेच, तत्त्वानेच धर्मांतर करणे न्याय्य होय हे सावरकरांचे मत[३] त्यांच्या कमलिनीलाही मान्य आहे. म्हणून धर्मांतरित शंकरला ती सांगते,"तत्त्वासाठी अुभय धर्माचा अभ्यास करून कोणी अेखादा हिंदुत्व सोडून मुसलमान झाला तर मी त्याला फार तर मतिमंद म्हणेन, पण धिक्कारणार नाही.''[४] शुद्धीसंबंधी सावरकरांनी व्यक्त केलेले विचार त्यांच्या व्याख्यानांतून, लेखांतून, 'गोमांतका'सारख्या काव्यातून-प्रसिद्ध झाले आहेत. रत्नागिरीच्या अेका शुद्धिसमारंभात ते म्हणाले होते, "पश्चात्तप्त अंत:करणाच्या अुच्चारासरशी महत्पापे देखील भस्म होतील, तिथे मुसलमानी भाताच्या अेका घासाची काय कथा ?" 'गोमांतक' काव्यातही ते लिहितात :

'तै पश्चात्तापेची अर्घशुद्ध ते....
तरि तयांसहि स्वीकरिणे धर्म्य.'

सावरकरांनी शंकरला शुद्ध करून घेताना सर्व भुतांच्या तोंडी हीच वाक्ये घातली आहेत.[५] मनाची शुद्धता, मनाचे पावित्र्य हे वलात्कारित भ्रष्ट व्यक्तीला शुद्ध होण्यास पुरेसे आहे, हा विचार सावरकरांच्या यशवंतरावलाही मान्य आहे.[६]

शुद्धिकार्य केले नाही तर हिंदुसमाजाच्या अस्तित्वालाच धोका आहे, 'संख्या-वळ हेच खरे वळ' अशी सावरकरांची विचारधारणा आहे. 'अंदमानात शुद्धी' या प्रकरणात व 'संख्याबळ हेही वळच आहे' या लेखात यासंबंधीचे सावरकरांचे विचार व्यक्त झाले आहेत. याच विचारांना अभिव्यक्ती देण्यासाठी जाफरअल्ली सांगतो, "हिंदुधर्म कधीही न बुडो, म्हणजे हिंदुधर्म आम्ही हा हा म्हणता बुडवून टाकू. प्रथम अस्पृश्य बाटवावेत आणि मग त्यांच्या संख्याबळानं प्रबल झालेल्या अिस्लामनं तत्त्व म्हटले की तरवार अुपसून या तत्त्वज्ञ ब्राह्मणादिकांस मुसलमान बनवावं हे धोरण, हा कार्यक्रम !''[७]

---

१. जाति. नि. पृ. ७९. २. अु:शाप पृ. ४२. ३. मा. जन्म. पृ. ३०१
४. अु:शाप पृ. १२१. ५. अु:शाप पृ. १३५. ६. अुत्तरक्रिया पृ. ९४-९५-९६.
७. अु:शाप पृ. ७१.

स्पृश्य हिंदूच केवळ अस्पृश्यता मानतात असे नाही तर अस्पृश्य समाजातही ही स्पृश्यास्पृश्यता, अुच्चनीच भाव असतात, हे सावरकरांनी 'धर्मांतराच्या प्रश्ना-विषयी महारबंधूंशी मनमोकळा विचारविनिमय' या लेखात सांगितले आहे. ते लिहितात, "महारांतही जन्मजात जातीचा अभिमान नि जातगंगेच्या पंचायतीचा प्रभाव, कोणा स्पृश्यास कल्पना नसेल अितका प्रबळ आहे. महार त्यांच्या खालच्या भंगी, धेडप्रभृती जातींबरोबर रोटीव्यवहार करण्यास ब्राह्मणाअितकाच ताठ विरुद्ध असतो."[1] 'अु:शाप' मधला अिब्राहिम हेच विचार सांगू लागतो तेव्हा 'बोलविता धनी' नाटककार स्वत:च आहे याची खात्री पटते. अिब्राहिम म्हणतो, "मी हिंदू होतो तोपर्यंत मला ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत तर काय, पण हे महार देखील 'नीच नीच' म्हणून हड हड करीत असत..... महार आम्हां डोंबांचे ब्राह्मण बनून अशीच कठोर छळवणूक करणार."[2]

धर्मांतर करूनही अस्पृश्यांचा प्रश्न सुटत नाही हे सावरकरांना वरील लेखात पटवून द्यावयाचे आहे. लेखाच्या अखेरीस ते म्हणतात, 'बाटल्या महारांना ते (मुसलमान) किती नोकऱ्या देणार? – किती मुली देणार? – नव्हे, मुसल-मानांतही त्यांना कमीना मुसलमान–कमजात मुसलमान म्हणून राहावे लागणार."[3] 'अु:शाप' मधल्या शंकरला वंगपखान जेव्हा धिक्कारतो तेव्हा त्याच्या मनातले विचार असेच आहेत.[4] 'मुसलमान वंगप देखील मला बाटगा म्हणून धिक्कारिता झाला' असे म्हणून शंकरने व्यक्त केलेले दु:ख सावरकरांच्या वरील विचारांचेच पडसाद आहेत.

अस्पृश्यतेच्या रूढीविरुद्धच – स्पर्शबंदीविरुद्धच– केवळ सावरकरांनी शस्त्र धरले नाही, तर स्पर्शबंदीबरोबरच शुद्धिबंदी, रोटीबंदी, सिंधुबंदी अित्यादी सप्तबेडयांवर त्यांनी आपल्या नाटकांतून घाव घातले. विशेषत: रोटीबंदीवर व सिंधुबंदीवर आपल्या नाटकांतील पात्रांच्या मुखांतून अत्युग्र टीका केली आहे. 'अुत्तरक्रिये'तील कोंडण्णा, धोंडण्णा, शास्त्रीबुवा ही पात्रे विरुद्ध पक्षाला अुभी करून यशवंतरावाच्या द्वारा आपलेच विचार त्यांनी साकल्याने मांडले आहेत. त्यामुळे यशवंतराव हे पात्र सावरकरांच्या विचारवाहकाचेच कार्य करण्यासाठी अवतरल्याचे दिसून येते. या दृष्टीने सावरकर व यशवंतराव यांचे विचार तुलनेने पाहिले म्हणजे यशवंतराव या पात्राचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नाहीसे होत आहे व सावरकरांचे आक्रमक व्यक्तिमत्त्वच त्यावर प्रभाव गाजवीत आहे याची खात्री पटते.

---

१. निर्भीड–दि. १५–१२–३५. २. अु:शाप पृ. ३५. ३. निर्भीड–दि. १५-१२-३५.
४. अु:शाप पृ. १३२–१३३.

'प्रस्तुतच्या जातिभेदाचे अिष्टानिष्टत्व' या 'केसरी'तील लेखमालेतील पहिल्याच लेखात सावरकर लिहितात, "परदेशगमन निषेधाचाच प्रताप आपणांस केवढा भोवला पाहा ! परदेशगमन निषिद्ध का? तर 'जात' जाअील म्हणून. आणि जात जाअील म्हणजे काय तर जातीवाहेरच्या मनुष्याशी अन्नोदक संबंध घडेल.... अशा विक्षिप्त विटाळ-वेडाने परदेशगमन निषिद्ध होताच परदेशचा व्यापार आणि व्याप ठार बुडाला. अितकेच नव्हे तर पृथ्वीवरच्या दूरदूरच्या खंडेखंडी या विटाळ वेडाच्या प्रादुर्भावापूर्वी हिंदू व्यापाऱ्यांनी आणि सैनिकांनी संपादिलेली आणि वसविलेली नगरेच्या नगरे, बंदरेच्या बंदरे, राज्येची राज्ये मातृ-भूमीपासून अकस्मात विलग झाल्याने आणि स्वदेशातून भारतीय स्वजनांचा जो सतत पाठपुरावा होत होता तो नाहीसा झाल्याने तिकडच्या तिकडे गडप झाली, अक्षरशः 'नामशेष' झाली.... (युरोपातील) यादवीचा जसा त्यांनी (अिंग्रजांनी) लाभ घेतला तसा आम्हांस घेता आला नसता ? पण आडवी आली ही जात– हे सोवळे– हा मुकटा! ' ह्या मुकटचापायी मुकुट दवडले मुकुट ! .... भारताचे जलबल– त्या रणतरी–ती नौसाधने–जी अगदी दहाव्या शतकापर्यंत सागरा-सागरा वर–हिंदुध्वज डोलवीत संचार करीत होती, ती तर अगदी ठार बुडाली, त्या महा-सागराच्या पाण्यात नव्हे तर या हिंदुजातवेडाच्या संध्येच्या पळीतील पाण्यात."[1]

आता 'अुत्तरक्रिये'तील यशवंतराव काय सांगतो पाहा :

"आज अिंग्लंडची आहेत तशीच मिसरपासून मेक्सिकोपर्यंत आपल्या भारतीय आर्यांचा हिंदुधर्म आणि हिंदुराज्ये फैलावली होती. ती कोणी बुडविली ? मुख्यतः ही परदेशगमन-बंदीची बेडी आपण होअून आपल्या पायांत ठोकून घेतल्याने ! अिकडून सैन्य, राजे, प्रचारक, नातेवाअीकदेखील तिकडे कोणी जाअीनासा झाला.... ती हिंदुराज्ये आणि हिंदुजनता तिकडे निर्जीवन होअून अहिंदूंनी खाअून टाकली. महाराज, युरोपपर्यंत आपली सिंधुयाने – हिंदु आरमारे जाअून जगताचा व्यापार आपल्या खिशात ठेवीत होती, प्रत्येक सागरा-महासागरावर हिंदुध्वज फडकावीत, हिंदुगणिक निर्भयपणे प्रवासत असे. तो सारा जागतिक हिंदु-व्यापार नि ती हजारो सिंधुयाने कशात बुडाली? कोण्या महासागराच्या प्रचंड वादळात नव्हे, तर अेका संध्येच्या पळीतील वादळात ! परदेशातील पाण्याने संध्या विटाळते, मुकटा विटाळतो, विजातीयांसह खाण्याने जात जाते, धर्मच बुडतो या खुळापायी जेव्हा रोटीबंदी नि तिच्यामुळेच पुढे समुद्रबंदीची बेडी आम्हीच, आमच्या प्रगतीच्या पायांत ठोकली तेव्हा तीमुळे आमची राज्ये नि तो सामुद्रिक व्यापार ठार बुडविला. या मुकटचापायी मुकुट दवडिले."[2]

---

१. जाति. नि. पृ. ५, ९. २. अुत्तरक्रिया पृ. २४–२५.

सावरकरांचा यशवंतराव सावरकरांचे विचारच केवळ सांगत नाही, तर सावरकरांच्या शब्दकळेत व शैलीतही ते विचार तो व्यक्त करतो. सावरकरांचा युक्तिवादही तो अिंग्रज वकिलांशी बोलताना लढवून त्याला निरुत्तर करतो.[१] 'हिंदूही राहू आणि काबूल तर काय पण अिस्तंबूलवरही मराठी झेंडा आणि मराठी घोडा नाचवू' हा सावरकरांचा प्रगत विचार[२] पेशवेकालीन व्यक्तींच्या पुढे तो निर्भयपणाने मांडतो.[३] पानिपतच्या लढाअीसंबंधी सावरकरांचा जो अैतिहासिक सिद्धान्त आहे तोच माधवराव पेशवे सांगतात. 'हिंदुपदपादशाही' प्रबंधातील 'जेत्यांना जिंकणारा पराभव' या प्रकरणात सावरकरांनी पुढील निष्कर्ष काढला आहे. "त्यांनी (मुसलमानांनी) पानपतचे युद्ध जिंकले. पण ते जिंकताना हिंदुपदपादशाही प्रस्थापित करावयाला निघालेल्या मराठ्यांशी त्यांनी चालविलेला झगडा मात्र ते पूर्णपणे हारले." 'अुत्तरक्रिये'तील माधवराव पेशवे हेच सांगतात की, 'मराठे पानिपतची लढाअी हरले.' पण मराठ्यांनी शेवटी.... पानपतचे युद्ध जिंकले."[४] महादजी शिंदेसुद्धा जणू काही हाच धडा गिरवून बोलतात, "पानिपतची लढाअी आम्ही हरलो हे खरे; पण पानिपतचे युद्ध आम्ही अजून तरी हरलो नाही."[५]

'संन्यस्त खड्ग' नाटकातील पात्रे जे विचार बोलतात त्यांतील महत्त्वाचे बहुतेक विचार सावरकरांनी आपल्या 'हिंदुत्व' या ग्रंथात समाविष्ट केले आहेत.[६] बुद्ध धर्माचा हेतू हा अुच्च व अुदात्त होता हे आपले मत सावरकरांनी विक्रमदेवच्या मुखातून वदविले आहे. तो म्हणतो, "भगवान, जन्म, व्याधी, जरा आणि मृत्यूपासून मनुष्यमात्रांस विनिर्मुक्त करण्यासाठी मनुष्यांत जर कोणी अधिकांत अधिक त्याग केला असेल, तप केले असतील, चिंता वाहिली असेल तर ती तथागत, भगवान बुद्धदेव, आपण होय."[७] अशाच प्रकारची बुद्धाबद्दलची कृतज्ञता विक्रमाने दोन-तीन ठिकाणी व्यक्त केली आहे.[८] शांतियुग स्थापण्यासाठी बुद्धाने अेक महान, अलौकिक प्रयोग केला हे सावरकरांना मान्य आहे. म्हणून त्यांचा विक्रम शस्त्रसंन्यास करताना सांगतो, "तथापि भगवान बुद्धासारख्या अलौकिक पुरुषास या पुण्यकार्यी साहाय्य मिळाले नाही म्हणून हा प्रयोग फसला असे पुढील पिढ्यांस चुकूनही वाटू नये म्हणून मी तथागतांच्या अिच्छेस अनुसरतो."[९] अखेर 'जेत्यांच्या तरवारीची तिखट धार, मृदुल ताडपत्राने किंवा मंत्रांच्या आवर्तनाने बोथट होअू शकणारी नव्हती' हा सावरकरांचा

---

१. अुत्तरक्रिया पृ. ६२. २. जाति. नि. पृ. ६. ३. अुत्तरक्रिया पृ. ४१. ४. अुत्तरक्रिया पृ. ४०. ५. अुत्तरक्रिया पृ. १४. ६. हिंदुत्व पृ. १८ ते २५. ७. संन्यस्त खड्ग पृ. ७१. ८. संन्यस्त खड्ग पृ. ७२, ७४. ९. संन्यस्त खड्ग पृ.४१, ४२.

निष्कर्ष[1] त्यांचा विक्रम पुढील शब्दात सांगतो. "दुष्ट दुर्जनच आपल्या अुपदेशास लाथाडून शस्त्राने, शक्तीने, बळाने कुरघोडी करू पाहणार! अशा सामन्यात पोथीच्या पानांची पोचट ढाल पक्क्या पोलादाच्या आघाताखाली पिचून पिचून जाअून पुण्यशीलांचा विनाश आणि पापशीलांचा विजयच होणार."[2]

बुद्धधर्मामुळे राष्ट्राच्या पौरुषावर गदा आली, शस्त्राची, शौर्याची अपेक्षा झाली हा विचार सावरकरांचा विक्रम सतत सांगत आहे. 'शस्त्रबळाची अुपेक्षा हानिकारक आहे' हे सत्य तो बुद्धाच्या अुपस्थितीत सांगतो.[3] शाक्याचा अेक अधिकारी महानामाही हेच सांगतो.[4] बुद्ध धर्माचा झालेला नैतिक अध:पात शाकंभट, ताकंसिंह सांगतात. अशा रीतीने या नाटकातील पात्रे सावरकरांचे विचार व्यक्त करण्यासाठी अवतार घेत असतात. त्यांना स्वत:चे विचार नसल्याने ती निर्जीव, कळसूत्री बाहुल्यांसारखी वाटतात.

सावरकरांच्या निबंधांतून व्यक्त झालेले विचार त्यांच्या नाटकांतील विविध पात्रांच्या मुखांतून कसे वदविले गेले आहेत, याची काही अुदाहरणे आपण आतापर्यंत पाहिली. हे विचारसाम्य तर आहेच. परंतु ज्या तत्त्वांनी, निष्ठांनी, श्रद्धांनी, ध्येयांनी सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला, त्यांच्या अनेक छटा, अनेक शलाका त्यांच्या नाटकांतील पात्रांत चमकताना आढळतात. त्यांचाही विचार थोडक्यात करावयाचा आहे.

शस्त्रपुरस्कार

शस्त्रपुरस्कार हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अेक महत्त्वाचा घटक आहे. तारुण्याच्या अुंबरठ्यावर अुभे असताना शस्त्रसामर्थ्याचा पगडा त्यांच्या मनावर बसला. 'सशस्त्र क्रांतियुद्ध' हा त्यांचा ठाम सिद्धान्त झाला.[5] मानवाच्या हितासाठी, प्रेमासाठीच अेक अपरिहार्य साधन म्हणून शस्त्रवादाचा पुरस्कार त्यांनी केला.[6] त्यांच्या नाटकांतील प्रमुख पात्रांच्या स्वभावरेखांत ह्या विचाराची शलाका अधिक अुठावदार वाटते. 'अु:शाप'मधील कमलिनी, 'संन्यस्त खड्गा'तील विक्रम, वल्लभ, महानामा, सुलोचना, धर्म 'अुत्तरक्रिये'तील सुनीती, सुशीला या व्यक्तींच्या स्वभावरेखांत या विशिष्ट वृत्तीचे रंग दिसून येतात. 'अु:शाप'मधील बंगषखान याचा खून केल्यावर कमलिनी म्हणते, "हिंदू कुमारिकांनो, ही रक्ताने माखलेली कटयार पाहा. पावित्र्यरक्षण आणि धर्मसंगोपन, आमच्या

---

१. हिंदुत्व पृ. २०. २. संन्यस्त खड्ग. पृ. ७३ ३. संन्यस्त खड्ग पृ. ७४.
४. संन्यस्त खड्ग पृ. ६५. ५. आ. च. पृ. २२५. ६. आ. च. पृ. २३५.

पुरुषांना आणि देवालाही जेव्हा करता येत नाही तेव्हा ते अेक चितोडची चिता करू शकते नाहीतर ही सूडाची सुरी"[1] 'संन्यस्त खड्गा'तील विक्रम हा तर शस्त्रवादाचा प्रभावी पुरस्कर्ता आहे. 'पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर जगाच्या दुर्दैवाने शस्त्रयुगाचेच प्राबल्य दिसून येअील, बळी तोच कान पिळीत राहील' अशी त्याची भविष्यवाणी आहे.[2] 'शस्त्र हे शास्त्राअितकेच परम पूज्य आहे आणि लोकधारणेस आवश्यक साधन आहे" असे विक्रमाचे मत आहे.[3] 'शस्त्रबळाची अुपेक्षा' धर्मासही अमान्य आहे.[4] वल्लभ, महानामा, सुलोचना यांनी हातांत शस्त्र घेअून रणांगणातच घाव घेतली आहे. 'अुत्तरक्रिये'तील सुशीला व सुनीती या वीरांगना रणांगणावर सशस्त्र तळपतात.

जनहितवृत्ति

जनहितबुद्धी, लोकहितसाधकवृत्ती हा सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील दुसरा विशेष त्यांच्या नाटकातील प्रमुख पात्रांच्या स्वभावात दिसून येतो. 'वरं जनहितं ध्येयं' हे सावरकरांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य[5] त्यांच्या नाटकातील पात्रांच्या जीवनाचेही ब्रीदवाक्य बनले आहे. 'अुःशाप'मधला चोखा म्हणतो, "हिंदू समाज.... लोकहितसाधक ते ते कर्म पवित्र आहे असं समजेल तर हा परस्पर मत्सर अुत्पन्न होणार नाही."[6] 'संन्यस्त खड्गा'तील बुद्ध 'केवळ लोककल्याणार्थ त्या निर्वाणाचा मार्ग जगतास अुपदेशीत' असल्याचे विक्रमसिंहास सांगतो.[7] विक्रमसिंह स्वतः आपल्या प्रत्येक कृतीचा निकष हे जनहित समजतो. बुद्ध सर्वांना संन्यासदीक्षा देत असल्याचे पाहून विक्रम म्हणतो, "तेवढी गोष्ट मात्र लोककल्याणास विघातक होणारी आहे, असे मला वाटते."[8] म्हणून लोकहितास प्रसंगी प्रतिकूल जाणाऱ्या प्रतिज्ञांना पंगू असलेल्या संन्यासाश्रमास तो सोडून जातो.[9] बुद्धाच्या अुपस्थितीत चंडावर वार करताना 'लोककल्याणार्थ तत्परता हे संन्याशाचे अैहिक कर्तव्य मी केले' म्हणून विक्रमाला धन्यता वाटली. विक्रमाचा पुत्र वल्लभ व स्नुषा सुलोचना यांची अखेरची अिच्छा 'लोककल्याणार्थ मरेतो लढणे' ही होती.[10] 'लोकहिताच्या साधनी व्यत्यय येताच त्या वैयक्तिक (अिंद्रिय) सुखांचा बळी देण्यास तत्काळ सिद्ध होणं हाच खरा अिंद्रियजय होय' हे विक्रम, वल्लभ व सुलोचना यांचे ब्रीद होते.[11] प्रत्यक्ष धर्मही विक्रमाला हाच संदेश देतो

---

१. अुःशाप पृ. १४७. २. संन्यस्त खड्ग पृ. ४१. ३. संन्यस्त खड्ग पृ. ६६. ४. संन्यस्त खड्ग पृ. १३२. ५. मा. जन्म. पृ. ४४८–४४९. ६. अुःशाप पृ. १८ ७. संन्यस्त खड्ग पृ. १७. ८. संन्यस्त खड्ग पृ. १७. ९. संन्यस्त खड्ग पृ. ८४. १०. संन्यस्त खड्ग पृ. १२८. ११. संन्यस्त खड्ग पृ. ११७.

की, "जो अत्यधिक लोकसाधक आहे अशा तू अुपदेशिलेल्या आणि आचरलेल्या शुभ-कामी शक्तिपूजक कर्मयोगाचा अवलंब करणे हेच या संकटाच्या कचाट्यातून मुक्त होण्याचे साधन आहे."[1] 'अुत्तरक्रिये'त यशवंतराव म्हणतो, 'पुण्य अशी अिच्छा, कामना जनधारणेसाठी आचरण्यास मी कचरणार नाही. मग लोकांनी मला कितीही दूषणे दिली तरी हरकत नाही.'[2]

हिंसा-अहिंसा आणि सत्य

या लोककल्याणाचा, जनहिताचा, अधिकात अधिक मानवांच्या हिताचा ध्रुवतारा सतत दृष्टीसमोर ठेवूनच सावरकरांनी काही तत्त्वांना मर्यादा घातल्या. अहिंसा व सत्य ही जीवनातील महत्त्वाची तत्त्वे सर्वश्रेष्ठ आहेत हे त्यांना मान्य आहे. पण सुष्टदुष्टांच्या व्यवहारी जगात त्यांना मर्यादा पडतात असे त्यांचे मत होते. 'अपरिमित हिंसा टाळण्यासाठी दुष्टांची वीण थांबवणारी किंचित हिंसाच खरी अहिंसा होय' अशी त्यांची निश्चिती झाली होती.[3] 'गोमांतक' काव्यात "हिंसेची दंतनखे छाटून तिला गाय करते तीच खरी अहिंसा' असा सिद्धान्त त्यांनी मांडला आहे.[4] 'गांधी-गोंधळ' या लेखसंग्रहात त्यांनी अहिंसेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'अधिकतर हिंसा टाळावयास अपरिहार्य अशी अल्प हिंसा कर्तव्यच ठरते.'[5] सावरकरांच्या नाटकांतील पात्रे अहिंसेवद्दलचा हाच सिद्धान्त, हीच व्याख्या पुन्हा पुन्हा प्रेक्षकांना सांगतात. त्यांचा विक्रम बुद्धाला सांगतो, "अधिकात अधिक सुष्ट प्राण्यांचे हितार्थ अेका दुष्ट प्राण्यास दंडिणे हाच खरा धर्म समजतो. हिंसेची दंतनखे शस्त्राने छाटून टाकते तीच खरी अहिंसा होय."[6] "आत्यंतिक अहिंसा म्हणजे आत्यंतिक हिंसा" असे त्यांचे निश्चित मत आहे.[7] म्हणून "ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचे परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्म असल्याने" तिला सोडून विक्रम पुन्हा शस्त्रधारणा करतो.[8] "केवळ अहिंसेने हत्या नष्ट करता येत नाही,' 'अहिंसेच्या अुपदेशाने काही सत्प्रवृत्त व्यक्तीच करुणामय बनतील,' 'पण दुष्टांचे मन सदुपयोग अैकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने,' 'अहिंसेच्या खुळापायी नरहत्या चालू राहील," असे विक्रम सांगतो.[9] 'अहिंसेच्या नावाने पौरुषघात' होतो असे 'अुःशाप' मधील बंगषखानही सांगतो.[10]

---

१. संन्यस्त खड्ग पृ. १३२. २. अुत्तरक्रिया पृ. २४. ३. आ. च. पृ. २२८. ४. गां. गों. पृ. ११५. ५. गां. गों. पृ. ५. ६. संन्यस्त खड्ग पृ. ७५. ७. संन्यस्त खड्ग पृ. ३८. ८. संन्यस्त खड्ग पृ. ८४. ९. संन्यस्त खड्ग पृ. ७६, ७७, ७९. १०. अुशाप पृ. १४५.

अहिंसेच्या खुळाची टवाळी करण्यासाठीच सावरकरांनी काही पात्रांची योजना केलेली आहे. 'संन्यस्त खड्ग' मधल्या शाकंभटाला कोसलच्या सैनिकांनी वेढताच व त्याला भेडसावताच तो भिक्षू शाकंभट म्हणतो, 'आम्ही भिक्षू! अहिंसा हेच आमचं मुख्य व्रत. ठोकणं, मारणं, पिटणं, असले हिंसात्मक शब्द अुच्चारणे देखील आम्ही पाप समजतो . . . .आम्ही थापास देखील ठोकीत नाही, चकाटयांना देखील पिटीत नाही, गप्पास देखील झोडीत नाही, हाकेला देखील मारीत नाही'[1] कोसल सैनिकांतील अेकही सैनिक अहिंसेची टवाळी करण्याची संधी सोडीत नाही. तो म्हणतो, "अशा मिथ्याचारी भिक्षूस भिक्षू म्हणूनच जिवंत ठेवणारा मी कोणी दुष्ट दयेचे आणि अनर्थक अहिंसेचे ज्याला दोन लांब कान फुटले आहेत असा बुद्दू गाढव नाही, समजलात!"[2]

जी गोष्ट अहिंसेची तीच सत्यासंबंधीची. सावरकरांनी सत्याबद्दलचे आपलेच विचार आपल्या पात्रांच्या तोंडून वदविले आहेत. "मनुष्यजातीचे हित हेच सर्व सद्गुणांचे समर्थन. अर्थात ज्या सत्याने मनुष्याचे अेकंदरीत कल्याण साधते ते सत्य सद्गुण, धर्म. पण ज्या सत्याने चोरास सोडून संन्याशास फाशी होते ते सत्यही दुर्गुण, ते सत्यच असत्य" असे सावरकरांचे निश्चित मत होते.[3] मग गंगाजीसारख्या सामान्य वेश्येने जर हेच मत मांडले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सत्यवानाने देवीसिंहासारख्या चोराच्या हातांत पेटयांच्या किल्ल्या दिल्याचे कळताच गंगाजी म्हणते, 'आग लागो मेल्या त्या सत्याला की जे दीन आणि सरळ साधुजनांना दुष्टांच्या पाशात फशी पाडतं."[4] 'वाचिक सत्य म्हणजे सत्य ही सत्याची व्याख्या' अयोग्य होय हे सूत्रधाराच्या तोंडी मुखाने वदवून सावरकरांनी 'अु:शाप'च्या नांदीच्या प्रवेशातही सत्यावर चर्चा केली आहे; आणि सत्याच्या हास्यास्पद व्याख्येची टर अुडविण्यासाठी सत्यप्रिय व सत्यवान या दोन पात्रांची योजना केली आहे. 'न हि सत्यात्परो धर्म:', हे सत्यवानाचे ब्रीद आहे.[5] 'साहित्यशास्त्रातील अलंकार, काव्य, नाटक, कादंबरी, कथा' या सर्व गोष्टी असत्य म्हणून त्याज्य असे तो सांगतो.[6] सत्याने सर्व रोग दूर होतात,"[7] 'सत्यवक्ती संतती हवी असेल तर प्रजनन हे देखील अेखाद्या, पापकृत्यासारखं अंधाराचे पडदे सोडून करू नका"[8] 'मुला-मुलींचे लपंडाव, आंधळ्या कोशिंबिरी, आटयापाटया भातुकली, बाहुली अित्यादी खेळ असत्यमय असल्याने निषिद्ध आहेत' असे सत्यवान सांगतो.[9] पितृसाधित नाव सोडून आअीवरून मुलांची नावे ठेवावीत

१: संन्यस्त खड्ग पृ. ९९. २. संन्यस्त खड्ग पृ. १००. ३. आ. च. पृ. २२०. ४. अु:शाप पृ. ११५. ५. अु:शाप पृ. ६५. ६. अु:शाप पृ. ६६. ७. अु:शाप पृ. ६७. ८. अु:शाप पृ. ६७. ९. अु:शाप पृ. ६९.

कारण 'अमक्या बाअींनी अमक्या मुलाला जन्म दिला हे अधिक विश्वसनीयपणे लोकांना सांगता येतं' असे 'सत्या'धिष्ठित तर्कशास्त्र सत्यवान लढवितो.[1] 'लपणं हे असत्य'[2] असे सत्यवानाचे मत जरी असले तरी त्याच्या व्यक्तिरेखेमागे नाटककाराचे व्यक्तिमत्त्व दडलेले आहे ही गोष्ट मात्र त्यालाही मान्य करावी लागेल.

सत्य-अहिंसा ही श्रेष्ठ तत्त्वे आपला भ्याडपणा लपविण्यासाठी सामान्य जनांकडून आचरली जातात हा विचार सतत मांडण्यासाठी सावरकरांनी वेगवेगळी पात्रे निर्माण केली आहेत. 'गोमांतका'तील निनामीबावाचेच सत्यप्रिय सत्यवान, शाकंभट, ताकंसिंह हे वेगवेगळे अवतार आहेत. सत्यवानाचा भ्याडपणा ठेंग्याने अुघडकीस आणलाच आहे.[3] बंगषचा अेक सामान्य शिपाअी हेच सत्य सांगतो. तो सत्यवानाचे वर्णन करताना म्हणतो, "हा सत्वेडा गवार आहे. कारण तो जितका सत्यवादी आहे तितकाच भ्याड आहे."[4]

प्रतिशोधाचे महत्त्व

मानुषकाच्या हिताच्या दृष्टीने सावरकरांनी आणखी अेका तत्त्वाचा पुरस्कार केला होता. 'आततायांस वचक वसविणारा सूड अुगवीत मरणे अिष्ट' असे ते मानीत.[5] 'त्यामुळे आततायांची संख्या घटते आणि दुसऱ्या कोणा अनागसाचा छळ करण्याची त्याची छाती ह्या प्रतिशोधाच्या भीतीने सहसा होत नाही असे ते सांगतात.[6] 'दास्यात अंती मरणच असल्याने त्या दास्यात जगण्यापेक्षा क्रांतियुद्धात राष्ट्र ठार झाले तरी ते मारीत मारीत मरण मरत मरत मरण्याहून केव्हाही अधिक श्रेयस्कर होय' अशी त्यांची दृढ धारणा होती.[7] 'अभिमुख शस्त्राघाती समर मखामाजी वेचिला काय' असा आजवरच्या आपल्या अस्तित्वाला शोभेल असा महान अंत हिंदू जातीने स्वीकारावा असे त्यांना वाटत होते.[8] नुसता अहिंसा परमो धर्मः नाही तर 'आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्' या हिंदुधर्माच्या दोन्ही आज्ञांचा समन्वय आपण करावा अशी त्यांची विचारसरणी होती.[9]

सावरकरांच्या तिन्ही नाटकांतील प्रमुख पात्रे ह्याच वृत्तीची आहेत. 'अुःशाप'मधील कमलिनी बंगषचा खून केल्यानंतर याच आशयाचे विचार मांडते.[10] 'संन्यस्त खड्ग'मधील विक्रमसिंह म्हणतो, "त्याचं (दुष्टाचं) मन दंडाने वळविता जरी आलं नाही तरीही ते पंगू करून टाकता येतंच येतं."[11] गौतमबुद्ध

---

१. अुःशाप पृ. ११०. २. अुःशाप पृ. ६९. ३. अुःशाप पृ. १४४ ४. अुःशाप पृ. १४१. ५. आ. च. पृ. २२९. ६. आ. च. पृ. २२९. ७. आ. च. पृ. २२९. ८. आ. च. पृ. २२९. ९. श्रद्धानंद दि. १०–२–२७. १०. अुःशाप पृ. १४८. ११. संन्यस्त खड्ग पृ. ७७.

आपले अनुशासन देताना म्हणतो, "न्याय्य युद्धात आततायी शत्रूशी लढण्यासाठी शस्त्र धारण करण्यास माझ्या गृहस्थाश्रमीय अनुयायांस माझी अनुज्ञा आहे.[1] समरसभेत आपले मत व्यक्त करताना सुलोचना सांगते, "ही सूडाची प्रवृत्ती आततायी आक्रमणास त्याचे पापी अपहरण सहसा अगदीच स्वस्त पडू देत नाही. त्यामुळ तो आततायी कर्मे करण्यास तितक्या निर्भय वेगाने धावत नाही की, जितक्या तो सूडाचे भाव नसते तर धावला असता."[2] तीच सुलोचना पुढे अेके ठिकाणी म्हणते, "जे म्हणतात की स्वर्ग आहे तेच म्हणतात की, आततायी नाशनार्थ केलेल्या धर्मयुद्धात हत झालेले ते त्या स्वर्गात जातात. . . . युद्धाच्या रात्री मीही धारातीर्थी अभिमुखी हत होणार आणि प्रियाच्या पाअुली पाअूल ठेवून स्वर्गास जाणार."[3]

विक्रमसिंह हा निर्वाणपदाचा अधिकारी आहे याचे कारण सांगताना धर्म म्हणतो, "धर्माचे मुख्य मर्म जे मानुषकाचे अत्यंत हित ते साधण्यासाठी तू सर्वस्व त्याग करून अभिमुख समरात लोककल्याणार्थ झुंजत लोकहिंसकाचा वध केलास."[4]

पानिपतच्या पराभवाचा सूड अुगविण्याचा निश्चय केल्यावर माधवराव पेशवे सबळ समर लढविण्याची प्रतिज्ञा करतात आणि शेवटी म्हणतात, "अभिमुख हत होअीनचि वा।"[5]

विश्वासराव पेशव्यांना गिलच्यांनी गारद केले अशी शेखी अबदालीचा वकील मिरवू लागताच विन्चीवाले अुत्तरतात, "ते धन्य झाले. अभिमुख समरी लढत, अविंधावर नीट चालोन घेत, हत्यार चालवीत, धारातीर्थी अेक पायही मागे न घेता वीर देह ठेवून स्वर्गी गेले."[6] यशवंतरावची प्रथम पत्नी शत्रूचा वार लागून घायाळ होअून पडताना म्हणते, "आज मराठ्यांच्या हाडवैऱ्याचे वैर अुगवीत धर्मसमरी अभिमुख आघाती घायाळ होअून आपल्या चरणापाशी मी नित्याची निजते आहे."[7]

कमलिनी, सुलोचना, वल्लभ, विक्रम, सुनीती, ही सगळी प्रमुख पात्रे आततायांना मारीत अभिमुख समरी मारीत मारीत मरण स्वीकारतात. 'शरण नाही रण, मारीत मारीत मरण' असे सुलोचना सांगते आणि विक्रमसिंह तिला साथ देतो.[8]

'अक्रोधेन जयेत क्रोधं' ही वृत्ती सावरकरांच्या स्वभावातच नाही. प्रतिशोधाची नैसर्गिक प्रवृत्ती मानवाच्या ठिकाणी काही दैवी हेतूने वास करीत असते

---

१. संन्यस्त खड्ग पृ. ७७. २. संन्यस्त खड्ग पृ. १०८. ३. संन्यस्त खड्ग पृ. ११८. ४. संन्यस्त खड्ग पृ. १३२. ५. अुत्तरक्रिया पृ. १८. ६. अुत्तरक्रिया पृ. १३-१४. ७. अुत्तरक्रिया पृ. १०७. ८. संन्यस्त खड्ग पृ. ११२, ११३.

असे ते मानीत. अंदमानात व पुढे रत्नागिरीच्या कारागृहात त्यांच्या टायीची ही प्रतिक्रियावृत्ती, प्रतिशोधाची प्रवृत्ती कशी अुसळून वर येत असे याचे वर्णन त्यांनी स्वत:च केले आहे.[१] त्यांच्या नाटकांतील प्रमुख पात्रेही याच प्रवृत्तीची आहेत. 'चितोडच्या चितेपेक्षा या सूडाच्या सुरीला बलात्कार थरथर कापत असतो' असे अुद्गार हातातील सूडाच्या सुरीच्या साक्षीने त्यांची कमलिनी काढते.[२] "अु:शाप "मधील सर्व भुतेही शंकरला 'अेका तरी दैत्याला वधदंड देण्याचे' तत्त्व-ज्ञान सांगतात.[३] या प्रवृत्तीच्या युक्ततेचे थोडे प्रदीर्घ विवेचन त्यांची सुलोचना करते. शाक्यांचा विनाश होण्याच्या वेळी 'शरण की रण' असा प्रश्न अुपस्थित झाला असता सुलोचना म्हणते, "विजयाची आशा सुटली; पण तरीही अजून शाक्यास अेक आशा आहे. ती म्हणजे सूडाची.... ही दलित क्रोधाची प्रतिक्रियाच अुन्मादाच्या हत्तीचा अंकुश असते .... प्राणिमात्राच्या क्रोधास ही जी निसर्गानेच सूडाची नांगी ठेविली आहे, तिच्यात हा असा दैवी हेतू असतो की, ही सूडाची प्रवृत्ती आततायी आक्रमणास त्याचे पापी अपहरण सहसा अगदीच स्वस्त पडू देत नाही.... शाक्याने निदान पाच पाच क्रूरकर्मी कोसलांचे कंदन करीत, दंड देत देत, सूड घेत घेत मरावे म्हणजे हा विद्युद्गर्भ आपल्यासारख्या अितर लहान लहान प्रमुख प्राजकांवर तरी यापुढे असा सशस्त्र छापा घालू धजणार नाही; अशा वेळी सूड ही नुसती अुपजत प्रतिक्रियाच नव्हे तर परोपकारक कर्तव्य आहे."[४] सुलोचनेची सखी नलिनीसुद्धा सुलोचनेस हाच कर्तव्याचा संदेश देते की, शत्रूंचा शक्य तो सूड अुगवीत, खड्गाखड्गांतून अुठलेल्या ज्वालांवर चढून प्रिय स्मृतीसह सती जावं."[५]

'अुत्तरक्रिया' नाटकाचे कथानकच पानिपतचा सूड घेण्याच्या कल्पनेवर आधारलेले आहे. त्यामुळे त्यातील बहुतेक पात्रे सूडाची भाषा बोलतात. त्यातील वेडी तर 'सोनपत– पानपत– तुमची आमची गेली पत ।
पादशाह हिंदुपत– घ्या घ्या सूड ।।'

असे गात, नाचत सर्व नाटकात वावरत असते.[६] 'देवाचं नाव घेण्यापेक्षा निडर निराशा सूडाचं नाव घेते' असे ती सुनीतीला सांगते.[७]

माधवराव पेशवे पानिपतच्या सूडाने भारावून सांगतात, "भित्र्या शहाणपणाने बोथट झालेल्या महाराष्ट्राच्या तरवारीची धार पानपतच्या सूडाच्या

---

१. मा. जन्म. पृ. २८७ व ५२१. २. अु:शाप पृ. १४८. ३. अु:शाप पृ. १३५. ४. संन्यस्त खड्ग पृ. १०८, १०९. ५. संन्यस्त खड्ग पृ. ९१. ६. अुत्तरक्रिया पृ. ५, २९, ८४, १०३, १०४. ७. अुत्तरक्रिया पृ. १०३.

सहाणेवर घासून मी तिला ह्या वेडीसारखे वेड लावणार!"[१] 'अुत्तर हिंदवर पानपतचा सूड घेण्यासाठी स्वारी करण्याचे माधवरावांनी निश्चित केले असल्याचे धोंडण्णा सांगतो.[२] यशवंतरावही 'पानपतच्या सूडासाठी आपण स्वारीवर जात असल्याचे' सांगतो,[३] आणि त्याला निरोप देणारी त्याची पत्नीही लगेच त्याच भाषेत आवेशाने म्हणते, "हिंदू वीरांनो, जा भाअूंचा सूड घ्यायला, पानपतचा सूड घ्यायला, हिंदूंचा सूड घ्यायला जा, जा."[४] महादजी शिंदे या सूडाच्या, तरवारीच्या भाषेतच नजीबखानशी बोलतात.[५] पुढे हेच महादजी शिंदे रोहिलखंडात मराठी सैन्य घेअून शिरताच 'पानिपतच्या लढाअीचा सूड अुगविण्यासाठी' मराठी वीरांना अुत्तेजित करतात.[६] मराठ्यांच्या अटकेत पडलेल्या बिबीसाहेबांस सुनीती त्वेषाने विचारते, "बोला, मराठ्यांनी रोहिल्यांचा सूड पण सूड अुगविला नाही का?.... आता हिंदूंचा सूडही त्याच मापाने तुम्हांस आम्ही मोजून देणार!"[७] नाटकाचा अुपसंहार करताना दाहिर राजाही, 'प्रतिशोधाची क्षमता हिंदुराष्ट्रात यावी या अपेक्षेनेच शत शत हिंदू हुतात्म्यांनी बलिदान केले' असे सांगून अंतर्धान पावतो.

हौतात्म्याचे आकर्षण

सावरकरांची हौतात्म्य वृत्ती घेअूनच त्यांची नाटकांतील पात्रे प्रकट होतात. कमलिनी,सुलोचना, वल्लभ, सुनीती, विक्रम यांनी पत्करलेल्या हौतात्म्यातून त्या स्वभावरेखा परिणामकारक करण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला आहे. शाक्यांनी मारत मारत हौतात्म्य पत्करावे असे सुलोचनेने सांगताच त्या हौतात्म्य वृत्तीचा गौरव पुढील शब्दांत केला आहे. विक्रम म्हणतो, "अहो, मनुष्य आपल्या हातांतील चेंडू जसा सहज फेकून देतो तसा जो संसारी वीर आपल्या धर्मार्थ, आपल्या राष्ट्रार्थ, परोपकारी न्याय्य युद्धी आपलं शिर हातावर घेअून फेकून देतो, त्याहून अधिक जितेंद्रिय, अधिक निस्संग, अधिक निर्लिप्त असा कोणता संन्यासी असू शकणार आहे?"[८] असा जितेंद्रिय पुरुष हाच खरा हुतात्मा होय असे पुढे त्यांनी धर्माच्या मुखातूनच वदविले आहे. बुद्धाने विक्रमास 'तू आज निर्वाणच्युत झाला' असे सांगताच धर्म प्रकट होअून म्हणतो, "हे महाकर्म योगीन वीरवरा, तू निर्वाणच्युत झाला नाहीस, अुलट ह्या हौतात्म्यानेच निर्वाणपद प्राप्त झालास."[९]

---

१. अुत्तरक्रिया पृ. ५. २. अुत्तरक्रिया पृ. ७. ३. अुत्तरक्रिया पृ. ३६.
४. अुत्तरक्रिया पृ. ३७. ५. अुत्तरक्रिया पृ. ५०. ६. अुत्तरक्रिया पृ. ७६,
७. अुत्तरक्रिया पृ. १०५, १०६. ८. संन्यस्त खड्ग पृ. ११२–११३.
९. संन्यस्त खड्ग पृ. १३१.

हुतात्मा हाच खरा मनोजयी किंवा संन्यस्तेंद्रिय होय असे सुलोचनेची सखी नलिनी सांगते. 'अेक वेळ मस्त हत्तीचा पाय फुलमाळांनी वांधता येअील पण हुतात्म्यांच्या पायांस लंपट लोभाने आम्हां ललनांस संसाराच्या दाराशी वांधून ठेवता येणार नाही' असे सांगून ही सखी नलिनी पुढे म्हणते, 'संसाराच्या सगळ्या लोभांचा रंग त्यात प्रतिंविवित झाला असताही अशा वीरात्म्यांचा आत्मा स्थितप्रज्ञांच्या आत्म्यासारखा स्फटिकवत, निर्लेप, निःस्पृह आणि निस्संग असतो."[1]

'क्रांतिकारकांनी लग्न करावे किंवा नाही' याविषयी सावरकरांनी 'आत्मचरित्रा'त व्यक्त केलेल्या विचारांशी[2] नलिनीचे वरील विचार ताडून पाहिल्यानंतर नलिनीची स्वभावरेखा का फिकी वाटू लागते हे जाणकारांच्या ध्यानी येअीलच.

वल्लभाच्या हौतात्म्यवृत्तीचे दर्शन घडविताना त्याची पत्नी सुलोचना सांगते, "आम्ही शस्त्रे खाली ठेविली आणि शत्रूने क्वचित वल्लभास जिवंत ठेविलेच तर तो कशासाठी ठेवील ?.... त्या वल्लभाची शाक्यांचा विजित सेनापती म्हणून धिंड काढण्यासाठीच ना ! अशा जीवनीय दुर्दशेहून त्या मानी सेनापती वल्लभास हे मरणीय हौतात्म्यच अधिक वांछनीय वाटत असेल."[3]

वल्लभ व सुलोचना यांनी रणांगणावरच सहशय्या केल्यानंतर त्यांची 'हुतात्मता केवळ अलौकिक आहे' असा गौरव विक्रमसिंह करतो. या दोन्ही स्वभावरेखांच्या द्वारा 'यच्चयावत तरुण कन्यकांना व कुमारांना' हौतात्म्याची प्रेरणा मिळावी अशी आपली अिच्छा होती हे सावरकरांनी स्वतःच मान्य केले आहे.[4]

हौतात्म्याच्या आकर्षणाने सावरकर आपल्या नाटकांतील पात्रांची जशी अनावश्यक, अनपेक्षित, अस्वाभाविक अशी हत्या घडवून आणतात, तसेच ध्येयवादी वृत्तीने, कर्तव्याच्या जाणिवेने स्वतःप्रमाणेच काही पात्रांना आत्महत्येपासून परावृत्तही करतात. सावरकरांना स्वतःच्या जीवनात आत्महत्येचे आकर्षण दोन तीन वेळा वाटले होते. त्याचे सविस्तर वर्णन त्यांनी 'जन्मठेपे'त केले आहे;[5] आणि या प्रत्येक क्षणी त्यांनी मनाला बजाविले आहे, "जर मरणे तर ज्या सेनेतील तू सैनिक आहेस त्या सेनेचेच तसेच अेखादे कार्य करून तरी मर.... आपल्या अेका जीवास्तव.... असा मर.... मरणेच तर शंभरी शंभर रुपये घेअून ...."[6] आयुष्याची अितिकर्तव्यता पाहून आपल्या जीवनाचे मूल्य ठरविण्याची ही सावरकरांची विचारसरणी त्यांच्या पात्रांतही मधून मधून डोकावते.

---

१. सन्यस्त खड्ग पृ. ८९. २. आ. च. पृ. १८७–१८८. ३. संन्यस्त खड्ग पृ. १११. ४. वहु. पृ. २३८. ५. मा. जन्म. पृ. १३०, २३२, ५११, ५१२. ६. मा. जन्म १३०, ५१२.

सादुल्लाखानाशी विवाह लावून भ्रष्ट जीवन जगणाऱ्या सुनीतीने आपला अमंगल देह केवळ हिंदुपदपादशाहीस अुपयोगी पडावा म्हणूनच जतन करून ठेवला होता. सादुल्ल्यास ठार मारण्यास प्रवृत्त झालेल्या आपल्या आअीस प्रतिबंध करताना सुनीती म्हणते, "आअी, दहा-वीस दिवस आणखी थांब.... आज माझे आणि या नीच सादुल्ल्याचेही जीवन आपल्या हिंदुपदपादशाहीस आमच्या मरणाहून सहस्रपटीने अधिक अुपयोगी आहे..... तीन दिवसांनी तुला मी का वाचले नि याला का वाचविले ते कळेल."[१] स्वत: सुनीती सरदाराच्या रूपाने हाच विचार सांगते. 'आत्महत्येच्या तलवारीने देहाचे तुकडे' करून टाकण्याचा विचार आपण का सोडला, याचे कारण ती पुढील शब्दांत सांगते, "निरपराधी स्वत:सच निष्कारण ठार करण्यापेक्षा पुढे-मागे दिल्लीवर मराठी सेना चालून आल्यास त्या संधीत फत्तरगडातील या साऱ्या आततायांचीच राखरांगोळी करावी नि त्या पुण्याअीने ह्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे हेच अुत्तम."[२] हीच सुनीती मरताना पुन्हा म्हणते, 'आत्महत्येच्या पालापाचोळ्याच्या चितेवर मी कधीच जळावयाची. तो सुबुद्धी सुचून आज मराठ्यांच्या हाडवैऱ्याचे वैर अुगवीत धर्मसमरी अभिमुख आघाती घायाळ होअून.... मी नित्याची निजते आहे; 'याहून सुखकर ते मरण कोणते ?'[३]

कर्तव्यभावना

जीवनाकडे सावरकर कर्तव्याच्या दृष्टीने पाहतात. 'आत्मचरित्रा'त 'जन्मठेपे'त, 'अंदमानच्या अंधेरीतून' या सर्व आत्मवृत्तपर ग्रंथात ही कर्तव्याची भावना सतत दिसून येते. त्या कर्तव्याचा स्वीकारही विवेकाने केला होता.[४] ह्याच कर्तव्याच्या भावनेने त्यांच्या नाटकांतील व्यक्तीही वावरतात. 'अु:शाप' मधला चोखा सांगतो, 'दुसरा हिणवितो म्हणून जो स्वकर्तव्य आणि लोकसेवा सोडतो, तो खराच पतित होतो.'[५] 'सामाजिक कर्तव्याच्या वाटणीत.... सामाजिक आरोग्यरक्षणाचं हे अत्यंत किळसवाणं परंतु अत्यंत अुपकारक कर्तव्य महारांच्या वाटणीला आल्यावद्दल' किसनला धन्यता वाटते.[६] 'संन्यस्त खड्ग'मधील वल्लभ 'कर्तव्याचे रणशिंग फुंकले जाताच' सुलोचनेसारख्या लावण्यलतिकेस अंकावरून तत्काळ दूर सारून.. रणाच्या आणि मरणाच्या जबडयात नीट चालून घेतो.[७] 'मन काय म्हणते यापेक्षा कर्तव्य काय म्हणते तेवढं सांग' असे

---

१. अुत्तरक्रिया पृ. ८४. २. अुत्तरक्रिया पृ. ९३. ३. अुत्तरक्रिया पृ. १०७.
४. मा. जन्म. पृ. १२४. ५. अु:शाप पृ. १९. ६. अु:शाप पृ. १९.
७. संन्यस्त खड्ग पृ. ८९.

सुलोचना नलिन्नीला विचारते आणि तीही तिला कर्तव्याचे म्हणणे सांगते.[1] 'सूड घेणं हे सुद्धा परोपकार कर्तव्य आहे' असे सुलोचना सांगते.[2] सुलोचनेच्या 'कर्तव्य-तत्परते'चा गौरव विक्रमसिंह करतो.[3] 'लोककल्याणार्थ तत्परता हे अैहिक कर्तव्य' केल्यावद्दल विक्रमाला कृतकृत्यता वाटते.[4]

अंतर्वेदीत मराठ्यांचे सैन्य संकटात सापडल्याचे समजताच 'अुत्तरक्रिये'-तील यशवंतरावाची पत्नी सुशीला कर्तव्याची वाट धरते.[5] यशवंतराव, सुशीला आणि सुन्नीती यांचे जीवन्नौघ प्रेमप्रयागी अेकवटताच किल्ल्यावर रणशिंग वाजते आणि ती कर्तव्य-अक्रूराची हाक अैकून गोकुळातल्या गोड गुंगीचा भंग करून सुशीला तडक निघून जाते.[6] पानिपतचा सूड अुगविल्यावर माधवराव पेशवे यांनाही कर्तव्यपूर्तीचे आत्मसमाधान आनंदित करते.[7] अशी ही सगळी पात्रे कर्तव्याच्याच दृष्टीने जगाकडे पाहतात.

पात्रांचे बौद्धिक-विश्वही सावरकरांचेच

सावरकरांच्या बुद्धिमत्तेचा, युक्तिवादाचा, कोटिक्रमांचा वारसा बहुतेक सर्व पात्रांच्या वाट्याला आलेला दिसतो. मग ती पात्रे अस्पृश्यांतील असोत, स्पृश्य जातीतील असोत वा कोणत्याही व्यवसाय-व्यापारातील असोत. 'अुःशाप'च्या पहिल्याच अंकात चोखा, शंकर व किसन 'सामाजिक कर्तव्याची वाटणी योग्य आहे की अयोग्य' या विषयावर चर्चा करतात. 'समाजाचे दैहिक किल्मिष', 'भौतिक आरोग्य 'आत्मिक आरोग्य' 'लोकहितसाधकता' अित्यादी प्रौढ, गंभीर विषयांवर आणि गीतावचनांचा आधार घेत ही चर्चा चालते.[8] चोख्याची पत्नी सोयरासुद्धा गीतावचनाचा दाखला देअून पापपुण्यासबंधी चोख्याशी चर्चा करते.[9] बंगषखानच्या सैनिकांनी सत्यागाराला वेढून कमलिन्नीवर प्राणांतिक संकट आणले असताना अिकडे सत्यागारात मात्र सत्यवान, ठैंग्य व कमलिन्नी यांचा सत्यासत्य, हिंदुधर्म यांसंबंधी वाद चालू असतो.[10] चोखामेळ्याला देहान्ताची शिक्षा ठोठावण्याचा धाक जाफरअल्लीने घातला आणि मुसलमानी धर्म स्वीकारला तर मुक्तता होअील असे आश्वासन दिले, तेव्हा चोखामेळ्याने नारंभटी अस्पृश्यता व काफरी अस्पृश्यता यांतील फरक मोठ्या युक्तिवादाने जाफरअल्लीच्या नजरेस

---

१. संन्यस्त खड्ग पृ. ९१. २. संन्यस्त खड्ग पृ. १०९. ३. संन्यस्त खड्ग १२९. ४. संन्यस्त खड्ग पृ. १३०. ५. अुत्तरक्रिया पृ. ६०. ६. अुत्तर-क्रिया पृ. १०८. ७. अुत्तरक्रिया पृ. १०९. ८. अुःशाप पृ. १८ व १९. ९. अुःशाप पृ. १०१, १०२. १०. अुःशाप पृ. १४२, १४३, १४४.

आणला.[1] 'हिंदु महार' व 'वाटगा महार' यांतील फरक किसनच्या लक्षात आणून देण्याकरिता शंकरने पाटील आणि कारभारी यांच्याशी जो कोटिक्रम केला आहे तो वाचकांना सर्वच दृष्टीने चकित करणारा आहे.[2]

'संन्यस्त खड्ग' नाटकाच्या कथानकाची बैठकच मुळी तात्त्विक सिद्धान्तावर केलेली आहे. 'कर्मयोग श्रेष्ठ की कर्मसंन्यास श्रेष्ठ' या विधेयावरच नाटकाची अुभारणी झाली आहे. बौद्ध, विक्रम, शुद्धोधन, वल्लभ, महानामा, सुलोचना नलिनी, चंड ही पात्रे अत्यंत बुद्धिनिष्ठ अशी चर्चा करतातच, परंतु शाकंभट, ताकंसिंह, क्षारा, सुनासशेट अित्यादी दुय्यम दर्जाची पात्रेही वादविवाद करताना दिसतात. अितकेच नव्हे तर काणाभिक्षू, दुसरा भिक्षू आणि कौसलचे सैनिकही युक्तिवाद करतात.

'अुत्तरक्रिया' नाटकातील वादाचे विषय मुख्यत: तीन आहेत. पानपतवर मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला का, हा पहिला विषय; हिंदुसमाजाने सिंधुबंदी, रोटीबंदी मानणे अिष्ट आहे काय, हा दुसरा विषय आणि बलात्कारित स्त्रियांचा स्वीकार हिंदुसमाजाने करावा काय, हा तिसरा विषय होय. या तीन विषयांवरील अुलटसुलट वाद आणि विचार अनुक्रमे अंक १ प्रवेश ३, अंक १ प्रवेश ४ व अंक ३ प्रवेश ४, मध्ये पाहावयास सापडतात. या प्रवेशांतील माधवराव, अबदालीचा वकील, शिंदे, बिन्नीवाले, यशवंतराव, शास्त्री, सुशीला, सुनीती अित्यादी सर्व पात्रांच्या ठायी विलक्षण बुद्धिमत्ता, कोटिक्रमांचे कौशल्य आणि युक्तिवादाचे चातुर्य नाटककाराने दिले आहे. अंक २ प्रवेश ६ मध्ये यशवंतराव आणि अिंग्रज वकील यांच्यात दाखविलेला संवाद बिनतोड कोटिक्रमाचे अेक अुत्कृष्ट अुदाहरण आहे; आणि मौज अशी की, स्वत: सावरकरांनी अँग्लो-अिंडियन वृत्तपत्राने हिंदूंच्या फाटाफुटीवर घेतलेल्या अशाच प्रकारच्या आक्षेपांना जे अुत्तर १९३१ साली रत्नागिरीस दिले होते, तेच अुत्तर त्यांचा यशवंतराव अिंग्रज वकिलाला पेशव्यांच्या काळात देतो. 'जातीय व प्रांतीय फाटाफुटीमुळे हिंदू लोक अेक राष्ट्र कसे म्हणावयाचे' असा बुद्धिभेदकारक प्रश्न 'Pioneer' ह्या वृत्तपत्राने विचारला असता त्या वेळी सावरकरांनी पुढील कोटिक्रमाने त्याला अुत्तर दिले होते. 'टिचभर अिंग्लंड हेही अेकदा जेव्हा सात राज्यांत, तीन धर्मांत आणि दहा जातींत भंगले होते– ती लाथाळी, ती तुमची (Heptarchy) आठवा आणि सांगा अिंग्लंड तरी अेक राष्ट्र आहे का ?"[3] 'अुत्तरक्रिये'तील यशवंतराव अिंग्रज वकिलाला सांगतो, "आज अवाढव्य हिंदुस्थानातील हिंदू लोक जातपात प्रांत-

---

१. अु:शाप पृ. १५१–१५२. २. अु:शाप पृ. ८८,. ८९, ९०. ३. रत्ना. हिं. प. पा. व. अिति. पृ. ९७.

भेदाने फाटाफूट झालेले आहेत. पण त्या तुमच्या टिचभर अिंग्लंडचे देखील ज्या सात राज्यांत तुकडे अुडालेले होते त्या 'Heptarchy 'स आठवा."[1]

'शॉ 'ची सर्व पात्रे जशी वाहुल्यासारखी असतात व ती शॉ चीच मते बडबडत असतात तशी सावरकरांची पात्रेही वागतात आणि बोलतात असे दिसून येते.

प्रचारकी वाङ्मयामुळे स्वभावलेखनाची हानी

सावरकरांचे नाट्यवाङ्मय प्रचारकी किंवा बोधवादी आहे हे आपण पाहिले. बोधवादी वाङ्मयामुळे स्वभावलेखनाची कशी हानी होते याचे सुंदर व सोदाहरण विवेचन डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी स्वभावलेखन या प्रबंधात केले आहे. प्रचारकी वाङ्मयात लेखकाचे लक्ष सारखे त्याच्या तत्त्वज्ञानाकडे असल्यामुळे त्याच्या स्वभावलेखनातील प्रत्येक रेखान् रेखा कशी विघडून जाते याचे वर्णन करताना डॉ. सहस्रबुद्धे लिहितात, "..... या व्यक्तींना खाजगी जीवनच नाही. आपण आपल्या अेकट्याचे सुखदु:ख पाहावे अशी साधी जाणीव त्यांना नसून दर वेळेस सर्व समाजाचे आपण अेक घटक आहोत याच दृष्टीने त्या विचार करीत असतात. याच्याअितके अस्वाभाविक खरोखर काही नाही.... अगदी पूर्ण वैयक्तिक जीवनातील सुखदु:खांबद्दल बोलतानाही या व्यक्ती त्या वर्गाच्या सुखदु:खांची जाणीव ठेवतात.... ललित लेखकांनी फक्त विशिष्टाबद्दल बोलावे व त्यातून सामान्य सिद्धान्त ध्वनित करावा.... वाङ्मयीन व्यक्तीच्याच तोंडी प्रातिनिधिक भाषा घालून तिला आपल्या वैशिष्ट्याची जाणीव सारखी आहे असे दाखविणे म्हणजे त्या व्यक्तिरेखांतील जीव काढून घेण्यासारखे आहे."[2]

स्वभावलेखन करताना सावरकरांच्या हातून नेमके हेच झाले आहे. त्यांची पात्रे व्यक्तिगत सुखदु:खांत गुरफटत नाहीत. वर्ग, जात, समाज, राष्ट्र यांचे प्रश्न त्यांना वैयक्तिक प्रश्नांपेक्षा अधिक श्रेष्ठ वाटतात. अुत्कट व यथार्थ असे मानवी जीवनाचे चित्र रेखाटणे अेवढीच मर्यादित भूमिका न स्वीकारता राष्ट्र, समाज यांच्यापुढील प्रश्नांचे, समस्यांचे मानवी मतांच्या आधारे चित्रण करण्याचे कार्य, नाटककाराची भूमिका घेअून सावरकर आपल्या हाती घेतात. स्वत: सावरकरांनीही राष्ट्रांच्या, समाजाच्या जीवनाला प्राधान्य देअूनच व्यक्तिगत जीवनाचा विचार केला होता. स्वत:च्या विवाहाच्या प्रश्नाचा विचार करताना त्यांनी सांगितले होते : " माझ्या जीवनाचे जे मुख्य ध्येय ती राष्ट्रसेवा, ती मानव-सेवा करण्यास (त्यायोगे) मी अधिकच समर्थ झालो. माझ्या देशाच्या स्वातंत्र्यार्थ

---

१. अुत्तरक्रिया पृ. ६३. २. स्व. ले. पृ. २६६, २६८.

झुंजताना मला त्या संबंधाचा अडथळा मुळीच आला नाही. वैयक्तिक सुख ? माझ्या जीवनात तो विचार तर केव्हाही दुय्यमच होता."[१] सावरकरांच्या या वृत्तीनुसार त्यांची पात्रेही राष्ट्राच्या, समाजाच्या, लोकहिताच्या प्रश्नापुढे आपले जीवन दुय्यम मानतात. त्यांची सुलोचना म्हणते, "राष्ट्राराष्ट्राच्या चिरंतन हानिलाभाच्या विचारात व्यक्तीस कोण मोजतो ?"[२] वल्लभही तेच सांगतो : "लोककल्याणार्थ वैयक्तिक जीवनसुखाप्रमाणे वैयक्तिक मरणसुखही क्षणभर बाजूस ठेवले पाहिजे."[३]

या विचारसरणीमुळे सावरकरांच्या नाटकांतील पात्रे जातीचे, वर्गाचे राष्ट्राचे सुखदु:ख बोलत असतात. चोखामेळा म्हणतो, "माझ्या अेकट्यासच नव्हे तर कोटी कोटी अस्पृश्य जातीच्या जीवनाचं अंतिम ध्येय कोणतं.... याचा निर्णय प्रत्यक्ष पांडुरंगाच्या मुखानं हा पतित लावून घेणार."[४] शंकरच्या बहुतेक भाषणांत, 'आम्ही महार', 'आम्हां महार जातींच्या', 'आम्हां महारांचा', 'आपल्या महारांचा', 'आम्हां महारांना',[५] असा सारखा अुल्लेख येत असतो. किसनही आपल्या जातीचा निर्देश करूनच बोलत असतो.[६] गंगाजी कमलिनीला केवळ नावाने संबोधताना सुद्धा, 'हे महार मुली,' असा शब्दप्रयोग करते. 'मी महाराची मुलगी आहे' असे कमलिनी अनेक व्यक्तींना सांगते.[७] शंकरला दिसलेली भुतेही 'आम्ही हिंदू महार' असा जात्युल्लेख करावयाला विसरत नाहीत.[८] चोखा, कमलिनी, किसन, गंगाजी या सगळ्यांना काळजी आहे ती हिंदुत्व रक्षणाची !

'अुत्तरक्रिये'तील पात्रांतसुद्धा वैयक्तिक सुखदु:ख क्वचित डोकावते. माधवराव, शिंदे, विन्नीवाले, यशवंतराव यांच्या भाषणात हिंदुपदपादशाहीसंबंधीचा सारखा अुल्लेख यावा हे क्षणभर क्षम्य समजले, तरी यशवंतरावाची द्वितीय पत्नी सुशीला, प्रथम पत्नी सुनीती, तिची दासी अम्मा यांच्याही संभाषणांत त्याच विषयाला प्राधान्य असल्याचे दिसते. पतिविरहाने व्याकुळ झालेली सुशीला क्षणभरात म्हणते, "ओलांडा ते हृदयाचे पळीभर पाणी नि हिंदू वीरांनो जा भाअूंचा सूड घ्यायला जा, पानपतचा सूड घ्यायला जा."[९] मराठ्यांचे सैन्य दुआबात संकटी सापडले असता, पतीच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करतानाही सुशीला आपल्या जातीला विसरत नाही. ती म्हणते, "मी हिंदू वीरांगना, अंगना म्हणून सख्याचा विरह मला साहवत नाही.

---

१. आ. च. पृ. १९२. २. संन्यस्त खड्ग पृ. १०९. ३. संन्यस्त खड्ग पृ. १२३. ४. अु:शाप पृ. ६३. ५. अु:शाप पृ. २२, २३, २८, २९, ३१, ३९. ६. अु:शाप पृ. ३२, ३७. ७. अु:शाप पृ. ३४, १२३, १२४, १३६. ८. अु:शाप पृ. १३४. ९. अुत्तरक्रिया पृ. ३७.

वरून अकस्मात मृत्यूच्या डोहात घसरली;"[१] आणि तो स्वत: मूर्च्छित अवस्थेत पडला असताही त्याची कल्पनाशक्ती अुत्तम काम देत असते. तो म्हणतो, "मृत्यूच्या परतीरावरील (सुलोचनेची) हाक मला स्पष्ट अैकू यावी अितका मी मृत्यूच्या जवळ आलो तर ! मूर्च्छेची नाव मला घेअून वैतरणीवरून किती जलदीने चालली आहे."[२] सिद्धार्थसुद्धा कमंडलू व मुकुट यांच्यावर कल्पनेचे रंग चढवून संभाषण करतो,[३] आणि 'संन्यासी हा अेक प्रकारचा शेतकरीच आहे' हे विक्रमाला पटविण्यासाठी अेक प्रदीर्घ रूपक योजतो.[४]

'अुत्तरक्रिये'तील वेडीपासून सगळी पात्रे काव्यमय, कल्पनाप्रचुर भाषेत बोलतात. फत्तरगडावरील दारूच्या कोठारातील कामगिरी वजाविताना वेडी म्हणते, "दारूकोठारावरील हे पठाण पहारेकरी दारू पाजून पाजून मी झिंगवून पाडले नि लगेच खंजिराच्या धारेच्या अुताराने जीवनाच्या पल्याडच्या मरणपुरीत पोचवून दिले."[५] माधवरावच्या स्वभावाचे वर्णन करताना कोंडण्णा म्हणतो, "ज्याच्या त्याच्या डोक्यावर यांच्या करडया भुवअीची वाकडी तरवार सदा लटकलेली !"[६] यशवंतराव, सुशीला व सुनीती यांची भेट झाल्यावर ही सर्व पात्रे कल्पनारम्य भाषेत बोलताना दिसतात.[७] सुशीला तिच्या दासीचे वर्णन "माझ्या अयोध्येची ओळख पटविणारी बातमी आणणारी मूक मुद्रिका" अशा शब्दांत करते.[८] 'ही वेडी म्हणजे महाराष्ट्राच्या हृदयातील मूर्तिमंत वेदना' असे माधवराव पेशवे म्हणतात[९] आणि पानपतचा सूड अुगविण्याची आपली अिच्छा ज्या भव्य कल्पनेत ते व्यक्त करतात ती कल्पना पूर्वी अुल्लेखिलेलीच आहे.[१०]

विनोदाचे स्वरूप

सावरकरांच्या नाटकांतल्या व्यक्ती त्यांच्याप्रमाणेच जशा अत्यंत भावनाप्रधान, तशाच त्या अत्यंत बुद्धिनिष्ठ आहेत हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. त्या व्यक्ती ज्या प्रकारचा विनोद करतात तोही सामान्य प्रतीचा आणि मुख्यत: बुद्धिनिष्ठ स्वरूपाचा आहे. सावरकरांच्या ठिकाणी श्रेष्ठ प्रकारची विनोदबुद्धी आहे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात आपण पाहिलेच आहे. परंतु त्यांच्या नाटकांचा विचार करताना मात्र श्री. धनंजय कीर यांनी म्हटल्याप्रमाणे, 'Humour is sometimes uncommon to genius and Savarkar is no exception to it.'[११] हे विधान

---

१. सं. ख. पृ. १२२. २. स. ख. पृ. १२७. ३. सं. ख. पृ. २७. ४. सं. ख. पृ. ३७. ५. अुत्तरक्रिया पृ. १०१. ६. अुत्तरक्रिया पृ. ६. ७. अुत्तरक्रिया – अंक ३, प्रवेश ४. ८. अुत्तरक्रिया पृ. ७८. ९. अुत्तरक्रिया पृ. ५. १०. अुत्तरक्रिया पृ. ५. ११. Savarkar and His Times p. 191.

मान्य करावेसे वाटते. त्यांच्या नाटकातील विनोद कमी प्रतीचा आहे असे मत चिंतामणराव कोल्हटकर यांनीही व्यक्त केले आहे.[1] श्री. गोमकाळे यांनी सुद्धा याच मताला साथ दिली असून सावरकरांच्या नाटकांना विनोदी प्रवेशांचे घृणास्पद गालबोट लागले आहे, असा आपला प्रतिकूल अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे.[2] श्री. भा. कृ. केळकर व श्री. गोपीनाथ तळवलकर यांना मात्र सावरकरांचा विनोद वाचून श्री. कृ. कोल्हटकर व गडकरी यांच्या विनोदाची आठवण होते.[3] याचा अर्थ अेवढाच तो विनोद कोल्हटकर गडकऱ्यांच्या विनोदाप्रमाणेच मुख्यत: बुद्धिनिष्ठ स्वरूपाचा आहे. जीवनातील विसंगतीतून सहज स्फुरणाऱ्या विनोदापेक्षा बुद्धी हेच ज्याचे अधिष्ठान आहे अशा शब्दनिष्ठ, कल्पनानिष्ठ, शब्दांवर कसरत करून निर्माण केलेला विनोदच बुद्धिनिष्ठ सावरकरांच्या हातून निर्माण होणे अधिक स्वाभाविक होते आणि आक्रमक व्यक्तित्वामुळे सामान्य व्यक्तीच्या मुखातूनही अशाच प्रकारचा विनोद त्यांनी निर्माण केला आहे.

'अु:शाप' नाटकातील सत्यप्रिय, सत्यवान, नारंभट आणि देवीसिंह 'संन्यस्त खड्ग' मधील शाकंभट, ताकंसिंह, क्षारा व भिक्षुणी आणि 'अुत्तरक्रिये'तील कोंड्ण्णा, धोंडाण्णा व शास्त्रीबुवा यांचा विनोद प्रामुख्याने शब्दनिष्ठच आहे. नारंभट-मालिनी प्रवेश, गंगाजीच्या माडीवरील दारुड्यांचा प्रवेश, व शाकंभट-क्षारेचा प्रवेश आणि शाकंभट-भिक्षुणी प्रवेश हे विनोदी आहेत खरे, पण त्यांतील अश्लीलतेमुळे मात्र ते औचित्यभंग करतात. सावरकरांच्या नाटकांत अेका बाजूला अुदात्त प्रेम दिसते तर दुसऱ्या बाजूला अश्लीलतेने डागळलेल्या, लैंगिकतेने लडबडलेल्या प्रेमाचे दर्शन घडते. प्रेमाचे हे दुहेरी पदर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच गुंफलेले दिसून येतात.

सुभाषितांतून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचेच दर्शन

सुभाषिते म्हणज व्यक्तीच्या अनुभवांचे, विचारांचे संकलित सार असते. व्यक्तीच्या वाणीतून वा लेखणीतून प्रकट झालेली अशी सुभाषिते त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वच प्रकट करतात. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची जी वैशिष्ट्ये आपण पाहिली ती नाटकांतल्या सुभाषितांतही सूत्ररूपाने दिसतात. शस्त्र, सामर्थ्य, दंडशक्ती यांवर सावरकरांची नितांत श्रद्धा आहे. ती श्रद्धा प्रकट करणारी नाटकातील पुढील सुभाषिते पाहा :– 'शस्त्र हे शास्त्राअितकेच परम पूज्य व लोकधारणेस अत्यंत आवश्यक असे साधन आहे.'[4] 'दंड करण्याची ज्यास शक्ती आहे तोच क्षमा करू शकतो.'[5] 'पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर या

---

१. बहु. पृ. २५८. २. सा. वि. द. पृ. ७७. ३. सा. द. व सह्याद्री – जून १९४३. ४. सं. ख. पृ. ६६. ५. सं. ख. पृ. ३९.

जगाच्या दुर्दैवाने शस्त्रयुगाचेच प्रावल्य दिसून येअील'[1] 'पावित्र्य-रक्षण आणि धर्मसंगोपन आमच्या पुरूषांना आणि देवालाही जेव्हा करता येत नाही तेव्हा ते अेक तर चितोडची चित्रा करू शकते नाहीतर ही सूडाची सुरी.'[2]

'वरं जनहितं ध्येयं' हे सावरकरांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य त्यांच्या पुढील सुभाषितांतून दृग्गोचर होते : 'लोकहितसाधक ते ते कर्म पवित्र आहे'[3] 'लोक-कल्याणार्थ तत्परता हेच संन्याशाचे अैहिक कर्तव्य',[4] 'लोकहिताच्या साधनी व्यत्यय येताच त्या वैयक्तिक सुखांचा वळी देण्यास तत्काळ सिद्ध होणे हाच खरा अिंद्रियजय होय.'[5]

सत्य, अहिंसेवद्दल सावरकरांनी विचारान्ती केलेला निर्णय त्यांची सुभाषितेच सांगतात. 'हिंसेची दंतनखे शस्त्रांने छाटून टाकते तीच खरी अहिंसा होय.'[6] 'आत्यंतिक अहिंसा म्हणजे आत्यंतिक हिंसा',[7] 'ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचे परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्म होय.'[8] 'आग लागो त्या सत्याला की जे दीन आणि सरळ साधुजनांना दुष्टांच्या पाशात फशी पाडत.'[9] 'वाचिक सत्य म्हणजे सत्य ही सत्याची व्याख्या अयोग्य होय.'[10]

याच सत्य, अहिंसा भूतदया यांच्या संदर्भात त्यांनी हिंदू समाजाला वंगपच्या मुखाने पुढील कटुसत्य सांगितले आहे : "सत्याच्या नावाने विश्वासघात, अहिंसेच्या नावाने पौरुषघात आणि भूतदयेच्या नावाने आत्मघात करणारे सज्जन हिंदू लोकांत जिवंत आहेत, म्हणूनच तर त्या राष्ट्रावर, नांगी नसलेल्या किड्यावर आपण नाचतो, तसे आम्ही नाचू शकतो."[11]

लोक हितास्तव न्याय्य कारणी प्रत्याघात, प्रतिक्रिया अत्यंत आवश्यक कर्तव्य होय अशी सावरकरांची धारणा आहे. आपले विचार पुढील सूत्रात ते व्यक्त करतात. "दलित क्रोधाची प्रतिक्रियाच अुन्मादक हत्तीचा अंकुश असतो."[12] 'सूड ही नुसती अुपजत प्रतिक्रियाच नव्हे तर परोपकारक कर्तव्य आहे.'[13] पूर्वी सांगितल्याप्रमाणे कमलिनीच्या तोंडून सूडाच्या सुरीचे माहात्म्य त्यांनी वर्णन केले आहे.

व्यक्ति–राष्ट्र संबंध सांगताना ते म्हणतात, "राष्ट्रीय किंवा जागतिक हिता-हिती व्यक्तीच्या सुखदु:खाचा प्रश्न गौण आहे."[14] हौतात्म्याच्या आकर्षणातूनच

---

१. सं. ख. पृ. ४१. २. अु:शाप पृ. १४७. ३. अु:शाप पृ. १९. ४. सं. ख. पृ. १३०. ५. सं. ख. पृ. ११७. ६. सं. ख. पृ. ७५. ७. सं. ख. पृ. ३८. ८. सं. ख. पृ. ८४. ९. अु:शाप पृ. ११५. १०. अु:शाप पृ. ५. ११. अु:शाप पृ. १४५–१४६. १२. सं. ख. पृ. १०७. १३. सं. ख. पृ. १०९. १४. सं. ख. पृ. ११०

पुढील तेजस्वी विचार त्यांच्या लेखणीतून लिहिला जातो : 'जीवनीय दुर्दशेहून..... हे मरणीय हौतात्म्यच अधिक वांच्छनीय वाटते.'[1]

'यशापयश योगायोगाच्या गोष्टी आहेत' हे 'जन्मठेपे'तील सावरकरांचे विचार[2] 'संन्यस्त खड्गा'तील धर्माच्या तोंडून बाहेर पडताना, "लौकिक हा बहुधा योगायोग असतो, योग्यतेचे अनन्य गमक नसतो" असे सुभाषिताचे रूप घेऊन बाहेर पडतो.[3]

जातिभेद, धर्मभोळेपणा, विटाळवेड हे सावरकरांचे तिरस्काराचे, टीकेचे विषय. तेव्हा या विषयांवरील त्यांचे विचार कित्येक वेळा नाटकांतूनही पुढील प्रकारे सूत्ररूपाने प्रकट होतात. 'वर्णाहंकारांनी माणूसच माणसाचा भयंकर शत्रू झालेला आहे. म्हणून तथागत बुद्ध केवळ गुणावरून, शीलावरून माणसांची योग्यता ठरवितो, जन्मावरून नाही.'[4] 'मला दर्भ नकोत, दळभार हवेत',[5] 'मुकटयापायी मुकुट दवडले.'[6]

संवादरचनेवर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव

सावरकरांनी आपल्या निबंधांतील, भाषणांतील, आत्मचरित्रातील विचारांना प्रचारकी पद्धतीने व्यक्त करण्यासाठी नाटचरूप दिले हे आपण अनेक अुदाहरणांच्या साहाय्याने पूर्वी पाहिलेच आहे. त्यामुळे सावरकरांच्या नाटकांतील संवादांना लांवलचक, प्रवचन-स्वरूप येणे अपरिहार्य होते. लेखकाच्या बुद्धिनिष्ठेमुळे व प्रचारकी वृत्तीमुळे त्यांचे संवाद संविधानकाला गती देण्याचे व पात्रांचे स्वभावदर्शन घडविण्याचे कार्य न करता पात्रांच्या म्हणजेच नाटककाराच्या मतांचे दर्शन घडविण्याचे कार्य करतात. संवादाला प्राधान्य दिल्यामळें नाटकांत अनेक प्रवेशांतून नवीन महत्त्वाची काहीही घटना न घडता कथानकं मंद, स्थिर झाल्यासारखे वाटते. अु:शापमधील चोखा–शंकर–किसन यांचा पहिल्या अंकातील प्रवेश, अंक ३ मधील सत्यागारातील प्रवेश, अंक २ मधील शाब्दशास्त्री व चोखा यांतील चर्चेचा प्रवेश, तसेच 'संन्यस्त खड्गा'तील पहिल्या अंकातील सिद्धार्थ व कौंडिण्य यांतील बुद्धधर्म विवेचनाचा प्रवेश, अंक २ मधील तिसरा प्रवेश 'अुत्तरक्रिया' नाटकातील पहिल्या अंकातला यशवंतरावच्या 'सिंधुबंदी', 'रोटीबंदी' या विषयांवरील व्याख्यानाचा प्रवेश अशी काही अुदाहरणे या दृष्टीने

---

१. सं. ख. पृ. १११. २. मा. जन्म. पृ. १२४. ३. सं. ख. पृ. १३२.
४. सं. ख. पृ. २९. ५. अुत्तरक्रिया पृ. ३. ६. अुत्तरक्रिया पृ. २५.

सांगण्यासारखी आहेत. या सर्व ठिकाणी सावरकरांच्या भाषेचा कल संवादाकडे नसून भाषणाकडे असल्याचे आढळते.

कित्येक वेळा काही वादग्रस्त प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीच सावरकर प्रवेश निर्माण करतात. शंकर व किसन यांची संभाजी पाटलाच्या घरी झालेली भेट, शाव्दशास्त्री व चोखा यांची रूढी, शास्त्र यासंबंधी झालेली चर्चा, वृद्ध व विक्रमसिंह यांची शस्त्रसंन्यासापूर्वी झालेली प्रश्नोत्तरे, समरसभेतील विक्रम, सुलोचना व अितर सरदार यांच्यात 'शरण की रण' या प्रश्नावर झालेले मतप्रदर्शन किंवा माधवराव पेशवे, शिंदे, विनीवाले आणि अवदालीचा वकील यांच्यात 'पानपतावर मराठे लढाअी हरले की युद्ध हरले' यावर अितिहासशास्त्रज्ञांना शोभेल अशी अुत्तरप्रत्युत्तर स्वरूपाची झालेली शाब्दिक लढाअी अशी अनेक अुदाहरणे दाखविता येतील.

वादग्रस्त प्रश्नांवरील चर्चेच्या स्वरूपात किंवा मतप्रचाराच्या आंतरिक हेतूने सावरकरांनी संवाद लिहिले असल्याने साहजिकच ते संवाद सुटसुटीत, चटकदार न होता प्रसंगी दीर्घ व कंटाळवाणे झाल्याचे दिसू येते. 'अुःशाप'च्या अंक १ मधील चोख्याची भाषणे, अंक २ मधील अिब्राहिमचे भाषण, अंक ३ मधील जाफरअल्ली व किसन यांची भाषणे, अंक ५ मध्ये हातात रक्ताने माखलेली कटयार घेअून कमलिनीने दिलेले व्याख्यान; तसेच 'संन्यस्त खड्गा'तील सिद्धार्थ-कौंडिण्य, सिद्धार्थ-विक्रम, विक्रम-सुलोचना व अितर सरदार यांच्यातील वादविवाद व धर्माचे भाषण आणि 'अुत्तरक्रिये'तील पहिल्या अंकामधील यशवंतरावाचे व्याख्यान व नंतर ऋषिकुमार, यशवंतराव व सरदार यांच्यातील संभाषणे वरील दोषांनीच डागाळलेली आहेत. 'ही भाषणे अितकी वोजड व पल्लेदार आहेत की, नाटकपात्रे ती कशी पाठ करीत असतील हे त्यांचे त्यांनाच माहीत' असे अुद्गार कै. न. चिं. केळकर यांनी काढले आहेत.[1] 'नाटकातील भाषणे लांबलचक, प्रवचनस्वरूप झाली आहेत. 'संन्यस्त खड्गा'तील पहिल्या अंकातील सेनापती व बुद्धदेव यांचा प्रवेश म्हणजे पंडितांच्या सभेतील, पूर्वपक्ष व अुत्तरपक्ष होत असलेला वादसमारंभच वाटतो', असा टीकाकारांचा अभिप्राय आहे.[2] 'काही अपवाद वगळल्यास सावरकरांच्या नाटकांत संवादकौशल्य बेताचेच आढळते' असे मत डॉ. अ. ना. देशपांडे यांनीही व्यक्त केले आहे.'[3] 'अुत्तरक्रिये'तील पहिल्या अंकातील मराठे सरदार व अवदालीचा वकील यांची शाब्दिक झटापट दाखविली आहे. त्यात (नाटककाराच्या) बुद्धीची कसरत, मराठी रियासतीचा स्वाभिमान, सर्व काही आहे. पण 'वर्नार्ड शॉ' पद्धतीचे ते अेक चित्ता-

---

१. प्रतिभा – १५ जानेवारी १९३६. २. म. सा. समा. पृ. ४९३. ३. आ. म. वा. अिति. पृ. ४३.

कर्षक वाग्युद्धाचे प्रात्यक्षिक वाटते, अशी कबुली श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी दिली आहे.[१] सावरकरांच्या व्यक्तित्वातील श्रद्धा त्यांच्या कथावस्तूंत, तर बुद्धीची आतषबाजी त्यांच्या संवादांत पाहावयास सापडते, असा श्री. तळवलकरांचा निष्कर्ष आहे.[२] सावरकरांच्या संवादांत टोकदारपणा, साधेपणा नाही हे श्री. तळवलकरांचे मत श्री. भा. कृ. केळकर यांनी मान्य करून पुढे म्हटले आहे की, त्यांची संवादरचना ही प्रामुख्याने विचारांच्या देवाणघेवाणीवर आधारलेली आहे.[३]

श्री. तळवलकरांनी सावरकरांच्या संवादांची तुलना कै. न. चिं. केळकर व कृ. प्र. खाडिलकर यांच्या संवादांशी केली आहे. सावरकरांच्या ओजाला केळकरांच्या भाषेचा टोकदारपणा व प्रमाणबद्धता नाही व खाडिलकरांच्या ओजस्वी भाषणातील डौल व लयबद्धता नाही असा श्री. तळवलकरांचा निष्कर्ष आहे.[४] अर्थात हा फरक या तीन व्यक्तींच्या व्यक्तित्वातील आहे. केळकरांच्या समधात वृत्तीतून भाषेत प्रमाणबद्धता आली. खाडिलकर अुपदेशपर प्रतिपाद्य विषयाअितकेच कलेच्या प्रतिष्ठेला जपणारे होते. 'कला ही शिकवणीची बटीक नसून त्या शिकवणीला नटविणारी वडील बहीण आहे' असे ते मानीत होते. 'नाटक हे भाषेवर जगते' असे खाडिलकर सांगत.[५]

संवादांतून सावकरांच्या स्वभावातील आवेश जसा दिसतो तशी त्यांची रसिकता, काव्यात्मवृत्ती प्रकट होते. त्यांच्या तिन्ही नाटकांतील प्रियकर-प्रेयसींचे संवाद त्यांच्या या वृत्तीमुळेच आकर्षक बनले आहेत. 'अुःशाप'मधील कमलिनी-शंकर यांच्या मीलनाचा पहिला आणि अखेरचा प्रसंग, 'संन्यस्त खड्ग' मधील दुसऱ्या अंकातील सुलोचना-वल्लभ यांचा महालातील प्रवेश, तिसऱ्या अंकातील दोघांच्या पुनर्मीलनाचा प्रवेश आणि 'अुत्तरक्रिये'तील सुशीला-यशवंतराव यांच्या प्रीतिभेटीचा पहिल्याच अंकातील प्रवेश त्यातल्या शृंगाररसयुक्त भाषेने सुटसुटीत, चटकदार वाक्यरचनेमुळे किती आकर्षक झाले आहेत ते पाहण्यासारखें आहे.

सावरकरांच्या वक्तृत्व–वैशिष्ट्याने त्यांच्या नाटकांतील जी काही भाषणे रंगली आहेत ती वक्तृत्वाचे व विषयप्रतिपादनाचे अुत्तम मासले म्हणून दाखविण्याचा मोह साहित्यसम्राट केळकरांनाही होतो.[६] 'संन्यस्त खड्ग'मधील धर्माचे[७] भाषण आणि 'अुत्तरक्रिये'तील यशवंतरावाचे भाषण[८] वक्तृत्वपूर्ण भाषणाचे अुत्कृष्ट नमुने म्हणून केळकरांनी सांगितले आहेत.

---

१. सह्याद्री–जून १९४३. २. सह्याद्री–जून १९४३. ३. सा. द. पृ. २४९. ४. सह्याद्री–जून १९४३. ५. खा. ना.–डॉ. वि. म. कुलकर्णी. ६. प्रतिभा–१५ जानेवारी १९३६. ७. संन्यस्त खड्ग पृ. १३१, १३२. ८. अुत्तरक्रिया पृ. २३.

सांगण्यासारखी आहेत. या सर्व ठिकाणी सावरकरांच्या भाषेचा कल संवादाकडे नसून भाषणाकडे असल्याचे आढळते.

कित्येक वेळा काही वादग्रस्त प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीच सावरकर प्रवेश निर्माण करतात. शंकर व किसन यांची संभाजी पाटलाच्या घरी झालेली भेट, शाब्द-शास्त्री व चोखा यांची रूढी, शास्त्र यासंबंधी झालेली चर्चा, बुद्ध व विक्रमसिंह यांची शस्त्रसंन्यासापूर्वी झालेली प्रश्नोत्तरे, समरसभेतील विक्रम, सुलोचना व अितर सरदार यांच्यात 'शरण की रण' या प्रश्नावर झालेले मतप्रदर्शन किंवा माधवराव पेशवे, शिंदे, विनीवाले आणि अवदालीचा वकील यांच्यात 'पानपतावर मराठे लढाअी हरले की युद्ध हरले' यावर अितिहासशास्त्रज्ञांना शोभेल अशी अुत्तरप्रत्युत्तर स्वरूपाची झालेली शाब्दिक लढाअी अशी अनेक अुदाहरणे दाखविता येतील.

वादग्रस्त प्रश्नांवरील चर्चेच्या स्वरूपात किंवा मतप्रचाराच्या आंतरिक हेतूने सावरकरांनी संवाद लिहिले असल्याने साहजिकच ते संवाद सुटसुटीत, चटकदार न होता प्रसंगी दीर्घ व कंटाळवाणे झाल्याचे दिसू येते. 'अुःशाप'च्या अंक १ मधील चोख्याची भाषणे, अंक २ मधील अिब्राहिमचे भाषण, अंक ३ मधील जाफरअली व किसन यांची भाषणे, अंक ५ मध्ये हातात रक्ताने माखलेली कटयार घेअून कमलिनीने दिलेले व्याख्यान; तसेच 'संन्यस्त खड्गा'तील सिद्धार्थ-कौंडिण्य, सिद्धार्थ-विक्रम, विक्रम-सुलोचना व अितर सरदार यांच्यातील वादविवाद व धर्माचे भाषण आणि 'अुत्तरक्रिये'तील पहिल्या अंकामधील यशवंतरावाचे व्याख्यान व नंतर ऋषिकुमार, यशवंतराव व सरदार यांच्यातील संभाषणे वरील दोषांनीच डागाळलेली आहेत. 'ही भाषणे अितकी बोजड व पल्लेदार आहेत की, नाटकपात्रे ती कशी पाठ करीत असतील हे त्यांचे त्यांनाच माहीत' असे अुद्गार कै. न. चिं. केळकर यांनी काढले आहेत.[1] 'नाटकातील भाषणे लांबलचक, प्रवचनस्वरूप झाली आहेत. 'संन्यस्त खड्गा'तील पहिल्या अंकातील सेनापती व बुद्धदेव यांचा प्रवेश म्हणजे पंडितांच्या सभेतील, पूर्वपक्ष व अुत्तरपक्ष होत असलेला वादसमारंभच वाटतो', असा टीकाकारांचा अभिप्राय आहे.[2] 'काही अपवाद वगळल्यास सावरकरांच्या नाटकांत संवादकौशल्य बेताचेच आढळते' असे मत डॉ. अ. ना. देशपांडे यांनीही व्यक्त केले आहे.'[3] 'अुत्तरक्रिये'तील पहिल्या अंकातील मराठे सरदार व अवदालीचा वकील यांची शाब्दिक झटापट दाखविली आहे. त्यात (नाटककाराच्या) बुद्धीची कसरत, मराठी रियासतीचा स्वाभिमान, सर्व काही आहे. पण 'बर्नार्ड शॉ' पद्धतीचे ते अेक चित्ता-

---

१. प्रतिभा – १५ जानेवारी १९३६. २. म. सा. समा. पृ. ४९३. ३. आ म. वा. अिति. पृ. ४३.

कर्षक वाग्युद्धाचे प्रात्यक्षिक वाटते, अशी कबुली श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी दिली आहे.[१] सावरकरांच्या व्यक्तित्वातील श्रद्धा त्यांच्या कथावस्तूंत, तर बुद्धीची आतषबाजी त्यांच्या संवादांत पाहावयास सापडते, असा श्री. तळवलकरांचा निष्कर्ष आहे.[२] सावरकरांच्या संवादांत टोकदारपणा, साधेपणा नाही हे श्री. तळवलकरांचे मत श्री. भा. कृ. केळकर यांनी मान्य करून पुढे म्हटले आहे की, त्यांची संवादरचना ही प्रामुख्याने विचारांच्या देवाणघेवाणीवर आधारलेली आहे.[३]

श्री. तळवलकरांनी सावरकरांच्या संवादांची तुलना कै. न. चिं. केळकर व कृ. प्र. खाडिलकर यांच्या संवादांशी केली आहे. सावरकरांच्या ओजाला केळकरांच्या भाषेचा टोकदारपणा व प्रमाणबद्धता नाही व खाडिलकरांच्या ओजस्वी भाषणातील डौल व लयबद्धता नाही असा श्री. तळवलकरांचा निष्कर्ष आहे.[४] अर्थात हा फरक या तीन व्यक्तींच्या व्यक्तित्वातील आहे. केळकरांच्या समधात वृत्तीतून भाषेत प्रमाणबद्धता आली. खाडिलकर अुपदेशपर प्रतिपाद्य विषयाअितकेच कलेच्या प्रतिष्ठेला जपणारे होते. 'कला ही शिकवणीची बटीक नसून त्या शिकवणीला नटविणारी वडील बहीण आहे' असे ते मानीत होते. 'नाटक हे भाषेवर जगते' असे खाडिलकर सांगत.[५]

संवादांतून सावकरांच्या स्वभावातील आवेश जसा दिसतो तशी त्यांची रसिकता, काव्यात्मवृत्ती प्रकट होते. त्यांच्या तिन्ही नाटकांतील प्रियकर-प्रेयसींचे संवाद त्यांच्या या वृत्तीमुळेच आकर्षक बनले आहेत. 'अु:शाप'मधील कमलिनी-शंकर यांच्या मीलनाचा पहिला आणि अखेरचा प्रसंग, 'संन्यस्त खड्ग' मधील दुसऱ्या अंकातील सुलोचना-वल्लभ यांचा महालातील प्रवेश, तिसऱ्या अंकातील दोघांच्या पुनर्मीलनाचा प्रवेश आणि 'अुत्तरक्रिये'तील सुशीला-यशवंतराव यांच्या प्रीतिभेटीचा पहिल्याच अंकातील प्रवेश त्यातल्या शृंगाररसयुक्त भाषेने सुटसुटीत, चटकदार वाक्यरचनेमुळे किती आकर्षक झाले आहेत ते पाहण्यासारखें आहे.

सावरकरांच्या वक्तृत्व–वैशिष्ट्याने त्यांच्या नाटकांतील जी काही भाषणे रंगली आहेत ती वक्तृत्वाचे व विषयप्रतिपादनाचे अुत्तम मासले म्हणून दाखविण्याचा मोह साहित्यसम्राट केळकरांनाही होतो.[६] 'संन्यस्त खड्ग'मधील धर्माचे[७] भाषण आणि 'अुत्तरक्रिये'तील यशवंतरावाचे भाषण[८] वक्तृत्वपूर्ण भाषणाचे अुत्कृष्ट नमुने म्हणून केळकरांनी सांगितले आहेत.

---

१. सह्याद्री–जून १९४३. २. सह्याद्री–जून १९४३. ३. सा. द. पृ. २४९. ४. सह्याद्री–जून १९४३. ५. खा. ना.–डॉ. वि. म. कुलकर्णी. ६. प्रतिभा–१५ जानेवारी १९३६. ७. संन्यस्त खड्ग पृ. १३१, १३२. ८. अुत्तरक्रिया पृ. २३.

सावरकरांच्या नाटकांतील हे दीर्घ संवाद, वक्तृत्वाकडे असलेला कल, अुत्प्रेक्षा, रूपके वगैरे अलंकारांवर भर आणि श्राव्य गुणांची जोपासना हे सर्व त्यांच्या मनावर झालेले महाकाव्यांचे संस्कारच दाखवितात. या संस्कारांनी त्यांची मूळची 'प्रबुद्ध भावना' संस्कारित झाली. स्वभावातल्या रसिकतेने तिला जोड दिली; जे मनाला पटते ते अितरांना पटविण्याच्या जबरदस्त प्रचारकी वृत्तीने त्यांच्या शब्दांना ओज व संवादांना आवेश प्राप्त झाला.

भाषाशैलीत व्यक्तिमत्त्वाचेच प्रतिबिंब

सावरकरांच्या नाटकांतील भाषाशैलीचा विचार करताना सकृद्दर्शनीच ही गोष्ट लक्षात येते की, त्यांची भाषा पात्रानुरूप नाही. ललित लेखकावर, विशेषतः नाटककारावर जे अेक मोठे बंधन येअून पडते ते हे की, त्याने आपले विचार 'मनुष्य-स्वभाव' या भाषेतच व्यक्त केले पाहिजेत. ललित लेखकाने अेकदा कथानक निर्माण केल्यावर त्या कथानकात जे बसेल व त्या व्यक्तीच्या तोंडी जे शोभेल तेच त्याने लिहिले पाहिजे. पण हे तो विसरतो; व आपणच त्यांच्यामार्फत व्याख्यान देअू लागतो..... लेखक असे बोलू लागताच तो निबंध होतो. वाङ्मयातील जे संवाद, जी भाषणे असतात त्यांतील प्रत्येकावर व्यक्तिवैशिष्ट्याचा छाप असावा लागतो.'[1] पण सावरकरांच्या नाटकांतील पात्रे जेव्हा बोलू लागतात तेव्हा त्या सगळ्यांची भाषा अेकाच प्रकारची असते. समाजातील कोणत्याही थरातील, व्यवसायातील, संस्कृतीतील , धर्मातील ती व्यक्ती असो; स्त्री असो वा पुरुष असो, समूहगीतात गाणे सांगणाऱ्याच्याच स्वरात जशा त्याच्यामागून गाणाऱ्या व्यक्ती गातात त्याप्रमाणे सावरकरांनी त्यांना पुरविलेल्या भाषेत त्या सर्व व्यक्ती बोलत असतात. सावरकरांचे आक्रमक व्यक्तित्व येथेही प्रभाव गाजविते. 'अुःशाप'मधील स्पृश्य आणि अस्पृश्य स्त्रीपुरुष अेकाच संस्कृतप्रचुर, प्रौढ, विलष्ट भाषेत बोलतात. अस्पृश्यांच्या मुली चंपा आणि सखू 'प्राजक्त' 'प्रसन्न पावित्र्य', 'शुचिर्भूत', 'शोभिवंत', 'मनोरम', 'अुज्ज्वल', 'सर्वांशी समान प्रतिमा', 'रंगाभ्यास' अित्यादी संस्कृत शब्द आपल्या भाषणात लीलेने वापरतात.[2] शंकर व किसन हे अस्पृश्य तरुण 'परम मंगलास्पद', 'वाचादत्त', 'निष्पाप', 'निर्वैर', 'निर्मळ', 'सोज्ज्वळ', 'पूर्वार्जित', 'भ्रांत', 'गर्वमद', 'शिरोभूषणीय', 'सृष्टयुत्पादक' असे सामान्य जनांनाही दुर्बोध आणि अुच्चारण्यास अवघड शब्द अुच्चारतात. बंगपसारखी मुसलमान पात्रेही 'अुत्क्षोभक शासन', 'भृकुटी', 'प्रत्यंचा', कटाक्षशरांनी विद्ध', ''मृगया', 'कामोद्दीपक कुमारी', 'बाहू स्वागताला प्रसृत झालेले' असे शब्द वा शब्दप्रयोग करतात. गंगाजीसारखी मराठा जातीतील

---

१. स्व. ले. पृ. २६१, २६२, २६३. २. अुःशाप पृ. ६ ते १०.

वेश्याही 'जातिभिन्नताप्रदर्शक वैधर्म्य' असा अनवट शब्दप्रयोग सहजपणे करून जाते. चोखामेळा, पुरुषोत्तमशास्त्री', शाब्दशास्त्री यांच्या संभाषणांत व्यक्तिभिन्नतेचा कोणताच फरक आढळत नाही. अवदालीचा वकील पेशव्यांच्या दरवारात येताच 'प्रतिकुशल', 'प्रभृती', 'रक्षणार्थ', 'विधान', 'सन्मुख लढता' असे शब्द सहज अुच्चारू लागतो. सादुल्ल्यालाही 'प्रार्थीत होता' 'आज्ञापून' हे शब्द माहीत आहेत. शिंद्यांच्या पदरचा अेक राअूत असलेल्या आणि सर्व युरोप खंडाचा प्रवास करून आलेल्या यशवंतरावला अिंग्रजी भाषा व संस्कृत भाषा अुत्तम अवगत आहेत. 'देहकृत पापाचरण हे मनःकृत तपस्याचरणच आहे, 'मनस्कृतं कृतं कर्म न शरीरं कृतं कृतम्।' असे वचन तो संभाषणाच्या ओघात चटकन अुच्चारतो.[1] त्याचे धनी महादजी शिंदे मराठी काव्यातले पुढील दोन चरण अवदालीच्या वकिलाच्या तोंडावर फेकतात.

झंझा झंजावरि अुसळुनि आपसवा तसे ते।
दोघे दोघांप्रती विलगले झुज घायाळ होते।[2]

'कापुरुषता', 'नखाग्रे', 'प्रत्याचार', 'नैमिषारण्यातील कोण्या द्वादश वार्षिक देदीप्यमान यज्ञकुंडाप्रमाणे' अित्यादी शब्दप्रयोग शिंदे करतात. पानिपतवर पाडाव झालेली व नंतर मुसलमानाकडून भ्रष्ट झालेली मराठी तरुणी आपल्या वेडया आईला देवाचे नाव घ्यायला सांगते, आणि कारण देताना म्हणते, "तो अग्निकल्लोळातूनही आपल्या दयेच्या अदाह्य वर्त्माखाली झाकून तुला सुखरूप परत आणील."[3]

पात्रांची भाषा त्यांना अनुरूप नाही अेवढच नव्हे, तर तीनही नाटकांत सावरकरांनी जी भाषा वापरली आहे ती अनेक ठिकाणी क्लिष्ट, बोजड व संस्कृतप्रचुर अशी आहे. कमलिनी शंकरला सावरीत म्हणते, "नाही, त्यांच्या प्रामाणिक भावना मी बलात्कारानं दुखवू देणार नाही. आपल्या दुःखानं कळवळून त्यांचं कारुण्य जेव्हा द्रवेल तेव्हा त्या पाण्यावरच मी आपली तहान भागवीन."[4] तेव्हा तिला पिण्यासाठी पाणी घालताना पुरुषोत्तमशास्त्री म्हणतात, "माझ्या संध्येचं पाणी त्या पतितांस पावन करण्याअितकं प्रवळ आहे! माझ्या गायत्रीचा मंत्र हा माझ्या हृदयाच्या कानठळ्या वसविण्याअितका कर्कश नसून दयेचं संगीत, त्या हृदयाच्या तारांतून स्वस्पर्शानं जागृत करील, असा मंजुळ आहे. बैस मुली, हे संध्येचं पवित्र पाणी तुझ्या तहानलेल्या तोंडात ओतणं हेच आजच्या माझ्या संध्येचं आरंभीय आचमन होवो."[5] अंक १ प्रवेश ३ मधील चोख्याच्या प्रारंभीच्या भाषणाला संस्कृतप्राचुर्याने काठिण्य प्राप्त झाले आहे. 'संन्यस्त खड्गा'तील भाषा बोजड असल्याने नाटक चांगले

---

१. अुत्तरक्रिया पृ. ९४. २. अुत्तरक्रिया पृ. १५. ३. अुत्तरक्रिया पृ. १०३.
४. अुःशाप पृ. ४०. ५. अुःशाप पृ. ४१.

असूनही, प्रेक्षकांच्या मनाची पकड घेअू शकले नाही.[१] त्यामुळे १९४३ साली ते रंगभूमीवर पुन्हा आणताना त्याची रंगावृत्ती काढावी लागली.[२] पहिल्या अंकातील सिद्धार्थ–कौंडिण्य–संवाद हे या क्लिष्ट, बोजड रचनेचे अुत्तम अुदाहरण होय. 'तनुबीन', 'वागुरा', 'निरस्त', 'त्वर्य' अित्यादी कठीण शब्दांमुळे नाटकातील संवाद अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत.[३] नाटकाच्या तीनही अंकांतील बुद्ध–विक्रम संवाद अत्यंत कठीण आहेत. 'आमच्या राष्ट्रीय तूणीराची शक्ती अपराजेय करू शकेल' अशी वाक्ये सामान्य प्रेक्षकांना कळणं फार अवघड होय. म्हणूनच या नाटकावर अभिप्राय देताना साहित्य-सम्राट केळकर म्हणाले होते, "नाटक प्रेक्षकांच्या डोक्यावरून जाअील."[४]

ही सर्व क्लिष्टता व संस्कृतप्राचुर्य सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातून निर्माण झाले आहे. 'अभिनव भारत छापाची काव्यमय, तेजस्वी, प्रदीप्त आणि प्रवळ अशी अेक नवीनच भाषाशैली' बनविण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न आपण केल्याचे स्वत: सावरकरांनीच सांगितले आहे.[५] त्यात स्वत्वाभिमानाने परकीय शब्द कटाक्षाने वगळून स्वभाषेतील शब्द योजण्याचा प्रयत्न सावरकरांनी केला. 'तुमच्या या नाटकात तुमची तीक्ष्ण दृष्टी चुकवून काही परकीय शब्द शत्रुपक्षाच्या हेरांनी प्रवेश मिळवावा तसे घुसले आहेत' असे डॉ. केतकरांनी कळविताच सावरकर म्हणाले, "माझ्यासारख्या कट्टर भाषावाद्याचीही दृष्टी चुकवून माझ्या लिखाणात परभाषी शब्दांनी प्रवेश मिळविला, यावरून अितरांच्या भाषेवर या परभाषी शब्दांचे किती आक्रमण होत असेल ! म्हणून तर माझा भाषाशुद्धीचा आग्रह !"[६]

सावरकरांच्या नाटकातील वाक्यरचनासुद्धा वैशिष्ट्यपूर्ण आहे. लांबलचक वाक्यरचना हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य चटकन नजरेत भरते. निबंधमालेसारखी लांब लांब वाक्ये रचण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता.;[७] आणि आपल्या निबंधांनाच त्यांनी नाट्यरूप दिल्याने तशी लांब लांब वाक्ये येथेही येणे स्वाभाविक होते. साधक-बाधक मुद्द्यांचा परामर्श त्यांना नाटकांतही घ्यावयाचा होता. चोखा,[८] किसन,[९] देवीसिंह[१०] यांची प्रदीर्घ वाक्ये या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. 'संन्यस्त खड्गा'तील विक्रमाच्या तोंडचे हे पुढील वाक्य पाहा : 'परंतु सज्जनहो, मोठ्या दु:खाने पण निर्भीडपणे मी माझी भीती अुल्लेखित करून ठेवतो की, पंचवीस वर्षां-नंतरच काय, पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर या जगाच्या दुर्दैवाने

---

१. मख. प. पृ. २३६. २. मख. प. पृ. २७३. ३. सह्याद्री, जून–१९४३, पृ. ४२३. ४. बहु. पृ. २३५. ५. आ. च. पृ. २३३. ६. बहु. पृ. २३८. ७. आ. च. पृ. ४८. ८. अु:शाप पृ. ५५, ५६. ९. अु:शाप पृ. ९१. १०. अु:शाप पृ. ११५.

शस्त्रयुगाचेच प्रावल्य दिसून येअील; वळी तोच कान पिळीत राहील; रक्तरंजित साम्राज्याचा विजयाश्व भूवर थैमान घालीत असेल आणि त्याच्या टापांखाली तेच अधिक प्रथम चिरडले जातील की, जे या शांतियुगाच्या स्वप्नवाणीला भविष्यवाणी समजून – तीवर विसंबून सर्वाआधी शस्त्रसंन्यास करतील – दुसऱ्याच्या दयेवर अवलंबून राहण्याअितके दुबळे होअून वसतील.''[१] या प्रदीर्घ वाक्याप्रमाणेच बुद्ध,[२] सुलोचना,[३] सैनिक,[४] विक्रम,[५] व धर्म[६] यांची वाक्ये लांबलचक असलेली दिसून येतात. 'अुत्तरक्रिये'तील माधवराव पेशवे[७] व यशवंतराव[८] यांच्या भाषणांतील वाक्ये अशीच प्रदीर्घ आहेत.

सावरकरांच्या नाटकांतील अनेक वाक्ये अिंग्रजी भाषेच्या घडणीची आहेत. ती तशी घडावयाला कारणही त्यांचे व्यक्तिमत्त्वच होय. चिंतामणराव कोल्हटकरांनी ते कारण अधिक स्पष्ट करताना लिहिले आहे : "जेत्यांना त्यांच्या भाषांतसुद्धा हार जावयाचे नाही अशा अीर्षेने अैन तारुण्यात आत्मसात केलेल्या आंग्ल भाषेच्या घडणीचा त्यांच्या (सावरकरांच्या) विचारावर अेवढा पगडा बसला की, त्यांच्या विचाराचे स्फुरण, मांडणी त्या भाषेच्या पद्धतीने होते. नंतर लिहिताना किंवा बोलताना ते त्याचे मराठीकरण करतात असा भास होतो."[९] 'अुःशाप'मधील किसन घोडेवाल्याला म्हणतो, "हे दयाळू सज्जना, तू आम्हाला कोण, काय ते न विचारता ज्या अर्थी शुद्ध मानवी दयेनं साहाय्य करण्यास प्रवृत्त झाला आहेस, त्या अर्थी तुझी ती दया अितकी अुथळ निश्चयाची नसेल की आम्ही महार आहोत हे अैकताच तिचा निर्मळ ओघ अेकाअेकी सुकून जाअील."[१०] याच पद्धतीची गंगाजी,[११] शंकर[१२] यांची वाक्ये आहेत. 'संन्यस्त खड्गा'तील महानामा म्हणतो, 'कोणतीही मानवी जिव्हा आपले हृद्गत अितक्या वक्तृत्वमय भाषेत सांगू शकणार नाही की, जितक्या हृदयोद्दीपक वाणीत ह्या खड्गाची ही लोह-जिव्हा सांगू शकेल."[१३] सुलोचना अशाच स्वरूपाच्या वाक्यात बोलते. ती म्हणते, " .....त्यामुळे तो आततायी कर्म करण्यास अितक्या निर्भय वेगाने धावत नाही की जितक्या तो सूडाचे भय नसते तर धावला असता."[१४] विद्युत्गर्भ सांगतो, " नाहीतर विक्रमास दंड देण्यासाठी त्यांचा पुत्र सेनापती वल्लभसिंह जो आमच्या विजयी सैन्याच्या हाती पडला आहे, त्याचा तत्काळ वध केला जाअील."[१५]

---

१ संन्यस्त खड्ग पृ. ४१. २. संन्यस्त खड्ग. पृ. ७. ३. संन्यस्त खड्ग पृ. ५५. ४. संन्यस्त खड्ग पृ. १००. ५. संन्यस्त खड्ग पृ. ११२. ६. संन्यस्त खड्ग पृ. १३२. ७. अुत्तरक्रिया पृ. ५. ८. अुत्तरक्रिया पृ. ९६. ९. बहु. पृ. २३३. १०. अुःशाप पृ. ३४. ११. अुःशाप पृ. ७५. १२. अुःशाप पृ. १२१. १३. संन्यस्त खड्ग पृ. ६७. १४. संन्यस्त खड्ग पृ. १०८. १५. संन्यस्त खड्ग पृ. ८७.

स्वत:च्या घडणीची लयवद्ध व आवेशयुक्त अशी वाक्येही सावरकर वापरतात. मनाच्या मुखावर विवेकाची मुद्रा ठोकल्यावर सुलोचना नलिनीस म्हणते, "मरणापूर्वी माझा वल्लभ जेव्हा आणि जर कधी भेटेल तर आणि तेव्हाच त्याचा हात काय तो ही मुद्रा अुघडील."[1] अवदालीच्या वकिलाला प्रत्युत्तर करताना बिनीवाले सांगतात "मराठ्यांचा सरसेनापती पानपती मारला गेला पण गिलच्यांचा मारला गेला नाही आणि त्यायोगे शेवटी मराठ्यांनी मैदान सोडले पण गिलच्यांनी राखले – या अेकाच अर्थी आणि अेवढ्यासाठीच काय ती गिलच्यांनी पानपतची लढाअी जिंकली आणि मराठ्यांनी गमावली असे आम्ही समजतो."[2]

क्रियापदांच्या पुनरुक्तीने व त्यांना 'च'कार जोडून आवेशयुक्त वाक्यरचना करण्याची सावरकरांची पद्धती येथेही दिसते. 'नाहीतच नाहीत'[3] 'नाहीच नाही',[4] 'करीनच करीन', 'टाळीनच टाळीन',[5] 'करणारच करणार'[6] अशा प्रकारची सावेश क्रियापद-रचना आढळून येते.

खास सावरकर छापाचे शब्द त्यांच्या नाटकांत ठायी ठायी आढळतात. ते शब्द वाचीत असताना सावरकरांचे आत्मचरित्र, निबंध, भाषा शुद्धीवरील लेख अित्यादी वाङमयांत त्यांची अुगमस्थाने वा अुपस्थिती आढळून येते. त्यामुळे सावरकरांचे नाट्यवाङमय त्यांच्या व्यक्तित्वाने किती रंगले आहे हीच गोष्ट प्रभावीपणे मनावर ठसते. 'अु:शाप 'मधील काही शब्द पाहा : 'अभिनीत',[7] 'प्रमाणपत्र'[8] 'मनोज्ञ युवा'[9], 'संन्यस्त खड्गा', तील शब्द असे :– 'आध्रुवध्रुवपर्यंत',[10] 'नृशंस',[11] 'त्वर्य',[12] 'प्राजक',[13] 'अुत्तप्त',[14] 'दंडम',[15] 'निडर',[16] 'अुद्दंड',[17] 'कण्ह',[18] 'अुत्तरदायित्व',[19] 'विधेय',[20] 'अनन्य',[21] 'मानुपक', तसेच नामावरून क्रियापद साधण्याची सावरकरांची पद्धती नाटकांतील भाषेतही दिसून येते. अुदाहरणार्थ, 'प्रवेशलो', 'निवेदावे', 'तरवारले', 'टक्करले' अित्यादी.

---

१. संन्यस्त खड्ग पृ. ९१. २. अुत्तरक्रिया पृ. १४. ३. संन्यस्त खड्ग पृ. ६७. ४. संन्यस्त खड्ग पृ. ७७. ५. संन्यस्त खड्ग पृ. ७९. ६. संन्यस्त खड्ग पृ. ८७ ७. मा. जन्मठेप पृ. ८९. ८. भाषाशुद्धी पृ. १३९, १४१. ९. कमला १०. मा. जन्म. पृ. ३१७. ११. मा. जन्म. पृ. २६२, २३०. १२. मा. जन्म. पृ. ४७७. १३. मा. जन्म. पृ. ३२४. १४. मा. जन्म पृ. ४८४. १५. भाषाशुद्धी पृ. १३४. १६. भाषाशुद्धी पृ. १३७. १७. मा. जन्म. पृ. २८८. १८. आ. च. पृ. ९९. १९. मा. जन्म. पृ. १८६. २०. आ. च. पृ. ६७. २१. जात्यु. नि. पृ. ३५.

नाटकातील आत्मचरित्र

या शब्दांप्रमाणेच नाटकांतील अितर काही शब्दांचा, विचारांचा आणि कल्पनांचा सावरकरांच्या चरित्राशी–आत्मचरित्राशी संबंध जोडता येतो. 'अु:शाप 'मधील 'पतित पावन ' हा शब्द रत्नागिरीत त्यांनी केलेल्या अस्पृश्योद्धार व शुद्धी या कार्याचे स्मरण करून देतो. ' संन्यस्त खड्गा'तील सुलोचनेच्या मनाने केलेले बंड व त्या मनाला तिने घातलेला विवेकाचा आवर सावरकरांच्या आत्मचरित्रातील स्वत:च्या विकार-विवेकाच्या द्वंद्वाचे अुत्कृष्ट चित्रण वाटते. ' माझ्या जन्मठेपे 'त सावरकरांनी आपल्या या विकारांच्या बंडाचे व त्यावर नेमलेल्या विवेकरूपी पहारेकऱ्याचे वर्णन अनेक ठिकाणी केले आहे.[1] ' अंदमानच्या अंधेरीतून ' लिहिलेल्या पत्रांतूनही या विवेक-रूपी आजीचा अुल्लेख ते करतात. काही वेळा तर नाटकांतील अेखादी कल्पना व शब्दप्रयोगसुद्धा आत्मचरित्रातूनच सर्वांशांनी अवतरले आहेत अशी खात्री पटते. अुदाहरणार्थ, 'अु:शाप ' मध्ये मौलवीने शंकरला मुसलमानीपणाची दीक्षा दिल्यावर तो शंकरला ' शिकंदरखान ' असे संबोधतो. तेव्हा शंकरला असह्य दु:ख होते. म्हणून शंकर स्वत:शी म्हणतो, " पण पूर्वीच्या त्याच हिंदूंच्या ' धेडा धेडा ' या शब्दांनी होणाऱ्या असह्य दु:खाला या नव्या दु:खाचा छेद दिला पाहिजे, तेव्हा दु:खाची वाकी पूज्य अुरेल."[2] हीच कल्पना सावरकरांनी वल्हंशी याच शब्दांत आपल्या आत्मचरित्रात मांडली आहे. रत्नागिरीच्या तुरुंगात मुसलमान कैद्यांशी हिंदू कैदी जशास तसे वागू लागताच मुसलमानांचा गुंडपणा कमी झाला. तेव्हा सावरकर लिहितात, " त्या दोनही लुच्चेपणाचा छेद परस्पर जाअून वाकी पूज्य अुरली."[3] सावरकरांच्या नाटकांत त्यांच्या आत्मचरित्राचा प्रत्यक्ष अुल्लेख 'अु:शाप 'मधील नांदीच्या प्रवेशात आला आहे. तेथे दुसऱ्या पदातील चरणात सावरकरांनी म्हटले आहे :—

आजवरी आचरि जो चरिताला ।। ध्रु० ।।
नाट्यविषय जे अद्भुत व्हावे । अन्य सु-कवि जनाला ।। १ ।।
अन्य चरित्रा नाट्यी रचिता । आजि विनायक झाला ।। २ ।।

आपल्या नाट्यमय अद्भुत जीवनाचा अुल्लेख सावरकरांनी येथे जाणीवपूर्वक केला आहे. सावरकरांच्या स्वभावातील स्वयंप्रभुतेचे दर्शन (Self Assertion) अशा रीतीने नाटकाच्या प्रारंभीच घडते. याच प्रवेशात पुढे नटीच्या तोंडून त्यांनी ' आक्षेपाच्या प्रबल शापाच्या वज्राघाताखाली, विनायकाच्या लेखणीची देवकीच्या

---

१. मा. जन्म. पृ. १४, ४९, ४१३. २. अु:शाप पृ. ७३. ३. मा. जन्म. पृ. ५१६.

देववंद्य कुसव्यासारखी करुणास्पद स्थिती झालेली' असल्याचे सांगितले आहे.[1] हे नटीचे भाषण म्हणजे सावरकरांचे अुघड अुघड आत्मनिवेदनच आहे, आत्मा-विष्कारच आहे.

परंतु नांदीच्या या पदापुरताच वा भाषणापुरताच सावरकरांनी आत्मा-विष्कार केलेला नाही. त्यांच्या आक्रमक व्यक्तिमत्त्वाने त्यांची सर्वच नाट्यसृष्टी कशी रंगविली आहे, हे आपण आतापर्यंत अनेक अुदाहरणांनी पाहिले आहे. या आक्रमक व्यक्तिमत्त्वामुळेच श्री. गोपीनाथ तळवलकरांनी म्हटल्याप्रमाणे सावर-करांचे नाट्य-वाङ्मय तेजस्वी पण चढाअीखोर व्याघासारखे दिसत आहे.[2]

---

१. अु:शाप पृ. २. २. सह्याद्री, जून – १९४३.

कथा – कादंबरीकार सावरकर

सावरकरांच्या लघुकथांचे स्वरूप

सावरकरांचे कथासंग्रह असे दोनच अुपलब्ध आहेत. 'सावरकरांच्या गोष्टी' या नावाने प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहात बारा कथांचा समावेश करण्यात आला आहे आणि 'समाजचित्रे' या कथासंग्रहात आठ कथा संग्रहित केल्या आहेत. याशिवाय 'सावरकर–साहित्य'च्या पाच खंडांतून विखुरलेल्या आणि पूर्वोल्लेखित कथा-संग्रहात समाविष्ट न केलेल्या अशा अेक दोनच कथा आढळतात. अतअेव, सावर-करांच्या या कथास्तवकात बावीस पुष्पांची गुंफण करता येअू शकेल.

सावरकरांच्या कथांची संख्या निश्चित करण्यात मुख्य अडचण येते ती त्यांच्या कथावाङ्मयाच्या रचनापद्धतीमुळे! सावरकरांचे निबंध वा लेख आणि त्यांच्या कथा यांच्यात व्यवच्छेदक रेषा ओढणे फार अवघड आहे. सावरकरांच्या अनेक टीका-कारांनाही ते अवघड वाटते. श्री. ग. वि. केतकर यांना सावरकरांच्या कथासंग्रहाला कथासंग्रह म्हणण्यापेक्षा 'समाजचित्रे' म्हणणे अधिक अन्वर्थक वाटते.[1] वाचकांच्या अंत:करणाची कपाटे अुघडून प्रवेश करण्यासाठी सावरकरांच्या निबंधांनी व सावरकरी बुद्धिवादाने हे कथांचे आवरण घातले आहे असे श्री. केतकर सांगतात.[2] 'सावर-करांच्या बहुतेक कथांतून त्यांच्यातील निबंधकार जागा होतो आणि त्यामुळे लघु-कथेला संवादात्मक निबंधाचे अैसपैस स्वरूप येअू लागते' असे आपले अभिमत श्री. म. ना. अदवंत यांनीही नोंदविले आहे.[3]

सावरकरांचे टीकाकारही जिथे असे संभ्रमित आहेत तिथे त्यांच्या कथा-संग्रहाच्या संपादकांना वा प्रकाशकांना संभ्रम पडावा यात काहीच आश्चर्य नाही. 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद', 'चातुर्मास्य' किंवा 'अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी' या 'सावरकरांच्या गोष्टींतील गोष्टी किंवा 'समाजचित्रा'तील 'पाहिजे! काळ्या माणसांना गोरे करणारा संशोधक पाहिजे!' 'देवसकी आणि माणुसकी', 'ललनांच्या लावण्याचे हानिलाभ' आणि 'व्रते आणि वैकल्ये' अित्यादी संवाद

---

१. स. चि. प्रस्तावना पृ. ५. २. स. चि. प्रस्तावना पृ. २. ३. सा. वि. द. पृ. १७४.

देववंद्य कुसव्यासारखी करुणास्पद स्थिती झालेली' असल्याचे सांगितले आहे.[1] हे नटीचे भाषण म्हणजे सावरकरांचे अुघड अुघड आत्मनिवेदनच आहे, आत्माविष्कारच आहे.

परंतु नांदीच्या या पदापुरताच वा भाषणापुरताच सावरकरांनी आत्माविष्कार केलेला नाही. त्यांच्या आक्रमक व्यक्तिमत्त्वाने त्यांची सर्वच नाट्यसृष्टी कशी रंगविली आहे, हे आपण आतापर्यंत अनेक अुदाहरणांनी पाहिले आहे. या आक्रमक व्यक्तिमत्त्वामुळेच श्री. गोपीनाथ तळवलकरांनी म्हटल्याप्रमाणे सावरकरांचे नाट्य-वाङ्मय तेजस्वी पण चढाओढीखोर व्याघासारखे दिसत आहे.[2]

१. अुःशाप पृ. २. २. सह्याद्री, जून – १९४३.

कथा – कादंबरीकार सावरकर

सावरकरांच्या लघुकथांचे स्वरूप

सावरकरांचे कथासंग्रह असे दोनच अुपलब्ध आहेत. 'सावरकरांच्या गोष्टी' या नावाने प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहात वारा कथांचा समावेश करण्यात आला आहे आणि 'समाजचित्रे' या कथासंग्रहात आठ कथा संग्रहित केल्या आहेत. याशिवाय 'सावरकर–साहित्य'च्या पाच खंडांतून विखुरलेल्या आणि पूर्वोल्लेखित कथा-संग्रहात समाविष्ट न केलेल्या अशा अेक दोनच कथा आढळतात. अतअेव, सावर-करांच्या या कथास्तबकात वावीस पुष्पांची गुंफण करता येअू शकेल.

सावरकरांच्या कथांची संख्या निश्चित करण्यात मुख्य अडचण येते ती त्यांच्या कथावाङ्मयाच्या रचनापद्धतीमुळे! सावरकरांचे निबंध वा लेख आणि त्यांच्या कथा यांच्यात व्यवच्छेदक रेषा ओढणे फार अवघड आहे. सावरकरांच्या अनेक टीका-कारांनाही ते अवघड वाटते. श्री. ग. वि. केतकर यांना सावरकरांच्या कथासंग्रहाला कथासंग्रह म्हणण्यापेक्षा 'समाजचित्रे' म्हणणे अधिक अन्वर्थक वाटते.[1] वाचकांच्या अंत:करणाची कपाटे अुघडून प्रवेश करण्यासाठी सावरकरांच्या निबंधांनी व सावरकरी बुद्धिवादाने हे कथांचे आवरण घातले आहे असे श्री. केतकर सांगतात.[2] 'सावर-करांच्या बहुतेक कथांतून त्यांच्यातील निबंधकार जागा होतो आणि त्यामुळे लघु-कथेला संवादात्मक निबंधाचे अैसपैस स्वरूप येअू लागते' असे आपले अभिमत श्री. म. ना. अदवंत यांनीही नोंदविले आहे.[3]

सावरकरांचे टीकाकारही जिथे असे संभ्रमित आहेत तिथे त्यांच्या कथा-संग्रहाच्या संपादकांना वा प्रकाशकांना संभ्रम पडावा यात काहीच आश्चर्य नाही. 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद', 'चातुर्मास्य' किंवा 'अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी' या 'सावरकरांच्या गोष्टींतील गोष्टी किंवा 'समाजचित्रा'तील 'पाहिजे! काळ्या माणसांना गोरे करणारा संशोधक पाहिजे!' 'देवसकी आणि माणुसकी', 'ललनांच्या लावण्याचे हानिलाभ' आणि 'व्रते आणि वैकल्ये' अित्यादी संवाद

---

१. स. चि. प्रस्तावना पृ. ५. २. स. चि. प्रस्तावना पृ. २. ३. सा. वि. द. पृ. १७४.

किंवा लेख 'कथा' म्हणून कथासंग्रहात संग्रहित करण्यास संपादकांनी वा प्रकाशकांनी कथातंत्राचे कोणते निकष लावले हे समजणे कठीण आहे.

खुद्द सावरकरांनाही आपले लेख लिहिताना त्या लेखांना 'कथा' हे नामाभिधान कितपत प्राप्त होअील यावद्दल साशंकता वाटत असावी असे वाटते. कारण कथेतील कल्पनाविलासापेक्षा सत्य घटना सांगण्याचा आपला हेतू आहे असे ते अनेक कथांच्या प्रास्ताविक विवेचनात सांगतात. 'पित्र्याचे दुसरे लग्न कसे फिसकटले?' या कथेत प्रारंभीच त्यांनी म्हटले आहे की, ही सत्य घटना असूनही 'कथा' अेवढ्यासाठीच म्हटली आहे की तीत नावे-गावे तेवढी, भाग पडले म्हणूनच, वदलली आहे नी घटनेशी घटना जुळवून घेतल्या आहेत.[1] 'तावुतांची गोष्ट' त्यांनी लिहिली तीही अैतिहासिक सत्य वाचकांच्या मनावर विंवविण्यासाठी.[2] 'वाळंतीण' ही कथा संपल्यावर सावरकरांनी कंसामध्ये मुद्दाम अेक परिच्छेद लिहून शेवटी लिहिले आहे– 'वास्तविक अनुभवांची विणलेली ही गोष्ट कथा असली तरी सामान्यतः सत्यच म्हणावयास नको काय?' 'देवसकी आणि माणुसकी' ही तर कल्पित कथा नसून रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळे या गावातील देवसकीच्या आत्मघातक मूर्खपणाचा हृदयद्रावक दाखला देणारे अेक सत्याधिष्ठित वृत्त आहे.[3] 'व्रते आणि वैकल्ये' या 'कथे'च्या प्रारंभीच सावरकरांनी म्हटले आहे की, "विज्ञाननिष्ठ प्रगतिपर व्रते कोणती नी अज्ञाननिष्ठ कोणती ही चर्चा, विशेषतः आपणां हिंदूंपुरती या लेखात करू."[4] 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद' या 'कथे'च्या पूर्वार्धात 'पंचगव्य' या विषयावर आमचा अेका सुधारक मित्राशी झालेला संवाद खाली देत आहो" असे लिहून सावरकरांनी आपल्या या लेखाचे चर्चात्मक स्वरूप स्पष्ट केले आहे.[5]

सारांश, काही अपवाद सोडल्यास सावरकरांच्या वहुतेक कथा निवंध आणि लघुकथा यांच्या सीमारेषेवरून वावरताना आढळतात. म्हणून त्यांच्या या गोष्टींना निवंधसदृश कथा किंवा कथासदृश निवंध म्हणणे अिष्ट ठरेल.

कथावाङ्मय – आत्माविष्काराचे एक साधन

कथा आणि निवंध यांची परस्परांत अशी गल्लत वा सरमिसळ होण्यास कारणही सावरकरांचे व्यक्तिमत्त्वच होय. निवंध हा वाङ्मयप्रकार सावरकरांनी आत्माविष्कारासाठी कसा वापरला हे आपण मागील अेका प्रकरणात सोदाहरण पाहिलेच आहे. निवंधाप्रमाणेच कथावाङ्मयाचाही अुपयोग सावरकरांनी आत्माविष्कारासाठी कसा केला ते आता पाहावयाचे आहे. कथावाङ्मय प्राधान्याने

---

१. सा. गो. पृ. ३३. २. सा. गो. पृ. १३३. ३. समाजचित्रे पृ. ९०.
४. समाजचित्रे पृ. १४६. ५. सा. गो. पृ. ७९.

वस्तुनिष्ठ असूनही या वाङ्मयप्रकारात लेखक आपले व्यक्तिमत्त्व विसरू शकत नाही, अितकेच नव्हे तर आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने लेखक त्या वाङ्मय-प्रकाराला विशिष्ट आकार वा घाट देतो, असेच आढळून येते. त्यादृष्टीने प्रसिद्ध अिंग्रज लेखक अेव्हेलिन मे ऑलब्राओट याने 'The Short-Story : Its Principles And Structures' या ग्रंथात केलेले विवेचन अभ्यसनीय ठरेल.

ऑलब्राओटच्या मते, लघुकथेच्या शरीरशास्त्रावर किंवा रचनाशास्त्रावर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा परिणाम होत असतो. लघुकथेचा हेतू, तीमधील लालित्य, तिला प्राप्त होणारा अर्थ, तिच्यातील भावनात्मकता, तिचा आकार वा घाट, कथेतील व्यक्तिचित्रण, कथेतील अभिप्राय वा भाष्ये, कथा हाताळण्याची पद्धती अित्यादी कथेच्या अनेक अवयवांवर ती कथा लिहिणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा अुमटतो. या दृष्टीने ऑलब्राओट याने केलेल्या विवेचनाचे वेचक मुद्दे पुढीलप्रमाणे होत :

(1) A story is significant and simple because it is worked over by a person, because it is made his own. It is the individual element that makes it literary, giving it meaning and purpose and an emotional colouring which shall distinguish it from other works of its kind. The emotional colouring is a more or less accurate reflection of the author's mood or temperament or settled character. Before the story can take on this emotional colouring or tone, so essential to its literary vitality, it must really belong to its author and be a part of him.[१]

(2) The form into which the narrative shall be cast would best be determined by the author's attitude towards his characters and his incidents.[२]

(3) Whether his characters are good or bad, every author puts a good deal of himself into them all.[३]

(4) The author is bound to interpret, else literature were as soulless as a photograph. He cannot escape interpretation, for it is only because experience means something to him that he cares to extend and make it permanent by giving it literary expression.....The short-story cannot do without interpretation

---

१. The Short Story : Its principles and structures. p. 22, 23.

२. The S. S. – Its principles & structures, p. 66.

३. The S. S. – Its principles and structures, p. 103.

and the personal point of view.[१] ..... The story of mere incidents or ingenious plot does not necessarily reveal the spirit of the author; but the story which interprets character and human life .... the story which makes a distinct emotional appeal .... inevitably suggests the personality of the author, no matter how objectively he works.[२]

(5) The spirit of the author is not to be judged by his choice of his material, but rather by his choice of motive, his manner of treatment and his total attitude towards the story.[३]

(6) Where comment is introduced, the author's attitude stands self-revealed. A single sentence suggests a philosophy of life.[४]

ऑलब्राअीटच्या वरील विवेचनावरून लघुकथेच्या अंग-प्रत्यंगातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व कसे प्रकट होत असते याची स्पष्ट कल्पना येते. सावरकरांच्या लघु-कथांचा अभ्यास करताना या विवेचनाचा प्रत्यय पदोपदी कसा येतो आणि सावर-करांचे व्यक्तित्व त्यांच्या कथांतून कसे प्रकट होते याचा सविस्तर विचार आता करावयाचा आहे.

कथासामग्रीची निवड – स्वकार्यातून नि तत्त्वज्ञानातून

सावरकरांनी आपल्या कथांची सामग्री स्वत:च्या स्थिर अशा विचारांतून आणि स्वत: अुभारलेल्या अनेक चळवळींतून निवडलेली आहे. सावरकरांच्या बहुतेक कथांचा लेखनकाल हा त्यांच्या १९२५ ते १९३७ या रत्नागिरीच्या स्थानबद्धतेचा काल होय. या काळात सावरकरांनी ज्या अनेक चळवळी केल्या, त्यांची वर्णने स्वत: सावरकरांनी आपल्या अनेक निबंधांतून आणि 'श्रद्धानंदा'मधील अनेक लेखांतून केली आहेत. 'रत्नागिरीने अस्पृश्यतेची आणि रोटीबंदीची बेडी कशी तोडली ?' या लेखात सावरकरांनी आपल्या विविध चळवळींचे व कार्याचे सविस्तर वर्णन केले आहे. हिंदुसमाजातील जातिभेदाचे अुच्चाटन करण्यासाठी 'सात स्वदेशी शृंखला' हिंदुसमाजाने तोडल्या पाहिजेत असा त्यांचा सतत प्रचार चालू होता. वेदोक्त बंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या 'सात स्वदेशी

---

१. The S. S. – Its principles and structures, p. 178, 179.
२. The S. S. – Its principles and structures, p. 229.
३. The Short Story – Its principies & structures – p. 226.
४. The Short Story – Its principles & structures – p. 229.

बेड्या' तोडण्यासाठी केवळ प्रचार करून सावरकर थांबले नाहीत, तर त्या बेड्या तोडण्यासाठी प्रत्यक्ष कार्यही त्यांनी केले. अस्पृश्यांत सरमिसळ वसून भजने व सहभोजने त्यांनी केली. पतितपावन मंदिराची स्थापना करून अस्पृश्यांना मंदिर-प्रवेशाचा व वेदोक्त पूजेचा अधिकार प्राप्त करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हिंदुसमाजाचे घटणारे संख्यावळ सावरण्याकरिता हिंदू अर्भकांसाठी अनाथालये चालविली. स्वदेशीचा घरोघर प्रचार केला. सावरकरांच्या या प्रत्यक्ष चळवळींतूनच त्यांच्या कथांची सामग्री सिद्ध झाली आहे.

आपल्या या प्रत्यक्ष कार्याची सामग्री कथांसाठी निवडण्यात सावरकरांच्या व्यक्तित्वाचे दर्शन तर घडतेच, पण त्याहीपेक्षा त्या सामुग्रीचा कथांतून वापर करताना त्यांच्या प्रभावी व्यक्तित्वाचा प्रत्यय येतो. ही सामग्री कथांतून संक्रमित करताना सावरकरांनी स्वतः तटस्थ राहून आणि कल्पनेच्या साहाय्याने तिचा कौशल्याने अुपयोग केला असता, तर त्या कथांतून सावरकरांचे व्यक्तिमत्त्व अितक्या प्रकर्षाने प्रकट झाले नसते. परंतु कथा रंगविताना सावरकर अनेक वेळा हे ताटस्थ्य विसरतात आणि स्वकार्याचा अुघड अुघड अुल्लेख करतात. 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेंतील नारद, शाब्दशास्त्री व अहिंसानंद या पात्रांशी संभाषण करीत असताना मधूनच रत्नागिरीच्या जातपात-तोडक पतितपावन मंदिराचा अभिमानाने अुल्लेख करतो.[1] 'वाळंतीण' कथेतील अेक पात्र रामभाअू वैद्य हे कथेतील वाळंतीण बाअीस व तिच्या अनाथ मुलास रत्नागिरीच्या हिंदुसभेकडे पोहोचवितात आणि रत्नागिरीस पोहोचताच त्या बाअीच्या आणि मुलाच्या पायांतील स्पर्शबंदीच्या, जातबंदीच्या, शुद्धिबंदीच्या बेड्या आपोआप तडातड तुटून पडतात.[2] अितकेच नव्हे तर 'संघटन-स्मृतीचे राज्य' झालेल्या त्या हिंदुत्वाभिमानी रत्नागिरी नगरीत कथेमधील त्या बाअीने 'अखिल हिंदु अुपाहारगृहा'त ब्राह्मण-वाणी-मराठा मंडळींसह सलग बाकावर बसून हेतुतः अुपाहार केला. पतितपावनांच्या सभामंडपात नेअून मूल देवापुढे ठेवले. सभ्य कुटुंबातील येत्या-जात्या स्त्रियांनी लुगडी देअून, साबण देअून, औषधे देअून, धीर देअून तिला अगदी घरासारखे वागविले. ब्राह्मणादिक स्त्रियांनी तिला पंगतीस घेतले.[3] 'चातुर्मास्य' या संवादात्मक कथेत सावरकरांनी हिंदू अनाथालयाचे वर्णन स्वतःच्या तद्विषयक लिहिलेल्या निबंधांच्या वर्णनाबरहुकूम लिहिलेले आहे.

सावरकरांच्या कथांची सामग्री त्यांच्या स्थिर व बुद्धिनिष्ठ अशा विचार-सरणीत आहे, हा मुद्दा त्यांचे निबंध आणि त्यांच्या कथा यांच्यांतील तुलनात्मक अभ्यासातून सहज सिद्ध होअू शकेल. सावरकरांच्या निबंधांतील विचारधनाचे दर्शन 'निबंधकार सावरकर' या प्रकरणात घडलेच आहे. येथे केवळ संक्षेपाने त्या विचारांचे

---

१. सा. गो. पृ. ६८. २. स. चि. पृ. २३. ३. स. चि. पृ. २३.

दिग्दर्शन करून सावरकरांनी तेच विचार पुन्हा पुन्हा आपल्या कथांतून कसे व्यक्त केले आहेत, हे पाहावयाचे आहे.

कथांमागील निष्ठात्रयी

सावरकरांची विचारधारा ही मुख्यत: हिंदुराष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा व बुद्धिनिष्ठा या तीन प्रभावी प्रवाहांनी बनलेली आहे. निबंधांतून तर ह्या निष्ठात्रयींचा आविष्कार अत्यंत प्रखरतेने त्यांनी केला आहे. त्यांच्या कथांमागे या निष्ठा अेखाद्या पृष्ठीपत्रासारख्या खडया आहेत. हिंदू जातीच्या अेकतेचे आणि हिंदू जातीच्या प्रत्येक बंधाचे जेणेकरून दृढीकरण होअील असे सण, अुत्सव, आचार यांच्या पालनाबद्दलचे जे वर्णन त्यांनी आपल्या ' हिंदुत्व ' या प्रबंधात केले आहे, तेच वर्णन थोडया वेगळ्या अशा संदर्भात व भाषाशैलीत त्यांनी ' आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको ' या कथेत केले आहे. हिंदुराष्ट्राभ्युदय हीच आचारांची कसोटी त्यांनी या कथेत सांगितली आहे. हिंदुराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी ' व्रते आणि विवेक ' या निबंधमालेत जी व्रते सांगितली आहेत आणि व्रतांस ज्या कसोटया लावल्या आहेत, त्यांचेच दर्शन ' चातुर्मास्य ' या संवादात्मक कथेत घडते. हिंदुराष्ट्रनिष्ठा आणि गोपालन यांच्यात विरोध अुत्पन्न झाल्यास राष्ट्रहत्या होण्यापेक्षा गोहत्या करण्यातच खरा हिंदुधर्म आहे, हा त्यांच्या निबंधातील विचार ' वाळंतीण ' आणि ' अेक घडलेला चुरचुरीत संवाद ' या कथांतून प्रकट झाल्याचे आढळते.

सावरकरांची विज्ञाननिष्ठा ही अनेक कथांना आधारभूत झालेली आहे. अैहिक जगापुरता खरा धर्म आणि खरा देव विज्ञानच होय आणि आजच्या युगात विज्ञानाच्या स्मृतीप्रमाणेच आचरण करावयास पाहिजे हा निबंधातील विचार सावरकर आपल्या कथांतून पुनरुक्त करतात. ' नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट ' या कथेतील नारद ' विज्ञान हा विष्णूचा नवा अवतार! सृष्टीव्यवहारापुरते तरी तुम्ही आता विज्ञानाचीच स्मृती अनुसरा ' असे सांगतो. सृष्टीचे सर्व अज्ञात नियम विज्ञानाच्या साहाय्याने आता मानवजातीला त्या विज्ञानदेवास कोणतीही लाचलुचपत न देताही, अवगत होत आहेत. तेव्हा ते सृष्टीचे नियम मानवांनी समजून घेतले, तर सारी मानवजात देवसकीच्या प्रभुत्वाखालून सुटून माणुसकीच्या, विज्ञानाच्या प्रभुत्वाखाली येअील असा विचार सावरकरांनी आपल्या बहुतेक कथांतून सांगितलेला आहे. ' गोविंदा गवळी ' या कथेत गोविंदा का बुडाला आणि कासम का मेला, याचे विवेचन त्यांनी याच संदर्भात केले आहे. ' अेक घडलेला चुरचुरीत संवाद ' या संवादात्मक कथेत त्यांनी प्रत्येक आचाराची कसोटी प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानच का मानावी, याचा अूहापोह केला आहे. ' पाअूस पाडण्याचे किंवा दुष्काळाला नामशेष करण्याचे जे काही सामर्थ्य मनुष्याच्या अंगी येणे शक्य आहे, ते ह्या दैनिक अज्ञानाच्या मागे लागून नव्हे, तर

प्रात्यक्षिक विज्ञानाच्या' असा विचार ते 'आता दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' या कथेच्या अखेरीस मांडतात. 'ताबुतांची गोष्ट' या कथेचा शेवट करताना ते आग्रहाने सांगतात की, ऐहिक जगापुरता खरा धर्म म्हणजे विज्ञानच होय. 'प्रार्थना' कथेतील गणितागत आलेल्या भूकंपाचे वर्णन त्यांनी याच वैज्ञानिक दृष्टीने केलेले आहे. गर्भ-शास्त्राकडे आता भारतीय शोधकांनी आग्रहाने लक्ष दिले पाहिजे असा संदेश त्यांच्या 'काळ्या माणसांना गोरे करणारा संशोधक पाहिजे' या कथेतील रमाकान्त देतो. अुत्पात – अपघातादी संकटांवर अुपाय अज्ञानाची धार्मिक छा-छू नाही, तर विज्ञानाच्या कार्यकारणभावाची ती वाट होय हा सावरकरांचा विचार त्यांच्या 'अपघात की आत्म-घात' या कथेचे सूत्र आहे; आणि म्हणून कथेतील विज्ञानवादी सुधारक डॉ. मोहिते शास्त्रीबुवांना असे वजावितात की, वड, पिंपळ हे देव, ही अंडाणी भावना मुळातच ठेवू नये ..... मनुष्याच्या 'अज्ञानयुगातील चुकी आता या विज्ञानयुगात सोडून दिली पाहिजे.' 'नवा अध्याय' या कथेतील बुवाच्या भावडया भक्तीचे लोकांना वाटणारे गूढ डॉ. विचारे यांच्या शब्दांत प्रकट केलेल्या विज्ञाननिष्टा विचारशलाकांनी सावरकर दूर करतात.

सावरकरांचा बुद्धिवाद त्यांच्या कथांमधील बहुतेक प्रमुख अशा बुद्धिवादी पात्रांच्या मुखातून व्यक्त होतो. धर्मभोळेपणा, भावडेपणा या वृत्तींची सावरकरांना विलक्षण चीड आहे, याचे कारण त्यांचा प्रखर बुद्धिवाद ! या भाबडेपणामुळे राष्ट्राची बुद्धी पंगू होअू नये, राष्ट्राची बुद्धिहत्या होअू नये आणि राष्ट्रातील बुद्धिविजय संपून भक्तिविजयांचा अध्याय सुरू होअू नये असा सावरकरांचा सतत आग्रह आहे. त्यांच्या कथेतील बुद्धिवादी पात्रे हाच आग्रह धरतात. 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेतील नारद अेखाद्या बुद्धिवाद्याप्रमाणे देव, धर्मग्रंथ, जातिभेद, सृष्टिनियम, विज्ञान, यासंबंधी चर्चा करतो. 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद' आणि 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' या दोन्ही संवादात्मक कथांमध्ये 'आम्ही'ने – म्हणजेच स्वतःने (सावरकरांनी) – पंचगव्य, दिवाळीचा सण आणि त्यातील आचार, पर्जन्यसूक्ते अित्यादी विषयांवर केलेला वादसंवाद बुद्धिनिष्ठेवरच आधारलेला आहे. 'नंदीबैल आणि माणूस बैल' आणि 'वाळंतीण' या कथेतील रामभाअूद्वयांची गाअीकडे पाहण्याची अेकच बुद्धिनिष्ठ भूमिका आहे. 'अपघात की आत्मघात' कथेतील डॉ. मोहिते यांचा वड–पिंपळादी वृक्षांवावत जो बुद्धिवादी दृष्टिकोन आहे, तसाच बुद्धिवादी दृष्टिकोन 'भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय' या कथेतील डॉ. विचारे यांचा भावडया भक्तीकडे पाहण्याचा आहे. देव–देवतांचे अस्तित्व व त्यांचे माणसांना मिळणारे संरक्षण, देवविषयक स्तोत्रांतील सामर्थ्य, प्रार्थनेच्या, फलश्रुतीच्या कल्पना या सर्वांचा विचार 'प्रार्थना' कथेतील विक्रम या पात्राने तर्कशुद्ध बुद्धिवादाच्या निकषावर घासून केला आहे.

या पात्रांच्या द्वारा व्यक्त झालेले विचार जसे बुद्धिवादावर आधारलेले आहेत, तसेच कथांमधून सावरकरांनी, कथातंत्राशी विसदृश असे जे विवेचन केले आहे तेही बव्हंशी बुद्धिनिष्ठ असेच आहे. 'गोविंदा गवळी' कथेत नवसावद्दल व्यक्त केलेले विचार, 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' आणि 'अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी' या कथांतून आचारकांडावद्दल केलेले तर्ककठोर विश्लेषण सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ व्यक्तित्वाची सतत जाणीव करून देत असते.

सावरकरांचे व्यक्तित्व ज्या तीन मूलद्रव्यांनी – राष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा – बनलेले आहे ती मूलद्रव्ये वा निष्ठा त्यांच्या कथांतून कशा प्रकारे प्रकट होतात हे आपण पाहिले; पण सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या अितर अनेक रंग-छटांनी त्यांच्या कथा रंगलेल्या आहेत. 'सावरकरांचे सर्वच वाङमय सावरकर–छाप आहे' या श्री. ग. वि. केतकरांच्या विधानाची प्रचीती त्यांच्या कथा वाचतानाही पदोपदी येते.[1]

कथालेखनाचे विविध हेतू – निबंधातील विचारांचा प्रचार

हिंदुराष्ट्राचें जागरण व अुद्धरण करणें हा सावरकरांचा जीवन–हेतू होता आणि हे अुद्धरण करण्यासाठी ज्या धर्मभोळ्या, भावडया प्रवृत्तींनी हिंदुसमाजाला ग्रासलेले आहे, त्या विघातक प्रवृत्तींचा अुच्छेद करण्यासाठी स्वमतांचा प्रभावी प्रचार करण्याचे हे कार्य सावरकरांनी हाती घेतले होते. आपल्या निबंधांतून त्यांनी हिंदु-समाजाला झालेल्या बुद्धिभ्रंशावर रामबाण लस टोचण्याचे कार्य केले होते.[2] भावडया प्रवृत्तीचा अुच्छेद करण्याचा चंग बांधून त्यांनी हाती लेखणी घेतली होती.[3] निबंधांतून स्वमतांचा केलेला हा प्रचार अुघड होता. पण श्री. ग. वि. केतकर यांनी म्हटल्याप्रमाणे सावरकरांच्या निबंधातील केवळ कोटिक्रम अेकामागून अेक सारखे वाचणे हेच मुळी कित्येकांच्या मनावर ताण पडण्यासारखे होते. म्हणून वाचकांच्या अंत:करणाची कपाटे उघडून प्रवेश करण्यासाठी अितिहासनिसर्गाधिष्ठित अशा सावरकरी बुद्धि-वादाने कथांचे आवरण घेतले.[4] याचाच अर्थ सावरकरांच्या कथांमागे काही विशिष्ट हेतू आहे. कधी कधी आपल्या कथांतून तो हेतू ते प्रकटही करतात. 'ताबुतांच्या गोष्टी'त सत्य अशी अैतिहासिक घटना वाचकांच्या भावनेवर व बुद्धीवर परिणामकारकपणे ठसविण्यासाठी आपण सांगत आहोत अशी भूमिका कथेच्या आरंभीच[5] सावरकरांनी घेतलेली आहे. तात्त्विक चर्चेपेक्षा समाजचित्राचा अेक अेक फुटकळ तुकडा लोकांना दाखविल्यास तो अधिक परिणामकारक होतो

---

१. स. चि. प्रस्तावना पृ. ४. २. क्ष–किरणे पृ. १५१. ३. वि. नि. पृ. ८४.
४. स. चि. प्रस्तावना पृ. २. ५. सा. गो. पृ. १३३.

ही सावरकरांनी निबंधलेखनासाठी स्वीकारलेली बैठक[1] कथालेखन करतानाही त्यांनी सोडलेली नाही. म्हणूनच 'पित्र्याचे दुसरे लग्न कसे फिसकटले?' किंवा 'ताबुतांची गोष्ट' या कथांमध्ये त्यांनी कल्पितापेक्षा प्रत्यक्ष घटितांचे दर्शन घडविण्याचा विचार व्यक्त केला आहे.[2] 'कुसुम' या कथेत तर त्यांनी वाचकांना वारंवार संबोधून 'हे समाजचित्र पाहा' असे अुद्घोषित करून आपल्या कथा-हेतूकडे त्यांचे लक्ष वेधले आहे. 'समाजाच्या वास्तव परिस्थितीवर लख्ख प्रकाश पाडण्यासाठीच' त्यांनी 'पित्र्याचे दुसरे लग्न कसे फिसकटले?' ही कथा लिहिली आहे.[3]

धर्मभोळेपणाचे उच्चाटन

धर्मभोळेपणाच्या, भावडेपणाच्या प्रवृत्तीचे अुच्चाटन करण्याचा हेतू सावरकरांनी निबंधलेखन करताना दृष्टीसमोर ठेविला होता. कथालेखन करतानाही सावरकरांनी तोच हेतू नजरेपुढे ठेवला होता. हिंदू आणि मुसलमान धर्मांतील देव-भोळेपणा दाखविण्यासाठी 'गोविंदा गवळी' ही कथा त्यांनी लिहिली. देव-भोळेपणामुळे भूकंपाची अुत्पत्ती लावण्यात हिंदु-मुसलमान आणि ख्रिश्चन यांची कशी चूक होत आहे हे त्यांनी 'नारदाची पृथ्वीस भेट' या कथेत सांगितले आहे. गोमूत्र, पंचगव्य या पदार्थांचे धर्मीकरण करणारी भाबडी प्रवृत्ती अुच्छेदण्यासाठी 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद' त्यांनी लिहिला. वैदिक वा पौराणिक, कुराणीय व बायबलीय प्रार्थनांनी वा मंत्रजपांनी पाअूस पडतो वा दुष्काळ हटतो ही निव्वळ भाबडेपणाची समजूत आहे' असे ते 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' या कथेत सांगतात.[4] 'ही पशुपूजा नि हे अंगारे नि ही अैतखाअू साधुता नि हे नंदीबैल ही समाजाच्या भाबडेपणाची मैलागाडी आहे – त्या भंग्याच्या मैलागाडीहून तिरस्कार्य, टाकाअू! ..... कारण त्या मैलागाडीचे शेतांना तरी खत होते – पण ह्या भाबडे-पणाच्या मैलागाडीने बुद्धिभ्रंशाची रोगराअीच काय ती जिकडे तिकडे फैलावते!' असे त्यांचा गंप्या, 'नंदीबैल आणि माणूसबैल' या कथेत सांगतो.[5] हिंदूंच्या व्रतांतील हास्यास्पदता अनेक अुदाहरणांनी स्पष्ट करताना सावरकर कमलेच्या मुखाने पुन्हा पुन्हा सांगतात – "खरा दोष आपल्या सगळ्यांच्या भाबडेपणाचा आहे.....मूळ दोष आपल्या भाबडेपणाचा."[6] 'ताबुतांची गोष्ट' रंगविताना सावरकरांचा सगळा कटाक्ष आहे तो मुसलमानांचा देवभोळेपणा सांगण्यावर! महमंद पैगंबराचा कृतकपुत्र अल्ली आणि महंमदाचे नातू हसन-हुसेन यांचे अीश्वराशी असलेले दैवी

---

१. क्ष–किरणे. २. सा. गो. पृ. ३४, १३२, १३३. ३. सा. गो. पृ. ३५.
४. सा. गो. पृ. १०३, १०४. ५. सा. गो. पृ. १२१, १२२. ६. सा. गो. पृ. १२९.

नाते त्यांना पराभवापासून व मृत्यूपासून वाचवू शकले नाही, हे त्या अैतिहासिक गोष्टीत सावरकरांनी दाखवून मुसलमानांचा देवभोळेपणा स्पष्ट केला आहे. 'अंगरख्याला माणसे वेतणारा शिंपी' ही कथाही मुसलमानांची आचारविषयक भावडी धर्मभावना किती हास्यास्पद आहे हे दाखविण्यासाठीच लिहिली आहे. वगदादच्या राजधानीतील खलिफांचा अंगरखाच शेवटी खलिफा होअून वसला हे सावरकरांनी अनेक अुदाहरणे देत व मधून मधून अुपरोधांचा शिडकावा करीत वर्णिले आहे. गाअीला अुपयुक्त पशू न मानता देवता समजून तिची हास्यास्पद अुपासना करण्याच्या पद्धतीची टवाळी त्यांनी 'वाळंतीण' कथेत केली आहे. प्रार्थनेतील वेडगळपणा, भावडेपणा, पटवून देण्यासाठी क्वेट्टाच्या भूकंपाच्या भयाण पार्श्वभूमीवर त्यांनी 'प्रार्थना' ही कथा लिहिली. वडदेव, विठोवा, ह्या भावडया भक्तीने निर्माण केलेल्या देवदेवतांचे अस्तित्व आणि त्यांचे अनुग्रह वा कृपा किती हास्यास्पद आहे, तर्कदुष्ट आहे हे मनावर विंववविण्यासाठी त्यांच्या 'अपघात की आत्मघात' आणि 'भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय' या कथा अवतीर्ण झाल्या आहेत.

निबंधांप्रमाणेच सावरकरांच्या कथा या हेतुप्रधान आहेत आणि त्या स्वमताच्या प्रचारार्थ त्यांनी लिहिल्या आहेत, हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी वरील अुदाहरणे पुरेशी होतील. सावरकरांच्या टीकाकारांनीही हाच मुद्दा वारंवार मांडला आहे. सावरकरांच्या कथांच्या संदर्भात लिहिताना श्री. ग. वि. केतकर हेच सांगतात की, सावरकरांचे सर्वच लिखाण हे प्रचारी हेतूने प्रवृत्त झाले आहे, केवळ मनोविनोदनासाठी काल-क्षेपाचे साधन म्हणून नव्हे[1] ..... आंधळ्या निष्ठा, घातक पूर्वग्रह, अप्रयोजक समजुती यांच्या योगाने हिंदुत्वाची सहस्रशः हानी झाली आणि होत आहे. ह्या पूर्वग्रहांवर आणि समजुतींवर बुद्धिवादाचे प्रहार करून त्यांचा निरास करण्यासाठी सावरकरांनी अनेक निबंध लिहिले आहेत.....अशा सावरकरी बुद्धिवादाने कथांचे आवरण घेतले आहे.[2] श्री. म. ना. अदवंतांनी सावरकरांच्या कथांतील दोषदिग्दर्शन करताना 'हिंदुधर्मातील अनिष्ट व वेडगळ रूढींवर हल्ला करण्यासाठीच सावरकरांनी ह्या कथा लिहिल्या'या शब्दांत त्या कथांमागील हेतुप्रधानता स्पष्ट केली आहे.[3] 'त्यांच्या बहुतेक कथांतून त्यांच्यामधील निबंधकार जागा होतो' या वाक्यात सावरकरांच्या कथा व त्यांचे निबंध यांच्यातील निकट साम्य श्री. अदवंत यांनी सहजपणे सूचित केले आहे.[4]

---

१. स. चि. प्रस्तावना पृ. १, २. २. स. चि. प्रस्तावना पृ. २. ३. सा. वि. द. पृ. १७४. ४. सा. वि. द. पृ. १७४.

विज्ञानाचा पुरस्कार

धर्मभोळेपणाचा केवळ निषेधच सावरकरांनी आपल्या कथांतून केलेला नाही. तर या धर्मभोळेपणाची नांगी ठेचणाऱ्या विज्ञानाचा सतत पुरस्कार निबंधांप्रमाणेच यांनी कथांतही केला आहे. धर्मभोळेपणाचे जे जे दुष्परिणाम त्यांनी निबंधांतून सांगितले आहेत ते ते सर्व दुष्परिणाम कथांच्या साहाय्याने वाचकांची अंत:करणे अुघडीत त्यांनी सांगितले आहेत. धर्मभोळेपणाने वुद्धिभ्रंश होतो,[१] मनुष्य देवलसी आणि पोथीनिष्ठ वनतो,[२] निरर्थक, भाकड अशा आचारांचा तो गुलाम होतो,[३] धर्म-ग्रंथांना प्रमाण मानले तर त्रिकालाबाधित अडाणीपणा त्यांच्या ठायी येतो,[४] धर्म-भोळेपणातून निर्माण होणाऱ्या विटाळवेडाने राष्ट्राची व स्वजातिवैभवाची हानी होते,[५] रोटीवंदीची विलक्षण वेडी स्वजातीच्या पायांत पडते,[६] गाअीसारख्या पशूची आणि वडासारख्या वृक्षाची देवतासमान पूजा करण्याची प्रवृत्ती वळावते,[७] आणि गोहत्येपेक्षा राष्ट्रहत्या करण्यासही मनुष्य सिद्ध होतो.[८] तेव्हा हा धर्मभोळेपणा नाहीसा करण्याचा मुख्य अुपाय म्हणजे प्रत्यक्षनिष्ठ आणि अनुभवसिद्ध अशा विज्ञानाची कास धरणे हा होय. सावरकरांनी हा सर्व विचार त्यांच्या बहुतेक निबंधांतून विशेषत: 'धर्मवेडाची नांगी ठेचू शकेल असे अेकच वळ आहे, आणि ते म्हणजे विज्ञानवळ'–या निबंधातून सोदाहरण सांगितला आहे. सावरकरांच्या वव्हंश कथा वरील निबंधाचेच कथात्मक रूप होत. युरोपही पूर्वी धर्मभोळाच होता. पण युरोपने या विज्ञानाची अुपासना करताच 'देवसकीचे प्रस्थ कमी होअून माणुसकीचे स्वामित्व प्रस्थापिले गेले'. म्हणून कथांमधूनही सावरकर या विज्ञाननिष्ठ युरोपाचे अनुकरण करण्याचा प्रचार करतात, अुपदेश करतात. त्यांच्या कथेतील नारद विज्ञाननिष्ठ रशिया कसा प्रगत झाला आहे आणि प्रार्थना न करणाऱ्या रशियावरच खरा देव कसा प्रसादला आहे, याचे रसभरित वर्णन करतो. "[९] अबाधित सृष्टिनियमांच्या ज्ञानाने आपल्या अिच्छेप्रमाणे पाअूस पाडण्याचे प्रयोग रशियात सफळत आहेत असे कथांतील चर्चेत सावरकर आग्रहाने सांगतात.[१०] प्रार्थना न करताही मास्कोमधील पाखंड नागरिक सुरक्षित राहू शकतात हा विरोध 'प्रार्थना' कथेत त्यांनी हेतुपुरस्सर दाखविला आहे.[११] धर्मग्रंथांवर समाजसंस्था अुभारण्यापेक्षा त्या युरोपप्रमाणे विज्ञानाच्या स्मृतीच्या आधारे

---

१. सा. गो. नंदीबैल आणि माणूसबैल. २. स. चि. – वाळंतीण, प्रार्थना. ३. सा. गो. अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी. ४. अेक घडलेला चुरचुरीत संवाद. ५. अनुकाकू, अं. मा. बे. शिंपी. ६. वाळंतीण. ७. बाळंतीण, अपघात की आत्मघात. ८. अेक घडलेला चुरचुरीत संवाद. ९. ना. पृथ्वीस भेट पृ. ७२. १०. आता मात्र दि. दु. भीतीच नको. ११. प्रार्थना, पृ. ३२.

स्थापिल्या जाव्यात हा सतत विचार सावरकरांच्या निबंधांत आहे. कथांमधूनही तोच विचार व विज्ञाननिष्ठ युरोपच्या अनुकरणाची तशीच आवाहने सावरकरांनी केली आहेत.

मानवहितदृष्टी

हिंदुत्वनिष्ठा ही सावरकरांची आद्य किंवा प्रथम निष्ठा होय आणि मानवनिष्ठा किंवा मानवहित ही त्यांच्या जीवनाची अंतिम निष्ठा किंवा मूल्य आहे हे आपण निबंधवाङ्मयात पाहिलेच आहे. सावरकरांच्या या मूळच्या मानवनिष्ठेला जेव्हा विज्ञाननिष्ठेची जोड मिळते, तेव्हा त्याची परिणती व्यापक अशा मानवहितामध्ये होणे अपरिहार्यच होय. या दोन्ही निष्ठांना सावरकरांच्या बुद्धिनिष्ठेने अेक प्रकारची समघातता, तर्कशुद्धता येते आणि म्हणूनच ते सर्वधर्मांमधील लक्षावधी अडाणी लोकांतील अज्ञानाची साथ हटवून त्यांना विज्ञानाच्या शुद्ध वातावरणात नेअून सोडण्याची बुद्धिनिष्ठ भूमिका घेतात.[1] सावकरांच्या कथांमधूनही त्यांची ही मानवहितदक्ष, कठोर, वैज्ञानिक आणि बुद्धिनिष्ठ भूमिका ढळत नाही. 'गोविंदा गवळी', 'ताबुतांची गोष्ट', 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट', 'अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी', 'प्रार्थना', 'अपघात की आत्मघात' या कथांतून सावरकरांनी ख्रिश्चन, मुसलमान आणि हिंदू या धर्मांतील अडाणी, धर्मभोळ्या लोकांना मानवहिताची कल्याणप्रद दृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे.

उपयुक्ततावाद

मानवनिष्ठेच्या वा लोकहिताच्या या प्रेरणेला सावरकर नेहमी अुपयुक्ततावादाची जोड देतात. सुधारणेच्या ज्या कसोट्या सावरकर मानतात, त्यांत लोकहिताच्या कसोटीबरोबरच अुपयुक्ततेचा समावेश ते करतात. मानव, राष्ट्र, धर्म आचार अित्यादी मूल्यांचा विचार करताना अुपयुक्तता हा सावरकरांचा निकष असतो. त्यांच्या कथेतील नारदही हाच निकष मानतो आणि शब्दशास्त्र्यांना सांगतो, मानव्याला अेकंदरीत ज्या परिस्थितीत जे अुपयुक्त ते चांगले, ते पुण्य, जे अनुपयुक्त ते –त्या परिस्थितीत वाअीट, पाप! हा मानवांचा मानवधर्म,"[2] (नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट) वैद्यमहाशयाशी बोलताना त्यांच्या संवादात्मक कथेतील 'आम्ही'चे पुढील विचार असेच आहेत. " प्रत्येक पदार्थ मनुष्याला ज्या प्रमाणात अुपयुक्त त्याच प्रमाणात सेव्य."[3] (अेक घडलेला चुरचुरीत संवाद). दान करताना समाजहिताची दृष्टी बाळगावयास हवी, असे आग्रहाने सांगताना त्यांचे रामभाअू म्हणतात,

---

१. सा. सा. भाग २, पृ. ८०. २. सा. गो. पृ. ७२. ३. सा. गो. पृ. ८८.

"अैकलंत का ताअी, गाय नि वैल पशू आहेत. समाजाला अुपयुक्त पशू आहेत–म्हणून त्यांचा समाजाला अुपयोग होअील अशा पद्धतीनं दान दिलं तर पुण्य ही दृष्टी धरा, की मग तुमचें दान आपोआप डोळस होअील नि त्या पशूंची अुपयुक्तता वाढेल."[1] (नंदीबैल आणि माणूसबैल) गाय, वड अित्यादी गोष्टी मनुष्याला अुपयुक्त म्हणून पूजनीय नि रक्षणीय हा विचार त्यांच्या निबंधांप्रमाणेच त्यांच्या कथांतून अनेक वेळा व्यक्त केला गेला आहे. 'वाळंतीण' या कथेत तो विचार सूचितच केला आहे तर 'अपघात की आत्मघात' कथेतील डॉ. मोहिते तोच विचार खणखणीत शब्दांत व्यक्त करताना म्हणतात, "गाअीवैलांसारखे पशू काय किंवा वडपिंपळांसारखी झाडे काय, ती मनुष्यास अत्यंत अुपयुक्त असतात म्हणून त्यांच्याविषयी आम्हांस प्रेम वाटावे, त्या प्रमाणात किंचित पूज्यताही वाटो.....पण ज्या परिस्थितीत ते पशू वा ती झाडे मनुष्यास अुपद्रव देण्यास कारण होतात, तेव्हा ती पालनीय वा रक्षणीय राहात नाहीत आणि जेव्हा त्यांच्या नाशानेच मनुष्यजातीचे वा राष्ट्राचे हित साधणारे असते तेव्हा त्यांचा नाश हाच खरा मनुष्यधर्म वा राष्ट्रधर्म होणार."[2] 'अंगरख्याला माणसे वेतणारा शिंपी' या कथेत आचारावर विवेचन करताना सावरकर लिहितात, "चांगले याला दैवी वा डिव्हाअीन हा अेक प्रतिशब्दच होअून बसला होता. मनुष्यास हितकारक ते चांगले अशी चांगल्याची मानवी व्याख्या करण्याअितके त्या काळचे समाज पुढारलेले नव्हते."[3]

आचाराप्रमाणेच धर्म, सण-महोत्सव या सर्वांकडे पाहण्याचा सावरकरांचा दृष्टिकोन हा समाजहितकारक वा मानवहितसंवर्धक असाच आहे. 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' या कथेत दिवाळी हा सण केवळ बुद्धिवादाला पटणारा सण म्हणून नव्हे तर तो सामाजिक अुपयुक्ततेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे ते आवर्जून सांगतात.[4] या सर्व कथांचे लेखन करण्यामागे सावरकरांची भूमिका ही मनुष्यहिताच्या आड येणाऱ्या भाबड्या धर्मभावना सुधारू अिच्छिणाऱ्या बुद्धिवादी सुधारकांची आहे असे त्यांनी स्वत:च डॉक्टर मोहिते यांच्या मुखाने सांगितले आहे.[5] (अपघात की आत्मघात). तेव्हा सावरकरांची निबंधलेखनामागील भूमिका येथेही प्रकट झाली आहे. सावरकरांची व्यापक मानवनिष्ठा आणि त्यांचा अुपयुक्ततावादाचा आग्रह यांमुळे त्यांच्या निबंधांप्रमाणेच त्यांच्या कथाही सर्वधर्मविचारसमावेशक व सर्व धर्मांतील पात्रांचे दर्शन घडविणाऱ्या झाल्या आहेत. त्यांच्या कथांत हिंदू पात्रांबरोबर अितर धर्मांतील कासम (गोविंदा गवळी), पीरदाद (प्रार्थना),

---

१. सा. गो. पृ. ११८. २. स. चि. पृ. ११२. ३. सा. गो. पृ. ११६. ४. सा. गो. पृ. ९३, ९४. ५. स. चि. पृ. १०५

पीरजादे (अपघात की आत्मघात), मिस ल्युसी (अपघात की आत्मघात) या पात्रांचे दर्शन घडते आणि त्यांच्या धर्मांतील दुष्ट श्रद्धा व आचार यांच्या निवारणार्थ सावरकर काही विचार व्यक्त करतात.

धर्मग्रंथविषयक विचार

आपले पूर्वज आणि धर्मग्रंथ यांच्याबद्दलचे सावरकरांचे , कथांमधील विचार त्यांच्या निबंधांतील विचारांचेच अनुकरण करतात. आपल्या पूर्वजांनी मानवी ज्ञानाची सीमा त्यांच्या सामर्थ्यानुसार व परिस्थितीप्रमाणे वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भांडवलाच्या वळावर आपण मानवी ज्ञानाची संपत्ती अधिकाधिक वाढवीत चाललो आहोत.[1] अशा पूर्वजांबद्दल आपण आदर बाळगला पाहिजे, तसेच धर्मग्रंथ हे अीश्वरकृत नसून मानवकृत आहेत,[2] त्या ग्रंथांतील अनेक वचने आज खोटी पडली आहेत, म्हणून कोणत्याही मानवी ग्रंथांप्रमाणे तेही आहेत अेवढे मानताच ते ग्रंथ मनुष्यजातीचीच अैतिहासिक नि सामाअिक संपत्ती होते,[3] अित्यादी विचार हे सावरकरांच्या निबंधांतूनच त्यांच्या कथांमध्ये अवतीर्ण झाल्याचे आढळून येते.

भौतिक सामर्थ्यावर विश्वास

आध्यात्मिक सामर्थ्यापेक्षा भौतिक सामर्थ्यानेच या जगात विजय प्राप्त होतात, हा सावरकरांच्या निबंधात प्रतिपादलेला सिद्धान्त स्पष्ट करण्यासाठीच काही कथांची रचना, सावरकरांनी केल्याचे दिसते. 'अीश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ?' या नावाचा त्यांचा निबंध याच विषयाला वाहिलेला आहे. कथांमधून हाच विचार वाचकांना पटवून देताना, ते कधी प्रसंगाची तर कधी कथाविषयाची हेतुपुरस्सर निवड करतात. 'गोविंदा गवळी' या कथेत देवाला करण्यात येणाऱ्या नवसाचे विवेचन करताना सावरकर लिहितात, "वाटमारे नि ठग यांच्याही देवता असतात.... वास्तविक दरोडेखारांना ज्या मानाने त्यांची तडफ, क्रूरता, शस्त्रास्त्रे, कारागीर असतात त्या मानानेच दरवडयात यश मिळते."[4] प्रयत्न नसतील, अैहिक सामर्थ्य नसेल तर प्रत्यक्ष दैवी नाते असलेल्या व्यक्तीही पराभूत होतात, रणहत होतात हे सांगण्यासाठीच सावरकरांनी 'तावुतांची गोष्ट' लिहिली आहे. महंमद पैगंबराच्या वंशाचा नायनाट कसा झाला याचे वर्णन केल्यानंतर सावरकरांनी निष्कर्षवजा पुढील विचार व्यक्त केले आहेत. "हातोडा धडधाकट असला की, तो मूर्तिपूजकांच्या

---

१. सा. गो. पृ. ७९. २. सा. गो. पृ. ७१, १६४, १६६, १६८. ३. सा. गो. पृ. १४५. ४. सा. गो. पृ. २७.

देवळासारखाच मूर्तिभंजकांच्या मशिदीही चूर्ण करतो. त्यांचे वंशही निर्वंश करतो' खरा देव महंमदाचा हातही धरीत नाही – येझिडचाही धरीत नाही ! ऐहिक राज्ये, ऐहिक सत्ता, ज्यांच्या हाती ती ती ऐतिहासिक साधने प्रबळ, त्यांच्याच हाती पडणार. "[1]

देवतोत्पत्तीची कारणमीमांसा

देवविषयक ज्या कल्पना सावरकरांनी निबंधांतून व्यक्त केल्या आहेत, त्याच कल्पना व तोच दृष्टिकोन त्यांनी आपल्या कथांमधूनही कायम ठेवला आहे. 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या निबंधात 'मनुष्याच्याच लांबीरुंदीचा गज घेऊन विश्वाची अुपयुक्तता, बरेवाओटपणा, देवाचे सुष्टत्व वा दुष्टत्व' मोजण्याची कल्पना किती हास्यास्पद आहे हे त्यांनी सांगितले आहे. हीच कल्पना 'प्रार्थना' कथेत "मनुष्याच्या सुष्टतेच्या वा दयालुत्वाच्या गजानेच देवास मोजू पाहणे हाच मूर्खपणा होय,"[2] या वाक्यात पुनश्च सांगितली आहे. मनुष्याने मानलेल्या देवाची हिंसात्मक, मानव-विरोधी अशी कृत्ये सावरकरांनी आपल्या निबंधांतून वर्णिली आहेत. आणि देवाचे अस्तित्व, त्याचे दयालुत्व आणि हे विश्व देवाने माणसांना अनुकूल असेच निर्मिले आहे, ही कल्पना – या सर्व गोष्टी किती खुळेपणाच्या व तर्कदुष्ट आहेत, हे सावरकरांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे. कथांमधूनही सावरकरांनी हेच विचार, ह्याच कल्पना पुनरुक्त केल्या आहेत. 'गोविंदा गवळी' कथेत गोविंदा आणि कासम या देवोपासकांना मारणारा देव, 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेतील विहार-मधील भूकंपीय महापुरांत हजारो वायकामुले गळचुंडी देअून बुडवून टाकणारा देव, मानवांच्या धर्मग्रंथांत अुलटसुलट फसवेगिरीच्या आज्ञा देणारा 'ताबुतांच्या गोष्टी' तील देव, देवाची प्रार्थना करूनही हजारो हिंदु-मुसलमानांना, अजाण अर्भकांना भूकंपाच्या खाअीत लोटणारा 'प्रार्थना' कथेतील देव, 'अपघात की आत्मघात ?' आणि 'भक्तिविजयातील हरविलेला नवा अध्याय' दोन्हीही कथांत भक्तांनाच ठार मारणारा वा आपल्या डोळ्यांदेखत भक्ताचा मृत्यू घडू देणारा देव – अशी देवाची विविध रूपे सावरकरांनी अुभी केली आहेत; आणि असा हा 'सवाअी नादिरशहाच. शोभणारा देव – 'देव की दैत्य ?' असा प्रश्न अनेक कथांत विचारून वाचकांच्या विचारशक्तीला त्यांनी धक्का दिला आहे.

अुपयुक्ततेतून देवकल्पनेची अुपपत्ती लावता येते, हा सावरकरांचा निबंधांतील सिद्धान्त कथांमधूनही पुन्हा पुन्हा डोकावतो. 'अपघात की आत्मघात' ? या कथेतील डॉ. मोहिते सांगतात, "गाअीबैलांसारखे पशू, वडपिंपळांसारखी झाडे ह्या वस्तू

---

१. सा. गो. पृ. १४४. २. स. चि. पृ. ४०.

मनुष्याला अुपयोगी म्हणून प्रथम रक्षणीय ठरल्या, दैवी ठरल्या; पण पुढे अुपयुक्ततेचे मूळ कारण विसरून त्या वस्तूच रक्षणीय, पूजनीय देवता वाटू लागल्या.[1] 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद वर्णन करताना गाय ही देवता कशी ठरली याची कारण-मीमांसा कथेतील 'आम्ही 'ने पुढीलप्रमाणे केली आहे. "ती (गाय) अुपयुक्त पशू म्हणून पालनीय ठरली; त्यायोगे हळूहळू तिला देवता, परलोकी स्वर्गती देणारी देवी, असे समजू लागताच ती गाय वस्तुतःच पूज्य, पवित्र, मनुष्याहूनही श्रेष्ठ वाटू लागली."[2]

अुपयुक्ततेतून देवतोत्पत्ती झाली हा विचार अेकीकडे मांडत असतानाच विज्ञानाची अुपयुक्तता मानवाला आत्यंतिक असल्याचे सावरकर सांगतात आणि म्हणून ते विज्ञानाला आजच्या युगातील देव संबोधतात आणि अितर मानीव देवांपेक्षा विज्ञानदेव हा अधिक श्रेष्ठ कसा, हे पटवून देताना 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेतील नारदाच्या तोंडून ते सांगतात – "हा विज्ञानदेव लाचलुचपत, पूजानैवेद्य, बळी-बोकड, निमाज-कुरबानी, मंत्रतंत्र, स्तुतिनिंदा कशासही अपेक्षित नाही, कशानेही प्रसादत नाही, रागावत नाही, ...अबाधित सृष्टिनियमांन्वये त्याचा सारा कारभार चालतो."[3]

देव असेल तर तो नराच्या अंतःकरणात असला पाहिजे व नराची सेवा हीच नारायणाची सेवा होय, हा निबंधातील विचार सावरकरांच्या 'बाळंतीण' आणि 'चातुर्मास' या कथांमधून व्यक्त झाला आहे. 'चातुर्मास 'मधील कमला आपल्या मैत्रिणींना सांगते, "जर देव झाडपशूंच्या सेवेनं संतोषत असेल, तर तो नराच्या सेवेनं अधिक संतोषत असला पाहिजे."[4] 'बाळंतीण' कथेतील रामभाअू गाअी-सारख्या पशूची सेवा करण्यापेक्षा मानवाची सेवा करणे अधिक युक्त होय, असा विचार सांगतात. अर्थात हा मानव हिंदुराष्ट्राचा घटक असला पाहिजे, हा त्यांचा हिंदुराष्ट्रवादी दृष्टिकोन निबंधाप्रमाणेच कथेतही सुटत नाही.[5]

कथारचनातंत्र – व्यक्तित्वानुसारी

सावरकरांच्या निबंधांतील विचार व त्यांच्या कथांमधून व्यक्त झालेले विचार यांच्यातील सादृश्य वा साधर्म्य आतापर्यंत आपण सविस्तर पाहिले. यावरून सावर-करांच्या कथांचा आशय हा त्यांच्या व्यक्तित्वातून कसा सिद्ध झाला आहे, हे ध्यानी

---

३. स. चि. पृ. ११३. २. सा. गो. पृ. ८०. ३. सा. गो. पृ. ७५. ४. सा. गो. पृ. १३० ५. सा. गो. पृ. १२७.

येअील. केवळ आशयच नव्हे, तर सावरकरांच्या कथेची रचना, स्वरूप वा तंत्र सावरकरांच्या व्यक्तित्वानुरूपच कसे वनले आहे हे आता पाहावयाचे आहे.

प्रथमदर्शनीच हे लक्षात येते की, 'सावरकर हे तंत्र-निर्माते आहेत, तंत्रपालक नाहीत. कथालेखनाचे आधुनिक तंत्र गुंडाळून ठेवूनच त्यांच्या कथा वाचावयास पाहिजेत.'[1] त्यांच्या कथांचे कथानक गुंतागंत, निरगाठ, अुकल अशा प्रमाणबद्ध पायऱ्यांवरून प्रवास करीत नाही. कथेच्या सूत्रावर नजर ठेवून विद्युत्पद्धतीने कथा सांगण्याची पद्धती ते क्वचित अवलंवितात. 'अनेक प्रसंगांची चतुराअीने मांडणी किंवा गुंफण[2] या ललितकथेच्या व्याख्येला जुळणारी त्यांची कथा नाही. त्यांच्या कथांचे कथानक व्यक्तींच्या स्वभावातून निर्माण होत नाही, तर तत्त्वचिंतनातून व तत्त्वप्रतिपादनाच्या आग्रहातून, प्रचारार्थ निर्माण होते. मध्यवर्ती तत्त्व कल्पून त्यांच्या कथांची रचना होते.

तत्त्वकेंद्रित कथा

लघुकथेच्या तंत्राचा विचार समोर ठेवून सावरकरांच्या कथा तपासल्या, तर त्यांतील गुणदोष चटकन लक्षात येतात. 'कुसुम' ही थोडीशी अपवादात्मक कथा सोडली तर त्यांच्या कथा काही मध्यवर्ती तत्त्व कल्पून त्याभोवती गुंफल्याचे दिसून येते. अुदाहरणार्थ, नवसाचा फोलपणा ('गोविंदा गवळी'). सनातनी सूत्राप्रमाणे चालणाऱ्या धर्मशील लोकांची विवाहनीती ('पित्र्याचे दुसरे लग्न कसे फिसकटले?'), अितिहास-संशोधकांचे संशोधनाचे विषय व त्यांतील हास्यास्पदता ('काळ आणि कसर'), भूकंपविषयक धर्मभोळी व खुळचट विचारसरणी ('प्रार्थना' व 'नारदाची पृथ्वीस भेट'), बौद्धिक धर्मभोळेपणा ('अेक घडलेला चुरचुरीत संवाद'), यज्ञयाग व वैदिकसूक्ते यांच्या सामर्थ्याबद्दलची चुकीची समजूत ('आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको'), गाय किंवा बैल आणि वडपिंपळांसारखी झाडे, यांना देवतास्वरूप मानण्यातील मानवी अज्ञान ('नंदीबैल आणि माणूसबैल', 'वाळंतीण', 'अपघात की आत्मघात'), देवाची प्रार्थना केली म्हणजे देव भक्तांचे रक्षण करतो या मानवी श्रद्धेतील खोटेपणा ('प्रार्थना', 'भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय'), भारतीयांच्या काळचा रंगास धुअून त्यांच्या देहास गौरवर्ण करणाऱ्या भारतीय वैज्ञानिकाची आवश्यकता ('संशोधक पाहिजे'), शिवाजी अुत्सवाचे आजचे अराष्ट्रीय व विक्रमहीन स्वरूप ('शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव'), धार्मिक व्रतांतील भोळेपणा व नवीन वैज्ञानिक व्रतांची जरूरी ('चातुर्मास्य'), अिहलोकी दैविक सामर्थ्यापेक्षा भौतिक सामर्थ्याचीच श्रेष्ठता

---

१. समाजचित्र – प्रस्तावना पृ. ३. २. प्रतिभासाधन पृ. ७९.

('ताबुतांची गोष्ट') अित्यादी मध्यवर्ती तत्त्वांवर सावरकरांच्या गोष्टी रचण्यात आल्या आहेत. अर्थात ही तत्त्वे सावरकरांच्या व्यक्तित्वातील विविध निष्ठांतून आणि त्यांच्या अनुभवांतून व कृतींतून सिद्ध झालेली आहेत आणि यांपैकी बहुतेक तत्त्वांचे प्रतिपादन त्यांच्या निबंधांतून करण्यात आलेले आहे.

कथांतील पात्रे – तत्त्वांचे प्रतिनिधी

मध्यवर्ती तत्त्व कल्पून कथांची रचना सावरकरांनी केल्यामुळे कथांमधील व्यक्तिचित्रांची वा पात्रांची मांडामांड त्यांनी त्याच तत्त्वांच्या अनुरोधाने केल्याचे दिसून येते. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा या कोणत्या ना कोणत्या तत्त्वाच्या प्रतिनिधी वाटतात. कथातंत्राच्या दृष्टीने विचार केला तर अुत्कृष्ट लघुकथेत कथानकातून व्यक्ती निर्माण होत नाही, तर व्यक्तीतून कथानक निर्माण होते.[1] व्यक्ती ह्याच प्रसंगाच्या कारकशक्ती असतात. परंतु सावरकरांच्या कथांमध्ये आशयाला वा त्यातील तत्त्वप्रतिपादनाला प्राधान्य असल्यामुळे तत्त्वप्रतिपादनाच्या सोयीसाठी व्यक्तिरेखांची निर्मिती होते. 'गोविंदा गवळी' कथेतील गोविंदा व कासम ह्या दोन व्यक्ती हिंदू आणि मुसलमान धर्मांतील देवलसी वृत्तीच्या प्रतिनिधी आहेत. 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेमधील नारद हा विज्ञानवृत्तीचा व बुद्धिवादाचा पुरस्कर्ता आहे, तर त्यातील अहिंसानंद आणि शाब्दशास्त्री ह्या व्यक्ती अनुक्रमे गांधीवादी नि सनातनी प्रवृत्तीच्या प्रतीक आहेत. मनाने पोथीनिष्ठ पण वाह्यतः बुद्धिवादी भासविणारे वैद्यमहाशय ('अेक घडलेला चुरचुरीत संवाद') व भिंगार्डे वकील ('अपघात की आत्मघात') त्यांच्या कथांतून वावरतात. भाषाशुद्धीच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारे श्री. तत्त्वे आणि मराठीतील क्रियापद-दारिद्र्य दूर करण्यासाठी अिंग्रजी भाषेचा मनसोक्त अुपयोग करावयास पाहिजे असे सांगणारे अैतिह्य संशोधक महामंडळाचे अध्यक्ष श्री. रावसाहेब धुरंधर सावरकरांची अेतद्विषयक मते व्यक्त करतात. 'कुसुम' कथेतील गोपाळभटजी, आणि 'चातुर्मास्य' या संवादात्मक कथेत अुल्लेखिलेला गोपाळभटजी ही दोन्हीही ब्राह्मणवर्गातील पात्रे मनुस्मृतीने सांगितलेली शास्त्रमर्यादा पाळणारी पण गवळ्याचा धंदा करून शास्त्राविरुद्ध आचरण करणारी दाखविण्यात आली आहेत. 'बाळंतीण' या कथेतील गोदास सुखे या पात्राचा अुपयोग सावकरांनी 'गोरक्षण' या शब्दावरील आपल्या आक्षेपांचे प्रतिपादन करण्यासाठी करून तर घेतला आहेच, पण याशिवाय गो-सेवा करणाऱ्या अेका गोदासाचे अेक प्रातिनिधिक चित्र त्यांनी आपल्यापुढे अुभे केले आहे. 'समाजचित्रे' या कथासंग्रहातील वकिलाची आअी (बाळंतीण), भीमाबाअी (अपघात की आत्मघात ?),

---

१. प्र. सा. पृ. १०६.

हरभटशास्त्री (अपघात की आत्मघात ?) पांडुरंगराव वकील व बुवा (नवा अध्याय), विक्रमची आजी (प्रार्थना) ही सर्व पात्रे सावरकरांनी देवलसी व पोथी-निष्ठ दाखविली आहेत आणि या वृत्तीला विरोध करणारी बुद्धिवादी, सुधारक, कृतिशील अशी पात्रे त्यांनी त्या त्या कथांतून रंगविली आहेत. त्यांनी रंगविलेला नारद हा धर्मग्रंथांना प्रमाण न मानणारा, बुद्धिनिष्ठ असून विज्ञानाची स्मृती अनुसरण्याचा संदेश देतो.[1] दोन कथांमध्ये तर स्वत: सावरकर 'आम्ही' असा स्वत:चा उल्लेख करून कथांत वावरतात आणि बौद्धिक भावडेपणाविरुद्ध व वेदांतील सूक्तां विरुद्ध बुद्धिनिष्ठ विचार व्यक्त करतात.[2] त्यांच्या कथेतील काही बुद्धिवादी पात्रे तर सावरकरांच्याच निबंधांतील – म्हणजे सावरकरांचेच – विचार व्यक्त करतात आणि सावरकरांचेच कार्य व हिंदुसंघटन–चळवळी करताना दिसतात. 'नंदी-बैल आणि माणूसबैल' या कथेतील रामभाऊ किंवा 'बाळंतीण' कथेतील रामभाऊ वैद्य यांचे गोरक्षणविषयक विचार अेकाच छापाचे म्हणजे सावरकरांचेच आहेत. धार्मिक भावडेपणाविरुद्ध टीकास्त्र सोडताना दोघेही सावरकरांच्याच विचारास्त्रांची मदत घेतात. गाय पशू असून तिला दैवत मानणे म्हणजे मानवाला कमी लेखण्यासारखे आहे अशी विचारसरणी दोघेही व्यक्त करतात. रामभाऊ वैद्य तर रत्नागिरी हिंदुसभेचे कार्यकर्ते आहेत. 'चातुर्मास्य' कथेतील कमला हीही अशीच हिंदुसभेच्या अनाथालयास सक्रिय साहाय्य करणारी कार्यकर्ती आहे. तीही विज्ञानाची महती सांगते आणि हिंदुधर्मातील भावड्या व्रतांचा धिक्कार करते. 'प्रार्थना' कथेतील विक्रम बद्धिवादी तर आहेच पण तोही हिंदुसंरक्षक दळाचा स्वयंसेवक आहे. रामभाऊ वैद्यांप्रमाणे तोही अनाथ हिंदू स्त्रियांना मुसलमानी अत्याचारांपासून वाचविण्याचा प्रयत्न करतो. प्रार्थनेतील भावडेपणावर तो सावरकरी धर्तीची टीका करतो. त्याशिवाय तो सावरकर-पुरस्कृत शस्त्रवाद आचारणारा आहे. 'काळ्या माणसांना गोरे करणारा संशोधक पाहिजे' या कथेतील घन:श्याम व रमाकान्त या दोन व्यक्तींना स्वतंत्र असे कोणतेच व्यक्तिमत्त्व नसून राष्ट्रनिष्ठ, बुद्धिनिष्ठ व विज्ञानवादी सावरकरांच्याच व्यक्तित्वाची ती दोन अंगे आहेत. 'अपघात की आत्मघात ?' कथेतील डॉ. मोहिते तर 'खरा रॅशनॅलिस्ट' आहे. गायबैलांसारखे पशू व वडपिंपळादी वृक्ष यांबाबत सावरकर-प्रणीत तत्त्वज्ञान तर तो सांगतोच पण तेही सावरकरांच्याच निबंधांतील शब्दांत तो सांगतो. डॉक्टर मोहित्यांच्याप्रमाणेच डॉ. विचारे हेही असेच बुद्धिवादी सुधारक आहेत. देवविषयक भावडेपणाचा ते धिक्कार करतात आणि सृष्टीचे नियम समजावून घेण्यास साहाय्य करणाऱ्या शास्त्राचा ते पुरस्कार करतात.

---

१. सा. गो., नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट. २. सा. गो., अेक घडलेला चुरचुरीत संवाद, आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको.

'शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव' मधील नागोजीराव हा अेक विनोदी पात्र म्हणून रंगविण्याचा सावरकरांनी कितीही कटाक्षाने प्रयत्न केला असला, तरी तो नागोजीरावही सावरकरांचे शिवाजीसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्याबद्दलचे आणि भाषाशुद्धिविषयक विचार व्यक्त केल्याशिवाय राहात नाही. या सर्व पात्रांत सावरकरांनी आपल्या व्यक्तित्वाचे अतिशय गडद रंग मिसळले आहेत आणि त्यांचे विचार, आचार व शब्दोच्चार या सर्वांवर 'स्व' त्वाचीच मुद्रा ठोकून वाचकांना त्यांची स्वतंत्र तोंडओळखही होअू दिलेली नाही.

कथारचनापद्धतीवर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव

कथाविषयांची निवड आणि कथांमधील पात्रांची स्वभावचित्रे सावरकरांच्या व्यक्तित्वातून कशी साधलेली, आहेत याचा विचार आपण केला. आता सावरकरांच्या कथांची रचनाही त्यांच्या व्यक्तित्वानुरूप कशी झाली आहे हे पाहावयाचे आहे.

सावरकरांच्या कथांचा हेतू विशिष्ट मताचे प्रतिपादन व प्रचार हाच होता हे आपण माग पाहिलेच आहे. या हेतूच्या अनुरोधाने व त्याच्या परिपुष्टीसाठी सावरकरांनी आपल्या कथांतील कथानकांची रचना केली आहे. यासाठी त्यांनी छाया-प्रकाशाच्या व परस्परविरोधी चित्रांचा फार कौशल्याने अुपयोग केला अहे. मानवी शास्त्र आणि निसर्गशास्त्र यांच्या संघर्षात सापडलेली 'कुसुम' त्यांनी फार चातुर्याने रंगविली आहे. बुद्धीची कुशाग्र, देहाने अुफाड्याची, स्वभावाने तरतरीत आणि स्वतंत्र बौद्धिक विचाराची दहा वर्षांची कुसुम तिशी-पस्तिशीतील आपल्या मेव्हण्याबरोबर विवाहबद्ध होते ती शास्त्राच्या व शिष्टाचारांच्या संमतीमुळेच! हीच कुसुम पुढे बाराव्या वर्षी बालविधवा होते आणि गोठ्यातल्या गाअीम्हशींप्रमाणे परावलंबी, नीरस जीवन जगू लागते; विधवांनी तसेच जीवन जगावे अशी शास्त्रांची आज्ञा आहे हे कुसुमला वारंवार सांगितले जाते. पण मग यौवन सरसर अंगी भरभराटत चाललेल्या त्या कुसुमचा आंतरिक असह्य कोंडमारा होअू लागतो. आणि अेका बाजूला देवदेवींना आणि राजर्षि-ब्रह्मर्षींनाही पवित्रतर वाटलेल्या कामवासना आणि दुसऱ्या बाजूला शास्त्राधिष्ठित समाजभीती यांच्या संघर्षात सापडलेली ती कुसुम नकळत मिथ्याचारी बनते. या सर्व कथेत शास्त्र आणि शास्त्रोक्त आचार करणारी भिक्षुक मंडळी याबद्दलचा सावरकरांचा तिरस्कार ठायीठायी दिसून येतो. या श्रुतिपुराणोक्त शास्त्राला वळी पडल्यामुळे आपल्या समाजातील कुटुंबसंस्था ही किती विषम पद्धतीवर अुभारली गेलेली आहे, हे सावरकरांना या कथेत प्रामुख्याने सांगावयाचे आहे. म्हणून कथारचना-तंत्राचा मुलाहिजा न बाळगता

सावरकर मध्येच स्वत: प्रकट होऊन वाचकांना सांगतात – 'हे समाजचित्र पाहा.' विषम कुटुंबजीवन दाखविणारे पहिले समाजचित्र त्यांनी रंगविले आहे, कुसुमच्या आऊ–वडिलांचे–गोपाळभटजी, गंगाबाऊ यांचे! गोपाळभटजी पासष्टी अुलटलेले आणि त्यांची तिसरी पत्नी गंगाबाऊ तिशीच्या वयाची त्यांनी दाखविली आहे. दुसरे समाजचित्र सावरकरांनी पुढील शब्दांत रंगविले आहे : 'या गोष्टीतले हे दुसरे समाजचित्र पाहा. आपली पहिली तरुण पत्नी वारताच अेका वर्षाच्या आत-बाहेर तिचीच धाकटी दहा वर्षांची जी वहीण (कुसुम) तिच्याशीच लग्न लावणारे तिशीपस्तीशीचे बिजवर खोत ! पन्नाशीनंतर लावलेल्या आपल्या तिसऱ्या विवाहा-पासून झालेल्या त्या दहा वर्षांच्या मुलीचे तिच्या वडील बहिणीच्याच नवऱ्यास तसे कन्यादान करणारे शास्त्रमर्यादाभिमानी गोपाळभटजी, आणि त्या सासऱ्या-जावयाच्या तिसऱ्या-दुसऱ्या विवाहाप्रमाणेच त्या दहा वर्षांच्या अल्लड मुलीच्या विवाहासही शास्त्रोक्त आणि शिष्टाचारसंमत मानून यथासांग स्वत: पार पाडणारा भट-भिक्षुक, आप्तेष्ट शिष्टादिकांचा समाज.[1]

'कुसुम' ही सर्व कथा अशा परस्परविरोधी चित्रांनी गुंफलेली आहे. आणि श्रुतिपुराणोक्त शास्त्राचा हिंदुसमाजजीवनावर होणारा दुष्ट परिणाम अशा विरोधी चित्रांतून सावरकरांनी अत्यंत प्रभावीपणे रंगविला आहे.

देवलसीवृत्ती ही कोणत्याही समाजात असणे घातकच होय, हे तत्त्व पटविण्या-साठी सावरकरांनी ज्या कथा लिहिल्या आहेत, त्यांचीही कथारचना अशाच विरोधी चित्रांतून सावरकरांनी केली आहे. 'गोविंदा गवळी' या कथेत गोविंदा हा हिंदू देवलसी दाखविला आहे आणि त्याच कथेत कासम हा मुसलमान देवलसी रंगविला आहे. परस्परविरोधी अशा या समाजांतील ह्या दोन्ही कथा समांतर प्रवास करतात आणि अखेर देवलसीवृत्ती ही दोन्ही समाजांस कशी घातक आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. देवलसीवृत्तीचे हे घातकारक तत्त्व पटविण्याचाच सावरकरांचा मुख्य अुद्देश असल्यामुळे कथारचना करताना योगायोगांचा बिनदिक्कत अुपयोग करून कथेतील गोविंदा व कासम यांचा मृत्यू ते घडवून आणतात. 'प्रार्थना' कथेत प्रार्थना करणाऱ्या व्यक्ती व हिंदु-मुसलमान-ख्रिश्चन समाज यांची चित्रे त्यांनी रंगविली आहेत. प्रार्थना न करणाऱ्या विक्रमासारख्या व्यक्तीरेखाही त्यांनी अुभ्या केल्या आहेत; आणि अखेर सृष्टिनियमांनुसार झालेल्या भूकंपात प्रार्थना करणाऱ्यांचा मृत्यू दाखवून प्रार्थना न करणाऱ्या विक्रमला व त्याच्या आऊला जीवदान मिळाल्याचे त्यांनी हेतुपुरस्सर दाखविले आहे. देवलसीवृत्ती धारण करणाऱ्या व प्रत्यक्ष दैवी नाते जोडलेल्या व्यक्तीं-नाही अैहिक सामर्थ्यापुढे नमावे लागते. प्रसंगी त्या सामर्थ्याला बळीही पडावे लागते,

---

१. सा. गो. कुसुम, पृ. १२ १३.

हे कटू सत्य दाखविण्यासाठी सावरकरांनी अेका वाजूला महंमद पैगंबर, त्याची मुले व नातवंडे यांची चित्रे रंगविली आहेत तर दुसऱ्या वाजूने, खलिफा मोअविया व त्याचा पुत्र येझिड या व्यक्ती अुभ्या केल्या आहेत. (तावुतांची गोष्ट). 'अपघात की आत्मघात ? ' या कथेत मूल व्हावे म्हणून भीमाबाअीच्या रूपाने वडाला भजणारी हिंदू देवलसी वृत्ती व दुसऱ्या वाजूला माळावरील वडपिंपळादी वृक्ष नष्ट करून मनुष्याच्या सुखसोयीने त्यांची वाढ करण्यास भाग पाडणारी मनुष्यहितदक्ष, बुद्धिवादी मिशनरी वृत्ती यांच्यातील विरोध सावरकरांनी अुभा केला आहे. 'नंदीवैल आणि माणूसबैल ' या कथेत सावरकरांनी अशाच साम्यविरोधधर्मी प्रसंगांची निवड केली आहे. कष्ट करून कशीवशी अुपजीविका करणाऱ्या मोळीविक्या बाया व धर्माच्या नावाने अैतखाअू जीवन जगणारा साधुजी, कष्ट करणाऱ्या त्या मोळीविक्या बायांना व्यवहारी भूमिकेने पैसे देण्यात घासाघीस करणारी पण नंदीवैल आणि गोमाता दारी येताच धार्मिक भावडेपणाने सढळ हाती दान करणारी शेटाणी, मैल्याच्या बंबाला जिभेने चाटणारी आदिदेवी जगज्जननी गोमाता आणि तो मैल्याचा बंब ओढून नेणारा बैल अित्यादी प्रसंग व व्यक्तिदर्शन यांतून सावरकरांनी या छायाप्रकाशाचा अुपयोग फार कौशल्याने केला आहे. 'वाळंतीण ' कथेत तर अशा साम्यविरोधी प्रसंगांची मालिकाच सावरकरांनी गुंफली आहे. पशू आणि मानव. हिंदू आणि मुसलमान यांच्यातील विरोध या कथेत सावरकरांनी फार प्रभावी रीतीने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कथेतील दहा-बारा हजार हिंदू वस्तीच्या गावात अेका धर्मशाळेपुढे अेका जख्खड गाअीचा गौरव होत असतो. तर त्याच वेळी त्या धर्मशाळेत वाळंतपणास टेकलेल्या अेका असाहाय्य हिंदू स्त्रीची अुपेक्षा व अवहेलना होत असते. गाय – तो अेक अुपयुक्त पशू – भुकेने मरू नये म्हणून मदत गोळा केली जाते. गाअीची मोठी मिरवणूक काढली जाते; पण त्या हिंदू स्त्रीची मात्र येत्या-जात्या माणसाकडून टवाळी केली जाते. गाअीची मिरवणूक चालली असताना वाटेत येणाऱ्या स्वधर्मातील भारेवाल्या महारणीचा लोकांना विटाळ होतो; पण परधर्मीय मुसलमानांचा मात्र विटाळ मानला जात नाही. त्या भटक्या जख्खड गाअीसाठी – अेका पशूसाठी – घराच्या ओसरीचा गोठा केला जातो; पण त्या हिंदू स्त्रीला – माणसाला– कोणत्याही घरात प्रवेशही दिला जात नाही. त्या दहा-बारा हजार हिंदू वस्तीच्या गावात मुसलमानांची वस्ती फक्त तीनशे असताना मुसलमान समाज स्वार्थासाठी त्या वाळंत बाअीला व तिच्या मुलाला स्वधर्मात घेण्याचा प्रयत्न करतो; पण तो वहुसंख्य हिंदू समाज तिची अुपेक्षाच करतो. अेका मुसलमान भंग्याने त्या हिंदू स्त्रीचे कपडे ओढून-जाळून तिची विटंवना केल्यावरही हिंदुसमाज संघटनेच्या अभावी ते अत्याचार थंड वृत्तीने सहन करतो. अशा रीतीने 'वाळंतीण 'कथेतील वहतेक प्रसंगांची रचना सावरकरांनी हेतुपुरस्सरच परस्परविरोधी चित्रांतून केली आहे.

स्वमतप्रतिपादनाला वाव मिळावा म्हणून सावरकरांनी आपल्या अनेक कथांतून अेखाद्या खऱ्या बुद्धिवादी सुधारकाचे व हिंदुसंघटकाचे पात्र रंगविले आहे; आणि त्या पात्राच्या पार्श्वभूमीवर तद्विरोधी प्रसंगांची व विचारांची मांडामांड केली आहे. डॉ. गोविंदराव ('कुसुम'), नारद ('नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट') श्री. तत्त्वे ('काळ व कसर'), रामभाअू ('नंदीवैल व माणूस वैल'), रामभाअू वैद्य ('वाळंतीण'), डॉ. मोहिते ('अपघात की आत्मघात ?'), डॉ. विचारे ('भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय') अित्यादी पात्रे हे सावरकरांचेच मुखकर्णे (Mouth-pieces) आहेत व ती पात्रे कथांमध्ये रंगविलेल्या विरोधी वा प्रतिकूल प्रसंगांचे व विचारांचे पृथक्करण नि खंडन करून कथांच्या अखेरीस स्वमताचा ठसा वाचकांच्या मनांवर अुमटविण्याचा प्रयत्न करतात. सावरकरांच्या कथांची रचना परस्परविरोधी प्रसंगांवर का झाली, याचे अुत्तर अशा रीतीने त्यांच्या व्यक्तित्वात पाहावयास मिळते.

सावरकरांनी ज्या चार कथा ('अेक घडलेला चुरचुरीत संवाद' 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट', 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको', 'चातुर्मास्य') संवादात्मक लिहिल्या आहेत, त्याही त्यांनी तत्त्वचर्काप्रियतेमुळे व स्वमतप्रतिपादनाच्या वृत्तीमुळेच लिहिल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या या कथांत कथांशही नाही आणि नाट्यमयताही नाही. 'अेक घडलेला चुरचुरीत संवाद' या कथेच्या पूर्वार्धात स्वतः लेखकानेच "'पंचगव्य' या विषयावर आमचा अेका सुधारक मित्राशी झालेला संवाद खाली देत आहोत." असे म्हटले आहे.[1] लेखकानेच म्हणजे या कथेत कथानकाला स्थान नसून ती कथा केवळ अेक तत्त्वचर्चा असल्याचे सांगितले आहे. 'आता मात्र दिवाळीत दुष्काळाची भीतीच नको' या कथेचा पूर्वार्ध हा दिवाळीसारख्या राष्ट्रीय व समाजोपयुक्त सणाच्या काव्यमय वर्णनात लेखकाने खर्च केला असून अुत्तरार्धात दुष्काळनिवारणार्थ पर्जन्यसूक्ते व यज्ञ हे भावडेपणाचे अुपाय किती हास्यास्पद आहेत, हे दाखविण्यासाठी लेखकाने आपल्या मित्रावरोबर केलेली चर्चा सविस्तर दिली आहे. 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या कथेतील नारद केवळ विज्ञानदेवाचे महत्त्व पटविण्यासाठी व भूकंपाबद्दलच्या भावडया कल्पनांचा बुद्धिवादाने अुच्छेद करण्यासाठीच प्रवचने करतो. त्यात कथाभाग असा काहीच घडत नाही. 'चातुर्मास्य' या कथेतील सर्व स्त्रीपात्रे तत्त्वचर्चा करण्यासाठीच अेकत्र आलेली असतात व त्यातील कमलेने सांगितलेली सावरकरप्रणीत विज्ञाननिष्ठ व्रते स्वीकारण्याची आणि हिंदू अनाथालयास साहाय्य करण्याची तयारी दर्शवून तत्त्वचर्चा संपवितात. सावरकरांच्या बहुतेक सर्व कथांतून कथानकाचा अभावच जाणवतो व व्यक्तिदर्शन घडण्याअैवजी तत्त्वदर्शनच घडते. प्रा. म. ना. अदवंत यांच्या

---

१. सा. गो. पृ. ७९.

शब्दांत सांगावयाचे झाले तर असे सांगता येअील की ..... 'त्यांच्या (सावरकरांच्या) कथांतून जीवनदर्शन घडण्याअैवजी जीवनचर्चाच अधिक आढळते.'[1]

कथादोषांचे कारणही व्यक्तिमत्त्वात

सावरकरांच्या कथारचनेत सूचकता व संयम यांचा अभाव दिसतो याचे कारणही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच दिसून येते. समाजातील भावडेपणा घालवून त्याला विज्ञानाधिष्ठित बौद्धिक वातावरणात नेण्याच्या ज्या भूमिकेने ते निबंध-वाङ्मयाकडे वळतात, त्याच भूमिकेने ते कथावाङ्मयाकडे वळतात हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. म्हणजे येथे त्यांची भूमिका अुघड अुघड अुपदेशक कथाकाराची आहे. म्हणूनच कथानकाचा प्रवाह वाहात असताना ते मध्येच थांबतात व कथेतील मध्यवर्ती तत्त्वाच्या अनुषंगाने चर्चा वा प्रवचन करू लागतात. 'गोविंदा गवळी' कथेतील नवसाच्या दैवी लॉटरीचे वर्णन, 'नंदीबैल व माणूसबैल' या कथेतील रामभाअू व गंप्या यांनी दिलेली प्रदीर्घ व्याख्याने, 'अपघात की आत्मघात ?' या कथेतील डॉ. मोहिते यांची वडर्पिपळांच्या अुपयुक्तनुपयुक्ततेबद्दलची चर्चा ही अुदाहरणे सावरकरांच्या कथेतील वरील दोष दाखवितात. अुपदेशकाच्या भूमिकेची जाणीव त्यांच्या ठायी कधी कधी अितकी प्रबल होते की, ते वाचकांना अुद्देशून, 'हे समाजचित्र पाहा' असे आवाहन करतात ('कुसुम'). 'नंदीबैल व माणूसबैल' कथेच्या अखेरीस अुपदेश करताना ते म्हणतात, "समाज जर गंप्यासारख्या होअील, तर अशा दहा लाख अैतखाअूंना कामे करून पोट भरणे भाग पडेल."[2] कधी कधी कथानकाच्या विणीत सावरकर अेखाद्या साभिप्राय वाक्याची व्यक्तित्वनिदर्शक चमकदार न्यहार गुंफतात. भावडच्या देवलसी वृत्तीवर प्रहार करण्यासाठी 'देव की दैत्य ?' अशा प्रश्नार्थक वाक्यांची योजना त्यांनी अनेक कथांमध्ये केली आहे. 'गोविंदा गवळी' कथेत गोविंदा व कासम यांच्या मृत्यूच्या कार्यकारणांची मीमांसा करताना सावरकर लिहितात, "नुसत्या नवसाने कार्य घडतही नाही, 'विघडतही नाही."[3] 'प्रार्थना' कथेतील क्वेट्टा शहर भूकंपात गडप होताच विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी सावरकर लिहितात, "देवळाला देवाने रक्षिले नाही, न मशिदीला अल्लाने ! न जीजस न जेहोव्हा ! निसर्गाच्या अिच्छेस मनुष्याच्या प्रार्थनेसाठी म्हणून कोणीही आड येअू शकला नाही, आडवू शकला नाही"[4]

साभिप्राय वचने

सावरकरांच्या कथांतील काही वचने तर त्यांच्या निबंधांत सिद्धान्तरूप पावलेली आहेत. 'धर्माचे स्थान हृदय, पोट नव्हे' हे 'बाळंतीण' या कथेतील

---

१. सा. वि. द. पृ. १७५. २. सा. गो. पृ. १२२. ३. सा. गो. पृ. ३२.
४. स. चि. पृ. ३३.

वचन[१] त्यांच्या आत्मचरित्रातून, निबंधांतून, 'श्रद्धानंदा'तील, स्फुट लेखांतून स्थिर झालेले आणि सिद्धान्तरूप पावलेले आहे. 'शिवाजीचे आजच्या राष्ट्रीय कर्त्या पिढीला अजीर्ण झाले आहे' हे 'शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव' या कथेतील वाक्य[२] सावरकरांनी 'तेजस्वी तारे' या चरित्रपर लेखात वापरलेले आहे. 'रमणीचे जीवन म्हणजेच रती आणि वत्सलता' हा विचार[३] त्यांच्या 'अंदमानच्या अंधेरीतून' या पत्रसंग्रहातून प्रकट झाला आहे. 'आपत्तीच कधी कधी आरोग्यप्रद असते, रामबाण औषध असते' हे 'बाळंतीण' कथेतील वचन[४] सावरकरांच्या आत्मचरित्रातून ठायीठायी प्रकट झाले आहे. 'प्रार्थना ही मनुष्याची आशा आहे, आशापूर्तीची हमी नव्हे' या वाक्याने[५] विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी, प्रयत्नवादी सावरकरांचे व्यक्तित्वच ध्यानी येते.

रागद्वेषाचे उघड प्रदर्शन

कथा रंगवताना, वृत्तीचे ताटस्थ्य न ठेवता, सावरकर आपल्या वैयक्तिक रागद्वेषांचे विषयही कथेतून अुघड करतात. म. गांधींच्या अहिंसेबद्दल, त्यांच्या मुसलमानधार्जिण्या वृत्तीबद्दल, त्यांच्या 'आतला आवाज', 'अंत:स्फूर्ति' 'प्रार्थना' अित्यादी देवभोळ्या खुळांसंबंधी, शिवाजी महाराजांच्या थोरपणाविषयी, त्यांनी केलेल्या चुकीच्या मूल्यमापनाबद्दल सावरकरांचे तीव्र मतभेद आहेत. हे सर्व मतभेद व रागद्वेष सावरकरांच्या 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट', 'प्रार्थना', 'शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव' अित्यादी कथांतून व्यक्त झाले आहेत. म. गांधींची काही प्रसिद्ध वचने – 'माय ब्रेव्ह मोपला ब्रदर्स'[६] 'Misguided Patriotism'–[७] सावरकरांनी आपल्या कथेत कोणताही आडपडदा न ठेवता अुघड अुघड दिली आहेत. विश्वप्रेमाचे व्यापक तत्त्वज्ञान किती हास्यास्पद आहे हे दाखविण्यासाठी 'गाढव-संघटन' कथेची घडण सावरकरांनी केली आहे.

प्रतिपक्षाच्या मतांची भंवेरी अुडविण्यासाठी अुपरोधात घोळलेला सावरकरी पद्धतीचा विनोद त्यांच्या कथांमधूनही आढळून येतो. अितिहाससंशोधकांचे संशोधनाचे हास्यास्पद विषय ('काळ व कसर'), विश्वप्रेमाच्या विलक्षण ध्यासाने गाढवी संस्कृतीशी संगनमत करणारे व त्या संस्कृतीचे अनुकरण करणारे हिंदू लोक (गाढव-संघटन), शिवाजी अुत्सवाचे सर्वधर्मसमावेशक अराष्ट्रीय असे स्वरूप (शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव), मराठीतील क्रियापद-दारिद्र्याविषयी व भाषाशुद्धी विषयी काही विलक्षण कल्पना ('काळ व कसर', 'शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव') अित्यादी विषय सावरकरांच्या अुपरोधिक विनोदाचे लक्ष्य झाले आहेत.

---

१. स. चि. पृ. २३. २. स. चि. पृ. ७९. ३. सा. गो. पृ. १७. ४. स. चि. पृ. १६.
५. स. चि. पृ. ४०. ६. सा. गो. पृ. २७. ७. स. चि. पृ. ८०.

कथाकार सावरकरांतील कवी

लघुकथा लिहिताना सावरकरांच्या ठायीचा निबंधकार जसा जागा असतो, तसा त्यांच्यातील महाकवीही मधूनमधून आपले अस्तित्व प्रकट करतो. सावरकरांच्या प्रतिभेचा पल्लेदारपणा, भव्यतेचे व अुदात्ततेचे तिला वाटणारे आकर्षण या सगळ्यांची साक्ष त्यांच्या कथा वाचतानाही पटते. क्वचित कोमल तर क्वचित कठोर अशी तिची कवितांतील चाल त्यांच्या कथांतही लक्षात येते. 'कुसुम' कथेत कुसुमच्या मनातील यौवनसुलभभाव 'मेघदूता'च्या वाचनाने कसे वहरू लागले, याचे वर्णन करताना सावरकर लिहितात, "ते (मेघदूत) म्हणत असता आकाशातील त्या मेघासारखा, तिच्या नयनांतही अश्रूंचा अेक मेघ येअून, ज्याला नाव ना गाव अशा तिच्या कोण्या प्रियकराचे तेच व्याकुळ संदेश तिलाही देअू लागे."[1] त्यांच्या कवितात आढळणारी भव्योदात्त कल्पना क्वचित त्यांच्या कथांमध्येही चमकून जाते. 'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' वर्णन करताना विज्ञानप्रणीत स्मृतीचे गोडवे व महती सांगितलेली आहे. कथेतील नारद सांगतात, "ती (विज्ञानस्मृती) मनुष्याच्या देवाने कुजक्या ताड-पत्रावर वा खजुरांच्या पानावर लिहिलेली नसून देवाने आकाशाच्या नीलपत्रावर ताऱ्यांच्या जाज्वल्य अक्षरांत मुद्रिली आहे."[2] 'प्रार्थना' कथेत भूकंपाचे वर्णन करताना महाकवी सावरकरांनी केलेली पुढील भव्य कल्पना पाहा :– "विजांचे चाबकावर चाबूक अुडवीत कोणी महारुद्र साऱ्या महाभूतांची पाठ सडकीत चवताळून अुठला."[3] कधी कधी दृष्टान्ताची निवड करतानाही सावरकरांचा पोथीनिष्ठ वृत्तीबद्दलचा राग व्यक्त होतो. 'गोविंदा गवळी' या कथेतील गोविंदा गवळी यास वृत्तपत्रात छापून आलेला मजकूर हा किती विश्वासार्ह वाटे याचे वर्णन सावरकरांनी पुढील अुदाहरणाच्या आधारे कसे स्पष्ट केले आहे ते पाहण्यासारखे आहे. सावरकर लिहितात, "गोविंदा गवळ्याला छापातील मजकूर अशंकनीय वाटे. जंसा जुन्या शास्त्रीपुराणिकांचा अमुक गोष्ट अगदी खरी असली पाहिजे हे सिद्ध करण्याचा अमोघ पुरावा म्हणजे पोथीत तसे आहे हा."[4] कथांतून प्रतिबिंबित झालेले सावर-करांच्या प्रतिभेचे हे स्वरूप आणि स्वनिष्ठांतून अलंकारांची निवड करण्याची त्यांची ही वृत्ती यांतून सावरकरांच्या व्यक्तित्वाचेच दर्शन घडते.

भाषाशैलीत प्रतिबिंबित झालेले व्यक्तिमत्त्व

सावरकरांनी ज्या शैलीत या कथा लिहिल्या आहेत ती शैली खास सावरकरांचीच शैली आहे. भाषाशुद्धीचा आग्रह, मराठीतील क्रियापददारिद्र्य घालविण्याच्या हेतूने नामावरून क्रियापद साधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न, विषय-

---

१. सा. गो. पृ. १६. २. सा. गो. पृ. ७५. ३. स. चि. पृ. ३२. ४. सा. गो. पृ. २३.

प्रतिपादनाच्या भूमिकेने केलेली क्रियापदांची पुनरुक्ती, पल्लेदार वाक्यरचना अित्यादी सावरकरी लेखनशैलीचे विशेष त्यांच्या कथांतूनही दिसून येतात. या दृष्टीने पुढील काही अुदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

१. भाषाशुद्धीचा आग्रह

(अ) प्रतिवृत्त,[१] प्रासिद्धिके,[२] परिपन्न, दूरश्रवण,[३] दूरदर्शन,[४] अडती[५] (अेजन्सी), जंतुघ्न टोचणी,[६] निर्बंध,[७] नगरसंस्था,[८] समाजमानस.[९]

(ब) प्रतिमूल्य,[१०] यंत्रशिल्पी,[११] वक्तव्य,[१२] हातघडी,[१३] अभिप्राय,[१४] विधेय.[१५]

२. नामावरून साधलेली क्रियापदे

(अ) पाणिग्रहिले,[१६] जिज्ञासले,[१७] आविर्भवले,[१८] अंतर्धानले,[१९] प्रस्ताविला.[२०]

(ब) चक्करला,[२१] सन्मानिला,[२२] आरंभिले,[२३] प्रस्थापिले.[२४]

३. क्रियापदांची पुनरुक्ती

(अ) होतोच होतो,[२५] असणारच असणार,[२६] निवारशीलच निवारशील.[२७]

(ब) राखीलच राखील,[२८] नाहीच नाही,[२९] मिळेलच मिळेल.[३०]

४. पल्लेदार वाक्यरचना

पारिस नगरातील अत्यंत रम्य अशा 'शान्झेलीझे' नावाच्या राजमार्गाने, युरोपमध्ये अनेक वर्षे राहिलेले आणि मोत्याच्या व्यापारात मानाने नी धनाने श्रेष्ठत्व पावलेले रमाकान्त हे युरोप-अमेरिकेत थोडे दिवस प्रवास करून, देशविदेश पाहण्याची हौस फेडण्यासाठी आलेल्या आपल्या घनःश्याम नावाच्या अेका लक्षाधीश स्नेह्यासह, शोभा पाहात नी त्या नवागत मित्रास स्थलमाहात्म्य सांगत चाललेले होते. (समाज-चित्रे – पृ. ४१).

सारांश, स्वकार्यातून आणि तत्त्वज्ञानातून कथांच्या विषयांची केलेली निवड, व्यक्तित्वातील निष्ठा आणि श्रद्धा यांनी परिपुष्ट केलेला कथांमधील आशय, कथांच्या आवरणाखाली निबंधांतीलच विचार पुन्हा पुन्हा मांडण्याची प्रचारकी वृत्ती, मानवी

---

१. [अ] सा. गो. पृ. (१) ४, (२) २५, (३) ६१, (४) ७४, (५) ७६, (६) ८६, (७) ४२, (८) १११, (९) ९४. [ब] स. चि. पृ. (१०) १८, (११) २६, (१२) ३९, (१३) ४०, (१४) १०८, (१५) ११२. २. [अ] सा. गो. पृ. (१६) ७, (१७) १३, (१८) ६०, (१९) ७६, (२०) ४९. [ब] स. चि. पृ. (२१) २, (२२) ७८, (२३) ७८, (२४) ८७. ३. [अ] सा. गो. पृ. (२५) ३३, (२६) ३४, (२७) २. [ब] स. चि. पृ. (२८) ११७, (२९) १००, (३०) ९.

स्वभावाच्या सूक्ष्म निरीक्षणावर आधारित व्यक्तिचित्रण करण्याअैवजी विविध तत्त्वांच्या आधारावर व्यक्ती अुभ्या करण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न, कथारचनापद्धतीला व्यक्तित्वानुसार दिले गेलेले वळण, लेखकाच्या व्यक्तित्वावर प्रकाशशलाका टाकणारी साभिप्राय वाक्ये आणि लेखकाचे व्यक्तित्व प्रतिबिंबित करणारी भाषाशैली या सर्व दृष्टींनी विचार करता आत्माविष्काराचे अेक साधन म्हणूनच सावरकरांनी कथालेखन केले, हा निष्कर्ष तर्कशुद्ध वाटतो.

सावरकरांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप

सावरकरांच्या कथांकडून कादंबऱ्यांकडे वळले, म्हणजे वाङमयप्रकार तेवढा बदलतो, पण त्यांच्यातील आशय आणि रचनाप्रकार हे मात्र बदलत नाहीत. 'काळे पाणी' (१९३७) ही त्यांची पहिली कादंबरी 'माझी जन्मठेप' ह्या त्यांच्या आत्मवृत्ताची ललितकथात्मक विस्तृत आवृत्ती वाटावी अितकी साधर्म्याने सजलेली आहे. किंबहुना 'माझी जन्मठेप' हा त्यांचा आत्मचरित्रात्मक ग्रंथ ब्रिटिश सरकारने जप्त केल्यानंतर 'शासनाच्या या कृतीस काटशह' म्हणून 'काळे पाणी' ही कादंबरी सावरकरांनी लिहिली असावी अशी आशंका टीकाकारांच्या मनात प्रबळावी अितके साधर्म्य या दोन ग्रंथांत आहे.[1] 'मला काय त्याचे ?' (१९२६) या कादंबरीच्या विषयाचे बीजारोपण सावरकरांच्या मनात त्यांच्या जन्मठेपेच्या शिक्षेच्या काळातच झाले होते.[2]

आत्मचरित्राचा कादंबरीशी संबंध

सावरकरांच्या आत्मचरित्राचा त्यांच्या कादंबऱ्यांतील घटनांशी व आशयाशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. विशेषत: 'काळे पाणी' या कादंबरीत त्यांच्या आत्मचरित्राचे प्रतिबिंब स्पष्टपणे पडलेले आहे. कादंबरीचे नाव आणि ज्या अंदमान बेटावर या कादंबरीतील महत्त्वाचे कथानक घडते ते स्थान यांचा सावरकरांच्या अंदमानातील जीवनाशी अतूट संबंध आहे. 'माझी जन्मठेप' व 'काळे पाणी' या पुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास केला तर या दोन्ही पुस्तकांतून किती तरी वाक्ये, विचार व घटना यांचा समांतर प्रवास चालू असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. प्रत्यक्षानुभूती हीच दोन्ही ग्रंथांचे अुगमस्थान आहे. ही प्रत्यक्षानुभूती 'माझ्या जन्मठेपे'त सरळ सरळ आविष्कृत होते, तर 'काळ्या पाण्या'त तिचा लालित्यपूर्ण कलात्मक आविष्कार दिसून येतो. कादंबरीतील नवव्या प्रकरणामधील अंदमानच्या 'चलान'चे वर्णन 'जन्मठेपे'तील अशाच वर्णनाची आठवण करून देते.[3] हे वर्णन केवळ

---

१. काळे पाणी – समीक्षण – पृ. १. २. मा. जन्म. पृ. २५७, ४९४.
३. मा. जन्म. – पृ. ३० ते ३६.

'कादंबरीतील कल्पित नाही' असे स्वतः सावरकरच सांगतात.[१] 'महाराजा' वोटीवरील पिंजऱ्यातील कैद्यांची गर्दी व त्यांच्या गप्पा यांचे दर्शन–श्रवण 'काळ्या पाण्या'त प्रतिबिंबित नि प्रतिध्वनित होताना दिसते.[२] 'अंदमान' या बेटाच्या नावाच्या उत्पत्तीबद्दल दोन्ही पुस्तकांत होणारी चर्चा सारखीच आहे.[३] 'माझी जन्मठेप' या आत्मवृत्ताच्या सहाव्या प्रकरणात अंदमानचे व तेथील जावरा जातीच्या लोकांचे सावरकरांनो केलेलें वर्णन 'काळे पाणी' या कादंबरीत त्याच शब्दांत त्यांनी रेखाटले आहे.[४] अंदमानच्या कारागारातील बंद्यांचे जीवन, त्यांच्या यातना, फटक्यासारखी त्यांना देण्यात येणारी शारीरिक अमानुष शिक्षा, त्या शिक्षेच्या वेदना कमी व्हाव्यात म्हणून बंदीवानांकडून योजण्यात येणारे अघोरी, किळसवाणे अुपाय, चोरीच्या मौलिक वस्तू लपविण्यासाठी बंद्यांकडून 'खोबडी'चा केला जाणारा आश्चर्यकारक अुपयोग अित्यादी कादंबरीतील वर्णने 'माझ्या जन्मठेपे'तील तत्सदृश वर्णनांचीच स्मृती जागोजाग करून देतात.

'माझी जन्मठेप' व 'काळे पाणी' यांतील हे सादृश्य केवळ बाह्य वर्णना-पुरते मर्यादित असते तर ते स्वाभाविक आणि प्रसंगी क्षम्यही ठरले गेले असते. परंतु कादंबरीतील जडविश्वाबरोबरच तीमधील विचारविश्व, भावविश्व जेव्हा सावर-करांच्या व्यक्तिमत्त्वातून अुद्भूत होते तेव्हा या कादंबरीतूनही सावरकरांनी सहजपणे आत्माविष्कार साधला आहे याची साक्ष पटते.

कादंबरीतील आत्माविष्कार

'माझ्या जन्मठेपे'त सावरकरांनी विविध विषयांवर जे विचार व्यक्त केले आहेत, जी मते प्रकट केली आहेत, ज्या ध्येयांचा निर्देश केलेला आहे, ज्या विषयांचा प्रचार केला आहे ते सर्व या कादंबरीतील त्यांच्या विविध पात्रांच्या मुखांतून पुनरु-च्चारित होताना आढळून येतात. 'माझी जन्मठेप' या आत्मवृत्ताच्या अुत्तरार्धातील विसाव्या व अेकविसाव्या प्रकरणात सावरकरांनी अंदमानच्या वसाहतीचे हिंदूंच्या दृष्टीने जे राष्ट्रीय महत्त्व वर्णिले आहे तेच महत्त्व त्यांच्या 'काळे पाणी' या कादंबरीतील कंटक व अप्पाजी वाचकांना पटवून देतात (प्रकरण पंधरा). हिंदुत्वाच्या अभि-मानातूनच ही दोन्ही पात्रे चर्चा करतात आणि अंदमानच्या वसाहतीला 'हिंदु-संस्कृतीचं अेक नव जानपद'[५] 'हिंदूंच्या सांस्कृतिक साम्राज्याचा अेक नवा प्रांत'[६] अशा शब्दांत संबोधितात. अितकेच नव्हे, तर अंदमानच्या भूमीवर पाअूल टाकताच

---

१. काळे पाणी पृ. ९८. २. काळे पाणी पृ. ११४. ३. काळे पाणी पृ. १२९.
४. काळे पाणी पृ. १३२. ५. काळे पाणी पृ. २१२. ६. काळे पाणी पृ. २१५.

सावरकरांच्या मनात अंदमानचे जे सामुद्रिक महत्त्व ध्यानी आले होते[१] तेच अंदमानचे महत्त्व सावरकरांच्या कंटकच्या ध्यानी, तो अंदमानात अुतरताच, आले होते.[२] या दृष्टीने कंटकची आणि अप्पाजींची पुढील काही वाक्यं अभ्यसनीय आहेत :– 'ही अंदमानची वसाहत राष्ट्रीय दृष्टीने फारच अुपयोगी आहे,'[३] 'वसाहत हिंदुस्थानचा, हिंदु साम्राज्याचा अेक वलिष्ठ असा सामुद्रिक दुर्ग, जन्मठेपी असे तुम्ही सारेजण मिळून करून सोडा'[४] 'ही सशस्त्र नि तटबंद वेटं म्हणजे आमच्या पूर्वसमुद्रात वेशीवर चढविलेली अेक महाकाली तोफ आहे'[५], 'पुढेमागे हे अंदमान म्हणजे हिंदुस्थानच्या पूर्वसमुद्रावर पहारा करणारा अेक लढाअू असा वैमानिक तळही झाल्यावाचून राहणार नाही.'[६] ही वाक्ये कंटक किंवा अप्पाजी अुच्चारीत आहेत असे कादंबरीकार स्वत:च सांगतो, म्हणूनच केवळ त्यावर विश्वास ठेवावयाचा. अन्यथा सावरकरांच्या आत्मवृत्तातील वाक्येच पुन्हा येथे अुद्धृत केली जात आहेत असेच म्हणणे अधिक सयुक्तिक होअील.

अंदमानच्या वसाहतीच्या संदर्भात सावरकरांनी अनुवंशविज्ञानावर जी चर्चा 'जन्मठेपे'त केली आहे तीच चर्चा पुन्हा या कादंवरीतील कंटक आणि अप्पाजी यांनी बव्हंशी त्याच शब्दांत आणि सावरकरांनी दिलेल्या अुदाहरणांच्या आधारेच केली आहे.[७] अंदमानात असताना सावरकरांनी अुर्दू भाषा व लिपी यांच्याविरुद्ध चळवळ केली होती; आणि हिंदी भाषा व नागरी लिपी यांचा प्रसार केला होता. 'काळे पाणी' कादंवरीतील वर अुल्लेखिलेली पात्रेही अुर्दूला विरोध करतात आणि हिंदी भाषा व देवनागरी लिपी यांचा पुरस्कार करतात.[८] अंदमानची वसाहत वंद न करण्याबद्दल जो युक्तिवाद सावरकरांनी 'जन्मठेपे'त केला होता, तोच युक्तिवाद अुपरिनिर्दिष्ट पात्रे करताना पाहून[९] त्यांचा 'बोलविता धनी'च वाचकांच्या दृष्टीपुढे अुभा राहातो. अठराशे सत्तावन सालच्या वंडाबद्दल व त्यातील 'वंडखोरा' बद्दल सावरकरांना अतीव आदर वाटत होता. 'काळे पाणी' कादंवरीत अप्पाजींचे पात्र निर्माण करून सावरकरांनी त्यांच्याबद्दल स्वत:च्या ठायी असणारा कृतज्ञभाव प्रकट केला आहे आणि 'सत्तावन सालच्या सहस्रावधी राष्ट्रवीरांची ह्या भूमीत (अंदमानात) विखुरलेली राख' म्हणजे आमची राष्ट्रीय संपदा, आमची अनर्घ्य ठेव आहे' असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे.[१०]

---

१. मा. जन्म. पृ. ७०. २. काळे पाणी पृ. २१६. ३. काळे पाणी पृ. २११. ४. काळे पाणी पृ. २१६. ५. काळे पाणी पृ. २१६. ६. काळे पाणी पृ. २१६. ७. काळे पाणी पृ. २१२. ८. काळे पाणी पृ. २१५. ९. काळे पाणी पृ. २१४, २१५. १०. काळे पाणी पृ. २१९.

सावरकरांचा कादंबरी-प्रबंध

सावरकरांनी ज्या दोन कादंबऱ्या लिहिल्या त्यांत रचनाकौशल्यदृष्ट्या कितीही सरसनीरसपणा असला, तरी त्यांच्या आशयाच्या प्रकारात फरक पडत नाही. 'काळे पाणी' ही त्यांची रचनादृष्ट्या सरस कादंबरी होय हे टीकाकारांनीही मान्य केले आहे. या कादंबरीमुळेच श्री. भा. गं. देशपांडे हे सावरकरांना 'श्रेष्ठ कादंबरीकार' वाटतात.[१] 'मराठीतील चांगल्या कादंबरीमध्ये या कादंबरीची (काळे पाणी) गणना करावयास हवी' असे प्रा. अदवंत यांना वाटते.[२] पण असे असूनही या कादंबरीतील आशय मधून मधून निबंधाचे रूप धारण करून बोधवादाकडे झुकतो. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वात मुरलेल्या सर्व श्रद्धा, मते, ध्येये, भावबंध घेऊन कादंबरीचा लेखक 'पात्रां'च्या रूपाने कादंबरीत जागोजाग अुभा राहून आपल्या विचारांचा प्रचार करताना आढळतो. मग सावरकरांच्या निबंधवाङ्मयातील बव्हंश महत्त्वाचे विचार कादंबरीच्या ललितपूर्ण माध्यमातून वाचकांपुढे पुन्हा प्रकटतात. बुद्धिनिष्ठ पद्धतीने परमेश्वरासंबंधी त्यांनी केलेले विवेचन कादंबरीतील पात्रे करू लागतात. 'काळे पाणी'मधील कंटक गंगेच्या काठावर अुभे राहून देवाची प्रार्थना करताना, सावरकरांच्या शब्दांतच पुढील बुद्धिवादी प्रश्न विचारतो, 'देव जर सुजनांचं संकट टाळण्याअितका परमदयाळू नि सर्वसमर्थही आहे, तर तो त्या निरपराध सुजनांना तरी संकटात मुळी लोटतोच का?'[३] जांवऱ्यांच्या जातीत दैवीकरणाची कल्पनाशक्ती फारशी जाज्वल्य नसल्याने त्यांच्याजवळील आगोचा अग्निदेव कसा झाला नाही, आगोटीचे अग्निहोत्र कसे झाले नाही, याचे विवेचन कादंबरीकार सावरकरांमधील जागृत निबंधकार करू लागतो.[४] सावरकरांना स्वकीय सप्तबेडयांचे स्मरण 'काळे पाण्या'वर न झाले तरच आश्चर्य! 'सिंधुबंदीची रूढी जेव्हापासून हिंदुसमाजात बळावली, तेव्हापासून समुद्र तितका काळं पाणीच वाटू लागला' असे निबंधकार सावरकरांचे विचार त्यांच्या कादंबरीतील कंटक सहज बोलून जातो.[५] सावरकरांच्या निबंधातील अनेक विषयांवर त्यांची निरनिराळी पात्रे मधून मधून चर्चा करतात. मालती व कंटक अेकूण विवाहसंस्थेवर व बहीण-भावांमधील लग्नाच्या पद्धतीबद्दल वैचारिक देवाण-घेवाण करतात.[६] त्यांचा शिपाअीगडी डोलकाठी प्रेतसंस्काराच्या विविध प्रथांबद्दल आणि मृत देहातील अस्थींच्या पावित्र्याबद्दल बुद्धिनिष्ठ विवेचन करतो.[७]

---

१. काळे पाणी समीक्षण पृ. ३८. २. सा. वि. द. पृ. १७४ ३. काळे पाणी पृ. ६८. ४. काळे पाणी पृ. १३९. ५. काळे पाणी पृ. १०५. ६. काळे पाणी पृ. २९३-२९४. ७. काळे पाणी पृ. २९९, ३०७.

'मला काय त्याचे ?'ही कादंबरी सावरकरांनी विशिष्ट हेतूनेच लिहिलेली आहे. आपल्या हेतूचे स्पष्टीकरण करताना कादंबरीच्या प्रस्तावनेत सावरकरांनी लिहिले आहे :– " मलबारमधील मोपल्यांच्या बंडात घडलेल्या भयंकर घटनांची माहिती जशीच्या तशीच, अतिरंजित वा अस्फुटरंजित न करता हिंदुमात्रांच्या कानावर घालणे व त्यातील घातक मर्म त्यांच्या मनावर बिंबविणे हे हिंदुमुसलमानांच्या अुभयतांच्याही दृष्टीने हितकारकच आहे असे आम्ही समजतो, व याच हेतूने ही गोष्ट लिहिलेली आहे."[१] 'हिंदुसमाजाला संघटित करण्याची शिकवण देण्याच्या हेतू'नेच ही कादंबरी लिहिली असल्यामुळे तीमध्ये हिंदुसमाजातील विघटनात्मक दुष्ट रूढी, घातक जातिभेद , भ्रामक देवभोळेपणा, वेडगळ पोथीनिष्ठता अित्यादी गोष्टींवर सावरकरांनी भेदक प्रहार केले आहेत. हे प्रहार करताना त्यांच्या निबंधवाङ्मयातील प्रखर विचारांची धार त्यांच्या लेखणीला आली आहे. " मुसलमानांना स्पृश्य हिंदू जितके जवळ करतात तितकेही अस्पृश्यांना ते जवळ करीत नाहीत " हा त्यांच्या निबंधवाङ्मयातून सतत घुमणारा घोष या कादंबरीत सारखा कानी पडत असतो. " कुत्र्यापेक्षा गदळ व या सर्पापेक्षा भयंकर असे का हे थिय्या लोक खरोखरच असतात ? "[२] " सापसुद्धा जे ब्राह्मण, क्षत्रिय पाळतात ते यांस (अस्पृश्यांस) अितके निष्ठुरपणे का बरे हिडिस-फिडिस करतात ? "[३] अशा स्वरूपाची किती तरी वाक्ये कादंबरीत ठिकठिकाणी पेरली आहेत.[४]

परमेश्वरासंबंधीचा बुद्धिनिष्ठ विचार त्यांच्या निबंधांतूनच कादंबरी वाङ्मयात अवतरतो. कादंबरीच्या प्रारंभी थिय्या या अस्पृश्य जातीतील तरुण कम्बू व मुसलमान मौलवी यांच्यातील संवादात परमेश्वराच्या थोरवीबद्दल ज विचार व्यक्त केले गेले आहेत त्यांचे मूळ सावरकरांच्या बुद्धिनिष्ठ निबंधांत आहे. " परमेश्वराच्या कल्पनेत न्यायीपणा, दयामाया नाही. " हा विचार येथे कंम्बू अत्यंत परखडपणे मांडतो.[५] जी गोष्ट परमेश्वराबद्दलची तीच अीश्वरी धर्मग्रंथाबद्दलची. " या अीश्वरी पुस्तकावर मानवाने केलेल्या सैतानी टीकांपायीच मनुष्यांवर अंधी अधिक संकटे कोसळली आहेत " हे संन्याशाचे अुद्गार सावरकरांचा बुद्धिवाद घेअूनच प्रकट झाले आहेत.[६] मानवाच्या " प्रत्यक्ष ज्ञानाच्या व अनुभवाच्या विरुद्ध आहे व जे बुद्धीला पटत नाही" असे धर्मग्रंथांसंबंधीचे कोणतेही मत कम्बू मान्य करीत नाही.[७]

---

१. मला काय त्याचे ? – प्रस्तावना. २. मला काय त्याचे? पृ. २२. ३. मला काय त्याचे ? पृ. २८ ४. मला काय त्याचे ? पृ. ५७, ६३, ६८, १०८. ५. मला काय त्याचे ? पृ. ७. ६. मला काय त्याचे ? पृ. १३१. ७. मला काय त्याचे? पृ. १४.

सावरकरांच्या निबंधांतील अन्य कमीअधिक महत्त्वाचे विषयही त्यांच्या कादंबरीतील पात्रांच्या चर्चेचे विषय बनले आहेत. 'हिंदु–मुसलमान ऐक्य'[१] 'खिलाफत',[२] 'अनत्याचार, असहकारवाद',[३] 'अहिंसा'[४] अित्यादी अनेक विषयांची अेक कथा म्हणजे त्यांची ही कादंबरी बनली आहे. सावरकरांची कादंबरी 'ललित' बनण्याअैवजी ती "प्रबंध–कादंबरी" का बनते याचे अुत्तर वरील विवेचनात आढळून येअील.

हिंदुत्वनिष्ठा व मानवहित

या दोन्ही कादंबऱ्यांच्या आशयावर सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील हिंदुत्व-निष्ठाच आपला प्रभाव गाजविते. 'काळे पाणी' या कादंबरीत अंदमानातील कारावासाच्या यातनांचा व तेथील जमातीच्या जीवनपद्धतीचा परिचय करून देण्याचा प्रमुख हेतू डोळ्यांपुढे ठेवून सावरकरांनी जरी कादंबरी लिहिली असली तरी अंदमान या बेटाचे महत्त्व त्यांनी ज्या हिंदुराष्ट्राच्या संवर्धनाच्या व संरक्षणाच्या दृष्टीने सांगितले आहे त्या दृष्टिकोनातच त्यांची हिंदुत्वनिष्ठा दडलेली आहे. " ती वसाहत बंद करू नका, मोडू नका " असा जो संदेश त्यांनी या कादंबरीत दिला आहे तो भौगोलिकदृष्ट्या वा प्रादेशिकदृष्ट्या दिलेला नसून हिंदुराष्ट्राच्या संरक्षणाचे अंदमान हे पूर्वेकडील द्वार आहे या हिंदुत्वनिष्ठेतूनच दिलेला आहे. त्या कादंबरीतील खलपुरुष जो रफिअुद्दिन त्याची व्यक्तिरेखा साकार करताना सावरकरांनी आपल्या हिंदुत्वनिष्ठेचेच रंग मुख्यतः त्यात मिसळले आहेत.

'मला काय त्याचे ?' या कादंबरीतील पात्रांवर मृत्युदंडाचे संकट कोसळते ते मुख्यतः ती सर्व हिंदू आहेत म्हणूनच ! त्यांच्यावरील या भयंकर अत्याचारांचे कारण सांगताना सावरकरांनी म्हटले आहे :–' हे जाच, हे अत्याचार व पीडा त्यांस सहन करावी लागावी असे त्यांनी काय पाप, कोणाचा अपराध केला होता ? अेवढाच की ते हिंदुसमाजात जन्मास आले होते ! ते हिंदूच राहू अिच्छीत होते ! व्यक्तिशः अितकाच, अेवढाच ! "[५] सावरकरांची सर्वच पात्रे त्यांच्या हिंदुत्वा-भिमानाने भारलेली आहेत. " मी हिंदूच राहणार. त्यांस सोडून मी स्वर्गात येअू अिच्छीत नाही " असे कम्बू मौलवीस सांगतो.[६] कादंबरीतील लक्ष्मी अेका क्षत्रियास निक्षून सांगते, " हिंदुत्वावर संकट आले असता डोंब, महार, मांग, ब्राह्मण हे डोंब, महार, मांग नसून केवळ हिंदूच आहेत असे मानणारे व आचरणारे आत्मे ब्राह्मणांत

---

१. मला काय त्याचे ? पृ. २६, २७, २८, ३०. २. मला काय त्याचे ? पृ. ४२, ७८. ३. मला काय त्याचे ? पृ. ३२. ४. मला काय त्याचे ? पृ. ४२, ४३. ५. मला काय त्याचे ? पृ. ६७. ६. मला काय त्याचे ? पृ. ९.

निघतात हे सिद्ध करण्यास मी या मसकुनीबरोबरच राहणार.”[१] कादंबरीतील सुमती अेखाद्या धर्मवीरासारखी, हिंदुधर्माच्या व हिंदुराष्ट्राच्या शत्रूशी लढत लढत मरते.[२] हिंदूंच्या कोणत्याही अुपजातीतील अेक मुलगी वा अेक मुलगा वाटला, परधर्मीयातील दुष्टांच्या हाती पडला, तर हिंदूंचे काय जाते, हे हिंदूंच्या ध्यानी आणून देण्यासाठी कादंबरीतील ‘मशाल–म्हातारी’ मशाल पेटवून हिंडत असते.[३] कादंबरीच्या अखेरीस संन्याशाच्या मुखाने हिंदुत्वनिष्ठ सावरकर पुढील संदेश देतात– “आपला प्रत्येक अश्रू आता हिंदुजातीच्या छळाप्रीत्यर्थ, हिताप्रीत्यर्थ गळला पाहिजे. व्यक्तीसाठी गाळण्यास आता डोळ्यांत अश्रू राहिला नाही.”[४]

आपली अंतिम निष्ठा जे मानवहित ते सावरकर येथेही विसरत नाहीत. अीश्वरी धर्मग्रंथांतील तत्त्वांचे आचरण करण्यासाठी मानवहित हीच कसोटी मानली पाहिजे असे सावरकर सांगतात.[५] “मानुषकाची सेवा करण्यात खरी माणुसकी आहे.” अशा आशयाचा विचार ‘काळे पाणी’मधील किसन भालतीला सांगतो.[६]

शस्त्रसामर्थ्य व हौतात्म्याचे आकर्षण

शस्त्रसामर्थ्यावरील सावरकरांचा विश्वास त्यांची पात्रे अनेक ठिकाणी बोलून दाखवितात. “गीतेच्या पारायणापेक्षा संगिनीच्या पोलादाची धारच समाज-स्वास्थ्याला पोषक ठरते,” अशा आशयाचा विचार ‘काळे–पाणी’ कादंबरीत ते व्यक्त करतात.[७] “परमेश्वर लज्जा रक्षण करीलच करील या समजुतीपेक्षा तुझ्या कमरेला खोचलेल्या सुरीवर तू अधिक अवलंबून राहा” असे सावरकर कादंबरीत स्वत:च प्रकट होअून सुमतीस सांगतात.[८]

हौतात्म्याचा संदेश सावरकरांनी ‘मला काय त्याचे?’ कादंबरीतून अनेक स्थळी दिलेला आहे. सुमतीने पत्करलेल्या हौतात्म्याचा गौरव करताना सावरकर अखेरीस लिहितात, “हवनांचे पिष्टवलिदानापेक्षा हौतात्म्याचे प्राणबलिदानच देवास कधी कधी अधिक प्रिय असते.”[९] मलबारमधील त्या भयानक विहिरीतून अेक हिंदू हुतात्मा जेव्हा वर येअू लागला तेव्हा त्याला अुद्देशून सावरकर म्हणतात “शिर छाटलेल्या हुतात्म्यांच्या खांद्यावर चढूनच शिर असलेले राष्ट्र खोल गर्तेतून वर येत असते.”[१०] हिंदुधर्मासाठी हौतात्म्य पत्करणारा अस्पृश्य हा ब्राह्मणांहून

---

१. मला काय त्याचे? पृ. ६५–६६. २. मला काय त्याचे? पृ. ७६. ३. मला काय त्याचे पृ. ११२, ११३. ४. मला काय त्याचे? पृ. १२९. ५. मला काय त्याचे? पृ. १३१. ६. काळे पाणी पृ. २९२. ७. काळे पाणी पृ. ९७. ८. मला काय त्याचे? पृ. ७३. ९. मला काय त्याचे पृ. ७७. १०. मला काय त्याचे? पृ. १२२.

ब्राह्मण ठरतो अशी सावरकरांची धारणा होती.[१] कादंबरीच्या अखेरीस हिंदुजातीला संदेश देताना हौतात्म्याचा गौरव करीत त्यांच्या संन्याशाने सांगितले, "अत्याचाराची धारही ज्या ढालीवर वोथट होते अशी ढाल – अशी ही हुतात्मतेची ढाल, हे हिंदुजाती तुझ्या हाती अजूनही आहे. तू भिऊ नकोस."[२]

'काळे पाणी' मधील किसनही ह्याच हौतात्म्याच्या हमीवर हिंदुजातीच्या पुनरुज्जीवनाची आशा बाळगून होता.[३]

व्यक्तिमत्त्वाचा कादंबरीच्या रचनापद्धतीवर परिणाम

आक्रमक व्यक्तिमत्त्व, प्रेषिताची भूमिका, कलातंत्रापेक्षा आशयातील मंत्राला महत्त्व देण्याची प्रवृत्ती यांमुळे सावरकर कादंवरीलेखन करताना कलात्मक अलिप्तता (Artistic Detachment) राखू शकत नाहीत. कादंबरीरचनेचा तंत्र-दृष्टया विचार करता लेखकाने स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणे हा दोषच मानला जातो.[४] लेखकाने स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून दिल्याने सत्याभासात रंगलेल्या वाचकांचे स्वप्न भंगून जाते आणि मग त्यांना प्रतीत होत असलेला सत्याभासही नष्ट होतो. पण सावरकरांनी या कलापूर्ण रचनात्मक तंत्राची मातब्बरी आपल्या कथा–कादंवरीच्या रचनेत कधीच बाळगली नाही. 'काळे पाणी'– मधील अकरावे प्रकरण तर त्यांचे स्वत:चे अनुभव व तदुद्भूत विचार व्यक्त करणारे आहे.[५] "वाचकहो" असे वाचकांना केवळ संबोधूनच[६] ते आपले अस्तित्व प्रकट करीत नाहीत तर "आम्ही अंदमानात असताना"[७] किंवा "अशी अुदाहरणे स्वत: पाहण्याअैकण्याचा अनुभव आम्हांलाही आला आहे" अशी वाक्ये[८] अनेक ठिकाणी घालून त्यांनी आपले अस्तित्व प्रकट केले आहे. "भर्तृहरीच्या नीतिशतकातील वेचक श्लोक अशिक्षित मुसलमानांच्या तोंडून लेखकाने स्वत: अैकलेले आहेत" अशी ग्वाही वाचकांना देण्यासाठी कादंबरीत प्रकट होण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही.[९] 'मला काय त्याचे?' या कादंबरीत कित्येक स्थळी त्यांच्यातील प्रचारक प्रभावी ठरून वाचकांच्या पुढे येतो व हिंदुजातीच्या दु:खाचे – तिच्या असंघटित जीवनाचे, तिच्या षंढपणाचे वर्णन करणारी भाषणे देअू लागतो.

---

१. मला काय त्याचे? पृ. १२८. २. मला काय त्याचे? पृ. १३१. ३. काळे पाणी पृ. २१९. ४. मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास पृ. ५१, ५२. ५. मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास पृ. ५२. ६. काळे पाणी पृ. १०५. ७. काळे पाणी पृ. १३०, १३१. ८. काळे पाणी पृ. ४७, १६३. ९. मला काय त्याचे? पृ. १४.

निघतात हे सिद्ध करण्यास मी या मसकुनीवरोवरच राहणार.”[१] कादंबरीतील सुमती अेखाद्या धर्मवीरासारखी, हिंदुधर्माच्या व हिंदुराष्ट्राच्या शत्रूशी लढत लढत मरते.[२] हिंदूंच्या कोणत्याही अुपजातीतील अेक मुलगी वा अेक मुलगा वाटला, परधर्मीयातील दुष्टांच्या हाती पडला, तर हिंदूंचे काय जाते, हे हिंदूंच्या ध्यानी आणून देण्यासाठी कादंबरीतील ‘मशाल–म्हातारी’ मशाल पेटवून हिंडत असते.[३] कादंबरीच्या अखेरीस संन्याशाच्या मुखाने हिंदुत्वनिष्ठ सावरकर पुढील संदेश देतात– “आपला प्रत्येक अश्रू आता हिंदुजातीच्या छळाप्रीत्यर्थ, हितांप्रीत्यर्थ गळला पाहिजे. व्यक्तीसाठी गाळण्यास आता डोळ्यांत अश्रू राहिला नाही.”[४]

आपली अंतिम निष्ठा जे मानवहित ते सावरकर येथेही विसरत नाहीत. अीश्वरी धर्मग्रंथांतील तत्त्वांचे आचरण करण्यासाठी मानवहित हीच कसोटी मानली पाहिजे असे सावरकर सांगतात.[५] “मानुषकाची सेवा करण्यात खरी माणुसकी आहे.” अशा आशयाचा विचार ‘काळे पाणी’मधील किसन मालतीला सांगतो.[६]

शस्त्रसामर्थ्य व हौतात्म्याचे आकर्षण

शस्त्रसामर्थ्यावरील सावरकरांचा विश्वास त्यांची पात्रे अनेक ठिकाणी बोलून दाखवितात. “गीतेच्या पारायणापेक्षा संगिनीच्या पोलादाची धारच समाज-स्वास्थ्याला पोषक ठरते,” अशा आशयाचा विचार ‘काळे–पाणी’ कादंबरीत ते व्यक्त करतात.[७] “परमेश्वर लज्जा रक्षण करीलच करील या समंजुतीपेक्षा तुझ्या कमरेला खोचलेल्या सुरीवर तू अधिक अवलंबून राहा” असे सावरकर कादंबरीत स्वत:च प्रकट होअून सुमतीस सांगतात.[८]

हौतात्म्याचा संदेश सावरकरांनी ‘मला काय त्याचे?’ कादंवरीतून अनेक स्थळी दिलेला आहे. सुमतीने पत्करलेल्या हौतात्म्याचा गौरव करताना सावरकर अखेरीस लिहितात, “हवनांचे पिष्टवलिदानापेक्षा हौतात्म्याचे प्राणबलिदानच देवास कधी कधी अधिक प्रिय असते.”[९] मलबारमधील त्या भयानक विहिरीतून अेक हिंदू हुतात्मा जेव्हा वर येअू लागला तेव्हा त्याला अुद्देशून सावरकर म्हणतात “शिर छाटलेल्या हुतात्म्यांच्या खांद्यावर चढूनच शिर असलेले राष्ट्र खोल गर्तेतून वर येत असते.”[१०] हिंदुधर्मासाठी हौतात्म्य पत्करणारा अस्पृश्य हा ब्राह्मणांहून

---

१. मला काय त्याचे? पृ. ६५–६६. २. मला काय त्याचे? पृ. ७६.
३. मला काय त्याचे पृ. ११२, ११३. ४. मला काय त्याचे? पृ. १२९.
५. मला काय त्याचे? पृ. १३१. ६. काळे पाणी पृ. २९२. ७. काळे पाणी पृ. ९७. ८. मला काय त्याचे? पृ. ७३. ९. मला काय त्याचे पृ. ७७.
१०. मला काय त्याचे? पृ. १२२.

ब्राह्मण ठरतो अशी सावरकरांची धारणा होती.[1] कादंबरीच्या अखेरीस हिंदुजातीला संदेश देताना हौतात्म्याचा गौरव करीत त्यांच्या संन्याशाने सांगितले, " अत्याचाराची धारही ज्या ढालीवर वोथट होते अशी ढाल – अशी ही हुतात्मतेची ढाल, हे हिंदुजाती सुरक्षा ढाली अजूनही आहे. तू भिऊ नकोस. "[2]

'काळे पाणी' मधील किसनही ह्याच हौतात्म्याच्या हमीवर हिंदुजातीच्या पुनरुज्जीवनाची आशा बाळगून होता.[3]

व्यक्तिमत्त्वाचा कादंबरीच्या रचनापद्धतीवर परिणाम

आक्रमक व्यक्तिमत्त्व, प्रेषिताची भूमिका, कलातंत्रापेक्षा आशयातील मंत्राला महत्त्व देण्याची प्रवृत्ती यांमुळे सावरकर कादंबरीलेखन करताना कलात्मक अलिप्तता (Artistic Detachment) राखू शकत नाहीत. कादंबरीरचनेचा तंत्र-दृष्टया विचार करता लेखकाने स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणे हा दोषच मानला जातो.[4] लेखकाने स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून दिल्याने सत्याभासात रंगलेल्या वाचकांचे स्वप्न भंगून जाते आणि मग त्यांना प्रतीत होत असलेला सत्याभासही नष्ट होतो. पण सावरकरांनी या कलापूर्ण रचनात्मक तंत्राची मातब्बरी आपल्या कथा–कादंबरीच्या रचनेत कधीच बाळगली नाही. 'काळे पाणी'– मधील अकरावे प्रकरण तर त्यांचे स्वत:चे अनुभव व तदुद्भूत विचार व्यक्त करणारे आहे.[5] " वाचकहो " असे वाचकांना केवळ संबोधूनच[6] ते आपले अस्तित्व प्रकट करीत नाहीत तर " आम्ही अंदमानात असताना "[7] किंवा " अशी अुदाहरणे स्वत: पाहण्याअैकण्याचा अनुभव आम्हांलाही आला आहे " अशी वाक्ये[8] अनेक ठिकाणी घालून त्यांनी आपले अस्तित्व प्रकट केले आहे. " भर्तृ-हरीच्या नीतिशतकातील वेचक श्लोक अशिक्षित मुसलमानांच्या तोंडून लेखकाने स्वत: अैकलेले आहेत " अशी ग्वाही वाचकांना देण्यासाठी कादंबरीत प्रकट होण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही.[9] 'मला काय त्याचे ?' या कादंबरीत कित्येक स्थळी त्यांच्यातील प्रचारक प्रभावी ठरून वाचकांच्या पुढे येतो व हिंदु-जातीच्या दु:खाचे – तिच्या असंघटित जीवनाचे, तिच्या षंढपणाचे वर्णन करणारी भाषणे देअू लागतो.

---

१. मला काय त्याचे ? पृ. १२८. २. मला काय त्याचे ? पृ. १३१. ३. काळे पाणी पृ. २१९. ४. मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास पृ. ५१, ५२. ५. मराठी कादंबरी – तंत्र आणि विकास पृ. ५२. ६. काळे पाणी पृ. १०५. ७. काळे पाणी पृ. १३०, १३१. ८. काळे पाणी पृ. ४७, १६३. ९. मला काय त्याचे ? पृ. १४.

कादंबरीतून चमकणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध शलाका

सावरकरांच्या विविध निष्ठांतून त्यांच्या कादंबरीतील आशय जसा आकारास आला आहे, तसा तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक शलाकानी रंगविला गेलाआहे. कर्तव्यभावना ही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील अेक श्रेष्ठ भावना होती. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांतील महत्त्वाच्या पात्रांच्या जीवनात ह्याच कर्तव्यभावनेचे दर्शन घडते. 'काळेपाणी 'मधील अप्पाजी, किसनला ह्याच कर्तव्यभावनेचा अुपदेश करतात.[१] 'मला काय त्याचे ? ' या कादंवरीतील दामू मुसलमानांचा हल्ला येण्याचा समय येताच आपल्या सहकाऱ्यांना सांगतो, " शेवटपर्यंत लढावयाचे, धर्मासाठी मरावयाचे. मलबारात हिंदू लढू शकतात–निदान आपण आपले कर्तव्य केले बस्स!"[२] मुसलमानधार्जिणी वृत्ती बाळगणाऱ्या षंढ हिंदूंवद्दलचे सावरकरांच्या ठायी असलेले रागद्वेष 'मला काय त्याचे ?' या कादंवरीत प्रकरण तीन व प्रकरण आठ यांमधून अुपरोध-अुपहासाच्या द्वारा प्रकट झाले आहेत. 'माझी जन्मठेप ' या आत्मवृत्तातून व पुढे 'गांधी गोंधळ ' या नावाने लिहिलेल्या लेखांतून सावरकरांनी 'खिलाफत'ची चळवळ आणि 'मोपल्यांच्या बंडा 'वर म. गांधींनी 'यंग अिंडिया 'त लिहिलेले लेख यांसंबंधी आपली मते प्रकट केली होती. तीच मते 'मला काय त्याचे ?' या कादंवरीच्या ललितकथेतून व्यक्त झाली आहेत.

भाषाशैली

नाट्य-कथात्मक वाङ्मयाप्रमाणेच सावरकरांच्या कादंबरीतील पात्रांना स्वत:चे विचार स्वत:च्याच भाषेत व्यक्त करण्याची अनुज्ञा नाही. 'काळेपाणी' या कादंबरीतील रफिअुद्दिन व त्याचे मुसलमान साथीदार काही स्थळी जी हिंदी भाषा बोलतात तिचा मात्र सन्मान्य अपवाद वरील सावरकरी भाषेच्या दंडकास करावयास हवा. अन्य सर्व ठिकाणी भाषाशुद्धीचा कटाक्ष ठेवून आणि नामावरून साधलेल्या क्रियापदांचा आग्रह धरून सावरकर आपले कथानिवेदन करीत असतात आणि पात्रांनाही आपल्याच संस्कृतप्रचुर भाषेत बोलावयास भाग पाडतात. या भाषाशुद्धीच्या आग्रहातून केलेल्या कथानिवेदनात पुढील काही शब्द वाचकांना सहज भेटतात–'तालिका ',[३] 'दृश्य पालट '[४], 'टंक '[५], 'स्वीकारोक्ती '[६], 'वक्तव्य ',[७] " हातचमक "[८], 'टोचे '[९] (Injections), 'दायित्व '[१०], 'अपराध विज्ञान '[११] (Criminology), 'प्रासिद्धिके '[१२], 'प्रतिवेदन '[१३], विधेय '[१४], अित्यादी.

---

१. काळे पाणी पृ. २०७. २. मला काय त्याचे ? पृ. ६८. ३. काळे पाणी पृ. ११, (४) २६, (५) ३५, (६) ४७, (७) ५९, (८) ७७, (९) ९७, (१०) १५०, (११)१८८, (१२) २९२. (१३) मला काय त्याचे ? पृ. २७. (१४) १५.

क्रियापदांची पुढील काही रूपे पाहण्यासारखी आहेत. 'तर्कले'[१], 'जिज्ञासला'[२], 'समाधानलेली'[३], 'ताटातुटली'[४], 'नवसले'[५], 'सफळतो'[६] 'आक्षिपले'[७], 'प्रतिध्वनिली'[८], अित्यादी. त्याशिवाय प्रदीर्घ वाक्यरचना (काळे पाणी–पृ. ६६), क्रियापदांची पुनरुक्ती ('काळेपाणी' – पृ. १८, १९८, २०९, २१४,२५२, २८६, २९३; 'मला काय त्याचे ?'–पृ. ४१, ७३) ही सावरकरांच्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये त्यांच्या कादंबऱ्यांतूनही दिसतात. या बोजड भाषाशैलीत सावरकरांच्या ठायीचा कवी मधून मधून डोकावतो आणि आपल्या विशाल, भव्य प्रतिभेची साक्ष पटवून जातो. 'काळे पाणी' कादंबरीतील मालती आपल्या वृद्ध आअीला ओव्या म्हणण्याचा आग्रह करते, तेव्हा ती वृद्ध माता अुत्तरते . . . . "आता तुझ्या आअीचा स्वर तुझ्यासारखा मंजुळ राहिला नाही. केळीच्या सालपटाच्या धाग्यात झेंडूची फुलं ओवता आली, तरी जुअीच्या फुलांची माळ ओवायची झाली तर, मअू मअू रेशमाचं कोवळं सूतच हवं."[९] अंदमानातील समुद्रकाठच्या वाळवंटात पसरलेला प्रचंड सुट्या शिलांचा संघ पाहून सावरकरांना अुत्प्रेक्षा सुचते ती अशी:– "जणू काय हत्तींचा थवाच्या थवा सिंधुपुलिनावर अुतरेला आहे"[१०] अुंच, रुक्ष आणि आडदांड दिसणाऱ्या डोलकाठीला गहिवरलेला पाहून 'अेखादा अुंच आणि राकट खडक पाझरत' आहे अशी कल्पना सावरकरांची भव्य प्रतिभा करते.' 'मला काय त्याचे ?' या कादंबरीतील हिंदूंच्या रक्तमांसाने भरलेल्या त्या भीषण विहिरीचे रात्री दिसणारे दृश्य पाहून सावरकर लिहितात, "तोंड वासून कोणी कोणी झोपी जातात तसा त्या विहिरीचा जबडा अुघडून अंधकार गाढ झोपी गेल्यासारखा घोरू लागला. त्याच्या पोटातील भयंकर पचनक्रिया चालू होती. त्या विहिरीतील अर्धजीवित वा आसन्नमरण हिंदूंचे कण्हणे व किंकाळ्या मधून मधून अंधाराच्या पोटातील गुरगुरण्यासारख्या, अैकू येत होत्या."[११] रौद्र, भयानक रसाचा आविष्कार करणारी सावरकरांची भाषा कधी अत्यंत मृदुमवाळ होते आणि पुढील काव्यमय वर्णन करून जाते:– "तो चंद्रकिरण तिच्या (सुमतीच्या) वदनास निर्भयपणे पाहता आले म्हणून धिटावून खाली सरकून आता तिच्या 'शंखासारख्या सुरेख कंठात कंठचाप्रमाणे शोभू लागला. त्याचे हे धाडस वाढून तो चंद्रहारासारखे मनोहर दिसावे म्हणून तिच्या वक्षस्थलावरही अुतरेल की काय या भयाने मधून मधून वाऱ्याच्या झुळकेच्या विमानात बसून तिचा तो किंचित हलणारा पदर त्या चंद्रकिरणांवर चाल करून जात होता."[१२]

---

१. काळे पाणी पृ. ४२, (२) ४४, (३) ५४, (४) ५९, (५) ६५, (६) १२३. (७) मला काय त्याचे ? पृ. ८०, (८) ९५. ९. काळे पाणी पृ. १. १०. काळे पाणी पृ. २४५. ११. मला काय त्याचे ? पृ. ११५, ११६. १२. मला काय त्याचे ? पृ. ५०.

समारोप

सावरकरांच्या कथा कादंबरी वाङमयाचे स्वरूप हे असे आंतरबाह्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने रंगलेले आहे. श्री. प्र. के. अत्रे यांनी म्हटल्याप्रमाणे " सावरकरांचे चरित्र म्हणजे वीररसाने आमूलाग्र ओथंबलेली अेक अद्‌भुतरम्य आणि रोमहर्षक कादंबरी आहे."[1] आपले चरित्र हे नाट्यविषय होण्याच्या पात्रतेचे आहे याची जाणीव सावरकरांना जशी होती (पाहा–' अुःशाप 'ची नांदी) तशी जाणीव ' काळ्यापाण्या 'सारखी कादंबरी लिहिताना त्यांना असावी हेच जास्त संभवनीय ! म्हणून त्यांनी ' काळे पाणी ' या कादंबरीसाठी जे कथानक निवडले ते प्रत्यक्षानुभूतीतूनच निवडले. कादंबरीचे तंत्र दूर सारून स्वतःच्या अस्तित्वाची त्यांनी अनेकदा जाणीव करून दिली. स्वभाषेच्या आग्रहाला धरून कथानक निवेदन केले. कादंबरीकार म्हणून त्यांना यश कितपत मिळाले हा प्रश्न येथे गौण आहे. प्रा. म. ना. अदवंत यांच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर अेवढेच सांगता येअील की " असामान्य प्रतिभावंताची सामान्य कृती ही सामान्य कलावंताच्या अुत्कृष्ट कृतीपेक्षाही कितीतरी श्रेष्ठ असते. बॅ. सावरकरांच्या कथाविश्वाबद्दल हेच म्हणता येअील. बॅ. सावरकरांच्या अितर साहित्याच्या तुलनेने हे साहित्य कदाचित काहीसे कमी प्रतीचे वाटेल. पण अेका महाकवीची प्रतिभा असलेल्या व झुंझार वृत्तीने जीवनातील अघटित घटनांना तोंड देणाऱ्या अेका वीराचे हे साहित्य आहे, हे विसरून चालावयाचे नाही !"[2]

---

१. माझी जन्मठेप – प्रस्तावना. २. सा. वि. द. पृ. १६७.

९

भाषाशुद्धी नि लिपिशुद्धीचे पुरस्कर्ते सावरकर

प्रास्ताविक

सावरकरांनी भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी या विषयावर केलेले लेखन पृष्ठ-संख्येने अल्प असले तरी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात चिरस्थायी झाले आहे. १९२४ मध्ये सावरकरांना रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्ध करण्यात आल्यापासून १९३७ मध्ये त्यांची बिनशर्त मुक्तता होईपर्यंत बारा–तेरा वर्षे सावरकरांनी जी विविध कार्ये हाती घेतली होती, त्यांत 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' आणि नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन' या दोन भाषाविषयक कार्यांना विलक्षण गती दिली होती. 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या विषयावर ता. २१ एप्रिल १९२५च्या केसरीत सावरकरांचा पहिला लेख प्रसिद्ध झाला, आणि ता. १२ मे १९२५च्या केसरीत त्यांनी ४ था लेख लिहून आपली लेखमाला संपविली. या त्यांच्या लेखमालेने वादाचे वादळ अुठले आणि ते शमविण्यासाठी सावरकरांनी पुन्हा २२ सप्टेंबरपासून १० नोव्हेंबर १९२५ पर्यंत पाच लेख लिहिले. रत्नागिरीत शुद्धीकरणाची चळवळ निर्धाराने चालू ठेविली आणि आपल्या पाच वर्षांच्या चळवळीचा आढावा घेणारी लेखमालिका दि. १६ मे १९३१पासून दि. २–६–३१पर्यंत 'केसरी'तून प्रसिद्ध केली. याच कालावधीत म्हणजे १९२७ च्या ऑगस्टपासून १९३७ सालापर्यंत मुख्यतः 'श्रद्धानंद' साप्ताहिकातून त्यांनी लिपिशुद्धिविषयक स्फुट लेखन केले. १९३७ नंतरही प्रसंगानुषंगाने त्यांनी भाषा-लिपिशुद्धीकरणाविषयी आपले विचार लेखना-तून वा भाषणांतून व्यक्त केले. त्या सर्वांचा परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

व्यक्तिमत्त्वामुळे भाषिक चळवळींना महत्त्व

भाषा-लिपि-शुद्धीकरणावर सावरकरांनी केलेले लेखन बरेचसे स्फुट, अुत्तर–प्रत्युत्तरात्मक आणि प्रचारात्मक असले, तरी ते मराठी वाङ्मयात चिर-स्थायी होण्याला मुख्य कारण सावरकरांचे व्यक्तिमत्त्व हेच होय. सावरकरांसारखा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा पुरस्कर्ता या दोन्ही चळवळींच्या मागे अुभा नसता, तर त्या चळवळी अितक्या लक्षवेधी आणि विचारप्रवर्तक झाल्या नसत्या. सावरकरांच्या विरोधकांनीच हे मान्य केले आहे. डॉ. माधवराव पटवर्धन हे सावरकरांच्या भाषा-

शुद्धीकरण-आंदोलनाचे पहिले विरोधक होते. त्यांनी केलेली 'सावरकरी भाषा-शुद्धीची चिकित्सा' सूक्ष्म आणि विलक्षण बोचरी होती. परंतु सावरकरांच्या व्यक्ति-माहात्म्यामुळे आणि त्यांच्या लेखणीच्या प्रभावामुळे भाषाशुद्धीच्या प्रश्नाची थोडी-बहुत चर्चा झाली असे माधवराव मान्य करतात.[1] आणि मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचा प्रश्न महाराष्ट्रीयांपुढे प्रथम मांडण्याचे श्रेय ते सावरकरांनाच देतात.[2] सावरकरांना 'भाषाशुद्धीचे खरे वैरी' संबोधणारे प्रा. श्री. के क्षीरसागर सावरकरांच्या लेखना-मागील त्यांचे तेजस्वी आणि विशाल व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर पुढील शब्दांत अुभे करतात, 'दे. भ. विनायकराव सावरकर यांच्यासारखे तेजस्वी, प्रतिभावान, पराक्रमी पुरुष कोणत्याही राष्ट्राचे शिर अुन्नत करतील आणि तूर्त फक्त वाङमया-संबंधीच बोलावयाचे झाल्यास त्यांच्याअेवढी प्रखर, तेजस्वी प्रतिभा अर्वाचीन वाङमयात कोणाच्याच वाट्यास आलेली नाही. पण कर्तृत्वात धाडस आणि लेखनात असामान्य प्रतिभा अेवढ्यावरच त्यांचे मोठेपण संपत नाही. अर्वाचीन भरतखंडात ज्या थोड्याच महाभागांनी अेक निश्चित आणि स्पष्ट तत्त्वज्ञान सांगितले अशा गांधी, टिळकांसारख्या तत्त्वप्रवर्तकांशेजारी सावरकर यांस त्यांच्या प्रतिकार-योगाच्या तत्त्वज्ञानाने अढळ स्थान मिळवून दिले आहे आणि हेच प्रखर आणि दुर्दम्य तत्त्वज्ञान त्यांच्या वाक्यावाक्यांतून निनादत आहे.''[3] पुणे येथे १९२७ साली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना कै. श्री. कृ.कोल्हटकर यांनी सावरकरांच्या भाषाशुद्धीची टवाळी केली तरी सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांनी आदराने अुल्लेख केला. '' अत्यंत बुद्धिमान, तेजस्वी व अुत्साही लेखक '' अशा शब्दांत सावरकरांचा गौरव करून श्रीपाद कृष्णांनी पुढे म्हटले, '' बुद्धिमान पुरुषाचा कोणताही अुद्योग अगदीच वाया जात नसतो, या नियमास अनुसरून त्यांनी (सावरकरांनी) सुरू केलेली ही (भाषाशुद्धीची) मोहीमही अगदीच निरर्थक ठरली आहे असे नाही. ''[4]

लिपिशुद्धीच्या चळवळीतही सावरकरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळेच नव-चैतन्य निर्माण झाले, असे मत श्री. य. मो. नानल, श्री. कृ. के. गोखले अित्यादी लिपिसुधारकांनी व्यक्त केले आहे. श्री. नानल यांनी सावरकरांच्या श्रेष्ठ व्यक्ति-त्वाचा अलंकारिक शब्दांत गौरव करताना म्हटले आहे : '' सुदैवाने शुद्धिविभाकर सावरकर या कार्यात बद्धपरिकर झाले असून अहिल्येची शुद्धी करणाऱ्या श्रीरामचंद्राप्रमाणे या प्रश्नाच्या कुडीत त्यांनी नवचैतन्य निर्माण केले आहे. '' श्री. कृ. के. गोखले यांनी सावरकरांच्या ठायी असलेल्या धडाडीचा अुल्लेख करून

---

१. भा. वि. पृ. ३५. २. भा. वि. पृ. ३५. ३. व्य. आ. वा. लेखक : क्षीरसागर पृ. १२८. ४. को. ले. पृ. ८४७. ५. ना. लि. आं. पृ. ३५.

'लिपि-सुधारणेचा प्रश्न आपण (सावरकर) आपल्या नेहमीच्या धडाडीने तडीस लावाल" असा विश्वास व्यक्त केला आहे.[1] महाराष्ट्रात लिपिशुद्धीच्या चळवळीचा जो विलक्षण रेटया अुत्पन्न झाला आहे, तो सावरकरांच्या 'अंगीकृत कार्य पुरस्कारण्याच्या अुत्कट व निरलस पद्धतीमुळे' अुत्पन्न झाला आहे, असे श्री. रा. म. आठवले यांना वाटते.[2]

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वामुळे जसे या दोन्ही चळवळींना नवचैतन्य लाभले, तसे त्यांच्या व्यक्तित्वातील काही वैशिष्ट्यांमुळे या चळवळींचा वेग थोडा मंदावला असे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे या दोन्ही चळवळी सावरकरांच्या हिंदु-संघटनेतील अनेकांगांपैकी अेक अुपांग होत्या. हिंदुत्वाधिष्ठित राजकारण हे सावरकरांचे प्रधान कार्य होते. पण रत्नागिरीच्या स्थलबद्धतेच्या काळातील राजकीय निर्बंधांमुळे सावरकरांना आपले लक्ष हिंदुसंघटनेला पोषक अशा विविध 'शुद्धीकरणात' गुंतवावे लागले. त्यातही भाषाशुद्धीचे कार्य अधिक निकडीचे की, अस्पृश्यांच्या शुद्धीचे कार्य अधिक निकडीचे, असा विवेक त्यांना करावा लागला आणि अखेर अस्पृश्यांच्या शुद्धीकरणाच्या कार्यास त्यांना अग्रक्रम द्यावा लागला. भाषाशुद्धीच्या विषयावर प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखांवर आक्षेपकांनी टीकेची झोड अुठविली असतानाही त्या टीकेला आपण त्वरित अुत्तर का देअू शकलो नाही, याचे जे स्पष्टीकरण सावरकरांनी केले आहे, ते त्यांची भाषाशुद्धीबाबतची भूमिका समजून घेण्यास अुपयुक्त ठरणारे आहे. सावरकर लिहितात, "या भाषाविषयक प्रश्नापेक्षाही आज आपल्या हिंदु-समाजाची आणि राष्ट्राची अमर्याद हानी करीत असलेल्या अस्पृश्यतेच्या निवारण्याचा प्रश्न निकडीने हाती घेऊन निदान रत्नागिरीस तरी त्याचा पिच्छा पुरविणे अधिक महत्त्वाचे कर्तव्य प्रथम करावे लागल्याने आजवर ह्या भाषाशुद्धीच्या लेखांवर आलेले आक्षेप अैकत बसण्यापलीकडे आम्हांस काही अधिक करता आले नाही."[3] 'भाषाशुद्धीचा विचार करताना सावरकर आपल्या श्रेष्ठ-कनिष्ठ कर्तव्याचा हा जो क्रम लावतात, त्यामुळेच डॉ. माधवराव पटवर्धनांचे पुढील विधान यथार्थ वाटते. डॉ. पटवर्धन लिहितात, "मराठी भाषेचे शुद्धीकरण हे सावरकरांना हिंदुसंघटनेच्या विविध अुपांगांतील अेक अुपांग वाटते, तसे ते मला वाटत नाही."[4] लिपिशुद्धीबाबतही असेच घडले. लिपिशुद्धीवर सावरकरांनी संततधार लिखाण केले आणि लिपिसुधारणेच्या तत्त्वांचे स्वत: करारी बाण्याने आचरणही केले. परंतु १९३७च्या मे महिन्यात त्यांच्यावरील 'राजकीय विषयबंदीची आणि रत्नागिरीतील स्थलबंदीची' अट ब्रिटिश सरकारने काढून टाकताच आपल्या प्रधान

---

१. नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन, पृ. ४४. २. प्रतिभा–सावरकर विशेषांक, जानेवारी १९३६. ३. म. भा. शु. पृ. ३०, ३१. ४. भा. वि. पृ. ३७, ३८.

कर्तव्याकडे सावरकरांनी धाव घेतली. त्या वेळी आपल्या लिपिशुद्धीविषयाची लेखन-सीमा करताना सावरकरांनी लिहिले, "राजकारणात भाग घ्यायचा नाही ही अट आता अुरली नसल्यामुळे रत्नागिरीहून सुटका होताच अखिल भारतीय राजकारणाचे रंगणात पुन्हा अुतरणे हेच आता आमचे प्राप्त कर्तव्य होय. त्यामुळे आता ह्या लिपिसुधारणादिक चळवळींत वेचण्यास वेळ असा आम्हांस क्वचितच मिळेल."[१]

वरील सर्व विवेचनाचा निष्कर्ष हा की, रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या व राजकीय निर्बंधाच्या काळात सावरकरांच्या ठायी असलेल्या 'स्वाभाविक कार्यलालसेने'[२] किंवा 'कर्मतृष्णेने' अथवा 'अंगीकृत कार्य करण्याच्या क्रियाशील तळमळीने'[३] त्यांना स्वस्थ वसू दिले नाही; जे कार्य या काळात त्यांनी हाती घेतले ते हिंदुसंघटनेच्या कार्याचे अेक अुपांगच होते आणि आपल्या प्रवृत्तीनुसार त्यांनी, कर्तव्याच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचा विवेक करून भाषा-लिपि-शुद्धीकरणाच्या कार्याचा क्रम निश्चित केला. अखेर श्रेष्ठ कर्तव्याचा क्षण येताच या चळवळींना दुय्यम स्थान देऊन ते पुढे गेले आणि त्यांच्यासारख्यांच्या प्रभावी व्यक्तित्वाचा प्रत्यक्ष पाठिंबा संपताच या चळवळींचा वेगही मंदावला.

व्यक्तित्वाच्या विकासाचा चळवळींवर परिणाम

भाषाशुद्धीचा विचारही सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या विकासाबरोबर वाढताना दिसतो. वयाच्या पंधरा वर्षांच्या आगेमागे सावरकरांना स्वभाषेतील अुणीव जाणवू लागली होती. चाफेकर–रानड्यांच्या वीरश्रीयुक्त कृतीचे वर्णन करताना अिंग्रजीतील 'Martyr' शब्दाअितका समर्पक शब्द त्यांना आढळेना, म्हणून 'वीरवर' या शब्दावर त्यांना भागवून न्यावे लागले. त्या अर्थाचे नाना शब्द काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता; पण तो मनासारखा जमला नव्हता.[४] अर्थात अशा स्वरूपाचे प्रयत्न करावयास लावणारी मूळ प्रेरणा त्यांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'पासून मिळाली होती. "मालाकारांचे अिंग्रजीमिश्रित मराठी विषयीचे कठोर शब्द लहानपणापासून त्यांच्या कानात घुमत होते."[५]" श्री. कृ. कोल्हटकरांना अुत्तर देताना सावरकरांनी हेच सांगितले होते की, निबंधमालेतील लेखांनीच अुद्युक्त होअून आम्ही आमच्या शाळेतील दिवसांपासून अिंग्रजी शब्द मराठीत शक्यतो न आणण्याचा प्रयत्न करण्याचा नियम आमच्या सहकाऱ्यांसह आजवर अनेक संस्थांतून घालीत आणि पाळीत आलो आहोत.[६] पुढे कॉलेजात

---

१. नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन, पृ. १३३. २. माझी जन्मठेप, पृ. २४८. ३. मंदार–दिवाळी अंक १९६१. ४. माझ्या आठवणी पृ. ७९. ५. म. भा. शु. पृ. ४१. ६. भाषाशुद्धी पृ. ७२, ७३.

आणि विलायतेतही या नियमांचे आपण कटाक्षाने कसे पालन केले, याचे सविस्तर वर्णन सावरकरांनी केले आहे.[१] अिंग्लंडमध्ये मॅझिनीचे चरित्र लिहिताना 'Martyr' ह्या शव्दाला 'देशवीर' हा शव्द त्यांना सापडला. पण तो मूळ अिंग्रजी शब्दाअितका व्यापक नसल्याचे त्यांच्या ध्यानी आले. अखेर अंदमानात 'हुतात्मा' शब्द सुचला, तेव्हा त्यांचे समाधान झाले.[२]

भाषाशुद्धीवद्दल सावरकरांचा मुख्य रोख प्रारंभी तरी अिंग्रजी शव्दाविरुद्ध होता, याची स्पष्ट कबुली स्वत: सावरकरांनीच दिली आहे. ते लिहितात, "आम्ही कारागृहात जाअीतोपर्यंत आम्हांसही अुर्दू शब्दांचे कुठे वावडे होते ! अिंग्रजी शब्द आम्ही टाळू, परंतु अुर्दू शव्द अगदी खडचासारखा निवडून काढण्याची तीव्र प्रवृत्ती तेव्हा नसल्याने आमच्या यौवनकालीन ग्रंथांत आणि कवितांत, आम्ही आज त्याज्य मानीत आहोत ते शब्द आम्हीच नि:संकोचपणे वापरलेले आहेत."[३]

सावरकरांचा राष्ट्रवाद जसजसा स्पष्ट होअू लागला, तसतसा त्यांचा भाषिक ध्येयवाद साकार होअू लागला. 'हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून सन्मानण्याचा प्रयत्न त्यांनी १९०६ पासून सुरू केला.[४] याच सुमारास त्यांनी व त्यांच्या 'अभिनव भारता'च्या सभासदांनी 'हिंदीस राष्ट्रभाषा करावयाची व नागरी लिपीस राष्ट्र-लिपी करावयाची' असा राष्ट्रीय संकल्प सोडला.[५] सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाले तर, 'कारागृहात (अंदमान) जाअीपर्यंत त्यांना अुर्दू शब्दाचे वावडे नव्हते. पण अंदमानात त्यांना निराळेच चित्र दिसून आले. अंदमानातील प्राथमिक शाळेत हिंदू मुलांसही अुर्दू शिकविण्याची वहिवाट पडली होती. कारण कारागारातील मुनशी अुर्दू शिक्षित होते आणि लेख्यालयातही अुर्दू नोकरांचाच भरणा अधिक होता.'[६] "तेथील हिंदूंचे मन अुर्दूने अहिंदू करून टाकले होते. अितकेच नव्हे, तर राष्ट्र-भाषेच्या दृष्टीने अुर्दू भाषा हिंदीवर वरपगडा करू पाहात होती."[७] सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठ मनाला हिंदू संस्कृतीवरील हे अुघड अुघड आक्रमण सहन होणे शक्य नव्हते. याच काळात 'हिंदुत्व' या ग्रंथाचे चिंतन ते करीत होते. हिंदु-राष्ट्रवाद, हिंदूची व्याख्या, हिंदूंचा विजयी अितिहास यांविषयीचे सिद्धान्त त्यांच्या मनात स्थिर होअू लागले होते आणि भाषा व लिपी यांबाबत विचार करताना त्यांचे असे निश्चित मत झाले की, अंदमानमध्ये हिंदुसंस्कृती जिवंत ठेवावयाची असेल तर हिंदी भाषा व नागरी लिपी यांचे शिक्षण प्रत्येक हिंदू मुलास अगदी अपरिहार्य म्हणून दिले जावयास पाहिजे.[८] यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. हिंदीचा प्रचार सुरू केला.

---

१. भाषाशुद्धी पृ. ७३; म. भा. शु. पृ. ४१. २. माझ्या आठवणी पृ. ८०.
३. म. भा. शु. पृ. ६९–७०. ४. मा. जन्म. पृ. ४५६. ५. मा. जन्म. पृ. ४५६.
६. मा. जन्म. पृ. ४६१. ७. मा. जन्म. पृ. ४६७. ८. मा. जन्म. पृ. ४६२.

हिंदी ही हिंदूंची भाषा आहे आणि आपले धर्मग्रंथ ज्या नागरी लिपीत आहेत ती लिपी व ती भाषा शिकणे आपले पवित्र कर्तव्य आहे ' असे ते ठामपणे सांगू लागले.[1] अुर्दू भाषेचे व पर्शियन लिपीचे हिंदू मुलांवर आणि पर्यायाने हिंदू संस्कृतीवर काय परिणाम होतात, याचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला. आणि त्यांना असे आढळून आले की, हिंदू मुलास भगवद्गीतेचे श्लोक येत नाहीत, तुलसी रामायण त्याला वाचता येत नाही, कालिदास, सूरदास यांचे ग्रंथ व विचार त्याला समजत नाहीत. त्याला पांडव, रामायण, भारत, भागवत यांचे अक्षर माहीत नसते, त्यांतील वीर पुरुष त्याला ज्ञात नसतात. अुलट त्याला पर्शियन कवीचे चुटके येतात, अुर्दू वर्तमानपत्र वाचता येते आणि त्याच्या डोक्यात अुपमा घोळत असतात त्या पर्शिया आणि अरेबियातील नद्यांच्या.[2] अशा रीतीने भाषाद्वारे हिंदू संस्कृतीवर होणारे हे आक्रमण सावरकरांना सहन होणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी स्वच्छपणे सांगितले की, अुर्दू भाषा ही हिंदुसंस्कृतीस परिणामघातक वाटल्याने आम्ही अुर्दूचे अुच्चाटन शक्य तो करीत राहिलो.[3] पण त्याचबरोबर अुर्दूचे अुच्चाटन म्हणजे अुर्दू भाषेचा द्वेष नव्हे हेही त्यांनी स्पष्ट केले.[4] या सर्व गोष्टींवरून सावरकरांचा भाषा व लिपीविषयक ध्येयवाद त्यांच्या पूर्वायुष्यात निश्चित झाला, असा निष्कर्ष तर्कदृष्टया येथे निघतो. आपल्या या ध्येयवादाचा अुल्लेख सावरकरांनी पुढे आपल्या अनेक ग्रंथांतून, व्याख्यानांतून स्फुटलेखांतून अनेक वेळा केला आहे. 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या ग्रंथातील सर्व विचारांची मांडणी करताना 'भारताच्या राष्ट्रभाषेचा अधिकार हिंदीचाच आहे' असे ते सांगतात[5]. मराठीचा व हिंदीचा तुलनात्मक विचार करताना 'राष्ट्रीय भाषा हिंदी हिचा आम्हांस मराठीहूनही अधिक अभिमान आहे ' अशी बेधडक मान्यता ते देतात.[6] 'नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन' या ग्रंथात त्यांनी 'हिंदी हीच राष्ट्रभाषा व देवनागरी होच राष्ट्रलिपी ' या आपल्या ध्येयाचा अुच्चार अनेकदा केला आहे.[7] नागपूर आणि कलकत्ता येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून भाषणे करताना त्यांनी आपल्या अुपरिनिर्दिष्ट भाषिक ध्येयवादाचाच पुरस्कार केला आहे. मुंबअी येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्ष या नात्याने बोलताना हाच भाषाविषयक संदेश त्यांनी दिला आहे.

अंदमानच्या कारागृहाच्या बंदिजगतात अुर्दूचे जे भाषिक आक्रमण सावरकरांच्या दृष्टोत्पत्तीस आले, त्यातून त्यांच्या भाषा–लिपिविषयक चळवळीला प्रतिक्रियात्मक स्वरूप प्राप्त झाले. 'कारागृहात जाअीतोपर्यंत ज्या सावरकरांना अुर्दू शब्दांचे

---

१. मा. जन्म. पृ. ४६२. २. मा. जन्म. पृ. ४६१. ३. मा. जन्म. पृ. ४६७. ४. मा. जन्म. पृ. ४६७. ५. म. भा. शु. पृ. ३५. ६. म. भा. शु. ३५. ७. ना. लि. आं. पृ. ७, २६, १२४, १३५.

वावडे नव्हते, त्याच सावरकरांना अुर्दू शब्द-अुच्चाटनाची व खडयासारखे दूर करण्याची चळवळ करावी लागली, यात प्रतिक्रियात्मकता नाही असे म्हणणे सुसंगतपणाचे ठरणार नाही. केवळ कारागृहाच्या भितीआडच नव्हे, तर कारागृहातून मुक्त होअून भारतात आल्यावरही अुर्दूच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांना आंदोलन अुभारावे लागले. 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' आणि 'नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन' दोन्ही ग्रंथांतून मुसलमानांच्या वाढत्या भाषिक आक्रमणाचे वर्णन सावरकरांनी केले आहे. या विखुरलेल्या वर्णनांचे तुकडे अेकत्र जोडले तर मुसलमानांच्या त्या आक्रमणाचे चित्र पुढीलप्रमाणे साकार होअील..." अगदी अलीकडे मुसलमानांत हिंदू संस्कृतीच्या विरुद्ध जेव्हा दुराग्रह अुत्पन्न होअू लागला, तेव्हापासून अुर्दू नामे व विशेषणे जाणूनबुजून घुसडण्यात येअू लागली. आता निजामशाहीतील मुसलमानी विश्वविद्यालयात तर अुर्दूला हिंदी भाषेपासून जितकी दूर नेववेल तितकी नेण्याचा भगीरथ प्रयत्न सुरू झालेला आहे."[1] "पंजाबात, अुत्तर हिंदुस्थानात वा सिंधमध्ये हे (हिंदी भाषा मृत होण्याचे) संकट, त्या त्या भाषांचा गळा कसे व किती घट्ट दाबते झाले, हे त्या त्या भाषांतून शेकडा ५० वर शब्द अरेबियन वा पर्शियन वा तुर्की पडतात व त्या शब्दांच्या तडाख्यातून सुटण्याचा प्रयत्न करतानाही तिकडील पुढाऱ्यांस तो साधत नाही, ह्यावरून अुघड होते."[2] 'मुसलमानांच्या आकांक्षा राजकारणात आजकाल जशा राष्ट्रविरोधी स्वरूपे धारण करू लागल्या आहेत, तशाच भाषेच्या विषयातही परधार्जिण्या होत आहेत."[3] "अलीगड कॉलेज व निजामी युनिव्हर्सिटी यांनी तर अुर्दू भाषेस हिंदी भाषेपासून शक्य तितके दूर हिसडून अरेबियनांच्या व पर्शियनांच्या घरात बांधून टाकण्याचा विडाच अुचललेला आहे."[4] आता तर हिंदीस राष्ट्रभाषा करू नका–अुर्दूस करा– असे साहसाने बोलणे ते (मुसलमान) अुघड बोलू लागले आहेत. हिंदुस्थानच्या सिंहासनावर काबूलच्या अमिराला आणवून पुन्हा मुसलमानी सुलतान स्थापावयाचा, हे जसे त्यांचे राजकीय ध्येय ठरले आहे, दहा वर्षांच्या आत हिंदुधर्मासच बाटवून हिंदुस्थानच्या देवालयात निमाज पढावयाचा, हा जसा त्यांचा धार्मिक निर्धार झालेला आहे, तसेच हिंदू जिव्हेने विटाळलेल्या भाषांस पायाखाली चेंदून हिंदुस्थानच्या वाक्पीठावर परदेशी भाषेचा झेंडा शक्य तितका बळकट रोवावा, हे त्यांचे वाङमयीन ध्येय आहे."[5] "बंगालसारख्या प्रांतात, की जेथे मुसलमानांच्या घरातही अुर्दू कोणास बहुधा समजत नाही तेथेही, जेव्हा मुसलमानांनी अरेबीबहुल अुर्दूच बोलावी म्हणून चळवळ सुरू केली; अितकेच नव्हे तर हिंदूंस अुर्दूच भाषा आणि पर्शियन लिपीदेखील हिंदुस्थानची राष्ट्रीय भाषा आणि लिपी मानण्यास भाग पाडू, म्हणून हजारो मुसलमानांच्या प्रतिज्ञा

---

१. म. भा. शु. पृ. ५. २. म. भा. शु. पृ. ६. ३. म. भा. शु. पृ. १५.
४. म. भा. शु. पृ. १५. ५. म. भा. शु. पृ. १७.

होअू लागल्या ; आणि अेका बाजूने निजाम आणि दुसऱ्या वाजूने अलिगढाहून अुठलेली अुत्तरीय लाट यांच्या पकडीत मराठीसही अुर्दूची आज नाही अुद्या मगर-मिठी पडणार, अशी धास्ती वाटू लागली, तेव्हा आम्हांसही अुर्दू शब्दांस वहिष्कार्य समजण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रात बळावावी म्हणून प्रयत्न करणे भाग पडले ''[1]

मुसलमानी अुर्दूचे हे अरेरावी स्वरूप[2] पाहून सावरकरांची प्रतिक्रियाही तितकीच तीव्र झाल्याचे दिसून येते. स्वभाषेत राहिलेल्या ह्या मुसलमानी शब्दांची घाण त्यांना असह्य होते व धुऊन टाकण्यासाठी ते आवाहन करतात.[3] त्यांना 'अुर्दू शब्दांचा मुसलमानी स्पर्श प्राणघातक' वाटतो.[4] सावरकरांच्या ह्या तीव्र प्रतिक्रियेमुळे डॉ. पटवर्धनांसारख्या टीकाकारांना सावरकरांची भाषाशुद्धीची चळवळ ही 'हिंदी मुसलमानांच्या अहिंदी धर्मवेडामुळे वाटणाऱ्या संतापावर आधारलेली वाटते ''[5] भाषाशुद्धीच्या चळवळीत सावरकरांची दृष्टी केवळ भाषिक नसून 'परकीयांच्या द्वेषाने' ती भरलेली आहे, आणि म्हणूनच 'अरबी–फार्शी म्हणण्यापेक्षा अिस्लामी शब्दांवर कडक बहिष्कार घातला पाहिजे, अशी घोषणा ते करतात,' असा पटवर्धनांचा दावा आहे.[6] विरोध दिसताच कर्तृत्वाचा आणि कर्तव्याचा निर्धार अधिक प्रबल होणे आणि त्यांचे रूपांतर तीव्र प्रतिक्रियात्मक स्वरूपात होणे हा सावरकरांच्या व्यक्तित्वाचा अेक विशेष भाषाशुद्धीच्या आंदोलनातही प्रकर्षाने प्रकट होतो.

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी : वैचारिक भूमिका

सावरकरांच्या भाषाशुद्धीची आणि लिपिशुद्धीची ही भाषिक चळवळ त्यांच्या व्यक्तित्वाच्या छापेतच कशी वावरते, याचा संपूर्ण शोध घेण्यासाठी या दोन्ही चळवळींसंबंधी सावरकरांचे विचार थोडक्यात समजावून घेणे अत्यावश्यक आहे.

भाषा वा लिपीच्या अशुद्धीचे कारण मुख्यतः ती भाषा बोलणाऱ्या व लिपी लिहिणाऱ्या लोकांवरील राजकीय आक्रमणात आढळते. प्रथम मुसलमानांच्या आक्रमणामुळे व नंतर अिंग्रजांच्या राजकीय सत्तेमुळे हिंदू भाषांवर बाटण्याचा प्रसंग आला. मुसलमानांच्या या भाषिक आक्रमणाचा प्रथम प्रतिकार श्रीशिवाजी-महाराजांनी हिंदवी-स्वराज्याच्या स्थापनेनंतर राज्यव्यवहारकोशाची निर्मिती करून केला. अिंग्रजांच्या भाषिक आक्रमणाचा, प्रतिकार – मराठी भाषेपुरतेच

---

१. म. भा. शु. पृ. ७०. २. म. भा. शु पृ. १७. ३. म. भा. शु. पृ. ११.
४. म. भा. शु. पृ. १८. ५. भा. वि. पृ. २. ६. भा. वि. पृ. ९४.

बोलावयाचे झाल्यास – निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या स्वाभिमानी व तिखट लेखणीने करून ते आक्रमण यशस्वीपणे मोडून काढले. परंतु या प्रतिकारानंतरही स्वभाषेत परकीय शब्दांची घाण राहिली आहे. ती राहिली–साहिली घाण धुऊन टाकण्यासाठी झटणे हे स्वभाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक पुरुषाचे कर्तव्य आहे. आज स्वभाषाशुद्धीची निकड अधिक होण्याला मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. अेक कारण परकीयांची – विशेषतः मुसलमानांची – अराष्ट्रीय, घातक महत्त्वाकांक्षा ! अुर्दूसच राष्ट्रीय भाषा आणि पर्शियन लिपीसच राष्ट्रीय लिपी करा, असा दुरभिमान मुसलमानांच्या ठिकाणी बळावत आहे. आणि दुसरे कारण हिंदूंच्या परधार्जिण्या, स्वाभिमानशून्य, चुकलेल्या प्रवृत्तीत आहे. जुन्या मराठी भाषेच्या विपर्यस्त कल्पना हिंदूंच्या ठायी दिसत असून अरबी–फार्शी शब्दबहुल 'शाहिरी' कवितेचे खूळ सर्वत्र पसरत आहे. म्लेंच्छ-भाषादूषित शाहिरी कवितेचे हे अनुकरण मराठी भाषेला मारक ठरत आहे. हजारो मोठमोठे हिंदू लेखक सवयीच्या कैचीत सापडून अुर्दू भाषाच परिपुष्ट करीत आहेत. परंतु सुदैवाने याच वेळी हिंदी, बंगाली, अित्यादी भाषांच्या शुद्धीकरणाचे प्रयत्न सुरू झाले असून परदेशी भाषांच्या कचाट्यातून हिंदू भाषांना मुक्त करण्याच्या आंदोलनाच्या दुंदुभीवर टिपरू पडले आहे. या शुद्धीकरणाच्या चळवळीत महाराष्ट्राने मागे राहता कामा नये. मराठीत निष्कारण घुसलेल्या आणि आता अगदी शिरजोर होअून बसलेल्या मुसलमानी शब्दांची हकालपट्टी केली पाहिजे. अशी हकालपट्टी करताना पूर्वीच्या सवयीमुळे त्रास होअील हे खरे ! पण म्हणूनच आपला निर्धार दुणावला पाहिजे. ज्या वीरोचित वृत्तीने शिवाजी महाराजांनी हे स्वभाषाशुद्धीचे कार्य केले, ज्या स्वराष्ट्राभिमानाने विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी परकीय शब्दांचे अुच्चाटन केले, त्या परंपराधिष्ठित स्वाभिमानाने हे भाषा-शुद्धीचे कार्य मराठी भाषिकांनी करावयास हवे.

सावरकरांनी सांगितलेली 'भाषाशुद्धीचो मूलतत्त्वे' खालीलप्रमाणे होत :

(१) गीर्वाण भाषेतील साराच्या सारा संस्कृत शब्दसंभार आणि संस्कृतनिष्ठ अशा तामीळ, तेलगू ते आसामी, काश्मिरी, गौड, भिल्ल बोलींपर्यंत ज्या आमच्या प्रांतिक भाषाभगिनी आहेत, त्या सर्वांतील मूळचे प्रांतिक शब्द हे सर्व आमच्या राष्ट्रभाषेच्या शब्दकोशाचे मूलधन, स्वकीय शब्दांचे भांडवल होय.

(२) ह्या आपल्या राष्ट्रीय शब्दभांडारात ज्या वस्तूंचे विचारांचे वाचक शब्द होते वा आहेत वा निर्मिता येतात, त्या अर्थाचे अुर्दू, अिंग्रजी प्रभृती परकीय शब्द वापरू नयेत. जर असे परकीय शब्द आपल्या पूर्वीच्या ढिलाअीमुळे आपल्यात घुसले असतील, तर त्यांना हुडकून काढून टाकावे. अद्यतन विज्ञानाची परिभाषा नवेनवे संस्कृत-प्राकृतोत्पन्न शब्द पाडून व्यक्तिविली जावी.

(३) परंतु ज्या परदेशी वस्तू अित्यादी आपल्याकडे नव्हत्या, त्यामुळे ज्यांना आपले स्वकीय जुने शब्द सापडत नाहीत; आणि ज्यांना त्या परकीय शब्दांसारखे सुटसुटीत स्वकीय शब्द काढणे दुर्घट जाते असे, परकीय शब्द मात्र आपल्या भाषेत जसेच्या तसे घेण्यास प्रत्यवाय नसावा. जसे बूट, कोट, जाकीट, गुलाब, जिलबी, बूमरँग, टेबल, टेनिस अित्यादी. तथापि अशा नव्या वस्तू आपल्याकडे येताच त्यांना कोणी स्वकीय नावे देअून ती रुळवून दाखवील, तर अुत्तमच.

(४) त्याचप्रमाणे जगातील कोणत्याही परकीय भाषेत जर अेखादी शैली वा प्रयोग वा मोड ही सरस वा चटकदार वाटली तर तीही आत्मसात करण्यास आडकाठी नसावी.[1]

देवनागरी लिपीत सुधारणा करण्यामागील सावरकरांची भूमिका अेका वाजूने अत्यंत शास्त्रशुद्ध व व्यवहारी असल्याचे आढळून येते. लिपिशुद्धी ज्या कसोटयांवर कार्यवाहीत आणावयाची, त्या कसोटया सावरकरांनी निश्चित केल्या आहेत. त्यांच्या मते नियमबद्धता , अुच्चारानुवर्तित्व, शिक्षणसुलभता, मुद्रणसुलभता, यंत्रक्षमता, सुव्यवहार्यता, परंपरानुकूलता, अित्यादी लिपिशुद्धीच्या कसोटया होत.[2] त्या दृष्टीने पाहिले तर नागरी लिपीत दोन-तीन प्रकारचे दोष आहेत; आणि त्या मानाने ती अशुद्ध आहे. वर्णरचना अशुद्ध नाही. अुलट सर्व जगात आपल्या वर्णमालेची पाणिनीविरचित रचना अत्यंत शुद्ध आहे. पण प्रस्तुत लेखनपद्धती सदोष अतअेव अशुद्ध आहे. अेकाच अक्षराचा अेकच अुच्चार आणि अेका अुच्चारास अेकच अक्षर हे लिपिशुद्धीचे गमक आहे. परंतु नागरीत अेकेक व्यंजन जोडाक्षरादिक प्रसंगी चारपाच प्रकारे लिहावे लागते.....[3] म्हणून हे दोष टाकून आपली लिपी नुसती निर्दोषच नव्हे, तर आजकालच्या मोद्रणिक सुधारणेसही अनुकूल करण्यासाठी आपण तीतील अशुद्ध लेखनप्रचार टाकून उच्चारानुवर्ती असे शुद्ध प्रचार सुरू केले पाहिजेत.[4] मात्र ह्या सुधारणा करताना ही पुरातन लिपीची लिपीच आपणांस बदलावयाची नसून तीस परिस्थितीशी टक्कर देण्यापुरत्या काही सुधारणा काय त्या करावयाच्या आहेत. त्याही अितक्या अल्प की, त्यामुळे तिच्या जीवनैक्यात मुळीच परिवर्तन होणार नाही[5] .....या दृष्टीने परंपरा नि पालट यांच्या समधात समन्वयाचे सूत्र साधारणत: असे सांगता येअील की, ...नागरी लिपीच्या मुळातच अुत्कृष्ट असलेल्या प्रकृतीस , प्रवृत्तीस , प्रौढीस आणि व्यक्तिमत्त्वास लवलेशही धक्का न लावता तिला मुद्रणक्षमतेत, शिक्षण-सुलभतेत नि शास्त्र-शुद्धतेत जगातील आजच्या कोणत्याही लिपीहून संपन्नतर

---

१. भाषाशुद्धी पृ. ११९-१२०. २. ना. लि. आं. पृ. ८९. ३. ना. लि. आं. पृ. ३१. ४. ना. लि. आं. पृ. ३२. ५. ना. लि. आं. पृ. ४८.

करण्यासाठी ज्या अल्पस्वल्प सुधारणा करणे आज अवश्य आहे तेवढ्याच काय त्या करावयाच्या.[1]

नागरी लिपीची मूळ प्रकृती, तिचे व्यक्तिमत्त्व कोणते आणि लिपि-सुधारणेच्या आपल्या आंदोलनाचें अुद्दिष्ट, क्षेत्र व मर्यादा कोणत्या, यांचे स्पष्टीकरण सूत्ररूपाने करताना सावरकरांनी लिहिले आहे. "संस्कृत नि संस्कृतनिष्ठ हिंदी ह्या भाषांतील सर्व अुच्चारांना व्यक्तविण्याचे सामर्थ्य जीत आहे ती वर्णमाला हीच नागरी लिपीची मूळ प्रकृती, व्यक्तिमत्त्व नि व्यक्तिकार्य. त्या तिच्या व्यक्तिमत्त्वाला धरून शिक्षणसुलभता, शास्त्रशुद्धता नि मुद्रणक्षमता ह्यांसाठी जितकी सुधारणा अत्यावश्य तितकी काय ती करणे हे लिपिसुधारणेच्या आंदोलनाचें अुद्दिष्ट, क्षेत्र, मर्यादा."[2]

वरील तत्त्वांच्या आधारे नागरी लिपीत सावरकरांनी ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्या सूत्ररूपाने खालीलप्रमाणे सांगता येतील :

(१) 'अ'ची वाराखडी. (२) जोडाक्षरे फोडून सलग लिहिणे. (३) जुने क, फ, र, ल हे कानायुक्त करून का, फा, ना, असे लिहिणे. (४) अर्धकानाक्षरे म्हणजेच झेंडीवाली अक्षरे (ट, ठ, ड, ढ, छ, द, ह, ळ, ङ.) ही आजच्या प्रघाताप्रमाणे 'अ'कारयुक्त पूर्ण व्यंजने मानणे आणि या झेंडीवाल्यांची जोडाक्षरे त्यांना पायमोड चिन्ह लावून 'द्य' 'ह्य' अशी साधणे. (५) रेफ ओळीत घेणे.[3]

दोन्ही चळवळींमागील राष्ट्रीय दृष्टी आणि हिंदुत्वनिष्ठा

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी या चळवळींमागील सावरकरांची वस्तुनिष्ठ भूमिका आपण थोडक्यात समजावून घेतली. आता या दोन्ही भाषिक चळवळी सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या छापेत कशा वावरत आहेत ते येथे पाहावयाचे आहे.

या चळवळींच्या प्रसारार्थ जे लेखन सावरकरांनी केले आहे, त्याचा सूक्ष्म अभ्यास केला तर असे आढळून येते की, सावरकरांच्या विविध निष्ठा, श्रद्धा, आशा-आकांक्षा , ध्येय अन् मनोवृत्तीच्या विविध छटा त्यात प्रतिबिंबित झाल्या आहेत. हिंदुत्वनिष्ठा ही या सर्व चळवळींचा कणा आहे. सावरकर भाषांचे वर्गीकरण भाषाशास्त्रज्ञाच्या शास्त्रीय दृष्टिकोनातून करीत नाही. पृथ्वीवरील भाषांचे वर्गीकरण करताना व्युत्पत्तीच्या आधारे केले जाणारे वांशिक वर्गीकरण (Geneological) किंवा अन्वित शब्दांच्या परस्परसंबंधांवर आधारलेले प्रकृतिप्रत्ययान्वित

---

१. ना. लि. आं. पृ. २४-२५. २. ना. लि. आं. पृ. १४९. ३. ना. लि. आं. पृ. ८५, १३२.

संग्रहालय. ठाणे.

(Morphological) वर्गीकरण ते करीत नाहीत.[1] तसेच आर्यभाषा किंवा आर्योद्भाव भाषा असे भाषासंघांचे वर्ग ते पाडीत नाहीत.[2] हिंदू भाषासंघ आणि अहिंदू भाषासंघ असेच वर्गीकरण त्यांनी 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या आपल्या ग्रंथात सर्वत्र केले आहे. या वर्गीकरणाच्या आधारेच मराठी भाषेच्या शुद्धीकरणाची पुढील व्याख्या ते देतात. 'हिंदू भाषासंघ सोडून अहिंदू भाषांतील शब्द जुने असोत वा नवे असोत, विनाकारण आणि शक्यतोवर आपल्या भाषेत डोअीजड होअू नयेत ही शुद्धीकरणाची संक्षिप्त व्याख्या आहे[3] सावरकरांनी केलेले हे भाषांचे वर्गीकरण केवळ वरवर नाही. त्याचे समर्थन करण्याअितका तात्त्विक आधार अेखाद्या कोटिक्रमातून ते चटकन देतात. अेका विद्वान माणसाने त्यांना अेका मासिकातून विचारले होते की, 'काय हो, हिंदुभाषासंघ म्हणजे काय ? भाषेला देखील धर्म असतो की काय ? ' त्यावर सावरकरांनी अुत्तर दिले होते, " हिंदुस्थान म्हणजे काय ? स्थानाला – दगडमाती – झाडपाल्यांच्या या साठवणीलाही धर्म असतो की काय ? पण जर तसे काही नसून हिंदू लोक परंपरेने ज्यात राहतात ते स्थान 'हिंदुस्थान' अशा अर्थी आपण (आपल्या लेखात) तो शब्द योजला असाल,तर हिंदू लोक परंपरागत ज्या भाषा बोलतात तो हिंदुभापासंघ, अितके कळण्यापुरताही विद्वत्ता आपल्या अंगी आहेच तर.'[4] सावरकरांच्या या वर्गीकरणामुळेच डॉ. माधवराव पटवर्धनांना त्यांच्या चळवळींत स्वधर्माभिनिवेश आणि स्वजात्यभिमानाचा दर्प येतो.[5]

भाषांच्या वर्गीकरणाप्रमाणे लिपींचे वर्गीकरणही सावरकर याच हिंदुत्ववादी दृष्टीने करतात. नागरी लिपिशुद्धीच्या आंदोलनाचे विवेचन करताना ते देवनागरीचा समावेश हिंदुलिपिसंघात करतात[6]; आणि भाषाशुद्धी नि लिपिशुद्धी यांचा विचार करतानाही अखिल हिंदूंची अेक भाषा आणि अेक लिपी झाली पाहिजे या आपल्या हिंदुत्वाधिष्ठित भापिक ध्येयवादाशी तो विचार नेअून भिडवितात. मराठीतील मुसलमानी परदेशी शब्द काढून टाकण्याचा प्रयत्न हा अुत्तरेतील हिंदी, बंगाली भाषांतील प्रयत्नाप्रमाणे व्हावयास हवा, हा मुद्दा स्पष्ट करताना वर वर्णन केलेला सावरकरांचा ध्येयवाद अधिक प्रकर्षाने दृग्गोचर होतो. सावरकर लिहितात, " म्हणजे आपल्या मराठीचे गद्य व अुत्तर हिंदुस्थानातील हिंदी व बंगालीमध्ये आजकाल प्रौढ दशेत पोचत चाललेल्या आपल्या अितर बंधूंच्या गद्याशी समकक्ष व समरूप होअून व संस्कृतोद्भव अशा अनेक हिंदू भाषा अेकजीव होअून त्यांची पुढे-मागे अेकच हिंदू भाषा करण्याच्या ध्येयाकडे अेक पाअूल पुढे टाकल्यासारखे

---

१. म. भा. उद्गम व विकास पृ. २० २१. २. म. भा. अु. व वि. पृ. २१–२२.
३. म. भा. शु. पृ. ३७–३८. ४. भाषाशुद्धी पृ. ९८–९९. ५. भा. वि. पृ. १४६.
६. ना. लि. आं. पृ. १०२, १०३.

होणार आहे: "[1] लिपिशुद्धीच्या आंदोलनातही सावरकरांची ही अेक हिंदुजगताची दृष्टी सुटत नाही. म्हणून ते लिहितात, " हिंदुसंघटनेच्या दृष्टीनेही सर्व हिंदूंची अेक लिपी करणे, त्यांची अेक राष्ट्रीय भाषा करण्याप्रमाणेच महत्त्वाचे कार्य आहे. "[2] परकीय शब्दांच्या जागी स्वकीय शब्दांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रश्न असो, प्रतिशब्द तयार करण्याचा प्रश्न असो किंवा पारिभाषिक शब्द रूढ करण्याचा प्रश्न असो, सर्वत्र अेकभाषी हिंदुजगताचे ध्येय सावरकरांच्या दृष्टीपुढे असते. 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या ग्रंथाच्या अखेरीस त्यांनी जो लहानसा शब्दकोश जोडला आहे त्यात परकीय शब्दांना स्वभाषेतील प्रतिशब्द देताना मधून मधून सावरकरांनी जे स्पष्टीकरण केले आहे, ते या दृष्टीने अभ्यसनीय आहे. 'जवाबदारी' व 'जबानी' या शब्दांना स्वभाषंतील प्रतिशब्द देताना सावरकरांनी पुढील तळटीप दिली आहे : 'वास्तविक पाहता जबाब, जबानी हे शब्द जिव्हा, जीभ ह्या शब्दांच्याच धातूपासून अुत्पन्न झालेले आहेत, आणि म्हणून वापरण्यास प्रत्यवाय नाही. परंतु अुत्तरेस आपल्या इतर हिंदू भाषा अुत्तरदायी (जबाबदार), दायित्व (जवाबदारी) असे शब्द वापरू लागल्याने आणि ते शब्द अधिक शोभिवंत असल्याने आपणही ते वापरणे भाषैक्याच्या दृष्टीने अधिक हितावह आहे.[3] हिंदी, बंगाली या अुत्तरेकडील भाषांत वापरले जातात म्हणून अितर प्रतिशब्द बाजूस सारून सावरकरांनी भाषैक्याच्या दृष्टीने पुढील शब्दांची प्रशस्ती केली आहे : 'अभिभावक' किंवा 'विश्वस्त'[4] 'प्रतिवाद',[5] 'मानचित्र',[6] 'तालिका',[7] 'अवकाश',[8] 'अनुरोध',[9] 'बंध',[10] 'जलवायू',[11] 'अुपस्थिती'.[12]

स्वकीय शब्द हा हिंदवी भाषासंघांतीलच असला पाहिजे असा सावरकरांचा आग्रह आहे. म्हणून अेखादा शब्द स्वकीय आहे की परकीय आहे हे ठरविण्याची कसोटी सावरकर सांगतात. "जो शब्द मराठी वा हिंदवी भाषासंघात बऱ्याच दीर्घ कालापासून प्रचलित आहे, ज्याची अुत्पत्ती प्राकृत शब्द अुत्पत्तिशास्त्रानुसार संस्कृत वा देशीय धातूपासून साधता येते आणि ज्याच्या कुलकथेचा अितिहास स्वदेशीय अितिहासाहून अधिक विश्वसनीयपणे परदेशीय कोशात सापडू शकत नाही तो तो स्वदेशी – हिंदवी शब्द होय."[13] सावरकरांच्या मते पारिभाषिक शब्द निवडतानाही हीच दृष्टी असली पाहिजे. " आपणांस सर्व हिंदुजगतात अेकच पारिभाषिक शब्द रूढ करावयाचा आहे "[14] आणि " जोपर्यंत सर्वसंग्राहक सामान्य परिभाषा ठरली नाही, तोपर्यंत

---

१. म. भा. शु. पृ. २०. २. ना. लि. आं. पृ. ३०. ३. म. भा. शु. पृ. ८९. ४. म. भा. शु. पृ. ९०. ५. म. भा. शु. पृ. ९१. ६. म. भा. शु. पृ. ९३. ७. म. भा. शु. पृ. ९७. ८. म. भा. शु. पृ. ९८. ९. म. भा. शु. पृ. ९९. १०. म. भा. शु. पृ. १०१. ११. म. मा. शु. पृ. १०२. १२. म. भा. शु. पृ. १०३. १३. श्रद्धानंद १४–४–२७. १४. श्रद्धानंद ९–२–२९.

चालचलाअू कामासाठी नवीन कल्पना आणि विचार प्रदर्शित करण्यास (आपण) जे शब्द योजितो ते योजितानाच प्रथमपासूनच ते संस्कृतोद्भव किंवा हिंदुभाषोद्भव असून श्रुतिसुखद असे योजण्याची सावधानता प्रत्येक लेखकाने ठेविली पाहिजे," अशी स्पष्ट जाणीव ते करून देतात.[१]

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी यावावतची सावरकरांची चळवळ सकृत्दर्शनी प्रतिक्रियात्मक वाटते खरी, पण या चळवळीला सावरकर हिंदुराष्ट्रवादाचा तात्त्विक आधार देतात. हिंदुराष्ट्राच्या पाच अंगांचे वर्णन करताना 'राष्ट्रमीमांसा' या ग्रंथात सावरकर लिहितात, 'हिंदुस्थान, हिंदुजाती, हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती, हिंदुभाषा या पंचकाने वनलेले हे हिंदुराष्ट्र आहे.'[२] या सिद्धान्तानुसार भाषा ही राष्ट्र, जाती, धर्म आणि संस्कृती यांच्याशी किती निगडित आहे, याची जाणीव सावरकरांना करून द्यावयाची आहे; आणि म्हणून सावरकर जेव्हा स्वभाषेवद्दल स्वाभिमानाने बोलू लागतात, तेव्हा माधवराव पटवर्धनांसारख्या टीकाकारांना त्यात 'स्वजात्यभिनिवेशा'चा किंवा 'स्वधर्माभिमाना'चा वास येतो. याच भूमिकेमुळे सावरकरांना स्वभाषेवरील आक्रमण हे हिंदुसंस्कृती, हिंदुधर्म, हिंदुराष्ट्र यांवरील आक्रमण वाटते.

हिंदूराष्ट्रवादाच्या भूमिकेवरून भाषा व लिपी यांच्या आंदोलनाचा विचार सावरकर करीत असल्याने त्यांना हे आंदोलन भाषिक वा भाषाशास्त्रीय स्वरूपाचे वाटत नाही, तर राष्ट्रीय कर्तव्य वाटते.[३] भाषाशुद्धीच्या या आंदोलनामागील त्यांची प्रेरणा मुख्यतः हीच आहे की, हिंदवी स्वाभिमानाच्या लाटेचा अेक ओघ वाङ्मयविभागातही प्रयत्नपूर्वक आणून सोडावयाचा.[४] भारतीय-विशेषतः मराठा-अितिहासाचा अर्थ त्यांनी हिंदुराष्ट्राच्या दृष्टिकोनातून लावलेला आहे आणि म्हणून या भाषाशुद्धीच्या चळवळीचा अुगम हिंदुराष्ट्रसंस्थापक शिवाजीमहाराजांपासून झाला असल्याचे आपले ठाम मत ते पुन्हा पुन्हा सांगतात.[५] त्यामुळे हिंदु राष्ट्रवादाच्या राष्ट्रीय दृष्टीने सावरकरांनी केलेले हे भूतकालाचे निरीक्षण हृदयंगगम असले, तरी; त्यात वास्तवता नाही हे डॉ. माधवराव पटवर्धन यांना साधार स्पष्ट करावे लागले आणि पुढे सांगावे लागले की, "राज्यव्यवहारकोशात त्या काळी पत्रव्यवहारातून रूढ असलेल्या शेकडो फार्शी शब्दांचे संस्कृत पर्याय दिलेले नाहीत. अुलट कित्येक देशी प्राकृत शब्दांचे पर्याय दिलेले आहेत. त्या अर्थी हा कोश मुसलमानी शब्दांचे पर्याय मराठीत योजून भाषेची शुद्धी करावी या हेतूने रचविला गेला असेल असे वाटत नाही."[६] अितिहासाकडे पाहण्याचा हा हिंदुत्वनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे

---

१. म. भा. श. पृ. ४६. २. सह्याद्रि–वीर सावरकर विशेषांक, जून १९४३, पृ. ६७. ३. ना. लि. आं. पृ. ८१. ४. म. भा. शु. पृ. ८०. ५. म. भा. शु. पृ. ६, ७, ३४, ६९. ६. भा. वि. पृ. ७, ८.

भाषिक आंदोलनाचा अन्वयार्थ लावताना सावरकरांच्या हातून आणखीही प्रमाद घडल्याचे पटवर्धनांनी निदर्शनास आणले आहे. नानासाहेब पेशव्यांच्या पत्रात व मोरोपंतांच्या काव्यात फार्शी शब्दांची अुपस्थिती कशी आढळून येते, हे माधवरावांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे.[१] विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा भाषाशुद्धीचा प्रयत्न हिंदुभाषा आणि हिंदुराष्ट्र यांचे अस्तित्व अिष्ट कालपावेतो अक्षुण्ण राखण्याचे न्याय्य कर्तव्य बजाविण्यासाठी होता,[२] हा सावरकरांचा सिद्धान्तही सवळ पुराव्याच्या अभावी सैल वाटतो.

मुसलमानांच्या राष्ट्रघातक महत्त्वाकांक्षेविरुद्ध सावरकरांच्या भाषाशुद्धीचा मुख्य रोख असल्यामुळे मराठ्यांच्या अितिहासाचा अन्वयार्थ सावरकरांनी आपल्या चळवळीला अनुकूल व पोषक कसा लावला आहे हे आपण पाहिले. हा अर्थ लावण्यात सावरकरांचा आणखी अेक हेतू आहे. आपल्या भाषाशुद्धीच्या चळवळीला परंपरेचे अधिष्ठान मिळावे आणि त्या चळवळीला परंपरेतून प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याची ज़ोड मिळावी हा त्यांचा हेतू होय. म्हणूनच लेखकवृंद व शिक्षकवर्ग यांच्यात या चळवळीचा प्रचार करताना ही चळवळ म्हणजे 'श्रीछत्रपतींचे आणि विष्णुशास्त्र्यांचे व्रत' चालविणे होय, असे ते आवर्जून सांगतात.[३] भाषाशुद्धीच्या चळवळीच्या विरोधकांना निरुत्तर करण्यासाठी 'भाषाशुद्धीकरणास स्वयमेव छत्रपतींच्या राज़ाज्ञेचाच आधार आहे' असे अधिकारप्राप्तीचे प्रमाणपत्र दाखवितात.[४] भाषाशुद्धीची चळवळ ही श्रीशिवछत्रपतींच्या वीरोचित भावनेने चालविली पाहिजे अशी चोदना ते देतात.[५] ही पूर्वजांची चळवळ असून आपण केवळ तिचे पुनरुज्जीवन करीत आहोत अशीच भूमिका सावरकरांनी सर्वत्र ठेविली आहे.

भाषाशुद्धीच्या चळवळीत सर्व परकीय शब्द बहिष्कार्य मानावेत असे सावरकर जरी सांगत असले, तरी त्यांच्या विवेचनाचा सर्व भर मुसलमानी शब्दांविरुद्धच आहे ही गोष्ट स्वतः सावरकरच मान्य करतात. "आज मराठी भाषेच्या शुद्धीकरणाची खटपट आम्ही करावी म्हणून म्हणतो, ते शुद्धीकरण विशेषतः या मुसलमानी शब्दांपासून होय," असे ते स्पष्टपणे सांगतात.[६] मुसलमानी शब्दांपासूनच मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याच्या विचारावर भर दिल्याने चिपळूणकरांच्या कार्याचे आणि त्या काळाचे सत्य, वस्तुनिष्ठ स्वरूप ते वाचकापुढे ठेवीत नाहीत. किंबहुना विपर्यस्त स्वरूपातच त्या काळाचे चित्र ते रंगवितात. चिपळूणकरांनी अिंग्रजी भाषेचा हल्ला परतविण्याचे कार्य यशस्वीपणे केले, असा चिपळूणकरांचा गौरव करून

---

१. भा. वि. पृ. ८. २. म. भा. शु. पृ. ३४. ३. म. भा. शु. पृ. ७४.
४. म. भा. शु. पृ. ६९. ५. भाषाशुद्धी पृ. १२७. ६. म. भा. शु. पृ. ८.

सावरकर पुढे म्हणतात,- " अिंग्रजी भाषेचा हल्ला येताच तो परतविण्याची व्यवस्था केली गेली असल्याने वास्तविक पाहता मराठी भाषेचे हे दुसरे शुद्धीकरण करण्यास फारसे प्रयास पडले नाहीत. "[1] परंतु चिपळूणकरांच्या आयुकालानंतरही अिंग्रजी भाषेचे मराठीवरील आक्रमण थांबले तर नव्हतेच, अुलट ते वाढत्या प्रमाणात होते याचे अनेक पुरावे सापडतात. स्वत: सावरकरांनी ज्या १९२५ ते १९३० या काल-खंडात भाषाशुद्धीकरणावर लेख लिहिले, त्याच कालातील दोन नामवंत मराठी साहित्यिकांच्या साक्षी या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. १९२६ साली शारदो-पासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना. अितिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी अिंग्रजी भाषेच्या आक्रमणाने 'मराठी भाषेचा समीपासन्न मृत्यू' कसा टळेल, यावावत चिंतायुक्त कळकळीने विवेचन केले होते.[2] 'अिंग्रजीचा पगडा देशातील तरुणांवर किती फाजील बसला आहे' याची सोदाहरण चर्चा आपल्या भाषणात त्यांनी केली होती.[3] आणि या सर्व विचारमंथनातून पुढील तात्पर्य त्यांनी काढले होते : " लहानमोठ्या सर्व खाजगी संस्थांतूनही देशी भाषांना काट मिळाला आहे; मिळून देशातील सर्व सरकारी, सर्व खाजगी संस्थांचा व्यवहार अिंग्रजीच्या द्वारा होतो; मराठीला कोणी पुसत नाही. हा प्रकार असाच पुढे आणखी अेकदोन पिढ्या चालल्यास, महाराष्ट्राची व सर्व भरतखंडाची खाजगी व सार्वजनिक भाषा अिंग्रजी सहजच होअील आणि मराठी मरून जाअील असा निश्चित अंदाज दिसतो."[4] १९२७ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून श्री. कृ. कोल्हटकर यांनी 'अिंग्रजीवर संपूर्ण बहिष्कार घाला' असा आदेश मराठीच्या संरक्षणार्थ दिला होता.[5] या दोन्ही साहित्यमतंगजांच्या विवेचनातील अतिरेक जरी सोडला, तरी 'अिंग्रजी भाषेचा हल्ला परतविण्याची व्यवस्था केली गेली' असल्याच्या विजयी समाधानात आणि निर्धास्ततेत सावरकर राहू शकतात याचे अेकमेव कारण म्हणजे त्यांचा मुख्य रोख मुसलमानी शब्दांवरच होता हेच होय. अितकेच नव्हे, तर 'आजकाल मराठी भाषेत अिंग्रजी शब्द घुसडू देण्याचा प्रयत्न बराच सुसंगतपणे चालला आहे हे त्यांना स्वत:ला अुघडअुघड दिसत असूनही[6] त्या नजीकच्या अितिहासाचे वस्तु-निष्ठ चित्र ते वाचकांच्या पुढे अुभे करीत नाहीत; आणि या सर्वांचे मूळ सावर-करांच्या हिंदुत्वाधिष्ठित राष्ट्रवादात, त्याला सुसंगत अशा भाषिक ध्येयवादात आहे असेच मान्य करावे लागते.

भाषा आणि लिपी यांचा अंतिम संबंध मानवी मनाशी आहे. मनोगत लिहून ठेवण्याचे साधन म्हणजे लिपी.[7] शब्द ध्वनीचे बनलेले असतात आणि ध्वनीचीच

---

१. म. भा. शु. पृ. ८. २. शारदा विहार पृ. ३१. ३. शारदा विहार पृ. ८.
४. शारदा विहार पृ. १०. ५. को. ले. पृ. ८०२. ६. म. भा. शु. पृ. ११.
७. ना. लि. आं. पृ. ३.

प्रतीके म्हणजे अक्षरे होत.[१] असा हा भाषा व लिपी यांचा संबंध परस्परांशी आत्यंतिक निगडित आहे. भाषेतील शब्दांचे अुच्चार व्यक्त करायला लिपी जेव्हा अपुरी पडू लागते, तेव्हा तिच्या सुधारणेचा विचार लिपिशास्त्रज्ञ करू लगतात. अशा सुधारणेत लेखन व चिन्ह यांच्यात अेकसूत्रीपणा आणून विसंगती दूर करावी, असा शास्त्रीय आणि व्यावहारिक दृष्टिकोन लिपिशास्त्रज्ञांचा असतो. सावरकरांचा दृष्टिकोन असाच आहे काय ? अभ्यासान्ती असे आढळून येते की, नागरी लिपीची सुधारणा करताना सावरकर तिच्याकडे दोन दृष्टींनी पाहतात. अेक म्हणजे ती हिंदुलिपी आहे[२] आणि दुसरी गोष्ट म्हणजे तिला हिंदुस्थानची राष्ट्रलिपी करावयाची आहे.[३] अेक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून ते लिपीसुधारणेच्या प्रश्नाकडे पाहतात.[४] हिंदुसंघटनेच्या संदर्भात विचार करताना सावरकरांना नागरी लिपीत सुधारणा हवी ती सर्व हिंदूंची अेक लिपी करण्यासाठी.[५] मुद्रणसुलभता व शिक्षणसुलभता यांसाठीही लिपिसुधारणा केली पाहिजे हे त्यांना मान्य आहे. ह्या व्यावहारिक सुधारणा जर केल्या नाहीत, तर यांत्रिक अुपयुक्त साधनांचा लाभ तिला घेता येणार नाही आणि त्या मानाने वाङमयप्रचारही होणे कठीण जाते हेही ते सांगतात.[६] पण त्या सुधारणा करण्यासाठी नागरीच्या जीवनैक्यात, तिच्या परंपरागत संस्कृतनिष्ठ स्वरूपात बदल करू देण्यास ते सिद्ध नाहीत.[७] नागरी लिपी ही हिंदुजगतात कित्येक शतकांपासून राष्ट्रलिपी म्हणून मान्यता पावली असल्याने या परंपरेला ते धक्का लावू देत नाहीत.[८] तिचे संस्कृतनिष्ठ स्वरूप परकीय भाषेतील शब्दांनी विकृत होण्याची भीती वाटत असल्याने सावरकर भाषाशुद्धीचा प्रचारही लिपिशुद्धीच्या प्रचाराबरोबरच करतात. भाषाशुद्धीमुळे हिंदी भाषा राष्ट्रभाषा होण्यास योग्य ठरल्यावर 'तिच्या नागरी लिपीत या परकीय अुच्चारासाठी दहा-वीस चिन्हे नि अक्षरे यांची भर टाकण्याचे कारणच अुरणार नाही' असा या दोनही चळवळींचे परस्परावलंबित्व स्पष्ट करणारा विचार ते व्यक्त करतात.[९] पंजाब, युक्तप्रांतातील हिंदूंनी परकीय शब्दांना हिंदीत घुसडून दिल्याने नागरी लिपीवर काय परिणाम झाला, याचे वर्णन करताना सावरकर लिहितात, "त्या शब्दांच्या परकीय अुच्चारासाठी नागरी मुळाक्षरांचा वर, खाली, पोटात, कुशीत अनेक विक्षिप्त चिन्हांच्या सुऱ्या खुपसून आमच्या संस्कृतनिष्ठ लिपीला घायाळ करून टाकले आहे."[१०]

---

१. ना. लि. आं. पृ. ४. २. ना. लि. आं. पृ. २६, ३०, १०२, १०३.
३. ना. लि. आं. पृ. २६. ४. ना. लि. आं. २६, ८१. ५. ना. लि. आं. पृ. ३०.
६. ना. लि. आं. पृ. ३०. ७. ना. लि. आं. पृ. ४८, १२४. ८. ना. भा. आं. पृ. १३७. ९. ना. भा. आं. पृ. १४६. १०. ना. आं. पृ. १४७.

नागरी लिपी मुद्रणक्षम करण्यामागे सावरकरांची विज्ञाननिष्ठाच केवळ अुभी नाही, तर त्यांची हिंदुत्वाधिष्ठित राष्ट्रीय दृष्टी आणि राजकीय दृष्टी या प्रश्नाचा वेध घेते. अुर्दू लिपी मुद्रणक्षमतेत अत्यंत त्रासदायक असल्याने तिचे अुच्चाटन करून तिच्या ठिकाणी रोमन लिपीच्या अुंटाचे पिल्लू आपल्या देशात घुसविण्याचा डाव ब्रिटिश सरकार खेळत आहे, हे सावरकरांच्या राष्ट्रीय प्रवृत्तीस सहन होणे शक्य नव्हते ! या सर्व प्रश्नांचे जे मूलग्राही विवेचन सावरकरांनी केले , त्याचा भावार्थ असा : " हिंदु–मुसलमानांची अेकच राष्ट्रीय लिपी होअील, या भीतीमुळेच सरकार रोमन लिपीची विक्षिप्त योजना पुढे आणीत आहे, हे त्यातील मुख्य बिंग आहे. मुसलमान (आपण) होअून अुर्दू लिपी सोडणार नाहीत. सरकारने कामकाजातून सत्तेच्या बळाने तिची हकालपट्टी केलीच – आणि तिथपर्यंत ते तसेच होवो – तर ते रोमन लिपीला अुर्दू लिपीच्या स्थानी योजण्यास सोडणार नाहीत. .....म्हणजे याचा परिणाम असा होअील की, सर्व अिंग्रजी आणि अुर्दू कामकाज रोमन लिपीत चालू लागल्यामुळे तिच्या अनुयायांची आणि जाणकारांची संख्या नागरीहून मोठी होअून हिंदुस्थानात बहुमत रोमन लिपीकडे झुकू लागेल आणि ह्याचा दुसरा अपरिहार्य परिणाम म्हणजे नागरी भाषाही रोमन लिपीतच लिहावी लागेल. कारण ? जे अुर्दू-विरुद्ध तेच ! नागरी लिपी ही मुद्रणक्षम नसल्याने रोमन लिपीतच सर्व लिखाण असावे असा हट्ट सरकार धरू लागेल आणि आजची नागरी लिपी – जीत आपण मराठी किंवा हिंदी लिहितो ती – रोमन लिपीपेक्षा मुद्रणादिक यंत्रांतून अुपयोग करण्यास अवघड जाते ही गोष्ट खरी असल्यामुळे आपणांस सरकारी कोटिक्रम खुडणे शक्य होणार नाही.....तेव्हा अुर्दू लिपी बंद केल्यानंतर तिच्या ठिकाणी रोमन लिपी चालू करणे अशक्य करून टाकून अुरलेली जी नागरी लिपी तीच हिंदुस्थानची अेकमेव राष्ट्रीय लिपी करावी आणि हा पेच यशस्वी होण्याचे मुख्य साधन म्हणजे नागरी लिपी मुद्रणक्षम करण्यासाठी लिपिशुद्धीची चळवळ आजच यशस्वी करावयाची असा निश्चय आम्ही सर्वांनी केला पाहिजे."[1]

यावरून अेक गोष्ट सिद्ध होते की, नागरी लिपीसुधारणेच्या प्रश्नाकडे सावरकर केवळ मुद्रणसुलभता, शास्त्रशुद्धता, आणि शिक्षणसुलभता या दृष्टीने पाहात नाहीत. सी. आर. देवधर, वैद्य बंधू, शितूत, नानल, विजापुरे, अित्यादी लिपिसुधारकांची दृष्टी प्रामुख्याने व्यावसायिक होती, तर सावरकरांची राष्ट्रीय, राजकीय स्वरूपाची आहे. 'श्रद्धानंदा' तून प्रसिद्ध होणारे राजकीय लिखाण लिपीशुद्धीपेक्षा त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. त्या राजकीय प्रभृती मतप्रचारास महत्त्वाचा अडथळा न होता लिपीशुद्धीच्या कार्यी त्वरा करण्याचे पथ्य ते कटाक्षाने पाळतात.[2] माधवराव पटवर्धन व अितर लिपिसुधारकांप्रमाणे लिपीच्या प्रश्नाचा विचार करताना ते

---

१. ना. लि. आं. पृ. ९२, ९३. २. ना. लि. आं. पृ. ५०.

व्याकरणाचा विचार करीत नाहीत. 'लिपी फक्त अक्षरांच्या रूपांचा विचार करते, व्याकरणाचा नव्हे'[1] अशी त्यांची भूमिका आहे. कै. न. चिं. केळकरांच्या अनावश्यक अनुस्वार गाळण्याच्या निर्धाराचे ते स्वागत करतात ते व्याकरणाच्या दृष्टिकोनातून नव्हे, तर टंक गळले जाऊन मुद्रणसुलभता येते म्हणून आणि मुद्रणसुलभता कशासाठी तर सरकारचा राजकीय पेच हाणून पाडण्यासाठी. अेवंच, लिपीसुधारणेसारख्या कार्यातही सावरकरांचे व्यक्तित्व अशी हुकमत गाजविताना दिसते.

भाषा व लिपिशुद्धीचे अितर पुरस्कर्ते नि सावरकर – तुलनात्मक अभ्यास

भाषा व लिपिशुद्धीचे आंदोलन महाराष्ट्रात अनेक मराठी नेत्यांनी केले. त्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, डॉ. माधवराव पटवर्धन , प्रा. श्री. के. क्षीरसागर यांसारख्या काही नामवंत व्यक्तींचा समावेश करावयास हवा. परंतु सावरकरांचे व्यक्तित्व काही विशिष्ट मूलद्रव्यांनी बनलेले असल्यामुळे त्यांची वरील दोन्ही आंदोलने अगदी वेगळी वाटतात. या व्यक्तींचा सावरकरांशी साम्य-विरोध दर्शवून सावरकरांचे आंदोलन त्यांच्या स्वत:च्या व्यक्तित्वामुळे वेगळे कसे झाले, हे आता पाहावयाचे आहे.

(अ) विष्णुशास्त्री चिपळूणकर व सावरकर

सावरकरांची भाषाशुद्धीची चळवळ विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या प्रेरणेनेच प्रवर्तित झाल्याचे स्वत: सावरकरांनी सांगितले आहे. त्यामुळे चिपळूणकर-सावरकर यांच्यांत अनेक बाबतींत साम्य दिसून येते. चिपळूणकरांप्रमाणे सावरकर भाषा हे देशाचे अुत्कर्षाचे अेक प्रभावी साधन मानतात. 'परभाषादूषणरूपी क्षयाचे बीज'[2] स्वभाषेत रुजू नये म्हणून शास्त्रीबुवांप्रमाणे सावरकरांची धडपड चालू आहे. मराठी भाषेच्या अवनतीची दोघांनी सांगितलेली 'स्वाभिमानशून्यदृष्टी',[3] 'स्वभाषेची अुपेक्षा',[4] 'शेळपट परधार्जिणेपणा'[5] अित्यादी कारणे जवळजवळ सारखीच आहेत. दोघांनाही स्वभाषेच्या सामर्थ्याचा यथार्थ अभिमान आहे. 'जी भाषा बोलणाऱ्यांनी दिल्ली–अटकेपर्यंत आपले झेंडे नेअून लावले.....त्या भाषेस आवेश, गांभीर्य, सरसता, या गुणांकरता कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाही,'[6] असे चिपळूणकर सांगतात. तर 'राष्ट्रकूटांचा गोविंद, श्रीमान अमोघवर्ष किंवा दिग्विजयी पुलकेशी आणि त्याचे अप्रतिहत प्रतापी सैन्य ज्या भाषेत

---

१. ना. लि. आं. पृ. ६६, ७०. २. निबंधमाला पृ. ३. ३. निबंधमाला पृ. २.
४. निबंधमाला पृ. ३. ५. म. भा. शु. पृ. ६६. ६. निबंधमाला पृ. २.

बोलत होते ती भाषा बेंगरुळ, ढिली आणि गचाळ असणे शक्यच नव्हते'[1], अशी सावरकरांची सार्थ निश्चिती आहे. भाषाशुद्धीबाबत चळवळ करताना 'अिंग्रजी भाषेबद्दलचा द्वेष 'चिपळूणकरांच्या मनात नव्हता.[2] सावरकरांनीही आपली चळवळ द्वेषमूलक नसल्याची निश्चिती पटविण्यासाठी सविस्तर विवेचन केले आहे.[3] दोघांचाही ओढा संस्कृत भाषेकडे अधिक असल्याचे दिसते. अुत्तम भाषेची कसोटी सांगताना दोघांनीही शब्दगत 'कर्णमधुरता'[4], 'वर्णसौंदर्य',[5] 'श्रुतिमंजुलता'[6] 'श्रुतिसुखदत्व'[7] अित्यादी सारख्याच कसोट्या सांगितल्या आहेत. 'पारिभाषिक शब्दांची तजवीज करण्यासाठी संस्कृत भाषेचे साह्य' घ्यावे असे दोघांचेही मत आहे.[8] अिंग्रजी भाषा ही 'मराठीच्या अभिवृद्धीस आधार' असून 'काही वेताचे अिंग्रजी शब्द मराठीत घेतले असता' तीस अपाय न होता तिचे हितच होअील,[9] अशीच दोघांचीही धारणा आहे. मात्र असे शब्द घेताना त्यांस मूळच्या भाषेहून शिरजोर होअू देता कामा नये',[10] असा अिशारा दोघेही आवर्जून देतात. परभाषेचे हे साह्य हेर्स्टिग्जच्या 'सबसिडिअरी अलायन्स'-सारखे नसावे असे अुदाहरण चिपळूणकर देतात,[11] तर 'हिंदुपदपादशाही 'तील पेशवाअीत रमलेले सावरकर हे परभाषेचे साह्य 'नारायणरावांच्या गार्द्यांसारखे प्राणघातक' नसावे असे सांगतात.[12] परकीय भाषेचे वा शब्दांचे अनुकरण अथवा ग्रहण कोठपर्यंत करावे, याबाबतही चिपळूणकर सावरकर यांच्यांत विचारसाम्य दिसते. चिपळूणकर लिहितात, "ज्या कल्पना आपणांत पूर्वी नव्हत्या, त्यांचे द्योतक शब्द, ते जरी अगदी नवे बनवले आहेत तरी, ते ग्रंथात घालण्यास हरकत नाही. जे नवे संप्रदाय अलीकडे प्रचारात आले आहेत, तेही आपणांत पूर्वी नसल्यामुळे आहेत तसेच ठेवण्यास काही चिंता नाही." सावरकरांनी पुढील शब्दांत हेच सांगितले आहे : "बाहेरचे शब्द तरच स्वभाषेत येअू द्यावेत वा आले असता टिकू द्यावेत की, जर त्या शब्दांनी व्यक्त होणारी कल्पना काही केल्या आपल्या शब्दांनी व्यक्त होअू शकत नसेल[13]... (तसेच) विशिष्ट वस्तूंचे विशेष नामाप्रमाणे असणारे किंवा ज्यातील खोच वा सुटसुटीतपणा आपल्या भाषांतून व्यक्त करणे अशक्य आहे, ते विदेशी शब्द स्वीकारण्यास मात्र काही प्रत्यवाय नाही."[14]

---

१. म. भा. शु. पृ. ४०. २. निबंधमाला पृ. ६. ३. म. भा. शु. पृ. ३१, ३२, ३३, ३४. ४. निबंधमाला पृ. ६. ५. निबंधमाला पृ. ६. ६ म. भा. शु. पृ. ३१. ७. म. भा. शु. पृ. ४६, ४७. ८. निबंधमाला पृ. १०३. ९. निबंधमाला पृ. १०४, १०५. १०. निबंधमाला पृ. १०५. ११. निबंधमाला पृ. १०४. १२. म. भा. शु. पृ. ७४, ७५. १३. म. भा. शु. पृ. ५१. १४. म. भा. शु. पृ. ६२.

चिपळूणकर-सावरकर यांच्यांत भाषाशुद्धीबाबत अितके विलक्षण साम्य असूनही काही बाबतींत जो विरोध दिसतो तो दोघांच्या भिन्न व्यक्तिमत्त्वामुळेच होय. सावरकरांनी हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वाचे अधिष्ठान ज्या मूलभूत तत्त्वांनी सिद्ध केले होते, ती तत्त्वे चिपळूणकरांच्या विचारसरणीत कोठेच दिसत नाहीत. हिंदुराष्ट्र हे सावरकरांचे राष्ट्रीय ध्येय आहे आणि संस्कृतनिष्ठ हिंदीला राष्ट्रभाषेचे स्थान प्राप्त करून देणे हे सावरकरांचे भाषिक ध्येय आहे. त्यामुळे सावरकरांची भाषाशुद्धीची चळवळ नवा घाट घेते. आपल्या या राष्ट्रीय ध्येयानुसार ते अितिहासाचा अर्थ लावतात आणि भाषिक चळवळीची पूर्वपीठिका सांगतात. हिंदवी-राज्य संस्थापक श्रीशिवाजीमहाराज यांच्यापासून भाषाशुद्धीची परंपरा सुरू झाली असे सांगून मोरोपंतादिकांनी समर्थिलेली ही परंपराच नि त्यांचे ते भाषाशुद्धीचे कार्यच आपण पुढे चालवीत आहोत अशा अैतिहासिक पारंपर्याच्या सामर्थ्याची जोड ते आपल्या चळवळीला देतात. 'हिंदुसंघटनेच्या विविध अुपांगातील अेका अुपांगाच्या पुरस्कारार्थ' आपण ही सेवा करीत आहोत, अशी या चळवळीमागील सावरकरांची भूमिका आहे.[1] चिपळूणकरांचा निखळ मराठी भाषाभिमान त्यांच्या चळवळीत दिसत नाही. मुख्यतः दिसतो तो हिंदुभाषाभिमान ! मुसलमानी आक्रमणाने मराठीच नव्हे, तर सर्व हिंदुभाषा मरतील अशी सावरकरांना जास्त भीती वाटते.[2] अितर हिंदुभाषा आणि मराठी भाषा-यांच्यांत श्रेष्ठ-कनिष्ठतेचा क्रम लावावयाचा झाल्यास 'राष्ट्रीय भाषेस मराठीचा अेकदम बळी देण्यास आम्ही सिद्ध आहोत' अशी घोषणा ते करतात.[3] सावरकरांच्या या व्यापक राष्ट्रीय व भाषिक ध्येयामुळे भाषाशुद्धीकरणाची व्याख्या आणि अिंग्रजी, अुर्दू शब्दांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन या दोन्ही गोष्टी चिपळूणकरांपासून अगदी भिन्न झाल्या आहेत. सावरकरांनी केलेल्या व्याख्येनुसार 'हिंदुभाषासंघ सोडून अहिंदू भाषांतील शब्द विनाकारण आणि शक्यतोवर, आपल्या भाषेत डोअीजड होअू देअू नयेत' असे त्यांचे धोरण आहे.[4] या व्याख्येत 'हिंदुभाषासंघ' आणि 'अहिंदुभाषासंघ' अशी सावरकरांनी केलेली विभागणी चिपळूणकरांच्या विवेचनात स्पष्टपणे कोठेच दिसत नाही. चिपळूणकरांचा मुख्य रोख आहे अिंग्रजीवर. ही अिंग्रजी भाषा आमच्यात मिसळण्याने 'मराठी मात्र नामशेष होअील' अशी भीती ते व्यक्त करतात. परंतु 'मुसलमानांच्या भाषेने आपल्या भाषेत झोकदारपणा व आवेश हे गुण मात्र जास्त आले' असे सांगून 'त्या भाषेच्या मिसळण्याने आपल्या भाषेचे अहित न होता हितच झाले' यात त्यांना तिळमात्र संशय वाटत नाही.[5] अुलट सावरकरांना 'अुर्दू शब्दांचा मुसलमानी स्पर्श

---

१. म. भा. शु. प्रस्तावना पृ. ३. २. म. भा. शु. पृ. ६. ३. म. भा. शु. पृ. ३५. ४. म. भा. शु. पृ. ३७–३८. ५. निबंधमाला पृ. ५.

प्राणघातक' वाटतो.[१] 'आरबी शब्द दक्षिणेत मुसलमानांचे जोपर्यंत प्राबल्य होते, तोपर्यंतच होते; ' आणि 'फारसी भाषेचा संबंध पेशव्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंतच असून तेव्हापासून नाहीसा झाला आहे' असे चिपळूणकरांचे मत आहे.[२] तथापि सावरकरांना तसे वाटत नाही. त्यांच्या मते 'मुसलमानी शब्दांचे वर्चस्व मराठीवर अितके भयंकर व अितके दीर्घकालपर्यंत टिकले की, त्यांची हकालपट्टी करण्याचे प्रयत्न पूर्वी झाले असताही . . . . आज पुनः तेच करणे अपरिहार्य होअून बसले आहे."[३] अितकेच नव्हे, तर– "ते मुसलमानी शब्द आता शिरजोर होअून बसले असून या मुसलमानी शब्दांची घाण धुअून काढण्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही," असा सावरकरांचा दावा आहे.[४] फारसी, अरबी शब्दांबद्दल दोघांची ही परस्परविरुद्ध मते, ते शब्द बोलणाऱ्या जातीकडे पाहण्याच्या भिन्न दृष्टिकोनांची निदर्शक आहेत. मुसलमानांची राजकीय, धार्मिक व भाषिक महत्त्वाकांक्षा हिंदू राष्ट्राला कशी घातक आहे हे सावरकरांनी अनेक अुदाहरणे देअून स्पष्ट केले आहे. यासंबंधी सर्व विवेचन पूर्वभागात योग्य स्थली केलेच आहे. 'विष्णुशास्त्री अुर्दू शब्दांविरुद्ध का नव्हते ?' यासंबंधी स्पष्टीकरण करताना सावरकरांनी चिपळूणकरांच्या हातून अुर्दू शब्दांबाबत अेवढे दुर्लक्ष का झाले, याची कारणमीमांसा केली आहे. सावरकर लिहितात, " अुर्दूची घातक मगरमिठी सर्व हिंदुभाषांसह मराठीसही बसण्याची कधी काळी वेळ येअील आणि अुर्दूसच राष्ट्रभाषा करा असा दुराग्रह अुघडपणे धरण्याअितकी मुसलमानी महत्त्वाकांक्षा चढेल होअील, हे शास्त्रीबुवांच्या काळी कोणाच्याच फारसे लक्षात येण्यासारखे नव्हते. जे अुर्दू शब्द घुसले ते घुसले, आता राजसत्ता बदलल्याने तो पेच सुटला आहे म्हणून दुर्लक्ष केले तरी चालेल, परंतु जिचा पगडा राजसत्तेच्या आधाराने मराठीवर पूर्णपणे बसण्याची भीती अुत्पन्न होत आहे, त्या अिंग्रजी भाषेच्या गुप्त आक्रमणाकडे मात्र कडक लक्ष दिले पाहिजे, असे त्यांस साहजिकच वाटले."[५] सावरकरांची ही मीमांसा, सावरकरांचे निश्चित असे राष्ट्रविषयक तत्त्वज्ञान, भाषिक ध्येयवाद आणि व्यक्तिस्वभावातील रागद्वेष यांतून केली गेली आहे असेच मान्य करावे लागेल. राष्ट्रवादाच्या या घट्ट पिळामुळे सावरकरांच्या भाषिक ध्येयांच्या विचारसरणीत कुठेच लेचेपेचेपणा, सैल विधाने वा संदिग्धपणा नाही. पारिभाषिक शब्द संस्कृतातून घ्यावेत अेवढेच चिपळूणकर सुचवतील, तर ते शब्द 'हिंदुभाषोद्भव' असावेत असा ठसठशीत शब्द सावरकर वापरतील. 'लांबलचक नव्या मराठी शब्दांपेक्षा (आहेत) ते अिंग्रजी शब्द बरे' असा क्वचित पडखाअूपणा चिपळूणकर दाखवितील,[६] तर शब्दांच्या वापराबाबत स्वदेशी अतिरेक झाला तरी तो

---

१. म. भा. शु. पृ. १८. २. निबंधमाला पृ. ४. ३. म. भा. शु. पृ. ८.
४. म. भा. शु. पृ. ११. ५. म. भा. शु. पृ. ६८–६९. ६. निबंधमाला पृ. ९६.

सावरकरांना अनुकरणीय वाटेल.[१] चिपळूणकरांपासून भाषाशुद्धीची मूळ प्रेरणा घेऊनही चिपळूणकरांच्या विचारांचा परामर्श घेताना सावरकरांचा प्रखर बुद्धिवाद 'बाबावाक्यं प्रमाणवत्' मानीत नाही असेच दिसून येते.[२]

(ब) सावरकर-पटवर्धन

सावरकरांनी भाषाशुद्धीची मूळ प्रेरणा चिपळूणकरांपासून घेतली होती, तरी त्यांच्या भिन्न निष्ठा, ध्येये आणि मते यांमुळे चिपळूणकरांपेक्षा सावरकरांची चळवळ कशी वेगळी दिसून येते, हे आपण पाहिले. भाषाशुद्धीची चळवळ करणारे आणखी अेक प्रमुख महाराष्ट्रीय म्हणजे डॉ. माधवराव पटवर्धन होत. डॉ. पटवर्धन सावरकरांपेक्षा वयाने कनिष्ठ पण त्यांच्या समकालीन असे भाषासुधारक होते. सावरकरांच्या भाषाशुद्धी व लिपिशुद्धिविषयक लेखांच्या वाचनातून पटवर्धन या विषयाकडे ओढले गेले.[३] प्रारंभी सावरकरांचे विरोधक आणि नंतर भाषाशुद्धीचे प्रचारक अशा दोन्ही भूमिकांतून पटवर्धनांनी आपले लेखन केले आहे. भाषाशुद्धीच्या प्रश्नावर काही बाबतींत दोघांचे अितके विचारसाम्य होते की, प्रा. क्षीरसागरांसारख्या त्यांच्या विरोधकालासुद्धा 'खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी, अर्थात सावरकर आणि पटवर्धन' अशा शब्दांच्या अेकाच माळेत त्या दोघांना गोवण्याचा मोह टाळता आला नाही.[४] दोघांना मराठी भाषेबद्दल आत्यंतिक अभिमान आहे. विदेशी शब्दांचा अुपयोग स्वभाषेचा क्षय करणारा आहे, असे दोघांनाही वाटते.[५] परभाषेचा स्वीकार हे स्वकीयांच्या 'स्वाभिमानशून्यतेचे लक्षण' होय;[६] किंवा स्वकीयांची 'परघार्जिणी वृत्ती' होय, असे दोघांचे मत आहे.[७] 'भाषैक्याचे ध्येय सावरकरांप्रमाणेच माझ्याही पुढे आहे' असे पटवर्धनच मान्य करतात.[८] कौटुंबिक साधर्म्याचे अैक्याचे द्योतक म्हणून स्वभाषेचे महत्त्व दोघेही जाणतात.[९] अिंग्रजी, फारसी आणि आरबी या परभाषांतील शब्दांकडे पाहण्याचा दोघांचा दृष्टिकोन बव्हंशी सारखाच दिसतो. अिंग्रजीच्या मराठीवरील गुप्त माऱ्याची भीती दोघांना वाटत होती.[१०] अिंग्रजी शब्दांच्या आक्रमणामुळे 'मराठीतील प्रतिशब्द मागे पडून नष्ट होण्याचा संभव आहे; मराठीच्या सर्गशक्तीस अपाय होत आहे' याबाबत दोघांचेही मतैक्य होते.[११] अुर्दू भाषेस हिंदुस्थानची राष्ट्रभाषा संबोधण्याचे प्रयत्न मुसलमानांकडून

---

१. म. भा. शु. पृ. ६३. २. म. भा. शु. पृ. ६९. ३. भा. वि. पृ. १, २, ३५. ४. भा. वि. पृ. ५१. ५. भा. वि. पृ. ४८. ६. भा. वि. पृ. १८, ७८. ७. म. भा. शु. पृ. ६६. ८. भा. वि. पृ. ३९. ९. भा. वि. पृ. २२. १०. भा. वि. पृ. १५. ११. भा. वि. पृ. १७.

वाडसाने चालू आहेत, असे सावरकरांप्रमाणे पटवर्धनांच्याही लक्षात आले होते.[१] स्वदेशी शब्दसंपत्तीचा अुपयोग न करता मुसलमानांनी अिराण-अफगाणिस्थानाकडे वाव घेतली, दुजा भाव ठेवला आणि अुर्दूला मातृभाषा मानण्याची चूक केली , असे सावरकरांच्याप्रमाणेच पटवर्धनही स्पष्टपणे बजावतात.[२] "अल्पसंख्य अशा फारसी शब्दांनीसुद्धा मराठी शब्दांना मृत्युपंथास लावले आहे" हे सावरकरांचे मत आपणांस अनुभवाने पटले असल्याची कबुली पटवर्धनांनी दिली आहे.[३] "फार्सी शब्दांवाचून मराठी भाषा नेभळट होअील" असे सावरकरांना तर वाटत नाहीच, पण पटवर्धनांनाही वाटत नाही.[४] उर्दूचे पौरुष आपल्या अंगात टोचून घेतल्याविना मराठीला बलवान राहताच येणार नाही, ही कल्पना कशी चुकीची आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न सावरकर आणि पटवर्धन करतात.[५] 'मुसलमानांच्या भाषेने आपल्या भाषेत झोकदारपणा व आवेश हे गुण आले' हे चिपळूणकरांचे विधान दोघांनाही मान्य नाही. अुलट भाषा बोलणारांच्या पराक्रमावर भाषेचा आवेश अवलंबून असतो[६] अथवा भाषा बोलणाऱ्यांच्या जिवंत राजकारणाने शब्दांत वीररस येतो,[७] या मुद्यावर दोघांचेही संपूर्ण अेकमत दिसून येते.

साधर्म्याचे अितके मुद्दे असूनही पटवर्धन-सावरकर यांच्यातील विरोध हा त्यांच्या भिन्न व्यक्तिमत्त्वाचाच परिपाक असल्याचे आढळून येते. अस्पृश्यांच्या शुद्धिकार्याची चळवळ करणारे सावरकर मुसलमानी शब्दांच्या स्पर्शाने अशुद्ध झालेल्या स्वभाषेला पुन्हा स्वधर्मीयांत प्रस्थापित करण्याच्या भूमिकेतून 'भाषा-शुद्धी' असा शब्दप्रयोग करतात. पटवर्धनांना हा शब्दप्रयोग अिंग्रजीतील 'प्युरिझम' या शब्दाचे निवळ भाषांतर वाटते. त्यांना तो शब्द मान्य नाही. कारण 'धर्मशुद्धी या अर्थी शुद्धी हा शब्द स्वीकारवाचक आहे, तर भाषाशुद्धीमध्ये तो बहिष्कारवाचक होतो व त्या शब्दामुळे घोटाळा होतो' असे पटवर्धनांना वाटते.[८] पटवर्धनांचा रोष कोणत्याही अेखाद्या जमातीच्या वा राष्ट्राच्या भाषेवर नाही तर सर्व परकीय शब्दांवर आहे.[९] सावरकरांच्या आणि आपल्या भूमिकेतील फरक सांगताना पटवर्धनांनी लिहिले आहे : "अिंग्रजी-फार्सी शब्दांचा बहिष्कार ....हे अेक तात्पुरते साधन आहे, साध्य नव्हे. खरे अुद्दिष्ट याहून व्यापक नि निराळे आहे. ही भाषाविषयक जागृती आहे, स्वाभिमान नि स्वावलंबन या दृष्टीने ही भाषेची पाहणी नि पुढील मार्गाची आखणी आहे. यात स्वभाषाभिमान आहे, स्वदेशाभिमान आहे, पण स्वजात्यभिमान कोठेही नाही. श्री. विनायकराव

---

१. भा. वि. पृ. २४, २५. २. भा. वि. पृ. ३७. ३. म. भा. शु. पृ. ३०.
४. म. भा. शु. पृ. ११. ५. म. भा. शु. पृ. ३८. ६. भा. वि. पृ. १४.
७. म. भा. शु. पृ. १२. ८. भा. वि. पृ. १३७. ९. भा. वि. पृ. १३७.

सावरकर हिंदुधर्माभिमानी आहेत, मलाही स्वधर्माभिमानशून्यता हे काही सुसंस्कृतपणाचे किंवा राष्ट्रीयत्वाचे द्योतक आहे असे वाटत नाही. तथापि भाषाशुद्धी प्रकरणी सावरकरांची दृष्टी जशी स्वधर्माभिनिवेशाची आहे, तशी माझी नाही; माझी दृष्टी स्वाभिमानी, स्वभाषासमुन्नतीची आहे"[1] 'सावरकरी भाषा शुद्धीची चिकित्सा' करताना पटवर्धनांनी दोघांच्या भूमिकेतील विरोध अधिक स्पष्ट केला आहे आणि तो विरोध दोघांचे ध्येय अेकच असूनही भिन्न दृष्टिकोनांमुळे कसा निर्माण झाला आहे याचे स्पष्टीकरण केले आहे. डॉ. पटवर्धन लिहितात:– "मराठी भाषेचे शुद्धीकरण हे सावरकरांना हिंदुसंघटनेच्या विविध अुपांगांतील अेक अुपांग वाटते, तसे ते मला वाटत नाही. हिंदूंची संघटना मलाही हवी आहे, परंतु तिच्यासाठी भाषेतून मुसलमानी शब्दांची हकालपट्टी करण्याची सुतराम आवश्यकता नाही. स्वार्थत्यागी प्रेम केल्याने, ममत्वाची व्याप्ती वाढविल्याने, धर्माचा खोल विचार केल्यानेच ही संघटना सिद्ध होअील.... सावरकरांची चळवळ हिंदुसंघटनेसाठी हिंदुधर्माभिमानावर अुभारलेली आहे; आणि ते त्या चळवळीला मराठी भाषेचे शुद्धीकरण म्हणतात. माझी खटपट स्वत्वसंरक्षणाची अंसून ती स्वभाषाभिमानावर अुभारलेली आहे, म्हणून मी माझ्या अुद्योगाला स्वकीयांचा पुरस्कार आणि अुद्धार म्हणतो. भाषांचे हिंदू आणि अहिंदू असे वर्ग मी करीत नाही. तर मराठी आणि अमराठी असे दोन वर्ग कल्पितो. मला मुसलमानी शब्दांची घाण येत नाही. सावरकर यांना 'अुर्दू शब्दाचा मुसलमानी स्पर्श प्राणघातक' वाटतो, तर मला सर्वच विदेशी शब्दांचा स्वीकार हा प्राणघातक वाटतो."[2]

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होअील की, अिंग्रजीच्या गुप्त माऱ्याची जाणीव असूनही आणि मुसलमानांच्या भाषाविषयक दुष्ट महत्त्वाकांक्षेची कल्पना असूनही धर्म व जाती यांच्या अभिनिवेशाच्या अभावी पटवर्धनांच्या चळवळीत व्यापक दृष्टी दिसते. सावरकरांचे राग-द्वेष विशिष्ट जातीवद्दल तीव्र आहेत आणि त्याचा परिणाम त्यांच्या चळवळींवर होतो. पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे, "सावरकरांच्या या चळवळींची अुभारणी ही हिंदी मुसलमानांच्या अहिंदी धर्मवेडामुळे वाटणाऱ्या संतापावर" झालेली आहे[3]. मुसलमानांवरील या संतापामुळे सावरकरांना मुसलमानी शब्दांचा स्पर्श प्राणघातक वाटतो. अुलट प्रेमाधिष्ठित व व्यापक भूमिकेमुळे 'मराठी भाषेचे स्वरूप कसे असावे, हे केवळ हिंदूंनीच ठरवावयाचे नाही' असे पटवर्धनांना वाटते.[4]

---

१. भा. वि. पृ. १४६, १४७. २. भा. वि. पृ. ३७, ३८. ३. भा. वि. पृ. २.
४. भा. वि. पृ. ३९.

सावरकर भारतीय अितिहासाचा–विशेषत: मराठ्यांच्या अितिहासाचा अर्थ हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने लावतात. म्हणून भाषाशुद्धीचा श्रीशिवाजीमहाराजांनी केलेला प्रयत्न त्यांनी अनुकरणीय वाटतो. मराठ्यांच्या अितिहासाकडे पाहण्याचा वास्तव दृष्टिकोन पटवर्धन स्वीकारतात. त्या दृष्टीने ते अितिहासाचे समालोचन करतात. शिवरायांच्या हस्ते भाषाशुद्धीकरणाचा आरंभ करून सावरकरांनी ते चित्र जरी हृदयंगम केले असले, तरी पटवर्धनांची शोधक दृष्टी त्या चित्राचे वास्तव स्वरूप अुघडे करते. पटवर्धन लिहितात "राज्यव्यवहारकोशात त्या काळी पत्र-व्यवहारातून रूढ असलेल्या शेकडो फार्सी शब्दांचे संस्कृत पर्याय दिलेले नाहीत; अुलट कित्येक देशी प्राकृत शब्दांचे पर्याय दिलेले आहेत. त्या अर्थी हा कोश मुसलमानी शब्दांचे पर्याय मराठीत योजून भाषेची शुद्धी करावी, या हेतूने रचविला गेला असेल असे वाटत नाही"[1] पटवर्धनांचे हे विधान सावरकरांनीही आडवळणाने मान्य केल्याचे दिसते. 'राज्यव्यवहारकोश' आजच्या परिस्थितीत मराठीस साहाय्य होणारा नाही याचे कारण सांगताना सावरकरांनी म्हटले आहे की, 'विदेशी शब्दांसह कित्येक प्राकृत शब्दांचाही त्यात समावेश करून त्यांस संस्कृत प्रतिशब्द देण्यात आलेले आहेत.'[2] तेव्हा 'विबुधभाषां वितनितुं' या ध्येयाने लिहिलेला राज्यव्यवहारकोश 'स्वभाषेस विदेशी शब्दाक्रमणापासून बचाविण्यासाठी' लिहिला असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही असे पटवर्धनांना वाटते. पटवर्धनांनी नेमके याच विसंगतीवर बोट ठेवले आहे. अेवढीच विसंगती दाखवून पटवर्धन थांबले नाहीत. सावरकरांनी केलेल्या अेका अवास्तव विधानाच्या संदर्भात त्यांनी अैतिहासिक कागदपत्रांचा सूक्ष्म अभ्यास केला. सावरकरांनी असे विधान केले होते की, शिवाजीमहाराजांच्या भाषाशुद्धीच्या प्रयत्नाचा परिणाम हळूहळू होअून 'नानासाहेब पेशव्यांच्या अुत्तर हिंदुस्थानातील पत्रांत व अंती मोरो-पंतांच्या शुद्ध, सरळ व म्लेंछ शब्दसंपर्काने अकलुषित असलेल्या सुंदर कवितेत दिसून येणारे शुद्ध स्वरूप मराठीस लाभू लागले.'[3] नानासाहेब पेशव्यांची पत्रे व मोरोपंतांचे काव्य यांचा अभ्यास केल्यानंतर पटवर्धनांना असे आढळून आले की, नानासाहेब पेशव्यांनी आपल्या पत्रातील सहा शब्दांच्या अेका वाक्यात अेकच शब्द मराठी वापरलेला होता.[4] (ते वाक्य असे – 'शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रुस्तुमीची'). 'केकावली' या काव्यात मोरोपंतांनी फार्सी शब्द ९० हून अधिक वापरले होते.[5] याच वास्तव दृष्टिकोनातून मराठ्यांच्या सर्व अितिहासाचे आलोडन पटवर्धनांनी केल्यावर त्यांना असे आढळून आले की, हिंदवी स्वराज्यात असा शुद्धीकरणाचा जाणीवपूर्वक प्रयत्न राज्यकर्त्यांनी केलेला नाही.

---

१. भा. वि. पृ. ७, ८. २. म. भा. शु. पृ. ७८. ३. म. भा. शु. पृ. ७.
४. भा. वि. पृ. ८. ५. भा. वि. पृ. ८.

ग्रंथ संग्रहालय, ठा... 03902 वि: ५६१ निबंध 9643 2111७९

व अुलट मराठी राज्यकर्ते 'समशेरबहादुरा' सारखी परभाषेतील बिरुदे मिरवताना दिसतात.[1] मुसलमानांनी दिलेली गावांची नावेही हिंदवी राज्यात बदललेली दिसत नाहीत. "दौलताबादची पुन्हा देवगिरी झाली नाही."[2] राजकारणी लोकांच्या पत्रव्यवहारात शेकडा तीसचाळीस फार्सी शब्द आढळून येतात.[3] अेका विजिगीषू राष्ट्राची स्वभाषा म्हणून मराठी भाषेची जशी अुन्नती आणि जोपासना करावयाला हवी होती तशी (मराठी लोकांकडून) कधीच करण्यात आल्याचे दिसत नाही.[4] जेते झाल्यावरही मराठी लोक पूर्वीच्या अितकेच मराठीविषयी अुदासीन राहिले.[5]

अेकाच अितिहासाचे सावरकर-पटवर्धन यांनी हे जे भिन्न अर्थ लावले आहेत ते त्यांच्या भिन्न व्यक्तित्वाचीच साक्ष देत नाहीत का ?

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी याबाबत सावरकर-पटवर्धनांनी केलेल्या लेखनातून त्या दोघांच्या भिन्न व्यक्तिमत्त्वावर आणखीही प्रकाश पडतो. पटवर्धनांच्या लेखनाला सावरकरांच्या लेखांचा आधार असला, तरी व्यासंगी अभ्यासक म्हणून पटवर्धनांचे व्यक्तिमत्त्व अुठून दिसते. 'सावरकरी भाषाशुद्धीची चिकित्सा' करून पटवर्धनांनी सावरकरांच्याच शुद्धीकरणावरील ग्रंथातील ९८ विदेशी शब्द निवडून आपली चिकित्सक बुद्धी प्रकट केली आहे.[6] 'भाऊसाहेबांच्या बखरीतील' अुतारा असो, किंवा कै. नरसोपंत केळकरांच्या लेखातील अेखादा परिच्छेद असो, त्यामागे पटवर्धनांचे व्यासंगी अभ्यासकाच्या वृत्तीने विलसणारे व्यक्तित्व अुभे असते.[7] पटवर्धनांनी तत्त्वचिकित्सा व तत्त्वप्रतिपादन अधिक काटेकोर केले आहे. अुलट सावरकरांच्या लेखांतून प्रचारकाचा अभिनिवेश अधिक आहे. त्यामुळे त्यांच्या लेखांत वाचकांच्या विवेचक शक्तीला चालना देण्याअैवजी त्यांच्या भावनेलाच अधिक आवाहन करण्याची भूमिका आहे. जातिवंत प्रचारकाला आवश्यक असणारे ओज, आवेश, प्रेरकता हे गुणविशेष सावरकरांच्या लेखांत प्रकर्षाने दिसून येतात. आपल्या मतांच्या प्रचारासाठी सावरकर आपल्या भाषाशुद्धीच्या चळवळीला छत्रपती शिवाजी, पेशवे, मोरोपंत, चिपळूणकर येथपर्यंत नेअून भिडवितात. लेखक, शिक्षक, विद्यार्थी, वृत्तपत्रकार अित्यादींना भाषाशुद्धीच्या तत्त्वानुसार आचरण करण्यासाठी अुघड अुघड संदेश देतात. सावरकरांच्या चळवळीत संस्कृतनिष्ठा अधिक आहे. अनेक हिंदुभाषा संस्कृतोद्भव आहेत अशी त्यांची धारणा आहे.[8] 'संस्कृत सोडून मराठी भाषा म्हणून काही अुरते की काय याची आम्हांस वानवाच आहे,' असे ते स्वतः सांगतात.[9] या धारणेमुळे आणि हिंदुजगताच्या भाषैक्याच्या ध्येयामुळे परभाषेतील

---

१. भा. वि. पृ. २३. २. भा. वि. पृ. २३. ३. भा. वि. पृ. २४. ४. भा. वि. पृ. ७४. ५. भा. वि. पृ. १६१. ६. भा. वि. पृ. ४५–४६. ७. भा. वि. पृ. १२, ६९. ८. म. भा. शु. पृ. २०. ९. म. भा. शु. पृ. ३७.

शब्दांना प्रतिशब्द निवडताना ते शब्द शक्य तो संस्कृतोद्भव असावेत असा सावरकरांचा कटाक्ष आहे. तर पटवर्धनांचा कटाक्ष, 'रायवळ मराठी' शब्दांवर आहे.[1] हिंदुजगताच्या भाषैक्याच्या हेतूने हिंदी-बंगाली भाषांतील संस्कृतोद्भव शब्द मराठी भाषेत आणण्याचे धोरण सावरकर स्वीकारतात. तर मराठीच्या अभिमानामुळे पटवर्धनांना अितर प्रांतांतील शब्द मराठीत येता कामा नये असे वाटते. म्हणूनच 'टकळी', 'चरखा', 'खेडूत', 'किसान' अित्यादी परप्रांतांतील शब्दांच्या मराठीतील प्रवेशाबद्दल ते नापसंती दाखवितात.[2]

लिपिशुद्धीच्या चळवळीतही दोघांचे भिन्न दृष्टिकोन दिसून येतात. सावरकरांचा भर मुख्यत: मुद्रणसौकर्यावर आहे. कारण त्यांचे सारे लक्ष राजकीय पेच सोडविण्याकडे आहे. पण पटवर्धनांचा भर मुख्यत: लेखनपद्धतीला अपुरेपणा दूर करण्यावर आहे. कारण ते लिपिशुद्धीचा विचार भाषाशास्त्रीय दृष्टीने करतात. ते मराठी लिपीचे स्वतंत्र अस्तित्व मानतात व अितर भाषेच्या संपर्काने मराठीत आलेल्या नव्या अुच्चाराला व्यक्त करणारी चिन्हे मराठी लिपीत निर्माण करणे आवश्यक आहे अशा भूमिकेने या प्रश्नाकडे पाहतात. अिंग्रजीच्या अनुषंगाने मराठीत आलेल्या 'ॲ', 'ऑ' या दोन नव्या अुच्चारांचा मराठी लिपीत अंतर्भाव करावा अशी सूचना पटवर्धन करतात. परंतु सावरकरांना स्वलिपीत शिरलेल्या या विक्षिप्त चिन्हांचा तिरस्कार वाटतो आणि पूर्वीच्या पापांचे प्रायश्चित्त घेण्यासाठी या विक्षिप्त चिन्हांचा नायनाट केला पाहिजे' अशी घोषणा ते करतात.[3]

(क) सावरकर-क्षीरसागर

सावरकर आणि प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या भूमिकांत साम्य कोठेच नाही. आहे तो फक्त विरोध आणि तो विरोधही अितका तीव्र आहे की, सावरकरांना 'भाषाशुद्धीचे खरे वैरी' संबोधण्यापर्यंत प्रा. क्षीरसागर यांची मजल जाते. या विरोधाचे मुख्य कारण भाषेकडे पाहण्याचे दोघांचे भिन्न दृष्टिकोन हेच होय. सावरकरांच्या राष्ट्रीय वृत्तीला भाषेचा संबंध हा राष्ट्र व धर्म यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे अेकरूपतेचा आणि स्वातंत्र्य व स्वाभिमान यांच्याशी निगडित वाटतो. आपल्या या भूमिकेच्या स्पष्टीकरणार्थ सावरकर लिहितात, "परदास्याचा परिणाम म्हणून घुसलेल्या या दास्यशीलतेच्या सूक्ष्म रोगाणूंना, आमच्या मनोभूमीत परशत्रूंनी अुभारलेल्या या आमच्या पराभवाच्या सूक्ष्म स्मारकांना, त्या अनावश्यक अिंग्रजी, अुर्दू शब्दांना आज आमचाही दिवस अुगवला असताना, ती विराष्ट्रीय

---

१. भा. वि. पृ. ८ (प्रस्तावना) २. भा. वि. पृ. १७२. ३. ना. लि. आं. पृ. १४७.

नि विधर्मीय राज्यसत्ता आज आम्ही अुखडून टाकली असतानां त्या अनावश्यक परकीय शब्दांनाही का अुखडून टाकू नये ? "[1] या अुलट, भाषाशुद्धीचा प्रश्न हां जातिद्वेष अथवा अभिनिवेशांचा प्रश्न नसून तो 'तारतम्य, अुपयुंक्तता व भाषा-सौष्ठत्व' या तत्त्वांशीच प्राधान्याने संबंधित आहे, असे प्रा. क्षीरसागर यांना वाटते.[2] 'सावरकर आततायी असल्याने जेथे तारतम्य हाच गुण प्रधान आहे, अशा ठिकाणी जाणे त्यांना परवडणार नाही' असे प्रा. क्षीरसागर सांगतात.[3] भाषाशुद्धीच्या चळवळीकडे पाहण्याची क्षीरसागरांची दृष्टी मुख्यत: सौंदर्यनिष्ठ आहे. त्यामुळे सावरकरांनी मराठीत आणून सोडलेल्या अकारण दुर्बोध व विद्रूप शब्दांवर त्यांचा अतोनात राग आहे. म्हणून असे विद्रूप शब्द निर्माण करून 'शुद्धिवाल्यांनी मराठीचे सौंदर्य धोक्यात आणले आहे', असा पुकारा प्रा. क्षीरसागर करतात.[4] या सौंदर्यवादी भूमिकेमुळेच भाषाशुद्धीच्या वादात 'भाषासौष्ठव' हे महत्त्वाचे तत्त्व त्यांनी मानले आहे. हिंदुत्ववादी सावरकर भाषासौष्ठवापेक्षा तो शब्द स्वदेशी आहे काय आणि तोही हिंदुभाषोद्भव आहे काय, हे प्रामुख्याने पाहतात.

सावरकरांच्या प्रचारकी वृत्तीचा नि पद्धतीचा प्रा. क्षीरसागरांनी केलेला अुल्लेख सावरकरांच्या व्यक्तिवैशिष्ट्याचाच अेक पैलू पुन: निदर्शनास आणतो. प्रा. क्षीरसागर लिहितात, " हे दोघेही (सावरकर-पटवर्धन) पंथप्रवर्तक, आग्रही, दीर्घोद्योगी आणि धडाडीचे आहेत. ते जो प्रचार हाती घेतात, त्यात राष्ट्राचे कल्याण अेकवटलेले आहे आणि त्यांच्या विरोधकांच्या ठायी देशद्रोह आणि शेळपटपणा भरून राहिला आहे, असे त्यांस त्यांच्या अेककल्ली वृत्तीमुळे सहजच दिसू लागते; आणि त्यामुळेच त्यांचे लेख अेखाद्या झंझावाताप्रमाणे वाटू लागतात. "[5]

परंतु नवीन प्रतिशब्द सुचविण्याबद्दल सावरकरांची वृत्ती, प्राध्यापक क्षीरसागर म्हणतात त्याप्रमाणे पंथाग्रही, सुलतानी, तर्ककर्कश वाटत नाही. काही ठिकाणी तर ती व्यवहारी आणि तडजोडीची वाटते. 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' या त्यांच्या पुस्तकात अनेक ठिकाणी दिलेल्या प्रतिशब्दांबद्दल त्यांनी म्हटले आहे की, 'जर कोणास वर दिलेल्या प्रतिशब्दांहून अधिक सुटसुटीत, परिचित आणि यथार्थ प्रतिशब्द सुचले, तर अर्थातच हे आम्हीही आनंदाने स्वीकारू. "[6] याच पुस्तकात दुसऱ्या अेका स्थळी त्यांनी लिहिले आहे की, 'जे स्वदेशी प्रतिशब्द दिले आहेत ते आम्हांस हया वेळी जे सुचले ते दिले आहेत. त्याहून सुटसुटीत वा सार्थ शब्द चर्चा होता होता सुचविले गेले, तर त्यांचा स्वीकार आम्ही आनंदाने करू.'[7]

---

१. भाषाशुद्धी पृ. १२६–१२७. २. व्य. आ. वा. पृ. १२२. ३. व्य. आ. वा. पृ. १०९. ४. व्य. आ. वा. पृ. ११५. ५. व्य. आ. वा. पृ. १२८. ६. म. भा. शु. पृ. ५८. ७. म. भा. शु. पृ. ७७.

सावरकरांच्या या भूमिकेत स्वकीय शब्दांचा आग्रह आहे, पण स्वनिर्मित शब्दांचाच दुराग्रह नाही. प्रसंगी कृत्रिम व वोजड दिसणाऱ्या स्वदेशी शब्दांचा अतिरेकच त्यांना अधिक अनुकरणीय वाटतो. कारण 'हा स्वदेशी अतिरेक भाषेचे जीवन फार तर संकुचित करील. परंतु परभाषेतील शब्दांचा बाटगा अतिरेक तिच्या जीवनाचा घात करण्यास सोडणार नाही' असे त्यांना वाटते.[१] या विचारांच्या पार्श्वभूमीवर प्रा. क्षीरसागर यांचे विवेचन स्वभाषाभिमानाच्या बाबतीत खूपच कमी आणि क्वचित परभाषाधार्जिण्या वृत्तीकडे कललेले दिसते. आपल्या ग्रंथात अेका स्थळी वृत्तपत्रकर्त्यांस विनंती करताना प्रा. क्षीरसागर लिहितात, "आपण वेळप्रसंगी अेखादा अिंग्रजी शब्द ठेवला तरी चालेल पण दोन नवे विक्षिप्त पर्याय काढू नका."[२]

भाषाशुद्धीच्या या प्रश्नात प्रा. क्षीरसागरांची दृष्टी अुपयुक्ततावाद्याची, सौंदर्यशोधकाची आहे, तर सावरकरांची दृष्टी वीरोचित स्वभाषाभिमानी हिंदुत्ववाद्याची आहे असेच आढळून येते.

कृतिशीलता

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी या दोन्ही चळवळींतून सावरकरांच्या कृतिशील वृत्तीचे दर्शन वारंवार घडते. भाषाशुद्धीचे तत्त्व पटल्यावर ते स्वत: आचरण्याचा प्रयत्न 'आजन्म अंगिकारलेल्या व्रतासारखा' काटेकोरपणे कसा केला. याचे वर्णन त्यांनी स्वत:च केले आहे.[३] विलायतेतील त्यांच्या वास्तव्यात मित्रमंडळींशी ज्या चर्चा होत, त्यांत ज्याच्या तोंडून व्यर्थ अिंग्रज़ी श ब्द निघेल त्याला त्या दिवशीच्या चहाला मुकावे लागे.[४] लिपिशुद्धीचे आंदोलन आपण का हाती घेतले, याचे स्पष्टीकरण करताना सावरकरांनी लो. टिळकांची अेक आठवण सांगितली आहे. लिपिसुधारणेची योजना घेऊन आलेल्या श्री. देवधर व श्री. आरू यांना लोकमान्यांनी विचारले, "योजना टीक आहे. ..... पण ती लोकांच्या गळी कशी अुतरविणार आहात ? – ती व्यवहारात आणून सोडण्याचे कार्य हाती घेणारा कोणी आहे का ?"

लोकमान्यांच्या या प्रश्नानंतर सावरकरांनी पुढीलप्रमाणे मजकूर लिहिला आहे. "हाच प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही हे लिपिशुद्धीचे आंदोलन आज हाती घेतले आहे. लिपिसुधारणा प्रत्यक्षपणे प्रत्यहीच्या सार्वजनिक व्यवहारात आणून सोडण्यासाठी आम्ही प्रयत्नांची, प्रचाराची नि आचाराची पराकाष्ठा करू;"[५] आणि 'श्रद्धानंद' पत्रातून सावरकरांनी तसा प्रयत्न केलाही.

---

१. म. भा. शु. पृ. ६३. २. व्य. आ. वा. पृ. १३०. ३. म. भा. शु. पृ. ४१.
४. म. भा. शु. पृ. ४१. ५. ना. लि. आं. पृ. २५.

या तत्त्वनिष्ठ कृतिशीलतेमुळे भाषाशुद्धीचे तत्त्व मानणाऱ्या कै. न. चिं. केळकरांपेक्षा सावरकरांचे व्यक्तित्व वेगळे दिसते. स्वत:च्या मनोवृत्तीचे वर्णन करताना केळकरांनी लिहिले आहे, "भाषाशुद्धीच्या कामी मी तत्त्वनिष्ठ तथापि व्यवहारप्रेमी, अुपयुक्ततावादी, परिवर्तनी आहे."[1] या स्वभावामुळे 'जेथे खरोखर अडते तेथे आपद्धर्म म्हणून मी परकी शब्द योजण्यास कमी करणार नाही' असे केळकर म्हणतात. अुलट जितकी प्रतिकूलता अधिक तितका तिला तोंड देण्याचा निर्धार अधिक असा सावरकरांचा स्वभाव आहे. म्हणून ते लिहितात, ".....परकी शब्द सोडण्याचा प्रयत्न करताना, लिहिताना प्रत्येकास फार व पदोपदी त्रास होअील हे आम्ही स्वत:च्या अनुभवावरून जाणून आहोत. परंतु ह्या त्रासाने हे शब्द टाळण्याचा आपला निर्धार मात्र दुणावला पाहिजे."[2]

लोकहिताची दृष्टी

भाषाशुद्धीच्या चळवळीमागे सावरकरांची लोकहिताची दृष्टी सतत जागृत होती. त्यामुळे अनेक टीकाकारांच्या टीकेला तोंड देण्याच्या प्रसंगी लोकप्रियतेपेक्षा लोकहिताचाच विचार करण्याच्या भूमिकेपासून ते ढळले नाहीत. त्यांच्या राष्ट्रीय नि राजकीय जीवनात हीच लोकहिताची वृत्ती प्रबल होती. भाषाशुद्धीच्या आंदोलनातही हीच वृत्ती प्रकट करताना सावरकर लिहितात, "आम्ही विदेशी शब्द निष्कारण घेअू नयेत म्हणून जरी म्हणत असलो, तरी त्यामुळे विदेशी भाषेतील सुरेख वाक्प्रचार वा अुदात्त कल्पना वा अगाध ज्ञान ही आम्ही त्याज्यच समजतो असे मानणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होय.....जे जे अुत्तम अनुकरणीय आणि लोकहितवर्धक असेल ते ते आपण कोणापासूनही शिकावे."[3] सावरकरांच्या लोकहिताच्या कल्पनेत लोकानुनयाची भूमिका मात्र नाही. जे राष्ट्रीय तत्त्वज्ञान लोकांच्या अंतिम हिताचे त्यांना वाटते, त्या तत्त्वज्ञानातील तत्त्वांचे लोकांकडून प्रत्यक्ष आचरण करून घेण्याची त्यांची धडपड असते आणि तसे आचरण लोकांनी करावे यासाठी ते आपल्या कृतिशीलतेची व प्रभावी प्रचाराची जोड देतात.

भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळीचे यशापयश

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी या क्षेत्रांत सावरकरांनी केलेल्या या प्रभावी आंदोलनाला लौकिक यश किती मिळाले? स्वत: सावरकरांनी आपल्या या चळवळींच्या यशापयशाची मोजदाद क्वचित केल्याचे दिसते. सावरकरांच्या म्हणण्याचा

---

१. सह्याद्री – जानेवारी १९३७. २. म. भा. शु. पृ. २८. ३. म. भा. शु. पृ. ७२, ७३.

आशय असा : भाषाशुद्धीच्या चळवळीने भाषेची संपत्ती वाढली.[१] या चळवळीचे सूतोवाच होताच गेल्या पाच वर्षांत भाषाशुद्धीचा अभिमान धरणारा आणि ती आचरणात आणून सोडणारा असा अेक संघटित वर्ग लहानमोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील बहुतेक महत्त्वाच्या नगरांतून अुत्पन्न झाला आहे.[२] भाषाशुद्धीच्या आंदोलनामुळे 'मराठीवर मोठे अरिष्ट कोसळेल' ही पूर्वीची पुष्कळजणांची भीती पार नाहीशी होअून अुलट आपल्या भाषेस आणि आपल्या अभिमानास अधिक पोषक होण्याचा तिचा सुपरिणामच अधिक संभवनीय आहे, अशी आता साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षापासून तो शाळाकॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत बहुतेकांची निश्चिती होत आली आहे.[३] गेल्या पाच वर्षांत ह्या चळवळीमुळे आपल्या भाषेचे वाढलेले शब्दबळ आणि आत्मविश्वास हाच ह्या चळवळीचे हितकारकत्व सिद्ध करण्याचा अखंडनीय पुरावा आहे.[४] भाषाशुद्धीने स्वकीय नवीन शब्दांची भर घालण्याचे हे अेक कार्य जसे केले, तसेच आपले जे जुने शब्द निष्कारण लुप्तप्राय होत चाललेले होते, त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे दुसरे महत्त्वाचे कार्यही तितक्याच प्रबळतेने केले.[५] मराठीस परकीय अनावश्यक शब्दांच्या मारक पीडेपासून मुक्त करून तिचे स्वकीय शब्दबळ अुलट प्रवर्धमान करणारी असली विस्तृत जाणीव आणि चळवळ आजवर केव्हाही झाली नव्हती. मराठीच्या अंगी मुरलेल्या अुर्दू शब्दांच्या रोगावर तर शिवाजीमहाराजानंतर शस्त्रक्रिया अशी हीच झाली.[६]

या सर्व वर्णनात सत्य मूल्यमापनाचा सावरकरांचा प्रयत्न असला तरी त्याआडून त्यांच्या व्यक्तित्वातील स्वयं-प्रभुता (Self Assertion) डोकावल्याशिवाय राहात नाही.

सावरकरांच्या या चळवळीचे अितर साहित्यिकांनी जे मूल्यमापन केले आहे, त्यावरूनही त्यांचे यशापयश ध्यानी येते. कै. श्री: कृ. कोल्हटकरांनी महाराष्ट्रशारदेच्या व्यासपीठावरून भाषाशुद्धीच्या चळवळीच्या यशापयशाची चिकित्सा करताना म्हटले आहे, – "विदेशी शब्दांविरुद्ध ही मोहीमही अशी अगदीच निरर्थक ठरली नाही. कारण अलीकडे मराठी गद्यात व पद्यात मुसलमानी शब्दांस जी बेसुमार भरती आली होती, तिला ह्या शुद्धिमोहिमेचा अुदय झाल्यापासून ओहोटी लागल्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. सावरकरांच्या अुद्योगाने मराठी भाषेतून मुसलमानी शब्दांस अर्धचंद्र न मिळाला, तरी भाषेत काही अुपयुक्त शब्दांची भर पडल्यावाचून राहणार नाही."[७] सावरकरांनाच भाषाशुद्धीच्या चळवळीतील अग्रेसरत्वाचा

---

१. भाषाशुद्धी पृ. ८५. २. भाषाशुद्धी पृ. ८६. ३. भाषाशुद्धी पृ. ९०.
४. भाषाशुद्धी पृ. ९२. ५. भाषाशुद्धी पृ. ९४. ६. भाषाशुद्धी पृ. ९६.
७. को. ले. पृ. ८०७.

मान देऊन त्यांचे श्रेष्ठ स्थान डॉ. पटवर्धन दाखवितात, 'मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचा प्रश्न प्रथम महाराष्ट्रीयांपुढे सावरकरांनी मांडला आणि अेका महत्त्वाच्या प्रश्नाकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधले,' असे डॉ. पटवर्धन यांचे मत आहे.[1]

१९२८ साली बेळगावच्या साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे यांनी आणि १९३० मध्यें मडगाव साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून श्री. वा. म. जोशी यांनी सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीचे मराठी साहित्यावर झालेल्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणामांचे समालोचन केले आहे. 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे यांनी भाषाशुद्धीच्या आंदोलनासंबंधी म्हटले की, "आपल्या भाषेत मिसळणारे मुसलमानी आणि अिंग्रजी शब्द आपल्या भाषेवरही आपल्या प्रस्तुतच्या राजकीय पारतंत्र्याचा छाप नित्याचा मारून ठेवतात. त्यामुळे हे शब्द आपणांस दुःसह होतात.....त्याचप्रमाणे जे मुसलमानांसही सारख्याच रीतीने भरडून काढणाऱ्या विकट राजकीय परिस्थितीत हिंदूंशी सहकार्य करीत नाहीत, त्या मुसल-मानांचे मुसलमानी शब्दही आपल्या भाषेत कशाला पाहिजेत, अशा दृष्टीनें दे. भ. सावरकर नि अितर काही लोक अिंग्रजीबरोबर मुसलमानी शब्दांचेही आपल्या भाषेतून अुच्चाटन करून टाकण्याचा अुद्योग करीत आहेत.....पारतंत्र्याच्या तिट-काऱ्याच्या दृष्टीनेही .....विनायकराव यांची अुद्योगशीलता लक्षात घेण्यासारखी नाही असे कोण म्हणेल ?"[2] प्रा. वा. म. जोशी यांनीही आपल्या भाषणात मराठी-फारसी शब्दांच्या हास्यास्पद संकराचा अुल्लेख करून सावरकरांनी महाराष्ट्रात अुत्पन्न केलेल्या भाषाशुद्धीच्या प्रश्नाची दखल घेतली.[3] भाषाशुद्धीच्या चळवळीत सावरकरांनी केलेल्या नेमक्या कार्याचे वर्णन प्रा. निरंतर यांनी पुढील शब्दांत केले आहे : "भाषाशुद्धीचा पुरस्कार करताना रुळलेले विदेशी शब्द स्वभाषिकांच्या पुढे आणून ठेवण्याचे कार्यही सावरकरांनी केले आणि भाषिक व्यापारातले आपले परावलंबन आणि परधार्जिणेपणा सुशिक्षितांच्या लक्षात आणून दिला."[4] सावर-करांच्या चळवळीला यश जरी मर्यादित स्वरूपात मिळाल्याचे दिसत असले, तरी त्या चळवळीचे खरे यश कशात आहे हे स्पष्ट करताना भा. कृ. केळकर यांनी म्हटले आहे की, यशाला महत्त्व नसून जी दृष्टी त्या चळवळीने येते, त्याला महत्त्व असते. या चळवळीने सर्व परकीय शब्द गेले नाहीत, तरी भाषाशुद्धी अवश्य आहे ही दृष्टी आता आली आहे हे निश्चित."[5]

सावरकरांच्या लिपिशुद्धीच्या आंदोलनाचे यश तर आता राजमान्य झाले आहे. मुंबअी सरकारने लिपिशुद्धीच्या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेअून १९४९ मध्ये

---

१. भा. वि. पृ. ३५ व १. २. भाषाशुद्धी पृ. ८९, ९०. ३. भाषाशुद्धी पृ. ९०. ४. सा. वि. द. पृ. १३६. ५. सा. द. पृ. २३२.

काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली होती तिने सावरकरांनी पुरस्कारिलेल्या लिपिसुधारणेच्या सूचनांपैकी तीन चतुर्थांश सुधारणा ग्राह्य धरल्या आहेत.[1] सारांश, सावरकरांनी भाषाशुद्धी व लिपिशुद्धी या दोन्ही चळवळींत आपली कल्पकता आणि स्वत्वाभिमान यांची अुत्कृष्ट प्रतीती आणून दिली आहे.[2]

समारोप

भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धी या दोन्ही चळवळी सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाले, तर 'भावनिक' आणि 'व्यावहारिक' स्वरूपाच्या असल्या, तरी त्यांचा अुद्गम आणि विकास हा सावरकरांच्या व्यक्तित्वानुसारच झालेला आहे. त्यांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीचे आरंभीचे अधिष्ठान त्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेत होते. म्हणून अिंग्रजी शब्दांच्या बहिष्कारापुरती ही चळवळ मर्यादित होती. परंतु पुढे स्वातंत्र्यनिष्ठेबरोबरच हिंदुत्वनिष्ठाही प्रभावी होताच या दोन्ही चळवळींनी तसा नवा घाट घेतला. सावरकरांनी भाषा आणि लिपी यांना राष्ट्र, धर्म, जाती अित्यादींची कुंपणे घातली. विज्ञाननिष्ठेतून निर्माण होणाऱ्या यंत्रशीलतेने त्यांच्या लिपिशुद्धीला मधून मधून आकार दिला. भाषैक्याच्या राष्ट्रीय ध्येयानेच या चळवळीवर हुकमत गाजविली. दीर्घकाल सावरकरांच्या रागद्वेषाचे विषय बनलेल्या मुसलमानांच्या शब्दांपासूनच मराठीस दूर ठेवण्याची धडपड या चळवळींत प्रामुख्याने दिसून आली. सावरकरांच्या प्रचारकी प्रवृत्तीने या चळवळींना गती मिळाली. राष्ट्रीय दृष्टीने अितिहासाचा विशिष्ट अर्थ लावून या चळवळींत परंपरेचे सामर्थ्य त्यांनी ओतले. हिंदुसंघटनेचे अेक अुपांग याच भूमिकेने या दोन्ही चळवळींचा परिपोष नि प्रसार त्यांनी केला; आणि म्हणूनच या चळवळी सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या छापेत वावरताना दिसतात, हे विधान यथार्थ वाटते.

---

१. सा. द. पृ. २३५. २. सा. द. पृ. २३५.

१०

समारोप

प्रास्ताविक : जसे ज्याचे व्यक्तित्व तसे त्याचे वाङ्मय, या साहित्यातील नियमाच्या निकषावर सावरकरांचे सर्व वाङ्मय तपासल्यानंतर आपल्या हाती कोणते निष्कर्ष येतात, ते या समारोपाच्या प्रकरणात पाहावयाचे आहे. साहित्यिक हा आपल्या साहित्यातून आत्माविष्कार करतो असेही अेक सूत्र साहित्य-टीकेतून वारंवार सांगितले जाते. पण साहित्यिक आत्माविष्कार करतो म्हणजे नेमके काय घडते, याचा सर्वांगीण आणि सखोल विचार झाल्याचे मात्र आढळत नाही. काही तुटक, फुटकळ व अेखाद्याच साहित्य-प्रकाराच्या अनुषंगाने या आत्माविष्काराच्या सिद्धान्ताच्या प्रस्थापनेचे प्रयत्न झालेही आहेत. परंतु अेकाच साहित्यिकाच्या सर्व साहित्याचा वरील सिद्धान्तानुसार सलग विचार झाल्याचे आढळत नाही. म्हणून सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास करताना हे आत्माविष्काराचे सूत्र प्रधान मानून अितर साहित्यविषयक निकष तुलनेने गौण लेखण्यात आले ; आणि या आत्माविष्काराच्या सिद्धान्ताचा पडताळा पाहण्याची अेकमेव दृष्टी ठेवून सावरकरांच्या सर्व साहित्याचे आलोडन करण्यात आले.

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण दर्शन :– सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विचार केल्यानंतर जे दर्शन घडते ते बहुमिती (Multi-dimensional) स्वरूपाचेच आहे. परस्परविरोधी व समन्वय न घडलेल्या अनेक प्रवृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होत्या. कवितेला अश्रूंनी न्हाअू घालणारी अुत्कट भावनात्मकता आणि श्रुतिस्मृतिपुराणोक्त विसंगत तत्त्वांशी झगडणारी तर्ककर्कश बुद्धिमत्ता त्यांच्या ठायी होती. आत्मौपम्यवृत्तीने ते सर्व सजीव सृष्टीशी समरस होत, तर ' निज जातिछळा ' ने त्यांचे हृदय तळमळे. हिंदुत्वातीत होअून ते कधी मानवतावादी बनत, तर कधी सूर्य विझला तर मानव्याचे काय होअील यापेक्षा हिंदूंना प्रकाश मिळणार नाही याचे दु:ख त्यांना अधिक वाटे. अहंप्रभुता आणि विनम्र कृतज्ञभाव यांचे विलक्षण मिश्रण यांच्या ठिकाणी होते. व्यक्तिगत जीवनात अशुभदर्शी प्रतिकूलतेचाच अनुभव घेतलेले सावरकर सार्वजनिक जीवनात वावरताना मात्र दुर्दम्य आशावाद बाळगीत असत. जनतेला चेतविणाऱ्या हौतात्म्याचे आकर्षण

सावरकरांना जितके होते, तितकेच कोणते हौतात्म्य अनुकरणीय व प्रशंसनीय याचेही तारतम्य बाळगून आत्महत्येपासून परावृत्त करणारी स्थिर विवेचक वृत्ती त्यांच्या ठायी होती. चिंतनशील, अेकान्तप्रिय असलेले सावरकर अखंड अुद्योगी आणि प्रत्यक्ष चळवळ अुभी करणारे संघटक होते. कुटुंबशील वृत्तीचे सावरकर अत्यंत प्रेमळ व हळवे वाटत; परंतु कर्तव्यभावनेने त्यांनी आपल्या मनाला अत्यंत कठोर बनविले होते. परमेश्वराच्या अस्तित्वाचा ते अत्यंत बुद्धिनिष्ठ आणि विज्ञानाधिष्ठित भूमिकेने विचार करीत ; आणि त्यावरोवरच वेदोक्त पूजेचा व मंदिरप्रवेशाचा हक्क प्रत्येक हिंदूस असावा यासाठी चळवळ करीत. हिंदुत्वनिष्ठा ही त्यांच्या जीवनातील अंतिम नि सर्वश्रेष्ठ निष्ठा होती आणि बुद्धिनिष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा व विज्ञाननिष्ठा या त्यांच्या व्यक्तित्वातील अितर निष्ठा तिच्या अंकित झाल्या होत्या. हिंदूंच्या पुनरुत्थानासाठी परमेश्वर अवतार घेअील, असा बुद्धिनिष्ठा व विज्ञाननिष्ठा यांच्या कक्षेत सामावू न शकणारा विचार हिंदुत्वनिष्ठेने प्रभावित होअूनच ते बोलत असत. तसेच स्वातंत्र्य-वीर सावरकरांपेक्षा हिंदुसंघटक सावरकर असा आपला अुल्लेख होण्यातच त्यांना विशेष अभिमान वाटत होता. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या विविध अंगांना अेकत्रित आणणारे हे सर्व ताण त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेशी केंद्रित झाले होते.

आत्मप्रकटीकरणासाठी साहित्यनिर्मिती:— साहित्य म्हणजे आत्मरंजनार्थ केलेली क्रीडा असे सावरकरांनी कधीच मानिले नाही. साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे अेक अुपांगच असल्याने साहित्याने राष्ट्रीय जीवनाच्या प्रगतीची, संरक्षणाची चिंता वाहिली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. समाजाला 'मंगलास्पद ध्येयाकडे प्रवृत्त करणारे साहित्य' हे साधन आहे अशी त्यांची धारणा होती. साहित्यकलेने प्राप्त परिस्थितीतील आपले कर्तव्य ओळखले पाहिजे आणि आपली सारी शक्ती या राष्ट्रीय अुत्थापनार्थ व राष्ट्रसंरक्षणार्थ वेचिली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शस्त्र, क्षात्रवृत्ती आणि साहित्य यांचा संबंध अगदी निकटचा आहे असे ते मानीत होते. परिस्थितीमुळे सावरकरांच्या साहित्याला प्रचारी स्वरूप धारण करावे लागले आणि साहित्यातून त्यांनी आपल्या ध्येयाचा, विविध निष्ठांचा आणि मतांचा प्रचार केला. स्वत:च्या जीवनतत्त्वाच्या अभिव्यक्तीसाठी त्यांनी साहित्य-निर्मिती केली. त्यांच्या घटित व्यक्तित्वाचा तो अुघड अुघड व सरळ आविष्कार होता. सावरकरांनी नाट्य-काव्यादी साहित्याचे विविध प्रकार हाताळले. पण त्या सर्व प्रकारांची निर्मिती सावरकरांच्या ज्वलंत, तेजस्वी, ध्येयवादी व्यक्तिमत्त्वातून झालेली असल्यामुळे त्या मागील आधारभूत सत्त्व अेकच होते. सावरकरांच्या वाङ्मयाला जे अेवढे तेज आले आहे, ते त्यांच्या व्यक्तिजीवनातून आले आहे.

आपल्या विचार-विकारांचा वाङ्मयात सरळ आविष्कार करण्याच्या या वृत्तीतून सावरकरांनी कलेचे वा सौंदर्यशास्त्राचे नियम कटाक्षाने पाळले नाहीत;

कलावंताला आवश्यक असलेली कलात्मक अलिप्तता (Artistic Detachment) त्यांना साधता आली नाही. लाठीचे सामर्थ्य त्यांनी ओळखले होते. पण लाठीपेक्षा लेखणीचे सामर्थ्य, ती कलेच्या विशिष्ट नियमांनी वापरल्यास, कितीतरी पटींनी अधिक असते हे ध्यानी येऊनही त्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. बंदुका घेण्यास प्रवृत्त ही लेखणीच करते हे नंतर त्यांना पटले होते.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व मुळातच संपन्न व क्रांतिप्रेरक होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सरळ आविष्कारही त्यांच्या वाङ्मयात विलक्षण तेज व बळ निर्माण करू शकला. अन्यथा सर्व साहित्यिकांच्या बाबतीत लेखणी लाठीसारखी वापरून अपेक्षित कलात्मक परिणाम साधेलच असे नाही.

काव्य, नाटक, कथा-कादंबरी इत्यादी ललित साहित्यांतून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार सहजपणे होतो. आत्माविष्काराला अनुकूल असे ते वाङ्मयप्रकार आहेत. परंतु चरित्र, इतिहास, निबंध इत्यादी आत्माविष्काराला पोषक नसलेल्या अशा वस्तुनिष्ठ वाङ्मय-प्रकारांतूनही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होताना आढळतो. विषयाची केलेली निवड, त्या विषयाभोवती गुंफा केला गेलेला आशय, त्या आशयाच्या अभिव्यक्तीत विशिष्ट तत्त्वांवर देण्यात आलेला भर (Emphasis), या आशयातील विचारांचा व्यक्तिनिविष्ट दृष्टिकोना-तून लावण्यात आलेला अर्थ इत्यादी गोष्टींतून सावरकरांचे व्यक्तिमत्त्व तेथे प्रकट झाले आहे. सावरकरांनी लिहिलेल्या सर्व वाङ्मय-प्रकारांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व कुठे कुठे प्रकट झाले आहे, ते पुढे निष्कर्षवजा सांगण्यात आले आहे.

आत्मचरित्रातील विचारांशी साम्य:–सावरकरांनी जे विविध वाङ्मय-प्रकार हाताळले, त्या सर्वांचा अेकत्र विचार करता त्यांत त्यांच्या आत्मचरित्रातील अनेक विचारांचे सूत्र गुंफलेले आढळून होते. मॅझिनीच्या चरित्रातील गुप्तमंडळ्या, राष्ट्रहित व मानवहित, प्रथम मन:प्रवर्तन आणि नंतर शरीरप्रवर्तन इत्यादींबद्दलचे विचार सावरकरांनी आपल्या आत्मचरित्रातून त्याच पद्धतीने आणि तशाच शब्दांत व्यक्त केले आहेत. निबंध-वाङ्मयातून सावरकरांनी धर्मग्रंथ, विटाळवेड, जातिभेद, धर्म आणि धर्माचार, सद्‌गुण-दुर्गुण, हिंसा-अहिंसा, सत्यासत्य यांबद्दलच्या कसोट्या, शस्त्रसामर्थ, शुद्धीकरण, धर्मोत्सव, लोकहित , राष्ट्रहित इत्यादींबद्दल चर्चा केली आहे. या विषयांवरील अशीच चर्चा त्यांच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथांतून आली आहे. किंबहुना आत्मचरित्रातील या विषयांचाच विस्तार पुढे त्यांच्या निबंध-वाङ्मयातून झाला आहे. इतिहास-ग्रंथांत तर अशा स्वरूपाच्या चर्चेला स्थान देणेही इष्ट नाही. परंतु त्यांच्या 'सहा सोनेरी पाना'त या विषयांवर दोन स्वतंत्र प्रकरणे त्यांनी खर्च केली आहेत. निबंधांतील हेच विषय कवितेतही अवतरतात. देवकल्पना,

सृष्टीचे करुण-क्रौर्यमय स्वरूप, धर्मांतर व शुद्धी, आपद्धर्म, सद्‌गुणविकृती , परदेश-गमनबंदी, यंत्राचे सामर्थ्य अित्यादी कितीतरी विषयांची चर्चा पद्यवाङ्मयातून त्यांनी केली आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याला अनेक ठिकाणी पद्यमय निबंधाचेच स्वरूप प्राप्त होते. त्यांच्या नाटकांतील आणि कथाकादंबऱ्यांतील पात्रेंही याच विषयांवर साधकबाधक चर्चा करतात. त्यामुळे सावरकरांनी लिहिलेली कोणतीही वाङ्मयकृती वाचताना सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचेच दर्शन घडते.

सर्व वाङ्मयातून विशिष्ट निष्ठांचाच आढळ:–सावरकरांच्या व्यक्ति-मत्त्वाच्या प्रकरणात त्यांच्या ठायी असलेल्या विविध निष्ठांचा निर्देश करण्यात आलेला आहे. त्यांच्या सर्व वाङ्मयावर ह्याच निष्ठा वर्चस्व गाजवितात. हिंदुत्व-निष्ठा ही त्यांच्या सर्व साहित्याचा कणा आहे. मराठ्यांच्या अितिहासाचा अर्थ ते ह्या हिंदुत्वनिष्ठेनेच लावतात. हिंदुराष्ट्राच्या अभ्युत्थानार्थ कोणते तत्त्व स्वीकारार्ह व कोणते त्याज्य, याची अतिशय व्यापक अशी चर्चा त्यांनी आपल्या निबंधवाङ्मयातून केली आहे. त्यांच्या कवितेत स्वातंत्र्यनिष्ठा ही प्रारंभी जरी प्रकर्षाने दिसत असली, तरी अुत्तरार्धात यांची कविता हिंदुत्वनिष्ठेच्या छापेत वागते. 'अुःशाप' नाटकात हिंदुत्वनिष्ठेचे दर्शन जातिभेदाच्या संदर्भात जरी दिसत असले, तरी त्यांचे 'अुत्तर-क्रिया' हे नाटक हिंदुत्वाच्या विशाल राजकारणाचा चित्रपट डोळ्यांपुढे अुभा करते. भाषालिपिशुद्धीत हीच दृष्टी प्रभावी आहे. त्यांच्या निबंधांत प्रकट झालेली बुद्धिनिष्ठा व विज्ञाननिष्ठा त्यांच्या कथाकाव्यांतूनही आपले अस्तित्व प्रकट करीत असते. निबंधांतून व्यक्त झालेली त्यांची मानवहित दृष्टी व व्यवहारवाद वा अुपयुक्तता-वाद यांचेही दर्शन त्यांच्या विविध कलाकृतींतून अनेकदा होत असते.

जाणीवपूर्वक आत्मनिवेदन:– कलावंताचे तटस्थ्य सोडून सावरकर अनेक वाङ्मय-प्रकारांतून स्वतः प्रकट होतात आणि त्या कलाकृतीतून होणाऱ्या आत्मा-विष्काराचे सरळ स्वरूप अुघड करतात. निबंधांतून अनेक स्थळी ते आपल्या स्थल-बंदीचे , विविध निर्बंधांचे, 'काळ्या पाण्या'च्या शिक्षेचे अुल्लेख करतात. त्यांच्या अनेक कविता स्वविषयकच आहेत. विविध काव्यांतून ते आपल्या ध्येयवादी, खडतर, कर्तव्यकठोर जीवनाचे वर्णन करतात. कथांमधून 'आम्ही' या नावाखाली सरळ सरळ तत्त्वचर्चा करतात. त्या कथांच्या कथानकांत आपल्या विविध कार्याची वास्तव वर्णने करतात. 'अुःशाप' नाटकाच्या नांदीत आपले अद्‌भुत चरित्र नाट्य-विषय होण्याजोगे कसे आहे हे त्यांनी सांगितले आहे. सरकारी आक्षेपामुळे 'विनायका'च्या लेखणीची देवकीच्या देववंद्य कुसव्यासारखी करुणास्पद स्थिती कशी झाली, हेही जाणीवपूर्वक सांगण्यास ते विसरत नाहीत.

विषयांची निवड:– विषयांची निवड लेखक आपल्या व्यक्तिमत्त्वानुरूप कसा करतो, याचे विवेचन प्रबंधातील त्या त्या प्रकरणांत आले आहे. सावरकरांच्या संपूर्ण

वाङ्मयाचे समालोचन केल्यावर शेवटी निष्कर्ष हाच निघतो की, त्यांच्या सर्व विषयनिवडीत ही व्यक्तिनिविष्ट दृष्टी कुठेच सुटलेली नाही. क्रांतिकारकांची जी चरित्रे वा व्यक्तिचरित्रे त्यांनी लिहिली, त्यांमधून त्यांनी आत्माविष्कारच केला. समानधर्मत्व हाच निकष त्यांनी चरित्रनायक निवडताना लावला होता. क्वचित चरित्रविषयक तपशीलही फारसा न देता त्यांनी आपल्याला प्रिय असलेल्या मतांचेच प्रतिपादन केले. कविता, नाट्य नि कथाकादंबरी यांतील चरित्रविषय झालेल्या प्रमुख व्यक्तींतील हौतात्म्यवृत्तीच त्यांनी अधिक समरसतेने रंगविली. हिंदुत्वनिष्ठेच्या केंद्रबिंदूशी जोडले जातील असेच विषय त्यांनी निवडले. अितिहासाचे हिंदुत्ववादी दृष्टिकोनातून त्यांनी समालोचन केले आणि प्राप्त निष्कर्ष आपल्या मूळ दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत हे सिद्ध करून दिले. निबंधवाङ्मयातून त्यांनी चर्चिलेल्या सर्व विषयांचा अुगम या हिंदुत्वनिष्ठेतून झाला होता. स्वातंत्र्यनिष्ठा, विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिनिष्ठा या निष्ठांतून त्यांनी आपल्या निबंधाचे अनेक विषय निवडले. धर्मभोळेपणा, देवलसी वृत्ती, जातिभेद अित्यादी विषयांची जी चर्चा त्यांनी आपल्या लेखनातून केली, तिला त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या निष्ठांचा आधार होता. आपल्या कथांचे विषयही त्यांनी याच निष्ठांच्या प्रकटीकरणासाठी व प्रसारासाठी निवडले. सावरकरांची पूर्वार्धातील कविता म्हणजे स्वतंत्रतेची स्तोत्रे आहेत आणि त्यांच्या अुत्तरार्धातील कवितेत हिंदुत्वाधिष्ठित स्वातंत्र्याचा अुद्घोष आहे.

विषयाची सजावट:– सावरकरांच्या विविध वाङ्मयकृतींच्या सजावटीवर त्यांच्या व्यक्तित्वाचा फार मोठा परिणाम झाला आहे. साहित्याची सजावट करताना सावरकरांनी रूढ तंत्र कधीच पाळले नाही. ते तंत्र-पालक नव्हते, तंत्रनिर्माते होते; आणि ते तंत्र त्यांनी स्वत:च्या व्यक्तिमत्त्वानुसार निर्माण केले. अितिहास-ग्रंथांची रचना करताना त्यांना प्रिय अशा मतांच्या चर्चेसाठी ते स्वतंत्र प्रकरणे लिहितात व त्यांसाठी अधिक पृष्ठे खर्च घालतात; परंतु अप्रिय अशा विचारांचा परामर्श चारदोन पृष्ठांत घेअून ते पुढे जातात. 'हिंदुपदपादशाही 'तील सवाअी माधवरावांच्या काळाचे त्यांनी सविस्तर वर्णन केले आहे, तर मराठेशाहीच्या ऱ्हासाच्या शेवटच्या पाव शतकाच्या काळावर अवघ्या चार पृष्ठांत पडदा टाकला आहे. 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने' या अितिहास-ग्रंथाची रचना त्यांनी विषयानुबंधाच्या क्रमानुसार हेतुपुरस्सर केली आहे. हिंदूंतील जातिभेद, सद्गुणविकृती या विषयांच्या चर्चेसाठी त्यांनी अनेक पृष्ठे खर्चिली आहेत: हिंदु-सम्राट खुश्रूखान व देवलदेवी यांच्या राज्यकारभाराच्या वर्णनासाठी स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. परंतु सम्राट अशोकची कारकीर्द नुसता ओझरता अुल्लेख करून त्यांनी संपविली आहे. कारण हिंदूंच्या विजयगौरवासाठी सम्राट अशोक व त्याच्या पिढीने

विजयी झुंज दिलेली नव्हती असे सावरकरांना वाटते. साधकबाधक व संथ चर्चेतून त्यांचा निबंध विकास पावत नाही. तर स्वमताच्या स्पष्टोक्तिपूर्ण प्रतिपादनाची गती त्याला प्रारंभापासूनच मिळते. कधी निबंधांतील विचारांची मांडणी करताना त्यांना प्रिय अशा मतांकडे, ते मत मूळ विषयांशी सुसंगत नसले तरीही, ते वळतात आणि त्या विषयातच निबंधाची परिसमाप्ती होते. त्यांच्या 'क्ष किरणा'त असे निबंध आढळतात.

कवितेतही असेच घडते. त्यामुळे अनेक कवितांचे पर्यवसान मूळ विषयाशी सुसंगत होत नाही. कलात्मक परिणाम साधण्यापेक्षा क्रांतिविचाराच्या अुद्दीपनाकडे लक्ष ठेवून कवितांची सजावट केली जाते. हौतात्म्याचा संदेश देणारा परिणाम साधण्याच्या भूमिकेतून ते आपल्या नाटकांचा अुपसंहार कृत्रिम रीतीने घडवून आणतात. त्यांच्या कथांत अनेकदा कथानक नसते, तर असते केवळ तत्त्वचर्चा. त्यामुळे त्यांच्या कथांची सजावट चर्चेच्या वा वादविवादाच्या स्वरूपाची होते.

प्रचारकी दृष्टिकोन: – हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितीमुळे आपणांस प्रचारकी वाङ्मय लिहावें लागले असे सावरकरांनी स्वतःच सांगितले होते. या प्रचारकी दृष्टिकोनामुळे कलावंतांच्या अुच्च, तटस्थ पातळीवर ते स्थिर राहू शकत नाहीत. मॅझिनीच्या चरित्रातून तर त्यांना अुघड अुघड क्रांतितत्त्वांचाच प्रचार करावयाचा होता. अठराशे सत्तावन सालच्या बंडाप्रमाणे भारतीय जनतेने पुन्हा बंड करून अुठावे आणि तसे करीत असताना सत्तावनच्या बंडाचे ज्वलंत अुदाहरण तिच्या दृष्टीसमोर धगधगते असावे, या हेतूने सावरकरांनी 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हा अितिहासग्रंथ लिहिला. स्वतःच्या व्यक्तित्वातील विविध निष्ठांचा प्रचार निबंध, काव्य, नाट्य व कथा-कादंबरीतून त्यांनी केला आहे. या प्रचारकी वृत्तीमुळेच सावरकरांच्या भाषा व लिपी यांच्या शुद्धीच्या चळवळीला विलक्षण गती मिळाली होती. या प्रचाराबरोबरच प्रत्यक्ष कृतिप्रेरणा देण्याची सावरकरांची भूमिका होती.

रागद्वेषाचे दर्शन:– कोणताही वाङ्मयप्रकार असो, सावरकरांच्या ठायी असलेले विशिष्ट रागद्वेष प्रकट झाल्याशिवाय राहात नाहीत.त्यांच्या निबंध-वाङ्मयातून ते सविस्तरपणे व्यक्त झाले आहेत. म. गांधी यांच्या विशिष्ट कार्याबद्दल त्यांना अत्यंत प्रेम होते. त्या कार्याबद्दल त्यांचा गौरवही सावरकर करतात. परंतु सत्य-अहिंसेबद्दलची त्यांची मते, त्यांचे ध्येय व साधन मार्ग, त्यांची मुसलमानांबद्दलची पक्षपाती वृत्ती व शस्त्राचारी देशभक्तांबद्दलची अुपेक्षा, त्यांचे राजकारण, त्यांचे 'बालिश तत्त्वज्ञान व षंढतेचे शास्त्र' या सर्वांबद्दल सावरकरांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होती. क्रांतिकारकांची व्यक्तिचित्रे रंगवितानाही त्यांचे हे रागद्वेष तंत्राची मर्यादा सोडून मधूनच प्रकट होतात. कथा-कादंबऱ्यांतूनही असेच घडते. म. गांधींची काही प्रसिद्ध वचने वा अुद्गार कथानकाच्या ओघात ते हेतुपुरस्सर वापरतात.

नाटकांतून त्यांनी सत्य-अहिंसेच्या मार्गाची भरपूर अुपरोधिक टवाळी केली आहे. तसे करताना त्यांनी कालविपर्ययाचा दोषही पत्करला आहे. भावडे गोभक्त रूढिप्रिय सनातनी यांबद्दलचा आपला राग त्यांनी कथांतून, नाटकांतून अुघडअुघड व्यक्त केला आहे. 'गोमांतका 'तील सत्य-अहिंसेवद्दल त्यांनी केलेली अुपरोधिक चर्चा या दृष्टीनेच पाहण्यासारखी आहे. विषय कोणताही असला तरी सावरकरांचे हे रागद्वेष प्रकट झाल्याशिवाय राहात नाहीत.

भाषाशैली :– सावरकरांच्या भाषाशैलीची काही वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्ति-मत्त्वातूनच सिद्ध झाली आहेत. काव्यात्मकता, अुपरोध, अुपहास, वक्रोक्ती, स्पष्टोक्ती ही त्यांच्या शैलीची काही वैशिष्ट्ये आहेतच. पण त्याहीपेक्षा भाषाशुद्धीच्या आग्रहा-मुळे यांच्या शैलीत पृथगात्मकता आली आहे. भाषाशुद्धीचा त्यांचा हा आग्रह निबंध–चरित्र–अितिहासादी वस्तुनिष्ठ विषयांत मान्य होण्यासारखा होता. परंतु त्यांचे आक्रमक व्यक्तित्व हा भाषाशुद्धीचा आग्रह घेअून ललित वाङ्मयातही अुतरते आणि त्या ललितकृतींतील विविध पात्रांनाही आपलीच शुद्धीकरण केलेली भाषा बोलावयास भाग पाडते. त्यांच्या काव्यांत, नाटकांत, कथा–कादंबरीत हेच घडले आहे. त्यांतील पात्रांचे वय, त्यांची संस्कृती, त्यांचे लिंग, त्यांची जात त्यांचा कोणताही विचार न करता सावरकर त्यांच्यावर आपली विशिष्ट भाषा लादतात. या भाषाशुद्धीच्या आग्रहात त्यांची आणखी अितरही वैशिष्ट्ये येअून मिसळतात. मराठीतील क्रियापद-दारिद्र्य दूर करण्याच्या आग्रहामुळे नामावरूनच साधिलेली क्रियापदे वापरण्याचे बंधन त्यांच्या सर्व पात्रांना पत्करावे लागते. सावरकरांच्या प्रचारकी भूमिकेमुळे पुनरुक्तीची सवय त्यांच्या सर्व पात्रांना लागलेली आहे. विविध विषयांवरील सावरकरांची ठाम मते, आग्रह व पूर्वग्रह घेअून ती पात्रे बोलत असतात. सावरकरांचेच कल्पनावैभव घेअून त्यांपैकी प्रत्येकजण अवतरतो. सावरकरांप्रमाणे लांब, पल्लेदार वाक्ये ती पात्रे सहज बोलू शकतात. 'धर्माचे खरे स्थान हृदय –पोट नव्हे' अशासारखी सावरकरी सूत्रे वा सुभाषिते त्यांच्या मुखांतून सहजपणे बाहेर पडतात.

अंदमानोत्तर सावरकरांचा भाषाशुद्धीचा आग्रह अधिकच वळावल्याचे दिसून येते. 'लंडनच्या बातमीपत्रातून' जे परकीय शब्द सावरकरांनी वापरले होते, तेच शब्द अंदमानोत्तर लिहिलेल्या लेखनातून कटाक्षाने वगळून सावरकरांनी त्या जागी स्वकीय हिंदुभाषोद्भव शब्दांची योजना केली आहे.

आंतरबाह्य व्यक्तिमत्त्वाचाच प्रभाव:– सावरकरांच्या आक्रमक व्यक्ति-मत्त्वाच्या आधिपत्याखाली वाङ्मयकृतीतील रसालंकारादी घटकही वावरतात. करुण, शृंगार, रौद्रादी रस सावरकरांच्या वाङ्मयकृतीतून आविष्कृत होतात हे खरे,

पण त्यांतील वीररसच अितर सर्व रसांना आपल्यात सामील करून का घेतो, याचे अुत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सापडते. वाङ्मयप्रकार कोणताही असो, सावरकरांच्या महाकविसदृश प्रतिभेतून जी कल्पकता प्रकट होते, तिचे स्वरूप भव्योदात्त व पल्लेदार असेच असते. त्यांची कल्पनाशक्ती जी अुपमाने वा प्रतीके शोधते ती सावरकरांचे क्रांतिकारक जीवन आणि त्यांची हौतात्म्य वृत्ती यांतूनच शोधते. त्यांची पल्लेदार प्रतिभा आणि वक्तृत्व हाच आत्मा असलेली त्यांची कवित्वशक्ती जे 'वैनायक' वृत्त निर्माण करते, ते त्यांच्या पृथगात्म व्यक्तित्वाचीच साक्ष पटविते.

आत्माविष्काराला पडलेल्या मर्यादा:– तत्कालीन राजकीय परिस्थिती आणि सावरकरांवर पडलेली बंधने पाहता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराला काही मर्यादा पडल्याचेही जाणवते. सरकारी आक्षेपाच्या प्रवळ वज्राघाताखाली देवकीच्या देववंद्य कुसव्यासारखी त्यांच्या लेखणीची स्थिती करुणास्पद झाली होती, असे स्वतः सावरकरांनीच सांगितले आहे. सावरकरांनी आत्मवृत्त लिहिणे हेही सरकारला आक्षेपार्ह वाटत होते. त्यामुळे त्यांच्या दोन्ही आत्मवृत्तांना अप्रसिद्धीच्या अंधारात दीर्घकाळ राहावे लागले. पुढे जी आत्मवृत्ते प्रसिद्ध झाली त्यांतही 'हा केवळ अितिहास आहे, त्याचे समर्थन नव्हे' असे म्हणत त्यांना आपल्या सरळ आत्मा-विष्काराला मुरड घालावी लागली. आपल्या खऱ्या, अुत्कट विचार-विकारांना आवर घालणारी कितीतरी वाक्ये सावरकरांनी 'माझ्या जन्मठेपे'त लिहिली आहेत. 'जर मरावयाचेच तर.....फाशी घेअून नव्हे तर.....' अशी अनेक वाक्ये सावरकरांनी अर्धवट, तुटक सोडलेली आहेत. मनात त्या त्या वेळी अुत्कटतेने अुसळणाऱ्या कल्पना व विचार लेखनसाहित्याच्या अभावी त्यांना सोडून द्यावे लागले. अंदमानातून त्यांनी लिहिलेली पत्रे प्रसिद्ध झाली, पण ती सरकारी सोळा संस्कारांनी मुद्रांकित होअून ! प्रामाणिक आत्माविष्काराला तेथेही वाव नव्हता. आपल्या मनातील स्पष्ट हेतू त्यांना अनेकदा वक्रोक्तीच्या आडवळणाच्या मार्गाने व्यक्त करावे लागले. मॅझिनीच्या आत्मचरित्रात्मक लेखांचा मराठी अनुवाद करण्यामागे सावरकरांचा हेतू त्या क्रांतितत्त्वांचा प्रसार करणे हाच होता. पण तो अुघड सांगणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी त्या ग्रंथाला हेतुपूर्वक प्रदीर्घ प्रस्तावना लिहून व त्यांत क्रांतितत्त्वांची सूचक गुंफण करून आत्माविष्काराचा प्रयत्न केला. जात्युच्छेदक निबंध लिहितानाही सरकारी निर्बंधामुळे त्यांना अस्पृश्यतानिर्मूलनाच्या राजकीय अंगाची चर्चा करता आली नाही. ब्रिटिशांची सत्ता भारतातून निघून गेल्यावर सावरकरांनी जे ग्रंथलेखन केले ('पूर्वपीठिका', 'भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने', 'शत्रूच्या शिबिरात'), त्यात त्यांनी केलेला मनमोकळा आत्माविष्कार पारतंत्र्यकालातील ग्रंथांतील आत्माविष्कारांशी तुलना करून पाहण्यासारखा आहे. स्वातंत्र्योत्तर काळांतील वाङ्मयात सावरकरांनी ब्रिटिश

सत्तेबद्दल जे सडेतोड विवेचन केले आहे, ते पाहता या विषयाबद्दल पारतंत्र्यकाळात त्यांच्या मनाची झालेली कुचंबणाच ध्यानात येते.

परंतु या आत्माविष्काराला पडलेल्या मर्यादिमुळेच सावरकरांच्या साहित्याला अेक वेगळे तेज चढले आहे, प्रखर धार आली आहे. साहित्यकलेतील विविध अलंकारांची परिणामकारक योजना आणि सूचक शब्दांचा वापर, या बंधनामुळेच त्यांना करावा लागला. त्यांचा आत्माविष्कार अधिक कलात्मक झाला.

सावरकरांच्या आत्माविष्काराला अेका वेगळ्या कारणानेही बंधन पडले. ते कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच होते. साहित्यसाधनेपेक्षा कार्यसाधनेची ओढ त्यांना अधिक होती. म्हणून कार्यसाधनेची संधी प्राप्त होताच त्यांनी साहित्यनिर्मितीकडे पाठ फिरविली होती. त्यांच्यावरील राजकीय बंधने दूर होताच त्यांनी साहित्यसेवेचा त्याग करून प्रत्यक्ष कार्याकडे धाव घेतली. त्यांची बहुतेक अुत्कृष्ट साहित्यनिर्मिती अिंग्लंडमधल्या स्वतंत्र वातावरणात तरी झाली किंवा १९१० ते १९३७ या राजकीयदृष्ट्या स्थलबद्धतेच्या काळात तरी झाली. भाषालिपिशुद्धीची वाङ्मयीन चळवळ त्यांनी मध्येच सोडली, ती त्यांच्यावरील राजकीय निर्बंध अुठल्यामुळेच! आणि पंचांगशुद्धीच्या चळवळीकडे ते वळले, तेही १९५० साली पुन्हा त्यांच्यावर राजकीय निर्बंध लादले गेल्यामुळे! राजकीय परिस्थितीमुळे सावरकरांच्या वाङ्मयीन आविष्काराला मर्यादा पडल्या हे अेका अर्थाने खरे, आणि त्यामुळेच त्यांच्या साहित्याला तेजही चढले हे दुसऱ्या अर्थाने खरे!

नेतेपणाची भूमिका सावरकरांना अखेरपर्यंत स्वीकारावी लागल्यामुळेही त्यांच्या खऱ्या प्रामाणिक भावनाविष्काराला काही मर्यादा पडल्या. वयाच्या पूर्वार्धात स्वातंत्र्याचा अुत्कट ध्यास व अुत्तरार्धात हिंदुत्वाचा, हिंदुराष्ट्राचा सतत ध्यास यामुळे त्यांच्या विशिष्ट विचार-विकारांचेच आविष्करण त्यांच्या साहित्यात होअू शकले. त्यांनी विविध वाङ्मयप्रकार हाताळले, तरी त्यांतील विषय ठराविकच होते. नेतेपणामुळे तेच तेच विचार लोकांच्यापुढे सतत जागते ठेवण्याचे स्वीकृत बंधन त्यांच्यावर आले. संसाराचा भव्यतर अर्थ त्यांना प्रतीत झाला असल्यामुळे सामान्य माणसांच्या संसारातील लहानसहान सुखदुःखांना त्यांच्या वाङ्मयात स्थान मिळू शकले नाही. स्त्रीप्रेम, पत्नीप्रेम, पुत्रप्रेम अशा सामान्य माणसांच्या भावना त्यांना मोकळेपणाने फुलविता आल्या नाहीत. नेतेपणाच्या अुच्च भूमिकेवरून या भावनांकडे ते पाहत होते. स्त्रीप्रेमाचे जे चित्रण त्यांनी केले आहे, तेही स्वातंत्र्यसंग्रामाच्या संदर्भातच केले आहे. पुत्रप्रेमातही स्वातंत्र्यधर्मरक्षणार्थ अुद्युक्त झालेले हौतात्म्य त्यांना दिसले. मातेच्या वियोगात स्वातंत्र्याच्या वियोगाने होणाऱ्या

दु:खाचेच दर्शन त्यांना घडले. सतत पुढारीपण पत्करल्यामुळे सामान्य माणसांच्या सर्वसामान्य भावनांच्या पातळीवर ते उतरू शकले नाहीत. किंवहुना कर्तव्यकठोर क्रांतिकार्यात त्यांना आपल्या नाजूक भावनांची आहुती द्यावी लागली. धगधगत्या स्थंडिलातील अग्नीत त्यांच्या कलाकळीला आत्मदान करीत हसावे लागले. काव्य-समाधी लावून आत्मानंदात दंग होणाऱ्या महाकवीची प्रतिभा लाभूनही प्रेषिताच्या प्रतिभेने त्यांना सतत अुच्च संदेशाचाच प्रसार करावा लागला. या नेतृत्वपदामुळेच कार्यांच्या साध्यासाठी व अनुयायांना कार्यप्रेरणा देण्यासाठी त्यांना प्रचाराच्या पातळीवर आपली कला आणावी लागली.

योग्याला साजेशी आत्मौपम्यवृत्ती सावरकरांच्या ठायी होती. 'पृथ्वी हाच देश, अीश्वर हाच राजा' अशी विश्ववादी भूमिकाही ते कधीकधी घेत. 'आमुचा स्वदेश। भुवनत्रयामध्ये वास' अशी संतांची व्यापक वृत्ती ते स्वीकारीत. पण या वृत्तीचा आविष्कार त्यांच्या वाङ्मयातून फारसा झाला नाही. अंदमानपूर्वकाळात त्यांची निर्भेळ स्वातंत्र्यभावना प्रकट झाली होती. सर्व जमातींनी युक्त अशा भारतीय राष्ट्रैक्याची स्तुतिस्तोत्रे 'लंडनच्या बातमीपत्रा'तून त्यांनी गाअीली होती. '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर' या ग्रंथात विविध धर्मांबद्दलची ही विशाल, सहिष्णू वृत्ती त्यांनी प्रकटही केली होती. अिंग्रजी शब्द कटाक्षाने टाळून अुर्दू, फारसी शब्दांचा वापर ते आपल्या भाषेत पूर्वग्रहरहित भावनेने करीत होते. परंतु अंदमानातील अनुभवांनी त्यांनी आपले नेतृत्व मुख्यत: हिंदुजातीच्या वाजूने अुभे केले; आणि खुद्द अंदमानात व नंतरच्या मुक्ततेच्या काळातही हिंदूंच्या वतीने बोलण्याचा व नेतृत्व करण्याचा आपला हक्क नि अधिकार त्यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही वारंवार सांगितला. 'हिंदूंचे स्वातंत्र्य', 'हिंदूंचा देव', 'अखिल हिंदूंचा विजय-ध्वज' अशा आपल्या कल्पना विशिष्ट जातीपुरत्या मर्यादित केल्या. जातीय व राजकीय नेतृत्वाने सावरकरांच्या वाङ्मयीन आविष्काराला अशा मर्यादा पडल्या. 'जगन्नाथाचा रथोत्सव' पाहणारी त्यांची विशाल प्रतिभा देवाच्या मंदिरात पूर्वास्पृश्यांना प्रवेश द्यावा, असा हिंदुजातीचा धावा करीत बसली; आणि मुसलमानी शब्दांचा विटाळही होअू नये म्हणून त्यांची वाणी भाषाशुद्धीचे सोवळे नेसली. कृतिवंत नेत्याची भूमिका स्वीकारल्यामुळे त्यांच्या वाङ्मयाच्या आशयावर व त्या वाङ्मयाचे बाह्यरूप जे शब्द, त्यांच्या आविष्कारावर असा परिणाम झाला.

तौलनिक विचार:– अितर वाङ्मयकर्त्यांच्या विचारांतील तुलनेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना सहजपणे होअू शकते. अेवढ्या मर्यादित भूमिकेनेच सावर-करांच्या पूर्वीच्या व समकालीन अशा श्रेष्ठ लेखकांच्या गद्य-वाङ्मयातील विचारांशी सावरकरांच्या विचारांची तुलना करावयाची आहे. समाजकारणात रानडे-आगरकर सावरकरांचे गुरू होते. राजकारणात चिपळूणकर-टिळक सावरकरांना गुरुस्थानी

होते. या श्रेष्ठ समाजधुरीणांच्या व सावरकरांच्या विचारांची मूस जवळजवळ अेकच आहे. फक्त वैचारिक विरोध कोठे होता अेवढेच थोडक्यात दिग्दर्शित करून सावरकरांच्या पृथगात्म व्यक्तिमत्वावर प्रकाश पाडावयाचा आहे.

परंपरेचा त्याग न करता सुधारणा घडवून आणावी अशी न्या. रानडे यांची ठाम भूमिका होती. म्हणून आगरकरांचा बुद्धिवादी पक्ष त्यांना सहन होत नसे. राजनिष्ठा, कायद्याचे सार्वभौमत्व आणि श्रद्धायुक्त राजकीय व सामाजिक व्यवहार ही रानड्यांची मूळ बैठक होती. सावरकरांनाही भूतकाळाशी नाते तोडावे असे वाटत नव्हते. पण त्या भूतकाळातील सामर्थ्याचा हिंदुराष्ट्राच्या राजकीय अुत्थापनासाठी अुपयोग करण्याकडे त्यांची धडपड होती. राजनिष्ठेचे बंधन व कायद्याचे श्रेष्ठत्व सावरकरांनी कधीच मानिले नाही. मानव्यावर आधारलेल्या सुधारणा रानड्यांसारख्या धर्मप्रवण व भक्तियुक्त अंतःकरणाच्या नेत्यास मानवणाऱ्या होत्या. सावरकरांच्या सुधारणावादात मानव्याचा विचार नाही असे नाही. पण त्यांची अंतिम निष्ठा ही हिंदुत्वनिष्ठा होती. हिंदुत्वनिष्ठेला कमी लेखून निव्वळ मानव्यावर आधारलेल्या सुधारणा सावरकरांनी स्वीकारल्या नाहीत.

आगरकरांनी सुधारणांचा पुरस्कार केला, तो शुद्ध विवेकवादाच्या आधारे केला. विवेकनिष्ठ राष्ट्रवाद हीच त्यांची प्रेरणा होती. मानवाचे अैहिक सुखसंवर्धन, समाजव्यवहारात संमतितत्त्वाची प्रस्थापना आणि व्यक्तिवाद या त्यांच्या समाजसुधारणेच्या तीन संधारक शक्ती होत्या. आगरकरांच्या जहाल विचारांचा पाया केवळ जनतेचे वाढते दारिद्र्य, आणि स्वातंत्र्याची, समतेची, सत्यनिष्ठेची सार्वत्रिक आकांक्षा यांत होता. निखळ बुद्धिवादाने आगरकर हिंदुधर्माचाही धिक्कार करीत; पण हिंदुधर्मातील दोष माहीत असूनही सावरकरांनी हिंदुधर्माचा धिक्कार कधीच केला नाही. अुलट डॉ. आंबेडकरांना त्यांनी असे बजावले की, 'काही झाले तरी बुद्धिवादाच्या दृष्टीनेही अेकंदरीत पाहता धर्मांत ग्राह्यतम धर्म कोणता असेल तर तो हिंदुधर्म होय.' बुद्धिवादी व नास्तिक असूनही सावरकरांनी धर्माचा व मूर्तिपूजेचा अुपयोग टिळकांप्रमाणे समाजसंघटनेसाठी करून घेतला. व्यक्तिवादापेक्षा सावरकरांनी समष्टीवर भर दिला. वर्गदृष्ट्या वा आर्थिकदृष्ट्या संमतितत्त्वाचा विचार न करता हिंदुधर्मातील विविध जातींची अुभारणी संमतितत्त्वावर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हिंदुसमाजाच्या पायांतील सप्तशृंखला तोडण्यामागे ही समानत्वाचीच भूमिका होती. सावरकरांच्या सर्व वाङ्मयातून जनतेच्या दारिद्र्याबद्दल साक्षेपी विवेचन कोठेच नाही. अस्पृश्यांबद्दल कणव आहे, ती हिंदूंच्या संख्याबळाच्या संदर्भात आहे. स्वातंत्र्यामुळे सावरकरांच्या विचारात येणारा जहालपणा पुढे हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य या मर्यादित कल्पनेशी जाअून भिडला.

चिपळूणकरांचा स्वाभिमानी राष्ट्रवाद सावरकरांनी स्वीकारला होता. स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश यांच्या अभिमानावरोवरच गीता, दासबोध हे आधारग्रंथ, शिवाजीमहाराज व श्रीकृष्ण ही आराध्य दैवते आणि मराठ्यांचा तेजस्वी अितिहास हे स्फूर्तिस्थान सावरकरांना प्रेरक ठरले होते. परंतु हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाचा वळकट पाया असलेली हिंदुराष्ट्राची कल्पना चिपळूणकरांजवळ नव्हती. भाषाशुद्धी-वावत चिपळूणकरांचे धोरण, मुसलमानी शब्दांच्या अुपयोगावावत कसे सहिष्णू होते हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. लो. टिळकांचा क्रांतिकारक आत्मा सावरकरांनी ओळखला होता. त्यांच्या तलवारीच्या मुठीचे मनोगत पूर्ण करण्यासाठीच आपण जहाल क्रांतीच्या पुढील कार्यात अुडी घेतली असे सावरकर सांगत. परंतु राजकीय क्षेत्रात जहाल असणाऱ्या टिळकांनी सामाजिक व धार्मिक वावतींत मात्र परंपरा-रक्षण्याचे तत्त्व स्वीकारले होते. वर्णाश्रमधर्माच्या पायाला धक्का न लावता राष्ट्र-निर्मितीचा प्रयत्न टिळक करीत होते. जातिभेद जन्मसिद्ध न मानता गुणसिद्ध माना-वयास टिळक तयार होते. परंतु समाजरचनादोषांवर निव्वळ तार्किक हल्ले करून समाजाच्या अिमारतीची नुसती पाडापाड करावयास टिळकांचा विरोध होता. वर्णाश्रमव्यवस्थेचे तत्त्व चुकीचे आहे म्हणून सावरकरांना राग नव्हता, तर त्या व्यवस्थेमुळे हिंदुजातिजीवनाचा परधर्मीय आक्रमणामुळे वळी जाअील याची मुख्य भीती त्यांना वाटत होती. तार्किक दृष्टया सावरकरांनी हिंदुधर्मावर किती कडक प्रहार केले व त्यामुळे त्यांचा परिणाम काय झाला, याचे वर्णन कै. न. चिं. केळकर यांनी पुढील शब्दांत केले आहे:– "हिंदुत्वाचा अभिमान वाळगणाऱ्या त्यांच्याचसारख्या इतर लोकांची मते दुखावणारे असे अनेक लेख सावरकरांनी अलीकडे विनाकारण लिहिले आहेत. त्यांनी हे ध्यानात ठेवावे की, हिंदुत्वावर घाला घालणाऱ्या परकीयां-संवंधाने वापरण्यास योग्य अशी भाषा, स्वकीय हिंदुधर्माभिमान्यासंवंधी वापरल्याने विद्वेष अुत्पन्न होतो व कार्याची हानी होते." (प्रतिभा – जानेवारी १९३६) स्वतः कर्ते सुधारक असून व समाजसंघटनेचे प्रत्यक्ष कार्य करतानाही सावरकरांना हिंदु-संघटनेच्या कार्यात अपेक्षित यश का मिळाले नाही, याचे अुत्तर या विवेचनाच्या आधारे शोधता येअील. आणि वरील सर्व तौलनिक विचारांतून सावरकरांचे पृथगात्म व्यक्तिमत्त्वही साकार होअील.

सावरकरांच्या थोरवीचे मूल्यमापन:– सावरकरांची थोरवी ठरविताना ती अितर राजकारणी व्यक्ती वा साहित्यिक यांच्याशी तुलना करून श्रेष्ठ-कनिष्ठ न्यायाने ठरविण्यापेक्षा सावरकरांनी जी ध्येये व महत्त्वाकांक्षा दीर्घकाळ मनात अुत्कटतेने वागविल्या, त्या कितपत फलद्रूप झाल्या यावरून ठरविणेच अधिक अिष्ट. वालपणापासून सावरकरांनी मुख्यतः दोन ध्येये अुराशी वाळगली होती. वयाच्या सरासरी आठव्या वर्षापासून सावरकरांनी कवितेची घूळपाटी हाती घेतली होती

व महाकवी होण्याची महत्त्वाकांक्षा या शैशवकाळापासूनच ते बाळगून होते. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य-संपादनाची प्रतिज्ञा देवीपुढे घेतली होती. अक्षर वाङ्मीट म्हणून महाकाव्य रचनेचा अुद्योग त्यांना पुढे ढकलावा लागला आणि मग जन्मठेपेच्या पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडांच्या मापाने या महत्त्वाकांक्षेच्या सफलतेचे गणित त्यांनी मांडले. परंतु काव्यसमाधीपेक्षा प्रत्यक्ष कार्यसाधनेकडेच त्यांची कर्मतृष्णा त्यांना सारखी ओढत असल्यामुळे महाकाव्य-निर्मितीचे कार्य मागे पडले. महाकाव्यसदृश अशा चार खंडकाव्यांची निर्मिती त्यांनी केली; आणि तीही निस्साधन, निस्साहाय अशा कारागृहात केली. आपला अचानक मृत्यू झाल्यास आपली शेवटची अिच्छा म्हणून सर्व कविता प्रसिद्ध करण्याची विनंती ते आप्तजनांना करणार होते. महाकवी होण्याचे आपले हे ध्येय त्यांनी रवींद्रनाथ टागोरांचे अभिनंदन करताना व्यक्त केले होते. 'शारदेचिया दरबारात' आपल्याला काहीशी मान्यता मिळाल्याचे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आले होते. पुढे महाकवी म्हणून त्यांचा गौरव टीकाकारांनी केला होता. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देअून मराठीजनांनी त्यांचा सन्मान केला. सावरकरी कवितेने मराठीची कूस धन्य झाली, असे टीकाकारांनी त्यांच्यासंबंधी गौरवोद्गार काढले. कवी होण्याची-महाकवी होण्याची – सावरकरांची महत्त्वाकांक्षा बव्हंश पूर्ण झाली.

देशाला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा आपल्या हयातीतच सफल झाल्याचे सावरकरांनी पाहिले व कृतकृत्यतेचे, कृतार्थतेचे, धन्यतेचे अुद्गार त्यांनी काढले. त्यांनी केलेली अनेक राजकीय भविष्ये या ना त्या स्वरूपात सत्य ठरली. मुसलमानांची देशबाह्य निष्ठा, हिंदुस्थानातील द्विराष्ट्राचे अस्तित्व, सिंधची फाळणी, काश्मीरचा प्रश्न, चीनच्या स्वारीचा धोका, १९४१ साली शिरगणतीवर बहिष्कार घालण्यातील काँग्रेसची चूक अित्यादीसंबंधी सावर-करांची भाकिते बव्हंशी खरी ठरली. 'मृत्युंजय दिना'निमित्त पुणे येथे केलेल्या भाषणात व 'आत्महत्या आणि आत्मार्पण' या अखेरच्या लेखात स्वत:च्या कृतार्थ नि धन्य जीवनाची जनिक साक्ष त्यांनी दिली आहे.

सुफलित झालेल्या महत्त्वाकांक्षेच्या कसोटीवर सावरकरांचे जीवन पारखून पाहावयाचे झाले, तर ते यशस्वी झाले असे मानावयाचे काय ? सावरकरांचे जीवन ही सुखांतिका होती की दु:खांतिका होती ? स्वत: सावरकरांना आपले जीवन सुखां-तिकाच वाटत होती. जीवनातील यशापयशापेक्षा कर्तव्याच्या कसोटीवर त्यांनी आपले जीवन परीक्षिले होते आणि "मी जे आज सांगतो ते दहा वर्षांनंतर लोकांना पटते ! तेव्हा मला कीर्ती मिळाली नाही, अधिकार मिळाला नाही – याचे मला काही वाअीट वाटत नाही" असे अुद्गार त्यांनी काढले होते. (सा. द. २७३).

सावरकरांचे वरील अुद्गार त्यांच्या दृष्टीने कितीही यथार्थ असले, तरी वर्तमानकाळात त्यांना अमाप लोकप्रियता लाभली नाही, ही वस्तुस्थिती त्यातून सूचित होते. असे का घडले ? अेका दृष्टीने पाहिले तर सावरकरांची थोरवी खरोखरच अपूर्व होती. सावरकरांच्या समकालीन नेत्यांत त्यांच्याअितके सर्वंकष कर्तृत्व, सहस्रनेत्री प्रतिभा, असामान्य धाडस व धैर्य, अमोघ वक्तृत्व, ज्वलंतदे शभक्ती, प्रखर बुद्धिनिष्ठा अित्यादी गुण क्वचित आढळून येतात. भाषा-लिपिशुद्धीपासून साहित्याच्या सर्व दालनांत त्यांनी आक्रमक संचार केला. सावरकरांचे वाङमय वाचल्याशिवाय मराठी सारस्वताचा अभ्यास पूर्ण होअ शकणार नाही, अशा आशयाचे अुद्गार त्यांच्या टीकाकारांनाही काढावे लागले. 'स्थंडिल–संप्रदाय' हा अेक नवीन संप्रदाय मराठी काव्यप्रांतात त्यांनी प्रस्थापित केला. 'वैनायका'सारख्या गरुडझेपी वृत्ताचे वाहन करून मराठी कवितेला त्यांनी संचार करावयास लाविले. औरस अनुभूतीने रसरसलेली सावरकरांची कविता वगळली, तर त्या काळच्या राष्ट्रीय भावनांना व्यक्तवील अशी मराठी कविता आढळत नाही. महाराष्ट्राची बुद्धिमत्ता खडबडून जागी व्हावी असे तेजस्वी वळ त्यांनी आपल्या निबंधांत ओतले. भारताच्या अितिहासाचा, मराठ्यांच्या अितिहासाचा राष्ट्रीय दृष्टीने अेक वेगळा, प्रेरक अर्थ त्यांनी लावला. 'स्वर्गीय स्फूर्तीने' स्फुरलेला वाटावा असा 'हिंदुत्वा'चा दिव्य संदेश त्यांनी दिला. 'ज्ञानयुक्त कर्मा'चा पुरस्कार करून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला व त्याचे राजकीय महत्त्व पटवून दिले. विज्ञान, यंत्र, शस्त्र व सागरी सज्जता यांतील सामर्थ्य ओळखून त्या त्या गोष्टींचा हिरीरीने प्रचार केला. मराठी शब्दकलेवर आपली चिरमुद्रा अुमटविली. 'सावरकरी लिपी' व 'सावरकरी शब्द' यांना मराठी भाषच्या अितिहासात विशिष्ट स्थान प्राप्त झाले. भारतीय राजकारणात 'सावरकर युग' हा शब्दप्रयोग सावरकरांच्या टीकाकारांनीच रूढविला. आंतरराष्ट्रीय राजकारणाची अेक वेगळी दृष्टी भारतीय जनतेला दिली. समकालीन नेत्यांपेक्षा तुलनेने अधिक वाटावा असा देशार्थ त्याग केला, पन्नास वर्षांची अपूर्व अशी शिक्षा भोगण्याची शरीर आणि मन यांची सिद्धता केली, त्रिखंडात गाजणारे साहसी सागर-अुड्डाण केले; आणि हे सारे करीत असताना 'वरं जनहितं ध्येयं' अशा वृत्तीने वागून लौकिक यशाची राख अंगास फासली.

अितके असामान्यत्व दाखवूनही सावरकरांना राजकारण, समाजकारण, साहित्यकारण अित्यादी क्षेत्रांत अमाप लोकप्रियता का लाभली नाही?

सावरकरांच्या या तुलनात्मक अपयशाला अनेक कारणे आहेत. त्यांतील काही वाह्य परिस्थितीत आहेत, तर काही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दडलेली आहेत. १९०६ पासून तो १९२४ पर्यंत –म्हणजे जवळ जवळ अठरा वर्षे– सावरकर भारतीय भूमी व भारतीय जनता यांच्यापासून शरीराने दूर होते. त्यांच्या अैन

तारुण्याचा काळ नृशंस कारागृहात गेला. पुढे १९२७ सालापर्यंत त्यांच्या हालचालींवर अनेक निर्बंध होते. १९२१ ते १९३७पर्यंतच्या पंधरा-सोळा वर्षांच्या काळात म. गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने ब्रिटिश सरकारविरुद्ध दोन-तीन व्यापक लढे दिले होते व त्यामुळे काँग्रेसचे सामर्थ्य वाढलेले होते. काँग्रेस ही भारतीय जनतेची श्रद्धास्थान बनली होती. लो. टिळकादी अनेक भारतीय नेत्यांची पुण्याई काँग्रेसच्या गाठी होती. विविध प्रांतात सत्तासंपादन करण्याइतके लोकसामर्थ्य काँग्रेसच्या मागे उभे होते. या पार्श्वभूमीवर सावरकर राजकारणात उतरले आणि तेही एका बाजूने म. गांधी, पं. नेहरू या लोकप्रिय नेत्यांवर व दुसऱ्या बाजूने जनतेचे श्रद्धास्थान बनलेल्या काँग्रेसवर विरोधी टीकेची आग पाखडीत उतरले. त्यामुळे 'अभिनव भारत' या संस्थेतील सावरकरांचे एका काळचे सहकारीही त्यांच्यापासून दूर गेले. सावरकरांचा वारंवार उद्भवणारा आजारही त्यांची गती रोधीत होता.

पण या परिस्थितिजन्य व राजकीय कारणांपेक्षाही त्यांच्या व्यक्तित्वात दडलेल्या अनेक कारणांमुळे सावरकर मागे पडले. त्यांच्या जहाल व क्रांतिवादी जीवनामुळे सर्वसामान्य भीरू जनता व सनदशीर पंथ त्यांच्यापासून स्वाभाविकपणेच दूर राहिले. त्यांच्या उत्कट हिंदुत्वनिष्ठेमुळे व मुसलमान समाजाबद्दलच्या विरोधी भावनेमुळे भारतातील मुसलमान वर्ग त्यांच्याविरुद्ध उभा राहिला. देव-देवता, धर्म, धर्मग्रंथ इत्यादींसंबंधी सावरकरांचा बुद्धिवाद इतका प्रखर होता की, वर्णाश्रमधर्माभिमानी बहुसंख्य सनातनी वर्ग त्यांचा निषेध करण्याइतका त्यांच्यावर रुष्ट झाला. खुद्द हिंदुमहासभेतील सावरकरांच्या काही अनुयायांनाही त्यांच्या शुद्धीकरण, लष्करभरती इत्यादी चळवळी पसंत नव्हत्या.[1] भाषाशुद्धी व लिपिशुद्धी या सावरकरांच्या वाङ्मयीन चळवळींना पटवर्धनादी साहित्यिकांनी विरोध तर केलाच, पण खुद्द सावरकरांच्या निकट सहकाऱ्यांनाही ह्या दोन्ही चळवळींचा सक्रिय पुरस्कार करता आला नाही. राष्ट्रीय जीवनात साहित्याला दुय्यम-तिय्यम स्थान देण्याची सावरकरांची भूमिका व 'लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या' असे साहित्यकलेला प्रचारासाठी राबविण्याचा संदेश देण्याची त्यांची वृत्ती यामुळे महाराष्ट्रातील लेखकवर्ग सावरकर-विरोधकांच्या गटात जाऊन बसला. इतिहासाला मुरड घालून तो विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी सावरकर जुंपीत आहेत असा समज इतिहास-संशोधकांत पसरल्याने त्यांच्या इतिहास ग्रंथलेखनाची अपेक्षा झाली.

---

१. असे होते सावरकर – पृ. १५०.

काँग्रेसमधील जहाल गटालाही सावरकरांचे क्रांतिमार्ग पसंत नव्हते. १९०६ मध्ये लोकमान्य टिळकांनी सावरकरांच्या 'मित्रमेळ्या' तील तरुणांना या दहशतवादी विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता.

बहुरंगी व समृद्ध व्यक्तिमत्त्व असूनही सावरकरांना विविध क्षेत्रांतून जो विरोध झाला, तो का झाला ? त्यांच्या व्यक्तित्वातच दडलेले अेक कारण असे की, कोणताही विचार, कोणतीही भावना आत्यंतिक पराकोटीला नेअून पोहोचविणे हा त्यांच्या मनःप्रकृतीचा स्वाभाविक गुणधर्म होता. त्यामुळे ते सामान्य लोकांपासून फार पुढे राहिले. सामान्य लोकांच्याच काय, पण त्या वेळच्या पुढाऱ्यांपेक्षाही सावरकर फार फार पुढे अुभे होते. सावरकरांनीच आत्मवृत्तात म्हटले आहे की, " माझे पुढारीपण घेणारा त्या पिढीतील पुढाऱ्यांत कोणीही नव्हता. ते झाडून सारेजण फार फार मागे अुभे राहिलेले असत. " या व्यावहारिक अपयशाचे दुसरे अेक कारण म्हणजे त्यांच्या ठिकाणी असलेला बहिर्मुख वृत्तीचा अभाव. अंदमानात सुमारे बारा वर्षे झिजत पडलेले सावरकर अंतर्मुख न बनले तरच नवल ! लहानपणापासून त्यांना निर्विकार, निःशब्द अेकान्तसुखाची गोडी लागलेली होती. पुढे कारागारात अेकान्ताच्या अतिरेकाने त्यांचे मन अितके अंतर्मुख झाले होते की, 'तेच ते जुने विचार घोळीत बसण्याची भंगड सवय' त्यांच्या मनाला लागली होती. याचा परिणाम म्हणून पुढे लोकव्यवहारात ते तुसडे बनले, हट्टी बनले. त्यामुळे कृत्रिमतेने का होअीना, पण नेत्याने लोकसंग्रहार्थ करावयाच्या अनेक गोष्टी ते करू शकले नाहीत. राष्ट्रीय वा सामाजिक जीवनात ते दुर्दम्य आशावादाने जरी वावरत असत, तरी व्यक्तिगत जीवनातील नैराश्य व 'प्रतिकूल तेच घडेल' अशी अशुभाकांक्षी निराश वृत्ती यांच्यातील द्वंद्वात ते सापडत. कर्त्याचे जहाल राजकीय जीवन आणि जहाल विषय यांमुळे त्यांचे वाङ्मयही फार थोडयांच्या हाती आले व महाविद्यालये नि विद्यापीठे यांमध्ये त्याचा अभ्यासही फार अुशिरा सुरू झाला. सावरकरांच्या जीवनाभोवती गूढतेचे वलय पसरविण्यास अशा काही गोष्टी कारणीभूत झाल्या.

लोकप्रियतेच्या मापाने सावरकरांच्या यशापयशाचे मोजमाप करणे अिष्ट आहे का, असाही अेक प्रश्न हे विवेचन करताना सतत डोळ्यांपुढे अुभा राहतो. 'यशापयश ह्या योगायोगाच्या गोष्टी आहेत' असे सावरकर सांगत असत. सिद्धीच्या मानससरोवरावर क्रीडा करण्याचे भाग्य आपणास लाभणार नाही, याची त्यांना जाणीवही होती. आपले जीवन म्हणजे हिंदुराष्ट्राने फोडलेली अेक किंकाळी आहे. सध्या तरी अवकाशात विलीन होअून जाणारी हिंदुराष्ट्राच्या प्रस्थापनेची ती अेक वल्गना आहे असे ते मानीत होते. आपल्या जीवितकार्याला अेवढाच अर्थ आहे अशी मर्यादा ते ओळखून होते. केवळ वैचारिक क्रांती करण्याचे

कार्य आपल्या प्रक्षोभक साहित्याला करावयाचे आहे याची जाणीव त्यांना होती. सन ८०० ते ९५० या काळात महर्षी देवल व भाष्यकार मेधातिथी यांनी हिंदू समाजाला विजिगीषू करण्यासाठी ज्या स्मृती लिहिल्या, तशा स्वरूपाचे तेजस्वी विचारधन हिंदुसमाजाच्या हाती देऊन जीवित-कार्य संपविण्याची भूमिका तर त्यांनी स्वीकारली नव्हती ना, अशीही अेक कल्पना मनाला स्पर्श करून जाते. अखेर सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या थोरवीचे मूल्यमापन करण्यास भविष्यकाळ खरा समर्थ भाष्यकार आहे. कवी ग. दि. माडगूळकर यांच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर–

"आकाशाहुन विशाल भासे, त्याचे व्यक्तित्व
कर्पुरसे जो जाळी अपुले अवघे कर्तृत्व
चिरंजीव हा हौतात्म्याचा विजयी अभिमान
अितिहासाविण कुणी करावा याचा सन्मान ?"

परिशिष्ट

संदर्भ ग्रंथ

(अ) समग्र सावरकर साहित्य

(१) आत्मचरित्रे

		प्रकाशन–काल
पूर्वपीठिका	... ...	१९५७
सावरकर आत्मचरित्र अर्थात माझ्या आठवणी– आवृत्ती पहिली	...	१९४९
माझी जन्मठेप–द्वितीय आवृत्ती	... संवत	२००३
जन्मठेप : संक्षिप्तीकरण नि प्रस्तावना–प्र. के. अत्रे	...	१९५३
शत्रूच्या शिबिरात–आवृत्ती पहिली	... ...	१९६५

(२) पत्रे व वार्तापत्रे

लंडनची बातमीपत्रे	... ...	१९४०
अंदमानच्या अंधेरीतून (मूळ अिंग्रजी)	... ...	१९२४
पुनर्मुद्रण	...	... १९४१, १९४७

टीप :– प्रस्तुत प्रबंधाचे लेखनकार्य चालू असतानाच स्वतः सावरकरांचे ग्रंथ व लेख प्रसिद्ध होत होते. समग्र-सावरकर-वाङमयाचे आठ खंडही याच काळात प्रकाशित झाले. त्या खंडात सावरकरांच्या बहुतेक प्रकाशित व थोडया अप्रकाशित वाङमयाचा समावेश करण्यात आला. त्याचाही अुपयोग या प्रबंधासाठी करण्यात आलेला आहे. त्यामुळे काही स्थळी सावरकरांच्या ग्रंथांचा वा लेखांचा स्वतंत्र अुल्लेख करण्याअैवजी "समग्र-सावरकर-वाङमया 'च्या खंडांचा अुल्लेख केलेला आहे.

अर्वाचीन मराठी वाङमयाच्या विविध प्रकारांच्या चर्चेच्या अनुषंगाने, प्रस्तावना-परामर्श स्वरूपाच्या लेखनातून व वाङमयेतिहासाच्या निमित्ताने सावरकरांचे व्यक्तिमत्व आणि साहित्य यांविषयी अनेक कमी-जास्त महत्त्वाचे अुल्लेख आलेले आहेत. त्या सर्वांचीच नोंद करण्याच्या अुद्देशाने ही संदर्भ-ग्रंथ-लेख सूची करण्यात आलेली नाही.

(३) चरित्रे

	प्रकाशन काल
जोसेफ मॅझिनी : आत्मचरित्र नि राजकारण–दुसरी आवृत्ती	१९४६
तेजस्वी तारे–पहिली आवृत्ती	१९४९

(४) अितिहास

अैतिहासिक पुरुषांचे अुत्सव का करावे ?	१९४०
अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्य-समर : प्रथमावृत्ती ...	१९६५
सत्तावनचे स्वातंत्र्य–समर : भाषांतरकार–वि. वि. पटवर्धन	१९४७
The Indian War of Independence	1947
Hindu Pad-Padashahi	1942
हिंदुपदपादशाही	१९४७
भारतीय अितिहासातील सहा सोनेरी पाने–भाग पहिला ...	१९५६
भाग दुसरा ...	१९६३
नेपाळी आंदोलनाचा अितिहास, स. सा. वा. खंड ६ वा. ...	१९६४

टीप पुढे चालू–

स्वतंत्रपणे अगर प्राधान्याने आणि विशेषत: प्रबंधाच्या मुख्य सूत्रास धरून सावरकरांवर जेवढे लेखन झाले त्याचीच नोंद येथे केलेली आहे.

सावरकरांच्या व्यक्तिगत जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगी आणि साहित्यकारण, समाजकारण व राजकारण यांतील त्यांच्या विविध कार्यांच्या गौरवार्थ अनेक नियतकालिकांतून व वृत्तपत्रांतून त्यांच्यावर प्रसंगोपात्त लेख, अग्रलेख, स्फुटे, विचारशलाका प्रसिद्ध झाल्या. त्या सर्वांचीच नोंद येथे केलेली नाही.

सावरकरांसंबंधी प्रसिद्ध झालेल्या अनेक स्फुट आठवणी, कविता व त्यांचा प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार यांचा क्वचित अुल्लेख प्रस्तुत प्रबंधात जरी करण्यात आलेला असला, तरी त्या सर्वांची नोंद येथे करण्यात आलेली नाही.

वृत्तपत्रांतून वा नियतकालिकांतून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी वा त्यांच्या साहित्यासंबंधी जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्या लेखांचे स्वतंत्र नाव देण्याअैवजी त्या नियतकालिकांचे व वृत्तपत्रांचे नाव व प्रकाशन-काल अेवढाच अुल्लेख येथे करण्यात आला आहे.

सावरकरांनी लिहिलेल्या अिंग्रजी ग्रंथांचा आवश्यक तेथे अुल्लेख करण्यात आला आहे. पण त्या ग्रंथांच्या भाषांतरित आवृत्तीलाच प्राधान्य देण्यात आले आहे.

(५) निबंध

	प्रकाशन काल
हिंदुत्व–अनुवादक–ना. दा. सावरकर	
द्वितीय आवृत्ती संवत	२००२
Hindutva – Fourth Edition	1949
क्ष किरणे	१९५०
विज्ञाननिष्ठ निबंध	१९५०
जातिभेदोच्छेदक निबंध	१९५०
गांधी गोंधळ	१९४१
हिंदुत्वाचे पंचप्राण–समग्र सावरकर वाङमय खंड ३ ...	१९६४
रणशिंग–समग्र सावरकर वाङमय खं. २	१९६३
सावरकर साहित्य भाग १ ते ५	———
मुद्रक व प्रकाशक, किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी.	

(६) काव्य

चाफेकर नि रानडे यांजवर फटका–प्रथमावृत्ती	१९४६
सिंहगडचा पोवाडा–पुनरावृत्ती	१९४६
बाजीप्रभूचा पोवाडा–पुनरावृत्ती	१९४६
सावरकरांची कविता : संपादक–वा. गो. मायदेव	
पुनर्मुद्रण १४ जानेवारी ...	१९४७
रानफुले : संकलित–आवृत्ती पहिली	१९३४
कमला–तृतीयावृत्ती	१९४७
गोमांतक–आवृत्ती पहिली	१९२४
महासागर; समग्र सावरकर वाङमय खं. ७	१९६५

(७) नाटके

संगीत अु:शाप	१९२७
संगीत संन्यस्त खड्ग	१९३१
संगीत अुत्तरक्रिया–आवृत्ती पहिली	१९३३
आवृत्ती दुसरी	१९५७

(८) कथा

सावरकरांच्या गोष्टी	१९४८
समाजचित्रे	१९५९

(९) कादंबरी

		प्रकाशन काल
काळे पाणी–प्रथमावृत्ती	... ...	१९३७
–पुनर्मुद्रण	... ...	१९४८,१९६०
मला काय त्याचे ?	(चौथी आवृत्ती)	१९५६

(१०) भाषाशुद्धी-लिपिशुद्धी

भाषाशुद्धी	... ...	(शके) १८७९
मराठी भाषेचे शुद्धीकरण	... ...	१९२६
नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन	... ...	१९५०

(११) भाषणे

हिंदूंच्या चळवळींचे ध्येय व धोरण	... ...	१९४०
समग्र सावरकर वाङमय, खंड ४ था	... ...	१९६५
संघटन संजीवनी	... ...	१९४२
स्वातंत्र्यवीर सावरकरांची भाषणे–		
समग्र सावरकर वाङमय खं. ८	... ...	१९६५
हिंदुराष्ट्र-दर्शन	... ...	१९४७
वीर सावरकरांची अभिनव भारत सांगता–		
समयीची अुत्कृष्ट भाषणे	... ...	१९५३
समग्र सावरकर वाङमय, खंड १ ते ८	... ... १९६३,१९६४,	१९६५
समग्र सावरकर वाङमय प्रकाशन समिति,		
महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणे.		

(आ) सावरकरांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे समग्र साहित्य यांवरील ग्रंथांची आणि लेखांची सूची

अधिकारी गो. गो.–बॅ. साबरकर यांचे चरित्र	... ...	१९३७
अधिकारी गो. गो.–सावरकर महाकाव्य (भाग १ ला)	...	१९६३
अत्रे प्र. के.–मराठी माणसे : मराठी मने–आ. प.	...	१९५६
,, ,, ,, आ. चौथी	...	१९६२
अदवंत म. ना. –महाराष्ट्र लक्ष्मी		
... –प्रथमावृत्ती	... ...	१९६३
–पुनर्मुद्रण	... ...	१९६४

	प्रकाशन काल
आठवले रा. म. वॅ. सावरकर : शलाका परिचय	१९३७
करंदीकर शि. ल. –सावरकरांचे सहकारी	१९४७
करंदीकर शि. ल. –सावरकर चरित्र (कथन)	१९४७
करंदीकर शि. ल. –असे होते वीर सावरकर	१९६६
कानडे मु. श्री. –मराठी नाट्य परिषद–अितिहास व कार्य ...	१९६१
कानिटकर बाळूकाका –मी आणि माझे जिवलग स्वातंत्र्यवीर ...	१९५८
कुलकर्णी वि. म. –खाडिलकरांची नाटके ...	अप्रकाशित प्रबंध
कुलकर्णी कृ.पां. –मराठी भाषा, अुद्‌गम व विकास–चतुर्थावृत्ती ...	१९६३
केतकर श्री. व्यं. –महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रथम खंड ...	१९२०
केळकर द. के. –काव्यालोचन–आवृत्ती दुसरी	१९४५
केळकर द. के. – साहित्य विहार	१९४४
केळकर भा. कृ. – सावरकरदर्शन, आ. पहिली	१० मे १९५२
केळकर – केळकर वाढदिवस मंडळ – दुसरी आवृत्ती ...	१९३२
कोल्हटकरांचा लेखसंग्रह, संपादक – वि. स. खांडेकर ...	१९३२
कोल्हटकर चिंतामणराव गणेश – वहुरूपी	१९५७
खांडेकर वि. स. – मराठीचा नाट्यसंसार	१९४५
खेर भा. द. – सावरकर-साहित्य नवनीत – प्रथमावृत्ती ...	१९५८
गाडगीळ न. वि. – माझे समकालीन	१९५९
गोविंदाग्रज – वाग्वैयंती – सा. आ.	१९४९
गोविंदमित्र (गं. दि. घारपुरे) – स्वातंत्र्यवीर श्री. विनायक दामोदर सावरकर यांचे काव्यमय चरित्र ...	१९५७
गोखले द. न. – क्रांतिवीर बाबाराव सावरकर	१९४७
गोखले द. न. – डॉ. केतकर – चरित्र, व्यक्तित्व आणि वाङ्मय यांचा अभ्यास ...	प्रबंध
गोखले मो. शि. – वीर सावरकर	१९४०
चिपळूणकर वि. कृ. – निबंधमाला – तिसरी आवृत्ती ...	१९२६
जोग रा. श्री. – अर्वाचीन मराठी काव्य ... ...जुलै	१९४६
जोशी अ. म. चरित्र-आत्मचरित्र-तंत्र आणि अितिहास ...	१९५६
जोशी प्र. न. – काळे पाणी (संक्षिप्त आवृत्ती) संपादित ...	
जैनेन्द्रका विचार	१९३७
जोशी श्री. कों. – सावरकर जीवनिका	१९६७
देशपांडे अ. ना. – आधुनिक मराठी वाङ्मयाचा अितिहास, भाग २	१९५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ६०१ वि: .....
क्रमांक ..... दों: वि:

	प्रकाशन काल
देशपांडे बालशंकर – मराठीचे मानकरी	१९६४
देशपांडे भा. गं. – मानवेंद्र सावरकर	१९६१
देशपांडे भा. गं. – काळे पाणी (समीक्षण)	—
देशपांडे वा. गो. – वीर विनायक	१९५२
देसाअी वसंत शांताराम – मखमालीचा पडदा	१९३७
पटवर्धन मा. व्यं. – छंदोरचना	१९३७
" " – भाषाशुद्धि–विवेक	१९३८
पळसुले ग. बा. – कमला (सावरकरकृत काव्याचे संस्कृत भाषांतर) ...	१९६२
पळसुले ग. बा. – अग्निजा	१९५८
परचुरे ग. पां. – मुलांचे तात्याराव सावरकर	१९४३
पारनेरकर पु. रा. – आपले हिंदुराष्ट्रपती अर्थात हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर बॅ. विनायक दामोदर सावरकर यांचे संक्षिप्त चरित्र ...	१९४३
पंडित भ. श्री. – आधुनिक मराठी कविता	१९५२
प्रदक्षिणा – शतसांवत्सरिक महोत्सव समिती, सार्वजनिक वाचनालय नाशिक – सुधारून वाढविलेली आवृत्ती ...	१९५६
फडके ना. सी. – प्रतिभासाधन – पा. आ.	१९५९
फाटक न. र. – अठराशे सत्तावनची शिपाअी गर्दी ...	१९५८
बरवे काकासाहेब – मानवधर्म विवेचन	१९५५
बर्वे शं. ना. – स्वातंत्र्यवीर	१९४८
बापट सेनापती – सेनापती बापट वाङ्मय – समग्र ग्रंथ ...	१९३९
भरत नाट्यशास्त्र – अनुवादक – चिं. ग. भानू ...	१९२७
भट वि. म. – अभिनव भारत – अथवा सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था ...	१९५०
भावे ल. शं. – स्वातंत्र्यवीरांचे सागरदिव्य (खण्डकाव्य) ...	१९५६
भोपे र. ग. – स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर यांचे जीवनचरित्र ...	१९३८
माडखोलकर ग. व्यं. – माझे आवडते कवी ... ... जून	१९६५
मालशे स. गं. – आवड-निवड – प्रथमावृत्ती	१९५९
(काव्येतिहास संग्रह) मोरोपंत, प्रकरणे – भाग १ ... शके	१८०५
मंजुमाधव – स्वातंत्र्यवीरास (षष्टयब्दपूर्तिनिमित्त काव्यांजली)	१९४३
रत्नागिरी हिंदुसभेचे पहिल्या पाच वर्षांचे प्रतिवृत्त ...१९२९,	१९३७

	प्रकाशन काल
रानडे स. रा. – स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर ह्यांचे संक्षिप्त चरित्र	१९२४
सावरकर यांच्या आठवणी, संपादन – रा. ल. रेणावीकर ...	१९६२
स्वातंत्र्यवीर सावरकर यांस साहित्यिकांनी अर्पिलेले मानपत्र ...	१९४३
लोंढे सिद्धनाथ माधव : वीरश्रेष्ठ सावरकर	१९२४
वाटवे के. ना. – संस्कृत काव्याचे पंचप्राण	१९४७
वाटवे के. ना. – स्वातंत्र्यसूक्ते – द्वितीय आवृत्ती ...	१९५५
वाटवे के. ना. – रसविमर्श – आवृत्ती पहिली	१९४२
वाळिंबे वि. स. – स्वातंत्र्यवीर सावरकर	१९६७
विनायकाची कविता – चवथ्या आवृत्तीचे संग्राहक व संपादक पंडित भ. श्री.	१९५५
वेदालंकार पं. चंद्रगुप्तजी – स्वातंत्र्यवीर सावरकर ...	१९४०
व्हीनस प्रकाशन – सावरकर विविध दर्शन	१९५८
शारदा – विहार : संपादक गं. भा. निरंतर, दि. वि. देव ...	१९४०
शिखरे दा. न. – बॅ. सावरकरांची भाषणे	१९३९
सरवटे वि. स. – मराठी साहित्य समालोचन	१९३७
सहस्रबुद्धे पु. ग. – स्वभाव-लेखन	१९३८
" " – राजविद्या	१९५९
साठे वि. द. – मराठी नाट्यरचना – तंत्र आणि विकास ...	१९५५
सावरकर काव्यसमालोचन – संपादक वा. गो. मायदेव प्रथमावृत्ती	१९४३
सावरकर सूत्रे – संपादक ग. रं. भिडे, ग. म. जोशी ...	१९४२
स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता	१९४७
हर्षे द. स. – सावरकर दर्शन	१९६६
क्षीरसागर श्री. के. – व्यक्ति आणि वाङ्मय	१९३७

सावरकर विशेषांक

केसरी – अमृतमहोत्सव अंक	...	२७ मे १९५८
केसरी – सावरकर मृत्युंजय दिन पुरवणी	...	१५ जानेवारी १९६१
मुरारी : स्वा. सावरकर विशेषांक	...	जून १९६६
सह्याद्रि – सावरकर विशेषांक	...	जून १९४३
सुमन : स्वा. सावरकर मृत्यंजय विशेषांक	...	जानेवारी १९६१
हिंदु : स्वातंत्र्यवीर सावरकर विशेषांक	...	...२८ मे १९५२

	प्रकाशन काल
हिंदु : वीर सावरकर अंक	२८ मे१९५३
हिंदु : वीर सावरकर विशेषांक	२८ मे१९५६
हिंदु : वीर सावरकर अमृतोत्सव विशेषांक	मे १९५८
भालचंद्र – अभिनव भारत विशेषांक	मे १९५०

वृत्तपत्रे व नियतकालिके

दै. काळ – दिवाळी अंक	१९५०
किर्लोस्कर	...फेबुवारी१९४८

केसरी–

४–८–१९२५,	१८–९–१९३४,	२३–५–१९४१,
७–५–१९४२,	९–११–१९४३,	२५–८–१९४३,
११–२–१९४९,	१७–५–१९४९,	३१–१–१९५०,
२१–२–१९५०,	२६–५–१९५०,	१३–५–१९५१,
२०–५–१९५१,	२९–५–१९५१,	२–५–१९५२,
११–५–१९५२,	१३–१२–१९५३,	२६–१–१९५४,
६–२–१९५५,	१५–२–१९५५,	२८–७–१९५६,
४–५–१९५८,	२५–५–१९५८,	३०–५–१९५८,
११–१२–१९६०,	१५–१–१९६१,	२४–१–१९६१,
२९–१२–१९६१	२७–५–१९६२,	१७–१–१९६३,
२७–५–१९६३,	८–३–१९६४,	१–६–१९६४,
८–५–१९६५,	१०–५–१९६५,	२–१–१९६६,
२८–२–१९६६,	९–३–१९६६,	१०–३–१९६६,
१३–३–१९६६,	२७–५–१९६६,	२९–५–१९६६,
१२–२–१९६७,	२६–२–१९६७,	२७–२–१९६७,
१–३–१९६७,	५–३–१९६७,	१०–५–१९६७,
२८–५–१९६७.		

केसरी– दिवाळी अंक	१९६१,
महाराष्ट्र	२६-८-१९३४
श्रद्धानंद	१० जानेवारी १९२७ ते १० मे १९३०
सकाळ	२१-७-१९३४
लोकसत्ता	२५-५-१९५८
अमृत	जून १९५८
अधिकारी प्रकाशन– सावरकर अंक	शके १८७८

	प्रकाशन काल
आलमगीर	... २३-३-१९५८
चित्तमयजगत	ऑक्टोबर १९२२
नवभारत	जानेवारी १९५४
नवयुग	... ११-५-१९५८
निर्भीड	१५-१२-१९३५
प्रतिभा	१५ जानेवारी १९३६
महाराष्ट्र साहित्य पत्रिका	अेप्रिल १९३८
महाराष्ट्र साहित्य पत्रिका	अेप्रिल, मे, जून १९५८
मंदार– दिवाळी अंक	... १९६१
प्रसाद	ऑगस्ट १९६६
युगवाणी	ऑगस्ट १९५१
रहस्यरंजन	जानेवारी १९६१
वसंत	सप्टेंबर १९६७
विवेक	... मे १९५५
सत्यकथा	... मे १९६६

सह्याद्रि– जानेवारी १९३७, जानेवारी, अेप्रिल, ऑगस्ट १९३८, जुलै १९४३, मे १९५०, डिसेंबर १९६४.

साहित्य	मे १९४९
हंस– दिवाळी अंक	१९६०
वसुधा	जून १९५८
शशि	जून १९५८
हिंदु– हुतात्मा अंक	१० मे १९५२

A. Nicoll : An Introduction to Dramatic Theory 1923
Albright E. M. – Short Story : Its Principles & Structures 1907
Archer : Play-making 1912
Bhide A. S. : Veer Savarkar's Whirlwind Propaganda 1941
Boring E. G. – Foundations of Psychology 1949
Boswell James – The Life of Samuel Johnson 1953
Clark A. M. – Autobiography – Its Genesis and Phase 1935
Chirol, Valentine – Indian Unrest 1910
Chitragupta – Life of Barrister Savarkar 1926,1939
Henry, New-Bolt – Essays and Essayists 1925
Keer Dhananjaya – Savarkar and His Times 1950
Keer Dhananjaya – Veer Savarkar 1966

Mauris Andore' – Aspects of Biography 1929
Millett and Bentley : The Art of Drama 1953
Naik D. G. – Art of Autobiography 1962
Norman L. Munn, 4th Edn. – Psychology 1961
Paramananda Bhai – Story of My Life 1934
Palande N. R. – Source Material for a History of the Freedom Movement in India, Volume II 1958
Priestley J. B. : Essays – Past and Present 1925
Ramarao A. Kulkarni : The English Essay 1928
Ranade R. D. : Mysticism in Maharashtra 1933
Saxena S. P. – Indian Autobiographies 1952
Young India 11-8-1920

सावरकर : जीवनपट

(ठळक घटना)

१८८३ मे २८ भगूर (नाशिक) येथे जन्म.

१८९२ मातृवियोग.

१८९८ अष्टभुजा देवीपुढे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शपथ.

१८९९ वडिलांचा मृत्यू.

१९०० मित्रमेळ्याची स्थापना.

१९०१ विवाह, मॅट्रिक उत्तीर्ण.

१९०२ पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश.

१९०५ परदेशी कपड्यांची होळी, प्रभाकराचा जन्म, बी. ए. उत्तीर्ण.

१९०६ शिवाजी शिष्यवृत्ती, बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला प्रयाण, मॅझिनी चरित्र व सत्तावनचे स्वातंत्र्यसमर या ग्रंथांची पूर्वतयारी.

१९०७ सशस्त्र क्रांतीचे उद्योग व संघटना.

१९०८ लंडन येथे शिवाजी, गुरुगोविंदसिंग यांचे उत्सव, सत्तावनी क्रांति-युद्धाचा भव्य स्मृतिदिन, वडील बंधू बाबाराव यांना भारतात अटक.

१९०९ भारतात पिस्तुले धाडली, बाबारावांना जन्मठेपेची शिक्षा, धिंग्रा प्रकरण, प्रभाकराचा मृत्यू, बॅरिस्टरी उत्तीर्ण पण पदवीस नकार, गांधीजींच्या अध्यक्षतेखाली विजयादशमीस भाषण.

१९१० पॅरिसला प्रयाण, लंडनला येताना अटक, भारताच्या वाटेवर मार्सेलिसनजीक सागरात उडी, मुंबई येथे खटला.

१९११ इंग्रजी राजवटीविरुद्ध सशस्त्र बंडाळीच्या यत्नाबद्दल दोन जन्मठेपांची शिक्षा, अंदमानला रवानगी.

१९१९ येसूवहिनींचे निधन.

१९२० टिळक, गांधीजी, खापर्डे, विठ्ठलभाई पटेल प्रभृतींचे सावरकर सुटके-साठी यत्न, कारागृहात निर्बंध सैल केले.

१९२१ सावरकरबंधूंची अंदमानातून भारतात पाठवणी, अलीपूर व
१९२२ रत्नागिरी येथील बंदिवास, 'माझी जन्मठेप' आणि 'हिंदुत्व' या ग्रंथांची जुळवाजुळव, बाबारावांची सुटका.

१९२३ जम्नादास मेहता प्रभृतींकडून सुटकेचे यत्न, येरवडा कारागृहात गव्हर्नर लॉइड जॉर्ज आणि सावरकर यांची मुलाखत.

१९२४ राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच वास्तव्य करणे या अटींवर सुटका, नाशिकला पहिला जाहीर सत्कार व थैली.

१९२५ कन्या प्रभा हिचा जन्म, अस्पृश्यता निवारण चळवळीला व सामाजिक लेखनाला आरंभ.

१९२७ रत्नागिरी येथे गांधीजी-सावरकर भेट.

१९२८ पुत्र विश्वास याचा जन्म.

१९३० पहिले प्रकट सहभोजन.

१९३१ पतितपावन मंदिराचे उद्घाटन, अस्पृश्यतानिवारण-परिषदा.

१९३२ मुंबईत एका गोऱ्या सार्जंटावर सशस्त्र हल्ला झाला, त्यानिमित्ताने संशयावरून अल्पकाळ कारावास.

१९३७ कूपर-मेहता मंत्रिमंडळाने बिनशर्त मुक्तता केली, पुणे येथे सत्कार, ठिकठिकाणी व्याख्याने, कर्णावती हिंदुमहासभा अधिवेशनाचे अध्यक्षपद.

१९३८ भारतदौरा, मुंबई येथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, भागानगर निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ, नागपूर हिंदुसभा अधिवेशन, मिरवणुकीवर विमानातून पुष्पवृष्टी.

१९३९ भारतदौरा, भागानगर चळवळ स्थगित, व्हॉइसरॉयशी भेट, कलकत्ता हिंदुसभा अधिवेशन.

१९४० द. भारताचा दौरा, मदुरा हिंदुसभा अधिवेशन, सायटिकाचा आजार.

१९४१ नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाची शताब्दी, कवी गोविंदांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण, भागलपूर सत्याग्रह.

१९४२ कानपूर हिंदुसभा अधिवेशन.

१९४३ पुणे येथे षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त भव्य सत्कार व थैली, साहित्यिकांकडून मानपत्र, अमृतसर हिंदुसभा अधिवेशनाचे अध्यक्षपद (सातव्यांदा).

१९४८-४९ गांधीवध खटल्यातून निर्दोष-निष्कलंकरीत्या सुटका.

१९५२ पुणे येथे ' अभिनव भारत ' सांगतासमारंभ.

१९५६ लो. टिळक जन्मशताब्दीचे अध्यक्षपद, पुणे येथे शनिवारवाड्यापुढे भाषण.

१९५७ सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची शताब्दी, दिल्ली येथे सत्कार व भाषण.

१९५८ अमृतमहोत्सव.

१९६१ मृत्युंजय-दिनानिमित्त पुण्यात भव्य सत्कार.

१९६३ नोव्हेंबर ८– पत्नी माई सावरकर यांचे निधन.

१९६६ फेब्रुवारी २६– सकाळी ११ वाजता दादर येथे ' सावरकर-सदना 'त निधन.

१९६६ फेब्रुवारी २७– सायंकाळी प्रचंड अंत्ययात्रा व चंदनवाडीच्या स्मशान-भूमीत विद्युत्दहन.

व्यक्ति-सूचि

अकबर २०६, ३६३
अणे लोकनायक ५८
अत्रे प्र. के. ५४२
अदवंत म. ना ५०५, ५१४, ५२७, ५३५, ५४२
अधिकारी गो. गो. ८
अमीर अमानुल्ला ६७
अय्यर दे. भ. ११५, ११६
अय्यर रामस्वामी ५८, १६४, १९४, ३७९
अरविंद बाबू १६३, २९०
अलीबंधू ६७
अल्ली मुसलीयार ६७
अलेक्झांडर १९८, २७७
अशोक २०८
असफअल्ली ९५, १७५, १७९, १९४
आगरकर २०, ५८६, ५८७
आठवले रा. म. ५४५
आपटे दा. ना. ३१९, ३८४, ३८८
आपटे हरिभाऊ १३४
आंबेडकर २२०, २२६, २४३, २६३, २७६, २८९
आर्चर वुइल्यम ४५४
ऑलब्राइट ५०७, ५०८
एमिल झोला ४४४
ओतूरकर रा. वि. १९४, २११
कर्झन (लॉर्ड) १८
करंदीकर ज. स. १०२
करंदीकर शि. ल. ८, ९, ३३, १०४, १५४, १९३, ३६५
कॅडॉक रेजिनॉल्ड १६०
काटदरे माधव ३४९, ३५०, ३५१
कानिटकर रा. अ. ९६
कानेटकर शं. के. ३२०, ४१८ ४२०
कामाबाई ११४, ११५
कालिदास १३५
कालेलकर काका ३६१, ५७६
क्लार्क मेलव्हिली ८८
काळे गोविंदराव २३९
क्रिप्स स्ट्रॅफर्ड ५७
कीर धनंजय ९, १४, १८, २५, २४२, ३२०, ३४३, ३८७, ४९२
कुटिनो १९४
कुलकर्णी कृ. पां. ३५१
कूपर धनजी शहा ५०
कूपलंड रेजिनॉल्ड ५९
कृष्णवर्मा शामजी ११५, ११६, १७२, १७६, १८०
कृष्णशहा (राजे) २१, ३२, ३४१
केतकर ग. वि. १९५, २४२, ५०५, ५१२, ५१४
केतकर डॉ. २४१, ५००
'केरळकोकिळ'कार १९, १३२, १३५
केशवसुत ३४९
करंदीकर नि. ल. १०४, १५४, १९३, ३६५

केळकर द. के. ३४०, ३६१
केळकर न. चिं. १०४, १५३, १९५, ३११, ३१५, ३२५, ४१८, ४२१, ४२९, ४४१, ४९६, ४९७, ५००, ५६१, ५६९, ५७३, ५८८
केळकर भा. कृ. ९, १०, १०४, १८०, २१८, २८८, ३१५, ३२५, ३८०, ४०५, ४१६, ४२७, ४२९, ४४९, ४५७, ४९३, ४९७
केळकर य. न. ३९५, ३९६, ३९८, ४२६
केळकर विश्वनाथराव ४४
कोकजे रघुनाथशास्त्री २३३
कोल्हटकर चिंतामणराव ४२८, ४२९, ४३१, ४४९, ४५६, ४८५, ५०१
कोल्हटकर, श्री. कृ. ४९३, ५४४, ५४६, ५५८, ५७४
खरे ना. भा. ११७, ४२८
खाडिलकर नाट्याचार्य ४५१, ४५६, ४९७
खांडेकर वि. स. ४५७
खानवेलकर श्री. शं. ४०२
खापर्डे बा. ग. ९६
गॅरिबाल्डी २६, १३४, १५५, १५६, १७७
गाडगीळ न. वि. ५८
गांगुर्डे कृष्णराव ११७
गांधी इंदिरा ५८
गांधी कस्तुरबा ७५, ७६
गांधी महात्मा २५, ४५, ४९, ५३, ५४, ७५, ७६, १०४, १५९, १८२, १९०, १९१, २२६, २८६, २८९, २९०, २९१, ३०१, ३०८, ४३५, ४४१, ४४२, ५२९, ५४०, ५८२, ५९१
गाय आल्फ्रेड १४९, ३५७
गुरुगोविंदसिंह ३०, ३३, ४३, १४५, १५५, २३९, ३६५, ३९९
गोखले कृ. के. ५४४
गोखले द. न. ४, ९२
गोखले नामदार १३७, १५८, १९०, १९७
गोखले मो. शि. ८
गोमकाळे द. रा. ४२९, ४४४, ४४९, ४५५, ४५७, ४९३
गोविंदशाहीर ११५, १८६, ३५०, ३५१, ३५२
गोविंदाग्रज ८७, ३४६, ३५०
गोळवलकर मा. स. ५८
घाणेकर २६
चट्टोपाध्याय वीरेन्द्रनाथ ११५
चतर्जी एन. सी. १५४
चंद्रशेखर जंगबहादूर ३२
चव्हाण यशवंतराव ५६, ५८
चाफेकरबंधू १२, १३, १५, १८, १२८, १४४, १५५, १६३, ३२५, ३४५, ३९९, ४५३, ५४६
चित्रगुप्त ७, ३०, २१२
चिपळूणकर भाऊसाहेब २१, ३४१

चिपळूणकर मालाकार १३५, ३१३, ५४६, ५५१, ५५७, ५५८, ५६१, ५६२, ५६३, ५६४, ५६५, ५६६, ५६९, ५८६, ५८८
चिरोल व्हॅलेंटियन २७, १९४
चौंडेमहाराज २९२
जयकर डॉ. ५७
जॅक्सन ३४, ३६
जॉन ५९
जॉन्सन डॉ. ८७
जीना बॅ. ५३
जैनेन्द्रकुमार ८८
जोग रा. श्री. ३२०, ३५०, ३७९, ३८०, ३८१, ३८४, ४१६, ४१७, ४२०, ४२३, ४२५
जोशी अच्युत ४
जोशी अ. म. ८८, १८०, ३९०
जोशी ग. ना. २१९
जोशी गो. म. २९२, ३०८
जोशी तर्कतीर्थ १५४, २९४
जोशी ना. ग. ३६३, ३८०, ४११, ४१३, ४१६
जोशी वा. म. ५७५
टॉलस्टॉय १३३
टिळक दे. ना. २४६, २४७
टिळक लक्ष्मीबाई २४६, २४७
टिळक लोकमान्य १२, १५, १७, १८, २१, ३९, ५३, ५५, ६१, ८२, १४१, १५६, १५८, २३९, ३९७, ५७२, ५८६, ५८८, ५९१, ५९२
डन डब्ल्यू एच. ८८
डांगे एस. ए. ५८
डेव्हिन जॉन पॅटन ५९
तळवलकर गोपीनाथ ४२९, ४५७, ४९३, ४९७, ५०४
तिवारी ३५०, ३५१
तुकाराम १३१, १३५, २८२, ३८५
दत्त मधुसूदन १३४, २४७
दत्त रमेशचंद्र १९७
दयाळ सु. वि. ५९
दातार वामनशास्त्री ११४
दाभोळकर देवदत्त ३८०, ४००
दामले मो. वि. १५४
दास जितेंद्रनाथ १८१, १८३, १८४
दे शशिमोहन १८१
देवधर सी. आर. ५६०, ५७२
देशपांडे अ. ना. १६५, २१७, २१८, २३२, २६०, २७५, ३४३, ३६१, ३७७, ३९५, ४२९, ४५७, ४९६
देशपांडे भा. गं. ५३५
देसाई गो. आ. ३४४
देसाई व. शां. ४२९, ४४५
देसाई ह. त्र्यं. ११७
धिंग्रा मदनलाल ११५, १२६, ३९९, ४५३
नंदा गुलझारीलाल ५८
नाईक डॉ. ८७, ८८
नाईक व. ना. ३४३, ३४५
नानल य. मो. ५४४, ५६०
नानासाहेब पेशवे २३९, ५५९, ५६८

नानी गोपाळ ११६
नारायणमहाराज २७८, २९२, ३०८
नॉर्मन एलमन. ९२
निरंतर ५७५
नेपोलियन (बोनापार्ट) ९६, १३४, २८२
नेहरू ५४, ५७, ६९, ७५, ७६, ७७, ५९१
पटवर्धन माधवराव ५४३, ५४४, ५४५, ५५०, ५५४, ५५६, ५५७, ५६०, ५६१, ५६५, ५६६, ५६७, ५६८, ५६९, ५७०, ५७५
पटवर्धन वा. ब. १९
पटेल विठ्ठलभाई ४४
पंडित म. श्री. ३१७, ३२०, ३३०, ३४१, ३४९, ३५०, ३५२, ३७९, ३८०, ३९६, ३९७, ४०५, ४०६, ४१५, ४१६, ४२६
परमानंद भाई ९४, ११५
परांजपे शि. म. १२, १५, ८१, ९०, ३११, ३१२, ४२१, ४२२, ५७५
पागे १५, १६, १७९, १८८
पाटसकर ह वि. ५८
पाटील स. का. ५८
पाल निरंजन ३३
पिंगळे हुतात्मा १७२, १७६, १८१, १८३
प्रियोळकर अ. का. ३८०, ३९४, ३९५
प्रिस्टले जे. बी. २१७
प्लुटार्च १९८
प्लेटो १३३
पोतदार द. वा. ९५, १९५
फडके ना. सी. ४१७
फाटक न. र. १९४
फिलिप्स वुईल्यम ५९
बरवे काकासाहेब २४१, २४२, २५१
बर्वे अ. वा. ९५
बॅनर्जी सुरेन्द्रनाथ २६, १३६, १९०
ब्रॅण्डर एस. ५९
वापट पां. म. २४, २९, ११५, ३६३
बारीबाबा ९९, १२२
बालमुकुंद १८१
बेझंट ॲनी १३४
बैरागी वीर १५६
बेरी लॅम्टन ५९
बोस सुभाषचंद्र ५७
भट वि. म. ११५, १७७, १७८
भागवत हरिभाऊ ११७
भाटवडेकर भा. कृ. २०
'भाला'कार ३०५
भावे पु. भा. २१८, २३३, २३५, ३१४
भिडे रा. गो. १८०
भूषण कवी २३९
भोपे र. ग. ८
मगरूडकर जॉन एच. ५९
मॅझिनी २६, २७, १३१, १३४, १५५, १५६, १७५, १७६,

वहाणी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
क्रमांक ...03702... दि: ...1.6.1993...
अ-क्र ...9.6.1993... नोंद दि: 22/2/97

१७७, १७८, १७९, १८०,
१८३, १८४, २१३, २१४,
५४७, ५७९
म्हसकर १५, १६, १००, ११९,
१७९, १८८
माडखोलकर ग. त्र्यं. २४६, २४७,
३१७, ३४३, ३५०, ३५१,
३५७, ३६१, ३६४, ३८०,
३९७, ४०५, ४२६
माडगूळकर ग. दि. ५९३
मायदेव वा. गो. ३१५, ३१८,
३१९, ३८७
मालशे स. गं. १०४, १८८, ३१५,
३१८, ३२१, ३४९, ३८०,
३९६, ३९९, ४०२, ४०५,
४१०, ४१६
मॉंतेन २१७
मिल १३३, ३८५
मिल्टन १९, १३२, १३६, ३९६
मुकर्जी हिरेन ५८
मेकॉले १०३, १३१, १३६
मेथा जमनादास ४४, ५०
मेहेता अशोक १९४
मोघे शं. ना. ११७
मोरोपंत १३, १९, १३०, १३२,
१३५, १३९, १८७, ३९७,
४०१, ५५७, ५६३, ५६८,
५६९
मोर्वा ८७, १६९, १७०, १८०
येशू खिस्त १३२
रघुनाथपंडित ३०१
रवीन्द्रनाथ १३४, २९०, ३३०,
३८५, ४००, ४०१
राजभोज ३१३
राजवाड़े वि. का. ५५८
राजाजी ५३, ५८, १९४
राजू श्रीराम १७२, १७६, १८०,
१८१, १८२, १८४
राणा सरदारासिंग २१
राधाकृष्णन ५६, ५८,
रानडे न्यायमूर्ती २०, ३९७,
५८६
रानडे रा. द. ३९३
रानडे स. रा. ७
रामकृष्ण परमहंस १३४, १४३
रामदास १३२, १७६, २०५,
२३९, २८२
रामन टी. ए. ५९
रेच इव्हिलिन ५९
रेझा सय्यद हैदर १५०, १५१
लॉईड जॉर्ज ४४
लिनलिथगो लॉर्ड ५७, ६३
लुई फिशर ५९
लोहिया राममनोहर ५८
वर्मा ग्यानचंद ३६१
वाटवे के. ना. ९३, १२२, १२४,
३१२, ३२१, ३२५, ३३५,
३४९, ३८०, ४०३, ४०४,
४०६, ४०९, ४१७, ४२६
वामनपंडित १३२
वायली कर्झन ३४
वासुदेव बळवंत १२८
विजापुरे ५६०
विनायक ३४९, ३५०, ३५१
विवेकानंद १३२, १३४
वेजवूड कर्नल ७०

मराठी ग्रंथ संग्रहालय
६३ ३ ३. क्र. ७७६६

वेलकर एम. बी. ५०
वैद्य शंकर ३९६
शंकराचार्य २९२, २९३, ३०१, ३०६, ३०८, ३८५, ३९१
शास्त्री श्रीनिवास ५७, १०२,
शिखरे दा. न. ३८०
शिंपी राजाराम ११४
शिवाजी १६, २६, ४३, ८४, १४५, १५५, १७७, २००, २०५, २३९, ३४६, ३५२, ३६७, ५५०, ५५१, ५५६, ५५७, ५६३, ५६८, ५६९
शेक्सपिअर १९, १३२
श्रद्धानंद ४८, ४९, २९१
श्रीकृष्ण १५५, २२३, ३५२, ३८५, ३८७, ३८८, ४५५, ४७०, ४७१
श्रीबंदा वीर ३९९, ४००, ४०१, ४१०
श्रीरामानुजाचार्य ३८५, ३९१
सक्सेना एस. पी. १७१
सप्रू तेजबहादूर ५७
संन्याल शचींद्रनाथ १८१, १८३
सरंजामे २८१, २८२, २९२
सरवटे वि. सी. ४५७
सरदेसाई रियासतकार २०५
सवाई माधवराव २१०, २१६, ४०१
सहस्रबुद्धे पु. ग. ९३, १७०, १७७, २३५, ४४८
साठे वि. द. ४४९
साधुदास ३७७, ३९५, ४२६
सानेगुरुजी ३५०, ३५१
सावरकर अण्णा (वडील) १०३, १०९
सावरकर गणेशपंत (बाबाराव) ११, १२, ३४, ३७, ५६, ९०, १०७, ११०, १६१
सावरकर नारायणराव ३४, ३८, १११, १५६, ३३६, ४३२
सावरकर बापूकाका १०३, १०९
सावरकर बाळाराव ८३
सावरकर माई (पत्नी) २२, ५६, ९७, ११२, ११३, ३३७, ३४०
सावरकर येसूवहिनी ३४, ९५, ९८, ९९, १००, १०७, १११, १३३, १८४, ३४०, ३८९, ३९६, ४३१
सावरकर राधाबाई (आई) १०९
सावरकर शांता ११२
स्कॉट १९, १३२
सिन्हा सत्यनारायण ५८
सिंमिंग्टन डी. ५०
स्मिथ व्हिन्सेंट १९८
स्पेन्सर १३३, १४०, १८६
हक्क फजलूल २७६
हडसन ५९
हरदास बाळशास्त्री ३२०, ३८०, ४२६
हार्वे १८९
हुकूमसिंग सरदार ५८
हेमचंद्रजंग राणा ४७
होमर १३, १३२
क्षीरसागर श्री. के. ५४४, ५६१, ५६५, ५७०, ५७१, ५७२
ज्ञानेश्वर १३१, १३५, ३८५

REFBK-0017764